

धनंजय रामचंद्र गाडगीळ

३ मे १९७१

१० एप्रिल १९०१

# ध. रा. गाडगीळ लेखसंग्रह

खंड १

संपादक

सुलभा ब्रह्मे

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे

गोखले अर्थशास्त्र संस्था, मराठी प्रकाशन १६ वे

© १९७३, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे.

किंमत चाळीस रुपये

प्रकाशक
वि. म. दांडेकर
गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणे ४

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

# प्रास्ताविक

प्रा. ध. रा गाडगीळ यांनी आपल्या सुमारे पन्नास वर्षांच्या अभ्यासपूर्ण सार्वजनिक जीवनात अनेक ग्रंथांखेरीज विविध आर्थिक, सामाजिक व राजकीय विषयांवर विपुल लिखाण केले. हे संकीर्ण लिखाण एकत्र आणून समग्रपणे यथावकाश प्रकाशित करण्याची संस्थेची योजना आहे. प्रा. गाडगीळांनी इंग्रजीबरोबर मराठीतही पुष्कळ लिखाण केले. किंबहुना त्यांचा पहिला प्रकाशित लेख मराठीतच आहे. 'इंग्लंडातील हिंदी खलाशांची स्थिती' हा लेख त्यांनी १९२३ साली इंग्लंडात विद्यार्थी म्हणून असतानाच लिहिला. तेथपासून शेवटपर्यंत ते मराठीतून सातत्याने लिहीत होते. त्यावरून त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम आणि आर्थिक-सामाजिक प्रश्नांची चर्चा जनसामान्यापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा आग्रह स्पष्ट होतो.

मराठीतील त्यांचे समग्र लिखाण आम्ही दोन खंडांत प्रकाशित करीत आहोत. त्यांपैकी हा पहिला खंड आहे. भारतीय व जागतिक प्रश्नांवरील लेख या खंडात समाविष्ट आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भातील लेख दुसऱ्या खंडात येतील. या दोनही खंडांचे संपादन सुलभा ब्रह्मे यांनी केले आहे. संपादकीय क्लिष्ट कामाखेरीज एक विस्तृत संपादकीय प्रस्तावनाही त्यांनी प्रस्तुत खंडास दिली आहे. या खंडात आलेल्या विषयांची सूची श्री श्रीपाद जोशी यांनी तयार केली आहे.

प्रस्तुत संग्रहातील लेख वृत्तपत्रे, नियतकालिके, लेखसंग्रह यांमध्ये अगर पुस्तिकारूपाने प्रसिद्ध झालेले आहेत. हे लेख पुनर्मुद्रणासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल संबंधित प्रकाशकांची, तसेच प्रा. गाडगीळांचे आकाशवाणीवरून झालेले भाषण प्रसिद्ध करण्यास अनुमती दिल्याबद्दल संचालक, आकाशवाणी यांची संस्था आभारी आहे.

वाढत्या महागाईमुळे प्रकाशनाचे काम दिवसेंदिवस अवघड होत आहे. ग्रंथांच्या किमती वाचकवर्गाच्या आटोक्याबाहेर गेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने प्रस्तुत ग्रंथास अनुदान देऊन प्रकाशनाचा पंचवीस टक्के खर्च सोसल्याने किंमत काहीशी सुसह्य ठेवणे शक्य झाले आहे. या अनुदानाबद्दल संस्था मंडळाची आभारी आहे.

**वि. म. दांडेकर**
संचालक

१५ ऑगस्ट १९७३
गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणे ४

३ स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता ? १४३
४ 'हिंदी अर्थशास्त्र' : ग्रंथपरीक्षण १५१
५ 'भारतीय अर्थशास्त्र' : ग्रंथपरीक्षण १५७
६ हिंदी अर्थशास्त्राचा पाया १६३
७ टिळकांचा आर्थिक व्यवहारवाद १७२
८ आर्थिक इतिहासाची साधने १७८

विभाग ३ : भारताच्या आर्थिक समस्या

१ ग्रामसंघटनेचा एक निमसरकारी प्रयत्न १९९
२ हिंदी जमाखर्चाचे भवितव्य २०५
३ स्वदेशीचे महत्त्व २०८
४ आर्थिक परिस्थिती व चलनव्यवस्था २१४
५ हिंदी जकात-मंडळाची नवीन घटना २२१
६ सरकारी जमाखर्चाची अंदाजपत्रके २२४
७ लँकाशायर आणि हिंदुस्थान २२८
८ हिंदी कंपन्यांची 'मॅनेजिंग एजन्सी' उर्फ व्यवस्थापक-मंडळ पद्धती २३१
९ ग्रामदान २४१
१० 'ग्रामदानाची प्रयोगभूमी' : प्रस्तावना २५४
११ आयात-निर्यात धोरणात निश्चिततेची आवश्यकता २६०
१२ भाववाढ व नियोजन २६४
१३ भारताचे युद्धकालीन आर्थिक धोरण २६८
१४ युद्धजन्य परिस्थितीत राज्यविकास-योजनांचे भवितव्य २७२
१५ संरक्षणनिधी व राष्ट्रीय बचत योजना २७६
१६ भावनियंत्रण आणि सरकारी उपाययोजना २८०
१७ केंद्रीय अर्थमंत्र्यांची नवी करवाढ योजना २८४

विभाग ४ : अर्थव्यवहाराचे नियोजन

१ आर्थिक व्यवहाराचे नियोजन २९१
२ युद्धकालीन नियंत्रणे व युद्धोत्तर योजना ३११
३ आपले आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य ३१६
४ गरीब व अप्रगत देशांचा आर्थिक विकास ३३६
५ पंचवार्षिक योजनेचे समीक्षण ३४२
६ भारताचा आर्थिक विकास ३६४
७ योजना व तिची प्रगती ३७६

८ भारतीय नियोजनातील नियोजन-मंडळाचे स्थान ३७९
९ तिसरी पंचवार्षिक योजना : नियोजनाची उद्दिष्टे आणि व्यवहार ३९९
१० आर्थिक विकासाच्या योजना आणि राष्ट्रीय एकात्मता ४०८
✓ ११ जिल्हा विकास योजना : तत्त्वे, पद्धती व अंमलबजावणी व्यवस्था ४१२
१२ ग्रामीण औद्योगीकरण ४२३

## विभाग ५ : भारताच्या राजकीय समस्या

१ हिंदी संघराज्याचे घटक-प्रांत ४२९
२ नवीन प्रांतरचना व उपप्रांतांचे सत्ताधिकार ४३३
३ भारतीय राज्यघटना संघराज्यघटना आहे काय ? ४४१
४ लोकमान्य टिळकांची चतुःसूत्री ४४४
५ समाजसत्तेचे विकेंद्रीकरण ४४८
६ राजसत्तेचे विकेंद्रीकरण व सहकारी अर्थव्यवस्था ४५७
७ राष्ट्रपतींची निवडणूक ४६१
८ लोकमान्यांचे राष्ट्रीय एकात्मतेविषयीचे विचार ४६५
सूची ४६७

काही महत्त्वाच्या जागतिक आर्थिक घडामोडींचा परामर्श घेणारे लेख, पॅलेस्टाईन व जपान यांच्या आर्थिक विकासावरील स्फुट लेख आणि 'भारत आणि चीन' या पुस्तकाची प्रस्तावना यांचा समावेश केला आहे. '**हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास, अर्वाचीन विभाग**' हा ग्रंथ, ह्या ग्रंथावरील परीक्षणांचे परीक्षण, भारतीय अर्थशास्त्रावरील दोन मराठी ग्रंथांची परीक्षणे, स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र असावे काय ह्या विषयावरील चिकित्सक लेख, रानडे व टिळक यांच्या अर्थशास्त्रीय विचारांवरील लेख आणि '**आर्थिक इतिहासाची साधने**'ही पुस्तिका यांचा समावेश दुसऱ्या विभागात केला आहे. तिसऱ्या विभागामध्ये भारताच्या आर्थिक समस्यांचा ऊहापोह केलेले सतरा लेख अंतर्भूत केले आहेत. भारतातील आर्थिक नियोजनासंबंधीचे बारा लेख चवथ्या विभागात घेतले आहेत. भारतीय संघराज्य घटना, राज्य-पुनर्रचना, लोकशाही इत्यादी राजकीय समस्यांवरील आठ लेख पाचव्या विभागात समाविष्ट केले आहेत.

दुसऱ्या खंडामध्ये महाराष्ट्राच्या संदर्भातील विविध लेख, संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न, महाराष्ट्राचे आर्थिक प्रश्न, आर्थिक नियोजन, सहकारी अर्थव्यवहार आणि सामाजिक व शैक्षणिक प्रश्न अशा पाच विभागांत सादर केले आहेत. पहिल्या विभागामध्ये संयुक्त महाराष्ट्राचे अधिष्ठान व भूमिका यासंबंधीचे लिखाण समाविष्ट केले आहे. मुंबई प्रांतातील धान्य परिस्थिती, अन्नधान्याची तूट व भाववाढ यांसारख्या महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनामध्ये सतत उद्भवणाऱ्या प्रश्नांचे वेळोवेळी केलेले विवेचन, तसेच महाराष्ट्रातील जमीनधारणा, सिंचनाच्या समस्या व ग्रामीण विकास या विषयांवरील लेख दुसऱ्या विभागात अंतर्भूत केले आहेत. प्रादेशिक समाज व प्रादेशिक अर्थव्यवस्था, जिल्हाविकास योजनेचे स्वरूप व कार्यपद्धती, विकेंद्रित आर्थिक नियोजन, इत्यादी राज्य पातळीवरील नियोजनविषयक लेख तिसऱ्या विभागात समाविष्ट केले आहेत. सहकारी चळवळीचे समालोचन, सहकारी साखर कारखाने व सहकारी पतपेढ्यांचे व्यवहार, सहकारी खरेदी-विक्री इत्यादी सहकारी अर्थव्यवहाराविषयीचे लेख चवथ्या विभागात येतात. पाचव्या विभागात महाराष्ट्रातील विद्यापीठ शिक्षणाची पुनर्घटना व पुणे युनिव्हर्सिटी कशी असावी हे दोन लेख, ब्राह्मण जातीतील व्यक्तींचे पुढील धोरण हा गांधीवधानंतरच्या जातीय तणावाच्या वेळी लिहिलेला लेख, 'भारत व महाराष्ट्र' हा प्रदीर्घ लेख आणि 'गावगाडा', 'शिंदे लेखसंग्रह' व 'बहुजन समाजातील कर्मवीर' या तीन पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना यांचा समावेश केला आहे. प्रत्येक विभागातील लेख कलानुक्रमे सादर केले आहेत.

## प्रा. गाडगीळ : व्यक्तिमत्त्व

प्रा. गाडगीळ यांचा जन्म १९०१ साली नाशिक येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण नागपूर येथे होऊन १९१६ साली ते सीनियर केंब्रिज परीक्षा उत्तीर्ण झाले. १९१८ ते १९२३ या काळात इंग्लंड-मधील केंब्रिज विद्यापीठात पदवी अभ्यासक्रम पुरा करून त्यांनी एम. लिट. ही पदवी संपादन केली. एम. लिट. पदवीच्या प्रबंधासाठी 'हिंदुस्थानातील औद्योगिक विकास' हा भारतीय जीवनाशी निगडित असा विषय त्यांनी निवडला होता. वस्तुनिष्ठ व चिकित्सक असा हा प्रबंध या विषयावरील साहित्यात मौलिक भर घालणारा प्रमाणग्रंथ म्हणून मान्यता पावला. १९२४ साली हा ग्रंथ ऑक्सफर्ड प्रकाशनाने प्रसिद्ध केला आणि त्या वेळेपासून विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमात त्याला संदर्भ ग्रंथाचे स्थान लाभले आहे. १९४२ साली त्याची चवथी व १९७१ साली पाचवी आवृत्ती (सुधारित) निघाली. इंग्लंडमधील वास्तव्यामध्येच १९२३ साली त्यांनी मराठी भाषेतील आपला पहिला लेख लिहिला आणि तो केसरीमध्ये प्रसिद्ध झाला. या लेखात इंग्लंडमधील हिंदी खलाशयांच्या प्रश्नांची चिकित्सा केलेली आहे.

केंब्रिजमधील अभ्यासक्रम पुरा झाल्याबरोबर प्रा. गाडगीळ मायदेशी परतले. इंग्लंडमधील वास्तव्यामध्ये त्यांचा उदारमतवादी व मानवतावादी दृष्टिकोन दृढमूल झालेला दिसतो. मात्र पाश्चिमात्य जीवनपद्धतीकडे ते आकर्षिले गेले नाहीत. तसेच क्रांतिकारी तत्त्वज्ञानापासूनही ते अलिप्त राहिले. त्यांची भारतीय समाजाबद्दलची आत्मीयता दृढ होती. भारतीय समाजातील अंगभूत दोषांची त्यांना पुरेपूर जाणीव होती व सामाजिक अन्यायाची मनस्वी चीड होती. विरफळलेला व विपन्नावस्थेतील भारतीय समाज एकसंध व समृद्ध होण्यासाठी अभिप्रेत असलेल्या समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होणे हे त्यांनी आपले जीवित-कार्य मानले आणि या प्रक्रियेमधील प्रबोधन हे आपले कार्यक्षेत्र ठरविले. प्रा. गाडगीळांनी संपत्ती वा लौकिक यश हे श्रेय कधीच मानले नाही. रानडे–टिळक–गोखले यांच्या निःस्पृह परंपरेमध्ये स्वदेशात रचनात्मक कार्यात भाग घेण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. अर्थशास्त्राचे अध्ययन, अध्यापन व संशोधन हे त्यांनी आपले प्रमुख कार्य मानले व त्या क्षेत्रात अखेरपर्यंत ते अहर्निश कार्यमग्न राहिले.

## संशोधन क्षेत्रे

१९३० साली प्रा. गाडगीळांच्या पुढाकाराने सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या विद्यमाने गोखले अर्थशास्त्र संस्थेची पुण्यात स्थापना झाली. संस्थेच्या स्थापनेपासून १९६६ पर्यंत त्यांनी संस्थेचे संचालक म्हणून काम पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गोखले अर्थशास्त्र संस्थेस अर्थशास्त्रीय संशोधन क्षेत्रात भारतामधील एक अग्रेसर संस्था असे स्थान प्राप्त झाले. देशातील लहानमोठ्या आर्थिक समस्यांचे स्वरूप व कारणपरंपरा समजून घेण्यासाठी आणि त्यांतील विभिन्न घटकांच्या अन्योन्य संबंधांची उकल करण्याच्या दृष्टीने स्थानिक पातळीवरील वस्तुनिष्ठ आर्थिक अभ्यासाची परंपरा त्यांनी गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये निर्माण केली. अशा संशोधनामध्ये शास्त्रशुद्ध अभ्यासपद्धती आणि चिकित्सक विश्लेषण यांवर त्यांचा विशेष कटाक्ष असे. संशोधनामध्ये शास्त्रीय दृष्टी आणि तर्कशुद्ध बैठक ठेवणे आणि सर्व तपशील परिश्रमपूर्वक व काटेकोरपणे अभ्यासणे याचा त्यांनी पायंडा पाडून गोखले अर्थशास्त्र संस्थेतील संशोधनास भारतामध्ये आणि भारताबाहेरही मान्यता मिळवून दिली. संशोधनाबरोबरच प्रा. गाडगीळांनी पदव्युत्तर विभागात अर्थशास्त्राचे अध्यापन व संशोधनामध्ये मार्गदर्शन हे काम सातत्याने केले. गोखले अर्थशास्त्र संस्थेतील विद्यार्थी–संशोधकांसाठी समाजविज्ञानातील संशोधनपद्धतीविषयक खास अभ्यासक्रम आखून त्यासंबंधीची व्याख्याने देण्याचे काम ते स्वतः विशेष आस्थेने करीत असत.

१९३७–३८ मध्ये प्रा. गाडगीळांनी गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या वतीने वाई तालुक्यामध्ये शेती व्यावसायिकांच्या आर्थिक जीवनाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने एक संशोधनपर पाहाणी केली. ह्या पाहाणीमध्ये शेतीव्यवसायातील जमाखर्चविषयक तपशीलवार माहिती गोळा करण्याच्या अभ्यासपद्धतीची रूपरेषा तयार करण्यात आली. शेतीच्या विकासाकरिता हाती घेण्यात येणाऱ्या सिंचन प्रकल्पांचे यथायोग्य मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने गोखले अर्थशास्त्र संस्थेमार्फत १९३९–४० मध्ये प्रवरा व गोदावरी कालव्यांच्या क्षेत्रातील सिंचित शेतीव्यवसायाचा व त्या भागातील कोरडवाहू शेतीचा तौलनिक अभ्यास करण्यात आला. सिंचन प्रकल्पांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायद्यांचे शास्त्रशुद्ध मापन करण्याचा प्रयत्न ह्या अभ्यासामध्ये केला गेला. नागरी अर्थशास्त्राच्या क्षेत्रात, १९३६–३७ साली पुणे शहराचा नागरी विकास, तेथील उद्योगधंदे, व्यापार व अन्य अर्थव्यवहार आणि सामाजिक संस्था इत्यादींचा तपशीलवार अभ्यास करून प्रा. गाडगीळांनी नगरांच्या सामाजिक-आर्थिक पाहाणीचे नवे दालन उघडले. ह्याच पद्धतीने कोल्हापूर व सोलापूर या शहरांचीही पाहाणी गोखले अर्थशास्त्र संस्थेमार्फत करण्यात आली. ग्रामीण आणि नागरी आर्थिक

जीवनाशी निगडित अशा इतर अनेक विषयांवरील वस्तुनिष्ठ अभ्यासही त्यांच्या मार्गदर्शनाखाली गोखले अर्थशास्त्र संस्थेत पुरे करण्यात आले.

अर्थव्यवस्थेतील निरनिराळ्या घटकांमधील विविधप्रकारच्या अर्थव्यवहारांसंबंधी फारशी आकडेवारी भारतात उपलब्ध नव्हती, अशा काळामध्ये प्रा. गाडगीळांनी स्थानिक पातळीवरील संशोधनपर अभ्यासाची परंपरा सुरू केली. या अभ्यासांची प्रत्यक्ष व्याप्ती मर्यादित असली तरी असे अभ्यास अर्थव्यवहार आणि सामाजिक संबंध यांच्या स्वरूपाबाबतचे अनेक बारकावे व तपशील टिपण्यासाठी उपयुक्त ठरतात. अशा वस्तुनिष्ठ अभ्यासांचे, सम्यक अर्थव्यवस्थेचे सखोल व आशयपूर्ण आकलन होण्याच्या दृष्टीने असलेले महत्त्व जाणून वस्तुनिष्ठ संशोधनावर प्रा. गाडगीळांनी भर दिला. अशा संशोधनाचा उपयोग त्यांनी देशातील आर्थिक समस्यांचे विवेचन आणि धोरणांची मीमांसा करीत असताना सतत केलेला आढळतो.

भारतातील व्यापारी जाती व जमाती, त्यांचे उद्योगधंद्यांतील स्थान व विकास आणि भारतातील उद्योगधंद्यांची रचना व कार्यपद्धती यांवरील त्यांचा परिणाम यासंबंधी एक व्यापक अभ्यास प्रा. गाडगीळांनी हाती घेतला होता. ह्या अभ्यासाचे काही प्राथमिक निष्कर्ष प्रसिद्ध झाले आहेत. मराठेशाहीतील व्यापारीवर्गाचे स्थान व विकास यांचा विचार करता मराठेशाहीला आर्थिक पाया होता काय ह्या मूलभूत प्रश्नाबाबत संशोधन होणे आवश्यक आहे ह्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## प्रचलित समस्यांचा ऊहापोह

प्रा. गाडगीळांनी प्रचलित राजकीय व आर्थिक प्रश्नांवर सडेतोड व बुद्धिनिष्ठ लिखाण सतत चालू ठेवले. १९३० ते १९३७ ह्या काळामध्ये जागतिक व भारतीय प्रचलित आर्थिक घडामोडी आणि समस्या यांचे विस्तृत विवेचन त्यांनी केले. जागतिक मंदीची कारणमीमांसा, चलनव्यवस्थेसंबंधीचे पेचप्रसंग आणि त्यांवरील उपाययोजना, आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध, जर्मनीवरील कर्जाचा बोजा इत्यादींविषयी चिकित्सक लेख त्यांनी या काळात लिहिले. तसेच भारतातील कूळवहिवाट, जमीनमहसूल व तद्विषयक प्रश्न, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, मॅनेजिंग एजन्सी पद्धती इत्यादी विषयांवरही या काळात त्यांनी लिखाण केले. सरकारी अधिकाऱ्यांचे पगार आणि वेतन-श्रेणी यांविषयीच्या आपल्या परखड लिखाणातून भारतातील खासगी उत्पन्नामधील जाचक विषमतेकडे १९३१ सालीच त्यांनी लक्ष वेधले होते. 'आर्थिक व्यवहाराचे नियोजन' हा नियोजनावरील प्रदीर्घ लेख त्यांनी १९३७ साली लिहिला. यामध्ये पाश्चिमात्य भांडवलशाही देशांमधील नियोजनाचा परामर्श घेऊन आर्थिक विकासासाठी नियोजनाची इष्टता व निकड प्रतिपादिली आहे. १९३९ नंतर युद्धजन्य परिस्थितीत भावनियंत्रण आणि नियंत्रित वाटप-पद्धती हे त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय ठरले. या संदर्भात सरकारी सल्लागार म्हणूनही त्यांनी जबाबदारी स्वीकारली होती. अन्नधान्याच्या तुटवड्याच्या परिस्थितीत सक्तीची धान्यवसुली आणि नियंत्रित धान्यवाटपाची निकड त्यांनी आग्रह-पूर्वक मांडली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय उलाढालीच्या उत्पाती परिस्थितीमध्ये प्रा. गाडगीळ कधी गुंतले नाहीत. अभ्यासकाच्या तटस्थ भूमिकेतून त्यांनी प्रचलित समस्यांचे विवेचन केलेले आढळते. १९४७ साली स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अर्थशास्त्रज्ञ या नात्याने प्रा. गाडगीळांचा सार्वजनिक क्षेत्रातील सहभाग वाढला. १९४७ साली 'युद्धकालीन नियंत्रणे व युद्धोत्तर योजना' या लेखामध्ये युद्धकालीन नियंत्रणांच्या आधारे भारतामध्ये नियोजित अर्थव्यवस्था उभारण्यास कसा प्रारंभ करता येईल ह्याचे विवेचन त्यांनी केले. १९४९ साली 'आपले आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य' ह्या व्याख्याना-

मध्ये नियोजनाबद्दलची आपली भूमिका मांडून अशी नियोजित अर्थरचना भारतातील प्रचलित राजकीय-आर्थिक चौकटीत निर्माण करणे कसे दुरापास्त आहे हे त्यांनी स्पष्टपणे दाखविले. व्यापारी व कारखानदार यांच्याकडून समजूतदारपणाची अपेक्षा त्यांना कधीच नव्हती; परंतु राजकीय पुढारी, सरकारी अधिकारी व शिक्षित पांढरपेशा वर्गातील महत्त्वाच्या व्यक्ती यांना परिस्थितीचे यथार्थ आकलन होऊन ते देशाच्या अर्थकारणाची व राजकारणाची धुरा योग्य रीतीने सांभाळतील असा जो आशावाद त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी वाटत होता, तो मात्र भ्रामक ठरला असे त्यांनी म्हटले. सत्ताधिकाऱ्यांचा व धनिकांचा उन्माद कमी होण्याची चिन्हे नाहीत; तो बळावणारच व सत्ता टिकविण्यासाठी, असंतोषाची चिन्हे दडपून टाकण्यासाठी ते इरतऱ्हेचे प्रयत्न करणार असा धोक्याचा निःसंदिग्ध इशारा त्यांनी १९४९ मध्येच दिला होता.

## भारतीय नियोजन

१९५० साली नियोजनाचे पर्व सुरू झाल्यानंतर भारतातील नियोजनविषयक विविध प्रश्नांवर त्यांनी वेळोवेळी विस्तृत लिखाण केले. आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे आणि व्यवहार, भारतीय नियोजनातील नियोजन-मंडळाचे स्थान, नियोजनाची भूमिका, नियोजनाचे यशापयश अशा विषयांवर विवेचनात्मक लेख लिहून भारतातील आर्थिक नियोजनाच्या मर्यादा, नियोजनातील अडसर, त्यामध्ये आवश्यक असलेले बदल इत्यादींविषयी मूलगामी विचार त्यांनी मांडलेले आढळतात. अर्थव्यवस्थेचे नियमन आणि नियंत्रणाची आवश्यकता त्यांनी १९४० सालापासूनच मांडली होती. बडे उद्योगपती व व्यापारी यांच्या अर्थव्यवस्थेवरील पकडीमुळे नियंत्रण व नियमन स्वीकारण्यात कसे अडसर येतात आणि उद्घोषित धोरणांच्या अंमलबजावणीत कोणत्या अडचणी निर्माण होतात हे त्यांनी वारंवार निदर्शनास आणले. १९६२ साली नागपूर विद्यापीठाच्या पदवीदान समारंभप्रसंगी केलेल्या भाषणामध्ये १९४९ साली दिलेल्या धोक्याच्या सूचनेचा त्यांनी पुनरुच्चार केला.

भारतातील समाज-चिंतन व सामाजिक संस्था यांतील उणीवांची त्यांनी सविस्तर चर्चा केलेली आढळते. भारतीय समाजरचनेचे सूक्ष्म व सखोल आकलन आणि परिस्थितीचा वस्तुनिष्ठ व सांगोपांग अभ्यास यांमुळे कोणत्याही समस्येचे विश्लेषण ते सम्यक समाज-अर्थव्यवस्थेच्या संदर्भामध्ये करीत. वेळोवेळी मांडली गेलेली धोरणे व उपाययोजना यांतील दोषस्थळे समग्र परिस्थितीच्या संदर्भात मार्मिकपणे दाखवून ते यथायोग्य अशा सुधारणा सुचवीत. या भूमिकेतूनच त्यांनी निरनिराळ्या सरकारी समित्यांचे सभासद अथवा सल्लागार म्हणून काम केले. कापड गिरणी-कामगार चौकशी-समिती (१९३७–४०), वस्तु-मूल्यनिर्धारण-समिती (१९४७), राष्ट्रीय उत्पन्न मापन-समिती (१९५०–५२), ग्रामीण पत पाहाणी (१९५१–५४) रिझर्व्ह बँकेचे संचालक मंडळ (१९५२–६२), नियोजन मंडळाने नेमलेली अर्थशास्त्रज्ञांची समिती (१९५५) व आर्थिक धोरण सल्लागार समिती (१९६३), अन्नधान्य-धोरण-समिती (१९६६) इत्यादी बहुविध समित्यांचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले. अशी जबाबदारी स्वीकारताना अभ्यासकाच्या भूमिकेतून संबंधित प्रश्नांचे विश्लेषण करणे आणि आपली भूमिका सडेतोडपणे मांडणे ते आपले कर्तव्य मानीत. अशा प्रकारच्या भूमिकेचे संबंधितांकडून कसे स्वागत होईल याबाबत अनिश्चितता असली तरी सामाजिक जीवनाच्या आस्थेमुळे सल्लागाराची जबाबदारी त्यांनी नाकारली नाही. गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या संचालकपदावरून निवृत्त झाल्यानंतर १९६७ साली नियोजन मंडळाच्या उपाध्यक्षपदाची मोठी जबाबदारी त्यांनी स्वीकारली तीही याच भूमिकेतून. नियोजनास वेगळे वळण देणे त्यांना शक्य झाले नाही, याचे कारण प्रस्थापित विचारप्रणालीच्या चौकटीच्या मर्यादांमध्येच शोधावे लागेल. ती चौकट मान्य केल्यामुळे एका विशिष्ट

मर्यादेपलीकडे त्यांनी प्रतिपादिलेली उपाययोजना प्रत्यक्षात अंमलात येणे शक्य होण्यासारखे नव्हते; आणि साहजिकच ते त्यांनाही साधता आले नाही.

## राजकीय प्रश्नांचे विवेचन

अर्थव्यवस्थेबरोबरच संघराज्य घटना आणि घटक राज्यरचना या विषयांचेही त्यांनी चिकित्सक विवेचन केलेले आहे. १९४५–१९४७ मध्ये भारतीय संघराज्याच्या निर्मितीविषयीचे प्रश्न आणि १९४८ मध्ये भारतीय राज्यघटनेच्या मसुद्यातील तरतुदी यांबद्दल त्यांनी विस्तृत लिखाण केले आहे. भारतीय घटनेमधील मूलभूत हक्कांच्या तरतुदींचा विचार करता सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली भाषण-स्वातंत्र्य, संघटना-स्वातंत्र्य आणि संचार-स्वातंत्र्य ह्यांसारख्या महत्त्वाच्या हक्कांबाबत फार मोठ्या प्रमाणात मर्यादा घालण्याचे अधिकार सत्ताधाऱ्यांच्या हाती ठेवण्यात आले आहेत. खासगी मालमत्तेचे हक्क व व्यवसाय-स्वातंत्र्य ह्याविषयीचे हक्क मात्र भारतीय घटनेमध्ये दृढतर करण्यात आले आहेत. अमेरिकेसारख्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या अध्वर्यू राष्ट्रामध्ये आहे त्याहीपेक्षा अधिक व्यापक अशी खासगी मालकी हक्कांची तरतूद भारतीय राज्यघटनेच्या मसुद्यात असल्याचे प्रा. गाडगीळांनी निदर्शनास आणले होते. खासगी मालमत्तेचे एवढे अतिव्यापक हक्क नसूनही अमेरिकेमध्ये अर्थव्यवहाराच्या नियंत्रणात सतत अडथळे निर्माण होत असल्याचे दिसते. मग भारतीय राज्यघटनेतील तरतुदींमुळे तर नुकसानभरपाईचे मोठमोठे हक्क सांगितले जाऊन आर्थिक व्यवहारांचे राष्ट्रीयीकरण आणि इतर समाजहितवादी कार्यक्रमांची कार्यवाही करणे फार अवघड होईल असा इशारा घटना निर्मितीच्या वेळीच प्रा. गाडगीळांनी दिला होता.

लोकशाही निवडणूक पद्धतीबाबतचे विवरण करताना, 'एकसदस्य मतदारसंघातून बहुमताने प्रतिनिधित्व' या पद्धतीचा स्वीकार केला तर प्रत्येक मतदारसंघातील सर्वांत मोठ्या पक्षासच फक्त प्रतिनिधित्व मिळू शकेल आणि लहान पक्षांना देशाच्या राज्यव्यवस्थेत स्थान मिळणार नाही व त्यांची कुचंबणा होईल हे त्यांनी स्पष्ट केले होते. एकसदस्य मतदारसंघ पद्धती स्वीकारल्याने आपला बहुजिनसी समाज एकरूप होईल हा युक्तिवाद त्यांच्या मते फसवा होता. लोकशाही कारभारामध्ये देशातील विविध मतप्रवाहांना स्थान मिळावयास हवे, या दृष्टीने बहुसदस्य मतदारसंघातील प्रमाणित प्रतिनिधित्व पद्धती श्रेयस्कर असल्याचे प्रा. गाडगीळांनी मांडले होते. ह्या पद्धतीमुळे निरनिराळ्या मतप्रणालींस आपापली अस्मिता टिकवून राज्यकारभारात सहभागी होता येते. अशा पद्धतीद्वारे प्रबळ राजकीय पक्षाची हुकूमशाही टाळता येईल व भारतीय बहुजिनसी समाजातील विविधता टिकून राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्यास मदत होईल. परंतु भारतात काँग्रेस पक्ष हा प्रबळ राष्ट्रीय पक्ष असल्याने अबाधित एकछत्री राजसत्ता टिकविण्यासाठी एकसदस्य मतदारसंघ पद्धतीच त्यास श्रेयस्कर वाटून, त्या पद्धतीचा स्वीकार होणार; मात्र त्यायोगे विविध मतप्रवाहांतील तणाव वाढून राजकीय अस्वस्थता वाढेल असा इशारा त्यांनी १९४८ सालीच दिला होता.

भारतीय समाज बहुजिनसी असल्यामुळे भारतीय राज्यघटना ही संघराज्य घटना असली पाहिजे. भारतामध्ये जर लोकशाही नांदावयाची असेल तर स्वभाषेतूनच शासन, न्यायदान इत्यादी राज्यकारभार चालविला पाहिजे आणि यासाठी एकभाषिक लोकसमूहांचे राज्यघटक बनविले पाहिजेत. अशा एकजिनसी राज्यघटकांच्या विविधतेतून येणारी जिवंत, प्रगमनशील आणि समृद्ध एकता हीच चिरस्थायी ठरेल अशी त्यांची धारणा होती. राज्यरचना भाषावार का करावी, राज्यपुनर्रचना करताना, कोणते निकष लावावेत यासंबंधीचे तात्त्विक विवेचन त्यांनी केले आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारे यांचे संबंध समानतेचे हवेत, कोणाचेच दुसऱ्यावर अतिक्रमण होता कामा नये, तरच ते खऱ्या अर्थाने

संघराज्य बनेल आणि या दृष्टीने घटनेच्या मसुद्यातील अनेक तरतुदी कशा बाधक आहेत हे त्यांनी दर्शविले होते. भारतीय घटनेवर ब्रिटिशकालीन राज्यव्यवस्थेतील श्रेणीपद्धतीचा ठसा कायम आहे. भारतीय राज्यघटनेत केंद्र व राज्य यांच्या अधिकार-विषयाच्या याद्या दिलेल्या आहेत. परंतु राज्यांच्या स्वायत्ततेवर अतिक्रमण करणारी अनेक कलमेही घटनेत आहेत. हिंदी राज्यघटनेत राज्याचा राज्यपाल राष्ट्रपतीने नियुक्त करण्याची तरतूद आहे. घटकराज्यांच्या स्वायत्ततेस विशेष बाधक अशी तरतूद म्हणजे आणीबाणीच्या परिस्थिती बाबतची कलमे होत. राज्यांमध्ये आणीबाणीची परिस्थिती जाहीर करणे हे राष्ट्रपतीच्या हातात असून त्या काळातील व्यवस्था चालू ठेवण्याबाबतचे अधिकार संघराज्याच्या कायदेमंडळाला दिलेले आहेत. अशा काळात राज्यसरकारच्या कायदेकानूविषयक क्षेत्रात शिरून कोणतेही कायदे करणे, आपल्या क्षेत्रात पूर्वी नसलेले कर वगैरे लादणे हे सर्व संसदेच्या अखत्यारात येते. अशा तरतुदींमुळे केंद्र सरकारचे सामर्थ्य वाढते असे नाही. परंतु राज्यांच्या अंतर्गत कारभारामध्ये ढवळाढवळ करण्याचा परवाना मात्र केंद्र सरकारला मिळतो. भारतीय घटनेतील अशा तरतुदींचा दुरुपयोग होण्याचा धोका त्यांनी १९४८ मध्ये स्पष्टपणे मांडला होता.

## संयुक्त महाराष्ट्राची भूमिका

संयुक्त महाराष्ट्र हा एक प्रांत का असावा याचे विवेचन त्यांनी १९४१ सालीच केले होते. १९४६ साली राज्यपुनर्रचनेबद्दल विचारमंथन सुरू झाल्यावर संयुक्त महाराष्ट्राबद्दल त्यांनी सहाजिकच विस्तृत लिखाण केले आणि संयुक्त महाराष्ट्राची व्याप्ती आणि सामाजिक व आर्थिक बैठक यांची त्यांनी तपशीलवार मांडणी केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला तात्त्विक अधिष्ठान त्यांनी पुरविले असे म्हणता येईल. विशेषतः मुंबईच्या प्रश्नावरील तर्कशुद्ध विवेचन, राज्यपुनर्रचना मंडळास सादर केलेले अभ्यासपूर्ण प्रस्ताव यांमुळे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमधील त्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरला. संयुक्त महाराष्ट्रातील मुंबई शहराचे स्थान 'मुंबई शहराचे भवितव्य' ह्या आपल्या विस्तृत लेखामधून त्यांनी स्पष्ट केले आहे. मुंबई शहराचा अलगपणे व स्वतंत्र असा विचार केला जातो व त्यामुळे एकीकडे मुंबई शहरातील केंद्रीकरणास उत्तेजन मिळून नागरी समस्या गंभीर होत आहेत तर दुसरीकडे महाराष्ट्रातील अन्य विभागांतील आर्थिक विकासात अडसर निर्माण होत आहेत; हे धोरण महाराष्ट्र राज्याच्या विकासाच्या दृष्टीने आत्मघातकी आहे, म्हणून मुंबई प्रदेशातील आर्थिक केंद्रीकरणास आळा घालणे व विकेंद्रित नागरीकरणाची योजना स्वीकारणे यांची निकड त्यांनी १९४८ सालीच निःसंदिग्धपणे मांडली होती. १९५६ साली महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणातही विकेंद्रित अर्थव्यवस्थेची आवश्यकता त्यांनी पुन्हा आग्रहाने मांडली.

## लोकसहभागाचे महत्त्व

तळच्या घटकांपासून योजनांची आखणी सुरू झाली पाहिजे, समाजाच्या अर्थव्यवहारामध्ये लोकांचा सहभाग असला पाहिजे, यांवर त्यांचा भर होता. जिल्हापरिषदा व सहकाराची जिल्हानिहाय यंत्रणा यांची उभारणी आणि जिल्हानिहाय योजनांची आखणी इत्यादी मार्गांनी लोकशाही विकेंद्रीकरणास मूर्तस्वरूप दिले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. विकेंद्रित अर्थव्यवहार व राज्यव्यवहार यांच्या आधारेच विकासाचे लोण तळच्या घटकांपर्यंत पोहोचविणे शक्य आहे व ह्या प्रक्रियेमध्ये स्थानिक पातळीवर जबाबदारी घेतली जाणे आवश्यक आहे आणि ते शक्यही आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता. लोकांमध्ये आपापल्या समस्यांची बोच असते व त्या सोडविण्यासाठी किमान कुवतही असते. परंतु प्रत्येक स्तरावरील विकासासाठी अनुकूल अशी परिस्थिती मात्र निर्माण करणे

आवश्यक असते. यासाठी निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये व विविध पातळींवर योग्य ते संघटन करणे व अशा संस्थांची घटना आणि कार्यपद्धती विचारपूर्वक आखणे अगत्याचे ठरते. संघटनेच्या कार्यात प्रत्येक व्यक्तीचा सक्रिय सहभाग असला आणि संघटनेतील घटकांनी संस्थेच्या प्रगतीची जबाबदारी उचलली तर विकासाची प्रक्रिया सार्वत्रिक बनेल अशी त्यांची धारणा होती. प्रा. गाडगीळांचा उदारमतवादी लोकशाही दृष्टिकोन विचारात घेतल्यास निरनिराळ्या संस्थांतील त्यांच्या सहभागामागील व कार्यपद्धतीतील भूमिका लक्षात येईल. कोणत्याही सार्वजनिक संस्थेमध्ये त्यांनी जेव्हा जबाबदारी स्वीकारली त्यावेळी त्या संस्थेचे स्वरूप व मर्यादा जमेस धरून व त्यातील विद्यमान व्यक्तींना समवेत घेऊन ते संस्थेचे काम करीत. प्रचलित चौकटीत आवश्यक ते किमान बदल करून संस्थेच्या कार्यास इच्छित गती व वळण कसे देता येईल याबाबत ते प्रयत्नशील असत.

## सार्वजनिक कार्यातील सहभाग

सार्वजनिक कार्यामध्ये सहकारी क्षेत्रातील त्यांचा सहभाग विशेष भरीव आहे. सहकारी क्षेत्रातील त्यांच्या कार्यास पुणे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे एक संचालक आणि नंतर अध्यक्ष म्हणून सुरुवात झाली. १९४६ साली बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालकत्व स्वीकारल्यापासून सहकार हे आर्थिक परिवर्तनाचे साधन म्हणून कसे वापरता येईल या दृष्टीने त्यांनी सहकारी चळवळीसंबंधी विचार मांडण्यास प्रारंभ केला. १९४८ साली त्यांनी 'पीक-कर्जयोजना' विस्ताराने मांडली. तसेच राज्य व जिल्हा पातळीवर स्वयंपूर्ण सहकारी संस्था उभारण्याची आवश्यकताही प्रतिपादिली. 'पीक-कर्ज योजना' कार्यान्वित करण्याचे आव्हान त्यांनी १९६० साली महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी आल्यावर स्वीकारले. या नव्या पद्धतीत रोख रक्कम व बी-बियाणे या रूपात पतपुरवठा होऊन शेतमालाला सहकारी विक्रीसंघामार्फत किफायतशीर किंमत मिळवून देण्याची यंत्रणाही अंतर्भूत होती. सहकारी पतपुरवठा व सहकारी खरेदी-विक्री यंत्रणा यांमध्ये समन्वय साधल्यास शेतकऱ्यांवरील सावकार व व्यापारी यांची पकड ढिली करून त्यांना काहीसे आर्थिक स्वास्थ्य व सुरक्षितता प्राप्त करून देता येईल या दृष्टीने सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या उभारणीत त्यांनी लक्ष घातले. १९४८ साली त्यांनी शेतकऱ्यांच्या सहकारी प्रक्रिया संस्थेची कल्पना मांडली आणि १९४९ साली त्यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना 'प्रवरानगर सहकारी साखर कारखाना' उभारला गेला. केवळ शेतीव्यवसायातील उत्पादनखर्चाचा विचार करून भागणार नाही तर शेतकऱ्यांच्या अन्नवस्त्रादी गरजांचाही विचार व्हावयास हवा म्हणून खावटी कर्जाची सोय केली तरच शेतकरी तग धरू शकेल ही वस्तुस्थिती मांडून त्यांनी या योजनेचा प्रयोग आदिवासी भागात १९६३ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत सुरू केला.

महाराष्ट्रामधील अन्य व्यापक तसेच स्थानिक प्रश्नांमध्येही प्रा. गाडगीळ वेळोवेळी लक्ष घालीत. महाराष्ट्रातील सिंचन व शेतीविकासाच्या प्रश्नांवर डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनच्या विद्यमाने त्यांनी विविध समस्यांवर प्रसंगोपात निवेदने व टिपणे तयार केली होती. महाराष्ट्रात १९५२ मध्ये पडलेल्या दुष्काळाच्या वेळी उभारलेल्या दुष्काळ निवारण समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी पत्करली होती. १९६१ मधील पानशेत आपत्तीनंतर पुण्यातील पुनर्वसनाचा प्रश्न व्यवस्थित हाताळला जावा म्हणून त्यांनी एक खास परिषद बोलावून पुणे शहराच्या योजनाबद्ध वाढीच्या निकडीकडे लक्ष वेधले. महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, नागपूर यांसारख्या महानगरांची वाढ नियंत्रित करण्यासाठी यंत्रणा उभारण्याच्या क्रियेस त्यांनी चालना दिली.

महाराष्ट्रातील सामाजिक समस्यांमध्ये प्रा. गाडगीळांनी खास निर्देशिलेला प्रश्न म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर प्रश्न. महाराष्ट्रीय समाजामधील ब्राह्मणजातीचे परंपरागत विशिष्ट स्थान आणि त्यामुळे

उत्पन्न झालेली विषमता टिकून राहणे हे सर्व त्यांना समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने अनिष्ट वाटे. यात ब्राह्मण जितका सुज्ञपणा दाखवतील त्यामानाने समाजात सद्भावना कायम राखून परिवर्तन घडविता येईल असे त्यांचे मत होते. या दृष्टीने ब्राह्मणांचे आजचे उद्दिष्ट सर्व प्रकारचा अधिकारसंन्यास व क्रमाने शक्यतोवर इतर समाजाच्या सामाजिक व आर्थिक दर्जावर येणे हे असले पाहिजे असे त्यांनी आवर्जून मांडलेले आढळते. याबरोबरच बहुजनसमाजामध्ये शिक्षणाचा प्रसार होणे व त्याची प्रगती घडून येणे ते अगत्याचे मानीत. अशा कार्याबद्दल त्यांना आत्मीयता होती. या भूमिकेतूनच रयत शिक्षणसंस्थेशी त्यांचे सतत निकटचे संबंध होते.

## लोकशिक्षण व लोकभाषा

शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रादेशिक विद्यापीठाच्या स्थापनेची आवश्यकता त्यांनी १९२७ सालीच 'पुणे युनिव्हर्सिटी कशी असावी' हा लेख लिहून प्रतिपादिली होती. पुणे विद्यापीठाची घटना व रचना कशी असावी यासंबंधीच्या विचारमंथनात त्यांनी प्रारंभापासून पुढाकार घेतला. पुणे विद्यापीठाच्या प्रस्थापनेपासून विद्यापीठाच्या कार्यामध्ये ते क्रियाशील होते. १९६६–१९६७ मध्ये दीड वर्ष ते पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी होते. विद्यापीठाने प्रत्यक्ष शिक्षण व संशोधनाचे कार्य करावे अशी विद्यापीठाची रचना व कार्यपद्धती असावी यादृष्टीने त्यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच विद्यापीठाने लोकशिक्षणाची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे अशी त्यांची भूमिका असल्याने बहिःशाल व्याख्यान-माला आयोजित करण्याबाबत त्यांनी विशेष आस्था दाखविली होती. उच्च पातळीवरील शिक्षणही मातृभाषेतून व्हावे, त्यासाठी पुणे विद्यापीठाने खास पुढाकार घ्यावयास हवा आणि त्यादृष्टीने परिश्रमपूर्वक व योजनापूर्वक पाउले उचलावयास हवीत याबद्दल त्यांचा विशेष आग्रह होता.

सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये सर्व जनतेचा सहभाग असावा अशी त्यांची धारणा होती. यामध्ये लोकशिक्षणास फार महत्त्वाचे स्थान प्राप्त होते आणि लोकभाषेचे महत्त्व अनन्य-साधारण ठरते. यादृष्टीने प्रचलित सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांचे स्वरूप लोकांपर्यंत पोहोचवावे यांकरिता ते प्रयत्नशील असत. विविध सामाजिक समस्यांसंबंधी सुबोध विवेचन जर मराठी भाषेतून उपलब्ध झाले तरच ते लोकांपर्यंत पोहोचेल, म्हणून प्रा. गाडगीळांनी मराठी भाषेतून आस्थेने व सातत्याने लिखाण केले व व्याख्याने दिली. मराठीमधून लिहिताना अगर बोलताना कोणत्याही तऱ्हेचा निष्काळजीपणा त्यांना खपत नसे. विषयाची परिपूर्ण जुळणी व सुसंगत मांडणी यांवर त्यांचा विशेष भर असे. शास्त्रीय विचाराच्या मांडणीसाठी आशयपूर्ण शब्द वापरून शुद्ध मराठीत लिखाण झाले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असे. यथार्थ अर्थशास्त्रीय परिभाषा निश्चित करण्यासाठी प्रा. गाडगीळ कसे प्रयत्नशील होते हे त्यांच्या लिखाणातून दिसून येते. पंचेचाळीस वर्षांच्या त्यांच्या लेखनकालावधीत मराठीतील अर्थशास्त्रीय परिभाषा कसकशी प्रगल्भ होत गेली याचे दिग्दर्शन त्यांच्या लिखाणातून होते. स्वभाषेतून जास्तीत जास्त विचारधन उपलब्ध व्हावे ह्याबाबत ते उपक्रमशील असत. गोखले अर्थशास्त्र संस्थेचे 'अर्थविज्ञान' हे त्रैमासिक ज्या वेळी सुरू झाले त्यावेळी प्रत्येक अंकात एकतरी लेख कोणत्या ना कोणत्या भारतीय भाषेत लिहिलेला असावा आणि प्रत्येक लेखाचा सारांश हिंदी भाषेत द्यावा ही प्रथा त्यांनी अगत्याने सुरू केली होती.

## प्रा. गाडगीळांची वैचारिक भूमिका

प्रा. गाडगीळ यांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांवरील लिखाण विस्तृत, बहुविध आणि सखोल असे आहे. प्रा. गाडगीळांची वैचारिक भूमिका समजून घ्यावयाची आणि तिचे विश्लेषण

करावयाचे म्हटले तर गेल्या पन्नास वर्षांतील बदलत्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर त्यांनी वेळोवेळी मांडलेल्या विचारांचा सांगोपांग परामर्श घ्यावयास हवा. परंतु हा एक स्वतंत्र अभ्यासाचा व संशोधनाचाच विषय होईल. असे सविस्तर विवेचन प्रस्तावनेच्या कक्षेत असत नाही. तेव्हा येथे प्रा. गाडगीळांच्या वैचारिक भूमिकेचे स्थूलमानाने विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्थशास्त्र हा प्रा. गाडगीळांचा प्रमुख अभ्यास-विषय होता. आर्थिक, सामाजिक व राजकीय समस्या ह्या एकाच समाज-जीवनाच्या समस्या असल्याने व त्या परस्परांशी निगडित असल्यामुळे त्यांचा एकत्रित विचार होणे आवश्यक आहे असे ते मानीत. इतिहासाचा त्यांचा सखोल अभ्यास होता. आर्थिक-सामाजिक परिवर्तन ही एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे आणि कोणत्याही काळातील आर्थिक-सामाजिक समस्यांचे विश्लेषण विशिष्ट समाजाच्या इतिहासाच्या संदर्भात झाले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. भारताच्या आर्थिक इतिहासाचा सखोल अभ्यास व निरनिराळ्या आर्थिक-सामाजिक पाहाण्यांचा प्रत्यक्ष अनुभव यांतून देशाच्या सामाजिक-आर्थिक रचनेबद्दलच्या त्यांच्या जाणिवा प्रगल्भ होत गेल्या. प्रत्येक प्रश्नाबाबतचा सांगोपांग विचार आणि त्यासंबंधातील प्रत्यक्ष प्रत्यंतर यांमुळे त्यांचे लिखाण केवळ तार्किक पातळीवर न राहता अनुभवांच्या आधारे सघन होत गेल्याचे आढळते.

## समाजाचे एकसंधीकरण

भारताच्या आर्थिक-सामाजिक समस्येच्या संदर्भात प्रा. गाडगीळांची वैचारिक भूमिका ही, विघटित समाजाचे एकसंधीकरण, राजसत्तेचे विकेंद्रीकरण आणि लोकाभिमुख आर्थिक विकास-तत्त्वांचा सुसूत्र अवलंब या त्रिसूत्रीवर अधिष्ठित होती असे स्थूलमानाने म्हणता येईल. प्रा. गाडगीळांच्या मते भारतीय संस्कृतीचे प्रधान वैशिष्ट्य म्हणजे भारतीय एकात्मभावना ही एकराज्याच्या कल्पनेशी कधीच निगडित झालेली नव्हती. तसेच भारतीय एकात्मतेच्या भावनेचा संबंध विशिष्ट धर्माशी अगर पंथाशीही नव्हता. कोणताही इतिहास अगर भाषा यांवरही भारतीय परंपरा अधिष्ठित नाही. विविधतापूर्ण आणि कोणत्याही एकाच विशेषाबद्दल अनाग्रही असे भारतीय एकात्मतेचे स्वरूप आहे. भारतीय परंपरेमध्ये अनेक समाजांचा समावेश आहे; आणि यांतील काही समाजांचे अस्तित्व संपुष्टात आले तरी उर्वरित समाजांच्याद्वारा भारतीय परंपरा टिकून राहते.

एकात्मतेबरोबरच भिन्नत्वाची भावना हे भारतीय समाजाचे दुसरे वैशिष्ट्य. आज भारतीय समाजात सर्वच प्रकारच्या भिन्नत्वाच्या कल्पना प्रभावी आहेत. जातीबद्दलची उच्चनीचत्वाची भावना आहे, पोटजातीबद्दलचा अभिमान आहे व त्याबरोबरच प्रादेशिक व भाषिक भिन्नत्वाच्या कल्पनांचा पगडा आहे. प्रादेशिक व भाषिक भिन्नत्वाच्या कल्पना नित्य साहचर्याच्या अभावी निर्माण होतात. एकाच प्रदेशातील लोकांत जाती, पंथ, धर्म इत्यादींमुळे आलेले भिन्नत्व मात्र याहून निराळ्या प्रकारचे होय. असल्या भिन्नत्वाच्या कल्पनांमुळे समाज दुबळा होतो. उच्चनीचत्वाच्या भावनांची यात भर पडल्यास समाजात दुफळी व बेकी अधिकच वाढते. अशा विघटित भारतीय समाजातील जाती, धर्म, पंथ इत्यादी भेदांचे महत्त्व कमी होण्याचा मार्ग म्हणजे प्रादेशिक समाजाच्या एकतेचे महत्त्व पटणे आणि निकटवासीयांचा समाज शक्य तितका एकजिनसी बनून, शेजारधर्माची कल्पना व्यापक बनणे हा होय. असे केले तरच भारतीय समाजाचे खरे स्वरूप विभिन्न प्रादेशिक एकजिनसी समाजांच्या संघराज्याच्या रूपाने दृग्गोचर होईल आणि विविधत्व असले तरी मूलभूत परंपरा व संस्कृती यांतील एकता मानणारे हे सर्व समाज असतील अशी प्रा. गाडगीळांची धारणा होती.

## राजसत्तेचे विकेंद्रीकरण

राजसत्तेचे विकेंद्रीकरण हे प्रा. गाडगीळांच्या वैचारिक भूमिकेतील दुसरे महत्त्वाचे सूत्र. भारतीय

परंपरेत धर्मसत्ता, अर्थसत्ता आणि समाजसत्ता या शासनसंस्थेची सार्वभौमता मानीत. परंतु शासनसत्तेला त्या अंकित नव्हत्या. भारतीय समाजामध्ये निरनिराळ्या क्षेत्रांतील स्वायत्तता मान्य केलेली होती. समाजाचा समतोल राखण्यासाठी ही स्वायत्तता टिकून राहणे फार महत्त्वाचे आहे. तसेच विविध क्षेत्रां-मधील स्वायत्ततेबरोबरच निरनिराळ्या श्रेणींमधील सत्तेचा समतोल महत्त्वाचा आहे. समाजातील प्रत्येक घटक व्यक्तीची कुटुंब, गाव, प्रदेश, राष्ट्र अशा विविध श्रेणींतील संस्थांबद्दल विशिष्ट कर्तव्ये असतात आणि विशिष्ट प्रकारची निष्ठा असते. या सर्व संस्थांची अधिकार–क्षेत्रे प्रायः निरनिराळी असतात. आणि जोवर एका श्रेणीचे दुसरीवर अतिक्रमण होत नाही तोवर विविध संस्थांबाबत असलेल्या विशिष्ट निष्ठा सांभाळून व्यक्तीस कारभार करता येतो. गावे, शहरे यांसारख्या श्रेणींचे अधिकार–क्षेत्र अवास्तव वाढल्यास अराजक माजण्याचा संभव असतो. तर राष्ट्रीय शासनाने इतर श्रेणींवर हुकूमत गाजविण्यास सुरुवात केल्यास हुकुमशाहीचा धोका उत्पन्न होतो. म्हणून सुसंवादी समाज–जीवनाकरता विविध श्रेणींची कार्यक्षेत्रे स्वायत्त राहणे आवश्यक आहे. या दृष्टीने राजसत्तेचे विचारपूर्वक विकेंद्रीकरण करून विविध श्रेणींच्या अधिकार-क्षेत्रांच्या मर्यादा आखणे व त्या सांभाळणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

भारतामध्ये राजकीय सत्तेचे हस्तांतर शांततापूर्ण रीतीने झाले. राष्ट्रीय सरकार स्थापन झाले; परंतु शासन-व्यवस्थेमध्ये मात्र फारसा बदल घडून आला नाही. आपली राजसत्ता टिकविण्याच्या दृष्टीने ब्रिटिशांनी निर्माण केलेली केंद्रित शासनव्यवस्था अथवा नोकरशाही स्वातंत्र्यानंतरही तशीच टिकून राहिली. म्हणून आज भारतीय नोकरशाहीत जातिबद्ध समाजातील वैशिष्ट्यपूर्ण निराळेपण, व वर्गीय समाजातील विषमता प्रतिबिंबित झालेली दिसते. परिणामी सरकारी धोरण आखताना शासना-तील वरिष्ठ अधिकारीवर्गाचे हितसंबंध पाहिले जातात आणि कनिष्ठ श्रेणी दुर्लक्षिलेली राहते. जनतेला विश्वासात घेण्याऐवजी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रतिष्ठेच्या जपणुकीस अग्रक्रम देण्यात येतो.

## लोकाभिमुख आर्थिक विकास

प्रा. गाडगीळांच्या वैचारिक भूमिकेतील तिसरा घटक म्हणजे लोकाभिमुख आर्थिक विकास. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत एक महत्वाचा बदल घडून आला. तो म्हणजे आर्थिकदृष्ट्या प्रबळ गटांचे वाढते वर्चस्व आणि सरकारी अधिकारी, राजकीय पुढारी व प्रबळ आर्थिक गट यांचे वाढते संगनमत. उद्योगधंद्यांच्या नियंत्रणाचे ज्यांना अधिकार आहेत असे शासना-धिकारी आणि राजकीय पुढारी व राजकीय पक्ष आणि अर्थसत्ताधारी यांमध्ये परस्पर देवाणघेवाणीचे व्यवहार संभवतात. वाढत्या राष्ट्रीय संपत्तीमधील अधिकाधिक वाटा मिळविण्यासाठी विभिन्न वर्ग आणि गट यांच्यांत चुरस चालते. ह्या चुरशीमध्ये सहाजिकच बलशाली गटास मोठा वाटा मिळविणे शक्य होते आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटांची ससेहोलपट होते.

आर्थिक विकास लोकाभिमुख असेल तरच राजकीय व सामाजिक स्थैर्य लाभू शकेल. अशा स्थैर्या-साठी देशातील आर्थिक धोरण दोन प्रकारे यशस्वी होणे आवश्यक असते. एकतर, समाजातील सर्व स्तरांना किमान स्वास्थ्य लाभण्याच्या योजना सरकार अमलात आणीत आहे असे जनतेला वाटले पाहिजे. आणि दुसरे, बहुसंख्य जनता हालअपेष्टा भोगत असता धनिक वर्गाच्या चैनीला निदान आळा बसत आहे असे स्पष्ट दिसले पाहिजे. अशा प्रकारचे आर्थिक धोरण संमिश्र अर्थव्यवस्थेत अमलात आणणे शक्य आहे; परंतु त्यामध्ये अनेक पथ्ये अभिप्रेत आहेत असे प्रा. गाडगीळांचे मत होते.

संमिश्र अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक प्रगती घडवून आणताना खासगी उद्योगधंद्यांतील अनिश्चिततेचा भाग कमी करणे हे फार महत्त्वाचे ठरते. यासाठी नियमनाद्वारा किमती स्थिर राखणे आणि बाजारपेठ वाढती राहील अशी परिस्थिती निर्माण करणे आवश्यक असते. तसेच उत्पादनाची योजनाबद्ध रीतीने

वाढ होण्यासाठी सरकारी मदत, प्रोत्साहन व संरक्षण इत्यादींचा अवलंब करणे जरूर असते. त्याचबरोबर खासगी उद्योगधंद्यांचे क्षेत्र ठरवून देणे आणि त्यांच्यावर योग्य नियंत्रण ठेवणेही आवश्यक असते. परंतु भारतीय नियोजनात नियंत्रणे आणि साहाय्य-योजना ह्यांचा सुयोग्य वापर करण्यास भारत सरकार असमर्थ ठरलेले दिसते. एका बाजूला खाजगी क्षेत्राकडून अतिनियंत्राणाच्या तक्रारी येतात तर दुसऱ्या बाजूला बडे उद्योगपती विकास योजनांचा फायदा फार मोठ्या प्रमाणात उठवत असूनही त्यांवर निर्बंध घालण्यास सरकार तयार नसल्याचे दिसते.

उत्पादन, पतपुरवठा आणि किमतींची पातळी ह्याबाबत सरकारी धोरणाची एकसूत्रित आखणी आणि अंमलबजावणी यावर योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचे यशापयश अवलंबून असल्याने या क्षेत्रातील नियंत्रणावर प्रा. गाडगीळांचा विशेष कटाक्ष होता. यामध्ये उत्पादनाबाबत अग्रक्रम ठरविणे आणि उद्योगांमधील केंद्रीकरणाला आळा घालणे अभिप्रेत आहे. पतपुरवठ्याचे नियंत्रण करणे आणि देशातील एकूण भांडवलाची चणचण लक्षात घेऊन वास्तव दराने ते निरनिराळ्या उत्पादकवर्गास नियोजित धोरणानुसार उपलब्ध करून देणे, विशेषतः सट्टेबाजीकडे ते वळणार नाही याबाबत खबरदारी घेणे, यासाठी बँकांच्या व्यवहारांवर सामाजिक नियंत्रण घालणे आवश्यक आहे. या संदर्भातच उद्योगधंद्यांतील आड-व्यवहारांवर आळा घालण्यासाठी हिशेबतपासणीच्या व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली होती. भांडवलाचा ओघ सट्टेबाजीकडे न वळू देता उत्पादनाकडे वळविण्याच्या दृष्टीने व जनतेचे राहणीमान टिकविण्याच्या दृष्टीने किमतींवर प्रत्यक्ष नियंत्रणे बसवून भाववाढ रोखण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी विशेष भर दिला होता. शेतीव्यवसायातील अस्थिरता कमी करण्याकरिता व शेतीव्यवसायाला योग्य ते प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने प्रमुख शेतमालांचे भाव नेमून देणे आणि प्रमुख शेतमालांची नियंत्रित दरात सरकारी खरेदी, साठवणूक आणि वाटपयंत्रणा उभी करणे ह्यांवरही प्रा. गाडगीळांचा विशेष भर होता. परंतु अशा नियंत्रणामुळे आजच्या काही प्रबळ गटांच्या हितसंबंधास धक्का पोचेल. यामुळे काटेकोर नियंत्रणाच्या योजनांना सरकारकडून मान्यता मिळणे कठीण आहे असेही त्यांनी ध्वनित केले आहे.

भारतासारख्या विकसनशील देशातील अर्थव्यवहाराच्या नियोजनामध्ये उत्पादनाच्या तंत्राची सुयोग्य निवड करणे महत्त्वाचे आहे. औद्योगीकरणाच्या स्वरूपाचा विचार करताना भारतातील भांडवलाची टंचाई लक्षात घेऊन जादा रोजगार पुरविण्याच्या दृष्टीने श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब करणे आवश्यक आहे. आधुनिक उत्पादनतंत्राच्या दृष्टीने अनिवार्य ठरेल तेथेच फक्त मोठ्या भांडवलप्रधान कारखान्यांना मुभा देण्यास हरकत नसावी. अर्थात अशा कारखान्यांवर समाजाचे नियंत्रण राहिले पाहिजे. आपल्या औद्योगिक विकासामध्ये लघुउद्योगांना महत्त्वाचे स्थान देणे आवश्यक आहे. देशातील औद्योगिक वाढ भौगोलिक व आर्थिक अशा दोन्ही दृष्टींनी विकेंद्रित स्वरूपात होईल असे उत्पादनतंत्र आणि औद्योगीकरणाचे व नागरीकरणाचे धोरण स्वीकारणे अगत्याचे आहे यावर प्रा. गाडगीळांनी वेळोवेळी भर दिलेला आहे.

जपानमधील आर्थिक प्रगतीचा इतिहास भारताच्या संदर्भात त्यांना उद्बोधक वाटे. मेजी राजवटीपासूनच्या जपानमधील आर्थिक प्रगतीमध्ये तेथील धुरीणांची जबाबदार वागणूक, लोकांमधील शिस्त व संयम आणि देशासाठी झीज सोसण्याची तयारी ह्या सामाजिक मूल्यांचा मोठा वाटा होता. दुसऱ्या महायुद्धानंतर विकेंद्रित अर्थव्यवहारावरील भर, भांडवलउभारणीसाठी देशांतर्गत प्रयत्न, उद्योगधंद्यांचे क्रमशः आधुनिकीकरण, शेतीवरील अवलंबितांना किमान संरक्षणाची व स्थैर्याची तरतूद अशा तऱ्हेचे आर्थिक धोरण व अर्धस्वायत्त निगम, सहकारी संघ, आणि स्थानिक कार्यकर्त्यांचे प्रयत्न अशा तऱ्हेचे संघटन यांच्या आधारे जपानमध्ये लक्षणीय आर्थिक विकास घडून आला.

## संमिश्र अर्थव्यवस्थेतील अंतर्विरोध

भारतीय अर्थव्यवस्थेत अशा प्रकारची धोरणे कागदोपत्री नोंदली गेली असली तरी प्रत्यक्षात ती कार्यान्वित झालेली दिसत नाहीत. तसेच भारतीय समाजामध्ये प्रगल्भ सामाजिक जाणिवांचा अभाव दिसून येतो. परिणामी अर्थसत्ता व राजसत्ता यांचा उपयोग जे प्रबळ आहेत त्यांच्याच समृद्धीसाठी केला जातो. म्हणूनच आज भारतात आपणास एका बाजूला मोठ्या शहरांतून चैन व संपत्तीचा दिमाख वाढताना दिसत आहे तर दुसऱ्या बाजूला दारिद्र्यपीडित वर्ग व अविकसित प्रदेश आर्थिक विकासापासून वंचित राहिलेले दिसत आहेत. संमिश्र अर्थव्यवस्थेमध्ये नियंत्रित अर्थव्यवस्थेतील 'लालफीत' आणि मुक्त अर्थव्यवस्थेतील शोषण या दोन्ही गोष्टी टाळावयाच्या असे उद्दिष्ट मानले जाते खरे; पण आज भारतात अशी परिस्थिती आहे की आर्थिक वाढीस पुरेशी गती मिळत नाही; ती अडखळत आहे, आणि आर्थिक विषमता वाढत आहे व परिस्थिती स्फोटक बनत आहे.

संमिश्र अर्थव्यवस्थेत आर्थिक वाढीच्या प्रक्रियेमध्ये सामाजिक न्यायास स्थान देता येणे शक्य नाही हे मान्य करणे म्हणजे साम्यवादाच्या अंतिम विजयाची अपरिहार्यताच मान्य करण्यासारखे होईल असे प्रा. गाडगीळांनी म्हटले आहे. भारतातील आजच्या चौकटीत आहे तशीच परिस्थिती टिकून राहणार अशी खात्री झाली तर अशा व्यवस्थेचा अव्हेर करावा अशीही त्यांनी भूमिका घेतली होती. परंतु ग्रामीण क्षेत्रातील कूळकायदे करताना सरकारने मालकी हक्कांबाबत अतिआग्रही भूमिका घेतलेली नाही. तसेच कमाल भूधारणाविषक कायद्यामध्ये विभाजनाविषयीचे प्रगतिपर विचार अभिप्रेत आहेत आणि या कृषिसुधारणा कायद्यामुळे ग्रामीण विभागात निर्माण झालेला हा ध्येयवाद ग्रामीण विभागापुरताच मर्यादित राहणार नाही अशा अपेक्षेमुळे संमिश्र अर्थव्यवस्थेबाबत ते आशावादी होते. याबरोबरच, सत्तेचे संतुलन बदलल्यास योजनेच्या धोरणात इष्ट बदल घडवून आणता येतील असा त्यांचा विश्वास होता. यासाठी राजकीय सत्तेचे लोकशाही विकेंद्रीकरण, प्रादेशिक विकास योजना आणि सहकारी अर्थव्यवस्था यांचा त्यांनी सतत पाठपुरावा केला. यायोगे समाजातील व अर्थव्यवहारातील जे स्थानिक घटक आहेत त्यांसाठी एकसूत्री योजना आखून, टप्प्याटप्प्याने त्या संकलित करीत राष्ट्रीय पातळीवरील योजनेस आकार द्यावा असा क्रम त्यांना योग्य वाटे.

## प्रादेशिक नियोजन

प्रादेशिक विकास योजनेची तीन प्रमुख उपांगे त्यांना अभिप्रेत होती. एक म्हणजे विशिष्ट प्रदेशातील उत्पादक घटकांची उत्पादनक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन व मदतीच्या योजना आणि ज्यांच्यापाशी उत्पादनाची साधने नाहीत अगर कसब नाही अशांसाठी खास योजना व्यापक प्रादेशिक विकास योजनेत अंतर्भूत करणे. दुसरे, प्रदेशातील विविध उद्योग व व्यवसायांच्या वृद्धीसाठी पोषक अशा वाहतूक, वीज, पाणीपुरवठा, शिक्षण इत्यादी सोयी उपलब्ध करून देणे. आणि तिसरे, प्रदेशाचा सातत्याने विकास होण्याच्या दृष्टीने तेथील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संधारणाच्या आणि संवर्धनाच्या योजना प्रादेशिक योजनेत अंतर्भूत करणे. विशिष्ट प्रदेशाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने प्रादेशिक विकास योजनेत बिगर-शेतकी रोजगार वाढविणे महत्त्वाचे आहे. तसेच या विकास योजनांमध्ये सर्व स्तरांतील लोकांना सहभागी होता यावे आणि त्यांना विकास योजनेचा फायदा मिळावा यांसाठी आवश्यक त्या संघटना बांधण्याचे महत्त्व त्यांनी आग्रहाने प्रतिपादिले आहे.

महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासाची प्रक्रिया पाहता, सहकारी साखर कारखानदारी ही प्रादेशिक विकासास प्रेरक ठरल्याचे आढळते. यायोगे पारंपारिक ग्रामीण व्यवहारांमध्ये बदल घडून आले. नवीन सघन वर्ग ग्रामीण विभागात निर्माण झाला. शेतकी आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये परस्परपूरक संबंध

वाढीस लागले; आणि प्रादेशिक अर्थव्यवस्था गतिमान बनली. प्रत्येक प्रदेशातील भौगोलिक व नैसर्गिक वैशिष्ट्यांचा विचार करून आणि तेथील संभाव्य प्रेरक उद्योगांचा अभ्यास करून, त्यांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले आणि त्यांच्या वाढीसाठी आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून दिल्या तर प्रादेशिक अर्थव्यवस्थेच्या विकासास चालना देता येईल. अशा प्रकारे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्थानिक लहान-मोठ्या शक्ती निर्माण होऊन देशातील आर्थिक, राजकीय सत्तेचा समतोल बदलण्यास मदत होईल आणि मध्यवर्ती केंद्रीकरणास मर्यादा घालता येईल. निरनिराळ्या लोकसमूहांनी आणि प्रदेशांनी सरकारी मदतीच्या साहाय्याने आपली उत्पादनशक्ती आणि संपत्ती वाढविल्यास आजच्या केंद्र सरकारच्या वाढत्या वर्चस्वाला आळा बसू शकेल अशी त्यांची भूमिका दिसते.

## सहकारी अर्थव्यवस्था

प्रा. गाडगीळांना सहकारी चळवळीचा सर्वसमावेशक व अत्यंत व्यापक असा आवांका अभिप्रेत होता. ग्रामीण अर्थव्यस्थेवरील सावकार व व्यापारी यांचा पगडा कमी करण्यासाठी कृषिव्यवसायामध्ये किमान पक्षी सहकारी पतपुरवठा व सहकारी खरेदी-विक्री यंत्रणा उभारण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली होती. सहकाराचे क्षेत्र विस्तृत करून शेती उत्पादन आणि औद्योगिक उत्पादन हे सहकारी यंत्रणेद्वारे संलग्न व्हावेत आणि औद्योगीकरणामध्ये प्राथमिक उत्पादकांचा सहभाग असावा यांवर त्यांचा भर होता. तसेच ग्राहक सहकारी संस्थांचे देशव्यापी जाळे निर्माण करून कृषी व औद्योगिक संघटनांशी त्यांचे प्रत्यक्ष दुवे जोडले गेले पाहिजेत व अशा रीतीने अर्थव्यवस्थेमधील मध्यस्थांचे व मक्तेदारांचे अडसर दूर करून उत्पादक आणि ग्राहक यांचे परस्पर हितसंबंध लक्षात घेऊन अर्थव्यवस्था संघटित करावी असे त्यांनी प्रतिपादिले आहे. अशा संघटना तालुका व जिल्हा पातळीवर उभारून राज्य पातळीवर त्यांच्या कार्यांचे एकसूत्रीकरण केले जावे. निरनिराळ्या राज्यांतून विविध पातळींवर आणि सर्व क्षेत्रांमध्ये सहकारी संघटनांचे व्यापक जाळे निर्माण केल्यास राजसत्ता व अर्थसत्ता यांचे विकेंद्रीकरण परिणामकारकरीत्या घडविता येईल असा त्यांचा विश्वास होता. अशा रीतीने विकेंद्रित सहकारी घटकांच्या आधारे सहकारी लोकराज्याची संकल्पना त्यांनी मांडली होती.

संमिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी संस्थांना स्थान मिळवून द्यावयाचे असेल व त्यांचे बळ वाढवावयाचे असेल तर त्यासाठी खासगी क्षेत्रातील अर्थव्यवहारांचे नियमन व नियंत्रण आवश्यक ठरते. परंतु मक्तेदारी उद्योग व बडे व्यापारी यांची अर्थव्यवस्थेवरील पकड लक्षात घेता आणि राष्ट्रहितासाठी स्वहितास ते मुरड घालतील असा संभव नसल्यामुळे त्यांना शह देण्यासाठी पर्यायी सत्ता-केंद्रे निर्माण केल्याविना त्यांचे नियमन करणे कसे शक्य आहे? शेतकी क्षेत्रातील विखुरलेल्या शक्ती सहकारी संघटनेखाली एकत्रित आणून सत्तेचे काहीसे संतुलन करता यावे असे प्रा. गाडगीळांच्या लिखाणातून ध्वनित होते. अधिकारीवर्ग, शासक व मध्यम वर्ग हे उद्योगपतींशी संगनमत करून आपले स्थान टिकविणे व जीवनमान उंचावणे यांत मशगूल न राहता राष्ट्रभावनेने प्रेरित होऊन आपली राष्ट्रीय जबाबदारी जाणतील व वागणूक संयत ठेवून आजच्या शक्तिशाली गटास नियंत्रण घालण्याचा प्रयत्न करतील अशी त्यांची ह्या वर्गाकडून अपेक्षा होती. परंतु संमिश्र अर्थव्यवस्थेमध्ये मक्तेदारी उद्योग व बडा व्यापार, मध्यम वर्ग आणि सहकारी यंत्रणेतील शक्तिशाली बनलेला शेतकरी वर्ग यांचे एकमेकांस शह न बसता, संगनमतच झाले तर फार मोठ्या संख्येने असलेला तळचा वर्ग अधिकच भरडला जाण्याचा संभव आहे. कारण पारंपरिक समाज-अर्थव्यवस्थेत मिळणारे संरक्षण आज कमी झाले आहे. तर नवीन अर्थव्यवहारांचा फायदा प्रायः वरच्या वर्गासच मिळत आहे. यामुळे तळचा वर्ग अधिक असुरक्षित बनला आहे. तळच्या

वर्गांची हलाखी वाढू नये म्हणून कायदेशीर तरतुदी, खास सोई-सवलती, मजुरांच्या व कारागिरांच्या सहकारी संघटना, ग्राहक-सहकारी संघ इत्यादींद्वारे तळच्या वर्गास किमान संरक्षण द्यावे, हे त्यांना जरुरीचे वाटे.

## लोकशाहीचा अर्थ

भारतातील आजच्या आर्थिक व राजकीय परिस्थितीत खरी लोकशाही प्रस्थापित होणे शक्य आहे काय असा प्रश्न त्यांनी उपस्थित केलेला आढळतो. लोकशाहीत अभिप्रेत असलेली निवडणुका, सार्वत्रिक मतदान यांसारखी बाह्य लक्षणे भारतामध्ये आढळतात. परंतु लोकशाहीचे खरे मर्म असे की लोकशाही व्यवस्थेमध्ये समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या सुप्त शक्तींचा विकास होण्यासाठी सर्वांना समान संधी मिळणे, समाजातील सर्व व्यवहार आपल्या भागीदारीने चालला आहे असे लोकांना वाटणे, ही खरी लोकशाही आहे असे सांगून आज चीनमध्ये लोकशाहीची बाह्य लक्षणे आढळत नसली तरी लोकशाहीची अनेक खरी लक्षणे चीनला जाऊन आलेल्या निरीक्षकांना तेथील समाजव्यवस्थेत प्रतिबिंबित होत असलेली आढळतात असे त्यांनी मांडले. भारतामध्ये आपली पारंपारिक उच्चनीचता आणि आर्थिक विषमता हे खऱ्या लोकशाहीच्या निर्मितीतील मोठे अडसर आहेत असे त्यांनी म्हटले आहे. चीनमधील पुढाऱ्यांची साधी राहाणी, उपभोगातील उधळमाधळ टाळण्याचा कटाक्ष, गरीब आणि मागासलेल्या वर्गास मदत करण्याची शासनाची दृष्टी ही सामाजिक मूल्ये आणि उपलब्ध मनुष्यबळाचा उत्पादनासाठी योजनाबद्ध उपयोग करणे व उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण हे आर्थिक विकासाबाबतचे धोरण यांचे महत्त्व त्यांनी निर्देशिले होते. भारतामध्ये अशा प्रकारच्या धोरणांना तत्त्वतः मान्यता मिळेलही, परंतु विचारांत क्रांती घडून आल्याशिवाय व्यवहारात तसे दृश्य दिसणार नाही असे त्यांनी प्रतिपादिले होते. अखेर हा प्रश्न राष्ट्रीय चारित्र्याचा व धुरीणांच्या वृत्तीचा आहे असे त्यांनी सूचित केले आहे.

## नैतिक अधिष्ठानाचे महत्त्व

भारतीय समाजाच्या विकासाच्या वाटचालीमध्ये समाजातील कोणती मूल्ये पोषक आहेत व कोणते अडसर आहेत याचे सविस्तर विवेचन प्रा. गाडगीळांनी केलेले आढळते. त्यांच्या मते आधुनिक काळातील हिंदू पुढाऱ्यांस आपल्या पुरातन वैचारिक परंपरेत दोन मोठी वैगुण्ये आढळली. एक म्हणजे, ऐहिक जीवनास गौण मानण्याच्या प्रवृत्तीमुळे नित्य व्यवहाराचा सूक्ष्म अभ्यास, त्याबद्दलची कळकळ किंवा धडपड ह्यांस असावे तितके महत्त्व नव्हते. दुसरे असे की व्यक्तिगत मुक्तीच्या महत्त्वामुळे समाजधर्म, सामूहिक कर्तव्ये यांवर भर देण्यात आला नव्हता. संन्यासमार्ग अयुक्त ठरविणे हे नव्या युरोपीय कल्पनांच्या अगर तत्त्वज्ञानाच्या आधारे करता आले असते, पण तसे कोणी केले नाही. उलट आपल्या परंपरेतील मूळ ग्रंथांचाच बदलता अर्थ लावण्याचा मार्ग पसंत केला व खरा श्रेष्ठ मार्ग म्हणून आपला नवीन 'निष्काम कर्मयोग', 'अनासक्ति योग' इत्यादी संज्ञांनी त्यांनी तो संबोधिला. जुन्या परंपरेला धरून विचार केल्यामुळे संन्यासमार्ग श्रेष्ठ न मानला तरी एका प्रकारे संन्यस्तवृत्ती सुटली नाही, अलिप्तता कायम राहिली. असेच काहीसे समाज-विचाराबाबतही घडले. आपला देश किंवा समाज याविषयी विशेष निष्ठा अगर कर्तव्य यांवर कोणी भर दिला नाही. अलिप्तपणा व सामूहिक जीवनास गौण लेखण्याची प्रवृत्ती आजही टिकून राहिलेली आहे. हे सारे समाज-विकासाच्या मार्गातील अडसर आहेत असे त्यांचे मत होते.

आधुनिक युगातील विशेष प्रभावी कल्पनांपैकी लोकशाही वगैरे काही कल्पनांचा आपण स्वीकार

केला पण भांडवलशाही समाजमूल्यांचा किंवा समाजवादी तत्त्वज्ञानाचा आपण स्वीकार केला नाही. वास्तविक आपल्याकडे प्रत्यक्षात भांडवलशाही अर्थव्यवस्थाच चालू आहे व आपले भांडवलशहा इतर भांडवलशहांपेक्षा जास्त लोभी, स्वार्थी व नीतिबंधने न जुमानणारे आहेत, ह्या वस्तुस्थितीकडे त्यांनी लक्ष वेधले होते. निरनिराळ्या तऱ्हांच्या व श्रेणींच्या विलोभनाची तरतूद केल्यासच अर्थव्यवस्था नीट चालू शकते हा आधुनिक भांडवली अर्थशास्त्राचा मूलभूत सिद्धांत आहे. अशा प्रकारच्या व्यक्तिगत विलोभनावर फार भिस्त ठेवली तर भांडवलशाहीतील ठळक दोष टाळता येणार नाहीत. तेव्हा विलोभनाचे कार्य अंशतः तरी धर्म-नीतिकल्पनांद्वारा साधता आले तर ते हितावह ठरेल. जुन्या संस्कारांमुळे संपत्तीच्या विषयी काहीशी अलिप्त वृत्ती अजून आपल्या समाजातील काही वर्गांत टिकून आहे. ही वृत्ती टिकून राहिल्यास सरकारी व सहकारी अर्थव्यवहार सचोटीने चांगला करणे सुलभ होईल. आज आपणांस अर्थव्यवहार व संपत्तिसंचय यांचे योग्य ते महत्त्व मान्य केले पाहिजे; परंतु त्याचबरोबर व्यक्तिगत संचयाचे अगर श्रीमंतीचे विलोभन फार वाटता कामा नये. हे सर्व कायद्याने करावयाचे झाल्यास ठिकठिकाणी दंडाचा वापर अभिप्रेत राहतो. दंडाचा वापर किमान व्हावा, या दृष्टीने नीतिकल्पनांच्या आधारे व्यक्तिगत संपत्तिसंचयाचे विलोभन कमी करणे श्रेयस्कर होय. उत्पादनांची साधने व त्यापासून उद्‌भूत झालेली संपत्ती वा सत्ता यांचा संयमशील वापर करणे यास सामाजिक मूल्य म्हणून मान्यता मिळाली तर अनेक आर्थिक कलहांची धार नष्ट होण्यास मदत होईल. नीतिकल्पना व समाजमूल्ये यांच्या आधारे समाज–शिल्पाचा विचार केल्यास समाजस्वास्थ्याच्या व सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने ते उपकारक ठरेल. भारतीय समाजातील नीतिमूल्यांना नवीन सामाजिक आशय देऊन विकेंद्रित राज्यव्यवहार, सहकारी अर्थव्यवहार, आणि सहिष्णु समाजव्यवहार यांवर अधिष्ठित अशा नवसमाजाच्या निर्मितीकडे पावले टाकता येतील अशी प्रा. गाडगीळांची धारणा होती.

आजचा भारतीय समाज धार्मिक, भाषिक, जातीय अशा विविध गटागटांतून विभागलेला आहे. प्रत्येक गटाने आपापल्यापुरता विचार करून आपले स्थान सांभाळावे ही वृत्ती आपल्या हाडीमाशी खिळलेली आहे. आपणांमध्ये दलितांबद्दल एकात्म भावना नाही, सामाजिक न्यायाबाबत कदर नाही, देशातील दारिद्र्याची पर्वा नाही. अशा विस्कळित समाजात क्रांतीची भाषा बोलावयाची म्हणजे नुसतीच उलथापालथ होऊन अराजकास निमंत्रण होईल. समाजातील मूलभूत नैतिक धारणा जोवर बदलत नाहीत तोवर सत्ताधारी बदलले तरी अर्थसत्ता व राजसत्ता राबविण्याच्या पद्धतीमध्ये बदल होणार नाही. नवीन मूल्ये सर्व समाजाने आत्मसात केली तरच चिरस्थायी स्वरूपाची नवीन समाज-अर्थव्यवस्था घडविता येईल. कोणत्याही समाजातील मूल्ये व आचार हा शतकानुशतकांच्या इतिहासाचा परिपाक असून सामाजिक बदलाच्या प्रक्रियेमध्ये टिकून राहिलेली मूल्ये आजच्या समाजधारणेस पायाभूत असतात. म्हणून सामाजिक संक्रमण हे समाजाची मूळची ऐतिहासिक बैठक विचारात घेऊन घडवून आणले पाहिजे. समाजातील नैतिक अधिष्ठान बदलण्याची प्रक्रिया ही प्रदीर्घ असणे अपरिहार्य आहे. म्हणून समाजव्यवस्थेमध्ये विचारपूर्वक व क्रमाक्रमाने परिवर्तन घडवून आणणे श्रेयस्कर होय अशी प्रा. गाडगीळांची भूमिका होती.

प्रा. गाडगीळ यांचे लिखाण असे बहुस्पर्शी आहे. भारताच्या आर्थिक–सामाजिक परिवर्तनाच्या वाटचालीमध्ये अत्यंत गुंतागुंतीच्या बहुविध समस्यांना सामोरे जाणे कसे आवश्यक आहे हे प्रा. गाडगीळांच्या लिखाणातून स्पष्ट होते. भारतीय अर्थशास्त्राच्या व समाजकारणाच्या अभ्यासकांना हे सर्व लिखाण एकत्रित उपलब्ध झाल्यास उपयुक्त होईल, यादृष्टीने प्रा. गाडगीळ यांचे मराठीतील समग्र लिखाण प्रस्तुत ग्रंथात संकलित केले आहे.

प्रस्तुत लेखसंग्रहाची योजना, आखणी व छपाई करण्यात तसेच ग्रंथाची प्रस्तावना तयार करण्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेतील अनेक सहकाऱ्यांनी बहुमोल साहाय्य केले. प्रा. वि. म. दांडेकर यांनी ग्रंथाचा आराखडा तयार करण्यामध्ये मार्गदर्शन केले. प्रा. नी. वि. सोवनी व डॉ. अ. रा. कामत यांनी प्रस्तावनेचा मसुदा चिकित्सक दृष्टीने वाचून महत्त्वाच्या सूचना केल्या. डॉ. बा. द. दिवेकर, श्री स. ह. पोरे व प्रा. कुमुद पोरे यांनी लेखसंग्रह व प्रस्तावना तयार करण्याच्या कामात वेळोवेळी बहुमोल मदत केली. श्री श्रीपाद जोशी यांनी सर्व लिखाण साहित्य परिषदेच्या नियमांनुसार तयार करून दिले, मुद्रिते दुरुस्तीच्या कामात साहाय्य केले व सूची तयार केली. श्रीमती कुमुद बर्वे यांनी ग्रंथाच्या कामात विविध प्रकारे मदत केली व श्रीमती माधवी मराठे यांनी लेखांच्या टंकलिखित प्रती 'तयार केल्या. ह्या सर्व सहकाऱ्यांच्या साहाय्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

१ ऑगस्ट १९७३
गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणे ४

सुलभा ब्रह्मे

# प्रा. गाडगीळांनी अंगीकारलेली महत्त्वाची कामे

अपर सहाय्यक सचिव, वित्त विभाग, मुंबई (१९२४–१९२५)

प्राचार्य, एम. टी. बी. कॉलेज, सुरत (१९२५–१९३०)

संचालक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे (१९३०–१९६६)

सदस्य, मुंबई कापड गिरणी कामगार चौकशी समिती (१९३७–१९४०)

सदस्य व काही काळ अध्यक्ष, संचालक मंडळ, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे (१९३७–४२, १९४६–४८)

सदस्य व काही काळ अध्यक्ष, माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई राज्य (१९३९–४८)

अध्यक्ष, इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन (१९४०)

सदस्य, पश्चिम विभागीय मंडळ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (१९४२–५२)

सदस्य, अर्थशास्त्रज्ञांची सल्लागार समिती, भारत सरकार (१९४२–४७)

सदस्य, घटनेचा मसुदा करण्यासाठी नेमलेली तज्ज्ञ समिती, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (१९४६)

सदस्य, संचालक मंडळ, मुंबई राज्य सहकारी बँक (१९४६–१९६०)

सदस्य, संचालक मंडळ, औद्योगिक वित्तीय महामंडळ (१९४८–५३)

सदस्य, विधिसभा व कार्यकारिणी, पुणे विद्यापीठ (१९४९–५८)

अध्यक्ष, प्रवरानगर सहकारी साखर कारखाना (१९४९–१९६०)

सदस्य, राष्ट्रीय उत्पन्न मापन समिती (१९५०–५२)

अध्यक्ष, प्रोग्राम्स कमिटी, इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पॅसिफिक रिलेशन्स (१९५०–५४)

सदस्य, संयुक्त राष्ट्रसंघटनेची तज्ज्ञ समिती (अविकसित राष्ट्रांच्या विकासासाठी उपाययोजना सुचविण्याकरता नेमलेली) (१९५१)

सदस्य, मार्गदर्शक समिती, ग्रामीण पत पाहाणी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (१९५१–५४)

अध्यक्ष, डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन (१९५२–७१)

अध्यक्ष, महाराष्ट्र मध्यवर्ती दुष्काळ निवारण समिती (१९५२–७१)

सदस्य, केंद्रीय संचालक मंडळ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (१९५२–६२)

अध्यक्ष, इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स, कॉन्फरन्स (१९५४)

उपाध्यक्ष, अर्थशास्त्रज्ञांची समिती, नियोजन मंडळ (१९५५)

अध्यक्ष, मुंबई राज्य सहकारी साखर कारखाना संघ (१९५६–१९५९)

अध्यक्ष, विभागीय समिती (पश्चिम विभाग) संशोधन कार्यक्रम समिती, नियोजन मंडळ (१९५९–१९६७)

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (१९६०–१९६७)

अध्यक्ष, सहकारी साखर कारखान्यांचा राष्ट्रीय महासंघ (१९६०–१९६७)

सदस्य, व्यापार मंडळ (वाणिज्य-उद्योग मंत्रालय) (१९६२)

सदस्य, आर्थिक धोरण सल्लागार समिती (१९६३)

सदस्य, कृषी पुर्नवित्तीय महामंडळ (१९६३)

अध्यक्ष, सहकारी शेती चौकशी समिती (१९६३–१९६५)

सदस्य, भारतीय अन्न महामंडळ (१९६५)

अध्यक्ष, मुंबई-पनवेल-पुणे प्रादेशिक नियोजन समिती, महाराष्ट्र राज्य (१९६५–१९६६)

सदस्य, अन्नधान्य धोरण समिती, भारत सरकार (१९६६)

सेवामुक्त प्राध्यापक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे (१९६६–६७)

कुलगुरू, पुणे विद्यापीठ (१९६६–६७)

सदस्य, राज्यसभा (१९६६–६७)

उपाध्यक्ष, नियोजन मंडळ (१९६७–७१)

# प्रा. गाडगीळांची पुस्तके

1. Industrial Evolution of India in Recent Times, Edn. 1, London : Oxford University Press, 1924 ; Edn. 5, Bombay : Oxford University Press, 1971.
2. The Salaries of Public Officials in India, 1931.
3. Imperial Preference for India (The Ottawa Agreement Examined), 1932.
4. हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास, अर्वाचीन विभाग, १८५०-१९३०, पुणे : लोकशिक्षण लघुग्रंथमाला, १९३२.
5. A Survey of the Marketing of Fruit in Poona, (jointly with V. R. Gadgil), 1933 (मराठी : पुणे जिल्ह्यातील फळांची पैदास व विक्री, १९३६).
6. A Survey of Motor Bus Transportation in Six Districts of the Bombay Presidency, (jointly with L. V. Gogate), 1935 (मराठी : महाराष्ट्रातील मोटर वाहतूक १९३६).
7. A Survey of Farm Business in Wai Taluka, (jointly with V. R. Gadgil), 1940.
8. Regulation of Wages and Other Problems of Industrial Labour in India, 1943.
9. War and Indian Economic Policy, (jointly with N. V. Sovani), Edn. 1, 1943 ; Edn. 2, 1944.
10. Poona—A Socio-Economic Survey : Part I—Economic, 1945.
11. Federating India, 1945.
12. The Federal Problem in India, 1947.
13. Economic Effects of Irrigation (Report of a Survey of Direct and Indirect Benefits of the Godavari and Pravara Canals), 1948.
14. Some Observations on the Draft Constitution, 1948.
15. आर्थिक घडामोडी (१९३०-५०), (प्रा. नी. वि. सोवनी यांच्यासह), १९५१.
16. पंचवार्षिक योजनेचे समीक्षण, १९५१.
17. Poona—A Socio-Economic Survey : Part II, 1952.

18. Economic Policy and Development (A Collection of Writings), 1955.
19. Primary Education in Satara District—Reports of Two Investigations, (jointly with V. M. Dandekar), 1955.
20. Towards Co-operative Commonwealth, Chandigarh : Punjab University, 1961 (मराठी : सहकारी लोकराज्य, १९६७).
21. Planning and Economic Policy in India, Edn. 1, 1961 ; Edn. 4, 1972.
22. पुणे शहरातील महाजन व नगरशेठ, १९६२.
23. Sholapur City : Socio-Economic Studies, 1965.
24. Women in the Working Force in India, Delhi : University of Delhi, 1965.
25. Human Rights in a Multi-National Society, 1968.

पुस्तक क्र. १, ४, २०, २४ सोडून इतर सर्व पुस्तकांचे प्रकाशक : गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

# विभाग : १

## जागतिक
## आर्थिक घडामोडी

# १ . . इंग्लंडातील हिंदी खलाशांची स्थिती

'इजिप्त' बोट बुडाल्यानंतर ती बुडण्याची कारणे काय व तिच्यात एवढी प्राणहानी का झाली, याबद्दल चौकशी करण्याकरिता जी कमिटी नेमली होती तिचा निकाल होऊन आज बरेच दिवस झाले. या कमिटीची चौकशी चालली असता तिच्यापुढे ज्या निरनिराळ्या साक्षी झाल्या, त्यांतील कित्येकात हिंदी खलाशांच्या कर्तबगारीबद्दल व हुशारीबद्दल बरीचशी खोडसाळ विधाने केली गेली. इंग्लंडांतील Seamen's Union च्या वतीनेही असल्याच साक्षी झाल्या. एकंदरीत काय, विलायती खलाशी व बरीचशी वर्तमानपत्रे यांनी हिंदी खलाशांचे नाव बद्दू करण्याचे आटोकाट प्रयत्न केले.

'इजिप्त' बोट बुडेल असे दिसल्याबरोबर बोटीतील लास्कर लोकांनी स्वतःचे प्राण वाचविण्याकरिता लाईफ बोटीकडे धूम ठोकली. त्यामुळे सगळाच गोंधळ होऊन शिस्त म्हणून मुळीच उरली नाही. हे कारण प्राणहानी इतकी होण्याचे देण्यात आले! सुदैवाने ही सगळी विधाने खोटी ठरली व कमिटीने हिंदी खलाशांवर काहीएक ठपका ठेवला नाही. पण या निकालाशी आपणास येथे कर्तव्य नाही. या सर्व चौकशीत एक गोष्ट अतिशय प्रामुख्याने नजरेस आली. ती ही की, हिंदी लोकांपैकी कोणाकडूनही हिंदी खलाशांची बाजू कमिटीपुढे नीटपणे मांडण्याचा प्रयत्न केला गेला नाही.

असो. 'इजिप्त' बोटीच्या अपघाताचा एक चांगला परिणाम झाला तो हा की, येथील काही हिंदी विद्यार्थ्यांचे व रहिवाशांचे लक्ष इंग्लंडातील हिंदी खलाशांची स्थिती काय आहे इकडे वेधले गेले. आणि येथे एक 'लास्कर वेलफेअर कौन्सिल' स्थापण्यात आले. 'कौन्सिला'तर्फे काम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी हिंदी खलाशी येथे कसे राहतात वगैरेबद्दल फार उपयुक्त माहिती जमविली आहे. ही माहिती खलाशी राहतात त्या भागात जाऊन खुद्द खलाशांजवळून मिळविली असल्यामुळे विशेष खात्रीलायक व उपयोगी आहे. अशा रीतीने मिळविलेल्या माहितीचा गोषवारा खाली देत आहे.

## हिंदी खलाशांचे प्रकार

प्रथमतः कोणत्या प्रकारचे हिंदी खलाशी इंग्लंडात आढळतात? हिंदी खलाशी साधारणपणे दोन प्रकारच्या करारांप्रमाणे नोकरी धरतात. या करारांतील मुख्य फरक म्हणजे त्यांचे मजुरीचे दर. हिंदी खलाशांपैकी बहुतेक सर्व हिंदी दरांवरच नोकरी धरतात. हिंदी दरांतही अर्थात फरक आहेतच. मुंबईचे दर कलकत्त्यापेक्षा अधिक आहेत. कलकत्त्यास घेतलेल्या 'फायरमनला' २२ ते २५ रुपये मिळतात, तर मुंबईच्या फायरमनला ३३ रुपये मिळतात. हे सर्व खलाशी 'सेरांग' लोकांच्या हाताखाली काम करतात. हिंदी कराराप्रमाणे जर खलाशाने नोकरी धरली तर आगबोट कंपनीस त्यास हिंदुस्थानाच्या बाहेर कोठेही पगार देऊन सोडून देता येत नाही. कायद्याप्रमाणे कंपनीने त्यास परत हिंदुस्थानात

आणलेच पाहिजे. हिंदी खलाशांपैकी बहुतेक सर्व खलाशी याच कराराप्रमाणे नोकरी धरतात. पण एखाद्या वेळेस हिंदुस्थानातील बंदरांत बाहेरची बोट आली असून तिला काही आणखी खलाशी हवे असतील तर मग इंग्रजी कराराप्रमाणे ती हिंदी खलाशी घेते. अर्थात या हिंदी खलाशांना इंग्रजी खलाशांच्या दराप्रमाणे पगार द्यावा लागतो. इंग्रजी दर हिंदी दराच्या जवळजवळ पाच पट आहेत. परंतु या खलाशांना परत हिंदुस्थानात आणून सोडले पाहिजे, अशा तऱ्हेचे आगबोट कंपनीवर बंधन नाही. हे खलाशी बहुधा एकाच सफरीपुरती नोकरी धरतात आणि याप्रमाणे जगातील या बंदरातून त्या बंदरात जशी नोकरी मिळेल तसे भटकत जातात. या वर्गात सिलोनी लोकांचा भरणा फार आहे.

इंग्लंडात जे हिंदी खलाशी असतात ते मुख्यत्वेकरून या दुसऱ्या वर्गापैकी हे उघडच आहे. पहिल्या वर्गापैकीही खलाशी काही काही वेळेस येथे आढळतात. हे बहुधा बोटीवरून पळून आलेले. पहिल्या वर्गातील इतरही खलाशी येथे असतात. उदाहरणार्थ, हिंदुस्थानातून आलेल्या बोटीस येथून निघण्यास वेळ लागला अथवा इतर काही कारणामुळे त्यास एखाद्या इंग्रजी बंदरात बरेच दिवस राहावे लागले तर बोट कंपनी खलाशांस किनाऱ्यावर एखाद्या बोर्डिंग हाऊसमध्ये पाठविते. पण त्यांचा राहण्याचा, खाण्याचा वगैरे खर्च कंपनीस द्यावा लागतो. बाकी इतर बोटी बंदरातून फार दिवस राहात नाहीत; व राहिल्या तरी खलाशी फारसे किनाऱ्यावर येत नाहीत. या हिंदी दरावर असलेल्या खलाशांबद्दल एकच गोष्ट विशेष लिहिण्यासारखी आम्हांस आढळली ती ही की, जेव्हा जेव्हा ते किनाऱ्यावर येतात, तेव्हा तेव्हा त्यांना रस्त्यातून सारखे कुडकुडत फिरावे लागते. कारण त्यांस बोटीवर जे कपडे देतात ते अगदी पातळ असतात. आणि तेवढ्या कपड्यांवर या इंग्रजी हिवाळ्यात त्यांचा थंडीपासून बचाव होणे शक्य नसते. एक-दोन मोठ्या कंपन्या आपल्या खलाशांस एक लोकरी गरम पोषाख देतात हे खरे; पण बाकी सर्व आगबोटीवरील हिंदी खलाशी तसेच थंडीत कुडकुडत फिरताना आढळतात.

## हिंदी खलाशांची दुर्दशा

वर लिहिल्याप्रमाणे राहणारे खलाशी म्हणजे एकतर बोटीवरून पळून आलेले अथवा फक्त एकाच सफरीपुरती नोकरी धरून येथे आलेले. यापैकी बोटीवरून पळून आलेल्यांचे फार हाल होतात. त्यांच्याजवळ एक दमडीही नाही किंवा अंगावर एक गरम कपडाही नाही, अशा स्थितीत ते इकडे तिकडे भटकत असतात. एखाद्या वेळेस सुदैवाने त्यांस परत जाण्यास बोट मिळते, नाहीतर त्यांची अगदी अन्नान्न दशा होते. बोटीवरून पळून येण्यास दोन कारणे असतात. एक तर 'सेरांग' वगैरे लोकांच्या जुलुमास त्रासून ते परत येतात. अथवा इंग्लंडात जास्त मोठ्या पगाराची नोकरी मिळेल या आशेने ते पळून येतात. पण मोठ्या पगाराच्या आशेने पळून येणारे फार थोडे; शिवाय या पळून आलेल्या खलाशांस इंग्रजी क्वचितच बोलता येते; त्यामुळे तर त्यांची स्थिती अधिकच वाईट होते. पण हिंदी खलाशी शक्य असेल तेव्हा एकमेकांस मदत करण्यास तत्पर असतात, ही गोष्ट येथे नमूद केली पाहिजे.

येथील हिंदी खलाशांत एकाच सफरीपुरती नोकरी धरून येणाऱ्या खलाशांचेच प्रमाण साहजिकपणे फार असते. हे खलाशी विशेषेकरून लंडन, कार्डीफ व लिव्हरपूल या बंदरात येतात. परंतु लिव्हरपूलला त्यांची राहण्याची काहीच सोय नसल्यामुळे ते तेथून लंडनलाच येतात. कार्डीफला आलेले खलाशी बहुधा तेथेच राहतात; पण त्यांच्यापैकीही काही-विशेषतः जवळचे पैसे संपले म्हणजे-लंडनला येतात. हिंदी खलाशांची राहण्याची सर्वांत उत्तम सोय लंडनलाच आहे. येथे आशियाटिक खलाशांकरिता म्हणून ' Stranger's Home ' आहे. आणि शिवाय जुन्या हिंदी खलाशांनी चालविलेली तीन

बोर्डिंग हाउसेस आहेत. विलायती लोक हिंदी अगर काळ्या खलाशांस आपल्या बोर्डिंग हाऊसमध्ये सहसा घेत नाहीत. लढाई चालू असता खलाशांची फार जरुरी असल्यामुळे या खलाशांची एकंदर स्थिती उत्तम होती. त्यांना अर्थात इंग्रजी दराप्रमाणे पगार मिळे व लढाई चालू असता त्यांस नोकरी मिळण्यास मुळीच अडचण पडत नसे. पण हल्ली तसे काही नाही. येथे बेकारपणा फार वाढला आहे आणि एतद्देशीय खलाशांसच नोकरी मिळण्याची मारामार, मग 'काळ्या आदमी'ची गोष्ट काय. गेले पाच–पाच, सहा–सहा महिनेसुद्धा नोकरीशिवाय असलेले हिंदी खलाशी आमच्या नजरेस आले. इतके दिवस पगाराचे पैसे कोठून पुरणार! काही बोर्डिंग हाऊसमधून त्यांस उधारीवर राहू देतात व नोकरी मिळाली म्हणजे पैसे वसूल करतात. पण असे किती दिवस चालणार? यामुळे बऱ्याच जणांवर रात्रंदिवस रस्त्यातून भटकत फिरण्याची पाळी येते.

त्यातल्या त्यात एवढे बरे आहे की, लंडनच्या 'पॉपलर' या भागात सहा महिन्यांवर राहिलेल्या हिंदी खलाशांस बेकारपणाबद्दलचा अलावन्स मिळतो व त्यावर त्यांचे कसेबसे चालते. पण 'पॉपलर' शिवाय इतर भागात हेही नाही. यातील काही हिंदी खलाशी येथील खलाशांच्या मजूरसंघाचे सभासद आहेत, पण सभासद होऊन त्यांस फारसा फायदा नाही. कारण संघातर्फे नोकरी द्यावयाची वेळ आली म्हणजे काळा व गोरा भेदाभेद होतो. याप्रमाणे विशेषतः आजतागायत येथील हिंदी खलाशांची स्थिती फार वाईट आहे. पण इतकेच नाही, याशिवाय खलाशांची गाऱ्हाणी बरीच आहेत. 'सेरांग' लोक त्यांस कसे वागवितात याचा उल्लेख वर केलाच आहे; पण ते नुसते वाईट वागवितात असेच नाही तर बरेच वेळा खलाशांजवळ असतील नसतील तेवढे पैसेही काढून घेतात. तसेच बरेच वेळा आपला पगारसुद्धा त्यांस पुरा मिळत नाही व जखम वगैरे झाली असता त्याबद्दलची भरपाईही नीट मिळत नाही अशा तक्रारी आमच्या ऐकण्यात आल्या. पण या गोष्टी तपशीलवार लिहिण्यात काही अर्थ नाही. एवढे मात्र खरे की, हिंदी खलाशांच्या कायदेशीर हक्कांची येथे वारंवार पायमल्ली होते.

## खलाशांचे अज्ञान व मजूर संघाचा अभाव

असे होण्यास मुख्यत्वेकरून दोन कारणे आहेत. एकतर खलाशांचे अज्ञान व दुसरे त्यांच्यामधील मजूरसंघाचा अभाव. येथील खलांशामधील फार थोड्यांस लिहिता किंवा वाचता येते. इंग्रजी फार थोड्यांस वाचता येते आणि बऱ्याच जणांस इंग्रजी बोलताही येत नाही. हिंदुस्थानात इंग्रजी बोलता येणे म्हणजे बरेच उच्च दर्जाचे शिक्षण समजले जाते; पण या हिंदी खलाशांस इंग्लंडात वावरावयाचे असते व आपल्या तक्रारी इंग्रजांपुढे मांडावयाच्या असतात, हे लक्षात घेतले म्हणजे, निदान थोडे तरी इंग्रजी बोलता येणे त्यांस किती अवश्य आहे हे समजून येईल. लोकांस लिहिता वाचता येत नसल्यामुळे आपल्या हक्कांची नीटशी माहिती नाही; मग त्या हक्कांचे संरक्षण करण्याची गोष्ट तर दूरच. पण जरी त्यांपैकी एखाद्यास आपले हक्क ठाऊक असले तरी एकट्यास विचारतो कोण? संघशक्तीच्या अभावी जो एखाद-दुसरा गडबड करील त्यावर कप्तान वगैरे दात मात्र ठेवतात इतकेच. या जर दोन गोष्टींची उणीव भरून काढली तर हिंदी खलाशांची जवळजवळ सर्व गाऱ्हाणी दूर होतील. अर्थात बेकारपणाचा प्रश्न फार बिकट आहे. हल्लीची आर्थिक स्थिती ज्या पायावर उभारली आहे तो पायाच बदलल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही हे खरे; पण या बाबतीतही नोकरी मिळविण्यास मजूरसंघाचा फार उपयोग होतो ही गोष्ट निर्विवाद आहे.

हिंदुस्थानातील औद्योगिक उत्क्रांतीचे पाऊल झपाट्याने पुढे पडत आहे व हिंदुस्थान आजपर्यंत केवळ शेतकी राष्ट्र होते ते औद्योगिक बनू पाहात आहे. या उत्क्रांतीचे दुसरे कितीही फायदे असले

तरी, एक मोठा तोटा आहे तो हा की, त्यामुळे राष्ट्रात एक मोठा मजूरवर्ग निर्माण होतो; आणि या औद्योगिक उत्क्रांतीचे सुरुवातीस तरी या मजूरवर्गाचे फार हाल होतात, हे इतर राष्ट्रांच्या उदाहरणांवरून दिसून येईल. या हिंदी मजूरवर्गाच्या कपाळी येणाऱ्या हालअपेष्टा चुकवावयाच्या असतील व आपल्या राष्ट्रावर असलेला अमुशिक्षितपणाचा शिक्का घालवावयाचा असेल तर प्रत्येक हिंदी मनुष्याने मजूरवर्गास सुशिक्षित करण्यास व त्यास संघशक्तीचे महत्त्व समजावून देण्यास आजपासून सुरुवात केली पाहिजे.

*केसरी*, २०-२-१९२३ (इंग्लंडमधील वास्तव्यात लिहिलेला लेख)

☆

# २ . . गोलमेज परिषदेने योजिलेले आर्थिक निर्बंध

लंडनमधील गोलमेज परिषदेने रेखाटलेले भावी स्वराज्याचे चित्र हे जरी अंधुक व अस्पष्ट असले तरी त्याचे स्थूल स्वरूप आकलन करता येण्यासारखे आहे. तपशिलात फरक पुष्कळ होण्यासारखा आहे व काँग्रेसपक्षीयांची सरशी झाल्यास या चित्राची एकंदर ढब अगदी बदलली जाईल असा संभव दिसतो. घटनेचा एकंदर साचा बनला गेला आहे, पण या साच्यातून कशा प्रकारचा जिन्नस घडेल ही गोष्ट मात्र अजून निश्चित व्हावयाची आहे. या घटनेत ज्या गोष्टी अगदी निश्चित ठरलेल्या वाटतात त्यांपैकी एक म्हणजे, संपूर्ण स्वराज्य हिंदुस्थानच्या हाती यावयाच्या पूर्वी काही तरी अवधी लोटावयाचा, व या संक्रमणावस्थेत काही खाती व काही विशिष्ट हक्क ही ब्रिटिश सरकारच्या हातांत राखलेली असावयाची ही होय. काँग्रेसची मागणी जरी निर्भेळ स्वातंत्र्याची असली तरी आजच सामोपचाराने स्वराज्यप्राप्ती होणे असल्यास त्यात काही उणिवा, थोडेसे वैगुण्य हे असावयाचेच हे काँग्रेस पुढाऱ्यांनाही कळते. शिवाय हा लढा फारच विकोपाला गेला असता राज्यकारभाराची घडी अगदी विसकटून काही काळपर्यंत बेबंदशाही माजावयाची भीती आहे. त्यापेक्षा चालू असलेला गाडा आपल्या ताब्यात आल्यास सुरुवातीस स्वसत्तेवर काही निर्बंध घातले गेले तरी राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने हे जास्त श्रेयस्कर होईल, अशी विचारसरणी अगदी जहाल पुढाऱ्यांनीही स्वीकारली तर त्यात आश्चर्य करण्यास नको. एवढेच की, हे निर्बंध कोणत्या स्वरूपाचे आहेत, त्यांनी भावी पूर्ण स्वराज्य किती लांबणीवर पडते, व जो काही हप्ता एकदम हाती पडणार त्याची किंमत किती कमी होते या गोष्टींचा बारकाईने व चिकित्सक बुद्धीने विचार करणे अवश्य आहे. या निर्बंधांच्या बाबतीत महात्मा गांधींनी अगदी समर्पक दृष्टांत देऊन आपणांस योग्य अशी दृष्टी कोणती ते दर्शविले आहे. ते म्हणाले की, सर्वच बंधने अपायकारक असतात असे नव्हे, काही उपकारकही असू शकतात. गोलमेज परिषदेतील बंधने जर एखाद्या माणसास अगदी हालचालसुद्धा करता येऊ नये अशा दोरांनी जखडावे, अशा प्रकारची असतील तर ती आम्हास नाकबूल आहेत; पण उलट, एखाद्या रोपट्याचे जनावरांपासून जतन व्हावे म्हणून त्याभोवती काटेरी कुंपण घालावे, अशा तऱ्हेचे जर हे निर्बंध असले तर ते स्वीकारण्यास आम्हांस हरकत वाटणार नाही. हिंदुस्थानच्या हितसंबंधांच्या दृष्टीने विचार करिता जे निर्बंध हवेसे वाटतात तेच निर्बंध आम्ही पत्करू. लॉर्ड रेडिंग यांनीही गोलमेज परिषदेत या निर्बंधांविषयी विवेचन करताना, हिंदुस्थानास ते हितकारक म्हणूनच आम्ही सुचविले अशी भूमिका घेतली आहे. तात्पर्य, आपणांस जो मुख्य विचार करावयाचा तो हाच की, या निर्बंधांमुळे आपल्या स्वराज्यात वैगुण्य काय येते व आपले खरेखुरे अधिकार कमी किती होतात? अर्थात् गोलमेज परिषदेत घातलेल्या या निर्बंधांचे आर्थिक स्वरूप काय ह्याविषयी प्रस्तुत लेखात विवेचन करण्याचा विचार आहे.

## आर्थिक निर्बंधांचे प्रकार

प्रांतिक स्वायत्तता संपूर्ण द्यावयाची हे निश्चित ठरले असल्यामुळे सनदी नोकरांच्या पगारांशिवाय प्रांतिक खर्चातील इतर कोणतीच बाब राखीव नाही. निर्बंध जे आहेत ते बहुतेक सर्व मध्यवर्ती हिंदुस्थान सरकारच्या अधिकारांवर. आर्थिक निर्बंधांचे तीन प्रकार कल्पिता येतील: (१) जमाखर्च व फडणिशी कारभार यासंबंधी, (२) चलनपद्धती व हुंडणावळ यासंबंधी, व (३) ब्रिटिश व्यापारी मंडळींच्या हक्कांसंबंधी.

पहिल्या सदरात विचार करावयाची अगदी महत्त्वाची बाब म्हणजे लष्करी खर्चाची होय. मध्यवर्ती सरकारच्या एकंदर खर्चातील अर्ध्याहून अधिक खर्च लष्करी खर्चाचे ओझे हे आपणांस असह्य होत आहे म्हणून आज कित्येक वर्षे आपण ओरड करीत आहो. स्वराज्यात मोठी बचत कोठे होईल तर ती लष्करी खर्चातच अशीही अपेक्षा सर्वजण करीत आहेत. परंतु नवीन योजनेत तर लष्कर हे खाते राखीव राहणार व याकरिता लागणारा सर्व पैसा सरकारास पुरविलाच पाहिजे. यावर सर्व तात्रा व्हाइसरॉयाचा आहे, हिंदी मंत्रिमंडळाचा नाही. ही बाब नाजूक आहे, यात आताच ढवळाढवळ करून चालावयाचे नाही; व संक्रमणकाल कबूल केल्यास त्या कालापुरते लष्कर ब्रिटिशांच्या हुकमतीत राहणारच, असे गोलमेज परिषदेत सर्वजणांनी कबूल केले. नेहरू रिपोर्टातील शिफारशी पाहिल्यास त्यांत सुद्धा लष्करी कारभारात बदल करावयाचा तो हळूहळू केला पाहिजे हे मत स्वीकारलेले दिसून येते. नेहरू रिपोर्टात, स्वराज्यस्थापनेचे वेळेस जे जे अंमलदार अथवा सैनिक हिंदी लष्करात पगारदार असतील त्यांचे सर्व नोकरी-वेतनविषयीचे हक्क निर्बंध राखण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले आहे. म्हणजे लष्कर आपल्या ताब्यात आले तरी त्यावरील खर्चाचे मान चटकन कमी करता येणार नाही ही विचारसरणी सर्वमान्य आहे. हिंदी लष्करी खर्च कमी करण्याचे मुख्य मार्ग दोन आहेत. एक तर हल्ली जे ब्रिटिश लष्कराचे प्रमाण राखण्यात येते ते बदलावयाचे व दुसरे म्हणजे हिंदी लष्करातील ब्रिटिश अंमलदारांच्या जागा कमी करावयाच्या. आता गोलमेज परिषदेत जे संरक्षण-पोटमंडळ (डिफेन्स-सब-कमिटी) नेमण्यात आले त्याने यासंबंधी अशा स्पष्ट शिफारशी केल्या आहेत की, हिंदुस्थानात असलेल्या ब्रिटिश सैन्याची संख्या शक्य तितकी कमी करण्यात यावी, व अंमलदारांच्या जागांचे हिंदीकरणाचे प्रमाण बरेच वाढविण्यात यावे. आपणास खरे पूर्ण स्वराज्य केव्हा मिळणार हे या शिफारशी कशा व कितपत अमलात आणण्यात येतात यावरच मुख्यत्वे अवलंबून आहे. हिंदी लष्कराची अमुक एक घटना पुढील काही वर्षे राहणार हे लक्षात घेऊन त्या मानाने त्या विवक्षित कालापुरती ठराविक रक्कम लष्करी खर्चाची म्हणून तोडून तिची तरतूद करावयाची अशी एक योजना सुचविण्यात आली आहे. इंग्लंडमध्ये सुद्धा लष्कर व आरमार यांस दरवर्षी एक ठराविक रक्कम तोडून देण्यात येते. या रकमेच्या तपशिलात फरक करण्याचे पूर्ण हक्क त्या त्या खात्याकडे असतात. पण वर्षारंभी ही रक्कम ठरविताना 'चॅन्सेलर ऑफ दि एक्सचेकर' (इंग्रज फडणीस) च्या सल्ल्याने ती ठरविली जाते; आणि आपल्याकडे यावरील सर्व हक्क व्हाईसरायाकडे राहणार, हा महत्त्वाचा फरक आपणास लक्षात ठेवला पाहिजे. तरीही लष्करी खर्चाचे मान मुख्यत्वे हिंदीकरणाच्या प्रगतीवर अवलंबून राहणार व सर्व लष्कर अमुक वर्षात पूर्णपणे हिंदी बनवावयाचे असे ठरल्यास हे खाते राखीव असो वा सोपीव असो, त्यात होणाऱ्या बचतीत फारसा फरक पडणार नाही. तेव्हा यासंबंधीच्या तपशिलात मुख्य नक्की करून घ्यावयाची गोष्ट म्हणजे हिंदीकरणाची गती हीच होय. बॅ. जिना यांनी सुचविल्याप्रमाणे ही गती सुरवातीसच ठरविली गेल्यास लष्कर राखीव असणे ही गोष्ट सुद्धा आपणास फारशी बाधणार नाही असे वाटते. अर्थात् हा केवळ आर्थिकदृष्ट्या विचार झाला. इतर बाजूंनी विचार करिता लष्कर सुरवातीपासूनच आपल्या हातात असणे कितपत आवश्यक ही गोष्ट वेगळी.

## नेहरू रिपोर्टातील तरतुदी

नेहरू कमिटीने लष्करी खात्यातील नोकर व इतर नोकर यांच्यामध्ये थोडा फरक केला आहे. लष्करी नोकरांस हल्लीचे त्यांचे सर्व हक्क सुरक्षित राखले जातील असे आश्वासन देण्यात आले आहे; परंतु इतर खात्यांचे बाबतीत अशी शिफारस केलेली नाही. फक्त स्वराज्यस्थापनेनंतर तीन वर्षांच्या आत जे अंमलदार नोकरी सोडतील, त्यांस एवढ्या नोकरीनंतर हल्लीच्या परिस्थितीत जे काही पेन्शन वगैरे मिळू शकेल तेच देण्यात येईल, अशी हमी घेतली आहे. रिपोर्टाच्या प्रस्तावनेत याविषयी असे लिहिले आहे की, कमिटीच्या शिफारशीत या अंमलदारांस, विशेषतः युरोपीय अंमलदारांस उद्देशून हे लिहिण्यात आले आहे. पगार वगैरे अव्याहत मिळण्याची कायदेशीर तरतूद करण्यात आली आहेच; परंतु हिंदी लोकमतास न जुमानता ली कमिशनची नेमणूक करण्यात आली व हिंदी कायदेमंडळाच्या परोक्ष या कमिशनच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली, या गोष्टी स्पष्टपणे नमूद झाल्या पाहिजेत; आणि नवीन राज्यघटना प्रस्थापित झाल्याबरोबर निरनिराळ्या सरकारी खात्यांतून नोकरांची भरती, त्यांचे पगार, भत्ते वगैरे सर्व विषयांची फेरतपासणी होणे अवश्य आहे. गोलमेज परिषदेत या सरकारी नोकरांच्या प्रकरणी एक निराळेच पोट-मंडळ नेमण्यात आले होते; आणि यापुढे जी भरती करावयाची ती सर्व हिंदुस्थान सरकारनेच करावी व यापुढील पगार वगैरेचे सर्व प्रश्न हिंदुस्थान सरकारकडेच सोपविण्यात यावेत याबद्दल ऐकमत्य होते. उलट, हल्ली जे अंमलदार येथे नोकरी करीत आहेत त्यांच्या हक्कांत अथवा पगारांत ढवळाढवळ करावी असे कोणीच म्हटलेले नाही. शिवाय नवीन योजनेस सुरुवात झाल्यानंतर हल्लीच्या अंमलदारांपैकी कोणास सेवानिवृत्त होणे असल्यास त्यास पाच वर्षांपावेतो नोकरीच्या प्रमाणात पेन्शन मिळून नोकरी सोडण्याचा हक्क देण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली. ब्रिटिश प्रतिनिधींपैकी काहींनी तर हा हक्क हिंदुस्थानात प्रस्तुत नोकरी करीत असलेल्या अधिकाऱ्यांस नेहमीचाच राखून ठेवावा अशी मागणी केली. म्हणजे नेहरू रिपोर्टाने नोकरीच्या प्रमाणात पेन्शन घेऊन तीन वर्षांच्या आत नोकरी सोडण्याचा हक्क दिल्यावर पुढे आपणांस वेतनात वगैरे फरक करता यावा अशी योजना सुचविलेली आहे. पण गोलमेज परिषदेत हल्लीचे वेतन अव्याहत कायम राखले जाईल असे आश्वासन देऊन वर आणखी काही कालपावेतो, पेन्शन घेऊन नोकरी मध्यंतरीच सोडण्याचा हक्क देण्यात यावा अशी शिफारस केली आहे. खरे म्हणावयाचे म्हणजे हल्लीच्या अंमलदारांच्या पगाराचा प्रश्न ब्रिटिश प्रतिनिधींस फार जिव्हाळ्याचा वाटतो; आणि म्हणून त्यांच्या हक्कांत काडीइतकाही फरक होऊ नये याकरिता ते आटोकाट खटपट करणारच. हे सर्व नोकर सनदी म्हणजे खुद्द भारतमंत्र्याशी करारमदार करून नोकरीत शिरलेले आहेत. तेव्हा त्यांच्या पगारांत बदल करणे हे भावी हिंदी सरकारास कितपत शक्य आहे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आपणांस हल्लीच्या अंमलदारांच्या पगारांचे मान बदलावयाचा हक्क मिळाला तर तो फार फायदेशीर होईल हे उघड आहे. हिंदुस्थानातील सर्वच खात्यांतील बहुतेक सर्वच नोकरांच्या पगारांचे मान अगदी बेसुमार वाढलेले आहे, व स्वराज्यात हे कमी केल्याखेरीज तरणोपाय नाही. पण हल्लीच्या सनदी नोकरांचे पगार जोपावेतो ठाम मुक्रर झालेले आहेत, तोपर्यंत इतर खालील दर्जाच्या अंमलदारांचे पगार कमी करणेही कठीण जाईल; व पुढील पगारांचे मान बदलतानाही इष्ट तेवढी छाटाछाट एकदम केली जाणार नाही असा संभव वाटतो. काही झाले तरी आज नोकरीवर असलेल्या अधिकाऱ्यांचे वेतन हल्लीप्रमाणेच राहिल्यास यापुढील केलेल्या फरकामुळे जी बचत होणार ती सुरुवातीस तरी फार अल्प होईल हे उघड आहे.

तिसरा मुद्दा राष्ट्रीय कर्जासंबंधी. या कर्जाबाबत काही चौकशी व्हावी अशी मागणी कोणीही गोलमेज परिषदेपुढे केली नाही, त्याअर्थी या प्रश्नाचा विचारच तेथे झाला नाही. नेहरू कमिटीनेसुद्धा आज

जेवढे हिंदुस्थान सरकारचे म्हणून कर्ज असेल ते सर्व भावी स्वराज्यातील सरकारने कबूल केले पाहिजे असेच आपले मत प्रदर्शित केले आहे. कर्जाबद्दल एखाद्या तटस्थ पंचाकडून चौकशी व्हावी ही मागणी अगदी नवीन आहे. काँग्रेसने ही मागणी करतेवेळी साधारणपणे आपल्या मते कोणत्या प्रकारचे कर्ज आपणांस अमान्य वाटते याबद्दल काहीच मत प्रदर्शित केलेले नाही. तेव्हा या चौकशीपासून काय निष्पत्ती व्हावी अशी त्यांची अपेक्षा आहे त्याची बरोबर अटकळ होत नाही. हे जुने वाद उकरून काढून आपणांस त्यापासून काही मोठासा आर्थिक फायदा होईल असे आम्हांस वाटत नाही. तेव्हा या मुद्द्याचे स्वरूप जास्त राजकारणी असल्यामुळे यावर अधिक लिहिणे नलगे.

या सर्व निर्बंधांचा मतलब हा की, राखीव खात्यांस (लष्कर व परराष्ट्रीय संबंध) लागणारा खर्च, राष्ट्रीय कर्जावरील व्याज व या कर्जाच्या परतफेडीची तरतूद करण्यास लागणारी रक्कम, आणि सनदी नोकरांचे पगार व पेन्शने यांत कोणताही फरक करण्याचा फडणिसास अथवा कायदेमंडळास अधिकार राहणार नाही. हा सर्व खर्च आपल्या जमाखर्चाच्या आढाव्यात परस्पर नावे पडण्याची योजना करण्यात येईल. ज्याअर्थी मध्यवर्ती सरकारच्या एकंदर खर्चाचा बराच मोठा भाग या सदराखाली मोडतो, त्याअर्थी आपले आर्थिक स्वातंत्र्य फार संकुचित राहणार असा युक्तिवाद करण्यात आला आहे. पण हे आम्हास बरोबर वाटत नाही. एक तर प्रांतिक जमाखर्चविषयक पूर्ण स्वातंत्र्य भावी राज्यघटनेत मिळेल हे लक्षात घेतले पाहिजे. पण खरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अगदी पूर्ण स्वराज्य जरी मिळाले तरी साधारणपणे आपणांस या बाबीत ढवळाढवळ करिता येणे शक्य आहे किंवा नाही याचा विचार करणे हा होय. रशियासारखी क्रांती होऊन जुन्या सरकारच्या जबाबदारीपैकी आम्ही कोणतीच स्वीकारीत नाही असे म्हणण्यासारखी आपली परिस्थिती नाही; आणि काँग्रेसने तर आम्हांस असे करावयाचेही नाही अशी वारंवार ग्वाही दिली आहे. मग आपल्या सरकारच्या जुन्या कर्जाच्या व्याजाचा अथवा परतफेडीचा बोजा आपणांस कमी कसा करिता येणार ? अथवा जुन्या नोकरांच्या करारमदारांस हात लावावयाचा नाही असे म्हटल्यास तो खर्चही कमी कसा होणार! लष्करी खात्याचा प्रश्न जरा निराळ्या स्वरूपाचा आहे. पण वर दर्शविल्याप्रमाणे आर्थिकदृष्ट्या खरा जिव्हाळ्याचा मुद्दा हिंदीकरणाचा आहे. लष्कर शक्य तितके लवकर पूर्णपणे हिंदी बनावे व संक्रमणकाळ शक्यतेवढा लहान असावा अशी खटपट करणे जरूर आहे. परंतु पूर्ण स्वराज्य मिळण्यापूर्वी संक्रमणकाल काही तरी लोटावयाचा हे मान्य केल्यास या कालात या तीन प्रकारच्या खर्चाबद्दल काहीतरी निराळी योजना होणे हे अपरिहार्य आहे असे आम्हांस वाटते.

## व्हाइसरॉयला अवास्तव हक्क

फडणिशी कारभाराच्या बाबतीत हे निश्चित स्वरूपाचे निर्बंध झाले. पण फेडरल पोट-कमिटीने याविषयी आणखी एक अत्यंत व्यापक व संदिग्ध हक्क व्हाइसरॉयांस राखून ठेवावा अशी शिफारस केली आहे. हा हक्क म्हणजे इतर देशांत हिंदुस्थानच्या पतीला बाध येईल असे धोरण हिंदी मंत्रिमंडळ स्वीकारीत आहे असे व्हाइसरॉयला वाटल्यास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे फडणिशी कारभारात ढवळाढवळ करणे हा होय; आणि हा हक्क देण्याचा उद्देश काय, तर नवीन राज्यव्यवस्थेतही हिंदुस्थान शहाजोग राहील अशी सर्व राष्ट्रांस खात्री पटवून देणे ! म्हणजे आपल्या देशाचे दिवाळे वाजू नये म्हणून हिंदी मंत्रिमंडळास जितकी काळजी वाटणार त्यापेक्षा व्हाइसरॉयसाहेबांना ती जास्त असेच झाले म्हणावयाचे! आम्हांस तर ही सबब अगदी पोरकट वाटते. गोलमेज परिषदेत या कलमावर वादविवाद झाला, तेव्हा बॅ० जिना, श्री० मोदी, सर कावसजी जहांगीर यांनी या निर्बंधास पूर्णपणे विरोध केला आणि सर फिरोझ सेटना यांनी सुद्धा निर्बंधाचे स्वरूप फार व्यापक व अनिश्चित आहे या मुद्द्यावर जोर दिला. लॉर्ड रेडिंग यांनी आक्षेपकांस उत्तर देताना फडणिसाच्या कारभारात काहीच व्यत्यय आणण्याचा

अथवा ढवळाढवळ करण्याचा आमचा इरादा नाही, फक्त कर न लादता वर्षानुवर्षे कर्जेच काढून कारभार चालवावयाचा, अशा प्रकारचे दिवाळखोरीचे धोरण हिंदुस्थान सरकारने स्वीकारल्यास त्यास व्हाइसरॉयाला आळा घालता यावा म्हणून हा निर्बंध सुचविला आहे; व असा निर्बंध घातल्याने त्रास काहीच न होता हिंदुस्थानास परदेशांत कर्ज उभारणे सोपे जावे हा याचा उद्देश आहे असे भाष्य केले! लॉर्ड रेडिंग यांचे हे म्हणणे कबूल केल्यास, हिंदी राज्यकारभार अगदी बेवकूबपणे चालविला तरच व्हाइसरॉयाला या राखीव हक्काचा उपयोग करावा लागेल असे दिसते. परंतु इतक्या थराला गोष्टी ज्या देशाचे मंत्रिमंडळ येऊ देईल अशी फार भीती, तो देश स्वराज्यासच नालायक असे म्हणण्यासारखे आहे; आणि मग त्यास निर्बंध घालावयाचे ते याहून किती तरी जास्त हवेत. शिवाय पैशाच्या कारभाराची ही बाब अशी आहे की, यात बेवकूबपणा केल्यास त्याचे परिणाम त्या देशास लगेच भोवतात, हे गेल्या दहा बारा वर्षांच्या जगातील निरनिराळ्या देशांच्या अनुभवावरून स्पष्ट दिसून आले आहे. आज जे आमचे धनको आहेत त्यांचे व्याज व कर्जाची परतफेड यांविषयी तरतूद निराळी केलेली आहेच; तेव्हा आमचा अव्यवस्थितपणा बाधेल तो फक्त आम्हांलाच, इतर कोणासही नाही. असे असता व्हाइसरॉयाकडे हा हक्क राखून ठेवण्यास काही कारण आहे असे वाटत नाही. इतकेच नव्हे, तर आजपर्यंतच्या अनुभवावरून पाहता, अशा प्रकारचे व्यापक हक्क व्हाइसरॉय, गव्हर्नर-जनरल यास दिले असता त्यांचा वारंवार दुरुपयोग होण्याचा फार संभव आहे असे उघड दिसते. लॉर्ड रेडिंग यांनी जरी कितीही आश्वासने दिली व ब्रिटिश मंत्रिमंडळाने असल्या हक्काचा उपयोग करावा लागावयाचा नाही अशी परिस्थिती निर्माण करूया अशी सदिच्छा प्रकट केली, तरी अगदी निर्वाणीचे अस्त्र म्हणून म्हटलेला सर्टिफिकेशनचा हक्क, मिठाचा कर आठ आण्यांनी वाढविण्यात अथवा प्रांतीवरील कराचे दर एक पैनेही कमी न होऊ देण्यात गेल्या दहा वर्षांत (काही खेपेस खुद्द लॉर्ड रेडिंग यांनीच) उपयोगात आणिला आहे, हे विसरून चालावयाचे नाही. सर फिरोझ सेठना यांनी दोन-तीन अगदी साधी उदाहरणे देऊन या गोष्टीत तरी व्हाइसरॉयाला हात घालता येणार नाही अशी आशा प्रदर्शित केली. पण जोपर्यंत असले व्यापक व अनिश्चित स्वरूपाचे हक्क एखाद्या अधिकाऱ्यास दिले आहेत, तोपर्यंत तो त्यांचा उपयोग अमुक रीतीने करील अथवा करणार नाही अशी हमी कोण घेणार? यास खरा इलाज म्हणजे अशा निर्बंधास कसून विरोध करणे हाच होय.

## चलनपद्धती व हुंडणावळ यासंबंधीचे निर्बंध

चलनपद्धती व हुंडणावळ यासंबंधी दोन प्रकारचे निर्बंध सुचविण्यात आले आहेत. एक तर या दोन्ही बाबींची व्यवस्था रिझर्व्ह बँकेकडेच सोपवावी आणि रिझर्व्ह बँक अस्तित्वात येईपावेतो व्हाइसरॉयाकडे याविषयीचे विशेष हक्क राखून ठेवावे. दुसरे म्हणजे चलनी नोटा व नाणे यासंबंधीचे कायदेकानू बदलावयाचे झाल्यास त्यास प्रथम व्हाइसरॉयाची संमती मिळविली पाहिजे असा निर्बंध घालून ठेवावा. रिझर्व्ह बँकेचे आवश्यकतेबद्दल दुमत असण्याचे काहीएक कारण नाही. विशेषतः गेल्या पंधरा वर्षांच्या अनुभवावरून कोणत्याही सरकारावर चलनपद्धतीचे नियंत्रण करण्याची जबाबदारी टाकण्याचे परिणाम फार अनिष्ट घडू शकतात हे कळून चुकले आहे; व एकंदर जगभरच स्वतंत्र मध्यवर्ती पेढ्या निर्माण करून परस्पर त्यांच्यावरच चलनपद्धतीचे नियंत्रण सोपविण्याची पद्धती स्वीकारली जात आहे. अडीअडचणीच्या वेळी चलनाची किंमत खालावून सक्तदर्शनी कर न बसविता पैसा काढण्याचा मोह बहुतेक सरकारांस अनावर होतो, व एकंदरीने पाहता सरकारी खात्यांचे हातून हा कारभार नीट चालविला जात नाही असाच अनुभव अलीकडे आला आहे. तेव्हा एक हिंदुस्थाना-पुरती मध्यवर्ती रिझर्व्ह बँक निर्माण करावी व तिजकडेच चलनपद्धती व पर्यायाने हुंडणावळ यांची

व्यवस्था सोपवावी ही शिफारस सर्वमान्य होण्याजोगी आहे. यात एकदोनच शंका प्रदर्शित करण्या-सारख्या आहेत. फेडरल-पोटमंडळाच्या अहवालात रिझर्व्ह बँकेचा राजकारणाशी काही एक संबंध नसावा असे म्हटले आहे हे सर्वस्वी रास्त वाटते. पण याचा अर्थ रिझर्व्ह बँकेच्या चालक-मंडळींपैकी काहीजण नेमण्यात कायदेमंडळाला काही अधिकार असावा किंवा नाही या जुन्या वादाचा परस्पर निकाल लागला असे न व्हावे. कारण जोपर्यंत आपले उद्योगधंदे व व्यापार यांच्या क्षेत्रांत परकीयांचे मनस्वी वजन कायम आहे, तोपावेतो मध्यवर्ती कायदेमंडळासारख्या हिंदी प्रातिनिधिक संस्थेचा रिझर्व्ह बँकेशी थोडाबहुत संबंध राखणे हे राष्ट्राच्या दृष्टीने हितावह भासणे साहजिक आहे. हा संबंध तर घड-वून आणावयाचा, पण राजकारण तर बँकेचे कारभारात घुसू द्यावयाचे नाही, हे साधण्यास योजना काय करावी हा प्रश्न बिकट आहे खरा. पण हिंदुस्थान सरकारचा व भारतमंत्र्याचा अशा संबंधासच मुळात विरोध होता. त्यांच्या म्हणण्यास धरूनच या वर निदर्शिलेल्या वाक्याचा अर्थ न व्हावा एवढाच आमचा मुद्दा आहे. दुसरा मुद्दा म्हणजे रिझर्व्ह बँक अस्तित्वात येण्यास लागणारा अवधी. गोलमेज परिषदेत बॅ० जिना यांनी ही बँक अस्तित्वात येण्यास पाच वर्षे सुद्धा लागतील व तो पावेतो चलनपद्धती हे राखीव खातेच राहणार की काय असा प्रश्न उपस्थित केला. त्यास उत्तर देताना सर फिरोझ सेठना यांनी बँकेची योजना जवळजवळ तयार आहे असे म्हणण्यास हरकत नाही व ती अत्यंत अल्पावधीत उभारता येईल असे विधान केले. योजना एक काय पण अनेक तयार असतील; परंतु काही वर्षांपूर्वी हा प्रश्न असेंब्लीत वादास निघाला असता त्यावर तीव्र मतभेद नजरेस येऊन सरकारने आयत्या वेळेस सर्व योजनेस खो दिला ही गोष्ट जगजाहीर आहे. तेव्हा रिझर्व्ह बँक हवी हे जरी कबूल केले, तरी ती लवकरच स्थापिली जावी व तिची योजना तयार करण्याचे काम मुख्यत्वेकरून हिंदी लोकमत व व्यापारी मंडळ यांकडूनच व्हावे, या दोन्ही गोष्टी प्रथम कबूल केल्या जातील अशी खबरदारी घेणे अवश्य आहे.

## निर्बंधांचा उगम

कोणत्याही देशात जी चलनपद्धती प्रस्थापित झालेली असेल ती व्यवस्थित रीतीने चालविणे हे मध्यवर्ती बँकेचे कार्य आहे. नाणे व नोटा यांच्या पुरवठ्याचे व्यापाराच्या गरजेप्रमाणे नियंत्रण करणे, चलनपद्धती सोन्या-रुप्याच्या पायावर उभारलेली असल्यास त्यांचा साठा पुरेसा आहे किंवा नाही याकडे लक्ष पुरविणे, हुंडणावळीतील फरक व देशातील इतर बँकांचे व्यापाऱ्यांस कर्ज देण्याविषयीचे वगैरे धोरण यांवर नजर ठेवणे इत्यादी गोष्टी रिझर्व्ह बँकेने करावयाच्या असतात. परंतु चलनपद्धतीचे स्वरूप काय असावयाचे, देशात नाणे व नोटा कशा प्रकारच्या असावयाच्या, मुख्य मूल्यमापक नाण्याची किंमत काय व पर्यायाने हुंडणावळीचा दर कोणता या सर्व गोष्टी प्रत्येक राष्ट्रातील सरकारने, म्हणजे लोकसत्ताक राष्ट्रात कायदेमंडळाने ठरविल्या पाहिजेत. फेडरल कमिटीने हल्लीच्या चलनपद्धतीबद्दलच्या कायद्यात बदल करणे असल्यास त्यास प्रथम व्हाइसरॉयाची संमती मिळविली पाहिजे अशी शिफारस केली आहे. ही शिफारस का केली याचे कोणीच परिषदेत विवेचन केले नाही. सर तेजबहादूर सप्रू तर आपल्या भाषणात आम्ही चलनपद्धती रिझर्व्ह बँकेवर सोपवावी एवढेच सुचविले आहे असे म्हणाले! लॉर्ड रेडिंगनीसुद्धा आपल्या भाषणात याचा उल्लेख केला नाही. खरे म्हणावयाचे म्हणजे बॅ० जिना यांनी स्पष्टपणे म्हटल्याप्रमाणे या सर्व निर्बंधांचा उगम हिंदी लोकांवर अविश्वास व त्यांच्या कुवतीबद्दल संशय यांतच आहे; आणि या उलट वस्तुस्थिती मात्र अशी की, आजपर्यंत-विशेषतः तीस-चाळीस वर्षांत, चलनपद्धती व हुंडणावळ यासंबंधी शहाण्यासुरत्या इंग्रज फडणिसांनी स्वीकारलेल्या धोरणास सारखा विरोध करण्याची पाळीच हिंदी पुढाऱ्यांवर आली, इतकेच नव्हे, तर सरकारनेच नेमलेल्या कमिशनातही या धोरणावर कडक टीका करावी लागली. असे असता गव्हर्नर-जनरलच्या

हातात हे विशेष हक्क दिले म्हणून आमची चलनपद्धती अगदी सुरक्षित राहिली असे कोणास वाटणार कोण जाणे! हिंदुस्थानचे व इंग्लंडचे हितसंबंध परस्परविरोधी नाहीत अशी दरबारी भाषा परिषदेत वापरावयास हरकत नाही. पण वास्तविक पाहता विरोध पदोपदी आढळून येतो, व ब्रिटिशांच्या हाती आमचे आर्थिक धोरण असताना ते साहजिकपणे आपल्या फायद्याकडे पाहूनच हे धोरण आखीत आले. चलनपद्धतीविषयी आमच्या दृष्टीने झालेल्या काही चुका केवळ गैरसमजुतीने झाल्या असतील; पण इतर काही गोष्टी तरी ब्रिटिश व्यापाराच्या हिताकडे बेसुमार लक्ष असल्यामुळेच घडून आल्या, असे मानण्यात बिलकुल प्रत्यवाय नाही. तेव्हा हा जो विशेष हक्क गव्हर्नर-जनरलास देण्यात येत आहे, त्याच्या बुडाशी केवळ अविश्वास व संशय एवढेच नसून शिवाय स्वार्थही आहे असा हिंदी लोकमताचा समज झाल्यास त्यात आश्चर्य नाही. नोटांच्या अथवा रुपयांच्या सुरक्षिततेकरिता म्हणून जी गंगाजळी ठेव जमविण्यात आली आहे, तिचे प्रतिष्ठान व तिच्या विनियोगाचे मार्ग असल्या गोष्टींवर गव्हर्नर-जनरलची हुकमत चालावी हे आम्हांस कधीही कबूल करता यावयाचे नाही. ब्रिटिश नोकर, ब्रिटिश कर्ज, पूर्वापार चालत आलेले ब्रिटिश व्यापाऱ्यांचे हक्क यांच्या संरक्षणाबद्दल हमी द्या असे म्हटले तर ते गैरवाजवी नाही. परंतु याउपर हिंदी बजेट, हिंदी चलनपद्धती यांवरही आमची हुकमत चालू द्या असा आग्रह धरणे म्हणजे स्वराज्य या शब्दाची केवळ चेष्टा आहे, असे आमचे स्पष्ट मत आहे. बजेटविषयक निर्बंधाची चर्चा करिताना दर्शविले त्याप्रमाणे चलनपद्धतीची दुर्व्यवस्थासुद्धा आमची आम्हासच भोवेल, त्याबद्दल ब्रिटिशांनी फाजील काळजी वाहावयास नको.

## ब्रिटिश व्यापारी मंडळींचे हक्क

"हिंदुस्थानात व्यापार करणारे ब्रिटिश व्यापारी, ब्रिटिश पेढ्या व कंपन्या आणि हिंदुस्थानात जन्मलेले हिंदी नागरिक यांच्या व्यापारविषयक हक्कात काही फरक केला जाणार नाही, हे तत्त्व ब्रिटिश व्यापारी मंडळींचे सूचनेवरून सर्वसाधारणपणे मान्य करण्यात आले. आणि असेही ठरविण्यात आले की, या हक्कांचे नियमन परस्पर देवघेवीच्या तत्त्वावर उभारलेल्या हिंदुस्थान आणि ग्रेट ब्रिटन यांचे दरम्यानच्या एका कराराने करण्यात यावे."

गोलमेज परिषदेत ब्रिटिश व्यापारी मंडळींच्या हक्कांबद्दल जो ठराव स्वीकारण्यात आला आहे त्याचे हे भाषांतर आहे. यावरून या ठरावाचे स्वरूप किती व्यापक व संदिग्ध आहे हे कळून येईल. हा ठराव प्रसिद्ध झाल्यापासून त्याचे अर्थ इतक्या निरनिराळ्या प्रकाराने लावण्यात आले आहेत की, त्याची व्याप्ती खरोखरच काय आहे हे समजणे अशक्यप्राय झाले आहे. म्हणून गोलमेज परिषदेत या ठरावावर जो वादविवाद झाला त्याच्या अनुरोधाने खालील विवेचन करण्याचा आमचा विचार आहे. प्रथमच ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की, या बाबीचा समावेश 'अल्पसंख्याक ज्ञाती'विषयक नेमलेल्या पोटमंडळाच्या क्षेत्रात करण्यात आला. म्हणजे या ठरावात निर्देशिलेली ब्रिटिश व्यापारी मंडळी ही हिंदुस्थानातीलच एक ज्ञाती असे मानण्यात आले आहे. इंग्लंडमधील कंपन्या, पेढ्या, इंग्लंडमधून कारभार चालविणारे व्यापारी यांचा यात समावेश नाही असे उघड दिसते. हीच गोष्ट सर तेजबहादूर सप्रू यांनी केलेल्या भाषणात निर्देशिलेली आहे. ते म्हणाले की, मूळचा नेहरू रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर युरोपियन ॲसोसिएशनने आपल्या हक्कांचे योग्य संरक्षण या रिपोर्टात केलेले नाही अशी तक्रार केल्यावरून नेहरू कमिटीने तदनंतर प्रसिद्ध केलेल्या पुरवणी-अहवालात काही विशेष योजना केली. या योजनेचे स्वरूप म्हणजे हिंदी नागरिक या शब्दाच्या व्याख्येची व्याप्ती वाढविणे हे होय. या व्याख्येस जे एक नवीन कलम जोडण्यात आले ते असे की, "साधारणपणे नेहमी हिंदुस्थानात व्यापार अथवा धंदा चालविणाऱ्या किंवा वास्तव्य करणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याच्या

प्रजाजनास हिंदी नागरिक समजण्यात यावे". आणि ज्याअर्थी निरनिराळ्या हिंदी नागरिकांच्या हक्कांत फरक करता येणे शक्य नाही, त्याअर्थी यापुढे युरोपियन अॅसोसिएशनच्या तक्रारीस जागा उरली नाही असे म्हणावयास हरकत नाही. सर ह्यूबर्ट कार व गेव्हिन जोन्स यांचेही म्हणणे असेच होते की, जे ब्रिटिश व्यापारी हिंदुस्थानास जाऊन तेथे राहून व्यवहार करतात, त्यांना तेथे मतदानाचे वगैरे हक्कही देण्यात येतात. तेव्हा आर्थिक बाबतीत त्यांना भिन्न भावाने वागविण्यात येऊ नये. श्री. चिंतामणी यांनी हिंदुस्थानात सांप्रत असलेले व पुढे येणारे व्यापारी यांच्यात फरक करता यावा असे सुचविले, पण त्यांच्या सूचनेस मान्यता देण्यात आली नाही. हिंदी प्रतिनिधींतर्फे मूळ तत्त्वास कोणी विरोध केला नाही. नेहरू रिपोर्टनेही 'नागरिक' या शब्दाच्या सुधारलेल्या व्याख्येत व आपल्या मूळ रिपोर्टच्या प्रस्तावनेत हे तत्त्व कबूल केलेले आहेच, याचाही वादविवादात निर्देश करण्यात आला. पण श्री० मोदी, श्री० शास्त्री, सर फिरोझ सेठना इत्यादिकांनी जो मुद्दा उपस्थित केला तो असा की, जरी तत्त्वतः ब्रिटिश व्यापाऱ्यांचे म्हणणे कबूल केले, तरी काही महत्त्वाचे उद्योगधंदे अथवा व्यापारी हक्क यांच्यासंबंधी विशेष सवलती हिंदी लोकांस देणे आवश्यक होईल; व अशा विशेष सवलती देण्यास या ठरावाने हरकत येऊ नये. ठरावाचे स्वरूप कसे असावे याबद्दल वाटाघाट चालली असताना श्री० मोदी यांनी सर्वसाधारणपणे तत्त्व मान्य केले तरी काही खास बाबी अपवादात्मक म्हणून राखून ठेवाव्या अशी सूचना केली. पण ती आपणास बिलकुल मान्य नाही, असे लॉर्ड रेडिंग यांनी ताबडतोब सांगितले. ता. १६ रोजी या ठरावावर बराच वादविवाद होऊन त्याचे स्वरूप अनिश्चित राहिले. नंतर काही खाजगी खलबते होऊन ता. १९ रोजी लॉर्ड रेडिंग यांनी परिषदेत शेवटी मान्य झालेला हा मसुदा वाचून दाखविला व त्यावर काही भाषणे न होता तो स्वीकारण्यात आला. फक्त बॅ० जिना यांनी आपली त्यास नापसंती दर्शविली. तेव्हा या शेवटच्या मसुद्याचाही अर्थ काय करावयाचा हा प्रश्न उरतोच. श्री० मोदी, सेठना, कावसजी जहांगीर यांनी त्यास मान्यता दर्शविली आहे. कावसजी जहांगीर यांनी 'सर्वसाधारणपणे' या शब्दावर जोर देऊन अपवादांस आम्ही पळवाट ठेविली आहे असे दर्शविले, सर ह्युबर्ट कार यांनीही प्रस्तुत जे हक्क आहेत त्यांस बाध येणार नाही एवढेच आश्वासन पाहिजे म्हणून सांगितले, त्याअर्थी आम्हांस प्रस्तुत कोणत्या प्रकारचा फरक करता येतो हा प्रश्न विचार करण्याजोगा आहे.

## फिस्कल कमिशनच्या शिफारशी

हा वाद प्रथम 'फिस्कल कमिशन' च्या वेळेस उत्पन्न झाला. त्यानंतर 'हिंदी नौकानयन कमिटी' व 'परदेशी भांडवल कमिटी' यांनीही हिंदी नागरिकांस विशेष सवलती कशा प्रकारे देता येतील याचा विचार केला. फिस्कल कमिशनने जकात वाढवून कोणत्याही उद्योगधंद्यांचे संरक्षण केले असल्यास त्याचा फायदा फक्त हिंदी कारखानदारांसच मिळावा अशी सोय करणे शक्य नाही. पण जेव्हा व्यक्तिशः व्यापाऱ्यांस अथवा कंपन्यांस काही विशेष हक्क अथवा पैशाची मदत देण्यात येते, त्या वेळेस मात्र हिंदी व बिन-हिंदी यांच्यामध्ये फरक करणे शक्य आहे व युक्तही आहे असे ठरविले. फिस्कल कमिशनने, अशी विशेष मदत देते वेळी फक्त ज्या कंपन्या हिंदुस्थानात नोंदल्या गेल्या आहेत, ज्यांचे भांडवल रुपयांत दर्शविलेले आहे, ज्यांच्या चालक मंडळींपैकी बरेचसे लोक हिंदी आहेत, व ज्यांनी हिंदी विद्यार्थ्यांस आपल्या उद्योगधंद्यांचे शिक्षण देण्याचे कबूल केले आहे, अशांसच ती द्यावी अशी शिफारस केली. या कमिशनच्या बहुतेक सर्व हिंदी सदस्यांनी एक भिन्नमतपत्रिका जोडली होती; व तीत साधी संरक्षक जकात लादली असता सुद्धा हिंदी व बिन-हिंदी यांस वरीलप्रमाणे भिन्न भावाने वागविणे जरूर आहे असे आपले मत प्रदर्शित केले होते. गेली एक-दोन वर्षे हा वाद स्वीडिश

आगकाड्यांच्या कंपनीचे कारभारावरून पुनः रंगास आला आहे. हिंदी व्यापारी नाविक धंद्याबद्दल चौकशी करण्यास नेमलेल्या कमिटीने किनाऱ्यालगतची वाहतूक हिंदी जहाजांकरिता राखून ठेवावी व 'हिंदी जहाजकंपनी' म्हणजे कोणती हे ठरविताना फिस्कल कमिशनने सुचविलेल्या वरील कसोट्यांचाच उपयोग करावा असे सुचविले. परदेशी भांडवल कमिटीनेही या प्रश्नाचा निराळ्या व व्यापक दृष्टीने विचार करून फिस्कल कमिशनच्या रिपोर्टातील मूळ शिफारशींसच पाठिंबा दिला. अजून या शिफारशी प्रत्यक्ष अमलात आणण्याचा हिंदुस्थान सरकारास कोठेच प्रसंग आलेला नाही. पण ज्याअर्थी या एकंदर विचारसरणीस हिंदुस्थान सरकारने मान्यता दर्शविली व ब्रिटिश सरकारनेही केव्हाच विरोध केला नाही, त्याअर्थी अशा प्रकारचा हिंदी व ब्रिटिश व्यापाऱ्यांत फरक करण्यास हल्ली तरी हरकत नाही असे मानता येईल. हा विचार सर्वमान्य झाल्यास गोलमेज परिषदेत मंजूर झालेल्या ठरावास संमती देण्यास काही हरकत नाही. पण हल्ली जे करिता येते अशी आमची समजूत आहे, ते सुद्धा यापुढे करता येऊ नये असा या ठरावाचा आशय असल्यास, हा ठराव रद्द करणे जरूर आहे. या ठरावाच्या दुसऱ्या भागात परस्पर-देववेवीच्या तत्त्वावर ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान यांच्या दरम्यान एक व्यापारविषयक करार करावा असे सुचविले आहे. वरपांगी हे जरी कितीही रास्त वाटले तरी खरोखर या देवघेवीत काहीच अर्थ नाही. कारण खरी देवघेव तुल्यबल राष्ट्रांतच होऊ शकते. इंग्लंडसारख्या पुढारलेल्या राष्ट्राने आम्हांस काहीही हक्क देऊ केले तरी त्याचा आम्हांस काय फायदा? (हेच हक्क इंग्लंड याच रीतीने अमेरिकेस देऊ करील काय?) उलट, हिंदुस्थानातील कुरणे स्वतःस राखीव म्हणून ठेवण्यात ब्रिटिश व्यापाऱ्यांचा अतोनात फायदा आहे हे उघडच आहे. 'आम्ही संरक्षक जकाती लादत नाही व तुम्हीही लादू नका,' असे इंग्लंडने सर्व जगास सांगण्यासारखे हे आहे. पण आता या म्हणण्यातील डावपेच सर्वांस कळून चुकले आहेत. त्याने कोणाची फसवणूक होणार नाही. असो. नेहरू रिपोर्टात ग्रथित केलेले तत्त्व सर्वसाधारणपणे मान्य करण्यास काही हरकत नाही. पण त्यास अपवाद असू शकतात, व फिस्कल कमिशनने केलेल्या शिफारशींबरहुकूम योग्य वाटेल तेव्हा हिंदुस्थान सरकारास हिंदी व्यापाऱ्यांना अथवा कारखानदारांना विशेष सवलती देण्यास गोलमेज परिषदेतील ठरावाने बाध येत नाही, असे स्पष्ट झाल्यासच तो ठराव मान्य करिता येईल. नाहीतर एक हाताने स्वराज्य मिळवून दुसऱ्या हाताने ते गमावले असे म्हणण्यास हरकत नाही.

प्रस्तुत लेखाच्या सुरुवातीसच गोलमेज परिषदेत सुचविलेल्या निर्बंधांचे आम्ही तीन प्रकार कल्पिले होते. या तिन्ही प्रकारांचा वर अनुक्रमे थोडाबहुत विचार करण्यात आला आहे. आपल्याला 'पूर्ण स्वराज्य' पाहिजे असे म्हटल्यावर कोणतेही निर्बंध आमच्या दृष्टीने फायदेशीर आहेत, असे म्हणणेच चमत्कारिक आहे. परंतु आमच्या दृष्टीने फायदेशीर असे न वाटले, तरी ब्रिटिश लोक आमच्या हातांत कारभार देणार तेव्हा त्यांचे काही पूर्वापार चालत आलेले हक्क सुरक्षित राखणारी, पण आम्हांस विशेष न नडणारी योजना असल्यास ती मान्य करणे प्राप्त आहे. या दृष्टीने लष्करी खर्च, सनदी नोकर व जुने कर्ज यांसंबंधीचे निर्बंध पूर्वोक्त मर्यादेत कबूल करण्यास हरकत नाही. तसेच रिझर्व्ह बँकेबद्दलची योजनाही मान्य करिता येईल. पण बजेटविषयक व्यापक हक्क अथवा चलनपद्धतीचा ताबा हे गव्हर्नर-जनरलास देणे, अथवा हिंदी लोकांस आर्थिक बाबतीत विशेष सवलती देण्याचा हक्क घालवून बसणे, अशा प्रकारच्या योजनेस कोणत्याही हिंदी पुढाऱ्याने संमती देणे योग्य होणार नाही, असे आमचे स्पष्ट मत आहे.

*लोकशिक्षण* ४ : ४ एप्रिल १९३१ पृ० २२२-२३५.

☆

# ३ . . प्रेसिडेंट हूवर यांचा जाहीरनामा

गेल्या महिन्यात घडून आलेली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अमेरिकेचे प्रेसिडेंट मि. हूवर यांचा सार्वराष्ट्रीय कर्जतहकुबीबद्दलचा जाहीरनामा ही होय. गेली दहा वर्षे जगभर कमीअधिक प्रमाणात सर्वच आर्थिक व्यवहार मंदीचे चालले आहेत, किमतीचे प्रमाण सारखे उतरत आहे व बेकारी वाढत आहे, असे म्हटल्यास फारसे अतिशयोक्तीचे होणार नाही. काही देशांची परिस्थिती इतरांपेक्षा जास्त बिकट झाली हे खरे, पण कोणालाच हे आर्थिक अरिष्ट पुरते टाळता आलेले नाही. आज अमेरिका हा जगातील सर्वांत संपन्न देश आहे. पण तेथेही ऑक्टोबर १९२९ पासून दिवाळखोरीचे व बेकारीचे प्रमाण बेसुमार वाढले आहे. या सर्व जागतिक परिस्थितीस एक प्रामुख्याने कारणीभूत झालेली बाब म्हणजे युद्धातून उद्भवलेली कर्जे व खंडण्या ही होय. या प्रश्नाचा नीटसा निकाल लागल्याखेरीज कोणत्याही राष्ट्रास डोके पुरते वर काढता यावयाचे नाही असे काही दूरदृष्टी अर्थशास्त्रज्ञ आज कित्येक वर्षे सांगत आहेत; परंतु राजकारणाचा ओघ असा काही विचित्र वाहत असतो की, शहाण्यासुरत्या माणसांनाही काही वेळेस अगदी साध्या गोष्टी समजेनाशा होतात, अथवा समजल्या तरी तदनुसार वर्तन करण्याची सोय नसते. अशातलाच बराचसा प्रकार या सार्वराष्ट्रीय कर्जांचा झालेला आहे.

## दोस्त राष्ट्रांचा खुनशीपणा

व्हर्सायचे तहात दोस्त-राष्ट्रांचा खुनशीपणा पदोपदी व्यक्त होतो. या खुनशीपणाच्या दोन विशेष निदर्शक गोष्टी म्हणजे पहिली, एकट्या जर्मनीवरच महायुद्ध सुरू करण्याचा आरोप लादण्याचा त्यांचा अट्टाहास आणि दुसरी, जर्मनी व इतर शत्रुपक्षीय राष्ट्रांकडून मोठी जबर खंडणी हबकण्याचा त्यांचा कृतनिश्चय ह्या होत. या खंडणीबद्दलच्या अगदी सुरुवातीच्या कल्पना तर फारच अफाट होत्या. कोणत्याही राष्ट्राकडून खंडणी घ्यावयाची तर तिला काही निश्चित मर्यादा असू शकते हा विचारच या काळी दोस्त-राष्ट्रांच्या मुत्सद्यांस शिवलेला दिसत नाही. तहनामा झाल्यानंतरच्या या चारपाच वर्षांत जर्मनीकडून अवाच्या सवा रक्कम वसूल करण्याच्या प्रयत्नात दोस्त-राष्ट्रांस यश येणे शक्य नव्हतेच. परंतु त्याचा एक परिणाम असा मात्र झाला की, जर्मन सरकारास आपल्या मार्काची हुंडणावळ स्थिरावणे अशक्य झाले. हळूहळू मार्काचा भाव उतरत चालला, त्यातच फ्रान्सने रूर प्रांत बळकावणे वगैरे गोष्टींमुळे जर्मन सरकारची पत जास्तच खालावली, व १९२३–२४ सालात मार्क नाणे अगदी कवडीमोल होऊन बसले. तेव्हा कोठे फ्रान्सला आपली हाव काहीशी कमी करण्याचे सुचू लागले. यानंतरच जर्मनीच्या चलनपद्धतीची पुनर्घटना तज्ज्ञांच्या सल्ल्याने होऊन खंडणीच्या प्रश्नाचा बराचसा व्यावहारिकदृष्ट्या विचार होऊ लागला.

## डॉज-योजनेतील तरतुदी

येथवरची मजल १९२४ साली गाठण्यात आली. जनरल डॉज यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिटीची योजना सर्व राष्ट्रांनी मान्य केली. १९२१ साली लंडनमधील दोस्त-राष्ट्रांच्या परिषदेमध्ये जर्मनीकडून कुलखंडणीवजा एकूण १३३ अब्ज मार्क (दीड मार्क म्हणजे एक रुपया असा स्थूल मानाने हल्ली हुंडणावळीचा दर आहे) मिळतील अशी अपेक्षा निश्चित ठरविली होती. तर १९२४ मध्ये एकंदर डॉज-योजनेप्रमाणे जास्तीत जास्त ४४ अब्जांपर्यंतच रकम मिळेल, याहून अधिक देण्याची जर्मनीची ताकद नाही, असे ठरविण्यात आले. पण खरे म्हणावयाचे म्हणजे डॉज–योजना हीही तात्पुरत्या स्वरूपाचीच होती. या योजनेने जर्मनीपासून घ्यावयाच्या खंडणीची रकम पुष्कळच उतरविण्यात आली. एवढेच नव्हे, तर ही खंडणी जर्मनीकडून वसूल करणे व ती निरनिराळ्या दोस्त राष्ट्रांस पोचविणे या गोष्टी नीटपणे पार पाडण्यास एक अगदी स्वतंत्र असा दोस्त-राष्ट्रांचा मुखत्यार (Agent-General for Reparations) नेमून त्याच्यातर्फे ही योजना अमलात आणली जावी असेही सुचविण्यात आले. त्यातल्या त्यात विशेष महत्त्वाच्या आणखी दोन बाबी लक्षात घेण्याजोग्या आहेत त्या अशा. कोणत्याही राष्ट्रास परराष्ट्रांचे देणे फार झाले म्हणजे त्या राष्ट्राचा हुंडणावळीचा दर खालावण्याचा संभव फार असतो ही गोष्ट उघड आहे. खंडणीची रकम तर इतकी मोठी की, तीही साध्या पैशाच्या अथवा हुंडीरोख्याच्या स्वरूपात परराष्ट्रात पाठविण्याचा प्रयत्न केल्यास त्यामुळे हुंडणावळीस व एकंदर राष्ट्राच्या चलनपद्धतीस धोका बसण्याचा संभव फार. जर्मनीस तर हा अनुभव अगदी नुकताच आलेला. तेव्हा डॉज-योजनेप्रमाणे खंडणी परराष्ट्रात पाठविण्याची जबाबदारी जर्मनीकडून काढून घेण्यात आली व ती दोस्त–राष्ट्रांच्या पूर्वोक्त मुखत्याराकडे देण्यात आली; आणि यानेसुद्धा जर्मनीकडून खंडणीदाखल मिळालेले मार्क परराष्ट्रात पाठविताना मार्कांच्या हुंडणावळीच्या दरास काही धक्का बसणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे असेही ठरविण्यात आले. डॉज–योजनेतील दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे खंडणीचा काही भाग जर्मनीने पैशाच्या स्वरूपात नाही तर मालाच्या स्वरूपात द्यावा अशीही सवलत दिली ही होय. शिवाय या डॉज–योजनेत जर्मनीच्या आर्थिक पुनर्घटनेकरिता इतर राष्ट्रांकडून कर्ज मिळविण्याची व्यवस्था व्हावी अशीही एक सूचना करण्यात आली.

## यंग-कमिटीच्या योजनेचे स्वरूप

१९२४ पासून चार-पाच वर्षे जर्मनीस बरी गेली. या अवधीत उद्योगधंदे, रेल्वे व इतर अनेक बाबींकरिता इतर राष्ट्रांत, विशेषतः अमेरिकेत, जर्मनीने मोठमोठी कर्जे उभारली. या कर्जातूनच खंडणीची रकम परस्पर देण्याची सोय करिता येण्यासारखी होती. म्हणून हुंडणावळीची अडचण फारशी भासली नाही. खंडणीचा काही भाग मालाच्या स्वरूपात देण्याच्या तरतुदीमुळे काही उद्योगधंद्यांचे गिऱ्हाईक वाढल्यासारखे झाले व एकंदर काल तेजीचा आला. परंतु जागतिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे हे फार दिवस चालणे शक्य नव्हते. त्यातल्या त्यात किमतीचे प्रमाण हळूहळू सारखे उतरावयास सुरुवात झाल्यामुळे एकंदर खंडणीच्या प्रश्नाचा पुनर्विचार करणे १९२९ साली प्राप्त झाले. ह्या साली घडविलेल्या यंग-कमिटीच्या योजनेचे स्वरूप डॉज-योजनेहून बरेचसे भिन्न आहे. एकतर खंडणीची रकम या योजनेत बरीच कमी झाली. डॉज-योजनेप्रमाणे १९२९ नंतर जर्मनीने द्यावयाची रकम २५० कोटी मार्क ठरविली होती; आणि शिवाय ही वार्षिक खंडणी संपण्याविषयी अमुक एक वर्षांची अशी काहीच मुदत घातली नव्हती. यंग-योजनेप्रमाणे एकंदर खंडणी देण्याची मुदत ५८ वर्षांची मुक्रर करण्यात आली. म्हणजे सन १९८७–८८ नंतर जर्मनीने काही एक द्यावयाचे नाही

असे ठरले. या अवधीत पहिल्या ३७ वर्षांत खंडणीची रक्कम दरसाल २०५ कोटी मार्क, यापुढील अठरा वर्षे १६५ कोटी मार्क व शेवटची तीन वर्षे ९० कोटी मार्क, अशी ठरविण्यात आली. पण याचबरोबर डॉज-योजनेत जर्मनीस दिलेल्या काही सवलतीही काढून घेण्यात आल्या. दोस्त-राष्ट्रांच्या मुखत्याराने बर्लिनमध्ये राहून सर्व कारभार करावयाचा यात जर्मनीला आपली मानहानी आहे असे वाटणे स्वाभाविक होते. परंतु हा मुखत्यार काढून घेतल्यावर साहजिकपणेच खंडणीचा पैसा परराष्ट्रात पोचविण्याची तरतूद करण्याची जबाबदारी जर्मनीवरच आली. म्हणजे डॉज-योजनेत जर्मनीस हुंडणावळीबाबत जे संरक्षण वळते करून (transfer protection) दिले होते, ते काढून घेण्यात आले. तसेच मालाच्या रूपाने खंडणी देण्याविरुद्ध दोस्त-राष्ट्रांची सारखी तक्रार होतीच. त्यांचे म्हणणे असे की, यामुळे आमच्या उद्योगधंद्यांस जर्मन मालाची स्पर्धा फार जाचते, कारण हा जर्मन माल काही झाले तरी आम्हांस घेतलाच पाहिजे. उलट काही भाग मालाच्या रूपाने न दिला तर खंडणी पोचविणे आम्हास दुरापास्त होईल, अशी अडचण जर्मनीच्या बाजूने सांगण्यात आली. शेवटी मालाच्या रूपाने खंडणीची काही रक्कम देण्याची सवलत फक्त दहा वर्षांपुरतीच ठेवण्यात आली आणि ही रक्कमही कमी करण्यात आली.

## सार्वराष्ट्रीय पेढीची उभारणी

हुंडणावळीमुळे अथवा इतर अडचणींमुळे जर्मनीस एखाद्या वर्षी खंडणी पोचविता न आल्यास काय करावे याची व्यवस्था यंग-योजनेत अगदी निराळ्याच तऱ्हेने करण्यात आली, ती अशी : एकंदर खंडणीच्या रकमेचे दोन भाग करण्यात आले. एक भाग ६६ कोटी मार्कांचा, जर्मनीने काही झाले तरी दिलाच पाहिजे; आणि म्हणून त्यास 'बिनशर्त वार्षिक खंडणी' असे नाव देण्यात आले आहे. वार्षिक खंडणीचा राहिलेला भाग–'सशर्त वार्षिक खंडणी'–हा एखाद्या वर्षी देणे न देणे हे जर्मनीच्या इच्छेवर थोडेसे अवलंबून आहे. तेही इतकेच की, कोणत्याही वर्षी खंडणीचा हा भाग देणे जर्मनीस तहकूब करिता येईल. परंतु या भागाचीसुद्धा मिळावयाची ती फक्त तहकुबीच, सूट कधी मिळणार नाही; व तहकुबी मिळावयाची ती देखील जास्तीत जास्त दोन वर्षांकरिता. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे यंग–योजनेप्रमाणे असे ठरविण्यात आले की, २०५ कोटी मार्क वार्षिक खंडणी देण्याची ऐपत जर्मनीस आहे, त्यातील ६६ कोटी कोणत्याही वर्षात देता येतील व बाकीची रक्कम एखाद्या वेळेस हुंडणावळीच्या अडचणीमुळे देता न आली, तरी ही अडचण केवळ तात्पुरत्या स्वरूपाचीच असणार. या ६६ कोटी बिनशर्त खंडणीबद्दल दुसरी एक योजना आहे. ती अशी की, पुढेमागे एवढे वार्षिक व्याज येईल तितके द. सा. द. शे. ६ टक्के व्याजाचे कर्जरोखे जर्मन आगगाड्यांच्या तारणावर जर्मनीने काढून ते दोस्त-राष्ट्रांच्या सरकारांस विकावे. याचा थोडक्यात परिणाम असा की, एवढी वार्षिक खंडणी नेहमी देण्याऐवजी आगगाड्यांच्या तारणावर डिबेंचरसारखी योजना करून त्याचे व्याज आगगाड्यांच्या उत्पन्नातून भागविता यावे. अर्थात हे व्याज देण्याचा बोजा प्रत्यक्ष आगगाड्यांवर नसून तो नेहमी जर्मन सरकारावरच राहील. यंग-योजनेत दोस्त राष्ट्रांचा मुखत्यार काढून घेतला, तर त्याऐवजी एका सार्वराष्ट्रीय पेढीची उभारणी करण्यात आली. ज्याप्रमाणे कोणत्याही एका देशात तेथील एकंदर पतपेढ्यांच्या व्यवहारांचे नियंत्रण करणारी एक मध्यवर्ती पेढी हल्ली स्थापलेली असते, त्याचप्रमाणे सर्व जगातील व्यवहारांकरिता ही सार्वराष्ट्रीय पेढी असे हिला स्वरूप यावे, अशी कल्पना याच्या मुळाशी आहे. गेल्या दहा-बारा वर्षांत निरनिराळ्या देशांतील मध्यवर्ती पेढ्यांचे एकमेकींशी असावे तितके सहकार्य नसल्यामुळे बऱ्याच वेळेस अनिष्ट परिणाम घडून येतात असे आढळून आले आहे. तथापि केवळ ही अडचण दूर करण्याकरिताच सर्व राष्ट्रांच्या संमतीने

सार्वराष्ट्रीय पेढी निघाली असती किंवा नाही याबद्दल शंकाच आहे. परंतु जर्मनीपासून खंडणी घेणे व त्याबाबत निरनिराळे व्यवहार करणे याकरिता मुख्यत्वे एखादी पेढीवजा सार्वराष्ट्रीय संस्था काढणे प्राप्तच होते. तेव्हा आयतेच सार्वराष्ट्रीय पेढीच्या कल्पनेला मूर्त स्वरूप आले. या संस्थेस पुढे काय आकार येईल तो येवो, पण सुरुवातीस तरी हिचा मुख्य कारभार जर्मन खंडणीबाबत असणार हे उघड होते.

## अमेरिकेचे कर्ज फेडण्याचा प्रश्न

हल्ली अमलात असलेल्या जर्मन खंडणीसंबंधीच्या यंग-योजनेचे स्वरूप हे असे आहे. या योजनेतील एका महत्त्वाच्या बाबीबद्दल उल्लेख करावयाचा राहिला. ती बाब म्हणजे दोस्त-राष्ट्रांस द्यावयाची खंडणी व दोस्त-राष्ट्रांनी अमेरिकेस कर्जफेडीबद्दल द्यावयाची रकम यांचा परस्परसंबंध ही होय. याबद्दलचा झालेला करार यंग-कमिटीच्या अहवालात समाविष्ट केला गेला नाही. याचे कारण असे की, अमेरिकन प्रतिनिधींना या करारात भाग घेणे शक्य नव्हते, व त्यांच्या दृष्टीने ते इष्टही नव्हते. हा करार मुख्यत्वे असा आहे की, अमेरिकेकडून दोस्त-राष्ट्रांस जर कर्जफेडीबाबत पुढे-मागे काही सूट मिळाली तर तिच्या दोन-तृतीयांश सूट जर्मनीस आपल्या वार्षिक खंडणीत मिळावी.

खरे सांगावयाचे म्हणजे अमेरिकेचे दोस्त-राष्ट्रांनी फेडण्याचे कर्ज व जर्मनीपासून दोस्त-राष्ट्रांस मिळणारी खंडणी यांचा परस्परसंबंध फार निकट आहे; आणि त्या दोन्ही प्रश्नांचा विचार एकत्र होणे अवश्य होते. परंतु ते आज इतकी वर्षे अमेरिकेच्या अट्टाहासामुळे अशक्य झाले. दोस्त-राष्ट्रांवरील अमेरिकेच्या कर्जाचाही उगम महायुद्धातच आहे. यातील बहुतेक सर्व कर्ज दोस्तराष्ट्रांनी युद्ध चालू असताना घेतलेले आहे व काही थोडेसे युद्धानंतरही उभारलेले आहे. तथापि काही झाले तरी हे कर्ज उभारणे दोस्त-राष्ट्रांस महायुद्धामळे अथवा त्याने उत्पन्न केलेल्या परिस्थितीमुळेच आवश्यक झाले. या कर्जावर द्यावयाचे व्याज अमेरिकन सरकारास राष्ट्रीय कर्जावर द्यावे लागते तेवढेच द्यावयाचे असे ठरविण्यात आले होते. युद्धाच्या सुरुवातीस या व्याजाचा दर दरसाल दरशेकडा तीन टक्के होता, तो वाढत वाढत शेवटी पाच टक्क्यांपर्यंत वाढला. ज्याप्रमाणे अमेरिकेने इतर राष्ट्रांस कर्ज दिले, त्याप्रमाणे इंग्लंड व फ्रान्स यांनाही दिले होते. इंग्लंडने अमेरिकेकडून घेतलेल्या कर्जाहूनही इतर राष्ट्रांस कर्जाऊ दिलेली रकम बरीच मोठी होती. पण फ्रान्सने कर्जाऊ दिलेली रकम ही या राष्ट्राने अमेरिका व इंग्लंडपासून घेतलेल्या कर्जाहून बरीच कमी होती. अमेरिकेने मुख्यत्वे इंग्लंड, फ्रान्स, इटली व बेल्जियम यांस कर्ज दिले होते; तर इंग्लंडने फ्रान्स, इटली, रशिया व बेल्जियम यांस व फ्रान्सने मुख्यत्वे रशिया व बेल्जियम यांस दिले होते. यांतील रशियास दिलेले कर्ज रशियन राज्यक्रांतीमुळे अर्थात साफ बुडाले. तीन्ही धनकोंनी मिळून रशियास दिलेले कर्ज एकंदर ७६ कोटी पौंड होते.

## कर्जफेडीचे परस्पर करार

व्हर्सायच्या तहनाम्याची वाटाघाट चालू असतानाच खंडणी व दोस्त–राष्ट्रांनी एकमेकांस दिलेली ही कर्जे सर्व रद्द करून जर्मनीकडून फारतर युद्धामुळे फ्रान्सचा व बेल्जियमचा उध्वस्त झालेला प्रदेश पुनः वसविण्यास लागेल येवढाच पैसा घ्यावा अशी सूचना कित्येकांनी, विशेषतः मि० कीन्स यांनी केली होती. पण ती कोणासच त्या वेळेस ग्राह्य वाटली नाही. ज्या त्या राष्ट्राच्या पुढाऱ्यांनी आम्ही जर्मनीवर पुरता सूड उगवू अशा तऱ्हेची वचने आपापल्या मतदारसंघास दिलेली होती. शिवाय या सर्वच राष्ट्रांस अमेरिकेचे कर्ज कसे फेडावयाचे याची विवंचना होतीच. अमेरिकेतील लोकमत तर या कर्जाची सरसहा

सूट देण्यास तयार नव्हते. तेव्हा वर दर्शविल्याप्रमाणे जर्मनीकडून बेसुमार खंडणीची मागणी होतच गेली; व इकडे अमेरिकेने 'आमच्या कर्जफेडीचा व तुम्ही जर्मनीकडून घ्यावयाच्या खंडणीचा अर्थाअर्थी काहीएक संबंध नाही', असे निक्षून दोस्त-राष्ट्रांस कळविले. यापुढे प्रत्येक राष्ट्राशी निरनिराळे करार होऊन प्रत्येक ऋणकोपुरता आपल्या कर्जाचा प्रश्न अमेरिकेने तोडून घेतला. या सर्व प्रकारास अर्थात बराच अवधी लागला. कर्जाबद्दलची रक्कम नक्की करण्याचा करार इंग्लंडशी १९२३ मध्ये झाला. तर इतर काही राष्ट्रांशी १९२९ पर्यंत करार होतच होते. काही राष्ट्रांस अमेरिकेने अगदी कमी सूट दिली, तर काही राष्ट्रांस सूट फार द्यावी लागली. इंग्लंडनेही अशाच प्रकारचे करार आपल्या कर्जदारांशी केले आहेत. स्थूलमानाने इंग्लंडला खंडणी व कर्जफेड याबद्दल मिळणारी रक्कम अमेरिकेस द्याव्या लागणाऱ्या रकमेइतकीच आहे, तर इतर काही दोस्त-राष्ट्रांस खंडणीपासून बराच फायदा होण्याजोगा आहे. या सर्वच रकमा फार अवाढव्य आहेत, परंतु त्यांच्या तपशिलात शिरण्याचे आपणास प्रयोजन नाही.

## खंडणीची वाटणी

खंडणीच्या या एकंदर प्रश्नात जर्मनीच्या बाजूने लढणाऱ्या इतर राष्ट्रांकडून घ्यावयाच्या खंडणीचाही उल्लेख करणे अप्रस्तुत होणार नाही. जर्मनीकडून मिळणाऱ्या खंडणीतील प्रमुख वाटेकरी फ्रान्स, ब्रिटिश साम्राज्य, इटली व बेल्जियम हे होते; तर ऑस्ट्रिया, हंगेरी व बल्गेरिया यांजकडील खंडणी फ्रान्स, इटली, ग्रीस, ब्रिटिश साम्राज्य, रुमानिया व युगोस्लाव्हिया यांस मुख्यत्वे वाटून द्यावयाची असे ठरले होते. प्रथमपासूनच या इतर राष्ट्रांकडून खंडणीच्या रूपाने विशेष रक्कम मिळणार नाही अशी अटकळ होतीच. त्यातच १९२१-२२ नंतर ऑस्ट्रियाची इतकी दुर्दशा उडाली की त्या राष्ट्रास राष्ट्रसंघाकडे धाव घ्यावी लागली. तेव्हापासून ऑस्ट्रियाकडून काही लभ्यांश होईल ही आशाच सोडून द्यावी लागली. ऑस्ट्रियाच्या आर्थिक पुनर्घटनेकरिता लागणारे कर्ज राष्ट्रसंघाने मिळवून दिले व त्याकरिता तारण म्हणून ऑस्ट्रियाची बहुतेक मालमत्ता गहाण टाकली. या कर्जावरील व्याज व मुद्दलफेड यासंबंधीच्याच रकमा इतक्या मोठ्या आहेत व हे देणे इतकी वर्षे चालू राहील की, ऑस्ट्रियास खंडणी म्हणून काहीच देता येणे शक्य नाही. एकंदर मुदत ४० वर्षांची असून वार्षिक हप्ते १४ ते ३७ लाख डॉलर एवढे आहेत (१ डॉलर म्हणजे स्थूलमानाने २॥। रु.). बल्गेरियाने वार्षिक ८० लाख डॉलरपर्यंत खंडणी देण्याचे १९२१ साली कबूल केले होते, आणि याप्रमाणे कित्येक वर्षे त्या राष्ट्राने रकमाही भरल्या. पण एवढी रक्कम बल्गेरियाच्या आवाक्याबाहेरची आहे असे आढळून आल्यावरून १९३० साली हेग येथे भरलेल्या परिषदेत ही रकम २५ लाखांवर आणण्यात आली; व एकंदर ३६ वर्षेपावेतो बल्गेरियाने खंडणी द्यावयाची असेही ठरविण्यात आले. हंगेरीचा प्रश्न बराच गुंतागुंतीचा होता. एका बाजूने हंगेरीने खंडणी जेत्यांस द्यावयाची, तर दुसऱ्या बाजूने जुन्या हंगेरीचे जे तुकडे रुमानिया, युगोस्लाव्हिया व झेकोस्लोव्हाकिया यांस देण्यात आले त्यांतील हंगेरियन प्रजाजनांच्या मालमत्तेबद्दल फारच मोठ्या रकमा या तीन राष्ट्रांकडून येणे आहेत असे हंगेरीचे म्हणणे होते. हे भिजत घोंगडे आज कित्येक वर्षे तसेच पडले होते. त्याचाही शेवटी गेल्या वर्षी निकाल लागला. यात असे ठरले की, १९४३ पावेतो काही थोडीशी रकम हंगेरीने दोस्त-राष्ट्रांस द्यावी, त्यापुढे हंगेरीने खंडणीदाखल द्यावयाच्या रकमांचा एक निधी बनवून त्यातूनच हंगेरीच्या प्रजाजनांची नुकसानभरपाई करून द्यावी.

## खंडणीचे परिणाम

येणेप्रमाणे १९३० सालपावेतो सार्वराष्ट्रीय खंडण्या व कर्जे या प्रश्नांची निरवानिरव लागली होती.

यात खरे धनको राष्ट्र असे एकच व ते म्हणजे अमेरिका, आणि अतोनात भयंकर बोजा असा कोणा एकाच्या शिरावर दिला गेला असेल तर तो जर्मनीच्या माथ्यावर हे उघडच आहे. इतपत व्यवस्था होण्यासही दहाबारा वर्षे लागली आणि येवढ्या अवधीत ऑस्ट्रियाची अगदी दुर्दशा उडून गेली. जर्मनीची चलनपद्धती कवडीमोल होऊन काही काळपावेतो व्यापार व कोणत्याच प्रकारचा आर्थिक व्यवहार करणे अशक्य झाले. तसेच बल्गेरियास राष्ट्रसंघाकडे धाव घ्यावी लागली हे लक्षात घेण्यासारखे आहे. आता प्रश्न उरतो तो हा की, या ज्या निरनिराळ्या योजना आज मुक्रर झालेल्या आहेत, त्या तरी कितपत शाश्वत आहेत? यंग-योजनेत ठरविलेली रक्कम देण्याची आपली ऐपत नाही, असे त्याच वेळेस जर्मन प्रतिनिधी म्हणत होते. परंतु अमेरिकेकडून दोस्त-राष्ट्रांस सूट मिळाल्यास आपणासही तिचा फायदा मिळेल या मोठ्या आशेवर यंग-योजनेस त्यांची संमती मिळाली. गेल्या दोन वर्षांत एकंदर आर्थिक परिस्थिती तर जास्त जास्त बिघडत चालली आहे. किमती सर्व उतरल्यामुळे खंडणीचा बोजा पूर्वीपेक्षाही हल्ली असह्य झाला आहे हे उघड आहे. कारण पूर्वीइतकाच पैसा परराष्ट्रांस पोचविण्यास जर्मनीस आता पुष्कळच अधिक माल विकावा लागेल. गेल्या वर्षभर या अवघड परिस्थितीत त्या राष्ट्राने कसेबसे दिवस काढले. जर्मन सरकारने पगारात सारखी कापाकाप चालविली असून निरनिराळ्या करांचा बोजा सारखा वाढवला जात आहे, तरीही जमाखर्चाची तोंडमिळविणी होणे अशक्य दिसू लागले. नवीन कर व खंडणी यांमुळे जर्मन लोकांत बेकारी वाढत आहे व त्यांस आपल्या राहणीचे मान कमी कमी करावे लागत आहे हे स्पष्ट दिसत आहे. परंतु आता हे अगदी मर्यादेबाहेर जात असून लोकांत असंतोष फारच तीव्रतेने फैलावत आहे अशी चिन्हे गेले महिना-दोन-महिने दिसून येऊ लागली आहेत. हल्लीच्या मंत्रिमंडळाचा पराभव होणे म्हणजे राज्यक्रांतीचीच सुरुवात होय, असे भविष्य बरेचजण वर्तवीत आहेत. आणि काही झाले तरी राज्यक्रांती म्हटली की जर्मनीच्या धनकोंस ती भीतिप्रदच. कारण न जाणो, रशियासारखा प्रकार होऊन सर्वस्वच बुडावयाचे!

या सर्व कर्ज-खंडणीच्या बोजाचा उद्योगधंद्यांतील तेजीमंदीशी काय संबंध आहे हेही थोडक्यात दर्शविले पाहिजे. जर्मनीवर बोजाचा परिणाम अनिष्ट होणार हे अगदी उघडच आहे. पण जर्मनीतील राहणीचे मान कमी झाल्यास जर्मन उद्योगधंद्यांची स्पर्धा इतर औद्योगिक राष्ट्रांसही बाधणार. शिवाय कर्जाच्या व खंडणीच्या रकमा सर्वच राष्ट्रांच्या जमाखर्चाच्या आकड्यांत फार मोठ्या प्रमाणात घुसल्या आहेत; व प्रत्येक राष्ट्राची स्थिती अशी की, आपले देणे देण्याची तरतूद तर केली पाहिजेच, पण येणे सगळे येईलच असे नक्की गृहीत धरणे कठीण! यामुळे एकंदर सर्वच फडणिशी कारभारात अनिश्चितता फार आलेली. आणि शेवटी या सर्व कारणांमुळे मध्य–युरोप व जर्मनी ही राष्ट्रे बरीच गरीब झाल्यामुळे तेथील व्यापार बसला व संपन्न राष्ट्रांच्यासुद्धा मालाला पाहिल्यासारखी मागणी येत नाही. सारांश, एकंदर कर्ज–खंडणीची नसती भानगड जोपावेतो मिटत नाही तोपर्यंत आर्थिक व्यवहारांची घडी पुनः नीटशी बसणार नाही असे आता सर्वच अर्थशास्त्रज्ञांचे मत झाले आहे.

प्रेसिडेंट हूवर यांनी कर्ज–तहकुबीबद्दलचा जो जाहीरनामा नुकताच काढला आहे तो फक्त एका वर्षापुरताच आहे. त्यास बहुतेक सर्व राष्ट्रांनी संमती दिली, पण फ्रान्सने विरोध केलाच. फ्रान्सचे म्हणणे असे की, ६६ कोटी मार्कांची जी बिनशर्त खंडणी यंग-योजनेत आहे ती तत्त्वतः जर्मनीने केव्हाही दिलीच पाहिजे. हे तत्त्व अमेरिकेने मान्य केले. आता जर्मन आगगाड्यांकडून ही रक्कम सार्वराष्ट्रीय पेढीकडे देण्यात येईल; पण ही पेढी लगेच ती रक्कम जर्मनीस कर्ज म्हणून परत देईल अशी योजना करण्यात आली आहे. तसा विचार केला तर निदान जर्मनीपुरती तहकुबी जर्मनीला यंग–योजनेप्रमाणेच मिळविता आली असती. पण प्रे. हूवर यांच्या जाहीरनाम्याचे खरे महत्त्व या एका वर्षाच्या तहकुबीपुरतेच नाही. कारण एवढ्या तहकुबीने काम भागले असे कोणासच वाटत

नाही. तथापि आता अमेरिकेसही या सर्व प्रश्नाचा आपण पुनर्विचार केला पाहिजे असे वाटू लागले असून सार्वराष्ट्रीय कर्जे व खंडण्या यांची आणखी काही जास्त सवलतीची नवी योजना अमेरिका स्वतः पुढाकार घेऊन घडवून आणील, अशी सर्वांची अटकळ झाली आहे. सन १९८७ सालपावेतो जर्मनी खंडणी देत राहील अथवा सर्व राष्ट्रे अमेरिकेच्या कर्जाची फेड करीत राहतील हे अगदीच असंभाव्य दिसते. फार मोठी आपत्ती कोसळावी व मग आपण घोडचूक केली हे मुत्सद्यांस कळावे, असाच प्रकार गेली दहा बारा वर्षे जगात सारखा चालला आहे. सरतेशेवटी हे सर्वच देणे-घेणे मिटवून टाकावे लागणार हे उघड दिसत आहे. परंतु त्यास आणखी किती वर्षे लागणार व आणखी किती आर्थिक अरिष्टे आल्यावर मुत्सद्यांचे डोळे पुरते उघडणार एवढाच प्रश्न आहे. देव करो आणि या खेपेसच अमेरिकेस व इतर राष्ट्रांस सुबुद्धी होऊन प्रस्तुत प्रकरणाची एकदाची कायमची वासलात लागो !

*लोकशिक्षण* ४ : ७ जुलै १९३१ पृ० ४९५-५०३.

☆

# ४ . . सुवर्णमानपद्धती

गेल्या महिन्यात लंडनमध्ये घडून आलेल्या चलनपद्धतीच्या क्रांतीमुळे जिकडेतिकडे या विषयासंबंधी अतिशय जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. इंग्लंडसारख्या बलाढ्य व संपन्न राष्ट्रालासुद्धा एकप्रकारचे दिवाळखोरीचे धोरण का स्वीकारावे लागले असा प्रश्न प्रत्येकजण विचारू लागला आहे. आणि शिवाय इंग्लंडच्या धोरणामुळे हिंदुस्थानातील परिस्थितीवर जो परिणाम घडून आला आहे व रुपयाच्या भवितव्याबद्दल जो वादविवाद सुरू झाला आहे, त्यामुळेही हिंदी लोकांस हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा वाटणे साहजिक आहे. इंग्लंडमधली सुवर्णपद्धती सुटल्याबरोबर हिंदुस्थानासही ती सोडून देणे आवश्यक होते. परंतु पुढे कोणती पद्धती स्वीकारावयाची, रुपयाचा संबंध पुनः सोन्याशी जोडावयाचा किंवा नाही, रुपयाचा संबंध कागदी पौंडाशी जोडणे इष्ट आहे काय, आपल्या चलनपद्धतीचा संबंध कशाशीच जोडला नाही तर त्याचा परिणाम आपल्या राष्ट्राच्या पतीवर व आपल्या धारणेवर काय होईल, हे सर्वच प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. एकंदर सुशिक्षित समाजात याची चर्चाही फार जोराने होऊ लागली आहे. तेव्हा या संधीचा फायदा घेऊन पैसा, चलन-पद्धती व हल्लीची तत्संबंधी जागतिक परिस्थिती याबद्दल थोडेसे विवेचन करण्याचा आमचा विचार आहे.

## पैसा व त्यासंबंधी काही सिद्धान्त

अगदी मुळापासून विचार करावयाचा तर पैशाचे कार्य काय, याचे प्रथम थोडक्यात दिग्दर्शन करू. पैसा हे एक विनिमयसाधन आहे. म्हणजे सर्व प्रकारच्या देवघेवीत पैशाचा उपयोग करण्यात येतो व पैसा वापरल्यामुळे व्यवहारात सुलभता येते. पैशाच्या मध्यस्थीशिवाय देवघेवीत अतोनात अडचण उत्पन्न होईल. मानव समाजाच्या अगदी सुरुवातीपासून पैसा म्हणजे एखादे विशिष्ट विनिमयसाधन म्हणून कोणत्या तरी वस्तूचा उपयोग करण्यात आलेला आढळतो. कोठे कवड्या, कोठे नारळ, तर कोठे कातड्याचे तुकडे इत्यादी वस्तू पैशाप्रमाणे वापरताना काही रानटी समाज आजही आढळतात. अर्थात पैशाची पात्रता अंगी येण्यास काही विशिष्ट गुण वस्तूच्या अंगी असले पाहिजेत. वस्तू सर्वत्रोपयोगी असल्याशिवाय व ती सर्वांनाच हवीशी वाटल्याशिवाय तिचा पैसा म्हणून सार्वत्रिक प्रसार होणे शक्य नाही. तसेच टिकाऊपणा, सुटसुटीतपणा व राशीच्या मानाने मूल्याधिक्य असणे वगैरे गुणही या वस्तूत हवेत. फार दिवसापासून हे सर्व गुण धातूंत – विशेषतः सोन्याचांदीत असतात असे आढळून आल्या-मुळे धातूंचाच पैसा म्हणून उपयोग केला जात आहे. गेली बरीच शतके मुख्यत्वे चांदीचा उपयोग जगभर करण्यात येत होता. परंतु शंभर वर्षांत हळूहळू सोन्याचे महत्त्व वाढून सोन्याच्या नाण्यावरच अधिष्ठित झालेली चलनपद्धती सर्व संपन्न राष्ट्रांनी महायुद्धापूर्वी स्वीकारली होती. तथापि पैसा या नात्याने निरनिराळ्या गोष्टींचा आज उपयोग केला जातो. तांब्याचा पैसा, निकलची आणेली, चांदीचा

रुपया, कागदी नोट अथवा बँकेवरील चेक हे सर्व पैशाचेच प्रकार आहेत. ही सर्व आर्थिक देवघेवीची विनिमयसाधने होत.

परंतु पैशाचे आणखी एक निराळेच जे कार्य आहे ते हे सर्व प्रकारचे पैसे करू शकत नाहीत. त्याकरिता चलनपद्धतीतील एखाद्या विशिष्ट प्रकारच्या पैशाचाच उपयोग करण्यात येतो. हे कार्य म्हणजे मूल्यमापनाचे. कोणताही क्रयविक्रयाचा व्यवहार करण्यापूर्वीची पहिली क्रिया किंमत ठरविणे ही होय. म्हणजे पैसा हा विनिमयसाधन म्हणून प्रत्यक्ष योजण्यापूर्वी किती पैसे द्यावयाचे हे निश्चित होणे जरूर आहे. अर्थात उपस्थित व्यवहार ज्या वस्तूसंबंधी व्हावयाचा तिचे मोल काय हा प्रश्न येथे आला. सर्व आर्थिक व्यवहाराचे मूलस्वरूप वस्तूंचे तुलनात्मक मोल ठरवून त्यांची एकमेकांत अदलाबदल करणे हेच होय. परंतु अमुक एक वस्तू जास्त किंवा कमी मूल्यवान अथवा ती अमक्या वस्तूच्या अमुक पट मूल्यवान या सर्व गोष्ट ठरविण्यास काही तरी मोल मापण्याचे साधन आपणांस अवश्य आहे. येथे आपणांस ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, विनिमयसाधन म्हणून ज्या गोष्टीचा उपयोग करण्यात येतो, तिचाच मूल्यमापनाकडे उपयोग झाला पाहिजे असे नाही. किंबहुना मूल्यमापनास अमुक एक जड वस्तूच पाहिजे असेही नाही. ज्याप्रमाणे लांबी मोजण्यास फूट अथवा इंच अशी एक लांबीसंबंधी निश्चित कल्पना पाहिजे, त्याप्रमाणे मूल्यमापनासही मोलाबद्दलची निश्चित कल्पना बनवून तिचा व्यवहारात उपयोग करणे शक्य झाल्यास तशीही पद्धती पाडता येईल. परंतु एवढे खरे की, बहुशः आजपावेतो देवघेवीत ज्या वस्तूचा पैसा म्हणून उपयोग केला जातो तिच्याच किमतीचा मूल्यमापनातही उपयोग करितात. म्हणजे चलनपद्धतीत सोन्याचांदीच्या नाण्यांचा उपयोग झाल्यास सोन्यात, अथवा चांदीत, अथवा दोहोंतही सर्व पदार्थांच्या किमती ठरविण्यात येतात. अशा या धातुमय चलनपद्धतीत कोणत्याही वस्तूची किंमत म्हणजे त्या वस्तूचा मोबदला किती सोने अथवा किती चांदी मिळेल हीच होय. अर्थात येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती अशी की लांबी, घनता, उष्णता इत्यादी गुणांचे मान ठरविण्यास आधिभौतिक शास्त्रज्ञ त्या त्या गुणाविषयी काही निश्चित कल्पना बसवून तिजवरूनच या गुणांचे जसे मापन करितात तशा प्रकारचे हे आपले मूल्यमापन नाही. सोन्याचांदीच्या मोलावरून इतर किमती ठरविल्या, पण स्वतः सोन्याचांदीच्या मूल्याची निश्चिती आहे काय? हे मूल्य फूट व डिग्री यांच्या कल्पनेसारखे काही स्थिर, अचल नाही. यामुळे आर्थिक व्यवहारात किमतीसंबंधी दोन प्रकारचे फरक होऊ शकतात व होत असतात. एक फरक म्हणजे कोणत्याही विवक्षित गोष्टीची किंमत वाढणे अथवा कमी होणे. कोळसा, घरभाडे अथवा डॉक्टराची फी या व असल्या कोणत्याही गोष्टीची किंमत त्या त्या गोष्टीच्या मागणी-पुरवठ्यांत फरक पडून वर-खाली होईल. हा एक प्रकार झाला. परंतु खुद्द मूल्यमापनास वापरलेल्या वस्तूच्या मागणी-पुरवठ्यांतच फरक पडल्यास आर्थिक व्यवहारातील सर्वच किमतीचे कोष्टक बदलणे साहजिक आहे. पहिला प्रकार म्हणजे विवक्षित गोष्टींच्या किमती बदलण्याचा व दुसरा सर्वच किमतींचे मान म्हणजे धारण बदलण्याचा.

आता सोन्यास अथवा चांदीस चलनपद्धतीत स्थान मिळून मूल्यमापनाकडे त्याचा उपयोग होऊ लागला म्हणजे या धातूंच्या मागणीस दुहेरी स्वरूप येते. एक तर इतर कोणत्याही वस्तूप्रमाणे निरनिराळ्या प्रकाराने समाजात या धातूंचा जो वापर होतो त्यासंबंधी उद्भवणारी मागणी, व दुसरे म्हणजे पैसा म्हणून वापरण्यास जेवढे सोने अथवा चांदी लागते तिची मागणी. विनिमयसाधने व्यापारास अवश्य आहेत म्हणून वर सांगितलेच आहे. जितका व्यवहार मोठा तितकी पैशाबद्दल मागणीही अधिक असणार. तेव्हा व्यवहाराच्या व्याप्तीच्या मानाने सोने, चांदी कमीअधिक विपुल झाल्यास त्यांची किंमत चढणार किंवा उतरणार. येथेच दुसरीही एक गोष्ट ध्यानात ठेविली पाहिजे. ती ही की धातूंना कोणत्याही चलनपद्धतीत जी मागणी येते तीही दुहेरी प्रकारची असते. एक विनिमयसाधन या नात्याने

धातूचा उपयोग होतो म्हणून, व दुसरा मूल्यमापनाकडे उपयोग होतो म्हणून. उदाहरणार्थ, पै-पैसे पाडण्याकरिता सरकार दरसाल बरेचसे तांबे विकत घेते. परंतु तांब्याचा मूल्यमापनास उपयोग होत नाही म्हणून या दृष्टीने त्यास मागणी नसते. उलटपक्षी हिंदुस्थानात सोन्याचे नाणे पाडले जात नसे; परंतु मूल्यमापनाच्या कार्याकरिता सोने लागत असे.

## महायुद्धापूर्वी सुवर्णमानपद्धतीचे स्वरूप

हे पैशासंबंधीचे काही प्रास्ताविक सिद्धांत मांडल्यावर आता सुवर्णमानपद्धती म्हणून महायुद्धापूर्वी बहुतेक सर्व पाश्चात्य देशांत जी चलनपद्धती प्रचलित होती तिजबद्दल विवेचन करू. या पद्धतीत सोन्याच्या नाण्याचा सार्वत्रिक प्रसार होत असून मूल्यमापनाचे साधन म्हणूनही सोन्याचा उपयोग करण्यात येत असे. परंतु सोन्याचे नाणे वापरले म्हणजे सोन्याचा मूल्यमापनास उपयोग आपोआप झाला असे मुळीच नाही. हिंदुस्थानात चांदीच्या रुपयाचा चलनपद्धतीत मुख्यत्वे उपयोग केला जातो. परंतु आपली पद्धती रौप्यमानाची खास नव्हे. विनिमयसाधने म्हणून ज्यांना पैशाचे स्वरूप आहे अशा सर्व वस्तू सहसा प्रत्येक देशात कायद्यानेच ठरविल्या जातात; आणि एकंदर चलनपद्धतीचे स्वरूपही कायद्यानेच ठरवितात. तसेच चलनी नाणी व बँकनोटा यांची संख्या कमीजास्त करणे हे विशिष्ट परिस्थितीत सरकार व सरकारने चलनपद्धतीसंबंधी विशेष अधिकार दिलेल्या मध्यवर्ती बँका यांच्यावर अवलंबून असते. पैशाची किंमत ही पैशाचा पुरवठा व पैशाच्या नानास्वरूपी आर्थिक देवघेवीचे मान या दोन गोष्टींवर मुख्यतः अवलंबून असते. परंतु पैशाचा पुरवठा वाढविणे, न वाढविणे सरकारच्या हातात आहे. तेव्हा नाण्याची किंमत व धातूची किंमत ही एकच असली पाहिजे असे नाही. सुवर्णमानपद्धतीत मात्र या दोन्ही किमती एकच असल्या पाहिजेत.

सोने अथवा चांदी याचा प्रथम जेव्हा व्यवहारात विनिमयसाधन म्हणून उपयोग होऊ लागला, त्या वेळेस नाणे पाडण्याच्या कलेची विशेष प्रगती झालेली नव्हती. तेव्हा बरीच शतके सोन्याचांदीच्या लडींचा पैसा म्हणून उपयोग करीत असत. या काळात अर्थात कस लावून धातू शुद्ध आहे किंवा नाही हे पाहणे व लडीचे वजन करणे या दोन्ही क्रिया प्रत्येक व्यवहाराच्या प्रसंगी कराव्या लागत असत. हळूहळू नाणी पाडण्यात येऊ लागली व त्यामुळे व्यवहार सुकर झाला. नाणे म्हणजे राजाने अथवा सरकारने व्यवहाराच्या सोयीकरिता अमुक वजनाचा व अमुक कसाचा पाडलेला धातूचा तुकडा असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु नाण्यात बरीच सरभेसळ असे व खोटी नाणी पाडणे अथवा नाणी झिजवून हलकी करणे इत्यादी निरनिराळे प्रकार संभवत असल्यामुळे नाणी पारखून घेणे प्रत्येक व्यवहाराच्या वेळेस अवश्य होते. आपल्याकडील मराठशाहीतील मुल्की अधिकाऱ्यांपैकी पोतदाराकडे वसुलात आलेली नाणी पारखून घेण्याचे काम होते हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. नाण्याचा जेव्हा सार्वत्रिक प्रसार झाला तेव्हा व्यवहारात धातूच्या लडी कोठे दृष्टीस न पडता केवळ नाण्यांचाच उपयोग हळूहळू होऊ लागला. यामुळे मात्र सरकारचे अथवा राजाचे चलनपद्धतीवरील नियंत्रण-सामर्थ्य बरेच वाढले. आणि काही काही प्रसंगी याचा फायदा घेऊन राजे लोक हलकी नाणी पाडून आपल्या खजिन्याची भर करीत. यामुळे नाण्याची किंमत व नाण्यातील धातूची किंमत यांमध्ये फरक पडणे शक्य झाले. परंतु सोने या धातूचा मूल्यमापनाकडे उपयोग करावयाचा तर असा फरक पडू देणे इष्ट नाही. कारण धातूच्या किमतीत व नाण्याच्या किमतीत फरक पडल्यास मूल्यमापन त्या धातूने होत नाही हे उघड आहे. तसेच हलकी नाणी वापरण्यास एकंदर लोकांची तयारी नसणार व त्यामुळे हलकी नाणी पाडण्याचा परिणाम शेवटी नाण्याची किंमत उतरण्यात होणार. एकंदर चलनपद्धतीवरील विश्वास उडू नये व नाण्याची किंमत फार कमी होऊ नये

म्हणून अमुक एक निश्चित वजनाचे व अमुक एक कसाचे नाणे सरकारने पाडले पाहिजे असे त्यावर कायदेशीर बंधन घालण्यात येते. उलट काही वेळेस नाण्यांचा तुटवडा पडल्यामुळे त्यांची किंमत त्यातील धातूच्या किमतीहून जास्त होण्याचाही संभव असतो. अशी तफावत पडू नये म्हणून महायुद्धापूर्वी जी सुवर्णचलनपद्धती प्रस्थापित झालेली होती तीत सर्रास खालील प्रकारची योजना करण्यात आली होती.

ही योजना अशी की, कोणीही सोने टांकसाळीत घेऊन आल्यास त्या सोन्याची नाणी पाडून घेण्याचा त्यास कायदेशीर हक्क दिलेला होता. याचा परिणाम साहजिक असा होई की, नाण्याची किंमत त्यातील धातूच्या किमतीपेक्षा अधिक असल्यास टांकसाळीतून सोन्याची नाणी पाडून नेणे फायदेशीर होत असे; आणि अशा रीतीने चलनी नाण्यांचा संग्रह वाढून नाण्याची किंमत कमी होई व ती धातूच्या किमतीबरोबर येई. उलटपक्षी धातूची किंमत जास्त व नाण्यांची किंमत कमी अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यास नाणी वितळवून त्यांच्या सोन्याच्या लडी करून विकण्याचा क्रम सुरू होईल. म्हणजे नाण्यांचा साठा पुन: कमी होऊन त्यांची किंमत चढेल. अशा रीतीने टांकसाळीत सोन्याची नाणी पाडून घेण्याचा जो सार्वजनिक हक्क जिकडेतिकडे कायद्याने प्रस्थापित करण्यात आला होता, त्यामुळेच सोन्याचे नाणे व सोने यांची किंमत सारखी राखण्यात आली होती. अर्थात सोन्याचा पुरवठा वाढून त्याची किंमत खालावली असता एकंदर नाण्यांचा संग्रह वाढणे अथवा पुरवठा कमी झाला असता चलनी नाण्यांची संख्या कमी होणे या क्रिया आपोआप घडून येत.

## कागदी चलनाचा सोन्याशी संबंध

आतापर्यंत पैसा म्हणून जे विनिमयसाधन वापरण्यात येते ते मुख्यत्वेकरून सोन्याचांदीचे नाणे होय, असे आपण गृहीत धरून चाललो. परंतु वास्तविक तशी स्थिती महायुद्धापूर्वीसुद्धा नव्हती. बहुतेक संपन्न राष्ट्रात कागदी नोटा व बँकेवरील चेक यांचा देवघेवीत बराच उपयोग केला जात असे. तेव्हा सुवर्णमानपद्धतीत नोटा व चेक यांचा सोन्याशी संबंध कसा जोडला जातो हे पाहणे आवश्यक आहे. नोटा काढण्याचा हक्क बहुधा सरकारकडे अथवा काही विशिष्ट बँकांकडे राखून ठेवलेला असतो. परंतु हा हक्क कायद्यान्वये देताना त्यासंबंधी काही तरी नियंत्रण केले जाते. सुवर्णमानपद्धतीत नोटा हे मूलभूत चलन नसून सोन्याचे नाणे हेच असे. तेव्हा नोटांचा प्रसार व्यवहारात होण्याकरिता, वाटेल तेव्हा सोन्यात रूपांतर करता येईल अशी योजना करणे आवश्यक आहे. एरवी व्यवहारात नोटा वापरण्याऐवजी सोन्याची नाणीच वापरण्याकडे लोकांची प्रवृत्ती होईल. म्हणून प्रत्येक नोट ही अमुक एक किमतीची प्रॉमिसरी नोट (कर्जरोखा) आहे असे म्हटल्यास चालेल. बँका अथवा सरकार यांपैकी ज्यांनी म्हणून नोट काढली असेल त्यांनी त्या नोटेच्या मोबदला नोटेच्या किमतीची सोन्याची नाणी देण्याचे अभिवचन प्रत्येक नोटेवर छापले जात असे. अर्थात नोटांचा प्रसार बराच झाला व हा पैशाचा प्रकार सोईस्कर वाटून तो प्रचारात आला म्हणजे कोणीही नोटेचे नाणे करून घेण्याच्या भानगडीत पडत नाही. परंतु ही गोष्ट जोपर्यंत बँकेवर अथवा सरकारावर जनतेचा पूर्ण विश्वास आहे तोपर्यंतची झाली. हा विश्वास उडाल्यास प्रत्येकास कागदी नोटेच्या ऐवजी सोनेच जवळ असावे असे वाटणे साहजिक आहे. या पद्धतीत नोटेस किंमत येते ती केवळ तिचे नाण्यात केव्हाही रूपांतर करून घेता येते म्हणून होय. नोटा काढणाऱ्या संस्थेवर हे रूपांतर करून देण्याची जबाबदारी आहे; व ही जबाबदारी पार पाडण्यास नोटांचे एकंदर संख्येच्या मानाने सोन्याचा काही तरी संग्रह बाळगणे अवश्य असते. हा संग्रह किती बाळगावा याबद्दलचे नियम काही निश्चित नाहीत, निरनिराळ्या देशांच्या कायद्यांत निरनिराळ्या प्रकारचे निर्बंध घातले जात असत. काही ठिकाणी नोटांच्या किमतीचा अमुक एक हिस्सा तरी सोने

किमानपक्षी बाळगले पाहिजे असा निर्बंध असे, तर काही ठिकाणी एकंदर नोटांच्या किमतीच्या विशिष्ट इयत्तेपर्यंत इतके सोने व त्यापुढे काही जास्त प्रमाणात, अशा प्रकारची योजना असे. आपणांस लक्षात घेण्याचा मुद्दा हाच की, या सुवर्णमानपद्धतीत जरी पैसा म्हणून नोटांचा उपयोग होत असे, तरी या नोटांच्या रकमेचा व त्यांस तारण म्हणून ठेवलेल्या सोन्याच्या संग्रहाचा एक ठराविक संबंध असे. नोटा वाढविल्यास सोन्याचा संग्रह वाढविणे आवश्यक असे व सोन्याचा संग्रह कमी झाल्यास नोटांची संख्याही कमी करावी लागत असे. बँकांच्या व्यवहारांतसुद्धा हाच नियम साधारणपणे लागू होता. अर्थात या व्यवहारासंबंधी बहुतेक देशांतून काही कायदेशीर निर्बंध नसत. परंतु व्यापाऱ्यांस कर्ज देणे, हुंडी मोडणे वगैरे जो पतीचा सर्व व्यवहार बँका करीत, त्याचा पाठपुरावा करण्यास एकंदर व्यवहाराच्या मानाने त्याचा काही एक अंश सोने आपल्या संग्रही राखणे त्यांस जरुरीचे होते. एकंदर जनतेस बँकेच्या शहाजोगपणाबद्दल खात्री पटवण्यास व प्रत्यक्ष व्यवहारात आकस्मिक अडचणी उत्पन्न झाल्यास मदत म्हणून हे सोने ठेविले जात असे. या सोन्यावर काही व्याज सुटत नसल्यामुळे त्याचा संग्रह कमी करण्याकडे बँकांची प्रवृत्ती असली तरी, बँकेच्या ठेवीदारवर्गात अविश्वास उत्पन्न होऊ न देण्याची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे प्रत्येक देशात बँकांच्या एकंदर व्यवहाराचे व त्यांच्या सुवर्णसंग्रहाचे प्रमाण जवळजवळ ठरून गेल्यासारखे होते. त्यामुळे बँकेच्या व्यवहारासंबंधीसुद्धा सुवर्णसंग्रह कमीजास्त झाल्यास व्यवहाराचे मान कमीजास्त होते असा नियम दिसून येईल.

महायुद्धापूर्वी सुवर्णमानपद्धतीचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते : देवघेवीत वापरल्या जाणाऱ्या पैशाचे प्रकार मुख्यत्वेकरून सोन्याची नाणी, कागदी नोटा व बँकांचे चेक हे असत. परंतु या तिहींचीही मदार सोन्यावर होती. टांकसाळीतून नाणी पाडून घेण्याचा हक्क सार्वत्रिक असल्यामुळे, एकंदर जगातील सुवर्णसंग्रहात फरक पडल्यास अथवा सोन्याचा भाव कमीजास्त झाल्यास सोन्याच्या नाण्यांच्या संख्येत व किमतीत फरक पडत असे. पण नवीन पैदाशीचे सोने प्रत्यक्ष नाण्याच्या रूपाने चलनपद्धतीत बहुधा शिरत नसे. नवे सोने बरेचसे बँकांकडे जाई अथवा सरकारी-तिजोरीत जाई; व त्याचा परिणाम नोटांची संख्या आणि बँकांचा व्यवहार यांवर घडून येई. काही झाले तरी सर्व प्रकारच्या एकंदर विनिमयसाधनांचा पुरवठा सुवर्णसंग्रहावर अवलंबून होता हे लक्षात ठेविले पाहिजे. ही पद्धती सर्व देशांत याप्रकारेच प्रचलित होती असे नाही. देशादेशांतून फरक असत, पण ते सध्या महत्त्वाचे नाहीत. कारण सर्व देशातून सुवर्णसंग्रहावर पूर्णपणे भिस्त ठेवणे आवश्यक होते व जसा जगातील सुवर्णसंग्रहात फरक पडत जाई त्याप्रमाणे पैशाच्या पुरवठ्यातही फरक पडे; आणि एकंदर किमतीचे मान बहुतांशी पैशाच्या पुरवठ्यावर अवलंबून असल्यामुळे धारणीतील चढउतार बराचसा सोन्याच्या पैदाशीवर अवलंबून असे. आर्थिक व्यवहाराचे क्षेत्र व मान ही सारखी वाढतच होती. तेव्हा हा व्यवहार करण्यास लागणाऱ्या विनिमयसाधनांची मागणी जास्तजास्त होणे अपरिहार्य होते. या वाढीच्या मानाने सोन्याचा संग्रह कमीजास्त झाल्यास धारणीत आपोआप चढउतार घडून येत असे. एकंदर किमतींच्या चढउतारावर बँकांचा अथवा सरकारचा ताबा फारसा चालत नव्हता; आणि म्हणून या प्रकारच्या मुख्य मापनपद्धतीस स्वाधीनगतिक (automatic) म्हणण्याचा अर्थशास्त्रज्ञांचा परिपाठ आहे.

## सुवर्णमानपद्धतीचे सार्वराष्ट्रीय स्वरूप

आता सुवर्णमानपद्धतीच्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या अंगाकडे वळू. महायुद्धापूर्वी जवळजवळ सर्व प्रमुख राष्ट्रांनी या पद्धतीचा अंगीकार केला होता. चीन व मेक्सिको या देशांत रौप्यमानपद्धती प्रचलित होती; परंतु हे देश अपवादादाखल समजावयाचे. हिंदुस्थानासारखा एखादा देश वगळल्यास जिकडेतिकडे सोन्याच्या नाण्याचा प्रचार होता. सर्व जगभर मूल्यमापनास एकच प्रमाण वापरले जात होते, व ते

प्रमाण म्हणजे सोने या धातूची किंमत. आर्थिक व्यवहारांत वेगवेगळ्या देशांत पौंड, डॉलर, मार्क, रूबल वगैरे निरनिराळ्या नाण्याच्या रूपाने किमती मापल्या गेल्या तरी त्या सर्व सोन्यातच मापल्या जात असत. कारण ही निरनिराळी नाणी म्हणजे सोन्याचे लहानमोठे तुकडे होते. अर्थात प्रत्येक देशात निरनिराळ्या वजनांचे तुकडे वापरले म्हणून मापनपद्धतीत मूलतः काहीच फरक पडला नाही हे उघड आहे. सर्व जगभर सुवर्णमानाचा स्वीकार झाला असल्यामुळे, निरनिराळ्या देशांत किमतींचे मान सहजच सारख्या प्रमाणात कमीअधिक होत असे. कोणत्याही एका देशातील किंमतींच्या मानाने विशेष फरक पडणे शक्य नव्हते. हे कसे याचा थोडक्यात विचार करू.

प्रत्येक देशातील मुख्य नाण्याचे वजन कायद्याने ठरलेले असे. तेव्हा कोणत्याही दोन देशांतील हुंडणावळीचा भाव म्हणजे त्या देशातील मुख्य नाण्याच्या वजनांतील परस्पर प्रमाण हे असे. एका पौंडात जर पाच डॉलर इतके सोने असले तर अर्थात पौंडास पाच डॉलर हा हुंडणावळीचा भाव ठरेल. आता कोणत्याही एका देशात इतर देशांपेक्षा किमती वाढल्या तर त्याचा राष्ट्रातील व्यापारावर असा परिणाम होतो की, परदेशांहून त्या देशात आयात फार होते. कारण मालाच्या विक्रीपासून तेथे विशेष फायदा होण्याचा संभव असतो. परंतु त्या देशातून मालाची निर्गत कमी होणार; कारण तेथील किमती विशेष वाढल्यामुळे परदेशांतील गिऱ्हाइकांस त्या देशाचा माल वाजवीहून अधिक महाग वाटेल. याप्रमाणे परदेशांशी होत असलेल्या व्यापारात फरक पडल्यामुळे त्या देशाचे परदेशी व्यापाऱ्यांचे देणे वाढेल. हे देणे देण्याचा मार्ग एकच, व तो म्हणजे सोने परदेशी पाठविणे. मग वर दर्शविल्याप्रमाणे कोणत्याही देशात सोन्याचा संग्रह कमी झाल्यास पैशाचा पुरवठा कमी होऊन किमती उतरतात, व इतर देशांत संग्रह वाढल्यामुळे त्या वाढतात. अशा रीतीने जरी एखाद्या देशात किमती तात्पुरत्या चढल्या तरी सोन्याच्या आयात-निर्गतीवर जोपर्यंत काही निर्बंध नाही, तोपर्यंत हा विशेष चढउतार फार वेळ टिकणे शक्य नाही. वेगवेगळ्या देशांतील हुंडणावळीचा भावही साधारणपणे स्थिरच असे. साधारणपणे म्हणण्याचे कारण एवढेच की, त्यात अत्यंत अल्प प्रमाणात फरक होणे शक्य होते. राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापारात मालाची किंमत चुकती करणे हे हुंड्या अथवा बँकेवरील ड्राफ्ट यांच्याच द्वारे सहसा होत असते. प्रत्यक्ष सोने पाठविण्याच्या भानगडीत व्यापारी स्वतः पडत नाहीत. अर्थात हुंड्या अथवा ड्राफ्ट यांना हंगामाच्या मानाने एका बाजूकडून कमीअधिक मागणी असते व त्यामुळे जिकडून पैसे परदेशी पाठविण्याची मागणी जास्त तिकडचा हुंडणावळीचा भाव उतरणे साहजिक आहे. परंतु हा भाव काही मर्यादेपलीकडे उतरणे शक्य नाही. तो फार उतरल्यास प्रत्यक्ष सोने विकत घेऊन ते परदेशी पाठविण्याचा खर्च व दगदग सोसण्यास व्यापारी तयार होतील. तेव्हा परदेशांत सोने पाठविणे व परदेशांहून सोने आणणे यास जो खर्च लागेल तो मिळवून अथवा वजा करून ज्या मर्यादा निश्चित होतील त्या मर्यादेतच हुंडणावळीच्या भावात फरक पडणे शक्य आहे. उदाहरणार्थ, एक पौंडास जर पाच डॉलर असा हुंडणावळीचा नेहमीचा भाव असला व सोन्याची न्यूयॉर्कहून लंडनला ने-आण करण्यात पौंडामागे जर पाच सेंट खर्च आला, तर चार डॉलर पंचाण्णव सेंट व पाच डॉलर पाच सेंट एवढ्या मर्यादेत डॉलर-पौंड हुंडणावळ असली पाहिजे. चार डॉलर पंचाण्णव सेंटहून कमी भाव पडू लागल्यास इंग्लंडमधून अमेरिकेत सोन्याची निर्गत होत राहील; व पाच डॉलर पाच सेंटहून जास्त हुंडणावळ पडू लागल्यास याच्या उलट निर्गतीचा प्रवाह सुरू होईल. अर्थात सोन्याची ने-आण करण्याचा खर्च जितका जास्त तितका हुंडणावळीत फरक पडण्यास वाव अधिक हे उघड आहे.

वरील विवेचनावरून सुवर्णमानपद्धतीत सर्व प्रकारचे फेरबदल हे सुवर्णसंग्रहावर अवलंबून आहेत असे दिसून येईल. देशातील धारण व परदेशीची हुंडणावळ यांत फेरबदल होणे हे सोन्याचा साठा वाढणे

किंवा कमी होणे यावर अवलंबून आहे. तेव्हा सुवर्णसंग्रहाची नीट काळजी घेणे ही गोष्ट प्रस्तुत पद्धती चालू राखण्यास अत्यावश्यक आहे. सुवर्णसंग्रहास धोका पोचण्याचा दोन प्रकारे संभव आहे. नोटा फार काढल्या असून लोकांचा त्यांच्यावरील विश्वास उडाला तर त्यांच्याऐवजी नाण्यांची मागणी होऊन संग्रह खालावण्याचा संभव असतो. परंतु असे सहसा प्रत्यक्ष घडून आलेले नाही. शिवाय काही झाले तरी नाणे देशातच राहणार. तेव्हा अशा प्रकारे संग्रह कमी झाला तर ते विशेष धोक्याचेही नाही. खरा धोका म्हणजे सोन्याची निर्गत फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागली तरच आहे. वर दर्शविल्या-प्रमाणे ही निर्गत हुंडणावळीचा भाव खालावला तरच होऊ लागते; व हुंडणावळीचा भाव खालावण्याचे मुख्य कारण कोणत्याही देशास इतर देशांचे तात्कालिक देणे अवास्तव वाढणे हेच होय. मग ही वाढ तात्पुरती असो अथवा नेहमीची असो.

## महायुद्ध व कागदी चलनपद्धती

येथपावेतो महायुद्धापूर्वी प्रचलित असलेल्या सुवर्णमानपद्धतीच्या सर्वसाधारण स्वरूपाचा विचार झाला. महायुद्ध सुरू झाल्याबरोबर त्यात गुंतलेल्या सर्व राष्ट्रांनी या पद्धतीचा एकदम त्याग केला. कारण त्यांस आपला सुवर्णसंग्रह पुढेमागे खर्चावा लागेल अथवा कर्जास तारण म्हणून इतर राष्ट्रांस द्यावा लागेल हे उघड दिसत होते. या कालात अमेरिका व इतर काही लहान लहान राष्ट्रे वगळली असता बाकी सर्व देशांत कागदी पैशाचाच प्रचार झाला होता. विनिमयसाधनांतून सोन्याचे नाणे लुप्त होऊन जिकडेतिकडे कागदी नोटाच दिसू लागल्या व मूल्यमापनाचे प्रमाण म्हणजे कागदी नोटांची किंमत असे झाले. परंतु या किमतीचा कोणत्याही जड वस्तूच्या किमतीशी संबंध नव्हता. सोन्याच्या नाण्यास ते विनिमयसाधन म्हणून किंमत असेल, पण त्याची खरी किंमत ते सोन्याचे म्हणून. तशी काही कागदी नोटांची स्थिती नव्हे नाण्यास पैशाचे व धातूचे असे दुहेरी स्वरूप होते. नोट हा केवळ पैसाच. विनिमयसाधन या नात्याने नोटेस जी किंमत येईल तेवढीच तिची बाजारात किंमत ठरणार. नोटेची किंमत नोटांच्या पुरवठ्यावर केवळ अवलंबून व नोटा किती छापावयाच्या हे सर्वस्वी सरकारच्या ताब्यात. तेव्हा ही कागदी पैशाची चलनपद्धती पूर्णपणे नियंत्रित असते हे उघड आहे. लढाई संपल्यावरदेखील बरीच वर्षे कागदी चलनपद्धतीच बहुतेक राष्ट्रांत अमलात होती. परंतु हळूहळू बऱ्याच राष्ट्रांनी पुनः सोन्याच्या भावाशी आपल्या चलनपद्धतीची सांगड घालण्याचा विचार केला.

कागदी चलनपद्धतीस टिकून राहण्याचा संकल्प सर्वच राष्ट्रांनी का केला या गोष्टीच्या प्रमुख कारणांचा विचार येथे केला पाहिजे. प्रथमच एक गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे, ती अशी की, सोने, रुपे अथवा कोणतीही धातू अथवा कोणतीही जड वस्तू हिचा मूल्यमापनास उपयोग केला असता या मूल्यमापनाच्या पद्धतीत एक प्रकारची निश्चिती असते. विशेषतः सोन्यासारख्या मूल्यवान धातूचा मूल्यमापनास उपयोग केला म्हणजे या मापनसाधनात पडणारे फरक साधारणपणे मर्यादित असतील अशी खात्री बाळगता येत असे. परंतु कागदी पैशाच्या किमतीस इयत्ता अशी काहीच नाही. फार कमी नोटा काढल्यास त्या अत्यंत मूल्यवान होऊन बसतील. उलट त्यांची संख्या अतोनात वाढल्यास त्या कवडीमोल होतील. हे नियंत्रणावर अवलंबून आहे; आणि विशेषतः या पद्धतीचा स्वीकार महायुद्धासारख्या बिकट प्रसंगी केल्यामुळे नियंत्रण जितके चोख असावे तितके राहिले नाही. सरकारास चालू खर्चास लागणारा पैसा उभारणे अशक्य झाल्यास जास्तजास्त नोटा छापून वेळ मारून नेण्याचा मोह अनावर होतो. अशा रीतीने बऱ्याच राष्ट्रांत कागदी पैशाच्या चलनपद्धतीचा दुरुपयोग केला गेल्यामुळे एकंदर जनतेचा या पद्धतीवरून विश्वास उडाला होता. हे एक कारण झाले. तथापि कागदी चलनपद्धती कितीही सुनियंत्रित असली तरी सर्व व्यापाराच्या कामी तिचा सुवर्णचलनपद्धती इतका उपयोग होत नाही. देशातल्या देशात सरकारने

काढलेल्या कागदी नोटांचा सार्वत्रिक प्रसार होऊ शकेल; व अंतर्गत व्यवहारापुरता इतर कोणत्याही विनिमयसाधनांचा उपयोग करावा लागणार नाही. पण या कागदी नोटांचा परदेशच्या व्यापाऱ्यांचे देणे देण्यास उपयोग काय? साधारणपणे राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारात निरनिराळ्या देशांचे आयात-निर्यातीच्या व्यवहाराचे हिशेब परस्पर तुटतात. परंतु कोठेही बाकी निघाल्यास ती भरून काढण्याचे सोने हे एकच साधन होय. या कामी कोणत्याही देशात प्रचलित असलेल्या कागदी नोटांचा उपयोग होणे शक्य नाही. तेव्हा जोपावेतो एखादी सार्वराष्ट्रीय बँक प्रस्थापित होऊन तिच्या नोटा जगभर मान्यता पावत नाहीत, तोपावेतो निदान परदेशी व्यापाराकरिता तरी आपल्या संग्रही सोन्याचा बराच साठा बाळगणे प्रत्येक राष्ट्रास अवश्य आहे. आणखीही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तो असा की, सुवर्णमानपद्धतीत तिचा स्वीकार ज्या राष्ट्रांनी केला असेल त्यांच्यामधील हुंडणावळीच्या दरांत स्थैर्य आपोआप येते. हे कसे ते वर दर्शविलेच आहे. कागदी चलनपद्धतीचे तसे नाही. प्रत्येक देशात जरी सुनियंत्रित अशी कागदी चलनपद्धती प्रस्थापित झालेली असली, तरी या सर्व देशांत मिळून असे एकच मूल्यमापनसाधन प्रचलित नसल्यामुळे हुंडणावळीच्या दरांत स्थैर्य राहणार नाही; तर प्रत्येक देशाचा दुसऱ्या कोणत्याही देशाशी हुंडणावळीचा दर त्या दोन देशांतील कागदी पैशाच्या किमतीच्या प्रमाणात बसेल. सुवर्णमानपद्धतीत हुंडणावळी अगदी स्थिर राहून सोन्याच्या पुरवठ्याच्या मानाने सर्वच जगातील किमती खाली-वर होतात; तर प्रत्येक देशात कागदी चलन व मूल्यमापनपद्धती प्रस्थापित झाली असल्यास आपापल्या देशातील किमतीचे मान नियंत्रित करणे प्रत्येक राष्ट्रास जरी शक्य झाले तरी त्याला हुंडणावळीच्या दरांवर काही ताबा चालविता येत नाही. आता हुंडणावळीचे दर जोपावेतो स्थिर नाहीत तोपावेतो राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारास थोडाबहुत अडथळा उत्पन्न होतो; व बँकांचे इतर देशांशी जे व्यवहार असावयाचे त्यांत विशेष अडचणी उद्भवतात. याकरिता परदेशी व्यापारावर व परदेशांशी होत असलेल्या पतपेढ्यांच्या व्यवहारावर गुजर होणाऱ्या इंग्लंडसारख्या राष्ट्रास सुवर्णमानपद्धतीचा शक्य तितका लवकर पुनरुद्धार करणे श्रेयस्कर वाटल्यास त्यात काही नवल नाही.

## महायुद्धानंतर सुवर्णमानपद्धतीचे स्वरूप

१९२४ सालच्या पुढील पाचसहा वर्षांत जवळजवळ सर्वच प्रमुख राष्ट्रांनी सुवर्णमानपद्धती पुनः अमलात आणिली; परंतु या स्थापित झालेल्या पद्धतीचे स्वरूप या कालात काहीसे बदलले होते. ते कसे याचे दिग्दर्शन येथे केले पाहिजे. महायुद्धाच्या काळात जेव्हा बहुतेक राष्ट्रांनी सुवणमानपद्धती सोडून दिली तेव्हा सोन्यास एकंदर मागणी बरीच कमी झाली; व खाणींतून नवीन निघालेल्या सोन्यास अमेरिकेसारखे एखादेच गिऱ्हाईक राहिले. यामुळे सोन्याचा भाव उतरला, सोन्याची पैदास कमी झाली व अमेरिकेतीलही किमती वाढल्या. बाकीच्या देशांतील किमती इतर कारणांमुळे अतोनात वाढतच होत्या. आता जेव्हा सर्व राष्ट्रे पुनः सोन्याशी संबंध जोडण्याचा विचार करू लागली, तेव्हा एकंदर व्यवहाराचा वाढलेला पसारा व दरम्यान वाढलेल्या किमती या दोहोंचा विचार करिता अखिल जगातील सुवर्णसंग्रह पुरेसा पडणार नाही, हे उघड दिसू लागले. तसेच महायुद्धात पडलेल्या बहुतेक सर्व राष्ट्रांचा युद्धपूर्वकालीन सुवर्णनिधी नष्टप्राय झाला होता अथवा बराच कमी झाला होता. तेव्हा पुनः सोने साठवू लागणे अवश्य होते. यामुळे जरी सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार करणे असले तरी असे करताना सोन्याचा अत्यंत काटकसरीने उपयोग करणे प्रत्येक राष्ट्रास प्राप्त झाले. महायुद्धाच्या काळात सोन्याचे नाणे नाहीसे होऊन एकंदर जनतेस सर्रहा कागदी पैशाचा उपयोग करण्याची सवय झाली होती. नाणे मिळू शकले नाही तर सामान्य माणसाचा चलनपद्धतीवरील विश्वास उडतो, अशा प्रकारचे सिद्धांत महायुद्धाने खोटे ठरविले. तेव्हा नाण्यांचा पुनः प्रसार करणे अनावश्यक

आहे हे सर्व राष्ट्रांस पटून सोन्यात ही एक मोठीच बचत आयती घडविता आली. सोन्याचे नाणे पाडून चालू करणे हा मार्ग युद्धानंतर कोणत्याच राष्ट्राने स्वीकारला नाही. नाणे नित्य व्यवहारात येत नसल्यामुळे बँकांना सोने राखणे अनावश्यक झाले. गेल्या दहापंधरा वर्षांत बहुतेक सर्व राष्ट्रांनी मध्यवर्ती बँका स्थापिल्या आहेत आणि पतीच्या एकंदर व्यवहाराचे व चलनपद्धतीचे नियंत्रण त्यांजवर सोपविले आहे. तेव्हा प्रत्येक बँकेस आपला निराळा सुवर्णसंचय करण्याची काही गरज नाही. मध्यवर्ती बँकेत आपल्या खात्यात जमा असलेली रक्कम ही सुवर्णनिधी सारखीच लेखण्यास हरकत नाही. यामुळे आता बहुतेक राष्ट्रांतील सर्व सोन्याचा साठा एकाच ठिकाणी—म्हणजे मध्यवर्ती बँकेच्या कोठारात असतो. या दृष्टीनेही सोन्याचा अलीकडे काटकसरीने उपयोग करिता येतो. पूर्वी नाणे, निरनिराळ्या बँकांचा निधी व मध्यवर्ती बँकेचा निधी अशा तीन स्वरूपात सोने आढळत होते, ते आता सर्व एकत्र झाले आहे; व या मध्यवर्ती बँकांतील सुवर्णसंचयावरच चलनपद्धतीची सर्व इमारत आज उभारलेली आहे.

सोन्याचे नाणे वापरात नसल्यामुळे जुन्या पद्धतीतील एक महत्त्वाचे अंग नाहीसे झाले. आता टांकसाळीत नाणे पाडून घेण्याचा हक्क कायद्यात नमूद करिता येत नाही; व त्यामुळे चलनी पैशाची किंमत व सोन्याची किंमत सारखी राखण्यासंबंधी जुनी योजना अमलात आणणे शक्य नाही. याकरिता अलीकडे कायद्यात नवीनच तरतूद केलेली असते. ती अशी : सोन्याचा मूल्यमापनाकडे उपयोग करण्यात आला म्हणजे राष्ट्रां-राष्ट्रांमधील धारण व देशातील धारण यांत फरक पडणे शक्य नाही हे वर दर्शविलेच आहे. तेव्हा चलनी पैशाचा जो सोन्याशी संबंध जोडावयाचा तो अंतर्गत व्यवहारात जोडला काय किंवा परदेशी व्यवहारांत जोडला काय त्याचा परिणाम एकच व्हावयाचा हे उघड आहे. सोन्याचे नाणे चलनातून काढल्यावर अंतर्गत व्यवहारात पैशाचा व सोन्याचा संबंध जोडणे शक्य नाही. कारण या व्यवहारात सोने कोणत्याच स्वरूपात आता वापरात येत नसते. पण राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापारात अद्यापि सोने वापरावे लागतेच. तेव्हा कोणासही सोने लागल्यास ते एका ठराविक भावाने नोटांच्या मोबदला देण्याचे अथवा जेथे सुवर्णमानपद्धती प्रचलित आहे अशा देशावर हुंड्या ठराविक भावाने विकण्याचे बंधन मध्यवर्ती बँकांवर अलीकडे कायद्याने घातलेले असते. या दोन्ही प्रकारच्या बंधनाचा परिणाम एकच होतो. कारण व्यापारी लोक सोने घेतात ते बहुधा परदेशांत पाठविण्याकरिताच होय. तेव्हा सोने दिले काय अथवा परदेशी ठराविक भावाने हुंड्या पटविण्याची व्यवस्था केली काय दोहोचा अर्थ एकच. या नवीन पद्धतीत मूल्यमापनात काही फरक पडला नाही. मूल्यमापनाचे साधन सोन्याची किंमत हेच अद्यापि आहे. कागदी पैशाचे ऐवजी सोन्याचे नाणे मिळण्याचा हक्क आता राहिला नसून प्रत्यक्ष सोने अथवा परदेशांतील पैसा मिळण्याची व्यवस्था झाली एवढेच. कागदी पैशाचा व सोन्याचा संबंध कायदेशीररीत्या ठरविला गेला असल्यामुळे पैशाची किंमत व सोन्याची किंमत यांत तफावत पडणे पूर्वीप्रमाणे आजही अशक्य आहे.

मग या नवीन पद्धतीत सोन्याची बचत होण्यापलीकडे बदल कोणता झाला ? मुख्य बदल झाला तो हा की, आता पूर्वीपेक्षा किती तरी पटींनी पैशाचा पुरवठा कमीजास्त करण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकांवर पडली. पूर्वी नाणे पाडून घेण्याचा हक्क सार्वत्रिक असल्यामुळे नवीन सोने बाजारातून आल्यास अथवा सोने विशेष स्वस्त झाल्यास नाण्यांचा पुरवठा वाढविणे कोणासही शक्य होते. तसेच सर्व बँका सोने बाळगीत असल्यामुळे आपला व्यवहार सुवर्णसंचयाच्या मानाने त्या कमीजास्त करीत; परंतु आज तशी स्थिती नाही. सर्व सोने मध्यवर्ती बँकांच्या संग्रही आहे. तसेच नोटा काढण्याचे कामही बहुतेक ठिकाणी या बँकांकडे सोपविलेले असते. तेव्हा आपण ठरविलेल्या धोरणानुसार पैशाचा पुरवठा वाढविणे अथवा कमी करणे मध्यवर्ती बँकांस काही अंशी शक्य झाले आहे. म्हणजे ज्या गोष्टी महायुद्धापूर्वी

बहुतेक आपोआप घडून येत असत त्या आता तशा घडत नाहीत. सुवर्णमूल्यमापनपद्धती ही पूर्वीइतकी स्वाधीनगतिक राहिली नसून ती बरीचशी मध्यवर्ती बँकांच्या नियंत्रणाखाली आली आहे. मध्यवर्ती बँकांवर कायदेशीर निर्बंध आज आहेतच. चलनी नोटा व मध्यवर्ती बँकांचा एकंदर व्यवहार आणि सुवर्णसंचय यांचा किमानपक्षी अमुक एक प्रकारचा संबंध असलाच पाहिजे अशी तरतूद कायद्याने सर्व देशांत केलेली आहे. परंतु बहुतेक बँकांतून साधारणपणे कायद्याने घालून दिलेल्या अत्यल्प मर्यादेहून जास्त सुवर्णसंचय करण्यात येत असतो, त्यामुळे सोने वाढले अथवा कमी झाले तर त्याचा परिणाम पैशाच्या पुरवठ्यावर लगलीच दिसून येतो असे नाही. विशेषतः सोन्याचा संचय बराच वाढला असताही पैशाचा पुरवठा व पतीचे व्यवहार वाढविणे मध्यवर्ती बँकेस अनिष्ट वाटल्यास ते न वाढू देणे ही बँकेच्या हातची गोष्ट आहे.

## सोन्याचे देशादेशांतून स्थलांतर

शेवटी दुसऱ्या एका महत्त्वाच्या बाबीचा विचार करून हा लेख आटोपता घेतो. राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापाराचा व हुंडणावळीच्या दराचा काय संबंध आहे हे मागे दर्शविलेच आहे. येथे लक्षात घ्यावयाची गोष्ट म्हणजे ही की, मालाची खरेदी-विक्री ही जरी राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारांतील खरी महत्त्वाची बाब असली, तरी हुंडणावळीच्या दरावर याहीपेक्षा भांडवल व ठेवी यांच्या हालचालीचा परिणाम फार अधिक घडून येतो. वर्षाच्या शेवटी ऐन देणे अथवा येणे काही निघाले नाही तरी हंगामा-हंगामाला देण्याघेण्याच्या ऐवजात फरक पडून हुंडावळीत फेरबदल होणे साहजिक आहे, याचा उल्लेख मागे केला आहे. परंतु मालाची ने-आण जशी होते त्याप्रमाणेच भांडवल व ठेवी यांतही राष्ट्राराष्ट्रांत व्यवहार सारखा चालत असतो. काही राष्ट्रे नेहमीची धनको तर काही नेहमीची ऋणको असतात. देशाच्या आर्थिक वाढीस लागणारे पुरेसे भांडवल देशात नसले म्हणजे परदेशांतून कर्ज काढावे लागते. या लांब मुदतीच्या कर्जाऊ व्यवहाराचा हुंडणावळींच्या दरावर फारसा परिणाम होत नाही. पण शेअर-बाजार, कापूस, गहू वगैरे मालांत चालणारे मोठमोठे सट्टे, हुंड्यांची खरेदी-विक्री असल्या व्यवहारांत जगातील सर्व प्रमुख व्यापारी शहरांत पुष्कळच पैसा गुंतलेला असतो. हा पैसा कोणताही कारखाना, शेतीभाती किंवा इतर अशा प्रकारच्या धनोत्पादक व्यवहारांत अडकून पडलेला नसून तो केवळ देवघेवीत सारखा खेळत राहिलेला असतो. तेव्हा ज्या व्यापारी केंद्रात अशा पैशाला तात्कालिक मागणी जास्त व जेथे व्याजाचा दर वाढलेला तेथे हा पैसा चटकन वाहाण्याची सारखी प्रवृत्ती असते. मोठमोठे सावकार व मोठमोठ्या बँका लहान मुदतीच्या ठेवींच्या रूपाने पैसा कधी या शहरी तर कधी त्या शहरी, जेथे जास्त फायदा मिळण्याचा संभव अधिक तेथे गुंतवीत असतात. अशा या मोठमोठ्या फिरत्या रकमा एका देशातून दुसऱ्या देशात नेल्या म्हणजे त्या देशांतील हुंडणावळीच्या दरांत अर्थात फेरबदल घडून येणार. या फिरत्या पैशाचे स्थलांतर मुख्यत्वे व्याजाच्या दरावर अवलंबून असते; व निरनिराळ्या देशांच्या प्रमुख व्यापारी केंद्रांतील व्याजाचे दर तेथील मध्यवर्ती बँक ठरवीत असते. कोणत्याही शहरातील व्याजाचा दर इतर शहरांपेक्षा फार वाढला म्हणजे तिकडे पैसा लोटणे साहजिक आहे; व हा प्रवाह असा बराच काळ टिकला म्हणजे त्या शहरी इतर ठिकाणांहून सोने पाठविणे अपरिहार्य होते. यामुळे देशदेशांतरी सोन्याची जी ने-आण होते तिचे दोन प्रकार कल्पिता येतात. एकतर परदेशी व्यापारांत जी ऐन बाकी राहते ती कर्जाच्या रूपाने अथवा सोन्याची ने-आण करून मिटविता येते. परंतु या कारणामुळे सोन्याचे स्थलांतर फारसे होत नाही. सोन्याचे स्थलांतर होण्याचे मुख्य कारण म्हणजे लहान मुदतीच्या ठेवींच्या रूपाने फिरता पैसा एका देशातून दुसऱ्या देशात जातो हेच होय. हा पैसा एके ठिकाणीच फार वेळ गुंतून राहत नसल्यामुळे सोन्याचे स्थलांतर एकीकडून दुसरीकडे

बरेच होत असते. यावरून असे दिसून येईल की, जगातील व्यापार व पतीचा व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर करणारी न्यूयॉर्क, लंडन, पॅरिस वगैरे जी शहरे आहेत त्यांतील व्याजाच्या दरांत फारसा फरक कायमचा राहणे सुवर्णमानपद्धतीत शक्य नाही. एकीकडच्या व्याजाचा दर वाढला तर दुसरीकडे त्याचे परिणाम चटकन भासल्याशिवाय राहत नाहीत. कारण वर दर्शविल्याप्रमाणे महायुद्धानंतर अलीकडे सर्व सुवर्णसंग्रह काय तो मध्यवर्ती बँकेत असतो; व एकीकडून दुसरीकडे पैसा फार जाऊ लागला म्हणजे मध्यवर्ती बँकेच्या संग्रहातून सोने बाहेर पडू लागते. सोने बाहेर पडले म्हणजे मध्यवर्ती बँकेस व्याजाचे दर वाढवून आपला व्यवहार आखडता घेणे अवश्य होते. येणेप्रमाणे लहान मुदतीच्या ठेवींचे स्थलांतर, सोन्याची ने-आण व मध्यवर्ती बँकेचे व्याजाचे दर यांमध्ये अत्यंत निकट संबंध आहे असे दिसून येईल.

महायुद्धापूर्वी अशा तऱ्हेची सोन्याची ने-आण होत नसे असे नाही; परंतु अलीकडे तिचे मान फार वाढले असून एकंदर पैशाचा पुरवठा व मध्यवर्ती बँकांचे धोरण यांच्याशी तिचा जास्त निकट संबंध जडला आहे. याची कारणे अशी : एकतर अलीकडे एकंदर सोन्याचा वाहतुकीचा खर्च पूर्वीपेक्षा कमी झाला आहे. शिवाय सोन्याचा साठा तितकासा विपुल नसल्यामुळे थोड्याबहुत सोन्याचे स्थलांतर झाले तरी बँकांना आपल्या सुवर्णनिधीबद्दल काळजी वाटू लागण्यास ती गोष्ट पुरेशी होते. गेल्या पाच-सहा वर्षांत सर्वच राष्ट्रांनी सुवर्णमानपद्धती स्वीकारली तेव्हा या राष्ट्रांना सोने गोळा करावे लागले; व हे करण्याकरिता व्याजाचा दर वाढवून पैसा आत ओढणे याच योजनेचा अवलंब बऱ्याच राष्ट्रांनी केला. परंतु सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे गेल्या पाच-सहा वर्षांतील एकंदर जागतिक परिस्थिती अत्यंत अनिश्चित असल्यामुळे बऱ्याच देशांत शिल्की रकमा नेहमीप्रमाणे भांडवल म्हणून नवीन उद्योगधंदे अथवा व्यापार यांत न घालता त्या बँकांतच लहान मुदतीच्या ठेवी म्हणून राखण्याची प्रवृत्ती फार वाढली आहे हे होय. यामुळे या फिरत्या ठेवींची रक्कम पूर्वीपेक्षा अतोनात फुगली आहे. याचा परिणाम असा होतो की, काही क्षुल्लक कारणामुळेही मोठमोठ्या रकमांचे देशांतर होऊन सोन्याची ने-आण सहज सुरू होते.

महायुद्धानंतर प्रस्थापित झालेल्या या सुवर्णमानपद्धतीतील विशेष म्हणजे सोन्याचे नाणे या पद्धतीत वापरीत नाहीत व सोन्याचा सर्व संचय मध्यवर्ती बँकेमध्येच केलेला असतो हे होत. यामुळे मध्यवर्ती बँकेस या पद्धतीचे थोडेसे नियंत्रण करिता येते, परंतु त्यास मर्यादा आहेच. दुसरे असे की, अलीकडील नाजूक आर्थिक परिस्थितीमुळे सोन्याच्या ने-आणीचे मान फार वाढले आहे. एका बँकेने स्वीकारलेल्या धोरणाचा परिणाम लगेच इतर बँकांस जाणवू लागतो व त्यामुळे आपला एकंदर सुवर्णसंग्रह संभाळून ठेवण्यात अत्यंत दक्षता दाखविण्याची मोठी जबाबदारी प्रत्येक बँकेवर येऊन पडली आहे. गेल्या दशकातील जगातील आर्थिक परिस्थिती आणि सुवर्णमानपद्धतीचे हे बदललेले स्वरूप यांचा इंग्लंडमध्ये नुकत्याच घडून आलेल्या चलनपद्धतीतील क्रांतीशी काय संबंध आहे व या क्रांतीचा हिंदुस्थानावर काय परिणाम घडून येणार याचा विचार पुढील लेखात करू.

*लोकशिक्षण* ४ : १० ऑक्टोबर १९३१ पृ० ६८८–७०४.

☆

# ५ . . प्रचलित मंदीची कारणमीमांसा

रहाटगाडग्याप्रमाणे जगातील आर्थिक व्यवहारात सारखे चढउतार होत असतात. विशेषतः गेल्या पन्नास-साठ वर्षांत हे चक्र इतके नियमित रीतीने फिरत आले आहे की, याचा सूर्यबिंबाच्या फेरबदलासारख्या नैसर्गिक दृश्यांशी संबंध जोडण्याचा काही अर्थशास्त्रज्ञांनी मागे प्रयत्न केला. अर्थात त्यांचे म्हणणे आज कोणी मान्य करीत नाही. पण एवढे खरे की, आर्थिक प्रगतीचा ओघ सारखा वाहात नसतो. त्यात कधी विशेष भरती येते, तर कधी विशेष खंड पडतो. यामुळे आर्थिक इतिहासात दोन प्रकारचे प्रवाह स्पष्टपणे दिसून येतात. एक तर एकंदर समाजाची उन्नती अथवा अवनती होण्याचा व दुसरा तेजीमंदीच्या आंदोलनाचा. गेली शंभरदीडशे वर्षे यांत्रिक प्रगतीमुळे आर्थिक समाजाचे पाऊल सारखे पुढे पडत आहे. पण हे पाऊल वर्षोवर्षी सारख्याच प्रमाणात पुढे पडत नाही, तर सातपासून दहा वर्षांच्या अवकाशात त्यातल्या त्यात एक तेजीमंदीचे चक्र पूर्ण होऊन जाते. आज जगभर फार मंदीचे दिवस आले आहेत हे एक परी पाहिले तर नित्यक्रमानुसारच झाले. एवढेच की महायुद्धानंतर उत्पन्न झालेल्या विशेष परिस्थितीमुळे हल्लीच्या आर्थिक अरिष्टाचे स्वरूप विशेष भीषण, विस्तृत व सर्वव्यापी असे बनले आहे. तसेच महायुद्धापूर्वीच्या व्यवहारांत चलनाबद्दलची जी एक प्रकारची निश्चितता बाळगता येत असे व सुवर्णमानपद्धतीत जो निर्धास्तपणे व्यवहार चालत असे, ते आज राहिले नसल्यामुळे अलीकडील परिस्थितीत विशेषच घोटाळा उत्पन्न झाला आहे.

## चलन पद्धतीतील क्रांती

गेल्या दहा वर्षांत झालेल्या आर्थिक घडामोडींचा विशेष तपशीलवार विचार आपणास आज करावयाचा नाही. केवळ आजच्या परिस्थितीचे स्वरूप नीट आकलन होण्यास जे काही थोडे मुद्दे विशद केले पाहिजेत तेच येथे नमूद करतो. महायुद्धामुळे एकंदर सर्व प्रकारच्या उत्पन्नास आळा बसला होता. लढाऊ सैनिक म्हणून कितीतरी माणसे लढत होती, दारूगोळा व इतर सामान तयार करण्याकडे बऱ्याच कारखान्यांना लक्ष पुरवावे लागत होते, निरनिराळ्या अडचणींमुळे वाहतूक व व्यापार ही फार कमी प्रमाणात होऊ लागली होती. या कारणांमुळे सर्वच प्रकारच्या पदार्थांची निपज व व्यय ही कमी झाली होती. महायुद्ध थांबल्याबरोबर चार-पाच वर्षे बंद असलेल्या या सर्व प्रकारच्या मागणीस पुन्हा तोंड फुटले. कागदी चलनपद्धतीचे नियंत्रण जवळजवळ सर्वच राष्ट्रांत अशा प्रकारचे होते की, त्यामुळे किमती सारख्या वाढत होत्या. एकदम बरीच नवीन मागणी व वाढत्या किमती यांचा संयोग झाल्यामुळे १९१८ च्या पुढील दीड-दोन वर्षे फार तेजीची गेली, पण ही व्यापारी भरभराट पोकळ होती. लढाई संपून शांतता प्रस्थापित झाल्याबरोबर जिकडे तिकडे महायुद्धापूर्वीप्रमाणे सर्व प्रकारचे

व्यवहार सुरळीत चालू लागतील ही अपेक्षा या भरभराटीच्या बुडाशी होती. पण ही अपेक्षा फोल ठरली. शांतता-परिषदेचे काम अत्यंत रेंगाळत चालले. नवीन निर्माण केलेली मध्ययुरोपातील राष्ट्रे एकमेकांचे हिताहित पाहून आर्थिक व्यवहाराची बिघडलेली घडी पुन्हा बसवून घेण्याचे प्रयत्न करण्याऐवजी एकंदर राष्ट्रसमूहास अनिष्ट अशा प्रकारचे धोरण स्वीकारू लागली. जबर खंडण्या वसूल करून घेण्याच्या दोस्त राष्ट्रांच्या अट्टाहासामुळे एकंदर राजकीय परिस्थिती नाजूक बनली. जर्मनी व ऑस्ट्रिया या राष्ट्रांची सरकारे दिवाळखोर झाली. रशियातील धामधूम बंद होण्याची काहीच चिन्हे दिसत नव्हती. म्हणून जरी पहिल्या उमेदीत माल बराच खपला व बाजारभाव बरे आले तरी ही परिस्थिती अशीच टिकणे शक्य नव्हते. पहिल्या भरात नवीन कारखाने व धंदे काढणाऱ्या कंपन्या पुष्कळ सुरू झाल्या; पण एकंदर आर्थिक व्यवहाराच्या चलतीस जगाची परिस्थिती अनुकूल नसल्यामुळे एकदोन वर्षांतच सर्वांची निराशा होऊ लागली व सर्व हालचालीस ओहोटी लागली. यानंतरची काही वर्षे एकंदरीत कठीण अशीच गेली. साधारणतः १९२१ ते १९२४ या कालात निरनिराळ्या युरोपीय देशांच्या चलनपद्धतीत भयंकर क्रांती घडून आली. काही देशांनी कागदी नोटा इतक्या भराभर छापल्या की, त्या अगदी कवडीमोल होऊन गेल्या व या देशांना आपल्या जुन्या चलनपद्धतीचा त्याग करून नवीन पद्धती प्रथमपासून बनवावी लागली. जर्मनी व ऑस्ट्रिया या देशांची ही स्थिती होती. या कालातच खंडणी व दोस्त राष्ट्रांची परस्परांची कर्जे यांचे घोंगडे तसेच भिजत पडलेले होते. त्याचा निकाल लागल्याशिवाय निरनिराळ्या राष्ट्रीय सरकारांचा फडणिशी कारभार सुरळीत चालणे व राष्ट्रा-राष्ट्रांतील व्यापारात निश्चितपणा येणे अशक्य होते. १९२४ सालच्या सुमारास एकंदर वातावरण बरेचसे निवळले. जर्मनीने नवीन चलनपद्धती सुरू केली व ती चालण्यास प्रथम काही अडचणी उत्पन्न झाल्या नाहीत. राष्ट्रसंघाने मदत केल्यामुळे ऑस्ट्रियाचा कारभारही काहीसा बरा चालू लागला. डॉज योजने-मुळे खंडणीच्या प्रश्नाला बरेचसे व्यवस्थित स्वरूप आले. अशा प्रकारे तेजीचा काल सुरू होण्यास परि-स्थिती अनुकूल झाली. कागदी चलनपद्धतीमुळे बऱ्याचशा आपत्ती ओढवल्या या समजुतीमुळे राष्ट्र-संघामार्फत सुवर्णमानपद्धतीच्या पुनःस्थापनेची शिफारस झाली व विशेषतः इंग्लंडने या बाबतीत पुढाकार घेऊन सुवर्णमानपद्धतीचा पुनरुद्धार शक्य तितक्या लवकर करण्याचा आपला निश्चय जाहीर केला.

## रॅशनलायझेशन : स्वरूप व परिणाम

जगातील सर्व राष्ट्रांत हे फेरबदल सारख्याच प्रमाणात व एकाच वेळी घडून आले असे नाही. परंतु १९२४ सालापासून पुन्हा एकंदर व्यवहारास भरती येऊ लागली असे सर्वसाधारण म्हणण्यास हरकत नाही. काही देशांतील स्थिती विशिष्ट कारणांमुळे तितकीशी सुधारली नाही. उदाहरणार्थ, फ्रान्समध्ये चलनपद्धतीची दुर्व्यवस्था १९२७ सालपावेतो चालू होती आणि म्हणूनच तेथील व्यवहार जोमाने वाढला नाही. उलटपक्षी अमेरिका व जर्मनी या देशांत व्यापारास व उद्योगधंद्यांस विशेष भर आला. सर्वच प्रकारचे उत्पादन १९२४ पुढील चार-पाच वर्षांत झपाट्याने वाढले. Rationalisation या नावाखाली ओळखल्या जाणाऱ्या औद्योगिक पुनर्व्यवस्थेचा विशेष प्रचार या कालात झाला. हिचा उगम जर्मनीत झाला, कारण की जर्मनीस आपल्या सर्वच आर्थिक जीवनाचा पाया नवीन बसवावयाचा होता. शक्य तितक्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे, अगदी नवीन नवीन यांत्रिक शोधांचा उपयोग करणे, मालखरेदी-विक्री शक्य तितकी व्यवस्थित व सामुदायिक रीत्या करून किमती कमी करणे अशी Rationalisation ची विविध अंगे होती. जर्मनीत या दृष्टीने विशेष प्रयत्न केला गेल्यामुळे इतर औद्योगिक राष्ट्रांसही जर्मनीचे अनुकरण करणे शक्य होते. या तीन-चार वर्षांत जगभर वीज व विजेच्या साहाय्याने चालणाऱ्या निरनिराळ्या यंत्रांचा व उपकरणांचा प्रसार, मोटार, रेडिओ, ग्रामोफोन

इत्यादी गोष्टींचा खप या गोष्टी प्रामुख्याने दिसून येतात. सगळीकडे उत्पादन स्वस्त झाले व अधिकाधिक होऊ लागले. हळूहळू Rationalisation चा प्रसार शेतकीतही होऊ लागला. विशेषतः जेथे जेथे मोठ्या प्रमाणावर मळे अथवा कानडासारख्या देशाप्रमाणे यंत्रांच्या साहाय्याने शेती होत होती तेथे तेथे Rationalisation लवकर करता आले; व यामुळे ऊस, रबर, कॉफी, गहू इत्यादी पदार्थांची निपज सपाट्याने वाढू लागली. सर्व प्रकारच्या मालाची पैदास सारखी जास्त जास्त होत होती, आर्थिक व्यवहाराचे मानही सारखे वाढत होते. या गोष्टी चालल्या होत्या तोपावेतो तेजीचा काल होता. पण या आर्थिक व्यवहाराच्या चक्राचा नियमच हा आहे की, काही काल तेजीचा काल गेला की, व्यवहाराचा फुगा प्रमाणाबाहेर फुगून तो केव्हा ना केव्हा तरी फुटावयाचा. किमती वाढत आहेत, व्यापाऱ्यांकडून मागणी सारखी होत आहे, कारखानदारांस फायदा चांगला पडत आहे हे पाहूनच सर्वच प्रकारच्या उद्योगधंद्यात नवीन कारखाने निघणे, जुन्यांनी आपल्या उत्पादनाचे प्रमाण वाढविणे या गोष्टी साहजिकपणे घडून येतात. गिऱ्हाइकांच्या मागणीचे वाढते प्रमाण व उत्पादनाचे वाढते प्रमाण ही जोपावेतो सारखी आहेत तोपावेतो सर्व ठीक चालते. पण असे सारखे चालत नाही. उत्पादन, निदान काही विशिष्ट बाबतीत तरी, फाजील वाढते व मग असा प्रसंग येतोच की, तेव्हा मालाचा उठाव होण्यास कठीण पडू लागते. १९२४ पासून १९२९ पर्यंत एकंदर कच्च्या मालाची निपज व पक्क्या मालाची बनावट यांचे प्रमाण सारखे वाढत गेले. मात्र धान्याची निपज फार वाढली नाही. परंतु धान्याखेरीज इतर कच्चा माल विशेष भारी प्रमाणात पैदा होऊ लागला. पक्क्या मालाची पैदास सुद्धा वाढतच होती. पण ती या कच्च्या मालाच्या पैदाशीपेक्षा कमी प्रमाणात. एकंदर जगातील आर्थिक उत्पादनशक्तीची फाजील व काहीशी एकांगी वाढ हे हल्लीच्या मंदीच्या बुडाशी असलेले एक महत्त्वाचे कारण आहे.

परंतु हल्लीच्या परिस्थितीस तिचे विशिष्ट स्वरूप प्राप्त होण्यास जी इतर अनेक कारणे झाली त्यांचा विचार करणे जरूर आहे. प्रथम राष्ट्राराष्ट्रांतील देण्याघेण्याच्या व्यवहाराचा विचार करू. जगातील जी संपन्न राष्ट्रे आहेत त्यांचा सर्व खर्चवेच जाऊन दरसाल ऐन बाकी म्हणून त्यांच्याजवळ मोठमोठ्या रकमा शिल्लक राहतात. त्या कर्जाऊ भांडवल म्हणून या राष्ट्रांतील व्यापारी इतर देशांत गुंतवितात. याप्रमाणे महायुद्धापूर्वी इंग्लंडने परदेशी कर्जाऊ दिलेले भांडवल व व्याजी लावलेली रक्कम जवळजवळ ६५ अब्ज रुपये एवढी मोठी होती. फ्रान्सने जवळजवळ २५ अब्ज रुपये असे गुंतविले होते, तर जर्मनीची सुमारे १७–१८ अब्ज रुपये रक्कम अशीच गुंतली होती. अमेरिकेत देशातल्या देशात भांडवल गुंतविण्यास मुबलक वाव असल्यामुळे महायुद्धापूर्वी अमेरिकेचे भांडवल फारसे परदेशी जात नसे. उलटपक्षी परदेशांतूनच अमेरिकेत भांडवल येई. महायुद्धानंतर ही परिस्थिती काहीशी बदलली. जर्मनी साफ बुडाला व जर्मन नागरिकांचे परदेशांतील सर्व भांडवल खंडणीचा एक भाग म्हणून दोस्त राष्ट्रांच्या खात्यांत केव्हाच जमा झाले. रशियातील क्रांतीमुळे फ्रान्सचे चांगलेच हात भाजले. कारण रशियन सरकारी कर्जे व रशियातील आगगाड्या यांत फ्रेंच भांडवल विशेष गुंतले गेले होते. शिवाय चलनपद्धतीच्या दृष्टीने स्थिरस्थावर होण्यास फ्रान्स महायुद्धानंतर लागलीच समर्थ नव्हते. राहता राहून इंग्लंड हे एकटेच राहिले व इंग्लंडने इतर राष्ट्रांस कर्जाऊ रकमा देणे व इतर देशांतील उद्योगधंद्यांत भांडवल घालणे हा व्यवहार महायुद्ध संपल्याबरोबर सुरू केला. अमेरिकेतील परिस्थिती आता पूर्णपणे बदलली होती. लढाई चालू असतानाच दोस्त राष्ट्रांना अमेरिकेने मोठमोठ्या रकमा कर्जाऊ म्हणून दिल्या होत्या व असे करितानाच अमेरिकेत जे जुने परदेशी भांडवल आले होते त्याची परतफेड करून टाकली. अमेरिका आता जे धनको बनले ते यापुढे सारखा हाच व्यवहार करण्याकरता. अमेरिकेत नवीन भांडवल पूर्वीइतके लागेनासे झाले व जसजसे राष्ट्र जास्त

श्रीमान झाले तसतशी वर्षोवर्षीची ऐन शिल्की रकमही वाढू लागली. तेव्हा अमेरिकेने परक्या राष्ट्रांस कर्जाऊ रकमा देणे, इतर देशांतील औद्योगिक व्यवहारांत भाग घेऊ लागणे हा नवीन उपक्रम गेल्या दहा वर्षात सुरू केला. १९२४ सालाच्यापुढे तर हा अमेरिकेचा व्यवहार इंग्लंडहूनही काहीसा अधिक प्रमाणात होऊ लागला. इंग्लंड व अमेरिका यांनी मिळून १९२४ ते १९२९ एवढ्या कालात जवळ जवळ १५ अब्ज रुपये परदेशी कर्जाऊ दिले. कर्जे काढणारी प्रमुख राष्ट्रे म्हणजे जर्मनी व ऑस्ट्रिया ही होती. त्यातल्या त्यात जर्मनीचा भाग खरा महत्त्वाचा; कारण जर्मनीने या काळात जवळ जवळ ११ अब्ज रुपयांचे कर्ज काढले.

## जर्मन परिस्थितीचा जागतिक व्यवहारावरील परिणाम

एकंदर जर्मन परिस्थितीचा जगाच्या व्यवहारावर विशेष परिणाम घडून आलेला असल्यामुळे तिचा विचार काहीसा विस्ताराने करू. १९२१ सालापासून १९२३ सालापावेतो जर्मन चलनपद्धतीतील दुर्व्यवस्थेमुळे आर्थिक व्यवहाराचे स्वरूप फार अनिश्चित बनून एकंदर काल हलाखीचा गेला. १९२३ मध्ये जुन्या नोटा कवडीमोल म्हणून काढून टाकून नवीन चलन जेव्हा सुरू करण्यात आले तेव्हा अर्थातच ज्यांच्या ज्यांच्या म्हणून जुन्या ठेवी व जुने कर्जरोखे होते ते साफ बुडाले. राष्ट्रीय सरकारचे जुने कर्ज जवळजवळ पूर्णपणे उतरले व कारखानदार वगैरेंनीही ज्या जुन्या रकमा कर्जाऊ घेतल्या होत्या त्यांचा बोजा अगदी हलका झाला. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे जेवढे भांडवल म्हणून मार्कांच्या रूपाने सावकारीत किंवा उद्योगधंद्यांत गुंतले होते तेवढे नामशेष झाले व ऋणको व धनको वर्गाची चैन झाली. इमारती, यंत्रे वगैरे जी संपत्ती होती ती कायम राहिली. हा एका दृष्टीने जर्मन कारखानदारवर्गाचा फायदा झाला. पण उलटपक्षी सबंध राष्ट्रातील फिरते भांडवल या रूपाने जो पैसा उद्योगधंद्यास लागतो तोही नाहीसा झाला हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजे सबंध जर्मनीत सरकारास अथवा कारखानदारांस कर्जाऊ रक्कम देण्याची कोणाचीच ताकद उरली नाही हे उघड आहे. तेव्हा "नवी विटी नवे राज्य" या न्यायाने नवीन चलनपद्धती प्रस्थापित करून जर्मनीच्या आर्थिक जीवनाच्या पुनरुद्धारास जेव्हा सुरुवात करावयाची तेव्हा मुळात सरकारास अथवा उद्योगधंद्यांस लागणारा सर्वच पैसा बाहेरून आणणे प्राप्त होते. हा पैसा अमेरिकेने फार मोठ्या प्रमाणात पुरविला व इंग्लंडमधूनही बऱ्याच रकमा गेल्या. १९२४ सालाच्या पुढे अमेरिकेत विशेष भरभराट असल्यामुळे परदेशी कर्जाऊ रकमा देण्याच्या व्यवहारास तेजी आली होती व जर्मनीला अमेरिकेत कर्ज उभारणे फारसे कठीण गेले नाही. या कर्जाऊ रकमांच्या जोरावरच उद्योगधंदे पुन्हा पूर्ववत चालू लागले व कर्जाऊ रकमांच्या साहाय्यानेच इतकी वर्षे जर्मनीने खंडणीची भरपाई केली. जोपर्यंत तेजी होती तोपर्यंत कर्ज काढण्यास फारशी अडचण नव्हती. पण अमेरिकेत हळूहळू व्यवहारास ओहोटी लागणार अशी चिन्हे दिसू लागली. जर्मनीस एवढ्या मोठ्या रकमा दिल्या जातात त्या परत फेडण्याची व त्यावरचे सालोसाल व्याज देण्याची जर्मनीच्या अंगात कितपत पात्रता आहे, याबद्दल अमेरिकन व इतर भांडवलवाल्यांस शंका येऊ लागली. तेव्हा कर्जाऊ रकमांचा ओघ बंद होणे साहजिकच होते. अशी परिस्थिती १९२९ साली उत्पन्न झाली. हिचा आर्थिक व्यवहारावर कसा परिणाम झाला हा विचार योग्य स्थळी करू.

## इंग्लंडमधील परिस्थिती

वर निर्देशिलेले व्यवहार बहुधा लांब मुदतीचे आहेत. याशिवाय फार महत्त्वाचे व्यवहार म्हणजे मागील लेखांत वर्णन केलेले लहान मुदतीच्या फिरत्या ठेवींचे होत. यांचा विचार करण्यापूर्वी १९२५

साली इंग्लंडने सुवर्णमानपद्धती स्वीकारल्यापासून पुढील पांच वर्षातील चलनपद्धतीच्या घडामोडींचे थोडक्यात वर्णन करणे जरूर आहे. सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार करणे म्हणजे काय हे मागील लेखात स्पष्ट केले आहे. कागदी चलनपद्धती प्रचलित असली म्हणजे नोटांची किंमत पूर्णपणे नियमित असून ती मुख्यतः नोटांच्या पुरवठ्यावर अवलंबून असते. सुवर्णमानपद्धती आता स्वीकारणे म्हणजे कागदी नोटांचा सोन्यात भाव ठरवून तो सारखा कायम राखण्याचे आश्वासन देणे हे होय. महायुद्धानंतर सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार जेव्हा जेव्हा निरनिराळ्या राष्ट्रांनी केला तेव्हा त्यांनी आपणांस सोइस्कर पडतील असे नवीन सोन्याचे भाव कागदी चलनात मुक्रर करून सुवर्णमानपद्धती पुन्हा स्वीकारली. जेथे शक्य असेल तेथे अर्थात महायुद्धापूर्वी जी त्या त्या देशातील मुख्य चलनाची किंमत होती ती ठरविण्याचाच प्रयत्न करण्यात आला. परंतु हे बहुतेक राष्ट्रांस शक्य नव्हते. फ्रान्स, इटली इत्यादी देशांत कागदी चलनाची किंमत महायुद्धानंतर इतकी उतरली होती की, फ्रँक व लिरा यांची महायुद्धापूर्वी जी सोन्यात किंमत होती ती ठरविणे सरकारास अशक्य होते. यामुळे सुवर्णमानपद्धती स्वीकारावयाचे ठरले असेल त्या वेळेस जी सोन्याची कागदी चलनात साहजिक किंमत चालू असेल तिच्या जवळपास एखादा सोइस्कर आकडा घेऊन नवीन कायद्यात तो ठरविला जाई. इंग्लंडने सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार केला तेव्हा कागदी पौंडाची किंमत सोन्याच्या जुन्या पौंडाच्या जवळ जवळ होती. तेव्हा सहजच पौंडाच्या जुन्या किमतीवरच नवीन पद्धती बसवावी असे ठरविण्यात आले. पण असे करण्यापूर्वी कागदी पौंडाचा भाव थोडासा कृत्रिम रीतीने वाढविणे अवश्य होते. कोणत्याही चलनाचा भाव कृत्रिम रीतीने वाढविणे याला उपाय म्हणजे त्या चलनाचा पुरवठा कमी करणे हा होय. चलनाचा पुरवठा कमी करावयाचा असल्यास व्याजाचे दर वाढवून, एकंदर व्यापारी व आर्थिक व्यवहार आखडता घेणे अवश्य आहे. व्याजाचे दर वाढविले व बँकांस आपले कर्ज देण्याचे मान कमी करण्यास सांगितले, म्हणजे साहजिकच व्यापारी, कारखानदार यांस आपला प्रपंच आवरता घ्यावा लागतो व एकंदर जिनसांच्या किमती उतरू लागतात. पण असे करणे म्हणजे कृत्रिम रीतीने आर्थिक व्यवहारास खीळ घालून व्यापारी मंदी उत्पन्न करणे आले. इंग्लंडमध्ये बँका वगैरेचा सुवर्णमानपद्धती पुन्हा स्वीकारण्यास विशेष आग्रह पडला होता आणि किमती थोड्याशा कृत्रिम रीतीने खालावल्या गेल्या तरी फारसा तोटा होणार नाही असा समज बहुतेक जणांचा झाला होता. १९२५ सालानंतर एकंदर सुवर्णमानपद्धतीत किमती जर वाढल्या असत्या तर इंग्लंडने सुवर्णमानपद्धती काहीशा चढत्या भावावर स्वीकारली याचे परिणाम फारसे अनिष्ट झाले नसते. परंतु एकंदर किमती वाढल्या नाहीत आणि इंग्लंडमधील मालाच्या किमती काहीशा उतरविल्या गेल्या. मजुरीचे दर त्या प्रमाणात उतरविणे मजूरसंघांच्या विरोधामुळे अशक्य झाले. यामुळे इंग्रज कारखानदारांचा तोटा झाला. विशेषतः कोळसा, कापड इत्यादी मुख्यतः निर्गतीवर अवलंबून असलेल्या धंद्यांत विशेष नुकसान येऊ लागले. यामुळे १९२४ ते १९२९ या कालात अमेरिका, जर्मनी इत्यादी राष्ट्रात ज्या मानाने भरभराटीचे दिवस गेले तितके इंग्लंडमध्ये गेले नाहीत.

## हिंदुस्थानमधील परिस्थिती

जी स्थिती इंग्लंडची तीच हिंदुस्थानची झाली. हिंदुस्थान सरकारने अठरा पेन्सांचा हुंडणावळीचा भाव ठरविण्यात असलीच चूक केली. हिंदी व्यापारी मंडळी व इतर हिंदी पुढारी यांचे हेच म्हणणे होते की, रुपयाचा भाव साहजिकपणे सोळा पेन्स हा वसत आहे. म्हणजे अमेरिका वगैरे इतर देशांतील किमती व हिंदुस्थानातील किमती ताडून पाहिल्यास रुपयाची किंमत सोन्यात सोळा पेन्स आहे असे दिसून येईल. अठरा पेन्स ही किंमत ठरविली तर रुपयाची किंमत कृत्रिम रीतीने वाढविली असे होईल व ही वाढलेली किंमत कायम राखण्याकरिता रुपयांचा पुरवठा कमी करून कृत्रिम व्यापारी मंदी

उत्पन्न करणे अवश्य होईल. आणि अनुभवांती हे हिंदी पुढाऱ्यांचे म्हणणे खरेही ठरले. पण ही इंग्लंड व हिंदुस्थान यांची विशिष्ट परिस्थिती झाली. इतर बहुतेक देशांत १९२५ पासून पुढील चार वर्षे चांगली गेली हे खरे. कारण इतर देशांत सुवर्णमानपद्धती स्वीकारताना कागदी चलनाचा जो सोन्यात भाव बसविण्यात आला तो कृत्रिम रीतीने चढविलेला नव्हता.

## सोन्याच्या स्थलांतराचे परिणाम

सुवर्णमानपद्धती कोणत्याही देशाने स्वीकारण्यापूर्वी तेथील मध्यवर्ती बँकेने सोन्याचा बराचसा संचय करून ठेवला पाहिजे हे उघड आहे. कारण सोने अमुक एका भावाने विकणे अथवा विकत घेणे याबद्दल घातलेली कायदेशीर बंधने बँकेला पाळणे जरूर असते व हुंडणावळीचा दर खालावण्याचा संभव दिसल्यास जरूर ती सोन्याची निर्गत होऊ देऊन व्याजाचा दर वाढवून त्या हुंडणावळीच्या दराचे स्थैर्य राखण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेवरच असते. सुवर्णमानपद्धती स्थापन करण्याच्या वेळेसच प्रत्येक देशात कायद्याने कागदी चलनाची एकंदर रक्कम व तिला तारण म्हणून ठेवण्याचा किमान सुवर्णनिधी यांचा संबंध ठरवून दिलेला असतो. त्याअर्थी १९२५ च्या पुढे युरोपमधील निरनिराळ्या राष्ट्रांची सोन्याबद्दलची मागणी बरीच वाढली. काही देशांतून सोन्याच्या ऐवजी परदेशी विशेषतः न्यूयॉर्क अथवा लंडन येथे हुंड्या पाठविण्याची व्यवस्था केली असता सुवर्णसंचय प्रत्यक्ष करण्याची जरुरी नव्हती. तेव्हा या देशांतील मध्यवर्ती बँका न्यूयॉर्क व लंडन येथे लहान मुदतीच्या ठेवी बँकांतून राखीत असत. पण इतर देशांत प्रत्यक्ष सोनेच बँकेत बाळगले पाहिजे असा निर्बंध घालण्यात आला. आणि विशेषतः फ्रान्समध्ये सोन्याचा संचय व एकंदर नोटांची रक्कम यांचे प्रमाणही बरेच मोठे ठरविण्यात आले. यामुळे १९२७ ते १९२९ सालपावेतो पॅरिसमधील मध्यवर्ती बँकेस सोने फ्रान्समध्ये ओढून घेण्याचे धोरण स्वीकारावे लागले. जगातील सोन्याचा एकंदर संचय हा मर्यादित आहे व त्याची प्रतिवार्षिक वाढ अलीकडे फार झपाट्याने होत नाही. यामुळे कोणत्याही एका देशात सोन्याचा संचय वाढविणे म्हणजे इतर देशांतील संचय कमी करणे प्राप्त आहे. याप्रमाणे फ्रान्सातील व इतर देशांतील सुवर्णनिधी वाढू लागल्याबरोबर अमेरिका, इंग्लंड या देशांतून सोने बरेचसे बाहेर जाऊ लागले. महायुद्धानंतर सुवर्णमानपद्धतीचे स्वरूप काहीसे पालटलेले आहे. यात सोन्याची निर्गत अथवा आयात सुरू झाल्याबरोबर पैशाच्या पुरवठ्यात पूर्वीइतका आपोआप फरक घडून येत नाही. महायुद्धकाळी जगातील बहुतेक सर्वच सोने अमेरिकेत एकवटले होते; त्यामुळे आता त्यापैकी बरेचसे परदेशी गेले तरी अमेरिकेस काळजी वाटण्याचे काहीएक कारण नव्हते. आणि १९२५ नंतर अमेरिकेतून होणाऱ्या सोन्याच्या निर्गतीस फेडरल रिझर्व्ह बोर्डाने अनुकूल असेच धोरण स्वीकारले. सोन्याचे देशादेशातून स्थलांतर कसे होते हे मागे दर्शविताना लहान मुदतीच्या ठेवींचे याबाबत महत्त्व काय आहे हे समजावून सांगितले. या ठेवी जशा एका शहरातून दुसऱ्या शहरी जातात तसे सोनेही इकडून तिकडे पाठवावे लागते, आणि या ठेवींचा प्रवाह व्याजाच्या दरांवर अवलंबून असतो.

## सट्टेबाजीचे परिणाम

आता येथे एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही की हुंडणावळीचा दर कायम राखणे व सोन्याच्या आयात-निर्गतीचे नियंत्रण करणे हे कार्य मध्यवर्ती बँक व्याजाचा दर खालीवर करून करीत असतात. या व्याजाच्या चढउतारामुळे देशातील अंतर्गत व्यवहारावर फार महत्त्वाचे परिणाम घडून येतात. आणि व्याजाच्या दराचे नियंत्रण करताना मध्यवर्ती बँकेस जसे परराष्ट्रीय परि-स्थितीकडे पाहावे लागते, त्याप्रमाणेच अंतर्गत स्थितीवर लक्ष ठेवावे लागते. एखादे वेळेस या दोन

प्रकारच्या परिस्थितींस अनुरूप अशी धोरणे परस्परविरोधी आढळून येतात; आणि यामुळे एकंदर सुवर्णमानपद्धतीत घोटाळा उडण्याचा फार संभव असतो. हा असा घोटाळा उडण्याचा विशेष संभव अलीकडे उद्भवण्याचे एक कारण म्हणजे जगातील एकंदर सोन्याचा पुरवठा हा फार मुबलक नाही. देशादेशांतील कायद्याने घालून दिलेली किमान मर्यादा लक्षात घेता बाकी फाजील सोने फारसे संचयात नाही. यामुळे सोन्याचे स्थलांतर बरेचसे होऊ लागल्यास बहुतेक देशांतील मध्यवर्ती बँका लवकरच पेचात पडण्याचा संभव असतो. १९२७ साली मात्र अमेरिकेची अशी स्थिती नव्हती आणि त्यामुळे फेडरल रिझर्व्ह बोर्डाने सोन्याच्या निर्गतीस पूर्ण मुभा दिली; इतकेच नव्हे तर आपला व्याजाचा दर कमी ठेवून या निर्गतीस उत्तेजनच दिले. पण हे धोरण स्वीकारण्याच्या वेळेस एक बिकट प्रश्न उपस्थित झाला. तो असा. १९२५ सालापासून १९२७ सालपावेतो फ्रान्समध्ये एकंदर चलनपद्धतीबाबत बरीच अनिश्चितता वाटत असल्यामुळे फ्रान्समधून बराच पैसा अमेरिकन बँकांत ठेवीच्या रूपाने आलेला होता. तेव्हा ही दोन-तीन वर्षे अमेरिकेत सोन्याचा संचय आणखीच वाढला व पैशाचा पुरवठा मुबलक होऊन व्याजाचे दर कमी झाले. या कालातच एकंदर भरभराट होऊन मोटारी, विजेची निरनिराळी यंत्रे, रेडिओ वगैरेंची पैदास फार वाढून एकंदर कंपन्यांच्या शेअरांची किंमत वाढू लागली होती. ही वाढ एकंदरीत अशीच वाढत राहणार अशी बरेचजणांची अपेक्षाही होती. या अपेक्षेमुळे व कमी व्याजाच्या दराने पैशाचा पुरवठा न्यूयॉर्कमध्ये मुबलक झाल्यामुळे शेअरबाजारांत बऱ्याचशा सट्टेबाजीस याच सुमारास सुरुवात झाली. आता फेडरल रिझर्व्ह बोर्डाला पेच पडला तो असा की व्याजाचा दर कमी ठेवला तर या सट्टेबाजीस उत्तेजन दिल्यासारखे होते; पण तो वाढविला तर सोन्याचे निर्गतीस व सर्वसामान्य आर्थिक व्यवहारास अडथळा होणार. या वेळेस फेडरल रिझर्व्ह बोर्डाने आपले व्याजाचे दर वाढविले नाहीत व फ्रान्समध्ये स्थिरस्थावर होऊन बँक ऑफ फ्रान्सने सोने न्यूयॉर्कमधून ओढण्यास सुरुवात केली. पण अशा प्रकारे जागतिक परिस्थितीच्या दृष्टीने इष्ट परिणाम घडून आला तरी खुद्द न्यूयॉर्कमध्ये काही महिन्यांतच बिकट परिस्थिती उत्पन्न झाली. वाढत्या सट्टेबाजीस वेळेवर आळा न घातल्यामुळे सर्वप्रकारच्या शेअरांच्या किमती व खप बेसुमार वाढले. १९२८ सालाचे सुरवातीपासूनच फेडरल रिझर्व्ह बोर्डाने व्याजाचे दर हळूहळू वाढवून व बँकांना कर्ज देते वेळेस शक्य तितका सट्टेबाजीस आळा घालण्याविषयी सल्ला देऊन, हा फुगलेला व्यवहार कमी करण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु त्यात यावे तसे यश आले नाही. प्रथम युरोपातून पैसा अथवा सोने ओढले जाण्याच्या भीतीने व्याजाचे दर फारसे वाढविले नाहीत आणि नंतर व्याजाचे दर जेव्हा बरेच वाढविले तेव्हा त्यांचा व्हावा तसा उपयोग झाला नाही. याचे कारण असे की, आता सट्टेबाजी इतकी वाढली होती की, तिचे नियंत्रण करणे बँकांच्या आवाक्याबाहेर गेले होते. बँकांनी जरी आपले व्याजाचे दर वाढविले व शेअरबाजारास होत असलेला आपल्या पैशाचा पुरवठा अगदी कमी केला, तरी शेअरांच्या सारख्या वाढत्या भावांकडे सर्व अमेरिकेतील माणसांचे लक्ष इतके वेधले होते की, जिकडून-तिकडून शेअरबाजारात गुंतविण्याकरिता पैसा न्यूयॉर्कला येऊ लागला. इतकेच नव्हे, तर अमेरिकेतून दरवर्षी इतर देशांत पाठविल्या जाणाऱ्या कर्जाऊ रकमा कमी होऊन ते भांडवल असेच शेअरबाजारात गुंतले गेले व लहान मुदतीच्या ठेवी युरोपातून न्यूयॉर्कला येण्याचाही ओघ सुरू झाला. शेवटी ऑक्टोबर १९२९ मध्ये या सट्टेबाजीचा फुगा नेहमीप्रमाणे एकदा फुटला. दोन-तीन दिवसांत शेअरांच्या किमती अर्ध्याहून अधिक उतरल्या व एकदम मंदीचे दिवस आले.

## इतर देशांतील मंदी

अमेरिकेतील मंदीच्या दिवसांस ऑक्टोबर १९२९ मध्ये जरी खरी सुरुवात झाली तरी इतर देशांत

याच्या आधीच व्यवहारास ओहोटी लागली होती. आर्थिक अडचणी प्रथम उत्पन्न झाल्या त्या अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, कानडा इत्यादी देशांत. या सर्व देशांचे जीवित गहू व कच्च्या मालाची पैदास व विक्री यांवर अवलंबून आहे. हे देश मुख्यतः कृषिप्रधान आहेत एवढेच नव्हे, तर या देशांतील शेती बहुधा मोठ्या प्रमाणावर यंत्रांच्या साहाय्याने करण्यात येते; व लोकसंख्या विरळ असल्यामुळे पैदाशीचा फार मोठा भाग परदेशी पाठविण्यात येतो. अलीकडे या देशांत उत्पादनाची वाढ फार झपाट्याने झाली होती, त्यातच १९२८ सालचे पीक फार चांगले आले आणि मालाच्या किमती हळूहळू उतरू लागल्या. या राष्ट्रांची स्थिती हिंदुस्थानापेक्षा फारच भिन्न आहे हे लक्षात घेणे जरूर आहे. हिंदुस्थान देश कृषिप्रधान खरा, पण त्याची भरभराट परदेशी व्यापारावर तितकीशी अवलंबून नाही. कारण येथील बरीच निपज देशातल्या देशातच खपते. तसेच अर्जेंटिना व ऑस्ट्रेलिया या देशांस परदेशांचे जितके देणे आहे तितके हिंदुस्थानास नाही. परदेशी भांडवल नेहमी कर्जाऊ मिळण्यावरच या देशांतील कारखानदार व मळेवाले विसंबून असतात. आता मालाच्या किमती एकदम खालावल्या व एकंदर व्यवहारात मंदी आली म्हणजे या देशांची सर्व बाजूनी त्रेधा उडते. मालाच्या मोबदला पैसा कमी मिळतो तेव्हा आयातीच्या मालाची किंमत चुकविण्यास पैसा पुरत नाही. तसेच पूर्वी काढलेल्या कर्जावरील व्याज-मुदलाचे हप्ते वेळोवेळी भरणे अशक्य होते; व नेहमी-प्रमाणे बाहेरून नवीन रकमा कर्जाऊ मिळत नाहीत. म्हणून मळेवाले व कारखानदार यांना आपले व्यवहार पूर्ववत चालू ठेवणे मुष्किल जाते. त्यातल्या त्यात या खेपेस कच्चा माल व गहू यांच्या किमती पक्क्या मालाच्या किमतीच्या मानाने जास्त उतरल्यामुळे या देशांचे फारच हाल झाले. येणेप्रमाणे १९२८ सालीच काही देशांची परिस्थिती कठीण होऊ लागली होती. त्यातच न्यूयॉर्कमधील शेअर-बाजार बसल्याचे निमित्त झाले व ऑक्टोबर १९२९ पासून सर्वच मालांच्या किमती भराभर उतरू लागल्या.

## जर्मनीवरील गंडांतर

अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया यांप्रमाणे जर्मनीची परिस्थितीही विशेष लक्षात घेण्याजोगी आहे. वर दर्शविल्या-प्रमाणे १९२४ वर्षापासून १९२९ पावेतो जर्मनीने मोठमोठी कर्जे काढून आपला संसार थाटला होता. या अवधीत साडेसहा अब्ज रुपयांहून काही अधिक रक्कम खंडणीरूपाने जर्मनीने इतर राष्ट्रांस पोहोच-विली. तरीही दरवर्षी मालाच्या आयातीची किंमत निर्गतीपेक्षा अधिक असे. १९२६ साली जर्मन-व्यापार काही अंतर्गत कारणांमुळे बसला होता. हे वर्ष सोडल्यास १९२४ ते १९२९ ही पाच वर्षे नवीन भांडवल बाहेरून सारखे जर्मनीत येत होते. १९२९ सालच्या उत्तरार्धापासून ही स्थिती एकदम बदलली. भांडवलाचा ओघ एकदम थांबला व काही काळानंतर हा उलट सुरू होतो की काय अशी भीती वाटू लागली. जर्मनी औद्योगिक राष्ट्र असल्यामुळे नवीन खालावलेल्या किमती जर्मनीस एकदम भोवल्या नाहीत. किंबहुना कच्चा माल विशेष स्वस्त झाल्यामुळे १९३० या साली एकंदर मालाच्या आयात-निर्गतीच्या हिशेबात जर्मनीच्या नावे रक्कम न निघता बाकी निघाली आणि या साली खंडणी देण्यास कर्जाची जरुरी प्रथमच भासली नाही. अर्थात हे घडवून आणण्याला एकंदरीत प्रयास बरेच पडले. किमती कमी झाल्याचे परिणाम जर्मनीस लगेच भासले नाहीत, तरी वर्ष-दीड-वर्षाने ते भासू लागले. खंडणी द्यावयाची रक्कम सोन्याच्या स्वरूपात ठरविलेली, म्हणून जसजशा मालाच्या किमती कमी होऊ लागल्या, तसतसा खंडणीचा बोजा राष्ट्राला जास्तजास्त असह्य होऊ लागला. कारण की, आता पूर्वी-इतकी खंडणी देण्यास बराच जास्त माल परदेशांस विकणे अवश्य होते. जर्मन सरकारास याकरिता आपल्या करांचा बोजा वाढवावा लागला, व त्यामुळे एकंदर सर्वच वर्गास ही परिस्थिती जाचक झाली.

यातच जसजशी मंदी जास्त वाढू लागली तसतसे बेकारीचे मान वाढून काही कारखानदार बसू लागले आणि इतर देशातील विशेषतः ऑस्ट्रियातील परिस्थिती अत्यंत बिकट झाली. Ersdi Anstalt या ऑस्ट्रियातील प्रमुख बँकेस १९३१ च्या मे महिन्यात सर्व व्यवहार थांबवावे लागले तेव्हा तर वेळ अगदी आणीबाणीची आली. १९३० साली जर्मनीने जेमतेम खंडणीचे हप्ते भरले, पण या वर्षी ते भरणे अशक्य आहे असे स्पष्ट दिसू लागले. यामुळे राजकीय परिस्थितीही अत्यंत नाजूक बनली व परदेशच्या ज्या ठेवीदारांनी जर्मन बँकांत पैसे ठेवले होते ते काढून नेण्याकडे त्यांची साहजिक प्रवृत्ती होऊ लागली. आता जर्मनीने कर्जाऊ म्हणून ज्या रकमा घेतल्या होत्या त्या सर्वच लांब मुदतीच्या नव्हत्या. बरीचशी लांब मुदतीची कर्जे जर्मन सरकार व कारखानदार यांनी काढलेली होती. त्यांवर सालोसाल द्यावयाचे व्याज बरेच होते. परंतु या कर्जाचे मुद्दल एकदम परत मागणे हे परदेशी सावकारांस करिता येण्याजोगे नव्हते. पण या कर्जाबरोबरच बऱ्याच लहान मुदतीच्या ठेवी परदेशी व्यापाऱ्यांनी जर्मनीत ठेविल्या होत्या, का की, जर्मनीतील व्याजाचा दर बरीच वर्षे तेजीचा होता. या अशा मुदतीच्या ठेवींची एकंदर रक्कम ही बाल कॉन्फरन्सच्या रिपोर्टात जवळ जवळ साडेतीन अब्ज रुपये अशी दिली आहे. (एकंदर लहान मुदतीच्या ठेवींची रक्कम सात अब्ज रुपये होती; पण जर्मन बँकांच्या परदेशच्या ठेवी जवळ जवळ साडेतीन अब्ज रुपये होत्या.) अर्थात एवढी मोठी रक्कम एकदम मागू गेल्यास कोणत्याही राष्ट्रास थोड्या अवधीत ती परत करणे अशक्य आहे. तेव्हा जर्मन बँकांस या ठेवी परत करिता आल्या नाहीत व त्यामुळे सर्वत्र व्यवहारांत आणखीच अनिश्चितता उत्पन्न झाली. प्रे० हूवर यांच्या जाहीरनाम्यानंतर जर्मनीस कोणत्या प्रकारे मदत करिता येईल याबद्दल प्रमुख युरोपीय बँका व अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह बोर्ड यांच्या प्रतिनिधींची परिषद भरली. त्यात त्यांनी जर्मन बँकांत असलेल्या लहान मुदतीच्या ठेवी परदेशी बँकांनी आणखी सहा महिने तरी काढणार नाही असे जर्मनीस आश्वासन द्यावे हा तात्कालिक उपाय सुचविला व त्याप्रमाणे जर्मनीस आश्वासन देण्यात आले व जर्मनीवर आलेले गंडांतर सहा महिने पुढे ढकलले गेले.

## इंग्लंडमध्ये सुवर्णमानपद्धतीचा त्याग

किमती खालावून व्यवहार बसला की प्रथम कर्जदारांची धांदल उडते; पण कर्जदार दिवाळखोर बनल्यास सावकाराचीही तीच अवस्था होणार. प्रथम ऑस्ट्रेलिया व दक्षिण अमेरिकेतील बरीच राष्ट्रे यांची गाळण उडाली; नंतर जर्मनीस हात टेकावे लागले व शेवटी पाळी आली इंग्लंडचीच. अमेरिका, फ्रान्स या इतर धनको राष्ट्रांच्या आधी इंग्लंडचीच अशी स्थिती का व्हावी याचे थोडक्यात दिग्दर्शन आता केले पाहिजे. इंग्लंड हे महायुद्धापूर्वी सबंध जगाचे प्रमुख सावकार होते व अजूनही ते अमेरिकेच्या बरोबरीने आहे. इंग्लंडची सावकारी किती मोठी आहे, याची काहीशी कल्पना इंग्लंडच्या परदेशी व्यापारासंबंधी दिलेल्या पुढील आकड्यांवरून सहज होण्यासारखी आहे. १९२७ पासून १९३० पर्यंतच्या आकड्यांची सरासरी देत आहो. एकंदर मालाच्या आयात-निर्गतीचा हिशेब घेतल्यास युनायटेड किंगडममध्ये ३६ ते ३९ कोटी पौंड किमतीचा माल जास्त येत असे. म्हणजे आयात झालेल्या मालाची किंमत निर्गतीच्या मालाच्या किंमतीपेक्षा एवढी जास्त असे. पण युनायटेड किंगडमचे उत्पन्न यात जमेस घेतले नाही. हे उत्पन्न म्हणजे मालाच्या वाहतुकीबद्दलचे भाडे, बँक, विमा कंपन्या इत्यादींचे कमिशन आणि परदेशी कर्जाऊ दिलेल्या व भांडवल म्हणून घातलेल्या रकमांवरील व्याज व नफा. १९२७ सालापासून १९२९ पावेतो आकडे घेतल्यास ब्रिटिश जहाज कंपन्यांचे उत्पन्न म्हणून १३ ते १४ कोटी पौंड, परदेशी घातलेल्या भांडवल वगैरेचे २७ ते २८ कोटी पौंड, पेढ्यांच्या व्यवहाराबद्दल जवळजवळ सहा कोटी पौंड व इतर काही किरकोळ उत्पन्न मिळून एकंदर सुमारे ५० कोटी पौंड दरवर्षी इंग्लंडचे

जादा उत्पन्न होते. जादा आयात मालाची किंमत वजा जाता ऐन बाकी ११ ते १५ कोटी पौंडांची निघत असे व यांतील बहुतेक रक्कम म्हणजे दहा-बारा कोटी पौंड दरवर्षी पुन्हा परदेशात युनायटेड किंगडममधून जात असत. मंदीचे दिवस आल्याबरोबर हे कोष्टक बदलले. १९३० सालीच या सर्वच बाबींवरचे उत्पन्न कमी होऊन ते सुमारे ४२ कोटी पौंड एवढेच झाले. आयात-निर्गतीतील फरक त्या मानाने उतरला नाही व त्यामुळे १९३० सालची ऐन बाकी चार कोटी पौंड एवढीच निघाली. १९३१ साली उत्पन्नाच्या बाबी अर्थात याहूनही कमी झाल्या आहेत. काहीजणांच्या अजमासाप्रमाणे या वर्षाच्या शेवटी ऐन बाकी न निघता ऐन देणेच निघण्याचा संभव जास्त आहे. असे जरी झाले तरी यामुळेच सुवर्णमानपद्धतीचा इंग्लंडला त्याग करावा लागला असे बिल्कूल नाही. एवढेच की, या साली नेहमीइतकी परिस्थिती निर्धास्त नव्हती.

## पौंडाच्या स्थैर्याबद्दल गैरविश्वास

सुवर्णमानपद्धतीचा त्याग करावा लागण्याचे कारण म्हणजे पौंडाच्या स्थैर्याबद्दल उत्पन्न झालेला परदेशीयांच्या मनांतील गैरविश्वास हेच होय. इंग्लंडवर जे हे अरिष्ट ओढवले ते केवळ गैरविश्वासामुळे ओढवले याबद्दल ऐकमत्य आहे. गैरविश्वास उत्पन्न होण्याला एक कारण म्हणजे इंग्लंडची परदेशी व्यापाराबद्दलची परिस्थिती हे खरे, पण हे मुख्य कारण नव्हे. एखाद्या वर्षी परदेशी व्यापारात देणे निघणे हे इंग्लंडसारख्या सावकार राष्ट्रास फारसे धोक्याचे नाही. हे देणे परदेशांत असलेल्या भांडवलाचा अगदी अल्प भाग कमी करून सहज चुकविता येण्यासारखे आहे. गैरविश्वास उत्पन्न होण्याइतकी नाजुक परिस्थिती मुख्यतः दोन कारणांमुळे घडून आली. एक जर्मनीची अडचण व दुसरे मे कमिटीचा रिपोर्ट. जर्मनीच्या परिस्थितीचा विचार वर केलाच आहे. हिचा इंग्लंडवर असा परिणाम झाला की, इंग्रज बँकांनी ज्या बऱ्याच रकमा लहान मुदतीच्या ठेवी म्हणून जर्मन बँकांत ठेविल्या होत्या त्या एकाएकी अडकून पडल्या. एकंदर जर्मनीत जुलै १९२१ मध्ये लहान मुदतीच्या जवळजवळ सात अब्ज रुपयांच्या ज्या ठेवी होत्या, त्यांपैकी दीड अब्जावर रक्कम इंग्रज बँकांची होती. ही रक्कम आणखी निदान सहा महिने तरी मिळत नाही असे जेव्हा ठरले तेव्हा इंग्रज बँकांत ज्या परदेशीयांनी ठेवी ठेविल्या होत्या त्यांना आपल्या पैशाबद्दल साहजिकच काळजी वाटू लागली. या लंडनमधील परदेशीयांच्या ठेवींची रक्कम नेहमीच फार मोटी असते. लढाईपूर्वी राष्ट्राराष्ट्रामधील व्यापारातील हुंड्यांचा व्यवहार, ऋणको राष्ट्रांचे कर्ज उभारणे अशा प्रकारच्या सर्व महत्त्वाच्या पैशाच्या व्यवहाराचे जगातील मुख्य केंद्र म्हणजे लंडन हेच होते. महायुद्धानंतर न्यूयॉर्क बरेच पुढे सरसावले आहे व पॅरिसही बरेच महत्त्वास पावले आहे. तरी लंडनचे प्रामुख्य फारसे कमी झाले नाही. यामुळे लंडनमधील बँकांत आपली खाती उघडणे व बराचसा व्यवहार पौंडांत करणे या गोष्टींची जगातील बहुतेक सर्व देशांच्या बँकांस सवय झाली आहे. तसेच महायुद्धानंतरच्या सुवर्णमानपद्धतीत सोने देण्याऐवजी परदेशी हुंड्या पटविण्याची काही मुभा मध्यवर्ती बँकांस दिलेली असते. या हुंड्या पटविण्याकरिता या बँकांस परदेशांत बरीच मोठी रक्कम ठेवणे अवश्य आहे व अशी रक्कम साधारणपणे न्यूयॉर्क अथवा लंडनमध्येच ठेवण्याचा विशेष प्रघात आहे. मॅकमिलन कमिटीने एकंदर लहान मुदतीच्या ठेवी लंडनमधील बँकांत परदेशीयांनी किती ठेविल्या असतात याची माहिती दिली आहे. या माहितीवरून हुंड्यांचा व्यवहार व ठेवी यांत अल्प मुदतीत काढून घेण्यासारखा परकी पैसा १९३० व १९३१ या सालांत जवळजवळ ४० ते ४५ कोटी पौंड एवढा असे असे दिसते. ही एवढी रक्कम लंडनमध्ये नेहमीचीच गुंतलेली असावयाची, या समजुतीवरच लंडनमधील व्यवहार नेहमी चालत असत. उलट लंडनमधून परदेशी लहान मुदतीच्या ठेवी जात असतच, पण त्यांची रक्कम लंडनमधील परक्या पैशाचे निम्म्यानेसुद्धा

नसे. आणि आता या रकमेचा बराच मोठा भाग जर्मनीत अडकून बसल्यासारखा झाला होता. शिवाय आणखी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, ती अशी की, इंग्लंडमधून लांब मुदतीचे कर्ज परदेशात पुरविण्याचा विशेष प्रघात महायुद्धापूर्वीपासूनचा पडलेला आहे. तेव्हा लंडनमधून इतर ठिकाणी जे भांडवल व ज्या रकमा जात त्या लहान मुदतीच्या ठेवींच्या रूपाने नसून लांब मुदतीचे कर्ज अथवा उद्योग-धंद्यांत गुंतविलेले भांडवल या स्वरूपाच्या असत. यामुळे काही वेळेस लंडनमधील या व्यवहारास अल्प मुदतीचे एकाचे कर्ज काढून दुसऱ्यास लांब मुदतीने देणे असे स्वरूप येई. जोपर्यंत गैरविश्वास उत्पन्न झाला नाही, तोपर्यंत यात विशेष धोका नव्हता; पण जर्मनीची बिकट अवस्था झाल्यानंतर जिकडेतिकडे गडबड उडाली व लंडनमधील पैशाचीही शाश्वती काय अशी सहजच शंका उत्पन्न झाली.

## मे कमिटीच्या रिपोर्टाचा परिणाम

यातच मे कमिटीच्या रिपोर्टाने भर टाकली. १९३१ सालच्या सुरुवातीस पार्लमेंटातील विरोधक पक्षांनी बरीच ओरड करून मजूर सरकारास ही काटकसर कमिटी नेमण्यास भाग पाडले. यांत विशेषतः लंडनमधील काही प्रमुख भांडवलवाल्यांचा समावेश करण्यात आला होता. या कमिटीने जुलै महिन्यात आपला रिपोर्ट सादर केला. या रिपोर्टात इंग्लंडच्या एकंदर फडणिशी कारभाराबद्दलचे चित्र अगदी भडक रंगात रंगविले होते. राष्ट्रीय उत्पन्नाची उधळपट्टी चालली असून सालोसाल भयंकर तूट येत आहे असे यात प्रतिपादन केले आहे. एकंदर रिपोर्ट अतिशयोक्तिपूर्ण आहे व त्यात जितकी परिस्थिती कठीण म्हणून वर्णन केले आहे, तितकी ती नाही असे आता बहुतेकजण कबूल करितात. परंतु रिपोर्टाचा तात्कालिक परिणाम फार झाला. मजूर सरकारास घाबरवून बेकारवेतन कापविण्याचा यात भांडवल-वाल्यांचा डाव होता व त्यात बँकाही सामील होत्या असा मजूरपक्षीय पुढाऱ्यांचा आक्षेप आहे. ते काही असले तरी रिपोर्टामुळे मजूरपक्ष घाबरून त्यात फूट पडली हे खरे. पण फक्त मजूरपक्षच घाबरला असे नाही तर परकी ठेवीदारसुद्धा घाबरले. म्हणजे बँकांचा खरोखरच काही डाव यात असला तर मग त्यांच्या दृष्टीने अगदी विपरीत असाच परिणाम घडून आला; आणि एव्हापासून ठेवी सारख्या भराभर निघण्यास सुरवात झाली.

या लहान मुदतीच्या ठेवी विशेषतः फ्रेंच लोकांच्या होत्या. फ्रान्समध्ये जवळजवळ १९२७ साला-पावेतो चलनाबाबत अस्थिरता असल्यामुळे या सार्वराष्ट्रीय पैशाचे व्यवहारांत फ्रेंच बँका वगैरेंनी फारसा महत्त्वाचा भाग घेतला नव्हता. तोपावेतो फ्रेंच लोकांची बाहेर, विशेषतः न्यूयॉर्कमध्ये, पैसा ठेवावया-चीच प्रवृत्ती विशेष होती. १९२७ नंतर हा पैसा बराचसा सोन्याचे रूपाने फ्रान्समध्ये परत आला. १९२७ च्या पुढे फ्रान्समध्ये बरीच भरभराट होती व एकंदर राष्ट्रीय उत्पन्नातून सालोसाल बरीच शिल्लक पडत होती. महायुद्धापूर्वी फ्रान्सने इतर देशांत, विशेषतः रशियात, बराच पैसा गुंतविला होता. हा रशियातील पैसा तेथील राज्यक्रांतीमुळे साफ बुडून फ्रेंच भांडवलवाल्यांस चांगलीच ठोकर बसली. यामुळे पुनः लांब मुदतीची कर्जे देण्यास फ्रेंच लोकांचे मन घेईना. शिवाय 'बँक ऑफ फ्रान्स'नेही जरी तिच्याजवळ सोने मुबलक झाले, तरी व्याजाचा दर पुष्कळ कमी करून अथवा इतर कोणत्याही रीतीने पैशाचा पुरवठा वाढविण्याची सोय केली नाही. म्हणून मालाच्या आयात-निर्गतीवर सोन्याच्या विपुलतेचा जो आपोआप परिणाम महायुद्धापूर्वी घडून आला असता तो घडून आला नाही. एकंदर फ्रेंच लोकांची प्रतिवार्षिक बचत गेली दोन-तीन वर्षे भांडवल म्हणून उपयोगात येण्याऐवजी ही सर्व रकम लहान मुदतीच्या ठेवींच्या रूपाने निरनिराळ्या देशांत फिरत आहे. तेव्हा एक तर भांडवलाच्या तुटवड्यामुळे उद्योगधंद्यास ओढ पडली; व दुसरे असे की, लहान मुदतीच्या ठेवी बेसुमार वाढल्यामुळे एकंदर चलनपद्धतीत अनिश्चितता उत्पन्न झाली. असो.

इंग्लंडने केलेल्या सुवर्णमानपद्धतीच्या त्यागाची ही अशी कारणपरंपरा आहे. जर्मनीतील ठेवी परत मिळण्याची अडचण, एकंदर राष्ट्रीय उत्पन्नाच्या महत्त्वाच्या बाबतीत येत असलेली तूट व त्यामुळे परदेशी व्यापाराचा झुकता हिशेब, व राष्ट्रीय फडणिशी कारभाराची मेकमिटीने चितारलेली चिंताजनक परिस्थिती या सर्वांचा परिणाम इतर ठेवीदारांवर साहजिक झाला आणि त्यांनी आपले पैसे लंडनमधून परत नेण्यास सुरुवात केली. एखाद्या बँकेतून पैसे काढण्याचा ओघ सुरू झाला म्हणजे जसा तो थांबता थांबत नाही, त्याप्रमाणेच लंडनची स्थिती झाली. इंग्रज सरकारने २० कोटी पौंडांच्या वर रकमा न्यूयॉर्क व पॅरिस या शहरांमध्ये कर्जाऊ उभारल्या, तरीही हा पूर ओसरण्याची काही चिन्हे दिसेनात. 'बँक ऑफ इंग्लंड'मधील सोने जास्त जास्त कमी होऊ लागले व शेवटी कायद्याने ठरविलेल्या किमान मर्यादेहूनही ते कमी होऊन कदाचित सोने पुरतेच नाहीसे होईल की काय अशी बँकेस भीती वाटू लागली. तेव्हा तिने सुवर्णमानपद्धतीचा त्याग करण्याचा सल्ला इंग्रज सरकारास दिला. म्हणजे बँकेवर सोने अमुक एका किमतीस विकण्याचे व विकत घेण्याचे जे कायदेशीर बंधन होते ते काढून घेण्यात आले. इंग्लंड दिवाळखोर नव्हते; अजून अमेरिकेच्या खालोखाल सधन व सावकार राष्ट्र तेच आहे. परंतु मोठ्या संपन्न बँकेवरही वेळेपुरता पैसा एकदम हाती नसल्यामुळे ठेवीदारांस नाही म्हणण्याची पाळी यावी तशापैकी प्रकार झाला. मात्र यामुळे पौंडाच्या हुंडणावळीच्या दरांतील स्थैर्य नाहीसे झाले व पौंड पुनः केवळ कागदी चलन बनले. आता सुवर्णमानपद्धती टिकवून धरणारी प्रमुख धनको अशी अमेरिका व फ्रान्स ही दोनच राष्ट्रे राहिली आहेत; आणि पुढे काय होणार हे या राष्ट्रांच्या धोरणावर अवलंबून असल्यामुळे त्यांच्याकडे आज सर्व जगाचे डोळे लागून राहिले आहेत.

*लोकशिक्षण* ४ ; ११ नोव्हेंबर १९३१ पृ. ७६५–७८१

☆

# ६ . . चांदीच्या भावातील चढउतार

गेल्या दोन-तीन महिन्यांत चांदीच्या एकदम वाढलेल्या भावामुळे या धातूच्या किमतीकडे सर्व लोकांचे पुनः लक्ष वेधले गेले आहे. सोन्याचांदीच्या किमतीचे चढउतार अलीकडील वर्षांत फार झाले आहेत; व सोनेचांदी बाळगणे हा द्रव्यसंचय करण्याचा आपल्याकडील सार्वजनिक आणि पूर्वापार चालत आलेला मार्ग असल्यामुळे या धातूंच्या किमतीचे या देशात सर्वांसच महत्त्व वाटते. तेव्हा चांदीच्या वाढत्या भावाची कारणमीमांसा येथे थोडक्यात करणे अप्रस्तुत होणार नाही.

## चांदीच्या मागणीतील घट

शंभर वर्षांपूर्वी जवळजवळ सर्व जगभर चांदीचीच नाणी मूल्यमापनाकरिता मुख्यत्वे वापरली जात असत. सोने फार महाग होते व त्याचा पुरवठाही अत्यल्प होता. १८५० पासून पुढे सोन्याच्या नवीन खाणी मोठ्या प्रमाणावर सापडल्यामुळे हा पुरवठा बराच वाढला व हळूहळू अनेक राष्ट्रे सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार करू लागली. मध्यंतरी बरीच वर्षे चलनपद्धतीत सोने व चांदी या दोहोंचाही दर्जा बऱ्याच देशांत सारखा होता. पण सोन्याचांदीच्या मागणीपुरवठ्यातील चढउतार सारख्या प्रमाणात न झाल्यामुळे अशा प्रकारची द्वि-धातुमानपद्धती टिकविणे कठीण पडू लागले; व इंग्लंडसारख्या पुढारलेल्या राष्ट्रांनी सोन्याचा जोराचा पुरस्कार केल्यामुळे सुवर्णमानपद्धती स्वीकारणे हे विशेष मानाचे समजले जाऊ लागले. सारांश, महायुद्धापूर्वीच्या काळापर्यंत सुवर्णमानपद्धती कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात स्वीकारली आहे, अशी चीनशिवाय इतरत्र बहुतेक जगभर परिस्थिती येऊन पोचली. याचा परिणाम अर्थात असा झाला की, चांदीची मागणी फार मोठ्या प्रमाणात घटली आणि महायुद्धानंतरही अशीच घटत राहिली. मध्यंतरी काही विशिष्ट परिस्थितीमुळे महायुद्धाच्या काळात चांदीचा भाव फार वाढला. हा अपवाद सोडून दिला तर चांदीचा भावही सारखा उतरण्याचाच कल अलीकडे दिसून येत होता. रौप्यमानपद्धती जरी सोडून दिली तरी चांदीची नाणी हरएक देशात थोड्याबहुत प्रमाणात वापरली जातातच. चीन, हिंदुस्थान, मेक्सिको इत्यादी देशांत त्यांचा प्रसार फारच मोठ्या प्रमाणात आहे. चीन व हिंदुस्थान यांमध्ये चांदीची नाणीच विशेष महत्त्वाची; तेव्हा तेथे चांदीची सरकारी खरेदी बरीच मोठी असावयाची, पण हिंदुस्थानच्या बाबतीत असे झाले की, महायुद्धकाळी हिंदुस्थानसरकारने फारच मोठ्या प्रमाणावर चांदीची खरेदी करून ठेवली. या वेळेस नोटा प्रसृत होण्यास कठीण पडून रुपयास मागणी फार येईल अशी सरकारची अटकळ होती. तसेच एकंदर किमतीचे मानही फार वाढलेले होते. परंतु पुढे किमती उतरल्या, नोटांचा प्रसार वाढू लागला, नवीन रुपये पाडण्यास चांदी लागेनाशी होऊन जुने रुपयेच टाकसाळीत साठू लागले व हिंदुस्थान सरकारा-

जवळचा रौप्यसंचय मोटा झाला. त्यामुळे गेल्या दहा वर्षांत हिंदुस्थान सरकार चांदीचे गिऱ्हाईक होण्याएवजी थोड्याबहुत प्रमाणात चांदी विकीतच आहे. हिंदुस्थानात चांदीची सरकारी खरेदी नसली तरी खाजगी खरेदी मात्र फार मोठ्या प्रमाणावर होते; आणि अलीकडील मंदीची काही वर्षे सोडली तर चांदीची आयात हिंदुस्थानात सारखी होत असते. भांडी, दागिने वगैरे निरनिराळ्या प्रकारांत चांदी आपल्याकडे वापरली जाते; व वर दर्शविल्याप्रमाणे धनसंचय करण्याचाही तो एक राजमार्ग असल्यामुळे चांदीचा मामुली वार्षिक खप आपल्या देशात फार मोठा आहे. चीन देशातील परिस्थितीही बहुतांशी अशीच आहे व तेथील सरकारी मागणीही मोठी आहे. तेव्हा चिनी सरकार व जनता, आणि त्यांच्या खालोखाल हिंदुस्थानातील जनता, ही चांदीची महायुद्धोत्तर मुख्य गिऱ्हाइके होती. याशिवाय वर दर्शविल्याप्रमाणे इतर देशांतूनही किरकोळ नाण्यांकरिता चांदी खपत असे आणि कला-कुसरीच्या कामांत व काही औद्योगिक क्रियांतही यूरोप-अमेरिकेत थोडीबहुत चांदी लागे. खाली दिलेल्या कोष्टकावरून १९२९ व १९३२ साली चांदीचा खप जगभर कसा होता हे दिसून येईल.

| चांदीचा खप | १९२९ | १९३२ |
|---|---|---|
| चीन | १३५० | ४०० |
| हिंदुस्थान | ८२० | १२० |
| जर्मनी | १२० | २३० |
| यूरोप-अमेरिका (कलाकुसर व औद्योगिक क्रिया) | ४४० | ३१० |
| नाणी | २५० | ४८० |
| बिनहिशेबी | २१० | ५४० |
| एकूण | ३२१० | २०८० |

(आकडे लक्ष औंसाचे आहेत. १ औंस = २॥ तोळे).

वरील माहितीवरून चीन व हिंदुस्थान येथील मागणी किती महत्त्वाची असे हे सहजच ध्यानात येईल. इतर देशांत किरकोळ नाणी चांदीची असली तरी महायुद्धोत्तर काळात त्यांची एतद्विषयक मागणी फार कमी झाली होती. कारण, या नाण्यांकरिता चांदीच्या ऐवजी जस्ताचा उपयोग करणे अथवा नाण्यांतील चांदीचा खप कमी करणे, या उपायांचा अवलंब पैशाच्या अडचणीमुळे बहुतेक राष्ट्रांनी केला होता. शिवाय इंडो-चीन वगैरे देशांची रौप्यमानपद्धती सोडून चांदीच्या नाण्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी करणे वगैरे गोष्टी या अवधीतच घडल्यामुळे एकंदर चांदीची गिऱ्हाइकी बरीच बसली. १९२९ सालपावेतो चीन-हिंदुस्थानमधील कृषिवर्ग अगदीच हलाखीच्या स्थितीला पोहोचला नसल्यामुळे तेथे मागणी बरीच होती; आणि म्हणून चांदीचा बाजार अगदीच बसला नव्हता. १९२४ ते १९२९ या पाच वर्षांत एकंदर जगात झालेल्या चांदीच्या विक्रीपैकी दोनतृतीयांश चांदी चीन व हिंदुस्थान या देशांत विकली गेली. परंतु यापुढे मात्र जसजसे मंदीचे प्रमाण जास्त तीव्र होऊ लागले तसतशी हिंदी-चिनी मागणी कमी होऊन ती १९३२ पर्यंत जवळजवळ नामशेष झाली. याचा परिणाम असा झाला की १९२९ ते १९३२ या अवधीत चांदीची किंमत पूर्वी उतरली नव्हती त्यापेक्षाही झपाट्याने उतरू लागली.

## चांदीमध्ये हितसंबंध गुंतलेले देश

चांदीची पैदास होते ती मुख्यतः अमेरिकेत होते. मेक्सिको, संयुक्त संस्थाने व कॅनडा या देशांतील खाणींतून एकंदर जागतिक उत्पादनाच्या तीनचतुर्थांश चांदी निघते. त्यातल्या त्यात मेक्सिकोचा क्रम पहिला व संयुक्त संस्थानांचा दुसरा लागतो. चांदीची किंमत घटली म्हणजे तोटा दोघांचा होतो. एक चांदीच्या उत्पादकांचा व दुसरा ज्यांनी चांदीच्या रूपाने धनसंचय केला असेल त्यांचा. चांदीची किंमत घटू लागल्यावर संयुक्त संस्थानांतील चांदीच्या खाणवाल्यांनी आपल्या सरकाराकडे यासंबंधी काही तरी करण्याबद्दल सारखी मागणी सुरू केली. संयुक्त संस्थानांतील चांदीचे उत्पादक हे फार वजनदार लोक आहेत आणि त्यांचा व तेथील डेमोक्रॅटिक पक्षाचा ऋणानुबंध पूर्वापार चालत आलेला आहे. पूर्वीपासून चांदी चलनपद्धतीत समाविष्ट करून तिची सरकारी गिऱ्हाइकी वाढविण्याची प्रथा त्या देशात पडलेली आहे. त्यातच १९३३ च्या मार्च महिन्यात डेमोक्रॅटिक पक्षाचे अध्वर्यू प्रे० रूझवेल्ट यांची अध्यक्षाच्या जागी निवडणूक झाली. तेव्हा चांदीची जागतिक मागणी वाढविण्याचा प्रयत्न सरकारने करावा व चलनपद्धतीतही चांदीचा पुरस्कार करावा याबद्दल जोराने चळवळ सुरू झाली. याचा परिणाम असा झाला की, १९३३ च्या जागतिक आर्थिक परिषदेच्या वेळेस संयुक्त संस्थानांच्या प्रतिनिधींनी चांदीचा प्रश्न प्रामुख्याने पुढे मांडला व त्याविषयी या परिषदेने काही शिफारसवजा ठरावही मान्य केले. याशिवाय याच परिषदेच्या वेळेस चांदीच्या प्रश्नांशी विशेष निकट संबंध असलेल्या काही राष्ट्रांची निराळी परिषद होऊन काही करारमदार झाले. जागतिक आर्थिक परिषदेने केलेल्या शिफारशींचे स्वरूप असे की, कोणत्याही राष्ट्राने आपल्या चलनपद्धतीतील रुप्यांची नाणी अथवा त्यांचा कस कमी न करता ती शक्य तोवर वाढविण्याचा प्रयत्न करावा. अर्थात या शिफारशींचा उद्देश हा की नाण्याकरिता चांदीची मागणी शक्य तर वाढावी, निदान चांदीची नाणी कमी झाल्यामुळे जागतिक चलनपद्धतीतून आणखी रुपे विकावयास बाजारात येऊ नये.

## चांदी-परिषदेतील निर्णय व त्यांचे परिणाम

खुद्द चांदी-परिषदेत खालील राष्ट्रांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. संयुक्त संस्थाने, मेक्सिको, कॅनडा, हिंदुस्थान, चीन व स्पेन. पहिली तीन उत्पादक राष्ट्रे म्हणून, हिंदुस्थान व स्पेन या दोन्ही राष्ट्रांच्या सरकारांजवळ बरीच विकाऊ चांदी होती म्हणून, आणि चीन मोठे गिऱ्हाईक व रौप्यमानपद्धतीचे राष्ट्र म्हणून. पहिल्या तीन राष्ट्रांच्या सरकारांनी दरवर्षी ३५० लक्ष औंस चांदी चलनपद्धतीकरिता म्हणून विकत घेण्याचे कबूल केले; व हिंदुस्थान, स्पेन आणि चीन या सरकारांनी ठराविक मर्यादेपलीकडे आपण सरकारी साठ्यातून चांदीची विक्री करणार नाही, असे कबूल केले. या वार्षिक मर्यादा म्हणजे हिंदुस्थानला ३५० लक्ष औंस व स्पेनला ५० लक्ष औंस अशा होत्या. या करारात उत्पादन कमी करण्याबद्दल काहीच ठरविण्यात आले नाही, हे लक्षात घेण्याजोगे आहे. अर्थात चांदीचे उत्पादन कमी करण्यात एक मोठी अडचण आहे. ती अशी की, बहुतेक खाणी केवळ चांदीच्या अशा नाहीत. चांदी, जस्त व शिसे या धातू बऱ्याचशा एकत्र सापडतात. त्यामुळे एकाच्या पैदाशीबरोबर दुसऱ्याची पैदासही साहजिकच होते. जगातील एकंदर चांदीच्या उत्पादनापैकी सारी एकचतुर्थांशच शुद्ध चांदी अशा खाणींतून निघते, असा अंदाज आहे. हे जरी खरे तरी उत्पादक राष्ट्रांकडून उत्पादन-नियंत्रणाविषयी थोडा तरी प्रयत्न होण्यासारखा होता व आहे. तो काही अजून झालेला नाही. सरकारात करारमदार झाले तरी एकंदर चांदीची मागणी फारशी वाढणे शक्य नव्हते. १९३३ च्या करारामुळे चांदी-बाजारावर फारसा परिणाम झाला नाही. हिंदुस्थान सरकार जेवढी चांदी सालीना विकत असे त्यात चांदी-परिषदेच्या

मर्यादेमुळे काही काट झाला नव्हता. तेव्हा अमेरिकन व इतर सरकारांनी चांदी विकत घेण्याचे कबूल करण्यापलीकडे उत्पादकांस या कराराचा जास्त फायदा झाला नाही; आणि १९३२ पासून पुढे चांदीची मागणी उतरतच राहिली. हिंदुस्थानामधील शेतकऱ्यांची दैना, परराष्ट्रीय व्यापारातील उलटी बाकी व हिंदुस्थान सरकारने चांदीच्या आयातीवर लादलेली जबर जकात या सर्व गोष्टींमुळे हिंदुस्थानातील चांदीची मागणी अगदी नाहीशीच झाली. चीनमधील स्थितीही हिंदुस्थानासारखीच आहे व तेथेही खाजगी मागणी आज काही उरली नाही.

## संयुक्त संस्थानांचे धोरण

खाजगी खप अत्यंत कमी झाला व परिषद-करारांनीही फायदा झाला नाही, तेव्हा संयुक्त संस्थानांतील चांदीवाल्यांनी आपल्या सरकारवर वजन घालण्याकडे लक्ष वळविले; आणि चांदीचा खप व चांदीची किंमतही सरकारी प्रयत्नांनी वाढवून घेण्यास सुरुवात केली. या प्रयत्नांत यश येण्यात प्रे० रूझवेल्ट हे डेमोक्रॅटिक पक्षाचे होते, हे एक बलवत्तर कारण होतेच; पण त्याहूनही दुसरे जे महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे प्रे० रूझवेल्ट हे आपल्या अध्यक्षपदाच्या सुरुवातीपासूनच चलनविषयक प्रयोग करून किंमत वाढविण्याच्या खटपटीत होते हे होय. सरकारने चांदी खरीदून तिच्या तारणावर नोटांचा प्रसार वाढविल्यास आपले ध्येय साध्य होण्यास काही अंशी मदत होईल, अशी रूझवेल्ट व त्यांचे सल्लागार यांची समजूत झाली होती. तेव्हा चांदीवाल्यांच्या भिडेस मान देऊन चांदीचे भाव वाढविण्याचे संयुक्त संस्थानांच्या सरकारचे प्रयत्न सुरू झाले. पहिली गोष्ट म्हणजे १९३३ डिसेंबरमध्ये संयुक्त संस्थानांच्या खाणींतून निघालेली सर्व नवीन चांदी यापुढे सरकार ठराविक भावाने विकत घेईल, हा प्रे० रूझवेल्ट यांनी काढलेला जाहीरनामा होय. एका दृष्टीने यात नवीन काही नव्हते. कारण, चांदी-परिषदेतील करारांप्रमाणे संयुक्त संस्थानांच्या सरकारास चांदीची वार्षिक खरेदी करावयाची होतीच, व या वार्षिक खरेदीचे प्रमाण हे संयुक्त संस्थानांतील नवीन चांदीच्या उत्पादनाइतकेच होते. तेव्हा हा जाहीरनामा रूझवेल्ट यांनी चांदी-परिषद-करारांस पुष्टिकारक म्हणूनच काढला. नवीन एवढेच केले की, चांदी खरीदण्याची किंमत ही त्या वेळेच्या बाजारभावाच्या जवळजवळ दिढीने ठेविली. पण एवढ्याने एकंदर बाजारभावावर फारसा परिणाम झाला नाही. तेव्हा १९३४ च्या मे महिन्यात एक महत्त्वाचा कायदा करण्यात आला. या कायद्याने कागदी नोटांस तारण म्हणून जो सरकारी धातुसंचय असावयाचा, तो केवळ सोन्याचा न ठेवता त्यात पाव हिश्शापावेतो चांदी ठेवण्यास सरकारास परवानगी देण्यात आली. गेल्या वर्ष-सव्वा-वर्षातील सर्व घडामोडी या कायद्याच्या आधारेच होत आहेत. कायद्याने चांदी अमुक प्रमाणात विकत घेतलीच पाहिजे, अशी काहीच सक्ती केलेली नाही. पण सरकारी विक्रीची जी कमाल मर्यादा ठरविली ती फारच मोठी आहे. पुरती पाव हिस्सा चांदी घ्यावयाची म्हणजे संयुक्त संस्थानांच्या सरकारास जवळजवळ १३० ते १६० कोटी औंस चांदी विकत घ्यावी लागेल. म्हणजे १९२९ साली एकंदर जगभर जेवढा चांदीचा उठाव झाला, त्याच्या चार-पाच पटीने खरेदी होईल. अर्थात ही सर्व खरेदी एकाच वर्षात होणे शक्य नाही व ती अमुक क्रमाने आणि अमुक इतकी होईल असा नेमही नाही. पण केव्हाही कितीही चांदी विकत घेण्यास गेल्या वर्षापासून प्रे० रूझवेल्ट यांस कायद्याचा पुरेसा आधार झाला आहे.

१९३४ मेपासून सरकारी खरेदी संयुक्त संस्थानांत कमजास्त प्रमाणात सारखी सुरू आहेच. संयुक्त संस्थानांमधील नवीन चांदीस जरी बाजारभावापेक्षा जास्त भाव ठरविण्यात आला तरी इतर खरेदी बाजारभावाप्रमाणे होत आली. नवीन गिऱ्हाईक उत्पन्न झाले व सरकार काही तरी करील अशी अपेक्षा उत्पन्न झाली. यामुळे जी वाढ व्हावयाची त्यापलीकडे सरकारने प्रत्यक्ष भाव वाढविण्याबद्दल काही खटपट

एकदम केली नाही. पण तसे पाहिले तर प्रे० रूझवेल्ट यांच्या सर्व चलनविषयक घडपडींची अवस्था मधूनमधून उसळीने काही करावयाचे अशीच आहे. मे १९३४ नंतर पुढचा उपक्रम १९३४ ऑगस्ट-मध्ये झाला. या महिन्यात प्रे० रूझवेल्ट यांनी संयुक्त संस्थानांतील सर्व व्यक्ती, कंपन्या वगैरेंजवळ असलेली चांदी त्यांनी सरकारास तीन महिन्यांच्या आत विकावी, असा जाहीरनामा काढला. ही चांदी विकत घेण्याचा भाव बाजारभावापेक्षा जास्त ठेविला नाही.

चांदीचा भाव १९३३ साली अतोनात उतरला होता. चांदी-परिषदेच्या वेळेस तो थोडासा सावरला, पण वाढीस लागला नाही. अमेरिकन सरकारच्या चांदीसंबंधी नवीन धोरणाची रूपरेषा दिसू लागताच मात्र तो चढू लागला. अमेरिकन सरकारने १९३४ साली जरी प्रत्यक्ष खरेदी फार मोठ्या प्रमाणावर केली नाही, तरी त्याची चांदीचा भाव वाढविण्याची इच्छा आणि त्याचे एकंदर चलनविषयक धोरणाचे स्वरूप यांची माहिती बाजारास असल्यामुळे व्यापारी लोक सारखा भाव चढवू लागले व नोव्हेंबर १९३३ ते मार्च १९३५ च्या दरम्यान हा भाव जवळजवळ दिढीने वाढला. मार्च १९३५ मध्ये नवीन चांदी घेण्याच्या ठरविलेल्या पहिल्या भावाजवळ तो येऊन पोहोचताच नवीन चांदीस सरकारने जास्त किंमत ठरवावी अशी चळवळ सुरू झाली व तिजमुळे सरकारने हा भाव सात सेंटांनी वाढविला; आणि तो आणखी वाढविण्याची तयारी दर्शविल्यामुळे या वाढीस विशेष उत्तेजन मिळाले. नवीन सरकारी भावापलीकडेही तो जाऊन पोहोचला. तेव्हा सरकारने आपला भाव पुनः सहा सेंटांनी वाढविला व एका फडणिशी खात्याच्या जबाबदार अधिकाऱ्याने याहून दिढीने वाढविण्याची सरकारची इच्छा आहे असे जाहीर केले. तेव्हा जिकडे तिकडे एकदम भाव वाढून सर्व जगभर चांदीबाजारात व काही देशांच्या चलनपद्धतीत गडबड उडून गेली.

## मेक्सिको, हिंदुस्थान व चीन यांवरील परिणाम

चांदीच्या भावांतील चढउतारांचा परिणाम विशेष दिसून येतो तो तीन देशांत–चीन, हिंदुस्थान व मेक्सिको. मेक्सिकोत चांदीच्या खाणी बऱ्याच आहेत व तेथील चलनपद्धती जरी सुवर्णमानाची असली, तरी तेथे हिंदुस्थानातल्यासारखे मुख्य चलनी नाणे रुप्याचेच आहे; आणि विशेष गोष्ट ही की, या चलनी नाण्यातील चांदीची किंमत त्या नाण्याच्या किमतीच्या मानाने बरीच आहे. तेव्हा मे १९३५ मध्ये जेव्हा किमती वाढल्या, तेव्हा एक बाजूने जरी मेक्सिकोतील चांदी-उत्पादकांचा फायदा झाला असला, तरी उलट बाजूने मेक्सिकी सरकारपुढे मोठी अडचण उत्पन्न झाली. ती अडचण अशी की, चांदीच्या नवीन भावाने मेक्सिकी डॉलरमधील चांदीची किंमत डॉलरच्या चलनी किमतीपेक्षा अधिक झाली. म्हणजे मेक्सिकी डॉलर, नाणे म्हणून वापरण्याऐवजी तो वितळवून त्यांतील चांदी विकणे किफायतशीर होऊ लागले. यामुळे मेक्सिकी सरकारास चांदीचे डॉलर चलनातून शक्य तितके काढून घेऊन त्याच्याऐवजी केवळ कागदी नोटा व तांब्याची नाणी यांचा जोराचा प्रसार करणे प्राप्त झाले. याप्रमाणे मेक्सिकी चलनपद्धतीत अमेरिकन सरकारच्या धोरणामुळे गोंधळ उडून गेला. हिंदुस्थानात आजतागायत परिणाम झाला असेल तो एवढाच की, ज्यांच्याजवळ चांदीचा साठा असेल त्यांच्या साठ्याची किंमत वाढली. परंतु चांदीचा भाव हा असाच जर वाढत राहिला तर मात्र काही काळाने मेक्सिकी डॉलरची जी आज अवस्था झाली आहे तीच आपल्या रुपयाची होण्याचा संभव आहे; आणि मग चलनपद्धतीत फेरबदल काय व कसा करावयाचा हा सरकारपुढे फारच बिकट प्रश्न उत्पन्न होणार आहे. गेल्या दीड वर्षांत अमेरिकन धोरणाचे प्रत्यक्ष परिणाम जर विशेष कोणावर घडून आले असतील तर ते चीनवर. चीनच्या व हिंदुस्थानच्या परिस्थितीत फार मोठा फरक म्हणजे चीनमध्ये रौप्यमानपद्धती जारी आहे हा होय. यामुळे चांदीच्या भावांत जे फरक पडतात त्याचा परिणाम

चीनमधील एकंदर पदार्थांच्या किमतीच्या मानावर होतो. जसजसा चांदीचा भाव वाढतो तसतसे हे मान खालावते. आधीच जागतिक मंदीमुळे सर्व पदार्थांच्या किमती बसल्या आहेत; व त्यातच या नवीन कारणामुळे त्या आणखी खालावल्या, म्हणजे चिनी शेतकरी व व्यापारी वर्गाची किती हलाखी होईल याची कल्पना सहज करता येण्याजोगी आहे. एकीकडे इतर सर्व राष्ट्रे आपल्या चलनाची किंमत बसविण्याचा प्रयत्न करीत असता चीनमध्ये मात्र डॉलरची किंमत सारखी वाढत आहे. एवढेच नव्हे, तर किंमत अमेरिकेत वाढल्यामुळे चीनमधून अमेरिकेत चांदीची निर्गत होण्याचा क्रम सुरू झाला व चिनी सरकारास देशातील चांदी देशात राखणे जड पडू लागले. देश रौप्यमानपद्धतीचा असल्यामुळे चांदीचा पुरेसा साठा असणे तर अत्यावश्यक आहे. या अडचणीत चिनी सरकारास चांदीच्या निर्गतीवर जबर जकात बसविणे गेल्या वर्षीच भाग पडले. पण जकात जरी बसविली तरी काही अंशी जकात भरून व बऱ्याच अंशी चोरून, चांदी अमेरिकेत पाठविली जात आहेच; आणि चिनी सरकारास चलनपद्धतीविषयी व किमतीच्या मानाविषयी मोठाच पेच पडला आहे.

## चांदीच्या भावाचे भवितव्य

आज चांदीचे मोठे गिऱ्हाईक असे एकच उरले आहे, व ते म्हणजे संयुक्त संस्थानांचे सरकार. हिंदुस्थानात गेली दोन-तीन वर्षे चांदीची आयात अतोनात कमी झाली आहे व चीनमधून तर १९३४ पासून निर्गतच होत आहे. चांदीचा भाव वाढल्यामुळे व एकंदर मंदीमुळे इतर देशांतील खपही पुष्कळच कमी झाला आहे. तेव्हा संयुक्त संस्थानांच्या सरकारने चांदी मोठ्या प्रमाणावर विकत घेतली नसती तर तिचा भाव अतिशय उतरला असता. पण आज जरी चांदीची इतर सर्व गिऱ्हाइकी नाहीशी झाली असली, तरी एकट्या संयुक्त संस्थानांच्या सरकारचा चांदी विकत घेण्याचा ठरलेला कार्यक्रम एवढा अफाट आहे व त्यांच्याजवळ द्रव्यबळ इतके भरपूर आहे की, चांदीची किंमत तितकी वाढविणे हे त्या सरकारास शक्य आहे. आजचा प्रश्न एवढाच की, ही किंमत आणखी वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल किंवा नाही. गेल्या मे महिन्यात किंमत वाढविली त्यावेळेस ती वाढविण्याचा आपला इरादा आहे असे अमेरिकन फडणिशी खात्याचे एक वरिष्ठ अधिकारी म्हणाले होते. पण अलीकडे काही नवीन उपक्रम आरंभण्यात आलेला नाही. यावरून निश्चित असे अनुमान काहीच काढता येत नाही. आपल्या धोरणामुळे चीन वगैरे काही देशांस उपद्रव होत आहे असे आढळून आल्यावरून, हे धोरण अमेरिकन सरकारने बदलणे संभाव्य आहे. एके काळी अशी समजूत होती की, चांदीचा भाव वाढल्यास ज्यांनी चांदीचा संचय केला आहे अशा चिनी व हिंदी लोकांचा फायदा होऊन एकंदर जागतिक व्यापार वाढवण्यास मदत होईल. पण तसा प्रकार फारसा घडून येत असल्याचे दिसत नाही. चिनी रौप्यमानपद्धतीमुळे त्या देशात त्याच्या उलटच परिणाम होत आहे. दुसरे असे म्हणण्यात येत असे की, सरकारी साठ्यातील चांदी वाढवून त्याबद्दल नवीन नोटा काढल्या असता एकंदर चलन वाढून पदार्थांच्या किमतीही वाढतील. परंतु गेल्या दोन-तीन वर्षांच्या अनुभवावरून हे इतके सहज होण्यासारखे नाही, हे अमेरिकन सरकारासही कळून चुकले असल्याचा संभव आहे. तेव्हा आता चांदीची किंमत वाढविण्यास एकच कारण उरते. ते म्हणजे चांदीच्या खाणीवाल्यांचा फायदा वाढवावयाचा व खाणी पूर्वी बंद पडल्या आहेत त्यांना पुनरुज्जीवित करावयाचे.

प्रे० रूझवेल्ट काय करतील अथवा काय करणार नाहीत हे सांगणे फार कठीण आहे. त्यांनी गेल्या दोन-तीन वर्षांत अनेक प्रकारचे नवीन अचाट उपक्रम केले. काही गोष्टी तडीस नेल्या, काही मध्येच सोडल्या. त्यांचे धोरण हे राजकीय व आर्थिक या दोन्ही परिस्थितींवर अवलंबून असते. आज चांदीचा

भाव आणखी वाढविण्यास आर्थिक कारण जरी काहीच उरलेले दिसत नाही, तरी राजकीय वारा कसा वाहात आहे व पुढे वाहील हे सांगणे कठीण आहे. पुढील वर्षी अध्यक्षाची फेरनिवडणूक आहे व चांदी निघते ती संस्थाने डेमोक्रॅटिक पक्षाचा नेहमी पाठपुरावा करणाऱ्यांपैकी आहेत. शिवाय एन. आर. ए. संबंधीच्या वरिष्ठ कोर्टाच्या हुकुमामुळे प्रे० रुझवेल्ट यांच्या कार्यक्रमापैकी मोठी महत्त्वाची बाजू लंगडी पडल्यासारखी आहे. तेव्हा चलनविषयक धडपड सुरू ठेवण्याचा रुझवेल्ट यांनी निश्चय केल्यास चांदीच्या भावात आणखीही वाढ होईल. आणि तसे न झाल्यास वाढला आहे हाही भाव काहीसा इतक्यातच घटेल. कारण आजची वाढ ही केवळ संयुक्त संस्थानांच्या सरकारने केलेल्या हालचालीमुळे व पुढे त्याजकडून आणखी उपक्रम होईल या अपेक्षेमुळे झालेली आहे, व या भावाचे भवितव्यही केवळ त्या सरकारवरच अवलंबून आहे.

*लोकशिक्षण* ६ : २ ऑगस्ट १९३५ पृ० ६०-६७.

☆

# ७ . . राष्ट्रीय औद्योगिक पुनरुज्जीवनाचा कायदा

अमेरिकन संयुक्त संस्थानांतील वरिष्ठ न्यायमंदिराने National Recovery Act (राष्ट्रीय औद्योगिक पुनरुज्जीवनाचा कायदा) ऊर्फ N. R. A. संबंधी दिलेला निर्णय हा प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या एकंदर पुढील धोरणाच्या दृष्टीने फारच महत्त्वाचा समजला पाहिजे. या निकालाने सबंध N. R. A. कायदाच बेसनदशीर ठरविला असून यात अनुसरलेली विचारसरणी लक्षात घेता संयुक्त सरकारची कार्यमर्यादा काही दिशेने यापुढे पुष्कळच संकुचित होण्याचा संभव दिसत आहे. वरिष्ठ न्यायमंदिराने N. R. A. बेकायदेशीर ठरविण्याची कारणे मुख्यतः दोन नमूद केली आहेत. एक तर या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता काँग्रेसने अध्यक्षांना व कायद्यान्वये स्थापिलेल्या अधिकाऱ्यांना (Code Authorities) इतके व्यापक अधिकार दिले आहेत की, बऱ्याच अंशी याविषयी कायदे करण्याचे काम त्यांच्यावर सोपविल्यासारखे झाले आहे. वरिष्ठ न्यायमंदिराच्या मते काँग्रेसला आपले कायदे करण्याचे काम दुसऱ्या कोणावर असे सोपविता येत नाही. दुसरे कारण हे की, संयुक्त संस्थानांत संस्थानी सरकार आणि संयुक्त सरकार यांची अधिकार-विभागणी मूलभूत राज्यघटनेतच स्पष्ट लिहून ठेविली आहे. या विभागणीप्रमाणे संयुक्त सरकारास फक्त संस्थानासंस्थानांमधील व्यापाराचे नियंत्रण करण्याचा अधिकार पोचतो. कोणत्याही संस्थानातील अंतर्गत व्यापाराचे नियंत्रण करणे हे त्या संस्थानच्या सरकारचे काम आहे. पण N. R. A. प्रमाणे सर्वच आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण होत असल्यामुळे वरिष्ठ न्यायमंदिराच्या मते हा कायदा मंजूर करण्याने संयुक्त सरकारच्या अधिकारमर्यादेचे उल्लंघन होत आहे, आणि त्याअर्थी तो कायदा मूलघटनेविरुद्ध, व म्हणून बेकायदेशीर आहे.

N. R. A. म्हणजे प्रे० रूझवेल्ट यांच्या कार्यक्रमातील अत्यंत महत्त्वाचे अंग होय. किमती वाढविणे व बेकारी कमी करणे यांकरिता रूझवेल्ट यांनी योजिलेले हे मुख्य अस्त्र होते. खुद्द N. R. A. व्यापक स्वरूपाचा असून त्याने उद्योगधंद्याचे नियंत्रण सर्व बाजूंनी करण्याचा प्रयत्न केला होता. धंदेवाले व सरकार, धंदेवाले व गिऱ्हाईक, मालक व मजूर आणि धंदेवाल्यांचे परस्परांशी संबंध या सर्वांचे एका विशिष्ट हेतूने नियंत्रण करण्याचा तो उपक्रम होता. मजुरांचे दर वाढले असता एकंदर मालाची गिऱ्हाइकी वाढेल व धंद्यास ऊर्जितावस्था येईल; आणि कामाचे तास कमी केले म्हणजे जास्त मजूर कामास लागून बेकारी कमी होईल, अशी प्रे० रूझवेल्ट यांची विचारसरणी होती. पण मजुरांचे दर वाढविणे व कामाचे तास कमी करणे या गोष्टीला आधीच डबघाईस आलेले धंदेवाले कबूल कसे होणार ? तेव्हा त्यांस आपसांतील चढाओढ कमी करून सांघिक मार्ग सुकर करून देण्याचे आमिष दाखविण्यात आले.

## महत्त्वाचा व बोधप्रद प्रयत्न

प्रथमपासूनच खाजगी प्रयत्न व वैयक्तिक स्वातंत्र्य यांजवर संयुक्त संस्थानांत भर दिलेला आहे; आणि आर्थिक व्यवहारात चढाओढ कायम राखणे हे सरकारचे मुख्य कर्तव्य समजले गेलेले आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणास जाण्यास शक्य तर दोन लोहमार्ग असावे, अशी विचारसरणी या देशात आजवर प्रचलित होती. यामुळे व्यापारी किंवा कारखानदार यांनी आपसात संगनमत करून किमती ठरविण्याच्या कोणत्याही प्रकारच्या सांघिक प्रयत्नाविरुद्ध संयुक्त संस्थानात फार कडक कायदे केलेले आहेत. N. R. A. च्या नियंत्रणाखाली येणाऱ्या उद्योगधंद्यांस या कायद्याच्या अमलातून वगळण्याचे प्रे० रूझवेल्ट यांनी कबूल केले. तसेच मंदीच्या दिवसात कारखानदारांचा एकमेकांशी बऱ्यावाईट प्रकारे निकराची चढाओढ करून किमती सारख्या बसविण्याकडे जो कल असतो त्यास आळा घालण्यासाठी, प्रत्येक धंद्याकरिता निराळी अधिकारीसंस्था निर्मून तिजकडे या सर्व प्रकारच्या चढाओढीचे नियंत्रण करण्याचे अधिकार देण्याचीही योजना केली; आणि याच अधिकारीसंस्थेला वेळेस धंद्यांतील उत्पाद्य वस्तूंचे बाजारभाव ठरविण्याचे काही अधिकार देण्यात आले. सर्व योजनेचा उद्देश हाच की, बेकारी कमी होऊन संघास ऊर्जितावस्था यावी. अर्थात हे काम फारच अफाट स्वरूपाचे होते. प्रत्येक धंद्यातील बहुसंख्याक उत्पादकांस एके ठिकाणी आणावयाचे, त्यांतून एक अधिकारीसंस्था निर्माण करावयाची, चढाओढ नियंत्रित करण्याचे व किंमत ठरविण्याचे निरनिराळे मार्ग निश्चित करावयाचे, मजुरीचे किमान दर, काम करण्याचे कमाल तास, व्यक्तिशः मजूर व मजूरसंघ आणि मालक यांचे परस्पर संबंध सलोख्याचे ठेवावयाचे, आणि हे सर्व सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेखाली करून घेऊन शिवाय गिऱ्हाईक कारखानदारांकडून लुबाडले जाणार नाही अशी काळजी घ्यावयाची, अशा तऱ्हेचा हा व्यापक प्रयत्न होता. या प्रयत्नात आजपावेतो रूझवेल्ट यांस कोणत्या बाजूने व कितपत यश आले याचा विचार येथे प्रस्तुत नाही, काही झाले तरी हा प्रयत्न फार महत्त्वाचा व फार बोधप्रद होण्यासारखा होता हे निःसंशय. पण या सर्व इमारतीचा पायाच वरिष्ठ न्यायमंदिराच्या निर्णयाने ढासळत आहे.

## कायद्याचे संभाव्य परिणाम

आता पुढील प्रश्न हा की, यातील कोणता भाग टिकतो व कोणता पडतो. पुन्हा इतक्यात फार मंदीचे दिवस आले नाहीत तर कारखानदारांच्या परस्पर सहकार्याविषयीची योजना बऱ्याच अंशी टिकून राहील, अशी सर्वसाधारण अटकळ आहे. कारण कायद्यान्वये स्थापिलेल्या अधिकारीसंस्थेस जरी सनदशीर स्थान नसले, तरी चढाओढ कमी करणे व बाजारभाव ठरविणे यांसंबंधी जुन्याच पद्धतीने खाजगी प्रयत्न चालू राहण्यास काहीच हरकत नाही. मुद्दा एवढाच की, सरकारी अधिकाऱ्यांचे नियंत्रण त्यांजवर आता किती ठेवता येईल व तसे ठेवता न आल्यास गिऱ्हाइकास न लुबाडण्याबद्दल खबरदारी कोण घेणार? मजुरांच्या बाजूने हल्लीची व्यवस्था टिकण्याचा मात्र फारच कमी संभव दिसतो. किमान दर, कमाल मर्यादित तास व मजूरसंघास मान्यता देणे, या सर्व गोष्टी अमेरिकन कारखानदारांस अत्यंत नावडत्या अशा आहेत. सरकारी वजनामुळे व N. R. A. च्या द्वारे प्राप्त झालेल्या इतर फायद्यांमुळे त्या कबूल केल्या गेल्या होत्या. तेव्हा या बाबतीतील नियंत्रण धुडकावून दिले जाईल अशी अपेक्षा आहे. जनलज्जेस्तव हे जरी एकदम न झाले, तरी मजुरांस मिळालेले हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न हळूहळू सर्व दिशांनी होणार हे निश्चित दिसते; व असे होऊ लागले म्हणजे आधीच मजूर व कारखानदार यांमधील उत्पन्न झालेली तेढ वाढून संपाची लाट संयुक्त संस्थानांत पसरण्याचा संभव दिसत आहे.

वरिष्ठ न्यायमंदिराच्या निकालामुळे केवळ N. R. A.च बेसनदशीर ठरतो असे नव्हे, संयुक्त सरकारने प्रे० रूझवेल्ट यांच्या कारकीर्दीत हाती घेतलेल्या इतर अनेक योजनांसही त्यामुळे बाध येऊ पाहात आहे.

N. R. A. हा जसा औद्योगिक पुनरुज्जीवनाचा उपाय म्हणून योजिला त्याप्रमाणे A. A. A. (Agricultural Adjustment Act) म्हणजे शेतकी व्यवस्थेसंबंधीचा कायदा करून शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्याची प्रे० रूझवेल्ट यांनी योजना केली. सर्वच प्रमुख पिकांच्या किंमती उतरल्या व शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होऊ लागले. तेव्हा शेतकऱ्यांनी आपली काही जमीन पडीत टाकून पिकांची पैदास कमी करून किमती वाढविण्याचा प्रयत्न करावा व पडीत टाकलेल्या जमिनीवरील नुकसानभरपाईबद्दल संयुक्त सरकारने त्यांस खंडणी द्यावी, अशी तरतूद A. A. A.या कायद्यात करण्यात आली होती. हा खंडणीचा पैसा, कच्चा माल घेऊन तो सडणे, दळणे, साफ करणे, दाबून गठ्ठे बांधणे इत्यादी क्रिया करणाऱ्या लोकांवर एक कर (Processing Tax) लादून उभारण्यात आला होता. हा कर देण्याचे काहींनी नाकबूल केले व वरिष्ठ न्यायमंदिराने N. R. A. विषयक खटल्यात स्वीकारलेली भूमिका लक्षात घेऊन तेथील कनिष्ठ न्यायमंदिरांनी तो बेकायदेशीर आहे असा निकाल नुकताच दिला. कारण, सबंध देशातील शेतकी उत्पादनाचे नियंत्रण करणे हा उद्देश या कराच्या बुडाशी आहे व कोणत्याही संस्थानातील व्यवहारावर अशा प्रकारे नियंत्रण घालण्याचा हक्क संयुक्त सरकारास नाही.

या निकालामुळे उत्पन्न झालेली एकंदर परिस्थिती अत्यंत चमत्कारिक आहे. आर्थिक व्यवहाराचे नियंत्रण करणारे व्यापक कायदे करणे आता संयुक्त सरकारास अशक्य झाले आहे. उदाहरणार्थ, मजुरीचे तास व दर, बेकार-वेतन, कारखान्यांसंबंधी कायदे, या सर्व गोष्टी केवळ निरनिराळ्या संस्थानांच्या अधिकारकक्षेतील ठरल्या गेल्या.

असल्या महत्त्वाच्या गोष्टींचे नियंत्रण संयुक्त संस्थानांतील निरनिराळ्या ४८ कायदेमंडळांनी करावयाचे, आणि त्यात एकरूपता आणण्यास काहीच सवड राहू नये, हा मोठाच अनवस्थाप्रसंग समजला पाहिजे. एकंदर आधुनिक प्रवृत्तीच्या हे अगदी विरुद्ध झाले. पण अमेरिकेत मूलभूत राज्यघटनेपुढे शहाणपण नाही. वरिष्ठ न्यायमंदिराच्या निकालानंतर दिलेल्या एका मुलाखतीवरून प्रे० रूझवेल्ट हे मूलघटनेत यासंबंधी काहीतरी दुरुस्ती घडवून आणण्याचा प्रयत्न करतील, अशी अटकळ आहे. पण अशी दुरुस्ती करणे हे फार बिकट व दीर्घसूत्री काम आहे. तेव्हा वरिष्ठ न्यायमंदिराच्या निकालाने आणखी काही वर्षे तरी संयुक्त सरकारची एका दिशेने बरीच कुचंबणा केली, हे निःसंशय होय.

*लोक शिक्षण* ६ : ३ सप्टेंबर १९३५ पृ० १६०-१६३.

☆

# ८ . . सार्वराष्ट्रीय आर्थिक संबंधांची सद्यःस्थिती

राष्ट्रसंघाच्या आर्थिक मंडळामार्फत 'सार्वराष्ट्रीय आर्थिक संबंधांची सद्यःस्थिती' या विषयावर एक लहानसे चोपडे नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. यात घेतलेला सद्यःस्थितीचा आढावा इतका विविध माहितीने युक्त व उद्बोधक आहे की, त्यातील मजकुराच्या अनुरोधाने काही विचार या लेखात मांडण्याचे आम्ही योजिले आहे. या चोपड्यात विचारात घेतलेला मुख्य विषय जगातील प्रचलित मंदी आणि निरनिराळ्या राष्ट्रीय सरकारांचे तद्विषयक धोरण हाच आहे. कारण, आजच्या परिस्थितीचा विशेष हा आहे की, व्यापारी व औद्योगिक भरभराटीस सुरुवात होण्यास इतर सर्व गोष्टी अनुकूल असल्या तरी बहुतेक राष्ट्रांतील सरकारी धोरण या भरभराटीच्या आड येत आहे. प्रत्येक राष्ट्राचे सरकार आपल्या परीने आपल्या देशाची व्यापारी व औद्योगिक वाढ होण्याकरिता खटपट करीत आहे. पण ही सर्व खटपट इतकी एकांगी आहे की, परिणामी जगाच्या भरभराटीचा मार्ग खुंटला गेला आहे.

## जागतिक मंदीचे कारण

जगाच्या व्यापाराचे उतरते प्रमाण हेच जगातील मंदीचे मुख्य कारण व मुख्य गमक होय; आणि हा व्यापार वाढल्याशिवाय कोणत्याच देशाची खरी भरभराट होणे शक्य नाही, यावर या राष्ट्रसंघाच्या चोपड्याचा मुख्य कटाक्ष आहे. प्रत्येक राष्ट्रीय सरकारचा जमाखर्च पाहिला तरी त्यावर जगातील व्यापाराच्या उतरत्या प्रमाणाचा परिणाम झाल्याचे दिसून येईल. जगातील मंदीच्या काळात बहुतेक सरकारांना आपल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करणे अशक्य झाले आहे. परराष्ट्रीय व्यापार कमी झाला म्हणजे त्याचा परिणाम अंतर्गत व्यापारावर व देशाच्या उद्योगधंद्यांवर होतो, व्यापार कमी झाला म्हणजे आगगाड्यांचे उत्पन्न घटते व त्यात फायदा उरेनासा होतो, परकी प्रवासी देशांत येईनासे होतात, निरनिराळ्या उद्योगधंद्यांस व विशेषतः शेतकी व्यवसायास प्रत्यक्ष मदत करण्याची नवीन जबाबदारी सरकारावर पडते, परराष्ट्रांतून येणारे व्याज अथवा त्यातून मिळणारे कर्ज हे कमी झाल्यामुळे सर्व प्रकारच्या भांडवलवाल्यांना अडचणी उत्पन्न होऊन त्यांची कर भरण्याची कुवत कमी होते. सारांश, निरनिराळ्या प्रकारांनी सरकारचे उत्पन्न कमी होते व खर्च वाढतो. तेव्हा प्रत्येक सरकाराने जरी अगदी आपल्यापुरता संकुचित विचार केला तरी जगाच्या व्यापाराची वाढ झाल्याशिवाय तरणोपाय नाही, असेच त्यास प्रायः दिसून येईल.

जगाच्या व्यापाराची वाढ न होण्यास आज जी दोन मुख्य कारणे आहेत ती म्हणजे चलनविषयक अस्थिरता व प्रत्येक राष्ट्राने परकी व्यापारावर लादलेले निर्बंध. बहुतेक सर्व राष्ट्रांनी सुवर्णमानपद्धतीचा आता त्याग केला आहे. त्यामुळे हुंडणावळीच्या दराची काही शाश्वती राहिली नाही. आपला

हुंडणावळीचा दर कमी करून व्यापारासंबंधी तात्पुरता फायदा करून घेण्याचा प्रत्येक राष्ट्र प्रयत्न करील की काय, अशी इतरांस सारखी भीती वाटत असते; आणि म्हणून चलन व हुंडणावळ यासंबंधीच्या सर्व परदेशी व्यवहारावर नियंत्रण घालण्याचा कित्येक राष्ट्रांनी उपक्रम केला आहे. म्हणजे जगाच्या व्यापारात आणखी एक नवीन अडथळा उत्पन्न झाला. कारण, व्यापाऱ्यांनी जरी मालाची देवघेव केली तरी त्यांस परकीयांना देण्यास अथवा त्यांजकडून वसूल करण्यास राष्ट्रीय सरकार हुंडणावळ पुरेशी मिळू देईल अशी खात्री नाहीशी झाली. या हुंडणावळीच्या नियंत्रणास सुरुवात झाल्यामुळे साहजिकच राष्ट्राराष्ट्रांतील हुंडणावळ देण्याबाबत दुहेरी करार आवश्यक झाले. म्हणजे एकमेकांच्या व्यापाऱ्यांस एकमेकांत दरवर्षी कोणत्या रकमेपर्यंत व्यापार करू द्यावयाचा याबद्दल करारमदार होऊ लागले. मालाच्या आयातनिर्यातीबरोबर चलन-हुंडणावळविषयक नवीन व्यवस्था करणे प्रत्येक व्यापाऱ्यास प्राप्त झाले, व निरनिराळ्या राष्ट्रांशी करण्याच्या व्यापाराच्या किंमतीची कमाल मर्यादा आगाऊ ठरलेली असल्यामुळे ही रक्कम निरनिराळ्या प्रकारच्या व्यवहारांत व व्यापारांत वाटून देण्याकरिता स्वतंत्र सरकारी खाती निर्माण करणे भाग पडले. याप्रमाणे सर्वच बाजूंनी नियंत्रणे व निर्बंध वाढले आणि त्यामुळे परदेशी व्यापाराचा साहजिकच अधिकाधिक संकोच होऊं लागला. ज्या राष्ट्रांवर परराष्ट्रीय कराचा बोजा विशेष होता, त्यांना हुंडणावळविषयक अडचणी फार भासल्या. कर्जफेड करावयाची व कर्जावरील व्याज भागवावयाचे या गोष्टी इतर देशात आपला माल विकून आलेल्या पैशांतूनच करणे केवळ शक्य आहे. हिंदुस्थान-चीनसारखा खाजगी सुवर्णसंचय किंवा रौप्यसंचय बहुतेक राष्ट्रांनी केलेला नसतो. तेव्हा जर इतर राष्ट्रांनी आपला माल विकत घेतला नाही तर कर्जफेड करण्यास पैसा आणण्याचा मार्ग इतर नाही. अशा स्थितीत व्याज अथवा कर्ज यांचे हप्ते चुकविणे अपरिहार्य झाले व नवीन कर्ज उभारणे अशक्य झाले. ज्या राष्ट्रांची पत अशा रीतीने कमी झाली त्यांच्या हुंडणावळीचे दर घसरू लागले व त्यामुळे त्यांनी सर्व हुंडणावळीच्या व्यवहारावर कडक नियंत्रण घालून आपली चलन-हुंडणावळपद्धती सावरण्याचा प्रयत्न केला. हल्लीच्या मंदीच्या काळातून पुनः डोके वर काढणे असल्यास परकीय चलनविषयक व्यवहारासंबंधी निर्बंध कमी होणे आवश्यक आहे. पण हे सर्व, याविषयी राष्ट्राराष्ट्रांचे ऐकमत्य झाल्याशिवाय होणार नाही. सुवर्णमानपद्धतीचा त्याग बहुतेक राष्ट्रांनी आता केलेला आहे; व ज्यांनी सुवर्णमानपद्धती पूर्णपणे सोडली नाही अशांपैकी काही राष्ट्रांनी निरनिराळ्या प्रकारांनी आपल्या चलनाची किंमत कमी केली आहे. जे पूर्वीच्या पद्धतीस व दरास चिकटून राहिले त्यांची व्यापारी परिस्थिती आज सर्वांत वाईट आहे; व गेल्या दोनतीन वर्षांत जी थोडीबहुत व्यापाराची वाढ झाली आहे ती जवळजवळ सर्व सुवर्णमानपद्धतीचा त्याग करून हुंडणावळीचे दर उतरविणाऱ्या राष्ट्रांच्या व्यापारात झाली आहे. यामुळे सुवर्णमानपद्धतीचा पुन्हा स्वीकार करण्याविषयी या राष्ट्रांची वृत्ती साहजिकच साशंक आहे. गेल्या वर्ष-सहामाहीत सुवर्णमानपद्धती पूर्ववत जगभर प्रस्थापित करणे जरूर आहे, असे सर्व प्रमुख राष्ट्रांतील बहुतेक अर्थशास्त्रज्ञ व व्यापारी मंडळींचे मत बनू लागले आहे हे खरे; आणि या प्रकरणी इंग्लंड, काही युरोपीय राष्ट्रे व संस्थाने यांच्या दरम्यान निमसरकारी वाटाघाटी सुरू आहेत. पण इतक्यात यातून काही निष्पन्न होईल असे दिसत नाही. कारण, या सर्व विचारविनिमयावरून दोन पक्षांत मतभेद बराच तीव्र आहे असे उघड झाले. सुवर्णमानपद्धतीस चिकटून राहिलेल्या फ्रान्स वगैरे राष्ट्रांचे मत असे की, या पद्धतीचा पुनः स्वीकार इतर राष्ट्रांनी शक्य तितक्या लवकर करावा, म्हणजे आपोआप इतर परिस्थिती सुधारू लागेल. याच्या उलट इंग्लंडचे मत म्हणजे सुवर्णमानपद्धती जारी करणे हे जरी आपणांस तत्त्वतः कबूल असले, तरी तसे करण्यापूर्वी एक तर तिची घडी पुनः बिघडू नये म्हणून पूर्वव्यवस्था करणे व चलनविषयक सुधारणेचा खरोखर लगेच उपयोग व्हावा म्हणून प्रथम व्यापारी निर्बंध सर्व राष्ट्रांनी कमी करणे, या गोष्टी अवश्य झाल्या पाहिजेत.

## व्यापारातील भ्रामक वाढ

इंग्रज व इतर तज्ज्ञांच्या मते चलनविषयक सुधारणा होण्यापूर्वी व्यापारी निर्बंध कमी करणे व सुवर्णमानपद्धतीच्या पुढील स्वरूपाविषयी काही रूपरेखा निश्चित करणे आवश्यक असल्यामुळे, व्यापारी निर्बंध कमी करण्याची शक्यता हाच खरा महत्वाचा मुद्दा उरतो. आज इतके निर्बंध असूनही काही देशात अंतर्गत व परदेशी व्यापाराची वाढ दिसूनयेत आहे हे खरे. पण बहुतांशी ही वाढ भ्रामक आहे, व कसेही असले तरी या वाढीच्या प्रवृत्तीसही लवकरच आळा बसेल असे दिसत आहे.

ही वाढ सर्व देशात सारखीच दृष्टोत्पत्तीस येत नसून ती काही देशातच दिसून येते. शिवाय या वाढीची मुख्य कारणे म्हणजे शस्त्रास्त्रांची व युद्धसामग्रीची वाढती मागणी आणि सार्वजनिक इमारती, रस्ते इत्यादींवर काही देशांतील सरकारांनी केलेला बुद्धिपुरस्सर खर्च ही आहेत. या दोन प्रकारच्या वाढत्या मागणीमुळे काही धंद्यांस तेजी आली आहे. ही तेजी लोखंड, पोलाद, रसायने, इमारतकाम इत्यादी महत्त्वाच्या धंद्यांत झाल्यामुळे सकृद्दर्शनी हिचे महत्त्व बरेच वाटते. परंतु या भरभराटीचा पाया फार डळमळीत आहे. नेहमीच्या तेजीचे कारण सर्व प्रकारच्या मालास सर्वसाधारण वाढती गिऱ्हाइकी हे असते आणि त्याच्या बुडाशी सुधारलेली आर्थिक परिस्थिती असते. पण ह्या नवीन मागणीच्या बुडाशी असलेला वाढता खर्च बहुतेक राष्ट्रीय सरकारे कर्ज काढून भागवीत आहेत. या कर्जाचा बोजा अर्थात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने सामान्य नागरिकांवरच पडणार आणि परिणामी परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडणार, हे उघड आहे. काही देशांत–विशेषतः इंग्लंड आणि स्टर्लिंगशी चलनविषयक संबंधांनी संलग्न असलेले काही देश यांत वर दर्शविलेल्या प्रकारच्या फारशा खर्चावाचूनही व्यापार वाढीस लागलेला आहे. परंतु या वाढीला निश्चित मर्यादा आहे. इंग्लंड हे तर पूर्वीपासून परकी व्यापारावर अवलंबून, आणि ब्रिटिश व्यापाराची वाढ होऊन त्या देशातील उद्योगधंदे भरभराटीस येणे हे केवळ अंतर्गत मागणीच्या जोरावर घडून येणे शक्य नाही.

## आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नवे स्वरूप

सध्या निरनिराळ्या राष्ट्रांनी अवलंबिलेल्या नियंत्रणात विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट ही की, परदेशी व्यापाराचे नियंत्रण आज फार बारकाईने व तपशीलवार केले जात आहे. आयात अथवा निर्यात मालावर केवळ जबर जकाती लादून हे नियंत्रण केले जात नाही, तर काही देशांत वर दर्शविल्याप्रमाणे प्रत्येक देशाशी किती रकमेपावेतो व्यापार करावयाचा हे ठरविले जाते; आणि शिवाय सर्व महत्त्वाच्या गोष्टींची प्रत्येक देशातून आयात किती करावयाची हेही ठरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. १९२९ साली जकातीशिवाय दुसऱ्या प्रकारचे निर्बंध जवळजवळ अस्तित्वातच नव्हते असे म्हटले तरी चालेल. पण जगातील व्यापारी मंदीस सुरुवात झाल्यावर सार्वराष्ट्रीय अशी एकसारखी उपाययोजना कोणतीच होऊ शकली नाही. तेव्हा प्रत्येक राष्ट्राने आपापल्यापुरता विचार करण्यास आरंभ केला. कर्जदार राष्ट्रांस नवीन कर्ज मिळेनासे झाले व जुन्या कर्जाचा बोजा वाहण्यास त्यांच्यात सामर्थ्य उरले नाही. तेव्हा त्यांस हरतऱ्हेने आपल्या मालाची निर्गत वाढविणे व परकी मालाची आयात कमी करणे आवश्यक झाले. पण सावकार राष्ट्रांनीही ऋणकोंकडून येणारे उत्पन्न घटणे व पुढील परिस्थितीसंबंधी अनिश्चितता, या दोन गोष्टींमुळे आपला परकी मालाच्या आयातीबाबतचा हात आखडता घेतला. त्यातच चलनविषयक भानगडी उत्पन्न झाल्या. अशा परिस्थितीत जर्मनीसारख्या राष्ट्राने आपले कर्ज अमुक अमुक अटींवरच हप्तेबंदीने फेडण्यास आपण तयार आहो असे जाहीर केले. आपला माल विकत घेतल्याशिवाय दुसऱ्याचे कर्ज फेडणे शक्य नाही, असे म्हणून जे राष्ट्र

मालाच्या आयातनिर्यातीच्या प्रमाणासंबंधी करार करण्यास तयार असेल त्याचे कर्ज विशेष लवकर फेडण्याची तत्परता जर्मनीने दाखविली. याचेच अनुकरण इतर ऋणको राष्ट्रांनी केले. 'चोराच्या हातची लंगोटी' या न्यायाने धनकोंनी त्यांतल्या काय बऱ्या अटी मिळतात हे पाहण्याचा प्रयत्न केला. झाले, यापुढेही राष्ट्राराष्ट्रातील व्यापार जुन्या पद्धतीवर चालू न राहाता प्रत्येक राष्ट्राशी केलेल्या निरनिराळ्या करारानुसार तो बद्ध होऊ लागला. हे सर्व करार दोन दोन राष्ट्रांमधील आहेत. म्हणजे या करारांत प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या प्रत्येक विशिष्ट राष्ट्राशी होणाऱ्या आपल्या आयातनिर्यातीचा मेळ घालण्याचा प्रयत्न करीत असते. नेहमी कोणत्याही देशाच्या एकंदर सर्व आयातीत व निर्गतीत साधारण मेळ असतो, पण प्रत्येक राष्ट्राशी असा निरनिराळा मेळ घालीत बसल्यास जगाच्या व्यापारास फारच निराळे वळण लागून तो संकुचित व्हावा हे साहजिक आहे. आपणाला लागणारा माल जेथून जितका मिळतो तेथेच व तितकाच आपला माल खपतो हे असंभाव्य, आणि असे मुद्दाम घडवून आणण्याचा प्रयत्न केला तर दोघांचीही गिऱ्हाइकी कमी होणारच.

## स्वयंपूर्णतेच्या दिशेने वाटचाल

जसजशी मंदी वाढत चालली तसतसे शक्य तितके स्वयंपूर्ण बनण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्र करू लागले; व राष्ट्रांचा व्यक्तिशः विचार केल्यास इतर राष्ट्रे निर्बंध लादून परकी मालावर बहिष्कार घालू लागली तर कोणा एका राष्ट्रालाही तोच मार्ग पत्करणे श्रेयस्कर होते. आयात-निर्गत मालाचे प्रमाण (quotas), इतर राष्ट्रांशी हुंडणावळीसंबंधी विशेष ठराव (clearing agreements) इत्यादी निर्बंधाचे नवीन नवीन प्रकार एकदा एका राष्ट्राने अमलात आणल्याबरोबर ते लवकरच सगळीकडे प्रचारात येऊ लागले. परिस्थिती बिकट आली म्हणून कोणी काहीतरी तात्पुरती उपाययोजना करावी, व दुसऱ्याने केले म्हणून स्वसंरक्षणार्थ आपणासही तसे करणे भाग आहे असे म्हणून इतरांनी त्याचे अनुकरण करावे, असा हा सर्व प्रकार घडून आला आहे. आताही सर्वांनी मिळून बंधने कमी करण्याचा प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे असा जरी सर्व विचारी माणसांचा अभिप्राय असला, तरी यास सुरुवात कोणी व कशी करावयाची हा एक बिकट प्रश्न आहे. कारण, प्रत्येक राष्ट्रास असेच वाटणार की, आपण निर्बंध कमी करून इतरांनी मात्र ते कायम ठेविले तर आपले नुकसान अधिकच होणार. शिवाय निर्बंध कमी करावे असे जरी तत्त्वतः सर्वांनी कबूल केले तरी हे प्रत्यक्ष घडवून आणणे अतोनात कठीण आहे. गेल्या पाच-सहा वर्षांत प्रत्येक राष्ट्राने स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न केल्यामुळे सर्व प्रकारचे नवीन उद्योगधंदे जेथे तेथे स्थापिले गेले आहेत. या उद्योगधंद्यांचे जीवित केवळ व्यापारी निर्बंधांवर अवलंबून आहे. अर्थात या सर्वांस आपल्यापुरते तरी हे निर्बंध निघू नयेत असे वाटते व त्याकरिता ते आटोकाट खटपट करीत असतात. लॉर्ड नफील्ड (मॉरिस मोटर कंपनीचे मालक) हे एकदा सार्वजनिक रीत्या इंग्रजी पोलाद कारखानदारांना ते संरक्षक जकाती मागतात म्हणून 'आळशी लुटारू' असे संबोधतात, तर दुसऱ्या प्रसंगी वसाहतींत अमेरिकन मोटरींचा खप होऊ देण्याबद्दल उपाययोजना करणे सरकारचे कर्तव्य आहे, असे बजावून सांगतात. कारखानदार व व्यापारी एकमेकांशी संगनमत करून वाटेल ते निर्बंध लादून घेतात व सामान्य जनतेचे हित मात्र कोणी पाहात नाही, हा अनुभव सार्वत्रिक आहे. स्वार्थसाधू व्यापारी व कारखानदार यांचे वजन जोपावेतो सरकारावर आहे तोपावेतो दूरवर विचार करून उदार धोरण स्वीकारणे अशक्य आहे.

राष्ट्रसंघाच्या चोपड्यात स्वीकारिलेली विचारसरणी येणेप्रमाणे असून ती अर्थात बहुतांशी निर्दोष आहे. दोन वर्षांपूर्वी यात मांडिलेले सिद्धांत बऱ्याच राजकारणी पुढाऱ्यांनी मान्य केले नसते, पण अलीकडे आलेल्या कटू अनुभवामुळे निरनिराळ्या राष्ट्रांची एकजुटीने काम करण्याची तयारी बरीच

दिसून येऊ लागली होती. या कार्यात मोठ्या व प्रमुख राष्ट्रांची जबाबदारी इतरांपेक्षा अर्थात अधिक आहे. धनको व संपन्न गिऱ्हाईक राष्ट्र या दुहेरी नात्याने संयुक्त संस्थानांवर मदत करण्याची पात्रता व जबाबदारी विशेष आहे. इंग्लंड हे परवापावेतो पूर्णपणे निर्बंधरहित राष्ट्र होते. त्याने १९३१ साली निर्बंधक जकातीचा स्वीकार केला व १९३३ साली ओटावा येथे आपले साम्राज्य स्वयंपूर्ण करण्याचा घाट घातला. या दोन्ही गोष्टींमुळे इतर राष्ट्रांच्या व्यापारावर वाईट परिणाम होऊन त्यांच्या निर्बंधक धोरणास उत्तेजन मिळाले. शिवाय चलनविषयक धोरणाच्या दृष्टीने इंग्लंडचे फार महत्त्व आहे. इंग्लंडच्या स्टर्लिंग चलनाच्या हालचालीवरून आपले चलनविषयक धोरण आखणारी राष्ट्रे फार आहेत. एकंदर स्टर्लिंगसमूहाचा परकी व्यापार एकंदर सार्वराष्ट्रीय व्यापाराच्या तिसऱ्या हिश्शाहून अधिक आहे, असा अंदाज केला जातो. तेव्हा काहीही नवीन उपक्रम करणे हे इंग्लंडच्या सहकार्यावाचून होणे नाही. फ्रान्स हे सुवर्णमानपद्धतीचे केंद्र असे महत्त्वाचे राष्ट्र. या तीन राष्ट्रांनी तरी एकजुटीने काही प्रयत्न केला तरच हल्लीच्या चमत्कारिक परिस्थितीतून वाट निघणे शक्य होईल. काही महिन्यांपूर्वी या सर्व गोष्टी घडून येऊ शकतील अशी थोडी तरी आशा करण्यास जागा होती. पण आता लढाईची नवी वावटळ सुरू झाल्यापासून ही आशा पूर्णपणे लयास गेली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. लढाई बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पेटल्यास युद्धसामग्रीला मागणी फार मोठी येऊन आर्थिक व्यवहारास नवीनच वळण लागेल. पण तसे न झाल्यास हल्लीचीच अर्धवट परिस्थिती आणखी बराच वेळ टिकेल असा अंदाज दिसत आहे.

*लोकशिक्षण* ६ : ६ डिसेंबर १९३५ पृ० ३९९-४०४.

☆

# १ . . इंग्लंड व हिंदुस्थान येथील घरबांधणीमधील वाढ

अलीकडे चारपाच वर्षांत हिंदुस्थानातील कोणत्याही मोठ्या शहरात सहज नजरेत भरणारी गोष्ट म्हणजे नवीन घरांची झपाट्याने होत असलेली वाढ ही होय. ही प्रवृत्ती आपल्याच देशात दिसून येते असे नाही. इंग्लंडमध्ये तर राहत्या घरांची ही वाढ एवढ्या मोठ्या प्रमाणावर गेल्या तीन-चार वर्षांत झाली की, अलीकडे दोन-तीन वर्षांत झालेल्या आर्थिक ऊर्जितावस्थेतचे ही वाढ हे एक मुख्य कारण समजले जाते; व ही वाढ अशीच पुढे टिकण्यावर भरभराट टिकणे अवलंबून आहे असेही म्हणतात. तीन-चार महिन्यांपूर्वी 'इकॉनॉमिस्ट' पत्रात या विषयावर काही लेख प्रसिद्ध झाले होते. त्यांतील प्रमुख मुद्द्यांचा गोषवारा पुढे दिला आहे.

## इंग्लंडमधील घरबांधणीच्या वाढीची कारणे

१९२९ सालापूर्वी इंग्लंडमध्ये स्थूलमानाने पावणेदोन लक्ष घरे दरवर्षी बांधली जात असत. १९२९ सालानंतर इतर व्यवहारास मंदी आली तरी, नवीन घरांची संख्या कमी झाली नाही. १९३१च्या पुढे ती जोराने वाढू लागली. १९३१ ते १९३५ साली अजमासे दरवर्षी अडीच लक्ष घरांपर्यंत ही सरासरी गेली व १९३३-३४ साली तर हा आकडा जवळजवळ तीन लक्षांपर्यंत जाऊन पोचला. या आकड्यांवरून घरबांधणीत झालेली वाढ किती मोठी होती, हे स्पष्ट दिसून येईल. इतर सर्व व्यवहार मंदीचा असताना एवढी वाढ व्हावी याचे महत्त्व विशेष आहे हे उघड आहे. या वाढीची कारणमीमांसा अनेक तऱ्हेने करण्यात आलेली आहे. इमारतबांधणीचा उतरता खर्च हे एक प्रमुख कारण म्हणून निर्देशिले गेले आहे. यावर आक्षेप हा की, उतरता खर्च हे जर घराच्या संख्येच्या वाढीचे मुख्य कारण असेल तर राहत्या घरांप्रमाणे इतर सर्व प्रकारच्या इमारतींचीही संख्या का वाढली नाही? पण वस्तुतः सर्व प्रकारच्या इमारतींची वाढ होण्याच्या ऐवजी औद्योगिक व व्यापारी कामाकरिता लागणाऱ्या इमारतींच्या बांधणीची वार्षिक संख्या अलीकडे घटलेलीच आढळून येते. तसेच १९२९ ते १९३५ मधील इमारतबांधणीचा खर्च एकंदर किती कमी आहे हे पाहू गेल्यास, तो एकदशांशाहून फारसा कमी झाला आहे असे दिसत नाही; आणि एकदशांश खर्च कमी झाल्याने घरांची संख्या दुपटीने वाढेल हे संभवत नाही. तेव्हा उतरत्या खर्चा-मुळे घर-बांधणीस थोडेबहुत उत्तेजन मिळाले असले, तरी अलीकडील वाढीचे हे मुख्य कारण नसावे. व्याजाचा उतरता दर हे दुसरे कारण असू शकेल. घरबांधणीची क्रमाक्रमाने मोठी वाढ व सरकारी कर्जरोख्यांवरील व्याजाच्या दराचा क्रमाक्रमाने उतार यांची तोंडमिळवणी करणे शक्य आहे. परंतु इंग्लंडमध्ये हे कारणही विशेष महत्त्वाचे नसावे, असे वरील लेखांत म्हटले आहे. याचे कारण असे की, इंग्लंडातील बहुतेक घरांची वाढ झालेली आहे ती लहान, मध्यम अथवा कनिष्ठ वर्गातील

लोकांच्या राहत्या घरांची, व त्यातही भाड्याने अशी बांधलेली फार थोडी. तेव्हा ज्या प्रकारच्या लोकांनी घरे नवीन बांधली ते बाजारी व्याजाच्या दराकडे पाहून व्यवहार करितात असे नाही. कारण, त्यांजवळ व्याजी लावण्यास अशी फारशी मोठी पुंजीच कधी नसते. शिवाय निरनिराळे आकडे पाहिले असता असे दिसून येते की, अलीकडील वर्षांत घडलेली वार्षिक खाजगी मोटर-खरेदीची वाढ आणि नवीन घरबांधणीची वाढ हे दोन्ही फरक सारख्याच वेळी व सारख्याच प्रमाणांत घडून आले आहेत. यावरून असे अनुमान काढण्यात येते की, लहानलहान नवीन मोटारी घेणारा व लहानलहान घरे बांधणारा असा जो वर्ग त्याचे क्रय-सामर्थ्य अलीकडे कोणत्यातरी कारणाने वाढले असावे आणि त्यामुळे या दोन्ही गोष्टी घडून आल्या असाव्या. हे क्रय-सामर्थ्य वाढण्याचे मुख्य कारण असे सांगण्यात येते की, उच्च कसबी कारागीरवर्ग व मध्यम नोकरीपेशाचा वर्ग (यांपैकी ज्यांचे काम किंवा नोकरी टिकून आहे) कोणाचेही वेतन किंवा पगार मंदीच्या दिवसांत फारसा कमी झालेला नाही. उलट, सर्व प्रकारच्या किमतींच्या उतारामुळे—विशेषतः खाण्याचे पदार्थ व कपडालत्ता यांच्या किमती उतरल्यामुळे या वर्गातील लोकांची बचत करण्याची पात्रता वाढली आहे. इंग्लंडात इमारतमंडळांच्या (Building Societies) मार्फत हप्तेबंदीने लहान घरे विकत घेण्याची सोय असल्यामुळे या बचतीचा विनियोग ब्याच जणांनी स्वतःच्या मालकीची घरे घेण्याकडे केला असावा.

## मागणी कोठून आली?

नवीन राहती घरे बांधण्यास पैसा कोठून आला याबद्दल हे विवेचन झाले. पण या नवीन घरांस मागणी कोठून आली, हा प्रश्न उरतोच. याबद्दल असे म्हटले जाते की, पूर्वी एकत्र राहणारी कुटुंबे आता विभक्त राहात आहेत, यामुळे स्वतंत्र कुटुंबांची संख्या वाढून स्वतंत्र घरांस नवीन मागणी बरीच आहे. तसेच भाड्याच्या खोल्यांतून (Lodgings) व इतर घरांत राहणारेही स्वतंत्र घरे करीत आहेत. मध्यम वर्गातील या दोन्ही प्रवृत्तींमुळे नवीन घरे बांधण्याची वार्षिक संख्या चार-पाच वर्षे बरीच वाढली. पण या प्रवृत्तीसही काही मर्यादा आहेच. वर्षानुवर्षे मोठ्या व वाढत्या प्रमाणावर नवीन घरे बांधत राहणे शक्य नाही. इतकेच नव्हे, तर नवीन घरबांधणीची कमाल मर्यादा इतक्यातच पोहोचली अशी चिन्हे दिसू लागली आहेत. १९३५ सालच्या शेवटच्या सहा महिन्यांतील नवीन बांधलेल्या घरांची संख्या १९३४ सालच्या शेवटच्या सहा महिन्यांतील संख्येहून थोडी कमी झाली आहे. ही संख्या घटण्यास व्याजाचा दर व घरबांधणीचा खर्च वाढणे अथवा कारागीरवर्गाचे किंवा मध्यम वर्गाचे उत्पन्न कमी होणे यांपैकी कोणत्याच गोष्टी झाल्या नाहीत. तेव्हा मागणी कमी होऊ लागली, हेच नवीन घर-बांधणीच्या स्थिरावलेल्या संख्येचे कारण असावे. घरबांधणीची वाढ खुंटली तर एकंदर आर्थिक परिस्थितीवर परिणाम होईल, म्हणून सरकारने व स्थानिक सरकारी संस्थांनी मजूरवर्गाकरिता घरे बांधण्याचा प्रश्न हाती घ्यावा, असे इंग्लंडमध्ये प्रतिपादिले जाते. सरकार याविषयी काय धोरण स्वीकारणार हे अजून स्पष्ट नाही, पण तात्पुरती जरी मध्यम वर्गाची राहत्या घरांची मागणी खुंटली, तरी औद्योगिक व व्यापारी इमारतींना मागणी वाढून एकंदर इमारतधंद्यास धक्का बसणार नाही, अशी चिन्हे दिसत आहेत.

## हिंदुस्थानातील परिस्थिती

वरील धर्तीचे विवेचन हिंदुस्थानासंबंधी करणे शक्य नाही. कारण, आपणांकडे या प्रश्नाबद्दल आकडेवार माहिती कोणतीच उपलब्ध नाही. हिंदुस्थानात शेतकरीवर्ग फार मोठा व कारागीर आणि मध्यम वर्गाची संख्या एकंदर लोकसंख्येच्या मानाने फार लहान. तेव्हा या प्रकारच्या राहत्या

घरबांधणीचा सर्व देशाच्या आर्थिक परिस्थितीवर जो परिणाम इंग्लंडात झाला तो आपल्याकडे होणे शक्य नाही. आपल्याकडे नवीन घरबांधणी शहरवस्तीतच चालू आहे, इतर ठिकाणी चालू असावी असे दिसत नाही. शहरवस्तीत मात्र नवीन घरबांधणीचा वेग पूर्वीपेक्षा पुष्कळच वाढलेला भासतो. आकड्यांच्या अभावी या वाढीच्या दराच्या प्रमाणाचा मात्र अंदाज करणे अशक्य आहे. या प्रवृत्तीचे आपल्याकडील महत्त्व इंग्लंडपेक्षा कमी असले तरी एकंदर स्वरूप मात्र इंग्रजी प्रवृत्तीसारखेच असावेसे वाटते. मुंबईसारख्या ठिकाणी पाहिले तर आपल्याकडेही औद्योगिक व व्यापारी इमारतींपेक्षा गेल्या चार-पाच वर्षांत राहती घरे बांधण्यावरच विशेष भर दिसतो. तसेच नवीन घरे बहुतांशी लहानमोठ्या नोकरीवर असलेल्या मध्यम वर्गातील लोकांकडूनच बांधली जात आहेत, आणि पगाराची स्थिरता व उतरत्या किमती यांमुळेच या वर्गाचे क्रय-सामर्थ्य वाढले असावे. आपणांकडे भाड्याने देण्याकरिता बांधलेल्या घरांचे प्रमाण मात्र इंग्लंडमधल्याइतके कमी असेल असे वाटत नाही; व विशेषतः महाराष्ट्रीय मध्यम वर्गाच्या दृष्टीने तरी घरे बांधणे हे पैसे गुंतवण्याचेही एक साधन होऊन बसलेले दिसते. अविभक्त कुटुंबांतून निरनिराळी स्वतंत्र कुटुंबे फुटून बाहेर पडण्याची प्रवृत्ती व शहराबाहेर नवीन वस्ती करण्याची प्रथा यांमुळे आपल्याकडील नवीन घरांची संख्या सारखी वाढत राहणे साहजिक आहे; आणि या मागणीला इतक्यातच आळा बसेल असे वाटत नाही. पण नवीन घरे बांधीत राहण्याचे मध्यम वर्गाचे सामर्थ्य मात्र किती काळ टिकेल ते सांगवत नाही. या सर्व गोष्टी अनुमानधपक्याने सांगण्याच्या झाल्या. निश्चित अनुमाने काढावयाची असली व राष्ट्रीय धोरण परिस्थित्यनुरूप आखावयाचे असले, तर सर्व प्रकारची आकडेवारी माहिती गोळा करणे किती आवश्यक आहे याची जाणीव दरठिकाणी प्रत्ययास येते.

*लोकशिक्षण* ६ : ९ मार्च १९३६ पृ० ६२४-६२७.

☆

# १० . . पॅलेस्टाइनची प्रगती

गेल्या पाच-सात वर्षांतील सार्वत्रिक मंदीच्या तडाक्यातून जगातील जी एक-दोन राष्ट्रेच सुटली आहेत त्यांत पॅलेस्टाइन हे एक आहे. महायुद्धापूर्वीपावेतो पॅलेस्टाइन हा तुर्की साम्राज्याचा एक लहान व मागासलेला भाग होता. महायुद्धानंतर तो देश राष्ट्रसंघामार्फत ब्रिटिशांच्या ताब्यात आला, आणि यहुद्यांच्या या मूलस्थानात यहुदी राष्ट्रकेंद्र (Jewish National Home) स्थापण्याचे धोरण ब्रिटिशांनी जाहीर रीतीने स्वीकारले. या धोरणानुसार इतर देशांतील यहुद्यांस पॅलेस्टाइनमध्ये येऊन वसाहत करण्यास उत्तेजन देण्यात येऊ लागले, व बरेच यहुदी दरसाल पॅलेस्टाइनवासी होऊ लागले. प्रथमपासूनच पॅलेस्टाइनमधील यहुदी लोकांची वसाहत इतर नवीन वसाहतींहून भिन्न होती. बहुतेक नवीन देश वसले जातात ते स्वदेशी बेकार असलेल्या अथवा आपल्या कर्तबगारीस नीट वाव मिळत नाही असे वाटत असलेल्या, पण बहुतांशी निष्कांचन अशा लोकांकडून. या असल्या लोकांत कसलेले कारागीर किंवा इतर शिक्षित लोक यांपेक्षा साधारण अडाणी लोकांचाच भरणा फार असतो. पॅलेस्टाइनमध्ये वसाहत करणारे यहुदी हे यांहून भिन्न प्रकारचे होते. यहुदी समाज हा सबंध जगभर पसरलेला आहे; व यातील संपन्नता, शिक्षण, व्यापारी व औद्योगिक कसब, विशेषतः यांत्रिक कलेचे ज्ञान याचे प्रमाण चांगले आहे. वसाहत करणाऱ्यांपैकी बरेचसे इतर ठिकाणी बेकार म्हणून नव्हे, तर यहुद्यांच्या अशा स्वतंत्र प्रदेशात राहण्याची इच्छा धरून परदेशगमन केलेले असे होते. प्रथमपासून वसाहत करणारा वर्ग काहीसा उच्च प्रतीचा असल्यामुळे या यहुद्यांच्या वसाहतींची प्रगती बरीच झाली; व यहुद्यांस आर्थिक व्यवहार चालविण्याची हातोटी जन्मजात असल्यामुळे व्यावहारिक दृष्ट्याही काही थोड्या अडचणी सोडल्या तर त्यांची भरभराटच होत गेली. याप्रमाणे त्यांची आठ-दहा वर्षे थोडथोडी, पण समाधानकारक, प्रगती होत गेली. परंतु अलीकडील भरभराटीचे मूळ यात नाही. ते १९३० सालच्या पुढे मध्य-युरोपीय देशांत, विशेषतः जर्मनीत यहुद्यांविरुद्ध उसळलेल्या लोकक्षोभाच्या प्रचंड लाटेत आहे. हिटलरशाहीने व इतर देशांतील तत्सम कारभाराने यहुद्यांना सळो का पळो करून सोडल्यामुळे, एक थाऱ्याची जागा म्हणून पॅलेस्टाइनकडे त्यांचे डोळे वळणे साहजिक होते. १९३२ सालच्या पुढे पोलंड व जर्मनी यांतील यहुद्यांचा एक प्रचंड ओघ पॅलेस्टाइनकडे वळला. १९३१ सालपावेतो दरसाल पॅलेस्टाइनमध्ये नवीन वसाहत करण्यास येणाऱ्यांची संख्या दहा हजारांच्या सुमारास असे. १९३२ साली ही संख्या १६ हजारांच्या आतच होती. यापुढे ती वाढत जाऊन ४२ व ४८ हजार अशी झाली. १९३५ सालात ही संख्या ६० हजारांच्या घरात असेल, असा अंदाज आहे. १९२२ सालच्या खानेसुमारीच्या वेळेस एकंदर लोकसंख्या साडेसात लाख असून त्यांतील यहुद्यांची संख्या ८४ हजारापर्यंतच होती; तर १९३५ साली एकंदर लोकसंख्या साडेबारा लक्ष असून तीत यहुदी तीन लक्षांहून अधिक भरतील, असा अंदाज करण्यात आला.

पण अलीकडील वर्षातील वाढत्या लोकसंख्येपेक्षा वाढत्या भांडवलाचे महत्त्व अधिक आहे, किंबहुना खरे महत्त्व त्याचेच आहे. १९३२ नंतर नवीन वसाहत करण्यात आलेल्या यहुद्यांत—विशेषतः जर्मन यहुद्यांत—संपन्न लोकांचे प्रमाण बरेच होते. १९३३ व १९३४ साली नवीन वसाहतवाल्यांत पंधरा हजार रुपयांहून जास्त भांडवल देशात घेऊन येणाऱ्यांची संख्या एक अष्टमांशाहून अधिक होती, असा अंदाज आहे. पण या एकअष्टमांशातही अतोनात श्रीमंत असे बरेच होते. असे म्हणतात की, १९३४ या एका सालात नवीन वसाहतवाल्यांनी १२ ते १५ कोटी रुपयांचे भांडवल पॅलेस्टाइनमध्ये आणिले. खरोखर जर्मनीतून याहूनही अधिक भांडवल पॅलेस्टाइनमध्ये आले असते. पण जर्मन सरकारने पैशाच्या स्वरूपात भांडवलाची निर्यात करण्याची बंदी केली. तेव्हा आता जर्मन यहुद्यांस पॅलेस्टाइनमध्ये भांडवल पाठविणे असल्यास त्यांस ते जर्मन राइक्स बँकेत भरावे लागते. आणि जसाजसा जर्मन माल पॅलेस्टाइनमध्ये विकला जातो, तसतसे हे पैसे त्यास पॅलेस्टाइनमध्ये मिळतात. दरवर्षी पॅलेस्टाइनमध्ये खपणाऱ्या जर्मन मालाला मर्यादा ही असणारच, व जर्मनीतून येणारे नवे भांडवल यामुळे मर्यादित होणार. या अडचणीमुळे जर्मन यहुद्यांचे पुष्कळ भांडवल राइक्स बँकेत तुंबले असून अशा प्रकारच्या नवीन ठेवी घेण्याचे त्या बँकेने बंदही केले आहे.

एवढे मोठे भांडवल एकदम एका लहानशा प्रदेशात आल्यामुळे ते कसे गुंतवावे याची मोठी अडचण पडली. त्यातल्या त्यात पॅलेस्टाइन हा काही मोठा संपन्न प्रदेश नाही. एकंदर देश कृषिप्रधान, व या शेतकीत भांडवल गुंतविण्यासारखा उद्योग एकच. म्हणजे फळबागांचा. शेतकी वगळल्यास मृतसमुद्रातील (Dead sea) पोटॅश हीच काय ती महत्त्वाची खनिज संपत्ती. तेव्हा हे सर्व नवीन भांडवल किफायतशीर रीतीने कसे काय गुंतविले जाते हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आज तरी पॅलेस्टाइनचा परदेशी व्यापार अगदी एकखांबी आहे. पॅलेस्टाइनमधून निर्गत होणाऱ्या मालाच्या किंमतीपैकी तीनचतुर्थांशाहून अधिक किंमत संत्री व तत्सम फळे व या फळांपासून केलेल्या पदार्थांच्या निर्गतीच्या किमतीची आहे. पण तारपुरता हा प्रश्न महत्त्वाचा नाही. कारण नवीन वस्ती एकदम आल्यामुळे शहरे झपाट्याने वाढली आणि या नवीन वस्तीकरिता लागणारी घरे व वाढत्या शहरांस लागणारे रस्ते, पाणी व इतर सोयी यांमध्ये नवीन भांडवलापैकी बरेच गुंतविता आले. सर्व प्रकारचे इमारत-धंदे ऊर्जितावस्थेस आले व नवीन युरोपीय वसाहतवाल्यांस लागणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तू पैदा करणारे लहान लहान धंदेही नव्याने निघू लागले. आज मुख्य टंचाई आहे ती मजुरांची, व मजुरीचे दर फार झपाट्याने वाढले आहेत. अशा रीतीने दुसरीकडे मंदी असता पॅलेस्टाइनमध्ये बरीच तेजी आहे, व हा सर्व भांडवलाच्या मोठ्या आयातीचा परिणाम. अरब-यहुदी संबंध वगैरे राजकीय प्रश्न व आर्थिक उत्पादन विविध करणे वगैरे आर्थिक प्रश्न या देशास सोडवावे लागणार आहेत. पण त्यांचा विचार करणे ही बाब अगदी स्वतंत्र आहे.

*लोकशिक्षण* ६ : ९ मार्च १९३६ पृ० ५२७-५२९.

☆

# ११ . . जपानचा आर्थिक विकास : शोध आणि बोध

महायुद्धपूर्वकालीन जपानची आर्थिक प्रगती भारतीय प्रगतीपेक्षा फार निराळ्या तऱ्हेने घडून आली. तरी महायुद्धोत्तर काळांतील अनेक प्रश्न व प्रवृत्ती दोन्ही देशांत सारख्या होत्या. तेव्हा तुलनात्मक दृष्टीने जपानी परिस्थितीचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या जवळजवळ सर्व काळात जपानी अर्थव्यवस्थेला चलनवृद्धी व किंमतवाढ या प्रवृत्तींस सारखे तोंड द्यावे लागते आहे. युद्धात कारखाने, इमारती इत्यादी मोठ्या प्रमाणात नाश झाल्यामुळे व अर्थव्यवस्थेची घडी बसविण्यास काही वर्षे लागल्यामुळे गेली दहा वर्षे भांडवलाची जपानात सारखी टंचाई भासली व तेथील व्याजाचा दर आपल्यापेक्षा सारखा वरचढ राहिला. परंतु असे असताही आजची जपानी अर्थव्यवस्था युद्धपूर्व कालातील उत्पादन-उच्चांकाशी स्पर्धा करू शकते. याला ज्या काही थोड्या गोष्टी कारणीभूत आहेत त्यांपैकी अर्थव्यवस्था समतोल राहिली हे एक महत्त्वाचे कारण आहे.

## शेती आणि सहकारी यंत्रणा

जपानमधील सर्वसामान्य शेतकऱ्याला, हिंदुस्थानातील शेतकऱ्याइतक्या विवंचना खासच नसतात. शेतकऱ्याची मुख्य काळजी म्हणजे त्याच्या शेतातील पिकांना मिळणाऱ्या भावाबद्दलची. जपानी शेतकऱ्याचे धान्यांचे सर्व पीक स्थानिक सहकारी संघांतर्फे सरकार विकत घेत असल्याने व नंतर त्याचे आम जनतेस वाटप केले जात असल्याने शेतकऱ्याची ही मुख्य काळजी नाहीशी झाली आहे. शेतकऱ्याला देण्यात येणारी व जनतेस आकारण्यात येणारी तांदळाची किंमत सरकार अगोदरच ठरवीत असल्याने एका स्थिर किमतीस पीक विकत घेणारे गिऱ्हाईक शेतकऱ्याला मिळाल्याने तो निश्चिंत असतो. राजकीय धोरणांचा, ही किंमत ठरविण्यावर परिणाम होत असला तरी शेतकऱ्याला मिळणारी किंमत ही यामुळे जरा जास्त असते एवढेच. जी गोष्ट तांदळाची तीच इतर धान्यांची. फरक एवढाच की, तांदळाची किरकोळ विक्रीची किंमत सरकार स्वतः ठरवीत असते; तर गहू, जव इत्यादी इतर धान्य सरकार ठोक व्यापाऱ्यांना एका ठराविक किमतीने विकत असते व त्यांच्यातर्फे मग ते जनतेस विकले जाते. बटाटे व मोहरी यांसारख्या महत्त्वाच्या पिकांच्या किमतीचे स्थैर्य राखणे ही सरकारचीच जबाबदारी असते. या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांच्या प्रयत्नांवर किमतींमधील फेरबदलाचा परिणाम होत नाही.

पिकावरील क्रिया, त्याची विक्री ही सर्व शेतकरी व त्याची सहकारी सोसायटी यांच्या हातात असते असे म्हणण्यास हरकत नाही. १९५१ ते १९५६ मधील काळातील पंचवर्षीय योजनेमुळे जवळ जवळ

प्रत्येक सहकारी सोसायटीजवळ स्वत:चे गोदाम व पिकावरील क्रियांसाठी लागणारी यंत्रसामग्री आहे. या सोसायटीतर्फे सर्व शेतकऱ्यांचे पीक एकत्र केले जाते, त्याची वर्गवारी करून मग ते विक्रीस पाठविले जाते. प्रत्येक सहकारी सोसायटीतर्फे कर्जाची वगैरे व्यवस्था केली जातेच. तसेच खते वगैरेंचाही पुरवठा केला जातो. सावकार हा वर्ग खेड्यांतून नसल्याने, त्यांच्या सहकारी सोसायटीतर्फे शेतकऱ्यांस कर्ज मिळू शकते. सोसायट्यांना सहकारी जिल्हा बँकांकडून कर्ज मिळू शकते व सोसायट्या आपल्याकडे आलेला जादा पैसा ठेवीच्या रूपाने या बँकांकडे ठेवतात. ज्या भागात भांडवलाचे आधिक्य आहे त्या भागातून ते काढून जेथे त्याची जरुरी आहे तेथे त्याचा पुरवठा करण्याचे महत्त्वाचे कार्य मध्यवर्ती सहकारी बँक करते. युद्धोत्तर काळातील किफायतशीर किमती व सरकारने भांडवली खर्चाकरिता केलेली मदत यामुळे दीर्घकालीन कर्जाची शेतकऱ्यांची मागणी जपानच्या अनेक भागात मंदावली आहे. तसेच प्रतिवार्षिक खर्चाकरिता कर्जही मोठ्या प्रमाणात काढले जात नाही. या गोष्टींमुळे कित्येक मध्यवर्ती सहकारी बँकांपाशी असलेल्या भांडवलास मागणी नसल्याने, ही बँक इतर बँकांसही हे भांडवल फायदेशीर दराने देऊ शकते. एवंच, शेतकऱ्यांचे वाढते उत्पादन व उपभोगाचे प्रमाण हे जपानी अर्थव्यवस्थेतील एक मुख्य घटक बनले आहे.

## व्याजाच्या दरांची किमया

युद्धोत्तरकालात धंद्यास लागणारे भांडवल स्वत:जवळ नसल्याने भांडवलासाठी कारखानदारांस बँकांवर अधिकाधिक अवलंबून राहावे लागले. या कारखानदारांस दिलेल्या मोठ्या कर्जामुळे बँकांसही त्यांच्या कारभारावर दिलेल्या भांडवलाच्या विनियोगावर लक्ष ठेवावे लागले व ठेवता येऊ लागले. अनिष्ट वाटलेल्या व्यवहाराकरिता उद्योगधंद्यास भांडवल नाकारून बँका देशातील उद्योगधंद्याच्या वाढीची दिशाही ठरवू शकल्या. या बँकाही आपल्या परीने भांडवलासाठी मध्यवर्ती बँक ऑफ जपानवर अवलंबून असत. बहुतेक मुख्य व्यापारी बँका याप्रमाणे बँक ऑफ जपानवर अवलंबून असल्याने या बँकांच्या ठेवी, कर्ज, तारण याबाबत सर्व माहिती मिळू शकते व कोणत्या बँकेने किती भांडवलाची कशी उलाढाल करावी याबाबत सल्लाही ती देऊ शकते. एकंदर अर्थव्यवस्था व चलनवाढ यांवर नियंत्रण घालण्याकरिता बँक ऑफ जपानने चढत्या व्याजाच्या दराची विशिष्ट योजना अमलात आणली आहे. काही महत्त्वाच्या विनियोगाच्या बाबी सोडल्यास इतरांकरिता बँकांनी द्यावयाच्या कर्जावर प्रचलित दराहून अधिक व क्रमाने वाढता दर बँक ऑफ जपान आकारीत असे. हा दर कर्ज देणारी बँक व ज्या धंद्यासाठी त्या कर्जाचा विनियोग होणार असेल तो धंदा विचारात घेऊन बदलत असे व त्यामुळे नको असलेल्या धंद्यांची वाढ आपोआपच खुंटत असे; कारण त्यांना लागणारे भांडवल या अधिक व्याजदर-पद्धतीमुळे कर्जाऊ घेणे त्यांना फायद्याचे ठरत नसे. बँकिंग धंद्यातील दुसऱ्या दोन महत्त्वाच्या उल्लेखनीय गोष्टी म्हणजे (१) तेथील व्यवहारात असलेले हुंड्यांचे स्थान व (२) डिपॉझिटवरील व इतर कर्जावरील आकारण्यात येणाऱ्या व्याजाच्या दरावरील सरकारी नियंत्रण. विशेष म्हणजे बहुतेक जनमत या अशा सरकारी नियंत्रणाच्या बाजूचे होते. हुंड्यांच्या सोयीमुळे सामान्य व मध्यम ऋणकोंस बँकांकडून कर्ज घ्यावयाची आवश्यकता विशेष भासत नाही. व्याजदरावरील सरकारी नियंत्रणामुळे बँकांच्या व्यवहाराचा विस्तार व संक्षेप यांवर आपोआपच सरकारी नियंत्रण येते. जपानातील प्रचलित अधिक व्याजदराबद्दल अडचण भासत नाही याचे एक कारण एका वर्षापेक्षा जास्त काळासाठी जपानी सरकार कर्ज उभारू शकत नाही. याचा परिणाम असा होतो की, मध्यवर्ती बँकेच्या व्याजाचा दर ठरविताना सरकारी कर्जाचा विचार करावा लागत नाही. अर्थात जपानी सरकार अल्प मुदतीचे कर्ज नेहमी काढते. केव्हाही सरकारच्या कर्जरोख्याच्या तारणावर बँक ऑफ जपान कर्ज देऊ शकते.

तसेच जरुरीप्रमाणे अन्नधान्य-हुंड्या व परदेशी-चलन-हुंड्या यांद्वारा सरकार पैसा उभारते; व इतर कोणी या हुंड्या न घेतल्यास बँक ऑफ जपान त्या खरीदते. या हुंड्यांच्या व्याजाचा दरही ठरलेला असतो.

विकास-योजना व पुनर्वसनासाठी लागणारा पैसा पुरविण्यात युद्धोत्तर काळात सरकारने फार मोठा वाटा उचलला. उदाहरणार्थ, दळणवळण, विद्युदुत्पादन, शैक्षणिक संस्था, स्वास्थ्य, विमा वगैरे गोष्टींसाठी सरकारने घेतलेली जबाबदारी फार मोठी होती. थेट मोठ्या कोळसाखाणीपासून तो साध्या छोट्या शेतकऱ्यापर्यंत सर्वांना वेगवेगळ्या खास संस्थांद्वारा सरकारी मदत मिळू शकते व मिळते. 'होकाइडो विकास फिनान्स कॉर्पोरेशन', शेतकी, जंगल व मच्छिमार फिनान्स कॉर्पोरेशन, छोटे व मध्यम धंदे विकास फायनान्स कॉर्पोरेशन वगैरे संस्था असल्या कार्याकरिता मुद्दाम स्थापल्या आहेत. सरकारकडून देण्यात येणाऱ्या महत्त्वाप्रमाणे त्या त्या योजनेस मिळणाऱ्या सवलतींतही बदल होतो. उदाहरणार्थ, ग्रामीण पंचवार्षिक गोदाम-बांधणी-योजना पुरी होईपावेतो ग्रामीण गोदामांकरिता मिळणारा व्याजाचा दर सवलतीचा ४ टक्के होता. परंतु जरुरी नाही असे सरकारचे मत झाल्याबरोबर हा दर ७॥ टक्क्यांवर नेण्यात आला.

## भांडवल-उभारणीसाठी देशांतर्गत प्रयत्नांवर भर

या सर्व योजनांना लागणारा पैसा हा सुरुवातीस अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदत-योजनेवर व कोरियन युद्धामुळे उद्योगधंद्यांस मिळालेल्या चालनेवर अवलंबून होता. परंतु तदनंतर तो अंतर्गत प्रयत्नांनी विशेषतः मोठ्या प्रमाणावर कर लादून उभारण्यात आला. अलीकडे भांडवली खर्चाकरिता कराचे उत्पन्न वाढविण्याची प्रवृत्ती कमी झाली असून आता करआकारणीपेक्षाही जास्त महत्त्वाचा मार्ग म्हणजे अर्थखात्याच्या ट्रस्ट-फंड-ब्यूरो वगैरेमधून मिळू शकणारे भांडवल. पोस्टल विम्यामुळे केवढी मोठी रक्कम जमा होऊ शकली हे लक्षात घेतले म्हणजे जपानी अर्थव्यवस्थेतील सामान्य माणसाच्या अर्थसंचयाचा वाटा किती मोठा होता हे लक्षात येईल. अलीकडे विकास-योजनांसाठी लागणाऱ्या भांडवलाची उभारणी व विनियोग ही प्रत्येक कार्यासाठी स्थापण्यात येणाऱ्या कॉर्पोरेशनच्या हातात दिल्याने सरकारचे दोन उद्देश साधण्याचा प्रयत्न होत आहे. एक तर अशा संस्थांच्या हातात विकास योजनेचा कारभार दिल्याने देशातील राजकीय उलाढालींचा त्यांच्यावर परिणाम होत नाही व दुसरे असे की प्रत्येक कॉर्पोरेशनला लागणाऱ्या भांडवलाचा प्रश्न त्याचे कार्य व कार्यक्षमता यांच्या अनुरोधाने सोडविला जाण्याचा संभव असतो. हे धोरण अजून नवीन असल्यामुळे याबाबत प्रत्यक्ष अनुभव फारसा नाही.

अर्थात, विकासाकरिता केलेल्या आर्थिक मदतीबरोबरच तांत्रिक व प्राबन्धिक मदतीची जरुरी असते. जपानमधील मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सरकारच्या सर्व पर्यवेक्षकांचे लक्ष सहकारी सोसायट्यांच्या जमाखर्चापेक्षा त्यांस देण्याच्या प्रत्यक्ष मदतीवर केंद्रित झालेले असते. आपल्याकडे दिसून येणारा सरकारी अधिकारी व इतर लोक यांमधील दुरावा तेथे मुळीच आढळून येत नाही. त्यांच्यातल्या प्रत्येक अधिकाऱ्यास त्याच्या हाताखालील धंद्याबद्दलची सर्व माहिती असते—मग तो धंदा कितीही लहान का असेना.

## उद्योगधंद्यांचे क्रमशः आधुनिकीकरण

गेल्या शंभर वर्षांत औद्योगिक वाढ होत असता जुन्या पद्धतीच्या उद्योगधंद्यांचा विनाश झाला नाही हे लक्षात घेणे जरूर आहे. नवीन काळास अनुसरून त्यांनी स्वतःच्या रचनेत व तंत्रांत क्रमशः बदल करून घेतला. सरकारी मदतीमुळे व सहाय्यामुळे त्यांना तसे करणे जास्तच सोपे झाले; व

परिणामान्ती आर्थिक व औद्योगिक विकास काही शहरांपुरताच मर्यादित न राहता समतोलपणे सर्व राष्ट्रभर पसरला गेला; इतका की ग्रामीण आणि नागरी असे भेद करणेच जपानमध्ये कठीण झाले. त्यामुळे मोठ्या कारखान्यात ज्या पद्धती वापरल्या जातात त्यांचाच स्वीकार काही फरकाने छोट्या उद्योगधंद्यांत केला जातो हे ओघानेच आले. अशा या अभेदामुळे शेतीशिवाय मिळणाऱ्या ग्रामीण भागातील मुबलक कामाचा परिणाम ग्रामीण लोकांना मिळणाऱ्या प्राप्तीवर झाल्यावाचून राहात नाही. जरी घरगुती धंद्यांचे महत्व दिवसेंदिवस कमी होत चालले असले तरी ग्रामीण भागातील छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यांच्या प्रसारामुळे तेथील बेकारीला बराच आळा बसला आहे.

युद्धोत्तर काळात बदललेल्या आर्थिक व्यवस्थेस तीन गोष्टी कारणीभूत आहेत :

(१) जमिनीवर अवलंबून असलेल्या लोकांचे जीवन, जमीनसुधारणा व धान्य-किमतींचे स्थैर्य यामुळे सुधारले.

(२) जुनाट झाईबात्सु भांडवलदारांचे गट मोडण्यात आले व त्यांच्या हातात केंद्रित झालेली सत्ता विखुरली गेली.

(३) तिसरी व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे युद्धोत्तर काळात वाढत्या प्रमाणावर हाती घेतलेल्या समाजकल्याण योजना. आरोग्य-विम्याचा फायदा निदान दोनतृतीयांश लोकसंख्येस मिळतो असे म्हणतात. तसेच बेकार-विमा व इतर योजनाही आहेत. या सर्वांमुळे नागरी कामगारांचे जीवनमान वाढून त्यांस सुरक्षितता वाटू लागली. याबरोबरच समाजात पूर्वीपासून असलेला शिक्षण-प्रसार लक्षात घेतला पाहिजे. युद्धोत्तर काळात शिष्यवृत्त्या व होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांत सार्वत्रिक माहिती ही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहेत. तेथे असलेला शिक्षणप्रसार, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलती, शास्त्रीय ज्ञानाचा झालेला प्रसार व त्यामुळे कामगारांचे वाढते तांत्रिक कौशल्य या सर्व गोष्टी, उत्पादनाची कार्यक्षमता वाढविण्याच्या कामी उपयोगी ठरतात.

वाढत्या उद्योगधंद्यांमुळे बेकारी कमी होण्याच्या मार्गावर असली तरी जपानमध्ये अजून जमिनीवर अवलंबून असणाऱ्यांची फारच मोठी संख्या आहे. व जरी गेल्या दहा वर्षांत नवीनच सुरू केलेल्या उद्योगधंद्यांचे प्रमाण खूपच वाढले असले तरी त्यामुळे बेकारी हवी त्या प्रमाणात कमी होत नाही. त्यामुळे भारतातील योजना आखणाराप्रमाणे जपानमधील योजनाकार बेकारांस काम देण्याचे साधन म्हणून छोट्या व मध्यम उद्योगधंद्यांकडे लक्ष पुरवितात. परंतु अशा छोट्या उद्योगधंद्यांमुळे उपलब्ध झालेल्या नोकऱ्या कमी असल्याने भारताप्रमाणेच जपानमध्येही बेकारीच्या प्रश्नावर पूर्णपणे यशस्वी तोड अजून सापडली नाही.

## भारताला उपयुक्त बोध

भारतापेक्षा जपानमधील संपत्ती व प्राप्ती यांचे वाटप अधिकच सम प्रमाणात आहे; देशातील निरनिराळ्या विभागांतील, निरनिराळ्या वर्गांतील व नागरी आणि ग्रामीण विभागांतील विषमतेचे प्रमाणही पुष्कळच कमी आहे; अर्थव्यवस्थेची आखणी व नियंत्रण, देशातील आर्थिक उलाढालीस देण्यात येणारा पाठिंबा वगैरे गोष्टींतील सरकारचा भाग निःसंशय जास्त व अधिक लाभदायक आहे.

परंतु आपल्या आर्थिक व्यवस्थेची घडी नीट बसवताना जपानला भारताप्रमाणेच निरनिराळ्या अडचणींना तोंड द्यावे लागले आहे. कामगारवर्गात झालेली वाढ, बेकारीचा मूलप्रश्न, जमिनीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या, भांडवलाची भासणारी चणचण व प्रगतिमान औद्योगिक व्यवस्थेची गरज ह्या सर्वांना भारताप्रमाणेच जपानलाही तोंड द्यावे लागले आहे. परंतु संपत्तिसंचयाचा योग्य विनिमय करणे व योजनेबरहुकूम आर्थिक विकास घडवून आणणे या दोन्ही गोष्टींत जपानला भारतापेक्षा

जास्त यश आले आहे. स्थानिक कार्यकर्त्यांचे प्रयत्न, सहकारी संघांचे कार्य व अर्धस्वायत्त अशा कार्पोरेशन-सारख्या असलेल्या संस्थांचे कार्य यांच्या प्रधानतेवर जपानमध्ये जास्त भर दिला जातो. भारताप्रमाणेच जपानमध्ये युद्धोत्तर कालातील औद्योगिक विकासात सरकारी वाटा जास्त आहे. भारताप्रमाणेच जपानमधील लोकमतही जास्त जास्त समाजवादी बनत चालले आहे. वरील सर्व गोष्टी लक्षात घेता भारताला दुसऱ्या कोणत्याही देशापेक्षा जपानच्या प्रयत्नावरून धडा घेणे जास्त उपयोगी ठरेल यात शंका नाही.

*केसरी*, दिवाळी अंक, १९५७, पृ० १६-१९.

☆

# १२ . . 'भारत आणि चीन' [प्रस्तावना]

श्री रा. कृ. पाटील हे महाराष्ट्रास सुपरिचित आहेत. मोठ्या हुद्द्यावरील कर्तबगार व स्वाभिमानी अधिकारी, प्रांतिक मंत्री, नियोजन-मंडळाचे सदस्य, भूदान-ग्रामदान आंदोलनातील निष्ठावंत कार्यकर्ते अशा निरनिराळ्या प्रकारे त्यांनी आजवर देशसेवा केली आहे. नियोजन-मंडळात असता मुख्यतः कृषिविभागाचे काम त्यांच्याकडे होते. यामुळे भारत सरकारने चीनमधील सहकारी शेतीची पाहणी करण्यास एक मंडळ पाठविण्याचे ठरविल्यावर मंडळाचे नेतृत्व श्री पाटील यांजकडे दिले हे उचितच झाले. या मंडळाचा अहवाल इंग्रजीत प्रसिद्ध होऊन बरेच महिने लोटले. आता श्री पाटील चीनमधील स्वतःचे अनुभव व त्यांचा निष्कर्ष यांबाबत हे पुस्तक मराठीत प्रसिद्ध करीत आहेत. ही गोष्ट सर्वथैव इष्ट व युक्त अशी आहे. मंडळाचा अहवाल, कोणताही सामूहिक अहवाल, समन्वयात्मक असतो. त्यामुळे अनेक खाचाखोचा, बारकावे, वादग्रस्त प्रश्न त्यातून साहजिक गळतात. न गळले तरी त्यांवरील मतप्रदर्शनास—भिन्न मतपत्रिका जोडल्यास—धार नसते. व्यक्तिगत अनुभवाचा जिव्हाळा अशा अहवालातून प्रकट होणे दुरापास्तच. यामुळे अधिकारी व्यक्तींच्या स्वानुभवाधिष्ठित लिखाणाचे महत्त्व व स्वारस्य विशेष प्रकारचे असते. श्री पाटील यांनी मराठीतून हा ग्रंथ लिहिला ही गोष्ट महत्त्वाची मानली पाहिजे. आपण देशव्यापी नियोजनाकरिता कटिबद्ध झालो आहोत व हे लोकशाही पद्धतीने करावयाचे असे म्हणत आहो. तेव्हा नियोजनाबाबतचे अनुभव व विचार-विशेषतः बहुसंख्यांकांच्या हिताशी निगडित असलेल्या शेतीच्या नियोजनाबाबतचे-देशी भाषांतून प्रकट व्हावयास हवेत. त्यावरील चर्चा गावगन्ना झाली पाहिजे. श्री पाटील यांच्या पुस्तकामुळे नियोजनाच्या अनेक अंगांबाबत महाराष्ट्रातील लोकशिक्षणास चालना मिळेल असा भरवसा वाटतो.

## पुस्तकाचे स्वरूप

श्री पाटील यांच्या पुस्तकाचे दोन मुख्य भाग आहेत. पहिला चिनी अर्थव्यवस्था व नियोजन यांविषयीच्या चर्चेचा व दुसरा चीनच्या प्रवासातील दैनंदिनीतील उताऱ्यांचा. दैनंदिनीतील मजकूर विस्ताराने दिल्यामुळे चीनमधील परिस्थितीचे प्रत्यक्ष चित्र डोळ्यांपुढे उभे राहण्यास फार मदत होते. टिपणे दिवसागणिक झाली असल्यामुळे वेळोवेळी दृष्टीस पडलेल्या अनेक बारीकसारीक गोष्टी त्यांत नमूद झाल्या आहेत. सहकारी शेतीची पाहणी हे मुख्य उद्दिष्ट असले तरी आर्थिक, सामाजिक व भौगोलिक परिस्थितीच्या अनेक अंगांचे वर्णन ओघाने सारखे येते व सहकारी शेतीही निरनिराळ्या ठिकाणची निरनिराळ्या प्रकारची कशी असते हे कळते. वाटाडे, कार्यकर्ते, राजकारणी इत्यादी अनेक पेशांच्या लोकांबरोबर झालेल्या चर्चेतील विषय अनेक वेळा तेच तेच असले तरी त्यांच्या वृत्तांतात

भरपूर विविधता आढळते व जेथे कोठे थोडी पुनरुक्ती होते, तीही सूचक वाटते. या सर्वांमुळे परिस्थितीचे यथार्थ ज्ञान, मनोरंजन होता होताच, प्राप्त होते आणि शिवाय दुसऱ्या भागातील चर्चा व अभिप्राय यांचे आकलन होण्यास फार मदत होते.

भारतातील सद्यःस्थितीच्या दृष्टीने श्री पाटील यांच्या पुस्तकात अनेक महत्त्वाच्या गोष्टी चर्चिल्या आहेत. त्या सर्वांचा लहानशा प्रस्तावनेत उल्लेख करणेही शक्य नाही; म्हणून काही विशेष महत्त्वाच्या वाटणाऱ्या बाबींकडे वाचकांचे लक्ष वेधण्यापलीकडे येथे प्रयत्न करीत नाही. पहिली गोष्ट म्हणजे श्री पाटील यांनी दिलेल्या चिनी सहकारी शेतीच्या यशस्वितेबद्दलचा निर्वाळा. अल्पावधीत, ठराविक ठिकाणी दिलेल्या काही भेटींवरून कोणताच निर्णायक अभिप्राय देता येत नाही असे या प्रकारच्या निर्वाळ्याबद्दल नेहमी म्हटले जाते. परंतु श्री पाटील यांची दैनंदिनी व चर्चा वाचल्यानंतर त्यांचा स्वतःचा सहकारी शेतीबद्दल अनुकूल ग्रह झाला, तो त्यांनी जेवढे पाहणे व विचारणे चिकित्सक बुद्धीने शक्य होते तेवढे केल्यानंतरच बनविला हे स्पष्ट होते. श्री पाटील यांनी केलेल्या यशस्वितेच्या कारणमीमांसेबद्दल एक शंका मात्र मनात डोकावते. चिनी शेतकऱ्यांस सहकारी शेतीचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवावरून कळले असे ते म्हणतात किंवा अनुमान काढतात. परंतु हिंदी मंडळाच्या भेटीच्या वेळी सहकारी शेतीचा सार्वत्रिक प्रसार पुरी दोन वर्षेही झाला नसावा. त्याचे आधी सहकारी शेती सार्वत्रिक नव्हती, एवढेच नव्हे तर त्याबाबतचे चिनी सरकारचे धोरणही निश्चित नव्हते आणि एकंदर सर्वच मामला पाच-सहा वर्षांचा. तेव्हा सहकारी शेती जास्त फलदायी असा प्रत्यक्ष तुलनात्मक अनुभव आल्याने तिचा स्वीकार झाला व ती फैलावली हे विधान तितकेसे पटत नाही.

## सहकारी शेतीच्या प्रगतीची कारणे

सहकारी शेतीच्या प्रगतीची श्री पाटील यांनी दिलेली इतर कारणे सयुक्तिक वाटतात. ही म्हणजे सरकारी मदत व लोकशिक्षण. सरकारी मदतीच्या जोडीस एकंदर सरकारी आर्थिक धोरणाचाही विचार केला पाहिजे. सहकारी शेती चीनमध्ये प्रसारित होण्याच्या आधी सरकारी धोरणाची वाटचाल कोणत्या दिशेने झाली याचा श्री पाटील यांनी दिलेला वृत्तान्त फार उद्बोधक आहे. जमीनदारी नष्ट करण्याच्या आधीही कृषिव्यवहाराबाबत कॉम्युनिस्ट सरकारने टाकलेले पहिले पाऊल म्हणजे धान्य व इतर उत्पादनाची ठोक खरेदी-विक्री आपल्या हातांत घेऊन शेतीच्या मालाच्या किमती बांधून देण्याची व्यवस्था करणे. हे कार्य पुढील सर्व योजनांस पायाभूत समजले पाहिजे. शेतीच्या अर्थ व्यवहारांतील किमतींच्या चढ-उताराचा धोका टळल्यामुळे उत्पादक निर्धास्त होतो व सावकारी, व्यापार आणि सट्टेबाजी यांच्या कचाट्यांतून हा व्यवहार सुटण्याची शक्यता निर्माण होते. हे जोवर झाले नाही तोवर सहकारी शेती तर राहोच पण शेतीच्या व्यवहारातील खरेदी-विक्री वगैरेही सहकारी व्यवस्था फोफावत नाही व शाश्वत टिकत नाही हा सार्वत्रिक अनुभव आहे. जमिनीच्या विषम वाटणीच्या परिस्थितीमुळे, कॉम्युनिस्ट कार्यपद्धतीस अनुसरून जमीनदारी नष्ट करणे हे चीनमधील दुसरे पाऊल ठरले. प्रत्यक्ष कसणाऱ्यांची मालकी जमिनीवर प्रस्थापित करून जमिनीचे वाटप त्वरेने करून टाकण्यात आले. या वेळेसच चीनमध्ये हिंसात्मक प्रकार प्रामुख्याने घडले. सार्वत्रिक जमीन-वाटप झाल्यामुळे छोट्या व दरिद्री शेतीचे उत्पादनावरील परिणाम उत्कटपणे दिसून आले आणि सरकारास वाटप पुरे होते न होते तो शेतीचा विचार करावा लागला. परंतु संपूर्ण सहकारी शेती एकदम हाती घेतली नाही. प्रथम पारस्परिक साहाय्यक समित्यांचा अवलंब केला. यांत सर्व उत्पादन सहकारितेने झाले नाही, तरी महत्त्वाच्या कामांकरिता अनेक लहान लहान शेतकऱ्यांचे मनुष्य व बैल यांचे बळ एकत्र करण्याचे काम या समित्यांनी केले. याच्यानंतर सहकारी शेतीचा उपक्रम करून दोन-तीन वर्षांच्या अवधीत ही चळवळ

देशव्यापी बनविली. वरील सर्व टप्पे १९४९ ते १९५६ एवढ्या कालात गाठले, हे या घडामोडींचा विचार करताना प्रामुख्याने लक्षात ठेविले पाहिजे. इतके मोठे परिवर्तन सात-आठ वर्षांत घडवून आणले असूनही श्री पाटील यांच्यासारख्या मार्मिक त्रयस्थास चीनमधील शेतीचा व्यवहार सर्व सुरळीत चालला होता असे भासले.

राज्ययंत्राचे संपूर्ण एकवटलेले बळ धोरणामागे असल्याखेरीज एवढे मोठे देशव्यापी परिवर्तन घडून येणे केवळ अशक्य. याकरिता चीनमधील सहकारी शेतीचा प्रसार सरकारी धोरण व मदत यांवर अवलंबून होता हे नमूद करणे खरोखर अनावश्यक वाटावे. पण श्री पाटील ते आग्रहाने नमूद करतात याचे कारण उघड आहे. जमिनीची समविभागणी, परस्परसाहाय्य, सहकारी शेती या सर्वांबाबत चीनमध्ये अमलात आलेल्या धोरणांच्या घोषणा भारतीय नियोजन-मंडळाने अनेक वर्षांपूर्वी केलेल्या श्री पाटील यांस माहीत होत्या; आणि म्हणून चीनमधील बदललेली परिस्थिती व भारतीय निष्क्रियता यांतील फरक हा, घोषणा करणारे सरकार व कार्यान्वित होणारे सरकार यांतील खरा फरक आहे हे त्यांनी ओळखले व मांडले.

## चिनी व भारतीय सरकार यांतील फरक

सरकारी धोरण व मदत यांवर भर देत असताच चिनी व भारतीय सरकारांची लोकांबाबतची वृत्ती व कार्यपद्धती यांतील भिन्नत्व हेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. यासंबंधी विवेचन करीत असता नवीन धोरण ठरले म्हणजे भारत सरकार कायदा करते व चिनी सरकार चळवळ सुरू करते, या श्री मोरेस यांच्या मताचा उल्लेख श्री पाटील यांनी केला आहे. अर्थात भारत सरकार कायदाही नेहमी ताबडतोब व निःसंदिग्ध करते असे नाही. चिनी सरकार मात्र चळवळ त्वरेने व मोठ्या प्रमाणावर अगदी देशव्यापी मोहिमेच्या स्वरूपाची सुरू करते. जनमत-परिवर्तनास दिलेले महत्त्व हा चिनीराज्ययंत्राचा उत्कट विशेष समजला पाहिजे. याबाबत सर्व निरीक्षकांचे ऐकमत्य आहे. कोणतीही गोष्ट घडवून आणावयाची तर ती प्रथम पद्धतशीर रीतीने लोकांस समजावून सांगावयाची, वारंवार हरतऱ्हेने तिचा ठसा जनमनावर सारखा उमटवीत राहावयाचे, देशभर विखुरलेल्या सर्व स्थानिक कार्यकर्त्यांस नवीन धोरणांचे स्पष्टीकरण व अंमलबजावणी यांत वाकबगार बनवावयाचे व नंतरच कायदेशीर अंमलबजावणीस प्रारंभ करावयाचा, ही चिनी सरकारी कार्यपद्धती. यामुळे लोकशिक्षण हे सर्व कारभाराचे एक प्रमुख अंग बनून राहिले आहे व या शिक्षणाचे तंत्र तेथे फार प्रभावी बनले आहे. या तंत्राचा दुरुपयोगही करता येतो हे खरे. पण लोकांस पूर्णपणे समजावून व शिकवून परिवर्तन खरोखर घडवून आणणारी हुकूमशाही व केवळ सोज्वळ घोषणा करून व कागदी घोडे नाचवून स्वतःस कृतकृत्य मानणारी लोकशाही या दोहोंची प्रत्यक्षात तुलना केली असता लोकशाही व हुकूमशाही या संज्ञांचा अर्थ व व्याप्ती याबद्दल निश्चित विधान करणे कठीण ठरते.

## कॉम्युनिस्ट पक्षाचा वाटा

चीनमधील परिवर्तनात कॉम्युनिस्ट पक्षाने उचललेला वाटा अतोनात महत्त्वाचा आहे. किंबहुना कॉम्युनिस्ट पक्षाने, पक्षाच्या लाखो सभासदांनी व पक्षाच्या यंत्रणेनेच हे परिवर्तन घडवून आणले. कोणत्याही साध्या राज्ययंत्रणेस—शासनसंस्थेस—हे साध्य झाले नसते. चीनमधील पूर्वीची राज्ययंत्रणा कधीच फारशी प्रभावी अगर कार्यक्षम नव्हती. चाळीस वर्षांच्या अंदाधुंदीच्या काळानंतर तर ती अनेक ठिकाणी जवळजवळ नामशेष झाली होती; आणि जेथे अस्तित्वात होती तेथे अगदी खिळखिळी झाली होती. अशा परिस्थितीत पक्षीय संघटना ही एकच प्रभावी शक्ती देशात उरलेली होती. अनेक

वर्षांच्या लढ्यात तावूनसुलाखून निघालेले कर्तबगार पुढारी, जपान्यांविरुद्ध व नंतर कुओमिंगटांगविरुद्ध मोहिमांत ठिकठिकाणी प्रस्थापित झालेली पक्षकेंद्रे, प्रतिकूल परिस्थितीतील झगड्यात निर्माण झालेली शिस्तीची व स्वार्थत्यागाची पक्षसभासदांतील भावना, या सर्वांचा क्रांती झाल्यानंतरच्या काळात पुरेपूर उपयोग चिनी कॉम्युनिस्ट राजसत्तेने करून घेतला, हे स्वाभाविक झाले, साहजिक झाले. खरी आश्चर्याची गोष्ट ही की, सत्तारूढ झाल्यानंतरही सत्तेचा मद न चढता, सुखलोलुप न होता पक्षसदस्यांतील शिस्त, कार्यशक्ती व कार्यक्षमता अविरत टिकून राहिली आणि पक्षसंघटनेचे सामर्थ्य व व्याप्ती ही सारखी वाढतच गेली. आपण सत्ता प्राप्त करून घेतली ती एक महान आर्थिक व सामाजिक क्रांती प्रत्यक्षात घडवून आणण्याकरिता ही जाणीव सतत बाळगून, ठायी ठायी प्रत्येक अंगोपांगात क्रांतीचे दर्शन घडविण्याचा दीर्घोद्योग करीत राहणे व हे शक्य तोवर लोकशिक्षणाच्या, मतपरिवर्तनाच्या मार्गाने घडवून आणणे हे कॉम्युनिस्ट पक्ष, पक्षाचे लाखो सभासद व त्यांच्या हातांतील राज्ययंत्रणा करू शकले हाच चीनमधील खरा चमत्कार. हे झाल्यामुळेच श्री पाटील यांस देशभर उत्साह व हुरूप दिसला, चर्चा व सभांची गर्दी आढळून आली. श्री पाटील यांनी विस्तृतपणे वर्णिलेल्या सहकारी शेतीच्या प्रयोगापेक्षाही पेकिंगमधील रिक्षावाल्यांचे व्यवसाय-परिवर्तन कसे घडवून आणले आणि देशातील वेश्याव्यवसायाचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न कोणत्या प्रकारे करण्यात येतात याचे श्री पाटील यांनी केलेले वर्णन वाचकांस अधिक उद्बोधक वाटेल. तसेच सहकारी शेतीतील उत्पादनवाढीच्या वर्णनापेक्षा श्री पाटील यांच्या सबंध प्रवासात त्यांस हॉटेलातही कधी कोणी बक्षिसी मागितली नाही याचे महत्त्व अधिक वाटेल.

श्री पाटील यांस भासलेला चीनमधील आणखी एक फरक म्हणजे राज्यसेवक व अधिकारी यांच्या वृत्तीबाबतचा. कमी पगारावर, जनतेच्या राहणीप्रमाणेच राहणारे चिनी अधिकारी कर्तव्यदक्ष होते, जनतेशी समरस होऊन आपली कार्ये सहकार्याने करीत होते, करवून घेत होते हे नावीन्यपूर्ण दृश्य श्री पाटील यांनी त्या देशात पाहिले. क्रांती-उत्तर परिस्थिती व कॉम्युनिस्ट पक्षाची कार्यक्षमता व बल ही लक्षात घेता सरकारी सेवक व अधिकारी यांची वृत्ती बदलली असल्यास फारसे आश्चर्य नाही. तरी पण या वृत्तीचे मोठमोठ्या योजना पार पाडण्यात अत्यंत महत्त्व आहे हेही तितकेच निर्विवाद आहे.

## चीन आणि भारत येथील आर्थिक विकास

श्री पाटील यांनी चीन व भारत या दोन देशांतील आर्थिक विकासयोजनांची तुलना विस्ताराने केली आहे, ही वाचकांस खास उद्बोधक वाटेल. वर निर्देशलेले चिनी परिस्थितीतील विशेष लक्षात घेता आपल्या मागासलेपणाबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. या देशात खरोखर क्रांती अशी घडूनच आलेली नाही. राज्ययंत्रणा, अधिकारी व सेवक यांची वृत्ती व कार्यक्षमता या सर्व परंपरागत ब्रिटिश राजवटीत होत्या तशाच त्या टिकून आहेत. स्वातंत्र्याच्या लढ्यात काही काळ प्रतीत झालेला ध्येयवाद नाहीसा झाला आहे. सर्वांत थोर पुढाऱ्यांचे ठायीही स्वार्थत्यागाची तयारी, सचोटीबद्दल कटाक्ष व प्रत्यक्ष कार्य घडवून आणण्याबद्दल तळमळ ही दिसत नाहीत, मग सामान्य पक्षानुयायांबद्दल काय म्हणावे! खरा फरक याबाबतचा आहे. कार्यक्रम व कार्यपद्धती यांमधील भिन्नता याच्यापुढे गौण मानली पाहिजे.

चिनी क्रांतीबाबत निवेदन करताना एक मुद्दा नेहमी पुढे मांडण्यात येतो, तो हा की ही क्रांती हिंसात्मक मार्गाने घडून आली, हुकूमशाही राज्ययंत्रणेने घडवून आणली व टिकविली. आपणास लोकशाहीचा अवलंब करावयाचा तर चिनी मार्ग आपणास अनुसरता येणार नाही. हा प्रश्न श्री पाटील यांनीही उपस्थित केला आहे. प्रश्नाची ही नेहमीची मांडणी मला अप्रस्तुत वाटते. प्रत्येक

देशाचा इतिहास व त्यातील परिस्थिती इतकी भिन्नभिन्न असतात की, एकाचा मार्ग तंतोतंत दुसऱ्यास अनुसरणे कधीच शक्य नसते. खरा प्रश्न हा की, आजच्या आपल्या परिस्थितीत जनतेच्या दारिद्र्याची व लाचारीची चीड येऊन ध्येयवादाने सतत कार्यान्वित झालेले पुरेसे पुढारी मिळतील का? शुद्ध चारित्र्याच्या, लीन वृत्तीच्या व समंजस सार्वजनिक कार्यकर्त्यांची साखळी निर्माण करता येईल का? सरकारी यंत्रणा पूर्ण लोकाभिमुख राहील का? असल्या प्रश्नांचे उत्तर लोकशाही विरुद्ध हुकुमशाही या प्रश्नाशी निगडित आहे असे मला वाटत नाही. खरोखर हा प्रश्न राष्ट्रीय चारित्र्याचा, जनमनाचा, धुरीणांच्या वृत्तीचा आहे. शतकानुशतके चिरफाळलेला असा आपला समाज आहे. प्रत्येक गटाने आपल्यापुरता विचार करून आपले स्थान सांभळून राहावे ही प्रवृत्ती या परिस्थितीमुळे आमच्या हाडीमासी खिळली आहे. आम्हांस कशाची चीड येत नाही, हेही आमच्यातील थोरांच्या मनांत दलितांबद्दल एकात्मतेची भावना नाही, त्यांशी ते समरस होऊ शकत नाहीत याचेच द्योतक आहे. आमच्या अधिकाऱ्यांच्या वृत्तीचा उगम याच परिस्थितीतील आहे. आमची सहिष्णुतासुद्धा बेफिकिरीच काय अशी शंका कधी कधी मनात डोकावते.

असो. मी शेवटी उद्धृत केलेल्या प्रश्नांचे श्री पाटील यांनी फारसे विवेचन केले नाही. तरी त्यांच्या लिखाणातून ते उत्पन्न होतात. तेव्हा इतके माहितीपूर्ण, उद्बोधक व विचारप्रवर्तक पुस्तक मराठीतून लिहिल्याबद्दल श्री पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करून ही काहीशी लांबलेली प्रस्तावना संपवितो.

पाटील, रा. कृ., *'भारत आणि चीन'* (उमरावती : महाराष्ट्र प्रकाशन), १९५८, पृ० ५–९.

☆

# विभाग : २

## भारतीय

## अर्थशास्त्र

# १ . . हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास
## [अर्वाचीन विभाग - इ. स. १८५० ते १९३०]

### १. उपोद्घात

गेल्या दीडशे वर्षांत सर्व जगभर आर्थिक व्यवहारात व व्यवस्थेत फार मोठी क्रांती घडून आली आहे ही गोष्ट सर्वश्रुत आहे. या क्रांतीस स्थूल मानाने इ. स. १७५० चे सुमारास इंग्लंडमध्ये प्रारंभ झाला असे समजण्यात येते. हिचे परिणाम इतर देशांत लगेच दिसून आले नसले, तरी नेपोलियनचा पराभव होऊन युरोपात शांतता प्रस्थापित झाल्यावर या अर्वाचीन यांत्रिक युगास इतर युरोपीय देशातही प्रारंभ झाला; आणि यांत्रिक उत्पादन व कारखान्याची पद्धती (Factory System) यांचा शिरकाव जिकडेतिकडे होऊ लागला. काही देशात हळूहळू तर काही देशांत फार झपाट्याने, काही देशांत प्रत्यक्ष नवीन उद्योगधंदे प्रस्थापित होऊन व जुन्या धंद्यांचे परिवर्तन होऊन, तर काही देशांत इतर ठिकाणच्या यांत्रिक उत्पादनामुळे जुने धंदे डबघाईस येऊन या नवीन युगाचे परिणाम जगभर दृष्टोत्पत्तीस येऊ लागले. यांत्रिक शोधांमुळे घडून आलेला फरक जरी विशेषतः औद्योगिक उत्पादनात दिसून आला, तरी त्यामुळे व्यापार व शेती यांचे स्वरूपही फार पालटले. अशा या विश्वव्यापी व नानास्वरूपी क्रांतीचा हिंदुस्थानावरही परिणाम घडून आला हे सांगावयास नको. अर्थात इतर देशांप्रमाणेच हिंदुस्थानातसुद्धा आर्थिक उत्पादन, आर्थिक व्यवहार व आर्थिक संघटना यांचे स्वरूप गेल्या शंभर वर्षांत फार बदलले आहे. याच परिवर्तनाचा इतिहास थोडक्यात सांगण्याचे येथे योजिले आहे.

ऐतिहासिक कालाचे आपण आपल्या सोयीकरिता जरी निरनिराळे विभाग कल्पितो, तरी मानवेतिहासात मागच्याशी पुढचा संबंध इतका निकट असतो व एकंदर कारणपरंपरा इतकी अखंड असते की, अमुक काळी एक युग संपले व दुसरे सुरू झाले असे म्हणण्याचा प्रयत्न करणे खरोखर हास्यास्पद होईल. म्हणून हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासास प्लासीच्या समरांगणावर सुरुवात झाली, की १८१८ साली मराठ्यांचा पुरा पाडाव करून इंग्रज हिंदुस्थानचे खरे अधिराज बनले तेव्हा झाली, की अगदी अलीकडे कंपनी सरकारचे आयुष्य संपल्यावर झाली, असले वाद सारखे चालू राहणारच. तथापि या वादांत येथे शिरण्याचे कारण नाही. आपल्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सर्व हिंदुस्थानभर आर्थिक उत्पादनाच्या व व्यवहाराच्या नवीन कल्पना व पद्धती यांस सुरुवात केव्हा झाली हे निश्चित करणे हा होय. परंतु त्यांतही हिंदुस्थान देश एवढा अफाट आहे व या देशातील निरनिराळ्या भागातील स्थित्यंतरे इतक्या भिन्न वेळेस घडून आली आहेत की, काही भागांच्या दृष्टीने एक मर्यादा बरी वाटली, तर इतर भागांच्या दृष्टीने ती सोयीची वाटणार नाही. तेव्हा साधारणपणे आपणांस एवढेच म्हणता येईल की, आगगाड्यांच्या कालापूर्वी म्हणजे इ. स. १८५० च्या पूर्वी आर्थिक घटनेत विशेष फरक घडून आला नव्हता आणि यानंतरच नवीन आर्थिक स्थित्यंतर सर्व देशभर झपाट्याने सुरू झाले. तेव्हा एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्धच विशेषतः येथे विचारात घेतला जाईल.

तथापि या अर्वाचीन कालात काय काय घडामोडी झाल्या व त्या कसकशा घडून आल्या हे समजून घेण्यास तत्पूर्वी एकंदर हिंदुस्थानची आर्थिक घटना व आर्थिक व्यवहार यांचे स्वरूप कसे होते याचे थोडक्यात दिग्दर्शन करणे आवश्यक आहे. गेल्या दीडशे वर्षांत घडून आलेल्या जागतिक क्रांतीचे दोन विशेष आहेत. एक औद्योगिक उत्पादनाच्या पद्धतीत पडलेला फरक, व दुसरा विशेष म्हणजे त्यामुळे आर्थिक व्यवहाराचे सारखे वाढत असलेले क्षेत्र. यावरून प्रस्तुत क्रांतीस औद्योगिक व व्यापारी क्रांती असे दुहेरी नाव कधी कधी देण्यात येते. परंतु या दोन्ही फरकांचा इतका निकट संबंध आहे की, व्यापारी क्रांती घडून आल्याखेरीज औद्योगिक क्रांतीस वाव नाही असेच म्हणणे अधिक योग्य होईल.

जुन्या हिंदी आर्थिक घटनेत व आजकालच्या घटनेत खरा फरक म्हटला म्हणजे या आर्थिक व्यवहाराच्या क्षेत्रासंबंधीच होय. जुन्या काळी हे क्षेत्र फार आकुंचित होते, हल्ली ते फार विस्तृत झाले आहे. आपल्या समाजाचा पाया पूर्वीपासून आपल्या खेडेगावांवर उभारलेला आहे व आजही खेड्यांचे महत्त्व कायम आहे. मात्र अलीकडे याचे स्वरूप फार बदलले आहे. ही खेडी शंभर वर्षांपूर्वी जवळ जवळ सर्वस्वी स्वयंपूर्ण व स्वावलंबी होती. त्यांची घटनाच अशा प्रकारची होती की, देशावरून केवढ्याही मोठ्या वावटळी गेल्या तरी त्यांचा ग्रामजीवनास फारसा धक्का लागू नये. ग्रामाधिकाऱ्यांसच अनेक प्रकारचे मुल्की अधिकार असत आणि गावातल्या गावातच तेथील भांडणतंटे तोडण्याची व्यवस्था केलेली होती. गावात जे पिके तेच तेथील लोक खातपीत असत, आणि मीठ व लोखंड यांसारखे काही जिन्नस सोडल्यास पंचक्रोशीतल्या पंचक्रोशीतच एकंदर लोकांच्या सर्व गरजा भागत असत. या गावगाड्याचे अगदी पूर्ण स्वरूप पाहावयाचे तर ते दक्षिणेतील अलुत्या-बलुत्यांच्या व्यवस्थेत दिसून येते. अलुते-बलुते हिंदुस्थानच्या सर्वच भागांत आढळते असे नाही. आसाम व बंगाल या प्रांतांत त्यांचा पूर्ण अभाव दिसून येतो; तर इतर प्रांतांतून त्यांची संख्या व हक्क याच्यासंबंधी बरेच फरक आढळून येतात. परंतु ग्रामाधिकारी व ग्रामजीवनास आवश्यक असलेला कारागीरवर्ग यांस जमिनीचा अथवा पिकाचा भाग देऊन त्यांस ग्रामसंस्थेत निगडित करण्याचा प्रकार मात्र सर्रास जिकडेतिकडे आढळून येतोच येतो. हे हिंदी ग्रामसंस्थेचे स्वरूप मूळ कोणत्या कारणाने बनले गेले हे निश्चित सांगता येत नाही. वाहतुकीच्या मार्गांची अल्पता व एकंदर अंतर्गत व्यापारातील अडचणी यामुळे खेडेगावांस विशेष स्वावलंबी बनविण्याकडे प्रवृत्ती झाली असावी. अलुत्या-बलुत्याच्या पद्धतीमुळे प्रत्येक खेडेगावातील आर्थिक जीवनाचा व घटनेचा एक साचाच ठरून गेल्यासारखा होता. शेतकरी व इतर वर्ग यांचे परस्पर संबंध व यांच्या संख्येचे परस्पर प्रमाण ही प्रत्येक भागातील खेड्यापाड्यांकरिता बांधली गेली होती. तेव्हा प्रांताप्रांतातील अथवा खेड्याखेड्यातील व्यापार याचे प्रमाण अगदी अल्प राहणे साहजिक होते. कोठे शेतीवरच विशेष भर, तर काही प्रदेशांत उदीम-धंद्याचेच केंद्रीकरण झालेले, असा प्रकार हिंदुस्थानात आढळून येत नसे.

आपले आर्थिक व्यवहाराचे एकंदर क्षेत्र फार आकुंचित असण्याचे एक कारण आपल्या ग्रामजीवनाची रेखीव व्यवस्था हे झाले, आणि दुसरे कारण म्हणजे वाहतुकीच्या साधनांचा आभाव हे होय. साधारणपणे खुष्कीच्या मार्गांपेक्षा जलमार्ग हे व्यापारास जास्त सोइस्कर, सुलभ व स्वस्त असेच आढळून येतात. विशेषतः आगगाड्यांचा प्रसार होण्यापूर्वी या दोन प्रकारच्या भागांतील अडचणी व खर्च यांमधील तफावत फारच मोठी होती; आणि हिंदुस्थानच्या तर बऱ्याच भागात जलमार्गांचा विशेषच अभाव आपणांस दिसून येतो. देशाच्या विस्ताराच्या मानाने समुद्रकिनाऱ्याची लांबी कमी असून समुद्रकिनाऱ्याच्या बऱ्याच भागावर जलमार्ग धोक्याचा असे. गंगा, ब्रह्मपुत्रा व सिंधू सोडल्या तर ज्यांच्यायोगे दूर पावेतो व्यापार करिता येईल अशा नद्याही नाहीत. इंग्लंड व जपान यांच्यासारख्या बेटांचा समुद्रकिनारा अथवा रशिया व चीन या देशांतील मोठमोठ्या नद्यांचे व्यापारी महत्त्व ध्यानात

घेतले, म्हणजे वाहतुकीच्या मार्गात हिंदुस्थानात केवढ्या मोठ्या अडचणी होत्या, हे सहज दिसून येईल. तसेच पुष्कळ मनुष्यबळ खर्चून जरी पिकांकरिता पाटबंधारे व कालवे जुन्या व नव्या हिंदी राज्यकर्त्यांनी बांधले, तरी ते वाहतुकीच्या कार्यास उपयोगी पडण्यासारखे बांधता येणे सहज शक्य नसे.

याचा परिणाम एकंदर अंतर्गत व्यापारावर होणे स्वाभाविक आहे. हा अंतर्गत व्यापार फार संकुचित होता. देशातील एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात माल जाणे फारसे सोपे नव्हते. मालाच्या वाहतुकीचे साधन म्हणजे बैलांचे अथवा उंटाचे तांडे हेच असे. पक्क्या सडका कोठेच झालेल्या नसल्यामुळे पावसाच्या दिवसात रहदारी जवळजवळ अजिबात बंद करावी लागत असे. कलकत्त्याहून उमरावतीस माल यावयाचा म्हणजे तो मिर्झापूरपर्यंत बोटीने येई व बैलांच्या तांड्यांमार्फत उमरावतीकडे जाई. १९ व्या शतकाच्या प्रारंभी यासंबंधी स्थिती काय होती हे बुकॅनन, मनरो इत्यादी ग्रंथकारांनी जी सविस्तर वर्णने लिहून ठेविली आहेत त्यांवरून लक्षात येण्यासारखे आहे. विशेषतः अठराव्या शतकात हिंदुस्थानभर माजलेल्या बेबंदशाहीच्या काळात व्यापारास अडथळे उत्पन्न होऊन त्याची एकंदर घडी विसकटणे साहजिकच होते. यामुळे काही किराणा माल, कापड, अफू, नीळ वगैरे गोष्टी सोडून दिल्यास व्यापार असा काही नव्हताच असे म्हटले तरी चालेल. विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की, त्यामुळे एका प्रांतातील किमती व बाजारभाव यांचा शेजारच्या इतर प्रांतातील किमती व बाजारभाव यांच्याशी काहीएक संबंध नव्हता. हिंदुस्थानभर धारणीचे मान आज जवळजवळ सारखेच आहे असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु याच्या उलट शंभर वर्षांपूर्वी अशी स्थिती होती की, खानदेशात जरी सुबत्ता असली तरी पुणे जिल्ह्यात धारण दुष्काळी झालेली असावी. म्हणजे दुष्काळ हा लहानसहान क्षेत्रापुरतासुद्धा पडणे शक्य होते; कारण धान्य वाहून नेणे दुरापास्त व अत्यंत खर्चाचे असे.

हे खेडेगावांबद्दल झाले. हिंदुस्थानातील जुन्या काळातील शहरे, त्यांचे स्वरूप व महत्त्व हा प्रश्न किंचित वादग्रस्त आहे. या वादाचा थोडासा ऊहापोह पुढे करू. येथे एवढेच नमूद करणे जरूर आहे की, ही शहरे उद्योगधंद्याच्या पायावर वसलेली अशी सहसा नसत. शहरांचे निरनिराळे प्रकार कल्पिले तर काही धार्मिक महत्त्व त्यांस मिळाले म्हणून, तर काही व्यापारी महत्त्व लाभले म्हणून नावारूपाला आलेली. परंतु मिर्झापूर अथवा सुरत यांसारखी केवळ व्यापारामुळे प्रसिद्धीस आलेली शहरे फार विरळा. बहुतेक जुनी शहरे म्हणजे लष्करी छावणीवजा होती. राजसत्तेचे अधिष्ठान आहे, दरबारी मंडळीचा आश्रय आहे म्हणून ज्यांस स्थानमाहात्म्य प्राप्त झाले अशाच प्रकारची हिंदी शहरे बहुधा असत. या विधानाची सत्यता सिद्ध करणारा मुख्य पुरावा म्हणजे राजसत्तेचा ऱ्हास वा स्थलांतर झाल्यावर या शहरांची स्थिती कशी होत असे हेच होय. पैठण, विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर अशा महाराष्ट्रातील जुन्या प्रमुख शहरांचा इतिहास पाहिला तर हेच दिसून येईल. धामधुमीच्या काळात तर शहरे झटकन मोडकळीस येत.

शहरांची स्थिती व व्यापार ह्या एकंदर बाबींवर नाना फडणविसांच्या वकिलाने त्यांस दिल्लीहून इ. स. १७८७ साली लिहिलेल्या एका पत्रातील खालील उताऱ्यावरून बराच प्रकाश पडेल :[1]

'पत्रीं आज्ञा कीं,...पूर्वी मिनेगार दागिने करावयाचे, नक्षे कमलाचे वगैरे पाठविले, ते कोठें आहेत हें लिहून पाठवावें. यंदा मेवा, नासपातीं व द्राक्षें वगैरे चांगला पाठवून द्यावा म्हणून पत्रीं आज्ञा ...हल्लीं इकडील सविस्तर आमचे यजमानास ही विनंती लिहिली आहे, त्याजवरून ध्यानारूढ होईल. विलायती मेवा यंदा उशीरा आला, व कांहीं पांचसात उंट मार्गात लुटले गेले, व गरमीचे दिवस समीप आले. एक्या महिन्याचे मुदतीनें मेवा न पोंहचे, व मार्गातच सडून जाई, म्हणून विलायतचे

१. *इतिहाससंग्रह – ऐतिहासिक टिप्पणे*, भाग २, पृ० ९५.

मेवेफरोशाही सांगितले, त्याजवरुन नासपातीं व द्राक्षें न पाठविली...व मिनेगार दागिने करावयाचे नक्षे कमळाचे वगैरे पाठविले ते कोठें आहेत म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास ते नक्षे आम्हांस ठाऊक नाहींत,...व कारागीर मिनेगार वगैरे हरयेक माणूस पेशजीं दिल्लीस होते, ते तीन वर्षे काळ पडला, याजकरिता कांहीं उपासानें माणसें मेली. कांहीं लखनऊकडे उठोन गेली. दिल्ली आता आपण पाहिली होती, तशी राहिली नाहीं. नजाफत व कारागिरी व चांगली वस्तू, पूर्वी आपण पाहिली आहे, त्याचप्रमाणें आता कांहीं दृष्टीस पडत नाहीं. उगेंच दिल्लीचें नांव मात्र राहिले आहे. इ."

या शहरांतील एकंदर उद्योगधंद्यांची तऱ्हा पाहिली असतासुद्धा असे दिसून येईल की, त्यांची उभारणी केवळ नागर लोकवस्तीचे मागणीवरच अवलंबून होती. निरनिराळ्या प्रकारच्या कळाकुसरीच्या धंद्यांत हिंदी कारागिरांनी अत्यंत प्रावीण्य मिळविले होते ही गोष्ट प्रसिद्ध आहे. परंतु हे धंदे म्हणजे राजेरजवाडे, सरदार-दरकदार यांच्याच आश्रयाने मुख्यत्वे वाढणारे असत, ही गोष्ट विसरता कामा नये. जरतार, कलाबतू, मलमल, शाली, मिन्याचे अथवा जडावाचे काम, चंदनी लाकडाचे अथवा हस्तिदंती नक्षीकाम ह्या व अशा अनेक चिजा तयार करणाऱ्या कारागिरांची उपजीविका राजाश्रयावर अवलंबून असे हे उघड आहे. सामान्य जनतेस लागणाऱ्या सर्व वस्तूंची पैदास खेड्यांतल्या खेड्यांतच होत असे. नाही म्हणावयास काही कापडाच्या पेठा विशेष महत्त्वास चढलेल्या दिसतात. परंतु कापडाच्या या मोठ्या पेठांची मागणीसुद्धा बरीचशी नागर व दरबारीच असे. उदाहरणार्थ, नागपूरचा रेशिमकाठी माल पुण्यास दुसऱ्या बाजीरावाच्या अमदानीत अतोनात खपत असे. परंतु तेच पेशवाई बुडाल्याबरोबर पुण्याहून मागणी फार कमी झाली; व ही सर्व मागणी दरबारावर किती अवलंबून असे हे जेंकिन्सने ब्रिथूरला म्हणजे बाजीरावाकडे नागपुरी माल १८२८ त किती जात असे याविषयी दिलेल्या आकड्यांवरुन स्पष्ट दिसून येते. साधारणपणे जाडेभरडे कापड हा एकच जरा विशेष महत्त्वाचा व्यापारी माल होता. प्रत्येक खेडेगावात कोष्टी असेच असे नाही. कोष्टयांचा समावेश अलुत्याबलुत्यांत होत नसे. तेव्हा निरनिराळ्या भागांतून कोष्टयांच्या निरनिराळ्या महत्त्वाच्या पेठा ठरलेल्या असत. या पेठांतील माल जत्रा, उरूस वगैरे निमित्ताने त्या त्या भागांतून विकला जात असे. तथापि जाड्याभरड्या कापडविक्रीचे क्षेत्रही फार विस्तृत नव्हते. कारण जवळजवळ प्रत्येक जिल्ह्यात मोठमोठ्या पेठा असत व जाडेभरडे कापड फारसे दूरवर पोचत नसे. आर्थिक व्यवहाराच्या संकुचित क्षेत्रामुळे खाणेपिणे, पोशाख व राहणी या बाबतीत स्थानिक फरक किती तरी आढळून येत. मुख्य धान्य, खाण्याचे तेल, अथवा लुगड्यांचा वाण या सर्व गोष्टी स्थानिक पैदाशीवर अवलंबून असत. मापे व वजने गावोगावी निराळी ठरणे हेही याचेच द्योतक होय.

ब्रिटिश अमलास सुरुवात झाल्याबरोबर जुनी सामाजिक व राजकीय व्यवस्था मोडकळीस येण्यास प्रारंभ झाला. आर्थिक बाबतीतही दोन-तीन प्रकारचे परिणाम चटकन दिसून येऊ लागले. ग्रामसंस्था विस्कळित होऊ लागणे हा नवीन प्रस्थापित झालेल्या राजसत्तेचाच परिणाम होता. आजपर्यंत चालत आलेल्या हिंदी राजांची पद्धती निराळी व इंग्रजांची निराळी. ग्रामाधिकारी व ग्रामसंस्था यांच्यामार्फतच बराच कारभार करवून घेण्याकडे जुन्या राज्यकर्त्यांचा कल असे. इंग्रज राज्यकर्त्यांस असे करणे शक्य नव्हते. सर्व सत्ता केंद्रीभूत होऊन थोड्या इंग्रज अमलदारांच्या हुकमतीत निरनिराळ्या प्रांतातील कारभार एकजात व एकतंत्री पद्धतीने चालणे हे इंग्रजी साम्राज्याचे खरे स्वरूप. तेव्हा या नवीन राजवटीत स्थानिक स्वराज्यसंस्थांचा पूर्णपणे ऱ्हास होणे हे अत्यंत साहजिकपणे घडून आले. स्थानिक संस्थांच्या ऱ्हासाबरोबरच इंग्रजी पद्धतीच्या न्यायमंदिरांची प्रस्थापना झाली व कायदेकानू निश्चित केले गेले. 'दामदुप्पट'सारखे नियम अथवा गावातल्या गावात तंटे तोडण्याची सोय या गोष्टी नाहीशा

झाल्या. जुन्या राजवटीत उत्कर्षास आलेले व्यवसाय व घराणी रसातळास गेली आणि नवीन व्यवसायांची व नवीन कल्पनांची माणसे पुढे सरसावली. पेशवाईत कर्ज वसूल करण्यास न्यायमंदिराकडे धाव घेता येत नसे. आता इंग्रजी कायद्यामुळे या गोष्टी शक्य झाल्या आणि त्यामुळे ऋणको व धनको यांचेमधील संबंध नवीन प्रकारचे बनले गेले. देशातील लढाया बहुशः बंद झाल्या, चोरा-चिलटांचा उपद्रव कमी झाला; व त्यामुळे लोकसंख्या वाढीस लागली. या एकंदर राज्यपद्धतीतील फरकाप्रमाणेच अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे सरकारचे जमीनमहसुलासंबंधीचे धोरण ही होय. अव्वल इंग्रजीतील ब्रिटिश अमलदार येथील मुल्की कारभारात साहजिकपणे अनभिज्ञ होते; व इतर गोष्टींप्रमाणेच मुल्की कारभारातही इंग्रजी परिस्थितीवरून बांधलेल्या कल्पनांवरूनच प्रथम प्रथम त्यांनी आपली मुल्की पद्धती बसविली. पुढे जसजसे निरनिराळे बरेवाईट अनुभव आले, निरनिराळ्या अधिकाऱ्यांचे विचार जसजसे बनत गेले, त्याप्रमाणे निरनिराळ्या भागांतील मुल्की व्यवहारास वळण लागले. बंगाल्यातील जमीनदारी, पंजाबमधील व संयुक्त प्रांतातील ग्रामसंस्थेमार्फत जमीनदारी, मद्रास इलाखा व मुंबई इलाखा येथील रयतवारी, मध्य प्रांतातील मालगुजारी, अशा प्रकारचे भिन्न भिन्न प्रकार बनले. हे प्रकार बनत असताना एकंदर समाजव्यवस्थेत मोठमोठे फरक घडून आले. काही वर्गाचा अतिशय फायदा झाला, तर इतरांचा फार तोटा झाला. याशिवाय दुसरी बाब म्हणजे जमीन-महसूल आकारण्यासंबंधीचे धोरण ही होय. जुन्या वसुलाचे आकडे हे कितपत खरे अथवा खोटे, कितपत ऐनवसुलीचे अथवा कितपत कमालमर्यादेचे याची इंग्रज अमलदारांस नीटशी कल्पना नव्हती; व एकंदर बऱ्याच लढाया लढाव्या लागल्यामुळे कंपनीस पैशाची नड सारखी भासत असे. यामुळे प्रथम जो जमीनमहसूल आकारण्यात आला तो बहुतेक सर्व प्रांतांत बेसुमार होता. हा बेसुमार जमीन-महसूल सक्तीने वसूल करण्यात किती जुलूम होत आहे व त्यामुळे शेतकऱ्यांची किती हलाखीची स्थिती होत आहे हेही या ब्रिटिश अमलदारांस कळून येत नव्हते. याच सुमारास, म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, सर्वच मालाच्या किमती थोडथोड्या कमी होत होत्या, म्हणजे जमीनमहसुलाचा बोजा (जमीनमहसूल पैशांत आकारला असल्यामुळे) सारखा वाढतच होता. एकंदरीत ब्रिटिश राजसत्ता प्रस्थापित झाल्यानंतरचा काही काळ प्रत्येक प्रांतात धामधुमीचा, हलाखीचा व सामाजिक उलथा-पालथीचा असाच गेला. यानंतर विस्कळित झालेली घडी पुनः काहीशी बसली. जमीनमहसुलाचे मान थोडेसे कमी करण्यात आले, किमती चढू लागल्या, आणि आर्थिक स्थिती सुधारू लागली. परंतु त्याबरोबरच उद्योगधंद्यांत मोठमोठे फरक पडू लागलेच होते. पुणे दरबार मोडल्यामुळे कलेला उत्तेजन नाहीसे झाले, व कारागीरवर्ग अन्नान्नदशेस पोहोचू लागला. त्यातच यंत्रशक्तीने तयार केलेला नवा माल हिंदुस्थानात जास्त जास्त येऊ लागल्यामुळे आपले धंदे आणखीच बुडणार अशी स्पष्ट चिन्हे दिसू लागली. अंतर्गत व्यापारातील बरेचसे जुने अडथळे नाहीसे झाले होते. हळूहळू कंपनीसरकारने रस्ते बांधण्याचे कामही हाती घेतले. पुढे काय होणार याची बरीच कल्पना येऊ लागली. परंतु आग-गाडीच्या युगास आरंभ होण्यापूर्वी आमच्या आर्थिक जीवनात अगदी मूलभूत असा फरक घडून आला नाही. जुन्या राजवटीत व नवीन अमदानीत फार मोठा फरक होता. हा फरक पडल्यामुळे वर दर्शविल्या-प्रमाणे एक सामाजिक क्रांतीच घडून आली असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु आर्थिक बाबींत जो फरक घडून आला तो अजून फार महत्त्वाचा नव्हता. खेड्यांचे स्वयंपूर्ण स्वरूप व अंतर्गत व्यापाराचे संकुचित क्षेत्र ही दोन्ही अद्यापि बहुतेक प्रांतात कायम होती; व ही कायम असेपावेतो यांत्रिक युगाचा धक्का आमच्या देशास बसला होता असे म्हणता येत नाही.

## २. वाहतुकीच्या साधनांची वाढ व तिचे परिणाम

गेल्या प्रकरणात दर्शविल्याप्रमाणे हिंदुस्थानभर इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा परिणाम केव्हा होऊ लागला हे अगदी नक्की सांगणे कठीण आहे. परंतु परराष्ट्रीय व्यापारात जे काही ठळक ठळक फरक इ. स. १७५० च्या पुढे झाले, त्यावरून हा परिणाम कसा होत गेला व त्याचे क्षेत्र कसे वाढू लागले हे कळून येण्यासारखे आहे. युरोपीय राष्ट्रांचा हिंदुस्थानाशी जो प्रत्यक्ष व्यापारी संबंध आला तो प्रथम मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापारामुळे होय. मसाल्यास लागणाऱ्या मिरी वगैरे जिनसांचा व्यापार फार किफायतशीर असल्यामुळे तो आपल्या ताब्यात असावा असे प्रत्येक युरोपीय राष्ट्रास वाटत होते; आणि म्हणून तुर्कांनी भूमध्यसमुद्राच्या पूर्वेकडील सर्व प्रदेशाचा ताबा घेतल्यावर आशियात पोचण्याचा जलमार्ग शोधण्याची खटपट तिकडे सुरू झाली. पुढे जलमार्गाने जावा वगैरे बेटांशी दळण-वळण सुरू झाल्यावर ह्या गोऱ्या व्यापाऱ्यांस असे आढळून आले की, त्या बेटांत हिंदुस्थानच्या कापडास मागणी फार आहे व आपण त्यांस हे कापड पुरविल्यास आपला व्यापार फार सुकर होईल. एवढ्याच-करिता युरोपीय व्यापारी आपल्या वखारी हिंदुस्थानात स्थापू लागले. पुढे पुढे हिंदी कापड व हिंदी कलाकुसरीच्या जिनसा यांना खुद्द युरोपातच मागणी बरीच दिसून आली; आणि हा व्यापारही बराच मोठा व किफायतशीर झाला. उलटपक्षी हिंदुस्थानात युरोपीय वस्तूंचा फारसा खप होत नसे व हिंदुस्थानात सोनेचांदी पाठवूनच येथील माल युरोपीय व्यापाऱ्यांस विकत घ्यावा लागे. अगदी १७५० पावेतो ईस्ट इंडिया कंपनी दरवर्षी इतर मालापेक्षा सोन्याचांदीचीच आयात हिंदुस्थानात अधिक करीत असे. १७५७ च्या पुढे कंपनीच्या ताब्यात हिंदुस्थानातील बराच मुलूख आल्यानंतर ही सोन्याचांदीची आयात बंद झाली. १७९० च्या सुमारास कंपनीच्या हिंदी व्यापाराची स्थिती पाहिली असता असे दिसून येईल की, हिंदुस्थानातून यावेळपावेतो निर्गतीची खरी महत्त्वाची बाब म्हणजे कापड हीच होती. या वेळेस इंग्लंडमध्ये यंत्राच्या साहाय्याने सूत निघू लागले होते; पण मागाची यंत्रे अद्यापि प्रयोगावस्थेतच होती. एकंदरीत तिकडे कापडाचा धंदा ऊर्जितावस्थेत होता, परंतु उच्च दर्जाच्या हिंदी कापडाला अजून मागणी बरीच होती. कॅलिको, मलमल वगैरे कापड ही खरी महत्त्वाची बाब, याशिवाय रेशीम, साखर, सोरा, नीळ, या इतर निर्गतीच्या वस्तू होत्या. याच सुमारास आयात होत असे ती निरनिराळ्या, विशेषतः युरोपीय लोकांस लागणाऱ्या वस्तूंची. उदाहरणार्थ 'बीयर'ची व युरोपीय दारूची बरीच आयात होत असे. सारांश, हिंदुस्थानात परदेशी मालाचा खप फारसा नव्हता. आयातीतील लक्षात घेण्यासारख्या प्रमुख गोष्टी म्हणजे लोकरी कापड, तांबे आणि लोखंड व पोलाद या होत्या.

१८५० च्या सुमारास जर हिंदुस्थानच्या परदेशी व्यापाराची स्थिती पाहिली तर एवढ्या अवधीत केवढा मोठा फरक घडून आला होता हे आपल्या लक्षात येईल. उदाहरणार्थ १८४१–४२ सालचे आकडे घेतल्यास असे दिसून येते की, या वर्षी हिंदुस्थानातून कलकत्ता, मद्रास व मुंबई या तीन बंदरांतून १४ कोटी रुपयांचा माल परदेशी रवाना झाला होता. यांपैकी अफू, नीळ व कापूस या तीन जिनसांची निर्गत प्रत्येकी अडीच कोटी रुपयांवर झाली होती. बाकी उरलेल्यांत साखर सव्वा कोटी, रेशीम व रेशमी कापड एखादा कोटी व धान्य अर्धा कोटी या ठळक बाबी होत्या. आणि एकंदर निर्गत झालेल्या साध्या कापडाची किंमत पुरी अर्धा कोटीही नव्हती. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की, कापसाच्या एकंदर निर्गतीपैकी जवळजवळ अर्धी निर्गत चीन देशात झालेली होती. याच्या उलट फरक आयातीच्या बाबतीत पडला होता. १८४६ साली विलायतेतून हिंदुस्थानात ६·७० कोटी रुपयांचा माल आला, त्यातील मुख्य बाबी पुढीलप्रमाणे होत्या : कापड ३·३७ कोटी रुपये, सूत ८४ लक्ष रुपये, लोकरी कापड ५९ लक्ष रुपये, तांबे व पितळी माल ४५ लक्ष रुपये, लोखंड व पोलाद १६ लक्ष रुपये.

म्हणजे १८०० ते १८५० या पन्नास वर्षांत हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापारांत खरी क्रांती घडून आली. हिंदुस्थान बरेच कापड पुरवीत होते ते पुरवीनासे झाले आणि त्याऐवजी नीळ, अफू व कापूस यांची निर्गत करू लागले; आणि आयातीत इतर सर्व गोष्टींपेक्षा मँचेस्टरचे कापड हीच महत्त्वाची बाब होऊन बसली. परराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप १८५० पूर्वीच असे बदलले होते. पण याचा परिणाम हिंदी आर्थिक घटनेवर फारसा घडून आला नव्हता. कारण अजून परराष्ट्रीय व्यापाराचे एकंदर प्रमाण अल्प असून परराष्ट्रीय व्यापाराच्या फरकांचे परिणाम सर्व हिंदुस्थानभर दिसून येत नव्हते. निर्गतीच्या महत्त्वाच्या बाबींपैकी नीळ व अफू यांची पैदास काही विवक्षित क्षेत्रांतच होत असे; आणि यांच्या वाढत्या व्यापाराचा परिणाम जिकडेतिकडे फैलावला नव्हता. कापसाच्या निर्गतीची गोष्ट काहीशी निराळी होती. परंतु कापसाच्या निर्गतीचा परिणामही फार अल्प क्षेत्रावरच घडून आलेला होता. याचे कारण म्हणजे खुष्कीच्या मार्गाने वाहतूक करण्याची महार्घता हे होय. सबंध हिंदुस्थानातून होणाऱ्या कापसाच्या निर्गतीपैकी अर्धी निर्गत गुजराथेतून या काळी होत असे. कारण की, गुजराथेतील कापूस पिकणाऱ्या जिल्ह्यांतच उत्तम बंदरे होती. बहुतेक भडोच, सुरत, धोलेरा, भावनगर, घोघो या बंदरांतून हा कापूस निर्गतीकरिता मुंबईस जाई. याच्या खालोखाल खानदेशी कापूस कल्याण व पनवेल या बंदरांच्या द्वारा जाई. तेव्हा हे काही भाग सोडून दिले तर परदेशी व्यापाराच्या बदललेल्या स्वरूपाचा फारसा परिणाम हिंदी शेतकऱ्यावर झाला असे दिसून येत नाही.

अर्थात आयातीत घडून आलेल्या फरकाबद्दल असे म्हणता येत नाही. यातील खरा फरक म्हणजे कापडाच्या व्यापारासंबंधीचा होय. १८०० च्या सुमारास जी मोठी कापडाची निर्गत हिंदुस्थानातून होत असे, ती या पन्नास वर्षांत जवळजवळ पूर्णपणे बंद पडून तिच्याऐवजी फार मोठ्या प्रमाणावर कापडाची आयात होऊ लागली हे उघड आहे. याचा परिणाम अर्थात कापडाच्या धंद्यावर व एकंदर कोष्टीवर्गावर फार मोठा झाला असला पाहिजे. या सर्व बाबींचा तपशीलवार विचार करण्यास पुरेशी सामग्री आपणास उपलब्ध नाही; आणि या सामग्रीच्या अभावी हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत कसकशी स्थित्यंतरे या काळात होत गेली हे सांगणे कठीण आहे. परंतु ठोकळ मानाने असे म्हणता येईल की, या काळात कापडाचा धंदा विशेष डबघाईस आला तो मुख्यत्वे बंगाल, आंध्रप्रांत व गुजराथ या भागांत आला असावा. कारण कापडाची निर्गत जी विशेष होत असे ती या भागांतूनच; आणि हे भाग जलमार्गाने विशेष सुकर असल्यामुळे कापडच्या आयातीचे दुष्परिणाम यासच प्रथम भोगावे लागले असतील. १८५० च्या सुमारास इंग्लंडमधून हिंदुस्थानात जवळजवळ २० कोटी वार कापडाची प्रतिवर्षी आयात होत असे. या वेळेस एकंदर कापडाचा खप देशात काय होता हे सांगणे अशक्य आहे. परंतु आयात झालेले कापड सगळीकडे सारखेच वाटले जात असेल हे संभवत नाही. तेव्हा या आयातीमुळे काही विशिष्ट भागांतील कापडाच्या धंद्यास बराच धक्का बसला असला पाहिजे हे निर्विवाद होय.

याप्रमाणे जरी काही भागांत आर्थिक घडामोडी होण्यास १८५० च्या पूर्वीच प्रारंभ झाला होता, तरी सबंध देशाचा विचार केला असता यावेळपर्यंत परदेशी व्यापाराची व अंतर्गत व्यवहाराची सांगड फारशी बसली नव्हती, असेच दिसून येईल. उदाहरणार्थ, खानदेशी कापसास जरी थोडीबहुत परदेशी मागणी असली, तरी मध्यप्रांतातील कापसाची मोठ्या प्रमाणावर निर्गत होणे अशक्य होते. मध्यप्रांतातील कापूस जात असे तो मिर्झापुरास बैलांच्या तांड्यांमार्फत अथवा मुंबईस बैलगाड्यांतून. परंतु १८५० च्या सुमारास मुंबईच्या वाहतुकीचा खर्च दर ७ मणांच्या गाडीमागे जवळजवळ ५० रुपये पडत असे.

वाहतुकीची साधने आणि मार्ग यांची सुधारणा घडवून आणण्याचे कार्य कंपनी सरकारने १८३० च्या पूर्वी फारसे हाती घेतले नव्हते. मद्रास इलाख्यात तर जवळजवळ १८५० पावेतो पक्क्या सडका

अशा नव्हत्याच, असे म्हटले तरी चालेल. मुंबई इलाख्यात १८३० साली बोर घाटाचा एक तेवढा चांगला रस्ता अस्तित्वात होता. १८३० च्या पुढे नवीन रस्त्यांची कामे बरीच हातात घेण्यात आली. १८५० सालपावेतो कलकत्ता ते बनारस व मुंबई ते आग्रा हे दोन मोठे रस्ते पुरे करण्यात आले होते; व मिर्झापूरपासून नागपूरपर्यंत एक बिनपुलाची साधारण सडक आखण्यात आली होती. लॉर्ड डलहौसी यांच्या कारकीर्दीत हे रस्ते बांधण्याचे काम विशेष नेटाने पुढे सरसावले. महा-राजमार्ग (ग्रँड ट्रंक रोड) कलकत्त्यापासून दिल्लीपर्यंत पुरा केला गेला; व पुढे लाहोर-पेशावरपर्यंतही तो पोचविण्याचे काम सुरू झाले. सरकारी रस्ते व इमारती यांकरिता एक नवीन खाते निर्माण करण्यात आले; आणि तिन्ही इलाख्यांतील वाहतुकीच्या मार्गाच्या खर्चवेंचासंबंधी विचार करण्याकरिता तीन कमिशने नेमण्यात येऊन प्रत्येक इलाख्यात नवीन रस्ते बांधण्यास आरंभ झाला. परंतु लॉर्ड डलहौसी यांच्या कारकीर्दी-पावेतो रस्त्यांच्या अभावामुळे पावसाळ्यात मालाची नेआण तर जिकडेतिकडे बंद असेच, पण इतर ऋतूतही गाड्या चालू शकतील असे रस्ते थोडेच असत. यामुळे या काळात व्यापाराची खरी वाढ ही ज्या भागांत नद्या अथवा कालवे बोटींच्या रहदारीस योग्य असत अथवा जो भाग समुद्रकिनाऱ्या-लगतचा होता त्या भागांतच झाली.

लॉर्ड डलहौसींनी रस्ते सुधारण्याच्या कामी बरीच खटपट केली. परंतु त्यांचे खरे महत्त्वाचे कार्य म्हणजे रेल्वे कंपन्या स्थापण्यास मदत करून एकंदर हिंदुस्थानातील आगगाड्यांच्या मार्गाची दिशा निश्चित करणे हे होय. हिंदुस्थानात आगगाड्यांचे रस्ते बांधण्याचा विचार १८४४ सालापासून सारखा होत होताच. परंतु शेवटी कंपनीसरकार व खाजगी इंग्रज कंपन्या यांतील करारमदार लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दीतच ठरले गेले व आगगाड्यांचे मार्ग आखण्याचे धोरण डलहौसीसाहेबांनीच निश्चित केले. इतर बऱ्याच देशांत आगगाड्यांची वाढ झाली ती खाजगी कंपन्यांच्या द्वारे परस्पर बराच व्यापार असलेल्या जवळजवळच्या शहरांचे दरम्यान लोहमार्ग बांधून झाली. कारण की, एकदम फार दूरवर रस्ता बांधला असता, त्याकरिता लागणाऱ्या मोठ्या भांडवलाच्या मानाने वाहतुकीपासूनचे उत्पन्न निदान सुरुवातीस मिळण्याची शक्यता नसे. परंतु हिंदुस्थानात कंपनी सरकारने रेल्वे कंपनीच्या भांडवलावर काही किमान मर्यादेपावेतो व्याज देण्याची हमी घेतल्यामुळे सरकार आखून देईल त्या मार्गाने एकदम आगगाड्या बांधल्या गेल्या होत्या. सरकारी धोरणाचे मुख्य उद्देश दोन प्रकारचे होते. सैन्याची हालचाल सुलभ व्हावी म्हणून आगगाड्या बांधावयाच्या हा पहिला, आणि हिंदुस्थानातील कच्च्या मालाची, विशेषतः कापसाची, निर्गत स्वस्त व्हावी हा दुसरा. हे दोन उद्देश ध्यानात घेऊन लॉर्ड डलहौसींनी आगगाड्यांचे रस्ते बांधण्याचा कार्यक्रम आखला. १८५० च्या सुमारास निरनिराळ्या कंपन्या अस्तित्वात येऊन कामास सुरुवात झाली आणि पंधरा वर्षांच्या आत कलकत्ता, मुंबई व मद्रास या तिन्ही बंदरांपासून त्यांच्याजवळील सर्व सुपीक प्रदेशांपावेतो आगगाड्या बांधल्या गेल्या. सन १८६५ त कलकत्त्यापासून अलाहाबाद व राणीगंजपावेतो मार्ग सुरू होता आणि पुढील जबलपूर व दिल्लीकडील मार्गांचे काम चालू होते. मुंबईपासून खांडवा, उमरावती, सोलापूर व अहमदाबाद येथील वाहतूक सुरू झाली होती; आणि मद्रासपासून त्रिचनापल्ली, बेंगळूर, कडप्पा व कोईमतूर मार्गाने पश्चिम किनाऱ्यावरील बेवूरपावेतो रस्ता पुरा झाला होता. तसेच पंजाबामध्ये मुलतान-अमृतसरचे दरम्यान व दिल्लीपासून पुढे, आणि बंगाल्यात कलकत्त्याहून डाकाचे बाजूला काम झपाट्याने चालू होते. १८७१ साली मुंबई व कलकत्ता यांचा जबलपूरमार्गाने, मुंबई व मद्रास यांचा रायचूरमार्गाने आणि कलकत्ता व मुलतान यांचा अलाहाबाद, दिल्ली व लाहोर या मार्गाने संबंध जोडला गेला होता. अशा रीतीने केवळ पंधरावीस वर्षांच्या आत वाहतुकीची जी मुख्य अडचण ती हिंदुस्थानच्या बहुतेक सर्व भागात एकदम सुटल्या-सारखी झाली; आणि बहिर्गत व अंतर्गत व्यापारास एकदम चालना मिळाली.

वाहतुक सुकर होऊन व्यापार असा झपाट्याने वाढीस लागल्यामुळे जगात इतरत्र चाललेल्या उलाढालीचे आर्थिक परिणाम हिंदुस्थानभर भासू लागले व हिंदुस्थानच्या आर्थिक इतिहासाच्या अगदी अर्वाचीन विभागास सुरुवात झाली असे म्हणण्यास हरकत नाही. अंतर्गत व्यापाराबद्दल आपणांस भरपूर माहिती नाही; तरी परराष्ट्रीय व्यापाराच्या आकड्यांवरून वरील सिद्धांताचे समर्थन करिता येईल. हिंदुस्थानातील कापूस इंग्लंडमधील कारखान्यांस पुरविता येईल किंवा नाही याचा विचार ब्रिटिश व्यापारी नेहमीच करीत आले होते, आणि १८५० च्या अलिकडे काही वर्षे हिंदुस्थानातून कापसाची निर्गत वाढली होती हे वर दर्शविलेच आहे. परंतु या वाढीस जुन्या परिस्थितीत काही मर्यादा होती ती ओलांडणे सुधारलेल्या वाहतुकीच्या साधनांमुळे शक्य झाले; आणि ही मर्यादा ओलांडण्याचा प्रसंगही अमेरिकेतील युद्धामुळे सहजच आला. इंग्लंडमधील गिरण्यांची मुख्य भिस्त अमेरिकेतील कापसावर असे. परंतु युद्धामुळे अमेरिकेतील कापसाचा पुरवठा एकाएकी कमी झाला आणि त्यामुळे लँकाशायरमध्ये कापसाचा दुष्काळ पडला. अशा वेळी मिळेल तो व मिळेल तेथून कापूस विकत घेणे प्राप्त झाले व हिंदी कापसास इंग्लंडकडून मागणी अतोनात वाढली. हिंदी कापसाचा भावही झपाट्याने वाढला, तो इतका की, केवळ चार वर्षांत तो चौपटीहून अधिक झाला! कापूस पिकवणे अतिशय किफायतशीर झाले व त्यामुळे कापसाच्या लागवडीस उत्तेजन मिळाले. काही वर्षेपावेतो कापूस पिकणाऱ्या प्रदेशांतील शेतकऱ्यांची चंगळ झाली. १८५० साली जवळजवळ दोन कोटी रुपये किमतीच्या कापसाची हिंदुस्थानातून निर्गत झाली होती, १८६० साली ही निर्गत साडेपाच कोटी रुपयांपर्यंत वाढली, तर १८६५ साली या निर्गतीची किंमत साडेसदतीस कोटी रुपये भरली! अर्थात या युद्धाच्या वेळेस चढलेले हे भाव पुढे लगेच उतरले व हिंदी कापसाला यानंतर युद्धकाली जी मागणी होती ती सारखी टिकली नाही. परंतु येथे विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की, या अमेरिकेतील युद्धाचे परिणाम जसे हिंदुस्थानभर दिसून आले तसे यापूर्वी कोणत्याच परराष्ट्रीय उलाढालीचे दिसून आले नव्हते; आणि अगदी शेतकऱ्यालाही चटकन भासणारी अशी ही बाहेरील जगातील पहिलीच गोष्ट होती. कापसाच्या तेजीच्या भावांमुळे निरनिराळ्या प्रांतांत १८६० ते १८७० या दशकांत बराच पैसा ओतला गेला. त्यामुळे जमिनीच्या किमती चहूकडे वाढल्या व शेतकऱ्याची स्थिती सकृद्दर्शनी तरी फार भरभराटीची दिसून आली.

ज्याप्रमाणे अमेरिकेतील युद्धामुळे हिंदी कापसास एकदम नवीन मागणी आली, त्याप्रमाणे क्रिमियातील युद्धामुळे हिंदी पाटाची माहिती युरोपात विशेष झाली. यापूर्वी युरोपात पोती, दोरखंड वगैरे बनविण्यास रशियातील तागाचा विशेष उपयोग करण्यात येत असे. परंतु क्रिमियातील युद्धामुळे जेव्हा या तागाचा तुटवडा पडला, तेव्हा त्याऐवजी हिंदुस्थानातील पाट जास्त वापरण्यात येऊ लागले. हळूहळू हे पाट अधिक चांगले असे आढळून आल्यामुळे त्याची मागणी वाढून त्या व्यापारास व तागाच्या लागवडीस जोर चढला. कापूस आणि ताग यांच्याप्रमाणेच इतर शेतीच्या पैदाशीची स्थिती होती. कारण सडका व आगगाड्या यांच्या प्रसारामुळे हिंदुस्थानातील बहुतेक प्रांतातील कच्चा माल परदेशी पाठविणे सुलभ होऊन परराष्ट्रीय व्यापार फार भरभराटीस आला. त्यातच १८६९ साली सुएझचा कालवा बांधला गेल्यामुळे युरोपात येथील माल जाणे विशेषच सोपे झाले. १८५०च्या सुमारास हिंदुस्थानातून निर्गतीच्या महत्त्वाच्या बाबी अफू, नीळ, कापूस व साखर या चारच होत्या. यांच्या खालोखाल धान्य, कापड आणि रेशीम व रेशमी माल यांची काहीशी निर्गत होत असे. १८५० च्या पुढील पंचवीस वर्षांत या व्यापारात फार मोठा फरक घडून आला. एक तर व्यापाराचे मान फार वाढले. एकंदर निर्गत मालाची किंमत १८५० साली सोळासतरा कोटी रुपये होती, ती वीस वर्षांच्या आत ५० कोटी रुपयांपर्यंत पोचली. (१८६४ ते १८८६ या वर्षी तर कापसाच्या भावाच्या आत्यंतिक तेजीमुळे एकंदर ६५ कोटी रुपयांपर्यंत परदेशीय निर्गत मालाची किंमत आली.) या निर्गतीच्या किंमतीची वाढ पुढेही अशीच टिकून राहिली.

१८८२ च्या सुमारास हा आकडा ८० कोटी रुपयांपर्यंत गेला व १८९५ साली तो १०० कोटी रुपयांवर चढला. परंतु एकंदर व्यापाराचे मान व किंमत ही वाढली एवढेच नव्हे, तर या व्यापारात बऱ्याच नवीन वस्तू आता महत्त्व पावल्या. व्यापाराच्या वाढीच्या मानाने फक्त कापूस व अफू एवढ्याच जुन्या बाबी वाढल्या, निळीचा व्यापार थोडासा वाढला; परंतु साखर, कापड, रेशीम व रेशमी माल यांचे महत्त्व अगदी कमी झाले. उलटपक्षी, तांदूळ आणि १८८० सालच्या पुढे गहू-जवस, शिरस, इत्यादी गळिताची धान्ये, पाट, कातडी, चहा व कॉफी, लाख, इत्यादी अगदी नवीन अशा मालाची निर्गत फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. याप्रमाणे परराष्ट्रीय व्यापाराच्या स्वरूपाचे परिवर्तन पुरे होऊन आता हिंदुस्थानातील सर्व प्रांतांमधील शेतकी पैदास हीच हिंदुस्थानातून होणारी खरी निर्गत असे झाले.

सडका व आगगाड्या यांच्या प्रसारामुळे हिंदुस्थानात जो मोठा फरक घडून आला तो हा की, जुन्या काळाप्रमाणे आता प्रत्येक टापू स्वतंत्र व स्वावलंबी असा राहिला नाही. इतर प्रांतांत व परदेशांत आपल्या मालास मागणी आहे हे शेतकऱ्यांस कळून आले; आणि तसेच परदेशचा व परप्रांतींचा मालही हिंदुस्थानभर जिकडेतिकडे पसरू लागला. हा दुसऱ्या प्रकारचा फरक विशेषतः दुष्काळाच्या प्रसंगी निदर्शनास येऊ लागला. अवर्षण व दुष्काळ ही अनादी कालापासून या देशातील लोकांच्या परिचयाची आहेत. दुर्गादेवीच्या दुष्काळासारख्या काही दुष्काळांनी सबंध प्रांतचे प्रांत असे उध्वस्त करून टाकले की, त्यांची स्मृती शतकेच्या शतके लोकांत टिकून राहिली. अवर्षण पडून अथवा अतोनात किंवा अवेळी पाऊस पडल्यामुळे पिकांची नासाडी होऊन खाण्यास दाणागोटा नाहीसा होणे म्हणजे दुष्काळ. याच्या निवारणार्थ लोकांनी धान्य पेवात राखून ठेवणे व राज्यकर्त्यांनी भावी आपत्ती टाळण्याकरिता धान्याची कोठारे बांधणे हाच सर्वमान्य उपाय होता. जेव्हा वाहतुकीची साधने फार अल्प होती तेव्हा धान्य फार दूरवर वाहून नेणे शक्य नव्हते; आणि कोणत्याही टापूतील धान्य व चारा यांचा पुरवठा नाहीसा झाला म्हणजे तेथे प्राणहानी फार होऊन सर्व जनता देशोधडीस लागे.

इ. स. १७८४ साली उत्तर हिंदुस्थानात पडलेल्या भयंकर दुष्काळाचे तत्कालीन पत्रांत केलेले वर्णन वाचून जुन्या काळच्या दुष्काळाच्या भीषण स्वरूपाची खरी कल्पना होते. पुढील उतारा पाहा : "या प्रांतीं पाऊस प्रथम आरद्रापासून आश्लेषापावेतों काय पडला असेल. त्याजवर जोरी बाजरी वगैरे पेरण्या जाल्या. मघापासोन अगदीं पाऊस उघडला. बाजरी वाळून उडाली. पुढें रबीचे पेरेच नाहीं जाले! हा मुलूख आधींच लुटला गेला. लोक कंगाल जाले. सांप्रत सुका पडला. या देशांत लष्करांत महागाई. बारा तेरा शेर धारण आज आहे. उद्यां ईश्वर जाणे! असीच गती अंतरवेद, दिल्ली, लाहोर, कश्मीर-पावेतों जाली. मुलूख तिकडील उठून दक्षणेस येतात. हजारों लाखों माणूस भिकार लष्करांत आलें. माळव्यांत जातात. अन्न मिळत नाहीं. उपासानें माणूस फार मरतें. संहारच होऊ लागला आहे. लखनवू व श्रीकाशी प्रांतीं हीच दशा झाली. कंगाल लखनऊंत फार आलें. त्याची वस्ती मिर्जा अमानीनें वेगळीच करविली. दर माणसीं दोन पैसे रोज देतो."[1] याच दुष्काळाबद्दल आणखी एका पत्रात खालील मजकूर आढळतो : "अनावृष्टीमुळें रयत झाडून येथवर मेली कीं, एकला गांव निमाणसी झाला. एके घरचीं माणसें दहावीस जीं असतील तीं झाडून घरांत मेलीं. प्रेतें उचलावयास कोणी राहिलें नाही! हाडांचे सापळे घरांत तसेच पडून राहिले! वांचले ते लौकर अधीर होऊन निघोन देशांतरास गेले. पूर्वेस फार गेले. दक्षणेस लाखों माणूस गेले. ग्वाल्हेरचे मुक्कामीं लष्करांतून पुढें जात. हजारोंहजाराच्या झुंडी एका-मागें एक जात होत्या. मारवाडची हीच दशा. माळवा, नेमाड, बराणपूर हीं टाकून पुढें झुंडी गेल्या."[2]

१. *इतिहाससंग्रह—ऐतिहासिक टिपणे*, भाग ५, पृ० ५.
२. *किता*, पृ० ११.

१८०२ साली आपल्या दक्षिण प्रांतात असाच मोठा दुष्काळ पडला होता. अनंतफंदीनें तत्संबंधी केलेल्या वर्णनातून पुढील काही ओव्या उद्धृत केल्या आहेत: "वृक्षास न राहे एक पर्ण। मग अपक्क राहतील कोठून। सोतरोठे बरबडे भक्षून। तरी वांचले नाहींत ॥ ७१ ॥ वृषभ धेनु सूकर श्वानें। मत्र मंडूक गणपतीवाहनें। सर्वेही भक्षिलें भिकाऱ्यानें। शेवटीं प्राण गेलेहो ॥ ७२ ॥ असें जें भक्षूं नये तें भक्षिलें। शेवटीं ईश्वरीं उपेक्षिलें। त्यांतून चवथाई रक्षिलें। तीन हिस्से गतप्राण ॥ ७४ ॥ हातानें तोलावें सुवर्ण। धान्य मोजावें ताजव्यानें। अच्छेर दीडपाव दाणे। रुपयाचे तेही न मिळे ॥ ७५ ॥ कोण प्रेताला ओढितो। येथे अवघ्यांचा प्राण जातो। कोण कोणाचा समाचार घेतो। यांत वांचतो कोणता ॥ ८२ ॥ सरी सर्वत्रलागीं जाणा। एकसारख्याची वेदना। धनाढ्यासि न मिळे दाणा। मग निर्धन कैसा वांचतो ॥ ८३ ॥"[1]

आगगाड्यांच्या प्रसारामुळे दुष्काळाचे हे मूळचे स्वरूप अगदी पालटू लागले. १८६८-६९ साली राजपुतान्यात पडलेला दुष्काळ हा जुन्या स्वरूपाचा शेवटचा दुष्काळ असे म्हणण्यास हरकत नाही. या वेळेस माणसे व गुरे यांची अतोनात हानी झाली; आणि आग्रा, दिल्ली वगैरे शहरे राजपुतान्यातील भिकाराने भरून गेली. परंतु निरनिराळ्या प्रदेशांत रस्ते व आगगाड्या बांधल्या गेल्या तेव्हा बाहेरून धान्याचा पुरवठा करण्याची सोय करता येऊ लागली. दुष्काळ म्हणजे आता धान्याचा पूर्ण अभाव असे नसून केवळ धान्याची महागाई आणि पिके बुडाल्यामुळे शेतकऱ्यांस व एकंदर खेड्यापाड्यांतील जनतेस उपजीविकेचे साधन नाहीसे होणे असे झाले आहे. दुष्काळाच्या बदललेल्या स्वरूपामुळे शेतकऱ्याचा फार फायदा झाला व आपल्या एकंदर आर्थिक जीवनात मोठा फरक पडला हे उघड आहे. अजून दुष्काळाची भीती शेतकऱ्याच्या मनात कायम आहे; आणि अवर्षणामुळे तो अन्नास महाग होतो, त्याच्या गुराढोरांची नासाडी होते, तसेच तो कर्जात बुडून जातो हे खरे. परंतु दुष्काळामुळे पूर्वीप्रमाणे खेडीच्या खेडी ओस पडणे व मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या कमी होणे हा प्रकार आता राहिला नाही.

## ३. जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास व नवीनांचा उगम

गिरण्या व कारखाने निघण्यापूर्वी हिंदी उद्योगधंद्यांचे सर्वसाधारण स्वरूप काय होते हे पहिल्या प्रकरणात दर्शविलेच आहे. या जुन्या उद्योगधंद्यांवर बदलत्या परिस्थितीचा काय परिणाम झाला व नवीन प्रकारचे उद्योगधंदे कसे अस्तित्वात आले याचा विचार आता करावयाचा आहे.

नागर कळाकुसरीचे धंदे, खेडेगावांतील साधे उद्योगधंदे आणि याशिवाय देशभर ठिकठिकाणी विखुरलेले लहानलहान पण महत्त्वाचे लोखंड, काच, कागद असे धंदे, हे जुन्या हिंदी उद्योगधंद्यांचे निरनिराळे प्रकार मानता येतील. नागर उद्योगधंदे नानाप्रकारचे होते. हिंदुस्थानभर निरनिराळी शहरे आपापल्या कारागिरीबद्दल प्रसिद्ध होती. हिंदी कापड तर जगद्विख्यात होते. ढाका व चंदेरी येथील मलमल अथवा बनारस व अहमदाबाद येथील किनखाब यांना जुन्या काळी जावापासून युरोपपर्यंत सारखीच मागणी असे. हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानात हरतऱ्हेच्या साध्या व रेशमी कापडाकरिता लाहोर, अमृतसर, दिल्ली, लखनौ, बनारस, मुर्शिदाबाद, अहमदाबाद, सुरत, नागपूर, उमरेड, पुणे, येवले, मच्छलीपट्टण, मथुरा अशा अनेक पेठा प्रसिद्ध होत्या. बंगाल्यातील मुर्शिदाबाद व माल्दा

१. *अनंतफंदीकृत श्रीमाधव ग्रंथ*, अध्याय १.

येथील रेशमी माल अथवा लखनौचे चिटाचे कापड यांस विलायतेतही अतिशय मागणी असे. जरतारी व कलाबतूचे काम लाहोर, दिल्ली, बनारस, बऱ्हाणपूर, अहमदाबाद, सुरत, पुणे, मदुरा इत्यादी ठिकाणी पैदा होत असे. सोन्याचांदीचे खोदकाम व नक्षीकाम, जडावाचे काम, काच–मिना व साध्या मिन्याचे काम ही जिकडेतिकडे होत असत. त्यातल्या त्यात हत्यारे, त्यांच्या मुठी व म्याना, आणि इतर धातूंवरील खोदकाम व नक्षीकाम हे कच्छ व सिंधप्रांत आणि पंजाबमधील सियालकोट, लुधियाणा, लाहोर इत्यादी ठिकाणी विशेष चांगले होत असे. काश्मिरी शालींची मुख्य पैदास अमृतसर व श्रीनगर येथे होई. बनारस व नासिक यांसारख्या क्षेत्रांच्या ठिकाणी तांबे, पितळ, कासे वगैरे धातूंच्या भांड्यांच्या धंद्यांस साहजिकच फार महत्त्व आले होते. आग्र्यास संगमर्मरी दगडाचे काम, तर मलबारात चंदनी लाकडाचे काम असेही एकाच ठिकाणी विशेष प्रसिद्धीस आलेले धंदे होते. सारांश, सर्व हिंदुस्थानभर निरनिराळ्या प्रमाणात हा कारागीरवर्ग विखुरलेला होता.

पहिल्या प्रकरणात दर्शविल्याप्रमाणे या सर्व धंद्यांचा मुख्य भर राजाश्रयावरच होता. उत्कृष्ट कारागीर आपल्या पदरी ठेवण्याचा मोठमोठ्या राजांचा प्रघात असे. असला आश्रय थोड्यांनाच मिळे; परंतु जरी राजाचा प्रत्यक्ष तनखा नसला तरी दरबारी व इतर मंडळींच्या आश्रयामुळेच सर्व कारागिरांचे चालत असे. या उद्योगधंद्याची प्रगती कलेतच झाली असे नव्हे; तर श्रमविभाग, उत्कृष्ट अवजारे यांचा उपयोग, एकंदर धंद्यांतील उत्पादनाची सुव्यवस्था या बाबतीतही हिंदुस्थानातील सर्व धंद्यांत हे नागरधंदे पुढारलेले होते. जरतार तयार करण्यास सातआठ निरनिराळ्या क्रिया कराव्या लागत व त्या निरनिराळ्या कारागिरांच्या हातून होत असत. या निरनिराळ्या क्रियांना योग्य अशी उत्कृष्ट उपकरणे व यंत्रेही घडविण्यात आली होती; आणि हे सर्व उत्पादन उदीमसंघाच्या देखरेखीखाली होई. उदाहरणार्थ, गुजराथेत जातीच्या पंचायतीप्रमाणे प्रत्येक धंद्याचे महाजन असत. त्यातल्या त्यात काही प्रमुख शेठिये असत; आणि सर्व शहराचा असा एक नगरशेठ असे. अजूनही या पद्धतीचे अवशेष कोठे कोठे आढळतात. उदाहरणार्थ, सुरतेस जरीकाठ विणण्याचा सर्व धंदा 'गोळा' जातीच्याच हाती आहे व त्यातील पंचांनी घालून दिलेल्या नियमांप्रमाणेच या धंद्याचे नियंत्रण केले जाते. अर्थात एकंदर कारागीर वर्गाची संख्या फार मोठी नव्हती; कारण काही झाले तरी या प्रकारच्या मालाच्या मागणीचे क्षेत्र केव्हाही मर्यादितच असावयाचे. तथापि सर्व हिंदी उद्योगधंद्यांत महत्त्वाचे असे यांचे स्थान होते हे निर्विवाद आहे.

ब्रिटिश अमदानीस सुरुवात झाल्याबरोबर या उद्योगधंद्यांस उतरती कळा लागली. ही उतरती कळा लागण्याचे मुख्य कारण म्हणजे राजाश्रयाचा लोप हेच होय. खालसा प्रदेशात राजे नाहीसे झाले व दरबार बुडाला. जुनी दरबारी मंडळी व जमीनदार मंडळी जी टिकली त्यांजवर काही वर्षे भिस्त ठेवता आली तरी ती फार तर एकदोन पिढ्याच टिकण्यासारखी होती. दरबारी मंडळीस राजधान्यांतून राहण्याचे कारण उरले नाही; आणि ती आपल्या वतनवाडीवर राहू लागली व जुन्या राजधान्यांचा ऱ्हास झाला. तसेच नवीन अमदानीतील नवीन कल्पनांमुळे मागणीचे स्वरूप बदलले. नागपुरी रेशीमकाठी माल वापरणे रानटीपणाचे लक्षण समजले गेले व मँचेस्टरचा तलम माल सरस ठरला. कारण जुन्या घराण्यांचा व जुन्या मंडळींचा नाश झाल्यावर अवल इंग्रजीत एक नवीन प्रकारचा संपन्न नागरवर्ग उत्पन्न झाला. हा नवीन वर्ग म्हणजे इंग्रजी शिकलेल्या पांढरपेशांचा. या पांढरपेशांच्या सर्व कल्पना इंग्रजांपासूनच उचललेल्या असल्यामुळे पेहराव वगैरे बाबींतील त्यांची अभिरुची ही इंग्रजी धाटणीवरच गेली; आणि त्यामुळे या वर्गाच्या लोकांकडून जुन्या तऱ्हेच्या कारागिरांना काहीच आश्रय मिळाला नाही. उलटपक्षी हिंदी संस्थानिकांच्या ताब्यात जो मुलुख राहिला तेथे मात्र बरेच दिवस आपला कारागीरवर्ग जीव धरून राहिला, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. याचे कारण पाश्चात्य कल्पनांचा पगडा या प्रदेशांत

बसण्यास वेळ लागला; व राजाचे जुने वैभव जरी कमी झाले तरी थोडाबहुत तरी राजाश्रय कलेला बरेच दिवसपावेतो मिळत राहिला. जयपूर, जोधपूर, काठेवाडातील शहरे वगैरे ठिकाणी जुने उद्योगधंदे टिकून राहण्याचे हेच कारण होय.

याप्रमाणे ब्रिटिश अमदानीच्या सुरुवातीसच या जुन्या उद्योगधंद्यांचा पाय मोडला गेला. अर्थात हा प्रकार सर्वत्र सारखाच घडून आला असे नाही. बंगाल्यात कलेचा ऱ्हास प्रथम सुरू झाला, तर पंजाब प्रांतात जवळजवळ १८५० पर्वेतो या बाबतीत काही फरक पडला नसावा. तसेच काही धंद्यांवर नवीन परिस्थितीचा परिणाम अधिक तर काहींवर कमी असे घडून येणे साहजिकच होते. साधारणपणे कापडाच्या धंद्यांना एकदम धक्का फारसा बसला नाही. उलटपक्षी हत्यारांचा धंदा सर्वस्वी बुडाला. १८५० सालपावेतो पंजाबमधील सियालकोट, गुजराथ, लाहोर वगैरे शहरी हत्यारे आणि त्यांवर नक्षीकाम व खोदकाम करण्याचे धंदे अगदी भरभराटीत होते. ब्रिटिश अंमल व हत्यारांचा कायदा यांनी या उद्योगधंद्यांच्या मुळावरच घाव घातला व केवळ तीस–पसतीस वर्षांत हे धंदे जवळजवळ नामशेष झाले. काही ठिकाणी असे झाले की, जुनी मागणी गेल्यावर नवीन मागणी उद्भवली. ही नवीन मागणी बहुतेक युरोपीय असे. अशी नवीन मागणी उद्भवल्याचे ठळक असे उदाहरण काश्मिरी शालींच्या धंद्याचे देता येईल. हिंदुस्थानातील मागणी कमी झाल्यावरही युरोपात, विशेषतः फ्रान्समध्ये, या शाली लोकप्रिय झाल्या; आणि १८५० च्या सुमारास हा धंदा अमृतसर, लुधियाणा व श्रीनगर येथे फारच ऊर्जितावस्थेस आला. परंतु तेव्हा हा पूर्णपणे फ्रेंच व्यापाऱ्यांच्या हातात गेला होता; आणि एकंदर हिंदी उद्योगधंद्यांतील कमकुवतपणा या धंद्याच्या बाबतीतही स्पष्ट दिसून आला. कारण पुढे १८७० च्या सुमारास फ्रेंच मागणी कमी झाली. शिवाय स्कॉटलंडमध्ये नकली शाली यंत्रावर निघू लागल्या तेव्हा या धंद्यास नवीन वळण देणे वगैरे काहीच झाले नाही; आणि एकोणिसाव्या शतकाचा शेवट होण्यापूर्वी याचाही शेवट झाला. हस्तिदंती काम, चंदनी लाकडाचे नक्षीकाम, आग्र्याचे संगमर्मरी काम अथवा गालिचे विणणे अशा प्रकारच्या धंद्यांनाही नवीन मागणीमुळे अगदी नवीन वळण लागले. ही नवीन मागणी म्हणजे युरोपीय प्रवाशांची. परंतु या प्रवाशांत खपणारा माल किरकोळ व हलक्या प्रतीचा असे, आणि त्यामुळे जरी हे धंदे थोडेबहुत टिकले तरी कलेच्या दृष्टीने त्यांची हानी झाली.

राजाश्रय गेला व नवीन सुशिक्षित, संपन्न वर्गाच्या कल्पना या धंद्यांच्या उत्कर्षास विघातक अशा बनल्या गेल्या, यामुळे हे धंदे बरेच बसले हे खरे. तथापि बहुतेक धंदे अजिबात व एकदम बसले असे झाले नाही. हत्यारांचा धंदा नामशेष झाला अथवा मलमलीची पैदास थांबली यात शंका नाही. परंतु इतर धंद्यांतून जरी उंची माल व उत्कृष्ट कारागिरी यांस मागणी राहिली नाही तरी साधारण हलक्या मालाचा खप होत राहिलाच. वर सांगितल्याप्रमाणे कापडाच्या धंद्यात हे विशेष घडून आले. तथापि कापडासच नव्हे, तर सोन्याचांदीचे काम, तांब्या-पितळेची भांडी, जरतार, कलाबतू या बाबतीतही मागणी बऱ्याच अंशी कायम राहिली. असे जे धंदे टिकून राहिले त्यांवर पुढे यांत्रिक उत्पादनाची हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर आयात होऊ लागली तेव्हा धाड आली. कापडाच्या धंद्याचे उदाहरण घेतल्यास परराष्ट्रीय व्यापारामुळे हे फरक कसकसे पडत गेले हे कळून येईल. १८०० च्या सुमारास हिंदुस्थानातून उंची कापडाची निर्गत होत असे, ती पुढील ५० वर्षांत बंद होऊन इंग्रजी मालाची आयात कशी सुरू झाली हे दुसऱ्या प्रकरणात सांगितले आहे. या आयातीला खरी भरती १८५० च्या पुढे आली. १८५० साली आयात जवळजवळ २० कोटी वार असे, ती पुढील पंचवीस-तीस वर्षांत अत्यंत झपाट्याने वाढली; आणि १८७० साली १०० कोटी तर १८८५ मध्ये २०० कोटी वारांपर्यंत पोचली.

येणेप्रमाणे १८७० साली दरमाणशी जवळजवळ ५ वार कापड हिंदुस्थानात येऊ लागले. यामुळे

कोष्ट्याचा धंदा किती बसला असेल याची कल्पना करिता येईल. परंतु हा धंदा जो बसला तो चोहीकडे सारखाच बसला नाही व सर्व प्रकारच्या पैदाशीवरही आयातीचा सारखाच परिणाम झाला असे नाही. वर दर्शविल्याप्रमाणे बंगाल, गुजराथ व आंध्रप्रांत येथील धंद्यांचा ऱ्हास अगदी लवकर सुरू झाला असावा, तर पंजाब व मध्यप्रांत येथे १८५० पावेतो फारसा फरक घडून आला नाही. तथापि इंग्रजी माल हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणात येऊ लागल्यावर, विशेषतः १८५० नंतर जिकडेतिकडे बराच फरक घडून आला. त्यात अगदी उच्च प्रतीच्या रेशमी व जरीकाठी मालावर अथवा लुगडी, पागोटी अशा तऱ्हेच्या विशिष्ट हिंदी पैदाशीवर परदेशी मालास प्रत्यक्ष हल्ला चढविणे शक्य नव्हते. तसेच खेडेगावांतील जाडेभरडे पण अत्यंत टिकाऊ असे शेतकऱ्यांस लागणारे कापडही परदेशांतून प्रथम येत नसे. परंतु याशिवाय बाकी राहिलेला जो मध्यम प्रतीचा माल त्यात मात्र हातमागावरील कोष्टी टिकाव धरू शकला नाही. तेव्हा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अगदी उंची मालाची मागणी विशेष वाढती नव्हती तरी जेवढी होती तेवढ्यापुरता विणकरवर्ग आपला धंदा संभाळून राहिला असावा. तसे अगदी जाडेभरडे खादीसारखे कापड विणणाऱ्या विणकरांची संख्याही फारशी कमी झाली नसावी. परंतु या दोन टोकांच्या दरम्यानचे जे मध्यमवर्गीय त्यांची मात्र दैना उडून त्यांचा धंदा या अवधीत ठार बुडाला असावा.

जरतारीच्या धंद्यांत हेच दिसून येते. आपल्या पोशाखांत व कपड्यांत जरतार वापरावयाचा प्रघात सार्वत्रिक असल्यामुळे जरतारीची पैदास हिंदुस्थानभर निरनिराळ्या शहरांतून होत असे. फार मूल्यवान अशा किनखाबास वगैरे जरी मागणी कमी झाली तरी साधारण मालाला मागणी चांगली टिकून होती; आणि हा धंदा पुढे बुडण्याचे कारण म्हणजे केवळ परदेशी मालाची आयात हेच होय. बंगाल्यातील जरतारीच्या धंद्याबद्दल लिहिलेल्या सरकारी अहवालावरून असे दिसून येते की, जर्मन व्यापाऱ्यांनी १८८० च्या पूर्वीपासून हिंदी नमुने युरोपात नेऊन थेट त्या प्रकारचा माल यंत्रावर तयार करण्यास सुरुवात केली. यात आरंभी त्यांस फारसे यश आले नाही; परंतु १८९७ च्या पुढे यंत्रावर फारच उत्तम माल निघू लागला; आणि यानंतर फ्रेंच व जर्मन माल येथील बाजारांत इतका सरसावला की, १९१४ च्या आतच बहुतेक जुन्या ठिकाणचा धंदा पुरता बसला. तसेच आजही हिंदुस्थान सरकारने या मालाच्या आयातीवर जबर जकात लादल्यावर फक्त सुरत येथे काय तो धंदा मोठ्या प्रमाणावर चालविण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे रंगाऱ्याचा धंदा घ्या. जुने हिंदी रंग पक्के देण्याचे काम मोठे अवघड असे व त्यामुळे रंगाऱ्याचे पिढीजाद कसब महत्त्वाचे होते. कापडाच्या धंद्याप्रमाणे या धंद्याचेही क्षेत्र मोठे होते. पण पुढे १८६९–७० सालापासून जर्मनीतून ॲनिलीन व ॲलिझॅरीन रंग येण्यास सुरुवात झाली. हे रंग दिखाऊ व भपकेदार आणि देण्यास फार सोपे असे असतात. खऱ्या कलाभिज्ञांच्या दृष्टीने या रंगांपेक्षा जुने रंगच अधिक उंची व सरस असत. परंतु भपकेदारपणामुळे व वापरण्याच्या सुलभतेमुळे त्यचा प्रसार झपाट्याने होऊ लागला आणि लवकरच रंगाऱ्याचा धंदा बुडाला. रंगाऱ्याच्या कसबास किंमत उरली नाही व परदेशी पुड्या वापरण्याच्या अल्पशा ज्ञानावर कोणालाही रंगारी बनता येऊ लागले. यामुळे रंगाऱ्याचे महत्त्व नाहीसे होऊन या धंद्यातील कमाई अगदी संपुष्टात आली. याचप्रमाणे गिरणीतून सूत रंगवून बाहेर पडू लागले व रंगीत सूत विणकरास मिळाल्यामुळे रंगाऱ्याची त्यास गरज उरली नाही.

येणेप्रमाणे प्रथम राजाश्रय नाहीसा होऊन व नवीन संपन्न वर्गाची अभिरुची बदलून जुन्या नागर धंद्यास उतरती कळा लागली. त्यातच नवीन खऱ्या व यंत्रावर निघणाऱ्या परदेशी नकली मालाच्या चढाओढीची भर पडून हे धंदे शंभर वर्षांच्या आतच नष्टप्राय झाले.

या नवीन परिस्थितीमुळे शहरच्या कारागीरवर्गास जसा एकदम धक्का बसला तसा खेडेगावांतील कारागिरांस बसला नाही. आपल्या एकंदर खेड्यापाड्यांच्या जीवनात जो फरक घडून आला तो अत्यंत हळूहळू व क्रमाक्रमाने घडून आला. ग्रामसंस्थेची बंधने विस्कळित होऊ लागली, बलुत्यांचे महत्त्व कमी झाले, बाहेरून मालाचा पुरवठा जास्त जास्त होऊ लागला व खेड्यांतील माणसे निनिराळ्या निमित्ताने बाहेर जाऊ लागली, तेव्हा लोहार, सुतार, कुंभार, चांभार वगैरे कारागिरांच्या स्थितीत काहीसा बदल झाला हे खरे. त्यातल्या त्यात लोहार व सुतार यांची परिस्थिती फारशी बदलली नाही. लोखंडाचा जास्त जास्त प्रसार झाल्यामुळे लोहाराच्या कामाला काहीशी जास्तच मागणी येऊ लागली असे म्हणता येईल. या लोखंडाच्या प्रसारामुळे सुतारवर्गाचे थोडेसे नुकसान झाले असावे; विशेषतः जेथे आउते-अवजारे लाकडी वापरली जात तेथे लोखंडी वापरली असता हे घडून आले. लोखंडी नांगर अथवा उसाचे चरक यांचा प्रसार होणे ही या प्रकाराची उदाहरणे होत. उलटपक्षी कुंभार व चांभार यांच्या परिस्थितीत बराच फरक पडला. कुंभारवर्ग हा पूर्वीपासूनच अगदी निकृष्ट स्थितीतील असा होता. याच्या मालास मागणी दिवसेंदिवस कमी होत चालली असे दिसून येते. तांबे, पितळ अथवा इतर धातूंची भांडी पूर्वीपेक्षा जास्त स्वस्त झाली, त्यामुळे कुंभाराचा माल खेड्यापाड्यांतून कमी खपू लागला आणि हा कारागीरवर्ग जास्तच खालावला. चांभार-ढोरांची परिस्थिती याहूनही काहीशी निराळी. ढोरांना मेलेल्या गुरांची कातडी कमवावयास फुकट मिळत, ती पुढे पुढे कातड्यास फार भाव येऊ लागल्यामुळे मिळेनाशी झाली व त्यामुळे कातडी कमावण्याचा खेड्यांतील धंदा नाहीसा होऊ लागला. ही कातडी आता शहरात तरी कमावली जात, किंवा बिनकमावलेलीच परदेशांत पाठविली जात. कातडी खेड्यातल्या खेड्यात कमावली जाण्याऐवजी बाहेर जाऊ लागल्यामुळे चांभारांची स्थिती स्वाभाविकपणेच बदलली. चांभारांच्या बाबतीत परदेशी मालाची आयात प्रथम फारशी भोवत नसे. तीसुद्धा अलीकडे भोवू लागली आहे. याचप्रमाणे खेड्यातील तेल्याची गोष्ट. याच्या धंद्यास फार मोठा धक्का बसला तो केरोसीन तेलाच्या प्रसारामुळे. १८८० सालच्या सुमारास केरोसीन तेल बऱ्याच मोठ्या प्रमाणात आपल्या देशात येऊ लागले. तेव्हापासून तेल्याची दिवाबत्तीच्या तेलाची मागणी नाहीशी झाली. अजून खाण्याच्या तेलासंबंधी विशेष फरक झालेला नाही. खाण्याच्या तेलाच्या गिरण्या अद्यापि फारशा निघालेल्या नाहीत आणि कृत्रिम तूप वगैरे पदार्थ तितके सार्वत्रिक वापरात नसल्यामुळे जुना घाण्याचा धंदा बराच टिकून आहे असे दिसते.

लोखंड, काच, कागद इत्यादी धंद्यांची स्थितीही वरीलप्रमाणेच झाली. लोखंडाच्या धंद्याचा प्रसार जेथे जेथे खनिज लोखंड सापडे व कोळशाचा पुरवठा मुबलक असे तेथे तेथे झाला होता. म्हैसुराकडील लोखंड व पोलाद फार जुन्या काळापासून जगप्रसिद्ध होते. महाबळेश्वराजवळ धावड लोखंड करीत. मध्यप्रांतात भंडारा व जबलपूर जिल्हा, पूर्वेस संबळपूर, बीरभूम, ओढ्याप्रांताचा डोंगराळ भाग, तसेच हिमालयाच्या पायथ्याशी असलेला संयुक्त प्रांतातील कुमायून जिल्हा वगैरे निरनिराळ्या ठिकाणांहून लोखंड हिंदुस्थानभर येई. खनिज लोखंड वितळून शुद्ध करण्याचे काम हे साध्या कोळशाच्या साहाय्याने, उथळ उघड्या भट्ट्यांत, पिढीजाद जुनाट पद्धतीने बहुतेक वन्य जातीच करीत. या धंद्याचा ऱ्हास होण्याची मुख्य कारणे दोन. एक तर या धंद्यास कोळशाचा पुरवठा फार मुबलक लागे, व त्यामुळे जेथे रानातून लाकडाचा पुरवठा भरपूर आहे तेथेच तो चालू शके. पण राने जसजशी कमी झाली व काही राने सरकारने राखीव केली, तसतसा कोळसा महाग होऊन लोखंडाचा धंदा बसू लागला. परंतु याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे लोखंड व पोलाद यांची वाढती आयात ही होय. एकीकडून उत्पादनाचा खर्च वाढला, तर दुसरीकडून स्वस्त मालाची चढाओढ सुरू झाली; व यामुळे हाही धंदा नाहीसा झाला. अर्थात लोखंड गाळण्याची जुनी पद्धती फार खर्चाची असे. हा धंदा किती लवकर

बसला याची पुढील हकीकतीवरून कल्पना येईल. बीरभूममध्ये एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस तो फार महत्त्वाचा होता. परंतु १८७० च्या आतच तेथील पैदास सर्वस्वी थांबली. मध्यप्रांतातील भंडारा जिल्ह्यात १८५० च्या सुमारास लोखंड तयार करण्याच्या १६० भट्ट्या होत्या; परंतु पुढील पन्नास वर्षांत त्यांपैकी एखादीच शिल्लक राहिली असावी. काच, कागद वगैरे इतर धंद्यांतही तीच स्थिती झाली. महाराष्ट्रात गेल्या शतकात जुन्नर, एरंडोल, पुणे, नाशिक इत्यादी ठिकाणी कागद बराच तयार होत असे. पेशव्यांनी या धंद्यास विशेष उत्तेजन दिले होते. परंतु परदेशी कागद आयात होऊ लागल्यावर त्याच्याशी देशी कागदास सामना देणे अशक्य झाले. पुण्यात जुन्या ४० कारखान्यांपैकी १८८३ साली सारे आठच शिल्लक होते, असे गॅझेटियरमध्ये नमूद आहे; आणि यासही मागणी होती ती मारवाडी वगैरे व्यापारी वहीखात्यांकरिता हा कागद वापरीत म्हणून. जुन्नरचा धंदा काही जास्त दिवस टिकून राहिला; पण तोही आज सर्वस्वी बुडालेला आहे. याप्रमाणे सर्वच प्रकारचे जुने उद्योगधंदे एकोणिसाव्या शतकात बुडू लागले व बरेचसे पुरते बुडाले.

अर्थात ही गोष्ट काही फक्त हिंदुस्थानातच घडून आली असे नाही. यांत्रिक उत्पादन सुलभ व स्वस्त होऊ लागून वाहतुकीची साधने वाढल्यावर सर्व जगभर जुन्या उद्योगधंद्यांचे दिवस भरले असे म्हणावयास हरकत नाही. जेथे जेथे धंदे टिकाव धरून राहिले तेथे त्यांस काही विशिष्ट परिस्थिती अनुकूल होती म्हणूनच. इतर ठिकाणी त्यांनी आपले स्वरूप थोडेसे बदलून नवीन तऱ्हेची उत्पादनपद्धती अगर आर्थिक व्यवस्था यांचा काही अंशी स्वीकार केला. बहुतेक देशात जुने धंदे गेल्याबरोबर त्यांची जागा नवीन धंद्यांनी घेतली.

नवीन आर्थिक युगाचा विशेष म्हणजे यांत्रिक उत्पादन हा होय. वाफ, वीज यांच्या योगे अथवा इतर मानवेतर शक्तीने चालविलेल्या मोठमोठ्या यंत्रांच्या साहाय्याने शेकडो मजूर लावून कारखान्यात माल पैदा करावयाचा आणि तो जगभर आगबोटी व आगगाड्या यांच्या द्वारे वाहून नेऊन खपवावयाचा ही पद्धत सर्व महत्वाच्या उद्योगधंद्यांत अलीकडे शेपन्नास वर्षे रूढ झाली आहे. या नवीन उत्पादन पद्धतीस हिंदुस्थानात १८५० च्या सुमारास सुरुवात होऊ लागली. ही सुरुवात कापड व गोणपाट विणणे या दोन धंद्यांत झाली. हिंदुस्थानात कापूस फार मोठ्या प्रमाणावर पैदा होत असे व या देशात कापडाचा खपही पुष्कळ. येथून कापसाची निर्गत आणि सुताची व कापडाची येथे आयात या दोन्ही गोष्टींस १८५० च्या पुढेच विशेष भरती आली. तेव्हा याच सुमारास येथे कापडाच्या गिरण्या निघाव्या यात काही आश्चर्य नाही. जी गोष्ट कापडाची तीच गोणपाटाची. येथून ताग जाऊन त्याच्या बळावर डंडीला गिरण्या स्थापन केल्या. तेव्हा डंडीच्या स्कॉच व्यापाऱ्यांपैकीच काहींना तागाच्या माहेरघरात, म्हणजे खुद्द बंगाल्यात गिरण्या काढाव्या अशी बुद्धी ओघानेच झाली. पहिली कापडाची गिरणी १८५१ साली एका पारशी गृहस्थाने मुंबईजवळ कुर्ल्यास काढली; व पहिली गोणपाटाची गिरणी १८५४ साली कलकत्यास एका स्कॉच गृहस्थाने उघडली.

या दोन्ही नवीन धंद्यांची वाढ प्रथम अगदी मंदगतीने झाली. कापडाच्या गिरण्यांस परदेशी माल व हातमागावर निघालेला देशी माल यांस दुहेरी टक्कर द्यावयाची होती; आणि सुरुवातीस तरी हिंदुस्थानात आगगाड्यांचा प्रसार पुरता झाला नसल्यामुळे कापूस मुंबईस आणणे व कापड तेथून निरनिराळ्या प्रदेशात पाठविणे हे सुलभ रीतीने करिता येत नसे. त्यातच १८६०-६५ च्या दरम्यान मुंबईस कापसाचा भाव अतोनात चढला. कापसाच्या सट्टेबाजीकडे व्यापाऱ्यांचे विशेष लक्ष वेधले गेले आणि मुंबईतील कापसाच्या महागाईमुळे गिरण्यांचे कापडही फार महागले. परंतु १८६५-६६ च्या सट्टेबाजीचा भर ओसरल्यावर त्या अवधीत निघालेल्या शेकडो निरनिराळ्या धंद्यांत कापडाच्या गिरण्या हा एकच धंदा विशेष टिकाऊ असा दिसून आल्यामुळे मुंबईतील व्यापाऱ्यांचे लक्ष

तिकडे जाऊन यापुढे कापडाच्या गिरण्यांची संख्या भराभर वाढू लागली. १८६० च्या सुमारास हिंदुस्थानात एकंदर गिरण्या बारावर नसाव्यात व पुढील दहा वर्षांत यांची संख्या वीसपर्यंत गेली असावी. १८७१ च्या पुढे मात्र गिरण्यांची वाढ किती झपाट्याने होऊ लागली हे पुढे दिलेल्या आकड्यांवरून दिसून येईल.

### कापडाच्या गिरण्यांची वाढ

| साल | गिरण्या | चात्या | माग |
|---|---|---|---|
| १८७६ | ४७ | १,१००,११२ | ९,१३९ |
| १८८१ | ६० | १,५१३,०९६ | १३,७०७ |
| १८९१ | १२७ | ३,३५१,६९४ | २४,५३१ |
| १९०१ | १९३ | ५,००६,९३६ | ४१,१८० |

प्रथम ज्या गिरण्या निघाल्या त्या बहुतेक सुताच्या होत्या; व कापड विणण्याचा प्रयत्न फारसा केला गेला नाही. याचे कारण असे की, सूत तयार करणे या वेळेस विशेष किफायतशीर होते. लँकाशायरमधून जेव्हा कापड येणे सुरू झाले तेव्हापासूनच सूतही येऊ लागले व या सुताच्या आयातीची सारखी वाढच होत होती. यंत्रावर कापड विणण्यापेक्षा सूत काढणे अधिक सोपे. याला भांडवल कमी लागे व मजूर-वर्गही साधारण अडाणी असलेला चाले. तसेच यांत्रिक उत्पादनाशी टक्कर देण्याचे चरख्याचे सामर्थ्य हातमागापेक्षा फारच कमी. यामुळे गिरणीच्या सुताला हातमागावर कापड काढणाऱ्या विणकर-वर्गाकडून फार मागणी असे. हिंदुस्थान व चीन यांमध्ये हातसूत मागे पडून तेथील गिऱ्हाइकी लँकाशायर आधी पटकावू लागले होते. हेच काम पुढे विशेष झपाट्याने मुंबईच्या गिरण्यांनी केले. हिंदुस्थानातील कापूस हलक्या प्रतीचे सूत काढण्यास फार चांगला होता. येथील मजुरी थोडी, तलम सत काढण्यास लागणारे विशेष कसब यास लागत नव्हते, आणि कापसाच्या व सुताच्या वाहतुकीचा खर्चही थोडा. या सर्व कारणांमुळे सुताचा धंदा फार लवकर वाढीस लागला. अगदी सुरुवातीपासूनच सुताच्या गिरण्यांची मदार चीनच्या गिऱ्हाइकीवर असे. १८७५ सालच्या पूर्वी सुताची निर्गत फारशी नव्हती. १८७६–७७ साली एकंदर ८० लाख पौंड सूत परदेशी गेले, त्यापैकी ६३ लाख पौंड सूत चीनमध्येच खपले. १८९२–९३ सालपावेतो हा व्यापार सारखा वाढतच होता. या साली हिंदुस्थानातून एकंदर निर्गत जवळजवळ १९ कोटी पौंडांची झाली व त्यापैकी १७·७ कोटी पौंड सूत एकट्या चीनने घेतले. तेव्हा या अवधीतील हिंदी गिरण्यांची वाढ चीनशी वाढत्या व्यापाराने झाली. वरील प्रकरणात दर्शविल्याप्रमाणे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदुस्थानातून चीनमध्ये पुष्कळ कापूस जात असे. ही कापसाची निर्गत १८७० सालपावेतो बरीच होती. पण ती आता नाहीशी होऊन हिंदी गिरण्यां-तील सूतच कापसाच्या ऐवजी चीनमध्ये जाऊ लागले. (हिंदुस्थानातून १८७० साली चीनमध्ये कापूस २१ लाख रु. किमतीचा व सूत २५ हजार रु. किमतीचे गेले, तर १८९२-९३ साली यांची किंमत अनुक्रमे सव्वालाख रु० व ६३ लाख रु० होती.) लँकाशायरच्या चीनशी होणाऱ्या सुताच्या व्यापारास मुंबईच्या सुताने चांगला आळा बसून पंचवीस वर्षांच्या आतच मुंबईकरांनी तो बहुतेक काबीज केला. हिंदुस्थानातही जे थोडेबहुत जाडेभरडे सूत परदेशाहून येत असे तेही येईनासे झाले. परंतु चीनमधील लँकाशायरची गिऱ्हाइकी जशी अगदीच बसली तसे आपल्याकडे होणे शक्य नव्हते. याचे कारण असे की, या देशात उत्तम तलम माल हातमागावर विणणारा फार मोठा विणकरवर्ग अस्तित्वात होता; व तलम सूत काढणे हिंदी गिरण्यांस सुरुवातीस तर शक्य नव्हते. या धंद्याच्या अगदी प्रथमावस्थेत

गिरण्यांतून फारच जाड सूत निघे. तथापि यासंबंधीचे तपशीलवार आकडे १८९५-९६ सालपावेतो मिळत नाहीत. या सालापूर्वी जरा बरे सूत काढण्यास हिंदुस्थानातील गिरण्यात थोडी सुरुवात झाली होती. तरी या वर्षीच्या आकड्यांवरून असे दिसते की, गिरण्यातील सुतापैकी नऊदशांश माल २० नंबराहून कमी नंबराचा होता. याच्या उलट आयातीत असे आढळून येते की, २५ नंबराच्या खालील काही रंगीत सूत येत असे तेवढेच; बाकी सर्व आयात २५ नंबरावरील, विशेषतः नं. ३१ ते नं. ५० मधील सुताची होत असे.

साधारणपणे १८९० ते १८९५ पावेतो हिंदी गिरण्या चीन देशातील विणकरवर्गावर पुष्कळच अंशाने अवलंबून होत्या. १८९० च्या सुमारास येथील गिरण्यात पैदा झालेल्या सुतापैकी जवळजवळ अर्धे सूत परदेशांत पाठविले जात असे. हिंदुस्थानात खपत असलेल्या गिरण्यांच्या सुतापैकी अर्ध्याहून बरेच अधिक सूत येथील विणकरवर्ग विकत घेई व बाकीचे गिरण्यांतील मागांकडे जाई व शिवाय हातसूत असे ते वेगळेच. हातसुताच्या धंद्याबद्दल नक्की काहीच सांगता येत नाही. बंगाल प्रांतात हा धंदा एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नष्ट झाला असावा, तर पवनी येथील नावाजलेल्या झिळमिळी कापडास लागणारे सूत तेथील महारवर्गच काढीत असल्याबद्दल १८७० च्या गॅझेटियरमध्ये उल्लेख सापडतो. लँकाशायरमधील सुताची आयात १८२५ च्या पुढे सुरू झाली. ही वाढता वाढता १८५० साली एक कोटी पौंड झाली. यापुढील आयात १८६० च्या सुमारास दोन, १८७० च्या सुमारास तीन, १८८० च्या सुमारास चार व १८९० च्या सुमारास पाच कोटी पौंड अशी वाढत गेली. स्थूलमानाने असे म्हणता येईल की, १८६० च्या पूर्वी काही विवक्षित प्रांतातच हा धंदा बसला, परंतु याच्या पुढे त्याचा ऱ्हास सार्वत्रिक व झपाट्याने होऊ लागला. १८६० च्या सुमारास हिंदी गिरण्यांचे असे फार थोडे सूत निघत असावे. या वेळेस झालेली सुमारे २ कोटी पौंडांची आयातच हातसुतास मुख्यतः घातक होती. पण लवकरच हिंदी गिरणसूत निघू लागून १८७५ च्या सुमारास देशी व परदेशी मिळून जवळजवळ १० कोटी पौंड गिरणीचे सूत व १८९५ च्या सुमारास २० कोटी पौंडांवर सूत विणकरवर्गात खपू लागले असावे. हे आकडे अर्थात अगदी ठोकळ मानाने खरे मानायचे. तरी त्यावरून हातसुताच्या धंद्याच्या क्षेत्राचे गिरणीच्या सुताने केव्हा व कसे आक्रमण केले याची बरोबर कल्पना येऊ शकते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी हातसुताचा धंदा हिंदुस्थानातून जवळजवळ नामशेष झाला होता असे समजण्यास हरकत नाही. तलम सूत काढण्याचा धंदा बुडाला तो विलायतेतील आयातीमुळे; परंतु देशभर पसरलेल्या जाडेभरडे सूत काढणाऱ्यांच्या पोटावर पाय हिंदी गिरण्यांतील पैदाशीनेच आणला. सुरुवातीच्या तीसपस्तीस वर्षांत हिंदी गिरण्यांस जाडेभरडे सूत काढण्यावर विशेष भर देता येऊन चांगला फायदा कमविता आला. परंतु १८९० नंतर एकंदर परिस्थितीत बराच बदल घडून आला. या वेळेपावेतो जपानात हिंदी सूत बरेच पाठविले जाई. जपानात १८९० च्या पुढे गिरण्या निघाल्यामुळे हा व्यापार बंद झाला. तसेच येथपावेतो चीनमध्ये होत असलेल्या निर्गतीत विशेषतः हुंडणावळीच्या अस्थिरपणामुळे बरीच अडचण भासू लागली. तेव्हा या धंद्यातील लोकांचे लक्ष धंद्याची वाढ कोणत्या नवीन दिशेने करता येईल याकडे साहजिकपणे गेले. नवीन वाढ होणे दोन बाजूंनी शक्य होते. एक तर कापड विणण्यावर जास्त भर देणे; व दुसरे म्हणजे वरच्या नंबरचे सूत व जास्त तलम माल काढू लागणे. १८९० च्या पूर्वी हिंदी गिरण्यांतून निघालेल्या सुतापैकी सारे एकपंचमांश सूत गिरण्यांतील मागाकडे जात असावे. १८९५ साली स्थूलमानाने ३० कोटी वार कापड गिरण्यांत विणले गेले असेल. याच्या जवळजवळ अडीच ते तीनपट माल हातमागावर निघत असावा; आणि या सुमारास परदेशी मालाची आयात २०० कोटी वार प्रतिवर्षी होत होती. १८९० च्या पुढे सुताच्या बाजारास मंदी आल्यामुळे गिरण्यांत जास्त माग बसवू लागले, हे वर दिलेल्या तक्त्यातील चात्या व माग यांच्या १८९१ ते

१९०१ चे दरम्यानच्या वाढीच्या प्रमाणावरून दिसून येईल. त्याप्रमाणे जास्त तलम माल काढण्याकडेही गिरणीवाल्यांची प्रवृत्ती होत गेली. परंतु या बाजूंनी जी खरी वाढ झाली ती विसाव्या शतकातच.

हलक्या प्रतीच्या कापसाची पैदास हिंदुस्थानात विशेष होते, तर पाट (raw jute) हा बंगाल्याशिवाय जगात कोठेच पिकत नाही. यामुळे पाटाच्या गिरण्या काढण्यास कलकत्ता हे सहजच योग्य ठिकाण आहे. हिंदुस्थानातून १८५० च्या पूर्वीच पाटाची निर्गत परदेशी कशी होऊ लागली व डंडी येथे पाटाच्या गिरण्या कशा स्थापिल्या याची हकीकत मागे दिलीच आहे. कलकत्त्यास पहिली पाटाची गिरणी १८५४ साली उभारली गेली. परंतु प्रथम याही धंद्याची वाढ फार मंदगतीनेच झाली. १८६५ मध्ये हिंदुस्थानात साऱ्या दोनच गिरण्या होत्या. १८७५ साली यांची संख्या दहापर्यंत वाढली, आणि यापुढे धंद्याची प्रगती अगदी एकसारखी झपाट्याने होत राहिली. युरोपात पाटाचा उपयोग पोती, गोणपाट बनविण्याकडे होई; पण याशिवाय इतर बऱ्याच तऱ्हेचे कापड विणण्यात व सतरंज्या अथवा गालिचे बनविण्यात कापूस व लोकर यांजबरोबर पाट वापरण्यात येई. हिंदुस्थानात सुरुवातीस पाटाचा कोणताच उच्च दर्जाचा माल काढण्यात येत नसे, तर बरीच वर्षे पोती व गोणपाट हीच हिंदी गिरण्यांतून बाहेर पडत. परदेशी अथवा बाहेरगावी धान्य वगैरे पाठविण्याकरिता पोती आणि कापसाचे वगैरे गठ्ठे बांधण्याकरिता गोणपाट हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानातच पुष्कळ लागे, यामुळे पाटाच्या गिरण्यांच्या मालाचा खप स्वदेशात बराच होई. तथापि प्रथमपासूनच परदेशांतसुद्धा या मालाची निर्गत होत होती. सुरुवातीस पोत्यांचीच निर्गत विशेष होई, पण १८८५ च्या पुढे गोणपाटाचीही निर्गत होऊ लागली. प्रथम चीन, इजिप्त, ऑस्ट्रेलिया या देशांतील गिऱ्हाईक कलकत्त्याच्या गिरण्यांनी डंडीपासून काबीज केले; आणि पुढे तर अमेरिका व खुद्द इंग्लंड, स्कॉटलंड येथेही हिंदुस्थानातील गोणपाट व पोती ही बरीच खपू लागली. यामुळे डंडीचा व्यापार समूळ बसला असे झाले नाही. तथापि कापडाच्या धंद्याप्रमाणेच पोती व गोणपाट ही सोडून जास्त उच्च प्रकारच्या मालाकडे डंडीला लक्ष पुरवावे लागले. या पाटाच्या गिरण्यांच्या धंद्यात विशेष लक्षात घेण्यासारख्या बाबी म्हणजे या की, अगदी सुरुवातीपासून आजतागायत जवळजवळ सर्व गिरण्या कलकत्ता अथवा त्यालगतच्या हुगळी किनाऱ्यावरील प्रदेश येथेच स्थापिलेल्या आहेत. तसेच या गिरण्या सुरुवातीस युरोपीय, विशेषतः स्कॉच लोकांनी काढलेल्या असून या धंद्यात जी वाढ झाली ती सर्व नवीन गिरण्या निघून नव्हे, तर जुन्या गिरण्यांनीच आपल्या कार्याचे क्षेत्र व प्रमाण वाढवून झाली. यामुळे प्रथमपासूनच या धंद्यातील गिरणीवाल्यांची एकजूट बरीच राहून उत्पादनाचे नियंत्रण करण्याचा प्रघात या धंद्यात बराच लवकर सुरू झाला. पाटाच्या मालाची मागणी एकंदर जागतिक व्यापाराच्या प्रमाणावर अवलंबून असे; त्यामुळे व्यापारी तेजीमंदीचे परिणाम या धंद्यावर चटकन दिसून येत. असे असूनही पाटाच्या गिरण्यांची प्रगती सारखी होत गेली याचे मुख्य कारण गिरणीवाल्यांची संघटना हेच होय.

## पाटाच्या गिरण्यांची वाढ

| साल | गिरण्या | चात्या | माग |
|---|---|---|---|
| १८७९–८० | २२ | ७०,८४० | ४,९४६ |
| १८८९–९० | २७ | १६४,२४५ | ८,२०४ |
| १९०१–०२ | ३६ | ३३१,३८२ | १६,११९ |

कापडाच्या व पाटाच्या गिरण्या यांशिवाय कोणत्याच नवीन कारखानी उद्योगधंद्यांत या काळात फारशी प्रगती झाली नाही. परंतु सदरील गिरण्यांबरोबरच एक नवीन प्रकार उदयास आला व वाढला.

हा प्रकार म्हणजे मळ्यांचा होय. मळ्यांना आर्थिक उत्पादनाचा नवीन प्रकार म्हणून कारखान्यांच्या पंक्तीस बसविणे एकप्रकारे योग्य नव्हे. कारण यांत्रिक उत्पादन हा जो कारखान्यांचा विशेष तो मळ्यांत दिसून येत नाही. शिवाय कारखान्यांत कच्च्या मालास पक्क्या मालाचे स्वरूप देण्यात येत असे, तर मळ्यांत कच्चा माल उत्पन्न करणे हेच विशेषेकरून घडून येई. परंतु एकसूत्री अमलाखाली बरेचसे भांडवल घालून मजुरांच्या मोठमोठ्या समुदायांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर काही विवक्षित पैदास करावयाची हे मळ्यांचे वैशिष्ट्य आहे. मळेही हिंदुस्थानात नवीनच निघाले, आणि ते निघण्याची कारणे व त्यांना अनुकूल असलेली पार्श्वभूमिका हीही कारखान्यांसारखीच असल्यामुळे मळ्यांचा विचार येथे करणे आपणांस जरूर आहे. हा विचार करावयाचा म्हणजे मुख्यत्वे तीन प्रकारच्या मळ्यांच्या धंद्यांचा : नीळ, चहा व कॉफी. हे तिन्ही प्रकारचे उद्योग युरोपियांनीच सुरू केले व अगदी अलीकडेपावेतो हे पूर्णपणे त्यांच्याच हातात होते.

यांपैकी निळीच्या धंद्याचे स्वरूप इतर मळ्यांपेक्षा काहीसे भिन्न होते. चहा व कॉफी यांची लागवड पूर्वी वसाहत जवळजवळ नसलेल्या अशा डोंगराळ मुलखात बहुधा झाली. मळेवाल्यांनी लागवडीस अनुकूल असलेल्या प्रदेशांत बऱ्याच जमिनी खरेदी केल्या अथवा अन्य तऱ्हेने मिळविल्या, आणि बाहेरून मजूर आणून जमीन स्वतःच तयार करून तेथे चहाची अथवा कॉफीची लागवड केली. निळीच्या बाबतीत तसे नव्हते. अठराव्या शतकात नीळ गुजराथेत पुष्कळ पिकत असे. परंतु पुढे जमेका वगैरे बेटांतील निळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्यामुळे गुजराथेतील पिकाचे महत्त्व फार कमी झाले. १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून निळीच्या लागवडीच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न, विशेषतः बिहार प्रांतात युरोपीय लोकांनी सुरू केले व त्यांत त्यांना लवकरच यशही आले. निळीच्या लागवडीचा प्रकार म्हणजे असा होता की, सामान्य शेतकरीच ती पिकवीत असे. युरोपीय मळेवाला हा स्वतः जमीनदार नसल्यास शेजारच्या जमीनदारांच्या कुळांशी नीळ पिकविण्याबद्दल करार करी. पुढे निळीचे पीक आल्यावर नीळ कारखान्यांत तयार करून परदेशी पाठविणे हेच कार्य काय ते युरोपीय मळेवाला करी. हा धंदा एकंदरीत लाभदायक होता; पण त्यात शेतकऱ्यांवर फार जुलूम होत असे, असे म्हणण्यास हरकत नाही. कारण मळेवाले आगाऊ पैसे देऊन अथवा अन्य रीतीने शेतकऱ्यांस आपल्या पकडीत आणीत आणि नंतर एका ठराविक भावाने आपल्या जमिनीपैकी अमुक एक हिस्सा जमिनीत नीळ पिकविण्याची त्यांजवर जबरदस्ती करीत. निळीच्या लागवडीची खरी वाढ बंगाल व बिहारमध्ये १८६० च्या अगोदर झाली. या काळात निळीस परदेशी व्यापारात फार महत्त्व होते. परंतु हे महत्त्व हळूहळू कमी होत गेले.

इतर नवीन महत्त्वाच्या धंद्यांप्रमाणे चहाच्या धंद्यासही सुरुवात १८५० च्या सुमारासच झाली. चहा आसामात चांगला होऊ शकेल असा शोध जरी प्रथम १८२० मध्ये लागला, तरी चहाचा पहिला खाजगी मळा १८५२ साली लावला गेला; आणि १८५५ ते १८६० च्या दरम्यान या धंद्यास खरा आरंभ झाला. १८६० ते १८६५ या अवधीत मुंबईतील कापसाच्या सट्टेबाजीसारखीच चहाच्या धंद्यातही सट्टेबाजीची वावटळ उठली. चहाचा धंदा फारच किफायतशीर असे वाटून लंडनमध्ये चहाच्या कंपन्या भराभर स्थापन झाल्या. परंतु लवकरच तो भ्रमाचा भोपळा फुटला; व १८६६ पुढे मळ्यांची वाढ तितकीशी झपाट्याने झाली नाही. तथापि जी झाली ती पूर्वीसारखी बिनबुडी राहिली नाही. चहाची लागवड मुख्यतः आसामातच प्रथम झाली; परंतु पुढे तिचा प्रसार दार्जिलिंगजवळचा प्रदेश, संयुक्त प्रांतातील व पंजाबातील हिमालयाच्या पायथ्याचा काही मुलूख आणि निलगिरीचा डोंगराळ टापू येथेही होत गेला. चहाचा खप परदेशीच फार होई. एकंदर पैदाशीच्या मानाने हिंदुस्थानातील चहाची मागणी गेल्या शतकात तर अत्यल्पच होती. आजही चहाचा प्रसार इतका

सार्वत्रिक झाला असून देखील एकंदर चहाच्या पिकापैकी जेमतेम एकदशांशच हिंदुस्थानात खपतो. बाहेरील गिऱ्हाइकांपैकी ग्रेट ब्रिटन व आयर्लंड हेच काय ते महत्त्वाचे गिऱ्हाईक होते; आणि चहाची बहुतेक सर्व निर्गत या देशांतच होई. १८६० पासून १९०० पर्यंतच्या चाळीस वर्षांत हिंदी चहाने हा प्रांत पूर्णपणे आक्रमिला; व १८६० साली विलायतेत केवळ चिनी चहाच जो खपत असे तो पुढे तेथे अगदीच खपेनासा होऊ लागला. चहाचे मळे पूर्वी सांगितल्याप्रमाणे इंग्रजी भांडवलवाल्यांनीच स्थापिले व ते बहुधा आजतागायत त्यांच्याच ताब्यात आहेत. राष्ट्रीय दृष्ट्या हिंदी लोकांना मजुरीचे नवीन क्षेत्र मिळाले आणि आसाम प्रांताची वसाहत या धंद्यामुळे बरीच झाली हेच त्याचे महत्त्व. या दोन्ही प्रश्नांचा थोडा विचार पुढे करावयाचा असल्यामुळे येथे त्याबद्दल अधिक विस्तार नको.

कॉफीचे मळेही १८५६ च्या पुढेच झपाट्याने वाढू लागले. चहाप्रमाणे १८६० ते १८६६ या सालात प्रथम या धंद्यातही सट्टेबाजी झाली. जवळजवळ १८७५ सालपावेतो चहा व कॉफी यांच्या निर्गतीची किंमत सारखीच होती. परंतु १८७५ च्या पुढे कॉफीच्या निर्गतीची प्रथम वाढ खुंटून नंतर तिला ओहटीच लागली. याची कारणे म्हणजे बोअरर नावाच्या किड्याने मळ्यांची केलेली नासाडी व परदेशांतील, विशेषतः ब्राझिलमधील कॉफीच्या पैदाशीची वाढ ही होत. चहाप्रमाणेच कॉफीचे गिऱ्हाईक बहुतेक परदेशीच असल्यामुळे ब्राझिलमधील चढाओढ ही हिंदी धंद्याच्या वाढीतील प्रमुख अडचण असे. १८८९ ते १८९६ च्या दरम्यान ब्राझिल देशातील अंदाधुंदीमुळे तेथील कॉफीची पैदास जशी कमी झाली तशी येथील धंद्यास तात्पुरती तेजी आली, यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. परंतु तेव्हापासून हा धंदा पुनः फारसा वाढीस लागलाच नाही; आणि बऱ्याच ठिकाणी कॉफीचे मळे काढून टाकून तेथे चहाची लागवड करण्यास मळेवाल्यांनी सुरुवात केली.

आता फक्त एकाच महत्त्वाच्या नवीन धंद्याचा विचार करणे राहिले व तो म्हणजे कोळशाचा. दगडी कोळशाच्या खाणी खणण्यास सुरुवात जरी अगदी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच झाली, तरी या कोळशाला त्या वेळेस कोठेच मागणी नव्हती व तो दूरवर वाहून नेण्याची सोयही नव्हती. यामुळे या खाणींची संख्या वाढणे शक्य नव्हते. कोळशाचा प्रसार व वाढ या गोष्टी आगगाड्या सुरू होण्यावरच खरोखर अवलंबून होत्या. कारण दगडी कोळशाला पहिली मुख्य मागणी म्हणजे आगगाड्यांचीच; आणि राणीगंजापावेतो लोहमार्ग बांधला गेल्यानंतरच या टापूतील खाणींची संख्या भराभर वाढू लागली. हिंदुस्थानच्या भूगर्भात कोळसा विपुल सापडतो असे स्थान एकच, व ते म्हणजे बिहार प्रांतातील राणीगंजजवळील प्रदेश हे होय. एकोणिसाव्या शतकात इतर ठिकाणी म्हणजे मध्यप्रांतातील मोहपानी व वरोडा ह्या ठिकाणीच थोडासा कोळसा सापडला. यामुळे पूर्वेकडील प्रांत सोडले असता इतर हिंदुस्थानातील भागात कोळसा महाग पडतो; आणि पूर्वीच्या काळी जेव्हा आगगाड्यांचा प्रसार कमी होता व वाहतुकीचे दर जबर होते तेव्हा तर तो अतिशयच महाग पडे. यामुळे बरीच वर्षे कोळशाच्या खाणींची वाढ व्हावी तशी झपाट्याने झाली नाही. विशेषतः सुएझ कालवा बांधला गेल्यामुळे इंग्लंड-मधील कोळसा मुंबई, कराची यांसारख्या ठिकाणी बराच स्वस्त मिळू लागला. तेव्हा सुरुवातीस पूर्वेकडील व उत्तरेकडील आगगाड्या आणि कलकत्ता शहर येथेच हिंदी कोळसा खपे. पश्चिमेकडील व दक्षिणेकडील आगगाड्यांस आणि मुंबईस काही मध्यप्रांतातील कोळसा व बाकीचा सर्व आयात झालेला कोळसा वापरीत असत. हिंदुस्थानच्या बहुतेक भागात कोळसा इतका महाग पडे की, राने विपुल असलेल्या प्रदेशांत आगगाड्यांकरिता सरपण म्हणून लाकडाचाच उपयोग करीत. हळूहळू कोळशाच्या खाणींची वाढ झाली. कोळसा काढणे व वाहून नेणे जास्त सुलभ होऊ लागले. हिंदी कोळशाच्या मागणीचे क्षेत्र वाढू लागले. १८८० च्या पुढे कोळशाची आयात वाढेनाशी झाली व हिंदी कोळशाची पैदास मात्र बरीच वाढली. नंतर १८९० च्या सुमारास हिंदी कोळसा थोडथोडा परदेशांत जाऊ लागला व

ब्रह्मदेशातील गिन्हाइकी त्यास मिळाली. तथापि मुंबई, कराचीकडे मात्र त्यास आयात होत असलेल्या कोळशाशी इतक्यात टक्कर देणे शक्य नव्हते. (१८८० ते १९०७ च्या दरम्यान प्रतिवर्षी ६ ते ८ लाख टन कोळशाची आयात हिंदुस्थानात होत असे. याच अवधीत हिंदुस्थानातील कोळशाची पैदास पुढीलप्रमाणे वाढत होती : १८७०, ४.५ लाख टन; १८८६, १२.९ लाख टन; १८९४, २८ लाख टन; १९०१, ६० लाख टन.) या काळात कोळशाहूनही जास्त किमतीचे सोने हिंदुस्थानातील खाणीतून काढण्यात येई. परंतु एकंदर जगातील पैदाशीच्या मानाने हिंदुस्थानात सोने अगदीच कमी निघते. शिवाय कोलारखेरीज अन्यत्र कोठेच खनिज सोने सापडले नाही, आणि कोलारचेही महत्त्व सारखे कमी कमीच होत आहे. औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीनेही सोन्याला काही फारसे महत्त्व नाही. तेव्हा यासंबंधी अधिक तपशिलात शिरण्याचे कारण नाही.

कापडाच्या वा पाटाच्या गिरण्या, कोळशाच्या खाणी, आणि चहाकॉफीची मळे एवढेच नवीन प्रकारचे उद्योगधंदे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी हिंदुस्थानात प्रस्थापित झाले होते. याशिवाय हिंदुस्थानातील कच्चा माल जो परदेशी जाई तो पाठविण्याजोगा तयार करणे, कापसातील सरकी काढणे, कापूस व पाट यांचे गठ्ठे बांधणे, तांदूळ सडणे, इमारती लाकडाच्या तुळया कापणे इत्यादी बाबतींत यंत्रांचा प्रसार झाला होता; आणि या प्रकारचे कारखाने सर्व हिंदुस्थानभर आढळून येतात. परंतु हे धंदे केवळ हंगामी आहेत व यांचे औद्योगिक दृष्ट्याही महत्त्व विशेष नाही. बाकी काही रेशमी व लोकरी कापडाच्या गिरण्या, कागदाच्या गिरण्या, दारू तयार करण्याचे कारखाने वगैरे नवीन धंदेही कोठे कोठे अस्तित्वात आले होते. तथापि त्यांचे प्रमाण अगदीच लहान होते. १८९५ साली स्थूलमानाने कापडाच्या गिरण्यांत दीड लाख, पाटाच्या गिरण्यांत पाऊण लाख व कोळशाच्या खाणींत पन्नास हजारपावेतो मजूर कामाला लावलेले असत. इतर कोणत्याच धंद्यांतील कारखान्यांत मजुरांची संख्या दहा हजारपावेतो गेली नव्हती.

या नवीन धंद्यांस सुरुवात साधारणतः १८६० च्या सुमारास झाली व या सर्वांची वाढ १८७०–७५ च्या पुढे विशेष झपाट्याने होऊ लागली. १८७५ पावेतो जुन्या धंद्यांचा ऱ्हासही मोठ्या प्रमाणात होत होता. तेव्हा औद्योगिक दृष्ट्या १८७०-७५ या सालात हिंदुस्थानची स्थिती जी अत्यंत निकृष्ट होती ती पुढील वीस वर्षांत काहीशी सुधारली. न्या. रानडे यांनी १८९३ साली लिहिलेल्या एका निबंधात हाच सिद्धांत पुढे मांडला असून त्याच्या पुष्ट्यर्थ हिंदुस्थानच्या आयात निर्गतीतील कच्च्या व पक्क्या मालाचे प्रमाण कसे चढत अथवा उतरत होते हे दर्शविले; आणि एकंदर सर्व धंद्यांच्या प्रगतीचा आढावा घेऊन हिंदी भांडवलवाल्यांनी जर कसून प्रयत्न केला तर हिंदुस्थानात फार मोठी औद्योगिक प्रगती थोडक्याच अवधीत होईल, असे त्या वेळेसच त्यांनी भविष्य वर्तविले होते.

## ४. शेती व शेतकरी

हिंदुस्थानातील शेतकऱ्याची स्थिती ज्या निरनिराळ्या गोष्टींवर अवलंबून आहे त्यातील मुख्य म्हणजे पाऊसपाणी, पिकाचे भाव व सरकारी सारा वसूल करण्याची मर्यादा व पद्धती या होत, असे म्हणण्यास हरकत नाही. आगगाडीच्या युगापूर्वी पिकाच्या भावास विशेष महत्त्व नव्हते. कारण शेतकरी व ग्रामसंस्था स्वावलंबी असत. गावातील पीक फारसे बाहेर विकावयास जात नसे. गावातल्या गावात अलुत्या-बलुत्यांस पिकांच्या रूपानेच त्यांचा माल व चाकरी यांबद्दल मोबदला देण्यात येत असे आणि बाहेरून विकत घेण्याच्या वस्तूही कमी होत्या. तेव्हा पीक चांगले आले

व सरकारी वसूल घेण्यात जुलूम झाला नाही म्हणजे ते सुबत्तेचे वर्ष असे समजावयाचे. अर्थात जमीनमहसूलविषयक सरकारी धोरण, हे शेतकऱ्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे समजले पाहिजे. या बाबतीत हिंदुस्थानात सर्वत्र सारखीच स्थिती नाही. बंगाल्यात पहिल्यापासून जमीनदारी पद्धती पडून तेथे कॉर्नवॉलिसच्या कारकिर्दीपासून धारा कायमही करण्यात आला. हा कायम केलेला धारा प्रथम फार जबर होता व त्यामुळे बंगाल्यातील ब्रिटिश अमदानीच्या सुरुवातीचे जमीनदार ठार बुडाले. पुढे हळूहळू धान्याच्या किमती वाढल्या व धाऱ्याचा बोजा हलका झाला, आणि नंतर जमीनदारांचा वर्ग संपन्न बनला. संयुक्त प्रांत व पंजाब यांतसुद्धा एकप्रकारची जमीनदारीचीच पद्धती प्रचलित आहे. या दोन पद्धतींत फरक एवढाच की, बंगाल्यात जी जमाबंदी करण्यात आली ती इस्टेटवार म्हणजे एका जमीनदाराच्या सबंध जमिनीपुरती. परंतु पंजाब व संयुक्त प्रांत यांमध्ये ती मौजावार अथवा महालवार करण्यात आली; म्हणजे आकार ठरविण्यात आला तो प्रत्येक महालाकरिता (खेड्याकरिता). बंगाल्यात मोठमोठ्या जमिनी धारण करणारे जमीनदार असत, तर पंजाब व संयुक्त प्रांत येथे प्रत्येक खेडे लहान लहान भागीदार असणाऱ्या जमीनदारांत वाटले गेलेले असे. येथेही कायम धारा बसवावा असे सुरुवातीस वाटत होते; परंतु काही वर्षांनंतर बराच खल होऊन याविरुद्ध निकाल पडला आणि जमीन-महसूल सरसकट लांब मुदतीचा बसवावा व वीस-वीस अथवा तीस-तीस वर्षांनी फेरतपासणी व्हावी असे धोरण निश्चित झाले. बंगाल्यातील जमीनदार साधारणपणे मोठा असामी व स्वतः शेत वाहणारा नव्हे; तेव्हा शेतकऱ्यावर जमीनमहसूलविषयक सरकारी धोरणाचा प्रत्यक्ष परिणाम होत नसे. कायम धाऱ्याचा जमीनदारास फायदा मिळाला; पण शेतकऱ्यास त्याचे काय! कारण जमीनदार त्याच्यावर जबर खंड लादून त्याला पिळून काढीतच असे. ही स्थिती बरीच दशके अशी कायम राहून जमीनदार व त्यांची कुळे यांच्यामध्ये सारखी तेढ वाढत राहिली. यास तोड म्हणून हळूहळू कुळांचे हक्क रक्षण करण्याकरिता कायदे होऊ लागले; व कुळांस काढून टाकणे अथवा खंडाची वाढ करणे यासंबंधी जमीनदारांच्या हक्कांवर कायदेशीर नियंत्रण घालण्यात आले. जे बंगाल्यात झाले तेच काही अंशी संयुक्त प्रांतात, विशेषतः अयोध्या प्रांतामध्ये झाले; आणि तेथेही कुळांच्या संरक्षणार्थ कायदे करण्याची हळूहळू पाळी आली. कुळांच्या संरक्षणार्थ पहिला कायदा १८५९ साली बंगाल्यात झाला. यातील मुख्य तरतूद अशी की, बारा वर्षांहून अधिक वर्षे सारखा जो खंडकरी शेत वाहत असेल त्याला काढून टाकण्याचा जमीनदारास हक्क नसावा. तसेच या कुळांचा खंडही मुल्की कोर्टाच्या परवानगीशिवाय कमीअधिक करता येऊ नये असे ठरविण्यात आले. यासंबंधी पुढचे महत्त्वाचे कायदे म्हणजे १८६८ चा पंजाब व १८८५ चा बंगालमधील कायदा हे होत. याच्या उलट मद्रास व मुंबई या इलाख्यांत रयतवारी पद्धती प्रचलित आहे. येथे साधारणपणे प्रत्यक्ष शेतकरी हाच सरकारसारा भरणारा असामी. जमीनदार या इलाख्यांत फार थोडे, व निदान १८५० च्या सुमारास तरी खंडाने जमीन घेऊन वाहणारे शेतकरीही फार थोडे असत. यामुळे या प्रदेशांत सरकारी जमीनमहसूलविषयक धोरणाचे परिणाम प्रत्यक्ष शेतकऱ्यासच जाणवत असत.

इंग्रज अमलदारांच्या अज्ञानामुळे अव्वल इंग्रजीत सर्व हिंदुस्थानभर शेतसारा फार जबर लादला गेला आणि त्यामुळे जमीनदारांची व शेतकऱ्यांची फार दैना झाली हे वर सांगितलेच आहे. मुंबई इलाख्यात वुइंगेट साहेबाच्या देखरेखीखाली नवीन महसूलपद्धती बसविण्याचे काम सुरू झाले; व १८४७ च्या संयुक्त अहवालात ह्या नवीन रयतवारी पद्धतीची तत्त्वे पूर्णपणे ग्रथित झाली. यापुढे एकंदर जमीनमहसुलाचा बोजा पूर्वीपेक्षा पुष्कळच कमी झाला व शेतकऱ्याची परिस्थिती सुधारू लागली. मद्रास इलाख्यात तर जवळजवळ १८६० सालपावेतो हा जमीनमहसूल कमी करण्याविषयी काही करण्यात आले नव्हते. त्यानंतर मात्र हा बोजा काहीसा कमी झाला. संयुक्त प्रांतात १८५५ चे

'शहाराणपूर कानू' अमलात येण्यापूर्वी जमीनमहसुलाचा बोजा फार भारीच होता. १८५० पावेतो साधारणपणे जमीनमहसुलाची पद्धती व या कराचे मान ह्या गोष्टीच ठरत होत्या. काही प्रांतांत जमीनदारी तर इतर ठिकाणी रयतवारी अमलात आली. प्रथम जमीनदाराच्या अथवा शेतकऱ्याच्या ऐन उत्पन्नाच्या तीनचतुर्थांश इतपतही कर वसूल करण्यापर्यंत मजल गेली; पुढे शहारणपूर कानूप्रमाणे ऐन उत्पन्नाच्या निम्याहून अधिक कर असू नये असे संयुक्त प्रांतात ठरले, व साधारणपणे हाच नियम जिकडेतिकडे अमलात येऊ लागला. प्रथम मोजणीखाते व मुल्कीखाते यांच्या कामास व्यवस्थित स्वरूप येण्याला वेळ लागला आणि एकंदर जमीनमहसुलाची आकारणी कशी करावी व उत्पन्नाचा अंदाज कसा बांधावा याविषयी त्या प्रांतात सरकारी अमलदारांनी आपआपल्या पद्धती व आपआपले ठोकताळे बसविले. हे सर्व होईपावेतो सारावसुली बहुतेक ठिकाणी जबरच होत गेली, आणि काही काही प्रांतांत वसुलासंबंधी अनन्वित जुलूमही झाला. आधीच नवीन परकीय अमलात कायदेकानू व राजकीय व्यवस्था ही एकदम बदलल्यामुळे समाजाची घडी बिघडली, ती या प्रकारामुळे विशेषच विस्कळित झाली. १८५० च्या पुढे जमीनमहसुलासंबंधी ठरावयाच्या गोष्टी राहिल्या त्या मुख्यतः फेरतपासणीच्या वेळचे धोरण, साऱ्याची तहकुबी व सूट यासंबंधीचे धोरण, आणि शेतकऱ्याने स्वकष्टाने घडवून आणिलेल्या शेतसुधारणेच्या उत्पन्नावर कर बसवावा किंवा नाही याबद्दलचा प्रश्न या होत. या सर्व प्रश्नांस पुढे जे मोठे दुष्काळ पडले त्यांनी तोंड फोडले व पुढील ५० वर्षांत फेरतपासणीच्या वेळेस सारावाढीची कमाल मर्यादा निश्चित करणे, तसेच पिकाच्या आणेवारीप्रमाणे सूट-तहकुबीचे नियम ठरविणे हे घडून आले.

फेरतपासणीच्या वेळेस काळजी किती वाहिली पाहिजे याचे उत्कृष्ट उदाहरण १८७५ सालच्या पुणे व अहमदनगर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या दंग्यांनी मिळाले. १८६४-६५ मध्ये कापसाच्या किमती अतोनात वाढून जेव्हा शेती फार किफायतशीर झाली होती, त्या वेळेस अहमदनगर व पुणे जिल्ह्यांतील काही तालुक्यात साऱ्याची फेरतपासणी होत होती. कापसाची प्रचलित किंमत ही अशीच राहणार असे गृहीत धरून सरकारी अमलदारांनी या वेळेस सारा दुपटी-तिपटीने वाढविला. पुढे चारपाच वर्षांत या किमती खालावल्या. १८७० ते १८७४ या सालांत तर सर्वच अतोनात स्वस्ताई झाली. यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न फार कमी झाले; आणि त्याचे सावकारी देणे व जमीनमहसूल ही पैशात बांधलेली असल्यामुळे त्यांचा बोजा आता असह्य झाला. तेव्हा तेथील सावकारांविरुद्ध उठून त्यांची घरे लुटणे, कर्जरोखे फोडणे इत्यादी प्रकार शेतकऱ्यांनी केले. या प्रकरणी सरकारने नेमिलेल्या चौकशीमंडळाने दंग्याचे एक कारण म्हणजे भारी जमीन-महसूल हे दर्शविले; व त्यावर सरकारने इंदापूर वगैरे तालुक्यांतील सारा कमी करून यापुढे कोणत्याही फेरतपासणीच्या वेळेस एका विवक्षित मर्यादेपलीकडे सारा वाढवावयाचा नाही असा नियम घालून दिला.

धान्याच्या बाजारभावावर शेतकऱ्याची आर्थिक स्थिती बरीच अवलंबून राहणार हे उघड आहे. जुन्या काळी जरी खेड्याच्या बाहेर फारसा व्यवहार करण्यात येत नव्हता आणि त्यामुळे जरी पैशाची फारशी जरुरी शेतकऱ्यास भासत नसे, तरी शेतसाऱ्याची रक्कम पैशांतच निश्चित केली असल्यामुळे व साऱ्याची वसुलीही पैशाच्या रूपानेच होत असल्यामुळे निदान शेतसारा भरण्यापुरता तरी पैसा त्याला उभारावाच लागे. आणि शेतसाऱ्याचा बोजा जर अवल इंग्रजीत होता त्याप्रमाणे फार त्रासदायक असला, तर पिकाच्या भावावर शेतकऱ्याची सुस्थिती बऱ्याच अंशी अवलंबून असणे साहजिक होते. भाव सारखे खालावत असल्यास शेतकऱ्याची स्थिती हलाखीची होत असे. त्यात १८५० च्या पूर्वीच्या काळाबद्दल लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की, या काळात किमतीचे मान सारखे उतरत होते. रस्ते व आगगाड्या यांचा फैलाव होण्यापूर्वी मालाच्या किमतीतील चढउतार वर्षोवर्षी अचानक व

फार मोठ्या प्रमाणावर घडून येत असत. उदाहरणार्थ, धुळ्यास जोंधळा एका रुपयास १८२४ साली ३७ शेर होता, तर १८२९ मध्ये ७२ शेर, १८४६ त १९ शेर, १८४८ त ८५½ शेर व १८६१ साली २५ शेर होता. तथापि याप्रमाणे जरी किमती सारख्या बदलत असल्या तरी साधारणपणे या वेळी किमतींचा कल उतरण्याकडे होता असे म्हणता येईल. याचे मुख्य कारण म्हणजे, चलनी नाण्यांत विशेष वाढ झाली नाही व सोनेचांदी पूर्वीपेक्षा फारशी मुबलक नव्हती; परंतु नाण्यांत व्यवहार पूर्वीपेक्षा जास्त होऊ लागला-विशेषतः सरकार जमीनमहसूल सरसकट नाण्यांतच वसूल करू लागले व त्यामुळे नाण्यांस मागणी जास्त होऊन मालाच्या किमती कमी झाल्या हे असावे. १८५० च्या पूर्वी शेतकऱ्याची स्थिती खराब होण्यास हे एक महत्त्वाचे कारण होते हे लक्षात ठेविले पाहिजे. १८५० नंतर ऑस्ट्रेलिया व कॅलिफोर्निया या प्रदेशांत सोन्याच्या व रुप्याच्या नवीन खाणी सापडल्यामुळे चलनी नाणे पुनः मुबलक होऊ लागले. आणि किमती थोडथोड्या वाढू लागल्या. त्या १८६० च्या पुढे १८६५ पर्यंत फारच झपाट्याने वाढल्या. १८६५ नंतर त्या पुनः उतरू लागून १८७० ते १८७६ मध्ये त्या बऱ्याच उतरल्या. पुढे दुष्काळामुळे चढलेल्या किमती दुष्काळानंतर लगेच उतरल्या आणि १८८० ते १८९० या काळात त्यांत फारसा फरक पडला नाही. परंतु साधारणपणे १८९० च्या सुमारास किमती ज्या चढू लागल्या त्या यापुढे सारख्या चढतच गेल्या. १८५० च्या पुढील पन्नास वर्षांत विशेष लक्षात घेण्यासारखे फरक म्हणजे १८६१ ते १८६५ पर्यंत एकदम किमतीत चढ व त्यापुढे काही वर्षे लागलेला एकदम उतार हेच होत. अर्थात सर्वच पदार्थांच्या किमतीत सारखेच फरक पडत गेले नाहीत. यात विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे १८८० ते १८९५ पर्यंत युरोपात एकंदर किमती उतरत होत्या व त्यामुळे हिंदुस्थानातही कापूस, गहू वगैरे मालाच्या किमती उतरल्या. परंतु एवढ्याच अवधीत तांदूळ, पाट, जवस यांच्या किमती बऱ्याच वाढल्या. साधारणपणे वाढत्या किमतीच्या अवधीत शेतकऱ्याचा बराच फायदा होतो, असे ठोकळ मानाने म्हणता येईल. १८७० च्या पुढे किमती प्रथम खालावल्या व नंतर दुष्काळ आला यामुळे पुनः शेतकऱ्याची स्थिती वाईट झाली. उलट १८८० च्या पुढे बरीच वर्षे किमतींत फारसा फरक पडला नाही तरी पावसाचे मान बरे असल्यामुळे शेतकऱ्यास पुनः डोके वर काढण्यास काहीसा वाव मिळाला. १८९० नंतर पुनः हळूहळू पदार्थांच्या किमती वाढण्यास सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात दोन बरेच मोठे दुष्काळ पडल्यामुळे धारण मध्यंतरी खालीवर फार झाली. परंतु १९०० सालच्या पुढे तर फारच झपाट्याने किमती वाढल्या, असे म्हणण्यास हरकत नाही; त्या इतक्या की, सरकारने या किमतीच्या वाढीचा विचार करण्याकरिता एका अमलदाराची-श्री दत्त यांची-खास नेमणूक केली. महायुद्धाच्या पूर्वी दहापंधरा वर्षे ही जी महागाई झाली त्याचे कारण काय असावे या वादात शिरण्याचे प्रयोजन नाही. एवढे मात्र खरे की, जगातील इतर देशांपेक्षा हिंदुस्थानातील किमती या काळात विशेषच वाढल्या. शेतकी माल जो परदेशी जात असे त्याच्याही किमती वाढल्या व त्यामुळे एकंदरीत शेतकऱ्याची स्थिती या काळात बरी होती. महायुद्धामुळे महागाईस अतोनात ऊत आला ही गोष्ट सर्वश्रुत आहे. तथापि या किमती वाढल्या त्या सर्व पदार्थांच्या सारख्याच वाढल्या नाहीत. हे या वेळेस विशेष झाले. त्यातल्या त्यात हिंदुस्थानातून जो माल परदेशात जात असे त्याच्या किमती लढाई चालू असता बहुतेक वाढल्या नाहीत. तांदूळ, गहू, गळिताची धान्ये व पाट यांच्या किमती बहुतेक स्थिरच राहिल्या. कापूस, कातडी वगैरे काही जिनसांच्या किमती वाढल्या, पण त्या परदेशाहून येणारा जो माल त्याच्या मानाने कमी वाढल्या; आणि १९१८ नंतर ज्या सर्वच किमती वाढल्या त्यांतही हे वैशिष्ट्य कायम राहिले. शेतकऱ्याच्या कच्च्या मालाच्या किमती या कारखान्यातून निघणाऱ्या व शेतकऱ्यास विकत घ्याव्या लागणाऱ्या कापड, केरोसीन, मीठ, साखर इत्यादी मालाच्या किमतींपेक्षा फार कमी वाढल्यामुळे शेतकऱ्याचे एकंदरीत नुकसान झाले; आणि हे

जे वाढत्या किमतीचे भिन्न प्रमाण ते पुनः जवळजवळ १९२४-२५ पावेतो सुधारले नाही. यानंतर पाचएक वर्षे बरी गेली असतील तो १९२९-३० पासून किमती भराभर खालावण्यास सुरुवात झाली व त्या आज (१९३२) अतोनातच खालावल्या आहेत. त्यात विशेष वाईट हे की, शेतकी पैदाशीच्या किमती इतर मालापेक्षा जास्त खालावल्यामुळे शेतकऱ्याचे दुप्पट नुकसान झाले आहे; व त्याची स्थिती १८७०-७५ सालात पुणे, अहमदनगर भागात ज्या वेळेस दंगा झाला त्या वेळच्या स्थितीसारखी झाली आहे.

पूर्वीप्रमाणेच अवर्षण, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्ती शेतकऱ्यावर अजूनही कोसळतात. त्यांचे परिणाम हल्ली काहीसे भिन्न होतात ते कसे, हे मागील एका प्रकरणात दर्शविले आहे. जेथे पाऊस अनिश्चित व दुष्काळ पडण्याची भीती फार, त्या टापूत शेतकीच्या पद्धतीत सुधारणा करणे फार कठीण व तेथील शेतकऱ्यास कर्जमुक्त करणे अशक्यप्राय आहे. तथापि गेल्या साठसत्तर वर्षांत दुष्काळ पडण्याबरोबर त्याचे तात्कालिक परिणाम तरी शक्य तितके कमी भासू द्यावे म्हणून बरेच प्रयत्न करण्यात आले असून ते बहुतांशी यशस्वीही झाले आहेत.

१८५० च्या पुढे फार मोठे असे दुष्काळ हिंदुस्थानात १८७६-७८, १८९५-९६, १९००-०१, १९०७-०८ व १९१८-१९ या साली पडले. १८५० पासून १८७० पर्यंतची वर्षे हिंदुस्थानभर साधारण बरी गेली. जिकडेतिकडे महसुलाचा बोजा कमी झाला होता, व्यापार वाढत होता व एकंदर धारणाही वाढत होती. या अवधीतच कापसाचे भाव वाढल्याचा अतिशय फायदा काही भागात मिळाला होता. परंतु १८६८ पासून पुढील दहा वर्षांत मात्र दुष्काळांची एक मालिकाच लागली. १८६८-६९ च्या राजपुतान्यातील दुष्काळाचा मागे उल्लेख केला आहेच. यापुढील महत्त्वाचा दुष्काळ म्हणजे १८७३-७४ मधील बंगाल व बिहार प्रांतांतील होय. दुष्काळनिवारणार्थ जे उपाय सरकार अलीकडे योजते त्यांस ह्या दुष्काळात प्रथम सुरुवात झाली असे म्हणता येईल. राजपुतान्यातील मृत्युसंख्येमुळे सरकारी अधिकाऱ्यांच्या मनावर अतिशय परिणाम झाला होता व या दुष्काळात लोकांस मदत फार सढळ हाताने करण्यात आली. याहीपेक्षा मोठा दुष्काळ १८७६-७८ या साली सर्व दक्षिणभर पडला. जेथे जेथे आगगाड्या बांधल्या गेल्या होत्या, तेथे तेथे दुष्काळाचे निवारण फारसे कठीण गेले नाही. परंतु कर्नाटकातील काही भागांत मृत्युसंख्या आगगाड्यांच्या अभावी पुष्कळ वाढली. तसेच धान्य जरी वाहून नेता आले तरी चारा वाहून नेणे तितके सोपे नव्हते; म्हणून दक्षिणेतून सर्व बाजूंनी सह्याद्रीच्या प्रदेशात चरण्याकरिता गुरांचे मोठमोठे कळप येऊ लागले. पण यांतील बहुतेक तेथे पोचण्यापूर्वीच मृत्युमुखी पडून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. या वेळेस सरकारने दुष्काळी कामे बरीच काढली, परंतु त्यांचा कारभार सरकारने अत्यंत कंजुषपणाने चालविला अशी ओरड झाली. या सर्व गोष्टींची १८८० च्या दुष्काळ-कमिशनने पूर्ण चौकशी करून एकंदर दुष्काळी कामे व दुष्काळनिवारणार्थ इतर उपाययोजना यांस निश्चित स्वरूप दिले. या दुष्काळात प्रत्यक्ष उपासमारीने जरी माणसे फारशी दगावली नाहीत, तरी दुष्काळानंतर पटकी व इतर साथी येऊन मृत्युसंख्या अतोनात वाढली. १८७८ च्या पुढे पुनः बरीचवर्षे असे मोठे दुष्काळ पडले नाहीत. तथापि १८९५-९६ साली जो मोठा दुष्काळ पडला तो अगदी सबंध देशभर. दुष्काळी कामे उघडण्याची वगैरे योजना तयार असल्यामुळे ही व्यवस्था बरी ठेविली गेली. परंतु या दुष्काळात दुष्काळी कामावरील मजुरीचा दर व विशेषतः दुष्काळातसुद्धा सारा चोपून वसूल करण्याची काही प्रांतिक सरकारांची पद्धती यांवर बरीच टीका झाली; आणि दुष्काळानंतर नेमलेल्या कमिशनची विशेष महत्त्वाची शिफारस म्हणजे साऱ्याची सूट व तहकुबी प्रांतिक सरकारांनी सढळ हाताने देत जावी हीच होती. हा दुष्काळ पडल्यानंतर थोड्या वर्षांत म्हणजे १८९९-१९०० साली सबंध मुंबई इलाखा, मध्यप्रांत, वऱ्हाड

व निझामाचे राज्य आणि मद्रास इलाख्याचा बराच भाग येथे पुनः कडक दुष्काळ पडला. एका प्रखर दुष्काळानंतर लगेच हा दुसरा दुष्काळ पडल्यामुळे लोकांची स्थिती फारच हलाखीची झाली हे सांगावयास नकोच. या दुष्काळातील विशेष गोष्ट म्हणजे चाऱ्याची भासलेली अतोनात टंचाई ही होय. यामुळे गुजराथेतील गुरांची फारच हानी झाली. वऱ्हाड व गुजराथ या दोन भागांत जवळ जवळ एकोणिसाव्या शतकात केव्हाच दुष्काळ पडला नव्हता, तो या दशकात पडल्यामुळे तेथील लोकांस त्याचे परिणाम विशेषच भासले. पूर्वीच्या दुष्काळामुळे लोकांत त्राण काहीच उरले नव्हते, तेव्हा या खेपेस दुष्काळी कामावर येणाऱ्या लोकांची संख्या फार वाढली; आणि सरकारनेही लोकांस मदत करण्याच्या बाबतीत अधिक उदार धोरण या वेळेस स्वीकारिले.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जवळजवळ सर्व हिंदुस्थानभर आगगाड्या बांधून झाल्या आणि सर्वप्रकारची वाहतूक पुष्कळच सुकर व स्वस्त झाली. यामुळे चालू शतकातील दुष्काळाचे स्वरूप पूर्वीच्या इतके भयानक राहिले नाही. उदाहरणार्थ १९०७-०८ साली हिंदुस्थानातील बहुतेक प्रांतांत पाऊस अत्यंत कमी पडला व संयुक्त प्रांतात तर पिके ठार बुडाली; तसेच १९१८-१९ साली मुंबई इलाखा, संयुक्त प्रांत, पंजाब व इतर प्रांतांतील काही भागांतसुद्धा पुरते अवर्षण पडले. परंतु या दोन्ही खेपेस दुष्काळाचे परिणाम मागील खेपांइतके जाणवले नाहीत. या दुष्काळांचा परिणाम मृत्युसंख्येवर फारसा घडून आला नाही; व दुष्काळी कामे उघडणे अथवा परप्रांतांतून दुष्काळग्रस्त टापूत धान्य आणविणे वगैरे कोणत्याच गोष्टी फारशा अवघड गेल्या नाहीत.

याप्रमाणे वाहतुकीच्या मार्गांची वाढ झाल्यानंतर जमीनमहसुलाची सूट व तहकुबी देणे, दुष्काळी कामाची योजना प्रथमपासून निश्चित करून व दुष्काळनिवारणार्थ निधी जमवून ठेवून त्यांचा वेळेवर उपयोग करणे, आणि दुष्काळ सरल्यावर शेतकऱ्यास गुरे विकत घेणे इत्यादी गोष्टींकरिता तगाई देणे, अशा प्रकारच्या उपाययोजना हळूहळू बनत जाऊन त्या अमलात येऊ लागल्यामुळे दुष्काळाचे तात्कालिक परिणाम सारखे कमी कमी जाचक होत गेले. तथापि यामुळे दुष्काळाचे निवारण कायमचे झाले असे नाही; आणि हे निवारण जेथे जेथे पाऊस फार अनिश्चित आहे, तेथे तेथे पुरते होणेही शक्य नाही. त्यास एकच उपाय म्हणजे अन्य तऱ्हेने पाण्याचा पुरवठा करून शेतकऱ्याची अवर्षणाची भीती घालविणे हाच होय. या बाबतीत ब्रिटिश अमदानीत बरेच कार्य घडून आले असे म्हणता येईल. कंपनी सरकारने यमुना नदीचे जुने कालवे आणि कावेरी व कोलेरून नद्यांच्या मुखांशी असलेले पाटबंधारे सुधारणे, गंगानदीपासून एक मोठा कालवा काढणे व गोदावरीच्या मुखालगतच्या प्रदेशात पाटबंधारे बांधणे ही कामे केली होती. १८६० च्या पुढेही पाट-कालव्यांचे काम हळूहळू चालले होते. पण त्यास खरा जोर १८८० च्या दुष्काळ-कमिशनच्या शिफारशीमुळे आला. या कमिशनने दुष्काळनिवारणार्थ स्वतंत्र निधी सरकारने काढून त्यातून कालव्यांची वगैरे कामे झपाट्याने हाती घेणे अवश्य आहे असे आपले मत दिले. या कमिशनच्या शिफारशीमुळे सतलज व चिनाब, आणि संयुक्त प्रांतात गंगा व बेटवा या नद्यांपासून आणखी कालवे काढण्यात आले; आणि या कमिशनच्या शिफारशीमुळेच आर्थिक दृष्ट्या जरी कालवे तोट्यात पडले तरी दुष्काळनिवारणार्थ काही टापूंत ते बांधण्याचा प्रघात सुरू झाला. बुंदेलखंडातील बेटवा व महाराष्ट्रातील नीरा नद्यांचे कालवे हेच या प्रकारचे पहिले कालवे होत. १८८० च्या कमिशनने शिफारस केलेली सर्व कामे बांधून झाल्यावर १९०१-१९०३ साली एक खास पाटबंधाऱ्याचे कमिशन नेमण्यात येऊन यापुढील कार्य बहुतांशी या कमिशनच्या शिफारशींस अनुसरूनच झाले. यांतील सर्वांत महत्त्वाचे काम पंजाबातील सतलज, चिनाब व झेलम या नद्यांवरील होय. अलीकडे अयोध्या व रोहिलखंडमधील शारदा कालव्याचे काम फार मोठे असे झाले आहे. दुष्काळनिवारणार्थ बांधलेल्या कालव्यांपैकी महाराष्ट्रांत गोदा, नीरा व प्रवरा या

नद्यांचे कालवेही बरेच महत्त्वाचे आहेत. हल्ली चालू असलेल्या कामांपैकी मद्रास इलाख्यात कावेरी-मेत्तूर कालवा व सिंधमधील सक्करचे धरण ही विशेष महत्त्वाची कामे होत.

कालवे बांधणे हे सर्व प्रांतांत सारखेच शक्य नाही. बंगाल प्रांतात कालवे बांधणे अगदीच शक्य नाही व त्यांची तेथे तितकी जरुरीही नाही. दक्षिणेतील पुष्कळ भागांत कालवे बांधणे अवश्य असूनही ते शक्य कोटीतील नाही. उलटपक्षी, सिंधमधील बहुतेक सर्व लागवड पुराच्या कालव्यांतील पाण्यावरच अवलंबून आहे. सिंधमधील कालवे बहुतेक फार पुरातन कालापासून बांधलेले आहेत; परंतु ब्रिटिश सरकारच्या कालवे बांधण्याच्या धोरणाने फार मोठा फरक कोठे घडून आला असेल तर पंजाबात होय. पंजाबच्या पश्चिम भागात या कालव्यांमुळे अगदी निर्जन असलेला प्रदेश सुपीक होऊन तेथे आता नवीन वसाहत झाली आहे. या कालव्यांमुळे पंजाबात आजतागायत जवळजवळ एक कोटी एकर जमीन वहीत जमीन म्हणून नव्याने जमेस आली. सिंधमधील सक्करचे धरण यशस्वी ठरल्यास तेथेंही बऱ्याच जमिनीवर नव्याने पिकांची लागवड करता येईल असा अंदाज आहे. याच्या खालोखाल संयुक्त प्रांतातील गंगा व यमुना या नद्यांचे कालवे आणि मद्रास इलाख्यातील गोदावरी, कृष्णा, कावेरी, कोलेरून, पेरियर इत्यादी नद्यांचे मुखाजवळ असलेले पाटबंधारे व कालवे यांचे महत्त्व आहे. दुष्काळनिवारणार्थ म्हणून केलेल्या कालव्यांत प्रमुख महाराष्ट्रातील व बुंदेलखंडातील कालवेच होत; परंतु हे असले कालवे फारसे वाढविणे शक्य नाही. निरनिराळ्या प्रांतातील एकंदर वहीत जमीन घेतल्यास त्यातील जवळ-जवळ चारपंचमांश जमिनीस सरकारी कालव्याचे पाणी सिंधमध्ये, व दोनपंचमांश जमिनीस पंजाबमध्ये मिळते, तर हेच प्रमाण महाराष्ट्रात शेकडा एक एवढेच पडते!

सरकारी कालवे व तलाव हीच फक्त पाणी पुरविण्याची कृत्रिम साधने नव्हत. खाजगी विहिरी, सामुदायिक बंधारे, अथवा लहानलहान तलाव ही सर्व हिंदुस्थानभर विखुरलेली सापडतात; आणि शेतकी कमिशनने दर्शविल्याप्रमाणे मोठी सरकारी कामे जरी काही विशिष्ट टापूतच हाती घेण्याजोगी असली तरी असल्या लहान खाजगी कामांस उत्तेजन देणे हे सगळीकडेच शक्य आहे. परंतु इकडे सरकारचे लक्ष जावे तसे अद्यापि गेलेले नाही.

१९०३ साली पाटबंधारा-कमिशनने प्रसिद्ध केलेल्या आकड्यांवरून असे दिसते की, त्या वेळेस एकंदर मानवी प्रयत्नाने पाणीपुरवठा केलेल्या जमिनीपैकी दोनपंचमांश सरकारी कामाने भिजली गेली होती, तर बाकीची सर्व खाजगी विहिरींनी व बंधाऱ्यांनी. त्या वेळेस सरकारी कालव्यांखालील क्षेत्रफळ साधारणतः १८५ लक्ष एकर होते. तेव्हापासून यात बरीच वाढ होऊन ते हल्ली ३१६ लक्ष एकर झाले आहे. खाजगी विहिरींची वगैरे वाढ मात्र गेल्या तीस वर्षांत काहीच झालेली दिसून येत नाही. हे सर्व आकडे अर्थात केवळ खालसा प्रदेशापुरतेच आहेत.

गेल्या शेपन्नास वर्षांत हिंदुस्थानातील एकंदर कृषिपद्धतीत फारसा फरक झालेला नाही; व लहान प्रमाणावरील शेती जाऊन मोठ्या प्रमाणावरही शेती कोठे सुरू झाली नाही. बटाट्यासारखे नवीन असे एखादेच पीक देशात आले व काही जुन्या पिकांत—कापूस, गहू इत्यादींत—नवीन जातीचे बियाण तयार करवून ते पसरविल्यामुळे कोठे कोठे शेतकऱ्याचा बराच फायदा झाला एवढेच. बाकी नवीन अवजारे अथवा यांत्रिक शक्ती यांचा प्रसार जवळजवळ काहीच झाला नाही. उसाचा लोखंडी चरक अथवा लोखंडी नांगर हे अपवादात्मक गणावयाचे. खत देणे, पेरणी, लागण, कापणी वगैरेंच्या पद्धतीत महत्त्वाचे फरक काही घडून आले नाहीत. पण खेडे हे सर्व बाबतीत आता स्वावलंबी राहिले नसल्यामुळे शेतकऱ्याची बाजारावर दृष्टी ठेवून जे किफायतशीर पडेल ते पिकविण्याकडे सांप्रत बरीचशी प्रवृत्ती होऊ लागली आहे.

पूर्वी बहुतेक सर्वच जिनसा खेड्यातल्याखेड्यातच तयार होत; व मीठ, साखर, कापड यांसारख्या काही अगदीच थोड्या गोष्टी बाहेरून आणिल्या जात. यांत साखर व कापड यांच्याविषयी लक्षात घेण्यासारखी

गोष्ट ही की, याही जिनसा फार दुरून आणणे शक्य नसे. तेव्हा जरी सर्वच खेड्यांतून शक्य नसले तरी बहुतेक सर्व टापूतून शक्य असेल तेथे ऊस व कापूस यांची लागवड करण्यात येई. वाहतुकीच्या साधनांच्या वाढीमुळे एकदल धान्ये व डाळी (ही पिके पूर्वीपासूनच ज्या त्या टापूत भिन्न भिन्न असत) सोडून बाकीच्या पिकांचे आता विशिष्ट टापूत केंद्रीकरण होत गेले. आता सर्वच प्रकारची पिके एके ठिकाणी पिकविण्याची जरुरी नसल्यामुळे ज्या भागात एखाद्या पिकाला परिस्थिती विशेष अनुकूल असेल, तेथेच ते विशेषेकरून पिकविणे शक्य झाले. हिंदुस्थानातील सर्व शेती लहानलहान शेतकऱ्यांनी चालविलेली आहे. या शेतकऱ्यांच्या पिकांचे हल्ली दोन प्रकार कल्पिता येतील. एक तर प्रत्यक्ष उदरपोषणाची एकदल धान्ये व डाळी; आणि दुसरे कोणते तरी विकाऊ पीक. पहिले पीक विशेष महत्त्वाचे. ते शेतकरी प्रत्यक्ष पोटाकरिता काढतो; आणि जमीनमहसूल, सावकाराचे देणे व स्वतःस किरकोळ लागणारे जिन्नस विकत घेणे या सर्वांस लागणारा पैसा दुसरे पीक विकून तो उभारतो. अर्थात हे दुसऱ्या प्रकारचे पीक म्हणजे नेहमीच धान्य व डाळी याव्यतिरिक्त असते असे नाही. ब्रह्मदेशात तांदूळ हेच उदरनिर्वाहाचे पीक व विकण्याचेही पीक. पंजाबात गव्हाची स्थिती काहीशी अशीच आहे. परंतु तिकडे बाजरी, मका व जोंधळा ही बऱ्याच जिल्ह्यांत पिकतात; आणि या जिल्ह्यांतून ही निकृष्ट धान्ये शेतकरी बहुतेक स्वतःसाठी राखून ठेवून बराचसा गहू परप्रांतात किंवा परदेशी पाठविण्याकरिता विकतो.

दुसऱ्या प्रकारची विकाऊ पिके म्हणजे मुख्यतः कापूस व पाट, जवस, भुईमूग, तीळ वगैरे गळिताची धान्ये, ऊस, तंबाखू ही अथवा कांदा, मिरची, घास वगैरे होत. जुन्या काळी विशिष्ट टापूंत विशिष्ट पिके काढीत नसत असे नाही, पण या विशिष्टीकरणाचे प्रमाण फार कमी होते. कापसाच्या लागवडीच्या उदाहरणावरून हा मुद्दा अधिक स्पष्ट करिता येईल. गुजराथ, खानदेश, वऱ्हाड, कोईमतूर, तिनेवेल्लीकडील मद्रास इलाख्याचा भाग या प्रदेशात जेथे आज कापूस विशेष पिकतो, तेथेच तो पूर्वीही विशेष पिकत असे हे खरे. परंतु त्याचे प्रमाण आता पूर्वीपेक्षा फार मोठे आहे. अगदी पूर्वीपासूनचे पिकाच्या क्षेत्रांचे आकडे आपणास उपलब्ध नाहीत. पण विशेषतः कापसासंबंधी बरीच माहिती आपल्याला मिळू शकते. एके काळी कापूस जिकडेतिकडे पिके व डाक्याची मलमल डाक्याजवळ पिकलेल्या कापसाच्या सुताचीच विणीत. परंतु डाक्याचा मलमलीचा धंदा शंभर वर्षांपूर्वीच पुरता बुडाला व त्याबरोबर तेथील कापसाची लागवडही थांबली. १८४८ साली पार्लमेंटने हिंदुस्थानातून विलायतेत होणारी कापसाची निर्गत कशी वाढविता येईल याचा विचार करण्याकरिता एक कमिटी नेमली होती. या कमिटीने मिळविलेल्या आकड्यांवरून असे दिसते की, या सुमारास एकंदर वहीत जमिनीपैकी भडोच जिल्ह्यात जवळजवळ अर्धी, सुरत जिल्ह्यात एकचतुर्थांशाहून काहीशी अधिक आणि खानदेशात एकदशांश इतकी जमीन कापसाखाली असे. भडोच व सुरत या जिल्ह्यांत बंदरे व नद्या यांच्या विपुलतेमुळे वाहतुकीची प्रथमपासूनच अडचण भासत नव्हती; आणि म्हणून तेथील कापसाची लागवड १८५० च्या पूर्वीच जेवढी वाढणे शक्य होते तेवढी वाढली होती. हीच गोष्ट अलीकडील आकड्यांवरून स्पष्ट होते. कारण भडोच व सुरत जिल्ह्यांतील कापसाच्या लागवडीचे प्रमाण तेव्हापेक्षा हल्ली जास्त नाही. उलटपक्षी, खानदेशात ते जवळजवळ चौपट वाढले आहे. तसेच वऱ्हाडात हेच प्रमाण १८६७ साली (अमेरिकन युद्धानंतरही) शेकडा २७ एवढेच होते, ते १९१३ साली शेकडा ४५ पर्यंत झाले होते. उसाच्या लागवडीचीही स्थिती हीच. जेंकिन्सने आपल्या अहवालात देगवडच्या राज्यात (याचा समावेश नागपूरकर भोसल्यांच्या राज्यातच होत असे) पूर्वी ऊस पुष्कळ पिके असे नमूद केले आहे, व मध्यप्रांत ब्रिटिश अमलाखाली आल्यावरही ४० हजार एकर उसाची लागवड तेथे होत असे, असा अंदाज आहे. परंतु हीच लागवड पन्नास वर्षांत अर्ध्याने कमी झाली, आणि याबरोबरच संयुक्त प्रांत व बिहार येथील काही जिल्हे, महाराष्ट्रातील कालव्यांकाठचा प्रदेश इत्यादी

ठिकाणी उसाची लागवड पुष्कळ वाढली. मैमनसिंग, फरीदपूर, डाका वगैरे बंगाल्यातील जिल्ह्यात पाटाच्या लागवडीसंबंधीही हेच आढळून येते. याप्रमाणे उदरपोषणाच्या धान्यांव्यतिरिक्त जे किफायतशीर विकाऊ पीक असेल तेच काढावयाचे असे झाल्यामुळे पिकाचे विशिष्टीकरण इतके झाले आहे की, जेथे पाऊसपाणी भरपूर, अथवा इतर पाणीपुरवठा चांगला आहे, अशा वऱ्हाडासारख्या काही सुपीक टापूंत तेथे लागेल इतकेही धान्य अथवा चारा होत नाही; व तो इतर ठिकाणांहून आणावा लागतो. तसेच जोंधळा, बाजरी, नाचणी असल्या हलक्या धान्यांच्या ऐवजी गहू, तांदूळ शक्य तेथे पिकविण्याकडे कल दिसून येतो. आणि दुसरे असे की, जशी काही पिके कमीजास्त फायदेशीर दिसून येतील तशी ती पेरण्याचा उपक्रम केला गेला आहे. कापसाचा भाव तेजीचा असल्यास कापसाचे क्षेत्रफळ पुष्कळ वाढते व तो उतरल्यास खानदेशासारख्या टापूत मिरची, कांदा, भुईमूग वगैरे पिकांकडे लगेच शेतकऱ्यास लक्ष द्यावे लागते. गुळाचा भाव फार उतरल्यामुळे उसाऐवजी कोणते पीक काढावे हाच आज पुणे जिल्ह्यात कालव्याखाली जमिनी असलेल्या बागाईतदारांपुढे फार मोठा प्रश्न उभा राहिला आहे. तसेच एखादे पीक विशेष फायदेशीर वाटल्यास त्याचा लगेच फैलाव कसा होतो हे गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रातील भुईमुगाच्या झपाट्याने वाढलेल्या क्षेत्रफळावरून लक्षात येईल.

### खालसा मुलखातील पिकांखालील जमीन

| पिकाखालील जमीन | १८९४-९५ | १९१२-१३ | १९२८-२९ |
|---|---|---|---|
| एकंदर वहीत जमीन | १९६,६०१ | २२४,१६६ | २२८,१६६ |
| कृत्रिम पाणीपुरवठा असलेली जमीन | २३,८२५ | ४५,५३९ | ४९,७६२ |
| तांदूळ | ६९,२८० | ७८,७५२ | ८१,१३२ |
| गहू | २२,७६१ | २३,८६१ | २४,९२५ |
| जोंधळा | २०,८६३ | २०,९६८ | २०,५३४ |
| बाजरी | ११,३३७ | १६,२६९ | १२,९५२ |
| हरभरा | १३,५३४ | १२,४२३ | १३,६२५ |
| एकदल धान्ये व डाळी | १८१,५७६ | २०१,३७३ | २००,२६८ |
| जवस | ३,८४४ | ३,१२५ | २,०९२ |
| तीळ | ३,०१७ | ४,१६४ | ३,६६८ |
| मोहरी व शिरस | — | ३,५५५ | ४,२८७ |
| भुईमूग | — | ३९४ | ५,४०२ |
| गळिताची धान्ये | १३,९३० | १४,९३६ | १७,८८७ |
| ऊस | २,८८९ | २,७१२ | २,६७५ |
| कापूस | ९,७१७ | १४,१३८ | १६,५०७ |
| पाट | २,२७५ | ३,३२४ | ३,०६२ |
| तंबाखू | १,१७५ | ९६५ | १,१५० |
| चहा | ४१४ | ५५८ | ७६० |
| नीळ | १,७०५ | २२७ | ८१ |
| घास-पिके | १,९३१ | ५,७७० | ९,१७७ |

(वरील एकरांचे आकडे हजारात दिले आहेत)

याप्रमाणे हिंदी शेतकऱ्याच्या परिस्थितीत या काळात झालेला सर्वांत मोठा फरक म्हणजे आपल्या पैदाशीपैकी बराच भाग बाजारात विकण्याची शक्यता व आवश्यकता हा होय. यामुळे शेतकीस काहीसे व्यापारी स्वरूप आले, असे म्हणता येईल. परंतु असे जरी झाले तरी अद्यापि शेतकरी वर्ग आपल्या निर्वाहाकरिता लागणारे धान्य उत्पन्न करण्यातच विशेष गुंतला आहे, हे निरनिराळ्या पिकांखाली असलेल्या क्षेत्रफळाच्या आकड्यांवरून स्पष्ट होईल. १८९४ पासून ब्रिटिश हिंदुस्थानामधील पिकांच्या क्षेत्रफळाचे निश्चित आकडे मिळण्यास सुरुवात होते. तेव्हापासून आतापर्यंत पाहिले असता ठोकळ मानाने निरनिराळ्या पिकांच्या महत्त्वात काही फरक झालेला दिसून येत नाही. एकंदर वहीत जमिनीचे क्षेत्रफळ थोडे वाढले आहे व कृत्रिम रीतीने बरीच जमीन भिजली आहे. एकदल धान्ये व डाळी यांचे आकडे घेतले तर वहीत जमिनीपैकी नऊदशांश भाग त्यांनी प्रथमपासून जो व्यापिलेला आहे तो सारखा कायमच आहे. त्यातल्या त्यात तांदूळ व गहू यांचे क्षेत्रफळ वाढून जोंधळा व बाजरी यांचे क्षेत्रफळ पूर्वीइतकेच कायम राहिले आहे. इतर पिकांत विशेष वाढ कापसात जशी दिसून येते, तशीच पाटातही. उसाच्या पिकात फरक काही पडला नाही. गळिताच्या धान्याचे क्षेत्रफळ वाढले आहे, पण त्यात विशेष फरक पडत आहे तो निरनिराळ्या गळिताच्या धान्यांच्या महत्त्वात. जवस व तीळ ही पूर्वीइतकी महत्त्वाची राहिली नाहीत. उलट, भुईमूग तीस वर्षांपूर्वी निराळे आकडे देण्याइतकाही महत्त्वाचा समजला जात नसे, त्याचा आज जिकडेतिकडे अतोनात प्रसार झाला आहे. चहाचे क्षेत्रफळ बरेच वाढले, तर १८९७च्या पुढे कृत्रिम निळीचा शोध लागल्यापासून निळीची लागवड झपाट्याने कमी होऊ लागून आज ती अगदी नामशेष झाली आहे.

याप्रमाणे पिकाच्या एकंदर क्षेत्रफळात फरक अगदीच कमी झाला असला तरी वर सांगितल्याप्रमाणे एकंदर पिकांच्या देवघेवीच्या पद्धतीत फरक फार मोठा झाला आहे. तो हाच की, जुन्या काळी जे ज्या टापूत पिकेल त्यावरच तेथील गरजा भागवाव्या लागत असल्यामुळे, एक तर शक्य तितक्या निरनिराळ्या प्रकारची पिके सगळीकडे काढावी लागत; आणि काही विशिष्ट पिके विशिष्ट टापूत होत नसल्यास त्याची गरज अन्य तऱ्हेने भागवून घ्यावी लागे. आज देवघेवीच्या सुलभतेमुळे जे आपणांस किफायतशीर असेल तेच शेतकरी आपल्या जमिनीत पिकवितो व ते विकून आपल्या गरजा भागवितो. यामुळे जरी जुन्या काळचीच पिके आजही पिकतात व त्यांच्या प्रमाणातही काही फारसा फरक पडलेला नाही, तरी त्यांची निरनिराळ्या टापूतील विभागणी आज बरीच निराळी आहे.

शेतीस व्यापारी स्वरूप आले याचा परिणाम साहजिकच असा झाला की, व्यापारी व सावकार यांचे महत्त्व खेडोपाडी फार वाढले. पूर्वी जेथे व्यापार कमी तेथे खेडोखेडी व्यापाऱ्याचा शिरकाव होणे शक्य नव्हते. पण आता पिकाचा बराच भाग शेतकऱ्यास विकणे भाग पडल्यामुळे व्यापाऱ्यावर भिस्त ठेवणे शेतकऱ्यास प्रायः अपरिहार्य झाले आहे. पिकाच्या कमीअधिक महत्त्वाप्रमाणे जवळ-दूरच्या व्यापाऱ्यांच्या हातात त्या पिकातील व्यापार राहतो. साधारणपणे भुसारमाल गावचाच वाणी अथवा सावकार विकत घेऊन परगावी पाठवितो, किंवा गावातच साठवून ठेवितो. कांदा, मिरची यांसारख्या मालाची खरेदी नजीकच्या मोठ्या शहरातील व्यापाऱ्याचे दलाल येऊन करतात; तर कापूस, पाट, भुईमूग इत्यादी परदेशी जाणाऱ्या मालाच्या व्यापारात इतर देशातील व्यापाऱ्यांचे गुमास्तेही मोठ्या प्रमाणात शिरलेले आढळतात. बऱ्याच ठिकाणी शेतकरी कर्जबाजारी असल्यामुळे सावकारास पीक विकण्यास तो बांधलेला असतो आणि त्यामुळे भाव व वजन या दोन्ही बाबतीत तो फसविला जातो. काही महत्त्वाच्या पिकांत पीक उभे असतानाच ते बाहेरील व्यापाऱ्यांच्या गुमास्त्यांनी विकत घेण्याचा प्रघात आहे. हा प्रघात आजचाच आहे असे नाही. १८२५ सालीच उमरावतीस शेठ धनराज नावाच्या मारवाड्याने अशा प्रकारे वऱ्हाडातील सर्व भागात उभे पीक विकत घेऊन

कापूस मिर्झापूर व मुंबई येथे पाठविण्याचा उपक्रम केल्याची नोंद आढळते. बाहेरच्या व्यापाऱ्यांची जितकी चढाओढ अधिक तितका शेतकऱ्यास भाव बरा मिळण्याचा संभव अधिक. तेव्हा खानदेशात अथवा वऱ्हाडात जेथे कापसाचे मोठे बाजार भरतात व त्यांत शेतकरी आपला कापूस गाडीवर आणून विकतो तेथे त्यास दलाली वगैरे अतोनात भोवत नाही. पण इतर बहुतेक पिकांत पीक विकण्याच्या बाबतीत अद्यापि ज्या बऱ्याच गैरसोई आढळून येतात, त्या कापसाच्या बाबतीत मध्यप्रांतात जशी बाजार भरविण्यासंबंधी कायदेशीर योजना आहे तशी जिकडेतिकडे स्वीकारली असता व शेतकऱ्यांनी सहकार्याने आपला माल विकण्याची सोय केली असताच निभण्याचा संभव आहे.

बहुतेक खेडेगावी व्यापारी व सावकार हा एकच असतो. व्यापार वाढल्यामुळे सावकाराचे व्यवहार-क्षेत्र वाढले व ज्या कारणांमुळे व्यापार वाढला त्यांनीच सावकाराचे इतर बाजूंनीही महत्त्व वाढविले. शेतकरी हा नेहमी कर्जबाजारी असावयाचा, असा सर्वत्र नियम दिसतो. या नियमास अनुसरून जुन्या काळातसुद्धा शेतकरी कर्जात बुडालेला असे. परंतु गेल्या शंभर वर्षांत यासंबंधी जे दोन मोठे फरक पडले आहेत ते विशेष लक्षात घेण्याजोगे आहेत. जुन्या काळी टंचाई भासत असे ती कुळांची, जमिनीची नव्हे. तेव्हा खंड बेसुमार नव्हता व जमीनदार कुळांना काढून टाकण्यास सहसा धजत नसे. तसेच यामुळे जमिनीस किंमत फारशी येत नसे. दुसरे असे की, पूर्वीच्या काळी कर्जाबद्दल जमीन जप्त करून घेणे सावकारास शक्य नव्हते; किंबहुना कोणत्याही कर्जवसुलीसंबंधी त्यास मदत करणे हे न्यायखात्याचे अंग समजले जात नसे. यामुळे फिर्याद करणे शक्य नव्हते; व धरणे धरून बसणे वगैरे कर्जवसुलीचे इतर मार्ग त्या काळी रूढ असत. परंतु ब्रिटिश अमदानी सुरू झाल्यावर विशेषतः १८५० नंतर या दोन्ही बाबतीत पुष्कळ फरक पडू लागला. लोकसंख्या वाढीस लागली; लष्कर, पेंढार यांचा उपद्रव नाहीसा झाला, व सरकारी महसूल मर्यादित झाला. यामुळे सर्व जमीन लागवडीखाली येऊन तिला बरीच किंमत येऊ लागली. पुढे परदेशी व्यापाराच्या वाढीमुळे पिकांचे भाव वाढले, तेव्हा तर जमिनीच्या किमती झपाट्याने सरसावल्या. याबरोबरच कायदेकानूंमध्ये फरक बरेच पडले. कर्जवसुली-विषयी कोर्टात फिर्यादी होऊ लागल्या व कोर्टातून जप्ती आणता येऊ लागली; आणि शेवटी शेतकऱ्याची जमीनही कर्जफेडीत विकण्याचा हक्क धनकोस प्राप्त झाला. या सर्व कारणांमुळे १८५० च्या पुढे कर्जवाढीस सारखे उत्तेजन मिळू लागले. उदाहरणार्थ, अमेरिकन युद्धाच्या वेळेस कापसाचे भाव वाढले आणि त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न व जमिनीच्या किमती वाढल्या. किमती वाढल्यामुळे शेतकऱ्याची पत वाढून त्यास सावकार लोक सढळ हाताने कर्ज देऊ लागले. तेव्हा या काळात एकंदर जमिनीवरील कर्जाचा बोजा वाढला. पुढे भाव पडले व शेतकऱ्याची स्थिती खालावली, पण कर्जाचा बोजा कायमच. तेव्हा पिकांवर, गुरांवर सावकारांच्या जप्त्या येऊ लागल्या; आणि शेवटी कित्येक शेतकरी आपल्या जमिनीसही मुकले. हीच स्थिती असह्य होऊन तिचे पर्यवसान पुढे सावकारांविरुद्ध केलेल्या दंग्यात झाले. अर्थात दंगे सर्वत्र झाले नाहीत; तथापि अशा प्रकारची परिस्थिती सर्वच प्रांतात निर्माण होत होती. या प्रश्नास प्रथम महाराष्ट्रात तोंड फुटले. परंतु पुढे काही वर्षांनी पंजाबात मि. थोरबर्न यांनी शेतकऱ्याची अशीच स्थिती होत असल्याचे सरकारच्या निदर्शनास आणिले. इतरत्रही विशेषतः निकस व दुष्काळ पडण्याची जेथे भीती जास्त अशा सर्व टापूंत सावकाराचे प्राबल्य दिवसेंदिवस अधिक भासू लागले.

जेथे जेथे अशी अतोनात कर्जवाढ झाली तेथे तेथे शेवटी शेतकऱ्याच्या हातातून जमिनी सावकाराच्या हातात जाऊन मजूरी करावी लागणे अथवा खंडकरी म्हणून शेत वाहणे याशिवाय त्यास गत्यंतर उरले नाही. अशा प्रकारे सावकारांच्या हातात जमिनीचे मालकी हक्क जाणे हा अलीकडील चाळीसपन्नास वर्षांतील इतिहासाचा एक विशेष आहे. परंतु यासंबंधी नक्की माहिती कोठेच मिळत

नाही. काही प्रांतात—उदाहरणार्थ पंजाबात—ही प्रवृत्ती विशेष नजरेस आली. तथापि येथेसुद्धा नक्की आकडेवार माहिती मिळविता येत नाही. सरकारचे नजरेस ही गोष्ट आणिली गेल्यावर तिला आळा घालण्याचे प्रयत्न ठिकठिकाणी करण्यात आले. यांपैकी पहिला प्रयत्न म्हणजे आपल्याकडील १८७९ साली 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस रिलीफ ॲक्ट' हा होय. यात सावकाराने लबाडीचे हिशेब केले असल्यास अथवा व्याज बेसुमार आकारिले असल्यास त्याची चौकशी करण्याचा कोर्टास हक्क देण्यात आला. तसेच धनकोचा जप्ती आणण्याचा हक्क मर्यादित करण्यात येऊन शेतकऱ्यास सरसहा हप्तेबंदी मिळावी, अशी योजना करण्यात आली. पंजाबातील 'लॅंड एलिइनेशन ॲक्ट'ने (१९०१) यापुढे पुष्कळच मजल मारली. या कायद्यान्वये एकंदर सर्व जातीचे शेतकरी व बिगरशेतकरी असे वर्गीकरण करण्यात आले; आणि शेतकरी जातीच्या माणसाच्या हातातील जमीन बिगर-शेतकरी जातीपैकी कोणालाही विकण्यास अथवा ती त्याने जप्ती आणून मिळण्यास मनाई करण्यात आली. अशाच प्रकारचा निर्बंध बुंदेलखंडातही घालण्यात आला आहे. या दोन्ही प्रकारच्या कायद्यांनी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कितपत कमी झाला हे अजमावणे शक्य नाही. परंतु आज सर्वानुमते 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस रिलीफ ॲक्ट' हा निरुपयोगीच ठरलेला आहे; व पंजाबातही 'लॅंड एलिइ-नेशन'च्या कायद्यामुळे प्रत्यक्ष शेत वाहणाऱ्याच्याच हातात आज जमीन जास्त राहते असे नसून शेतकरी जातीच्या सावकाराचा खरा फायदा झाला आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. शेतकी कमिशनच्या मते याविषयी कायद्याने करण्यासारखी गोष्ट म्हणजे जुना कर्जाचा व्यवहार तोडून टाकून सोप्या पद्धतीने नादार होऊन शेतकऱ्यास नवीन संसार थाटण्याची व्यवस्था करून देणे हीच होय.

अर्थात या सर्व रोगांस खरा उपाय म्हणजे शेतकऱ्यांनी एकमेकांशी सहकार्य केले पाहिजे हा होय. विशेषतः हिंदुस्थानासारख्या लहानलहान शेतकऱ्यांच्या राष्ट्रास याशिवाय तरणोपाय नाही हे उघड आहे. जुन्या प्रकारच्या ग्रामजीवनात सहकार्य पदोपदी आढळून येत असे; व अद्यापि खानदेशच्या काही भागांतील सहकारी पद्धतीने बांधलेल्या व चालविलेल्या पाटबंधाऱ्याच्या पद्धतीसारखी उदाहरणे आपणांस आढळतील. परंतु सहकारी चळवळ ही संज्ञा विशिष्ट प्रकारच्या सहकार्यासच देण्यात येते; आणि या चळवळीमुळेच जर्मनी, डेन्मार्क, इटली, आयर्लंड वगैरे अनेक युरोपीय राष्ट्रांतील शेतकऱ्यांची दुःखे दूर झाली आहेत. या चळवळीस प्रथम जवळजवळ तीस वर्षांपूर्वी हिंदुस्थानात प्रारंभ झाला. १९०४ चा कायदा मंजूर करून सरकारने प्रांतोप्रांती रजिस्ट्रार नेमून सहकारी मंडळ्या स्थापन करण्यास व नोंदण्यास सुरुवात केली. १९१२ पर्यंत सहकारी पतपेढ्याच फक्त नोंदता येत असत. १९१२ च्या पुढे सर्व प्रकारच्या सहकारी मंडळ्या नोंदण्याची व्यवस्था कायद्यात करण्यात आली. गेल्या पाव शतकात या चळवळीचा प्रसार हिंदुस्थानात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झाला आहे. परंतु तो निरनिराळ्या प्रांतात भिन्नभिन्न प्रमाणात झाला असून सगळाच प्रसार प्रामुख्याने सहकारी पतपेढ्यांचाच झाला आहे. शेतकऱ्यास पैशाची नड फार व ती प्रथम भागविणे जरूर. तेव्हा शेतकऱ्यास पतपेढीची आवश्यकता लवकर पटते. शिवाय पतपेढीचे कामही कमी गुंतागुंतीचे, आणि बाहेरून भांडवल आणून ती सुरू करणे बरेच सोपे. या सर्व कारणांमुळे पतपेढ्यांचा प्रसार फार झाला. शेतकी कमिशनने बांधलेल्या अंदाजावरून सहकारी चळवळ विशेष जोरात अशी पंजाब, मुंबई व मद्रास या प्रांतांतच आहे. या भागातच दर खेड्यातील १० ते १५ घरांच्या मागे एक सहकारी मंडळीचा सभासद सापडेल, असा कमिशनने अंदाज केला. परंतु यामुळे शेतकऱ्यास प्रत्यक्ष मदत चळवळीपासून किती होते हे नीटसे कळत नाही. कारण सहकारी पतपेढीच्या सभासदास बाहेरील सावकार नेहमी पाहावा लागतोच, ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. तसेच मूळ जी चळवळ वाढली ती सरकारी अंमलदारांनी व शहराच्या वकील वगैरे वर्गांनी निराळ्या कारणास्तव चळवळीत भाग घेतला म्हणून. परंतु ती सुरळीतपणे

चालण्यास तिला खरा पाठिंबा खेडेगावातूनच मिळाला पाहिजे. अद्यापि सरकारी नियंत्रण चळवळीवर बरेच आहे व सरकारातून मदतही होते. यांच्या अभावी चळवळीचे स्वरूप काय होईल हेही सांगणे कठीण आहे. तसेच केवळ पतपेढ्या काढून भागत नाही, असे आता आढळून येऊ लागले आहे. खरेदी-विक्रीच्या मंडळ्या, गुरांच्या विम्याच्या मंडळ्या इत्यादी अनेक प्रकारच्या सहकार्याचे प्रकार सुरू झाल्याशिवाय शेतकऱ्याची स्थिती खरोखर सुधारणे शक्य नाही. चळवळीची ही बाजू तर आज अतोनात लंगडी आहे. काही काही भागात सहकारी चळवळीची प्रगती पुष्कळच झाली आहे व तेथे शेतकऱ्यांतील विशिष्ट वर्गास तिचा बराच फायदा झाला आहे हे खरे. परंतु एकंदर देशाच्या मानाने तिचा विस्तार अजून अत्यल्प व एकांगी आहे असे म्हणणे प्राप्त आहे.

शेतकऱ्याच्या बदलत्या परिस्थितीतील शेवटी सांगावयाचा मुद्दा म्हणजे जमिनीची सारखी होत असलेली विभागणी हा होय. जमिनीची विभागणी होणे व तिचे लहानलहान तुकडे पडणे या दोन्ही क्रिया आपल्या देशात आज बरीच वर्षे वाढीस लागल्या आहेत, हे सर्वश्रुत आहे. जमिनीचे लहानलहान तुकडे पडल्यामुळे शेताची निगा व मशागत यांजवर जास्त खर्च येतो, शेतकऱ्याचा वेळ फार फुकट जातो, व विहिरी-ताली बांधणे अथवा इतर शेतसुधारणा करणे हे दुरापास्त होते. तेव्हा याकरिता प्रत्येक शेतकऱ्याची सर्व शेतजमीन एकाच अथवा दोनतीन शेतांतच सामावली जावी अशी पुनर्विभागणी करणे जरूर आहे. हे कायद्याने सक्तीने करता येईल अथवा सामोपचाराने सर्वांच्या संमतीने करता येईल. ही गोष्ट कायद्याने साधणे आज तरी शक्य कोटीतील नाही व सहकारी मंडळ्या स्थापून हे कार्य करण्याचे प्रयत्न सर्व हिंदुस्थानात हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच झाले आहेत.

तथापि खरे पाहिले असता लहानलहान तुकडे पडण्याचा प्रश्न गौण असून खरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जमिनीची सारखी विभागणी होत जाऊन दर शेतकऱ्यामागे वहीत जमिनीचे क्षेत्रफळ क्रमाक्रमाने कमी होत जाणे हा होय. वहीत जमीन शेतकऱ्याचा गुजारा करण्याचे खरे साधन. तेव्हा या साधनाचीच वाण भासल्यास शेतकऱ्याची स्थिती सारखी खराब होत जाणार हे उघड आहे. जमिनीची विभागणी होण्याचे कारण हिंदू व मुसलमान यांचा वारशाचा कायदा असे कित्येक मानतात, पण हे योग्य वाटत नाही. खरे कारण हेच की, शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येच्या वाढीच्या मानाने एकंदर वहीत जमिनीचे क्षेत्रफळ व उत्पादनसामर्थ्य वाढत नसावे. या प्रवृत्तीस आळा घालण्याचा एक प्रकारचा प्रयत्न म्हणजे अमुक एका मर्यादेहून कमी क्षेत्रफळाची जमीन कोणाही शेतकऱ्यास वाहावयाची परवानगी नसावी हा आहे. पण आज एकंदर शेतीवर पोसलेली कुटुंबे हा मार्ग स्वीकारल्यास कमी होतील, आणि साहजिकच त्यांची अन्यत्र तरतूद लावणे हा महत्त्वाचा प्रश्न होऊन बसेल. आज जी परिस्थिती उत्पन्न झाली आहे ती अशी की, बऱ्याच प्रांतात दर शेतकऱ्याच्या वाटणीस इतकी थोडी जमीन येते की, शेतीच्या व्यवसायात त्यास व त्याच्या कुटुंबास वर्षभर गुंतविणे आणि त्या जमिनीच्या उत्पन्नावर त्याचा निर्वाह होणे हे अशक्य झाले आहे. म्हणून त्यास इतर व्यवसाय पाहावे लागतात; आणि इतकेही करून त्याची अर्धवट उपासमार होते व शेतीवर त्याचे लक्ष पुरते नसल्यामुळे तिची हेळसांड होते, हे निराळेच. कोकणात या सर्व गोष्टी विशेष प्रामुख्याने दिसून येतात. परंतु महाराष्ट्रातील काही भागात व हिंदुस्थानात इतर ठिकाणीही परिस्थिती बरीचशी या प्रकारची आहे.

लोकसंख्येच्या या प्रकारच्या वाढीचाच दुसरा अनिष्ट परिणाम म्हणजे आजची आपल्या गुरांसंबंधीची स्थिती हा होय. शेतकी कमिशनच्या मते आपल्या गुरांची पैदास सारखी बिघडत चाललेली आहे. आपले बैल सारखे दुबळे व गाई निकस होत आहेत. पैदास करण्याची जुनी पद्धती नष्ट झाली व तिच्या जागी नवीन काही निर्माण झाली नाही. जुनी राने व गुरचराईच्या इतर सोयी राहिल्या नाहीत; आणि राहिलेल्या घासपुरवठ्यावर पोसावयाच्या जनावरांची संख्या मात्र वाढली आहे. कमिशनच्या मते याचे

मूळ कारण लोकसंख्या वाढल्यामुळे पिकाखालील जमीन वाढली व चारा जेथून पैदा होतो ते क्षेत्रफळ कमी झाले हे होय. बरे, पिकाखालील जमीन वाढली तेव्हा बैलांची जास्त जरुरी भासू लागली. पण या जनावरांच्या वाढत्या संख्येस चाऱ्याचा पुरवठा करता येणे अशक्य झाले. चारा कमी पडल्यामुळे जनावरांची पैदास बिघडू लागली आणि त्यामुळे पूर्वीचेच काम करण्यास पूर्वीइतकी जनावरे पुरेनाशी झाली. शिवाय यामुळे त्यांची संख्या आणखी वाढवावी लागली. अशी ही अत्यंत अनिष्ट कार्यकारणपरंपरा आज बरीच वर्षे आपल्या देशात सुरू झाली आहे.

या एकंदर विवेचनाचा निष्कर्ष असा काढता येईल. गेल्या शेपन्नास वर्षांत शेतकऱ्याचा व्यापारी-संबंध परप्रांतांशी व परदेशांशी येऊ लागला, आणि त्यामुळे पिकांचे विशिष्टीकरण टापूटापूत झाले व बाहेरील जिनसा शेतकऱ्यास थोडक्या किमतीत मिळू लागल्या. त्याबरोबरच दुष्काळाचे होणारे तात्कालिक अनिष्ट परिणाम टाळता येऊ लागले. याच कालखंडात काही काही प्रदेशांत कालव्याची वाढ होऊन शेतीचे स्वरूप तेथे पालटले. परंतु एकंदर देशातील कृषिपद्धतीत मात्र या बाहेरील जगाशी जुळलेल्या संबंधामुळे फारसा फरक पडला नाही. उलटपक्षी वाढती लोकसंख्या, जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास आणि नवीन प्रकारचे उद्योग व कारखाने यांचा अभाव यांचे परिणाम मात्र वाढता कर्जबाजारीपणा, जमिनीची विभागणी, गुरांची निकृष्ट स्थिती अशा स्वरूपात शेतकऱ्यास भोवू लागले आहेत.

## ५. विसाव्या शतकातील औद्योगिक प्रगती

तिसऱ्या प्रकरणात कापडाच्या गिरण्यांची वाढ एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी कोणत्या नवीन दिशेने होऊ लागली होती हे दाखविलेच आहे. चीनमधील सुताच्या खपाची वाढ १८९० च्या सुमारास खुंटली, ती पुनः चारपाच वर्षांनी सुरू झाली. परंतु या वेळेस ही वाढ फारशी टिकली नाही. विसाव्या शतकातील पहिल्या दहा वर्षांत चीनमधील सुताचा व्यापार काहीसा अस्थिर व बिनवाढताच राहिला. महायुद्धापूर्वीच्या व्यापाराचे मान पाहिल्यास ते १८९०-९५ या वर्षांच्या मानाने बरेच कमी होते, असे आढळून येईल. जपानी बाजारातील हिंदी सुताचा खप १८९० च्या पुढे खुद्द जपानात गिरण्या निघाल्यामुळे अगदी थांबला. त्यामुळे हिंदी सुताची निर्गत जी परदेशी होत होती ती १९०० सालच्या पुढे वाढेनाशी झाली. तेव्हा गिरण्यांच्या वाढीची मदार आता सुताच्या बाजारावर नव्हे, तर कापडाच्या बाजारावर राहणे अपरिहार्य होते.

**कापड-गिरण्यांची वाढ**

| साल | गिरण्या | चात्या | माग | मजूर |
|---|---|---|---|---|
| १८९५-९६ | १५० | ३,८५२,६११ | ३७,२७८ | १४६,५५२ |
| १९१४-१५ | २७२ | ६,९२१,७४४ | ११०,४०९ | २६५,३४६ |
| १९२०-२१ | २५७ | ६,८९५,८०४ | १२३,७८३ | ३३२,१७९ |
| १९३०-३१ | — | ७,९७९,४५४ | १५६,६६२ | ३८४,०२२ |

ह्या तक्त्यावरून असे दिसून येईल की, १८९५ ते १९१४ या वर्षांत गिरण्यातील मागांची संख्या चौपटीहून अधिक वाढली, तर चात्यांची संख्या दुप्पटसुद्धा झाली नाही. १९१४ पासून पुढील काळातही

हीच प्रवृत्ती सारखी दिसून येते. याचा अर्थ एवढाच की, सुताचा खप आता फार मोठ्या प्रमाणावर गिरण्यातल्या गिरण्यातच होऊ लागला. महायुद्धामुळे तर चिनी व्यापारास मोठाच धक्का बसला. कोणताही माल परदेशी पाठविणे कठीण झाल्यामुळे जपानी गिरण्यांचे फार फावले; व याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे आता खुद्द चीनमध्ये बऱ्याच गिरण्या निघाल्या ही होय. महायुद्धापासून या व्यापारास जी ओहोटी लागली ती कायमची; आणि आज चीनमध्ये हिंदुस्थानातून सूत जाणे जवळजवळ बंद झाले आहे. इतकेच नव्हे, तर गेल्या तीनचार वर्षांत चीनमधूनच आपल्याकडे बरेच सूत येत आहे. आज हिंदी गिरण्यांतील सूत बहुतेक सर्व हिंदी गिरण्यांत अथवा हिंदी विणकरवर्गात खपते. १८९५ च्या सुमारास गिरण्यांतून निघालेल्या सुतापैकी अर्धे सूत परदेशी जात असे. महायुद्धापूर्वी हे प्रमाण एकतृतीयांशावर आले होते, ते आज एकतिसांशाहूनही कमी आहे.

अलीकडील धंद्याची सर्व वाढ कापड विणण्यात झाली हे उघड आहे. ही वाढ किती झपाट्याने झाली याची कल्पना पुढील आकड्यांवरून येईल. हिंदी गिरण्यांतील एकंदर पैदास १८९५ मध्ये ३५ कोटी वार, १९१४ मध्ये ११० कोटी वार आणि १९३०-३१ साली २५० कोटी वार झाली. महायुद्धाचे काळात नवीन यंत्रसामग्री बाहेरून आणविण्याच्या अडचणीमुळे नवीन गिरण्या निघणे दुरापास्त झाले. पण ज्या गिरण्या अस्तित्वात होत्या त्यांनी आपली कापडाची पैदास शक्य तितकी वाढविली आणि अतिशय फायदा मिळविला. १९१९ ते १९२२ या वर्षांत कापडाच्या गिरण्यांची भरभराट अतोनात झाली. नवीन गिरण्या निघाल्या व जुन्या गिरण्यांनी आपले कार्यक्षेत्र खूप वाढविले. पुढे जरी मंदीची वर्षे आली व विशेषतः मुंबई शहरातील धंद्यास वाईट दिवस आले, तरी एकंदर हिंदुस्थानभर गिरण्यांची संख्या व कापडाची पैदास ही सारखी आजपर्यंत वाढतच आहेत.

अलीकडील तीस वर्षांत या धंद्यात आणखी एक मोठा फरक पडला आहे तो हा की, या बाबतीतील मुंबई शहराचे महत्त्व आता बरेच कमी झाले आहे. १९०० सालपावेतो सूत व कापड या दोहोंचीही पैदास मुंबई शहरात हिंदुस्थानच्या इतर सर्व भागापेक्षा जास्त होत असे.

१९३० साली एकंदर हिंदुस्थानात जवळजवळ २४२ कोटी वार कापड व २१ लाख पौंड सूत गिरण्यांतून निघाले, त्यापैकी ८९ कोटी वार कापड व साडेसहा लाख पौंड सूत इतकी मुंबईच्या गिरण्यांची पैदास होती.

१९२७ साली खालीलप्रमाणे हिंदुस्थानातील प्रमुख शहरी गिरण्यांची व त्यातील मजुरांची संख्या होती :

| शहर | गिरण्या | मजूर |
|---|---|---|
| हिंदुस्थान देश | ३२२ | ३७४,०९१ |
| मुंबई | ८३ | १५४,३९८ |
| अहमदाबाद | ७५ | ५६,३७८ |
| सोलापूर | ६ | १९,१४९ |
| कानपूर | ९ | १७,१०१ |
| मद्रास | ३ | ११,९३८ |
| इंदूर | ६ | ९,७०५ |
| नागपूर | २ | ९,६६० |

याचे कारण हे की, बाहेरून यंत्रसामग्री आणविणे, कापूस चोहोंकडून येणे, व परदेशी माल पाठविणे या सर्व गोष्टी मुंबईस इतर ठिकाणांपेक्षा साहजिकच अधिक सुलभ व स्वस्त रीतीने होत

असत. चीनमधील सुताचा जवळजवळ सर्व व्यापार मुंबईच्या गिरण्यांच्या ताब्यात होता, हे वर नमूद केलेच आहे. तसेच परदेशी होत असलेली कापडाची निर्गत बहुधा मुंबईच्या कापडाचीच होत असे. ही कापडाची निर्गत इराण, इराक, अरबस्तान, पूर्व आफ्रिका, मलाया, सिंहलद्वीप इत्यादी भागांत होत असे, आणि अजूनही ती तेथेच होते. महायुद्धाच्या काळात या निर्गतीला वाढता वाव मिळाला, पण लगेच पुढे जपानी चढाओढीमुळे ही वाढ खुंटली. येणेप्रमाणे सुताचा व्यापार बसत चालला आणि कापडाची निर्गतही काही विशेष वाढेनाशी झाली, तेव्हा मुंबईच्या गिरण्यांस आपला वाढता संसार हिंदुस्थानातील कापडाच्या मागणीच्या जोरावरच थाटणे अवश्य झाले. परंतु माल परदेशी पाठविण्याच्या बाबतीत जे सौकर्य मुंबईस होते ते इतर बाबीत तेवढ्या प्रमाणात नव्हते. हिंदुस्थानभर कापड मुंबईहून पाठविणे हे अर्थात खर्चाचे होई; आणि जेथे कापडाची मागणी विशेष व कापसाचा पुरवठा चांगला तेथे गिरण्या निघताच तेथे आपली स्थानिक गिऱ्हाइकी मुंबईच्या गिरण्यांकडून काबीज करणे सोपे झाले. याप्रमाणे अहमदाबाद, नागपूर, सोलापूर, कानपूर, मद्रास वगैरे ठिकाणी हळूहळू गिरण्या स्थापन होऊ लागल्या. त्यातल्या त्यात अहमदाबादची वाढ प्रथमपासूनच झपाट्याने होत गेली. १८९५ च्या पुढे या निरनिराळ्या शहरांतून कापडाच्या गिरण्या बऱ्याच निघाल्या आणि महायुद्धानंतर त्या विशेष भरभराटीस आल्या. कारण निर्गत व्यापारास लागलेली उतरती कळा व जपानी आयातीची चढाओढ या दोहोंचाही परिणाम इतर ठिकाणच्यापेक्षा मुंबईच्या गिरण्यांसच विशेष भोवला.

हा परिणाम इतका भोवला की, १९२६ साली मुंबईच्या गिरणीवाल्यांनी सुतावर व कापडावर संरक्षक जकाती लादाव्या असा सरकारकडे अर्ज केला. या अर्जाचा विचार जकात-मंडळाने (टॅरिफ बोर्ड) केला. या मंडळाने आपल्या अहवालात एकंदर मंदीची कारणमीमांसा करून मुंबईच्या परिस्थिती-बद्दल विशेष विचार केला. जपानी चढाओढ मँचेस्टरच्या चढाओढीपेक्षा जास्त भासण्याचे कारण हे की, जपानी माल हिंदी कापसाचा बनलेला असल्यामुळे तो हिंदी गिरण्यात निघालेल्या माला-सारखाच असावयाचा. उदाहरणार्थ, हिंदी गिरण्या अलीकडे जरा जास्त तलम सूत (नं. ३० ते ४०) काढण्याचा विशेष प्रयत्न करू लागल्या, तेव्हाच या प्रकारचे सूत जपानमधून फार स्वस्त येऊ लागले होते; आणि ही जपानी मालाची आयातही अलीकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होऊ लागली होती. महायुद्धापूर्वी सूत किंवा कापड जपानहून काहीच येत नसे, ते आता बरेच सूत व ३० ते ५० कोटी वार कापड दरवर्षी येत असते. मुंबईत मजूरवर्गातील असंतोष, गिरण्यांच्या अंतर्गत कारभारातील व्यंगे, तेथील गिरणीमालकांची अप्रागतिकता वगैरे अनेक गोष्टीही होत्याच. तेव्हा परदेशी व्यापार वाढविण्याकरिता मुनीम नेमणे, यंत्रावरील जकाती कमी करणे इत्यादी प्रकारे सरकारने या धंद्यास मदत करावी, असे जकात-मंडळाने सुचविले. याशिवाय जपानी मालाविरुद्धही काही विशेष योजना करण्यात यावी असे मंडळाचे मत दिसले; परंतु योजनेच्या स्वरूपासंबंधी ऐकमत्य होऊ शकले नाही. शेवटी हिंदुस्थान सरकारने सुतावरील प्रचलित जकात बदलून ती जपानी सुताच्या आयातीवर विशेष भारी पडेल असे तिला स्वरूप दिले. ही १९२७ साली लादलेली जकात पुनः १९३० साली कायम करण्यात आली. मध्यंतरी सरकारच्या उत्पन्नात तूट येऊ लागली म्हणून कापडावरील जकातीही वाढविण्यात आल्या. अशा रीतीने कापडाच्या धंद्याला जकातीच्या रूपाने सरकारी मदत अलीकडे बरीच झाली आहे. पण ही मदतही पुरेशी नाही अशी गिरणीवाल्यांची तक्रार असून यासंबंधी दुसरी चौकशी जकात-मंडळ हल्ली (१९३२) करीत आहे. या वेळेसही मुख्य तक्रार मुंबईकरांचीच आहे. १९ व्या शतकात हिंदी गिरण्यांतून कापडाची पैदास फार थोडी होई व जी होत असे ती बहुतेक जाड्याभरड्या कापडाची. अलीकडील वीस वर्षांत कापड काढणे हीच महत्त्वाची बाब होऊन बसली आहे; आणि त्यातही शक्य तितके विविध प्रकारचे व तलम कापड विणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. याची काहीशी कल्पना

आपल्या गिरण्यांतून निघत असलेल्या सुताच्या प्रतीवरून येईल. महायुद्धापूर्वी जवळजवळ $\frac{३}{४}$ सूत २० नंबराखालील असे व ३० नंबरावरील सूत जेमतेम एकंदर पैदाशीच्या $\frac{१}{२०}$ असे. १९३०-३१ चे आकडे ठोकळ मानाने असे आहेत : २० नंबराखालील सूत $\frac{६}{१०}$, २० ते ३० नंबरी सूत $\frac{३}{१०}$, व ३० नंबरावरील $\frac{१}{१०}$. याच प्रवृत्तीचे दुसरे द्योतक म्हणजे इजिप्त, केनिया वगैरे प्रदेशांतील कापसाची वाढती आयात हे होय. कारण हिंदुस्थानात लांब धाग्याचा कापूस फारसा पैदा होत नाही. म्हणून जास्त तलम कापड काढणे असल्यास परदेशी कापूस आणणे अपरिहार्य झाले आहे.

येणेप्रमाणे या शतकात कापडाच्या गिरण्यांची प्रगती झपाट्याने झाली आहे हे निर्विवाद होय. हिंदुस्थानातील एकंदर कापडाचा खप किती होता यासंबंधी निश्चित आकडे मिळणे कठीण आहे. तथापि असा अंदाज करण्यात आला आहे की, महायुद्धापूर्वीच्या काळात हिंदुस्थानात एकंदर कापडाचा खप ४८० कोटी वार होत असे. ठोकळ मानाने यातील अर्धे कापड परदेशांतून येई; आणि बाकीचा अर्धा माल हिंदी हातमाग व हिंदी गिरण्या या समप्रमाणात पुरवीत असत. आजची परिस्थितीही नक्की अजमावता यावयाची नाही. विशेषतः १९३०-३१ सालात एकंदर जागतिक मंदी व बहिष्काराची चळवळ यांमुळे व्यापाराची घडी फारच बिघडली होती. त्यापूर्वीच्या तीनचार वर्षांचा हिशेब ध्यानात घेता स्थूल मानाने आकडे मांडता येतील ते असे : अलीकडे हिंदुस्थानातील कापडाचा प्रतिवार्षिक खप जवळजवळ ५५० कोटी वार आहे. यापैकी गेल्या तीनचार वर्षांत सरासरीने १९० कोटी वार कापड परदेशांतून येत असे, २२० कोटी वार हिंदी गिरण्यांत पैदा होई व १४० कोटी वार हातमागावर विणिले जात असे. अर्थात १९३० सालापासून हिंदी गिरण्यांतील कापडाची पैदास याहूनही अधिक वाढली आहे, हे लक्षात ठेविले पाहिजे. आज हिंदी गिरण्यांनी आपल्या विशिष्ट मालाची जवळजवळ सगळीच गिऱ्हाइकी काबीज केली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. हातमागाच्या क्षेत्राचे त्यांनी फारसे आक्रमण केलेले दिसत नाही. हातमागाच्या पैदाशीचा अंदाज करणे फार अवघड आहे. पण ही पैदास काही गेल्या तीसचाळीस वर्षांत कमी झालेली नाही, असल्यास अगदी थोड्या प्रमाणात वाढतच असावी असे वाटते. परदेशी कापड आयात होणे हे हिंदी गिरण्या तलम माल किती काढू शकतात यावर अवलंबून आहे. यापुढे जसजशी या बाबतीत त्यांची प्रगती होईल तसतसे धंद्याचे पाऊल पुढे पडेल. अर्थात लांब धाग्याचा हिंदी कापूस फार क्वचित पिकतो आणि अत्युत्कृष्ट प्रतीचा कापूस तर आपल्याकडे जवळजवळ पिकतच नाही, ही गोष्ट या गिरण्यांच्या धंद्याच्या पुढील वाढीस प्रामुख्याने आड येणार हे उघड आहे.

गेल्या तीस वर्षांत पाटाच्या गिरण्यांची वाढ एकसारखी होत गेली आहे. पाटाची लागवड कशी वाढली हे मागील प्रकरणात दर्शविलेच आहे. या वाढीबरोबरच हिंदुस्थानातून परदेशात जाणाऱ्या पाटाचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे. म्हणजे पूर्वी जो पाटच विशेषतः परदेशी जात असे, त्याच्याऐवजी आज पोती व गोणपाट ही विशेष जातात. पाटाच्या गिरण्यांच्या वाढीस विशेष उत्तेजन महायुद्धाच्या काळात मिळाले. पाट परदेशी पाठविण्यात निरनिराळ्या अडचणी उपस्थित झाल्यामुळे पाटाची किंमत या काळात बिलकूल वाढली नाही; आणि इतर देशातील पाटाच्या गिरण्यांची पैदास पुष्कळ कमी झाली. याशिवाय महायुद्धामुळे धान्याची व इतर सामानाची नेआण करण्यास, तसेच रेती भरण्यास (Sand-bags) म्हणून पोत्यांस नवीन मागणी फार मोठी आली. तेव्हा हिंदुस्थानातील गिरण्यांस विलक्षण भरभराटीचे दिवस येणे साहजिकच होते. या काळात रात्रंदिवस गिरण्या चालू ठेवून माल काढून घेण्यात येत असे; आणि गिरण्यांनी ७५ टक्केपर्यंत आपल्या भागीदारांस नफा वाटला! तथापि महायुद्धानंतरचा काळ त्यांस कठीणच गेला आहे. महायुद्धकालातील नफ्यामुळे नवीन गिरण्या १९१९ पुढे पुष्कळच निघाल्या आणि जुन्यांनीही आपला व्याप वाढविला. पण गेली दहा वर्षे मंदीचीच असल्यामुळे पाटाच्या मालास वाढती मागणी नव्हती. त्यामुळे अलीकडे बरीच वर्षे

पाट-गिरण्यांच्या संघास कोणत्याही गिरणीने आठवड्यात अमुक तासावर काम करू नये, नवीन साचे आणू नयेत वगैरे प्रकारची बंधने घालून मालाची पैदास नियंत्रित करण्याचा प्रयत्न करावा लागला आहे. मध्यंतरी १९२८–२९ साली मालास थोडी मागणी वाढल्यामुळे आठवड्यातील कामाचे तास ५४ ते ६० करण्यात आले. पण लगेच १९३० पासून पुनः फार बिकट दिवस आले; आणि आज (१९३२) तर गिरण्यांच्या कोठारांत माल इतका शिल्लक आहे की, ४० तासांपलीकडे काम करू नये आणि प्रत्येक गिरणीचा काही भाग कायमचाच बंद ठेवावा, अशा प्रकारची योजना अमलात आणावी लागली आहे. तथापि या धंद्यातील कारखानदार सुसंघटित असल्याने एवढ्या मंदीच्या दिवसांतही ते सहकार्य करून ठीक भागवून नेतात. या धंद्याच्या प्रगतीत इतर बाबीत नमूद करण्यासारखे विशेष काही नाही. पाट हा हिंदुस्थानाबाहेर कोठे पिकतच नाही. पाटाच्या एकंदर पिकापैकी हिंदी गिरण्यांत खपणाऱ्या पाटाचे प्रमाण महायुद्धापूर्वी हळूहळू वाढत होते व १९१४ सालच्या सुमारास एकंदर पिकाचा जवळजवळ अर्धा भाग हिंदी गिरण्या विकत घेत असत. महायुद्धकालात सारे एकतृतीयांश पीकच परदेशी जात असे, तर गेल्या दहा वर्षांत परदेशी जाणारे पीक अर्ध्याहून काहीसे कमी असते. डंडी हे अद्यापि फार महत्त्वाचे ठिकाण आहे, पण जगातील बहुतेक इतर देशांतही पाटाच्या गिरण्या स्थापिल्या गेल्या आहेत. अर्थात हिंदुस्थानातील धंद्याइतका मोठा धंदा इतर कोठेच नाही, हे वरील विवेचनावरून ध्यानात येईल. परंतु मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे हिंदुस्थानातील बहुतेक पैदास पोती व गोणपाट वगैरे हलक्या प्रकारच्या मालाचीच आहे; आणि इतर ठिकाणी, विशेषत डंडी येथे, सतरंज्या व इतर अनेक चांगल्या प्रतीचे कापड विणण्याकडे लक्ष जास्त दिले जाते.

### पाट-गिरण्यांची प्रगती

| साल | गिरण्या | चात्या | माग |
|---|---|---|---|
| १९१३–१४ | ६४ | ७४४,२८९ | ३६,०५० |
| १९२३–२४ | ८९ | १,०४३,४१७ | ४९,०३८ |
| १९२९–३० | ९८ | १,१४०,४३५ | ५३,९०० |

कापडाच्या व पाटाच्या गिरण्यांप्रमाणेच कोळशाच्या खाणींचीही वाढ या काळात पुष्कळ झाली. भूगर्भात कोळसा मुबलक असलेला नवीन टापू असा कोणताच सापडला नाही, आणि तो आता हिंदुस्थानात सांपडेल अशी प्रायः चिन्हेही दिसत नाहीत. राणीगंज व झारिया यांभोवतालच्या प्रदेशातच कोळशाच्या सर्व महत्त्वाच्या खाणी आज वसलेल्या आहेत, आणि या टापूत हिंदुस्थानात एकंदर निघत असलेल्या नऊदशांशावर कोळसा निघतो. कोळशाच्या पैदाशीची वाढ १८९५ च्या पुढे किती झपाट्याने झाली हे पुढील आकड्यांवरून ध्यानात येईल :—

### कोळशाची पैदास

| साल | पैदास (टन) | खाणी | मजूर |
|---|---|---|---|
| १८९४ | २,८००,६५२ | १२३ | ४३,१९७ |
| १९०१ | ६,६३५,७२७ | २१० | ९५,३१८ |
| १९१४ | १५,७२७,६३१ | ६१० | १३७,८५१ |
| १९२२ | १८,१६८,९८८ | ९५३ | १८४,३५५ |
| १९२९ | २२,३०८,१७४ | ५४८ | १६५,६५८ |

कोळशाची पैदास वाढण्याचे कारण म्हणजे उद्योगधंद्यांची व आगगाड्यांची वाढ हे उघड आहे. आगगाड्या हे कोळशाच्या धंद्याचे फार मोठे गिऱ्हाईक. एकंदर वार्षिक पैदाशीपैकी जवळजवळ एक-तृतीयांश कोळसा अगदी प्रथमपासून आगगाड्यांवर खपत आला आहे. तेव्हा आगगाड्यांच्या वाढीमुळे कोळशाच्या खाणीस उत्तेजन मिळाले हे साहजिकच आहे. आणि याबरोबरच आगगाड्यांच्या प्रसारामुळे कोळशाची वाहतूक सुलभ होऊन हिंदुस्थानातील निरनिराळ्या भागात हिंदी कोळशाचा खप होण्यास मदत होऊ लागली. चालू शतकाच्या आरंभी हिंदी कोळसा परदेशी पाठविण्यास सुरुवात होऊ लागली. मुख्यतः ब्रह्मदेश, मलाया, सिंहलद्वीप या प्रदेशातील बंदरांत हिंदी कोळसा पुष्कळ खपू लागला. १९०८ चे सुमाराच्या जागतिक तेजीच्या काळात हा व्यापार फारच वाढला. पण पुढे काही वर्षे तो पुनः बसला. कोळशाची आयात महायुद्धापूर्वी एकंदरीने कमीच होत होती, आणि निर्गत आयातीहून बरीच मोठी झाली होती. परंतु कराची, मुंबई वगैरे ठिकाणी अजून विलायती कोळसा हिंदी कोळशापेक्षा जास्त स्वस्त पडत असे. महायुद्धाच्या काळात उद्योगधंद्याच्या भरभराटीमुळे कोळशाची मागणी विशेष वाढली. परंतु त्या मानाने पैदास वाढली नाही याचे कारण वाहतुकीच्या साधनांचा अभाव हे होय. युद्ध चालू असता कोळसा समुद्रमार्गाने नेणे धोक्याचे होते. त्यामुळे परदेशी होत असलेली निर्गत जवळजवळ थांबली, आणि हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानातसुद्धा सर्व माल आगगाडीच्या मार्गानेच पाठवावा लागला. तथापि सर्वच परिस्थिती अडचणीची असल्यामुळे मालाच्या डब्यांचा तुटवडा पडू लागला, आणि आगगाड्यांस खाणीतून निघत असलेल्या सर्व कोळशाचा उठाव करणे अशक्य होऊ लागले. यातच सरकारी कामासही कोळसा लागू लागला, आणि सरकार १९१७ च्या पुढे कोळशाची वाहतूक व विक्री यांचे नियंत्रण करू लागले. या काळात खाणींना फायदा फार मिळाला; पण त्यांची वाढ प्रथम फारशी झाली नाही ती १९१९ च्या पुढे होऊ लागली. सरकारी नियंत्रण १९२१ पर्यंत चालू होते. यातील शेवटची एकदोन वर्षे तर देशातल्या देशातच पुरवठा पुरता होत नसल्यामुळे हिंदुस्थानातून कोळसा निर्गत करण्याची मनाई करण्यात आली होती. परंतु सरकारी नियंत्रण जेव्हा काढण्यात आले त्याच वेळेस एकंदर काळ पालटला.

महायुद्धानंतर भरभराटीचे दिवस संपुष्टात आले आणि हिंदुस्थानातील कोळशाची मागणी एकदम कमी झाली. इकडे कोळशाच्या खाणींची संख्या व पैदास तर पुष्कळ वाढली होती. परंतु परदेशी बरीच वर्षे माल पाठविण्यात न आल्यामुळे हिंदुस्थानाची गिऱ्हाइकी दक्षिण आफ्रिकेने काबीज केली होती. अशा रीतीने १९२२ च्या पुढे कोळशाच्या धंद्यास बरीच बिकट स्थिती उत्पन्न झाली. खुद्द हिंदुस्थानात होणारी कोळशाची आयात मात्र महायुद्धकालापासून जी अगदी थांबली ती केव्हाच पुढे फारशी वाढली नाही; आणि गेल्या पंधरा वर्षांत हिंदुस्थानात खपणाऱ्या एकंदर कोळशापैकी शेकडा ९५ टक्क्यांहून अधिक कोळसा हिंदीच असतो. तेव्हा येथे बाहेरील आयातीचा प्रश्न नसून खुद्द हिंदी मागणीच्या वाढीचाच प्रश्न आहे. आगगाड्यांची वाढ तर सारखी होत आहेच; पण याशिवाय या धंद्याच्या दृष्टीने अलीकडे घडलेली फार महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोखंड व पोलाद करणाऱ्या कारखान्याची स्थापना ही होय. कारण यांत कोळशाचा अतोनात खप होतो. तसेच इतर उद्योगधंद्यांची वाढही होत आहेच. तथापि सर्वच धंदे गेली दहा वर्षे विशेष चांगल्या स्थितीत नसल्यामुळे कोळशाच्या खाणींसही दिवस वाईट आले. जकात-मंडळाने १९२६ साली या धंद्याविषयी जेव्हा चौकशी केली तेव्हा त्यास असे आढळून आले की, हिंदुस्थानात आयात कोळशावर जकाती लादून धंद्यास मदत काही होणार नाही; पण परदेशी बंदरांत हिंदी कोळशाचा पुनः शिरकाव झाला तर कोळशाच्या खाणींचा फायदा होईल. हा शिरकाव होण्यास मुख्य अडचण म्हणजे हिंदी कोळशाची परदेशातील कुप्रसिद्धी ही होती. जेव्हा जेव्हा कोळशास मागणी फार येई (उदाहरणार्थ १९०८ साली अथवा महायुद्धानंतरच्या काळात)

तेव्हा तेव्हा येथील व्यापारी वाटेल त्या प्रतीचा माल परदेशी पाठवीत. म्हणून परदेशी जाणाऱ्या मालाची प्रतवारी लावणारे एखादे मंडळ निर्माण करून त्याने पसंत केल्यावरच माल बाहेर पाठवावा, अशी जकात-मंडळाने शिफारस केली. तदनुसार अलीकडे एक मंडळ निर्माण करण्यात आले आहे आणि त्याचा निर्गतीची वाढ होण्यास बराच उपयोग झाला आहे. एकंदर धंद्याची स्थिती आज फारशी चांगली नाही; आणि गेल्या दहा वर्षांत पैदास जरी वाढत असली तरी खाणींची संख्या कमी होत आहे. यावरून बऱ्याच, विशेषतः लहानलहान खाणीवाल्यांस धंद्यातून आपले अंग काढून घ्यावे लागले हे उघड आहे.

एकंदरीत पाहता हिंदुस्थानातील कोळशाच्या धंद्याची स्वदेशातील व जवळच्या परदेशी बंदरातील गिऱ्हाइकी चांगली बसली असून त्याची पुढील वाढ हिंदुस्थानातील उद्योगधंद्यांच्या वाढीवर अवलंबून राहणार आहे. पण येथे विशेष लक्षात घेण्याची गोष्ट ही की, हिंदुस्थानात कोळसा सापडतो तो विशेषतः एका टापूत. हा टापूही समुद्रकिनाऱ्याला फारसा जवळ नाही. यामुळे कोळशाच्या वाहतुकीचा खर्च अतोनात येतो. ही दूरदूरच्या प्रांतातील उद्योगधंद्याच्या दृष्टीने अत्यंत अडचणीची बाब आहे. उदाहरणार्थ, १९२५-२६ साली खाणीतून काढलेल्या कोळशाची किंमत तेथल्या तेथे टनास ५-६ रुपये असल्यास ती मुंबईसारख्या ठिकाणी टनास १५-१६ रुपये पडत असे. याकरिताच तेलावर चालणाऱ्या एन्जिनांचा उपयोग करून पाहणे आणि अगदी अलीकडे आगगाड्या व गिरण्या चालविण्यास वीज कामास लावणे, असले उपक्रम मुंबई, मद्रास, पंजाब या बाजूस करणे प्राप्त झाले आहे; आणि त्यामुळे इकडील गिऱ्हाइकीवर कोळशाच्या धंद्यास नेहमी अवलंबून राहणे शक्य होणार नाही.

हिंदुस्थानात अलीकडील काळात औद्योगिक दृष्ट्या घडून आलेली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोखंड व पोलाद आधुनिक पद्धतीने तयार करण्याचे कारखाने इकडे प्रस्थापित झाले ही होय. याचे श्रेय विख्यात पार्शी कारखानदार म. जमशेटजी ताता यांसच सर्वस्वी आहे. ईस्ट-इंडिया कंपनीच्या वेळेपासून बऱ्याच इंग्रजांनी लोखंड हे दगडी कोळशाच्या भट्टीत तयार करण्याचे हिंदुस्थानात प्रयत्न केले होते. पण यांपैकी कोणतेच प्रयत्न यशस्वी झाले नव्हते. नाही म्हणावयास १८८० च्या सुमारास बाराकर (बंगाल) येथे एका इंग्रज कंपनीने असल्या भट्ट्या उभारल्या; आणि जरी बरीच वर्षे तिला तूट येत होती, तरी ती पुढे सावरू लागून महायुद्धाच्या सुरुवातीनंतर कंपनी भरभराटीस आली. पण हे काम फार मोठ्या प्रमाणावर धडाडीने ताता कंपनीने हाती घेतले. आरंभी मार्गात अतोनात अडचणी आल्या. सरकारची सहानुभूती बिलकूल नव्हती, ती हळूहळू मिळविली. खनिज लोखंड प्रथम चांदा जिल्ह्यात व नंतर द्रुग जिल्ह्यात विपुल म्हणून तेथे सुरुवात करून पाहिली; पण दगडी कोळसा मध्यप्रांतात पुरेसा नाही म्हणून शेवटी बऱ्याच वर्षांनंतर हल्लीची तातानगरची जागा निश्चित झाली. १९११ साली कारखान्यातून लोखंड बाहेर पडू लागले. पुढे लागलीच महायुद्धास आरंभ झाला व त्यामुळे धंद्याच्या उत्कर्षास अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झाली. महायुद्धकालात हिंदुस्थानातील आगगाड्या व निरनिराळे ओतकामाचे व इंजिनियरिंगचे कारखाने यांत तातांच्या मालास मागणी फार आली आणि फायदा चांगला पडू लागला. तेव्हा आपले भांडवल वाढवून कारखान्याची उत्पादनशक्ती वाढविण्याचा थोडक्याच वर्षांत ताता कंपनीने बेत केला. महायुद्ध चालू असता नवीन यंत्रसामग्री मागविणे अशक्य होते म्हणून ते संपताच १९१९ मध्ये नवीन भट्ट्या बसवून कारखान्याचा विस्तार करण्यास आरंभ झाला. पण पुढे दोनतीन वर्षांत इतर धंद्यांप्रमाणेच, किंबहुना इतर धंद्यांहूनही अधिक प्रमाणात, लोखंड व पोलाद यांच्या धंद्यांत सर्व जगभर मंदीचे दिवस आले आणि किमती उतरल्या. युरोपातून अत्यंत स्वस्त मालाची आयात होऊ लागली, आणि ताता कंपनीस या चढाओढीत टिकाव धरणे अशक्य झाले. कर्मधर्मसंयोगाने या सुमारासच

हिंदुस्थान सरकारने जकातीसंबंधीचे धोरण बदलावे अशी 'फिस्कल कमिशन'ने शिफारस केली व या कमिशनने ताता कंपनीच्या कारखान्याकडे लागलीच लक्ष पुरवावे अशी विशेष सूचना केली. यामुळे १९२४ साली जकात-मंडळ प्रस्थापित झाल्यावर लोखंड-पोलादाच्या धंद्याचे संरक्षण कसे करावे हा प्रश्न त्यांच्यापुढे प्रथमच टाकण्यात आला. मंडळाने यासंबंधी बारकाईने विचार करून आयात होणाऱ्या मालावर संरक्षक जकाती विवक्षित प्रमाणात लादाव्या अशी शिफारस केली. याशिवाय ताता कंपनीने कारखान्यातील काही खात्यांत नवीन यंत्रसामग्री आणून त्यांचा विस्तार केला असता व इतर काही सुधारणा केल्या असता एकंदर कारभार जास्त किफायतशीर होईल असेही त्यांनी सुचविले. १९२४ मध्ये पोलादावर प्रथम संरक्षक जकाती लादण्यात आल्या. पण पुढील सर्वच वर्षे वाढत्या मंदीची असल्यामुळे या जकाती मध्यंतरी पुनः वाढविण्यात येऊन १९२७ मध्ये जकात-मंडळाकडून फेरचौकशी होऊन आणखी सात वर्षांकरिता जकाती कायम कराव्या, अशी शिफारस झाली; आणि त्याप्रमाणे कायदाही करण्यात आला. ताता कंपनीप्रमाणेच जुनी बाराकरला स्थापन झालेली बंगाल आयर्न कंपनी ओत-कामाच्या कारखान्याकरिता लोखंड तयार करीत असते; आणि अलीकडे अशीच दुसरीही एक कंपनी निघाली आहे. परंतु या दुसऱ्या कंपन्यांच्या कारखान्यांचे प्रमाण लहान असून यांच्या भट्ट्यांतून फक्त लोखंडच बाहेर पडते. ताता-कंपनी मात्र केवळ लोखंडच काढण्यापेक्षा त्रीड, पोलाद व पोलादाचे पत्रे, सांधपट्ट्या, इमारती तुळया, आगगाडीचे रूळ वगैरे ठोकळ सामान तयार करण्याकडे विशेष लक्ष पुरविते.

लोखंड तयार करण्याचा धंदा आता हिंदुस्थानात कायमचा प्रस्थापित झाला असे म्हणण्यास हरकत नाही. कारण खनिज लोखंड, दगडी कोळसा व चुनखडी हे लोखंड पैदा करण्यास लागणारे मुख्य पदार्थ बिहार व ओरिसा प्रांतांच्या काही भागांत एकमेकांच्या सांनिध्याने मुबलक व स्वस्त सापडतात. यामुळे भट्टीतून तयार झालेले लोखंड हिंदुस्थानात इतर कोणत्याही देशापेक्षा स्वस्त मिळते. अलीकडे बरीच वर्षे हिंदुस्थानातून जपानात बरेचसे लोखंड पाठविले जाते. पोलाद करण्याच्या बाबतीत मात्र एक अडचण आहे ती अशी की, पोलाद करण्याला जो उंची कोळसा लागतो त्याचा पुरवठा हिंदुस्थानात मुबलक नाही. यामुळे पोलाद करणे इतके स्वस्त पडत नाही. तसेच सुरवातीस तरी बरेच कामकरी व तज्ज्ञ परदेशांतून आणावे लागल्यामुळे हा खर्च हिंदुस्थानात विशेष येऊ लागला. परंतु येथे हळूहळू सुधारणा करण्यात येत आहे. जकात-मंडळाच्या म्हणण्याप्रमाणे पोलादाचा धंदाही आणखी पाचसात वर्षांत स्वावलंबी होऊ शकेल. १९३०–३१ साली हिंदुस्थानातील या धंद्याची एकंदर पैदास अशी होती : लोखंड, ११·४ लक्ष टन; पोलाद, ९·२ लक्ष टन; व पोलादी सामान, ४·३ लक्ष टन.

लोखंड व पोलाद तयार करण्याचा एक मोठा कारखाना स्थापिला गेला तरी अजून या बाबतीत आपण बहुतांशी परदेशांवर अवलंबून आहो, हे कळून येण्यासारखे आहे. वर सांगितल्याप्रमाणे काही पोलादी ठोकळ सामानच फक्त या कारखान्यात तयार होते. आता काही ओतकामाचे व इंजिनियरिंग कामाचे कारखाने सुद्धा आपल्याकडे अस्तित्वात आले आहेत आणि काही आगगाड्या, एंजिनाशिवाय आपणांस लागणारा इतर सर्वच माल स्वतःच्या कारखान्यांत तयार करवितात हे खरे. परंतु अजून निरनिराळ्या प्रकारची अवजारे, हत्यारे, शास्त्रीय उपकरणे व हरतऱ्हेची यंत्रसामग्री—फार काय पण खिळे, नट, स्क्रू वगैरे जिन्नसही आपणांस बाहेरून आणावे लागतात. १९१९ च्या सुमारास तातांच्या कारखान्यास जेव्हा भरभराटीचे दिवस होते, तेव्हा तेथीलच पोलाद घेऊन निरनिराळे सामान बनविण्याच्या कंपन्या तातांच्या साहाय्याने जमशेदपूरला बऱ्याच स्थापिल्या गेल्या. परंतु यांतील बहुतेक आज नामशेष झाल्या आहेत. तारेचे खिळे करणारा तेथील कारखाना संरक्षक जकात व बिहार प्रांताच्या सरकारची इतर प्रकारची मदत मिळूनही टिकू शकला नाही. आज केवळ पोलादी तारा व दोर करणारी कंपनी, टिनचे पत्रे करणारी कंपनी अशा दोनतीनच कंपन्या काय त्या जीव धरून आहेत.

लोखंड व पोलाद यांची ही गोष्ट झाली. हिंदुस्थानच्या भूगर्भात सापडणाऱ्या इतर खनिज पदार्थांची स्थिती याहूनही चमत्कारिक आहे. कोळशाच्या खालोखाल हिंदुस्थानातील महत्त्वाच्या खाणी म्हणजे मॅंगनीज या धातूच्या आहेत. १९०० सालच्या सुमारास खाणींची संख्या विशेष वाढू लागली. रूसो-जपानी युद्धाच्या वेळी रशियातील मॅंगनीजची निर्गत थांबल्यामुळे हिंदुस्थानातील व्यापारास भरती आली, आणि त्यापुढे हिंदुस्थानातून होणारी निर्गत सारखी वाढतच राहिली. या मॅंगनीजच्या खाणी विशेषतः मध्यप्रांतात व काही थोड्या मद्रास इलाख्यात आहेत. महायुद्धात हिंदी मॅंगनीजला मागणी पुष्कळ आली, आणि अजूनही रशियातून निर्गत होत नसल्यामुळे जगास मॅंगनीजचा पुरवठा करणारे हिंदुस्थान हे एकच प्रमुख राष्ट्र आहे. परंतु औद्योगिक दृष्टीने आपणांस याचा फायदा करून घेता आलेला नाही. कारण या खनिज पदार्थाचा उपयोग अत्युत्कृष्ट प्रतीचे पोलाद तयार करण्यास होतो; आणि या प्रकारचे उत्पादन आपल्या देशात होत नसल्यामुळे ही मूल्यवान खनिज संपत्ती आपणांस जशीच्या तशी परदेशी पाठवावी लागते. हिंदुस्थानातल्या इतका अभ्रकही दुसरीकडे कोठे सापडत नाही. पण याचे ठोकळे खाणीतून काढून ते जसेच्या तसेच परदेशी पाठविणे यापलीकडे आपल्या देशात काहीच होत नाही. तसेच अगदी अलीकडे ब्रह्मदेशात एके ठिकाणी शिसे, जस्त व रुपे यांची एक फार मोठी खाण सापडली आहे. परंतु या खाणीतूनही धातू अशोधित स्वरूपातच परदेशी शुद्धीकरणा-करिता व पुढे उद्योगधंद्यांत वापरण्याकरिता पाठविले जातात. हल्लीच्या उद्योगधंद्यांची पद्धतच अशी आहे की, निरनिराळ्या प्रकारची रसायनद्रव्ये वगैरे पदार्थ तयार करण्याचे कारखाने एकदम अस्तित्वात येऊन धातुशोधनाच्या क्रियेत निघत असलेल्या इतर आनुषंगिक पदार्थांचा उपयोग केल्याखेरीज ते किफायतशीर होत नाहीत. म्हणून आपल्याकडे कच्चा माल बऱ्याच प्रकारचा उपलब्ध असला तरी सर्वच प्रकारच्या उद्योगधंद्यांस उठाव मिळेल अशी परिस्थिती उत्पन्न झाल्याखेरीज औद्योगिक प्रगती होणे कठीण दिसत आहे.

हिंदुस्थानातील खनिज संपत्तीपैकी निर्देश करावयाचा राहिला म्हणजे रॉकेल तेलाच्या धंद्याचा. १८९० च्या सुमारास ब्रह्मदेशातील खाणी आधुनिक पद्धतीने चालविण्यास सुरुवात झाली, आणि त्यानंतर खाणीतील तेलाच्या पैदाशीची वाढ फार झपाट्याने झाली. गेल्या वीस वर्षांत हिंदुस्थानात आसाम प्रांत व अटक जिल्हा येथेही खाणी सापडल्या आहेत. परंतु सर्वांत मोठा तेलाचा पुरवठा अद्यापि ब्रह्मदेशातूनच होतो. हिंदुस्थानच्या सर्व भागात मिळून जवळजवळ ३० कोटी गॅलन तेल दरवर्षी निघते. पण एवढ्याने हिंदुस्थानातील मागणी भागत नाही, व एकंदर जगाच्या पैदाशीचा हा केवळ ·६५ अंश आहे.

चहा-कॉफीच्या मळ्यांचा अलीकडील इतिहास विशेष महत्त्वाचा नाही. चहाच्या मळ्यांची वाढ प्रस्तुत कालखंडात सारखी होतच राहिली. आणि आज एकंदर जगातील दोन पंचमांश चहाचे पीक हिंदुस्थानात निघते. या धंद्याच्या वाढीस आजपर्यंत अडचणी अशा फार आल्याच नव्हत्या. अलीकडे पाचसहा वर्षे मात्र जाव्हा व त्याजवळील इतर बेटांतील हलक्या प्रतीच्या चहाची स्पर्धा हिंदी चहास ब्रिटिश बाजारात भोवू लागली आहे. कॉफीचे मळे भरभराटीत नसले तरी म्हैसूर व कूर्ग या प्रांतांत ते जेमतेम जीव धरून आहेत. अगदी नवीन मळ्याचा धंदा निघालेला म्हणजे रबराचा. रबराचे मळे ब्रम्हदेश व त्रावणकोर संस्थान येथे विशेष आहेत. या तीन्ही धंद्यांतील मळे बहुतांशी युरोपीय लोकांच्या हाती आहेत.

हिंदुस्थानातील एकंदर औद्योगिक प्रगतीचा आढावा काढण्यास मजूर-कमिशनने दिलेल्या माहिती-वरून तयार केलेले खालील कोष्टक उपयोगी पडेल. यातील आकडे १९२९ सालाबद्दलचे आहेत.

### १ कारखाने

(यंत्रसाहाय्याने काम करून २० पेक्षा अधिक मजूर लावणारे व बारमहा चालणारे)

| तपशील | कारखाने | मजूर |
|---|---|---|
| कापडाच्या गिरण्या | २९५ | ३३८,००० |
| पाटाच्या गिरण्या | ९५ | ३४७,००० |
| एंजिनियरिंग कामाचे व धातुकामाचे कारखाने | ८७१ | ३१५,००० |
| इतर | ११९० | १६६,००० |
| एकूण | २४५१ | १,१६६,००० |

### २ खाणी

| तपशील | खाणी | मजूर |
|---|---|---|
| कोळसा | ५४८ | १६५,६५८ |
| मँगनीज | १२५ | २७,२४३ |
| अभ्रक | ४९८ | १६,५५५ |
| इतर | ५६१ | ६०,२४५ |
| एकूण | १७३२ | २६९,७०१ |

### ३ हंगामी कारखाने

| तपशील | कारखाने | मजूर |
|---|---|---|
| कापसाची सरकी काढणे व गठ्ठे बांधणे | २,१७६ | १३९,९८७ |
| चहाच्या मळ्यावरील कारखाने | ९३४ | ६३,४१२ |
| पाटाचे गठ्ठे बांधणे | ११५ | ३७,३०० |
| तांदूळ सडणे | १,६०६ | ७६,२१४ |
| तेलाचे कारखाने | २४४ | ११,४९५ |
| गूळ व साखर | ४५ | १५,०७६ |
| सिगारेट, सिगार वगैरे | १६ | ९,९२२ |
| इतर | ५४२ | ३४,३०८ |
| एकूण | ५,६७८ | ३८७,७१४ |

### ४ मळे

| तपशील | पिकाचे क्षेत्र | मजूर |
|---|---|---|
| चहा | ७८९,००० | ९३०,४७२ |
| कॉफी | १६३,००० | ९२,५०४ |
| रबर | १७१,००० | ४८,७०४ |
| एकूण | १,१२३,००० | १,०७१,६८० |

वर दिलेल्या तत्त्यांवरून आधुनिक उद्योगधंद्यांची आपल्याकडील व्याप्ती नीट कळून येईल. बारमहा काम करणाऱ्या कारखान्यांबद्दल, कापडाच्या व पाटाच्या गिरण्या वगळून, याहूनही थोडी अधिक फोड पुढीलप्रमाणे करता येईल. हे आकडे १९२७ सालबद्दलचे आहेत.

| तपशील | कारखाने | मजूर |
|---|---|---|
| आगगाड्यांच्या कंपन्यांचे कारखाने | ११२ | १४७,३५८ |
| एंजिनियरिंग काम | २६० | ४४,२५५ |
| लोखंड व पोलाद | ७ | ३७,३७५ |
| छापखाने वगैरे | २९८ | ३६,१७१ |
| गाठा बांधणे | २२ | २४,२१२ |
| बंदुका वगैरे तयार करणे | २४ | २०,५१८ |
| आगकाड्या | ३४ | ११,३३१ |

दहा हजाराहून अधिक मजूर कामास लावणारे सर्व उद्योगधंदे यात आले. यावरून असे स्पष्ट दिसून येईल की, कापडाच्या व पाटाच्या गिरण्या, लोखंड व पोलाद तयार करणे, आणि कोळसा, मँगनीज व अभ्रक यांच्या खाणी यांपलीकडे महत्त्वाचे असे धंदे आपल्याकडे विशेष नाहीतच. बाकी एंजिनियरिंग कामाचे अथवा आपला माल परदेशी पाठविण्याकरिता गठ्ठे बांधण्याचे वगैरे हंगामी कारखाने यांचाच प्रसार फार. नाही म्हणावयास हंगामी कारखान्यांत साखरेचे कारखाने महत्त्वाचे आहेत. परंतु या धंद्याचा इतिहासही उद्बोधक आहे. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात साखर हिंदुस्थानातून बाहेर देशी जात असे. पुढे निर्गत कमी होऊन हिंदुस्थान या बाबतीत केवळ स्वयंपूर्ण बनले. परंतु १८९५च्या पुढे युरोपात 'बीट'पासून साखर फार स्वस्त तयार होऊ लागून हिंदुस्थानात तिची एकदम आयात सुरू झाली. एव्हापासून हिंदुस्थानातील साखरेचा खप व आयात ही सारखी वाढत असून हिंदी साखरेचे व गुळाचे कारखाने बसले आहेत. हल्लीची आयात मुख्यतः जाव्हा बेटातून होते. तेथे साखरेच्या कारखान्यास उसाचा पद्धतशीर पुरवठा होऊन मोठ्या प्रमाणावर यंत्रसाहाय्याने साखर तयार केली जाते. यापैकी काहीच हिंदुस्थानातील हल्लीच्या कृषिपद्धतीत होणे शक्य नाही; आणि म्हणून फार मोठ्या प्रमाणावर संरक्षक जकाती लादल्याखेरीज आज आहे तितपतही साखरेचा धंदा हिंदुस्थानात टिकणे शक्य नाही, असा जकात-मंडळाने निर्णय दिला आहे. मजूर-कमिशनने दिलेले आकडे 'फॅक्टरी ॲक्ट'-च्या खाली कारखाने येतात त्यांबद्दलचे आहेत.

एकंदरीत यांत्रिक युगाचा प्रसार हिंदुस्थानात फार अल्प प्रमाणात झाला आहे हे उघड आहे. खानेसुमारीच्या वर्गवारीप्रमाणे हिंदुस्थानातील लोकसंख्येपैकी जवळजवळ एकदशांश लोक उद्योगधंद्यांवर उपजीविका करितात. पण यांतील बहुतेक सर्व भरणा खेड्यांतील कारागीर-वर्गाचा आहे. यांतील अत्यंत मोठा वर्ग हातमागावरील विणकरांचा. विणकरांच्या खालोखाल सुतार, चांभार, न्हावी, परीट, कुंभार, शिंपी वगैरे येतात. या औद्योगिक लोकसंख्येच्या पुरातन कार्यपद्धतीत फरक असा अगदी थोडा पडला आहे. विणकरवर्ग हातसुताऐवजी गिरणसूत वापरू लागला आहे, आणि बऱ्याच ठिकाणी धावत्या धोट्यांचे माग प्रचारात आले आहेत. रंगारी परकीय रंग वापरतात, शिंपी शिवण्याची यंत्रे वापरतात, आणि बऱ्याच भागांत लोहार व सुतार नवीन प्रकारची परदेशी हत्यारे उपयोगात आणितात. यापेक्षा काही नागर कारागीर-धंद्यांत जरा जास्त फरक पडलेला आहे. सुरतेच्या जरतारी धंद्यात अलीकडे लहानलहान यंत्रे बरीच वापरण्यात आली आहेत. परंतु यांत्रिक साह्य एकंदरीत फार कमी घेतले जाते हे खरे.

आपला सर्व कारागीरवर्ग अगदी गरीब व सावकाराच्या मुठीत असलेला असाच आहे; आणि केवळ कारागीर पोटाला फार कमी घेतात म्हणूनच यांच्या मालाचा खप आज होऊ शकत आहे. कारागिरांची संघटना करणे, खरेदी-विक्रीबाबत त्यांचे व्यापारी वर्गावरील परावलंबन कमी करणे, त्यांच्या कार्यपद्धतीत शक्य त्या सुधारणा करणे वगैरे सर्व प्रश्न फार बिकट आहेत; आणि ते निकराने हाती घेऊन सोडविणे अत्यंत जरुरीचे आहे. तसेच शेतकऱ्यासही काही जोडधंदा पाहून देणे तितकेच आवश्यक आहे. जोडधंदा पाहावयाचा म्हणजे प्रत्येक टापूतील कृषिपद्धती व तेथे उपलब्ध असलेला कच्चा माल यांकडे लक्ष पुरवणे जरूर आहे. हिंदुस्थानात या संबंधीची परिस्थिती सगळीकडे सारखी नाही. परंतु त्यातल्यात्यात सूत कातणे व हातमागावर कापड विणणे यांचाच फैलाव देशभर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होणे शक्य आहे, हे अखिल-भारतीय चरखा-संघाने केलेल्या अलीकडील कामगिरीवरून स्पष्ट दिसून येते.

हिंदुस्थानात औद्योगिक मजूरवर्ग हा एकंदर लोकसंख्येच्या मानाने जरी फार लहान असला, तरी त्याची संख्या पंधरा लाखावर आहे; व त्यासंबंधीचे निरनिराळे प्रश्न अलीकडे बरेच महत्त्व पावले आहेत. हिंदी मजूरवर्गाबद्दल नेहमी जी गोष्ट अगदी प्रथम सांगण्यात येते ती ही की, खेड्यापाड्यांशी पुरता संबंध तोडून पिढीजाद उद्योगधंद्यांच्या ठिकाणीच वास्तव्य करणारा असा मजूरवर्ग आपल्याकडे कोठेच निर्माण झालेला नाही. परंतु हे हिंदुस्थानातच नव्याने घडून आले असे नाही. इतर सर्व देशांत उद्योगधंदे बाल्यावस्थेत असताना अशीच परिस्थिती होती. मात्र हिंदुस्थानाइतकी ती इतर कोठे सारखी टिकून राहिली नव्हती. आज हिंदुस्थानातही मजूरवर्गाचा खेड्यापाड्यांशी जो संबंध आहे त्याचे निरनिराळे प्रकार आहेत. प्रथम हंगामी कारखान्यांचा विचार करू. यातील सर्व मजूर आजूबाजूच्या टापूतील शेतकरी अथवा शेतीवर काम करणारे असतात; आणि कारखाना हंगामी असल्यामुळे असे होणे साहजिकच आहे. मळ्यांवरील मजुरांचा प्रश्न अगदीच निराळा आहे. हे मळे—विशेषतः चहाचे—स्थापन झाले ते साधारणतः निर्जन व वन्य प्रदेशांत. तेव्हा यांस मजुरांचा पुरवठा थेट बाहेरून करणे अवश्य होते. प्रथमपासूनच मजूरभरती करणे हा मळ्यांचा बिकट प्रश्न होऊन बसला होता. या मजूरभरतीस वाव साहजिकच जेथे दाट लोकवस्ती आहे अथवा ज्या टापूत भुकेबंगाल वन्य जाती आहेत तेथे मिळाला. ही भरती करण्याकरिता अशा टापूंत प्रत्येक मळेवाल्यास आपले मुखत्यार पाठवावे लागत व लांब मुदतीच्या कराराने मजुरांस बांधून आणावे लागे. प्रथमतः या सर्व प्रकारास काहीच पद्धती नव्हती; आणि कित्येक मजूर हालअपेष्टा होऊन आसामात पोचण्यापूर्वी वाटेतच मरत. हळूहळू थोडे नियंत्रण सुरू झाले. मळेवाल्यांच्या मुखत्यारांची नावे जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंदली गेली पाहिजेत व मजुरांस करारांची कलमे नीट समजाविली पाहिजेत, अशा प्रकारची बंधने घालण्यात आली. परंतु तरीही मजुरांची फसवणूक व नागवणूक बरीच होत राहिली. मजुरांस विशेष जाचक अशी परिस्थिती होती ती अशी की, एकदा आसामात गेल्यावर त्याला स्वदेशात परत येणे अशक्य होई. कारण तो कराराने बांधला गेल्यामुळे पळून गेल्यास त्याला कायद्याने कडक शिक्षा ठेवण्यात आली होती. मध्येच निघून जाणाऱ्या मजुरास कैदेची शिक्षा देणारे कायदे हे १९२० सालपर्यंत अस्तित्वात होते. आज ते जरी रद्द झाले तरी मजूर बराच असहाय असतो. परत जाऊ म्हटले तरी स्वदेश फार लांब व प्रवास खर्चाचा, आणि मळ्यावरील मजुरीही बेताचीच. तेव्हा अजूनही चहाच्या मळेवाल्यांना मजूर मिळविण्याकरिता नेहमी बराच खटाटोप व खर्च करावा लागतो. कोळशाच्या खाणींतील मजूर बहुतेक आसपासच्या संताळ वगैरे वन्य जातींचेच आहेत. हे सर्व घरची भातशेती करून खाणींत काम करितात. यामुळे पेरणीच्या व कापणीच्या दिवसांत मजुरांचा तुटवडा व हंगामानंतर मजूर मुबलक अशी या खाणींवर स्थिती असते. त्याचप्रमाणे पीक चांगले आले अथवा दुष्काळ पडला तर असेच फरक पडतात. संताळ वगैरे लोक आपल्या खेड्यांवर राहून खाणींवर कामास येणार म्हणून

ही परिस्थिती बदलत नाही; आणि इतर प्रांतांतून नेहमी खाणीवर राहणारे मजूरही येत नाहीत, याचे कारण तेथील मजुरीचे दर त्या मानाने फार कमी पडतात हे होय.

मोठमोठ्या गिरण्या आहेत अशा शहरांतील प्रश्न अगदीच निराळ्या प्रकारचा आहे. जेथे एखाद्-दुसरीच गिरणी आहे तेथे कायमचा औद्योगिक मजूरवर्ग निर्माण होणे शक्य नाही. कारण हा निर्माण होण्यास नेहमी कोठे ना कोठे तरी उद्योगधंदा मिळण्याची निश्चिती व बायकामुलांचाही समावेश होऊ शकेल एवढी धंद्यांची विविधता पाहिजे. म्हणून जेथे बरेच कारखाने आहेत व काम हरतऱ्हेचे आहे तेथेच असला वर्ग निर्माण होतो. अर्थात लहान लहान शहरांतील मजूर आसपासच्या शेतकीवर्गातील व शेतीशी संबंध राखणारे असे असतात. कलकत्ता, मुंबई व अशाच काही ठिकाणी परिस्थिती थोडीशी अनुकूल वाटते. परंतु येथे काही विवक्षित अडचणी आहेत. कलकत्त्यास बहुतेक मजूर संयुक्त प्रांतातील येतात. कारण बंगाली मजूर मागतो तेवढी मजुरी पाटाच्या गिरण्या देत नाहीत. संयुक्त प्रांतातील मजूरवर्ग कलकत्त्यास कायम राहणे शक्य नाही, तेव्हा आपल्या खेड्याशी संबंध ठेवून त्यास वारंवार तेथे परत जावे लागते. मुंबईच्या गिरण्यांतील मजूर कोकणी असल्यामुळे ही अडचण उत्पन्न होत नाही. येथे मुख्य अडचण म्हणजे राहण्याच्या सोयीची. मजूरवर्गास राहण्याची जागा इतकी अपुरी, गैरसोयीची व आरोग्यदृष्ट्या अपायकारक असते की, त्यांना आपल्या खेड्याचा संबंध तोडणे शक्य नसते. मुंबईची जी स्थिती तीच प्रायः इतर ठिकाणची. बहुतेक ठिकाणी एकेका खोलीत एका अथवा बऱ्याच वेळा अनेक कुटुंबास राहावे लागते. बायकांस आडोसाही मिळत नाही, पाण्याचेही हाल असतात, सभोवती स्वच्छतेचा पूर्ण अभाव असतो व बेकार झाल्यास शहरात टिकणे दुरापास्त होते. म्हणून हिंदुस्थानातील मजूरवर्ग कायमचा औद्योगिक व नागर बनला नाही, खेड्याशी त्याचा संबंध कायम आहे आणि आजच्या परिस्थितीत हे इष्टच आहे असे मजूर-कमिशनचेही मत आहे.

इंग्लंडात व इतर देशात कारखान्याच्या नियंत्रणाला आरंभ जनतेच्या डोळ्यात मजूरवर्गाची दुःस्थिती भरली म्हणून झाला. परंतु आपल्याकडे हे कारण मुख्य नव्हतेच. आरंभी तर कारखाने फार थोडे होते. यामुळे तेथील मजूरवर्गाची स्थिती आपल्याकडे महत्त्वाची वाटणे शक्य नव्हते. हिंदुस्थानातील मजूर-कायद्यांचा उगम लँकाशायर व डंडी येथील कारखान्यांच्या चळवळीत आहे. मुंबईतील गिरणीवाले जसे जपानमधील गिरण्या फार तास चालतात म्हणूनच जपानातून इकडे कापड स्वस्त येऊ शकते अशी तक्रार काही वर्षांपूर्वी करीत असत, तसेच लँकाशायर व डंडी येथील गिरणवाले मुंबई व कलकत्ता येथील गिरण्यांविरुद्ध तक्रार करीत; आणि येथील सर्वच सूत्रे लंडनहून हलत असल्यामुळे हिंदी गिरण्यांचे नियंत्रण झाले पाहिजे असा बूट निघणे अत्यंत साहजिक होते.

हिंदुस्थानात कारखान्यांसंबंधी कायदे करण्याचा विचार प्रथम १८७५ साली मुंबई इलाख्यात निघाला व १८८१ मध्ये या इलाख्यापुरताच एक अगदी साध्या स्वरूपाचा, फक्त मोठ्या गिरण्यांस लागू पडणारा कायदा करण्यात आला. पहिला हिंदुस्थानभर लागू पडणारा असा कायदा १८९१ साली मंजूर झाला. यात ९ वर्षांच्या खालील मुलांस कारखान्यात कामास लावू नये आणि ९ ते १४ वयाच्या मुलांस सात तास व बायकांस अकरा तास याहून जास्त काम पडू नये, अशी तरतूद करण्यात आली होती. या कायद्याचे क्षेत्र यांत्रिक शक्ती वापरून ५० वर मजूर कामास लावणाऱ्या कारखान्यांपुरतेच होते; व यातील काही कलमे कापडाच्या गिरण्यांपुरतीच लागू होती. यानंतर बरीच वर्षे मजुरांच्या स्थितीकडे लक्ष देण्यासारखे काही झाले नाही. परंतु १९०५ च्या सुमारास मुंबईच्या गिरण्या भरभराटीस आल्या होत्या; आणि याच वेळी विजेचे दिवे घेण्यात आल्या-मुळे गिरण्यांतील मजुरांस काम फार पडते, अशी तक्रार होऊ लागली. विजेचे दिवे नव्हते तेव्हा अर्थात दिवसाउजेडीच काम करणे शक्य असे. मुंबईतील गिरण्यांबद्दल ही ओरड झाल्यामुळे १९०८

साली हिंदुस्थान सरकारने एक कमिशन नेमले; आणि या कमिशनच्या शिफारशींस अनुसरून १९१२ साली एक कायदा करण्यात आला. या कायद्याप्रमाणे लहान मुलांची काम करण्याची व अर्धे काम करण्याची वयोमर्यादा जुनीच कायम राखण्यात आली; परंतु कापडाच्या गिरण्यांत मुलांचे काम सहा व माणसांचे काम बारा तासांवर असू नये, असे ठरविण्यात आले. तसेच अपघातापासून बचाव, कारखान्यांतील स्वच्छता, उजेड व हवा यासंबंधी नवीन नियमही या कायद्यात प्रथमच घालण्यात आले. परंतु १९१२ साली जी अत्यंत महत्त्वाची सुधारणा घडून आली ती ही की, कायद्याची अमलबजावणी नीट होत आहे किंवा कसे हे पाहण्याकरिता या वेळेपासून सरकारी तपासनीस (इन्स्पेक्टर) नेमण्यास सुरुवात झाली. यापूर्वी कायदे केले गेले तरी ते वारंवार मोडले जात. काम करण्याच्या ठरलेल्या वेळा अथवा मुलांची वयोमर्यादा यांबद्दलचे निर्बंध राजरोस मोडलेली उदाहरणे १९०८ मधील कमिशनच्या कितीदा तरी नजरेस आली.

महायुद्धानंतर वॉशिंग्टन येथे मंजूर झालेल्या कराराला (Convention) मान देण्याकरिता १९२१ त हिंदुस्थान सरकारास कारखान्यांतील मजुरांची स्थिती नियंत्रित करण्याकरिता एक नवीन कायदा करावा लागला. या कायद्याने व्यापिलेले क्षेत्र जुन्या कायद्यापेक्षा अधिक विस्तृत होते. कारण जुन्या कायद्यातील नियंत्रण ५० वर मजूर कामास लावणाऱ्या कारखान्यांसच लागू होते, तर ते आता २० वर मजूर लावणाऱ्यांस लागू करण्यात आले. या नव्या कायद्यान्वये १२ वर्षांखालील मुलास कारखान्यांत काम देण्यास मनाई करण्यात आली असून १२ ते १५ वयाच्या मुलांस फक्त अर्धा वेळ काम दिले पाहिजे, प्रौढ माणसास दर आठवड्यास ६० तास व कोणत्याही एके दिवशी ११ तास ही कामाची कमाल मर्यादा घातली गेली आहे. तसेच ही मर्यादा सर्व प्रौढ माणसांस घालण्यात आल्यामुळे आता बायका-पुरुषांत कामाच्या तासांसंबंधी काही फरक केलेला नाही. त्याचप्रमाणे इतर बाबीतही नवीन कलमे घालण्यात आली असून तपासनीस वगैरेंचा संचही अधिक वाढविण्यात आला. १९२९ साली नेमिलेल्या मजूर-कमिशनने तर याही कायद्यात सुधारणा करण्यासंबंधी महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. आठवड्याचे व दिवसाचे तास अनुक्रमे ५४ व १० असावे; आणि हवा, पाणी, शौचकूप यांच्या कारखान्यांतील पुरवठ्याविषयी जास्त काळजी घेतली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे.

साधारणपणे इतर देशाच्या मानाने मजुरांसंबंधीचे कायदे हिंदुस्थानात बरेच लवकर सुरू झाले व त्यांतील एकंदर प्रगती समाधानकारक अशीच आहे. याचे मुख्य कारण म्हणजे वर दर्शविल्याप्रमाणे प्रथम लँकाशायर व डंडी यांची ओरड आणि नंतर सार्वराष्ट्रीय परिषदांच्या शिफारशी हे होय. जेथे अशी ओरड झाली नाही तेथे नियंत्रणही झाले नाही व नियंत्रणाच्या कक्षेबाहेरील कारखान्यात काही वेळेस स्थिती अत्यंत वाईट अशीच आढळून येई. उदाहरणार्थ, आरंभी कापूस, पाट वगैरेंचे गठ्ठे बांधण्याच्या हंगामी कारखान्यांवर कायदेशीर दाब काही नव्हता; आणि त्यामुळे तेथे कामाच्या गर्दीच्या वेळेस अहोरात्र जवळजवळ विश्रांतीशिवाय मजुरांना काम करावे लागत असे, असे आढळून आले. तसेच आजही जेथे यांत्रिक साहाय्य कोणत्याच प्रकारचे घेण्यात येत नाही अशा विड्या, लाख, गालिचे इत्यादी माल तयार करण्याच्या कारखान्यात अगदी लहान मुलांस अतोनात व अवघड कामास लावणे, कामकाज करण्याच्या जागेत अत्यंत गलिच्छपणा असणे, मजुरांस विश्रांतीस फुरसद न देता पंधरा-पंधरा तास त्यांजकडून काम घेणे, वगैरे स्थिती मजूर-कमिशनला आढळून आली. तसेच कापड (कापूस व ताग यांचे)–गिरण्यांचे नियंत्रण जरी लवकर झाले तरी खाणींच्या बाबतीत अगदी अलीकडच्या काळापर्यंत सरकारने काहीच केले नव्हते. बायकांस खाणीत काम करू न देणे ही जी सुधारणा इंग्लंडात अगदी प्रथम घडून आली ती आपल्याकडे अद्यापि पुरतेपणी अमलात आलेली नाही. गेल्या चारपाच वर्षांतच खाणींतील बायकांच्या कामाचे नियंत्रण होण्यास आरंभ झाला असून बंगाल व बिहार

यांमधील कोळशाच्या खाणींतील बायकांचे काम पुरते बंद होण्यास १९३९ पर्यंत अवधी लागेल असा अंदाज आहे. १९२३ च्या पूर्वी खाणींतील कामाच्या तासावर काहीच मर्यादा घातलेली नव्हती. परंतु त्या सालच्या कायद्याने १३ वर्षांच्या खालील मुलांस खाणीत काम करण्यास मनाई करण्यात आली; आणि खाणीच्या वरच्या अंगास काम करणाऱ्या मजुरांस आठवड्याचे ६० तास व खाणीत काम करणाऱ्यांस ५४ तास अशा कमालमर्यादा घालण्यात आल्या. मजूरवर्गाच्या कारखान्यातील स्थितीचे नियंत्रण करणाऱ्या कायद्याशिवाय मजूरवर्गासंबंधी इतरही काही कायदे सरकारने केलेले आहेत. यातील प्रमुख म्हणजे मजूर कामावर असताना त्याला जर काही इजा झाली अथवा तो दगा पावला तर त्यास नुकसानभरपाई म्हणून कारखानदारास काही रक्कम देण्यास भाग पाडणे यासंबंधीचा कायदा होय. तसेच मुंबईइलाखा व मध्यप्रांत येथे अलीकडे काही उद्योगधंद्यांत कामकरी बायकांस बाळंत होण्यापूर्वी व बाळंत झाल्यानंतर काही दिवस पगारी सुटी देण्यासंबंधी कायद्याने तरतूद करण्यात आली आहे.

१९२६ साली हिंदुस्थान सरकारने मजूरसंघ नोंदविण्याचाही एक कायदा केला आहे. इतर देशांच्या मानाने आपल्याकडे मजूरवर्गातील संघटनेची चळवळ अगदी नवीन आहे. मजूरवर्ग शहरांत स्थायिक झालेला नाही; आणि मजूर अत्यंत अशिक्षित व अडाणी असल्यामुळे बरीच वर्षे मजूरसंघ प्रस्थापित होऊ शकले नाहीत. पण महायुद्धानंतर सबंध जगभरच मजूर-चळवळीची उसळलेली लाट हिंदुस्थानातही येऊन पोहोचली. १९१८ सालाच्या नंतर बहुतेक मोठमोठ्या औद्योगिक शहरांत मजूरसंघ स्थापन झाले आणि त्यांनी पगारवाढीबद्दल चळवळ करण्यास सुरुवात केली. महायुद्धानंतर काही वर्षे उद्योगधंदे भरभराटीत होते, एकंदर धारण वाढती होती, परंतु त्या मानाने मजुरीचा दर वाढला नव्हता; यामुळे कारखानदारांस फायदा फार पडत होता. या काळात मजूरसंघ स्थापित होऊन त्यांनी संप केले अथवा संपाचा धाक घातला तर भरभराटीच्या काळात कारखाना बंद ठेवणे कठीण वाटून कारखानदार पगारवाढ करीत. याप्रमाणे भरभराट होती तो पावेतो मजूरसंघांच्या मागण्या कबूल होत गेल्या आणि यामुळे मजूरसंघांचे महत्त्व व संख्याही वाढली. परंतु पुढे मंदीचे दिवस आल्याबरोबर बाजू उलटली. कारखानदारांस संघांचे भय वाटेनासे झाले व पगारवाढ करण्याची त्यांस ताकदही उरली नाही. यामुळे १९२२ सालच्या पुढे संप जास्त जास्त अयशस्वी होऊ लागले व हळूहळू संघांचे महत्त्व कमी होऊन त्यांतील सभासदांची संख्या ओसरू लागली. अर्थात मुंबई, कलकत्ता, जमशेदपूर इत्यादी ठिकाणीच मजूरसंघ काही तरी महत्त्वाचे आहेत. इतर ठिकाणी मजूरवर्गात संघटनेचा जवळजवळ पुरताच अभाव आहे असे म्हटले तरी चालेल. वर सांगितल्याप्रमाणे मजूरवर्ग अशिक्षित असल्यामुळे बाहेरील शिक्षित पुढाऱ्यांच्या मदतीशिवाय संघटनेचे कार्य नीटसे होऊ शकत नाही. तसेच निदान हल्लीच्या काळात तरी मजुरांचा पुरवठा मागणीपेक्षा अधिक असल्यामुळे संप एकजुटीने यशस्वी करून दाखविणे हे सहसा घडून येत नाही.

महायुद्धापूर्वी उद्योगधंद्यांत मजुरांचा पुरवठा पुरा पडत नाही अशी तक्रार करण्यात येत असे. खरे पाहता अशी तक्रार चमत्कारिक दिसते. कारण ज्या देशात लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न महत्त्वाचा होऊन बसलेला आहे तेथे मजुरांचा तुटवडा पडावा हे कसे? यातील खरा प्रकार असा दिसतो की, मुंबई, कलकत्ता वगैरे काही ठिकाणी महायुद्धकालापूर्वी गिरण्या व कारखाने फार झपाट्याने वाढत होते आणि मजुरांना मागणी बरीच होती; परंतु शहराकडे येणाऱ्या मजुरांचा ओघ तितक्याच झपाट्याने वाढलेला नसल्यामुळे सकृद्दर्शनी त्यांचा तुटवडा आहे असे वाटत होते. तसेच जेथे–उदाहरणार्थ मळे व कोळशाच्या खाणी येथे–मजूर फार दूरच्या प्रदेशांतून आणणे प्राप्त होते अथवा येथील मजुरीचे दर किंवा इतर परिस्थिती फारशी अनुकूल नव्हती, तेथे मजुरांची वाण भासणे साहजिकच होते. महायुद्ध-कालानंतर ही परिस्थितीही पुरती बदलली आहे. आता मजुरांचा पुरवठा भरपूर होत आहे व गेली चारपाच वर्षे तर मंदीमुळे औद्योगिक शहरांतील बेकारीचे मान अतोनात वाढले आहे.

शेतावर पोटाला पुरेसे मिळत नाही म्हणून इतर काम बघणाऱ्यांचाच आपला औद्योगिक मजूरवर्ग बनलेला आहे, हे वरील विवेचनावर कळून येईल. संताळ, गोंड वगैरे भुकेबंगाल वन्य जातींतील लोक अगदी अल्प वेतनावरसुद्धा आसामात जाऊन कायम राहतात. रंगून येथे गोद्यात व तांदळाच्या गिरण्यांत काम करण्याकरिता आणि मलायातील रबराचे व सीलोनमधील चहाचे मळे यांवर काम मिळविण्याकरिता दरवर्षी मद्रास इलाख्यातून मजुरांच्या झुंडीच्या झुंडी जातात. संयुक्त प्रांतातून विशेषतः कलकत्ता येथे, पण इतर प्रांतांतही मजूर पसरतात. रत्नागिरीचे मजूर मुंबईत तर आहेतच, शिवाय त्यांचा कराचीतही आजकाल भरणा पुष्कळ आहे. या सर्वांची राहणी अत्यंत गरिबीची व वेतन अत्यल्प हे ठरलेलेच; तथापि त्यातल्या त्यात अर्थात फरक आहेत. परदेशांतील मळ्यांवर जाणाऱ्या मजुरांचे वेतन व परिस्थिती यांसंबंधी सरकारकडून नियंत्रण केले जाते; आणि म्हणून तेथून काही वर्षांनी चार पैसे पदरी बांधून मजूर स्वदेशी परततात. रंगूनमधील स्थिती आजपर्यंत बरी होती; तथापि अलीकडे निरनिराळ्या कारणांमुळे फार बिघडली आहे आणि मजूर-कमिशनने ब्रह्मदेशातील हिंदी मजुरांच्या हितसंरक्षणार्थ एक स्वतंत्र अधिकारी हिंदुस्थान सरकारने नेमावा, अशी शिफारस केली आहे. आसामातील मजुरीचे दर पूर्वी जे फारच कमी असत ते हल्ली जरी थोडे वाढले आहेत तरी ते सरकारने एक मंडळी नेमून नेहमी ठरवून देत जावे, अशी मजूर-कमिशनने शिफारस केली आहे. इतर ठिकाणचेही मजुरीचे दर सारखेच आहेत, असे नाही. मजूर-कमिशनने गोळा केलेल्या आकड्यां-वरून मजुरीच्या दरांची सरासरी साधारणपणे संयुक्त प्रांतात दरमहा रु. १५, बंगाल्यात रु. २२·५ व मुंबई इलाख्यात जवळजवळ रु. ३० पडते. पण ठिकठिकाणचे धारणीचे मान भिन्न असल्यामुळे राहणीत आकड्यांवरून वाटतो तेवढा फरक पडत नाही. साधारणपणे शेतकीत मजुरी पडेल त्याहून ती शहरांत काहीशी जास्त पडते आणि शहरांतील मजुरांस थोडेसे पैसे घरी पाठविता येतात एवढेच. परंतु इतर देशांप्रमाणे आपल्याकडे मजुरांच्या वेतनाचे मान वाढत आहे अथवा त्यांची स्थिती पूर्वीपेक्षा सुधारत आहे असे मात्र निःसंदेह म्हणता येत नाही.

## ६. चलनपद्धती, बँका व पतपेढ्या

ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात हिंदुस्थानचा बराच भाग आल्यानंतरही कित्येक वर्षे हिंदु-स्थानातील चलनास पद्धतशीर स्वरूप देण्याचा प्रयत्न कंपनीने केला नव्हता व निरनिराळ्या प्रदेशांत तेथील जुनी नाणीच (उदाहरणार्थ, उत्तरेत मोंगलाई रुपया, मद्रास इलाख्यात पगोडा) चालू होती. या सर्वांत एकसूत्रीपणा आणण्याचे मुख्य श्रेय मि. प्रिन्सेप यांस देण्यात येते. यांनी साधारणपणे १८२० पासून पुढे जिकडेतिकडे रुपया हेच मुख्य चलनी नाणे सुरू करण्याची खटपट करून, रुपया जो पूर्वी निरनिराळ्या प्रांतांत भिन्नभिन्न कसाचा व वजनाचा असे तो एकच प्रकारचा बनविला. मि. प्रिन्सेप हे प्रथम कलकत्त्याच्या टांकसाळीचे दुय्यम अधिकारी होते. पुढे ते तेथील मुख्याधिकारी झाल्यावर १८३५ साली १८० ग्रेन वजनाचा व ठराविक कसाचा रुपयाच फक्त टांकसाळीत पाडला जाईल, असे कंपनी सरकारने जाहीर केले; आणि त्यापुढे हेच ठराविक प्रकारचे रुपये सर्वत्र चलनात आले. हे रुपये पाडून घेण्याचा अधिकार टांकसाळीत चांदी नेणाऱ्या कोणाही इसमास असल्यामुळे हिंदुस्थानात रुपया हे प्रमुख चलनी नाणे असलेली रौप्यमानपद्धती अस्तित्वात होती, असे म्हणता येईल. १८३५ पासून १८९३ पर्यंत या पद्धतीत काहीच फरक पडला नाही; परंतु १८९३ सालच्या पूर्वी जवळजवळ वीस वर्षे या रौप्यमानपद्धतीचे आसन सारखे डळमळत होते. याचे कारण सोने

व रुपे यांच्या भावात पडू लागलेली तफावत हे होय. आपल्याकडे मूल्यमापनात एकाच धातूचा (रुप्याचा) उपयोग केला जात असे, परंतु ग्रेट ब्रिटनशी आपला व्यापार फार मोठ्या प्रमाणावर होता व तेथील व्यवहार सोन्याच्या नाण्यांत केले जात; आणि शिवाय विशेष महत्त्वाची गोष्ट ही की, हिंदुस्थान सरकारास दरसाल भरावे लागणारे सरकारी कर्जावरील व्याज, गोऱ्या नोकरांची वृद्धवेतने, इंडिया ऑफिसचा खर्च इत्यादी सर्व बाबी पौंडांत बांधलेल्या होत्या. सोन्या–रुप्याच्या भावात फरक पडला म्हणजे सहजच रुपया–पौंडाचे हुंडणावळीचे दर खालीवर होणार. चांदी सारखी स्वस्त झाली म्हणजे पौंडांत पैसे भरण्यास पूर्वीपेक्षा जास्त रक्कम उभारावी लागणार. अशा तऱ्हेने १८७३ पासून पुढे वीस वर्षे रुपयाची खालावत असलेली हुंडणावळ ही विशेषतः हिंदुस्थान सरकारास सारखी जाचत होती. हुंडणावळीचा जुना मामुली दर म्हणजे रुपयास दोन शिलिंग हा होता. १८७३ सालापूर्वीच तो थोडासा कमी होऊन रुपयास सरासरी २३ पेन्स झाला होता. तो या वीस वर्षांत सारखा घसरत १८९३ साली रुपयास १६ पेन्सांवर आला. १८९३ पावेतो सर्व राष्ट्रे मिळून हा प्रश्न सोडवितील अशी काही आशा होती. ती या साली पुरती नष्ट झाली व सोन्यारुप्याचा भाव स्थिरावण्याचेही काही चिन्ह दिसेना. तेव्हा शेवटी टांकसाळीत रुपये पाडणे तात्पुरते बंद केले आहे, असे हिंदुस्थान सरकारने जाहीर केले व अशा रीतीने रौप्यमानपद्धतीचा शेवट झाला.

यापूर्वी सुमारे चाळीस-पन्नास वर्षे हिंदुस्थान सरकारचे फडणीस व हिंदुस्थानातील काही व्यापारी संस्था सोन्याचे चलनी नाणे प्रचारात आणून हिंदुस्थानात सुवर्णमानपद्धती प्रस्थापित करावी अशी योजना पुढे मांडीत असत. तेव्हा टांकसाळ बंद झाल्यावर सुवर्णमानपद्धती अमलात येणार अशीच सर्वांची अपेक्षा होती. १८९३ पासून पुढे काही वर्षे हुंडणावळीचा दर स्थिर ठेवण्याकडेच हिंदुस्थान सरकार लक्ष देत होते. पाच वर्षे याप्रमाणे सोळा पेन्सांवर हुंडणावळीचा दर राहिल्यावर १८९८ साली फौलर कमिशनची नेमणूक करण्यात आली. या कमिशनने सोन्याचा सॉव्हरिन हिंदुस्थानच्या चलनपद्धतीत आणावा व येथील टांकसाळीत सोन्याची नाणी पाडण्याची सोय करून सुवर्णमानपद्धती प्रस्थापित करावी, अशी शिफारस केली. परंतु या कमिशनच्या अहवालानंतरची काही वर्षे हिंदुस्थानात दुष्काळ व प्लेग यामुळे विशेष अडचणीची गेली, आणि त्यामुळे चलनपद्धतीत मोठा फरक घडवून आणणे शक्य झाले नाही. दरम्यान चांदीचा भाव फार उतरला होता व चांदी कोणीही आणिल्यास त्याचे रुपये पाडून देणे बंद झाले होते. यामुळे रुपयातील चांदीची किंमत व रुपयाची किंमत यांचा काहीच संबंध उरला नव्हता. रुपयाची किंमत केवळ एका सोन्याच्या पौंडाबरोबर पंधरा रुपये या हिशेबाने लागत होती. तेव्हा सोन्यांचे चलनी नाणे प्रत्यक्ष जरी रूढ नसले तरी हुंडणावळीच्या दराच्या द्वारे सुवर्णमानपद्धती १८९३ पासून आपल्याकडे सुरू झाली असे म्हणण्यास हरकत नाही. १८९३ च्या पुढील दहा वर्षांत सोन्याचे नाणे सुरू करण्याचा बेत असूनही तसे अनेक कारणांस्तव न घडल्यामुळे त्या अवधीत हुंड्या विकून अथवा खरेदी करून रुपया-पौंडाचा हुंडणावळीचा दर सोळा पेन्सांवर कसा स्थिर राखावयाचा याविषयी बराच अनुभव हिंदुस्थान सरकार व इंडिया ऑफिस यांस आला होता. तेव्हा साहजिकच अप्रत्यक्ष रीतीने जर अशी सुवर्णमानपद्धती सुरू झालीच आहे, तर सोन्याचे नाणे पाडून विशेष फायदा काय अशी शंका उपस्थित होऊ लागली; आणि १९०४ साली सोन्याचे नाणे पाडण्याचा जुना निश्चय पूर्णपणे मोडण्यात आला.

ही १८९३ साली आपाततः अस्तित्वात आलेली व पुढील दहा वर्षांतील अनुभवानुसार बनत गेलेली चलनपद्धती महायुद्ध सुरू झाल्यानंतर काही वर्षे टिकून होती. पण १९१६ नंतर जेव्हा चांदीचा भाव भराभर वाढीस लागला तेव्हा कृत्रिम रीतीने रुपया-पौंडाचा हुंडणावळीचा दर ठरविणे अशक्य झाले, व चांदीबरोबर रुपयाची किंमतही वाढू लागली. १९१७ साली हुंडणावळीचा दर सतरा पेन्सांवर गेला.

परंतु याच्या खऱ्या वाढीस सुरुवात १९१९ च्या आरंभी झाली, व सप्टेंबर १९१९ मध्ये काही दिवस रुपयाची किंमत २८ पेन्स होती! तथापि जितक्या झपाट्याने चांदीचा भाव चढला होता तितक्याच झपाट्याने तो खाली उतरला; आणि रुपयाचा भावही पुनः डिसेंबर १९२० मध्ये अठरा पेन्सवर येऊन पुढे तो काही काळ पंधरा पेन्सपर्यंतही पोचला होता. १९१७ ते १९२४ या वर्षात हिंदुस्थान सरकारने हुंडणावळीचा दर स्थिरावण्याकडे लक्ष पुरविले नाही. देशातील चलनी नाणे व नोटा यांच्या पुरवठ्याचे नियंत्रण करून धारण फार खालीवर होऊ न देण्याकडेच विशेष लक्ष असावे. पुन्हा कोणती पद्धती स्वीकारावी याचा विचार करण्याकरिता (१९२५ साली) हिल्टन यंग कमिशन नेमण्यात आले. या कमिशनने महायुद्धापूर्वीची पद्धती सोडून देऊन प्रत्यक्ष सोन्याचे नाणे न पाडता परदेशी पाठविण्याकरिता व्यापाऱ्यांस लागल्यास एका ठराविक भावाने सोने पुरविण्याची सरकारने व्यवस्था करून सुवर्णपद्धती प्रस्थापित करावी असे सुचविले. या खेपेस जो वाद माजला तो मात्र चलनपद्धतीसंबंधी नसून या कमिशनने सुचविलेल्या हुंडणावळीच्या दराबद्दल होता. कमिशनच्या मते १८ पेन्सांस रुपया हा दर कायम करावा असे होते; व तोच हिंदुस्थान सरकारने मान्य केला. परंतु बऱ्याच हिंदी व्यापाऱ्यांचे व तज्ज्ञांचे असे मत आहे की, हा दर कृत्रिम रीतीने फुगलेला आहे, व तो कायम राखण्याचा हट्ट धरल्यास हिंदुस्थानातील सर्व किमती खालावून व्यापाऱ्यांचे व कारखानदारांचे अतोनात नुकसान होईल. आणि याप्रमाणे घडूनही आले. १९२७ पावेतो हिल्टन यंग कमिशनने सुचविलेल्या योजनेप्रमाणे सुवर्णमानपद्धती अस्तित्वात होती. परंतु गतवर्षी (१९३१) इंग्लंडने त्या पद्धतीचा त्याग केल्यावर हिंदुस्थानासही ती सोडावी लागली; आणि पुढे कोणती स्वीकारली जाईल हेही आज अनिश्चित आहे.

चलनपद्धतीचा व व्यापारी तेजीमंदीचा फार निकट संबंध आहे. हा संबंध धारण खालीवर होऊन व्यापारात फरक पडून आल्यामुळे दृष्टोत्पत्तीस येतो. गेल्या ८० वर्षात हिंदुस्थानात किमतीचे चढउतार कसे झाले हे वर दिलेच आहे. १८७३ पासून १८९३ पर्यंत झालेले हुंडणावळीच्या दरांचे फरक क्रमाक्रमाने होत गेल्यामुळे त्यांचा परिणाम किमतींवर व व्यापारावर प्रत्यक्ष कसा घडून आला हे सांगणे बरेच कठीण आहे. यापुढे हिंदुस्थान देश जगातील बहुतेक इतर देशांप्रमाणे सुवर्णमानपद्धतीवर असल्यामुळे एकंदर जागतिक फरकच येथे पडावे अशी अपेक्षा असावी. परंतु महायुद्धापूर्वी दोन दशके इतर देशांपेक्षा बऱ्याच जास्त प्रमाणात हिंदुस्थानातील किमती वाढल्या व त्यामुळे उद्योगधंद्यांच्या वाढीस जास्त प्रमाणात काहीशी मदत झाली. तथापि या किमतींच्या वाढीचे मूळ चलनपद्धतीच्या नियंत्रणात नसावे. महायुद्ध व महायुद्धोत्तर काल यांत किमतींचे चढउतार हिंदुस्थानात इतर देशांच्या मानाने बरेच कमी झाले याचे कारण आपली चलनपद्धती नियंत्रित करणे शक्य होते व त्याप्रमाणे ती नियंत्रित केली गेली हेच होय. १९२५ ते १९२८ या कालात मात्र हुंडणावळीच्या कृत्रिम दरामुळे आधीच प्रचलित असलेल्या मंदीत आणखी भर पडली हे निर्विवाद आहे.

चलनपद्धतीचा व सरकारी जमाखर्चाचाही संबंध कसा येतो हे वर सुचविलेच आहे. १८७३ नंतरची खालावत असलेली हुंडणावळ व्यापारापेक्षा सरकारलाच जास्त नडली. १८ पेन्स हाच दर ठरवावा असा आग्रह धरण्यात इंग्लंडातील सरकारी देणे देण्याची सुलभता हिंदुस्थान सरकारच्या फडणिसांच्या डोळ्यांसमोर प्रामुख्याने होती यातही संशय नाही.

चलनाच्या पद्धतीवर धारण अवलंबून असते एवढेच नव्हे, तर व्यापारास लागणाऱ्या सर्व देवघेवीच्या साधनांचे स्वरूप हे चलनपद्धती नियंत्रित करणारी सत्ताच बहुतेक देशात ठरविते. कागदी नोटा काढण्यास हिंदुस्थान सरकारने १८६२ साली सुरुवात केली; व महायुद्धकालात कागदी चलन लोकांच्या बरेच अंगवळणी पडल्यामुळे गेल्या दहा वर्षात रुपयांच्या ऐवजी नोटांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. चलनपद्धती कशी असावी, नाणी कोणती पाडावी अथवा नोटा कशा काढाव्या हे सर्व प्रथम-

पासून सरकारच ठरवीत आले आहे. याशिवाय अलीकडील काळात एकंदर पतीच्या व्यवहाराचा व्यापाराशी व चलनपद्धतीशी अत्यंत निकट संबंध येत असल्यामुळे या व्यवहाराची चलनपद्धतीशी सांगड घालणे आवश्यक होऊन बसले आहे. पण हे हिंदुस्थानात कधीच झालेले नाही. अगदी प्रथम-पासूनच आपल्या चलनपद्धतीत जर काही मोठा दोष असेल तर तो हा की, तीत लवचिकपणा बिलकूल नाही—म्हणजे व्यापारी हंगामाच्या दिवसांत चलन आपोआप वाढून आडदिवसांत ते आपोआप कमी होण्याची सोय नाही. कागदी नोटांच्या नियंत्रणाचे काही नियम याच्या आड येत; आणि याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे पतीच्या व्यवहाराचे नियंत्रण इतर देशांत होते त्याप्रमाणे ते करणारी कोणतीच संस्था, म्हणजे मध्यवर्ती बँक आपल्याकडे नाही हे होय.

हिंदुस्थानात पतीचा व्यवहार जुन्या स्वरूपात एकोणिसाव्या शतकापूर्वीच बराच परिणतावस्थेस पोचलेला होता. सराफी व सावकारी पेढ्या सर्व मोठमोठ्या शहरी प्रस्थापित झालेल्या असून हुंड्यांच्या द्वारे हिंदुस्थानभर त्यांचा व्यवहार चालत असे. मोठमोठ्या राजेरजवाड्यांची सावकारी त्या करीत असत, इतके त्यांचे अमूप द्रव्यसामर्थ्य होते. शिवाजीच्या काळचा सुरतेचा आतमाराम भूखण व क्लाइव्हला मदत करणारा मुर्शिदाबादेचा जगत शेठ यांची नांवे महशूर आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या धामधुमीच्या काळात या पेढ्या बऱ्याच खालावल्या; परंतु इंग्रजी अमल प्रस्थापित झाल्यानंतर त्यांजवर फारसा अनिष्ट परिणाम घडून आलेला नसावा, कारण वाढत्या अंतर्गत व्यापाराचा फायदा त्यांस मिळाला. मद्रास इलाख्यातील चेट्टी, शिकारपूर टापूतील मुलतानी व्यापारी व सर्वगामी मारवाडी यांच्या व्यव-हाराचे क्षेत्र सारखे वाढतच राहिले. परंतु जुना व्यवहार कायम राखून जरी त्याचे क्षेत्र वाढविले, तरी नवीन प्रकारच्या पतीच्या व्यवहाराकडे त्यांचे लक्ष बिलकुल गेलेले दिसत नाही. यामुळे बँकांच्या वाढत्या व्यवहारक्षेत्राबरोबर यांचे महत्त्व गेल्या पंचवीस-तीस वर्षांत बरेच कमी होऊ लागले आहे. बँका स्थापन करण्यात एतद्देशियांनी काही भाग कित्येक दशके घेतला नाही. प्रथम ज्या बँका हिंदुस्थानात स्थापिल्या गेल्या त्या सर्व युरोपियांच्याच होत्या. आरंभी कलकत्त्यास बऱ्याच निघाल्या व त्यांचा तेथील युरोपीय व्यापाऱ्यांशीच संबंध येई. सन १८४० च्या सुमारास कलकत्ता, मुंबई व मद्रास येथे पुढे 'प्रेसिडेन्सी बँका' म्हणून ओळखिल्या जाणाऱ्या संस्थांस सुरुवात झाली. प्रथम या सर्व संस्थांत कंपनीचे थोडेसे भांडवल असे व सरकारी डिरेक्टरही नेमिले जात. परंतु पुढे बँकांचा कारभार फार भानगडीचा होऊ लागल्यामुळे १८७६ च्या कायद्यान्वये सरकारी भांडवल व डिरेक्टर काढून घेण्यात आले. १८५० च्या पुढे वाढत्या परदेशी व्यापारामुळे हिंदुस्थानात काही परकीयांनी बँका स्थापिल्या. आणि शिवाय बाहेरील बँकांनी येथील प्रमुख व्यापारी शहरांत शाखा काढून व्यवहार करण्यास सुरुवात केली. १८६० मध्ये हिंदुस्थानातील बँकासंबंधी पहिला कायदा करण्यात आला. व यानंतर अमेरिकन युद्धामुळे सुरू झालेल्या व्यापारी धामधुमीच्या काळात, विशेषतः मुंबईस, एकदम सुमारे पंचवीस बँका स्थापन झाल्या. परंतु ही विलक्षण सट्टेबाजीची चार-पाच वर्षे गेल्यानंतर त्या सर्वच बुडाल्या. नवीन बँकांसच नव्हे तर जुन्या बँकासही या वेळेस धक्का बसला; व प्रेमचंद रायचंदच्या अचाट व्यवहारात गुरफटल्यामुळे मुंबईच्या प्रेसिडेन्सी बँकेवरही जवळजवळ आपला कारभार गुंडाळण्याची पाळी आली.

या काळानंतर सरासरी पस्तीस-चाळीस वर्षे नवीन पद्धतीच्या बँका हिंदुस्थानात निघाल्याच नाहीत. प्रेसिडेन्सी बँका व एक्स्चेंज बँका यांचाही व्यवहार बेतानेच वाढला. याचे मुख्य कारण मध्यंतरीची हुंडणावळीच्या दराची अनिश्चितता हे असावे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटची दुष्काळी वर्षे गेल्यावर हुंडणावळ स्थिरावून परदेशी व्यापार झपाट्याने वाढू लागला; आणि किमती चढावयास लागून उद्योग-धंद्यांस व शेतकऱ्यांस जरा बरे दिवस आले. १९०६ मध्ये स्वदेशी चळवळीस प्रारंभ झाला. या सर्व कारणांमुळे एतद्देशियांनी काढलेल्या नवीन लहानमोठ्या बँका भराभर स्थापन होऊ लागल्या आणि

काही दिवस त्या भरभराटीस आल्या. परंतु बँकांच्या व्यवहारात ही नवीन मंडळी तरबेज नव्हती, त्यामुळे त्यांच्याकडून चुका घडल्या. जुन्या बँकांनी नव्या बँकांचा बीमोड करण्याचा प्रयत्न केला; आणि प्रेसिडेन्सी बँका व सरकार यांजकडून काहीच साहाय्य न झाल्यामुळे १९१३ पुढील तीन-चार वर्षांत या नवीन बँकांपैकी बऱ्याचशा ढासळल्या. परंतु महायुद्धानंतर पुनः नवीन बँका निघू लागल्या व गेल्या दहा-बारा वर्षांत झालेली त्यांची प्रगती एकंदरीत समाधानकारक आहे.

१८७६ चा प्रेसिडेन्सी बँकांचा कायदा १९२० पर्यंत कायम होता. या बँकांकडे सरकारी शिल्लक व व्यवहार असे; आणि त्यांच्या बाह्य व्यवहारावर कायद्यान्वये काही निर्बंध घातलेले होते. या तीन बँका निरनिराळ्या असल्यामुळे व्यवहारांत एकसूत्रीपणा नव्हता, व त्यांनी शाखा उघडण्याचे वगैरे कार्यही झपाट्याने हाती घेतले नव्हते. १९२० साली या तिहींचे एकीकरण करण्यात येऊन इंपीरियल बँक स्थापिली गेली. या बँकेच्या व्यवहारांवर घातलेले निर्बंध प्रेसिडेन्सी बँकांपेक्षा कमी कडक होते व तिजकडे सरकारी शिल्लकही पूर्वीपेक्षा जास्त ठेवण्यात येत आहे. याचबरोबर बँकेने १०० नवीन शाखा पाच वर्षांत उघडल्या पाहिजेत, अशी अट घालण्यात आली. ही अट बँकेने योग्य मुदतीत पुरी केली. पण जरी इंपीरियल बँक १९२० पासून अस्तित्वात आली तरी ती मध्यवर्ती बँक नव्हे. कारण, तिजकडे चलनपद्धती व हुंडणावळ यांच्या नियंत्रणाचे काहीच हक्क नाहीत; आणि तिचा सर्व व्यवहार इतर बँकांशी चढाओढीनेच चालतो. यामुळे मध्यवर्ती बँकेची उणीव आज विशेष भासत आहे. तथापि ती बँक कशी असावी हा प्रश्न सुटला नसल्यामुळे ती अस्तित्वात येणे लांबणीवर पडत आहे.

खेडेगावांतील सर्व पतीचा व्यवहार सावकाराकडेच असतो, येथपर्यंत खाजगी बँका कधी पोचतच नाहीत. परंतु जेथे जेथे सहकारी पतपेढी आहे तेथे तिच्याकडे बराच व्यवहार येतो. लहानमोठ्या शहरांतून जुन्या वळणाच्या सावकारी पेढ्या आहेत. खेडेगावांतील सावकारांना पैसा पुरविणे, शहरां-खेड्यांतील लहानसहान उद्योगधंद्यांना व कारागीरवर्गाला मदत करणे हे सर्व या पेढ्याच करितात. शिवाय अंतर्गत व्यापाराचा बराच भाग यांजकडे आहे; कारण पेढीचा व्यवहार व व्यापार यात बँकां-प्रमाणे ह्या पुरता फरक करीत नाहीत. यांचा बँकांशी पूर्वी काहीच संबंध नसे. पण अलिकडे मोठमोठ्या शहरांतील सावकार बँकांकडून पैसे काढणे व बँकांमार्फत आपल्या हुंड्या पटविणे हे व्यवहार करू लागले आहेत. या सर्वांचा मिळून आजमितीस केवढा मोठा व्यवहार आहे हे सांगणे अशक्य आहे. परंतु तो एकंदरीत प्रचंड असला पाहिजे. बहुतेक सर्वच परदेशी व्यापार परकी एक्सचेंज बँकांच्या हातांत आहे. यात भाग घेणे इंपीरियल बँकेस शक्य नाही. अंतर्गत व्यवहारात इंपीरियल बँकच प्रमुख आहे व तिच्याच बरोबरीने एक्सचेंज बँका व हिंदी बँका यांचा मिळून व्यवहार आहे.

## पाच लक्ष रुपयांहून अधिक भांडवल असलेल्या बँका (१९२९)

| प्रकार | संख्या | भांडवल (वसूल) | ठेवी |
|---|---|---|---|
| इंपीरियल बँक | १ | ५,६२,५० | ७९,२४,२८ † |
| हिंदी बँका | ३३ | ७,८६,९७ | ६२,७२,०३ |
| एक्सचेंज बँका | १८ | ... | ६६,६५,९१ ‡ |
| सहकारी बँका | २२ | १,३९,७६ | १०,९०,१६ |

(रुपयांचे आकडे हजाराचे आहेत)

† यांपैकी सरकारी ठेवी रु. ७,५९,९७

‡ फक्त हिंदुस्थानातील शाखांमधील ठेवी

## ७. उपसंहार

एथपर्यंत हिंदुस्थानच्या अलीकडील आर्थिक इतिहासाच्या निरनिराळ्या अंगाचे स्थूल मानाने वर्णन झाले. आता शेवटी, इतर देशांच्या इतिहासाशी तुलना केली असता यात विशेष असे काही दिसून येते की काय व या आर्थिक इतिहासाचे निरनिराळे असे भाग काही कल्पिता येतील की काय, या प्रश्नाचा थोडक्यात विचार करावयाचा. वर दर्शविल्याप्रमाणे आगगाडीच्या युगाचा प्रारंभ होण्यापूर्वीच परदेशी व्यापारास नवीन वळण लागण्यास व जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली होती. आगगाड्या चालू झाल्यावर हीच प्रवृत्ती अधिक बळावून कित्येक जुने धंदे लवकर नामशेष झाले. या पलीकडे विशेष झपाट्याने असे काहीच घडून आले नाही. शेतकऱ्याची परिस्थिती जी थोडी बदलत होती ती या सर्व काळात सारख्याच प्रमाणात बदलत असावी. १८७६–१८७८ चे व एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचे दुष्काळ आणि १९१८ सालचा इन्फ्लुएंझा यांसारख्या महान आपत्ती मधूनमधून राष्ट्रावर कोसळत, त्यामुळे काही काळ विशेष कठीण जाई. कोठे थोडी प्रगती झाली असेल तेथे पीछेहाट होई, पण थोड्या वर्षांत पुनः पूर्ववत चालू लागे. महायुद्धामुळे उद्योगधंद्यांच्या वाढीस वाव मिळाला; परंतु महायुद्धात पुढे पडलेले पाऊल फारसे मागे न सरण्याचे कारण बहुतांशी बदललेले सरकारी धोरण हे आहे. निश्चित कालमर्यादेतच बोलावयाचे म्हणजे असे म्हणता येईल की, १८७५ पावेतो जुन्या उद्योगधंद्यांचा झपाट्याने ऱ्हास होत गेला; त्यापुढील पंचवीस वर्षांत या ऱ्हासाचा वेग कमी होऊन नवीन प्रकारचे उद्योगधंदे व एकंदर यांत्रिक शक्तीचा उपयोग यांचा देशात प्रसार होऊ लागला; व हीच प्रवृत्ती गेल्या तीस वर्षांत प्रामुख्याने दृष्टोत्पत्तीस येत आहे.

इतर देशांशी तुलना केली असता आपल्या इतिहासाचे वैशिष्ट्य म्हणजे आपली अप्रागतिकता असेच म्हणता येईल. फार मोठा असा फरक घडून आला तो फक्त व्यापाराच्या क्षेत्रात. आगगाड्या व रस्ते यांच्या वाढीमुळे देशाच्या कोन्याकोपऱ्यांतून माल बाहेर जाणे व बाहेरील माल विक्रीस येणे हे शक्य झाले आहे; आणि यामुळे जुन्या उद्योगधंद्यांवर व शेतकऱ्यांवर झालेले परिणाम मागे वर्णिलेच आहेत. कृषिपद्धती अथवा शेतकी आऊते व अवजारे यांत जवळजवळ काहीच फरक पडलेला नाही. शिवाय आपला कारागीरवर्गही इतका अप्रागतिक आहे की, त्यांनी आपण होऊन काही यांत्रिक साह्य घेऊन व आपल्या उत्पादनपद्धतीत काही फरक करून यंत्रोत्पादित मालाशी टक्कर देण्याचा कधीच नेटाने प्रयत्न केला नाही. याला सुरतेच्या जरतारी धंद्यासारखे एखादेच अपवादात्मक उदाहरण सांगता येईल. पण येथेही धंद्यास भरभराटीचे दिवस सरकारने जकाती लादल्यानंतरच आले. नवीन पद्धतीच्या धंद्याचे स्वरूप काय याचे मागे विवेचन केलेच आहे. फार मोठ्या प्रमाणावर चालणारे असे कापूस, पाट, लोखंड यांशिवाय आपल्याकडे दुसरे धंदेच नाहीत. बाकी यंत्रांचा प्रसार झाला आहे तो मुख्यत्वे आगगाड्यांचे व एंजिनियरिंग कामाचे कारखाने, छापखाने अशा प्रकारच्या किरकोळ व विशेषतः दुरुस्ती करण्याच्या कामांत, अथवा कापूस–पाटाचे गठ्ठे बांधणे, तांदूळ सडणे अशा हंगामी कामांत. हे काम दूरच्या प्रदेशांत होणे शक्यच नाही म्हणून ते आपल्याकडे होते.

या अप्रागतिकतेची कारणे अनेक आहेत. देश गरीब म्हणून भांडवलाचा अभाव, लोक अशिक्षित म्हणून मजूरवर्ग अडाणी, सरकार परकीय म्हणून त्याचे धोरण आपल्या प्रगतीस विघातक, आणि निसर्गदत्त संपत्तीतही बऱ्याच उणिवा. हा शेवटचा मुद्दा महत्त्वाचा आहे. काही दृष्ट्या हिंदुस्थान देश संपन्न आहे. हवापाण्याची विविधता व जमीनही हरतऱ्हेची, यामुळे शेतकीची पैदास आपल्याकडे विपुल आहे. कारागीरवर्ग जुन्या परंपरेत वाढलेला व कुशल, यामुळे जुन्या काळात हा देश श्रीमंत व

उद्योगधंद्यांत पुढारलेला म्हणून गाजला तर त्यात नवल नाही. परंतु गेल्या दीडशे वर्षांत सर्व जगभर जी औद्योगिक क्रांती घडून आली आहे तीमुळे याहून निराळ्या प्रकारच्या नैसर्गिक संपत्तीची इष्टता भासू लागली आहे. जुन्या काळात तलम कापड काढणे हे औद्योगिक प्रगतीचे मुख्य लक्षण समजले जाई, तर आज लोखंड–कोळशाच्या बळावर उद्योगधंदे उभारणे यास खरे महत्त्व आले आहे. परंतु आपल्याकडे कोळशाचा पुरवठा जरी मुबलक असला तरी तो हलक्या प्रतीचा व सर्व आडमार्गी आढळतो. खनिज लोखंड विपुल; पण त्याचे कारखाने उभारणे अगदी अलीकडे शक्य झाले आहे. एकंदर खनिज संपत्ती फार कमी असून सोडा व असिड तयार करण्यास लागणारे पदार्थ सापडत नाहीत, यामुळे धातू व रासायनिक द्रव्ये तयार करण्याचे महत्त्वाचे कारखाने आपल्याकडे निघणे कठीण. कोळशाच्या अभावामुळे हिंदुस्थानच्या बऱ्याच भागात यंत्रे चालविण्यास लागणारी विजेची अथवा वाफेची शक्ती फार महाग पडते; व आपल्या परिस्थितीतील हा दोष काढून टाकणे आज तरी शक्य दिसत नाही. अलीकडे ब्रह्मदेशात काही खाणींचा शोध लागला आहे; आणि त्यामुळे परिस्थिती जरी थोडीशी सुधारली असली तरी हे सर्वच प्रकारचे उद्योगधंदे एकसमयावच्छेदेकरून व फार मोठ्या प्रमाणावर काढणे अवश्य असल्यामुळे आपले पाऊल एकदम पुढे पडेल असे वाटत नाही. यात फार मोठी अडचण आहे ती अशी की, इतर देशांत आधीच फार मोठ्या प्रमाणावर धंदे चालू असून हिंदुस्थानातील गिऱ्हाइकी त्यांनी पटकावलेली आहे. तेव्हा विशेष प्रयत्न केल्याखेरीज त्यांस हुसकून देऊन आपले धंदे स्थापणे शक्य नाही; आणि अशा प्रकारचा विशेष प्रयत्न करणे हे केवळ सरकारी धोरणावर अवलंबून आहे.

सरकारी धोरणाचा विचार करण्यापूर्वी दुसऱ्या एका महत्त्वाच्या विषयाचा व आपल्या मार्गातील अडचणीचा विचार करणे जरूर आहे. हा विषय म्हणजे आपल्या लोकसंख्येची वाढ हा होय. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी हिंदुस्थानची लोकसंख्या केवढी होती हे सांगणे कठीण आहे. १८७२ पासून खानेसुमारी घेण्यास सुरुवात झाली. त्यापूर्वीचे खात्रीलायक आकडे मिळत नाहीत. तथापि एकंदर उपलब्ध असलेल्या माहितीवरून १८५० च्या नंतर लोकसंख्या वाढीस लागलेली असावी व हीच प्रवृत्ती तत्पूर्वी काही कालपावेतो चालू असावी. अठरावे शतक सर्व हिंदुस्थानभरच धामधुमीचे गेले; त्यामुळे या शतकात लोकसंख्येच्या वाढीस वाव मिळाला नसावा. ब्रिटिश अमल प्रस्थापित होऊन लढाया बंद झाल्यावर नवीन जमीन लागवडीखाली आली आणि लोकसंख्या वाढीस लागणे शक्य झाले. पण जोपर्यंत काही प्रदेशांत जमीनमहसुलाबाबत फार जुलूम होत होता तोपर्यंत तेथे हे घडले नसावे. तेव्हा स्थूलमानाने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच हिंदुस्थानातील लोकसंख्येच्या वाढीस विशेष सुरुवात झाली असे म्हणता येईल. १८७२ पासून खानेसुमारीचे आकडे आहेत ते येणेप्रमाणे : १८७२ : २०·६२ कोटी, १८८१ : २५·३९ कोटी, १८९१ : २८·७३ कोटी, १९०१ : २९·४४ कोटी, १९११ : ३१·५२ कोटी, १९२१ : ३१·८९ कोटी व १९३१ : ३५·२८ कोटी (खानेसुमारीने व्यापिलेला प्रदेश दरखेपेस वाढत असल्यामुळे या आकड्यांची एकमेकांशी सहज तुलना करता येत नाही.)

या आकड्यांवरून एकदम काहीच अनुमान करिता येणे शक्य नाही. कारण की, हिंदुस्थानातील सर्वच भागांत लोकसंख्या सारखी वाढली नाही. त्रावणकोर संस्थान अथवा पूर्व बंगाल यांसारख्या भागात ही वाढ झपाट्याने होत आहे. कारण, हे प्रदेश सुपीक व दुष्काळांच्या कचाटीतून सुटलेले असून येथे नवीन लागवडीखाली येण्याजोगी जमीनही होती. आसाम प्रांतात वाढ झाली याचे कारण म्हणजे हा प्रदेश अगदी वन्य जातींनी व्यापिलेला. ब्रिटिश अमलाखाली आल्यावर तेथे चहाचे मळे स्थापिले गेले; आणि त्या निमित्ताने बाहेरून बरेच मजूर आसामात जाऊन स्थायिक झाले. दुसरे असे की, आसा-

मातील बंगालभागातल्या भागात बरेचसे बंगाली शेतकरी नवीन वसाहत करण्यास जाऊ लागले. पश्चिम पंजाबातील नवीन कालव्यांखालील वसाहतीच्या प्रदेशांत तर लोकसंख्येची वाढ अतोनात होणे साहजिक होते. उलटपक्षी, संयुक्त प्रांत, बिहार, पश्चिम बंगाल वगैरे बहुतेक प्रदेशांत वाढ अत्यंत हळूहळू होत आहे. आधीच दाटी फार झालेली व नवीन जमीन फारशी नाही, तेव्हा यात वाढ न होणे स्वाभाविक आहे; आणि महाराष्ट्र, बुंदेलखंड, कर्नाटक, पश्चिम पंजाब वगैरे विशेष दुष्काळग्रस्त व कंगाल प्रदेशांत प्रथम लोकसंख्या वाढणे व दुष्काळ आला असता ती एकदम कमी होणे हा प्रकार आळीपाळीने चाललेला दृष्टोत्पत्तीस येतो. एकंदर हिंदुस्थान देशाचा विचार केला असता गेल्या साठ वर्षांतील वाढीच्या प्रमाणात फरक कसा पडत गेला हे पुढील आंकड्यांवरून कळून येईल. लोकसंख्येतील वाढ—१८७२–१८८१ : ३० लक्ष, १८८१–१८९१ : २४३ लक्ष, १८९१–१९०१ : ४१ लक्ष, १९०१–१९११ : १८७ लक्ष, १९११–१९२१ : ३७ लक्ष आणि १९२१–१९३१ : ३४० लक्ष. वरवर पाहता यात असे दिसून येईल की, एका दशकात हिंदुस्थानात लोकसंख्येची वाढ होते तर दुसऱ्या दशकात ती खुंटते, असे हे चक्र सुरू आहे. ब्रह्मदेशाच्या आकड्यांचा यांतच समावेश झालेला आहे. तेथे सारखी वाढच होत आलेली आहे. तेव्हा ते आकडे वजा केल्यास वाढीचे प्रमाण कमीअधिक होणे प्रस्तुत हिंदुस्थानातील लोकसंख्येविषयी विशेषच ठळक रीतीने दिसून येईल. हे प्रमाण कमीअधिक होण्याची कारणे महत्त्वाची आहेत. १८७६–७८, १८९५–९६ व १९००–१९०१ चे दुष्काळ व १९१८ चा इन्फ्लुएंझा यांमुळे त्या त्या दशकातील लोकसंख्येची वाढ खुंटलेली दिसते. महाराष्ट्रासारख्या टापूत तर या दशकात लोकसंख्या घटलेलीच आहे. या एकंदर हालचालीवरून निश्चित अनुमाने काढणे कठीण आहे. एवढे मात्र लक्षात घेण्याजोगे आहे की, दुष्काळामुळे अथवा इन्फ्लुएंझामुळे मृत्युसंख्या वाढते ती विशेषतः गरीब व दुष्काळग्रस्त अथवा अत्यंत दाट वस्ती असलेल्या टापूंतच. तेव्हा असेही म्हणता येईल की, हिंदुस्थानातील लोकसंख्येची सर्वसाधारण प्रवृत्ती वाढण्याची आहे; परंतु प्रांतांप्रांतातील उत्पादनसामर्थ्य भिन्न असल्यामुळे ही वाढ कमीअधिक प्रमाणात होते आणि दुष्काळ अथवा रोगाची मोठी साथ यासारखी एखादी आपत्ती देशावर कोसळली म्हणजे लोकसंख्येची बेसुमार वाढ ठिकठिकाणी छाटली जाते.

मूळ लक्षात घेण्याजोगा मुद्दा हा की, युरोपात अलीकडे दिसून येत असलेली प्रवृत्ती आपल्याकडे काहीच दृष्टोत्पत्तीस येत नाही. तेथे मृत्युसंख्येचे प्रमाण वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे व जनतेची राहणी सुधारल्यामुळे सारखे कमी होत आहे. तसेच संततिनियमनाच्या उपायांचा अवलंब केल्यामुळे अथवा इतर कारणांनी जननसंख्याही कमी होत आहे. प्रारंभी जननसंख्येपेक्षा मृत्युसंख्येचे प्रमाण जास्त लवकर खाली उतरत असल्याने लोकसंख्या वाढत राहिली. परंतु अलीकडे उलटा प्रकार दिसून येतो, व त्यामुळे हल्ली कोणत्याच युरोपीय देशातील लोकसंख्या वाढती नाही. मुले कमी होवून त्यांपैकी कमी मृत्युमुखी पडणे हे केव्हाही सर्वच दृष्टींनी हितावह आहे; आणि आपली एकंदर परिस्थिती पाहता लोकसंख्या न वाढणे हेच बरे. परंतु यांपैकी काहीच घडून येत नाही. आपली जननसंख्या व मृत्युसंख्या या दोन्ही जगातील बहुतेक इतर देशांपेक्षा फार मोठ्या असून त्या दोहीतही अलीकडील काळात विशेष फरक घडून येत असलेला दिसत नाही. आपली अवाढव्य लोकसंख्या व तिची सतत होत असलेली वाढ हाच हिंदुस्थानचा मुख्य प्रश्न आहे. आपली गरिबी लोकसंख्येचाच परिणाम आहे; यामुळेच दरमाणशी वहीत जमीन फार थोडी पडते व कृषिपद्धतीत कोणतीही मोठी सुधारणा करणे अशक्य होते. पूर्व बंगाल व उत्तर बिहार या टापूत दर चौरस मैलास जवळजवळ साडेसहाशे माणसे असे प्रमाण पडत असून इतकी दाटी पृथ्वीवरील कोणत्याही कृषिप्रधान प्रदेशात आढळत नाही. तथापि केवळ दाटीवरूनच लोकसंख्या बेसुमार वाढली असे म्हणता येत नाही. कोकणातील दाटी २३० च असली तरी लोकसंख्येचा बोजा तेथील शेतकीस सहन होत नाही, हे उघड आहे. आपली लोकसंख्या

मोठी व बहुतेक शेतकीवर अवलंबून आहे. उद्योगधंद्यांत किती थोडी माणसे गुंतली आहेत हे मागे सांगितलेच आहे; तेव्हा ते कितीही झपाट्याने वाढले तरी जमिनीवरील बोजा कमी होण्याचे फारसे चिन्ह दिसत नाही. या प्रश्नास तोडही काही दिसत नाही. संततिनियमनाच्या उपायांचा प्रसार आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर होणे आज तरी अशक्य आहे. तेव्हा अधीच मोठी असलेली लोकसंख्या आणखी थोडी तरी वाढत राहणार असे गृहीत धरून चालणे अवश्य आहे.

कोणत्याही देशाच्या आर्थिक इतिहासात सरकारी धोरण हे महत्त्वाचे समजले पाहिजे. त्यातल्या-त्यात हिंदुस्थानात तर ते विशेषच महत्त्वाचे होय. कारण, गेल्या शतकात येथे उत्पन्न झालेली परिस्थिती अगदी चमत्कारिक होती. राजसत्ता पुरतेपणी परकी, हिंदी लोक यांत्रिक युगास, यांत्रिक उत्पादनास, शास्त्रीय शोधांस व प्रचंड व्यापारास अगदी नवखे होते. तेव्हा यांत्रिक युगाचा परिणाम हिंदुस्थानावर कशा प्रकारे होणार व किती जल्द होणार हे बहुतांशी सरकारी धोरणावर अवलंबून होते. व्यापार व उद्योगधंदा यांसंबंधी सरकारी धोरणाचे मुख्य गमक म्हणजे अनिर्बंध आर्थिक व्यवहार हेच होते. या शतकात इंग्लंडात प्रस्तुत तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या अर्थशास्त्राचे वर्चस्व होते व ते हिंदुस्थानास सहजच लागू करण्यात आले. इतकेच नव्हे, तर हिंदुस्थानचा परकीय व्यापार वाढणे हे इंग्लंडच्या फायद्याचे असल्यामुळे व्यवहाराचे क्षेत्र वाढेल अशी शक्यतोवर उपाययोजना करण्यात आली. सडका सुधारणे व लोहमार्ग सुरू करणे याच्या बुडाशी कापसाचा व्यापार वाढावा ही बुद्धी होती. सरकारने या काळात जर विशेष काळजी कशाविषयी घेतली असेल तर ती कोणत्याही प्रकारच्या जकाती वाढू न देणे व आगगाड्यांची वाढ शक्य तितक्या भराभर करणे या विषयी होती. इतर बाबीत जरी सरकारने अगदी तटस्थ वृत्ती स्वीकारिली, तरी लोहमार्ग सरकारी जोखमीने बांधणे ही मूळ धोरणास अगदी विसंगत अशी गोष्ट त्यांनी धडाडीने हाती घेतली. १९०० साल पावेतो आगगाड्यांवर काही नफा सुटत नसताही लोहमार्ग बांधण्याचे काम चालूच होते. आगगाड्यांमुळे दुष्काळनिवारणाचे कार्य बरेच झाले ही गोष्ट वेगळी; परंतु लोहमार्गाचा मूळ उद्देश सहजगत्या हिंदी माल बाहेर जावा व परदेशी माल आत यावा हाच होता. याचा परिणाम असा झाला की, हिंदी आर्थिक घटनेवर नवीन परिस्थितीचा आघात फार जोराने झाला. आपल्या नागर कारागीरवर्गावर याचे परिणाम फारच अनिष्ट झाले. आपल्या ग्रामसंस्था इतक्या जुनाट व बळकट असताही या नवीन परिस्थितीत त्या टिकू शकल्या नाहीत व त्यांना टिकविण्याचा प्रयत्नही काही झाला नाही.

पुढेही ही तटस्थ वृत्ती सरकारने तशीच कायम राखिली. कालवे बांधणे हे मात्र अपवादात्मक झाले. उद्योगधंद्यांस मदत करणे हे अगदी चुकीचे समजले जाई; व लॉर्ड मोर्ले यांनी १९०७ मध्ये देखील मद्रास सरकारास औद्योगिक खाते उघडून दिले नाही. कारण पूर्वीपासूनचाच समज हा की, हिंदुस्थानाने पक्का माल विकत घ्यावा व कच्चा पुरवावा. तथापि शेतकीलाही विशेष अशी मदत काही झाली नाही. लॉर्ड कर्झन यांच्या काळापर्यंत या बाबतीत सरकार प्रायः स्तब्धच होते, असे म्हटले तरी चालेल. त्यानंतर शेतकीखाती प्रांतोप्रांती निघाली व काही संशोधनकार्य होऊ लागले. जंगलखात्याचे सर्व लक्ष इमारती लाकूड व इतर किफायतशीर उत्पन्न काढण्याकडे होते. जंगले ही वैरण अथवा लाकूडफाटा पुरविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांस कशी उपयोगी पडतील याचा विचार त्यांनी कधीच केला नाही. किंबहुना तो अजूनही होत नाही. तसेच मध्यवर्ती बँक निर्माण करून हिंदी पतव्यवहारास नीट वळण लावणे अथवा जपानप्रमाणे सरकारी एक्सचेंज बँका काढणे व एतद्देशीय बँकांस उत्तेजन देणे हेही कधी केले गेले नाही. संरक्षक जकाती लादणे हे तर शक्यच नव्हते. तथापि उत्पन्नाकरितासुद्धा लहानशी जकात बसविली गेली तरी हिंदी उद्योगधंद्यांस तिजपासून काही फायदा न मिळावा म्हणून त्यांवरही लागलाच तितका कर लादण्यात आलेला आहे.

ही परिस्थिती महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत अशीच टिकली. परंतु महायुद्धकालात हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानात दारूगोळा व युद्धोपयोगी इतर साहित्य तयार करण्याची अडचण पडू लागल्यामुळे सरकारलाच येथील उद्योगधंद्यांची वाण नडली; आणि काही उद्योगांस उत्तेजन देण्याचा घाईने प्रयत्न करण्यात आला. तसेच हिंदी लोकमतास आता काहीसा जास्त मान मिळू लागल्यामुळे औद्योगिक कमिशन नेमिले गेले. महायुद्धोत्तर कालात मुख्य फरक पडला म्हणजे जकातींच्या धोरणात. जकात-कमिशनने मर्यादित स्वरूपाचे का होईना पण संरक्षक धोरण स्वीकारावे, अशी शिफारस केली व ती सरकारने मान्य केली. त्याप्रमाणे लोखंड, पोलाद, कापूस, जरतार, आगकाड्या, कागद, साखर, रासायनिक द्रव्ये इत्यादी अनेक धंद्यांत जकात-मंडळामार्फत चौकशी होऊन त्यांस संरक्षक जकातीचा फायदाही देण्यात आला आहे; आणि यापुढे संरक्षक जकातीचे हे प्रमाण सारखे वाढतच जाणार असा रंग दिसत आहे. परंतु उद्योगधंदे व शेतकी यासंबंधीच्या इतर धोरणांत जसा फरक पडून यावा तसा अद्यापि आलेला नाही. औद्योगिक कमिशनच्या शिफारशी नवीन राज्यघटनेत निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनी अमलात आणावयाच्या होत्या. पण पैशाच्या व इतर अडचणींमुळे त्यांनी विशेष असे काहीच केले नाही. शेतकी कमिशनच्या शिफारशींपैकीही एक बृहत्-संशोधकमंडळ स्थापण्यापलीकडे काही झाले नाही आणि लवकर काही होईल असे वाटत नाही. आपली आजची परिस्थिती पाहता मोठ्या उद्योगधंद्यांची फारशी झपाट्याने वाढ होईल, असे वाटत नाही. काही झालीच तर ती जमशेदपूर, कलकत्ता वगैरे विवक्षित टापूतच होईल. एरवी बहुजनसमाजाचा व्यवसाय म्हणजे छोट्या प्रमाणावर शेतकी अथवा कारागिरी धंदा हाच आणखी कित्येक दशके राहणार हे उघड आहे. दिवसेंदिवस इतर देशांतील शास्त्रीय प्रगती व मोठ्या प्रमाणावरील उत्पादन यांच्या जोरापुढे हिंदी शेतकऱ्यांस व कारागिरांस टिकाव धरणे अशक्य होऊ लागले आहे. तेव्हा छोट्या शेतीस उपयोगी पडतील अशा सुधारणा घडवून आणणे म्हणजे लहान लहान तलाव वगैरे बांधून पाणीपुरवठा करणे, गुरांच्या पैदाशीकडे लक्ष देणे, शेतकऱ्यांस लाकूडफाटा व गुरचराई यांसंबंधी अधिक सोय करणे, सावकाराच्या कचाट्यातून त्यांस सोडविणे, कृषिपद्धतीत, बियाणांत वगैरे त्यांस झेपेल अशा सुधारणांचा प्रसार करणे, सहकार्याने विक्री-खरेदीस उत्तेजन देणे इत्यादी अनेक गोष्टी साधण्याकडे प्रथमतः सरकारने अधिक लक्ष पोचविले पाहिजे. कारागीरवर्गासंबंधीही अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत. सरकारी खाती व राष्ट्रीय पैसा यांचा विनियोग या कार्याकडे झाला पाहिजे. तात्पर्य, राष्ट्राच्या आर्थिक घटनेचा व व्यवहाराचा सर्वांगीण विचार करून सरकारने आपले धोरण व्यवस्थित आखून त्याचा नेटाने पिच्छा पुरविणे अवश्य आहे. आपला देश गरीब, अडाणी व अशिक्षित लोकांचा, आपला सर्व समाज विस्कळित, आणि प्रत्येक उत्पादकघटक लहान व असहाय्य असा आहे. इतर देशांतही संघटना व सरकारी मदत यांचे महत्त्व आजकाल फार वाढले आहे. मग आपल्याकडे तर त्याशिवाय तरणोपायच नाही हे उघड आहे.

*लोकशिक्षण-लघुग्रंथमाला*, पुस्तक २ (पुणे, १९३२) पृ० ११९, किंमत १२ आणे.

☆

# २ . . 'हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास'

## [ग्रंथपरीक्षणाचे परीक्षण]

प्रतिमेच्या १६।२।३४ चे अंकात एका अर्थशास्त्राभ्यासकांनी माझ्या 'हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास' या पुस्तकावर लिहिलेला एक परीक्षणात्मक लेख छापला आहे. माझ्या कोणत्याही पुस्तकावर कोठेही छापलेल्या परीक्षणास प्रत्युत्तर देण्याचा मजवर आजपावेतो प्रसंग आला नव्हता. पण 'प्रतिभे'तील या परीक्षणाची तऱ्हाच इतकी नावीन्यपूर्ण आहे, की तिजबद्दल दोन शब्द लिहिण्याचे मी धाडस करीत आहे.

मूळ परीक्षणाकडे वळण्याच्या आधी एक प्रास्ताविक खुलासा करतो. माझ्या मते कोणत्याही पुस्तकाचे परीक्षण करिताना पुस्तक लिहिण्यात लेखकाचा उद्देश काय होता हे लक्षात घेणे जरूर आहे. रा. अभ्यासकांनी मी अमुक लिहिले नाही, तमक्याचा विचार केला नाही असे निरनिराळे आक्षेप मजवर घेतले आहेत; पण कोठेच पुस्तकाचा आकार काय, ते कोणत्या मालेत प्रसिद्ध झाले वगैरे गोष्टींचा उल्लेख केला नाही. पुस्तक 'लोकशिक्षण-लघुग्रंथमाले'करिता मुद्दाम लिहिलेले. मालेच्या पुस्तकांचा आकार साधारणपणे १०० छोटेखानी पृष्ठे हा ठरलेला. ही मर्यादा लक्षात घेऊन मला विषयाची मांडणी करणे प्राप्त होते. पृष्ठसंख्येची जशी एक मर्यादा, तशीच मालेच्या उद्देशाच्या दृष्टीने दुसरी मर्यादा. पुस्तक बहुतांशी माहितीवजा लिहावयाचे, विवेचनात्मक भाग फारसा घालणे अप्रस्तुत होईल हेही उघड होते. तेव्हा औद्योगिक क्रांती म्हणजे काय, भांडवलशाहीचे स्वरूप कोणते व गेल्या ऐंशी वर्षांत सामाजिक स्थित्यंतरे काय झाली हा माझा मूळ विषयच नव्हता.

१८५० नंतर हिंदुस्थानातील आर्थिक परिस्थितीत कोणते फरक घडून आले हे स्थूलतः मांडणे, एवढेच मला करावयाचे होते. यांत्रिक उत्पादनाने औद्योगिक घटनेवर घडून आलेला परिणाम अगर वाहतुकीच्या सुलभतेमुळे शेतकीपद्धतीत पडलेला फरक, असल्या गोष्टींचा विचार मी ग्रंथात केलेला आहे. पण याहून खोल पाण्यात शिरणे या मालेच्या ग्रंथात अप्रस्तुत होईल असे मला वाटले.

### पूर्वग्रहदूषित समालोचन

रा. अभ्यासकांचे परीक्षण वाचून, इंग्रजीतील 'Give a dog a bad name and then hang him' या म्हणीचे उत्कृष्ट उदाहरण पाहावयास सापडत आहे, असे मला वाटू लागले. मी एक "भांडवलशाही अर्थशास्त्रज्ञ" आहे असा रा. अभ्यासकांनी आपला समज करून घेतला आहे; आणि हे ठरविल्यावर भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यास द्यावयाची सर्व मामुली विशेषणे मला लावण्यात आली आहेत. "भांडवलशाही अर्थशास्त्रज्ञ" याचा अर्थ भांडवलशाहीचा पुरस्कार करणारा, तिला उचलून धरणारा, हा आहे असे मी समजतो. भांडवलशाहीचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीने मी पुरस्कार केला आहे असे एखादे तरी स्थळ माझ्या समग्र ग्रंथात रा. अभ्यासक दाखवून देतील काय? भांडवल-

शाही चांगली अगर वाईट याचे मला विवेचन करावयाचे नव्हते; परंतु औद्योगिक व व्यापारी क्रांतीमुळे शेतकरी, कारागीर व मजूर यांची स्थिती निकृष्ट केव्हा व कशी झाली याचे विवेचन मी आपल्या पुस्तकात ठिकठिकाणी केले आहे. पुस्तक इतिहासात्मक असल्यामुळे ही निकृष्ट स्थिती घालविण्यास उपाययोजना काय केली पाहिजे याचा सविस्तर अगर खोलवर विचार करणे मला शक्य नव्हते. म्हणून जेथे हा प्रश्न उद्भवलाच तेथे भांडवलशाहीचे अस्तित्व गृहीत धरून, तात्पुरते अत्यल्प विवेचन मी केले आहे. अर्थात रा. अभ्यासक जर असे म्हणते की भांडवलशाही चांगली अगर वाईट याचा विचार केल्याखेरीज आर्थिक इतिहासावर एखादे चोपडेही लिहिणे शक्य नाही व ज्याअर्थी मी भांडवल-शाहीस ठिकठिकाणी शिव्या दिल्या नाहीत, त्याअर्थी मी तिचा एक पुरस्कर्ता आहे, तर मात्र मला त्यांना उत्तर देता येणार नाही हे मी प्रांजलपणे कबूल करतो. किंवा असेही असेल, की अर्थशास्त्राचा ज्या पद्धतीने आम्ही अभ्यास करितो ती पद्धतीच भांडवलशाही आहे, असे रा. अभ्यासकांचे मत असेल. समाजसत्तावाद्यांपैकी अनेक पंथ या पद्धतीचा अवलंब करितात हे खरे, पण आजची परिस्थितीच अशी आहे, की विशिष्ट पंथानुयायांनी आपणासच सर्व कळते व इतर मूर्ख अगर "भांडवलशाही" असा आग्रह धरावा. असा आग्रह रा. अभ्यासकांचा असावा असे परीक्षणाच्या एकंदर स्वरूपावरून वाटते.

भांडवलशाही म्हटला म्हणजे तो दुष्ट व मठ्ठ हे ठरलेलेच आणि मी भांडवलशाही! तेव्हा सर्व विशेषणे सार्थ आहेत. हे सिद्ध करण्याकरिता पुस्तकातील उतारे देणे वगैरे आवश्यक होते व ते रा. अभ्यासकांनी केलेले आहे. वाईट एवढेच वाटते की, असे करिताना खऱ्या-खोट्याची चाड बाळगण्याची जरुरी त्यांस भासली नाही. खोटेपणा अगर खोडसाळपणा यांनी सर्व लेख इतका व्यापला आहे की त्याचे सविस्तर विवेचन करणे मला शक्य नाही. परंतु त्याच्या स्वरूपाच्या विविध प्रकारांची काही उदाहरणे मात्र येथे देतो. "शेती व शेतकरी" या प्रकरणात जमीनदारांच्या जुलमाचा ओझरता नामनिर्देशही मी केला नाही असे परीक्षक लिहितात. पण प्रकरणाच्या अगदी सुरुवातीसच याबद्दल विवेचन आहे, इतकेच नव्हे तर कुळांच्या संरक्षणार्थ केलेल्या कायद्यांचाही तेथे उल्लेख केला आहे. हे निखालस खोटेपणाचे एक उदाहरण झाले. याचा निराळा प्रकार खालील वाक्यात आढळून येईल, "अधिक पैदाशीमुळे मंदी येते असे समजून मंदी घालविण्याकरिता पैदाशीला आळा घालावा, असलेल्या वस्तूंचा नाश करावा असे प्रतिपादणाऱ्यांनी लोकसंख्या हे गरिबीचे कारण म्हणून सांगताना पाहिले म्हणजे त्यांच्या बुद्धीवर गंज किती चढला आहे याची वाचकांना नीट कल्पना येईल." या वाक्यावरून मी मंदीला आळा घालण्याकरिता वस्तूंचा नाश करावा असे प्रतिपादितो अशी कोणाही वाचकाची समजूत होईल. मी अशा तऱ्हेचे विधान कधीच केलेले नाही आणि रा. अभ्यासकांस माझा सवाल असा आहे की, या पुस्तकातच नव्हे तर इतरत्र माझ्या कुठल्याही लिखाणात मी असले विधान केलेले त्यांचे पाहाण्यात आलेले आहे काय? हे केवळ एक उदाहरण झाले. पण याच पद्धतीस अनुसरून मी कधीही कोठेही न प्रतिपादलेले सिद्धांत माझे अंगी चिकटवून निष्कारण टीका करण्याचे धाडस रा. अभ्यासकांनी या परीक्षणलेखात ठिकठिकाणी केले आहे. आता खोडसाळपणाचा एक प्रकार पाहा. चहाच्या मळ्याच्या वाढीबद्दल काही मजकूर लिहिल्यावर मी आपल्या पुस्तकात खालील दोन वाक्ये घातली आहेत. "चहाचे मळे पूर्वी सांगितल्याप्रमाणे इंग्रज भांडवलवाल्यांनीच स्थापिले व ते बहुधा आजतागायत त्यांच्याच ताब्यात आहेत. राष्ट्रीय दृष्ट्या हिंदी लोकांना मजुरीचे नवीन क्षेत्र मिळाले व आसाम प्रांताची वसाहत या धंद्यामुळे बरीच झाली हेच त्याचे महत्त्व." या वाक्यांचे रूपांतर परीक्षकांनी खालीलप्रमाणे केले आहे. "चहाचे मळे स्थापल्यामुळे राष्ट्रीय दृष्ट्या हिंदी लोकांना मजुरीचे नवीन क्षेत्र मिळाले." हे वाक्य अवतरण चिन्हांत देऊन जसे काही मी ते तसे लिहिले असे दाखविले आहे, आणि पहिले वाक्य न देऊन दुसऱ्याची आपणास हवी तशी काटछाट करून माझ्या खऱ्या अर्थाचा पूर्ण विपर्यास

केला आहे. याप्रमाणे अर्थविपर्यास करणे अगर एका संदर्भात वापरलेले वाक्य भलत्याच अर्थाने उद्धृत करणे असलेही प्रकार परीक्षणात आढळतात.

परीक्षकांची हीच वृत्ती निराळ्या प्रकारानेही प्रतीत होते. "शेतकरी नेहमी कर्जबाजारी असावयाचा असा सर्वत्र नियम दिसतो. या नियमास अनुसरून जुन्या काळात देखील शेतकरी कर्जात बुडालेला असे." ही दोन वाक्ये मी आधुनिक काळात कर्जबाजारीपणाची वाढ कशी व का झाली याच्या विवेचनाचे सुरुवातीस घातली आहेत. ती उद्धृत करून रा. अभ्यासक, ही माझी कर्जबाजारीपणाची "उथळ व हास्यास्पद" कारणमीमांसा आहे असे म्हणतात. मला तेथे कारणमीमांसा करण्याचे प्रयोजन नव्हते; आणि अर्थात वाक्ये केवळ वस्तुस्थितिकथनवजा असून त्यांत कारणमीमांसा करण्याचा मी प्रयत्नही केलेला नाही, हे ती वरवर वाचणाऱ्यासही कळून येण्याजोगे आहे. पण एवढा विवेक जर रा. अभ्यासक करिते तर आपल्या स्वतःच्या बुद्धिवैभवाचे प्रदर्शन वाचकांसमोर त्यांस कसे करिता येते? परीक्षण-लेखातील बहुतेक भाग माझ्या अशाच साध्या वाक्यांवर 'कारणमीमांसा' अगर 'उपाययोजना' यांचा आरोप करून, नंतर त्यांजवर टीका करण्याने व्यापलेला आहे. माझ्या बुद्धीवर गंज चढला आहे याची रा. अभ्यासकांना इतकी खात्री झालेली दिसते, की अगदी साध्या व उघड गोष्टी मला कळत नाहीत इतकेच नव्हे तर ज्या गोष्टी मी प्रत्यक्ष लिहिल्या त्यांतील बऱ्याच नकळत अगर चुकून लिहिल्या गेल्या असेही प्रतिपादण्याची त्यांस काही दिक्कत वाटत नाही.

असो! मी भांडवलशाही आहे, माझे बुद्धीवर गंज चढला आहे अगर माझी दृष्टी विकृत आहे, या गोष्टी खऱ्या की खोट्या याची शहानिशा येथे करण्याची जरुरी नाही. आणि 'प्रतिभे'च्या वाचकांच्या दृष्टीने या वादास काही महत्त्वही नाही. परंतु परीक्षणलेख लिहिताना खऱ्याखोट्याकडे काही पाहावे लागते, ते न पाहता लिहिलेला हा निष्कारण खोडसाळपणाचा एक लांबलचक मासला 'प्रतिभे'ने छापला, तो 'प्रतिभे'च्या संपादकमंडळाने परीक्षणप्रकारात एक अभिनव उपक्रम करावा या हेतूने बुद्धिपुरःसर छापला नसावा असे वाटल्यावरून परीक्षणाचे यथार्थ स्वरूप थोडक्यात दिग्दर्शित करण्याचा प्रयत्न करण्याचे मी भरीस पडलो.

## तात्त्विक भूमिकेत मूलभूत भेद

परीक्षण लिहिताना अभ्यासकांनी काही अर्थशास्त्रविषयक सिद्धांत मांडले आहेत, त्यांचे विवेचन करणे हे वाचकांचे दृष्टीने जास्त महत्त्वाचे झाले असते. विस्तारभयास्तव हे तपशीलवार करिता येत नाही. पण काही ठळक मुद्द्यांबद्दल थोडेसे येथे लिहितो. परीक्षणलेखावरील खोडसाळपणा व अहंमन्य-पणा यांचे पटल दूर केले, तर रा. अभ्यासक यांच्या व माझ्या मतांत एक ठळक भेद दिसून येतो. तो असा. रा. अभ्यासकांच्या मते हिंदुस्थानच्या दारिद्र्याची खरी कारणे भांडवलप्रधान समाजपद्धती व विशिष्ट तऱ्हेची शासनपद्धती हीच होत. माझ्या मते निसर्गदत्त संपत्तीतील उणिवा व फार मोठी लोकसंख्या यांस गरिबीची कारणे म्हणून विशेष महत्त्व द्यावयास पाहिजे. परकी राजसत्तेमुळे आपली औद्योगिक प्रगति कशी थांबली याचे विवेचन मी आपल्या पुस्तकात केले आहेच. पण एवढ्याने कारणमीमांसा पुरी होत नाही. कोळसा व खनिज संपत्ती या यांत्रिक युगात आवश्यक असणाऱ्या बाबींचा आपल्याकडे तुटवडा आहे व शेतकी पैदास विपुल व विविध असली तरी लोकसंख्येचे मानाने ती अपुरीच आहे. एकंदर पैदाशीच्या मानाने पोसावयाची माणसे कमी किंवा जास्त यावर गरिबी अगर श्रीमंती बऱ्याच अंशी अवलंबून असते असे मी समजतो. लोकसंख्येच्या मानाने आपल्या देशातील निसर्गदत्त संपत्ती व पैदास ही इतकी कमी आहेत की, संपत्तीची विभागणी अगदी समसमान झाली तरी आपण सर्वजण अत्यंत गरीबच राहू. एवढेच नव्हे, तर आर्थिक विषमता घालविल्यावरही पैदास

वाढविण्याचे मार्गात—उदाहरणार्थ, रशियासारख्या समाईक शेतीच्या पद्धतीचा प्रसार करण्याचे मार्गात —मोठी लोकसंख्या ही एक अडचणच आहे, असे मला वाटते. आणि म्हणून संपत्ती निर्माण करण्याची पद्धती अगर शासनपद्धती कशीही असली तरी तिला या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालावयाचे नाही.

"हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची स्थिती ज्या निरनिराळ्या गोष्टींवर अवलंबून असते त्यांतील मुख्य म्हणजे पाऊस-पाणी, पिकांचे भाव व सरकारी सारा वसूल करण्याच्या पद्धती व मर्यादा या होत." हे माझे वाक्य रा. अभ्यासकांस विकृत दृष्टीचा एक अजब मासला वाटतो. पण मी उल्लेखिलेल्या गोष्टी गौण कशा हे मला अजूनही कळले नाही. अनावृष्टी, अतिवृष्टी, पूर वगैरेमुळे दुष्काळ पडल्यास तो रशियातही जाणवतोच. आर्थिक विषमता नाहीशी झाल्यावरही पाऊस-पाण्याचे महत्त्व कायम राहणारच पिकाच्या भावाचे महत्त्व रा. अभ्यासक कबूल करीत नाहीत. जोपर्यंत आजची व्यापारपद्धती चालू आहे, तोपर्यंत पिकांचे भावास अतोनात महत्त्व राहणारच, जागतिक मंदी सर्वत्र असताना तरी बाजारभावाचे महत्त्व कोणास पटवून देण्यास विशेष खटपट करण्याचे कारण नाही. आणि धारण वर-खाली झाल्यामुळे काही मोठी आर्थिक स्थित्यंतरे कशी घडून आली आहेत हे इतिहासज्ञांस सांगावयास नको. १८७५ सालचे आपल्याकडील दंगे अगर आजच्या निरनिराळ्या ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या बंडाळ्या यांचे बुडाशी बाजारभावच आहे. आता क्रय-विक्रय करण्याची पद्धतीच बदलली तर बाजारभावाचे महत्त्व आपणांस कदाचित कमी करिता येईल म्हणून आज बाजारभावास महत्त्वच नाही असे प्रतिपादणे सयुक्तिक होणार नाही. सरकारी सारा हिंदुस्थानात फार जबर असल्यामुळे सारापद्धतीचे स्वरूप हेही फार महत्त्वाचे आहे. अव्वल इंग्रजीपासून आजपर्यंतचा इतिहास पदोपदी सारापद्धतीचे महत्त्व किती आहे हे दर्शवितो. हे सर्व सोडून रा. अभ्यासक जमीनदारी पद्धती हीच शेतकऱ्याच्या दारिद्र्याच्या बुडाशी आहे असे मानतात. म्हणजे त्यांचे मते जेथे जमीनदार नाहीत तेथील सर्व शेतकरी पूर्णपणे सुखी असे समजावयाचे की काय? खरी गोष्ट अशी, की जमीनदारी पद्धती हिंदुस्थानातील बऱ्याच मोठ्या भागात प्रचलित नाही. जेथे प्रचलित आहे तेथे या पद्धतीचे आजचे स्वरूप ब्रिटिश आमदानीतील सरकारी सारा-वसुलीच्या त्या त्या प्रांतांतील पद्धतीनेच बनले गेले आहे. आणि संयुक्त प्रांतासारख्या ठिकाणी आजही जमीनमहसूल पद्धतीत फरक पाडून जमीनदाराचे हक्क नियंत्रित करण्याचा प्रयत्न चालू आहे. याचे उलट मी उल्लेखिलेल्या गोष्टी मूलभूत व सर्वव्यापी अशा आहेत; आणि म्हणूनच रा. अभ्यासक यांचा या बाबतीतला अभिप्राय मला ग्राह्य वाटत नाही.

आता भांडवलशाही समाजपद्धतीबद्दल म्हटले तर रशियाखेरीज इतर सर्व देशांतच ती प्रचलित आहे. असे असून सर्व युरोपीय राष्ट्रे आपणांपेक्षा इतकी अधिक संपन्न का? संपत्तीची विषम विभागणी याबद्दल भांडवलशाही पूर्णपणे जबाबदार आहे. पण उत्पादन-साधनांचा भांडवलशाहीत उपयोग करून घेतला जात नाही असे म्हणता यावयाचे नाही. किंबहुना उत्पादन शक्य तितके वाढविताना कोणताही अडथळा आपणांस होऊ नये म्हणूनच भांडवलशाही अर्थशास्त्रज्ञांनी Laissez-faire चे तत्त्व प्रस्थापित केले असाच त्यांजवर आजपर्यंत ठपका ठेवण्यात आलेला आहे. शेतकऱ्यास जोडधंदा बघून द्यावा हे माझे म्हणणे रा. अभ्यासक यांस हास्यास्पद वाटते. ते का कोण जाणे? अथवा त्यांस आपल्या शेतकऱ्याच्या वाट्यास जमीन इतकी थोडी येते की ती पुरती कसावयास साधारणपणे सहा महिने पुरतात व इतर सहा महिने त्यास जवळजवळ निरुद्योगी राहावे लागते ही गोष्ट माहित नसावी. ज्या ज्या विभागांतून शेतकऱ्यास मजुरी करण्यास काही महिने बाहेर जावे लागते, तेथे तेथे लोकसंख्येची दाटी विशेष असते ही गोष्ट महशूर आहे. सरासरी काढल्यास प्रत्येक शेतकऱ्यामागे आपल्याकडे इतर देशांच्या मानाने पीकच फार थोडे निघते. अर्थात या थोड्यातूनही सारा, व्याज व खंड या रूपाने बराच भाग

जास्त जाऊन शेतकऱ्यास फारच थोडे उरते हे खरे. पण दारिद्र्याचे मूळ कारण विभागणीची पद्धती नाही. विषम विभागणीमुळे हे दारिद्र्य आणखीच वाढते हे मात्र खरे. आणि जोडधंदा बघून द्यावा असे म्हणण्यात भांडवलशाहीचा पुरस्कार केल्यासारखे होते असेही नाही, किंबहुना समाजसत्तावादी सरकारासही आपल्या खेडेगावातील फाजील लोकसंख्येस उद्योगधंदा लावून देणे हे काम प्रथम करावे लागेल. मतभेदाचे प्रकार आणखी अनेक आहेत पण मूळ फरक दाखविण्याकरिता एवढे विवेचन पुरे आहे.

परीक्षणलेखक इतिहासाभ्यासकांच्या एका विशिष्ट पंथाचे अनुयायी दिसतात, गरिबांच्या स्थितीबद्दल ते एकच कळकळ वाहतात, इतरांच्या मनासही न शिवणारे प्रश्न त्यांच्या दृष्टीसमोर सतत उभे आहेत. तरी ते आपल्या दृष्टिकोनाच्या ओलाव्याचा, प्रगल्भ व चिकित्सक बुद्धीचा मराठी वाचकांस फायदा करून देतील काय? आपल्या लेखद्वारा आर्थिक इतिहासाच्या घडामोडींवर त्यांनी नवीन प्रकाश पाडल्यास आम्हां सर्वांवर त्यांचे बहुत उपकार होतील. साप साप म्हणून भुई निरर्थक धोपटण्याऐवजी या जास्त फलदायी कार्याकडे त्यांनी वळावे, अशी त्यांस माझी नम्र विनंती आहे.

*प्रतिभा* २ : ७ मार्च १९३४ पृ० १५–१८.

☆

# ३ . . स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता ?

ज्ञानकोशातील अर्थशास्त्रावरील निबंधात हिंदी अर्थशास्त्र हे एक पोटकलम घातले आहे![1] या पोटकलमात प्रथम हिंदी अर्थशास्त्र स्वतंत्र असण्याची जरुरी दाखवून नंतर आपल्या समाजरचनेचा, आपल्या सांस्कृतिक परंपरेचा व हल्लीच्या आपल्या राजकीय स्थितीचा आपल्या आर्थिक रचनेवर काय परिणाम होतो याचा विचार केला आहे. स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची बिलकूल जरुरी नाही, किंबहुना असे स्वतंत्र अर्थशास्त्र आहे असे दर्शविण्याचा प्रयत्न करणेच अर्थशास्त्रविषयक चुकीच्या कल्पना पसरविण्यास कारण होईल असे आमचे मत आहे. नवीन हिंदी अर्थशास्त्र जन्मास आले की हिंदुस्थानची आर्थिक उन्नती लवकरच होणार, हा समजही आम्हांस चुकीचा वाटतो. ज्ञानकोशकार हे नवीन शास्त्र निर्माण करण्यास मुख्य कारण काय देतात तर हिंदी समाजाची घटना इंग्रजी समाजाच्या घटनेहून भिन्न आहे. "पाश्चात्य विद्वानांनी ठरविलेले सिद्धांत आयते उचलून ते तंतोतंत इकडे लागू करून हिंदुस्थानची आर्थिक उन्नती करण्याच्या प्रयत्नास यश येणे तर शक्यच नाही", हे खरे; व अलीकडचा कोणी अर्थशास्त्रज्ञ आपले सिद्धांत चोहोकडे 'तंतोतंत' लागू पडतात असे म्हणण्याइतका वेडगळ नाही. पण ते चोहोकडे सारखे लागू पडत नसले म्हणून प्रत्येक राष्ट्राचे एक निराळे अर्थशास्त्र निर्माण करावे असेही कोणी प्रतिपादन करीत नाही. खुद्द लिस्टसुद्धा राष्ट्रीय दृष्ट्या आर्थिक उन्नतीचा प्रयत्न करीत असता हरएक राष्ट्राची परिस्थिती निरनिराळी असते याचा विचार करावा एवढेच म्हणत होता. शिवाय लिस्टच्या वेळेस अर्थशास्त्राचे सिद्धांत फार अपूर्ण होते व अर्थशास्त्राचा एकंदर ओघ केवळ तात्त्विक होता हे लक्षात ठेवले पाहिजे.

## हिंदी समाजाच्या वैशिष्ट्यांचे मर्यादित महत्त्व

या हिंदी अर्थशास्त्राला ज्ञानकोशकार अर्थशास्त्राचे व्यावहारिक अंग असे एके ठिकाणी म्हणतात, आणि शिवाय "हिंदी अर्थशास्त्र तयार करण्याकरिता प्रथम हिंदी समाजाची, त्याच्या बौद्धिक परंपरेची, सांस्कृतिक इतिहासाची, वाङ्मयाची, तसेच प्रस्तुतच्या परिस्थितीची लेखकास चांगली माहिती पाहिजे", असे त्यांचे मत आहे. आर्थिक प्रश्नांचा व्यावहारिक दृष्ट्या विचार करताना आपली सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक इत्यादी परिस्थिती युरोपीय देशांहून भिन्न आहे हे समजून पुढे पाऊल टाकावे असा केवळ इशारा देऊन जर ते राहते तर आमचे काहीच म्हणणे नव्हते. पण त्यांच्या निबंधात हरकत घेण्यास मुख्य जागा म्हणजे आपल्या सामाजिक रचनेला, आपल्या कलियुगाच्या कल्पना इत्यादी गोष्टींना, आर्थिक प्रगतीला वळण लावण्यात त्यांनी फाजील महत्त्व दिले आहे व पर्यायाने का

१. केतकर, श्री. व्यं. (संपादक), महाराष्ट्रीय ज्ञानकोश, (पुणे १९२४), विभाग ७, पृ० ४६३–४७३.

होईना, हिंदी आर्थिक घटना म्हणजे काही विशेष प्रकारच्या आहेत असे सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याकडे राष्ट्रीय भावनेच्या भलत्याच ओघामुळे 'आपणांत इतर देशांपेक्षा सर्व बाबतींत काही और आहे' असे भासविण्याची प्रवृत्ती झाली आहे. अर्थशास्त्रात या प्रवृत्तीचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रो. राधाकमल मुकर्जी यांची लिखाणे होत. असल्या अंध राष्ट्रभक्तांच्या मालिकेत ज्ञानकोशकारांना गोवणे शक्य नाही हे आम्ही समजून आहो; पण 'हिंदी अर्थशास्त्र निर्माण करण्याची वेळ आली आहे' अशा प्रकारच्या शब्दप्रयोगामुळे या प्रवृत्तीस आणखी उत्तेजन मिळण्याचा संभव आहे. आपल्या सामाजिक परिस्थितीत व युरोपीय परिस्थितीत फरक बराच आहे हे खरे, पण हा फरक आर्थिक बाबीत फारसा महत्त्वाचा नाही. आर्थिक प्रगती अथवा आर्थिक स्थित्यंतरे केवळ भौगोलिक अथवा नैसर्गिक कारणांवरच अवलंबून नसतात. पण आजच्या आपल्या परिस्थितीत आपल्या सामाजिक रचनेमुळे उत्पन्न झालेले अडथळे फारसे महत्त्वाचे नाहीत, त्यांनी अर्थशास्त्रीय सिद्धांतांनुसार होणाऱ्या क्रियेतील घर्षण फार तर थोडेसे वाढेल इतकेच, असे आमचे म्हणणे आहे. ही विधाने सिद्ध करण्याकरिता ज्ञानकोशकारांनी नमूद केलेल्या एकदोन मुद्द्यांचा थोडासा तपशीलवार विचार करू.

ज्ञानकोशकार जातिभेदांच्या अनिष्ट परिणामांवर विशेष जोर देतात. सुरुवातीसच जातिभेदांमुळे आर्थिक प्रगतीस थोडेसे अडथळे येतात हे आम्ही कबूल करतो. यांपैकी मुख्य अडथळा म्हणजे आपल्या समाजात कलांचे अथवा शास्त्रांचे ज्ञान जितके लवकर पसरावे तितके पसरत नाही, यामुळे ज्ञानाची वाढ खुंटते व आर्थिक प्रगतीचा वेग कमी होतो. डॉ. व्होएलकेर यांनी आपल्या हिंदुस्थानातील शेतकीच्या सुधारणेवरील रिपोर्टात नमूद केले आहे की, हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतून व जिल्ह्यांतून शेतकीच्या चांगुलपणाचे मान फार भिन्न आहे. इतकेच नव्हे तर एकाच खेड्यात निरनिराळ्या जाती निरनिराळ्या पद्धतीने शेते वाहताना आढळून येतात. काही जाती बऱ्याच सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब करितात, पण इतर जाती सुधारणांचा काहीच उपयोग करून घेत नाहीत. जातिभेद नसते व सर्व जातींतून रोटीबेटीव्यवहार सुरू असता तर इतका फरक सापडणे शक्य नव्हते, व आपले एकंदर शेतीचे मान बरेच वाढते हे उघड आहे. आपल्या समाजघटनेमुळे सर्व समाजाच्या राहणीस सामान्य स्वरूप येऊ शकत नाही हे ज्ञानकोशकारांचे म्हणणेही खरे आहे. इतकेच की, हल्लीचा एकंदर कल सामान्य स्वरूप येण्याकडे आहे व जातिभेदाचा या बाबतीतला परिणाम बराच कमी होत चालला आहे. पण ही जी दोन उदाहरणे दिली ती एवढेच दर्शवितात की जातिभेदामुळे आर्थिक घर्षण वाढते, व अर्थशास्त्रीय सिद्धांतांनुसार होणाऱ्या क्रिया इतर समाजांत जितक्या लवकर घडून येतात तितक्या लवकर त्या हिंदुस्थानात घडून येत नाहीत. याहून अधिक आर्थिक रचनेवर जातिभेदाचा काही परिणाम होत नाही.

## जातिभेदाने मागणीस मर्यादा ?

'पदार्थांची निपज करताना श्रमविभागाच्या तत्त्वानुसार जरूर असणारे सहकार्य निरनिराळ्या जातींत होऊ शकत नाही' हे ज्ञानकोशकारांचे विधान चुकीचे दिसते. या मुद्द्याचा विचार करताना दोन गोष्टी नेहमी लक्षात धरल्या पाहिजेत. एक तर जातिभेद व राष्ट्रभेद यांचा घोटाळा होऊ देऊ नये व दुसरी, कोणत्याही वस्तूची मोठ्या प्रमाणावर निपज होणे हे लोकांच्या सांपत्तिक स्थितीवर व त्या वस्तूकरता असलेल्या मागणीवर अवलंबून असते. आपले विधान सिद्ध करण्याकरिता ज्ञानकोशकार दोन उदाहरणे देतात. एक शिंप्याच्या धंद्याचे व दुसरे खाणावळीच्या धंद्याचे. यांत गुजराथी व दक्षिणी लोकांच्या पोषाखांतील फरकामुळे तोटा होतो असे त्यांचे म्हणणे आहे. दक्षिणी व गुजराथी यांच्या

पेहरावांतील फरकामुळे शिंप्यांच्या धंद्यातील श्रमविभागास खरीच अडचण होते काय ही गोष्ट अलाहिदा आहे. येथे मुळातच राष्ट्रभेद व जातिभेद यात घोटाळा दृष्टीस पडतो. दक्षिणी व गुजराथी हे फरक जातिभेदामुळे उत्पन्न झालेले खात्रीने नव्हेत. हिंदुस्थान हे इंग्लंडसारखे एक राष्ट्र नाही. दहाबारा राष्ट्रांचे कडबोळे आहे. त्यांची भाषा निराळी, परंपरा निराळी, त्यांचे पोषाखही निराळे. पण यात जातिभेदाचा प्रश्न कोठून आला ? जर जातिभेदामुळे श्रमविभागास कोठे अडथळा येत असेल तर पागोटी बांधण्याच्या धंद्यात. पगड्यांशिवाय बाकी साधारण गुजराथ्यांचा पोषाख एकच असतो. तीच गोष्ट खाणावळीची. मुंबईत गुजराथी व दक्षिणी खाणावळी निराळ्या खऱ्या, पण एखादी दक्षिणी खाणावळ पाहिली असता तीत साधारण एका आर्थिक पायरीवरचे पण सर्व जातीचे असे महाराष्ट्रीय सापडतील. बरे, या पोषाखांच्या व खाद्यपेयांच्या धंद्यांत मोठ्या प्रमाणावर निपज कितपत शक्य आहे ? प्रथमच ही गोष्ट कळून येईल की, या धंद्यांत वैयक्तिक आवडीनिवडीचा प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळे एकाच प्रकारची अशी सार्वजनिक मागणी सहसा असत नाही. पाश्चिमात्य देशांत सुद्धा या धंद्यांतून मोठ्या प्रमाणावर निपज अगदी अलीकडे होऊ लागली आहे. इंग्लंडात हल्ली सुद्धा आयते तयार केलेले सूट चांगल्या स्थितीतले लोक सहसा घेत नाहीत. आता दुसऱ्या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहा. आयते तयार केलेले कुडते वगैरे तयार न होणे हा आपल्या बहुजनसमाजाच्या राहणीचा दोष आहे. साधारण शेतकरी व मजूर वर्गास धोतर, उपरणे अगर मुंडासे याकरिता लागणाऱ्या कापडाची निपज मोठ्या प्रमाणावर होते, व त्यात जातिभेदाचा कोठे अडथळा येत नाही. मध्यम वर्गास लागणारा कपडा व धोतरे यांच्या उत्पादनातही जातिभेदामुळे काही अडथळा येत नाही. खाद्यपेयांच्या धंद्याचीही स्थिती तीच आहे. आपल्याकडे टिन्ड किंवा कॅन्ड पदार्थांचा खप नाही याचेही खापर ज्ञानकोशकार जातिभेदांच्याच माथी फोडणार की काय कोण जाणे ! बिस्किटे वगैरेंनाही मागणी आपल्याकडे फार कमी, मग श्रमविभागाचे तत्त्व चालण्यास वाव असणार कोठे व जातिभेद आडवा येणार कोठून ? जेथे मोठ्या प्रमाणावर निपज शक्य आहे, तेथे जसजशी मागणी वाढते तसतशी निपज मोठ्या प्रमाणावर होतेही. पिठाच्या व तांदळाच्या गिरण्या हेच दर्शवितात. तसेच अलिकडे गुलकंद, गरम मसाला वगैरे जिनसांनाही सार्वत्रिक मागणी उत्पन्न झाली असून त्यांची निपजही मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. या जिनसांकरिता मागणी केवळ सांपत्तिक स्थितीवरूनच ठरत नाही, तर घरातील बायकांस वेळ व इतर सोय कितपत आहे यांवरही ते अंशतः अवलंबून असते. खेड्यापाड्यांतून बायकांना निवडणे, पाखडणे, कांडणे, कुटणे, इत्यादी करण्यास वेळ व तशीच जागेची सोयही असते; पण तेच मुंबईत अशक्य. म्हणून मुंबईत आयत्या तयार केलेल्या जिनसांना मागणी फार. हा मुख्यत्वे नागर व अनागर राहणीतला फरक आहे. आमचा मुद्दा एवढाच की जातिभेदामुळे येथे काही अडथळा येत नाही. (या बाबीत एवढे मात्र कबूल केले पाहिजे की जातिभेदामुळे जरी नव्हे तरी खाण्यापिण्याच्या निरनिराळ्या बंधनांमुळे हिंदुसमाजाचा आर्थिक बराच तोटा होतो.)

आता चामड्याच्या धंद्याचे आणखी एक उदाहरण ज्ञानकोशकार देतात ते वरवर पाहिले असता बरेच महत्त्वाचे वाटते. जुन्या पद्धतीने चालणाऱ्या खेडवळ धंद्यात बहुधा काही ठराविक जातीचेच लोक आढळतात हे खरे. पण या धंद्यात सुद्धा नवीन शास्त्रीय पद्धती सुरू करण्यास व मोठे कारखाने काढण्यास जातिभेदाने काहीच अडथळा आणलेला नाही. मद्रास इलाख्यात तर चामड्याच्या धंद्यात इतर जाती पुष्कळ आढळतात.[1] कातडी कमावणाऱ्या मोठ्या कारखान्यांतून कामगार वर्ग सगळा चांभार जातीचा खात्रीने नसतो. शिवाय चांभाराचा धंदा घाणेरडा म्हणूनही बऱ्याच जणांस तो पतकरावासा

१. चॅटरटन (मद्रास), गुथ्री व मार्टिन (मुंबई) यांचे चामड्याच्या धंद्यावरील रिपोर्ट पाहा.

वाटत नाही. हिंदूंच्या अहिंसेबद्दलच्या काही समजुती व चामड्याचा विटाळ या गोष्टी त्या धंद्याची स्थिती खालावण्यास अंशतः कारणीभूत असतील. पण जातिभेदाचा येथेही बराच परिणाम आहे असे वाटत नाही. हल्लीचा मुख्य प्रश्न प्रगतीचा, व तीत तर जातिभेद आडवा येण्याचे काहीच कारण दिसत नाही.

## जातिभेद श्रमविभागणीस अडसर ?

जातिभेदाचा अनिष्ट परिणाम असा एक दाखविता येईल की, त्याच्यामुळे एकच धंदा वंशपरंपरा चालतो. पण बहुतेक सर्व देशांत जेथे जातिभेद नाहीत तेथेसुद्धा बापाचा धंदा लेकाने पुढे चालविण्याचा प्रघात फार. आपल्याकडेही आपल्या जातीच्या परंपरागत धंद्यावर उपजीविका नीट चालू शकत नाही असे आढळून आल्यास लोक दुसरे धंदे चटकन पतकरतात. खानेसुमारीच्या बऱ्याच रिपोर्टांत जाती व धंदे यांचे आकडे दिले आहेत त्यांपासून फार बोध होण्यासारखा आहे. या आकड्यांसंबंधी विचार केला असता काही गोष्टी उघड दिसतात. एकतर सुमारे पन्नास-पाउणशे वर्षांपूर्वी जरी जात व धंदा ही स्थूलमानाने एकच असली तरी आज तशी स्थिती नाही. आपल्या जातीचा धंदा सोडणे हल्ली बऱ्याच जणांना प्राप्त झाले आहे. आपल्या जातीचा धंदा सोडल्यानंतर साधारण बरी स्थिती असल्यास मनुष्य शेतकी करू लागतो, नाहीतर त्यास मोलमजुरी करावी लागते. इतर धंदे तो सहसा करीत नाही. पण याचे कारण जातिभेद नसून आपल्या सर्व जुन्या धंद्यांची निकृष्ट स्थिती हे होय. सुतार, लोहार, चांभार, वगैरेंच्या जुन्या पद्धतीच्या सर्व धंद्यांस उतरती कळा लागली आहे. पण जेथे कोणताही धंदा किफायतशीर वाटतो तेथे इतर जातीचे लोकही त्या धंद्यात प्रवेश करतात. काही प्रांतांतून कोष्ट्यांचा व काही प्रांतांतून शिंप्यांचा धंदा फायदेशीर होता तेव्हा त्या धंद्यात इतर जातीचेही लोक सापडत असत. तसेच अलिकडे शहरातून फर्निचर वगैरे जिनसांना बरीच मागणी असल्यामुळे सुतारकामात मिळकत बरीच होऊ लागली आहे, त्यामुळे नागर सुतारवर्गात हल्ली इतर जातींचा भरणा बराच आहे. जुन्या पद्धतीने काम करणाऱ्या व निकृष्ट स्थितीत असलेल्या खेडवळ धंद्यांत इतर जाती शिरतील कशाला ? पण जेव्हा कांही सुधारणेमुळे धंद्यास ऊर्जितावस्था येते तेव्हा जातिभेदास न जुमानता इतर जातींचे लोक देखील त्या धंद्यात आपला शिरकाव करून घेतात.[1] जाती व धंदे यांचे आकडे मिळविण्यास त्रास पडतो व ते असावे तितके खात्रीलायक मिळत नाहीत म्हणून अलीकडील खानेसुमारीच्या रिपोर्टांत ते सापडत नाहीत. पण या दोन आकड्यांतील तफावत फार मोठी आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. इतकेच नव्हे तर ही तफावत सारखी वाढत चालली आहे.[2] कोणत्याही जातीतले लोक आपल्या जातीचा धंदा सोडून इतर धंदे लवकर पाहतात यावरून जातिभेदाची बंधने आर्थिक बाबतीत फार सैल झाली आहेत हे सिद्ध होते.

ज्ञानकोशकार आणखी दोन विधाने करतात. पहिले विधान हे आहे : "याप्रमाणे एकाच समाजात भिन्नभिन्न वर्ग व त्यांच्या भिन्नभिन्न गरजा यांमुळे समाजात आर्थिक उन्नती होण्याच्या मार्गात भयंकर अडचणी येतात." आमच्या सर्वसाधारण गरजांच्या बाबतीत जातिभेदामुळे भिन्नत्व कोठे उत्पन्न होते हे आम्हांस काहीच कळत नाही. पोषाख व खाण्यापिण्याचे पदार्थ या दोहोतच जातिभेदामुळे मागणीत फरक होतो असे दाखविण्याचा ज्ञानकोशकारांनी प्रयत्न केला आहे. या दोन्ही धंद्यांच्या स्थितीचे सविस्तर विवेचन आम्ही वर केलेच आहे. बाकी सर्व महत्त्वाच्या बाबतींत जातिभेदामुळे मागणीत काहीच

१. याविषयी विशेष माहिती निरनिराळ्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत मिळेल.

२. १८९१ सालच्या पंजाब व मद्रास यांच्या खानेसुमारीचे रिपोर्टांत आकडे पाहा.

कारांनासुद्धा कबूल करावे लागेल. आपल्या घरांची बांधणी, ती बांधण्यास
गोष्टी आपल्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून असतात, आपल्या जातीवर
म्हणून तो काही कुणब्याहून निराळ्या शेतकी आउतांची मागणी करीत
रॉकेल वापरते म्हणून दुसऱ्या जातीने गोड्या तेलाची मागणी केल्याचे
णतीही महत्त्वाची बाब घ्या, सर्व जातींची मागणी साधारणपणे सारखीच.
आपल्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून आहे. बारीकसारीक फरक
ल्लक बाबतीत. आता पगड्यांची धाटणी जातीजातींची निराळी; अथवा
गरम मसाला फार वापरतात, पण सारस्वतांत मात्र ओल्या खोबऱ्याची
तिभेदामुळे आमची 'आर्थिक उन्नती होण्याचे मार्गात भयंकर अडचणी
त म्हणावयाचे असल्यास हरकत नाही. हे जरा अतिशयोक्तीचे विधान
म्ही त्यांस करतो. ज्ञानकोशकारांचे दुसरे विधान म्हणजे "पदार्थांची
ी व प्रत्येक धंद्यात कामाची वाटणी होऊन प्रत्येक अंगात प्रावीण्य संपादन
फूट पडून विस्कळित झालेल्या हिंदू समाजात मुळीच संभवत नाहीत".
आहे' असे त्यांस वाटते की तिच्या समर्थनार्थ ते काहीच पुरावा देऊ
निपज मोठ्या प्रमाणावर केव्हा होऊ शकते याचा थोडासा विचार
कोणत्याही कामाची वाटणी करण्यास जातिभेदामुळे काय अडथळा येतो!
यंत्रांचे साधन नव्हते तेव्हा कोणत्याही धंद्यात श्रमविभाग फारसा होणे
ळची यांत्रिक सुधारणा लक्षात घेता शक्य तितका श्रमविभाग होत असे.
नवीन यांत्रिक सुधारणांचा जेव्हा प्रवेश झाला तेव्हा कामाची वाटणीही
गेली.[1] कोणत्याही धंद्यात प्रावीण्य मिळविणे जातिभेदामुळे कसे अशक्य
न यंत्राचा अथवा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करीत नाहीत याचे कारण
शिक्षणाच्या अभावाचा परिणाम आहे. वंशपरंपरा सारखा एकच धंदा
रचे प्रावीण्य मिळविण्यास जातिभेदाचा थोडासा उपयोग होतो असे
दुसमाज सामाजिक दृष्ट्या विस्कळित असेल, पण तो आर्थिक दृष्ट्या

## चर्णीबाबत अपसमज

या आर्थिक आपत्तींची परंपरा ओढवली आहे असे ज्ञानकोशकारांच्या
काही जातिभेदावर लादले जाते. हिंदुस्थानात मोठा व्यापार नाही हाही
ज्ञानकोशकार कसे सिद्ध करतात ते पाहा: 'बुद्धी, शारीरिक श्रम व
णे मोठ्या व्यापारास आवश्यक' हा अर्थशास्त्राचा सर्वमान्य सिद्धांत
आपल्याकडे महाराष्ट्रीय ब्राह्मणाजवळ बुद्धी, मारवाड्याजवळ भांडवल
असते. या तीन निरनिराळ्या जाती झाल्या. त्यांचा एकमेकांशी संबंध
ा व मोठा व्यापार होणार कसा! या अर्थशास्त्रास काय म्हणावे!
र करू. मजूर लोक हे काम कशाकरिता करतात? तर केवळ मजुरी

(मुंबई) यांचे जर व कलाबतू या धंद्यावरील मोनोग्राफ पाहा. तसेच डाम्पियर
पितळ व तांब्याच्या भांड्यांच्या धंद्यावरील मोनोग्राफ पाहा.

मिळविण्याकरिता. ज्याप्रमाणे मजुरी मिळेल त्याप्रमाणे त्यांचे काम होईल, व जेथे मजुरी जास्त मिळेल तेथे जाण्याचा मजूरवर्गाचा कल राहील. (अर्थात मजूरवर्गाची चलनशक्ती पूर्ण आहे असे येथे गृहीत धरले आहे. प्रत्येक लहानशा अडथळ्याचा विचार केला असता विवेचन फारच लांबेल.) पण कुणबी मजूर दोन पैसे कमी घेऊन कारखानदाराकडे काम करील असे ज्ञानकोशकारांस वाटते काय? आमच्या समाजात महार व ब्राह्मण यांचा संबंध एकमेकांशी फार कमी येतो. पण पगार नीट मिळाल्यास ब्राह्मणाच्या दुकानात चाकरी करण्यास महारांची काहीच हरकत नसते. मारवाड्यांचे उदाहरण युरोपातील यहुद्यांप्रमाणेच आहे. यहुद्यांच्यामुळे युरोपातील आर्थिक रचनेवर जेवढा परिणाम होतो तेवढा आमच्याकडे मारवाड्यांच्यामुळे होईल. पण मारवाड्यांच्या हातांतच काही हिंदुस्थानातला सर्व पैसा नाही. बंगालचे उदाहरण घ्या. बंगाली कायस्थ, ब्राह्मण वगैरे उच्च जातींचेच बंगालचे मोठमोठे सधन जमीनदार आहेत, व त्या जातींतच बंगालचा बुद्धिमान सुशिक्षित वर्ग आहे. मग येथे बुद्धी व भांडवल यांची सांगड होण्यास ज्ञानकोशकारांच्या मते काहीच अडचण नसावी. तरीपण बंगालात एतद्देशीय लोकांनी चालविलेले धंदे फार कमी आहेत, आणि जे काही आहेत ते गेल्या दहा-पंधरा वर्षांतच निघालेले. निरनिराळ्या अर्थशास्त्रीय कल्पनांचा घोटाळा पुन्हा खालील विधानात दृष्टीस पडतो : "आमच्या गुजराथी बनिया व मारवाडी समाजांपैकी परदेशात जाऊन उच्च शिक्षण मिळविणारे इसमच नाहीत. यामुळे बुद्धी व भांडवल यांचे सहकार्य दुरापास्त झाले आहे." जसे काही परदेशात जाऊन आल्याशिवाय भांडवलाचा उद्योगधंद्यांच्या वाढीकरता नीटसा उपयोगच करिता येत नाही. आता धंदे चालविण्यास अथवा सुरू करण्यास दोन प्रकारचे शिक्षण व बुद्धी यांची जरुरी आहे. मुख्य म्हणजे धंद्यामधील कार्ययोजकता. आपल्या उत्पाद्य वस्तूंच्या मागणीचा व पुरवठ्याचा विचार करणे, सर्व धंदा सुव्यवस्थित चालविणे, काटकसर कोठे करिता येईल याकडे सारखे लक्ष देणे, व थोडाबहुत धोका आहे असे समजूनही योग्य ठिकाणी भांडवल खर्ची घालण्याची तयारी असणे, वगैरेस लागणारी जी बुद्धी व जे शिक्षण धंदा सुरू करण्यास अथवा चालविण्यास आवश्यक आहे ते परदेशात जाऊन मिळत नाही. यात मुख्यतः हिंदुस्थानातील धंद्यांची घटना व त्यांच्या अडचणी यांचा अनुभवच लागतो. परदेशीय औद्योगिक घटना व अर्थशास्त्र यांच्या ज्ञानाने फायदा होईल. पण हे ज्ञान आवश्यक नाही. दुसऱ्या प्रकारचे शिक्षण म्हणजे त्या धंद्यांत लागणारे शास्त्रीय पद्धतीचे औद्योगिक शिक्षण होय. हे शिक्षण मिळवण्यास परदेशाचे जाणे हल्ली जरुरीचे आहे. पण असले शिक्षण युरोपात सुद्धा भांडवलवाले स्वतः घेत नाहीत. ते केवळ पगार देऊन त्या बाबतींतले तज्ज्ञ नोकरीस ठेवितात. आणि तसे तज्ज्ञ मारवाडी अगर गुजराती बनिया, फायदा होईल असे वाटल्यास आजही नोकरीस ठेवतात. खरे पाहिल्यास मारवाडी व गुजराती बनिया या जातींनी आपल्या भांडवलाचा उद्योगधंद्यांची वाढ करण्याकडे जितका चांगला उपयोग केला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही जातींनी केला असता की नाही याबद्दल शंकाच आहे. आपल्या उद्योगधंद्यांच्या वाढीचा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा आहे. अशिक्षित मजूरवर्ग, थोडे भांडवल व या भांडवलाकरिता शेतकी, व्यापार, उद्योगधंदे यांची चढाओढ, कोळसा, लोखंड वगैरे खनिज संपत्तीची वाण, अशा निरनिराळ्या मोठमोठ्या अडथळ्यांमुळे आपली औद्योगिक वाढ आज खुंटली आहे. जातिभेदाचा यावर परिणाम अत्यंत थोडा होतो, आणि जातिभेद जरी आज नसते तरी या वाढीचा वेग जास्त झाला असता की नाही याची वानवाच आहे. जातिभेदाच्या प्रश्नाचा आम्ही जरा विस्तृत विचार केला. कारण की, ज्ञानकोशकार आपल्या विवेचनात याला बरेच महत्त्वाचे स्थान देतात. ज्ञानकोशकारांनी नमूद केलेल्या प्रत्येक मुद्द्याचा निरनिराळा विचार आम्ही विस्तारभयास्तव येथे करीत नाही.

## हिंदी अर्थशास्त्र स्वतंत्र नाही

आमची सामाजिक रचना भिन्न म्हणून आमची आर्थिक रचनाही निराळी असली पाहिजे अशी ज्ञानकोशकारांची विचारपरंपरा दिसते. पण हे खरे नाही. आमच्या आर्थिक रचनेसारखी रचना गेल्या शतकात इतर बऱ्याच देशांची होती व आजही कित्येक देशांची आहे. बरे, हल्ली जे फेरबदल जगात होत आहेत त्यांच्या हिंदुस्थानावरील परिणामाकडे पाहा. आमच्या देशाच्या गेल्या शतकातील आर्थिक उत्क्रांतीकडे लक्ष दिले असता असे आढळून येईल की, या उत्क्रांतीची दिशा युरोपीय देशात १८ व्या व १९ व्या शतकांत झालेल्या उत्क्रांतीच्या दिशेप्रमाणेच आहे. आर्थिक बाबीत आर्थिक गरजांच्या दडपणामुळे सामाजिक रचनेचा तेव्हाच पाडाव होतो. आपल्याकडे अलुत्याबलुत्यांची पद्धत फार जुनी आहे. यात प्रत्येकाचे ठराविक वेतन असून त्याबद्दल त्यास ठरविक चाकरी करावी लागे. काही वर्षांपूर्वी आपल्याकडे गावच्या मेलेल्या गुरांच्या कातड्यावर चांभार अथवा धेड यांचा वंशपरंपरा हक्क चालत आला होता. पण सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हा कातड्यांच्या किमती जगभर फार वाढल्या व मेलेल्या गुरांच्या कातड्यांना चांगली किंमत येऊ लागली त्याबरोबर चांभार व धेड यांच्या पुरातन हक्कास गावकरी लोक जुमानीत नाहीसे झाले. आमच्या आर्थिक रचनेत विशेष असे काहीच नाही. आमची आर्थिक उत्क्रांती हळू होत आहे इतकेच. बाकी सर्व बाबतीत ती इतर देशांप्रमाणेच चालली आहे. आमच्या नागरधंद्यांच्या घटनेतील स्थित्यंतर, आमच्या मजूरवर्गाची जमिनीपासून फारकत, इत्यादी गोष्टींचा बारकाईने विचार केला असता या विधानाची खात्री पटेल.' या सर्व महत्त्वाच्या बाबतींत आपले इतर देशांशी पुरते साम्य आहे. मग स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता कोठून उरली ? हे अर्थशास्त्र निर्माण करण्या-करता ज्ञानकोशकार आणखी एक कारण देतात. ते म्हणतात, "आजपर्यंत शंभर-दीडशे वर्षांच्या ब्रिटिश अमदानीत पुष्कळ ब्रिटिश अर्थशास्त्र शिकलेल्या विद्वानांनी अर्थशास्त्रीय विषयांचे शिक्षण दिले, पण अद्याप हिंदुस्थानची आर्थिक स्थिती फारशी सुधारली नाही." आम्ही वर दाखविल्याप्रमाणे फार मोठे अडथळे वाटेत असता नुसत्या अर्थशास्त्राच्या शिक्षणाने आर्थिक उन्नती कशी होणार ? आणि विद्वानांनी आर्थिक स्थिती सुधारण्यास त्यांच्या हातात काहीतरी सत्ता पाहिजे, ती आमच्याकडील विद्वानांना कोठे होती ! शिवाय अजून अर्थशास्त्राची प्रगती फार व्हावयाची आहे. मार्शल यांच्या वेळेपावेतो इंग्रजी अर्थशास्त्राची व व्यवहाराची फारकत बरीच होती आणि गेल्या दोनतीन वर्षांतच एकॉनॉमिक बॅरोमीटर्स वगैरे तयार करण्याचा प्रयत्न होऊन उद्योगधंद्यांस प्रत्यक्ष उपयोगी असे वळण अर्थशास्त्रास लागत आहे. खुद्द इंग्लंडातील ही गोष्ट झाली. हिंदुस्थानातील अर्थशास्त्रीय शिक्षण इंग्लंडातील शिक्षणाच्या बरीच वर्षे मागे रेंगाळते ही गोष्ट प्रसिद्धच आहे. तेव्हा हिंदी अर्थशास्त्रज्ञांनी जर आर्थिक उन्नतीस मदत केली नाही तर तो अर्थशास्त्राच्या अपरिपक्वतेचा व आपल्याकडील शिक्षण-पद्धतीचा दोष आहे. याला उपाय म्हणजे हिंदुस्थानच्या आर्थिक इतिहासाचा तुलनात्मक दृष्टीने अभ्यास करणे, व्यावहारिक अर्थशास्त्राकडे जास्त लक्ष देणे व युरोपीय क्रमिक पुस्तकांतील ठराविक उदाहरणे न देता हिंदी परिस्थितीकडे लक्ष देऊन अर्थशास्त्रीय सिद्धांत शिकविणे हा होय. प्रत्येक देशातील परिस्थिती निराळी म्हणून प्रत्येक देशीय अर्थशास्त्र असणे शक्य नाही.

एकंदरीत आर्थिक बाबतीत ज्ञानकोशकार सामाजिक रचनेला भलतेच महत्त्व देतात असे आमचे मत आहे. त्यांनी हिंदी अर्थशास्त्राच्या विवेचनात जातिभेद, दैववाद यांवर पाने खर्च केली; पण जमीनमहसूल, उद्योगधंदे, नगरवाढ वगैरे आर्थिक दृष्ट्या ज्या खऱ्या महत्त्वाच्या गोष्टी त्यांचा बिलकुल विचार केला नाही. तसेच ज्ञानकोशकारांची अर्थशास्त्राच्या कक्षेबद्दल चुकीची कल्पना दिसते. सामाजिक

१. प्रस्तुत लेखकाचे नुकतेच प्रसिद्ध झालेले 'इंडस्ट्रियल एव्होल्यूशन ऑफ इंडिया' पाहा.

विषयावरील सर्व शास्त्रे एकमेकांशी संलग्न आहेत, व एकाचा विचार करताना इतरांचा थोडाबहुत विचार करावा लागतो, हे जरी खरे असले, तरी प्रत्येक शास्त्राची काहीतरी आखलेली मर्यादा असावी लागते; आणि या मर्यादेतील विषयांचाच त्या त्या शास्त्रात विचार करावयाचा असतो. या दृष्टीने समाजरचनेला अर्थशास्त्रात फार गौण महत्त्व आहे. शिवाय ज्ञानकोशकारांची अशी समजूत दिसते की अर्थशास्त्र म्हणजे एक ठराविक सिद्धांतांचा साठा. हे सिद्धांत यूरोपात तयार झाले व ते आपणांस लागू पडत नाहीत तेव्हा करा एक नवीन हिंदी अर्थशास्त्र निर्माण. पण खरी परिस्थिती अशी नाही. अर्थशास्त्राचे सिद्धांत व्यवहारात आणताना सर्व बाजूंनी प्रथम योग्य विचार केला पाहिजे, ही गोष्ट सर्वमान्य आहे. आणि अर्थशास्त्र एक सिद्धांतांचा गठ्ठा व हे सिद्धांत जिकडेतिकडे सारखे लागू पडतात असेही कोणी म्हणत नाही. यासंबंधी केंब्रिज येथे प्रसिद्ध झालेल्या अर्थशास्त्रीय विषयावरील एका मालेच्या प्रस्तावनेतून खालील उतारा देतो. या प्रस्तावनेत मि. केन्स म्हणतात, "अर्थशास्त्रीय उपपत्ती आपणांस ज्यावरून तात्काळ एखादे धोरण बसविता येईल असे निश्चित सिद्धांत काढून देत नाही. अर्थशास्त्रीय उपपत्ती हे एक तत्त्व नसून ती पद्धती आहे. ती एक विशिष्ट मानसिक रचना व विचारपद्धती असून तिच्यापासून एखाद्यास विशिष्ट गोष्टींपासून अचूक सिद्धांत काढण्यास मात्र मदत होते. आता धंदेवाईक अर्थशास्त्रज्ञांचे मुख्य कर्तव्य म्हणजे प्रस्तुत वस्तुस्थितीचे साकल्याने ज्ञान मिळविणे आणि त्यास अर्थशास्त्रीय तत्त्वे कुशलतेने लागू करणे, किंवा आपल्या पद्धतीची मूलतत्त्वे सुलभ, बिनचूक व उद्बोधक रीतीने प्रतिपादन करणे हेच राहिले आहे."

कोणत्याही बाजूने विचार केला असता स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र उत्पन्न करण्याची जरुरी बिलकूल नाही, इतकेच नव्हे तर अशा प्रकारच्या संज्ञेनेच फार चुकीच्या समजुती पसरण्याचा संभव आहे. उगीच अवांतर बऱ्याचशा गोष्टींचा विचार करून मुख्य अर्थशास्त्राची कक्षा विसरून चालावयाचे नाही. आणि हिंदी अर्थशास्त्र स्वतंत्र तयार करून आमच्या आर्थिक रचनेत काही विशेष आहे असा समज उत्पन्न करणेही योग्य नाही. व्यावहारिक दृष्टीने अर्थशास्त्राचा विचार करणे बरोबर आहे आणि हिंदुस्थानातील एकंदर परिस्थितीचा विचार करूनच नंतर अर्थशास्त्राचे सिद्धांत लागू करावे. पण यास हिंदी अर्थशास्त्र असे स्वतंत्र शास्त्र निर्माण करण्याची जरुरी नाही. समाजशास्त्र, मानसशास्त्र व अर्थशास्त्र यांची खिचडी अर्थशास्त्राच्या मर्यादेत नको. अशामुळे आधीच निकृष्ट स्थितीत असलेल्या हिंदुस्थानातील अर्थशास्त्राच्या शिक्षणास वाईट वळण लागण्याचा संभव आहे. असले विचार ज्ञानकोशकारांसारख्या अधिकारी गृहस्थांनी प्रदर्शित केले, त्यास विरोध करणे जरुरीचे वाटले म्हणून हा लेख लिहीत आहो.

*विद्यासेवक* १ : ३–४ नोव्हेंबर-डिसेंबर १९२४ पृ० ११–१७.

☆

# ४ . . 'हिंदी अर्थशास्त्र'

## [ग्रंथपरीक्षण]

'Indian Economics' या संज्ञेचे 'हिंदी अर्थशास्त्र' असे मराठी भाषांतर करण्याचा प्रघात आहे. एका दृष्टीने भाषांतर अगदी योग्य आहे. कारण मूळ इंग्रजी संज्ञेइतकीच दिशाभूल या भाषांतरानेही होते. Indian Economics चे निरनिराळे अर्थ होऊ शकतात व प्रस्तुत पुस्तकाचे लेखक एकंदर तीन अर्थ कल्पितात : (१) हिंदुस्थान-विषयक सर्व आर्थिक प्रश्नांचा एकत्र केलेला विचार, (२) हिंदी आर्थिक विचारांचा इतिहास आणि (३) हिंदी परिस्थितीस अनुरूप असे अर्थशास्त्र. तिसऱ्या अर्थातून हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिती इतर देशांपेक्षा इतकी भिन्न आहे की, आपणांस एका नवीनच शास्त्राची जरुरी आहे असा ध्वनी निघतो. पण हा अर्थ प्रो. जठार व बेरी यांस मान्य नाही. त्यांचे मते पहिला अर्थ तेवढा बरोबर आहे व ज्यांनी प्रमुखत्वेकरून इतर अर्थच या संज्ञेने ध्वनित होतात म्हणून तिजवर टीका केली, त्यांचा ग्रंथकर्त्यांनी उपहासही केला आहे. या बाबतीत आमचा ग्रंथकर्त्यांशी मतभेद आहे. कारण, जरी आज बरेचसे हिंदी अर्थशास्त्रज्ञ आर्थिक व्यवहाराचे नियम सर्व जगभर प्रायः सारखेच आहेत असे कबूल करितात, तरी Indian Economics या संज्ञेचा जो प्रथम उपयोग करण्यात आला तो आपल्या देशास लागू पडणारे अर्थशास्त्राचे सिद्धांतच इतर देशांपेक्षा काहीसे भिन्न आहेत अशाच समजुतीमुळे होय. न्यायमूर्ती रानड्यांचे मत हेच होते, आणि म्हणून खुद्द ग्रंथकर्तेच त्यांजवर टीका करितात. हिंदी अर्थशास्त्र या विषयाचे व पर्यायाने Indian Economics या संज्ञेच्या आक्षेपार्ह अर्थाचे जनकत्व रानड्यांकडेच आहे. Indian Economics म्हणा वा हिंदी अर्थशास्त्र म्हणा, याचा सरळ अर्थ असा दिशाभूल करणारा आहे, एवढाच काय तो टीकाकारांचा आक्षेप आहे. प्रो. जठार व बेरी यांस जो अर्थ मान्य आहे तो या संज्ञेतून कदाचित् काढता येईल, परंतु तिचा मूळचा व आजचाही प्रचलित अर्थ तो नव्हे हे खास. आता आता संज्ञा रूढ झाली, सर्वजण तिचा उपयोग करू लागले, युनिव्हर्सिट्यांनी तीस शिक्षणक्रमांत स्थान दिले, तेव्हा कशी का असेना, तिचाच उपयोग करून काम भागविणे प्राप्त आहे. पण एवढ्यावरून ज्यांनी टीका केली ते टीकाकार मूर्ख ठरत नाहीत.

### हिंदी अर्थशास्त्राचे स्वतंत्र स्थान

असो! हा केवळ शाब्दिक वाद झाला. नाव काही द्या, हिंदी आर्थिक प्रश्नांचा असा निराळा विचार झाला पाहिजे व विद्यार्थ्यांसही आज हा एक निराळाच विषय म्हणून शिकविणे अवश्य आहे, याबद्दल बहुतेकांची एकवाक्यता आहे. पाश्चिमात्य युनिव्हर्सिट्यांत असला एखादा निराळा विषय शिकवीत नाहीत हे खरे. पण त्यांचे कारण उघड आहे. ज्या देशांतून अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचे अथवा या विषयाच्या निरनिराळ्या अंगांचे जे शिक्षण दिले जाते, त्यात पाश्चिमात्य आर्थिक परिस्थितीच्या

अभ्यासाचा साहजिकच समावेश होतो. आपल्याकडे अर्थशास्त्राचे शिक्षण इंग्रज व अमेरिकन प्रोफेसरांनी लिहिलेल्या क्रमिक पुस्तकांच्या द्वारा दिले जाते; तेव्हा त्यांतील विषयाची मांडणी व विवेचन पाश्चिमात्य आर्थिक व्यवस्थेस अनुरूप असेच असते. पण हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशात जे महत्त्वाचे व गुंतागुंतीचे प्रश्न आहेत त्यांचे स्वरूप तिकडे अगदी निराळे असते. उलट, यूरोप-अमेरिकेत आज निकडीचे म्हणून जे कित्येक प्रश्न गणले जातात त्यांचा विचारच आपणांकडे उद्भवत नाही. याकरिता मूलभूत सिद्धांत शिकविताना जरी तिकडील क्रमिक पुस्तकांचा उपयोग करणे फारसे गैर नाही, तरी 'व्यवहारी' (applied) अर्थशास्त्राचे शिक्षण देताना आपल्या आर्थिक परिस्थितीचे वैशिष्ट्य व आपलेकडील महत्त्वाचे प्रश्न यांवर विशेष जोर देणे अवश्य आहे. हिंदुस्थानविषयक आर्थिक प्रश्नांचा अगदी स्वतंत्र असा विचार करण्याचा पहिला उत्कृष्ट धडा न्यायमूर्ती रानड्यांनी घालून दिला आणि म्हणूनच या विषयाचे जनकत्व त्यांजकडे येते.

'मागणीपाठोपाठ पुरवठा' हा आर्थिक सिद्धांत इतर धंद्यांप्रमाणे ग्रंथकर्त्यांच्या धंद्यालाही लागू पडतो, व याचे आपलेकडील हिंदी अर्थशास्त्रविषयक ग्रंथलेखनाचा इतिहास हे एक प्रत्यक्ष उदाहरण आहे. हिंदी अर्थशास्त्र हा युनिव्हर्सिट्यांतील अभ्यासाचा एक महत्त्वाचा विषय आहे, म्हणूनच हिंदी अर्थशास्त्रात अंतर्भूत होणाऱ्या निरनिराळ्या विषयांवरील बऱ्याच पुस्तकांची निर्मिती झाली असे म्हणावयास हरकत नाही. पण हा विषय अत्यंत अवाढव्य, याची अंगे व उपांगे फार विविध, ती सर्व निरनिराळ्या पुस्तकांतून अभ्यासण्याची विद्यार्थ्यांत धमक नाही, व त्यांस तेवढा वेळही नाही. तेव्हा सर्व विषयांचा विचार एकत्रित करून देणाऱ्या पुस्तकांस विद्यार्थीवर्गाकडून मागणी फार. ती पुरविण्याचे आजपर्यंत बरेच कमीअधिक यशस्वी प्रयत्न झाले. प्रो. जठार व बेरी यांचा प्रयत्न मुख्यत्वेकरून याच प्रकारचा आहे. अर्थात असल्या पुस्तकांत नवीन कल्पना मांडण्यास वाव जवळजवळ नाहीच. पण केवळ सर्व विषयांचे सांगोपांग विवेचन करणे हेही काही सोपे नाही. असे असूनही प्रस्तुत पुस्तकात ग्रंथकर्त्यांचे हातून हे काम एकंदरीत चांगले पार पडले आहे हे आमचे मत आम्ही सुरुवातीसच नमूद करितो.

## पुस्तकाचे स्वरूप

पुस्तकाच्या दोन्ही भागांची मिळून पृष्ठसंख्या ११०० वर आहे, आणि एवढ्यांत जवळजवळ सर्वच आर्थिक प्रश्नांचा विचार करण्यात आला आहे. विषयानुक्रम बराचसा मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी. ए. परीक्षेच्या अभ्यासक्रमाच्या अनुरोधाने आहे. प्रथम हिंदुस्थानच्या आर्थिक संपत्तीचे वर्णन व लोकसंख्येबद्दल विवेचन केल्यानंतर गेल्या शतकातील आर्थिक विकासावर एक प्रकरण घातले आहे. यापुढे शेतकी, उद्योगधंदे, वाहतूक, व्यापार, चलनपद्धती, पतपेढ्या व बँका आणि सरकारी जमाखर्च व करपद्धती असे विषय अनुक्रमे विचारात घेतले आहेत. साधारणपणे विषयाच्या महत्त्वानुसार त्यावर पाने खर्ची घातली आहेत. पण उद्योगधंदे आणि सरकारी जमाखर्च व करपद्धती ही प्रकरणे फारच त्रोटक आहेत. कापडाच्या गिरण्यांच्या धंद्याची वाढ व त्याच्या स्वरूपातील परिवर्तन यांचे विवेचन नीटसे झाले नाही. तसेच कोळशाचे उत्पादन आर्थिक दृष्ट्या फार महत्त्वाचे असूनही या धंद्याबद्दलची माहिती अत्यंत अपुरी आहे. अवघ्या ५० पानांत सरकारी जमाखर्च व करपद्धती हे प्रकरण आटोपल्यामुळे जवळजवळ प्रत्येक मुद्द्यावरच बऱ्याचशा उपयुक्त माहितीस पुस्तकात स्थान मिळाले नाही. कराच्या बोजाची समाजाच्या निरनिराळ्या वर्गांवरील विभागणी, प्रांतिक व मध्यवर्ती सरकार यांचे दरम्यानची उत्पन्न व खर्च यांची वाटणी या बाबतीचे विवेचन समाधानकारक नाही. उलट, Imperial Preference (साम्राज्यांतर्गत व्यापारविषयक सवलती) चा वाद आता स्वतंत्र प्रकरण घालण्याइतका महत्त्वाचा राहिला नाही. तसेच हिंदुस्थानातील दर माणशी उत्पन्न काय याबद्दलचे केलेले सर्व अंदाज इतके कच्च्या

पायावर उभारलेले आहेत की, त्यांचे सविस्तर विवेचन करण्यात तीस-पस्तीस पाने निष्कारण खर्ची घातली आहेत असे आम्हांस वाटते. गेल्या शंभर वर्षांचा आर्थिक इतिहास व बेकारी यांवरील प्रकरणे ही इतर क्रमिक पुस्तकांत सहसा नसल्यामुळे नवीन वाटतात.

येणेप्रमाणे पुस्तकात बहुतेक सर्व महत्त्वाच्या विषयांचा विचार झाला आहे. ग्रंथकर्त्यांनी केलेले विवेचन बहुतेक ठिकाणी समतोल असेच आहे. कमिट्या व कमिशनांच्या रिपोर्टांचे केवळ गोषवारे देऊन न भागविता आपली त्यांवरील मतेही ठिकठिकाणी नमूद केली आहेत. वादग्रस्त मुद्द्यांवर साधारणतः सर्वमान्य मताचाच पुरस्कार बहुधा केलेला आहे. चलनपद्धती व हुंडणावळ आणि पतपेढ्या व बँका ही प्रकरणे विशेष विस्तृत असून एकंदर चांगली साधली आहेत. तसेच शेतकीविषयक प्रश्नांसही योग्य ते महत्त्व देण्यात आले आहे. पुस्तकाची भाषा बरी आहे व विषयाचे विवेचनही रूक्ष असे कोठे वाटत नाही. पुनरुक्ती व पाल्हाळ हे दोष मात्र काही प्रमाणात आढळतात.

येथवर पुस्तकाच्या सर्वसाधारण स्वरूपाचा विचार झाला. असल्या पुस्तकाचे परीक्षण तपशीलवार करणे शक्य नाही, व तसे करण्यात फारसा फायदाही नाही. सर्वच आर्थिक प्रश्नांचा विचार जेथे झालेला तेथे कोणालाही आपणास ग्राह्य नाहीत अशी मते व विचार आढळणारच. ग्रंथकर्त्यांची एकंदर विचार-सरणी आम्हांस मान्य आहे. तेव्हा आमचा मतभेद आहे ते सर्वच मुद्दे विचारात न घेता आक्षेपार्ह अशा काही प्रमुख स्थळांचा तेवढा निर्देश येथे करितो.

## काही आक्षेपार्ह स्थळे

पुस्तकात ठिकठिकाणी आकड्यांचे तक्ते दिले आहेत आणि शक्य तोवर अगदी अलीकडची माहिती व आकडे देण्याचा प्रयत्न केल्याचे उघड दिसते. पण बरेच ठिकाणी नुसते तक्ते देऊनच काम भागविले आहे व त्या आकड्यांच्या स्पष्टीकरणार्थ काहीच विवेचन केलेले नाही. (उदाहरणार्थ, दुसऱ्या विभागातील पृ० ४० ते ५१ वरील उद्योगधंद्यांचा तक्ता व पृ० ५८५–५८६ वरील बजेटांचे तक्ते पाहा.) तसेच काही ठिकाणी आपल्या विधानांच्या पुष्ट्यर्थ आकडे देण्यात अथवा आकड्यांचे विवेचन करण्यात योग्य ती खबरदारी बाळगण्यात आलेली नाही. उदाहरणार्थ, गेल्या पन्नास वर्षांत हिंदुस्थानात Ruralization सुरू आहे असे विधान प्रो. जठार व बेरी करितात. मुळात हा शब्दप्रयोगच बरोबर नाही. कारण, याचा अर्थ शहरांतील लोकसंख्येचे प्रमाण कमी होत असून खेडेगावांतील वाढत आहे, असा होतो. पण वस्तुस्थिती तशी नाही. खरा प्रकार एवढाच की, खेडेगावांतील इतर उद्योगधंदे नाहीसे झाल्या-मुळे जनतेची शेतकीवरील भिस्त वाढत आहे. आता या प्रवृत्तीची जरी दर प्रांतात नोंद करण्यात आली आहे, तरी तिचे मापन करणे कठीण आहे. ग्रंथकर्त्यांनी १८९१ पासूनच्या खानेसुमारीतील शेतकीवर उपजीविका करणाऱ्यांचे आकडे देऊन या प्रवृत्तीचे परिमाण दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. पण या आकड्यांचा उपयोग अशा प्रकारे करिता येत नाही. एक तर खानेसुमारीतील धंदेवार वर्गी-करणाचे आकडे बिलकूल खात्रीलायक नाहीत, हे प्रत्येक खानेसुमारीचे रिपोर्टातच नमूद केलेले असते. विशेषतः शेतकरी पेशाचे बाबतीत बऱ्याच प्रमाणात शेतकीबरोबरच इतर काही धंदेही शेतकरी करीत असल्यामुळे नोंदणीचे वेळेस मुख्य धंदा म्हणून नोंद करीत असता एका वेळेस एक तर दुसऱ्या वेळेस दुसरा, असा घोटाळा नेहमी होत असतो; व आकड्यांत फरक झाला तर तो खऱ्या परिस्थितीतील फरकाचाच निदर्शक आहे असे म्हणता येत नाही. याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे गेल्या चार खाने-सुमाऱ्यांतील धंद्यांचे वर्गीकरणाची व नोंदणीची पद्धती दर वेळेस सारखीच नव्हती. तेव्हा हे सर्व आकडे समजातीय नसल्यामुळे तुलनेच्या दृष्टीने तुल्यबल नाहीत हे उघड आहे. दुसऱ्या एका ठिकाणी आकड्यांबद्दल विवेचन करिताना विलक्षणच घोटाळा केला आहे. गेल्या पंधरा वर्षांत हिंदुस्थानातून

होणाऱ्या धान्यांच्या निर्यातीचे स्वरूप काय आहे हे दर्शविणारा एक तक्ता (भाग १, पृ० २१८) येथे घातला आहे. पण या निर्यातीच्या स्वरूपाचे विवेचन जे काही पाने अलीकडे केले आहे (पृ० २०० ते २०४) त्यांत मात्र बहुतेक लढाईपूर्वीचेच आकडे आधारभूत धरले आहेत. पान २०२ वर कॉटनच्या हॅंडबुकाच्या आधारावर गव्हाच्या पिकापैकी सालीना एकदशांश परदेशास जाते हे विधान करिताना ग्रंथकर्ते आपणच पुढे दिलेल्या तक्त्यावरून गेल्या दहा वर्षांतील प्रमाण एक तिसांशसुद्धा नाही असे सिद्ध होते हे साफ विसरलेले दिसतात. दुसरे एके ठिकाणी दिलेल्या आकड्यांच्या निश्चिततेबद्दल आम्हास शंका येते. १९०१ मध्ये व १९२५ मध्ये एकंदर हिंदुस्थानात जे कापड खपले त्यापैकी अनुक्रमे ३७ व ६४ टक्के कापड स्वदेशी होते असे विधान केले आहे. या विधानास आधार काय हे दर्शविलेले नाही. आता जरी गिरणीच्या कापडाची पैदास व एकंदर कापडाची निर्यात व आयात यांबद्दलची माहिती निश्चित असली तरी हातमागांवर कापड किती निघते हे नक्की ठरविणे अशक्य आहे. त्याबद्दल औद्योगिक कमिशनने सुचविलेल्या अगर इतर अप्रत्यक्ष मार्गांचा अवलंब करूनच अनुमान करावे लागते. हिंदुस्थानात जे स्वदेशी कापड खपते त्यात हातमागावरील कापडाचे प्रमाण बरेच मोठे आहे. हातमागावरील कापडाची पैदास व खप यांबद्दल जोपर्यंत खात्रीलायक आकडे मिळत नाहीत तोपर्यंत स्वदेशी कापडाच्या खपाबद्दल ग्रंथकर्त्यांनी दिले आहेत इतक्या निश्चित स्वरूपात आकडे ठरविणे शक्य नाही असे आम्हांस वाटते.

सामाजिक व धार्मिक संस्था हे प्रकरण बरेच पाल्हाळिक आहे व यात नमूद केलेली बरीच मतेही आम्हांस मान्य नाहीत. जेव्हा हिंदी अर्थशास्त्र असे नवेच शास्त्र निर्माण केले पाहिजे असा वाद निघाला, तेव्हा त्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आमची भिन्न समाजरचना व आमच्या धार्मिक समजुती यांवर विशेष जोर देण्यात आला. याचा पगडा आमच्या आर्थिक व्यवहारावर व समजुतींवरही फार बसला आहे असे त्यावेळचे म्हणणे होते; व हेच मत डॉ. मुकर्जी अथवा आपल्याकडे डॉ. केतकर अजूनही स्वीकारतात. प्रो. जठार व बेरी यांस हा वाद सर्वस्वी ग्राह्य नाही असे हिंदी अध्यात्मवादाचा आर्थिक व्यवहाराशी काय संबंध आहे याबद्दल त्यांनी जे विवेचन केले आहे त्यावरून वाटते; पण एकंदर प्रचलित विचारपरंपरेचा थोडाबहुत परिणाम त्यांचेही लिहिण्यावर झालेला दिसून येतो. पृ० ११९ वर आपल्या जातिसंस्थेपासून फारच अनिष्ट आर्थिक परिणाम उद्भवतात हे डॉ. केतकरांचेच मत ते स्वीकारतात. खरे म्हटले तर या बाबतीत सप्रमाण असे विवेचन आजपर्यंत फारच थोडे झाले आहे. जातिबंधनामुळे जातीच्या धंद्याबाहेर लोक फारसे बाहेर जात नाहीत अथवा त्यामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याला आडकाठी येते या म्हणण्यात आम्हांस काहीच अर्थ दिसत नाही. आजच्या आर्थिक परिस्थितीबद्दलचा हा विचार आहे ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे. खानेसुमारीच्या रिपोर्टातील माहिती घ्या अथवा इतर कोणतीही सामाजिक माहिती घ्या, तीवरून ती विधाने सिद्ध करणे शक्य नाही. शुद्ध बौद्धिक अथवा तात्त्विक वादच या बाबतीत झाला आहे. प्रत्यक्ष परिस्थितीचे अवलोकन झालेले दिसून येत नाही. जुने धंदे डबघाईस आलेले असता त्यांत इतर जातीचे लोक शिरतील कशाला? पण विणकामासारख्या धंद्यांची जेव्हा भरभराट होते, तेव्हा इतर जातीतील लोक सुद्धा त्यात शिरतात हे खानेसुमाऱ्यांच्या कित्येक रिपोर्टांत नमूद केलेले आहे. जातिसंस्थेचे इतर अनिष्ट परिणाम बरेच असतील, पण आर्थिक बाबींत तरी या संस्थेपासून तोटे वा फायदे अलीकडे फारसे झालेले आढळून येत नाहीत. अविभक्त कुटुंबपद्धतीबद्दलही हेच म्हणता येईल. जेथे आर्थिक परिस्थिती अनुकूल राहिलेली असते, तेथेच हिंदू समाजात या संस्था आज मूळ स्वरूपात कायम आहेत; पण आर्थिक परिस्थिती प्रतिकूल होताच लवकरच यांची या बाबतीतील बंधने शिथिल होतात. यावरून या दोन्ही समाजसंस्थांमध्ये निदान आर्थिक परिस्थितीस वळण लावण्याचे सामर्थ्य आता उरलेले नाही हे उघड आहे. याच प्रकरणात शेवटी शेवटी (पृ० १३७) हिंदी दैववादाचा पगडा लोकांवर बसण्याचे कारण अठराव्या शतकातील राजकीय परिस्थिती

होय, असा आपला अभिप्राय जो ग्रंथकर्त्यांनी प्रदर्शित केला आहे तो तर अगदीच चमत्कारिक वाटतो.

जमीनसाऱ्याच्या विवेचनात एका बाबतीत या पुस्तकात बराच घोटाळा दिसून येतो. जमीनसारा खंड असो वा कर असो, या वादाचा सरकारी धोरणाशी प्रत्यक्ष काहीच संबंध नाही असे मत प्रतिपादले आहे. अर्थात या वादावर निश्चित मत न देता, सारा मुळात काहीही असला तरी त्याचा बोजा करासारखा असून तो हिंदी करपद्धतीतील एक प्रमुख भाग आता बनल्यामुळे इतर करांप्रमाणे त्याचा विचार आता झाला पाहिजे एवढे जरी सरकारने कबूल केले तरी पुरे आहे असे आम्हांस वाटते. पण हे जोपर्यंत सरकार कबूल करीत नाही, तोपर्यंत या वादाला महत्त्व राहीलच. कारण सारा जर खंड मानला, तर सारा घेऊन शिवाय इतर वर्गाइतकाच कराचा बोजा शेतकरीवर्गावर लादण्याचा सरकारला अधिकार राहतो; पण जर जमीनसारा केवळ कर असला, तर इतर वर्गापेक्षा अधिक बोजा डोक्यावर बसल्यास तो कमी झाला पाहिजे ही शेतकरीवर्गाची मागणी रास्त ठरेल. असो! या प्रश्नाचा खल बराच झाला असल्यामुळे यावर जास्त लिहिण्याचे काही कारण नाही.

बहुतेक ठिकाणी नमूद केलेली मते निर्भीड व सडेतोड आहेत. सरकारी धोरणाचे बाबीतही आपली नापसंती कित्येक ठिकाणी स्पष्ट रीतीने दर्शविली आहे. ही गोष्ट लक्षात घेता परीक्ष्य ग्रंथावर 'केसरी'तील परीक्षणात ग्रंथकारांच्या सरकारी कॉलेजातील प्रोफेसरीस अनुलक्षून केलेली टीका सर्वस्वी न्याय्य होती, असे म्हणता येत नाही. एकदोन वेळा मात्र बराच गुळमुळीतपणा स्वीकारलेला दिसतो. उदाहरणार्थ, हल्लीची नोकरशाही डोईजड आहे, जिकडे तिकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पगार बेसुमार वाढलेले आहेत व ते देण्याची आपली ऐपत बिल्कूल नाही, हे सर्वमान्य सिद्धांत सुद्धा स्पष्टपणे मांडलेले नाहीत (भाग २, पृ० ३०६) डेव्हलपमेंट खात्यावरील विवेचनातही थोडी घरसोड केलेली दिसून येते (भाग २, पा० १३२) एकंदर दर माणशी उत्पन्न वाढले आहे, पण शेतकऱ्याला खाण्याला मात्र पूर्वीइतके चांगले मिळत नाही. (भाग २, पृ० १५५) ही विधाने आम्हांस अगदीच विसंगत वाटतात. विशेषतः आपल्या देशात बहुतेकांच्या उत्पन्नापैकी किती तरी मोठा भाग अन्नखर्चात जातो. तेव्हा तर आवक वाढूनही अन्न निकृष्ट झाले हे म्हणणे सयुक्तिक दिसत नाही. उलट, बहुजनसमाजात खाण्याचे बाबतीत राहणी जर खालावली तर यावरून दर माणशी उत्पन्न खरे वाढले नाही असे विधान करणेच जास्त सयुक्तिक होईल.

Imperial Preference वरील प्रकरणात मात्र ग्रंथकर्त्यांना ब्रिटिश साम्राज्याबद्दल इतका प्रेमाचा उमाळा का आला आहे हे काहीच कळत नाही. तादृश फायदा काहीही नसला तरी या धोरणाचा स्वीकार करणे हे खरे मुत्सद्देगिरीचे लक्षण आहे असे ते समजतात. Cotton Excise (हिंदुस्थानात तयार झालेल्या कापडावरील पट्टी)चा इतिहास जगजाहीर आहे; व आजही साम्राज्याचे इतर घटक हिंदी लोक व हिंदुस्थानचे हित याबद्दल कितपत आस्था बाळगतात याविषयी लिहावयास नकोच. पण इतके असूनही प्रो. जठार व बेरी हे आपल्याकडील जे पुढारी Imperial Preference चा एकदम स्वीकार करीत नाहीत त्यांना फाजील शंकेखोर म्हणतात; म्हणजे हा साम्राज्यप्रीतीचा कडेलोट झाला असेच म्हटले पाहिजे!!

## काही उणीवा

मजूरवर्गाबद्दलचे विवेचन विस्तृत आहे. पण त्यात मुंबईतील परिस्थितीचाच विचार बहुतेक स्थळी झालेला आहे. खाणीतील व चहा, कॉफी वगैरेंच्या मळ्यांवरील मजूरवर्ग यांबद्दल माहिती जास्त द्यावयास हवी होती. चलनपद्धतीवरील विवेचन उत्तम आहे, पण Gold Exchange Standard (सुवर्णविनिमय पद्धती) चे माथी लढाईच्या आधीच्या १५ वर्षांतील जवळजवळ सर्वच आर्थिक आपत्तीचे खापर फोडले आहे यात जरा अतिशयोक्ती वाटते. काही जणांची जशी Drain बद्दलची,

अथवा काही जणांची Ratio बद्दलची जी वृत्ती, त्याच प्रकारची वृत्ती प्रो. जठार व बेरी यांची Gold Exchange Standard बद्दलची वाटते. याच प्रकरणात पान ४४३ वर सुवर्णचलन-पद्धतीमुळे हुंडणावळीचा दर व देशातील किमती या दोन्हीही स्थिर राहतात हे जे विधान केले आहे ते बहुतेक अर्थशास्त्रज्ञांस मान्य होईल असे आम्हांस वाटत नाही.

पुस्तकात आटोपशीरपणाकडे फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. ग्रंथकर्त्यांनी मनात आणले असते तर एवढीच माहिती बऱ्याच कमी पृष्ठसंख्येत देता आली असती. काही काही ठिकाणी अवांतर भारूड बरेच भरले आहे. याचे मुख्य उदाहरण म्हणजे "सामाजिक व धार्मिक व्यवस्था" हे प्रकरण होय. खरे म्हणावयाचे म्हणजे या प्रकरणात आपल्या हल्लीच्या सामाजिक व धार्मिक व्यवस्थेचा आर्थिक परिस्थितीवर काय परिणाम होतो एवढ्याचाच ऊहापोह करावयाचा. यात वर्णव्यवस्थेची उत्पत्ती, हिंदू तत्त्वज्ञानाचे खरे स्वरूप, प्रो. राधाकृष्णन वगैरे ग्रंथकर्त्यांच्या पुस्तकांतील लांबलचक उतारे, यांचा प्रोफेसरमजकुरांची विद्वत्ता दर्शविण्यापलीकडे फारसा उपयोग होतो असे आम्हांस वाटत नाही. या प्रकरणातील बराचसा मजकूर सहज गाळता आला असता. हाच प्रकार पुस्तकातील इतर प्रकरणात, विशेषतः पहिल्या विभागात लोकसंख्या व शेतकीविषयक प्रकरणात, दिसून येतो.

पुस्तक लिहिण्यात मूळ आधारग्रंथांचा व रिपोर्टांचा फार उपयोग केला आहे असे मलपृष्ठावर विधान करण्यात आले आहे. या विधानाची सत्यता प्रत्यक्ष रीतीने अजमावणे शक्य नाही. कारण, पुस्तकातील बहुतेक माहिती इतर ग्रंथांतूनही मिळण्यासारखी आहे. टीपात आधारभूत म्हणून दिलेल्या ग्रंथांकडे पाहिले, तर मात्र मूळ ग्रंथांचा व रिपोर्टांचा उपयोग बऱ्याच ठिकाणी केलेला नाही अशी शंका येते. उदाहरणार्थ, जंगलाबद्दची माहिती मुख्यत्वेकरून Encyclopaedia Britannica व Indian Year Book यांच्या आधारे दिली आहे असे एका टीपेत नमूद केले आहे. तसेच, हिंदुस्थानच्या लोहसंपत्तीबद्दलच्या माहितीस लॉर्ड रोनाल्डशे यांच्या पुस्तकाचा (भाग १, पा० ३२) अथवा हिंदुस्थानात हातमाग किती आहेत या माहितीस डॉ. नोल्स यांच्या पुस्तकाचा (भाग १, पा० १७७) आधार देणे हे अगदी चमत्कारिक दिसते. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी विशेष अभ्यासाकरिता म्हणून महत्त्वाचे रिपोर्ट व ग्रंथ यांची छोटीशी यादी दिली असती तर तिचा विद्यार्थ्यांस फार उपयोग झाला असता.

पुस्तकाच्या पहिल्या विभागात तिरप्या टाइपांचा (Italics) अगदी सुळसुळाट आहे. प्रकरणाच्या शेवटी गोषवाराच तेवढा अथवा काही महत्त्वाचे मुद्दे एवढेच Italics मध्ये नसून वाटेल तेव्हा मधील वाक्ये अथवा वाक्यांचे काही भाग Italics मध्ये घातले आहेत. यासंबंधी काहीच धरबंध दिसत नाही. ही दोन टाइपांची सरमिसळ चांगली दिसत नाही; व तिने विद्यार्थ्यांसही काही उपयोग होईल असे वाटत नाही. दुसऱ्या विभागात पहिल्या दोन प्रकरणांतच Italics आहेत. पुढे बिल्कूल नाहीत. वेळेच्या अभावी पुढील पाने Italics विरहित छापली असावी असे वाटते. एकंदर सर्व पुस्तकच घाईने लिहिले व छापले आहे. अशुद्धे अतोनात आहेत. शुद्धिपत्रक बरेच मोठे असूनही त्यात दुरुस्त न केलेली अशुद्धे आम्हांस आढळली.

कोणत्याही परीक्षणात्मक लेखात दोषस्थळांचेच विवेचन जास्त विस्तृतपणे होणे हे अपरिहार्य आहे. तरी विद्यार्थ्यांस उपयुक्त व हिंदुस्थानविषयक कोणत्याही आर्थिक प्रश्नांचे स्थूल स्वरूप चटकन समजावून देणारे म्हणून कोणासही संग्राह्य असे पुस्तक लिहिल्याबद्दल प्रो. जठार व बेरी यांचे पुन्हा अभिनंदन करून लेखणी खाली ठेवितो.

*लोकशिक्षण* २ : ५ मे १९२९ पृ० ३४१–३५० (जी. बी. जठार व एस. जी. बेरी, *इंडियन इकॉनॉमिक्स*, १९२८)

# ५ . . 'भारतीय अर्थशास्त्र'

## [ग्रंथपरीक्षण]

आपल्या अर्थशास्त्रावरील पुस्तकाच्या प्रस्तावनेत दिलेल्या अभिवचनाप्रमाणे एकदोन वर्षांचे आतच भारतीय अर्थशास्त्रावर एक ६५५ पानांचा जाडा ग्रंथ प्रो. काळे व कर्वे यांनी लिहून काढला याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तितके थोडेच. प्रो. भाटे यांच्या ग्रंथानंतर बरीच वर्षे अर्थशास्त्रावर नाव घेण्यासारखे पुस्तक मराठीत लिहिले गेले नव्हते. त्यानंतर एवढ्या थोड्या अवधीत 'अर्थशास्त्र' व 'भारतीय अर्थशास्त्र' ही दोन माहितीपूर्ण व अधिकारयुक्त पुस्तके प्रसिद्ध झाली. तेव्हा आता मराठीतील अर्थशास्त्रीय वाङ्मयाचा उदयकाल जवळ आला असे म्हणण्यास हरकत नाही. मराठी अर्थशास्त्रीय वाङ्मयाच्या दृष्टीने हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे हे उघड आहे. समग्र भारतीय अर्थशास्त्रावर हा मराठीतील पहिलाच ग्रंथ होय व मराठी वाचकांस आपल्या सर्व आर्थिक प्रश्नांचे स्थूल स्वरूप आकलन करण्यास त्यामुळे अत्यंत मदत होईलच. याशिवाय एका विवक्षित धाटणीची अर्थशास्त्रीय परिभाषा बसवून तिच्या साहाय्याने साधारण सुलभतेने शास्त्रीय विवेचन मांडण्याचा हा नमुना डोळ्यासमोर असल्याने मराठीतील इतर लेखकांस यापुढील मार्ग बराच सुकर झाला आहे. या ग्रंथाचे सर्वांगीण परीक्षण येथे करण्याचा आमचा इरादा नाही व आमचा तेवढा अधिकारही नाही. केवळ या ग्रंथाचे स्थूल स्वरूप वाचकांस कळावे व काही विशिष्ट बाबींकडे ग्रंथकर्त्यांचे लक्ष वेधावे म्हणून हा लेख लिहीत आहो.

या पुस्तकाचे दोन भाग पाडले आहेत. पहिल्या भागास प्रास्ताविक म्हटले असून दुसरा भाग निनावी आहे. पहिल्या भागात अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचे विवेचन केले असून दुसऱ्या भागात केवळ भारतीय अर्थशास्त्रविषयक प्रश्नांचा विचार केला आहे. असे करण्याचा उद्देश हा की, "एकाच ग्रंथात अर्थशास्त्राचे व भारतीय अर्थशास्त्राचे उद्घाटन केलेले वाचकास सापडून अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांसाठी दुसऱ्या ग्रंथांकडे धाव घेण्याचे त्यास कारण राहू नये." भारतीय अर्थशास्त्रविषयक सर्व प्रश्नांचे मर्म नीट समजण्यास अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचे चांगले ज्ञान पाहिजे हे उघड आहे; पण म्हणून भारतीय अर्थशास्त्रावरील पुस्तकातच एक अर्थशास्त्रावरील छोटेखानी निराळे पुस्तक समाविष्ट करणे हे कितपत युक्त आहे याबद्दल आम्हांस जबरदस्त शंका वाटते. एक तर जो भारतीय अर्थशास्त्रविषयक प्रश्नांचा शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करण्यास धजतो त्यास अर्थशास्त्राचा मुळीच गंध नाही असे संभवत नाही; आणि दुसरे म्हणजे ह्या प्रास्ताविक भागाचा अगदीच अनभिज्ञ माणसास काही फायदा होईल असे वाटत नाही. कारण भारतीय अर्थशास्त्रविषयक सर्वच प्रश्नांचा दुसऱ्या भागात ऊहापोह केला असल्यामुळे पहिल्या भागात अर्थशास्त्राचे सबंध क्षेत्र आक्रमिणे ग्रंथकर्त्यांस प्राप्त झाले; आणि हे अवघ्या २०० पानांत करावयाचे! तेव्हा सर्वच विवेचन अत्यंत त्रोटक झाले आहे. बरे, या विवेचनातही फक्त महत्त्वाच्याच बाबींचा समावेश करून त्यांचे स्पष्टीकरण विशेष सुलभ रीतीने केले असते तरी ठीक होते. पण सर्वच

मुद्द्यांचा उल्लेख करावयाचा आणि विषयाची मांडणीही शास्त्रीय (Academic या अर्थाने) पद्धतीची व विवेचन विवक्षित अर्थशास्त्रीय परिभाषेत, यामुळे अर्थशास्त्राचे मुळीच ज्ञान नसणाऱ्या वाचकांस हा प्रास्ताविक भाग नीटसा समजेल असे आम्हांस वाटत नाही. सबंध "पैशाचा परिणामविषयक सिद्धांत" (Quantity theory) अथवा "आर्थिक अरिष्टे" (Industrial fluctuations) यांचे वाट्यास दोन दोन पाने आली असता ग्रंथकर्ता कितीही कुशल असला तरी विषय अगदी अनभिज्ञ माणसास समजेल अशी मांडणी करणे त्यास अशक्य आहे. ज्याचे अर्थशास्त्रविषयक ज्ञान बरेच आहे त्यास मात्र विषयाची थोडक्यात उजळणी करणे असल्यास या प्रास्ताविक भागाचा उपयोग होईल; पण एवढ्याकरिता एकंदर ग्रंथाचा जवळजवळ एकतृतीयांस भाग अडविण्याची काही जरुरी नव्हती. असो. ग्रंथाचा खरा उद्देश भारतीय अर्थशास्त्राची शिकवण हा असल्याने या प्रास्ताविक भागाविषयी आणखी काही न लिहिता दुसऱ्या भागाकडेच वळू.

## 'भारतीय अर्थशास्त्रा'चे स्थान

'भारतीय अर्थशास्त्र' या संज्ञेबद्दल व ह्या संज्ञेने निदर्शित केलेल्या विषयसमूहाच्या परस्परसंबंधाबद्दल आज बरीच वर्षे वाद माजलेला आहे. काही अंशी हा वाद केवळ शाब्दिक आहे. पण वादाचे मूळ थोडेसे अर्थशास्त्रीय मूलतत्त्वांबद्दलच्या मतभेदातही आहे. आज डॉ. मुकर्जी यांसारखे काही हिंदी अर्थशास्त्रज्ञ असे प्रतिपादितात की, आपली समाजरचना व एकंदर परिस्थिती ही पाश्चात्य राष्ट्रांहून अत्यंत भिन्न असल्याने हिंदुस्थानापुरते निराळेच अर्थशास्त्र उत्पन्न करणे अवश्य आहे. प्रो. काळे व कर्वे यांस हे मत ग्राह्य नाही, असे त्यांना अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांवरील एका प्रास्ताविक भागाचा या पुस्तकात समावेश करण्याची जरुरी वाटली यावरून उघड दिसते. दुसऱ्या भागातील प्रत्येक प्रकरणात वाचकांस पहिल्या भागातील मूलतत्त्वविषयक विवेचन पाहण्याची ग्रंथकर्ते वारंवार सूचना देतात यावरूनही त्यांच्या मते भारतीय अर्थशास्त्र म्हणजे अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वदृष्ट्या भारतीय आर्थिक प्रश्नांचा केलेला विचार, अशी कोणाचीही समजूत होणे साहजिक आहे. पण प्रस्तावनेत व इतर ठिकाणी प्रदर्शित केलेल्या विचारांवरून ग्रंथकर्त्यांचे मत डॉ. मुकर्जीसारखे नसले तरी त्यांनाही 'भारतीय अर्थशास्त्र' असे एक निराळे 'शास्त्र' आहे असे वाटत असावे. "मानवी समाजाचे जर एकच अर्थशास्त्र असणार, तर तुमचे भारतीय अर्थशास्त्र ही नवी चीज काय आहे?" या शंकेचे निरसन करण्याचा प्रयत्न त्यांनी प्रस्तावनेत केला आहे. ग्रंथकर्त्यांच्या मते हिंदुस्थानची विशिष्ट परिस्थिती हिशेबात धरून अर्थशास्त्राचे सिद्धांत आणि शिकवण यांची मांडणी केली पाहिजे आणि "ही विशिष्ट कामगिरी करणारे जे शास्त्र ते भारतीय अर्थशास्त्र." या दृष्टीने पुस्तक धुंडाळले तर अर्थशास्त्राच्या जुन्या सिद्धांतांची काही नवीन प्रकारची मांडण आढळेल अशी अपेक्षा होते, पण ती व्यर्थ आहे. कारण, दुसऱ्या भागातील सर्व प्रकरणांतील बहुतेक भाग वर्णनात्मक आहे आणि काही भाग अर्थशास्त्राच्या सिद्धांताच्या दृष्टीने हिंदी परिस्थितीच्या विवेचनपर आहे; पण मूळ सिद्धांताची नवीन मांडणी करण्याचा प्रयत्न कोठेच केलेला आढळत नाही. खरे पाहिले असता भारतीय अर्थशास्त्र ही एक 'और' चीज, अशी पोकळ बात कित्येक हिंदी अर्थशास्त्रज्ञ का मारतात हेच आम्हांस समजत नाही. यात काही विशेष फुशारकी मारण्यासारखे आहे की काय?

न्यायमूर्ती रानड्यांच्या ज्या प्रख्यात निबंधापासून हिंदी अर्थशास्त्रविषयक अभ्यासाचा उगम झाला त्या निबंधातसुद्धा रानड्यांनी नवीन 'शास्त्र' निर्माण करण्याचा आव न आणिता केवळ हिंदी परिस्थितीच्या दृष्टीने इंग्रज राज्यकर्त्यांस आपले हिंदुस्थानविषयक आर्थिक धोरण–विशेषतः जकातीसंबंधी–बदलणे किती आवश्यक आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. रानड्यांचा कटाक्ष एकंदर पाश्चात्य

अर्थशास्त्रज्ञांच्या शिकवणीवर नसून ज्या रिकार्डो संप्रदायाच्या सिद्धांतानुसार ब्रिटिश धोरण आखले जात होते त्या रिकार्डो संप्रदायावर आहे. या निबंधातील मुख्य मुद्दा हा की, रिकार्डो संप्रदायाची मते अत्यंत एकांगी असून अलीकडे युरोप व अमेरिकेतील नवीन अर्थशास्त्रज्ञांनी जास्त खोलवर विचार करून या शास्त्राच्या सिद्धांतास जास्त विस्तृत असे स्वरूप दिले आहे. एवढे प्रास्ताविक विवेचन करून रानडे लिहितात, "We have next to consider the bearings of this enlarged view of the science in its Indian aspects."

आणि ह्या पुढील विवेचनांत लिस्टने प्रत्येक राष्ट्राने आपल्यास हितावह असे धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन करून राष्ट्रीय अर्थशास्त्राचा जो पुरस्कार केला, त्यावर विशेष जोर दिला आहे. अर्थात लिस्टचे राष्ट्रीय अर्थशास्त्र म्हणजे प्रत्येक राष्ट्राचे निरनिराळे अर्थशास्त्र असे नाही, तर ॲडॅम स्मिथने प्रतिपादिलेल्या, एकंदर जागतिक हित व प्रत्येक राष्ट्राचे हित ही दोन्ही एकच असून ती प्राप्त करण्यास सर्व आर्थिक व्यापार अप्रतिबद्ध असावेत या सिद्धांताविरुद्ध राष्ट्रीय हितावर जोर देऊन त्याच्या संरक्षणाकरिता व संवर्धनाकरिता प्रत्येक राष्ट्रीय सरकारास आर्थिक बाबींत ढवळाढवळ करण्याची आवश्यकता प्रस्थापित करण्याकरिता केलेले विवेचन हे होय. आमचा मुद्दा एवढाच की, 'शास्त्र' म्हणावयाचे तर ते एकच असू शकते. आर्थिक 'धोरण' मात्र प्रत्येक राष्ट्रास आपली परिस्थिती अजमावून निरनिराळे बांधावे लागते.

## भारतीय अर्थव्यवस्था

'भारतीय अर्थशास्त्र' या दुसऱ्या भागाची पृष्ठसंख्या जवळजवळ ४६७ असून त्यात एकंदर चौदा प्रकरणे आहेत. पहिली दोन प्रकरणे 'राष्ट्रीय अर्थशास्त्र' व 'हिंदी संस्कृति' ही प्रास्ताविक स्वरूपाची आहेत. यानंतर चार प्रकरणांत हिंदुस्थानातील उत्पादक साधनांबद्दल विवेचन केले आहे. या चारही प्रकरणात माहिती विपुल दिली आहे; पण तिची मांडणी करताना हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रदेशांच्या भिन्न आर्थिक परिस्थितीकडे लक्ष द्यावे तितके दिलेले नाही. 'नैसर्गिक परिस्थिति' या प्रकरणात महत्त्वाचे 'भौगोलिक विशेष' हे एक निराळे कलम घातले आहे. पण यानंतरच्या कलमात या भौगोलिक विशेषांचा भिन्न भिन्न प्रदेशांतील उत्पादनव्यवस्था घडविण्यात काय संबंध आहे हे दर्शविले नाही.

हवापाणी व पिके यांतील माहिती प्रांतवार दिली आहे. पण प्रत्येक प्रांतात निरनिराळ्या आर्थिक घटकांचा समावेश होत असल्यामुळे या माहितीचा विशेष फायदा नाही. तसेच जंगलाबद्दल जी माहिती दिली आहे, त्यातसुद्धा जंगलाचे जे निरनिराळे प्रकार त्यांकडे लक्ष न वेधता सर्व विवेचन केवळ गोळाबेरीजवजा आहे. आमच्या मते हिंदुस्थानचे जे निरनिराळे नैसर्गिक विभाग पडतात, त्यांचे नीट विवेचन करून या प्रत्येकातील आर्थिक उत्पादन-साधन-समुच्चयाचा निरनिराळा विचार करणे जरूर होते. हवामान, पाऊस, इतर पाणी-पुरवठा, जमिनीची सुपीकता इत्यादिकांवर उत्पादनव्यवस्था अवलंबून असते व निरनिराळ्या प्रदेशांतील पिके, जनावरे वगैरेबद्दलची भिन्नता यामुळेच ठरली जाते. तर वेगवेगळ्या नैसर्गिक प्रदेशांची तपशीलवार माहिती देऊन त्यांतील आर्थिक व्यवस्थेचे सर्वांगीण स्वरूप दर्शविण्याचा प्रयत्न केला असता तर या चार प्रकरणांतील विवेचन आमच्या मते जास्त उद्बोधक झाले असते. उदाहरणार्थ, शेतीची जनावरे (पृष्ठ २९२-९४) या कलमांत 'लागवडीच्या व लोकसंख्येच्या १०० एकरांशी अथवा माणसांशी शेतीच्या जनावरांचे प्रमाण' याचा एक तक्ता दिला आहे आणि नंतर "पाच एकर जमिनीची मशागत करण्यास एक बैलजोडी पाहिजे असे गृहीत धरले तरी एकंदर शेत-जमिनीच्या मानाने जनावरांचा तुटवडा पडत आहे असेच दिसेल." असे विधान केले

आहे. या विधानातून सर्व प्रकारच्या कृषिपद्धतीत सरसकट साधारण बैलजोड्यांचे एकरी सारखेच प्रमाण असते असा जो ध्वनी निघतो तो अर्थात चुकीचा आहे. याउलट शेतकी कमिशनच्या रिपोर्टात निरनिराळ्या कृषिपद्धतीत गुरांचे स्थान काय व हल्ली कोठे कोठे जनावरांचा विशेष तुटवडा आहे याचे विस्तृत विवेचन केले आहे. त्याचे अनुषंगाने माहिती दिली असती तर वाचकांस आर्थिक व्यवस्थेचे रहस्य जास्त पूर्णपणे लक्षात आले असते. प्रांतवार विभागणी आर्थिक दृष्ट्या अगदी निरुपयोगी आहे. 'मद्रास प्रांतात तांदूळ, ज्वारी, बाजरी, कापूस, गळिताची धान्ये, नीळ ही सर्व पिकतात.' या विधानावरून मद्रास प्रांतातील निरनिराळ्या प्रदेशातील आर्थिक व्यवस्थेची काहीच कल्पना करता येत नाही. कोकण व महाराष्ट्र अथवा वऱ्हाड व छत्तिसगड यांतील कृषिव्यवस्था अगदी वेगळ्या प्रकारची, पण यांचा एकेका प्रांतातच समावेश होतो. यामुळे प्रांतवार दिलेल्या माहितीपासून काहीच बोध होऊ शकत नाही. अर्थात सर्व प्रकारचे आकडे प्रांतवार मिळत असल्यामुळे ते प्रांतवार देणे अपरिहार्य आहे; पण विषयाची मांडणी करताना नैसर्गिक व आर्थिक विभागांची रचना प्रांतरचनेहून भिन्न आहे हे स्पष्ट करून नंतर नैसर्गिक व आर्थिक विभागवार माहिती देण्यास हवी होती.

## सदोष मांडणी

या चार उत्पादनविषयक प्रकरणांनंतरची तीन प्रकरणे 'लोकसंख्या व संपत्ति', 'आर्थिक क्रांति' व 'उद्योगधंदे व व्यापार' ही होत. लोकसंख्या व संपत्ती या प्रकरणाची व्याप्ती ग्रंथकर्त्यांचे दृष्टीने काय असावी हे नीटसे कळत नाही. या प्रकरणात आलेल्या बहुतेक बाबींचा समावेश अलीकडच्या 'मनुष्यबळ' व शेवटच्या 'किमतीचे व राहणीचे मान' या प्रकरणांत होण्यासारखा आहे. उत्पादनसामर्थ्याचे दृष्ट्या मनुष्यबळाचा विचार करावयाचा त्यातच लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न साहजिक रीत्या येतो; व राहणीचे मान या कलमाखाली एकंदर उत्पन्नाबद्दल अनुमानांचा समावेश होणे रास्त आहे. शिवाय या प्रकारणांत खाण्याच्या पदार्थांचा पुरवठा व किमती यांचा अगदी निराळा असा विचार केला असल्यामुळे खाण्याच्या पदार्थांच्या किमतींचा लोकसंख्येशी काही विशेष संबंध आहे व त्यांची चढउतर इतर जिनसांच्या किमतींप्रमाणे होत नाही असा वाचकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. खरी गोष्ट अशी की, गहू , तांदूळ इत्यादी धान्यांच्या किमती केवळ हिंदुस्थानातील उत्पादन व मागणी यांवर अवलंबून नाहीत. इतर देशांतील किमतींच्या प्रमाणास अनुसरून हिंदुस्थानातील किमतींतही फरक पडतो. इतकेच नव्हे तर धान्येतर शेतकी पिकांच्या किमतींचाही धान्याच्या किमतींशी निकट संबंध आहे. आता धान्याच्या वढीच्या किमतींमुळे झालेला बहुजनसमाजाचा तोटा इतर पिकांच्या किमतींच्या वाढीमुळे आपल्या देशात भरून येत नाही ही गोष्ट अलाहिदा. पण धान्याच्या किमती फक्त हिंदुस्थानातील धान्याच्या पुरवठा-मागणीवर अवलंबून असतात असा जो या कलमाचा रोख दिसतो तो आम्हांस चुकीचा वाटतो. या कलमाखेरीज दर माणशी उत्पन्नाबद्दल अनुमाने व 'संतति-नियमन' याविषयीची या प्रकरणातील कलमे विशेष चांगली आहेत. जरी आपल्या लोकसंख्येची वाढ झपाट्याने होत नसली तरी आपल्या हल्लीच्या परिस्थितीत होत आहे हीच वाढ कशी भारी आहे हे उत्कृष्ट रीतीने दर्शविले आहे. तसेच इतर देशांत अवलंबिलेल्या 'संतति-नियमन' या लोक-संख्येच्या वाढीवरील उपायाचा आपणाकडे निदान हल्ली फारसा उपयोग होण्यासारखा नाही असेही ग्रंथकर्त्यांनी आपले मत स्पष्ट केलेले आहे. 'आर्थिक क्रांति' या प्रकरणात बहुशः परराष्ट्रीय व्यापारा-चाच विशेष विचार केला आहे. 'आर्थिक क्रांति'हा मथळा वाचून या क्रांतीचे स्वरूप काय वगैरे ऐतिहासिक विवेचन या प्रकरणात केले असेल असा ग्रह होतो. पण त्याकडे ग्रंथकर्त्यांनी मुळीच लक्ष दिलेले नाही. शिवाय या प्रकरणात बरेच आकडे व तक्ते देऊन त्यांचे स्पष्टीकरणार्थ मजकूर मात्र

काही द्यावयाचा नाही ही जी ग्रंथकर्त्यांची खोड आहे ती विशेष अनुभवास येते. यानंतरच्या 'उद्योगधंदे व व्यापार' या प्रकरणात औद्योगिक व व्यापारी धोरण यांचाच खरा विचार केला आहे व प्रकरणास मथळा हाच वापरला असता तर बरे झाले असते. जकातींचा इतिहास व जकात कमिशनानंतर अवलंबिलेल्या जकातींच्या साहाय्याने धंद्यांचे संरक्षण करण्याचे धोरण यांचा या प्रकरणात पूर्ण ऊहापोह केला आहे. दहावे व अकरावे प्रकरण हिंदी चलनपद्धती व हुंडणावळ. या प्रकरणांतील माहितीही सविस्तर दिली असून बहुतेक सर्व हिंदी अर्थशास्त्रज्ञांस संमत असलेल्या सुवर्णचलनपद्धतीचा व 'सोळा पेन्सा'चाच पक्ष ग्रंथकर्त्यांनीही उचलून धरला आहे. बारावे प्रकरण पेढ्यांवरील व तेरावे सहकारी चळवळीवर. सहकारी चळवळीच्या प्रसारात ज्या निरनिराळ्या अडचणी आहेत त्यांत हिंदी शेतकऱ्याची 'व्यक्तिप्रधान मनोरचना' व हिंदी नागरिकाचा 'एककल्ली स्वभाव' यांचाही समावेश केला आहे. बहुतेक जणांस हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची मनोवृत्ती सहकारी चळवळीस अनुकूल अशी वाटते त्याविरुद्ध हे मत आहे. चवदावे प्रकरण 'राष्ट्रीय उत्पन्नांतील वांटेकरी' असे आहे. इंग्रजीत 'Distribution' चा जुना, ॲडम स्मिथने रूढ केलेला अर्थ, म्हणजे कोणत्याही मूल्याची त्याच्या निरनिराळ्या उत्पादक-घटकांत विभागणी, म्हणजे कोणत्याही वस्तूची बाजारी किंमत अमुक ठरल्यास या किमतीचा कोणता वाटा भांडवल, निसर्ग, श्रम व संघटन यांचे हिश्शास येतो हे ठरविणे. Distribution याचा दुसरा अर्थ म्हणजे, कोणत्याही आर्थिक समाजातील निरनिराळ्या व्यक्तींस त्या समाजाच्या उत्पन्नाचा कोणता वाटा मिळतो हे ठरविणे, हे होय. पहिल्या अर्थाप्रमाणे एका वस्तूच्या किमतीची ती वस्तू तयार करण्यास मदत झालेल्या उत्पादकघटकांतील वाटणीचा विचार करावयाचा व दुसऱ्या अर्थाप्रमाणे सबंध राष्ट्रीय उत्पन्न, समाजातील निरनिराळे वर्ग व व्यक्ति यांत कसे विभागले गेले आहे याचा विचार करावयाचा. अर्थात जरी या दोन्ही अर्थात्मक, इंग्रजीत 'Distribution" ही संज्ञा वापरतात तरी हे दोन्ही विचार अगदी भिन्न आहेत हे सांगणे नलगे; पण या चवदाव्या प्रकरणात ग्रंथकर्त्यांचा या बाबीत जरा घोटाळा झालेला दिसतो. कारण जरी मथळा 'राष्ट्रीय उत्पन्नांतील वांटेकरी' हा आहे तरी प्रकरणात या उत्पन्नाची वाटणी निरनिराळ्या वर्गांत कशी झाली आहे, याचा विचार बिल्कूल केलेला नसून खंड, मजुरी, व्याज व नफा ह्या 'Distribution'च्या पहिल्या अर्थाखाली समावेश होणाऱ्या बाबींचा हिंदी परिस्थितीच्या दृष्टीने विचार केलेला दिसतो. असा स्वतंत्र विचार फारसा काय करता येणार, म्हणूनच की काय या प्रकरणात जमीनधाऱ्याच्या पद्धती, कारखान्यांसंबंधी कायदे, आंतरराष्ट्रीय मजूर चळवळ, अशा प्रकारची कलमे घातली आहेत. असो. पंधरावे प्रकरण 'हिंदुस्थानातील सरकारी उत्पन्न व खर्च' यांवर आहे. आमच्या मते या प्रकरणाचा मुख्य दोष म्हणजे हल्लीच्या आपल्या करपद्धतीच्या गुणदोषांचे नीटसे वर्णन कोठेच केले नाही हा होय. 'करपद्धतीची सुधारणा' म्हणून एक कलम घातले आहे खरे, पण यात करचौकशी कमिटीच्या रिपोर्टाचा हवाला देण्यापलीकडे काहीच फारसे केलेले नाही. हल्ली कराचा बोजा समाजाच्या निरनिराळ्या वर्गांवर कसा पडतो व समतेच्या आणि ऐपतीच्या तत्त्वाच्या दृष्टीने या पद्धतीत काय फरक होणे इष्ट आहे याचा विचार ग्रंथकर्त्यांनी करावयास हवा होता. शेवटचे प्रकरण 'किमतीचे मान व राहणीचे मान' असे आहे. या दोन बाबी एकाच प्रकरणात का गोवल्या गेल्या हे आम्हांस कळत नाही. याने किमतीच्या मानाचा व राहणीच्या मानाचा काही निकट संबंध आहे असा चुकीचा ग्रह मात्र वाचकांचा व्हावयाचा. यापेक्षा किमतीच्या मानाचा विचार चलनपद्धतीच्या अनुषंगाने, व राहणीच्या मानाचा विचार राष्ट्रीय संपत्तीचा विचार जेथे केला तेथे झाला असता तर जास्त युक्त होते. राहणीचे मान ह्या विषयावरील मजकूर थोडका असला तरी उत्कृष्ट आहे. राहणी आणि प्रगती या शेवटच्या कलमांतील विचारसरणी आम्हांस विशेष पसंत पडली.

## पाठ्यपुस्तकी स्वरूप

पुस्तकाचे सर्वसामान्य स्वरूप काय व त्यातील विषयांची मांडणी कशी याची कल्पना आतापर्यंतच्या लिखाणावरून वाचकांस आली असेलच. पुस्तकाची व्याप्ती फार मोठी आहे, तेव्हा त्यातील सर्वच विषयांवरील प्रगट केलेल्या मतांचा ऊहापोह करणे आम्हांस शक्य नाही. पण बहुतेक मते सर्वसंमत अशीच आहेत व क्वचितच ठिकाणी कोणासही तीव्र विरोध करावा अशी स्थळे आढळतील. मराठीत या विषयावर शास्त्रीय दृष्ट्या लिहिण्याचा प्रघात इतका थोडा आहे की, अजून आपली अर्थशास्त्रीय परिभाषा नीट बसलेली नाही; आणि बहुतेक शास्त्रीय विवेचन बोजड व काहीसे क्लिष्ट असे वाटते. या दोषापासून ग्रंथकर्ते अगदीच अलिप्त नसले तरी पुस्तकाचा बहुतेक भाग साधारण सुशिक्षितांस सहज समजेल असाच आहे. भरपूर माहिती व समतोल बुद्धीने केलेले विवेचन हे या पुस्तकाचे मुख्य गुण होत.

शेवटी एकच गोष्ट आम्हांस लिहावीशी वाटते. ती अशी की, मराठीत अगदी स्वतंत्र रीतीने ग्रंथनिष्पत्ती करण्याची संधी आली असता आपण केवळ शालोपयोगी म्हणून लिहिलेल्या एका पुस्तकाचा जवळजवळ अनुवाद करण्याचा मार्ग ग्रंथकर्त्यांनी का स्वीकारावा ? परीक्षेस बसण्याची तयारी करण्याकरिता लिहिण्याच्या पुस्तकाची पद्धती वेगळी व सामान्य सुशिक्षित माणसास नवीन विषयाची ओळख व्हावी म्हणून लिहिलेल्या पुस्तकाची पद्धती वेगळी असणार, परंतु या दृष्टीने काही नवीन प्रकारची मांडणी करण्याचा ग्रंथकर्त्यांनी अगदीच प्रयत्न केला नाही. इतकेच नव्हे, तर मराठीत पुस्तक लिहिलेले, तेव्हा साहजिकच महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीचा विशेष विचार करण्यात यावा अशी आमची अपेक्षा होती. पण या बाबतीत आमची अगदीच निराशा झाली.

असो. आपल्या भाषेतील ग्रंथनिष्पत्ती अजून इतकी अल्प आहे की, कोणीही कोणत्याही विषयावर साधारण बरेसे पुस्तक लिहिले तरी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करणे जरूर आहे. तेव्हा अर्थशास्त्राच्या दोन कसलेल्या प्रोफेसरांनी, त्यांतील एक महाराष्ट्रातील सर्वांत जुने व सुविख्यात अर्थशास्त्रज्ञ, भारतीय अर्थशास्त्रावर एक बडा ग्रंथ लिहिण्याचे मनांत आणले व ते इतक्या उत्तम रीतीने तडीस नेले ही खरोखरीच मोठ्या भाग्याची गोष्ट होय.

*रत्नाकर* ५ : ५ मे १९३० पृ० ३६५-३६९ (वा. गो. काळे व द. गो. कर्वे, *भारतीय अर्थशास्त्र*, १९२९)

☆

# ६ . . हिंदी अर्थशास्त्राचा पाया

एकोणीसशे बेचाळीस साली न्यायमूर्ती रानडे यांच्या जन्मास १०० वर्षे लोटतात व त्याच साली त्यांनी 'हिंदी अर्थशास्त्र' या विषयावर केलेल्या विवेचनाला ५० वर्षे पुरी होत आहेत. 'हिंदी अर्थशास्त्र' या विषयावरील निबंधातील विचार न्यायमूर्तींनी प्रथम १८९२ साली डेक्कन कॉलेजातील एका व्याख्यानप्रसंगी पुढे मांडले. याच्या आधी विशिष्ट आर्थिक विषयावर जरी त्यांनी बरेच लेख लिहिले होते व नंतरही काही विवेचने केली, तरी वरील व्याख्यानात ज्या पद्धतीने त्यांनी अर्थशास्त्र व आर्थिक धोरण यांच्या मूलतत्त्वांचा विचार केला आहे ती पद्धत इतरत्र आढळत नाही. या निबंधात आपल्या अर्थशास्त्राच्या व्यापक वाचनाचे व हिंदी आर्थिक परिस्थितीच्या अभ्यासाचे व अवलोकनाचे सर्व सार रानडे यांनी ओतले आहे. यामुळे त्यांच्या अर्थशास्त्रविषयक विचारांची बैठक या लेखावरूनच समजून येते. तसेच नवीन पद्धतीच्या हिंदी आर्थिक प्रश्नांच्या विचाराचा उगमही येथूनच झाला असे म्हणण्यास हरकत नाही.

रानडे यांच्या या लेखाची व्याप्ती आणि त्यातील विचारांचे मूलगामित्व इतके आहे की त्यांचे विस्ताराने विवेचन एका लेखात करणे अशक्य आहे. म्हणून या निबंधातील प्रमुख विचार सारांशाने देणे व त्यांचे आजतागायत महत्त्व थोडक्यात दाखविणे एवढेच करण्याचे आम्ही येथे योजले आहे.

### रानड्यांचा मुख्य निष्कर्ष

या निबंधाच्या सुरुवातीसच रानडे यांनी आपली एकंदर भूमिका स्पष्ट केली आहे. सर्व प्रकारच्या समाजशास्त्रांस निश्चित, सनातन, सर्व काळीं व सर्व स्थळीं लागू पडणारी प्रमेये कोणासही मांडता येणार नाहीत, हाच या लेखातील पहिल्या परिच्छेदात मांडलेला मुख्य सिद्धांत होय. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या सर्व शास्त्रांतर्गत प्रश्नांचा कालपरिस्थित्यनुरूप सापेक्षतेने विचार करावा लागतो. म्हणून इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या पुस्तकांतून प्रतिपादिलेल्या तत्त्वांचा पुरस्कार आपल्याकडे बिनधोक करता येणे शक्य नाही. कारण इंग्लंडामधील परिस्थिती व हिंदी परिस्थिती यांत अनेक दृष्टींनी जमीन-अस्मानाचे अंतर आहे. हिंदुस्थान व इंग्लंड यांमधील या भिन्नत्वामुळे समाजविकास किंवा समाजधारणेची तत्त्वे या दोन देशांत एक असणे शक्य नाही, असे रानडे यांनी अनेक उदाहरणे देऊन दर्शविले. ज्यांचे मूलभूत सिद्धान्त त्रिकालाबाधित आहेत अशा पदार्थविज्ञान अथवा खगोलशास्त्राप्रमाणे जर अर्थशास्त्र असते तर गोष्ट निराळी. परंतु वेळ, परिस्थिती, व्यक्तींची कुवत व त्यांच्या आकांक्षा, समाजसंस्थांची व शासनसंस्थांची बंधने या सर्वांचा जेथे निकट संबंध येतो, तेथे सर्वच ठिकाणी व नेहमीच सारखे सिद्धांत लागू पडणे शक्य नाही. या प्राथमिक विवेचनावरूनच रानडे यांची भूमिका किती व्यापक आणि त्यांची विचारसरणी किती शुद्ध होती हे दिसून येईल. यानंतरच्या विवेचनात

तपशिलात शिरून एकंदर इंग्रजी अर्थशास्त्राचा इतिहास व त्या शास्त्रातील सिद्धांताची गृहीत प्रमेये यांची छाननी त्यांनी केली आहे.

जरी सुरुवातीचे काही इंग्रज लेखक आपले सिद्धांत मांडताना प्रत्यक्ष परिस्थितीचा सतत विचार आपण करीत आहो असे समजत तरी मिल्, केरन्स इत्यादी आधुनिक लेखकांस या बाबतीतील उणेपणा काहीसा कळून आला आहे, असे रानडे यांनी दर्शविले आहे. परंतु या सर्वच इंग्रज अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या विवेचनात काही गोष्टी स्वतःसिद्ध मानल्या आहेत. या बाबी जरी इंग्लंडापुरत्या गृहीत धरणे योग्य वाटले, तरी हिंदुस्थानात त्यांचे अस्तित्व केव्हाही गृहीत धरता येणार नाही. बेझट, जेव्हन्स, सिजिक इत्यादी आधुनिकांना सनातन इंग्रजी अर्थशास्त्राची बैठक सदोष वाटते व तिची व्याप्ती प्रचलित इंग्रजी परिस्थितीपुरतीच आहे हेही त्यांस कळून चुकले आहे. परंतु इंग्रजेतर लेखकांतच एकंदर सनातन इंग्रजी विचाराविरुद्धचा प्रवाह इंग्रज लेखकांपेक्षा अधिक स्पष्ट दिसतो. ॲडॅम स्मिथ व त्याचे समकालीन लेखक यांच्या विचाराच्या ओघाची दिशा ज्याप्रमाणे पूर्वकालीन परिस्थितीविरुद्ध प्रतिक्रिया अशा स्वरूपाचीच उघड दिसते, त्याचप्रमाणे नवीन जर्मन-विशेषतः लिस्ट-व अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांच्याही भूमिकेचे स्वरूप आहे. सर्व प्रकारे नियंत्रित व निर्बंधित आर्थिक व्यवस्थेचे दुष्परिणाम जेव्हा विशेष भासू लागले. तेव्हा निसर्गसिद्ध हक्क व वैयक्तिक स्वातंत्र्य यांचे महत्त्व प्रत्येक क्षेत्रातील तत्त्वज्ञ प्रतिपादू लागले. याच्या उलट अनिर्बंध व्यवहार, खुला व्यापार, पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य ही जेथे देशकालपरिस्थितीस पोषक नाहीत असे दिसून आले, तेथे त्यांच्याविरुद्ध राष्ट्रव्यवस्थेवर जोर देण्यात येऊ लागला. इंग्रज अर्थशास्त्रज्ञांनी आपले सिद्धांत काही गृहीत प्रमेये धरून त्यापासून परिस्थितीचा विचार न करता केवळ तर्काने काढले, तर आता इतर अर्थशास्त्रज्ञ इतिहास, परिस्थितीचा अभ्यास व आकडेशास्त्र यांची जोड घेऊनच अर्थशास्त्रीय सिद्धांत बसविले पाहिजेत असे प्रतिपादू लागले आहेत. हे सर्व विवेचन रानडे यांनी निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांची नावे देऊन व त्यांचे प्रमुख सिद्धांत त्रोटकपणे सांगून सजविले आहे. या सर्व विवेचनाचा पुढीलप्रमाणे निष्कर्ष रानडे यांनी काढला आहे. अर्थशास्त्र हे व्यापक समाजशास्त्राचेच एक उपांग असल्यामुळे त्याचा विचारही मुख्यतः मानवेतिहासदृष्ट्या प्रत्यक्ष परिस्थिती अभ्यासून केला पाहिजे. त्यांतील सिद्धांतांची सापेक्षता सतत लक्षात ठेवली पाहिजे व या सर्व अभ्यासाचे ध्येय मुख्यतः समाजहित साधणे हे आहे हेही विसरता उपयोगी नाही. म्हणूनच आपणांस हिंदुस्थानच्या परिस्थितीस अनुरूप असाच विचार करणे प्राप्त आहे.

## काही रूढ सिद्धांतांची विचिकित्सा

रानडे यांनी हिंदी परिस्थितीबद्दल विचार करताना मुख्यतः दोन-तीन सिद्धांत परिक्षिले. भूपृष्ठाच्या भिन्न खंडाखंडांतील आर्थिक व्यवसाय-विभागणी-बाबतचा सिद्धांत हा त्यांतील पहिला होय. उष्ण प्रदेशांतील लोकांनी कृषिव्यवसाय नेहमी करावा व समशीतोष्ण प्रदेशातच आर्थिक धंदे चालावे, असे यांत्रिक युगातील काही इंग्रज अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादीत. त्यांच्या मते हा जणू एक निसर्गसिद्ध नियमच होता. रानडे यांनी याविरुद्ध जुना इतिहास व पुढील शक्यता यांकडे बोट दाखवून सद्यःकालीन परिस्थिती ही कशी तात्कालिक आहे हे स्पष्ट केले आहे. केवळ अलीकडील यांत्रिक उत्पादनाच्या स्पर्धेमुळे व तेही परकीय राज्यकर्त्यांनी या देशाच्या हिताचा दूरदृष्ट्या विचार न केल्यामुळे हिंदुस्थान व तत्सम देश हे फार मोठ्या प्रमाणात शेतकीप्रधान झाले. कोणाचाही तात्पुरता फायदा कितीही असला तरी ज्यात सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवसायांचे अस्तित्व योग्य प्रमाणात टिकून राहते अशा प्रकारचीच व्यवस्था शाश्वत व हितावह आहे; आणि म्हणून नवीन परिस्थितीमुळे जुने व्यवसाय बुडाले, काही जुनी पिके बिनफायदेशीर झाली तर हा परिस्थितीचा दोष असे मानून असहायपणे स्वस्थ न

असता, नवीन वसाहती वसविणे व कृषिव्यवस्थेस पद्धतशीर नवीन वळण लावणे हे शासनसंस्थेचे कर्तव्य आहे, असेच केव्हाही खरे अर्थशास्त्र मानील. तसेच खंड हा जमीनदाराचा निसर्गसिद्ध हक्क आणि त्याचे व कुळाचे किंवा धनकोचे व ऋणकोचे संबंध हे नेहमी अनियंत्रित असले पाहिजेत असे न मानता, व्यापक समाजहिताचा विचार करून संपत्तीची न्याय्य विभागणी करणे व जेथे शिरजोर जुल्म करीत आहेत तेथे गरीब व दुबळ्यांचे संरक्षण करणे हेच सरकाराचे खरे कर्तव्य ठरते. यापुढे जाऊन एकंदर सरकारी अधिकाराच्या अगर जबाबदारीच्या मर्यादेचा विचार केला असता त्याबद्दल कोणताच शाश्वत सिद्धांत मांडता येत नाही असे रानडे स्पष्ट लिहितात. हा प्रश्न व्यक्तिगत हक्क अगर आचार-स्वातंत्र्य यांबद्दलचा विचार करून सुटण्यासारखा नाही. काल व परिस्थिती, युक्तता व व्यवहार्यता यांकडे पाहूनच तो सोडवावा लागेल. इंग्लंडांतही सरकारने बऱ्याच नवीन जबाबदाऱ्या अलीकडे पत्करल्या आहेत व हिंदुस्थानात तर त्यास अनेक क्षेत्रांत प्रवेश करणे प्राप्त आहे. या बाबतींत अमेरिका व युरोप खंडांतील काही देश यांतील परिस्थितीशी हिंदुस्थानचे इंग्लंडपेक्षा पुष्कळच जास्त साम्य आहे, म्हणून तेथील अनुभव व तेथील विचार आपणांस जास्त लागू पडतात असे समजून आपले राष्ट्रीय धोरण आखणे आवश्यक आहे.

## ‘हिंदी राष्ट्रीय अर्थशास्त्र’

रानडे यांच्या या लेखाचा मथळा ‘इंडियन पोलिटिकल इकॉनमी’ असा आहे. याचे भाषांतर ‘हिंदी अर्थशास्त्र’ असे केले तर ते पूर्णपणे यथार्थ होत नाही. ॲडॅम स्मिथच्या ग्रंथाचा प्रमुख विषय राष्ट्राच्या संपत्तीची वाढ असा होता व त्याच्यानंतर जवळजवळ १०० वर्षेपर्यंत या स्मिथप्रणीत शास्त्रास नुसते ‘अर्थशास्त्र’ किंवा ‘संपत्तिशास्त्र’ न म्हणता ‘राष्ट्र-संपत्तिशास्त्र’ (पोलिटिकल इकॉनमी) असेच म्हणण्याचा प्रघात होता. त्या वेळी अर्थातच एकंदर राष्ट्र-संपत्तीचा साकल्याने विचार करणे व सरकारी धोरणाचा विशेषाने ऊहापोह करणे हे या शास्त्राचे प्रमुख अंग समजले जात असे. अलीकडे समाज, राष्ट्र व सरकार यांवर जुन्या काळी देण्यात येणारा भर कमी करण्यात आला असून सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांचा सर्वसामान्य विचारच विशेषाने केला जातो. म्हणूनच राष्ट्र-संपत्तिशास्त्राचे ऐवजी केवळ संपत्तिशास्त्र अथवा अर्थशास्त्र हे नाव आज या शास्त्रास जास्त अन्वर्थक वाटते. हे अलीकडील नाव रानड्यांच्या काळी तितकेसे रूढ झालेले नव्हते. शिवाय रानड्यांची दृष्टी समाजहित व राष्ट्रहित यांजवरच जास्त होती. त्यामुळे त्यांनी आपल्या निबंधास ‘इंडियन इकॉनॉमिक्स’–हिंदी अर्थशास्त्र-असे नाव न देता, ‘इंडियन पोलिटिकल इकॉनमी’ – हिंदी राष्ट्रीय अर्थशास्त्र – असे नाव दिले असावे. या निबंधात रानडे यांनी ज्याप्रमाणे हिंदी परिस्थिती ध्यानात घेतली असता आर्थिक व्यवहाराबाबत कोणत्या प्रकारचे सिद्धांत बांधता येतात याचा विचार केला, त्याचप्रमाणे हिंदी राष्ट्रास कोणते आर्थिक धोरण स्वीकारणे युक्त ठरेल याबद्दलही आपले विचार मांडले आहेत. अलीकडे इंग्लंडातही कारखाने, मजूरसंघ इत्यादींच्या व्यवहारांवर सरकारी निर्बंध घालण्यात येऊन निर्भेळ, अनिर्बंध व्यवहाराच्या तत्त्वास बाध आला आहे. हिंदुस्थानातील परिस्थिती फार मागसलेली. तेथे स्वयंस्फूर्तीने नवीन गोष्टी करण्याची एतद्देशीयात प्रथा नाही. तेव्हा येथील शासनसंस्थांना–विशेषतः इंग्रज सरकारला–स्वतः पुष्कळच बाबतींत पुढाकार घेणे जरूर आहे. कापूस, कोळसा, चहा इत्यादिकांच्या उत्पादनाविषयी सरकारने थोडे प्रयत्न केले आहेत; पण या देशाचे एकंदर क्षेत्र व येथील विविध उत्पादनसाधने यांच्या मानाने ते फारच अपुरे पडतात. जरी राजकीय कारणांमुळे संरक्षक जकाती लादणे सरकारास शक्य नसले तरी नवीन धंद्यांचा उपक्रम करणे अगर त्यांना हरतऱ्हेने मदत करणे हे सरकारास खचित करता येईल. त्याचप्रमाणे आधुनिक पद्धतीची राष्ट्रीय पतपेढी व्यवस्था (Bankig system) उभारणे

किंवा सरकारास लागणाऱ्या सर्व जिनसांच्या पुरवठ्यासाठी स्थानिक मालाचा उपयोग करून घेणे, या गोष्टी सरकारी कर्तव्याच्या मर्यादेत येतात.

रानडे यांनी या निबंधात मांडलेल्या प्रमुख विचारांचे येथवर दिग्दर्शन झाले. हे मुद्दे ५० वर्षांनंतर पारखले असता त्याबाबत काय म्हणता येईल एवढेच आता थोडक्यात सांगावयाचे.

## विचारांची काल-परिस्थिति-सापेक्षता

रानड्यांची दृष्टी फार व्यापक होती. त्यामुळे त्यांनी आपल्या विचारांची बैठक अशी मांडली आहे की, एवढ्या कालावधीनंतर तीत कोठेही जुनेपणा दिसून येत नाही. जो लेखक केवळ आपल्या काळापुरता अगर परिस्थितीपुरता विचार करून लिहितो त्याचे लिखाण तात्कालिक परिणामी ठरले तरी ते पुढील पिढीस उद्बोधक वाटत नाही. रानड्यांच्यासारख्या द्रष्ट्यांचे असे नसते. एखाद्या केवळ तात्पुरत्या महत्त्वाच्या बाबीसंबंधी जरी त्यांनी लिहिले तरी ते असे मूलभूत सिद्धांत मांडून लिहिलेले असावयाचे की त्यांचे सिद्धांत परिस्थिती पूर्ण बदलल्यावरही भावी पिढीस मार्गदर्शक व्हावे. हा निबंध लिहिताना तर रानडे बुद्ध्याच मूलभूत सिद्धांताबद्दल लिहीत होते. तेव्हा त्यातील लिखाण आजही मौलिक ठरल्यास आश्चर्य नाही. या निबंधातील सिद्धांत क्रमाक्रमाने घ्यावयाचे तर पहिला सिद्धांत समाजशास्त्राच्या मूलभूत विचाराची काल-परिस्थिति-सापेक्षता हाच घ्यावा लागेल. १९ व्या शतकात भौतिकशास्त्राची जी अद्‌भुत प्रगती झाली त्यामुळे सर्व लोकांचे डोळे दिपून गेले व त्या शास्त्रात अवलंबिलेल्या पद्धतीने समाजविषयक प्रश्नांचा विचार केल्यास निरनिराळ्या समाजशास्त्रांतही अशीच प्रगती होऊन आपणांस मूलगामी सिद्धांत शाश्वत बसवता येतील असे कित्येकांस—विशेषतः इंग्रज शास्त्रज्ञांस—वाटत होते. हा ग्रह आता फार दिवसांच्या अनुभवाने बदलला आहे. भौतिकशास्त्राने अवलंबिलेली विचारपद्धतीही खरे पाहता काही नवीन नाही. पाश्चात्य विचारौघातही ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी अवलंबिलेल्या विवेचनपद्धतीहून निराळे असे तीत काहीच नव्हते. फक्त इतक्या व्यापक क्षेत्रात व सतत इतका कालपावेतो या पद्धतीचा उपयोग पूर्वी करण्यात आला नव्हता, एवढाच त्यातील फरक होय. १५ व्या शतकापासून पुढे विशिष्ट अनुकूल परिस्थितीमुळे युरोपात सृष्ट जगाच्या निरीक्षणाबाबत तो करण्यात आला व त्याचे फळही फार चमत्कृतिजनक असे आले.

भौतिकशास्त्राची करामत आणि त्यातील शास्त्रज्ञांनी आपापल्या क्षेत्रात मिळविलेला निर्विवाद अधिकार ही पाहून समाजशास्त्रज्ञांस आपणही तसेच प्रगत व्हावे असे वाटणे साहजिक होते. परंतु अनेक मूलभूत अडचणींमुळे त्यांस ते शक्य झाले नाही व आजही शक्य होईलसे वाटत नाही. अर्थशास्त्र हे सर्वसामान्य अर्थव्यवहाराबद्दलचे त्रिकालाबाधित सिद्धांत बांधणारे शास्त्र आहे असा आव अगदी अलीकडील काही अर्थशास्त्रज्ञ आणतात. परंतु या त्यांच्या प्रतिपादनाचा फोलपणा त्या सर्वांच्या लिखाणाकडे पाहिले असता सहज दिसून येतो. भौतिक शास्त्रांतील प्रगतीची मुख्य साधने म्हणजे व्यापक निरीक्षण व नियंत्रित प्रयोग. यांपैकी दुसरे साधन समाजशास्त्रज्ञास उपलब्धच नाही असे म्हटले तरी चालेल. व्यापक निरीक्षणाबाबतही अनेक अडचणी आहेत. केवळ माहिती मिळविण्याच्या अडचणी जरी सोडून दिल्या तरी निर्हेतुक व निर्विकार निरीक्षणाच्या शक्यतेची अडचण ही खरोखर मूलगामी आहे. विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट लोक विशिष्ट रीतीने वर्ततात याबद्दल त्यांच्या बाह्य वर्तनाचे सूचक म्हणून जरी काही माहिती व आकडे गोळा केले, तरी जेव्हा कार्यकारणसंबंध दाखविण्याची वेळ येते तेव्हा त्यांचे मनोव्यापार कसे चालतात याचा विचार केल्याशिवाय गत्यंतर उरत नाही. कारण मनुष्याची वागणूक ही निर्जीव पदार्थांसारखी किंवा बहुतेक सजीव प्राण्यांसारखी अमुक परिस्थितीत अमुकच असावयाची असे गृहीत धरून चालणे शक्य नाही. आणि या मनोव्यापारांबद्दल विचार केला

म्हणजे एक तर निरीक्षकाच्या स्वतःच्या मनोवृत्तींचा निरीक्षणावर परिणाम होत नाही असे निश्चित सांगता येत नाही. कोणी कितीही म्हटले तरी त्याचे परीक्षण अगर निरीक्षण हे निर्हेतुक असते म्हणजे स्वतःच्या मनोवृत्तीशी त्याचा काही संबंध नसतो असे म्हणणे कठीण आहे.

## ताजे उदाहरण

याचे एक ताजे उदाहरण म्हणजे नवीन निरपेक्ष सिद्धांतपक्षीय अनेक इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचेच देता येईल. अर्थशास्त्रज्ञास इष्ट अगर साध्य काय याचा विचार कर्तव्य नाही, त्याने फक्त निर्हेतुक निरीक्षण करावे व त्यावरून निरपेक्ष सिद्धांत बांधावे असे यांतील बहुतेक जण नेहमी म्हणतात. पण या सर्वांचे लिखाण पाहिले म्हणजे ते सगळेच इतके पूर्वग्रहयुक्त प्रमेयांनी दूषित दिसते की, ज्या गोष्टी टाळाव्या असे ते म्हणतात त्या टाळणे त्यांना स्वतःलाच शक्य नाही हे उघड होते. अनिर्बंध व्यवहार, व्यक्तिस्वातंत्र्य, खुला व्यापार इत्यादी इंग्रज रक्तात मुरलेल्या सिद्धांतांचा प्रच्छन्न पुरस्कार शास्त्रीय लिखाणाचे नावाखाली केलेला पाहिला म्हणजे या शास्त्रीयतेच्या संभाव्यतेची मर्यादा चटकन कळून येते.[1] निर्विकार व निर्हेतुक निरीक्षण हे जसे दुरापास्त आहे तसेच आजच्या परिस्थितीतील व्यक्तींचे आचरण अथवा समाजाची वृत्तीही पूर्वी अशीच होती अगर पुढे अशीच राहील असे समजणेही योग्य नाही. मनुष्याच्या मनोव्यापारावर बाह्य परिस्थितीइतकीच त्याच्या डोक्यातील कल्पनांची पकड असते. वैचारिक चळवळीच्या या काळात हा सिद्धांत जास्त स्पष्ट करावयास नको. पण त्याचा समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या शाश्वततेशी फार निकट संबंध आहे. एवंच रानड्यांनी समाजशास्त्रांतील सिद्धांताच्या मर्यादा ज्या ५० वर्षांपूर्वी निर्देशिल्या त्या त्या वेळेस जरी अनेकांस पटण्यासारख्या नव्हत्या तरी आज बहुतांशी सर्वमान्य झाल्या आहेत. जरी मानवी मनोव्यापाराबद्दलच्या थोड्या प्रमेयांवर अगदी तर्कशुद्ध रीतीने मोठी इमारत उभारली तरी ती शुद्ध पायावर रचलेली व स्थिर आहे किंवा नाही हे वेळोवेळी व ठिकठिकाणी प्रत्यक्ष परिस्थितीशी पडताळून पाहिल्याखेरीज ठरविणे शक्य नाही. हा विचार नवीन पक्षांतील काही अर्थशास्त्रज्ञसुद्धा आज मान्य करू लागले आहेत.[2]

## डॉ. कॅनन यांचा दुजोरा

समाजशास्त्रातील सिद्धांतांच्या सापेक्षतेस धरूनच रानडे यांनी इंग्रजी अर्थशास्त्राच्या विकासाबद्दल विस्तृत विवेचन केले आहे व इंग्रज लेखकांचे विचार कसे परिस्थितिजन्य होते हे त्यात दाखविले आहे. ऐतिहासिक दृष्ट्या विचार करणारे इंग्रज लेखकही ही गोष्ट आज कबूल करतात. रानडे यांच्या या व्याख्यानानंतर चार वर्षांनीच डॉ. कॅनन यांनी आपला 'उत्पादन व विभाजन विचारांचा इतिहास' हा मोठा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यात माल्थस, रिकार्डो, मिल्ल इत्यादिकांचे बरेच सिद्धांत ठिकठिकाणी कसे तर्कदुष्ट आहेत हे त्यांनी विस्तृतपणे दाखविले आहे. त्याबरोबरच त्यांनी जे सिद्धांत मांडले ते सभोवारच्या परिस्थितीस कसे अनुरूप होते व त्या लेखकांच्या स्वतःच्या आर्थिक धोरणाबद्दलच्या ग्रहांना कसे अनुकूल होते, हेही त्यांनी स्पष्टपणे दाखविले आहे. आज अर्थातच मार्क्सवादाची पकड जिकडे तिकडे एवढी बसलेली असता मनुष्याचे विचार हे त्याची परिस्थिती, त्याचे हितसंबंध व त्याचे पूर्वग्रह यांच्याशी कसे निगडित असतात हे विशेषाने सांगण्याची जरुरी नाही. विचारवंतांची भूमिका

१. या नवीन पक्षाचे प्रातिनिधिक लेखक म्हणून प्रो. रॉबिन्स यांचे सर्वच लिखाण परीक्षणीय आहे.

२. Hicks, 'Value and Capital' या ग्रंथाची प्रस्तावना पाहा.

ही परिस्थितिजन्य असते व त्यांच्या विचारांचा रोख हा त्यांच्या भोवतालच्या घडामोडींवरून बहुतांशी ठरतो असे मार्क्सवादांतील आत्यंतिक सिद्धांतांचा पुरस्कार न करणाऱ्यासही सहज म्हणता येईल. यांत्रिक युगाच्या आर्थिक परिणामाविषयी जी मीमांसा युरोपीय अर्थशास्त्रज्ञांनी केली तिचा इतिहास या दृष्टीने फार उद्बोधक आहे. यांत्रिक युगाच्या अगदी सुरुवातीस यांत्रिक उत्पादनामुळे जुन्या कारागिरीच्या धंद्यांवर अनिष्ट परिणाम घडून बेकारी व असंतोष यांची काही दृश्ये दिसली; परंतु थोड्याच काळात यांत्रिक उत्पादनाच्या खपाची मर्यादा जशी जगभर वाढू लागली तसतसे या अनिष्ट परिणामांऐवजी वाढते उद्योग व वाढती मजुरी ही जास्त ठळकपणे डोळ्यांत भरू लागली. त्यामुळे जरी प्रारंभी प्रत्येक युरोपीय देशात अर्थशास्त्रज्ञांनी यांत्रिक उत्पादनाच्या प्रसाराच्या अनिष्ट परिणामाकडे लक्ष दिले तरी शेवटी सर्वांचा भर त्याचे हितावह परिणाम काय झाले याजवरच मुख्यतः राहिला. यांत्रिक उत्पादनाच्या प्रसाराचे अनिष्ट परिणाम पुढारलेल्या औद्योगिक देशांत फार थोडा काल आणि अत्यल्प प्रमाणात भासल्यामुळे संक्रमणावस्थेतील परिस्थितीचा विचार फारसा महत्त्वाचा नाही असेच सर्व अर्थशास्त्रज्ञांनी मानले. यांत्रिक उत्पादनाने बेकारी होतच नाही, झाली तरी ती तात्पुरतीच असते आणि तिच्याबरोबरच उद्योगधंद्यांची वाढ फार होते असे सिद्धांत इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, या देशांतून मांडले गेल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण तेथील परिस्थिती व हे सिद्धांत यांत विशेष विरोध दिसून येत नव्हता. पण त्याचे उलट एखाद्या हिंदी अर्थशास्त्रज्ञाने जर या प्रश्नाचा विचार केला तर त्यास अनिष्ट परिणामच प्रामुख्याने दिसतील व संक्रमणावस्था ही अल्पकालीन नसून आपल्या देशापुरती तरी निदान कायमचीच आहे की काय असा भास होईल. तेव्हा या बाबतीतील त्याचे सिद्धांत हे निराळेच असणार. अगदी सर्वसामान्य असे काही थोडे सारखेच लिहिले तरी आर्थिक धोरणाबाबतचे विचार व एकंदर विवेचनाचा भर याविषयी या निरनिराळ्या परिस्थितीमुळे युरोपीय व हिंदी अर्थशास्त्रज्ञांचे लिखाणांत महदंतर पडणारच. (येथे एक गोष्ट प्रांजलपणे नमूद करणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखक जेव्हा सुमारे १८ वर्षांपूर्वी विलायती पदवी संपादून हिंदुस्थानात परत आला तेव्हा त्याचे विचार याहून भिन्न होते; त्यामुळे डॉ. केतकर यांनी ज्ञानकोशात स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र स्थापण्याची आवश्यकता प्रतिपादिली असता तीस विद्यासेवकात आपला मराठीतील पहिला लेख लिहून त्याने कसून विरोध केला. आज मात्र त्याचे विचार स्वतःच्या जुन्या लेखापेक्षा डॉ. केतकरांशी जास्त जुळते आहेत.)

## समाज-नियंत्रण हीच प्रकृती

ऐतिहासिक दृष्ट्या विचार करता अर्थशास्त्रज्ञांचे सिद्धांत कसे प्रतिक्रियारूप असतात हे पटले, म्हणजे कोणत्याही एका सिद्धांताची महती व युक्तता ही सदैव टिकणे शक्य नाही हे उघड होते. १९ व्या शतकात इंग्रज अर्थशास्त्रज्ञांचे सर्व लिखाण अनिर्बंध व्यवहाराच्या तत्त्वाच्या पायावर उभारलेले होते. अनिर्बंध व्यवहार ही आर्थिक व्यवस्थेची मूळ प्रकृती, व तो सुटला म्हणजे ती विकृती झाली असे हे अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादीत. या प्रतिपादनाचा फोलपणा रानडे यांनी ऐतिहासिक व व्यावहारिक विवेचन करून दाखविला. ऐतिहासिक दृष्ट्या स्मिथ व तत्कालीन लेखकांचे सिद्धांत हे तत्कालीन परिस्थितिजन्य होते हे आज सर्वच कबूल करतात. यांत्रिक क्रांतीच्या आघाडीवर असलेल्या, विशेषतः इंग्लंडसारख्या, राष्ट्रांच्या प्रगतीस अनिर्बंध व्यवहार पोषक ठरला हेच त्याची पकड इतका वेळ टिकण्याचे मुख्य कारण होय. अर्थात इंग्रजांनी अनिर्बंध व्यवहाराचा पुरस्कार केला, म्हणून तो सर्वांनाच सर्व काळी हितावह होईल असे म्हणणे केवळ हास्यास्पद आहे. किंबहुना रानडे यांनी लिहिल्याप्रमाणे आत्यंतिक अनिर्बंध व्यवहाराचा पक्ष धरणे, म्हणजे मूलतः समाजधारणेचे फायदे घालविणे असेच ठरेल. कोणत्याही

समाजाच्या अस्तित्वास व प्रगतीस ज्या अर्थी समाजनियंत्रण हे आवश्यक असते, त्या अर्थी नियंत्रणास प्रकृती मानणे हेच केव्हाही श्रेयस्कर होय. अर्थात नियंत्रणाची शक्यता व त्याची व्याप्ती हे देशकालमानास अनुसरूनच ठरवावे लागते. पण नियंत्रणाच्या मर्यादा ठरवावयाच्या त्या केव्हाही शाश्वत सिद्धांतांच्या रूपाने मांडता येत नाहीत. एकंदर परिस्थितीचा विचार करून इष्ट काय व शक्य काय या दृष्टीने त्या दर वेळी निश्चित कराव्या लागतात. असे म्हटले म्हणजे या मर्यादा वेळोवेळी बदलतील व त्या प्रत्येक देशाच्या परिस्थितीवर अवलंबून राहतील, हेही कबूल करावे लागते. मागे उल्लेखिलेल्या नवीन इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या गटापैकी काही आग्रही लेखक वगळल्यास आज हे सिद्धांत सर्वमान्य झालेले आहेत. रानड्यांनी दर्शविल्याप्रमाणे इंग्रज अर्थशास्त्रज्ञ नेहमी अनिर्बंध व्यवहाराचा पुरस्कार करीत आलेले आहेत. परंतु गेली १५-२० वर्षे त्यांच्यातील प्रमुखांसही अनिर्बंध व्यवहाराबद्दलच्या जुन्या सिद्धांतातील उणेपणा दिसून आला आहे. जगभर नाणावलेले इंग्रज अर्थशास्त्रज्ञ मि. केन्स यांनी सुमारे १५ वर्षांपूर्वी 'अनिर्बंध व्यवहाराची इतिश्री' या नांवाचे एक पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात सरकारने काय करावयाचे अथवा काय करावयाचे नाही याबाबत अर्थशास्त्रज्ञ काही चिरकालिक नियम घालू शकत नाहीत असेच मुख्यतः प्रतिपादिले आहे. अलीकडे प्रो. व्हायनर यांनी अमेरिकन अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष या नात्याने भाषण करताना या प्रतिपादनासच निराळ्या तऱ्हेने पुष्टी दिली. अनिर्बंध व्यवहार इत्यादी गेल्या शतकात उदारमतवादी मानलेल्या सिद्धांताबद्दल ते म्हणाले की, त्यांचा पुरस्कार करतांना ते शास्त्रीय सिद्धांत असे म्हणून चालणार नाही; त्यांस विचारांची अगर मनाची एक प्रवृत्ती असेच मानावे लागेल. तेव्हा आज तरी रानडे यांच्या याबाबतच्या सिद्धांतातील अचूकपणा व दूरदर्शीपणा याविषयी जास्त लिहावयास नको.

## इंग्रजी सिद्धांतांचे दडपण

या निबंधात रानडे यांनी मांडलेल्या व्यापक व सूचक सिद्धांतांपैकी एक महत्त्वाचा सिद्धांत अगदी जाता जाता व ओझरता मांडला आहे. या सिद्धांताची व्याप्ती त्यांनी सर्व क्षेत्रांत विशद करून दाखवली नाही, तरी त्या सिद्धांताचे महत्त्व फार मोठे असल्यामुळे त्याकडे येथे विशेष लक्ष दिले पाहिजे. इतर अनेक ठिकाणी इंग्रजी राज्यापासून झालेले फायदे रानडे यांनी विवेचिले. या निबंधात मात्र त्यांचे लक्ष तोट्यावरही गेलेले आहे. इंग्रजी विचार व इंग्रजी अनुभव हे हिंदुस्थानास गैरलागू आहेत; त्यांचा पुरस्कार केला व सर्व बाबतीत इंग्रजी उद्दिष्टेच आपल्या डोळ्यासमोर ठेवली तर अनर्थावह परिस्थिती उत्पन्न होते. इंग्लंडसारख्या संपन्न, बलवान व जगन्मान्य राष्ट्राचे अनुकरण करणे आपणांस साधावयाचे नाही व तसे करणे योग्यही नाही. रानडे यांच्या या मताची सत्यता पटण्यास आर्थिक धोरणाचा विचार केला पाहिजे असे नाही. सर्व समाजजीवनात त्याची यथार्थता वेळोवेळी पटते. आपल्याकडे आज जे अनेक प्रश्न बिकट होऊन बसले आहेत, त्यांची उकल इंग्रजी उद्दिष्टे व इंग्रजी साधने यांचे आपल्या मनावरील दडपण काढून टाकल्याविना व्हावयाची नाही. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराचाच प्रश्न घेतला, तरी तेथेही जोपर्यंत इंग्रजी उद्दिष्टे आपल्या डोळ्यासमोर आहेत, तोपर्यंत आपणास कधीच काहीही करता येण्यासारखे नाही असेच वाटेल. पण जपानसारख्या राष्ट्राचा अनुभव लक्षात घेतला, म्हणजे ही गोष्ट तितकी दुःसाध्य वाटत नाही. किंवा नवीन प्रांतरचनेच्या प्रश्नाच्या चर्चेतही विचार असाच नेहमी उलट्या दिशेने चाललेला आढळून येतो. पगाराचे व एकंदर नोकरसंख्येचे प्रमाण हे आधी गृहीत धरून मग प्रांतमर्यादा ठरवायच्या की इष्ट मर्यादा ठरवून मग त्यात आपणांस काय पगारमान वगैरे झेपेल हे पाहावयाचे? पण आपल्याकडे सर्वांचीच इंग्रजी सिद्धांत व अनुभव यांनी दिशाभूल झालेली आढळते. त्यामुळे अनेक क्षेत्रांत खाईन तर तुपाशी नाही तर उपाशी, अशा अविचारी धोरणाचा पुरस्कार

विचारवंतही करताना आढळतात. इंग्लंडसारख्या संपन्न राष्ट्राचे अनुकरण आमच्यासारख्या दरिद्र्यांनी करणे हे बैल-बेडूक न्यायाने किती हास्यास्पद आहे हे आपण नेहमी लक्षात बाळगणे जरूर आहे.

हिंदी आर्थिक धोरणाबाबत रानडे यांनी उल्लेखिलेल्या बाबी आज नवीन वाटणार नाहीत. त्यांच्या काळापासून ह्या गोष्टींचा पुरस्कार बहुतेक हिंदी पुढारी व लेखक करीत आले व त्यांपैकी बहुतेक आज सरकाराने तत्त्वतः स्वीकारल्या आहेत. किंबहुना आजचे लेखक रानडे यांच्याही बरेच पुढे जात आहेत असे वाटण्यासारखे आहे. पूर्ण अनिर्बंध व्यवहाराच्या साम्राज्याच्या काळात मांडलेले हे विचार आजच्या पूर्ण नियोजित व्यवस्थेच्या पुरस्काराच्या काळात काहीसे अपुरेही वाटतील. परंतु आम्ही वेळोवेळी म्हटल्याप्रमाणे खरा मुद्दा तपशिलाचा नसून तात्त्विक भूमिकेचा आहे. आणि त्याबाबत रानडे यांनी स्वीकारलेला पक्ष आजही निर्दोष वाटतो. अनिर्बंध व्यवहार किंवा पूर्ण नियोजन या दोनही पक्षांत आत्यंतिक आग्रह हा आढळतोच. तो टाळावयाचा असल्यास रानडे यांनी घालून दिलेल्या व्यवहार्यतेच्या कसोट्याच योजल्या पाहिजेत.

## हिंदी अर्थशास्त्राची रानड्यांच्या नंतरची प्रगती

शेवटी हिंदी अर्थशास्त्राची रानडे यांच्यानंतरची प्रगती याविषयी दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. ही प्रगती बरीच व अनेक दिशांनी झाली आहे. आज अर्थशास्त्र महत्त्व पावले असून, त्याचे अध्यापक व अभ्यासक ठिकठिकाणच्या शिक्षणसंस्थात असतात. विशिष्ट हिंदी आर्थिक प्रश्नांकडे या अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष गेले असून, गेल्या २०-२५ वर्षांत याबाबतचे संशोधन व लिखाण पुष्कळच बाहेर पडले आहे. तसेच सरकारी कमिट्या व कमिशने यांनी हिंदी आर्थिक परिस्थितीची निरनिराळी अंगे अभ्यासिली. एकंदर हिंदी आर्थिक जीवन व धोरण यांबाबत बराच विचार झाला, व झाला त्याहूनही बारकाव्याचा विचार चालू आहे. हे सगळे झाले, तरी रानडे यांनी या निबंधात स्वीकारलेल्या भूमिकेवरून अर्थशास्त्रीय विचारांची स्वतंत्र मांडणी करण्याचा उपक्रम केलेला मात्र कोठे दिसून येत नाही. क्वचित प्रसंगी हिंदी समाजरचना अगर संस्था यांचा पुरस्कार करण्याच्या अभिनिवेशाने काही लिहिले गेले असले, तरी ते केवळ आग्रही दिसते. अशा लिखाणात शास्त्रीयतेचा बहुशः अभावच असतो. हा उणेपणा आजतागायत राहण्याची कारणे अनेक असू शकतील. एक तर, हिंदुस्थानचे अफाट क्षेत्र व विविध परिस्थिती या मानाने अभ्यासकांची संख्या आजही अपुरी आहे. आणि अभ्यासकांस उपलब्ध असलेली साधने व वेळ हीही फार मर्यादित आहेत. परंतु खरे महत्त्वाचे कारण, म्हणजे हिंदी अभ्यासकांच्या मनावर बसलेली इंग्रजी विचारांची पकड हेच असावे. इंग्रजी विश्वविद्यालयीन पदव्यांस सर्वच क्षेत्रात जो विशेष मान अलिकडे प्राप्त झाला आहे, त्याचा हा परिणाम असावा. स्वतंत्र विचाराचा प्रवाह काय तो तिकडेच चालणार व तेथील सिद्धांतनास अनुसरूनच आपल्या परिस्थतीप्रमाणे आम्ही लिहिणार असेच बहुतांशी अलीकडे होऊन बसले आहे. प्रत्यक्ष विलायतेहून नुकत्याच आलेल्या ताज्या पदवीधरास येथील मुरलेल्या अभ्यासकाहूनही जास्त कळते अशा प्रकारची वृत्ती अनेक ठिकाणी दिसून येते. यामुळे येथील अभ्यासकांचा निरुत्साह होतो. इतकेच नव्हे, तर इंग्लंडामधून शिकून आलेल्यांतही तेथील किनारा सुटला की आपली वाढ थांबते अशी भावना उत्पन्न होते. रानडे यांच्याइतक्या स्वतंत्र प्रज्ञेची माणसे केव्हाही विरळच असणार. परंतु शिवाय आपल्या अभ्यासकांत विचारांचा व्यापकपणा व आत्मविश्वास ही दोन्ही कमी पडतात, असे कष्टाने म्हणावे लागते. नाही म्हणावयास आपल्याकडे स्वतंत्र रीतीने विचार करून धडाडीने सिद्धांतन करण्याचा प्रयत्न म्हणजे समाजशास्त्रात डॉ. श्री. व्यं. केतकर यांचाच समजावयाचा. त्यांनी आर्थिक व्यवहाराबद्दलही थोडे सूचक असे लिहिले, याबद्दल मागे एका ठिकाणी उल्लेख केलाच आहे. केतकरांच्या कार्यक्षेत्राचे स्वरूप व त्यातील अनेक अडचणी यांमुळे

त्यांस नवीन सिद्धांतनाकडे विशेष लक्ष देता आले नाही व त्यात तितकेसे यशही आले नाही. परंतु रानड्यांनी दाखविलेल्या व डॉ. केतकरांनी अंशतः आक्रमिलेल्या मार्गानेच आपणांस पुढे जावयाचे आहे. आपले अर्थशास्त्र हे केव्हाही गरीब व मागासलेल्यांचे अर्थशास्त्र आहे. त्याचे एकंदर रूप व रंग ही केव्हाही संपन्न व प्रगत राष्ट्रांच्या अर्थशास्त्रापेक्षा निराळी असणार[1] आणि या दृष्टीने हिंदी अर्थशास्त्राचा विकास झाल्यावरच आपल्या राष्ट्रीय आर्थिक धोरणाबाबत भरीव कामगिरी अर्थशास्त्रज्ञांस करता येईल.

*सह्याद्रि* १५ : १ जानेवारी १९४२ (रानडे विशेषांक) पृ० ३१–३८

☆

१. याच्या पुष्ट्यर्थ एकच उदाहरण पुरेसे आहे. गेली दहाबारा वर्षे आर्थिक जीवनात मुख्य प्रश्न उत्पादनाचा उरलेला नसून, केवळ विभागणीचाच उरला आहे, असे सर्व पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ–मि. केन्स धरून–प्रतिपादितात. त्यांना हिंदुस्थान व चीन यांमधील अर्धपोटी असलेल्या असंख्य जनतेची दखलच नाही असे दिसते.

# ७ . . टिळकांचा आर्थिक व्यवहारवाद

लोकमान्य टिळक हे एक थोर राजकारणी मुत्सद्दी होते; त्यांचा व्यवसाय पत्रकर्त्याचा होता. या दोन्ही नात्यांनी आर्थिक प्रश्नांशी त्यांचा निकटचा संबंध आला. लोकमान्यांनी स्वतःच्या विचारसरणीकडे लोकांना प्रवृत्त करावे या उद्देशाने वृत्तपत्रकाराचा धंदा पत्करिला होता. जोपावेतो त्यांची विशिष्ट अशी विचारसरणी स्पष्ट झाली नव्हती व निराळी होऊनही मान्यता पावली नव्हती तोपावेतो वृत्तपत्रीय लिखाणाकडे टिळकांनी साहजिकच जास्त लक्ष पुरविले; हळूहळू जसे त्यांस अखिल भारतीय पुढारीपण प्राप्त झाले तसतसे वृत्तपत्राकडील त्यांचे स्वतःचे लक्ष कमी होऊन राजकीय चळवळीस प्राधान्य मिळाले. त्यांच्या उपलब्ध लिखाणात या स्थित्यंतराचा स्पष्ट पुरावा सापडतो. साधारणपणे १९०५ सालच्या पुढे केसरीतील टिळकांच्या लेखांची संख्या पूर्वीपेक्षा कमी झालेली आढळते. तसेच लेखांच्या विषयांतील विविधता कमी होऊन आपल्या राजकीय पक्षाची विचारप्रणाली व कार्यक्रम यांवरच बहुतेक जोर लेखांत आढळून येतो. पूर्वीप्रमाणे अनेक विषयांवर लिहिण्यास त्यांस वेळ मिळत नव्हता व त्यांचे सारे लक्ष आपल्या विशिष्ट कार्यक्रमावर केंद्रित झाले होते हेच यावरून दिसते, असे म्हणण्यास हरकत नाही.

## लेखनाचे विषय

लोकमान्यांच्या एकंदर आर्थिक प्रश्नांबाबतच्या लिखाणास, तसेच शेतकी व शेतकऱ्यांबाबतच्या लिखाणासही वरील नियम लागू पडतो. लोकमान्यांच्या 'केसरी'तील लेखांच्या खंडांत १९१४ नंतरच्या लेखांत विशिष्ट आर्थिक प्रश्नावर असा लिहिलेला एकही लेख सापडत नाही. १९१४ च्या अलीकडील काळातही १९०५ साली लिहिलेले 'सुताचा व विणकामाचा धंदा' हे दोन लेख सोडल्यास सन १९०४ नंतर लोकमान्यांनी स्वदेशी या विषयाखेरीज कोणत्याही आर्थिक प्रश्नावर केसरीत लिहिलेले आढळत नाही; आणि स्वदेशीवर लिहिले तेही मुख्यतः आपल्या चतुःसूत्रीतील एक सूत्र म्हणून. १९०३ सालपर्यंत मात्र निरनिराळ्या आर्थिक प्रश्नांवर स्वतंत्रपणे व विस्तृतपणे लिहून त्यांचा ऊहापोह व त्याबद्दलचे मतप्रदर्शन टिळकांनी केलेले आढळते. अर्थात हेही जे लिहिले ते राजकारणी वर्तमानपत्रकर्ते म्हणून लिहिले हे लक्षात ठेविले पाहिजे. आर्थिक प्रश्नांबाबत त्यांची काही निराळी शास्त्रज्ञाची भूमिका नव्हती; प्रसंगोपात्त विशिष्ट प्रश्न तात्कालिक महत्त्व पावला म्हणजे त्याबाबत जनतेची बाजू घेऊन सूचना करणे व टीका करणे या प्रकारचेच हे आर्थिक लिखाण होते. यामुळे बहुतेक बाबतींत सामान्यपणे राष्ट्रीय पक्षातील प्रचलित विचारसरणीचा अवलंब व पुरस्कार टिळकांनी आपल्या लेखांत केलेला आढळतो. ही गोष्ट अपरिहार्य होती. टिळकांचा पेशा अर्थशास्त्रज्ञाचा नव्हता, किंवा रानडे-गोखले यांच्याप्रमाणे त्यांनी या विषयाचा मुद्दाम अभ्यासही केलेला नव्हता. तेव्हा कोणत्याही

प्रचलित महत्त्वाच्या प्रश्नावर केसरीत लिहिताना किंवा इतर प्रतिपादन करताना दादाभाई, रानडे, दत्त, वाच्छा इत्यादी नामांकित हिंदी तज्ज्ञांच्या मताचा हवाला देऊन विस्तार करणे हे साहजिकच घडले. रानड्यांच्याप्रमाणे तत्कालीन हिंदी आर्थिक विचारास अगदी वेगळे वळण लागेल असे टिळकांनी काही लिहिले असेल अशी अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. असे असले तरी टिळकांच्या इतर लिखाणाप्रमाणे अर्थशास्त्रीय लिखाणातही काही विशेष आढळतात.

## आर्थिक भूमिका

टिळकांनी अर्थशास्त्रीय विचारांत काही विशेष नवीन भर घातली नाही, तरी राजकारण व अर्थकारण यांचा काही विशेष संबंध साधला किंवा नाही हा विचार अप्रस्तुत नाही. सौ. नलिनीबाई पंडित यांनी आपल्या अलीकडील "महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास" या पुस्तकात टिळकांच्या आर्थिक भूमिकेबाबत काही विचारपूर्वक लिहिलेले आढळते. खाली उद्धृत केलेल्या काही वाक्यांवरून सौ. नलिनीबाई यांची मते स्पष्ट होतील :—

"हिंदी लोकांच्या आर्थिक अवनतीला मुख्यतः ब्रिटिशांची साम्राज्यशाही जबाबदार असल्यामुळे टिळकांनी सर्व दोषांचे खापर सरकारच्या माथ्यावर फोडले तर त्यात काहीच आश्चर्य नाही. सरकारच्या रागालोभाची पर्वा न करता त्यांनी नोकरशाहीच्या जुलमी राज्यकारभारावर कडक टीका केली; आणि महाराष्ट्रातील लोकांना आपल्या राजकीय हक्कांची जाणीव करून दिली."

"नव्या उत्पादन-साधनांनी देशाच्या संपत्तीत भर पडत असल्यामुळे सामाजिक सुधारणांना विरोध असूनही व्यक्तिस्वातंत्र्य व स्पर्धा यांवर आधारलेल्या या उत्पादन-पद्धतीचे टिळकांनी स्वागत केले आणि महाराष्ट्रात छोटेमोठे कारखाने काढण्यास प्रोत्साहन दिले. तरीदेखील जुन्या अर्थसंस्थेबद्दल त्यांच्या मनात जिव्हाळा होता. ही अर्थव्यवस्था विषमतेवर आधारली होती. सरकारप्रमाणे येथील धनिक व वतनदार वर्गही सामान्य लोकांच्या पिळवणुकीत सामील होते. राजकीय चळवळीत एकजूट असावी म्हणून टिळकांनी या बाबतीत वर्गसमन्वयाची भूमिका घेतली."..."मात्र सरकारच्या भेदनीतीमुळे वर्गसमन्वयाचे हे धोरण सांभाळणे जेव्हा अशक्य झाले तेव्हा मालकी हक्काचे समर्थन करून त्यांनी निःशंकपणे वरिष्ठ वर्गाचीच बाजू घेतली."... "कुळकायदा, कर्जनिवारण कायदा यांची बंधने घालण्यास रानड्यांनी आपली संमति दिली, पण रानड्यांपेक्षा लोकमताची अधिक मातब्बरी वाटत असूनही टिळकांना व्यापक भूमिका घेता आली नाही." (पा० १०० ते १०३).

## बिनचूक विवेचन

मला सौ. नलिनीबाईंची मते बऱ्याच अंशी मान्य आहेत. परंतु टिळकांची भूमिका व कार्य समजावून घेण्याकरिता सौ. नलिनीबाईंस आपल्या विशिष्ट विषयाच्या मर्यादेमुळे जो विचार विस्तारपूर्वक करता आला नसावा तो करण्याचे मी प्रस्तुत लेखात योजिले आहे. टिळकांनी आपल्या आर्थिक परिस्थितीचे व दारिद्र्याचे सर्व खापर ब्रिटिश राजवटीवर फोडले यात त्यांचा राजकीय विचार दिसला, तरी याबाबतचे त्यांचे विवेचन आर्थिक इतिहास दृष्ट्याही बिनचूक मानले पाहिजे. आशियांतील जुने समाज आर्थिक दृष्ट्या १९ व्या शतकात अप्रगत राहिले हा युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यशाहीचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम होय हे आज सर्वमान्य झाले आहे. बरेच आशियाई देश युरोपीय राष्ट्रांच्या प्रत्यक्ष अंमलाखाली होते. जे नव्हते त्यांच्यातील शास्ते आपले आसन टिकविण्यासाठी सर्व प्रकारच्या प्रगतीस विरोध करणारे होते. अशांस स्वहिताकरिता त्यांजकडून आपणांस आवश्यक सवलती मिळविण्याकरिता, युरोपीय सरकारे उचलून धरीत असत व मदत करीत असत. शास्तावर्ग स्वतः प्रगतिशील

बनून, त्याने सरकारचे बळ आर्थिक व औद्योगिक क्रांतीच्या पाठीशी उभे केल्यास आशियाई देशांतही काय होऊ शकते हे फक्त जपान दाखवू शकले. परकी अंमल, विशेषतः एका युरोपीय प्रगत राष्ट्राचा अंमल, हा आमच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक सर्वच प्रगतीस कसा विघातक आहे हे विवेचक बुद्धीने मांडून सर्व जनतेस पटवून देणे हे टिळकांच्या महान कार्यापैकी एक होय.

परराज्यामुळे विशेषतः इंग्रजी राज्यामुळे लोकांच्या कर्तृत्वाला कोणत्याही व्यवसायास कसा वाव उरला नाही, यावर 'ब्राह्मण व त्यांची विद्या' या परीक्षण-लेखमालेत टिळकांनी विशेष जोर दिला. हा मुद्दा इतरत्रही वारंवार त्यांच्या लिखाणात येतो; पण त्याबद्दलचा त्यांचा विचार केवळ ठोकळेबाज राजकीय मतप्रतिपादनवजा नव्हता. एकंदर आपला समाज अप्रगत राहून त्याची दशा उत्तरोत्तर निकृष्ट का होत आहे याचा त्यांनी खोलवर विचार केला होता.

## शास्त्रशुद्ध विवरण

त्यासंबंधी एका लेखात केलेले विवेचन इतके समर्पक व त्यात दाखविलेली कार्यकारणपरंपरा अर्थशास्त्रदृष्ट्या इतकी शुद्ध आहे की, त्यातील एक लांब उतारा देण्याचा मोह आवरत नाही :—

"अमेरिका आणि हिंदुस्थान या दोन देशांची स्थिती अगदी भिन्न आहे. नव्या खंडात जमीन मुबलक व माणसे थोडी, अशी स्थिती असल्यामुळे कोणासही लागेल तितके अर्थार्जन करण्यास पूर्ण साधने आहेत. जमिनीची तूट म्हणून नाही, मनुष्य करील तितकी मेहनत थोडी, असा तिकडे प्रकार आहे; आणि जमीनही अगदी नव्या दमाची म्हणजे पूर्वी कधीही न वाहिलेली असल्यामुळे अमेरिकेतील लोक मोठ्या झपाट्याने द्रव्यार्जन करीत आहेत; परंतु आमच्याकडे म्हणजे ज्या देशात आर्यलोकांची वसाहत होऊन आज कमीत कमी पाच-सहा हजार वर्षे झाली, तेथला प्रकार अमेरिकेहून अर्थातच अत्यंत भिन्न आहे; विशेषेकरून इंग्रजी राज्यातील सुखशांततेखाली तर हा भेद अधिकाधिकच बळावत चालला आहे. हिंदुस्थानातील बहुतेक चांगली जमीन आज हजारो वर्षांच्या लागवडीने निकस व निःसत्त्व होत चाललेली आहे. राब, कवळठा, शेण वगैरे खताचे पदार्थ उत्तरोत्तर जंगलाच्या त्रासाने आणि गायरानांच्या अभावाने दुर्मिळ होत चालले आहे. देशातील लोकांनी परदेशगमन करावे तर तशी त्यांस सवय नाही व सोयहि नाही; आणि इंग्रज सरकारच्या शांत अमलाखाली लोकसंख्या उत्तरोत्तर झपाट्याने वाढत चालली आहे. व्यापारधंद्यात काही गुंतून राहिली असती, पण त्यांतील किफायतीचा बहुतेक भाग परदेशस्थ लोकांनी उचलल्यामुळे तिकडूनही काही तरणोपाय राहिला नाही."

(केसरीतील लेख—राजकीय खंड १, पृ० १३५).

सांगावयाचे एवढेच की, ब्रिटिश राजवट सर्व संकटांच्या मुळाशी आहे हे म्हणताना राजकीय हेतू प्रमुख असला तरी केवळ प्रचार-तंत्र या दृष्टीने टिळक हे मत प्रतिपादीत नव्हते. हिंदुस्थानाची आर्थिक परिस्थिती व साम्राज्यशाही यांचे परस्पर संबंध त्यांस पूर्णपणे कळले असून लोकांस समजतील अशा भाषेत त्यांचे यथार्थ दिग्दर्शन ते करून देत होते. इतकेच नव्हे तर लोकसंख्येच्या वाढीसारख्या प्रश्नाचे जे महत्त्व अलीकडेही राजकीय पुढाऱ्यांस न कळताना दिसले, ते त्यांच्या लक्षात होते हे वरील उताऱ्यावरून लक्षात येईल.

## सांगोपांग अभ्यास

टिळकांना अर्थशास्त्राचा विशेष अभ्यास करण्यास फुरसत झाली नसली तरी प्रमुख आर्थिक प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास करून त्यांचे खरे स्वरूप समजावून घेणे किंवा विशद करणे हे त्यांना पूर्णपणे साधले होते. अर्थात वर सांगितल्याप्रमाणे त्यांचे अर्थशास्त्रीय लिखाण वृत्तपत्रीय व प्रसंगोपात्त होते. तेव्हा

ज्या प्रश्नांचा विचार प्रचलित घटनांमुळे आवश्यक होता तेवढ्यावरच टिळकांनी लिहिले. १८९२ ते १९०३ या काळात अनुक्रमे सावकारी नियंत्रण कायद्यावरील कमिशन, दुष्काळ, जमिनीवरील मालकी हक्कांबाबत नवीन कायदा, सरकारी पतपेढ्या व खोतीपद्धती हे प्रमुख विषय टिळकांनी हाताळलेले आढळतात. दुष्काळ व तत्संबंधी सारातहकुबी, सूट, व एकंदर साऱ्याची आकारणीपद्धती याबाबत टिळकांना पुष्कळ लिहावे लागले. १८९५-९६ व १९००-०१ हे दोन मोठे दुष्काळ या काळातच पडले व या दोहोंनंतर सरकारने कमिशने नेमल्यामुळे दुष्काळविषयक सर्वच प्रश्नांचा विशेष ऊहापोह करावा लागला. टिळकांच्या या विषयावरील विवेचनात आज विवाद्य असे काही आढळणार नाही.

## कायमधारापद्धतीचा पुरस्कार

आज मान्य न होण्याजोगा या लेखांतील मुख्य मुद्दा म्हणजे कायमधारापद्धतीचा पुरस्कार. कायमधारापद्धतीचा स्वीकार केला असता हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारेल या मताचे मूळ प्रतिपादन बाबू रमेशचंद्र दत्त यांनी केले असे म्हणण्यास हरकत नाही. हे मत सर्व राष्ट्रीय पुढाऱ्यांनी मान्य केले. त्याचा पुरस्कार या काळात सर्वत्र आढळतो. कायमधारापद्धतीच्या पुरस्कारास सरकारबद्दलचा अविश्वास मुख्यतः कारणीभूत आहे. या वेळच्या राजकीय पुढाऱ्यांच्या मतप्रतिपादनात एकप्रकारची विसंगती अनेक ठिकाणी आढळते. अनेक गोष्टी सरकारने केल्या पाहिजेत. सरकार आपले कर्तव्य बजावीत नाही म्हणून आमची स्थिती हलाखीची आहे असे एका बाजूस प्रतिपादन करीत असता दुसऱ्या बाजूस सरकारचे उत्पन्न किंवा अधिकारक्षेत्र वाढणे हे अनिष्ट असेही म्हणत. सरकार परकी व विश्वासपात्र नाही हे जितके खरे तितकेच गरीब व मागासलेल्या देशाची प्रगती सरकारने पुढाकार घेतल्याशिवाय व्हावयाची नाही हेही खरे; या कोंडीत आपले पुढारी सापडले होते. हाच प्रकार पुढे मुंबई सरकारने खालसा केलेल्या व इतर काही जमिनीबाबत, मर्यादित स्वरूपाचे मालकी हक्क उत्पन्न करण्याचा जेव्हा कायदा केला तेव्हा दिसून आला. जमिनीवरील मालकी हक्क अत्यंत मर्यादित स्वरूपाचे असावे हे आज सर्वसामान्य ठरले आहे, पण सरकारवर अविश्वास असल्यामुळे मुंबई सरकारच्या १९०३ मधील बिलास सर्व लोकप्रतिनिधींनी पूर्ण विरोध केला.

## राष्ट्रीय मतप्रवाह

सावकार नियंत्रण व मजूर-कायदे यांबाबतची टिळकांची व इतर समकालीनांची भूमिका आकलन होण्यासही याच दृष्टीने विचार केला पाहिजे. मजुराबाबतच्या कायद्यांचा उगम कसा झाला हे लक्षात घेण्याजोगे आहे. विलायतेतील कारखानदारांनी चळवळ केली की मजूर-कायदे हिंदुस्थानात नसल्यामुळे हिंदी माल आमच्या मालापेक्षा स्वस्त पडतो; तेव्हा त्यांस चढाओढीत तुल्यबल ठरविण्याकरिता मजूर-कायदे हिंदुस्थानात करण्यात आले. मजुरांची स्थिती निकृष्ट नव्हती किंवा कायदे केले हे एकंदर योग्य झाले नाही अशातला भाग नाही. पण मजुरांच्या निकृष्ट स्थितीकडे लक्ष वेधले जाऊन व त्या बद्दल चळवळ होऊन कायदे न होता परकी दडपणामुळे झाले हे तत्कालीन राष्ट्रीय हिंदी मतप्रवाह समजण्याकरिता लक्षात घेतले पाहिजे. सावकार-नियंत्रण महाराष्ट्रात आले ते अर्थात परकीय दडपणामुळे नव्हे तर एतद्देशीय दंग्यांमुळे. तेव्हा या बाबतीत नियंत्रण नसावे असे कोणीच म्हटलेले आढळत नाही. निदान टिळकांनी तरी असे कुठे लिहिलेले नाही. शेतकऱ्याच्या कायद्यामुळे जे अनिष्ट सावकारी प्रकार बंद झाले ते बंद करणे केव्हाही जरूर होते असेच ते लिहितात (के० लेख, रा. खंड १, पा. १४४). याबाबतचा टिळकांचा मुख्य मुद्दा हा की, शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेचे मूळ फार खोल, एकंदर आर्थिक परिस्थितीत आहे. त्यावर सावकारी नियंत्रण हा उपाय नव्हे. टिळक व रानडे यांच्या सावकार व

जमीनदार यांच्याबाबतच्या मतांत काही विशेष फरक होता असेही दिसून येत नाही. सावकारांच्या पेढ्या काढून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यास पैसा पुरविण्याच्या कल्पनेचा पुरस्कार केलेला रानड्यांचा १८९१ चा लेख त्यांच्या निबंधसंग्रहात सापडतो. याच निबंधसंग्रहात बंगाल्यातील कूळकायद्यावरील १८८३ चा लेख आहे. त्यात रानडे यांनी ज्यायोगे वर्गकलह निर्माण होईल अशा प्रकारचा कायदा करणे अनिष्ट आहे व जमीनदारांचे हक्क कोणत्याही प्रकारे मर्यादित केल्यास त्याबद्दल त्यास योग्य मोबदला दिला पाहिजे हे दोन मुद्दे प्रामुख्याने मांडलेले आढळतात.

### कालमानाचा प्रभाव

अर्थात वर्गकलहाद्वारे आर्थिक प्रगती घडून येते ही कल्पना टिळकांपुढे असती आणि ती त्यांनी मान्य केली असती तर राजकीय व आर्थिक लढा यांचा परस्पर संबंध त्यांनी निराळा लावला असता, व सावकारांबाबत अगर खोतांबाबत काही निराळे विवेचन केले असते असे म्हणता येईल. पण टिळकांचा काळ म्हणजे हिंदी राष्ट्रीय चळवळीच्या अगदी सुरुवातीचा काळ होता. या वेळेस सरकार परके आहे, ते हिंदुस्थानचे हित पाहात नसून स्वजनांचे हित पाहते, सरकार परकी आहे तोपर्यंत आपणा स्वतःकरिता आपणांस काही करता येणे शक्य नाही, या आज साध्य वाटणाऱ्या गोष्टी स्पष्टपणे मांडून लोकास काय पण पुढाऱ्यांसही पटवावयाच्या होत्या. या वेळेस वर्गकलहामुळे प्रगती साधते ही कल्पना मनात येणे कठीण; आल्यासही एकंदर प्रचलित लढ्याच्या स्थितीत तिचा उच्चार करणे त्याहूनही कठीण. शिवाय त्या वेळेस अमुक एका वर्गाची साथ करून स्वतःची राज्यसत्ता ब्रिटिश टिकवीत आहेत असेही दिसत नव्हते आणि जेथून आधुनिक विचारप्रवाह आपणांकडे येत होता तेथे म्हणजे विलायतेतही, मार्क्सवादाची पकड यावेळेस बसली नव्हती. हे सर्व पुढे पहिल्या महायुद्ध-कालात व तदनंतर घडून आले. टिळकांनी आर्थिक प्रश्नांबाबत स्वतंत्रपणे १९१६ नंतर काही लिहिले नाही. पण १९१६ ते १९२० या काळात मुंबईतील मजूर-चळवळीकडे त्यांनी जे विशेष लक्ष दिले त्यावरून नवीन विचार-प्रवाहापासून ते अगदी अलिप्त राहिले असते असे वाटत नाही.

### कुशल व्यवहारदृष्टी

ज्या कल्पना समकालीन तज्ज्ञात अगर अगदी पुरोगामी गणलेल्यात अजून रुजल्या नव्हत्या व ज्या स्वतःच्या चळवळीस विशेष पोषक नव्हत्या त्यांचे भविष्याच्या प्रवाहातील अस्तित्व ताडण्याइतके अर्थशास्त्रीय द्रष्टेपण टिळकांत नव्हते हे उघड आहे. माणूस कितीही मोठा झाला तरी काही विशेष भाग सोडून तो आपल्या स्वतःच्या कालातच बहुतेक वावरतो. पण द्रष्टेपण नसले तरी पूर्ण अभ्यास, कुशल व्यवहारदृष्टी, मार्मिक व सडेतोड विवेचन हे टिळकांचे गुण त्यांच्या अर्थशास्त्रीय लिखाणातही दिसून येतात आणि त्यामुळे इतर समकालीनांच्या लिखाणात न दिसणारी चमक व मर्मभेदकत्व यांचा प्रत्यय याविषयीच्या लेखांतही येतो. या विधानाच्या समर्थनार्थ एक-दोन उदाहरणे देऊन हा लेख संपवितो.

शेतकऱ्याच्या दारिद्र्याची सामान्य कारणे काय याचा मूलभूत विचार करीत असता टिळकांनी प्राथमिक शिक्षणाचा अभाव व रोजगार उपलब्ध नसणे यावर विशेष भर दिला व या दोहोबाबत जबाबदारी सरकारचीच आहे असे खालील शब्दांत नमूद केले :

"अज्ञान, उधळेपणा अगर इस्टेटीची दरपिढीस होत असलेली वाटणी यामुळे शेतकरी लोक उत्तरोत्तर दरिद्री होत चालले, तर त्यांची स्थिती कायद्यात कितीही फेरफार केले असता सुधारायची नाही. हे दुर्गुण प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारानेच नाहीसे होतील तेव्हा होतील. परंतु प्राथमिक

शिक्षण देणे किंवा न देणे, हे ज्याअर्थी सरकारचे कर्तव्य आहे, त्याअर्थी आमच्या मते सरकारास या बाबतीत केवळ निर्दोष म्हणता येईल असे दिसत नाही." (रा. खं. १ पा० १४७)

"देशातील सर्व लोक उपजिविकेची नवीन साधने शोधून काढण्यास असमर्थ असतात. ती कामे देशातील पुढारी लोक अगर ज्ञाति आणि सरकार यांनीच केली पाहिजेत. इतर राष्ट्रातून ज्याप्रमाणे पुढारी लोक असतात तसे आमच्याकडे नाहीसे होत चालले आहेत. त्यामुळे या प्रश्नाचा निकाल लावण्याचा सर्व बोजा बहुतेक सरकारवरच पडतो. म्हणून देशातील लोकसंख्या वाढली तर त्यांस खावयास कसे मिळेल याचा विचार इंग्रज सरकारच्या मुत्सद्यांनीच केला पाहिजे."

(रा. खं. १ पा० १४८)

तत्कालीन एकंदर लिखाणाशी तुलना केली असता वरील उताऱ्यांतील सडेतोडपणा व मार्मिकपणा दोन्ही विशेष उठून दिसतात.

## मार्मिक भविष्यकथन

याहूनही दुसरे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे "शेतकऱ्यांच्या परस्परसाह्यकारी पेढ्या" या विषयावरील १९०३ च्या लेखाचे देता येईल. या परस्पर-सहायक पेढीच्या प्रयत्नाबाबत टिळकांचा अभिप्राय असा की सरकारचा ओढा परस्पर भागविण्याकडे असल्यामुळे हे बिल बाहेर पडले आहे. शेतकरी दरिद्री, उथळे व अज्ञानी आहेत हे जर खरे तर त्यांस बाहेरून मदत केल्याखेरीज परस्परसहायक मंडळींच्या युक्तीने त्यांची गरज कशी भागू शकेल? ज्या सरकारास गावातील गायरानाची व्यवस्था चालविण्याइतकीही ग्रामसंस्था कार्यक्षम करता येणार नाही असे वाटते त्यास या परस्परसाह्यकारी पेढ्या यशस्वी होतील असे कसे म्हणता येईल? असे मुद्दे टिळकांनी या लेखात मांडले. "शेतकऱ्यांचे कल्याण व्हावे अशी सरकारची इच्छा आहे खरी, पण इच्छेप्रमाणे पैसा खर्च करण्यास त्यांचा हात चालत नसल्यामुळे लोकांनी कितीही उपाय सुचविले तरी त्यांपैकी परभारे किंवा परस्पर भागण्यासारखा जो उपाय तेवढाच सरकारास पसंत पडतो असे म्हणणे भाग पडते." हिंदुस्थानातील शेतकरीवर्गाच्या सहकारी मंडळ्यांच्या वाढीत व कार्यात मुख्य अडचण काय येणार हे टिळकांनी या चळवळीच्या जन्मासच अशा रीतीने भविष्य वर्तविले. रिझर्व्ह बँकेमार्फत नुकत्याच झालेल्या शेतीकर्जपाहणीच्या अहवालात गरिबांनी केवळ परस्पर-साह्य करून स्वतःचा उद्धार करून घेणे किती दुरापास्त आहे यावरच भर दिला आहे व सहकारी चळवळ यशस्वी व्हावयाची असल्यास सहकारी भांडवल व भागीदारी यांचे साह्य तीत अत्यावश्यक आहे असे प्रतिपादले आहे. हे मत गेल्या दोन वर्षात काही खटपटीनंतर हिंदुस्थानातील सरकारांनी व सहकारी कार्यकर्त्यांनीही मान्य केले आहे. येणेप्रमाणे पन्नास वर्षांनंतर, मोठ्या पाहणीनंतर कष्टाने मान्य झालेल्या सिद्धांताची पूर्वसूचना चळवळीच्या जन्मकाळीच देणाऱ्याचे व्यवहारचातुर्य व मर्म-भेदीपणा जास्त विशद करून सांगण्याची जरुरी नाही.

*केसरी*, २२ जुलै १९५६ (टिळक जन्मशताब्दी विशेषांक) पृ० ७७-८१.

☆

# ८ . . आर्थिक इतिहासाची साधने

राजवाड्यांनी आपल्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत इतिहासाची व्याप्ती पुढीलप्रमाणे दर्शविली आहे : ते लिहितात, "कोणत्याही संस्कृत राष्ट्राच्या चरित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटला म्हणजे तो अनेक दृष्टींनी केला पाहिजे. धर्म, नीती, विद्या, समाज, व्यापार, कृषी, कलाकौशल्य, कायदेकानू, राजकारण व तत्सिद्ध्यर्थ केलेल्या अंतःस्थ व बहिःस्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा विगतीचा कालक्रमाने, व्यवस्थित, बांधेसूद, पद्धतवार व सप्रमाण विचार केला जाऊन तो पुनः आत्मिक व भौतिक रीत्या झाला म्हणजे राष्ट्राचे चरित्र समग्र कळले असे होते."[१] नंतर सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेत, "इतिहास म्हणजे केवळ गतराजकारण हे विधान सर्वस्वी अपुर्ते आहे" असे सांगून, "धर्म, आचार, विद्या, व्यापार वगैरे अनेक व्यवहारांच्या घडामोडी राष्ट्रात होत असतात. व त्यांचा समावेश समाजाच्या चरित्रात करणे अत्यावश्यक असते"[२] असे त्यांनी प्रतिपादिले. याच प्रस्तावनेतील पुढील विवेचनात मराठ्यांच्या इतिहासाच्या समकालीन परिस्थितीचे त्यांनी परीक्षण केले, व "शास्त्रीय स्थितीची छाप समाजावर आस्ते आस्ते बसत चालली आहे ह्यात बिलकुल संदेह नाही"[३] व "सद्यस्क चळवळींवर चिपळोणकरांच्या निर्भीड टीका आणि सामाजिक, धार्मिक, राजकीय विषयांवर रानड्यांचे निबंध शास्त्रीय स्थितीच्या आगमनाचे द्योतक आहेत"[४] असे अभिप्राय व्यक्त केले. रानड्यांच्या ऐतिहासिक ग्रंथाबद्दल त्यांनी असे लिहिले आहे की, "मराठ्यांच्या समाजचरित्राला अध्याहृत कारणपरंपरा आहे हा सिद्धांत त्यांच्या ग्रंथाने कायमचा प्रस्थापित केला आहे ह्यात संशय नाही"; तसेच 'मराठ्यांच्या इतिहासातील काही टिपणे' हा तेलंगांचा निबंधही "समाजशास्त्राच्या तयारीचा पूर्वसूचक आहे"[५] असे त्यांनी म्हटले आहे. याचबरोबर "टीका, जितक्या खोल, विस्तृत, सूक्ष्म व व्यापक असावयास पाहिजेत तितक्या अद्याप होऊ लागल्या नाहीत. अद्यापि सर्वच प्रकार स्थूल व स्फुट असाच आहे", "शास्त्रीय स्थितीचे आगमन संभाव्य होण्यास मुख्य कारण जी समाजाच्या चरित्राची इत्थंभूत हकीकत, तिची साधने प्रसिद्ध होण्यास नुकता कोठे प्रारंभ झाला आहे. ही साधने झाली आहेत त्याहून शंभरपट प्रसिद्ध झाल्या-

१. राजवाडे वि. का., लेखसंग्रह भाग १, 'ऐतिहासिक प्रस्तावना', भारत इतिहास संशोधक मंडळ (पुणे) पुरस्कृत ग्रंथमाला, क्र० १२, १९२८, पृ० २६–२७.

२. कित्ता, पृ० ३०६.

३. कित्ता, पृ० ३५६.

४. कित्ता, पृ० ३५६.

५. कित्ता, पृ० ३५८.

वाचून व त्यांची विवेचक दृष्टीने छाप झाल्यावाचून इतिहासाची व समाजशास्त्राची निर्मिती होणे शक्य नाही"[१] असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

## अपुरे संशोधन

सहाव्या खंडाची प्रस्तावना छापल्यास पन्नास वर्षे झाली. या अवधीत मराठी इतिहासलेखनाची प्रगती किती व कशी झाली याचे कोणत्याही अधिकारी व्यक्तीने केलेले परीक्षण माझ्या अवलोकनात नाही. असे परीक्षण करण्याचा मला बिलकुल अधिकार नाही. परंतु साधने प्रसिद्ध करण्यात जरी बरीच मजल या कालखंडात मारली गेली असली, तरी ही सामग्री बहुधा एकांगी आहे व सर्वांगीण समाज-चरित्राचे विवेचक दृष्टीने निरूपण होण्याचे प्रयत्न रानडे-तेलंगांच्या पुढील काळात विशेष झालेले नाहीत असे वरवर पाहताही उघड दिसते. राजवाड्यांनी केवळ राजकारण म्हणजे इतिहास नाही असे सांगितले असूनही त्यांनी स्वतः प्रसिद्ध केलेल्या खंडांत व तदनंतरच्या बहुतेक खटाटोपात राजकारणी पुरुषांच्या राजकारणविषयक हालचाली यासंबंधीचीच साधने बहुतेक प्रसिद्ध झाली आहेत. आजतागायत टिकून राहिलेली व आज उपलब्ध असलेली साधने बहुतेक सर्व अशाच प्रकारची आहेत, असे एक कारण त्या अवस्थेच्या समर्थनार्थ सांगता येईल. परंतु हे सर्वस्वी समाधानकारक वाटत नाही. कारण की, पेशवे दप्तरात हरतऱ्हेचे कागद आहेत. तेथे पुण्यातील निरनिराळ्या पेठांच्या इतिहासाबाबत काही कागद मिळतात का पाहावे अशी विनंती मी काही संशोधकांस केली असता त्यांस थोड्या दिवसांच्या उद्योगाने महत्त्वाच्या याद्या व कागद मिळू शकले. माझी तत्कालीन गरज भागल्याने मी या उपक्रमाचा पाठपुरावा केला नाही. पण असा उद्योग विशिष्ट हेतूने सतत केल्यास या दप्तरात सामाजिक व आर्थिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची भरपूर माहिती मिळेल अशी माझी खात्री आहे. तेव्हा साधने उपलब्ध नाहीत यापेक्षा संशोधक व इतिहासलेखक या दृष्टीने खटपट व विचारच करीत नाहीत असा ग्रह होतो.

## आर्थिक अधिष्ठानाचे महत्त्व

राजकारणी हालचालींचा अभ्यास हे इतिहासाचे एक प्रमुख अंग आहे असे मी मानतो. सर्व समाजाची शक्ती विशिष्ट बाबतींपुरती तरी राजा, राज्ययंत्र व शासनसंस्था यांत केंद्रित झालेली असते व अनेक महत्त्वाच्या समाजव्यवहारास वळण लावणे, त्यांचे नियमन करणे हे त्यांजकडून होते. परंतु 'राजा कालस्य कारणम्' हे जितके खरे तितकेच, परिस्थिती राजास बनविते, राज्यकर्त्यांच्या हालचालीस मर्यादा घालते हेही खरे, आणि दीर्घकालीन इतिहासाचे सूत्र समजावयाचे असल्यास तात्कालिक राज-कीय घडामोडींच्या पलीकडे जाऊन समाजरचना, समाजविकास इत्यादीबाबतच्या बदलत्या परिस्थितीचा अभ्यास केला पाहिजे. आर्थिक व्यवस्थेचा व घडामोडीचा इतिहास हे या अभ्यासाचे एक महत्त्वाचे अंग आहे. सर्व मानवेतिहासाचे सूत्र आर्थिक उत्पादनव्यवस्था हेच आहे, हा आत्यंतिक मार्क्सवाद जरी बाजूस सारला तरी आदिकालापासून, मानवांचे भ्रमण व जीवन यांपासून त्यांच्या धर्म व नीतिकल्पना येथपर्यंत आर्थिक व्यवहाराने आपला पगडा कसा बसविला आहे याची प्रचीती गेल्या पन्नास वर्षांत इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासकांस अधिकाधिक झाली आहे. परिणामी, आर्थिक व्यवहार, आर्थिक कलह व आर्थिक स्थित्यंतरे यांजकडे सर्व देशांतील इतिहासज्ञ बारकाईने लक्ष पुरवीत आहेत.

१. किता, पृ० ३५६–५७.

या जागतिक प्रवृत्तीचे प्रतिबिंब महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अभ्यासात कोठे उमटलेले दिसत नाही. मराठ्यांच्या आर्थिक इतिहासाच्या साधनांचा मुख्य संग्रह अजूनही, रा. ब. वाडांनी[१] संपादिलेल्या रोजनिशीतच आढळतो. पेशवे दप्तराच्या अनेक खंडांतील फार थोड्यात सामाजिक व आर्थिक माहितीचे म्हणून कागद छापले आहेत. पण त्यांची निवड कोणत्याही पद्धतीनुसार अगर पूर्वविचारानुसार केलेली दिसत नाही व त्यांचे संपादनात गबाळेपणा उघडउघड दिसून येतो. श्री ना. गो. चापेकर यांच्या 'पेशवाईच्या सावलींत'[२] या पुस्तकात खाजगी सावकारांच्या वह्यांतून निवडलेले उतारे असल्याने ते एक महत्त्वाचे नवीन साधन मानले पाहिजे. तसेच कै. वामनरावजी काळे यांनीही सावकारी वह्या पाहून काही लहान पण महत्त्वाची टिपणे लिहिणे यापलीकडे काही केले नाही. इतरत्र अर्थेतिहासज्ञ म्हणविणाऱ्यांनीही हाती आलेल्या कागदांपैकी आर्थिक म्हणून वाटले ते निराळे काढून त्यांवर जुजबी टिपणे लिहिणे यापलीकडे काही केलेले नाही. मराठेशाहीतील अर्थव्यवस्था व आर्थिक कारभार यांबाबत न्यायमूर्ती रानड्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेपलीकडे खरी खरी मजल गेली ती फक्त तीस वर्षांपूर्वीच्या सेन यांच्या 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ दि मराठाज्'[३] या पुस्तकाची एवढे सांगितले म्हणजे याबाबतच्या सद्यःस्थितीची यथार्थ कल्पना येईल.

## आर्थिक बाबींकडे दुर्लक्ष

आर्थिक इतिहासाची साधने आणि आर्थिक स्थितीचे वर्णन यांबाबत जे आता सांगितले ते अर्थ-व्यवस्था, समाजरचना व राजकारण यांच्या परस्परसंबंधांविषयीच्या विवेचनाला पूर्णपणे लागू पडते. रानडे व तेलंगांनंतरचे महाराष्ट्रातील विचक्षण इतिहासज्ञ व समाजशास्त्रज्ञ म्हणजे राजवाडे व केतकर. राजवाड्यांच्या कार्याची व्याप्ती फार मोठी व त्यांची प्रतिभा अनेक क्षेत्रांत तेजस्वीपणे चमकली. परंतु आर्थिक बाबींकडे त्यांचे लक्ष फारसे गेलेच नाही असे दिसते. महाराष्ट्रधर्म, हिंदुपदपादशाही इत्यादी महाराष्ट्रेतिहासाच्या विवेचनातील त्यांच्या मूलभूत कल्पनांचा आर्थिक व्यवहाराशी त्यांनी संबंध जोडलेला नाही. त्यांच्या एकंदर व्यापक सर्वांगीण विवेचनातही कृषी, व्यापार, इत्यादींचा उल्लेख आला तरी अर्थव्यवस्था अगर अर्थव्यवहार यांस महत्त्वाचे स्थान कोठे दिलेले आढळत नाही. केतकर अर्थात खुद्द अर्थशास्त्रात पारंगत; परंतु त्यांच्या इतर प्रचंड उद्योगात आर्थिक इतिहासाच्या तपशिलाचा विचार करण्यास त्यांस फावलेले दिसत नाही. ज्ञानकोशाच्या 'हिंदुस्थान व जग'[४] या प्रस्तावनाखंडात एतद्विषयी काही विचार विखुरलेले आढळतात; पण येथील लिखाणाचा रोख वर्तमान परिस्थितीवर असल्यामुळे ऐतिहासिक विचार मुख्यतः ओघाने आलेला, स्पष्टीकरणात्मक असा आहे. राजवाडे-केतकरांनंतर महाराष्ट्र-इतिहासात विचारवंत म्हणून नावे घ्यावयाची ती मुख्यतः कै. दत्तोपंत आपटे व श्री. त्र्यंबकराव शेजवलकर यांची. परंतु यांहीपैकी कोणी आर्थिक इतिहासाची साधने, आर्थिक परिस्थितीचे वर्णन अगर अर्थव्यवहाराचे व घडामोडीचे आमच्या इतिहासातील महत्त्वमापन यांकडे विशेष लक्ष दिलेले नाही.

१. वाड रा. ब. गणेश चिमणाजी, 'सातारकर महाराज व पेशवे यांच्या रोजनिशी,' डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटी, पुणे, १९०६ ते १९११.

२. चापेकर ना. गो., 'पेशवाईच्या सावलीत', भारत इतिहास संशोधक मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला, क्र. ३४, पुणे, १९३७.

३. Sen Surendranath, *Administrative System of the Marathas,* University of Calcutta, 1923.

४. केतकर डॉ. श्रीधर व्यंकटेश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग १ (हिंदुस्थान व जग), पृ० ४६१.

निर्देशित उणिवांपैकी एखादीही अंशतः भरून काढण्यास मी आज उद्युक्त झालो आहे असा या प्रस्तावनेचा रोख नाही. यांपैकी काहीही करण्यास मी सर्वस्वी अपात्र आहे हे मी जाणतो. माझा आजचा मुद्दा एवढाच की या उणिवा राहिल्या आहेत हे प्रथम मराठी इतिहास-अभ्यासकांच्या नजरेस आणावे; तदनंतर काही तपशिलांकडे लक्ष वेधून, या उणिवांचे स्वरूप काय हे सांगावे; अधिकारी व्यक्तींनी कोणत्या दिशेने प्रयत्न केल्यास त्या भरून निघण्याचा संभव आहे हे निर्देशावे; व ऐतिहासिक विवेचनात अर्थव्यवहाराचा विचार न केल्यास एकांगीपणा कसा येतो हे एकंदर निरूपणाच्या ओघात स्पष्ट करावे. अठराव्या शतकातील माहितीचा व घडामोडींचा विशेषत्वे मी आज विचार करणार आहे, याची कारणे दोन : एक तर भारतातील आधुनिक वळणाच्या अर्थव्यवहाराचा उद्‌गम व विकास यांचा अभ्यास काही सहाध्यायांच्या मदतीने मी हल्ली करीत आहे. हे करीत असता महाराष्ट्रातील अठराव्या शतकातील आर्थिक परिस्थितीबाबत माहिती जमविण्याचा प्रयत्न मी साहजिकच केला. अशा रीतीने हा भाग मला थोडासा ज्ञात असल्यामुळे त्याविषयीच बोलणे योजावे हे सहज घडले. दुसरे असे की आधुनिक महाराष्ट्र समाजाची घडण, महाराष्ट्रीयांची प्रचलित मनोभूमिका व आमच्या आजच्या समस्या या कशांचाही विचार करावयाचा तर त्यांचे मूळ हुडकण्यास निदान अठराव्या शतकापर्यंत तरी जाणे आवश्यक आहे. शिवाय हेही खरे की तत्पूर्वीच्या काळात आर्थिक व्यवहाराचा तपशील विचार करण्यास जी साधने लागतात ती उपलब्ध नाहीत व उपलब्ध होण्याचा संभवही फारसा दिसत नाही.

## संख्यात्मक माहितीची आवश्यकता

अर्थव्यवहाराबाबत विचार करावयाचा तर काही मूलभूत, शक्य तर संख्यात्मक, माहिती आपणांस हवी. लोकसंख्या, उत्पादन, उद्योगधंदे, व्यापार, शहरे, चलने इत्यादी अनेक गोष्टींबद्दल वर्णनात्मक व आकडेबद्ध माहितीची जरुरी आहे. या अनेक बाबींबाबत अठराव्या शतकातील हिंदी आर्थिक परिस्थितिविषयक छापील साधने अत्यंत तोकडी आहेत, व जी बरीचशी उपलब्ध आहेत ती युरोपीयांच्या राजकीय व व्यापारी उलाढाली, युरोपीय प्रवाशांची वर्णने याबाबतची दप्तरे व लिखाणे यांतूनच मिळते. मराठी सेनानी व फौजा यांच्या हालचालींबाबत मुक्कामवार व तारीखवार संशोधन अलीकडे बरेच झाले आहे. पण नेहमीचे व्यापारी मार्ग व त्या मार्गांवरील व्यापारी वाहतूक याविषयीच्या नोंदी फारशा उपलब्ध नाहीत. मेजर रेनेल यांनी १७८२ मध्ये प्रसिद्ध केलेला 'हिंदुस्थानचा नकाशा'[१] व त्यावरील खुलासेवजा प्रबंध यांत वापरलेल्या सर्व नोंदी युरोपीयांच्या वृत्तांतातील आहेत. आजही हिंदी दप्तरे वगैरेंतील नोंदी रेनेलच्या लिखाणात पडताळा म्हणून वापरावयाच्या तर लष्करी हालचालींबाबतच्या नोंदींखेरीज दुसरे काही सापडणार नाही. याचे कारण उघड आहे. पूर्वकालीन माहिती उपलब्ध होते ती कोणीतरी, कोणत्या तरी उद्देशाने मिळवून नोंदलेली असते अगर कोणत्या तरी तत्कालीन लिखाणात निर्देशिलेली असते. आज उपलब्ध असलेले सर्व पत्रव्यवहार राजकारण्यांच्या दप्तरांतील. तेव्हा त्यांत आर्थिक माहिती विशेषत्वे नोंदली जाण्याचे कारण नाही. सरकारी कारभाराशी जिचा प्रत्यक्ष संबंध येतो अशी माहिती सरकारी दप्तरांतील नोंदीत सापडते. पेशव्यांच्या रोजनिशीतील अर्थव्यवहाराची माहिती कशा प्रकारची आहे यावरून या नोंदींचे स्वरूप स्पष्ट होते. पेठा वसविणे, जकातीचे दर अगर जकात माफी, विशिष्ट व्यवहारांवरील निर्बंध, सरकारी कर्जाच्या नोंदी, खाशांनी

१. Rennel Major James, *Memoir of a Map of Hindoostan, of the Moghul's Empire*, London, 1st Edition 1782.

मागविलेल्या चैनीच्या अगर इतर वस्तूंबाबतचे खर्च, देशाधिकारी, ग्रामाधिकारी व श्रीमंत यांच्या घरची कार्ये, आहेर, इत्यादी प्रकारच्या नोंदींवरूनच आर्थिक व्यवहारावर मुख्यतः प्रकाश पडतो. खुद्द सावकारी दप्तरे घेतली तर काही हुंड्या व पोतनिशी व्यवहार यांखेरीज नवीन प्रकारची माहिती त्यांत मिळत नाही.

काही प्रकारची माहिती वर्षानुवर्षे एकाच पद्धतीने लिहीत जाण्याचा व ती व्यवस्थित संघटित करण्याचा प्रघात असता तर त्यावरून काही महत्त्वाचे निष्कर्ष काढण्यासारखे होते. उदाहरणार्थ, अमुक स्थानाचे अगर मार्गाचे, अमुक वस्तूंचे अगर वाहतुकीबाबतचे जकातीचे अमुक दराने येणारे उत्पन्न एका कालखंडात इतके होते, दुसऱ्यात काही निराळे होते, अशा प्रकारची माहिती फार उपयुक्त ठरू शकते. पण वारंवार बदल, अनेक माफ्या, मक्त्याने वसूल विकणे, इत्यादी गोष्टींमुळे उपलब्ध नोंदींचा उपयोग विशिष्ट व्यवहाराचे मान अगर त्याचे चढतेउतरते प्रमाण यांविषयी अंदाज करण्याकडे फारसा होऊ शकत नाही.

खरी महत्त्वाची गोष्ट ही की आपला कारभार सुकर होण्याकरिता किंवा पुढील धोरणे बांधण्याकरिता आर्थिक व्यवहारांविषयी पद्धतशीर, विश्वसनीय माहिती जमवून अभ्यासणे ही दृष्टीच आपणांकडे राजकारणी, व्यापारी, सावकार यांची कोणाची नव्हती. वार्षिक आढावा, अहवाल, अंदाजपत्रक यांच्या संकलनाची पद्धतीही जारी नसावी. यामुळे दैनंदिन व्यवहाराच्या ज्या नोंदी होत जातील त्यांपलीकडे मुद्दाम नोंदलेली माहिती आपणांस मिळत नाही. पेशव्यांचे वकील निजामाच्या शरीरयष्टीचे बारकाव्याने वर्णन करणे महत्त्वाचे समजतील पण त्याच्या राज्यातील व्यापार-उदीम, पेठा-शहरे इत्यादी बाबींची माहिती मिळविणे व ती पुरविणे यांकडे लक्ष द्यावे असे त्यांस वाटणार नाही.

दैनंदिन व्यवहाराच्या नोंदींवरून माहिती किती मिळते हेही त्याची व्याप्ती काय यावर अवलंबून असते. सरकारी कारभाराचा सर्व प्रकारच्या अर्थव्यवहाराशी सारखा संबंध येत असल्याखेरीज या नोंदीत अनेक अंगोपांगांचा उल्लेखही यावयाचा नाही. नवीन पेठ वसविण्याकरिता कौलनाम्याची जरुरी म्हणून कौलनाम्याच्या नोंदीवरून पेठ वसविण्याचा काल व वसविणाऱ्या व्यक्ती यांबाबत काही अंदाज बांधता येतो. परंतु पेठेची पुढील वाढ, तेथील व्यवहारांचे स्वरूप यांबाबत काही माहिती दप्तरांत मिळत नाही. ज्या पेठांतून श्रीमंतांकडे कापड येते त्या तत्कालीन नावाजलेल्या आहेत असा अंदाज बांधता येतो; पण इतर किती आहेत, कोठे आहेत, भरभराटीत आहेत किंवा नाहीत, त्यांत उत्पादन कशा प्रकारचे होते हे कोणत्याही एका कालखंडाबाबत अजमावण्याकरिता कोठे माहिती मिळत नाही. आर्थिक इतिहासज्ञ कापडपेठांच्या यादीकरिता द्रौपदीवस्त्रहरणासारख्या आख्यानात कवींनी दिलेल्या याद्या धुंडाळतात. पण या याद्यांत दिलेली नावे या कवींस माहीत होती याहून जास्त काहीच सांगता येत नाही. यादीतील कोणतेही नाव कवीने प्रत्यक्ष माहितीवरून दिले की पारंपरिक यादीवरून, की केवळ यमकात बसावे म्हणून वापरले अशाविषयी आज काही विधान करणे कठीण होते.

## लोकसंख्या अजमाविण्यातील अडचणी

तत्कालीन युरोपीयांच्या दप्तरांत महत्त्वाची अनेकविध माहिती मिळते असे वर सांगितले, पण त्यांतही ज्या महत्त्वाच्या उणिवा आढळतात त्यांवरून विशिष्ट सरकारी अगर खाजगी कामाकरिता माहिती हवी असल्याखेरीज तिची सहसा नोंद होत नाही हा मुद्दा स्पष्ट होईल. कोणत्याही देशाच्या अगर प्रांताच्या लोकसंख्येबद्दल खात्रीलायक माहिती एकोणिसाव्या शतकापूर्वी युरोपातही सहसा मिळत नाही. तेव्हा हिंदुस्थानात याबाबत काही अपेक्षा बाळगण्याचे कारण नाही. परंतु हिंदुस्थानात मोठमोठ्या शहरांचीही लोकसंख्या अठराव्या शतकात काय होती याचा साधारण खात्रीलायक अंदाजही बांधणे कठीण आहे.

ही परिस्थिती हिंदी राजांच्या ताब्यातील प्रदेशांपुरतीच नाही. पूर्णपणे युरोपीयांच्या अंमलाखाली ज्यांची वाढ झाली अशा शहरांच्या वेळोवेळीच्या लोकसंख्येबद्दलही आज निश्चयाने काही सांगता येत नाही. मुंबई, कलकत्ता, मद्रास, पांडिचेरी या शहरांच्या पूर्वकालीन लोकसंख्येबद्दल आज काही विधान करावयाचे तर ते काही थोड्या समकालीन माणसांनी नोंदून ठेवलेल्या अंदाजांवरून बहुधा करावे लागते. पण असल्या नोंदींची विश्वसनीयता अगदी बेताचीच असते. उदाहरणार्थ, मुंबईच्या लोकसंख्येबाबत खालील अंदाजी गोष्टी गॅझेटीयरमध्ये[1] आढळतात : सन १६७०–६०,०००; सन १७१५–१६,०००; सन १७४४–७०,०००. १७६४ सालचे दोन अंदाज नमूद आहेत. एका अंदाजावरून त्यावेळची मुंबई शहराची लोकसंख्या १,४०,००० इतकी होती; तर दुसरा अंदाज ६०,००० असा आहे. दोन्ही अंदाज पूर्णतया अविश्वसनीय मानले जातात. पण प्रत्यक्ष परिस्थिती काय असू शकेल हे काहीच सांगता येत नाही. मद्रास शहराची लोकसंख्या १८७२ व १८८१ च्या खानेसुमारीवरून ४ लाखांपेक्षा थोडी कमजास्त होती असे आढळते. पण मद्रासच्या लोकसंख्येचे १७५० ते १८७० पर्यंत केलेले सर्व अंदाज ४॥ लाखांच्या पुढचे होते व १७५० ते १८०० च्या दरम्यान तर या अंदाजाची मजल ७॥ ते १० लाखांपर्यंत होती. एवंच ब्रिटिशांनी वसविलेल्या त्यांच्या अंमलाखालील प्रमुख शहरांच्या लोकसंख्येचा विवक्षित कालाबाबत ठोकळ अंदाज करणे हेही आज दुरापास्त आहे. याचे कारण हेच की ब्रिटिश राज्यकर्त्यांस ज्या गोष्टींचे नियमन करावे लागले, ज्याबाबत त्यांनी निर्बंध घातले किंवा विशिष्ट कारणांकरिता माहिती गोळा केली त्याविषयीच ऐतिहासिक परिस्थितीचे पुरेसे ज्ञान आज त्यांच्या दप्तरांवरून होऊ शकते. मुंबई बंदरातील आयात-निर्यातीचे आकडे किंवा दक्षिणेतील इनाम-सरंजामांबाबत माहिती उपलब्ध आहे ती त्या वेळच्या राज्यकर्त्यांस या गोष्टी महत्त्वाच्या वाटल्या म्हणून.

युरोपीय व्यापारी व राजकर्ते यांची काही बाबतीत जास्त व्यापक व चिकित्सक वृत्ती व आकडेसिद्ध माहिती सहेतुक गोळा करण्याची त्यांची पद्धती यांमुळे त्यांच्या दप्तरांतून एतद्देशीय दप्तरांत अनुपलब्ध असलेली आपल्या प्रदेशांविषयीचीही माहिती मिळते. असे असले तरी आपली दप्तरे ही काळजीपूर्वक, विशिष्ट उद्देशानुसार धुंडाळिली असता आज आपणांस वाटतो त्याहून पुष्कळच भरीव व तपशीलवार आर्थिक इतिहास लिहिता येईल अशी माझी समजूत आहे. शहरांच्या लोकसंख्येचीच गोष्ट घ्या. अनेक कारणांकरिता आपणांकडेही खानेसुमारीच्या म्हणून नोंदी आढळतात. या जुन्या खानेसुमाऱ्या म्हणजे आधुनिक पद्धतीच्या संपूर्ण लोकसंख्येच्या शिरगणतीसारख्या नाहीत. डोईपट्टी, घरपट्टी, व्यवसायपट्टी इत्यादी पट्टयांच्या निमित्ताने काही खानेसुमाऱ्यांतील माहिती गोळा झालेली आढळते. तेव्हा प्रत्येक खानेसुमारीचे विवक्षित स्वरूप ध्यानात घेऊनच तीत गोळा केलेल्या माहितीचा उपयोग केला पाहिजे. काही वेळेस गणती अगर नोंद विशिष्ट प्रसंगानुसार होऊ शकते. पुणे शहराच्या पाहणीवरील माझा ग्रंथ तयार करीत असताना पेशवे दप्तरातील काही महत्त्वाची माहिती चटकन कशी मिळविता येईल हे पाहण्याचा मी जो प्रयत्न केला त्याचा मघाशी उल्लेख केलाच. या वेळी मिळालेल्या कागदांत एक अत्यंत महत्त्वाचा कागद १७६४–६५ साली पुण्यातील निरनिराळ्या पेठांतील घरे, झोपड्या व खळी यांच्या संख्येबाबतचा आहे. या कागदातील यादीत निझामाच्या हल्ल्यात वाचलेली घरे, नवीन बांधलेली घरे, खळी, झोपड्या, यांची पेठवार एकूण माहिती आहे.[2] निझामाने पुण्यावर स्वारी करून जाळपोळ केली त्यावेळची परिस्थिती व तदनंतर वर्ष-दोन-वर्षांत झालेली सुधारणा यांविषयी काही विशिष्ट हेतूने

१. Gazetteer of Bombay Presidency, Vol. I, 1885, pp. 150-55.

२. हा कागद परिशिष्ट म्हणून शेवटी छापला आहे.

अंदाज बांधण्याकरितां ही माहिती गोळा झाली असावी असे आज म्हणता येते. ही माहिती ज्या पद्धतीने मांडली आहे ती पद्धती, तिजमधील एकंदर तपशिलाचे स्वरूप व ती उपलब्ध होण्याचे स्थान या सगळ्यावरून ही माहिती विश्वसनीय आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. तसेच, ज्याअर्थी काही विशिष्ट हेतुपूर्वक माहिती गोळा केलेली दिसते त्याअर्थी ती त्या वेळेस जितकी काळजीपूर्वक गोळा करणे शक्य होते तेवढ्या काळजीपूर्वक गोळा झाली होती असे मानण्यास हरकत नाही. या गोष्टी मान्य केल्यास हा कागद फार महत्त्वाचा ठरतो. कारण त्यावरून पुणे शहराचा विस्तार व शहराची लोकसंख्या यांविषयी बराच विश्वसनीय अंदाज बांधता येतो. या कागदाबाबत तपशीलवार विवेचन मी पुणे शहराच्या पाहणीच्या ग्रंथात केलेले असून १७६५ साली पुण्याची लोकसंख्या सरासरी ४०,००० असावी असा अंदाज बांधला आहे.[१] पुणे शहराबाबत या कागदाच्या आधारे केलेला अंदाज प्रत्यक्ष समकालीन तपशीलवार आंकड्यांवर मी उभारला असल्यामुळे त्याची विश्वसनीयता बरीच आहे. अठराव्या शतकातील मुंबई, मद्रास व कलकत्ता या शहरांच्या लोकसंख्येच्या केलेल्या कोणत्याही अंदाजापेक्षा तो अनेक पटीने जास्त बरोबर आहे असे म्हणता येते.

या एका उदाहरणावरून, पेशवे दप्तर धुंडाळल्याने आपणांस सर्वच बाबतीत विश्वसनीय माहिती मिळेल असे म्हणण्याचा माझा आशय नाही. एवढेच की, आपल्याकडील सरकारी व्यवहाराची पद्धती युरोपीय सरकारी व्यवहारापेक्षा बरीच भिन्न असली आणि त्यामुळे माहितीत अनेक वैगुण्ये आली असली तरी आपल्याकडेही सरकारास अनेक व्यवहार, अनेक चौकशा करणे कारणपरत्वे प्राप्त होते, तदनुषंगाने सरकारी नोंदी होत होत्या, माहिती नमूद होत होती. तेव्हा नवीन दृष्टीने दप्तरे पाहू लागल्यास आपणांस अजून पुष्कळ सापडण्यासारखे आहे.

जी ऐतिहासिक माहिती उपलब्ध आहे अगर होऊ शकेल तिचे स्वरूप काय असण्याचा संभव आहे, आपणांस याबाबत निरनिराळ्या राजवटींत व समाजांत कोणत्या प्रकारच्या अपेक्षा करिता येतील व अनेक खाजगी दप्तरे आणि विशेषतः पेशवे दप्तरातील सरकारी कागदांचा प्रचंड संग्रह बहुतांशी न तपासलेला असल्यामुळे त्यांत शोधक बुद्धीने व चिकाटीने प्रयत्न केल्यास बराच लाभ होण्याचा संभव कसा आहे हे येथवर सांगितले. आता मराठी समाजाच्या आर्थिक इतिहासातील काही घटना, प्रक्रिया व काही समस्या यांबद्दल थोडक्यात विवेचन करून अभ्यासकांस काय करता येण्याजोगे आहे याबद्दलच्या थोड्या सूचना मांडतो.

## 'महाराष्ट्रीय' वाणी समाजाचा अभाव

अर्थव्यवहारदृष्ट्या मराठी समाजाबाबतची अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे 'महाराष्ट्रीय' असा लौकिक दृष्ट्या समजला जाणारा किंवा आपणास तसे समजणारा वाणी समाज आपणांकडे नाही. कोकणी वैश्य असे संबोधिलेल्या काही जाती या विधानास अपवादात्मक आहेत, पण कोकणातही त्यांची संख्या लहान व त्यांच्या व्यवहाराचा विस्तार थोडा. तेथील व्यवहारही मुख्यतः मूळ परप्रांतांतून आलेल्या निरनिराळ्या वाणी व तत्सम जातींच्या हाती आहे. महाराष्ट्रीय वाणी समाजच नसावा ही घटना खरोखर अत्यंत विस्मयजनक मानली पाहिजे. भारताच्या इतर सर्व प्रदेशांत तद्देशीय वाणी समाज कमीअधिक प्रमाणात अस्तित्वात असून व्यवहार करीत आहेत. ही घटना जशी विस्मयजनक तशीच अनर्थकारकही मानली पाहिजे. यामुळे आपला समाज एकांगी बनला व राहिला व आर्थिक व्यवहाराची

१. Gadgil D. R., *Poona a Socio-Economic Survey*, Gokhale Institute of Economics and Politics, Poona, Part I (1945), p. 10 and Part II (1952), pp. 8-11.

इष्ट दिशेने वाढ होणे व त्याच्या वाढीचा व भरभराटीचा समग्र समाजास पुरा फायदा मिळणे हे झाले नाही. या मूलभूत पुरातन घटनेच्या अनुषंगाने अनेकविध ऐतिहासिक संशोधन व विवेचन करणे शक्य आहे व आवश्यक आहे. यांपैकी अजून काही झालेले नाही, व इतिहासज्ञांच्या लिखाणात या परिस्थितीचा उल्लेखही क्वचितच येतो.

राजवाड्यांच्या सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेत याविषयी खालील मजकूर सापडतो : "पुरातन आर्यसमाजयंत्रांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी चतुर्वर्णात्मक विभागणी असे, तिच्याऐवजीं ब्राह्मण व शूद्र अशी द्विवर्णात्मक पद्धति शके १२२२ ते १५२२ पर्यंत मान्य समजूं जाऊं लागली. शेटे, महाजन वगैरे वैश्य जाती यादवांच्या राज्यापासून महाराष्ट्रांतील ग्रामसंस्थांत व नागरसंस्थांत चालू होत्याच. परंतु त्यांचा धंदा मारवाड व गुजराथ या दोन प्रांतांतील वाण्यांनीं मुसल्मान अंमलांत आक्रमून टाकिला. त्यामुळें महाराष्ट्रातील शेटे, महाजन वगैरे लोक शेतीवर उदरनिर्वाह करूं लागले."[1]

एके काळी महाराष्ट्रात वाणी जातीचा व्यापारी समाज होता व तो कालपरत्वे नाहीसा झाला असे मानण्यास काही पुरावा आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. महाजनकी, शेट्येपण इत्यादी वतने महाराष्ट्रात चालू होती व आहेत यावरून कोणताच निर्णयात्मक निष्कर्ष काढता येत नाही. आज 'महाजन', 'शेटे' ही आडनावे अनेक महाराष्ट्रीय जातीत रूढ आहेत. इतर प्रदेशांत जे व्यवसाय अगर कारभार वाणी करीत असत ते एतद्देशीय वाणी नसल्यास दुसऱ्या कोणीतरी करणे अपरिहार्य आहे व विशिष्ट व्यवहार अगर कारभार केला म्हणजे त्याविषयक संज्ञा नावात, आडनावात चिकटणे हे ओघाने घडते. अस्सल मराठा घराण्यातील तुकोबांनी स्वतःला व्यवसायावरून वाणी म्हणवून अनेक संशोधकांची दिशाभूल केली हे सुप्रसिद्ध आहे.

महाराष्ट्रात वाणी एके काळी असते व ते काही कारणांनी व्यवसायच्युत झाले असते तर त्यांची स्मृती कोणत्या तरी चिन्हाने टिकून राहिली असती. व्यवसाय व जात यांची फारकत होणे हे पूर्वीही घडत असे, तेव्हा कोणताही समाज अजीबात परागंदा किंवा नष्ट झाल्याखेरीज त्याच्या अस्तित्वाची कोणतीच खूण शिल्लक न राहणे असंभाव्य वाटते. ज्यायोगे महाराष्ट्रातील वाण्यांवर विशेष संकट यावे अशी ऐतिहासिक परिस्थिती उत्पन्न झाल्याचेही दिसत नाही. राज्यक्रांती झाली असता व्यापारी-सावकारी व्यावसायिकांस त्याची झळ लागू शकते. आर्थिक इतिहास आपणांकडे लिहिला गेला नसल्यामुळे असल्या घडामोडींविषयी नोंद होण्याचा फारसा संभव नाही. कै. दत्तोपंत आपटे ह्यांनी घोरपडे घराण्याच्या इतिहासाच्या प्रस्तावनेत[2] असा एक प्रसंग नमूद केला आहे. बहामनी राज्यातील सावकार-सराफांनी बहामनी नाणे आटवून विजयनगरचेच नाणे चालू ठेवण्याचा सारखा सपाटा चालविला. त्यामुळे महंमदशाहने दक्षिणेतील सावकार-सराफांची १३६० साली कत्तल करून उत्तर हिंदुस्थानातील खत्री सावकारांस या कारभाराचा मक्ता दिला. पुढे पन्नास वर्षांनी हा मक्ता रद्द करून फिरूझशहाने दक्षिणी सावकारांस व्यवहार मोकळा केला असे त्यांनी म्हटले आहे. प्रस्तुत ग्रंथात ते म्हणतात :

"अल्लाउद्दीनच्या हयातींत बहामनी राज्यांची प्राथमिक मांडणी करून स्थिरस्थावर करण्याचें काम सुरू असल्यानें त्यानें विजयनगरच्या प्रबळ साम्राज्याशीं युद्धाचे प्रसंग टाळण्याची खटपट केली एवढेंच नव्हे, तर त्यानें आपल्या राज्यांत विजयनगरच्या राज्यांतील नाणीं चालविण्यासहि हरकत घेतली नाहीं.

१. राजवाडे विश्वनाथ काशिनाथ, लेखसंग्रह भाग १, 'ऐतिहासिक प्रस्तावना', पृ० ३५२.

२. आपटे द. वि., *'मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास'*, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३४, प्रस्तावना, पृष्ठे ७३–७४ व ७६–७७

पण हें धोरण अल्लाउद्दीनचा मुलगा महंमद यास पटलें नाही. 'धार्मिक व राजकीय अशा दोनहि दृष्टींनीं बहामनी नाणें चालविणें जरूर आहे' असा विचार करून त्यानें भरपूर नाणें पाडलें व तें मात्र तेवढें आपल्या राज्यांत चालावें आणि विजयनगरकरांचें नाणें चालूं नये असेंहि त्यानें ठरविलें. त्यामुळे विजयनगरचा बुक्कराज व वरंगळचा कन्हयालाल यांच्या नाण्यांचा प्रसार बंद पडून त्यांचा तोटा होऊं लागला. तेव्हां त्यांनीं बहामनी नाण्यांचा प्रसार बंद पाडण्याकरितां त्या राज्यांतील सावकार व सराफ यांना वश करून घेतलें व त्यांच्यामार्फत बहामनी होन आटविण्याचा व सांठवण्याचा सपाटा चालवला. असें करण्यांत त्या सराफांचा फायदा होता; कारण बहामनी होनांत सोन्याचें प्रमाण अधिक होतें. यामुळे तें सांठविणें म्हणजे पर्यायानें सोनेंच शिल्लक ठेवण्यासारखें होतें. शिवाय ते होन विकत घेण्यास विजयनगर व वरंगळ येथील टांकसाळी तयार होत्या. आपल्या राज्यांतील सराफांनीं चालविलेला हा प्रकार महंमदशहाच्या लक्षांत आला तेव्हां त्यानें बरेच वेळां असें न करण्याबद्दल सावकारांना व सराफांना बजावून सांगितलें; पण त्यांनीं फारसें लक्ष दिलें नाही. शेवटीं, इ. स. १३६० च्या मे-जूनमध्यें बादशाही हुकमानें बहामनी राज्यांतील सावकार व सराफ यांची सरसकट कत्तल करण्यांत आली! आणि हा धंदा उत्तर हिंदुस्थानांतील खत्री लोकांनी करावा व इतरांनीं करूं नये असा वटहुकुम निघाला."

या घटनेचे परिणाम टिकाऊ झालेले दिसत नाहीत. प्रस्तावनेतच याबाबत पुढे खालीलप्रमाणे मजकूर आहे :

"ही परिस्थिति पुढें फार दिवस टिकली नाहीं. हिंदुस्थानी व दक्षिणी हा भेद हळुंहळूं लुप्त होऊन मुसलमानांत दख्खनी व परदेशी या भावना वाढूं लागल्या आणि रजपूत सरदार व खत्री सावकार दक्षिणेंतील लोकांशी सरूप होऊं लागले; तेव्हां निराळा देखावा उत्पन्न होऊं लागला. कारण खत्री सावकारांना (महंमदशहाच्या वेळीं) मिळालेला सराफीचा मक्ता ५० वर्षांनीं फिरूजशहाच्या वेळीं रद्द झाला; व दक्षिणेंतील सराफांनाहि कांहीं नजराणा भरून आपला धंदा करण्यास बहामनी राज्यांत मोकळीक मिळाली."

या अगर असल्या प्रकारच्या घटनेने महाराष्ट्रातील पूर्वीचा वाणी समाज नष्ट झाला असावा असे मानणे शक्य नाही. एकतर अशा कत्तलीत काही थोड्या निवडक घराण्यांचे बळी पडले तरी समग्र प्रादेशिक समाज नष्ट होणे शक्य नाही. जुन्यांचे काही तरी अवशेष व स्मृती असावी व जुन्यांऐवजी जे नवीन आले त्यांचे कोणी प्रतिनिधी येथे कोणत्या तरी स्वरूपात असावे. पण यांपैकी काही दिसत नाही. येथील सर्व व्यवहार मराठशाहीच्या दिवसांच्या आधी स्थानिक इतर जातींनी, वाण्यांच्या ऐवजी, केलेला दिसतो.

महाराष्ट्रात वाण्याची जात जवळजवळ नाहीच. याचे कारण, व्यापाराची वृद्धी होण्यास आवश्यक लागणारी राजधानीची अगर उतारपेठेची ठिकाणे महाराष्ट्राच्या इतिहासात फारशी महत्त्वाची अशी थोडी आढळतात, असे डॉ. केतकर देतात.[1] भौगोलिक परिस्थितीमुळे प्रमुख व्यापारमार्ग दुसरीकडून गेले हे कारण व्यापाराची व उद्योगधंद्यांची विशेष वाढ न होण्यास असू शकेल. पण थोडाबहुत तरी व्यापार प्रत्येक प्रदेशात नेहमी असणारच; असे असता, हिंदुस्थानच्या इतर सर्व प्रदेशांत समाज-रचनेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग समजला गेलेला वाणी समाज मुळात आपणांकडे नसावा हे एक कोडेच वाटते. या कूटप्रश्नाकडे महाराष्ट्राचा वसाहतकाल व महाराष्ट्रसमाजरचनेचा आदिकाल यांच्या अभ्यासकांनी लक्ष देणे जरूर आहे.

एका दृष्टीने हे विषयांतर झाले. माझा मुख्य रोख अठराव्या शतकातील घडामोडींवर आहे. तेव्हा

१. केतकर डॉ. श्रीधर व्यंकटेश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग १, 'हिंदुस्थान व जग', पृ० ४६१.

त्यांकडे आता वळू. विषयांतराचा मुद्दा हा की, महाराष्ट्रात मूळचा वाणी समाज नव्हता आणि त्यामुळे बहुशः इतर जातींतील व्यक्ती येथे व्यापार-सावकारी करीत, असे शिवकालीन व पहिल्या दोनतीन पेशव्यांच्या काळातील नोंदींवरून आढळते. केव्हातरी जुन्या काळी येथे असलेल्या मूळच्या वाणी समाजास परस्थांनी येऊन मागे सारले, असे राजवाड्यांनी, वर उद्धृत केलेल्या उताऱ्यांत म्हटले आहे, ते खरे मानण्यास काही पुरावा नाही. जो काही पुरावा आहे तो सर्व उलट बाजूला. पुणे शहराचा इतिहास पाहिल्यास येथे गुजरातमधील व्यापारी जमातीचे आगमन सन १७४०–५० च्या आधी विशेष प्रमाणात झालेले आढळत नाही; आणि मारवाडी वाणी समाज तर अठराव्या शतकाच्या अखेरच्या भागातच येथे आला असावा. यात आश्चर्य करण्यासारखेही काही नाही. परस्थ मुद्दाम उठून कोठे गेले तर तेथे काही विशेष पराक्रमाची संधी आहे, लाभ आहे, म्हणूनच ते जाणार. जेथे राज्यक्रांती होत आहे, सारखे सत्तांतर चालले आहे, तेथे आर्थिक व्यवहाराच्या वृद्धीस अवसर काहीच नसतो. अशा काळात स्थानिक रहिवाश्यांनी कसातरी व्यवहार करून योगक्षेम चालवावा; परस्थांस मुद्दाम येण्यास विलोभन काय असणार? औरंगजेबाच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रातील परिस्थिती काहीशी स्थिरावली. नंतर मराठ्यांचे प्रतिहल्ले उत्तरेवर सुरू झाल्यामुळे तेथील संपत्तीचा ओघ इकडे थोडा वळला. मुख्यतः खंडणी वगैरेद्वारा चलन, हुंड्या यांच्या देवघेवीची व ने-आणीची गरज उत्पन्न झाली. यामुळे असल्या व्यवहारांत वाकबगार असलेल्या व्यक्तींच्या कर्तृत्वास वाव मिळाला. पुणे शहरातील बोहरी समाजाचा जमातखाना १७३० साली बांधला गेला असे विधान केलेले आढळते.[1] एकंदर परिस्थितीच्या मानाने हे साल जरा लवकरचे वाटते. परंतु बोहरी समाज येथे अगदी लवकर यावा यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. अगदी पूर्वीपासून बऱ्हाणपूर हे बोहऱ्यांचे केंद्र. उत्तरेस मराठ्यांच्या पहिल्या मोहिमा झाल्या त्या मध्यभारतात. औरंगजेबाच्या मृत्यूपूर्वीच सिरौंचपर्यंत ते पोचले होते; या मार्गावर बऱ्हाणपूर हे मोक्याचे व व्यापारी-सावकारी व्यवहारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठिकाण; तेव्हा बऱ्हाण-पूरच्या प्रमुख व्यापारी जमातीने पुण्यास लवकर पोचावे हे साहजिकच आहे. बोहरी हे मुख्यतः व्यापारी; सावकारी-सराफी व्यवहारांत ते विशेष नव्हते. तेव्हा ते येथे लवकर आले असले तरी आपल्या विवक्षित क्षेत्राच्या बाहेर कधी गेलेले नसावे. यामुळे राजकारणी दप्तरांतून त्यांचा उल्लेख फारसा नाही.

## पुण्याची वाढ व भरभराट

सन १७५०–६० च्या पुढे पुण्याची वाढ व भरभराट तीस-चाळीस वर्षे फार झाली असे निरनिराळ्या लक्षणांवरून दिसून येते. सन १७६० ते १८०० या अवधीत या शहराची लोकसंख्या ४०,००० वरून एक लाखावर गेली असावी. अनेक नवीन पेठा वसविल्या गेल्या. येथील दरबाराचे महत्त्व व येथील उलाढाली ही सर्वच वाढली. व्यापार, सावकारी व सराफी यांचे मानही मोठे झाले. या वेळेस लढवय्ये व विद्वान, कारागीर व व्यापारी या सर्वांचाच भरणा हरदिशेकडून पुण्यात झालेला आढळतो. सावकारी-सराफी व व्यापारी व्यवहार करणारे बाहेरून कसे, किती व केव्हा आले याचा इतिहास लिहिण्यास आज पुरेशी छापील सामग्री उपलब्ध दिसत नाही. १७२५ साली मनोहरदास नावाच्या साताऱ्यास सावकारी करू इच्छिणाऱ्या सुरतेच्या सावकारास शाहूने अभयपत्र दिले असा या-विषयीचा जुना असा उल्लेख आढळतो.[2] पण बरीच सावकार वगैरे मंडळी बऱ्हाणपूर व औरंगाबाद येथून

१. Gazetteer of the Bombay Presidency, Vol. XVIII, 1885, Poona, Part I, p. 334.

२. 'पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद', खंड ३०, १९३३ (शाहू व पहिले दोन पेशवे–संकीर्ण), लेखांक ३५८, पृ० ३७५.

पुण्यास आली असावी असे दिसते. त्यांच्या उद्योगाच्या सुरवातीच्या कालात सार्वजनिक नोंदींत त्यांची नावे येणे असंभाव्य. पण सन १७६० नंतर व विशेषतः सन १७७० नंतर ही नावे बरीच येतात. त्यावरून याचे आधी वीस-पंचवीस वर्षे, म्हणजे सन १७४०-५० चे दरम्यान, यांचे आगमन सुरू झाले असावे असे म्हणण्यास हरकत नाही.

पेशव्यांच्या रोजनिशांच्या उताऱ्यांच्या, बाळाजी बाजीरावांच्या कारकीर्दीतील, दुसऱ्या खंडात सरकारने वेळोवेळी कर्जे घेतली त्याबद्दल जी माहिती दप्तरी मिळाली ती एकत्रित करून दिली आहे. या यादीत जवळ जवळ दोनशे नोंदी आहेत.[१] यातील पहिली नोंद सन १७४० ची असून शेवटची १७६१ सालची आहे. ही धनकोंची यादी पाहिली तर प्रमुख नावे रास्ते, भिडे, कर्वे, तांबवेकर, पटवर्धन, गद्रे, अनगळ, मधवे, थत्ते, त्रिवलकर, भोकरे, गोसावी मंडळी इत्यादींचीच आढळतात. या सर्व नोंदीत नेमिदास अनीदत्त सावकार एवढेच नांव जैन वाटणारे आहे. हे गृहस्थ गुजराती अगर मारवाडी असण्याचा संभव आहे. तेव्हा, जवळजवळ सन १७६० पर्यंत तरी गुजराती अगर मारवाडी मंडळी पुण्याच्या सरकारी सावकारी व्यवहारात महत्त्व पावली नव्हती हे उघड आहे. सरकारास कर्ज देणाऱ्या सावकारवर्गात गुजराती सावकार मोडत नव्हते म्हणजे ते अजून येथे जुने झाले नव्हते असे म्हणावयास हरकत नाही.

## छापलेल्या कागदांतील मोठी उणीव

आजवर छापलेल्या कागदांतील मोठी उणीव म्हणजे आपणांस बरे वाटतील तेच सुटे कागद संशोधक छापतात; दप्तरांतील किंवा संग्रहांतील एखाद्या विषयासंबंधीची माहिती संकलित करण्याचा कोठे प्रयत्न करीत नाहीत. वर उल्लेखिलेली वाड-संपादित रोजनिश्यांतील यादी ही या समग्र ग्रंथांत अपवादात्मक आहे. ही यादी कोणत्याही एका कागदात नव्हती. सरकारी कर्ज-व्यवहारात्मक बहुतेक नोंदी जमेस धरून संपादकांनी ही मुद्दाम तयार केलेली दिसते. त्यामुळे हीत काही उणिवा राहिल्या असल्या तरी आर्थिक इतिहासाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची आहे. सावकार-सराफ यांच्या नावांची दुसरी एकच अशी छापलेली यादी माझ्या पाहण्यात आलेली आहे. ही यादीही अशीच एका संशोधकाने संकलनाचे श्रम घेतले म्हणून तयार झाली. श्री नानासाहेब चापेकर यांचा 'तोडा'[२] या विषयावर एक लेख आहे. या लेखात तोडा म्हणजे काय असावा याचा ऊहापोह करून शेवटी पटवर्धनांच्या जमाखर्चात नमूद केलेल्या शके १६७७-७८ (इ. स. १७५५-५६) मधील तोडेवाल्यांच्या नावांची यादी त्यांनी दिली आहे. अर्थात ही यादी म्हणजे पुण्यातील तत्कालीन समग्र प्रमुख सावकारांची यादी नव्हे. एका मोठ्या पेढीशी एका वर्षी तोड्याचा व्यवहार ज्यांचा झाला अशांचीच ती यादी आहे. तरीही यादी महत्त्वाची वाटते. १७५५-५६ साली सरकारला कर्ज दिलेल्या सावकारांपैकी अनेकांची नावे हीत आहेत. तेव्हा पुण्यातील प्रमुख सावकारांची ही एक प्रातिनिधिक यादी आहे असे मी मानतो. या यादीत एकंदर नावे ७५ आहेत. यांत गुजराती नावांचे प्रमाण बरेच आहे. कानदास पुरुषोत्तम, दयाराम आत्माराम, दुर्लभदास गोविंदजी, भुकणजी कसीदास, वेणीराम दवे अशी गुजराती वाटणारी १२ नावे एकंदर ७५ पैकी आहेत. तेव्हा, १७५५ पर्यंत गुजराती सावकार-सराफ पुण्यात मोठ्या प्रमाणावर व्यवहार करू लागले होते असे म्हणण्यास हरकत नाही.

१. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रॅन्सलेशन सोसायटी, पुणे, १९०६, पृ० १७०-१८०.

२. चापेकर ना. गो., 'तोडा', भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक, वर्ष २२, अंक ३-४; पृ० ८९-९३.

या विषयाच्यासंबंधी तिसऱ्या एका यादीचाही उल्लेख करावयास हवा. पेशवे-दप्तरातून निवडलेल्या कागदांत 'कापड-पेठेतील व्यापाऱ्यांचीं नांवें' अशा मथळ्याचा १७७३ सालचा एक कागद छापला आहे.[1] या कागदातील यादीत एकंदर ७१ नावे आहेत. ही ७१ नावे तपासली तर पेशव्यांच्या धनकोंची म्हणून नावे दिली तशांचीच मुख्यतः ही यादी दिसते. हीत फक्त छबिलदास बऱ्हाणपूर व माधवदास गोडीदास अशी दोनच नावे गुजराती वाटतात. या कागदाचे निश्चित स्वरूप माहीत नसल्यामुळे यादीवरून निश्चित अनुमान काही काढता येत नाही. तरी यावरून कापड-व्यवहारात १७७३ साली पुण्यात गुजराती व मारवाडी मंडळी फारशी नव्हती असे वाटते. गुजरात्यांचा जम प्रथम सावकारीत बसून, नंतर ते व्यापारांत शिरले असे झाले असल्याचा संभव यावरून दिसतो. तसे झाले असल्यास ते साहजिकही दिसते. पुण्याचे स्थानिक व्यापारी कापड-व्यवहार पूर्वीपासून थोडाबहुत तरी करीत असणार. सावकार-सराफी, विशेषतः परप्रांतांशी मोठ्या प्रमाणावर हुंड्यांचा व्यवहार, हा येथे पूर्वकाळी जवळजवळ अज्ञात असणार; त्यामुळे या व्यवहारात वाकबगार असलेल्या व दूरवरचे संबंध असलेल्या लोकांनी प्रथम सावकारी-सराफी सुरू करावी यात आश्चर्य नाही.

आणखी एक यादी येथे उल्लेखनीय आहे.[2] सन १७३९ साली संक्रांतीनिमित्त पेशव्यांनी ज्यांना तिळगुळ पाठविला त्यांपैकी सावकार लोकांची यादी अशी आहे : १. बापूभट मोघे २. बाजी नाईक कांबरस ३. रघना नाईक ४. बावाजी नाईक कडु ५. रामजी घम ६. पांडुरंग नाईक दसपुत्रे ७. रामजी नाईक भिडे ८. भगवंत नाईक कानडे ९. गोविंद नाईक अनगळ १०. मोरावा नाईक तांबवेकर ११. दादाभाई १२. शेषाद्रि शास्त्री १३. कोंड जोसी १४. गोविंदभट बरवे.

## कागद-छपाईत तपशिलाचे महत्त्व

कापड-पेठेच्या यादीच्या अनुषंगाने एक विनंतीवजा मुद्दा पुढे मांडावासा वाटतो; तो हा की कागद प्रसिद्ध करताना त्याच्याबद्दल शक्य तेवढी तपशीलवार माहिती दिली तरच त्याचा उपयोग होऊ शकतो. वरील प्रथम उल्लेखित कागद छापताना फक्त एक बाजूस वर "२ जिल्हेज" शब्द, दुसऱ्या बाजूस इंग्रजींत 24–2–1773 हे आकडे आणि मथळा "१७७३ मधील कापडपेठेंतील व्यापाऱ्यांचीं नांवें" एवढाच ७१ नावांखेरीज मजकूर आहे. कागदातील माहितीचा उपयोग करावयाचा तर ही माहिती कशाकरिता गोळा करण्यात आली होती किंवा कोणत्या निमित्ताने नोंदण्यात आली हे कळणे फार महत्त्वाचे असते. हा कागद ज्यात छापला आहे त्या खंडाचे नाव 'पेशव्यांच्या रोजनिशींतील उतारे' असे आहे. वाडांनी संपादित केलेले रोजनिशीचे खंड आहेत त्यांत अशा नुसत्या याद्या कोठे छापलेल्या नाहीत. विजयादशमीस नजराणे केले किंवा पोशाख दिले; कारकुनांस जकात माफ केली; देवास अक्षत दिली; कुणबिणींस लुगडी वाटली अशा कोणत्या तरी विशिष्ट प्रसंगानुसार या नोंदी रोजनिशीत केल्या जात असे वाड-संपादित रोजनिश्यांवरून दिसते. वाडांच्या कालानंतर अनेक वर्षांनी मुद्दाम सरकारी योजनेनुसार संपादिलेल्या पेशवे-दप्तरातून निवडलेल्या कागदांच्या खंडांत आवश्यक प्रास्ताविक माहिती गाळून निव्वळ याद्या छापल्या आहेत ! यामुळे गैरसोय काय होते हे अगदी सहज कळण्यासारखे आहे. 'व्यापाऱ्यांची नांवें' असे मोघम म्हटल्यामुळे ही सर्व व्यापाऱ्यांची आहेत की काही निवडक मोठ्यांची आहेत किंवा विशिष्ट प्रकारच्या व्यापाऱ्यांची आहेत, हे कळून येत नाही. तसेच 'कापड-पेठ' म्हटले आहे, त्याचा अर्थ काय ? हा मूळच्या कागदांतील शब्द की संपादकांचा ? कागदांतील असल्यास

१. 'पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद', खंड २२, १९३२, क्रमांक २२९, पृ० १३१–१३३.
२. 'पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद', खंड १७, पृ० ६६.

कोणती विवक्षित पेठ किंवा एखादा बाजार अभिप्रेत होता याबद्दल काही निर्देश आहे काय? तो संपादकांचा शब्द असल्यास त्यांस काय म्हणावयाचे होते? अशा अनेक शंका उपस्थित होतात; त्यांचा ऊहापोह येथे करावयाचा नाही. विनंती एवढीच की, अर्थव्यवहाराबाबत कागद आधी थोडे; ते जर असे संपादिले तर जवळजवळ निकामी ठरतात; तेव्हा हे संपादिताना शक्य तितकी माहिती देऊन काळजीपूर्वक संपादावे.

नागर अर्थव्यवहार पुण्यासारख्या राजधानीच्या ठिकाणी कोणता, कोणाच्या हाती होता, त्यात नवे कोण, जुने कसे मागे पडले, वगैरे विवेचन आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले पाहिजे. हे आजच्या छापील साधनांवरून करताना किती उणिवा आहेत, काय अडचणी आहेत हे मी थोडक्यात दर्शविण्याचा प्रयत्न केला. सर्व प्रकाशित साधनेही मी काळजीपूर्वक पाहिली आहेत असा माझा दावा नाही. माझा उद्देश स्वतः काही नव्याने ऐतिहासिक सांगावे हा नाही, तर आर्थिक घडामोडींच्या अभ्यासकाची दृष्टी कशा प्रकारची असते, त्यास काय हवे असते हे ढोबळ उदाहरणांवरून दर्शवावे एवढाच आहे, आणि म्हणूनच अशा कागदांचे संपादन आणि संकलनाचे महत्त्व वगैरे गोष्टींकडे मी येथे लक्ष वेधिले.

## पुण्यातील परप्रांतीय सावकार व सराफ

आता पुण्यातील परप्रांतीय सावकार व सराफ यांच्या व्यवहारांकडे पुन्हा वळू. आर्थिक व सामाजिक व्यवस्था व प्रक्रिया यांचे बदलते स्वरूप पाहून त्या प्रश्नाचा एका निराळ्या तऱ्हेने विचार करता येईल. पुण्यातील गुजराती समाजातील जुन्या घराण्यांतील एक व्यासंगी गृहस्थ श्री गोविंददास गोपाळदास शाह यांनी १९५६ साली 'पुनाना श्री बारनात महाजननो इतिहास'[१] नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात गुजराती वाणी समाजातील पोटजाती व त्यांची पुण्यातील ज्ञातिव्यवस्था यांबद्दल बरीच महत्त्वाची माहिती मिळते. श्री गोविंददास यांनी अठराव्या शतकातील प्रसिद्धीस पावलेल्या या समाजातील व्यक्तींच्याबद्दल जे काही लिहिले आहे ते सर्व मराठी छापील कागदांवरूनच. परंतु त्यांनी ही माहिती एकत्रित करून शिवाय समाजविषयक आवश्यक माहिती पुरविल्यामुळे त्यांचा ग्रंथ फार उपयुक्त ठरतो. गुजरातेतील सर्व प्रमुख शहरांत 'महाजन' नावाच्या संस्था पूर्वकाळी फार महत्त्वाच्या होत्या व काही स्वरूपात आजही त्यांचे अवशेष दिसून येतात. अर्थव्यवहाराचे नियमन परंपरागत पद्धतीने करणाऱ्या अशा या 'महाजन' संस्था हिंदुस्थानात एकोणिसाव्या शतकापर्यंत टिकून होत्या व त्या गुजरातेखेरीज इतरत्र कोठेच नव्हत्या. या "महाजन" संस्थांची घटना व कारभार मुंबई जिल्हा गॅझेटियरमधील[२] वर्णनांवरून थोडक्यात येणेप्रमाणे दिसतात : गुजरातेत जवळजवळ सगळीकडे कारागीर व व्यापारी यांच्या आर्थिक संघटना अस्तित्वात होत्या. कारागिरी व जात यांचा निकटचा संबंध असल्यामुळे कारागिरांची आर्थिक संघटना व त्या त्या जातींची पंचायत यांच्यात सहसा फरक नसे. व्यापारी व्यवहारांबाबत मात्र सर्व मोठ्या शहरांतून बहुतेक महत्त्वाच्या व्यापारांत एकाहून अधिक जाती भाग घेत असत. ज्या समूहात परस्परात बेटीव्यवहार होतो तीच ज्ञात पंचायतीच्या दृष्टीने जात. गुजरातेत वाणीसमाजात अनेक पोटजाती आहेत आणि शिवाय जैन वाणीही व्यापारात पूर्वापार महत्त्व पावलेले. तेव्हा अनेक समाज-समूह एखाद्या व्यवहारात असल्यावर अर्थव्यवहाराचे नियमन करणारी संस्था व सामाजिक ज्ञाति-संस्था या निरनिराळ्या असण्याशिवाय गत्यंतर नाही.

१. शाह गोविंददास गोपाळदास, 'पूनाना श्री बारनात महाजननो इतिहास', पुणे, १९५६.

२. Gazetteer of the Bombay Presidency, Vol. IV, 1879, pp. 106-116.

निरनिराळ्या महत्त्वाच्या व्यापारी व सावकारी व्यवहारांचे एखाद्या स्थलापुरते नियमन करणारी सर्व जातींची मिळून जी संस्था तिला 'महाजन' म्हणत. व्यवहाराचे शिरस्ते ठरविणे, लवाद करणे, सरकार-दरबारी दाद मागणे इत्यादी सर्व महत्त्वाचा कारभार 'महाजन' चालवीत असे. मोठ्या शहरी अशा व्यापारी महाजन-संस्था अनेक असू शकत. लहान शहरांत घाऊक व्यापारी व सावकार यांची मिळून एकच महाजन-संस्था असे व तीस 'शहर महाजन' म्हणत. महाजनचा नित्याचा कारभार प्रमुख प्रतिष्ठितांकडे असे. त्यातल्या त्यात एखादे घराणे मुख्य मानले जाऊन त्या घराण्याच्या कुटुंबप्रमुखास 'नगरशेठ' अशी पदवी असे. ही व्यवस्था बऱ्याच अंशी वंशपरंपरा असे. परंतु घराणे मोडकळीस आल्यास अगर दुबळे झाल्यास हे मान साहजिकच दुसरीकडे जात.

## महाजन व नगरशेठ

गुजराती वाणी समाज पुण्यास मोठ्या प्रमाणावर आल्यावर काही कालाने येथेही महाजन, नगरशेठ इत्यादी संज्ञा व संस्था रूढ झालेल्या दिसतात. पण स्थलांतराने परिस्थित्यनुरूप त्यांचे स्वरूप पार पालटले. ते कसे ते आता पाहू. प्रथम लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे, वर मूळ गुजरातेतील ज्या संस्था वर्णिल्या त्या प्रकारच्या महाजन-संस्था महाराष्ट्रात या वेळेस अस्तित्वात नव्हत्या. इतकेच नव्हे तर महाजन शब्दाचा मूळचा अर्थही मराठीत माहीत नव्हता. मोल्सवर्थच्या कोशात महाजन शब्दाचे अर्थ खालील-प्रमाणे आहेत : "A virtuous or illustrious man; a merchant or trader; a hereditary officer in a village, kasba or city. His business is to superintend the trade of and to assist in collecting the tax from certain classes of traders." शेवटच्या अर्थाचा संबंध 'महाजनकी' या जुन्या महाराष्ट्रीय वतनाशी उघड आहे. बारनात महाजनाच्या इतिहासकारांस मराठीतील या अर्थाची व परंपरेची माहिती नसल्यामुळे मराठी कागदांतील 'शेट्ये-महाजन' या नेहमीच्या जोडीतील 'महाजन' म्हणजे गुजरात-मधील महाजनसारखी संस्था असावी असा निष्कर्ष त्यांनी काढला व यावरून गुजराती वाणी येथे फार पूर्वीच आले असे सिद्ध धरले. खरा प्रकार असा दिसतो की, गुजराती वाण्यांचा प्रभाव येथील अर्थ-व्यवहारावर पडल्यानंतर देखील 'महाजन' संस्था अगर 'महाजन' शब्दाचा तसा अर्थ महाराष्ट्रात रूढ झाला नाही.

पुण्यातील बारनात महाजनच्या इतिहासावरून या संस्थेचे रूप दिसते ते अनेक पोटजातींची सांघिक ज्ञाति-संस्था असे. गुजराती वाण्यांतील अनेक पोटजातींची मंडळी पुण्यास आली. कोणत्याच एका जातीच्या कुटुंबाची संख्या मोठी नव्हती. तेव्हा गुजरातेत जातीतल्या जातीत होत जाणाऱ्या अनेक सांघिक गोष्टींकरिता सर्व गुजराती वाणी पोट-जातींनी मिळून कारभार करणे सोईस्कर ठरले व सहजगत्या सामाजिक सहकार्याने काम करण्याच्या त्यांच्या सवयीनुसार ही महाजन अस्तित्वात आली. यातील एक बाब विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. भोजने वगैरेकरिता सर्व पोट-जातींचा मिळून एक समाज गणला गेला, तरी बेटीव्यवहाराबाबत पोट-जातीचे निर्बंध पाळले गेले. यामुळे लग्नसंबंधांकरिता मूळ स्थानाशी संबंध टिकून राहिले. तसेच अनेक पोटजातींच्या व्यक्तींनी एकत्र येऊन बनविलेल्या या 'महाजन' संस्थेतील स्वरूप केवळ सामाजिक व धार्मिक असेच राहिले. सगळ्यांचे मिळून देवस्थान चालविणे; ज्ञातिकार्याकरिता सामूहिक सोय करणे; सर्वसाधारण रिवाजपालनावर देखरेख ठेवणे, इत्यादी जात-पंचायतीची कार्ये आणि तत्सम घटना व अधिकार या 'महाजन'चे दिसतात. कोणत्याच प्रकारचा आर्थिक व्यवहार 'महाजन'कडे नव्हता.

गुजराती वाणी कोणत्याही व्यवहारात येथे कितीही प्रभावी झाले तरी एखादा व्यवहार पूर्णपणे

त्यांचे हाती आला असे कधी झाले नाही. अर्थव्यवहाराचे नियमन करू लागण्यास सर्वांची संमती व राजसत्तेचे साहाय्य ही दोन्ही आवश्यक आहेत. अर्थव्यवहाराचे नियमन करणाऱ्या जुन्या संस्था येथे नव्हत्या. येथील राजकर्त्यांसही त्यांबद्दल काही माहिती नसावी. शिवाय याबद्दल विशेष विचार करण्याइतके अर्थव्यवहाराकडे त्यांचे लक्ष नव्हते. म्हणून अनेक जातींच्या विशिष्ट अर्थव्यवहाराचे नियमन करणारी संस्था पुण्यास अगर महाराष्ट्रात इतरत्र अस्तित्वात आली नाही. पुण्यातील गुजराती 'महाजन' संस्थादेखील गुजराती वाणी पोट-जातींचे सांघिक सामाजिक कार्य करणारी संस्था एवढ्या-पुरतीच मर्यादित राहिली; आणि म्हणून 'महाजन' हा शब्दही गुजरातेतील रूढ अर्थी महाराष्ट्रास अपरिचित राहिला.

## पुण्याचे पहिले नगरशेठ

व्यापारी व सावकार 'महाजनां'च्या प्रमुखास नगरशेठ अशी संज्ञा व मान गुजरातेत असे. महाराष्ट्रात याही पदवीचे अस्तित्व सार्वत्रिक आढळात येत नाही. पुण्यात जवळजवळ शंभर वर्षे ही पदवी मात्र रूढ होती असे दिसते. किरकोळ उल्लेखांची जुळणी करून तिचा जो इतिहास दिसतो तोही उद्बोधक आहे. नगरशेठ घराण्याचा निर्वंश झाल्यामुळे या पदवीचा लोप होऊन पंधरा वर्षे लोटली असा गॅझेटियरमधील सन १८८५ चा उल्लेख आहे.[१] या उल्लेखावरून पुण्यात कोणीतरी व्यक्ती 'नगरशेठ' म्हणून १८७० पूर्वी ओळखली जात असे, असे सिद्ध होते. पण याला सुरुवात केव्हा व कशी झाली असावी याचा काही पुरावा प्रसिद्ध असल्याचे मला माहीत नाही. या प्रश्नाची चर्चाही कोणी केलेली दिसत नाही. जुन्या कोणत्याही प्रकाशित कागदात कोणा व्यक्तीचा 'नगरशेठ' हे उपपद जोडून उल्लेख केल्याचे मी पाहिलेले नाही. पुण्याचे पहिले नगरशेठ दुल्लभशेठ गोविंदजी असे समजले जाते. दुल्लभशेठजींचे अनेक उल्लेख प्रसिद्ध केलेल्या कागदांत आहेत; यांतील बरेच श्री गोविंद-दास यांनी आपल्या पुस्तकात प्रकाशित केले आहेत. सर्वत्र दुल्लभशेठ गोविंदजी याहून दुसऱ्या नावाचा कोणत्याच प्रकारचा उल्लेख नाही. दुल्लभशेठ हे पुण्याचे नगरशेठ हे समजण्यास एकच पुरावा उपलब्ध असल्याचा दिसतो तो म्हणजे मेणवली दप्तरातील खुद्द शेठजींचे नानांस लिहिलेले एक पत्र[२] छापले आहे ते. त्यातील मजकूर असा : "स्वामींनीं सेवकाची प्रतिष्ठा वाढवून लौकिकास आणलें. तेणेंकरून रामेश्वरापासून लाहोरपावेतों सावकारेयात जाणतात कीं पुण्यांत नगरशेठ दुल्लभशेठ आहे. त्यास हें स्वरूप राहिलें पाहिजे. म्हणोन हरएक देशांचे सावकार पुण्यांत आहेत व येतात. त्यांचे स्वरूपाप्रमाणें आदर करून, सर्वांस समाधान राखोन व्यवहार तंटे सांभाळावे लागतात. त्यास निर्लोभपणें सरकार चाकरी होते. हें जाणोन स्वामींनीं टांकसाळांवर उत्पन्न करून दिल्हे आहे. त्या प्राप्तीमध्ये प्रतिष्ठा खर्च याचा मात्र निर्वाह होतो."

खुद्द नानांस लिहिलेल्या विनंतीवजा पत्रात त्यांस न मानवणारे अगर पटणारे विधान केले जाण्याचा संभव नाही. तेव्हा लौकिकदृष्ट्या नगरशेठ म्हणून दुल्लभशेटजी पत्र लिहिल्यावेळी ओळखले जात होते असे मानण्यास हरकत नाही. तसेच परस्थांचा मान करणे वगैरे गुजरातेतील महाजन–नगरशेठ यांची काही कर्तव्य ते पार पाडीत होते, इतकेच नव्हे तर याकरिता नानांनी त्याजकडे काही किफायतशीर व्यवहार सोपविले होते, हेही खरे असावे. परंतु महत्त्वाचा फरक असा की, पुण्यात

१. Gazetteer of Bombay Presidency, Vol. XVIII, (Poona), Part II, p. 173.

२. इतिहास-संग्रह, सं., द. बा. पारसनीस, १९१३–१४, 'ऐतिहासिक टिपणे' : भाग ६ (मेणवली दप्तरांतील कागद), पृ० २८.

सरकारने प्रयत्न करून अगर सर्व व्यापारी वगैरे जमातीने एकत्र येऊन काही निश्चित संस्था उभारली, व्यवस्था केली किंवा पदवी निर्मिली असे म्हणण्यास काहीच पुरावा नाही.

मग दुल्लभशेठजींस लौकिक दृष्टया तरी नगरशेठ कसे मानू लागले असावे? श्री गोविंददास यांच्या पुस्तकात, पान ५२ वर, बारनात महाजनचा एक जुना ठराव उद्धृत केला आहे. त्यात, "आपणा महाजनमां जमणवार वगैरेनी रजा असल्मां दुल्लभशेठनी लेवाती हती" असा मजकूर आहे. या नोंदीवरून हे सिद्ध होते की, दुल्लभशेठ केवळ एक मोठे सावकार होते, एवढेच नव्हे तर गुजराती समाज जेव्हा प्रथम संघटित होण्याइतका बहुसंख्य झाला तेव्हा दुल्लभशेटजी अधिकृत रीत्या समाज-प्रमुख मानले गेले. यापुढे हे सहज घडले असावे की सर्व व्यापारी समाजाच्या व महाजनांच्या प्रमुखास नगरशेठ म्हणण्याच्या गुजरातेतील प्रघातास अनुसरून प्रथम गुजराती वाणी समाज दुल्लभशेठजींस नगरशेठ म्हणू लागला; दुल्लभशेठजीही परंपरागत वळणामुळे परस्थांची सरबराई करणे, तंटे तोडणे वगैरे अधिकार आपणाकडे मानून करू लागले व इतर कोणास यात काही बोलण्यासारखे नव्हते. सरकारास हे साहाय्यकारक व गुजराती वाणीसमाजही महत्त्वाचा, तेव्हा दुल्लभशेठ लौकिक दृष्टयाही नगरशेठ बनले. सहजगत्या ही गोष्ट झाली. असेच हे नगरशेठचे स्थान जवळ जवळ शंभर वर्षे पुढेही टिकले. पण महाराष्ट्रातील परिस्थितीमुळे याहून दुसरे काहीच झाले नाही. येणेप्रमाणे 'महाजन' व 'नगरशेठ' या संज्ञा गुजरातेतून तेथील समाजाबरोबर महाराष्ट्रात आल्या, पण त्यांचे येथे रूपांतर झाले व स्थानिक अर्थव्यवहारावर त्यांचा काही विशेष प्रभाव पडला नाही.

## काही मूलभूत प्रश्न

याहून जास्त व व्यापक मूलभूत विचार करण्यासारखे अनेक प्रश्न आहेत. त्यांतील एकदोहोंकडे केवळ लक्ष वेधून हा निबंध संपवितो. वर काही सावकार-व्यापारी वगैरेंच्या याद्यांचा उल्लेख केला. यांतील बहुतेक नावे महाराष्ट्रातील निरनिराळ्या जातींतील व्यक्तींची दिसतात; काही थोडीच गुजराती वगैरे महाराष्ट्राबाहेरून नवीनाने आलेल्यांची आहेत. महाराष्ट्रातील व्यापारी-सावकार यांचा व्यवहार इतरांच्या मानाने मोठ्या प्रमाणावर वाटतो. तेव्हा पुढील काळात ते टिकून राहू शकले नाहीत याची कारणमीमांसा करणे महत्त्वाचे आहे. मराठी सावकारांनी मुख्यतः सरकारासच कर्जे दिली काय? सरकारी सावकार म्हणून मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन त्यांनी इतर हुंड्यांच्या व सराफी-पोतनिशी व्यवहारांत आपला जम बसविला नाही का? मराठे राज्यकर्ते म्हणून संबंध हिंदुस्थानभर असता आपल्या पेढ्या व त्यांचे संबंधित यांचे जाळे सर्वत्र पसरण्याचे त्यांनी उद्योग केले की नाही? त्यांच्या एकंदर व्यवहाराचे स्वरूप नेहमीच एकांगी व सरकारी कारभारावर अवलंबून असे राहिले का? असे अनेक प्रश्न या घटनेमधून उत्पन्न होतात. चिपळूणकर, दीक्षित, पटवर्धन इत्यादी सावकारी वह्यांचा अभ्यास आजवर त्यांतील नोंदींचे स्वरूप, विशिष्ट संज्ञांचा अर्थ अगर व्यवहाराची उकल या गोष्टी समजावून घेण्यापुरताच झाला आहे. एकंदर महाराष्ट्रीय सावकारी व्यवहाराचे तत्कालीन क्षेत्र व कालानुक्रमे यात व व्यवहारांच्या प्रमाणात पडत गेलेले फरक यांची एकंदर प्रगती व विगती व त्यांची कारणे यांकडे लक्ष द्यावयास पाहिजे. इतिहासाच्या ओघात सर्व प्रकारची स्थित्यंतरे सारखी घडून येतातच; त्यांतूनही सातत्य राखण्यात गुणोत्कटता दिसून येते. गुजराती वाणी समाजाने अनेक शतके आर्थिक व्यवहारांतील आपली कुशलता निरनिराळ्या प्रदेशांत हरएक राजवटीत दाखविली. महाराष्ट्रीय सावकार जे पुढे आले ते केवळ विशेष अनुकूल परिस्थिती म्हणून, काही व्यवहारापुरते. ही परिस्थिती पालटली तेव्हा सर्व संपले, असा हा देखावा दिसतो. यातील मर्म शोधले पाहिजे व त्यावरून काय तो धडा शिकला पाहिजे.

## मराठशाहीला आर्थिक पाया होता काय ?

याहून महत्त्वाचा प्रश्न समग्र मराठशाहीच्या आर्थिक पायाचा. किंवा आत्यंतिक भाषेत बोलावयाचे म्हणजे हीस खरा पाया होता की नाही ? का ती केवळ बिनबुडाची होती ? सरकारी, खाजगी, लष्करी, राजकारणी अशा सर्व प्रकारच्या कागद-संग्रहांत एक प्रकारचे उल्लेख हमखास सापडतात; ते म्हणजे कर्जाविषयी. केतकर विनोदाने म्हणत असत की, मराठ्यांच्या मोहिमांचे मूळ सावकारांच्या तगाद्यांत शोधले पाहिजे ! मानी बाजीराव कर्जाच्या भारामुळे ब्रह्मेंद्रस्वामींपुढे कसा नमत असे याबद्दलचे राजवाड्यांचे निवेदन प्रसिद्ध आहे. पण या बाबीचा जास्त खोलवर विचार व्हावयास हवा. ही कर्जे कधीच का फिटली नाहीत ? पुढील वसुलाच्या भरवशावर आधीच रकमेची उचल करावयाची, असे सर्वांचेच व्यवहार सदैव कसे राहिले ? यांचा शास्ता, नियंता कोणी नव्हताच काय ? यातही स्वराज्य व चौथाई-सरदेशमुखीचा मुलूख यांतील फरक लक्षात आणला पाहिजे. या दुसऱ्याबाबत आमची राजकीय जबाबदारी काही नव्हती व आमचा आर्थिक कारभारही कमालीचा गैरव्यवस्थेचा व परिणामी रयतेस अत्यंत जुलुमाचा होता हे खरे आहे का ? अजूनही मराठ्यांच्या सत्ताविस्ताराची दुसरी बाजू, अन्य भारतीयांची बाजू, आमच्या लक्षात येऊ लागलेली नाही. भारतीय अर्थव्यवस्थेचा व्यापक विचार करावयाचा तर ही लक्षात घेणे अतोनात जरूरीचे आहे. आम्हांस सगळीकडे 'लुटारू' का म्हणतात ? आमच्या अर्थव्यवहाराने या नामाभिधानाला आम्ही खरोखर पात्र झालो का ? व आमच्या सत्ताविस्ताराच्या आर्थिक पायामुळे आमच्यातील मिरासदारी वृत्ती, ऐदीपणा, गैरहिशेबीपणा हे आजचे अनेक दुर्गुण उत्पन्न झाले काय ? इत्यादी व्यापक प्रश्न विचारार्ह आहेत.

खऱ्या अर्थी अजून इतिहासाच्या लेखनास सुरुवातच झालेली नाही. लोकसंख्या, शहरे, व्यापार, शेतकी व औद्योगिक उत्पादन यांचे मापन; चलन, किमती इत्यादींतील उलाढाली; राज्याचे आर्थिक व्यवहार व त्यांचे खाजगी व्यवहाराशी संबंध या सर्वांबाबत प्रथम साहित्याची जुळणी व नंतर संगतवार इतिहासलेखन या सर्वांचा अजून उपक्रम व्हावयाचा आहे. तुरळक नोंदी अगर टिपणे यांहून अधिक काही झालेले नाही. हे पुढील कार्य करावयाचे त्याचे स्वरूप, त्यातील अडचणी, त्याचे महत्त्व लक्षात यावे या दृष्टीने मी आजचा अल्पसा प्रयत्न केला आहे. इतिहास आर्थिक दृष्टीने परीक्षिला गेल्याखेरीज त्याचे मर्म कळावयाचे नाही, त्यातून खरा बोध घेता यावयाचा नाही अशी माझी समजूत आहे. म्हणून या उपेक्षित दालनास सजविण्याची खटपट करावी अशी सर्व अभ्यासकांस मी कळकळीने विनंती करतो.

## परिशिष्ट

Poona Daftar — पेशवे प्रांत अजमास पुणें रुमाल नंबर ४९६ — इ. स. १७६४-६५

श्री

तेरीज घरें येकंदर पुणें स्वारी राजश्री ——— पंतप्रधान सु॥ खमस सितैन मयां व अलफ

| पेठ | अज घरें सुमारें | मोगलाचे दंग्यांत वाचली | नवीन तयार जाहाली | जागा रिकाम्या आहेत | छपरबंदी घरें आहेत |
|---|---|---|---|---|---|
| कसबा पुणें | ९२३ | ५५०॥ | १४७ | ६१॥ | १६४ |
| पेठ रविवार | १३३५ | १५३॥ | २२१॥ | १२६ | ८३४ |
| पेठ सोमवार | ३७२ | १३४ | ३७ | ५४ | १४७ |
| पेठ मंगलवार | २४३ | ३५ | २ | ४० | १६६ |
| पेठ बुधवार | ४६४ | ६० | २३० | ५५ | ११९ |
| पेठ गुरुवार | ७२२ | ५२ | ४१ | ६० | ५६९ |
| पेठ शुक्रवार | ६९० | ११७ | ९६ | ८१ | ३९६ |
| पेठ शनवार | ३७४ | ९९ | १४० | ६० | ७५ |
| पेठ न्याहाल ऊर्फ नागेश | ११० | ३९ | ८ | २३ | ४० |
| पेठ गंज | ४९३ | ९५ | १६ | ६७ | ३१५ |
| पेठ गणेश | ३७२ | ४३ | ३ | ४४ | २८२ |
| हसमपुरा व कारकूनपुरा मिळोन | ८७ | २२ | १२ | १७ | ३६ |
| मुसाफरजंग पुरा | ११० | ३ | ० | ५२ | ५५ |
| | ६,२९५ | १,४०३ | ९५३॥ | ७४०॥ | ३,१९८ |

गोखले अर्थशास्त्र संस्था, मराठी प्रकाशन, ७ (पुणे, १९६२); कै. दत्तोपंत आपटे यांच्या पंधराव्या स्मृति-दिनानिमित्त ता. ९-११-१९५८ रोजी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या वतीने दिलेले व्याख्यान; प्रस्तुत व्याख्यान *पुणे शहरातील महाजन व नगरशेठ* या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेले आहे.

☆

# विभाग : ३

## भारताच्या
## आर्थिक समस्या

# १ . . ग्रामसंघटनेचा एक निमसरकारी प्रयत्न

हिंदुस्थान हा देश कृषिप्रधान आहे. त्यातील तीनचतुर्थांश लोकांची उपजीविका शेतकीवर होते व शेकडा नव्वद लोक खेड्यापाड्यांतून राहतात, या सर्व गोष्टी मशहूर आहेत. तसेच आपल्या शेतकऱ्यांची एकंदर स्थिती फार हलाखीची आहे व सहकार्य आणि शिक्षण यांच्या अभावी जिकडेतिकडे दारिद्र्य व अज्ञान यांचे साम्राज्य पसरलेले आहे याचीही जाणीव अलीकडे बऱ्याचजणांस फार तीव्रतेने होऊ लागली आहे. आपले राष्ट्रच शेतकऱ्यांचे व खेडवळांचे, तेव्हा जेणेकरून खेडेगावांची स्थिती सुधारेल तोच राष्ट्रोन्नतीचा खरा मार्ग अशी भाषा हिंदी राजकीय व सामाजिक पुढारी आज बरीच वर्षे बोलत आले आहेत. देशबंधू दासांच्या विधायक कार्य-क्रमाच्या योजनेत ग्राम-संघटनेस प्राधान्य दिले होते व गांधीजींच्या चळवळीची मुख्य भिस्त गुजराथेतील निरनिराळ्या ठिकाणी ग्रामोद्धाराकरिता स्थापिलेल्या आश्रमांवरच आहे. एवढेच नव्हे तर अलीकडे सरकारासमुद्धा यासंबंधी आपण काही तरी केले पाहिजे असे वाटू लागले आहे. हिंदुस्थानात राजकीय चळवळ सुरू झाल्यापासूनच ही चळवळ केवळ पांढरपेशांची, शेतकऱ्यांचे खरे हितकर्ते काय ते स्वतः आपण अशी घोषणा सरकार करीत आले आहे. परंतु शेतकऱ्यांच्या उन्नतीकरिता आजतागायत प्रत्यक्ष कृती मात्र सरकारच्या हातून फारच थोडी घडली आणि शेतकीच्या सुधारणेकरिता कोणतेच सर्वांगीण व सुसंबद्ध धोरण हिंदुस्थान सरकारने अगर कोणत्याही प्रांतिक सरकारने अजून आखलेले नाही. गेल्या चारपाच वर्षांतच, विशेषतः अर्विनसाहेबांच्या आगमनापासूनच या प्रश्नास चालना मिळाली एवढे मात्र खरे. शेतकी कमिशन नेमले गेले आणि त्या कमिशनच्या अहवालात ग्राम-संघटनांवर विशेष जोर दिला गेला आहे. खुद्द व्हाइसरॉयसाहेबांनाच हा प्रश्न जिव्हाळ्याचा वाटतो, तेव्हा साहजिकच सरकारी अधिकारीसुद्धा याबद्दल सहानुभूती—कोरडी का होईना—दाखवू लागले आहेत. कदाचित काही प्रांतिक सरकारेही प्रत्यक्ष कार्य करण्यास उद्युक्त होतील असे दिसते. अशा स्थितीत ग्रामसंघटनेची एक निमसरकारी व शेतकी कमिशनने वाखाणलेली अशी जी ब्रेनसाहेबांची योजना तिचे महत्त्व फार आहे हे उघड आहे. या योजनेच्या प्रसिद्धीकरणार्थ ब्रेनसाहेबांनी इंग्रजीत दोन पुस्तके लिहिली आहेत व त्यांचे निरनिराळ्या देशी भाषांतून भाषांतर करण्याचे कामही झपाट्याने चालू आहे. मराठीतील भाषांतरे पुरी होऊन ही दोनही पुस्तके अभिप्रायार्थ 'लोकशिक्षणा'कडे आली आहेत, आणि या पुस्तकांबद्दल व तदनुषंगाने मि. ब्रेन यांच्या एकंदर योजनेबद्दल येथे दोन शब्द लिहिण्याचे आम्ही योजिले आहे.

### पुस्तकांचे स्वरूप

मि. एफ. एल. ब्रेन, आय. सी. एस. यांची दोन पुस्तके म्हणजे 'हिंदुस्थानातील खेड्यापाड्यांची

पुनर्घटना'' (The Remaking of 'Village India) व 'विष्णुशर्म्याची खेड्यापाड्यांतील कामगिरी'' (Socrates in an Indian Village) ही होत. पहिल्या पुस्तकात ब्रेनसाहेबांनी आपला कार्यक्रम, ध्येये, साधनसामग्री वगैरे योजनेचे सर्व बाजूंनी वर्णन केले आहे. दुसरे पुस्तक संवादपद्धतीवर लिहिले आहे. यातील भूमिका अशी की, विष्णुशर्मा (इंग्रजी पुस्तकात Socrates) नावाचा वृद्ध मुरब्बी निरनिराळ्या प्रसंगी खेड्यात आला असता तेथील परिस्थितीच्या वेगवेगळ्या अंगांचे स्पष्टोक्तिपूर्ण वर्णन करून खेडवळांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालून त्यांस आपल्या समजुती व आपली एकंदर जीवनपद्धती बदलावयास लावतो. हे संवाद केवळ काल्पनिक नसून खुद्द ब्रेनसाहेबांनी आपल्या खेडेगावांतील मोहिमेत केलेल्या प्रवचनात व संभाषणांत योजिलेल्या विचारसरणीचा व भाषेचा अवलंबच त्यात केला आहे असे या पुस्तकाच्या प्रस्तावनेत निर्दिशित केले आहे. पहिल्या पुस्तकाचा उपयोग एकंदर योजनेचे स्वरूप नीट कळते हा होय. दुसरे पुस्तक मि. ब्रेन यांनी शेतकऱ्यांस आपली मते कशी पटविली याचे दिग्दर्शन करण्याकरिता लिहिले असावे. या पुस्तकाचे मूळ नाव 'Socrates in an Indian Village' असे आहे. म्हणजे या प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्त्याने सत्यान्वेषणाकरिता ज्या वादविवादपद्धतीचा उपक्रम केला ती ब्रेनसाहेबांनी स्वीकारली असा यात ध्वनी निघतो. पण खरा प्रकार असा मुळीच नाही. विष्णुशर्मा (Socrates) एक अगदी फटकळ माणूस, तो आपल्या खडखडीत भाषणामुळे खेडवळांचे गळी आपले मुद्दे तेव्हाच उतरवितो—त्यास फारसे वाक्चातुर्य अथवा तर्कचातुर्य, विचारसरणी यांची जरुरी भासत नाहीसे दिसते. कोणत्या भाषापद्धतीचा कोठे स्वीकार करावयाचा हे कोणताही मुद्दा पटविणाऱ्यावर आणि तो कोणास पटवावयाचा या दोहोंवरही अवलंबून असते. ब्रेनसाहेबांचा मार्ग सर्वांसच युक्त वाटेल असे नाही. ते बडे अधिकारी पडले, तेव्हा त्यांनी केवळ वजनाने जे कार्य केले ते इतरांस मन वळवून करावे लागेल. तसेच त्यांनी जी कडक भाषा वापरली आहे ती सर्वांसच पटेल असेही नाही. तरीही खेडेगावांत प्रचारकार्य करणाऱ्यांस या संवादांचा बराच उपयोग होईल हे निःसंशय होय. दोनही पुस्तकांतील मूळ उपाययोजना व विवेचनपद्धती एकच आहे, तेव्हा या दुसऱ्या पुस्तकाबद्दल आणखी विशेष लिहिण्याची जरुरी नाही.

## विवेचनातील उणीवा

'हिंदुस्थानातील खेड्यापाड्यांची पुनर्घटना' या पुस्तकाचे चार खंड पाडले आहेत. पहिल्या खंडात एकंदर कार्यक्रम काय याची माहिती दिली आहे. दुसऱ्या खंडात हा कार्यक्रम पार पाडण्यास साधने कोणती हवीत व ती कशी तयार करावयाची याबद्दल विचार केला आहे. तिसऱ्या खंडाचे नाव 'ध्येये' हे असून त्यात मि. ब्रेन व मिसेस ब्रेन यांनी वेळोवेळी पुनर्घटनेच्या चळवळीचा अंतिम हेतू काय यावर लिहिलेल्या निबंधांचा समावेश केला आहे. चौथा खंड उपसंहारात्मक आहे. यातील पहिल्या प्रकरणात पुनर्घटनेची चळवळ यशस्वी झाल्यास दोनतीन पिढ्यांत खेडी कशी सुधारतील याचे काल्पनिक चित्र रेखाटले असून दुसऱ्या प्रकरणात एकंदर योजनेबद्दलच्या काही शंकांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. पुस्तकाचे एकंदर चार खंड पाडल्यामुळे एकेका खंडाचा निराळा प्रतिपाद्य विषय जरी वाटला तरी एकंदर पुस्तकाची मांडणी फारशी व्यवस्थित केली आहे असे नाही. उपायांची अथवा साधनांची तर्कशुद्ध वर्गवारी करून त्यांचे सुसंबद्ध विवेचन कोठेच आढळत नाही. पुनरुक्ती तर अतोनात आहे. खुद्द खेडेगावांतील लोकांस काय करिता येण्यासारखे आहे, सरकारी मदतीशिवाय काय करणे शक्य नाही याचा नीटसा विचार कोठेच केलेला नाही. साधने सांगितली, पण ही साधनसामग्री जमविण्यास व उपाययोजना

१. ही पुस्तके 'ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई' यांनी प्रसिद्ध केली आहेत.

अमलात आणण्यास खर्च किती लागेल याचे एखादे अंदाजपत्रक देण्यास पाहिजे होते. गुडगावास अमुक झाले म्हणून प्रस्तावनेत वल्गना पुष्कळ, पण याची आकडेवार मांडणी कोठेच नाही. आमचा प्रयत्न यशस्वी झाला असे नुसते म्हणून काय उपयोग ? अमुक बाबतीत इतकी प्रगती झाली असा तपशील दिल्यासच विश्वास बसू लागतो. खरे म्हणावयाचे तर जर ब्रेनसाहेबांनी एका खंडात गुडगावमधील एकंदर चळवळीचा खराखुरा इतिहास दिला असता—त्यांना काय अडचणी आल्या, त्यांतून साहेब पार कसे पडले, खर्च किती, त्यांची व्यवस्था काय वगैरे—तर त्याचाच उपयोग जास्त झाला असता. असो. जी माहिती दिली आहे तीवरून एकंदर कार्यक्रमाचे स्वरूप काय हे आता पाहू.

## ग्रामसुधारणेबद्दलचा दृष्टिकोन

तसे पाहिले तर इतर लोकांपेक्षा मि. ब्रेन यांचे म्हणणे काही निराळे आहे असे नाही. शिक्षणाचा प्रसार करून लोकांच्या वेडगळ समजुती घालविल्या पाहिजेत, गावे व घरे साफसूफ राखण्याविषयी चळवळ करून रोगराईचा नायनाट केला पाहिजे, स्त्रियांचा समाजातील दर्जा वाढविला पाहिजे, व निरनिराळ्या प्रकारांनी हल्लीच्या कृषिपद्धतीत सुधारणा करून शेतकऱ्याची सांपत्तिक स्थिती सुधारली पाहिजे हेच ब्रेनसाहेबांचे मुख्य सांगणे आहे. एकंदर योजनेत काही एकदोन गोष्टींवर विशेष जोर दिला आहे. स्त्रियांचा दर्जा वाढविल्याशिवाय खरी सुधारणा होणे अगदी अशक्य आहे असे मि. ब्रेन वारंवार प्रतिपादन करितात, आणि हा मुद्दा खरोखरच फार महत्त्वाचा आहे. पडद्याची चाल समूळ नाहीशी करावी, मुलांमुलींस सारखे वागविण्यात यावे, मुलींस शिक्षण द्यावे, त्यांची लग्ने लहानपणी करू नयेत, दळण-कांडणासारख्या गोष्टी यांत्रिक साधनाने कराव्यात, खेड्यांत बागबगीचे करून विशेषतः बायकांस हिंडण्याफिरण्यास त्यांचा उपयोग करावा इत्यादी सूचना मि. ब्रेन पुढे मांडतात. बागबगीचे जरी लांब राहिले तरी एकंदर खेडेगावच्या राहणीची व आरोग्याची सुधारणा करावयाची असल्यास त्याबद्दलची शिकवण मुख्यत्वे स्त्रियांसच दिली पाहिजे हे उघड आहे. दळण-कांडणासारखी कामे जरी बायकांस करावयास लावू नये असे ब्रेनसाहेबांचे मत असले तरी शेतांतील कामे मात्र त्यांनी अवश्य करावी असे ते म्हणतात. मि. ब्रेन यांचा आणखी एक मुद्दा असा की, अंगमेहनत टाळण्याची प्रवृत्ती अलीकडे शेतकऱ्यांत बळावली आहे. याचे कारण म्हणजे मजूरवर्गाची वाढ. या वाढत्या मजूरवर्गास नवीन कोणत्या उद्योगांकडे वळवावयाचे याचा विचार पुस्तकात झालेला नाही. पण स्वतः सारखी अंगमेहनत केल्याशिवाय हिंदुस्थानात शेतकी किफायतशीर व्हावयाची नाही, व मजुरांचा सुळसुळाट झाल्यामुळे स्वतः काम करणे कमी दर्जाचे वाटू लागते ही मनोवृत्ती बरोबर नसून सर्वांसच श्रमाची थोरवी काय हे समजावून देणे आवश्यक आहे, ही ब्रेनसाहेबांची विचारसरणी आम्हांस ग्राह्य वाटते.

बाकी इतर बाबींत पुस्तकात नवीन असे काही नाही असे म्हटले तरी चालेल. साधारणपणे खेडेगावची सुधारणा करण्यास आज बरीच वर्षे जे उपाय सुचविण्यात येत आहेत तेच बहुशः येथे नमूद केले आहेत. एवढेच मात्र खरे की, आजपावेतो खेड्यापाड्यांची सर्वांगीण पुनर्घटना हा विषय कोणत्याच एका पुस्तकात प्रतिपादलेला नसल्यामुळे प्रस्तुत पुस्तकाने या विषयाचा प्रथम अभ्यास करणाऱ्यांची बरीच सोय झाली आहे. पण वर दर्शविल्याप्रमाणे निरनिराळ्या उपायांची शक्याशक्यता अथवा व्यवहार्यता याचे नीटसे विवेचन कोठेच केलेले नाही. सर्वच गोष्टी ठासून मांडल्या आहेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे पुस्तकाचा हेतू तारतम्यबुद्धीने उपाययोजनेचे विवेचन करावयाचे असा नसून ब्रेनसाहेबांच्या कार्यक्रमाचे प्रसिद्धीकरण हाच आहे असे दिसते. एक-दोनच गोष्टींचा विचार केल्यास आमचे म्हणणे काय हे कळून येईल. शेणी-गोवऱ्यांची बाब घ्या. ब्रेनसाहेबांचा यांच्यावर फार

कटाक्ष. असले हलके काम केल्याने बायकांचा सामाजिक दर्जा कमी होतो (त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे "शेणात कोण वावरते?–शेणकिडे"), व गोवऱ्या लावल्याने शेतकऱ्याचे बहुमोल खत नाहीसे होते असे ते पुनः पुनः लिहितात, आणि वास्तविक पाहता हे काही खोटे नाही. पण मुख्य प्रश्न हा की शेतकऱ्याने गोवऱ्या जाळू नयेत तर करावे काय? इतर सरपणाची सोय आहे किंवा नाही? यावर ब्रेनसाहेब जोराने लिहितात की आपल्या खेड्यापाड्यांतून जळण मुबलक आहे. गोवऱ्यांच्या मंदाग्नीवर दूध तापविल्याने विशेष फायदा होतो ही कल्पना मूर्खपणाची आहे. कोळसे वापरले असता ते सुद्धा गोवऱ्यांपेक्षा स्वस्त पडतात, इत्यादी. ही झाली ब्रेन यांची मते. पण या सर्व प्रश्नांचा विचार शेतकी-कमिशननेही केला आहे, आणि त्याचा अहवाल पाहिल्यास काही निराळेच विचार आढळतात. त्यांच्या मते अजून गोवऱ्यांचे ऐवजी जास्त स्वस्त असे जळण बऱ्याच प्रांतांत सापडत नाही; शिवाय गोवऱ्या जाळण्याने काही विशेष फायदा होतो किंवा नाही याविषयी जास्त माहिती मिळविल्याशिवाय निश्चित मत देणे शक्य नाही. हाच प्रकार ब्रेनसाहेबांच्या गुराढोरांची अवलाद सुधारण्याविषयीच्या विचारांत दिसून येतो. त्यांच्या मते ही गोष्ट फार सोपी आहे. परंतु शेतकी-कमिशनच्या अहवालात आपल्याकडे या अवलादी दिवसेंदिवस का बिघडत आहेत व त्या सुधारण्याच्या मार्गात किती मोठमोठ्या अडचणी आहेत यांवरच विशेष जोर दिला आहे. एकंदर गवत वगैरेचा पुरवठा वाढविणे, जंगलखात्याने या बाबीतील आपले धोरण बदलणे, रोगराईच्या निवारणाविषयी सरकारने गावोगाव माहिती पुरविणे, शेतकी खात्याने प्रांतोप्रांती अवलादी सुधारण्याकरिता विशेष जारीने प्रयत्न करणे या सर्व गोष्टी झाल्याशिवाय सुधारणा तर राहोच, पण जो आपला ऱ्हास होत आहे तो सुद्धा थांबावयाचा नाही असे कमिशनचे मत आहे. थोडक्यात लिहावयाचे म्हणजे ब्रेनसाहेबांनी पुष्कळच उपाय सुचविले आहेत व बरीचशी माहिती एकत्र केली आहे; पण ही उपाययोजना प्रत्यक्ष अमलात आणू बघणाऱ्यास ज्या प्रकारचे विवेचन उपयोगी पडेल तसले विवेचन पुस्तकात कोठेच सापडत नाही.

### अंमलबजावणीचा प्रश्न

ग्रामसंघटनेच्या विचारांत आपले ध्येय काय याबद्दल मतभेद क्वचितच आढळतो. तसेच सुधारणा घडवून आणण्याची दिशा आणि खेडेगावच्या कृषिपद्धतीत, राहणीत अथवा विचारात कोणकोणते फेरबदल घडवून आणणे इष्ट आहे याबद्दलही साधारण एकवाक्यताच आहे. पण सगळ्यांत बिकट प्रश्न म्हणजे हे करावयाचे कसे हा होय. आणि मि. ब्रेन यांच्या गुडगावमधील प्रयत्नाविषयी मुख्य विचार करावयाचा तो हाच की, त्यांनी काम करण्याची कोणती पद्धती स्वीकारली, तीत त्यांना यश किती आले व त्याच पद्धतीचा अवलंब इतर ठिकाणी कितपत करता येईल? ब्रेनसाहेब हे एका जिल्ह्याचे मुख्याधिकारी होते; यामुळे त्यांच्यापाशी सत्ता व पैसा यांची काहीच उणीव नव्हती. जिल्हा लोकलबोर्ड व शिवाय सरकारी खास मदत इकडून पैसापुरवठा, निरनिराळ्या खात्यांचे सरकारी नोकर हा माणसांचा पुरवठा व त्यांस काम करावयास लावणारे सरकारी दडपण एवढी सर्व साधने त्यांच्या हाताशी होती. ब्रेनसाहेबांच्या कार्यपद्धतीचे विशेष म्हणजे सरकारी दडपणाचा पूर्ण उपयोग व 'घिसाडघाई' (हा शब्द भाषांतरकर्त्यांनीच वापरलेला आहे). मि. ब्रेन यांचे म्हणणे असे की, जनतेच्या डोळ्यांत भरेल असे काम थोडक्या अवधीत झाले तरच त्याचा खरा परिणाम होतो, व असे काम घडवून आणावयाचे म्हणजे 'घिसाडघाई'चाच अवलंब केला पाहिजे. हूल एकदम खूप उठविली पाहिजे. जिल्हाभर कामाचा डांगोरा वाजवावयाचा, पुष्कळसे प्रचारक नेमावयाचे, सर्व खात्यांतील सरकारी नोकरांस धाकदपटशा देऊन अथवा बढतीचे लालुचीने या चळवळीत भाग घेण्यास लावावयाचे, व थोडक्या वर्षात पुष्कळ

झाले असे दाखवावयाचे ही ब्रेनसाहेबांची रीत. काही दृष्ट्या ब्रेनसाहेबांस यश मिळाले हे कबूल करणे प्राप्त आहे. त्यांचा गाजावाजा तर खूप झाला. सबंध हिंदुस्थानभर गुडगावचे नाव झाले, शेतकी कमिशनने त्यांची पाठ थोपटली, खुद्द अर्विनसाहेबांनी पुस्तकास प्रस्तावना लिहिली, येथील अधिकारी गरिबांचे कसे कनवाळू असतात हे सिद्ध करण्यास विलायतेत त्यांच्या नावाचा उपयोग होऊ लागला. या सर्व गोष्टी झाल्या. परंतु खुद्द गुडगावास काय झाले? या प्रश्नास उत्तर देणे मात्र फार कठीण आहे. एकीकडे ब्रेनसाहेब आपण घडवून आणलेल्या सुधारणांचे मोठे रसभरित वर्णन करितात, तर दुसरीकडे अगदी याविरुद्ध हकीगत ऐकावयास मिळते. गुडगावास प्रत्यक्ष जाऊन आलेल्या दोनतीन प्रतिष्ठित व्यक्तींकडून जी माहिती आम्हांस मिळाली ती 'यंग इंडिया'त गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या एका पंजाबी संशोधकाच्या लेखातील मजकुराशी जुळते. या सर्वांचा इत्यर्थ हाच की गुडगावास बाह्यात्कारी देखावाच फार, शाश्वत अशी सुधारणा फार थोडी झाली. प्रसिद्धीकरणाचे कार्य सपाटून झाले हे मात्र सर्व कबूल करितात. पण बाकी ग्रामप्रचारक नेमणे, ग्रामशिक्षणाची शाळा व गृहशास्त्राची शाळा उघडणे वगैरे जे प्रयत्न ब्रेनसाहेबांनी केले त्यांत त्यांना बिलकुल यश आले नाही असे म्हटले तरी चालेल. अवांतर सरकारी मदत जरी पुष्कळ मिळाली, तरी या सर्व बाबींत जिल्हा लोकलबोर्डाला खर्च इतका आला की, ते आता अगदी कर्जबाजारी झाले आहे! ग्रामप्रचारक हे बहुधा वशिल्याची तट्टे आणि ज्यांना इतर कोठेच नोकरी मिळणे जवळजवळ अशक्य असेच. त्यांच्या हातून प्रचारकार्य काय होणार! शाळा चालविल्या त्याही विद्यार्थी व विद्यार्थिनी यांस वेतने देऊनच. त्यांना शिक्षण बेताचेच दिले गेले. जोपर्यंत खुद्द ब्रेनसाहेब जिल्हाधिकारी होते तोपर्यंत निदान वरवर तरी काही कार्य होत आहे असे भासत होते. ते गेल्याबरोबर सर्वच इमारत खचली व आता हा सर्व पैसा अगदी पाण्यात ओतला की काय असे वाटावयास लागले आहे!

## ग्रामसुधारणेसंबंधीची सदोष भूमिका

खरे सांगावयाचे म्हणजे मि. ब्रेन यांची पद्धतीच चुकीची असे कबूल करणे भाग आहे. शाश्वत अशी सुधारणा घडवून आणावयाची तर ती दडपण व धिसाडघाई या मार्गांनी घडवून आणता येणे शक्य नाही. याचे एक प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे आपल्याकडील सहकारी चळवळीचा इतिहास हा आहे. इतर देशांतील सहकारी चळवळीचा उगम लोककार्यार्थ झटणाऱ्या अशा खाजगी व्यक्तींच्या कार्यातून झाला व नंतर तिला पुढे सरकारी मदत वगैरे मिळाली. पण प्रथम पाया भक्कम बसविला होता. आपल्याकडे ही चळवळ बहुतेक सरकारी दडपणानेच सुरू झाली व अजून बऱ्याच प्रांतांत त्यावरच अवलंबून आहे. यामुळे खऱ्या सहकारी तत्त्वांबद्दल सर्वत्र अज्ञान व शेतकरी वर्ग सहकारी पेढीस एक नवीन सावकार म्हणूनच लेखतो अशी जिकडे तिकडे हाकाटी सुरू आहे. ज्या काही प्रांतांत सार्वजनिक पुढाऱ्यांनी चळवळीत फार कमी भाग घेतला त्यांतील चळवळीची स्थिती काय हे तर विचारूच नये! नुकतेच ब्रह्मदेश व मध्यप्रांत यांमधील चळवळीवर जे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत त्यांत याबद्दल माहिती वाचावयास मिळेल. ही झाली सरकारने सबंध सुरू केलेल्या व पाठिंबा दिलेल्या चळवळीची स्थिती. ब्रेनसाहेबांचा प्रयत्न म्हणजे केवळ त्यांच्या वैयक्तिक लहरीवर अवलंबून. जिल्हाधिकाऱ्यास अधिकार फार व त्याचे सरकारात वजन बरेच म्हणून काही थोड्या गोष्टी घडून आल्या. पण अशा प्रकारचे प्रयत्न टिकणार किती वेळ! खरीखुरी सुधारणा व्हावयाची असल्यास ती लोकांच्या परिस्थितीस अनुरूप असली पाहिजे व ती त्यांस पटवून दिली पाहिजे; आणि हे काम करणारे केवळ एका सरकारी खात्याचे पगारी नोकर अथवा साहेबांच्या मर्जीच्या आशेने अथवा गैरमर्जीच्या भीतीने उद्युक्त झालेले नसून त्यांच्या ठिकाणी खरी कळकळ व आस्था पाहिजे. सरकारी

दडपणाच्या जोरावर हे कार्य होण्याजोगे नाही. एवढे मात्र खरे की सर्व देशभर सुधारणा करावयाची असली तर ती सरकारनेच हाती घेतली पाहिजे. इतर सर्व देशांत असले प्रयत्न प्रत्येक राष्ट्रीय सरकारनेच केलेले आहेत. परंतु आपल्या सरकारात व इतर देशांच्या सरकारांत एक मोठा फरक आहे. इतर देशांत सरकार जे कार्य करते ते दडपणाच्या जोरावर नव्हे. कारण त्या देशांत सरकारी अधिकाऱ्यांस आपल्याकडे असलेले फाजील महत्त्वच नसते. तेव्हा लोकांस पटवून दिल्याशिवाय काही कार्यच होणे शक्य नाही. राजसत्ता लोकांच्याच हाती असते. तेव्हा सरकारी नोकरांनी वागण्याची पद्धतही निराळी व लोकांची त्याविषयीची भावनाही निराळी. पण सरकारी नोकरांच्या व जनतेच्या वृत्तीत अशा प्रकारचा फरक पडेपावेतो आपल्याकडे ग्रामसुधारणेसारखे काम सरकारी अधिकाऱ्यांकडून नीटसे होणे कठीण आहे. ब्रेनसाहेब भले गृहस्थ ही गोष्ट निर्विवाद आहे. पण त्यांनी केलेल्या दिशेने प्रयत्न झाल्यास आपला प्रश्न सुटेल ही अपेक्षा करणे व्यर्थ होय.

शेवटी भाषांतराबद्दल थोडेसे लिहावयाचे. हे काम बहुतांशी चांगले झाले आहे. एकंदर विषयास व ब्रेनसाहेबांच्या विचारांस अनुरूप अशाच भाषापद्धतीचा अवलंब केला आहे. काही काही ठिकाणी मात्र शब्दयोजनेत अथवा वाक्यरचनेत दोष आढळून आले. उदाहरणार्थ 'जमीनदार' हा शब्द उर्दू अर्थाने वापरलेला आहे. तसेच मराठीत "तकवाई" पेक्षा "तगाई" हा शब्दच जास्त रूढ आहे. पण अशा शब्दांच्या चुका फारशा नाहीत. वाक्यरचना मात्र काही ठिकाणी क्लिष्ट व काही ठिकाणी इंग्रजीचे शब्दशः भाषांतर केल्यामुळे दुर्बोध झाली आहे. उदा. "आपण या विद्यार्थी प्रचारकांच्या मनांत जसा बाणा निर्माण करूं तसें त्या बाण्यावर आपल्या कामाचें यश अवलंबून राहील आणि आपलें कार्य आपण सिद्धीस नेऊंच नेऊं असें मानण्याइतका मी आशावादी असून या गोष्टीस आरंभ मात्र निश्चयपूर्वक झाला पाहिजे." (पृ० ६६) हें एकच सबंध वाक्य आहे. इंग्रजी वळण कायम राहिल्याचे नमुने दोनतीन देतो. "मला विचाराल तर मी म्हणेन एक चांगला दांडगादुंडका डॉक्टर मला हवा, म्हणजे आंग न ताणतांच त्याला मी जवळ होईन आणि सहज रीतीनें तो माझा दंड टोंचूं शकेल." (पृ० १०१) "ज्या वेळीं आपल्या गांवच्या खेळाडूंच्या अकराच्या टोळींत आपल्याला येण्याचा कितपत संभव आहे याविषयीं तो मनांत विचार करीत असायचा त्या वेळी मोठ्या समारंभानें त्याचें लग्न होई." (पृ० ११६) "आम्हा दोघांच्याही कानीं नेहमीं हेंच येतें कीं, धनगर हा मेंढराचें कातडें पांघरलेला लांडगा असतो." (पृ० १२०)

असो. ब्रेनसाहेबांच्या प्रयत्नाने व लिखाणाने ग्रामसंघटनेच्या विषयास बरीच चालना मिळाली हे खास; आणि काहीही झाले तरी या विषयाबद्दल कळकळ बाळगणाऱ्यांनी ही दोनही पुस्तके एकवार अवश्य वाचून पाहावी अशी आमची त्यांस शिफारस आहे.

*लोकशिक्षण* ३ : १० ऑक्टोबर १९३० पृ० ६७६–६८४.

☆

# २ . . हिंदी जमाखर्चाचे भवितव्य

लाहोर येथे नुकत्याच भरलेल्या १४ व्या हिंदी अर्थशास्त्रीय परिषदेच्या प्रसंगी कलकत्ता युनिव्हर्सिटीतील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व मिंटो प्रोफेसर डॉ. प्रमथनाथ बानर्जी यांनी अध्यक्षस्थानावरून केलेल्या भाषणाचा विषय "हिंदी जमाखर्चाचे भवितव्य" हा होता. सरकारी जमाखर्चाचा प्रश्न हा अर्थात अत्यंत महत्त्वाचा आहे; देशात निरनिराळ्या प्रकारच्या सुधारणा घडवून आणावयाच्या आहेत याबद्दल ऐकमत्य आहे; परंतु त्यास लागणारा पैसा कसा मिळवावयाचा याविषयी प्रथम विचार व्हावयास पाहिजे. कोणतीही सुधारणा सुचविली की पैसा नाही हे त्यावर सरकारचे उत्तर ठरलेले, असे आज कित्येक वर्षे चालले आहे. मॉंटेग्यू-सुधारणांनंतर लोकपक्षीय मंत्र्यांची या पैशाच्या टंचाईमुळेच कुचंबणा झाली; आणि स्वराज्य जरी मिळाले तरी या प्रश्नाचा आपोआप निकाल लागला असे नाही. सायमन कमिशन नेमले तेव्हा हिशेबाची तोंडमिळवणी कशी करावी, नवीन कर कोणते लादावे, खर्चात काटकसर कोठे करिता येईल या सगळ्याचा विचार करण्याकरिता सर वॉल्टर लेटन या अर्थशास्त्रज्ञांस मुद्दाम विलायतेहून आणण्यात आले; व अहवालातील जमाखर्चविषयक प्रकरण त्यांनीच लिहिले आहे. डॉ. बानर्जी यांनी आपल्या भाषणात सर वॉल्टर लेटन यांनी सुचविलेल्या योजनेचाच बहुतांशी विचार केलेला आहे.

## मेस्टन निवाड्याचे स्वरूप

कोणत्याही संयुक्त राज्यपद्धतीतील एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मध्यवर्ती व प्रांतिक सरकारात एकंदर सरकारी उत्पन्नाची वाटणी कशी करावयाची हा होय. प्रांतिक व मध्यवर्ती सरकार यांचे दरम्यान अधिकाराची जशी वाटणी असेल त्या मानानेच पैसाही वाटला गेला पाहिजे हे उघड आहे. मेस्टन-साहेबांच्या निवाड्याने प्रस्थापित झालेली विभागणी अत्यंत अन्यायाची होती हे आता सर्वजण कबूल करितात. यामुळे गेल्या दशकात मध्यवर्ती सरकारच्या व काही विवक्षित प्रांतिक सरकारच्या हाती मुबलक पैसा दिला गेला व उलट इतर प्रांतांची पैशाच्या अभावी विलक्षण कुचंबणा झाली. जेथे पैसा मुबलक तेथे उधळपट्टी होते व इतर ठिकाणी अत्यंत आवश्यक अशा गोष्टीही सरकारास करिता येत नाहीत, असे या सदोष विभागणीचे दुष्परिणाम आहेत. त्यातच प्रांतिक सरकारांकडे खर्चिक खाती सर्व दिलेली असून वाढत्या उत्पन्नाचे कर मात्र सर्व मध्यवर्ती सरकारकडे सोपविलेले, असाही या मेस्टन निवाड्याचा विशेष होता. ही विभागणी सुधारण्याच्या दृष्टीने सर वॉल्टर लेटन यांनी केलेल्या सूचनांत विशेष महत्त्वाची सूचना म्हणजे प्राप्तीवरील कराचा अर्धा वाटा प्रांतिक सरकारास मध्यवर्ती सरकाराने द्यावा ही होय. डॉ. बानर्जी यांच्या मते ही सुधारणा अपुरी पडेल व त्यांनी महाकराचाही (सुपरटॅक्स) अर्धा वाटा यास जोडावा अशी सूचना केली आहे. याशिवाय ताग, तांदूळ, कातडी वगैरे

हिंदुस्थानातून परदेशांत जात असलेल्या मालावरील करही प्रांतिक सरकारांस द्यावे अशी डॉ. बानर्जी यांची सूचना आहे.

## नवीन करांविषयी सूचना

सर वॉल्टर लेटन यांनी सुचविलेले नवीन कर म्हणजे शेतकी उत्पन्नावर प्राप्तीवरील कर, आग-गाडीने पाठविलेल्या मालावर जकात, प्राप्तीवरील करावर एक प्रांतिक पट्टी आणि आगकाड्या व सिगारेट यांवर जकात हे होत. हे बहुतेक सर्व कर डॉ. बानर्जी यांस पसंत आहेत; व यांशिवाय त्यांनी मयताच्या संपत्तीवरील कराच्या जुन्या कल्पनेचाही पुनरुद्धार केला आहे. सर वॉल्टर लेटन यांची आणखी एक कल्पना अशी की, मिठावरील कर व आगकाड्या आणि सिगारेट यांवरील जकाती यांच्या उत्पन्नाचा मिळून एक प्रांतिक द्रव्यनिधी बनवावा, व याची विभागणी लोकसंख्येच्या प्रमाणात प्रांतवार व्हावी. प्रस्तुत प्रांतिक-निधीच्या कल्पनेस डॉ. बानर्जी यांचा मुख्य आक्षेप म्हणजे मिठावरील कर आणखी किती दिवस टिकेल याचीच शंका आहे हा होय.

सर वॉल्टर यांच्या सूचना करांच्या उत्पन्नाची पुनर्विभागणी व नवीन कर यांबद्दलच्याच मुख्यत्वे आहेत. डॉ. बानर्जी यांनी कोणकोणत्या खात्यांतून काटकसर करिता येईल याचाही विचार केला आहे. अर्थात मुख्य काटकसर म्हणजे लष्करी खात्यातील. पुढील दहा वर्षांत १० कोटी रुपयांची बचत लष्करी खात्यात करता येईल असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु या बाबतीत त्यांनी तपशीलवार असे विवेचन काहीच केलेले नाही. याशिवाय इतर किरकोळ कर सोडल्यास डॉ. बानर्जी यांची महत्त्वाची सूचना म्हणजे हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जाचा काही बोजा विलायत-सरकारास सोसण्यास सांगणे ही होय. यात डॉ. बानर्जी यांचा आशावादीपणा खास व्यक्त होतो असे म्हणणे प्राप्त आहे. कारण आधीच लढाईच्या कर्जाखाली दडपलेले ब्रिटिश सरकार आपखुषीने आमचा भार हलका करण्याला धावून येईल अशी मनाची समजूत करून घेणे म्हणजे वेडगळपणाच होईल.

एकंदर काटकसर, पुनर्विभागणी व नवीन कर या तीन मार्गांनी आपली राष्ट्रीय सांपत्तिक स्थिती सुधारता येईल व त्यामुळे नवीन सुधारणांचे कार्य आपणांस हाती घेता येईल अशी डॉ. बानर्जी यांची विचारसरणी आहे. डॉ. बानर्जी अथवा सर वॉल्टर लेटन यांनी सुचविलेल्या निरनिराळ्या उपायांच्या शक्याशक्यतेचा अथवा इष्टानिष्टतेचा विचार आम्हांस सांप्रत कर्तव्य नाही; कारण या सर्वच इमारतीचा पाया कितपत बळकट आहे याबद्दल आम्हांस शंका वाटते. डॉ. बानर्जी यांनी नवीन कर सुचविले खरे, पण हे जरी लादले गेले तरी यांचे सर्वच उत्पन्न ऐन नवीन उत्पन्न असे गृहीत धरणे बरोबर नाही. का की, त्यांतील बराचसा भाग जुन्या करांतील तूट भरून काढण्यास खर्ची घालावा लागेल. आपणांस स्वराज्याचा थोडासा अंश जरी प्राप्त झाला तरी नवीन सरकारास अबकारी उत्पन्न व मिठावरील कराचे उत्पन्न ही हळूहळू नाहीशी होणार असे धरून चालले पाहिजे. तसेच बऱ्याच प्रांतात शेतसारापद्धतीतही सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. या सर्व मोठ्या उत्पन्नाच्या बाबी आहेत. नवीन सरकारची इच्छा कितीही तीव्र असली तरी एकदम ह्या सुधारणा घडवून आणणे जड जाईल हे खरे. पण हे यापुढे उतरत्या उत्पन्नाचे कर आहेत हे उघड आहे. यामध्ये पडणारी तूट अन्य मार्गांनी भरून काढणे जरूर आहे. दुसरा मुद्दा हा की, नवीन राज्यघटना—मग तीत स्वराज्याचा अंश कितीही असो—ही जास्त खर्चिक होणार. कारण कौन्सिले जास्त मोठी होणार, दिवाण व मंत्री यांची संख्या वाढणार, व एकंदर प्रांतांचीही संख्या वाढणार हे उघड दिसत आहे. या सर्व योजनेस बराचसा पैसा जास्त लागणार हेही सांगावयास नकोच. हल्लीच्या पद्धतीनेच राज्यकारभार चालावयाचा असेल तर जो काही थोडासा पैसा नवीन कर लादून जमविता येईल तो सर्व नवीन राजकीय सुधारणाच खाऊन

नसतील. या गोष्टी इतक्या उघड आहेत की, तपशीलवार आकडे मोडण्याची येथे बिलकुल जरूरी नाही. मग आपले भवितव्य काय हा प्रश्न शिल्लक राहतोच.

## राज्यपद्धती बदलण्याची आवश्यकता

लॉर्ड इरविन यांनी म. गांधींच्या अकरा मागण्यांना उत्तर देताना असे म्हटले की, मिठावरील कर बाद केला असता जी तूट येईल ती भरून काढण्याचा मार्ग जर गांधी सुचवतील तर हा कर सोडून देण्याची आपली केव्हाही तयारी आहे. यावर महात्माजींनी जे उत्तर दिले त्यातच या प्रश्नाचे खरे मर्म साठले आहे. ते म्हणाले की, ज्या राज्यपद्धतीचे मिठाच्या करावाचून चालत नाही ती नादान व सर्वथैव त्याज्य हे स्वयंसिद्धच आहे. तर खरा दूरवर विचार केला असता आपणांसही असेच म्हटले पाहिजे की, आमच्या जमाखर्चाचा प्रश्न सुटण्यास आम्हांस राज्यपद्धतीचा मूळ सांगाडा बदलण्याचाच प्रयत्न केला पाहिजे. परंतु आजपर्यंत या बाबतीतील सर्व प्रकार उलटाच होत आलेला आहे. राष्ट्राची कुवत काय हे पाहून खर्चिक अथवा बिनखर्चिक राज्यपद्धतीचा प्रकार, नोकरांच्या पगारांचे मान, लष्कर वगैरेचा बोजा हे न ठरविता एवढे लष्कर, इतके पगारी नोकर हे हिंदुस्थानाने पोसले पाहिजेतच येथपासून सुरुवात झाली, व मग जो काय इतर पैसा उरेल त्यातून हळूहळू नवीन खाती हातात घेण्यात आली. सरकार परकीय असल्यामुळे त्यास आमच्या ग्रामसंस्था, खेडेगावांतील पंतोजी यांसारख्या बिनखर्चिक व आमच्या परिस्थितीच्या मानाने उपयुक्त अशा साधनांवर अवलंबून राहणे अशक्य झाले; आणि भर पगारदार नोकरांची पद्धती स्वीकारावी लागली. एक साधेच उदाहरण घ्या. आज जर सार्वत्रिक व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देऊ म्हटले व ते हल्लीच्या पद्धतीवरच द्यावयाचे तर त्यास लागणारा पैसा उभा करणे आज केवळ अशक्य आहे. एतदर्थ हल्लीची अंदाजपत्रके व हल्लीचे फडनिशी प्रश्न यांचा अर्थशास्त्रज्ञांनी विचार करू नये असे आमचे म्हणणे नाही. परंतु आमचे भवितव्य अवलंबून आहे ते अशा किरकोळ बाबींवर नाही. दात कोरून कधी पोट भरत नसते. आमच्या सांपत्तिक स्थितीस अनुरूप अशा इष्ट सुधारणा राज्यपद्धतीत घडून आल्या, स्थानिक संस्था व स्थानिक लोकनायक यांचेच शक्य तितके साहाय्य घेऊन नवीन उपक्रम सुरू केले, पगार, भत्ते, कौन्सिले व अधिकारी यांचे थाटमाट इत्यादींचे मान पुष्कळच कमी झाले, तरच राष्ट्राची धडगत आहे, नाहीतर नाही हे आमचे मत मात्र निश्चित आहे.

*लोकशिक्षण* ४ : १ जानेवारी १९३१ पृ० ४५–४८.

☆

# ३ . . स्वदेशीचे महत्त्व

१

स्वदेशीची कल्पना खरोखर पाहता फार साधी व सुगम आहे, पण स्वदेशीचे व्रत आचारात आणण्याची इष्टता व व्यवहार्यता यांकडे चिकित्सेने पाहू लागलो म्हणजे कित्येक शंका मनात येऊ लागतात व बऱ्याच भानगडी उपस्थित होतात. आर्थिक व्यवहारांत स्वदेशी म्हणजे आपल्या देशात हिंदी पैशाने व मजुरीने उत्पन्न झालेल्या व बनविलेल्या मालाची खरेदीविक्री करणे असा सरळ अर्थ घेता येईल. पण अगदी १६ आणे स्वदेशी कोणासही आचरणात आणणे जवळजवळ अशक्यच आहे. आपण आगगाडीत अथवा मोटारीत बसलो म्हणजे लागलीच आपण या व्रताचा भंग केला हे निर्विवाद आहे. तेव्हा स्वदेशी कोठपर्यंत व्यवहार्य आहे याचा विचार ज्याला त्याला करणे जरूर आहेच. तसेच १६ आणे स्वदेशी हे आपले ध्येय तरी असावे काय? आपल्या राष्ट्रापुरताच विचार करणे हे कोतेपणाचे लक्षण नव्हे काय? अशा प्रकारचेही मुद्दे अनेक वेळा उपस्थित करण्यात येतात.

## जगातील आर्थिक विषमता

या मुद्द्यांचा विचार करताना एकंदर जागतिक परिस्थितीकडे लक्ष देणे जरुरीचे आहे. आजचा राष्ट्रसमूह निरनिराळ्या भिन्नवर्णीय, भिन्नजातीय, भिन्न आर्थिक व राजकीय परिस्थितींत असलेल्या घटकांचा बनलेला आहे. असल्या परिस्थितीत अनिर्बंध व्यापार सुरू ठेवणे मागासलेल्या राष्ट्रांस किती घातुक आहे हे गेल्या शतकात सर्व जगास नीट कळून आले आहे. राष्ट्राराष्ट्रांत भेद मानू नयेत, विश्वकुटुंबाची कल्पना प्रसृत करावी हे म्हणणे अयोग्य नव्हे. पण या सर्व बाबतींत काही 'देवाणघेवाण' असावी लागते. अमेरिकेचा माल आमच्याकडे अनिर्बंध यावा, अथवा अमेरिकेच्या भांडवलवाल्यांना आपल्या देशातील धंदे काबीज करण्यास पूर्ण मुभा असावी असे म्हणणे अमेरिकेत काळ्यागोऱ्यांत भेद मानीत नसले तर एकवेळ शोभेल. पण जेथे जगभर सर्व गोरे लोक हा भेद मनांत बाळगतात व कृतीत उतरवितात तेथे जित काळ्यांस आपल्या मनोधैर्याचे निरर्थक प्रदर्शन करण्याचे काहीच कारण नाही, की आम्ही मोठेपणाचे उदाहरण घालून दिल्याने त्याचा इतर राष्ट्रांवर काही परिणाम होईल. मानव जाती आज एक नाही. त्यातील निरनिराळे समूह गुण्यागोविंदाने नांदत नसून एकमेकांकडे संशयित दृष्टीने पाहात आहेत व शक्य असल्यास बळजबरीने एकमेकांस आपल्या राजकीय अथवा आर्थिक पकडीत आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही परिस्थिती अत्यंत अनिष्ट आहे. पण आज हिंदुस्थानचा जगांतील दर्जा, मान व वजन ही इतक्या कमी प्रतीची आहेत की, आपल्या राष्ट्रास हा कलह तोडणे अशक्य आहे, केवळ यातून जीव बचावून कसे बाहेर पडतो हेच आपणांस पाहणे आहे.

## स्वदेशीचे अस्त्र

आज स्वसंरक्षणार्थ निरनिराळी राष्ट्रे निरनिराळ्या उपायांची योजना करीत आहेत. त्यांपैकी आर्थिक बाबीत हरतऱ्हेचा प्रयत्न करून स्वावलंबी बनणे हे सर्वांचे ध्येय आहे. सर्वांचेच हे ध्येय पूर्णपणे सिद्धीस गेले तर राष्ट्राराष्ट्रांतील दळणवळण थांबलेच असे होईल, म्हणून हा प्रयत्न सर्वस्वी सिद्धीस जाणे केव्हाच शक्य नाही, तरी बहुतांशी सर्व राष्ट्रांची इच्छा अशी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. गेल्या शेपन्नास वर्षांत राजकीय वर्चस्व व पकड यांपेक्षा आर्थिक वर्चस्वाचे महत्त्व जास्त मानण्यात येऊ लागले आहे हे सर्वश्रुत आहे. कोणताही मुलूख प्रत्यक्ष ताब्यात घेण्यापेक्षा तेथील गिऱ्हाइकी काबीज करण्याबाबत प्रमुख राष्ट्रांची चुरस हल्लीच्या वेळी असते. या आर्थिक बंधनाचा प्रभाव इतका आहे की आज पेढीवाले व भांडवलवाले हेच जगाची सूत्रे हलवितात असे म्हणणे अतिशयोक्तीचे मानले जात नाही. मोठमोठ्या भांडवलवाल्यांच्या संघांची (Trust) भीती प्रमुख राष्ट्रांतील राजकर्त्यांनाही वाटू लागली आहे. त्यांच्याशी टक्कर देणे व इतर देशांतील भांडवलवाल्यांची मगरमिठी बसली आहे ती सोडवणे हे काम खरोखर अत्यंत बिकट आहे. विशेषतः राजकीय सत्ता आपल्या हातांत नसल्यामुळे आपण अगदी असहाय आहो असे वाटणे साहजिक आहे. पण अगदी असहाय आपण खास नाही. कारण स्वदेशीचे एक अस्त्र आपले हातात आहे. त्याचा अवलंब केल्यास काही बाबींत तरी स्वतंत्र होण्याचे मार्गास आपण खास लागलो असे समजावे. परदेशी माल विकत न घेणे, परदेशी कंपन्यांशी व्यवहार न करणे, परकीय भांडवल ज्यांत गुंतलेले आहे अशा हिंदुस्थानातील कंपन्याही परदेशी समजणे ह्या सर्व गोष्टी आपल्या हातच्या आहेत. कायदेशीर नियंत्रण न घालता केवळ स्वेच्छेने पण एकजुटीने काम केले असता आपले आर्थिक स्वातंत्र्य परत मिळविणे आपणांस अगदी अशक्य नाही. शिवाय आपल्या राजकर्त्यांनीही या मार्गास अजून अडथळे उत्पन्न केलेले नाहीत.

अर्थात हा मार्ग एकदोघांचा नाही. प्रयत्न सर्व राष्ट्राने एकदम केला पाहिजे. खेड्यांत अथवा शहरांत श्रीमंतांनी व गरिबांनी सर्वांनीच आपले परीने स्वदेशीचे प्रसारास हातभार लावणे अवश्य आहे. सर्व राष्ट्रानेच स्वावलंबी व्हावयाचे म्हटले म्हणजे कोणीही परदेशी कारखानदार अगर व्यापारी यांचे सहाय्यावर अवलंबून राहून उपयोगी नाही. शक्यतोवर स्वदेशी अमलात आणिली पाहिजे. खादी ही सोळा आणे स्वदेशी, कारण ती बनविण्यात परदेशी यांत्रिक सामुग्रीचेही कोठे सहाय्य घ्यावे लागत नाही. याच हिशेबाने मोटारचे प्रवासापेक्षा बैलगाडीचा प्रवास जास्त इष्ट आहे. अर्थात प्रत्येकास व्यवहार्यतेचा प्रश्न पाहावा लागेलच. पण सोळा आणे स्वदेशीचे ध्येय हे असे आहे हे लक्षात ठेवणे जरूर आहे.

## स्वदेशी म्हणजे काय ?

आज आपण कितीतरी बाबीत परदेशी मालाचे गिऱ्हाईक आहोत. अगदी प्रामुख्याने कपडा व सूत हे परदेशांतून आपण विकत घेतो. पण इतरही अशा अनेक बाबी आहेत की त्यांत परदेशी मालाशिवाय सहज चालण्यासारखे आहे. साखर, रेशमी व लोकरीचे कपडे, कागद व स्टेशनरीचे सामान, बिस्किटे व डब्यांत भरलेली फळे, मोटारगाड्या व मोटार सायकली, सिगारेट, सिगार, काचकाम, रंग, अत्तरे, तेले, औषधे, साबण, खेळ असा हर तऱ्हेचा परदेशी माल आज या देशात खपत आहे. यांतील बहुतेक वस्तू स्वदेशात तयार होत आहेत व ज्या तयार होत नसतील त्यांचा त्याग करणे विशेष कठीण नाही. तसेच परदेशी व्यापारी, विमा कंपन्या, बँका, जहाज कंपन्या, चहाचे मळेवाले, आगकाड्यांचे कारखानदार, वगैरे अनेक परदेशी भांडवलवाले आपल्या देशातून नफा ओढून नेत

आहेत. या सर्व मालाचा खप कमी करणे, हा नफा त्यांस न पडू देणे, याचा एकजुटीने प्रयत्न करणे याचेच नाव स्वदेशी. यांत्रिक सामग्रीही आपले देशात परदेशातून फार येते. पण त्याबाबतचा विचार थोडक्यात करणे शक्य नाही. त्याचाही त्याग शक्य असल्यास करणे हे सोळा आणे स्वदेशीचे एक अंग आहे एवढेच दर्शविलेले पुरे.

## स्वदेशीवरील आक्षेपांचे खंडन

आता बऱ्याच स्वदेशी वस्तू महाग पडतात, त्या ओबडधोबड असतात, क्वचित प्रसंगी टिकाऊही नसतात हे खरे आहे. जेथे त्या बनविण्याचा प्रयत्नच नवीन, कारखानदार व मजूरवर्ग दोन्ही अनभिज्ञ व अडाणी तेथे हे घडून यावयाचेच. पण याकरिता स्वदेशी टाकून देणे युक्त होणार नाही. कारण प्रथमपासून जर स्वदेशी धंद्यांस गिऱ्हाइकी मिळाली नाही तर ते पुढे तरी नावारूपास कसे येणार? याही पलीकडे स्वदेशीच्या नावाखाली बरेच वेळा फसवेगिरी होण्याचा संभव असतो, असेही म्हणता येईल. पण याबाबत गिऱ्हाइकानेच सावधगिरी बाळगली पाहिजे. शक्य असेल तोपर्यंत खात्रीलायक दुकानातून व कंपन्यांतूनच माल खरेदी करावा व केवळ दुकानदाराच्या शब्दावर अवलंबून न राहता आपण हुडसूनखडसून चौकशी करावी. याबाबत स्वदेशी संघाला माहिती गोळा करून ती प्रसृत करण्याचे काम बरेच करण्यासारखे आहे व ते करण्याचा प्रयत्नही केला जात आहे. शेवटी एक असा आक्षेप घेण्यात येतो की, स्वदेशी व्रताने फायदा होतो तो केवळ कारखानदारांचा. पण सर्व जनतेने महाग वस्तू घेतल्या तर केवळ भांडवलवालेच श्रीमंत होतील एवढेच नाही. तर त्यामुळे नवीन प्रकारचे उद्योगधंदे आपल्या देशात प्रस्थापित होण्यास मदत होईल व यामुळे राष्ट्राचे आर्थिक जीवन आज जे केवळ एकांगी आहे त्याचे स्वरूप बदलेल. आणि दुसरे असे की, जरी आज भांडवलवाले गब्बर झाले तरी ते भांडवलवाले हिंदीच आहेत तोपर्यंत हरकत नाही. कारण आज त्यामुळे आपला प्रश्न अर्धा तरी सुटेल. परकीय भांडवलवाल्यांचे कचाटीतून आपण आज निसटलो तरी पुरे आहे. पुढे आपल्या हातात सत्ता आल्यावर हिंदी भांडवलवाल्यांचे नियंत्रण करणे आपणांस इतके अवघड जाणार नाही. पण जोपर्यंत परदेशी मालावरच आपण सर्व बाजूनी अवलंबून आहो, तोपर्यंत आपणांस काहीच करणे शक्य नाही.

एकदम आज सर्वांनीच खादी घेऊ म्हटले तर तेवढी आज पैदा होत आहे काय? अथवा आम्हांस सोळा आणे स्वदेशी व्रत अंगिकारिता येत नाही तेव्हा थोडेथोडकेच करून काय फायदा? अशा तऱ्हेचेही आक्षेप काही वेळेस काढण्यात येतात. पण यांचा विचार करण्यात अर्थ नाही. कारण ज्यांस काहीच करावयाचे नाही अशांचेच असले आक्षेप असतात. हे राष्ट्रकार्य आहे या बुद्धीने सर्वांनी यास हातभार लाविला पाहिजे. आपणांस शक्य असेल तितके स्वदेशी व्रत आचरणात आणिलेच पाहिजे. ज्यास ते अगदी सोळा आणे साधेल तो भाग्यवान; पण सोळा आणे न साधेल तर शक्य तितके साधविण्याची प्रत्येकाने पराकाष्ठा करणे जरूर आहे.

आपण जित आहोत व परावलंबी आहोत. आपल्या राज्यकारभारावर आपली हुकमत आज चालत नाही. आर्थिक व्यवहारावर नियंत्रण घालणे, राष्ट्रीय आर्थिक जीवनास इष्ट ते वळण लावणे, या गोष्टी आपणांस करिता येत नाहीत. इतर राष्ट्रे परकीय मालावर जकाती बसवून अथवा परदेशी कंपन्यांच्या व्यवहाराबद्दल कायदे करून जे साधत आहेत ते साधण्याचा आपला एकच मार्ग म्हणजे स्वदेशी हा होय. स्वावलंबन हाच स्वातंत्र्याचा खरा पाया आहे. जे समर्थ आहेत, जे बलवान आहेत त्यांचेच जग ऐकते. आपणांस समर्थ होणे असल्यास प्रथम आपल्या पायावर उभे राहण्यास शिकले पाहिजे व सर्व राष्ट्राने स्वदेशी व्रत अमलात आणले तरच ते पूर्णपणे शक्य आहे.

## २

### औद्योगिक प्रगती अत्यल्प व एकांगी

आजपर्यंतची झालेली हिंदुस्थानची औद्योगिक प्रगती अत्यल्प व एकांगी आहे ही गोष्ट मह्शूरच आहे; पण आपल्या हल्लीच्या स्थितीचे यथार्थ चित्र डोळ्यांपुढे येण्याकरिता खालील माहिती उपयोगी पडेल. खानेसुमारीचे वेळेस जे वर्गीकरण केले जाते त्याबरहुकूम तीनचतुर्थांश लोकांचा निर्वाह शेतीवर होतो व उद्योगधंद्यांत एकदशांश लोक गुंतले आहेत असे म्हणता येईल. पण या उद्योगधंद्यांत गुंतलेल्या लोकांचे बारकाईने निरीक्षण केले असता असे आढळून येईल की, यांतील बहुतेक सर्व भरणा खेड्यापाड्यांतील कारागीरवर्गाचा आहे. उद्योगधंद्यांत मोडले जाणारे संख्येने फार मोठे वर्ग म्हणजे अर्थात, प्रथम हातमागावरील विणकर वर्ग व त्यांचेनंतर सुतार, चांभार, न्हावी, परीट, कुंभार हे होत. आधुनिक पद्धतीने व यंत्रसाहाय्याने चालणारे उद्योगधंदे पाहावयास गेले तर आपणाकडे फार थोडे आहेत. मजूर कमिशनने (लेबर कमिशनने) यांत्रिक साहाय्य घेऊन बारमहा चालणाऱ्या कारखान्यांत सर्व हिंदुस्थान मिळून जवळजवळ साडेअकरा लाख मजूर १९२९ साली काम करीत होते, असे नमूद केले आहे. याशिवाय खाणींतून दोन लक्ष सत्तर हजार मजूर काम करीत असत. येणेप्रमाणे नवीन पद्धतीच्या उत्पादनात नेहमी गुंतलेली लोकसंख्या अखिल हिंदुस्थानात अवघी चौदा लाखांहून थोडीशी अधिक एवढीच आहे.

हे औद्योगिक प्रगतीच्या अभावाचे गमक झाले. पण जेवढी काही औद्योगिक वाढ झाली आहे तीही फार एकांगी आहे. याबाबत १९२७ सालातील जे तपशीलवार आकडे मिळतात ते खालीलप्रमाणे आहेत.

| | धंदा | मजुरांची संख्या |
|---|---|---|
| १ | कापडाच्या गिरण्या | ३७४ हजार |
| २ | पाटाच्या गिरण्या | ३४५ ,, |
| ३ | कोळशाच्या खाणी | १६५ ,, |
| ४ | आगगाड्यांचे कारखाने | १४७ ,, |
| ५ | चहाच्या मळ्यांतील कारखाने | ६० ,, |
| ६ | एंजिनियरिंग कारखाने | ४४ ,, |
| ७ | लोखंड व पोलाद यांचे कारखाने | ३७ ,, |
| ८ | छापखाने वगैरे | ३६ ,, |
| ९ | मँगॅनिजच्या खाणी | २७ ,, |
| १० | गोद्या व नावा बांधणे | २४ ,, |
| ११ | बंदुकीचे कारखाने | २१ ,, |
| १२ | अभ्रकाच्या खाणी | १७ ,, |
| १३ | साखरेचे कारखाने | १४ ,, |
| १४ | पेट्रोल गाळणे | १३ ,, |
| १५ | तेलाच्या गिरण्या | १३ ,, |
| १६ | आगकाड्यांचे कारखाने | ११ ,, |

अखिल हिंदुस्थानात दहा हजारांवर मजूर कामास लावणाऱ्या उद्योगधंद्यांची ही पूर्ण यादी झाली. खरे म्हटले तर कापड व पाटाच्या गिरण्या, कोळशाच्या खाणी व अलीकडे निघालेला टाटाचा जमशेदपूर येथील कारखाना याशिवाय आपले देशात महत्त्वाच्या उद्योगधंद्यांची अथवा कारखान्यांची वाढ झालेलीच नाही हे उघड आहे. त्यातल्या त्यात टाटाचे कारखान्याबद्दल लक्षात ठेवण्याची गोष्ट ही की, गेल्या आठदहा वर्षांत हिंदुस्थान सरकारचे धोरण काहीसे बदलून संरक्षक जकाती बसविण्यास सुरुवात झालेली नसती तर तोही आज अस्तित्वात न राहता. आगकाड्यांचा धंदा हिंदुस्थानात अलीकडे प्रस्थापित होण्यास व जरतारी धंद्याचे पुनरुज्जीवन होण्यास संरक्षण जकात हेच कारण होय. साखरेचे कारखाने अथवा रासायनिक द्रव्यांचे कारखाने जकातीशिवाय टिकून राहणे शक्य नाही असे टॅरिफ बोर्डाने आपले मत नमूद केले आहेच. तरी संरक्षक जकातीचे प्रमाण व व्याप ही हिंदुस्थानात अमेरिका व युरोपातील सर्व देशांपेक्षा कितीतरी पटीने कमी आहेत.

## परकीय भांडवलाचा शिरकाव

बरे, जो थोडाबहुत आधुनिक पद्धतीचा व्यापार व उद्योग हिंदुस्थानात चालतो त्यापैकी हिंदी माणसांचे हातात किती आहे याचा विचार केला तर एकंदर परिस्थिती अत्यंत खेदजनक आढळून येईल. एकंदर परकीयांचे भांडवल आपल्या देशात किती गुंतले आहे, हे अजमावणे अशक्य आहे. प्रो. शहा यांनी हा आकडा सहाशे कोटी रुपये असावा असा एकदा अंदाज केला होता. हा अंदाज बरोबर असो वा नसो, एकंदर हे भांडवल फार मोठे आहे हे निर्विवाद आहे. आणि याने व्यापलेला प्रदेशही फार विस्तीर्ण आहे. उद्योगधंद्यांत पाहिले तर पाटाच्या सर्वच गिरण्यांचे व्यवस्थापक परकीय आहेत असे म्हणण्यास हरकत नाही. शिवाय या गिरण्यांतील बरेच भागीदारही परदेशी आहेत. कोळशाच्या खाणींपैकी बऱ्याच मोठ्या किफायतशीर खाणी परकीयांच्या हाती आहेत. रॉकेलचा सर्व धंदा विदेशी आहे. काही कापडाच्या गिरण्या, बहुतेक लोकरीच्या कापडाच्या गिरण्या, कातड्याच्या सामानाचे बरेच कारखाने, साखर तयार करण्याचे पुष्कळ कारखाने, चहा-कॉफीचे बहुतेक मळे, आगकाड्यांचा हिंदुस्थानातील सर्वांत मोठा कारखाना हे सर्व परदेशी लोकांनी स्थापिलेले, आपल्या हातात राखलेले अथवा काबीज केलेले आहेत. हिंदुस्थानातील सर्व बिनसरकारी आगगाड्यांचा कारभार लंडनहून चालविला जातो. या परदेशी भांडवलाचा शिरकाव उद्योगधंद्यांतच नव्हे तर व्यापारातही फार झालेला आहे. विदेशी विमा कंपन्यांनी आपल्या देशांतील मोठे क्षेत्र बळकाविले आहे व हे बळकाविण्यास त्यांस विदेशी बँकांचा फार उपयोग झाला आहे. इंपीरियल बँकेच्या भांडवलापैकी अर्ध्याहून अधिक भांडवल परकीयांचे हातात आहे. परदेशी व्यापाराचा सर्व व्यवहार विदेशी बँकांच्याच ताब्यात आहे. आणि शिवाय अंतर्गत व्यवहार पाहिला तर विदेशी बँकांच्या हिंदुस्थानातील ठेवी इंपीरियल बँकेच्या बरोबरीने व हिंदी बँकांच्याहून बऱ्याच अधिक आहेत. कापूस, भुईमूग, पाट इत्यादी वस्तूंच्या निर्गत व्यवहारांतही मोठमोठ्या परकीय व्यापारी मंडळींचे गुमास्ते थेट शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पीक खरेदी करतात. एकूण उद्योगधंदा अथवा व्यापार यांत असा एकही प्रांत नाही की ज्यात विदेशीयांचा हात नाही आणि बहुतेक प्रांतांत तर ते आज शिरजोर आहेत. यासंबंधी सरकारी धोरण काय आहे हे सर्वश्रुतच आहे. स्वदेशी म्हणजे केवळ हिंदुस्थानातीलच नव्हे तर ज्यांत हिंदी भांडवल व हिंदी मजूर यांचा प्रामुख्याने संबंध आलेला तेवढेच, असा आग्रह धरण्याचे कारण काय हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

हिंदुस्थानात आयात होणाऱ्या वस्तूंपैकी काही विशेष लक्षात ठेवण्याजोग्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

| वस्तू | किंमत |
|---|---|
| एकंदर आयात | १६४८२ |
| सूत व कापड | २५२५ |
| साखर | १०९६ |
| वाहने[१] | ७३१ |
| किरकोळ माल[२] | ४८८ |
| दारू | ३३२ |
| रेशीम व रेशमी कापड | ३०० |
| कागद व पुठ्ठे | २८७ |
| रासायनिक द्रव्ये, वगैरे | २६१ |
| रंग | २५९ |
| लोकर व लोकरी कापड | २३१ |
| औषधे[३] | १९४ |
| काच व काचकाम[४] | १६५ |
| तंबाखू[५] | १६१ |
| साबण | ११२ |
| बूट वगैरे | ८८ |
| स्टेशनरी | ८१ |

(वस्तूंच्या किमतींचे आकडे लक्ष रुपयांत दिले आहेत.)

(आकडे १९३०–१९३१ सालाबद्दल आहेत. या सालातील आयात विशेषतः कापड वगैरेची, सार्वत्रिक मंदी, बहिष्कार इत्यादी गोष्टींमुळे नेहमीपेक्षा फार कमी होती.)

१ यांत ५ लाख रुपये किमतीच्या मोटारगाड्या, लॉऱ्या व सायकली आहेत.

२ यात मुख्यत्वे पॅकबंद डब्यांतील फळे, भाज्या इत्यादी, डब्यांतील दूध, बिस्किटे, केक्स यांचा समावेश होतो.

३ कापूर, क्विनीन व ४३ लाख रुपयांची पेटंट औषधे.

४ बांगड्या ५० लाख रु., मणी व खोटे मोती १६ लाख रु., बाटल्या २० लाख रु. इत्यादी.

५ मुख्यत्वे सिगारेट १२२½ लाख रु., तरी या वर्षीचा खप इतर वर्षांपेक्षा फार कमी होता.

महाराष्ट्र स्वदेशी संघ, प्रसिद्धी-पत्रक १ (पुणे, १९३२)

☆

# ४ . . आर्थिक परिस्थिती व चलनव्यवस्था

अलीकडे एकदोन वर्षे मंदी सरून तेजीचे दिवस पुनः येऊ लागले आहेत, अशी व्यापारी व अर्थशास्त्रज्ञ यांची अटकळ आहे. या अटकळीच्या बुडाशी काही अंशी फाजील आशावादीपणा तर असेलच, परंतु तिला काहीसा बळकट पुरावाही आहे. मंदीच्या काळात सारखा खालावत असलेला व्यापार सावरू लागला, पदार्थांच्या किमती कमी होण्याच्या थांबल्या किंवा निदान त्यांची उतरण्याची गती तरी कमी झाली, कच्च्या मालाची मागणी वाढू लागली, अशी चिन्हे कोठे कोठे दिसू लागल्यामुळे आता तेजीचे दिवस पुनः येणार असा अर्थशास्त्रज्ञ कयास करू लागले. पण ही चिन्हे जरी कोठे दिसली तरी ती सार्वत्रिक नाहीत अथवा सुस्पष्टही नाहीत, आणि जी सुधारणा दिसून येत आहे तिची प्रगतीही एकसारखी अथवा जलद नाही. यामुळे जरी एकंदरीने सुधारणा होत आहे असे म्हणण्याकडे सर्वांचा कल असला, तरी आता ती इतकी अडखळत का होत आहे याचाही सर्वांस विचार पडला आहे. तेजी किंवा मंदी यांचे मार्गदर्शक आकडे म्हणजे मुख्यतः व्यापाराचे व किमतींचे समजले जातात. व्यापार वाढला व किमतीही वाढल्या म्हणजे भरभराटीचे दिवस परत आले, असे समजण्यास हरकत नसते. या दृष्टीने हिंदुस्थानच्या परदेशी व्यापाराकडे नजर फेकली असता आज निश्चित असे काहीच अनुमान करता येत नाही. गेल्या चार वर्षांत आपल्याकडील प्रामुख्याने डोळ्यांत भरणारी गोष्ट म्हणजे सोन्याची निर्गत ही होय. नेहमी हिंदुस्थानातून परदेशांत होणारी निर्गत ही आयातीपेक्षा पुष्कळच जास्त असते. या निर्गतीच्या वाढाव्यातून विलायतेत द्यावे लागणारे कर्जावरील व्याज, वृद्धवेतने इत्यादी खर्च व हिंदुस्थानातील परकी व्यापारी, बँका, कारखानदार इत्यादींचा नफा, मालाची आयात-निर्गत करणाऱ्या जहाजांचे भाडे वगैरे बाबी भागविल्या जात असत. याउपर साधारणपणे प्रतिवर्षी सोन्यारुप्याची आयात करण्यासही रक्कम उरत असे. पण अलीकडे आपल्या मालाच्या किमती बसल्यामुळे व मालाची परदेशी मागणीही उतरल्यामुळे ही परिस्थिती पार बदलली आहे. सोन्यारुप्याची आयात बंद झाली, व उलट परकी देणे मिटविण्याकरिता सोन्याची निर्गत करणे प्राप्त झाले. हिंदुस्थानातून परदेशी निर्गत होणाऱ्या मालाची किंमत १९३२ साली तर आयात होणाऱ्या मालापेक्षाही कमी पडली व सोन्याच्या निर्गतीचे प्रमाण फारच मोठे झाले. अलीकडील दोन वर्षांत ही परिस्थिती कशी बदलली आहे, हे पुढील कोष्टकावरून कळून येईल. या कोष्टकात १९३२, १९३३ व १९३४ या सालांतील एप्रिल ते ऑक्टोबर या सात महिन्यांतील व्यापाराचे आकडे दिले असून सोन्याच्या निर्गतीने केवढी तूट अजून भरावी लागत आहे हे त्यांवरून थोडक्यात कळून येण्यासारखे आहे.

| तपशील | १९२४–२५ ते १९२८–२९ पंचवार्षिक सरासरी | एप्रिल ते ऑक्टोबर (सात महिने) १९३२ | १९३३ | १९३४ |
|---|---|---|---|---|
| मालाच्या निर्गतीची किंमत | ३,५३,५१ | ७३,८३ | ८५,५६ | ८७,६८ |
| मालाच्या आयातीची किंमत | २,५१,०२ | ८०,७३ | ६५,९५ | ७४,३४ |
| निर्गतीच्या किमतीचा वाढावा | +१,०२,४९ | − ६,९० | +१९,६१ | +१३,३४ |
| सोन्यारुप्याची ऐन निर्गत (+) किंवा आयात (−) | − ४९,५४ | +३३,९९ | +३१,१४ | +२८,२३ |
| एकंदर वाढावा | + ५२,९५ | +२७,०९ | +५०,७५ | +४१,५७ |

(वरील आकडे लक्ष रुपयांचे आहेत.)

## आंतरराष्ट्रीय व्यापारातील अस्थिरता

१९३२ सालापेक्षा आजची परिस्थिती निश्चितपणे सुधारली आहे हे उघड दिसते. परंतु सोन्याची निर्गत अजीबात थांबविण्याइतकी ती सुधारली नाही अथवा गतवर्षीपेक्षाही पुढे पाऊल पडले नाही. किंबहुना थोडी पिछेहाटच झाली आहे, हे वरील आकड्यांवरून सिद्ध होते. या आकड्यांची विशेष फोड करून तपशिलात शिरले तरी निश्चित प्रगती अमुक एका दिशेने होत आहे, असे काहीच आढळून येत नाही. उदाहरणार्थ, जगातील सर्व चहाच्या मळेवाल्यांचे करारमदार झाल्यामुळे चहाची किंमत व एकंदर निर्गत ही दोन्ही वाढली आहेत. कापसाच्या निर्गतीतही सारखी सुधारणा होत आहे व याचे कारण जपानशी व लँकेशायरशी झालेले हिंदुस्थान सरकारचे करार हे असण्याचा संभव आहे. पण उलट, पाट व गोणपाट यांचा व्यापार वाढता नाही, आणि गतवर्षी गळिताच्या धान्यांत होणारी वाढ यंदा घटू लागली आहे. त्यातून यंदाच्या सात महिन्यांतील जवसाची निर्गत विशेषच असमाधान-कारक आहे. ओटावा करारात जवसाच्या निर्गतीस फार महत्त्व दिले होते व या निर्गतीची गेल्या वर्षात झालेली वाढ हे ओटाव्याचे प्रमुख दृश्य फल समजले जात असे. त्या निर्गतीची इतक्या लवकरच पिछेहाट व्हावी, हे आश्चर्यकारक व बोधप्रद आहे. एकंदरीत आपल्या परदेशी व्यापाराचे प्रमाण वाढते नाही. तसेच किमतीतही काहीच चढ दिसून येत नाही. एवढे मात्र खरे की, किमतीत सारखा दिसून येणारा उतार गेल्या वर्ष-सहा-महिन्यांत थांबला आहे, व निर्गतीच्या सर्वच पदार्थांच्या किम्मती थोड्याबहुत स्थिरावल्या आहेत. महत्त्वाचे फरक असे एकदोन जिनसांतच आढळून येतात. उदाहरणार्थ, कातड्यांच्या किमती बऱ्याच कमी झाल्या आहेत, तर लाखेची किंमत वाढली आहे. पण किमती कमी होण्याचे थांबणे हीसुद्धा व्यापाऱ्यांच्या दृष्टीने काही लहानसहान गोष्ट नाही. कारण किमतींचे साधारण मान ठरल्यासारखे झाले म्हणजेच व्यापार वाढीस लागतो, असे म्हणता येईल. पण यात दुसराही असा विचार येतो की, अलीकडे किमती वाढल्या आहेत त्या बहुतांशी शेतकी पैदाशीच्या कच्च्या मालाच्या वाढल्या आहेत. अजून इतर किमती, विशेषतः पक्क्या मालाच्या किमती वाढल्या नाहीत. तेव्हा आज दिसून येणारी किमतींची वाढ ही मंदीचे दिवस सरण्याची द्योतक नव्हे. सन १९२९ ते १९३१ या दरम्यान सर्व किमती उतरत असता शेतकी मालाच्या किमती ज्या इतर किमतीच्या मानाने विशेष उतरल्या त्या केवळ आज सावरत आहेत व शेतकी माल आणि इतर माल यांतील किमतींचे प्रमाण आता पूर्ववत बसत आहे, असाही याचा अर्थ करिता येईल.

हिंदुस्थान सोडून इतर देशांच्या परिस्थितीकडे पाहिले तर तीही अशीच काहीशी मिश्र स्वरूपाची दिसून येते. काही ठिकाणची प्रगती निश्चित स्वरूपाची आहे. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियातील व्यापाराची व किमतींची वाढ ही दोन्ही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झालेली आढळते. परंतु ऑस्ट्रेलियाची प्रगती ही त्या देशाच्या विशिष्ट परिस्थितीमुळे घडून आली असावी. मंदीचे दिवस आले तेव्हा प्रथम ऑस्ट्रेलियातच त्यांचे परिणाम विशेष जाचले. शेतकी मालाच्या किमती उतरल्यामुळे राष्ट्रीय व्यापार व राष्ट्रीय फडणिशी कारभार या दोहोंसही जबर धक्का बसला. पण उलट, ऑस्ट्रेलियातच प्रथम राष्ट्रीय सरकारने किमती वाढविणे व जमाखर्चाचा मेळ बसविणे या दृष्टीने संघटित प्रयत्न केला, व गेल्या एकदोन वर्षांतील शेतकी मालाच्या किमतीतील वाढीचा ऑस्ट्रेलियास विशेष फायदा मिळाला. पण सर्व राष्ट्रांचा व्यापार मात्र सरसहा वाढलेला दिसत नाही. सार्वराष्ट्रीय व्यापाराबद्दलही असेच म्हणता येईल की, त्याची सारखी होणारी घट मात्र अलीकडे थांबली आहे. या व्यापाराचे परिमाण (quantum) पाहिले तर ते आज १९२९ मधील परिमाणाच्या तीनचतुर्थांश आहे. १९३२ च्या तिसऱ्या तिमाहीत हे परिमाण अत्यल्प झाले होते, ते त्यानंतर थोडेबहुत वाढले आहे. किमतींचा हिशेब केला तर तो मात्र काही निराळाच निघतो. कारण, जगभर पैशाचे मान आज एकच नाही. आणि काही देशांत किमती उतरणे जरी आज थांबले असले, तरी सोन्याच्या भावाच्या मानाने अजून पदार्थांच्या किमती कमीच होत आहेत. जेथे सुवर्णमानपद्धती आहे त्या देशांतील किमतीने हिशेब केला तर जागतिक व्यापाराची किंमत आज १९२९ च्या अर्ध्याहूनही कमी येईल. हा मानपद्धतीतील फरक महत्त्वाचा आहे. किंबहुना असेही म्हणता येईल की, ठिकठिकाणी व्यापारी तेजीमंदीतील दिसून येणारा फरक हा बऱ्याच अंशी या मानपद्धतीतील फरकावरच अवलंबून आहे.

## चलन पद्धतींचे निरनिराळे प्रकार

प्रस्तुत जगात स्थूल मानाने दोन गट पाडता येतील. एक सुवर्णमानपद्धतीस चिकटून राहणाऱ्यांचा व दुसरा ज्यांनी या पद्धतीचा त्याग केला आहे अशांचा. हा दुसरा गट काही अगदी एकरूप नाही, पण त्यांतील बरीच राष्ट्रे आपल्या चलनपद्धतीचे नियंत्रण पौंडाच्या अथवा स्टर्लिंगच्या किमतीस अनुलक्षून करीत आहेत; म्हणजे, त्यांनी आपल्या चलनाची किंमत पौंडाला धरून निश्चित ठरविली आहे, किंवा काही ठोकळ प्रमाण लक्षात ठेवून ते पौंडाच्या किमतीच्या मानाने आपल्या चलनाच्या किमतीचे नियंत्रण करीत असतात. हा भेद लक्षात घेऊन मानपद्धतीच्या दृष्टीने राष्ट्रांचे वर्गीकरण केले तर ते (१) सुवर्णमान गट, म्हणजे मुख्यतः फ्रान्स, इटली वगैरे काही युरोपीय राष्ट्रे, (२) स्टर्लिंग गट, म्हणजे इंग्लंड, ब्रिटिश साम्राज्य व काही उत्तर युरोपीय राष्ट्रे, व (३) अगदी स्वतंत्र पद्धतीने आपल्या चलनपद्धतीचे नियंत्रण करणारी राष्ट्रे, असे करिता येईल. यांपैकी पहिल्या गटातील देशांतल्या किमतींचे मान अजून सारखे उतरतच आहे. यात अलीकडे जर काही फरक असेल तर तो एवढाच की, या किमती उतरण्याचा दर काहीसा कमी झाला आहे. स्टर्लिंग गटातील बहुतेक देशांत किमती उतरण्याच्या आता थांबल्या आहेत, असे म्हणण्यास हरकत नाही. या गटातील बहुतेक देशांत किमती उतरण्याची पराकाष्ठा १९३२ साली अथवा १९३३ च्या सुरुवातीच्या महिन्यात झाली. पण तेव्हापासून त्यांच्यात थोडी वाढ झाली आहे. अर्थात हिंदुस्थानचा समावेश स्टर्लिंग गटातच होतो. स्टर्लिंग गटाच्या बाहेर स्वतंत्र देश बरेच आहेत, ते सर्व एकाकी असल्यामुळे प्रत्येकाचा इतिहास निराळा आहे. रशियातील एकंदर आर्थिक नियंत्रण इतरांपेक्षा अगदी भिन्न असल्यामुळे त्याचा विचार करण्याची जरुरी नाही. जपानने आपले स्वतंत्र धोरण स्वीकारून किमतींची वाढ इतरांपेक्षा थोडी जास्त करून घेतली आहे. अमेरिकेत (संयुक्त संस्थानांत) प्रे० रूझवेल्ट यांच्या कारकीर्दीपासून सुवर्णमानाचा त्याग करून किमती

वाढविण्याचा विशेष प्रयत्न झाला आहे व त्यात गेल्या वर्षांत बरेचसे यशही आले आहे. चीनमध्ये रौप्यमान असल्यामुळे १९३१ साल पावेतो जागतिक मंदीचा त्या देशावर फारसा परिणाम झाला नव्हता. पण, पुढे चांदीची किंमत वाढू लागली व प्रे. रूझवेल्ट यांच्या धोरणामुळे या वाढीत एकदम भर पडली; आणि चीनमध्येही पदार्थांच्या किंमतीचे मान भराभर उतरू लागले, ते आजही उतरतच आहे. चिनी रौप्यमानामुळे चीनच्या चलनपद्धतिविषयक प्रश्नांचा विचार इतर देशांहून अगदी निराळाच करावा लागतो. एकूण येथेही कोठे एकसूत्रीपणा किंवा निश्चितपणा नाही. ज्या देशांनी सुवर्णमानाचा त्याग केला त्या देशांतील परिस्थितीत काही सुधारणा झाली असे दिसते. पण यावरून सुवर्णमान गटातील देशांनीही त्या पद्धतीचा त्याग केला तर त्यांचीही स्थिती सुधारून एकंदर जागतिक तेजीस प्रारंभ होईल, असे म्हणणे चुकीचे दिसते. कारण, आज जेथे व्यापारी वाढ दृष्टीस पडते तेथे ती बहुतेक जागतिक परिस्थिती सुधारल्यामुळे झाली असे नाही. एकंदर वाढ झाली नसून काहींची उतरत्या व्यापाराची विभागणी भिन्न होणे, एवढेच घडून येत आहे. काही देशांचा व्यापार बराचसा कमी होणे तर काहींचा थोडासा वाढणे, या प्रकारचे गेल्या दोन-तीन वर्षांतील फेरबदलांचे स्वरूप आहे; व हे फेरबदल किमतींच्या सापेक्ष चढउतारांमुळे घडून येत आहेत. सुवर्णमानाचा त्याग केल्यामुळे ज्या देशांतील चलनांचे मोल उतरले व जेथील किमतींचे प्रमाण वाढले तेथे व्यापार वाढला, असे झाले आहे. पण सुवर्णमानाचा त्याग करून फायदा होणे हे केवळ इतरांपेक्षा आपली परिस्थिती भिन्न असण्यावरच अवलंबून आहे. सगळ्यांनीच सुवर्णमानाचा त्याग केला तर हा सापेक्ष फायदा कोणासच मिळणार नाही. यामुळे प्रत्येक राष्ट्राने आपल्यापुरता विचार केला तर सुवर्णमानाचा त्याग करणे अथवा इतर रीतीने आपल्या चलनाचे मोल खालावून पदार्थांच्या किमतीचे मान वाढविणे हे धोरण जरी हितावह वाटले तरी सुवर्णमानाचा त्याग सररहा केल्यामुळे जागतिक प्रगतीस प्रारंभ निश्चित होईल, असे म्हणता येत नाही. आज अर्थात सर्व राष्ट्रे आपापल्यापुरता विचार करीत आहेत. तेव्हा त्यांत जणू काय आपल्या चलनाची किंमत सापेक्षतः उतरविण्याची चढाओढ चालली आहे, असा भास होत आहे. परंतु अशी चढाओढ फार वेळ चालल्यास सर्वच चलने कवडीमोल होतील, हे कोणासही कळून येण्यासारखे आहे. म्हणून, जरी प्रारंभी चलनांची किंमत कमी करण्याच्या धोरणाचा पुरस्कार केला गेला, तरी असे करण्यासही काही मर्यादा आहे, हा विचार प्रबल होऊन आता त्या स्थिरावण्याकडे अनेक प्रमुख राष्ट्रांचे लक्ष लागले आहे. प्रे० रूझवेल्ट यांच्या धोरणाकडेही पाहिले असता त्यात अलीकडे निश्चित फरक पडून आलेला दिसून येतो. अमेरिकेतील (सं. संस्थानांतील) किमती जवळजवळ १९२९ च्या मानाला परत न्यावयाच्या, असा प्रथम त्यांचा निर्धार होता, व याकरिता डॉलरची किंमत सोन्याच्या मानाने कितीही उतरवावी लागली तरी हरकत नाही, असे त्यांचे धोरण दिसून येत होते. पण हे करणे वाटते तितके सुलभ नाही; व एकदम सोन्याचा व्यवहार फार केल्यास एकंदर जागतिक परिस्थितीवर व अप्रत्यक्ष रीत्या खुद्द संयुक्त संस्थानां-मधील परिस्थितीवर त्याचे अनिष्ट परिणाम घडून येण्याचा संभव आहे, असे स्पष्ट दिसू लागल्यामुळे प्रे० रूझवेल्ट यांनी आपले धोरण हळूहळू बदलले; व अलीकडे बरेच महिने डॉलरची किंमत सोन्याच्या मानाने घटविण्यापेक्षा ती स्थिरावण्याकडे त्यांचे लक्ष लागले आहे, असे दिसून येते. किंबहुना आज असेही म्हणता येईल की, डॉलर हा जरी सोन्याचा नसला, तरी डॉलरची किंमत सोन्यात अलीकडे बरेच महिने निश्चित केल्यामुळे संयुक्त संस्थानांमध्येही आज जवळजवळ सुवर्णमानपद्धती आहे.

### सुवर्णमानाचे महत्त्व

किमती स्थिरावण्याचा विचार मनात येऊ लागला की, साहजिकच सुवर्णमानाचा प्रश्न उत्पन्न होतो. कारण, सुवर्णमानाचे तोटे जरी पुष्कळ असले, तरी जोपावेतो सर्व राष्ट्रांना एकमताने चलनपद्धतीचे

नियंत्रण करणे शक्य नाही, तोपावेतो सुवर्णमानाची कास प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीने धरल्याशिवाय कोणासच तरणोपाय दिसून येत नाही. तसे पाहिले तर आज पौंडाचा व सोन्याचा कोणत्याच रीतीने प्रत्यक्ष संबंध नाही. परंतु सुवर्णमानाचा त्याग करून दोनतीन महिने झाल्यावर डॉलर-पौंडाचा भाव साधारण अमुक असणे इष्ट आहे, अशी मनाची खूणगाठ बांधून पौंडाचे नियंत्रण केले जात असे. ज्या वेळेस डॉलर सोन्याचा होता, तेव्हा पर्यायाने सोन्याच्या भावाशीच एक प्रकारचा पौंडाचा निश्चित संबंध जोडण्यात आला होता. अमेरिकने सुवर्णमान सोडल्यामुळे पौंडाची स्थिती काहीशी बिकट झाली आहे हे खरे. कारण, एकीकडे हेलकावे खाणारा डॉलर, तर दुसरीकडे सुवर्ण-फ्रँक असा दुहेरी संबंध लक्षात ठेवणे आता आवश्यक झाले आहे. पण डॉलर जसजसा स्थिरावत जाईल, तसतसा हा प्रश्न सोपा होईल. थोडक्यात, ज्यांनी सुवर्णमानाचा आज त्याग केलेला दिसतो, त्यांनी ही फारकत कायमची म्हणून केलेली नाही. सुवर्णमानाचा शक्य तितका लवकर पुनः स्वीकार करावा, असे इंग्लंडातील बऱ्याच वजनदार पेढीदारांचे मत आहे. तेव्हा त्यांच्या दृष्टीने ही जी राष्ट्रे आज सुवर्णमानास चिकटून आहेत, त्यांनी ते सोडावे हे अनिष्टच आहे. आणि म्हणून प्रे० रूझवेल्ट यांनी सोन्यासंबंधी चढाईचे धोरण स्वीकारल्यामुळे सुवर्णमान-देशांची परिस्थिती विशेष बिकट झाली होती, तेव्हा इंग्लंडमधील व्यापाऱ्यांचे व अर्थशास्त्रज्ञांचे मत या चढाईच्या धोरणाविरुद्धच होते. पण या रीतीने जरी लोकमताचा वारा वाहात असला, तरी आजच्या अनिश्चित परिस्थितीत एकदा सोडलेल्या सुवर्णमानाचा पुनः स्वीकार करण्यास कोणतेच राष्ट्र तयार दिसत नाही; आणि जी राष्ट्रे सुवर्णमानास चिकटून आहेत त्यांची परिस्थिती म्हणण्यासारखी काहीच सुधारत नाही. म्हणजे, अजून ती शेवटपर्यंत सुवर्णमान असेच टिकवून धरू शकतील, असे खात्रीलायक सांगता येत नाही. किंमती सारख्या कमी होत जाण्यामुळे परकी व्यापाराचा संकोच, अंतर्गत मंदी, वाढती बेकारी वगैरे आपत्ती या राष्ट्रांस इतरांपेक्षाही विशेष भोवत आहेत. या राष्ट्रांची परकीय व्यापारावर इंग्लंड-जपानइतकी मदार नाही, म्हणून आजपर्यंत त्यांस वेळ मारून नेता आली आहे. त्यांस सुवर्णमानाचे फायदे बरेच वाटतात, म्हणून त्यांनी ते टिकविण्याचा विशेष प्रयत्न केला आहे. पण परिस्थिती काही थोड्या अवधीत न सुधारल्यास त्यांसही नाइलाजाने कागदी चलनाचा स्वीकार करावा लागेल; व असे झाल्यास एकंदर जागतिक परिस्थितीत आणखी काही निराळीच घटना उत्पन्न होईल. जागतिक परिस्थिती थोडीबहुत सुधारत आहे, तेव्हा हळूहळू व्यापार वाढीस लागेल, सर्वच चलनपद्धती कमीअधिक प्रमाणात स्थिरावता येतील, व सर्व गाडे पूर्ववत सुरळीत चालेल, असा आशावादीपणा बहुतेक सर्वजण बाळगून आहेत. पण अजून तरी अशी आशा पूर्णपणे बाळगण्यास निश्चित पुरावा काही नाही, हे उघड आहे.

## हिंदुस्थान सरकारच्या योजना

जागतिक परिस्थिती सुधारण्याच्या मार्गात आज सर्वांत मोठी अडचण कोणती असेल तर चलन-पद्धतीच्या फरकामुळे अथवा इतर कारणांमुळे राष्ट्राराष्ट्रांत पडलेले निरनिराळे गट ही होय. १९२९ सालच्या आधीच बहुतेक राष्ट्रे स्वयंपूर्ण बनण्याचा थोडाबहुत प्रयत्न करू लागली होती. पण मंदीमुळे या प्रवृत्तीस विशेष जोर चढला. जेव्हा सामुदायिक रीत्या कोणताच प्रश्न सोडविणे शक्य नाही असे दिसू लागले, तेव्हा प्रत्येक राष्ट्राने आपल्यापुरता किंवा विवक्षित गटाने आपल्यापुरता विचार करून सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण घालण्यास सुरुवात केली. स्वयंपूर्णतेचे ध्येय जितके जास्त स्वीकारावे तितके सार्वराष्ट्रीय व्यापाराचे मान कमी होणार हे उघड आहे; आणि साधारणपणे खुला व्यापार व राष्ट्राराष्ट्रांतील आर्थिक व्यवहार यांस आळा घालून त्यांस विशिष्ट वळण लावण्याचा प्रयत्न करणे हेही स्वयंपूर्णतेचे ध्येय स्वीकारल्यावर ओघानेच आले. या रीतीने आर्थिक बंधने, आर्थिक

व्यवहाराचे नियंत्रण इत्यादींस अलीकडे फार महत्त्व प्राप्त झाले आहे, आणि या सर्वांचा नियंत्रित अथवा नियुक्त आर्थिक व्यवहार या नावाखाली समावेश होत असतो. इतर देशांत काही झाले. की ते आपल्याकडे करण्याचा अथवा निदान ते करण्याचा आव आणण्याचा तरी हिंदुस्थान सरकारास प्रयत्न करावा लागतो. रशियाच्या पंचवार्षिक योजनेपासून जिकडेतिकडे योजनांची भाषा सुरू झाली. तेव्हा जरी योजनेचा विचार न झाला, तरी जर योजना पुढेमागे करण्याचे मनात आणिले, तर ती करण्यास लागणारी आवश्यक माहिती तरी गोळा करावी, असा शुस्टरसाहेबांनी बूट काढला, व त्यास अनुलक्षून बोले व रॉबर्टसन या दोन विख्यात इंग्रजांस पाचारण केले. यांपैकी प्रो. बोले हे बुद्रुक व फार विद्वान असे आकडेशास्त्रज्ञ आहेत, व प्रो. रॉबर्टसन हे केंब्रिजमधील बरेच नावाजलेले अर्थशास्त्रज्ञ आहेत. या दृष्टीने या दोघांची निवड गैर झाली असे म्हणता येत नाही. इंग्लंडाहून माणसे आणावयाचीच म्हटले तर ती निदान चांगली तरी आणिली. मात्र त्यांच्यापुढे प्रामुख्याने जो प्रश्न ठेविला तो असा की, ज्याचा विचार करण्यास त्यांस हिंदुस्थानची सफर करण्याचे काहीच कारण नव्हते. प्रथम कल्पना अशी होती की, हे दोघे विद्वान सरकार प्रसिद्ध करीत असलेल्या सर्वच आकड्यांबद्दल विचार करतील. पण त्यांनी चौकशी करून अहवाल लिहिला तो फक्त हिंदुस्थानातील आर्थिक उत्पादनाची एकंदर गणती कशी करावयाची याबद्दलच. त्यांच्या अहवालात आज सरकारतर्फे गोळा होत असलेली माहिती ही कशी अपुरी आहे अथवा ती गोळा करण्याची पद्धती कोठे असमाधानकारक आहे, तीतील वैगुण्ये कशी भरून काढली पाहिजेत, या मूलभूत प्रश्नांचा विचार बिलकुल झालेला नाही. हा अर्थात या परस्थांचा दोष नाही, त्यांची कार्यमर्यादा सरकारनेच अशी चमत्कारिक आखली होती; त्यांस सांगितले तेवढ्यापुरता त्यांनी अहवाल सादर केला व एक खर्चिक योजना आखून दिली. पैसे नसल्यामुळे त्याविषयी काही करावयाचेच नाही, असे सरकारने ठरविल्यासारखे दिसते. तात्पर्य, शुस्टरसाहेबांच्या या पहिल्या प्रयत्नाचे फल बोले-रॉबर्टसन यांस हिंदुस्थानची हिवाळी सफर घडणे एवढेच ठरले.

यानंतर विलायतेस परत जाता जाता जुन्या फडणिसांनी प्रांतिक मंत्र्यांचे एक भले जंगी संमेलन भरवून त्यात बऱ्याच बिकट प्रश्नांचा ऊहापोह केला. म्हणजे शेतकी पैदाशीचे व पेरणीचे नियंत्रण येथपर्यंतसुद्धा मजल गेली. पण या सर्वांतून प्रत्यक्ष निष्पत्ती एकच झाली. ती म्हणजे मि. लिव्हिंग्स्टन यांची नेमणूक ही होय. योजना करावयाची तर जशी आकडेसिद्ध माहिती प्रथम गोळा झाली पाहिजे, तसेच शेतकऱ्यांस मदत करावयाची तर ती करण्याच्या आधी त्यांच्या अडचणी कळून आल्या पाहिजेत. त्यांतील आजकालच्या प्रमुख अडचणी म्हणजे बाजारभावासंबंधीच्या. तेव्हा शेतकी मालाच्या व्यापाराची व बाजारांची पाहणी करणे हे अत्यावश्यक आहे, असा हिंदुस्थान सरकारने निष्कर्ष काढलेला दिसतो, व त्याकरिता इंग्रजी शेतकी खात्याच्या बाजारविभागांत काही वर्षे काम केलेले मि. लिव्हिंग्स्टन यांस या पाहणीचे मुख्य नेमण्यात आले. आता काही लाख रुपये या कामाकरिता वेगळे काढण्यात आले असून बऱ्याच मोठ्या पगाराचे अधिकारीही नेमण्यात येणार आहेत, व हे काम पाच वर्षे चालेल असा अंदाज आहे. तोपर्यंत तरी शेतकऱ्यास मदत करण्याच्या कोणत्याच योजनेबद्दल कोणास काही करण्याची अथवा बोलण्याचीही गरज नाही!

## सरकारी चालढकल

आर्थिक पाहणी किंवा आर्थिक प्रश्नांचा सूक्ष्म आकडेसिद्ध अभ्यास या गोष्टी आमच्या मते अनावश्यक आहेत असे कोणी समजू नये. निदान आम्ही तरी तसे प्रतिपादणे शक्य नाही. आमचा मुद्दा एवढाच की, या सर्व गोष्टी दिरंगाईच्या व ढिलाईच्या धोरणाच्या द्योतक आहेत. सरकारास खरोखरच काही करावयाचे असते तर आजपावेतो काय कमी पाहण्या झाल्या? गेल्या पंधरा वर्षांत कमिशने व कमिट्या

काय कमी नेमिल्या गेल्या? शेतकीचाच विचार करावयाचा तर शेतकी कमिशनने केलेल्या शिफारशीं-पैकी किती अमलात आणिल्या गेल्या आहेत? अमलात आणिली गेली खरोखर काय ती एकच. ती म्हणजे इंपीरियल कौन्सिल निर्माण करून दिल्ली-सिमल्यास नवीन कचेरी उघडण्याची. खुद्द व्यापार व बाजार यांचे नियंत्रण करावयाचे म्हटलेच तर शेतकी कमिशनने सुचविलेले व इतर देशांच्या अनुभवावरून सहज सुचण्यासारखे असे काही मार्ग एकदम अवलंबिण्यासारखे आहेत. तपशिलात शिरावयाचे तर बारकाईची व व्यापक पाहणी केली पाहिजे. पण काही महत्त्वाचे प्राथमिक उपाय आजही करण्यासारखे आहेत. एकाच दिशेने नव्हे, तर सर्वच दिशांनी हा विचार लागू पडतो. थोडीबहुत प्रत्यक्ष कार्यास सुरुवात झाली व नंतर जास्त तपशिलात शिरले, तर त्यात हरकत घेण्यासारखे काही नाही. पण निदान आजपर्यंतच्या आपल्या सरकारी कारभारावरून कमिटी, कमिशन व पाहणी या सर्व वेळ मारून नेण्याच्या सबबी आहेत, असे निर्विवाद म्हणता येते.

हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांतील कार्यविभागणी ही सुद्धा आपल्या प्रगतीच्या आड येत आहे. खर्च करण्याची व राष्ट्रहिताची कामे करण्याची सर्व खाती प्रांतिक सरकारांकडे आहेत; व पैसा जो आहे तो हिंदुस्थान सरकारकडे. हिंदुस्थान सरकारने पाहण्या केल्या तर त्याजकडे प्रत्यक्ष करण्याचे काही नसल्यामुळे त्यास प्रांतिक सरकारांकडे बोट दाखविता येते. प्रांतिक सरकारे पैशाची अडचण ही सबब सतत दाखवू शकतात. आणि हेही खरे की, प्रांतिक सरकारांत दिवाणांपैकी या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करणारी माणसेच फार थोडी, व आपल्या राजकारणाचा एकंदर सूर पाहता त्यांस तसा विचार करावयास लावणारी परिस्थितीही कधी उत्पन्न झालेली नाही. आर्थिक प्रकरणी आपले अमुक एक धोरण आहे, असे म्हणण्याची पाळी प्रांताप्रांतातील कोणत्याच राजकीय पक्षावर आलेली नाही, आणि जोपर्यंत अशी पाळी आलेली नाही तोपर्यंत दिवाणांनी तरी बिकट प्रश्नांचा नसता विचार कशास करावा?

*लोकशिक्षण* ५ : ७ जानेवारी १९३५ पृ० १०५-११३.

☆

# ५ . . हिंदी जकात-मंडळाची नवीन घटना

या महिन्यात हिंदी जकातमंडळाची पुनर्घटना हिंदुस्थान सरकारने केली व त्यात सर अलेक्झँडर मरे (कलकत्याचे जुने व बडे व्यापारी कारखानदार) –अध्यक्ष, सर फाझल इब्राहिम रहिमतुल्ला (सर इब्राहिम रहिमतुल्ला यांचे चिरंजीव व पेशाने व्यापारी), आणि श्री रामस्वामी मुदलियार (मद्रासकडील जस्टिस पक्षाचे एक प्रमुख पुढारी) या तिघांस नेमिले आहे. हिंदुस्थान सरकारच्या जकातविषयक धोरणाचा वारा सांप्रत कोणत्या दिशेने वाहात आहे व या बाबतीत नवीन राज्यघटनेत काय घडण्याचा संभव आहे याची काहीशी कल्पना जकात-मंडळाच्या या नवीन घटनेवरून येण्यासारखी आहे, आणि म्हणून याबद्दल येथे थोडेसे विस्तृत विवेचन करण्याचे योजिले आहे.

## मंडळाच्या घटनेविषयी मतभेद

जकात-मंडळाच्या कल्पनेचा उगम जकात कमिशनच्या इतिवृत्तात (१९२२) आहे. या कमिशनने संरक्षक जकाती लादण्याचे धोरण सरकारने स्वीकारावे अशी शिफारस केली, व त्या केव्हा व कशा लादाव्या याची चौकशी करण्याकरिता एक स्वतंत्र मंडळ निर्माण करावे असे म्हटले. संरक्षक जकातीचे स्वरूप आणि त्यांची व्यापकता याबद्दल जरी कमिशनच्या सभासदांत मतभेद असला, तरी धंद्यास संरक्षण देण्याच्या पूर्वी स्वतंत्र मंडळामार्फत चौकशी होणे अवश्य आहे याबद्दल एकवाक्यता होती. या मंडळाचे काम, एकंदर परिस्थितीची कसोशीने पाहणी करून आपला निर्णय निःपक्षपात बुद्धीने देणे हेच असावयाचे. श्रीमंत कारखानदारांनी आपसांत संगनमत करून जनतेस लुबाडावयाचे, कायदे-मंडळाच्या सभासदांस लाचलुचपत देऊन अनुकूल करून घ्यावयाचे, इत्यादी अनिष्ट प्रकार टाळावयाचे असल्यास स्वतंत्र मंडळामार्फत चौकशी हा एकच उपाय आहे, याबद्दल दुमत नव्हते. जकात-कमिशनच्या बहुमतवादी व भिन्नमतपत्रिकावादी सभासदांचा मंडळाच्या घटनेच्या तपशिलाविषयी थोडासा मतभेद होता. बहुमतवाद्यांच्या दृष्टीने हिंदी जकात-मंडळाची घटना अमेरिकन जकात-मंडळासारखी असावी. त्या वेळेस एक अर्थशास्त्रज्ञ अमेरिकन मंडळाचा अध्यक्ष होता व इतर सभासद हे नावाजलेले कायदेपंडित किंवा राजकीय पुढारी होते. असली विविधज्ञानसंपन्न व उच्च दर्जाची माणसे सरकारने मंडळावर नेमावी, अशी बहुमतवाद्यांची शिफारस होती. भिन्नमतवाद्यांचे मतही जकातमंडळाचे समासद 'लायक, प्रामाणिक व निःपक्षपाती' असावे असेच होते. मूळ मतभेद, सभासद कोणी नेमावयाचे यासंबंधी होता. यांची शिफारस अशी की, मंडळात तीन सभासद व दोन 'असेसर' (निर्धारक) असावे. मंडळाचे काम सर्व बाजूंनी विचार करून निःपक्षपाती निर्णय देण्याचे असल्यामुळे त्याचा अध्यक्ष एखादा वरिष्ठ न्यायमंदिरात काम केलेला न्यायाधीश असावा, इतर दोन सभासद सर्व जनतेचे हित पाहून

निकाल देणारे असणे जरूर असल्यामुळे ते निवडण्याचा अधिकार जनतेच्या वरिष्ठ प्रातिनिधिक सभेस म्हणजे लेजिस्लेटिव्ह असेंब्लीस असावा, व मंडळाला विशिष्ट बाबतीत आनुभविक सल्ला देण्यासाठी म्हणून, निरनिराळ्या व्यापारी मंडळांनी मिळून निवडून दिलेले औद्योगिक व व्यापारी बाबतीतील तज्ज्ञ, 'असेसर' म्हणून मंडळाबरोबर काम करण्यास द्यावे. परंतु त्यांचा दर्जा सल्लागारांचा ठेवून मंडळाच्या सभासदांस वाटतील तेवढ्या संबंधांतच मंडळाने त्यांची मदत घ्यावी, असा स्पष्ट अभिप्राय भिन्नमत-पत्रिकाकारांनी नमूद केला आहे. सर इब्राहिम रहिमतुल्ला, घनःश्यामदास बिडला, नरोत्तम मुरारजी इत्यादिकांच्या सह्या या भिन्नमतपत्रिकेवर आहेत.

या दोन्ही मतांचा विचार केला असता पात्रता व निःपक्षपातीपणा या गुणांवर विशेष भर दोघांनीही दिला आहे असे दिसून येईल. बहुमतवाद्यांनी चौफेर विचार करण्याची लायकी आणि त्यातल्या त्यात अर्थशास्त्रातील पारंगतता व व्यापारी उद्योगधंद्याचा काही प्रत्यक्ष अनुभव यावर जोर दिला आहे. भिन्नमतपत्रिकेत तज्ज्ञ हे 'असेसर' म्हणून ठेवून जनतेचे प्रतिनिधी निवडून दिले जावे, अशी शिफारस केली आहे. एक वरिष्ठ न्यायाधीश नेमणे आणि व्यापारी व औद्योगिक तज्ज्ञांस असेसरांचा दर्जा देणे या मार्गाने भिन्नमतवाद्यांनी पक्षपात टाळण्याचा प्रयत्न केला, तर बहुमतवाद्यांनी उद्योगधंदा व व्यापारी मंडळी यांचे प्रत्यक्ष प्रतिनिधी मंडळावर नेमिले जाऊ नयेत, असा स्पष्ट अभिप्राय नमूद केला.

## सभासद-नेमणुकीतील पक्षपात

हिंदुस्थान सरकारच्या संरक्षक जकातीसंबंधीच्या एकंदर धोरणात १९३० सालानंतर फरक पडला असे म्हणावयास हरकत नाही. तोपावेतो चौकशी विशेष कसोशीने होऊन संरक्षण काटेकोरपणाने दिले जात असे. यापुढे धोरणात ढिलाई येऊन हिंदी भांडवलवाल्यांस विशेष सवलतीने वागविण्यात येऊ लागले, असे दिसते. जकात कमिशनमधील बहुमतवाद्यांच्याच शिफारसी मान्य झाल्यामुळे जकात-मंडळ हे तीन सरकारनियुक्त सभासदांचे बनले. या मंडळाचे पहिले सभासद म्हणजे मि. रेनी, प्रो. काळे व बॅ. जिनवाला हे होते. पहिले अनुभविक सरकारी अधिकारी, दुसरे अर्थशास्त्रज्ञ व तिसरे असेंब्लीचे एक सभासद व नावाजलेले कायदेपंडित होते. म्हणजे, बहुमतवाद्यांच्या मताप्रमाणेच मंडळाची घटना सुरू झाली, असे म्हणावयास हरकत नाही. १९३० पावेतो हाच नमुना कायम ठेवण्यात आला होता. बॅ. जिनवाला हे १९३० पावेतो मंडळाचे सभासद होते, प्रो. काळे यांच्याऐवजी अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रो. मथाय आले, व तिसरा सभासद कोणीतरी मोठा सरकारी हुद्देदार असे. १९२६ मध्ये कापूस-गिरण्यांची निराळी चौकशी झाली तेव्हा मि. नॉईस, प्रो. सुब्बाराव व श्री. कौल यांस नेमले. हेही घटनेच्या मूळ कल्पनेस धरूनच झाले. मात्र १९३० मध्ये शेट फाझल रहिमतुल्लांची बॅ. जिनवाला यांच्या जागी नेमणूक करून सरकारने प्रथम नवीन प्रथा सुरू केली. शेट फाझल रहिमतुल्ला हे पेशाने व्यापारी असून नेमणूक झाली तेव्हा त्यांचा निरनिराळ्या व्यापारी व औद्योगिक मंडळ्यांशी डिरेक्टर म्हणून संबंध होता. नेमणुकीच्या समयी ते वयानेही तरुण असून त्यांना राजकारणात किंवा इतर कोठे चौफेर अनुभव मिळविण्याची संधी प्राप्त झाली होती असेही नव्हते. यंदा जे मंडळ नेमण्यात आले आहे त्यात याच्याही पलीकडे जाऊन मंडळाच्या घटनेत पुष्कळ फरक करण्यात आला आहे. गेल्या ११ वर्षांत, एक सरकारी अधिकारी व एक अर्थशास्त्रज्ञ हे दोन प्रकारचे सभासद मंडळात असावयाचेच, असा क्रम होता; आणि स्वतंत्रपणे विचार करून निःपक्षपातबुद्धीने निकाल देणे हे या प्रकारच्या सभासदास जितके शक्य असते तितके इतरांस नसते, हे उघड आहे. नवीन जकात-मंडळातून या दोघांचेही उच्चाटन करण्यात आले आहे. तसेच नवीन मंडळात एकही अर्थशास्त्रज्ञ नसल्यामुळे या बाजूने काटेकोर विचार करणाराही कोणी उरला नाही. याच्या उलट तिघांपैकी दोन सभासद

उद्योगधंदा व व्यापार यांच्याशी निकट संबंध असलेले आहेत, व सर अलेक्झँडर मरे यांच्यासारख्या मोठ्या भांडवलवाल्या कारखानदारास व जिनीव्हा येथे हिंदी भांडवलवाल्यांचा प्रतिनिधी म्हणून गेलेल्या इसमास मंडळाचे अध्यक्ष नेमण्यात आले आहे. या सर्वच गोष्टी गैर आहेत, हे उघड आहे. लायकी पाहावी तर स्वतंत्र शास्त्रीय तज्ज्ञ कोणी नाही; व निःपक्षपाताच्या दृष्टीने विचार करावा तर तिघांपैकी दोघे, ज्या अर्जांचा विचार करावा लागणार त्यांच्याशी प्रत्यक्ष नसले तरी त्यांच्या पक्षाशी हितसंबंधाने निगडित असलेले, अशी या नवीन मंडळाची स्थिती आहे. सर जेम्स ग्रिग यांनी परवा मुंबईत केलेल्या भाषणात संरक्षक जकाती लादण्यात किती तारतम्याने विचार केला पाहिजे यावर विशेष जोर दिला, पण इकडे जकात-मंडळ तर अशा तऱ्हेचे नेमण्यात आले! यावरून जकात-कमिशनच्या मूळ अटी व कल्पना यांजकडे बुद्ध्या दुर्लक्ष करून आपल्याकडील जकातींचे धोरण दिवसेदिवस अधिकाधिक लबाडीचे होणार, असा कयास करण्यास काही हरकत दिसत नाही. नवीन राज्यघटनेतील श्रीमंतीच्या वर्चस्वाकडे लक्ष देता, याचाच विस्तार आणखी पुढेही होत राहणार हेही तितकेच स्पष्ट आहे.

*लोकशिक्षण* ६ : ३ सप्टेंबर १९३५ पृ० १६३–१६५.

☆

# ६ . . सरकारी जमाखर्चांची अंदाजपत्रके

निरनिराळ्या प्रांतिक सरकारांची व हिंदुस्थान सरकारची अंदाजपत्रके बहुधा दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात कायदेमंडळांपुढे मांडिली जातात, व या प्रसंगी बहुतेक फडणीस वार्षिक जमाखर्चाचा आढावा घेऊन आपल्या आर्थिक परिस्थितीचे समालोचन करण्याचा प्रयत्न करितात.

## आगगाड्यांच्या खात्याचे अंदाजपत्रक

काही वर्षांपूर्वीपासून हिंदुस्थानच्या सरकारी आगगाड्यांच्या खात्यांचे अंदाजपत्रक हे निराळे तयार करून मांडले जाते, व यामुळे सर्वसाधारण जमाखर्चाचा एक व आगगाड्यांचा दुसरा असे दोन हिशेब व अंदाजपत्रके मध्यवर्ती कायदेमंडळात सादर केली जातात. यंदा सादर केलेल्या सरकारी आगगाड्यांच्या हिशेबांचा विचार केला असता, चालू वर्ष (१९३५-३६) हे आगगाड्यांच्या दृष्टीने निराशाजनक असेच गेले. १९३४-३५ सालात आगगाड्यांच्या उत्पन्नात थोडी वाढ व्हावयास लागलेली आढळल्यामुळे व्यापार-मंत्र्यांनी आता व्यापाराची ओहटी कमी होऊन पुनः तो थोडा वाढीस लागला आहे असा अंदाज केला; व या अंदाजाप्रमाणे पुढील वर्षाची आवक वाढत्या प्रमाणात धरली. पण हा अंदाज सपशेल फसून १९३५-३६ ची एकंदर आवक १९३४-३५ पेक्षाही कमी होईल अशी आता स्पष्ट चिन्हे दिसू लागली आहेत. गेल्या काही वर्षांतील आगगाड्यांच्या उत्पन्नांचे ठळक आकडे खालील कोष्टकात दिले आहेत.

**सरकारी आगगाड्यांचे उत्पन्न**

| साल | वरच्या वर्गातील उतारूंपासून | वर्ग ३ च्या उतारूंपासून | मालाची वाहतूक | एकुण आवक |
|---|---|---|---|---|
| १९२५–२६ | ४,४८ | ३२,१७ | ६१,५८ | १,०६,०६ |
| १९२८–२९ | ४,४५ | ३०,८९ | ६७,७८ | १,११,१५ |
| १९३२–३३ | ३,२५ | २५,६९ | ५३,७६ | ९०,५९ |
| १९३३–३४ | ३,१५ | २४,५० | ५८,२० | ९३,०६ |
| १९३४–३५ | ३,१६ | २४,७७ | ६१,०५ | ९६,५० |
| १९३५–३६ | ३,१७ | २५,१३ | ६०,३५ | ९६,५० |
| १९३६–३७ | ३,२० | २५,३० | ६१,२५ | ९७,५९ |

(आकडे लक्ष रुपयांचे आहेत)

१९३२–३३ हे साल व्यापाराच्या दृष्टीने सर्वांत वाईट गेले, असे मानण्यास हरकत नाही. मालाच्या वाहतुकीचे उत्पन्न त्या वर्षांत अतोनात कमी झाले ते यापुढे हळूहळू वाढू लागले. उतारूंपासून येणारे उत्पन्न १९३४–३५ सालीच प्रथम काहीसे वाढले. सर्व जगभर १९३३ च्या पुढे आर्थिक व्यवहारास थोडीबहुत ऊर्जितावस्था येऊ लागली. याचाच परिणाम हिंदुस्थानातील आगगाड्यांचे उत्पन्नही थोडे वाढण्यात झाला. पण यात विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की, व्यापारी वाढीची प्रवृत्ती इतर सर्व देशांत तेव्हापासून कमीअधिक प्रमाणात सारखी चालू असता हिंदुस्थानात मात्र ती गेल्या वर्षांत थक्कलेली दिसते. १९३५–३६ च्या फेरअंदाजाप्रमाणे या सालचे उतारूंपासूनचे उत्पन्न हे १९३४–३५ सालापेक्षा जरा जास्त असेल, पण या सालच्या वाहतुकीच्या उत्पन्नात थोडीशी घट होण्याचाच संभव दिसतो. अलीकडे सर्वच देशांत मोटारवाहतुकीच्या चढाओढीचा आगगाड्यांच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे. पण हा परिणाम निदान हिंदुस्थानात तरी विशेषतः उतारूंच्या वाहतुकीवरच झालेला आढळेल. तेव्हा मालाच्या उत्पन्नाच्या घटलेल्या उत्पन्नाचे मोटर-चढाओढ हे कारण सांगता येणार नाही. त्यातल्या त्यात माल-वाहतुकीच्या उत्पन्नाचा तपशील पाहिला असता, घटीचे मुख्य कारण व्यापाराचा संकोच हेच आहे, असे कळून येईल. १९३५–३६ सालात उत्पन्न कमी झाले आहे ते मुख्यतः कापूस, पाट (ज्यूट), गळिताची धान्ये यांची वाहतूक कमी झाल्यामुळे. याचा अर्थ हाच की, शेतकी मालाचा अंतर्गत व परकी व्यापार हा वाढीस लागण्याच्या ऐवजी थोडासा कमीच झाला. फ्रान्सला होणारी भुईमुगाची निर्गत कमी झाल्याचे उदाहरण व्यापार-मंत्र्यांनी विशेष महत्त्वाचे म्हणून आपल्या भाषणात उल्लेखिले. कोळसा व इतर खनिज मालाची वाहतूक मात्र या वर्षांत कमी झालेली नाही. याप्रमाणे आगगाड्यांचे उत्पन्न वाढीस लागण्याचे काही चिन्ह नसल्यामुळे आगगाड्यांचे हिशेब तुटीचे असून घसारा इत्यादींकरिता बाजूस काढण्याच्या वार्षिक ठेवीतून कर्ज काढून तोंडमिळवणी करणे अजून अवश्य आहे.

## हिंदुस्थान सरकारचे अंदाजपत्रक

आगगाड्यांच्या कारभाराकडे पाहिले असता आर्थिक परिस्थितीचे जे चित्र दिसते त्याहून काहीसे भिन्न चित्र आपल्या भाषणात सर जेम्स ग्रिग यांनी चितारले. आपल्या अपेक्षेबाहेर आवक वाढल्यामुळे बरीच रक्कम शिल्लक राहात असल्याचे त्यांनी दाखविले व या शिल्की रकमेचा विनियोग काही करमाफीकडे आणि काही प्रांतिक सरकारांस विशिष्ट कार्याकरिता देणग्या देणे आणि संशोधन व बांधकाम यांवर विशेष खर्च करणे यांजकडे केला. हिंदुस्थान सरकारच्या फडणिसांनी एवढी शिल्लक दाखविल्याने आपली स्थिती खरोखरच सुधारत आहे की काय असे प्रथम वाटू लागते. पण जरा बारकाईने आकडे पाहिले म्हणजे ही सुधारणा बहुतांशी भ्रामक आहे असे दिसून येते. १९३४–३५, १९३५–३६ व १९३६–३७ या तिन्ही सालात बरीच शिल्लक राहणार, असे सर जेम्स ग्रिग यांनी दाखविले. पण ही शिल्लक राहण्याचे मुख्य कारण म्हणजे, वर्षारंभी फडणिसांना आपल्या उत्पन्नाचा नीटसा अंदाज करिता आला नाही हे होय. १९३५ सालच्या फेब्रुवारीत १९३४–३५ सालच्या जमाखर्चाचा अंदाज करून सर जेम्स यांनी या वर्षाअखेर ३,२७ लक्ष रुपये शिल्लक राहील असे सांगितले, तर खरी शिल्लक ४,९५ लक्ष रुपये राहिली. याच वेळेस १९३५–३६ सालचे एकंदर उत्पन्न ८२,९९ लक्ष रुपये येईल असा अंदाज केला, तर यंदा फेब्रुवारीत एकंदर उत्पन्न ८६,५२ लक्ष रुपये होईल, असा फेर-अंदाज केला आहे; आणि हे उत्पन्न व्यापारी भरभराटीमुळे वाढलेले नसून केवळ फडणिसांनी चुकीचा अंदाज केल्यामुळे फुगलेले दिसत आहे. १९३५–३६ च्या मूळ व फेर-अंदाजांतील अर्ध्याहून अधिक फरक साखरेच्या आयातीवरील जकातीमुळे पडला आहे. साखरेच्या

आयातीवरील जकात बरीच वाढली असल्यामुळे साखरेची आयात फार झपाट्याने कमी होईल व या जकातीचे उत्पन्न बसेल, अशी सर जेम्स यांनी आपली समजूत गतवर्षी करून घेतली, आणि या उत्पन्नाचा अंदाज नेहमीपेक्षा फार कमी केला. पण हा अंदाज चुकला व उत्पन्न पुष्कळ जास्त आले. याचा अर्थ आपली आर्थिक परिस्थिती सुधारत आहे असे नसून फडणिसांस अंदाज करिता येत नाहीत एवढेच. खरी परिस्थिती काय आहे हे खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

**हिंदुस्थान सरकारचे उत्पन्न**

| तपशील | १९३२-३३ | १९३३-३४ | १९३४-३५ | १९३५-३६ फेर-अंदाज | १९३६-३७ अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| करांपासून एकंदर आवक | ८०,९३ | ७४,०५ | ७९,२७ | ८१,२१ | ८०,२३ |
| जकात | ५१,९५ | ४७,१६ | ५२,६७ | ५४,७१ | ५४,८२ |
| प्राप्तीवरील कर | १७,९७ | १७,१३ | १७,५५ | १६,८० | १५,६७ |
| मीठ | १०,०७ | ८,८६ | ८,०० | ८,७० | ८,७५ |
| टपाल व तार खात्यांची आवक | १०,५५ | १०,७२ | ११,१९ | ११,४९ | ११,७४ |

(आकडे लक्ष रुपयांचे आहेत)

एकंदर आवकीच्या दृष्टीने विचार केला, तर १९३३–३४ साल हे सर्वांत हलाखीचे गेले. १९३४–३५ साली आवकीत सुधारणा दिसू लागली. परंतु या साली जकातीत दिसणारी वाढ ही सगळीच व्यापारवृद्धीपासून झालेली नाही. कारण की, एव्हाच प्रथम साखर, आगकाड्या, पोलाद यांवर अंतर्गत जकात लादली गेली. १९३४–३५ सालापेक्षा १९३५–३६ सालात फेर-अंदाजाप्रमाणे होणारी वाढ ही फार थोडीच आहे. प्राप्तीवरील कराचे उत्पन्न तर १९३५–३६ साली १९३३–३४ सालाहूनही एकंदर कमी होईल असा अंदाज आहे. मिठावरील कराचे, जकातीचे व टपालखात्याचे उत्पन्न वाढलेले आहे. निरनिराळ्या प्रकारच्या जकाती हेच हिंदुस्थान सरकारचे मुख्य कर असल्यामुळे जकातीच्या उत्पन्नातील वाढ हीच विशेष महत्त्वाची आहे. पण या वाढीचा तपशीलवार विचार करता काही विशिष्ट बाबींतच ही वाढ झाली आहे असे स्पष्ट दिसून येते. आयात मालावरील जकातीत १९३४–३५ व १९३५–३६ सालांतील उत्पन्नांत काहीच फरक आढळून येत नाही. तंबाखू, कापूस, यंत्रे, सूत, नकली रेशमी माल वगैरेचे आयातीवरील उत्पन्न वाढणार असल्याचे दिसते, तर केरोसीन, कापड यांच्या आयातीवरील उत्पन्न घटून एकंदर आवक पूर्वीचीच राहणार. मुख्य वाढ दिसून येते ती पाटाच्या निर्यातीवरील जकातीत व पेट्रोल, साखर आणि आगकाड्या यांच्यावरील अंतर्गत जकातीत. अंतर्गत जकातींच्या उत्पन्नात वाढ झाली म्हणजे आर्थिक परिस्थिती सुधारत आहे असे निश्चित म्हणता येत नाही; पाटावरील निर्यात जकातीचे उत्पन्न वाढले तरी आगगाड्यांच्या हिशेबांवरून पाटाचा एकंदर म्हणजे अंतर्गत व परकी व्यापार कमीच झाला आहे असे दिसून येते.

## प्रांतिक सरकारांची कुचंबणा

याप्रमाणे हिंदुस्थान सरकारच्या अंदाजपत्रकांची थोडीशी चाचणी केली असता आपली आर्थिक परिस्थिती सुधारत असल्याचे काहीच गमक त्यांत सापडत नाही. निरनिराळ्या प्रांतिक सरकारांची

अंदाजपत्रके पाहिली तर त्यांत जिकडेतिकडे शेतकऱ्याच्या हलाखीच्या स्थितीची रडच आढळून येते. पण आपल्याकडील हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारे यांच्या दरम्यानची जमाखर्चाच्या खात्यांची विभागणी अशी चमत्कारिक आहे की, हलाखीच्या काळातही वाढावा दाखवून भरभराटीचा देखावा हिंदुस्थान सरकारच्या फडणिसास करता येतो. आज शेतकऱ्याची स्थिती जरी अगदी निकृष्ट असली तरी व्यापार व उद्योगधंदा जरा सावरू लागला आहे. हिंदुस्थान सरकारास शेतकी परिस्थितीची झळ फक्त आगगाड्यांच्या कारभारात लागते. बाकी त्यांच्या सर्व करांचे उत्पन्न मुख्यतः व्यापार व उद्योगधंदे यांवर अवलंबून आहे. या करांचे प्रमाणही गेल्या तीनचार वर्षांत अतोनात वाढलेले आहे. तेव्हा जरा कोणताही व्यापार वाढला की हिंदुस्थान सरकारचे उत्पन्न वाढते. याच्या उलट, या सरकारावर कोणताही महत्त्वाच्या वाढत्या खर्चाचा बोजा नाही. तेव्हा जरासे उत्पन्न वाढले की, नोकरांची पगारकपात रद्द करणे आणि करांचे प्रमाण थोडे कमी करणे अथवा वाढावा प्रांतिक सरकारांत देणगीच्या रूपाने वाटून टाकणे याखेरीज मार्ग उरलेला नाही. प्रांतिक सरकरांना देणग्या देण्याचा खरा उपयोग काहीच होणे शक्य नाही. या देणग्यांची शाश्वती बिलकुल नाही, तेव्हा रक्कम आली की तात्पुरती वाटेल तशी ती चटकन खर्चून टाकली, अशीच गत या देणग्यांची होते. दोन वर्षे ग्रामोद्धाराकरिता म्हणून बऱ्याच मोठ्या रकमा प्रांतिक सरकारांस वाटण्यात येत आहेत. पण ग्रामोद्धार म्हणजे काहीएक निराळे विवक्षित खाते नाही. ज्या प्रांतिक सरकारास शिक्षण, आरोग्य, शेतकी, उद्योगधंदे वगैरे कोणत्याच खात्याची नीट वाढ व जोपासना करण्याचे बळ नाही, त्याच्या हातून एखाद्या वर्षी पांचसहा लाख रुपये मिळाले म्हणून ग्रामोद्धार कसचा होणार? त्याअर्थी जोपावेतो हल्लीची दुष्ट विभागणी बदलत नाही, तोपावेतो हिंदुस्थान सरकारने शक्य तितका कमी खर्च करून मध्यवर्ती करांचा बोजा शक्य तितका हल्का करणे हाच राष्ट्रहिताच्या दृष्टीने श्रेयस्कर मार्ग होय.

*लोकशिक्षण* ६ : ९ मार्च १९३६ पृ० ६२०-६२४.

☆

# ७ . . लँकाशायर आणि हिंदुस्थान

विलायती सुती कापडावरील जकातीचा दर योग्य आहे किंवा नाही याचा विचार करण्याकरिता हिंदुस्थान सरकारने एक खास जकात-मंडळ काही महिन्यांपूर्वी नेमिले होते. या मंडळाचा वृत्तान्त नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यास अनुसरून हिंदुस्थान सरकारने हे जकातीचे दर २५ टक्क्यांवरून २० टक्क्यांवर आणिले आहेत. खास जकात-मंडळाच्या नेमणुकीचा उगम लीज-मोदी करारात आहे. या करारान्वये, मुंबई गिरणीमालक-संघाने इंग्रजी कापडावरील जकाती ह्या इंग्रजी कापडाच्या किंमती व हिंदी कापडाच्या किमती बरोबरी करतील इतक्याच असाव्या, त्याहून जास्त असू नयेत, हे तत्त्व मान्य केले. लीज-मोदी करार १९३२ साली झाल्या वेळी जकातीचा दर २५ टक्के होता, तो तात्पुरता रास्त आहे, असे उभयपक्षी मानण्यात आले. पण १९३५ डिसेंबरच्या आत या प्रश्नाचा फेरविचार व्हावा असेही तेव्हाच ठरले. खास जकात-मंडळ हा फेरविचार करण्याकरिता नेमिले गेले होते. प्रस्तुत मंडळाकडे विचारार्थ सोपविण्यात आलेला प्रश्न हा की, हिंदुस्थानात आयात होत असलेल्या इंग्रजी कापडाची किंमत व तत्सदृश हिंदुस्थानात तयार होत असलेल्या हिंदी कापडाची किंमत या समसमान करण्याकरिता इंग्रजी कापडावर जकात किती लादावी? हे अजमावण्याचा प्रत्यक्ष मार्ग म्हणजे एकाच प्रकारच्या कापडाचा दोन्ही देशांतील उत्पादनखर्च व किंमत निश्चित करून त्यांतील फरक काय आहे, हे कापडाच्या किमतीच्या टक्केवारीत ठरवावयाचे. परंतु या वादातील दोन्ही पक्षांचे—लँकाशायर व हिंदी गिरणीमालक यांचे—असे म्हणणे पडले की हा सरळ मार्ग अवलंबणे अशक्य आहे. कारण, इंग्लंडातून हिंदुस्थानात आयात होणारा कपडा व येथे तयार होणारा कपडा, हा एकाच तऱ्हेचा कधीच नसतो. एकमेकांशी चढाओढ होण्याइतपत जरी या दोन देशांतील निरनिराळ्या प्रकारच्या कापडांत प्रत व किंमत या बाबतीत सारखेपणा असला, तरी वीण, माप व सफाई या सर्व गोष्टीत बहुतेक ठिकाणी भिन्नता असल्यामुळे एकाच्या उत्पादनखर्चाची दुसऱ्याशी प्रत्यक्ष तुलना करणे अशक्य आहे. म्हणून लँकाशायरने हिंदी गिरण्यांत निघत असलेले कापड आपणाकडे विणवून उत्पादनखर्चाचे आकडे तयार केले, व हिंदी गिरणीमालकांनी अयात होत असलेल्या इंग्रजी कापडाचा आपल्या गिरण्यांतील उत्पादनखर्च असाच अजमावून पाहिला. असे आकडे तयार झाल्या-नंतर लँकाशायरचे म्हणणे हे की, लँकाशायर व मुंबई यांमधील उत्पादनखर्चातील फरक फारच कमी आहे; याच्या उलट, आपण तयार केलेल्या आकड्यांवरून आजचा जकातीचा दरही अपुराच पडतो असे हिंदी गिरणीमालकांनी प्रतिपादिले. या दोन्ही मालकसंघांनी आपापल्या गिरण्यांतून तयार केलेल्या आकड्यांस इतर पडताळा काहीच नसल्यामुळे ते ग्राह्य धरण्याचे जकात-मंडळाने नाकारले, व उत्पादन-खर्चाची प्रत्यक्ष तुलना अडचणीची असली तरी तीच करणे अपरिहार्य आहे असा पक्ष स्वीकारिला. अशी तुलना करूनच २५ टक्क्यांवरून जकातीचा दर २० टक्क्यांवर आणिला म्हणजे किंमती समसमान

होतील, अशी जकात-मंडळाने शिफारस केली. जकात-मंडळाने तुलना करताना वापरलेले आकडे व माहिती अपुरी व असमाधानकारक आहे हे उघड आहे; परंतु मंडळापुढे टाकलेल्या प्रश्नाचे निश्चित स्वरूप पाहता त्याने स्वीकारिलेला मार्ग अयोग्यच होता असे म्हणवत नाही.

## हिंदुस्थान सरकारची घिसाडघाई

समग्र आकडेशीर माहिती तपासता आल्याशिवाय जकात-मंडळाचा निर्णय योग्य आहे किंवा नाही, हे सांगता येणार नाही; आणि हा खटाटोप करणे महत्त्वाचेही नाही. परंतु या प्रश्नाच्या मुळाशी जे एकदोन तात्त्विक मुद्दे आहेत त्यांचा विचार करणे जरूर आहे. प्रथमच ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, लीज-मोदी करार हा काही दोन सरकारांच्या दरम्यान झालेला करार नव्हे. यास रीतसर सरकारी मान्यता कधीच मिळालेली नाही. लीज साहेब हे लँकाशायरचे खरेखुरे प्रतिनिधी होते असे जरी मानले, तरी मोदीशेटजींच्या पाठीशी सर्व हिंदी गिरणीमालकवर्ग होता, असे म्हणता येत नाही. लीज-मोदी करार प्रसिद्ध झाल्याबरोबरच अहमदाबाद गिरणीमालक-संघ या मुंबई गिरणीमालक-संघाच्या जवळ जवळ समान महत्त्वाच्या संघाने प्रस्तुत कराराचा निषेध केला होता. तेव्हा सरकारी मान्यता न मिळालेल्या व हिंदी बाजूने तरी सर्वमान्य नसलेल्या कराराच्या एका कलमाची अंमलबजावणी करण्याची हिंदुस्थान सरकारने तत्परता दाखविली, हे सकृद्दर्शनी तरी चमत्कारिक दिसते. बरे, लीज-मोदी करार पाहिल्यास ब्रिटिश मालावर सवलतीच्या जकाती लादण्याचा मोबदला म्हणून लँकाशायरने काय दिले, तर हिंदी कापूस शक्य तितका जास्त विकत घेण्याचे कोरडे आश्वासन! आणि ज्याअर्थी लीज-मोदी कराराची मुदत डिसेंबर १९३५ हीच होती, त्याअर्थी आज जकाती कमी केल्यावर एवढे कोरडे आश्वासन देखील शिल्लक नाही. आपण मुद्दाम जकाती कमी केल्यावर त्यांच्या मोबदला लँकाशायरकडून अथवा ब्रिटिश सरकाराकडून काही विशेष सवलती मिळविण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकारने केलेला ऐकिवात नाही. मध्यवर्ती कायदेमंडळात ओटावा करार फेटाळला गेला असता, आणि एकंदर साम्राज्यांतर्गत सवलतीच्या जकातीचा प्रश्न निकालात निघालेला नसता, या प्रकारे एका महत्त्वाच्या ब्रिटिश मालावर जकाती कमी करण्यात हिंदुस्थान सरकारने घिसाडघाई केली, हे निःसंशय आहे.

## लँकाशायरला उघडउघड पक्षपात

यावर बऱ्याच वेळा असा युक्तिवाद करण्यात येतो की, कोणत्याही देशावरच्या आयातीवरील जकात आपल्या उद्योगधंद्यांस दिलेले संरक्षण कमी न करता जर उतरविता आली, तर त्यामुळे गिऱ्हाइकांचाच फायदा होतो व म्हणून असे करण्यात आपण परकीयांचे हित पाहात आहो असे म्हणता येत नाही. वरवर पाहता हे म्हणणे खरे वाटते; परंतु वस्तुतः यात काही तथ्य नाही. एक तर कोणत्याही देशात जेव्हा संरक्षण जकाती लादल्या जातात, तेव्हा त्या लादताना निरनिराळ्या देशांतील उत्पादनखर्च मापून त्याप्रमाणे प्रत्येक देशाच्या आयातीवर निरनिराळे जकातीचे दर लादणे हे केव्हाच शक्य नसते. हा व्यवहार्यतेचा व सोयीचा प्रश्न झाला. पण याहूनही महत्त्वाचा विचार म्हणजे देशादेशांतील स्पर्धेमुळे गिऱ्हाइकाच्या होणाऱ्या फायद्याचा. कोणत्याही एका वेळेस निरनिराळ्या देशांतील उत्पादनखर्चाच्या मानाने जकातीच्या दरांत फरक करणे, याचा अर्थ ज्या देशांतील मालाचा उत्पादनखर्च जास्त असेल त्या देशांतील मालावर जकात कमी लादणे व जेथील माल स्वस्त असेल त्यावर जबर जकाती लादणे हा होय. म्हणजे, त्यामुळे उत्पादनात जो देश ज्या मानाने कमी कार्यक्षम असेल त्यास त्या मानाने मुद्दाम सवलत दिली जाते. सार्वराष्ट्रीय व्यापारात निरनिराळ्या देशाच्या उत्पादकांची नेहमी एकमेकांशी चढाओढ

चाललेली असते. या चढाओढीमुळे माल दिवसेदिवस जास्त चांगला व स्वस्त निघत जाऊन गिऱ्हाइकांचा फायदा होतो. विशिष्ट परिस्थितीकडे लक्ष देऊन स्वदेशी कारखानदारांच्या हितार्थ त्यांस हव्या तेवढ्या संरक्षक जकाती लादणे ही एक गोष्ट झाली. पण या जकातींच्या दरांत निरनिराळ्या देशांच्या उत्पादन-खर्चाच्या मानाने फरक करणे म्हणजे देशादेशांतील चढाओढीचा फायदा आपल्या जनतेस मिळू न देण्याची योजना केल्यासारखेच होईल. जपानविरुद्ध ब्रिटिश मालास जकातीत सवलत देणे, म्हणजे जपानी मालाची ब्रिटिश मालाविरुद्ध सरशी न होईल याबद्दल खबरदारी घेणे असेच झाले. यात हिंदी गिऱ्हाइकाचा नफा होत नसून दूरवर विचार करता त्याचा तोटाच होत आहे, हे उघड आहे. तेव्हा अशी योजना आपणांस काहीही मोबदला न मिळता झाल्यास त्यात उघडउघड लँकाशायरला पक्षपात केला, असे म्हटल्यास काही वावगे नाही.

*लोकशिक्षण* ७ : १ जुलै १९३६ पृ० ६१-६३.

☆

# ८ . . हिंदी कंपन्यांची 'मॅनेजिंग एजन्सी' उर्फ व्यवस्थापक-मंडळ पद्धती

१

सर्वच गोष्टी मोठ्या प्रमाणावर व्हावयाच्या, हा आधुनिक आर्थिक युगाचा एक विशेष आहे. उत्पादन-घटक मोठे, कारखान्यात घातलेले भांडवल मोठे व कंपन्यांचे मालकही अनेक, अशी बहुतेक महत्त्वाच्या धंद्यांतील परिस्थिती आहे. भांडवल पुष्कळ लागते म्हणून ते अनेकांकडून गोळा करणे आवश्यक असते; आणि लहान लहान भाग देशभर विकून ते गोळा केले जाते. पण सार्वजनिक कंपन्यात जेवढे भाग धारण करणारे तेवढे सर्व कंपनीचे मालक. तेव्हा मालक अनेक व ते देशभर विखुरलेले, अशा परिस्थितीत कंपनीचा कारभार चालविण्याची व्यवस्था कशी लावावी हा एक महत्त्वाचा प्रश्न होऊन बसतो.

### चालक-मंडळाच्या हातांतील सत्ता

प्रातिनिधिक लोकशाहीच्या तत्त्वानुसारच या सार्वजनिक कंपन्यांचा कारभार चालवावा, अशी सर्वसाधारण कल्पना बांधता येते; व इंग्लंडमधील सार्वजनिक कंपन्यांच्या कारभाराची घटना अशाच प्रकारची असते. सर्व भागदारांची प्रतिवार्षिक सभा होते. तीत चालक (Directors) मंडळाची अंशतः अथवा पूर्णपणे निवडणूक-फेरनिवडणूक होते. या वार्षिक सभेतच कंपनीचा ताळेबंद मंजूर होऊन नफ्याची योग्य ती विल्हेवाट लाविली जाते. अर्थात ही तात्त्विक कल्पना झाली. खरोखरच पाहता या वार्षिक सभेस फार थोडे भागदार हजर असतात, व चालक-मंडळाच्याच हातात सर्व खरी सत्ता असून तेच आपल्या मताप्रमाणे सर्व कारभार चालवितात. कंपनीच्या कल्पनेचे उत्पादक आणि सुरुवातीस भांडवल जमविण्याकरिता खटपट करणारे यांतूनच चालक-मंडळ प्रथम बनते, व भागांच्या मालकीत अथवा कंपनीच्या अंतःस्थ कारभारामुळे मुख्य चालक-मंडळाच्या हातात व परंपरेतच कंपनीची व्यवस्था चालू राहते. ही इंग्लंडातील वस्तुस्थिती झाली. यात लक्षात घेण्याजोगी गोष्ट ही की, तत्त्वतः सर्व सत्ता भागदारांच्या हाती असते आणि वस्तुतः चालक-मडळातील प्रमुख लोक ती गाजवितात.

आपल्या देशात मर्यादित जोखमीच्या सार्वजनिक कंपन्या निघाल्या त्या प्रथम इंग्रजांनी काढल्या, व सार्वजनिक कंपन्यांविषयीचा हिंदी कायदा प्रायः इंग्रज कायद्याप्रमाणेच बनत गेलेला आहे. परंतु प्रथम-पासूनच आपल्याकडील सार्वजनिक कंपन्यांच्या कार्यपद्धतीचे स्वरूप इतर देशांतील पद्धतीहून अगदी भिन्न असे झाले, व या भिन्न घटनेचाच विचार करण्याचे प्रस्तुत लेखात योजिले आहे. कंपनीच्या कारभारात भागदार व चालक-मंडळ यांहून निराळाच असा व्यवस्थापक अथवा व्यवस्थापक-मंडळ आपल्या देशात आढळून येते व या व्यवस्थापक-मंडळाच्या पद्धतीमुळे एकंदर सार्वजनिक कंपन्यांच्या कार्य-पद्धतीत आपल्याकडे काही विशिष्ट प्रकार आढळून येतात व काही विशिष्ट प्रश्न उद्भवतात. व्यवस्थापक

पद्धतीतील मुख्य विशेष हा की, यामुळे भागदार व चालक-मंडळ या दोहोंचेही अधिकार कमी होऊन कंपनीवरील बहुतेक सत्ता व्यवस्थापकांच्या हातीच केंद्रीभूत होते. व्यवस्थापक हे कंपनीच्या उत्पादकांचे वंशज किंवा कालांतराने उत्पादकांचे अधिकार प्राप्त झालेले असे कोणीतरी असतात. कंपनीच्या सुरुवातीस कंपनी व व्यवस्थापक यांजमध्ये करारमदार होऊन व्यवस्थापकांचे हक्क ठरलेले असतात. बहुतेक ठिकाणी या करारान्वये कंपनीचा जवळजवळ सर्व कारभार चालविण्याची सत्ता लांब मुदतीने किंवा कायमची व्यवस्थापकांकडे दिलेली असते. व्यवस्थापकांस मिळणारा खर्च, वेतन वगैरेही करारान्वयेच ठरविले जाते. हा करार प्रथमच होऊन गेला असल्यामुळे भागदारांस व्यवस्थापकांना कारभारावरून दूर करणे बहुतांशी शक्य नसते; व इंग्लंडांतल्याप्रमाणे चालक-मंडळ जरी निवडले अथवा नेमिले गेले, तरी या चालक-मंडळावरही या कारभाराचा बोजा किंवा त्याबद्दलची जबाबदारी नसते. एकंदर मूळ कराराबरहुकूम बहुतेक सर्व अंतर्गत व्यवस्था व्यवस्थापकाकडे सोपविलेली असल्यामुळे त्यात ढवळाढवळ करण्याचा चालक-मंडळास काही हक्क नसतो, आणि दुसरे असे की, चालक-मंडळावर काही सभासद नेमण्याचा हक्क व्यवस्थापकांस असून शिवाय व्यवस्थापक स्वतः भागदार या नात्याने चालक-मंडळाच्या निवडणुकीत प्रामुख्याने भाग घेतात. तेव्हा चालक-मंडळ हे व्यवस्थापकांच्या विरुद्ध जाईल किंवा त्यांच्या कारभारात विशेष ढवळाढवळ करील, अशी कधी भीती नसते. एकंदर चालक-मंडळ हे खरोखर इंग्लंडमधल्याप्रमाणे कारभारी-मंडळ नसून ते आपल्याकडे केवळ सल्लागार-मंडळ अथवा देखरेख-मंडळ असते, आणि तेही नामतःच.

## व्यवस्थापक पद्धतीचा उद्गम

व्यवस्थापक म्हणून कोणी निराळे असण्याची पद्धती हिंदुस्थानात उद्भवण्याचे कारण काय व या पद्धतीचे परिणाम औद्योगिक घटनेवर काय घडून येतात हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. हिंदुस्थानात व्यवस्थापक पद्धतीचा उगम अर्वाचीन भांडवलशाहीच्या उगमाप्रमाणेच बंगाल्यात ब्रिटिश भांडवलवाल्यांत झाला. याची कारणमीमांसा आज लावण्यात येते ती अशी : पाटाच्या गिरण्या, कोळशाच्या खाणी किंवा चहाचे मळे हे सर्व प्रथम हिंदुस्थानात ब्रिटिश भांडवलाच्या जोरावर निघाले. हे भांडवल ब्रिटिश सार्वजनिक कंपन्यांना ब्रिटिश लोकांनी पुरविलेले असे. परंतु त्या काळात येथे भांडवल जरी मुबलक आले तरी ब्रिटिश व्यापारीमंडळी अशी केव्हाही थोडीच असे. या सर्व कंपन्या इंग्लंडमध्ये नोंदल्या गेलेल्या असत आणि तेथे त्यांचे रीतसर चालक-मंडळ असे. पण त्या चालक-मंडळास येथील कारभारावर देखरेख ठेवणे हे निदान त्या काळी तरी अशक्यप्राय होते. बरे, हिंदुस्थानात असणारी ब्रिटिश व्यापारी मंडळी ही अगदी मूठभर असल्यामुळे या निरनिराळ्या कारभारावर लक्ष ठेवण्याकरिता त्यांची हिंदुस्थानात चालक-मंडळे करणे हेही अशक्य होते. तेव्हा या ब्रिटिश कंपन्यांस आपला येथील सर्व प्रत्यक्ष कारभार एखाद्या व्यवस्थापकावर पूर्णपणे सोपविणे अपरिहार्य असे. ब्रिटिश कंपन्यांसंबंधी तरी ही सुरुवातीची परिस्थिती बहुतांशी आजही बदललेली नाही. तेव्हा त्यांचा सर्व कारभार या व्यवस्थापकांमार्फत चालतो. यांतील काही व्यवस्थापक (आता त्या व्यवस्थापक कंपन्या झाल्या आहेत) फार जुने असून त्यांच्या हाती निरनिराळ्या अनेक सार्वजनिक कंपन्यांचा कारभार आहे. नवीन व्यवहार हाती घेणे व नवीन कंपन्या उभारणे हा या व्यवस्थापक कंपन्यांचा उद्योग सारखा चाललेला असतो व आपण नवीन उभारलेल्या कंपन्या व आपल्या ताब्यात आलेल्या जुन्या कंपन्या यांचे व्यवस्थापक म्हणून या व्यवस्थापक कंपन्या स्वतःस नेमून घेत असतात. या व्यवस्थापक कंपन्यांच्या पतीमुळे त्यांनी नवीन काढलेल्या कंपन्यांसही भांडवल मिळण्यास काही प्रयास पडत नाहीत. या व्यवस्थापक कंपन्यांच्या विस्ताराची थोडीशी कल्पना श्री लोकनाथन् यांच्या उत्कृष्ट पुस्तकावरून

घेतलेल्या खालील तपशिलावरून येईल. काही प्रमुख व्यवस्थापक कंपन्या किती व कोणत्या प्रकारच्या कंपन्या चालवितात हे दर्शविणारा तक्ता येणेप्रमाणे :

| व्यवस्थापक कंपनीचे नाव | एकंदर कंपन्या | पाट गिरण्या | चहाचे मळे | कोळशाच्या खाणी | रेल्वे इ. | वीज व एंजिनियरिंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अँड्र्यू यूल आणि कं | ५४ | १० | १८ | १४ | ३ | — | ९ |
| डंकन ब्रदर्स आणि कं. | २५ | १ | २४ | — | — | — | — |
| मार्टिन आणि कं. | २२ | — | — | ७ | ८ | ६ | १ |
| ऑक्टेव्हियस स्टील कं. | २० | — | १३ | १ | १ | ५ | — |
| ग्रेग्, डनलॉप आणि कं. | १९ | ४ | १३ | — | — | १ | २ |
| बर्ड आणि कं. | २० | ८ | — | ३ | ५ | २ | २ |

पूर्व हिंदुस्थानातील सर्व औद्योगिक वाढ ब्रिटिश भांडवलवाल्यांनीच केलेली आहे व तेथील सर्व उद्योगधंदे आजतागायत बहुतांशी ब्रिटिशांच्याच हातांत आहेत. इकडील धंद्यांत असलेल्या स्थैर्याचे व सुसंघटितपणाचे श्रेय बहुतांशी या मोठमोठ्या ब्रिटिश व्यवस्थापक कंपन्यांसच देणे रास्त आहे.

## व्यवस्थापक पद्धतीचे हिंदी भांडवलदारांकडून अनुकरण

पश्चिम हिंदुस्थानातील परिस्थिती मात्र याच्या उलट आहे. पश्चिम हिंदुस्थानात झालेली औद्योगिक वाढ स्वदेशी भांडवलवाल्यांच्या प्रयत्नांमुळेच झाली; व पश्चिम भागात ब्रिटिश भांडवलवाल्यांच्या हातांत असलेल्या कंपन्या अगदी थोड्या आहेत. खरे पाहता व्यवस्थापक म्हणून निराळी योजना करण्याचे या हिंदी भांडवलवाल्या कंपन्यांस अगदीच प्रयोजन नव्हते. परंतु हिंदुस्थानात व्यवस्थापक अथवा व्यवस्थापक कंपन्यांचा प्रसार पूर्व भागात जितका आहे तेवढाच पश्चिम भागात आहे; व आज जे बिकट प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यांचे मूळ बहुतांशी पश्चिम भागातील व्यवस्थापकांच्या कारभारातच आहे. मुंबईस व्यवस्थापक पद्धती येण्याचे मुख्य कारण ती कलकत्त्यास पूर्वी होती एवढेच दिसते. इकडे जेव्हा सार्वजनिक कंपन्यांचा कारभार प्रथम सुरू झाला, तेव्हा त्याची घटना आपल्या देशात इतरत्र पूर्वीच प्रचलित असलेल्या पद्धतीप्रमाणे व्हावी हे साहजिकच होते. प्रथम प्रथम जे उद्योगधंदे निघाले ते एखाद्दुसऱ्या मोठ्या व्यापाऱ्याने किंवा काही थोड्याजणांनी मिळून भागीने असे काढले. पुढे त्यांचे सार्वजनिक कंपनीत रूपांतर झाले तेव्हा चालक-मंडळ निवडून कंपनीचा सर्व कारभार त्यांजकडे व भागदारांकडे सुपूर्त न करिता तो आपणांकडे व्यवस्थापक म्हणून राखून ठेवणे, हे केव्हाही कंपनीच्या संस्थापकांस श्रेयस्कर वाटणार. बरे, देशात हीच पद्धती प्रथम चालू असल्यामुळे इकडच्या कंपन्यांच्या संस्थापकांनी ती स्वीकारण्यात विशेष चलाखी किंवा लबाडी केली, असेही म्हणता येत नाही. परंतु एकदा व्यवस्थापकांकडे कारभार सोपविण्याची पद्धती पडल्यानंतर ती बदलणे, हे इकडील भांडवलवाल्यांसही हितावह न वाटावे हे साहजिकच होते. व्यवस्थापक पद्धती उत्पादकांच्या व संस्थापकांच्या फायद्याची हे उघड आहे. त्या कारणाने नवीन कंपन्या निघताना जिकडेतिकडे तिचाच स्वीकार होत गेला, यात नवल नाही. एवढे मात्र लक्षात ठेविले पाहिजे की, मुंबईत या पद्धतीचा स्वीकार झाला नसता तरी प्रथमपासून चालण्यासारखे होते. हिंदी भागदार हे ब्रिटिश भागदारांप्रमाणे हजारो मैल दूर नव्हते. हिंदी कंपन्यांचे मुख्य ठिकाणही देशातल्या देशातच होते. ब्रिटिश कंपन्यांस व्यवहारज्ञ ब्रिटिश व्यापाऱ्याची चालक म्हणून काम करण्यास जशी वाण भासत होती, तशी ती हिंदी कंपन्यांस वाटण्याचे काही कारण

नव्हते. धूर्त व व्यवहारज्ञ भांडवलवाले मुंबईत हवे तितके होते. १८६०-६६ च्या दरम्यान मुंबईतील व्यापाऱ्यांनी केलेल्या अचाट उलाढालींचा व सट्टेबाजीचा इतिहास पाहिला म्हणजे या विधानाची यथार्थता लक्षात येईल.

येथे एक गोष्ट नमूद करणे जरूर आहे, ती ही की, आपल्याकडे आधुनिक पद्धतीच्या पेढ्यांची (Banking) उशिरा झालेली वाढ हे मुंबईसही व्यवस्थापकांची पद्धती जारी होण्याचे म्हणून एक निराळे कारण सांगितले जाते. एखाद्या इसमाने अथवा खाजगी मंडळीने व्यवहार केला तर त्यास वेळोवेळी लागणारे भांडवल ते आपल्या पतीवर किंवा मालमत्तेच्या तारणावर उभारतात. सार्वजनिक कंपन्याच्या बाबतीत असे व्हावयास पाहिजे व बहुतेक देशांत होतेही. पण हिंदुस्थानात सार्वजनिक कंपन्या जेव्हा नव्याने निघाल्या तेव्हा नवीन पद्धतीच्या पेढ्या देशात अगदी थोड्या होत्या; आणि ज्या काही होत्या त्या परकीय असून त्या हिंदी सार्वजनिक कंपन्यांस भांडवल पुरविण्यास तयार नव्हत्या. तेव्हा या एकंदर कंपन्यांस लागणारे खेळते भांडवल त्यांस जुन्या पद्धतीने व्यवहार करणारे सावकार व पेढ्या यांजपासूनच घेणे प्राप्त होते. पण या एतद्देशीय पेढ्यांस सार्वजनिक कंपन्यांच्या व्यवहाराची माहिती नसून त्यांच्या स्थैर्याबद्दल किंवा पतीबद्दल खात्री वाटत नसे. यामुळे सार्वजनिक कंपन्यांकरिता जे कर्ज काढावयाचे ते कोणा तरी वजनदार व्यक्तीच्या किंवा पेढीच्या नावावरच काढावे लागे. अर्थात कंपनीचे व्यवस्थापक हे बहुधा वजनदार असामी असत व ते स्वतःच्या नावावरच आपल्या व्यवस्थेखाली असलेल्या कंपन्यांस कर्ज मिळवून देत. म्हणून सार्वजनिक कंपन्यांना जोपावेतो प्रत्यक्ष कर्ज मिळणे शक्य नव्हते, तोपावेतो त्यांस व्यवस्थापकांचा आसरा धरण्याशिवाय गत्यंतर नव्हते. व्यवस्थापक पद्धती निघून ती टिकण्यास ही कर्ज मिळण्याची अडचण किती कारणीभूत झाली हे सांगणे कठीण आहे. व्यवस्थापक हे स्वतः मूळ व्यापारात पैसा कमावलेले आणि व्यापारात दुसऱ्यांचा पैसा घेऊन गुंतविणारे असत. यांपैकी काहींच्या पेढ्यांवर बऱ्याच ठेवी लांब मुदतीने ठेविल्या जात. तेव्हा त्यांस स्वतःस आपल्या कंपन्यांस कर्ज देणे शक्य असे. अशा रीतीने व्यवस्थापकांस कंपन्यांना कर्ज देण्याची अनुकूलता असली, तरी व्यवस्थापक पद्धती नसती तर सार्वजनिक कंपन्यांस हळूहळू माल वगैरेच्या तारणावर जुन्या पेढ्यांकडून कर्ज मिळू शकले नसते, असे वाटत नाही. परंतु एकदा मालाच्या तारणा-शिवाय व्यवस्थापकाची सही गुंतवावयाची प्रथा पडल्यावर ती पेढ्या सोडीनात, आणि सार्वजनिक कंपन्यांस व्यवस्थापकाच्या ओंजळीने पाणी नेहमीच पीत राहावे लागले. यात विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट ही आहे की, अलीकडे दहाबारा वर्षे काही व्यवस्थापकांच्या पतीविषयीच बँकांस शंका येऊ लागल्यामुळे मुंबईस तरी प्रत्यक्ष कंपन्यांसच कर्ज देण्याची वहिवाट बँकांनी सुरू केली आहे.

## व्यवस्थापक मंडळांची व्यापारी दृष्टी

आणखी एका गोष्टीचा थोडक्यात निर्देश केला पाहिजे. गिरण्या वगैरे नवीन यांत्रिक उद्योगधंदे ज्या एतद्देशियांनी सुरू केले ते बहुतेक मूळचे व्यापारी, सराफ किंवा सावकार होते. मालाची देवघेव किंवा पैशाचा व्यवहार यांत पिढ्यानपिढ्या मुरलेल्या जातींनीच आपले भांडवल या नवीन धंद्यांत घातले. जुन्या पद्धतीचे कारखानदार किंवा कारागीर या नव्या मंडळीत कोणी नव्हते. यांस पार्शी हे अपवाद समजा-वयाचे. हे लोक केवळ व्यापारी नसून यांपैकी काहींनी जहाजे बांधणे इत्यादी नवीन धंद्यांत बरीच प्रगती केलेली होती. बाकी भाटिया, वाणी, खोजे, बोहरी हे सर्व लोक कोणत्याही व्यवहाराकडे व्यापारी अथवा सराफी दृष्टीनेच पाहणारे होते. उत्पादनकौशल्य व उत्पादनसौकर्य यांकडे त्यांचे लक्ष नसून व्यापारी फायद्याकडे होते. याचा परिणाम असा झाला की, प्रथमपासूनच हिंदी उद्योगधंदे हे उत्पादन-सामग्री व पद्धती यासंबंधी अप्रगतिपर राहिले. सार्वजनिक कंपन्या ज्या काढल्या त्या सर्व व्यापारी व

सावकारी परंपरेतील शर्तींनी काढल्या. हे प्रमुख भांडवलवाले म्हणून त्यांजकडेच त्या व्यवस्थेकरिता राहिल्या. व्यवस्थापक म्हणून त्यांचा नेहमीचा ताबा कंपन्यांवर राहिल्यामुळे इतर कोणाचा शिरकाव या धंद्यांच्या चालक-मंडळांत होऊ शकला नाही; आणि यांचा डोळा व्यवस्थापक म्हणून व्यापारी फायद्यावर सारखा असावयाचा. व्यापारी उलाढाली, सट्टेबाजी व कमिशने यांकडे विशेष लक्ष राहिल्यामुळे आपल्या गिरण्या किंवा कारखाने उत्पादनक्षम करणे ह्या महत्त्वाच्या प्रश्नाची उपेक्षा झाली. हिंदुस्थानात कापडाच्या गिरण्या जपानच्या पूर्वी कितीतरी वर्षे निघाल्या. परंतु यंत्रसामग्री वगैरे बाबतीत जपान्यांची सुधारणा-प्रवृत्ती सारखी दिसून आली व येत आहे, तर हिंदी गिरण्यांनी परकी (इंग्रज म्हणा, जपानी म्हणा) यंत्रसामग्री जशीच्या तशी विकत घेण्यापलीकडे काहीच कधी केले नाही. व्यापारी किंवा सराफी वृत्तीची ही पकड आमच्या उद्योगधंद्यांवर कायमची बसण्याचे एक कारण व्यवस्थापक पद्धती हे निश्चित आहे.

## व्यवस्थापक पद्धती व एकसूत्रीकरण

व्यवस्थापक पद्धतीचे काही म्हणण्याजोगे फायदे आहेत किंवा काय? हिंदुस्थानच्या पूर्वभागासंबंधी बोलावयाचे म्हणजे, ब्रिटिश भांडवलवाल्यांस या किंवा अशा काही तरी इतर व्यवस्थेपेक्षा दुसरी व्यवस्था करणेच शक्य नव्हते हे उघड आहे. पण यापलीकडे या पद्धतीने अमुक काही विशेष साधले असे म्हणता येत नाही. व्यवस्थापक पद्धतीमुळे खेळत्या भांडवलाचा पुरवठा सार्वजनिक कंपन्यांस होऊ शकला, या मुद्द्याचा विचार वर केलेलाच आहे. शिवाय असेही म्हणतात की, एकाच व्यवस्थापक कंपनीच्या हातांत बऱ्याच गिरण्या किंवा कारखाने असल्यामुळे मालाची खरेदी-विक्री आणि एकंदर व्यवस्था यांसंबंधी खर्चात बचत होते, व मंदीच्या काळात या मोठ्या व्यवस्थापक कंपन्या आपल्या ताब्यातील सार्वजनिक कंपन्यांस लागेल ती मदत करून त्यांस तगवितात. या दोन्ही मुद्द्यांचा विचार एकेच ठिकाणी करता येईल. यातील अर्थ एवढाच की, व्यवस्थापक कंपनीच्या पद्धतीमुळे जरी निरनिराळ्या सार्वजनिक कंपन्या सकृद्दर्शनी वेगळ्या दिसल्या, तरी एकाच व्यवस्थापकाच्या हातांतील कंपन्यांचा एक गट होऊन सबंध गटाचा कारभार एकत्रित चालविता येतो. साधारणपणे गट जेवढा मोठा असेल त्या मानाने गटाची कार्यक्षमता आणि त्याचे आर्थिक बल वाढते व आपला खर्च कमी करणे किंवा आर्थिक संकटांस तोंड देणे हे त्यांस साधते. परंतु हा फायदा जो उद्भवतो तो व्यवस्थापक पद्धतीने उद्भवतो असे नाही. त्याचे कारण निरनिराळ्या व्यवहारांचे एकसूत्रीकरण हे होय. असे एकाच किंवा अनेक धंद्यांतील बऱ्याच घटकांचे एकसूत्रीकरण प्रत्येक देशात घडून आलेले आहे. आपल्या देशात हे एकसूत्रीकरण व्यवस्थापकांच्या द्वारा अप्रत्यक्षपणे घडून येते तर इतर देशांत ते प्रत्यक्ष कंपन्याकंपन्यांतच होते. हरएक देशातील या प्रवृत्तीचे प्रकार व परिणाम यांत फरक आढळून येतातच. आमचा मुद्दा एवढाच की, या प्रवृत्तीचा व तिजमुळे झालेल्या नफातोट्याचा व्यवस्थापक पद्धतीशी काही संबंध नाही. ही पद्धत नसती तरी एकसूत्रीकरण जेथे जेथे परिस्थिती अनुकूल आहे तेथे तेथे हिंदुस्थानातही घडून आले असते. बरे, हिंदुस्थानातही जे विशेष एकसूत्रीकरण आज झालेले आहे, ते वर दर्शविलेल्या पूर्व भागातील ब्रिटिश व्यवस्थापकांच्या हातांतच. पश्चिम हिंदुस्थानात ही प्रवृत्ती अत्यल्प प्रमाणात दिसून येते. श्री लोकनाथन् यांनी आपल्या पुस्तकातील तक्त्यात एकंदर २९ व्यवस्थापक कंपन्यांचा समावेश केला आहे, त्यांतील फक्त पाचच पश्चिम भागातील आहेत. या पाचांतही एतद्देशीय दोनच—करीमभाई इब्राहिम आणि कं० व ताता आणि कं०. इब्राहिम करीमभाई यांच्या व्यवस्थेखाली १४ व तातांच्या व्यवस्थेखाली १३ कंपन्या दाखविल्या आहेत. आता करीमभाई इब्राहिम आणि कं० चे दिवाळे निघाल्यामुळे त्यांच्या ताब्यातील गिरण्याही पांगल्या गेल्या आहेत. अहमदाबादच्या गिरण्यांत विशेष मोठा गट असा कोणाच्याच हातांत नाही. मुंबईसही सासून, ब्रॅडी असे नाव घेण्यासारखे

अगदी थोडे गट आहेत. यावरून एकसूत्रीकरण व व्यवस्थापक पद्धती यांचा काही परस्परसंबंध नाही, हे स्पष्ट दिसून येईल.*

## २

### पूर्व व पश्चिम हिंदुस्थानांतील फरक

व्यवस्थापक पद्धतीच्या सुरुवातीस तिचे दुष्परिणाम फारसे दिसून आले नाहीत याची कारणे अनेक होती. एक तर या काळात व्यवस्थापक स्वतःच आपण काढत असलेल्या सार्वजनिक कंपनीचे बरेच भाग विकत घेत. सार्वजनिक कंपन्या किफायतशीर होतील या अपेक्षेने हे भाग ते आपणांकडे ठेवीत. शिवाय सार्वजनिक कंपन्यांचे भाग खपविणे हे आजच्याइतके त्या काळात सोपेही नव्हते. खुद्द व्यवस्थापकच कंपनीचे प्रमुख भागदार असल्यामुळे कंपनीस फायदा होणे हे व्यवस्थापकांच्या हिताचेच असे. कंपन्यांचे उत्पादक व संस्थापक हे काही झाले तरी कर्तबगार व धडाडीचे असत आणि आपण काढलेली कंपनी यशस्वी करून दाखविण्याची त्यांच्या मनात ईर्ष्या असे. शिवाय या जुन्या काळात एकंदर भांडवल अपुरे असून ते चटकन मिळविण्याची सवडही नव्हती, त्यामुळे सार्वजनिक कंपन्यांस व्यवस्थापकांचा प्रत्यक्ष उपयोग बराच होता. कालांतराने या सर्वच परिस्थितीत पुष्कळ बदल झाला. निरनिराळ्या कारणांमुळे कंपन्यांतील मूळचे सर्व भाग व्यवस्थापकांकडे राहिले नाहीत व जसजसे वेळोवेळी कंपनीचे भांडवल वाढविले गेले, तसतसा दर वेळेस व्यवस्थापकांनी नवीन भागांपैकी मोठा हिस्सा विकत घेतला असेही झाले नाही. सारांश, सुरुवातीस व्यवस्थापक हे कंपनीचे जसे प्रमुख भागदार असत तसे ते पुढे राहिले नाहीत, व यामुळे कंपनीचे हित व व्यवस्थापकांचे हित यांचा जो एके काळी निकट संबंध होता तो टिकला नाही. तसेच कंपनीच्या मूळ संस्थापकांची पिढी गेल्यानंतर त्यांच्या दुसऱ्या पिढीतील कार्यकारी माणसे तशीच कर्तबगार निपजतील याची काहीच खात्री नसते. या बाबतीतही पूर्व व पश्चिम हिंदुस्थानांतील फरक लक्षात घेण्याजोगा आहे. कलकत्त्याच्या ब्रिटिश व्यवस्थापक कंपन्यांतील परंपरा संस्थापकाच्या वंशजांच्या हातातच कारभार राहावा अशी नाही. बऱ्याच वेळा संस्थापकाचे वारस हिंदुस्थानात येऊ चाहत नाहीत व कंपनीतील चलाख अधिकाऱ्यांपैकीच माणसे पातीत घेऊन कारभार चालू ठेवावयाचा, अशी तिकडील परंपरा आहे. तेव्हा कंपनीचे नाव 'जार्डिन व स्किनर' पण आज व्यवस्थापकांत जार्डिन किंवा स्किनर एकही नाही, अशी परिस्थिती असू शकते. एतद्देशियांत मात्र कारभाराची सूत्रे वंशपरंपरा चालू राहण्याचा आग्रह फार. यामुळे मूळ व्यवस्थापक नेमताना जरी कर्तबगार माणसे कंपन्यांस लाभली तरी त्यांची परंपरा टिकली नाही. अगदी शहाजोग कंपन्या दुसऱ्या पिढीतील कर्तृत्वशून्य माणसांच्या हाती गेल्यामुळे डबघाईस आल्याची उदाहरणे कितीतरी दाखविता येतील. कर्जाऊ लागणाऱ्या भांडवलाबद्दलही परिस्थिती बदलली. सांप्रत सार्वजनिक कंपन्यांस कर्ज मिळण्यास पूर्वीइतक्या अडचणी भासत नाहीत; व बऱ्याच वेळा व्यवस्थापकांनी कंपन्यांस कर्ज देण्याच्या ऐवजी ते स्वतःच कंपन्यांकडून कर्ज घेतात असे आढळते.

### व्यवस्थापक पद्धतीची कालबाह्यता

आज एतद्देशीय कंपन्यांविषयी असे हमखास म्हणता येते की, व्यवस्थापक पद्धतीची जरुरी काहीएक उरलेली नाही. पण कंपनीच्या उत्पादकांस व्यवस्थापक म्हणून आपणांस अधिकार मिळविण्याची

* *लोकशिक्षण* ७ : १ ऑगस्ट १९३३ पृ० ११८-१२४.

लागलेली चटक सोडविणे कठीण आहे. व्यवस्थापक कोठेच नसावेत, अशा तऱ्हेची सरसकट बंदी केवळ कायद्याने करणे अव्यवहार्य वाटते. तेव्हा व्यवस्थापक पद्धतीचे नियंत्रण तरी व्हावे, अशी ओरड आज बरीच वर्षे चालू आहे. या चळवळीत मुंबई भागदारमंडळ (Bombay Shareholders' Association) याने प्रामुख्याने भाग घेतला. व्यवस्थापक पद्धतीत आज पुढील दोष ठळक प्रमाणात आढळतात: व्यवस्थापकांचे कंपन्यांशी झालेले बहुतेक करार अशा प्रकारचे असतात की, कंपनीच्या भागदारांस अथवा चालक-मंडळास व्यवस्थापकास व्यवस्थापकत्वावरून सहसा दूर करता येत नाही. बहुतेक करार लांब मुदतीचे असून ही मुदत संपल्यावर कंपनीची दुसरी व्यवस्था लावणे हे भागदारांच्या प्रचंड बहुमताशिवाय होऊ नये, अशी सोय केलेली असते. काही करारांत तर वंशपरंपरा कायम व्यवस्था आपणाकडे व्यवस्थापकाने राखून ठेविलेली असते. व्यवस्थापक, व्यवस्थापक मंडळ, व्यवस्थापक कंपनी यांत कोणताही फरक घडून आला तरी कंपनीस काही करता येत नाही. व्यवस्था कितीही नादान झाली तरी कंपनीस ढवळाढवळ करण्याचा हक्क नसतो. इतकेच नव्हे, तर व्यवस्थापकास आपले हक्क दुसऱ्या कोणासही कंपनीच्या सल्ल्याशिवाय विकून टाकता येतात. करीमभाई इब्राहिम कं० च्या दिवाळ्यामुळे त्यांच्या व्यवस्थापकत्वाचे हक्क त्यांच्या निरनिराळ्या ऋणकोंच्या हातांत गेलेले आहेत. सुरुवातीस जरी कंपनीच्या व्यवस्थापकाच्या सचोटीकडे किंवा कर्तृत्वाकडे बघून लोकांनी तिचे भाग घेतले, तरी हल्लीच्या व्यवस्थापकांच्या ऐवजी पुढे केव्हा, कोण व कसा येईल याची काहीच शाश्वती नसते व याविषयी भागदारांस काही विचारण्यातही येत नाही. हा एक मुद्दा झाला. दुसरा मुद्दा व्यवस्थापकाचे वेतन व नफा यांबद्दलचा. वर दर्शविल्याप्रमाणे व्यवस्थापक हे कंपनीचे जोपावेतो प्रमुख भागदार आहेत, तोपावेतो दोघांच्या हितांत तफावत पडत नाही. परंतु कंपनीचे थोडे भाग जर व्यवस्थापकाच्या मालकीचे राहिले तर कंपनीस फायदा थोडा झाला अथवा तोटाही झाला, तरी व्यवस्थापकास काळजी करण्याचे कारण नसते. त्याचा मुख्य रोख आपणास व्यवस्थापक म्हणून मिळणाऱ्या उत्पन्नावर राहतो. हे उत्पन्न निरनिराळ्या प्रकाराने निश्चित केले जाते. जुन्या बऱ्याचशा करारांत हे उत्पादनावर ठरविलेले असते. कारखान्याचे उत्पादन जसे वाढेल तसे हे उत्पन्न वाढते. याचा उघड परिणाम असा होता की, व्यवस्थापकाची दृष्टी फायदेशीर उत्पादन करण्याकडे न राहता केवळ उत्पादनाची कमाल मर्यादा गाठण्याकडे राहते. मंदीच्या दिवसांतही मुंबईस व इतर ठिकाणी कापडाच्या गिरण्यांचे उत्पादन फारसे कमी होत नाही, याचे हे एक महत्त्वाचे कारण समजले जाते. याशिवाय व्यवस्थापकास मिळकतीचे अनेक मार्ग—फायदेशीर आणि बेकायदेशीर—मोकळे असतात. मालाची खरेदीविक्री, विमा उतरणे वगैरे सर्व प्रकारचे व्यवहार केवळ व्यवस्थापकांत सार्वत्रिक आहेत, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. आरंभीच्या यंत्रसामग्रीवरील दलालीपासून तो नेहमीचा विमा, कच्चामालखरेदी ते पक्कामालविक्रीपावेतो दलाली व्यवस्थापकांच्या पदरात सारखी पडत असते. सर्व व्यवहारांत वशिलेबाजीस भरपूर वाव असतो, आणि बऱ्याच ठिकाणी व्यवहार या प्रकारचा होतोही. कंपनी जेमतेम चालू ठेविली तरी व्यवस्थापकास पुरे असते. व्यवस्थापक पद्धतीचे काही चाहते असे म्हणतात की, मंदीच्या दिवसांत व्यवस्थापक आपले वेतन न घेता कंपन्या चालवितात हा त्यांचा मोठेपणा आहे; आणि असे व्यवस्थापक कंपन्यांस लाभतात म्हणून त्या टिकून राहतात. थोडा विचार केला असता या म्हणण्यात काही अर्थ नाही हे दिसून येईल. मुंबईच्या गिरण्यांचे काही व्यवस्थापक जे वेतन गिरण्यांकडून तोटा झाला असता घेत नाहीत, ते केवळ उत्पादनावर किंवा नफ्यावर ठरलेल्या टक्केवारीच्या प्रमाणाबर-हुकूमचे वेतन होय. पण बहुतेक व्यवस्थापकांच्या उत्पन्नाचा मोठा भाग खरेदी-विक्री इत्यादींवरील दलालीतच असतो. ही दलाली व्यवस्थापक सोडण्यास कधीही तयार नसतात. आणि व्यवस्थापक कंपन्या जगवतात हे काही त्यांच्या मोठेपणाचे लक्षण समजावयाचे नाही. हा त्यांच्या स्वतःच्या

हिताचाच प्रश्न आहे. त्यांनी असे न केले तर इसापनीतीतील सोन्याची अंडी घालणाऱ्या हंसीला मारणाऱ्याइतकेच ते मूर्ख ठरतील.

## व्यवस्थापकांचे गैरव्यवहार

येथवर सांगितलेल्या गोष्टी अगदी सामान्य व सार्वत्रिक अशा समजावयाच्या. काही ठिकाणी व्यवस्थापक हे कंपनीस निराळ्या प्रकारांनीही लुबाडतात. कंपनीचे देण्यावेण्याविषयीचे सर्व व्यवहार व्यवस्थापकांच्याच ताब्यात असतात. तेव्हा कंपनीकडून आपण स्वतः कर्जाऊ रकमा काढणे, किंवा आपल्या ताब्यात असलेल्या संपन्न कंपन्यांकडून स्वतःच्या ताब्यातील इतर डबघाईस आलेल्या कंपन्यांस रकमा कर्जाऊ देवविणे, आपल्या निरनिराळ्या व्यवहारांत ऋणको अथवा भागदार म्हणून कंपनीचा पैसा गुंतविणे अशा रीतीने व्यवस्थापकास कंपन्यांचा फायदा घेता येतो. प्रत्येक कंपनीची स्वतंत्र व्यवस्था न राहता एका व्यवस्थापकाच्या ताब्यातील सर्व कंपन्यांचे व्यवहार परस्परांवर अवलंबित होतात; व हे इतर देशांतील कंपन्यांच्या एकसूत्रीकरणाप्रमाणे प्रत्यक्ष निरनिराळ्या कंपन्यांचे परस्पर संबंध पाहून होत नाही, तर केवळ एका व्यवस्थापकाने निरनिराळे व्यवहार हाती घेतले म्हणून घडून येते; आणि बहुतेक कंपन्यांच्या भागीदारांस या देण्यावेण्याच्या व्यवहाराबद्दल काहीच माहिती नसते. याचा परिणाम असा होतो की, व्यवस्थापक बुडाल्यास असल्या अंतर्गत व्यवहारामुळे त्याच्या ताब्यात असलेल्या वाईट कंपन्यांबरोबर चांगल्या कंपन्याही बुडतात. करीमभाई इब्राहिम कंपनीच्या अथवा लाला हरकिसनलाल यांच्या दिवाळखोरीचे परिणाम निरनिराळ्या कंपन्यांस का भोवले हे यावरून कळून येईल. याशिवाय आपल्या ताब्यातील कंपनीच्या भागात सट्टेबाजी करणे, आपण व्यक्तिशः केलेला व्यवहार अंगाशी आला तर त्याचा बोजा कंपनीवर टाकणे वगैरे इतर प्रकार संभवतात व प्रत्यक्ष घडून येतात. प्रत्येक व्यवस्थापक लबाडच असतो असे नाही. काही फार सचोटी असतात. मुद्दा एवढाच की, व्यवस्थापकांच्या हातात हल्लीच्या पद्धतीने कंपनीची शेंडी इतक्या पूर्णपणे राहते की, कारभारात हलगर्जीपणा अथवा लबाडी नाना तऱ्हेने व्यवस्थापकांस बिनदिक्कत करता येते, आणि इतकी सत्ता हातात असल्यावर तिचा बऱ्याच वेळेस दुरुपयोग झाल्यास नवल नाही.

## व्यवस्थापक पद्धतीचे नियंत्रण

हिंदुस्थान सरकारने कंपनी-कायद्याची दुरुस्ती करण्याचा प्रश्न जेव्हा हाती घेतला, तेव्हा व्यवस्थापकांचे काय करावयाचे हा प्रश्न त्यांजपुढे प्रामुख्याने उभा राहिला. इतर सर्व महत्त्वाच्या बाबतीतील दुरुस्त्या इंग्रजी कायद्याकडे पाहूनच सुचविल्या गेल्या. परंतु व्यवस्थापक पद्धतीचे नियंत्रण कसे करावयाचे हे केवळ आपल्याकडील अनुभवावरूनच ठरविणे आवश्यक होते. व्यवस्थापक पद्धतीचे समूळ उच्चाटन करण्यास हिंदी व ब्रिटिश या दोन्ही व्यापारी मंडळांचा विरोध होता. एवढेच नव्हे तर राष्ट्रसभापक्षाचे नेते श्री भुलाभाई देसाई यांनीही आपल्या असेंब्लीतील भाषणात व्यवस्थापकांचे गोडवे गाइले. तेव्हा व्यवस्थापक पद्धती नष्ट न करिता तिचे नियमन कसे करावे हेच कंपनी-कायदा दुरुस्तीने ठरवावयाचे होते. नुकत्याच मंजूर झालेल्या दुरुस्ती-बिलात व्यवस्थापक पद्धतीच्या नियंत्रणाबद्दल अनेक कलमे आहेत व असेंब्लीतील एकंदर वादविवादात या कलमांचा विचार प्रामुख्याने झाला. हे नियंत्रण घडवून आणण्याचे बरेचसे श्रेय 'मुंबई भागदारमंडळ' व इतर तत्सदृश चळवळ्या संस्था आणि व्यक्ती यांस आहे. तसेच सर नृपेंद्रनाथ सरकार व त्यांचे हस्तक श्री सुशील सेन यांसही आहे. पण याचा थोडा तरी वाटा ब्रिटिश भांडवलवाल्यांसही द्यावा लागेल. कारण, वर दर्शविल्याप्रमाणे व्यवस्थापक पद्धतीतील बरेचसे दोष व बरेचसे दोषास्पद व्यवहार हे बहुतांशी हिंदी कंपन्यांतच आढळून येतात.

तेव्हा याचे निवारण करण्याकरिता घालण्यात येणाऱ्या निर्बंधांस ब्रिटिश भांडवलवाल्यांनी बिलकुल हरकत घेतली नाही. इतकेच नव्हे, तर काही प्रसंगी हे निर्बंध विशेष कडक असावेत, असे स्वतः सुचविले. उदाहरणार्थ, सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या बिलाच्या मूळ मसुद्यात कंपनीने व्यवस्थापकांस शक्य तोवर कर्जाऊ रकमा देऊ नयेत म्हणून निरनिराळ्या प्रकारचे निर्बंध सुचविण्यात आले होते. यावर मुंबई चेंबर ऑफ कॉमर्स (ब्रिटिश) यांनी कोणत्याही प्रकारचे कर्ज देण्यास स्पष्ट मनाई असावी, अशी दुरुस्ती सुचविली. ही दुरुस्ती सिलेक्ट कमिटीत मान्य होऊन त्याप्रमाणे आता कलम घालण्यात आले आहे. हिंदी व ब्रिटिश भांडवलवाल्यांकडून एकजुटीने मुळातच विरोध झाला असता तर हिंदुस्थान सरकार कडक निर्बंध करण्याच्या भानगडीत पडले नसते, हे उघड आहे. म्हणूनच ब्रिटिश (विशेषतः मुंबईकर) भांडवलवाल्यांची तटस्थता अथवा सहानुभूती बिलास उपकारक झाली हे लक्षात घेण्याजोगे आहे.

## करारांच्या पावित्र्याचे स्तोम

तथापि इतर बाबतीत ब्रिटिश भांडवलवाल्यांनी सहानुभूती दाखविली, तर एका महत्त्वाच्या बाबतीत त्यांनी हिंदी भांडवलवाल्यांहूनही जास्त कसून विरोध केला. ही बाब व्यवस्थापकांच्या करारांच्या मुदती-बद्दलची. हल्लीचे करार जवळजवळ बिनमुदत असतात व त्यांचा फेरविचार करण्याची भागदारांस संधी कधीच मिळत नाही, हे वर दर्शविलेच आहे. बिलात यापुढील होणारा कोणताच करार वीस वर्षांहून लांब मुदतीचा असू नये, असा निर्बंध सुचविण्यात आला. हे भावी करारांविषयी झाले. पण आजतागायत होऊन गेलेल्या करारांवर नियंत्रण जर केव्हा ना केव्हा घालावयाचे, तर ते कधी तरी पुरे होतील अशी सोय केली पाहिजे. म्हणून कायदा मंजूर झाल्यानंतर वीस वर्षांनी जुने सर्व करार आपोआप रद्द समजून भागदारांस पुनः करार करण्याचा हक्क प्राप्त व्हावा असे एक कलम बिलात घातले होते. म्हणजे, आज कराराप्रमाणे जुन्या व्यवस्थापकांस कितीही कालपावेतो व्यवस्थापकत्व भोगता येत असले तरी त्याची कमाल मर्यादा या कायद्याप्रमाणे आजपासून वीस वर्षे अशी ठरविण्यात आली. या कलमात विशेष अन्यायमूलक असे काही नव्हते. आणखी वीस वर्षे भोगवटा दिल्यावर जुन्या व्यवस्थापकांची काही तक्रार राहणार नाही, असा सरकारचा समज होता. पण तो चुकीचा ठरला, आणि या कलमास अत्यंत जोराचा जो विरोध झाला तो युरोपियांकडून. इतर निर्बंध त्यांस फारसे जाचक वाटले नाहीत, पण दूरवर दृष्टी ठेवता हे कलम त्यांस भयानक वाटले. याचे कारण असे की, आज जरी चहा, ताग, कोळसा या धंद्यांतील सर्व व्यवस्था ब्रिटिशांच्या हातात असली, तरी या धंद्यांतील कंपन्यांचे बरेचसे भाग हिंदी लोकांच्या हातांत जाऊ लागले आहेत. भाग हिंदी लोकांच्या हातांत जाणे जर असेच चालू राहिले, तर आणखी पंधरा-वीस वर्षांत तरी हिंदी भागीदार बहुतेक कंपन्यांत खात्रीने बहुसंख्याक होतील असे दिसते. अर्थात वीस वर्षांनी व्यवस्थापक मंडळींचे सर्व करार पुनः करावयाचे ठरल्यास, त्यापुढे आपल्याकडे व्यवस्था राहील अशी युरोपियांस खात्री वाटत नाही; व युरोपियांच्या हातांतील व्यवस्था गेली तर त्यांचे येथून समूळ उच्चाटन केल्यासारखे व्हावयाचे. ही भीती वाटल्यामुळे कलकत्त्याच्या युरोपीय मंडळाने या कलमाने 'करारांच्या पावित्र्यावर' आघात होत आहे अशी घोषणा सुरू केली; व एकदा कायद्याने जुने करार फिरविता येऊ लागले म्हणजे बेबंदशाहीच माजेल, असा कांगावा सुरू केला. या त्यांच्या ओरडीला यशही आले. हिंदी व्यापारी मंडळींनी प्रस्तुत कलमाविरुद्ध तक्रार केली नव्हती. तरी त्यांनी सिलेक्ट कमिटीत युरोपियांच्या हातास साहजिकच हात लावला. परिणामी, कलम जर सिलेक्ट कमिटीत निघाले नाही तर वीस वर्षांनंतरही करार पुरा पाडल्यास नुकसानभरपाई करण्यात यावी, अशी पुस्ती त्यास जोडण्यात आली. जबर नुकसानभरपाई देण्यापेक्षा जुन्या व्यवस्थापकांस कायम धरणे हेच कंपनीस परवडणार असाच या पुस्तीचा परिणाम व्हावयाचा आणि जुन्या व्यवस्थापकांची

मिरास कायम टिकावयाची. सुदैवाने याविरुद्ध बराच गाजावाजा झाल्यावर असेंब्लीत ही पुस्ती काढून टाकण्याचे सरकारने कबूल केले, आणि आता हे कलम मुळाप्रमाणेच राहिले आहे.

## व्यवस्थापकांवरील निर्बंध

व्यवस्थापकांवर कंपनी-कायद्याच्या नवीन दुरुस्तीप्रमाणे घालण्यात आलेले निर्बंध अनेक आहेत. त्यांचे सर्वांचे तपशीलवार विवेचन करणे शक्य नाही. त्यांतील प्रमुख निर्बंध कोणते हे थोडक्यात दर्शवावयाचे एवढेच येथे योजिले आहे. यापुढे व्यवस्थापक व कंपनी यांजमधील व्यवस्थेबद्दलचा करार वीस वर्षांहून अधिक मुदतीचा केव्हाही असू शकणार नाही. त्यामुळे व्यवस्थापकाकडे वंशपरंपरा व्यवस्था बिनमुदत चालू राहण्याचे दोष टळतील अशी अपेक्षा आहे. तसेच व्यवस्थापकाने कंपनीच्या व्यवस्थेत अफरातफर केल्याने त्याला शिक्षा झाल्यास त्याला काढून टाकण्याचा हक्क कंपनीस देण्यात आला आहे. आजपर्यंत हे देखील कंपनीस करता येत नसे. व्यवस्थापकाची मुदत मर्यादित झाली इतकेच नव्हे, तर यापुढे व्यवस्थापकास आपले व्यवस्थापकीय हक्क गहाण टाकणे किंवा विकणे हे सुद्धा भागदारांच्या संमतीशिवाय करता येणार नाही. याप्रमाणे व्यवस्थापकांच्या करारावर मुख्य निर्बंध आहेत. व्यवस्थापकांच्या वेतनाचेही नियमन करण्यात आले आहे. कचेरीखर्च व काही मर्यादित किमान रकमेपलीकडे व्यवस्थापकांचे वेतन हे केवळ नफ्याच्या टक्केवारीतच ठरविले जावे, असे कलम या कायद्यात घालण्यात आले आहे. म्हणजे कंपनीस नफा झाल्याशिवाय व्यवस्थापकास काही विशेष उत्पन्नाची बाब राहणार नाही असा निर्बंध घातल्यामुळे नफ्याकडे न पाहता व्यवहार करण्याच्या काही व्यवस्थापकांच्या प्रवृत्तीस आळा बसेल असे वाटते. तसेच व्यवस्थापकाने कंपनीबरोबर इतर कोणतेही खाजगी व्यवहार करणे झाल्यास त्यास चालक-मंडळाच्या विशेष बहुमताची परवानगी घ्यावी लागावी, अशीही तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. व्यवस्थापकांचे हुकमी बहुमत चालक-मंडळावर नेहमीच राहू नये याकरिता, व्यवस्थापकांतर्फे चालक-मंडळावर येणारे चालक-मंडळाचे सभासद सर्व सभासदांच्या संख्येपेक्षा एकतृतीयांशाहून अधिक केव्हाही असू नयेत, असा निर्बंध घालण्यात आला आहे. याबरोबरच भागदारांनी निवडावयाचे चालक एकंदर मंडळाच्या दोनतृतीयांश तरी निदान असावेत असेही ठरविण्यात आले आहे. व्यवस्थापकाने आपल्या ताब्यातील कंपनीकडून कर्ज काढू नये किंवा एकाच व्यवस्थापकाच्या व्यवस्थेखालील निरनिराळ्या कंपन्यांनी एकमेकांस कर्ज देऊ नये, अशी कायदेशीर योजना आता करण्यात आली आहे. या मुख्य बाबी झाल्या. याशिवाय व्यवस्थापकाने आपल्या व्यवस्थेखाली असलेल्या कंपनीशी चढाओढ होईल अशा कोणत्याही व्यवहारात खाजगी रीतीने भाग घेऊ नये, त्याला स्वतःला कंपनीकडून सर्व प्रकारची एकंदर आवक किती झाली याची माहिती त्याने भागदारांस पुरवावी, कंपनीशी होणाऱ्या निरनिराळ्या व्यवहारांत आपला व्यक्तिशः (किंवा पातीत) भाग काय आहे हे त्याने चालक-मंडळास व भागदारांस कळवावे, तसेच चालक-मंडळाने कंपनीच्या भागांच्या खरेदीविक्रीच्या उलाढालीत पडू नये, अशा प्रकारच्या अनेक इतर बाबीही कायद्यात घातलेल्या आहेत. या सर्वांचा रोख काय आहे व त्याने कोणते प्रकार टळतील अशी अपेक्षा आहे, हे व्यवस्थापक पद्धतीच्या दोषांचे जे वर विवेचन करण्यात आले आहे त्यावरून स्पष्ट होईल. एवढे निर्बंध पुरे पडतील की अपुरे पडतील, व्यवस्थापक यांतूनही काही पळवाट काढतील की काय या गोष्टी अर्थात अनुभवानेच कळण्याजोग्या आहेत. शेवटी भागदारच जर झोपले तर कायदा तरी त्यांस किती तारणार हा विचार राहतोच.*

******लोकशिक्षण* ७ : ४ ऑक्टोबर १९३६ पृ० २९६-३०२.

☆

# १ . . ग्रामदान

## १

सुमारे तीन वर्षांपूर्वी अलाहाबाद येथे भरलेल्या शेती अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात शेती-उत्पादनव्यवस्थेच्या दृष्टीने मी भूदानाची मीमांसा केली होती. त्यात मी असा निष्कर्ष काढला होता की, स्थितिशील पार्श्वभूमी गृहीत धरल्यास भूदानाची उपयुक्तता सिद्ध होते. समाजाच्या अर्थरचनेत किंवा उत्पादनात काही बदल अगर वाढ होण्याची शक्यता नाही, अशी परिस्थिती असल्यास सामाजिक न्याय मिळविण्यासाठी भूदान चळवळीस पाठिंबाच द्यावा लागेल. प्रामुख्याने शेतीवर जगणारा व दरिद्री असेच आपल्या लोकसमाजाचे चित्र राहणार असेल तर मग दारिद्र्याची अधिक न्याय्य वाटणी करण्यावाचून गत्यंतर नाही; परंतु जलद आर्थिक विकास घडवून आणून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याची आपली मनीषा असेल तर मात्र भूदानाची तत्त्वप्रणाली व प्रत्यक्ष व्यवहारात त्यास लाभणारे यश यांमुळे कालांतराने जमिनीची व्यवस्था व उत्पादनासंबंधीचे प्रश्न सोडविताना काही अडचणी निर्माण होण्याचा संभव आहे. त्यावेळच्या या माझ्या मीमांसेनंतर भूदान चळवळीने आता बरीच प्रगती केलेली आहे. त्यातून आता ग्रामदान कल्पनेचा उद्भव झाला असून भूदानापेक्षा ग्रामदानावरच आता विशेष भर देण्यात येत आहे. ही प्रगती मला स्वागतार्ह वाटते. आणि गतिशील अवस्थेत भूदान उपयुक्त ठरणार नाही असे माझे मत असले तरी जलदीने सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्याचे ग्रामदान हे एक प्रभावी साधन होऊ शकेल असे मला वाटते. सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्याची उपयुक्तता तर आता सर्वांनाच पटलेली आहे. ग्रामदानाबद्दल मला असा विश्वास का वाटतो याची कारणमीमांसा मी येथे करीत आहे. तसेच कोणत्या परिस्थितीत ग्रामदान हा बदल घडवून आणील व त्याबरोबरच संक्रमण-कालातील अडचणी कमी करील, त्याचीही रूपरेखा मी मांडीत आहे.

### ग्रामीण भागातील आर्थिक सत्ताधारी

खेड्यामध्ये ज्या गतिमान प्रक्रियेची आज आवश्यकता आहे तिच्या प्रमुख लक्षणाकडे प्रथम लक्ष पुरविणे जरूर आहे. देशाच्या ग्रामीण भागात आर्थिक व सामाजिक क्रांती घडून येणे जरूर आहे, असे नेहमी बोलले जाते. या क्रांतीचे निश्चित स्वरूप कोणते ते कळणे अवश्य आहे. ग्रामीण भागातील आर्थिक सत्ता आज प्रामुख्याने दोन घटकांच्या हातांत आहे. यांपैकी पहिला म्हणजे व्यापारी-सावकार वर्ग. शेतीला भांडवल पुरवठा करण्याच्या व्यवहारातून तसेच ग्रामीण भागातील व्यापार-व्यवहारातून मुख्यतः हा वर्ग फायदा मिळवीत असतो. या लोकांचा शहरांतील व्यापारी व सावकार जमातीशी संबंध असतो; व एक प्रकारे त्यांचे ते खेड्यांतील हस्तक वा प्रतिनिधीच असतात. दुसरा म्हणजे साधारणपणे बरे व जमीनदार व सधन शेतकरी यांचा वर्ग, म्हणजे खेड्यांतील वरच्या थरांतील

दहा टक्के लोक. हे लोक साधारणपणे जमीनमालक असतात. तसेच काही स्वतः शेती करणारेही असून त्यांच्या शेतीचे प्रमाण मोठे असते. या लोकांचे खेड्यांत बरेच वजन असते, व खेड्यांतील बरीचशी राजकीय व सामाजिक सत्ता त्यांच्या हातांत असते. काही बाबतीत या दोन्ही घटकांच्या हितसंबंधांत बरेच ऐक्य असून ते एकविचारे वागतात, तर इतर पुष्कळ बाबतीत त्यांमध्ये भिन्नता आढळून येते. या दोन्ही घटकांच्या बाबतीत बदल घडवून आणण्याचे प्रश्न वेगवेगळे असून प्रत्येकासाठी वेगळा कार्यक्रम ठरवावा लागेल.

## सहकारी संस्था

व्यापारी व सावकारी वर्गाच्या हितसंबंधांना व हालचालींना आळा बसावा या उद्देशाने आज मुक्रर केलेला कार्यक्रम म्हणजे शेतीस लागणारे भांडवल व शेतमालाची विक्री याबाबत शक्य तेवढ्या प्रमाणात सहकारी पद्धतीचे अवलंबन करणे, विशेषतः शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगांत सहकारी पद्धतीवर विशेष भर देणे हा होय. अशा सहकारी संस्थांना सरकारकडून प्रत्यक्ष मदत मिळणार असून शेती-मालाचे गुदाम व साठे तयार करणे व जरूर पडल्यास पुढे शेती-मालाची खरेदी करणे अशा स्वरूपाची ही मदत आहे. हा कार्यक्रम यशस्वी झाला तरी वरच्या थरांतील शेतकऱ्यांना त्यामुळे काहीच धोका पोचत नाही. ते पूर्वीप्रमाणेच प्रबळ राहू शकतील. उलट व्यापारी व सावकारवर्गाचे वजन घटल्यामुळे त्यांची प्रतिष्ठा पूर्वीप्रमाणे आणखी वाढण्याचा संभव. व्यापारी-सावकारांची जागा ज्या सहकारी संस्था घेणार त्यांमध्ये या शेतकऱ्यांचे वर्चस्व राहिल्यास हे घडणे अगदी स्वाभाविक आहे. आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा हे शेतकरी प्रयत्न करणार आणि ते कमी करण्याचा खास प्रयत्न केला नाही तर ते प्रस्थापित होणार.

## जमीनसुधारणाविषयक कायदे

वरच्या थरांतील शेतकऱ्यांचे आजचे महत्त्व व वजन त्यांच्या ताब्यातील विस्तृत क्षेत्राच्या शेतीवर अवलंबून आहे; आणि ती त्यांच्या ताब्यात आहे तोवर ते तसेच राहणार, म्हणून जमीनसुधारणा-विषयक विशिष्ट प्रकारचे कायदे केले तर त्यांच्या आजच्या स्थानाला धक्का पोचणार आहे.

जमीनसुधारणाविषयक कायदे आणि सहकारी संस्थांचा विकास हे दोन्ही कार्यक्रम आज निव्वळ कागदावरचेच राहिले आहेत. एवढेच नव्हे तर ते सुरू होण्यापूर्वीच त्यांमध्ये बरीच काटछाट होण्याचा संभव आहे. यावरून ग्रामीण भागात व्यापारी-सावकार वर्गाचे अस्तित्व टिकविण्यासाठी आज जोरदार शक्ती उच्च ठिकाणी आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत हे उघड आहे. याबाबत महत्त्वाच्या अशा अलीकडे घडलेल्या दोन घटना लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. अन्नधान्याचा व्यापार आज खाजगी व्यापाऱ्यांच्या हातांत आहे; तसाच तो पुढे चालू राहावा याबाबत अधिकारी व्यक्तींनी पाळलेला कटाक्ष ही एक गोष्ट; आणि दुसरी म्हणजे प्राथमिक सहकारी संस्थांना सुरुवातीस सरकारकडून भांडवल पुरवठा करून त्यांचे आर्थिक सामर्थ्य वाढविण्याचा व त्या मजबूत करण्याचा जो कार्यक्रम आखण्यात आला होता त्या सर्वांना करण्यात आलेला तीव्र विरोध ही होय. सरकारी मदती-पेक्षा स्वतःच्या प्रयत्नांवर व स्वावलंबनावर सहकारी संस्थांनी आपले सामर्थ्य वाढविले पाहिजे हा या विरोधातील मुख्य सूर. परंतु याबाबत काही गोष्टींकडे जाणूनबुजून डोळेझाक करण्यात येत आहे असे दिसून येते. गरीब व असमर्थ यांना मदत पुरविली नाही तर सुसज्ज व सुस्थितीत असणाऱ्या व्यापारी-सावकार वर्गाच्या बरोबरीच्या सामन्यात त्यांचा टिकाव लागत नाही, हा सार्वत्रिक अनुभव आहे. आणि भारतातील प्रत्यक्ष अनुभवानेही ही गोष्ट सिद्ध झाली आहे. गरीब शेतकऱ्याच्या प्राथमिक

सहकारी संस्थांना आर्थिक मदत नाकारण्यात व आर्थिक दृष्टया आतबट्टयाचे असे लहान प्राथमिक घटक राहू देण्यात अंतरीचा हेतू वेगळा दिसतो. ज्या देशातील सर्व मोठाले औद्योगिक कारखाने गिऱ्हाइ-कांच्या त्यागावर उभारले नि वाढले, आणि ज्यांना सर्व प्रकारची सरकारी मदत पुरविण्यात आली, त्यांना सवलतीने भांडवल उपलब्ध करून देण्यात आले, तेथे हे धोरण अंगिकारणे म्हणजे वस्तुस्थिती-कडे डोळेझाक करून अंतरीचा खरा हेतू लपविण्याचा एक अयशस्वी प्रयत्नच होय. त्यातील अंतरीचा खरा हेतू, आहे ही स्थिती कायम राहावी, त्यात बदल होऊ नये हाच आहे. जमीनसुधारणाविषयक कोणतीही गोष्ट यशस्वी व परिणामकारक करण्याच्या मार्गातील मोठी अडचण म्हणजे ग्रामीण भागातील वजनदार सधन शेतकरी वर्गाचे सामर्थ्य ही होय. समाजविकास प्रकल्पांची कारभारयंत्रणा (कम्युनिटी प्रॉजेक्ट ॲडमिनिस्ट्रेशन) अकार्यक्षम व निरर्थक ठरण्याचे मुख्य कारण म्हणजे या दोन सुसज्ज वर्गाच्या हितसंबंधांना व स्थानांना धक्का पोचेल अशी कोणतीही गोष्ट करण्याची त्यांची इच्छा नाही किंवा त्यांची तेवढी शक्ती नाही. असे काही न करण्याबाबत ही समाजविकास-कारभारयंत्रणा किती दक्ष असते हे नुकत्याच झालेल्या एका पाहाणीवरून कळून येते. कायदेशीर व नागरिक हक्कांबाबत हरिजनांना घटनेने जी हमी दिली आहे तिचे व्यवहारात योग्य पालन करण्याच्या कामी त्यांना मदत करण्यास ही कारभार-यंत्रणा नाखुष असल्याचे आढळून आले.

## साधनसंपत्तीची विषम वाटणी

ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रगती घडून यावी याबाबत सर्वांचे एकमत आहे. आज ग्रामीण-साधनसंपत्तीची खरोखरीच अत्यंत विषम वाटणी होत असून शेतमालाला बरी किंमत येत असताना त्याचा बहुतेक सर्व फायदा व्यापारी व सावकार वर्गाच्या हातांत व तदनंतर काही प्रमाणात मोठ्या शेतकऱ्यांच्या हातांत पडत असतो. या परिस्थितीत बदल घडवून आणून उत्पादन-वाढीच्या दिशेने जलदीने वाटचाल करावयाची झाल्यास उत्पादन-साधनांची अधिक समवाटणी करावी लागेल. वरच्या थरांतील सधन शेतकरी व व्यापारी-सावकार वर्गाशी सामना देता येईल एवढे लहान शेतकऱ्याचे आर्थिक सामर्थ्य वाढवावे लागेल; व त्याचबरोबर शेती-उत्पादनाची प्रक्रिया, विक्री व त्यासाठी लागणारे भांडवल या सर्व गोष्टी प्रत्यक्ष शेती कसणाऱ्या वर्गाच्या हाती केंद्रित कराव्या लागतील. ही सर्व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शेतीसुधारणाविषयक कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. तसेच सहकारी पद्धतीने विकास घडवून आणण्याचे कार्यक्रमही मुक्रर करण्यात आले आहेत; आणि शेतीत तांत्रिक सुधारणा करून शेतकऱ्यांचे आरोग्य व शिक्षण इत्यादींकडे लक्ष पुरविणाऱ्या समाजविकास प्रकल्पांचीही खास योजना करण्यात आली आहे.

जमीनदारीच्या उच्चाटनाखेरीज कोणतीही विशेष प्रगती जमीन सुधारणेबाबतच्या कार्यक्रमाने केलेली नाही. शिवाय जमीनदारीचे उच्चाटन ही काही संपूर्ण शेतीसुधारणा नाही. त्यामुळे जुन्या जमीनदारी विभागांतील शेतीसुधारणाविषयक प्रश्न रयतवारी विभागांतील शेती प्रश्नांच्या पातळीवर येतात एवढेच. पुष्कळ राज्यांतून शेतीसुधारणाविषयक प्रस्थापित सिद्धांतांवर आधारलेले असे पुरेसे कायदेही अजून झालेले नाहीत. ज्या ठिकाणी असे कायदे झाले आहेत तेथे एक तर त्यांची अंमलबजावणी समाधान-कारक रीतीने होत नाही किंवा स्थानिक शेतमालकवर्गाने तेथे ते यशस्वी रीतीने निःष्प्रभ करून टाकले आहेत. जमिनीची फेरवाटणी व जमिनीच्या बिनकिफायतशीर तुकड्यांचे एकत्रीकरण करण्याचे कार्यक्रम तर अजून कूळकायद्याच्या कितीतरी मागे आहेत. ज्या राज्यांतून आधीच बिनसरकारी प्रयत्नाने सहकारी संस्थांची बरीच वाढ झाली होती, तेथे भांडवलपुरवठा, मालविक्री व शेतमालाची प्रक्रिया या क्षेत्रांत सहकारी संस्थांनी कांही प्रगती केली आहे. कारण कोणत्या प्रश्नांना तोंड द्यावे लागेल

याची त्यांना आधी कल्पना आलेली होती. इतर राज्यांतून याबाबत काहीच प्रगती झालेली नाही; आणि लवकरच या संबंधीच्या विकास कार्यक्रमांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी तेथे सामना द्यावा लागेल. ग्रामीण समाजातील आजच्या शक्तिशाली गटाच्या हितसंबंधांना विशेष इजा पोचेल अशी कोणतीही गोष्ट करण्यास विकासप्रकल्प-यंत्रणा आज असमर्थ आहेत. म्हणून ग्रामीण विभागांत मोठ्या प्रमाणावर सामाजिक व आर्थिक बदल त्वरित घडून येण्याची फारशी शक्यता नाही. ज्यांच्या हातांत आर्थिक व राजकीय सत्ता आहे, त्यांना असा बदल घडवून आणण्याची इच्छा नाही हेच त्याचे खरे कारण. ज्यावेळी समाजाच्या खालच्या थरांतून वर दाब येईल, व विद्यमान स्थितीसंबंधाचा असंतोष पृष्ठभागी येईल त्यावेळेस ज्या कार्यक्रमांना आज केवळ औपचारिक मान्यता देण्यात आली आहे, ते खरेखुरे जिवंत होऊन कार्यान्वित होतील.

## 'सर्वै भूमि गोपालकी'

ग्रामीण समाजाची आजची ही रचना व त्यात बदल घडवून आणण्यासाठी योजनापूर्वक आखलेल्या कार्यक्रमाची आजची ही स्थिती या विशिष्ट पार्श्वभूमीवर ग्रामदानाच्या तत्त्वप्रणालीचे परीक्षण करणे जरूर आहे. याबाबत प्रथम एक गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे, ती म्हणजे ग्रामदान ही एक भूदानाचीच पुढची अवस्था आहे, असे त्याचे स्वरूप नाही. 'सर्वै भूमि गोपालकी' ही दोहोंच्या बाबतीत एकच घोषणा असली तरी भूदानात भूमिहीनाला आपल्याजवळील थोडी भूमी देण्याचे एक दयेचे अगर परोपकाराचे कृत्य करण्यास आवाहन आहे. ग्रामदानात तुमच्याजवळचे सर्व गावातील सर्वांसाठी एकत्र करावयाचे आहे, व सर्व गावासाठी जे निर्णय घेण्यात येतील त्याप्रमाणे चालावयाचे आहे. दान म्हणजे समवाटणी (दानम् संविभाजनम्), हे केवळ एक दयेचे कृत्य नाही अशी जी भूदानात दान शब्दाची व्याख्या केली जाते, ती प्रत्यक्ष व्यवहारात कधीच खरी ठरलेली नाही, आणि केवळ एक कल्पना या दृष्टीनेही ती मान्य करणे कठीण आहे; परंतु ग्रामदानाच्या बाबत मात्र ही व्याख्या मान्य करण्यास कोणतीच अडचण नाही. त्या दिशेने प्रत्यक्ष व्यवहार करताना पुढे काय अडचणी येतात हेच काय ते पाहावयाचे.

एवढे प्रास्ताविक विवेचन केल्यानंतर समाजक्रांती घडवून आणण्याचे अगर ती घडून येण्यासाठी लागणारी शक्ती निर्माण करण्याचे ग्रामदान हे एक प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष साधन होऊ शकेल किंवा कसे हे पाहणे जरूर आहे.*

## २

वर दिग्दर्शित केलेल्या विद्यमान स्थितीच्या प्रत्येक अंगोपांगावर ग्रामदानाचा काय परिणाम होणे शक्य आहे ते प्रथम पाहून मग ग्रामदान हे आर्थिक व सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे एक साधन होऊ शकेल किंवा कसे या प्रश्नाचे उत्तर देणे वाजवी होईल. ग्रामसमाजामध्ये व्यापारी-सावकार वर्गाचे जे आज स्थान आहे त्यास ग्रामदानामुळे किती धक्का पोचेल ते प्रथम पाहू. ग्रामदान झाले हीच केवळ घटना ताबडतोब गावातील व्यापारी-सावकार वर्गाच्या स्थानाला प्रत्यक्ष धक्का पोहोचवू शकणार नाही. ग्रामदान झाल्यामुळे जमिनीवरील व्यक्तिगत मालकीहक्कसंबंध ग्राम-समाजाकडे जातो;

* *केसरी*, १०-११-१९५७.

त्यामुळे जमिनीच्या तारणावर या वर्गाने जे काही कर्ज दिले असेल, मग ते दूरदृष्टीने अंती जमीन खरेदी करण्याच्या उद्देशाने दिलेले असो, अगर केवळ सुरक्षिततेच्या दृष्टीने जमीन तारण घेऊन दिलेले असो, ग्रामदानामुळे तेवढ्यापुरता सावकारवर्गाच्या हितसंबंधांना धक्का पोचेल. परंतु ग्रामीण पतपाहणीत जी माहिती उपलब्ध झाली त्यावरून असे दिसून येते की, ग्रामीण भागांत जमीन तारणावर दिलेल्या कर्जाचे प्रमाण अलीकडे बरेच घटले आहे. अर्थात जमीन खरेदी करण्याच्या आंतरिक हेतूने शेतकऱ्याला सावकारवर्ग थोडे फार सढळपणे जे कर्ज देई ते मात्र या ग्रामदानामुळे बंद होईल. परंतु एकंदरीने त्याचा फारसा परिणाम होणार नाही. कारण कुळकायद्यातील जमिनीच्या खरेदी-विक्री संबंधाच्या नियमामुळे शेत-जमिनीच्या खरेदी-विक्रीचा खुला बाजार जवळ जवळ बंद झाला आहे. आणि कर्जाच्या तारणास जमिनीच्या किमतीचा फारसा आधार राहिलेला नाही.

## ग्रामदानी गाव

व्यापारीवर्गाच्या व्यवहारावर व हितसंबंधांवर ग्रामदानाने तात्कालिक असा कोणताच परिणाम घडून येत नाही. येथे 'ग्रामदानी गाव' या शब्दप्रयोगाचा निश्चित कोणता अर्थ अभिप्रेत आहे त्याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. गावातील सर्व जमीन ग्रामसमाजाच्या मालकीची होऊन ती एकत्रित झाली आणि ती तात्पुरती नसून कायमची तशी राहणार आहे असा मी त्याचा अर्थ करीत आहे. या अर्थाच्या ग्रामदानी गावाहून वेगळी ग्रामदानी गावेही असू शकतील. गावाच्या एकंदर सामाजिक व आर्थिक व्यवस्थेत फारसा फेरबदल न करता किंवा सतत असा बदल होत राहावा या संबंधाची कोणतीही व्यवस्था न करता ग्रामदान झाल्यानंतर तेथील जमिनीचे फक्त फेरवाटप करण्यात आले आहे अशीही गावे असू शकतील. अशा गावांना मी ग्रामदानी गावे म्हणणार नाही. अशा गावांचे एकदा ग्रामदान झाले असले तरी पुनः ती इतर सर्वसामान्य गावांच्या वर्गात सामील झाली असाच त्याचा अर्थ होईल. या दुसऱ्या प्रकारच्या गावांतून केवळ ग्रामदानामुळे तेथील व्यापारी-सावकार वर्गाच्या ग्रामसमाजातील स्थानामध्ये कोणताच फेरबदल होत नाही. तसेच तेथील वरच्या थरांतील जमीनदार-शेतकऱ्यांना जमिनीच्या फेरवाटपामुळे जो थोडा धक्का पोचतो त्यापेक्षा अधिक असा कोणताही फेरबदल त्यांच्याही स्थानांत होत नाही.

सावकार-व्यापारी वर्गाचे प्राबल्य तसेच कायम असताना गावाचा आर्थिक विकास घडवून आणणे अगर गावातील सामाजिक व आर्थिक व्यवहाराचे सुजाणपणे व न्याय्यपणे नियंत्रण करणे कसे शक्य आहे ते लक्षात येत नाही. म्हणून ग्रामदानी गावांच्या समस्यासंबंधाने पुढे जे मी विवेचन करीत आहे त्यामध्ये 'ग्रामदानी गाव' याची मी वर केलेली व्याख्या गृहीत आहे, व जमीन देणे ग्रामदान कार्यक्रमातील केवळ सुरुवातीची गोष्ट आहे असे मी मानतो. जमीन देणे हे प्रारंभिक कृत्य असून गावातील जमीनधारक शेतकरी यापुढे गावचे सर्व आर्थिक व सामाजिक व्यवहार ग्रामकुटुंबाच्या भूमिकेवरून करण्यास तयार असल्याचे आणि जरूर पडल्यास व्यक्तिहित गौण मानण्यास तयार असल्याचे ते निदर्शक आहे. ग्रामीण विकासाच्या कोणत्याही कार्यक्रमात व्यापारी-सावकार वर्गाचे उच्चाटन करणे—ग्रामसमाजाचे त्यांच्यावरील आर्थिक अवलंबन नाहीसे करणे—ही अत्यंत आवश्यक अशी पहिली गोष्ट आहे, हा मुद्दा मी येथे मांडीत नाही. कारण याबाबत एक अडचण निर्माण होण्याचा संभव आहे. आणि सर्व ग्रामदान कार्यकर्त्यांना तिला तोंड द्यावे लागणार आहे. काही अपवादात्मक उदाहरणे सोडल्यास पैशाचे बळ, व्यवस्थाकौशल्य इत्यादी बाबतीत ग्रामकुटुंबाचे संकलित सामर्थ्य फारसे मोठे असणार नाही आणि अन्य मार्गांनी मदत न मिळाल्यास व्यापारी-सावकार वर्गाचे साह्य टाळता येणार नाही. म्हणून जे ग्रामदानाचा प्रचार करीत आहेत व ग्रामदाने मिळवीत आहेत त्यांनी आवश्यक ती पूरक

मदत काही काळ तरी बाहेरून मिळवून देण्याची जबाबदारी आपली आहे व ती आपण टाळू शकत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. यासाठी सहकारी विकासाचे व शेती-तंत्र-सुधारण्याचे जे कार्यक्रम आज इतरत्र पुरस्कारिले जात आहेत ते या ग्रामदानी गावांतून सुरू केले पाहिजेत व या सर्व कामाची सर्व जबाबदारी व चालकत्व सुरुवातीच्या अवस्थेत तरी ग्रामदान कार्यकर्त्यांनी स्वतःकडे घेतले पाहिजेत. ग्रामदान झाले असे मानले गेलेल्या काही भागांतून जी माहिती उपलब्ध होते त्यावरून ग्रामदानानंतर व्यापारी-सावकार वर्गाची पकड ढिली करण्याचा बिलकुल प्रयत्न न केल्यामुळे तेथे केवढे हानिकारक परिणाम झाले आहेत हे दृष्टोत्पत्तीस येत आहे. आणि ही परिस्थिती लक्षात घेऊन वरील मुद्द्याचा विचार होणे जरूर आहे. सारांश हा की, केवळ ग्रामदान झाले एवढीच गोष्ट काही व्यापारी-सावकार वर्गाच्या स्थानामध्ये अपेक्षित बदल घडवून आणणार नाही आणि ग्रामदानानंतरच्या पुनर्रचना कार्याचा एक भाग म्हणून हा प्रश्न सुरुवातीस काही काळ तरी हाताळावा लागेल आणि त्याची जबाबदारी ग्रामदानी कार्यकर्त्यांना घ्यावी लागेल.

### क्रांतीचे एक प्रभावी साधन

गावातील मोठ्या जमीनदार शेतकऱ्यांचा जो दुसरा सत्तावान वर्ग आहे, त्याच्या स्थानाला ग्रामदानामुळे तत्काळ धक्का पोचतोच. कऱ्यापैकी जमीनमालकांची व शेतकऱ्यांची संमती असल्याशिवाय व त्यांचे सहकार्य मिळाल्याशिवाय आधी ग्रामदानच घडून येणार नाही; म्हणून ग्रामदान झाले असे म्हटले जाते त्यावेळी गावातील वरच्या थरांतील जमीनमालक व शेतकऱ्यांनी स्वखुशीने आपली सत्तास्थाने सोडली आहेत असाच त्याचा अर्थ मानला पाहिजे. या स्वखुशीच्या सत्ताविसर्जनाने कोणते महत्त्वाचे परिणाम घडून येतील ! येथेही ग्रामदानाच्या प्रचारानंतर स्वाभाविक घडून काय येईल व ग्रामदान हे क्रांतीचे एक प्रभावी साधन होण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष काय घडून यावयाला हवे यामध्ये फरक करणे जरूर आहे. भूदानाबाबत आजपर्यंतचा इतिहास लक्षात घेता ग्रामदानानंतर तेथील भूमिहीनांना व अल्प-भूमिधारकांना एका किमान क्षेत्रविस्ताराची जमीन मिळाली पाहिजे या मुद्द्यावरच भर देऊन सुरुवातीला जमिनीचे फेरवाटप केले जाण्याचा संभव आहे. ही फेरवाटणी आरंभी बरीचशी लाक्षणिक असते असा या बाबतीतला आजवरचा अनुभव असून त्यामुळे मोठ्या जमीनधारकांना फारसा धक्का पोचत नाही. तसेच गावच्या साधनसंपत्तीवरील हुकमतीचा सर्वसाधारण साचाही त्यामुळे फारसा बदलत नाही. परंतु पुढील अनेक गोष्टींपैकी ही केवळ सुरुवातीची गोष्ट आहे असे त्याचे स्वरूप असल्यास त्यास विशेष महत्त्व देण्याचे कारण नाही. तथापि ग्रामदानी गावात एक नवी शक्ती निर्माण झाली असून ती अपेक्षित परिवर्तन क्रमशः घडवून आणील हे यात गृहीत आहे. शेती व्यवस्थेसंबंधाने जी परिवर्तने घडवून आणावयाची ती मुख्यतः दोन प्रकारची आहेत. त्यांपैकी पहिले म्हणजे जमिनीचे संकलन (लहान तुकडे एकत्र करणे). शेतीचे तंत्र सुधारण्यासाठी संकलनाची आवश्यकता आहे हे आता सर्वमान्य झाले आहे. त्याचबरोबर संकलन ही एक खर्चाची व सावकाशीने होणारी क्रिया आहे असाही सर्वसाधारण अनुभव आहे. ग्रामदान झाल्यामुळे संकलनाची जरुरी नाही असे बिलकुल होत नाही. ग्रामदानामुळे ते स्वस्त व जलद होईल काय हाच प्रश्न आहे. तात्त्विकदृष्ट्या विचार करता ग्रामदानानंतर जमिनीच्या वाटपासंबंधीचे वगैरे सर्व अंतिम हक्क ग्रामसमाजाकडे अगर ग्रामकुटुंबाकडे येतात असे मानले तर संकलनाची गती वाढविण्याच्या दृष्टीने ग्रामदान ही अत्यंत उपकारक गोष्ट ठरेल. ग्रामदानी गावातून संकलनासाठी लागणारा खर्च व वेळ दोन्ही बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकतील; परंतु ग्रामदान झाले की, संकलन आपोआप होईल असे म्हणता येत नाही. शेतीचे तंत्र सुधारण्यासाठी या संकलनाची आवश्यकता आहे याची जाणीव ग्रामव्यवस्था मंडळाला

अगर ग्रामसभेला असली पाहिजे, आणि ते घडवून आणण्यासाठी जरूर ती सत्ता व संघटना असलेली कारभार-यंत्रणाही त्यांना उभारता आली पाहिजे.

या संकलनापेक्षाही कदाचित अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ग्रामदानी गावातून जमीन धारणाची कमाल मर्यादा कोणती असावी, तसेच बिनकिफायतशीर शेतीच्या तुकड्यांची कशी विल्हेवाट लावावयाची हा प्रश्न होय. याबाबतीतही ग्रामदान झाले की त्याबरोबर आपोआप घडून येईल अशी कोणतीही गोष्ट नाही. समायिक उत्पादन व सहकारी शेतीबाबत भूदानकार्यकर्त्यांचा दृष्टिकोन अलीकडे बराचसा अनुकूल झाला आहे. तथापि, आज देखील उत्पादन-संघटना कशी असावी, अंतिम उद्दिष्ट कोणते, यासंबंधीच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट झाल्या नाहीत.

## परिवर्तनाच्या पायऱ्या

सर्व गोष्टी स्वखुशीने व जाणीवपूर्वक घडून आल्या तर परिवर्तनाचा पाया भक्कम व टिकाऊ होतो, या कल्पनेत निःसंशय बरेच तथ्य आहे. विशिष्ट स्वरूपाचे परिवर्तन घडून येण्यासाठी कमीजास्त पायऱ्यापायऱ्यांनी जावे लागेल, कमी अगर जास्त वेळ लागेल. तसेच निरनिराळ्या ग्रामदानी गावांतून होणाऱ्या परिवर्तनाची गती व अवस्था यांमध्येही फरक असेल. परिवर्तनाचे अंतिम चित्रही कदाचित एकाच धाटणीचे न निघता त्यामध्ये काही फरक आढळून येईल. पण प्रयोग करण्याला भरपूर संधी हा एक मोठा गुण परिवर्तन घडवून आणण्याच्या या पद्धतीत आहे. स्थानिक परिस्थितीप्रमाणे व गरजेप्रमाणे प्रयोग करून परिवर्तनाच्या वेगवेगळ्या अवस्थांचे संधी जुळविण्याला यात भरपूर अवसर आहे. जेथे जुळवून घ्यावे लागते ती परिस्थिती निव्वळ आर्थिक असेल असे नाही. सामाजिक व वैचारिक परिस्थितीकडेही पुष्कळ ठिकाणी लक्ष द्यावे लागेल आणि या दोन्हींचा एकमेकांशी मेळ घालण्याकडे तेवढेच लक्ष पुरवावे लागेल. हे सर्व सांगितले तरी ग्रामदानी गावांची वाटचाल सर्वसाधारणपणे कोणत्या दिशेने होणार त्याची स्पष्ट रूपरेखा ठरविणे जरुरीचे आहे.

शेती-व्यवस्थेच्या संबंधाने इथवर जे विवेचन केले त्याचा निष्कर्ष हा की, प्रत्येक ग्रामदानी गाव हा एक घटक आहे आणि जमिनीचे संकलन करून शेतीच्या क्रिया कार्यक्षम रीतीने करता येतील एवढे नवे शेती-घटक बनविण्याचा कार्यक्रम पार पाडण्याचे त्याने ठरविले आहे. हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने पुढे जाईल आणि प्रत्येक गावातील परिस्थितीशी जुळवून घेण्याचे त्यात धोरण राहील; आणि हे सर्व काम सतत करण्याची जबाबदारी प्रत्येक ग्रामदानी गावात एका कार्यकारी संघटनेने अगर संस्थेने घेतलेली असेल, हेही यात गृहीत आहे. संकलन-क्रियेच्याप्रत्येक पुढच्या पायरीत, तसेच शेतीचा नवा कार्यक्षम घटक निर्माण करताना ग्रामसंस्थेला जमिनीच्या वितरणसंबंधीचे आपले अधिकार वापरावे लागतील. हे अधिकार सतत ग्रामसंस्थेकडे राहून तिचा ती वापर करीत राहिली तरच हे क्रमाक्रमाने घडून येईल. आणि कोणत्याही अवस्थेत ग्रामसंस्था आपल्या अधिकाराचे विसर्जन करणार नाही किंवा स्वतःच्या विरुद्ध जातील असे कोणतेही नवे अधिकार ती निर्माण होऊ देणार नाही. म्हणून सुरुवातीला अगर जमिनीच्या फेरवाटपाच्या कोणत्याही पुढच्या पायरीत पुन्हा फेरवाटप यापुढे शक्य नाही अशी परिस्थिती निर्माण झाली तर मात्र कार्यक्रमातील लवचिकपणा नाहीसा होऊन ग्रामदानी गावातून प्रगतीचा दरवाजा बंद होईल. हे सर्व सारांशाने सांगावयाचे तर असे म्हणता येईल की ज्या गावामध्ये जमिनीचे पुनर्धारण व पुनर्वितरण सतत होण्याची शक्यता नाहीशी होईल ते गाव वस्तुतः ग्रामदानी गावच राहणार नाही. म्हणून सुरुवातीस ग्रामदानी गावाची व्याख्या करताना जे सांगितले ते, शेतीव्यवस्था प्रगतिपर व चांगली करण्याचे एक साधन या दृष्टीने ग्रामदानी गावातील कार्य चालण्यास आवश्यक असल्याचे दिसून येईल.

## दूरगामी परिणाम

ग्रामदानी गावासंबंधाने वर जे सिद्धांत मांडले आहेत त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. उदाहरणार्थ, राज्यामध्ये चालू असलेले नेहमीचे कूळहक्कासंबंधीचे कायदे ग्रामदानी गावाला लागू होणार नाहीत. कूळकायद्याची अंमलबजावणी जर तेथे चालू राहिली तर ग्रामदानी गावाच्या पुनर्रचना-कार्यातील सर्व लवचीकपणा नाहीसा होईल. म्हणून ग्रामदान झाले याचा अर्थ आजच्या सर्व प्रकारच्या जमीनधारकांचे जमिनीबाबतचे सर्व विद्यमान हक्क विसर्जित झाले एवढेच नव्हे तर विसर्जित झालेले हे हक्क पुढे पुनः केव्हाही कोणालाही बहाल करता येणार नाहीत हेही ठरवून टाकले आहे. यावरून ग्रामदानी गावातील शेतकरी व ग्रामसंस्था यांचे परस्पर संबंध केव्हाही काढता न येण्यासारखे कूळ व मालक अशा स्वरूपाचे होतात. असंरक्षित तात्पुरते कूळ असताना नेहमी जी दुःस्थिती व असहायता त्यांच्या वाट्याला येते ती यापुढे येणार नाही. याची त्यांना खात्री पटल्यास ग्रामदानी गावातील शेतकरी हा दर्जा पत्करण्यास तयार होतील. यासाठी ग्रामसंस्थेला हमी द्यावी लागेल की स्वतंत्रपणे शेती करणाऱ्या प्रत्येकाला जरूर ते कर्ज दिले जाईल. मग त्याच्या शेताचे आकारमान केवढेही असो. अगर कोणत्याही दर्जाचा तो शेतकरी असो; कोणत्याही जमिनीच्या तुकड्यावर त्याचे कायमचे अगर दीर्घ मुदतीचे हक्क असोत वा नसोत, त्याच्या आर्थिक सुरक्षिततेची काळजी ग्रामसंस्था वाहात आहे. एखादा जमीनीचा तुकडा अगर मालमत्ता कायमची ताब्यात असल्यामुळे जी सुरक्षिततेची हमी वाटते, निदान तेवढ्या सुरक्षिततेची हमी ग्रामसंस्थेने त्याला दिली पाहिजे. पुनर्धारणा व पुनर्वितरणाच्या अधिकाराची सतत अंमलबजावणी करतेवेळी ग्रामदानी गावातील सर्व कुटुंबांच्या आर्थिक हितसंबंधांची व सुरक्षिततेची काळजी सतत वाहण्याची जबाबदारी ग्रामसंस्थेवर आपोआप येऊन पडते; आणि समाजाचे सध्या जे घटक आहेत, त्यांच्यापुरतीच ही काळजी वाहावयाची नसून त्याचे जे अवलंबित असतील किंवा वारस असतील त्यांचीही काळजी वाहावी लागेल. कदाचित, ही देखील या जबाबदारीची अत्यंत संकुचित व्याख्या होईल. वस्तुतः ग्रामदान झाल्यानंतर गावात जे भूमिहीन असतील, त्यांना थोडी जमीन प्रथमतः देण्यात येते, यावरून हे सिद्ध होते की, ग्रामसंस्थेने घ्यावयाची जबाबदारी आज जे जमीन धारण करतात तेवढ्याच पुरती मर्यादित नाही. म्हणून जमीन असणारांची व नसणारांची व बिगर-शेतकऱ्यांची सर्वांची जबाबदारी घ्यावी लागणार. ग्रामकुटुंबाचा घटक असणाऱ्या प्रत्येकाच्या आर्थिक सुरक्षिततेची व कल्याणाची जबाबदारी ग्रामदानी गावाने खरोखरीच घेतली पाहिजे.*

## ३

कूळ—कायदे अमलात असताना ज्या अडचणी नेहमी येतात त्यांच्या दृष्टीने ग्रामदानी गावांची काय स्थिती होते ते आतां पाहू. यापैकी एक अडचण म्हणजे जमिनीची विक्री व जमीन तारण यांवर कर्ज मिळविण्याबाबतची असते. ग्रामदानी गावात ग्रामसमाज हाच जमिनीचा मालक (जमिनीसंबंधाचे सर्व वरिष्ठ हक्क धारण करणारा) असणार. त्यामुळे त्या गावातील जमिनीची विक्री अगर अन्य कोणतेही हस्तांतर करण्याचा किंवा त्या जमिनीवर कर्ज काढण्याचा हक्क ग्रामसमाजाखेरीज अन्य कोणालाही राहणार नाही. म्हणून जमिनीवरील बोजा निर्माण करून कर्ज उभारण्याची गोष्ट सर्वस्वी ग्रामसमाजाच्या अखत्यारीतील होते, व इतर कोणतीही व्यक्ती अगर संस्था ते करू शकत नाही.

* *केसरी*, १७-११-१९५७.

याचा अर्थ मध्यम मुदतीचे अगर दीर्घ मुदतीचे कर्जदेखील ग्रामसमाजानेच उभारले पाहिजे. यावरून साहजिकच हा निष्कर्ष निघतो की, ग्रामसमाज व कर्जउभारणी संस्था या दोन्ही एकच असल्या पाहिजेत. परंतु, ही काहीशी गैरसोयीची भूमिका सर्वस्वी स्वीकारलीच पाहिजे असे दिसत नाही. भारतातील जमीन-सुधारणाविषयक कायद्यांचा चालू कार्यक्रम पाहता दीर्घ मुदतीच्या कर्जासाठी जमिनीचे तारण आधारभूत मानण्याची पद्धत उत्तरोत्तर मागे पडत चालली आहे. जमिनीचे हस्तांतर अगर विक्री व जमिनीची किंमत ठरविण्याचे साधन या दोनही गोष्टी आज सामान्यतः अस्तित्वातच नाहीत. म्हणून जमिनीची किंमत व तिच्या तारणावर काढलेले दीर्घ मुदतीचे कर्ज यांचा पूर्वी जो संबंध होता, तो यापुढे राहणार नाही.

## ग्रामसंस्था व अन्य संघटना

विशिष्ट संमत पद्धतीने पैशाची गुंतवणूक करून व अपेक्षित प्रमाणात जमिनीच्या उत्पादनात सुधारणा घडवून आणून तद्द्वारा कर्जाची परतफेड करणे असे यापुढे दीर्घ मुदतीच्या कर्जाचे स्वरूप राहणार असून जमिनीच्या विक्रीशी–किमतीशी–त्याचा फारसा संबंध राहणार नाही. म्हणून ग्रामदानी गावांतील कर्जाबाबतची स्थिती व बाहेरील इतर ठिकाणची त्याबाबतची स्थिती यांमध्ये फारसा फरक राहणार नाही. त्यामुळे ग्रामसमाजानेच स्वतः कर्ज काढले पाहिजे असे न होता गावातील उत्पादकांची एखादी सहकारी संस्थाही तिचा विशिष्ट उत्पादन-कार्यक्रम असल्यास जमीन-तारणाशिवाय कर्ज मिळवू शकेल. जमिनीत अगर त्यावरील एखाद्या पक्क्या स्वरूपाच्या बांधकामात गुंतविलेल्या रकमेसाठी गावातील जमिनीचा अंतिम हक्कधारक या नात्याने ग्रामसमाजाला (ग्रामसंस्थेला) काही ठिकाणी अशा कर्जाची हमी द्यावी लागेल. अशा रीतीने नित्याच्या व्यवहारात ग्रामदानी गावांना विशेष अडचणी येणार नाहीत; तथापि, वर जे विवेचन केले आहे त्यावरून ग्रामसंस्था व गावातील अगर बाहेरील सरकारी संस्था व त्यासारख्या इतर संघटना यांचे परस्पर संबंध कसे राहतील, त्यांचे कायदेशीर स्वरूप कसे राहील, त्यांच्यामध्ये कामाची विभागणी कशी होईल इत्यादी संबंधाचे महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात.

## सद्यःपरिस्थितीतील अडचणी

विद्यमान कूळकायद्याबाबत आज ज्या अनेक अडचणी येतात त्या मुख्यतः त्यांच्या अंमलबजावणीबाबत येत असतात. स्वतःच्या मालकीची बरीचशी जमीन असणाऱ्या वरच्या थरांतील शेतकऱ्यांचे गावात जे जबरदस्त वजन असते त्यामुळे त्या बऱ्याचशा निर्माण होतात. कायद्याने ठरवून दिलेला खंडच कुळांनी द्यावा याची परिणामकारक अंमलबजावणी होत नाही; कारण कायदा काहीही असला तरी हे जमीन-मालक परंपरागत चालत आलेला खंड सक्तीने वसूल करतात आणि जमीन मिळविण्यासाठी कुळांमध्येही जी चढाओढ चालू असते त्यामुळेही कायद्यातील खंडाबाबतच्या तरतुदी परिणामकारक होत नाहीत. फक्त जेथे जमीनमालक परगावी असतो, किंवा क्वचित प्रसंगी गावातील वर्चस्व असणाऱ्या शेतकरी जमातीचा तो नसतो तेथे या खंडाबाबतच्या तरतुदींबाबतची काहीशी परिणामकारक अंमलबजावणी होत असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे जेव्हा जमीनमालक स्वतःच्या वजनाने कुळाकडून जमिनीच्या कबजाचे 'स्वखुशीचे' राजिनामे मिळवू शकतात, तेव्हा कायद्याने दिलेल्या कूळवहिवाटीच्या हक्काची शाश्वतीही निरर्थक ठरते.

ग्रामदानी गावांत अर्थात असले प्रश्न निर्माण होणार नाहीत, कारण प्रथम येथील मोठ्या शेतकऱ्यांनी आपला श्रेष्ठ दर्जा स्वखुशीने सोडलेला असतो; आणि नंतर जमिनीची न्याय्य वाटणी करण्याचा व

त्याचबरोबर-एकंदर उत्पादन-संघटना कार्यक्षम करण्याचा क्रमबद्ध कार्यक्रम येथे आखलेला असतो. अर्थात, सुरुवातीस केवळ नामधारी फेरवाटप होऊन पुढे कसलाही क्रमबद्ध कार्यक्रम आखलेला नसेल तर मात्र मोठ्या शेतकऱ्यांच्या वर्चस्वाचे दुष्परिणाम, केवळ त्या गावचे एकवेळ ग्रामदान झाले होते एवढ्याच कारणामुळे टळू शकणार नाही.

## उत्पादक व ग्रामसंस्था

जीवनचक्राशी संबंध असलेले असेही काही कूळहक्काबाबतचे अगर व्यवस्थेबाबतचे प्रश्न आहेत. निरनिराळ्या कारणांमुळे एखाद्या कुटुंबास मध्यंतरी शेती सोडून द्यावी लागते. त्यामुळे त्याच्या कूळवहिवाटीस लहान मोठ्या मुदतीचा खंड पडतो. नेहमीचे उदाहरण म्हणजे कुटुंबप्रमुख मेलेला असतो व पाठीमागे अज्ञान मुले राहिलेली असतात, आणि शेती करण्यास ती असमर्थ असतात किंवा समजा, असेही एखादे कुटुंब असेल की, ज्यातील एखादी दुसरी व्यक्ती गावाबाहेर अन्य ठिकाणी नोकरीधंदा करीत आहे व कुटुंबातील एकजण गावी शेती करीत आहे; आणि पुढे गावात राहून शेती करणाऱ्याच्या मृत्यूमुळे अगर अन्य दुर्बलतेमुळे कुटुंबाच्या शेतीत खंड पडला आहे व बाहेरगावी असणाऱ्या व्यक्तीही ताबडतोब गावी परत येण्यासारखी परिस्थिती नाही. तथापि, काही दिवसांनी परत येण्याचा त्यांचा निश्चित मानस आहे अशा सर्व प्रसंगी आपले शेतीवहिवाटीचे हक्क इतर कोणाकडे तरी अल्प अगर दीर्घ मुदतीने सुपूर्द करण्याची त्या कुटुंबाची इच्छा असणार व या मुदतीत त्या जमिनीपासून अज्ञानास मिळते, त्याप्रमाणात काही उत्पन्न मिळावे अशीही त्यांची इच्छा असणार. अशा प्रसंगी जमीन-पोटभाड्याने देण्याचा प्रश्न एका बाजूने निर्माण होतो; आणि दुसऱ्या बाजूने अज्ञान व्यक्ती सज्ञान होऊन स्वतः शेती करण्यास समर्थ होते किंवा बाहेरगावी असणारे लोक गावी येऊन कायमचे राहून शेती करू इच्छितात, त्यावेळी पुन्हा शेती धारण करण्याचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून जमीन पोटभाड्याने देता यावी व पुन्हा वहिवाटीसाठी काढून घेता यावी यासाठी सर्व कूळकायद्यांतून काहीतरी तरतूद करावी ही लागणारच. परंतु असे करावयाचे म्हणजे एकीकडे जमिनीचा निव्वळ खंड घेणारा एक वर्ग व दुसरीकडे केव्हाही काढता येणाऱ्या असंरक्षित कुळांचा वर्ग निर्माण होण्याची भीती असते; आणि ही भीती टाळून वरीलप्रमाणे काही तरतूद करणे फार कठीण आहे असे प्रत्यक्ष अनुभवासही आले आहे. पण ग्रामदानी गावांना हा प्रश्न यशस्वीरीतीने हाताळणे शक्य होईल. मागे ग्रामदानी गावांबाबत ज्या दोन गोष्टी गृहीत धरल्या आहेत त्यानुसार त्यांना हा प्रश्न हाताळणे सुकर होणार आहे. त्यांपैकी (१) ग्रामदानी गावातून जमिनीचे पुनर्धारण व पुनर्वितरण नेहमी शक्य असून ते सतत काही प्रमाणावर घडत आहे; आणि (२) गावातील सर्व जमिनीवरील व इतर नैसर्गिक साधनसंपत्तीवरील अंतिम मालकीहक्क ग्रामसमाजाचा असल्यामुळे या ग्रामकुटुंबाचा घटक असणाऱ्या सर्वांच्या आर्थिक गरजा पुरेशा प्रमाणात भागविण्याची तात्कालिक जबाबदारी ग्रामसंस्थेने—समाजाने—घेतलेली आहे. या आधारावर जमिनी पोटभाड्याने देण्याचा व पुन्हा त्या काढून घेण्याचा प्रश्न सोडविण्यात ग्रामसंस्थेला फारशी अडचण येणार नाही. कारण कोणत्याही कारणाने गावातील एखादे कुटुंब शेती करण्यास असमर्थ झाल्यामुळे त्याने ती सोडून दिली तर ती जमीन दुसऱ्या कोणाला देण्याची अगर तिचा अन्य काही उपयोग करण्याची मोकळीक ग्रामसंस्थेला असते. त्याचबरोबर कोणत्याही कारणाने का होईना गांवातील काम करणाऱ्या एखाद्या कुटुंबाची द्रव्यार्जन-शक्ती कमी झाल्यास त्या कुटुंबास योग्य ते काम पुरविण्याची अगर आर्थिक मदत करण्याची जबाबदारी ग्रामसंस्थेवर येते. त्याचप्रमाणे कुटुंबातील अज्ञान माणसे मोठी होऊन काम करण्यासारखी होतात किंवा बाहेरगावी गेलेली माणसे पुन्हा परत येतात त्यावेळी त्यांना

जमीन देण्याची अगर दुसरा काही कामधंदा देण्याची जबाबदारीही ग्रामसंस्थेवर येऊन पडते. अशा रीतीने गावातील सर्व साधनसंपत्तीचा उत्पादनासाठी सतत वापर करीत राहणे व त्याचबरोबर ग्रामकुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला कामधंदा पुरवून त्याच्या योगक्षेमाची तरतूद करणे या दोन्ही जबाबदाऱ्या ग्रामसंस्थेवर येतात आणि गावातील सर्व उत्पादक-साधनांवर ग्रामसंस्थेचा संपूर्ण ताबा असेल तरच तिला या जबाबदाऱ्या पार पाडणे शक्य होईल.

## ग्रामसंस्थेचे व्यापक कार्यक्षेत्र

जमीनीच्या पुनर्धारण व पुनर्वितरणासंबंधीच्या अधिकाराचा सतत उपयोग करीत राहणे ही यातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. मोठ्या प्रमाणावर होणारे पुनर्धारण व पुनर्वितरण बऱ्याच कालांतराने होत राहील व लहान प्रमाणावरील सतत होत राहील. कुटुंबाच्या व्यक्तिगत परिस्थितीत बदल होईल, त्याप्रमाणे सतत जुळवाजुळव करून घ्यावी लागेल. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूने बदलत्या कल्पनामुळे-किंवा दीर्घ मुदतीच्या एखाद्या कार्यक्रमातील महत्त्वाचा टप्पा गाठल्यामुळे तंत्रविषयक काही नव्या सुधारणा करावयाच्या असल्यामुळे किंवा एखादा नवा साहसी उपक्रम सुरू करण्यासाठी महत्त्वाचे बदल घडवून आणण्याची जरुरी भासल्यामुळे, या क्रिया गावातील सर्व साधनसंपत्तीवर एकसमयावच्छेदे कराव्या लागतील व त्यामुळे होणारे बदलही बरेच मोठे असतील. ग्रामसंस्था याप्रमाणे सतत कार्य करीत राहिल्यास वर उल्लेखिलेल्या कूळवहिवाटीबाबतच्या अडचणी आपोआप निवारण होतील.

ग्रामसंस्थेच्या जबाबदाऱ्या व कार्य यासंबंधाने मागे जे सिद्धांत मांडले त्यांमध्ये एक गोष्ट गृहीत आहे ती ही की, ग्रामसंस्था निव्वळ शेतीमध्ये लक्ष घालीत नसून शेतीखेरीज अन्य अर्थोत्पादक व्यवसायांतही तिचे लक्ष आहे. जमिनीचा व्यवस्थापक या नात्याने तसेच शेतकऱ्यांच्या एकंदर अर्थजीवनाचा व्यवस्थापक म्हणूनही ग्रामसंस्थेला, चारा, जळण व गावाशी संबंधित अशा इतर वनधनाची व्यवस्था पाहावी लागेल. गावातील सर्वांना काम देण्याची जबाबदारी ग्रामसंस्था जसजशी अधिकाधिक दक्षतेने घेत जाईल, तसतसे तिला ग्रामोद्योगाची उभारणी व संघटना करण्याच्या क्षेत्रात पदार्पण करावे लागेल. कारण गावातील लोकांना शेतीखेरीज इतरत्र काम देण्यास हेच क्षेत्र आहे. याखेरीज जमिनीचा व निसर्गसंपत्तीचा वापर प्रत्येक दृष्टीने सुधारण्याच्या व शेतीचे तंत्र सुधारण्याच्या ज्या क्रिया ग्रामसंस्थेला कराव्या लागणार त्या वेगळ्याच. या सर्व गोष्टी ग्रामीण उद्योगधंद्यांची संघटना व विकास करण्याचे जे सर्वसाधारण प्रश्न त्यांच्याशी निगडित आहेत; एवढेच नव्हे तर शेतीस वाढत्या प्रमाणावर भांडवल पुरवठा करणे, दळणवळणाची साधने सुधारणे, घरबांधणी, पाणी व वीज पुरवठ्याच्या सोयी अशांसारख्या अनेक प्रश्नांशीही त्या निगडित आहेत. अशा रीतीने ग्रामसंस्थेला गावातील सर्व अर्थोत्पादक कार्यांकडे सर्वांगीण लक्ष पुरवावे लागेल. यांतील पुष्कळ गोष्टी प्रत्यक्ष करण्याची जबाबदारी ग्रामसंस्थेने स्वतःवर घेण्याची जरुरी नाही. विशिष्ट कामासाठी विशिष्ट अशा सहकारी संघटना निर्माण करून त्यांच्या मार्फत त्या तिला करवून घेता येतील. खरोखरी, अनुभवांती असेही आढळून येईल की, ग्रामसंस्थेने स्वतःकडे जमिनीचा अंतिम हक्कदार व एक नियोजक व संयोजक एवढीच कामगिरी घेणे चांगले. आणि शेती-उत्पादन, शेतमालाचा व्यापार, प्रक्रिया इत्यादी निरनिराळ्या कामांची व्यवस्था त्या त्या कामासाठी असणाऱ्या स्वतंत्र संघटनांकडे सुपूर्द करणे बरे.

वर उल्लेखिलेल्या निरनिराळ्या अंगांचा विचार केल्यावर कदाचित असे आढळून येईल की, ग्रामीण समाजात बदल घडवून आणताना ज्या कित्येक ठिकाणी कठीण समस्यांना तोंड द्यावे लागते त्यांची समाधानकारक सोडवणूक ग्रामदानाने होऊ शकेल. वरच्या थरांतील शेतकऱ्यांची सत्ता त्यामुळे कोलमडेल; शेती–उत्पादन व शेतमालाचा व्यापार या क्षेत्रांतून व्यापारी–सावकारवर्गाचे उच्चाटन

होईल; कुटुंबाच्या वैयक्तिक धनसंपत्तीत होणाऱ्या बदलामुळे निर्माण होणारे शेतीव्यवस्थेचे अनेक प्रश्न त्यामुळे समाधानकारकरीतीने सुटतील; गावाची साधनसंपत्ती व अर्थोत्पादन–क्रिया यांचे यशस्वी रीतीने संघटन करता येईल; आणि अधिक समता निर्माण होऊन लोकांचा उत्साह वाढेल; व त्यामुळे अखेर सर्वांचाच फायदा होईल. हे सर्व साधावयाचे तर ग्रामदान चळवळीने आपले कार्यक्षेत्र कोणते व आपल्या जबाबदाऱ्या कोणत्या ते स्पष्टपणे ओळखणे तितकेच जरूरीचे आहे; पण याची जाणीव त्यातील कार्यकर्त्यांना झालेली दिसत नाही. आतापर्यंत त्यांची जी कल्पना आहे त्यापेक्षा कितीतरी व्यापक व विधायक कामगिरी त्यांच्या शिरावर आहे.

तथापि, ग्रामदानाचा एवढा व्यापक अर्थ केल्यामुळे ग्रामदानी गावाबाहेरच्या एकंदर समाजाशी, तसेच राज्यसरकारशी कसे संबंध राहावेत हे ठरविण्याचा प्रश्न अत्यंत निकडीचा व तीव्र होऊन बसतो. राज्यामध्ये अमलात असलेले कूळहक्कासंबंधीचे व जमीनसुधारणाविषयक बहुतेक कायदे या ग्रामदानी गावांना लागू करू नयेत हे वर स्पष्टच केले आहे. याखेरीज आणखी कितीतरी बाबतींत, उदाहरणार्थ, जमीन महसूल, पोलिस, जंगल, शेती, उद्योगधंदे व सहकार या खात्यांशी करावयाच्या व्यवहारांबाबत ग्रामदानी गावांचे विशेष स्थान कायद्याने ठरवून द्यावे लागेल. तसेच राज्यातील कारभारयंत्रणेशीही त्यांचे कसे संबंध राहतील, तेही ठरवून द्यावे लागेल. पण ग्रामदान हा 'एक महत्त्वाचा सामाजिक प्रयोग' असे त्याचे स्वरूप असेल तरच या गोष्टी करता येतील, म्हणून सरकारने अनेक बाबतीत ग्रामदानी गावांचे विशेष स्थान मान्य केल्यानंतरही एकंदर समाजाच्या दृष्टीने, तसेच सरकारच्या दृष्टीनेही हा प्रयोग योग्यरीतीने होत आहे व त्याची प्रगती योग्य दिशेने सतत चालू आहे, इकडे सरकारला लक्ष पुरवावेच लागेल. यासाठी या प्रयोगाचे अंतिम उद्दिष्ट कोणते, त्याची स्पष्ट व्याख्या करावी लागेल. कोणत्या दिशेने ते पुढे जात राहील, त्याचा वेग काय राहील, व या कामाचा किमान उठाव करण्याची जबाबदारी अखेर कोणत्या व्यक्तींवर व संस्थांवर राहील ते ठरवून द्यावे लागेल.

## 'ग्रामसंकल्प'

यासंबंधात ज्याचा बराच बोलबाला झाला आहे, त्या 'ग्रामसंकल्प' या कल्पनेचा येथे विचार करू. काही संकल्प करून ग्रामदानी गावांतील व्यवहार चालवेत, या ग्रामसंकल्पात गावकऱ्यांची मते प्रतीत व्हावीत, त्यांना स्वबुद्धीने निर्णय घेऊ द्यावेत, त्यासाठी बाहेरचे मार्गदर्शन अगर बंधन त्यांच्यावर राहू नये, अशी ही 'ग्रामसंकल्प' कल्पना असल्याचे सांगण्यात येते. तसेच हे करण्यासाठी कोणतीही संघटना अगर संस्था उभारण्याचे शक्य तेवढे टाळून सर्व गोष्टी लोकांनी स्वयंप्रेरणेने कराव्यात अशी ही कल्पना आहे. या कल्पनेमध्ये आध्यात्मिक अगर नैतिक मूल्ये कोणतीही असोत, सामाजिक व आर्थिक धोरणाच्या दृष्टीने विचार करता, ग्रामसंकल्पासाठी वरील प्रकारच्या गोष्टींना मान्यता देणे शक्य नाही, हे स्पष्टपणे लक्षात ठेवले पाहिजे. सुरुवातीस जमिनीचे काही दिखाऊ फेरवाटप होण्यापलीकडे कोणतीही गोष्ट ग्रामदानी गावात न झाल्यास ग्रामदान कसे वांझ ठरते, हे मागे सांगितलेच आहे. आणि असे गाव 'ग्रामदानी गाव' म्हणून नेहमीच्या कूळकायद्यांच्या व इतर कायद्यांच्या कक्षेबाहेरचे मानावयाचे म्हणजे सामाजिक व आर्थिक धोरणांचे विडंबनच म्हणावे लागेल. म्हणून एकदा ग्रामदान झाले आहे या सबबीवर त्याला 'ग्रामदानी गाव' म्हणून व्यवहारात समजणे केव्हाही इष्ट नाही. सुरुवातीला एकवेळ फेरवाटप झाल्यानंतर पुढे गावातील सर्व व्यवस्था अगदी स्थिर होऊन त्यात कोणतीही गती न राहिल्यास ते गाव पुन्हा नेहमीच्या सर्वसाधारण कायद्यांच्या व सरकारी धोरणाच्या कक्षेत आलेच पाहिजे. 'ग्रामदानी गाव' म्हणून ते गणले जावयाचे तर त्याने त्याच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत, त्या स्वीकारल्या पाहिजेत. तसेच ग्रामदानाच्या सामाजिक व आर्थिक तत्त्वज्ञानाची मूलभूत उद्दिष्टे गाठण्याची

त्याचा प्रयत्न असला पाहिजे. अर्थात, देशातील ठिकठिकाणच्या परिस्थितीमध्ये भयंकर तफावत आढळून येत असल्यामुळे ग्रामदानी गावांचे कार्य अगर यश मोजताना बरीच उदार दृष्टी ठेवावयास हवी. म्हणून काही प्रसंगी कार्यक्रमाचे टप्पे, किंबहुना थोड्या प्रमाणात कार्यक्रमाचा एकंदर नमुना आणि विशेषेकरून कार्यक्रम पुरा करण्यास लागणारा वेळ ही अगदी आखीव असण्याचे काहीच कारण नाही. पण काही सर्वांगीण मार्गदर्शन होत राहिले पाहिजे; तसेच सतत प्रगती करण्याची काही सर्वांगीण जबाबदारीही घेतलेली असली पाहिजे.

ही जबाबदारी कोण घेईल? प्रत्येक ग्रामदानी गावाने ती वेगवेगळी घ्यावी की एखाद्या भागात बरीच ग्रामदानी गावे असल्यास त्या सर्वांच्या एका संघटनेने ती घ्यावी? कोणत्याही परिस्थितीत सरकारला आपली अंतिम जबाबदारी टाळता येणार नाही. ही जबाबदारी घेणे म्हणजे वेळोवेळी प्रगतीचे मोजमाप करण्याचा हक्क व कर्तव्य बजावणे, मार्गदर्शन करणे, आणि शेवटी जरूर पडल्यास त्याला तात्पुरते बडतर्फ करणे किंवा ते सर्वस्वी ताब्यात घेणे, किंवा त्याला हद्दपार करणे या गोष्टी कराव्या लागतील. येथे हद्दपार करणे याचा अर्थ ग्रामदानी गावांच्या यादीतून ते काढून टाकणे.

ग्रामदान ही एका दृष्टीने मोठी अपूर्व चळवळ असून तिचे अनेकविध परिणाम आहेत व तिच्यात फार मोठे गर्भित सामर्थ्य आहे. ज्या ज्या ठिकाणी हा ग्रामदानाचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर होत असेल, तेथे खास काही कायद्यांची व इतर कारभारविषयक सोय करून देऊन त्याला योग्य तो प्रयोगावधी देणे जरूर आहे. या सर्व गोष्टी अल्पावधीत पूर्ण होणे शक्य नाही. म्हणून संपूर्ण सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून या प्रयोगाकडे पाहण्याची वृत्ती राहिली तरच त्याच्या यशासाठी कोणत्या गोष्टींची गरज आहे हे कळून येईल. पण सरकारला, तसेच या चळवळीस जबाबदार असलेल्या लोकांना या प्रयत्नांचे व प्रयोगाचे एकंदर कोणते परिणाम आहेत, व त्याबाबत आपली जबाबदारी कोणती याची सुरुवातीपासूनच जाणीव असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## यशासाठी लोकस्वीकृतीची आवश्यकता

शेवटी, या ग्रामदान चळवळीच्या संभाव्य प्रसाराबाबत दोन शब्द लिहिणे जरूर आहे. एक क्रियाशील संस्था या अर्थाने ग्रामदान चळवळीने एकदा मूळ धरले म्हणजे मग अनुकूल परिस्थितीत बाहेरच्या कोणत्याही मदतीविना व प्रचाराशिवाय तिची वाढ व प्रसार होत राहील. मग इतर सर्वसामान्य गावांचा साचा पसंत करावयाचा की ग्रामदान साचा पसंत करून आपला विकास घडवून आणावयाचा हे लोकांनी ठरवावे. ग्रामदान साचा पसंत केल्यास तेथे मिळणाऱ्या खास सवलतींचा व मदतीचा एका बाजूने जसा फायदा घेता येईल, त्याचबरोबर दुसऱ्या बाजूने विशेष प्रयत्न करण्याची व जबाबदारी पत्करण्याची तयारीही ठेवावी लागेल. तसेच इतर कायद्यांच्या बाबतीत ज्याप्रमाणे काही ठराविक मताधिक्याची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे 'ग्रामदान' पद्धतीत गणना होण्यासाठीही त्या गावातील आवश्यक ते मताधिक्य मिळवावे लागेल. कदाचित हे फार दूरवर पाहणे होईल. पण अशा रीतीने लोकांना विचारपूर्वक हवी ती पद्धत अगर साचा निवडण्याचे स्वातंत्र्य देऊन ग्रामदान चळवळ यशस्वी झाली तरच देशाचा सामाजिक व आर्थिक विकास व त्यासंबंधीचे धोरण यावर ती परिणामकारक रीतीने आपला प्रभाव पाडू शकेल.*

* *केसरी*, २४-११-१९५७ (इंग्रजीतून अनुवादित, अनु. य. कृ. सोवनी)

☆

# १० . . 'ग्रामदानाची प्रयोगभूमी' [प्रस्तावना]

विनोबाजींच्या भूदान चळवळीस सुरुवात होऊन दहा वर्षे झाली. या काळात चळवळीचे स्वरूपही बरेच पालटले. एका प्रदेशातील भूहीन शेतमजूर वर्गातील अशांतता शमविणे हे चळवळीचे तात्कालिक उद्दिष्ट होते. राष्ट्रव्यापी सामाजिक, राजकीय व आर्थिक क्रांती शांततेने घडवून आणणे हे तिचे आजचे उद्दिष्ट बनले आहे. परिवर्तनाचा दानमार्ग यास अजून प्राधान्य आहे, परंतु दानाची व्याप्ती वाढून भूमीबरोबर संपत्ती, समय, जीवन यांचाही आता दानात समावेश झाला आहे. प्रथमतः दत्त भूमीचे भूहीनांत वाटप करून त्यांस कृषीवल बनविणे एवढेच मर्यादित कार्य भूदान–कार्यकर्त्यांपुढे होते. आता एकेक ग्रामदान झाल्याच्या घोषणेपासून सुरुवात होऊन प्रत्यक्ष समग्र देशव्यापी क्रांती घडून येईपावेतो ग्रामदानकार्य संपले असे म्हणता येत नाही! अर्थात या प्रक्रियेत अनेक टप्पे अभिप्रेत आहेत आणि तीस कालावधीही फार लागणार हे उघड आहे. चळवळीचे स्वरूप पालटले ते हळूहळू, क्रमशः पालटले हे खरे; परंतु भूदान मागण्याचे सोडून मुख्यतः ग्रामेच मागू लागणे हे विनोबाजींच्या उत्कल पदयात्रेतच घडून आले. तसेच उत्कलच्या कोरापुट जिल्ह्यातच आजपावेतो इतरत्र कोठेही मिळाली त्यापेक्षा जास्त ग्रामदाने मिळाली आणि ग्रामदान–कार्यकर्त्यांतर्फे येथेच आपल्या विधायक क्रांति–कार्यक्रमाची खरी आखणी होऊन प्रत्यक्ष कार्यास सुरुवात झाली आहे, तेव्हा ग्रामदान क्रांती म्हणजे काय, तिचे मार्ग कोणते व तिजपासून काय अपेक्षावे, हे कोरापुटमधील कार्याची माहिती करून घेतल्यामुळेच कळण्याजोगे आहे.

श्री माजगावकर यांनी याच दिशेने आपल्या पुस्तकात प्रयत्न केला आहे. पुस्तक लिहिण्यापूर्वी अनेक दत्त–ग्रामांस त्यांनी भेट दिली व प्रमुख कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतल्या; तसेच उपलब्ध असलेली माहिती व आकडेही शक्य तेवढे गोळा केले असे दिसते. पुस्तकात ही सर्व वर्णनात्मक माहिती दिलेली आहे. एवढेच नाही तर त्यांनी स्वतःच्या निरीक्षणावरून या सर्व चळवळीबद्दल विवेचन करून काही निष्कर्ष काढले आहेत. हे सर्व उपयुक्त झाले आहे असे मला वाटते. इतर बाबीत इष्ट वाटत असलेला चिकित्सक दृष्टिकोन ग्रामदानासारख्या चळवळीबाबत अप्रस्तुत मानावा, याविषयी श्रद्धाळू वृत्तीच राखावी, असा मोठ्यांचा अभिप्राय आहे, असे काही वेळा दिसून येते. तेव्हा श्री माजगावकरांचे निष्कर्ष अगर त्यांची विवेचनपद्धती याबद्दल काही न लिहिता हा प्रास्तविक मजकूर या मूलभूत महत्त्वाच्या प्रश्नाच्या विचारातच अडवावा, असे मी योजिले आहे.

### ग्रामदान चळवळीचे स्थान

गेल्या दहा वर्षांतील विनोबांचे कार्य अनेक दृष्टींनी महत्त्वाचे व राष्ट्रास उपकारक ठरले आहे. भूदान-ग्रामदान चळवळीची शाश्वत फलप्राप्ती काय होते, याचा विचार न करताही या कार्याचे महत्त्व

मानले पाहिजे. एका व्यक्तीस शासन-संस्था अगर परंपरागत समाजसंघटना यांचा आधार न घेता, त्याकडे लक्ष न पुरविता, व्यक्ती व समाजातील सुप्त भावनांस निदान काही काळापुरते तरी कसे जाग्रत करता येते, हे विनोबांच्या पदयात्रेने दाखविले आहे. तसेच भारतातील निरनिराळ्या भाषा व विभिन्न परंपरा यांस दुर्लक्षून नव्हे तर त्यांचा परिपोष करून, त्यांतील मर्म सहेतुक विचक्षणपणे जाणून घेऊन, एक भारतीय भूमिका विश्वशांतीकरिता निर्माण करण्याचा महाप्रयत्न ते करीत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशातील, विशेषतः खेड्यातील, दैन्य व लाचारी यांकडे सतत लक्ष वेधण्याचे बिनमोल कार्यही त्यांनी केले आहे. याही पलीकडे सद्भावना व सद्विचार यांची सतत प्रेरणा ते देशास आपल्या संचाराने सारखी देत राहिले आहेत. हे सर्व कार्य भूदान–ग्रामदान चळवळी करीत असताना होत असले तरी त्याचा या कार्याशी तसा अभेद्य संबंध नाही. हे कार्य भारतीय परंपरेतील संत मालिकेतील इतरांनी केल्यासारखे कार्य आहे. स्वतःचे आचरण व सतत मनन, प्रवचन आणि संचरण यांच्या द्वारा भारतीय आध्यात्मिक व नैतिक वारशास विनोबाजी उजळा देत आहेत, जनतेस त्याचे नित्य स्मरण देत आहेत व राष्ट्रात विवेक व शांती यांचा प्रभाव टिकवीत आहेत, हे कार्य बिनमोल आहे.

भूदान–ग्रामदानाच्या चळवळीचे महत्त्वमापन करताना हे कार्य दृष्टीआड न झाले तरी ते प्रत्यक्षात विचारात घेण्याचे कारण नाही. संतांचे कार्य हे एका दृष्टीने स्थितिकालनिरपेक्ष असते. त्याचे लक्ष्य मानवसमाजाची नैतिक पातळी टिकविणे, वाढविणे, हे असते; अमुक काही घडवून आणणे हे नसते. या कार्यातील पारलौकिक अंश सोडला तरी ऐहिक विशिष्ट कार्यक्रमाच्या ऐवजी एकूण ते कसे करावे, कोणत्या वृत्तीने करावे, यावर त्यांचा भर असतो. व्यक्तिगत मुक्ती, मनःशांती, निर्वैरत्व कसे साधावे, याचे मार्ग संत सांगतात व दाखवितात. कोणत्याही काळात व परिस्थितीत संतांच्या कार्यामुळे तात्कालिक समस्या सुटण्यास अनुकूल मनोभूमिका तयार होते. पण हे कार्य सर्वसामान्य स्वरूपाचे आहे. हे सतत करीत राहाण्याचे असते. त्याचे विवक्षित उद्दिष्ट नसते, असू शकत नाही. काही तर असे म्हणतील की, संतांचे कार्य अहेतुक असते. ते स्वतःचे जीवन क्रमतात आणि केवळ सहाजिकपणे इतरांचा उद्धार करतात. विनोबांच्या पदयात्रेत ते असल्या प्रकारचे कार्य करतात हे वर सांगितलेच. त्यांच्या विवक्षित कार्यक्रमाबद्दल प्रचार करतानाही ते या स्वतःच्या मूलभूत भूमिकेचा विसर पडू देत नाहीत. परंतु खुद्द ग्रामदान चळवळीचा विचार करीत असताना आपणास शांती व सद्भावना यांपलीकडे जाऊन विवक्षित उद्दिष्टे व कार्यक्रम यांचा आपला देश व सद्यःकाळ यांच्या चाकोरीत विचार करावयाचा आहे.

हे लक्षात ठेवले म्हणजे तपशिलात जाऊन आजची परिस्थिती काय आहे, यात कोणते परिवर्तन व्हावे असे म्हटले जाते व ते कसे घडवून आणण्याचा कार्यक्रम आहे, व हे कोणत्या अंशी, कोठे व कोणत्या दिशेने प्रत्यक्ष घडत आहे, घडण्यासारखे आहे, या सगळ्याचा विचार करावा लागतो. हा विचार करताना प्रथम प्रामाण्यविचारापासून सुरवात केली पाहिजे. प्रामाण्य अनेक प्रकारचे असू शकते. पूर्वीच्या ऋषींच्या किंवा आजच्या संतांच्या उक्ती स्वतःसिद्ध आहेत, असे मानल्यास पुढील विचारच करावा लागत नाही. किंवा या उक्तींचा अर्थ काय एवढाच विचार शिल्लक उरतो. पण प्रत्यक्ष व्यावहारिक कार्यक्रमाचा विचार करताना युक्तायुक्तता व शक्याशक्यता या दोन्हींकडे लक्ष पुरवणे आवश्यक आहे. कोणत्याही कार्यक्रमाच्या युक्तायुक्ततेबद्दलचा अगर इष्टानिष्टतेबद्दलचा विचार प्रथमच करावा लागतो. हाही विचार केवळ सामान्यपणे करून चालत नाही. शांतिप्रधान, अहिंसात्मक समाजनिर्मिती असले सामान्य उद्दिष्ट सर्वमान्य होऊ शकेल; पण या समाजाची रचना व व्यवस्था कशी असणार, तो कसा चालणार, याबद्दल तपशील कळल्याखेरीज असल्या सर्वमान्यतेचा फारसा उपयोग नाही. ग्रामदान कार्यकर्त्यांतसुद्धा उद्दिष्टांबाबत मतभेद असू शकतात, हे श्री. माजगावकर दाखवितात. ग्रामदानाने

सामाजिक व आर्थिक क्रांती साधू शकेल असे म्हटले असता या क्रांतीनंतर समाजाचे सर्वांगीण स्वरूप कसे असेल व ही क्रांती कोणत्या रीतीने व कोणत्या टप्प्याने घडणार, हे स्पष्ट करणे जरूर आहे.

## अंतिम स्वरूप संदिग्ध

आज ग्रामदान क्रांतीचा विचार करताना तिचे अंतिम स्वरूप सुस्पष्ट नाही, ही एक मोठी अडचण आहे. उदाहरणार्थ, ग्रामदान विचारात स्वयंपूर्णता महत्त्वाची, असे सामान्यपणे मानले जाते. आर्थिक प्रगती व सुबत्ता ही सर्व प्रकारच्या श्रमविभागावर अवलंबून आहेत असे शास्त्रज्ञ सांगतात; व मानव-समाजाचा आजवरचा इतिहास हेच दर्शवितो असेही म्हणतात. ग्रामस्वयंपूर्णतेचा स्वीकार केला असता देशातील एकंदर उत्पादन घटेल व जीवनमान वाढण्याऐवजी कमीच होईल असे आज सर्वसाधारणपणे मानले जाते. हे होणार नाही किंवा झाले तरी हरकत नाही असे ग्रामदानवाद्यांस म्हणावयाचे असल्यास हे त्यांनी सयुक्तिक रीतीने मांडले पाहिजे व प्रत्यक्षात कसे घडू शकते, हे स्पष्ट करून दाखविले पाहिजे. आज याबाबत विचारात व कृतीत काहीही झालेले दिसत नाही. कोरापुटमधील ग्रामे जास्त स्वयंपूर्ण होण्याकरिता उत्पादनाची बैठक बदलण्याचा प्रयत्न केला नाही, इतकेच नव्हे तर अनेक ठिकाणी बाजारी उत्पादनाकडे लक्ष वाढविण्यात आले. तसेच अंचल वा तालुका संस्था काढतानाही स्वयंपूर्णतेकडे लक्ष दिलेले दिसत नाही. आता तर पुढील विधायक विकासकार्यक्रमाकडे ग्रामदान कार्यकर्त्यांनी लक्ष द्यावयाचे नाही, ते काम सरकारी यंत्रणेकडे सोपवावयाचे, असे ठरले. तेव्हा आर्थिक विकासाची व आर्थिक व्यवस्थेच्या कारभाराची दिशा ग्रामदान झाल्याने मुळीच बदलणार नाही व बदलावयाची नाही हे उघड आहे. असे झाले तरी वारंवार स्वयंपूर्णतेबद्दल ग्रामदान व सर्वोदय तत्त्वज्ञ व प्रचारक बोलतात यामुळे वैचारिक गोंधळ होणे अपरिहार्य ठरते.

## स्वयंपूर्णतेच्या मर्यादा

बरे, स्वयंपूर्णतेवर भर द्यावयाचा नाही असे ठरल्यास ग्रामदान तत्त्वज्ञांपुढील प्रश्न फार व्यापक होतो. ग्रामस्वयंपूर्णता अगर छोट्या जनपदांपुरती स्वयंपूर्णता हे उद्दिष्ट मानल्यास नागर अर्थव्यवस्थेचा प्रश्न महत्त्वाचा उरत नाही. कारण एकेक ग्राम किंवा लहान जनपद स्वयंपूर्ण झाल्यास मोठ्या शहरांची जरुरी उरत नाही व मोठ्या नागर वस्तींस आवश्यक असलेला धनधान्यादी पुरवठा होणेही शक्य नाही. तेव्हा ग्रामस्वयंपूर्णतेचा कार्यक्रम म्हणजे नागर अर्थव्यवस्था मोडण्याचा कार्यक्रम असे मानावे लागते. परंतु असल्याप्रकारची स्वयंपूर्णता ग्रामदानात अभिप्रेत नसल्यास ग्रामदानाच्या बरोबर नागर आर्थिक व्यवस्थेबाबतही काही कार्यक्रम या क्रांतिकारक मोहिमेत समाविष्ट करावा लागेल. भूदान-ग्रामदानाच्या जोडीस संपत्ती, समय व जीवनदान मागण्यात येऊ लागले आहे. परंतु दुकान-दान किंवा कारखाना-दानाची भाषा अजून ऐकू येत नाही. ग्राम स्वयंपूर्ण होणार व शहरे नाहीशी होणार, असे मानल्यास दुकान-दान किंवा कारखाना-दान न मागणे हे सयुक्तिक आहे. परंतु असे नसल्यास हल्लीची दान-मागणी फार एकांगी ठरते. खेड्यापुरता विचार केल्यास भूहीनांचे दैन्य डोळ्यांत ठळकपणे भरते. परंतु राष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेकडे पाहिल्यास शहर-खेड्यांतील फरक, शहरांतील मूठभर लोकांच्या हाती संपत्ती व सत्ता यांचे केंद्रीकरण हेच आजचे खरे राष्ट्रीय शल्य असे दिसू लागते. आजच्या ग्रामदानाच्या तत्त्वज्ञानात याचा विचारच कोठे झालेला नाही, ही मोठी उणीव आहे; एवढेच नव्हे तर ज्या कार्यक्रमात सत्ता-संपत्तीच्या या केंद्रीकरणाबाबत काय करावयाचे हे सांगितले नाही, त्याचे 'समग्र समाजात क्रांती घडवून आणणारा कार्यक्रम' असे वर्णन करणेच चुकीचे ठरते.

## तंत्राविषयीची भूमिका

स्वयंपूर्णतेबद्दल वर जे सांगितले तशाच प्रकारचे यंत्र व अमानुषी शक्ति यांचा वापर याबद्दलही मांडता येईल. ग्रामदान तत्त्वज्ञांची याबाबत भूमिका अजून स्पष्ट नाही. खुद्द विनोबा सोडल्यास आज या चळवळीतील सर्वच पुढारी वाहातुकीची व दळणवळणाची अत्याधुनिक साधने वापरतात. ही सर्व जर त्याज्य नसली, यांचा वापर नेहमी होणार असला, तर ही ज्यावर आधारित त्या सर्व गोष्टी–आधुनिक शास्त्रीय उत्पादन-तंत्र, यंत्रोत्पादनास लागणारे सर्व उद्योग, त्यांच्या अनुषंगाने प्राप्त होणारी व्यापार-पत या बाबतची व्यवस्था—ही सर्व ग्राह्य ठरतात. नवीन तंत्राचा स्वीकार घेताने, नियमित रीतीने व्हावा, ज्यायोगे आपली आजची आर्थिक घडी पूर्ण न बिघडेल, बेकारी न वाढेल अशा रीतीने परिवर्तन घडून यावे, या म्हणण्यास कोणी विरोध करणार नाही. परंतु नवीन तंत्र हळूहळू तरी स्वीकारल्याखेरीज तरणोपाय नाही, त्याशिवाय आपले सामर्थ्य व संपत्ती वाढणार नाहीत, या विचाराऐवजी ते कधीच स्वीकारार्ह नाही, त्याशिवाय आपले भागेल व शांत व समाधानी समाज निर्मिता येईल असे म्हणणाऱ्यांनी आपले म्हणणे आकड्यांत तपशिलात स्पष्ट मांडून दाखविले पाहिजे. नाहीतर आधुनिक तंत्र प्रत्यक्षात आपल्या कामापुरते वापरावयाचे, बोलण्यात मात्र त्याचा निषेध करावयाचा व असे करून बौद्धिक गोंधळ माजवून त्याच्या प्रागतिक विचारास अडथळा आणावयाचा, याखेरीज काही साधते असे दिसत नाही.

## ग्रामदानाने क्रांती कशी होणार ?

हे विचार जरा पुढचे म्हणून बाजूस सारून केवळ ग्रामव्यवस्थेतील क्रांतीबाबत तात्पुरता विचार करता येईल. येथे उद्दिष्टांबाबत काही न लिहिता मार्ग व व्यवहार यांविषयीच काही मुद्दे उपस्थित करतो. पहिला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्रामदानाने क्रांती होते हे केव्हा सिद्ध झाले असे मानावयाचे ? मूलोद्योगी शिक्षण म्हणजे काय हे प्रत्यक्षात स्पष्ट न होता, त्याचे फायदे-गैरफायदे काय हे अनुभवाने सिद्ध न करता आपण त्याचा स्वीकार केला. परिणामी अजूनही त्याची व्याप्ती व उपयुक्तता ही ठरलेली नाहीत आणि त्याचेपायी साधनांचा व संपत्तीचा अपव्यय झाला व होत आहे. ग्रामदानाबाबत असेच करायाचे तर निराळे. मग मूलोद्योगी शिक्षणामुळे जेवढी क्रांती झाली तेवढीच ग्रामदानाने होईल ! तसे पाहिले तर ग्रामदानाने क्रांती कशी होणार, याविषयी मूलोद्योग शिक्षणपद्धतीबद्दल जेवढा विचार झाला आहे तेवढाही झालेला नाही. किंबहुना ग्रामदानतत्त्वज्ञांत एक वर्ग असा दिसतो की, त्यांच्या मते असा विचार होण्याचीही जरुरी नाही. ग्रामांतील लोकांनी दान करण्याचे ठरविले म्हणजे झाले. पुढे काय होणार हे पाहणे अगर सांगणे कोणाकडेच नाही. हे सर्व ग्रामसंकल्पाने व्हावे. ग्रामांतील मंडळींनी स्वतः जमिनीचे वाटप कसे करावयाचे व यापुढे काही करावयाचे किंवा नाही हे ठरवावयाचे. ग्रामदान करा, असे सांगण्यापलीकडे काही जबाबदारी ग्रामदान तत्त्वज्ञांची व प्रचारकांची नाही. लोकांवर आपली मते लादू नयेत, सर्व स्वयंस्फूर्त व्हावे, म्हणून अशी वृत्ती स्वीकारावी असे सांगण्यात येते. यासही काही हरकत घेण्याचे कारण नाही. एवढेच की, एकदा ही वृत्ती स्वीकारली म्हणजे ग्रामदानानंतर-ग्रामदानामुळे-क्रांती तर राहोच, पण अमुक एक काहीही होते असे म्हणण्यास त्यांना काही अधिकार, आधार उरत नाही. अशा परिस्थितीत ग्रामदानानंतर जमिनीचे फेरवाटपही इष्ट मार्गाने होईल असे सांगता येत नाही. थोडेबहुत मार्गदर्शन होऊनही कोरापुटमध्ये जमीनवाटपाबाबत असमाधानकारक परिस्थिती कशी राहिली, हे श्री माजगावकर यांनी दाखविले आहे.

केवळ ग्रामसंकल्पावर अवलंबून न राहता ग्रामदान कार्यकर्त्यांनी काही जबाबदारी स्वीकारावी असे म्हटल्यास कोरपुट जिल्ह्यांतील प्रयोग फार महत्त्वाचा ठरतो. कारण, इतरत्र मंगरोठसारखे एखादे

एकाकी खेडे सोडल्यास ग्रामदान कार्यकर्त्यांनी विचारपूर्वक कार्यक्रम आखून काही काळ सातत्याने त्याचा पाठपुरावा केल्याचे उदाहरण नाही. कोरापुटमधील प्रयोगाचे वर्णन करणे हा श्री. माजगांवकर यांच्या पुस्तकाचा प्रमुख उद्देश असल्यामुळे त्याबद्दल मला काही लिहिण्याचे कारण नाही. पण तेथील अनुभवावरून एक-दोन गोष्टी स्पष्ट दिसतात त्यांकडे येथे लक्ष वेधतो.

## व्यापक वा कार्यक्षम यंत्रणेची निकड

कोरापुटमधील अनुभवाचा विचार करता पहिली गोष्ट जी ध्यानात येते ती ही की, क्रांती या शब्दाने अभिप्रेत असलेली प्रक्रिया फार मूलगामी व व्यापक आहे. समाज अगदी प्रथमावस्थेत असला तरी त्याची व्यवस्था एकदम बदलता येत नाही. आणि परिवर्तन समजावून, शांततेने घडवून आणावयाचे असल्यास कार्य सातत्याने दीर्घकाल झाले पाहिजे. इतर सर्व गोष्टी कोरापुटमध्ये अनुकूल असूनही जमीन-वाटप समाधानकारक रीतीने सर्व ग्रामांत होऊ शकले नाही व जेथे जाणते कार्यकर्ते मार्गदर्शन करण्यास सारखे उपलब्ध नव्हते तेथे वाटपापलीकडे काहीच झाले नाही. तेव्हा क्रांतीची गोष्ट राहोच, पण साध्या विकासकार्यास सुरुवात करावयाची तरी सरकारी यंत्रणेहून अधिक व्यापक व कार्यक्षम यंत्रणा ग्रामदान कार्यकर्त्यांस तयार करावयास हवी.

दुसरे असे की, ग्रामदानातील विकासकार्याचा क्रांतिकारक असा काही निराळा साचा नाही; अजून तरी तयार नाही. रूरल क्रेडिट सर्व्हे समितीच्या कार्यक्रमाच्या धर्तीवर तातडतोबीने आपण काम सुरू करणे अवश्य आहे हे लक्षात येण्यासच ग्रामदान कार्यकर्त्यांस काही वेळ लागला. ही गोष्ट लक्षात आल्यावर पैसा पुरविणे, खरेदी-विक्रीची व्यवस्था करणे आणि या व्यवहाराशी कृषिसुधारणेचा मेळ बसविणे या गोष्टी सोप्या नाहीत, प्रत्येकात विचारपूर्वक काम करण्यास माणसे हवीत हे स्पष्ट झाले व हे सर्व करीत असता सरकार व सरकारी कार्यपद्धती यांच्याशी जुळवून घेणे अपरिहार्य होते हे लक्षात येऊ लागले. एवंच ग्रामविकासाबाबत आज जेवढा विचार देशात झालेला आहे, अनुभव आलेला आहे, तेवढा पचवून आपल्या क्षेत्रात कसे काम करावे, हेच अजून ग्रामदान कार्यकर्त्यांस पुरते शिकावयाचे आहे.

ग्रामदान कार्यकर्त्यांस काही नवीन सुचावयाचे नाही, यावयाचे नाही, असा याचा अर्थ नाही. किंबहुना ग्रामविकासाच्या अनेक क्षेत्रांत देशातील आजवरचा विचार व अनुभव ही अत्यल्प आहेत. त्यातल्या त्यात खुद्द लोकावर विशेष भिस्त टाकून ग्रामात उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा पूर्ण उपयोग करून समाजातील सर्व थरांस उत्साहित व कार्यान्वित करून विकास समसमाजनिर्मितीच्या दृष्टीने घडवून आणण्याबाबत कोठेच विचार व कार्य आज झालेले नाही. मुद्दा एवढाच की, हे कार्य ग्रामदानाची घोषणा झाली व कार्यकर्त्यांच्या मनाची तयारी झाली म्हणून झाले, अशा प्रकारचे नाही. ग्रामदान कार्यकर्त्यांनी प्रथम आजच्या पडलेल्या चाकोरीत कार्य कसे होते हे पूर्ण समजावून अनुभविले पाहिजे. नंतर सतत निरनिराळे प्रयोग करून, खोल विचार करून आपल्या दृष्टिकोनातून, विशिष्ट कार्यपद्धतीचा अवलंब करून विकासकार्यास अभिनव फलदायी वळण कसे लावता येईल हे हळूहळू सिद्ध केले पाहिजे. पण हे करावयाचे तर अनेक सुजाण कार्यकर्त्यांची मोठी साखळी निर्माण करून ती वर्षानुवर्षे कार्यान्वित केली पाहिजे व हे सर्व होत असताना लोकांचा मूळचा उत्साह व विश्वास ही टिकविली पाहिजेत.

## तंत्र-मुक्तीचा आग्रह

हे आज होताना दिसत नाही. यास अनेक कारणे आहेत. माणसांची वाण हे तर एक मुख्य कारण आहेच; परंतु काही भरीव विधायक कार्य करण्याची संधी आहे असे दिसून आल्यास पुरेसे नाहीत तरी आजच्यापेक्षा पुष्कळ अधिक कार्यकर्ते मिळू शकावेत. ग्रामदान कार्यकर्त्यांत काहीजण पुढील कार्याबाबत

काहीच जबाबदारी पत्करावयास तयार नाहीत. शिवाय जे विधायक कार्य करू इच्छितात त्यांतही मार्ग व साधने यांबद्दल मतभेद आहेत. काम करण्याकरिता संघटना निर्माण करण्याचे कारण नाही, सर्व दृष्टीने तंत्रमुक्ती झाली पाहिजे, हा आग्रह मोठ्यांचा आहे. टिकाऊ संघटनेशिवाय विधायककार्य सतत होत राहिले तर उत्तमच. पण जोवर हे कसे होऊ शकते ते कोणी प्रत्यक्ष कृतीने दाखविले नाही तोवर या आग्रहाच्या योगे केवळ विलंब लागतो, कार्याची उत्कृष्ट संधी फुकट जाते, असे म्हणणे प्राप्त आहे. सरकारी अधिकाऱ्यांशी संबंध काय ठेवायचे, सहकारी कायद्यान्वये प्राथमिक मंडळे स्थापावयाची किंवा नाही, याबाबतच्या किरकोळ वादांत सुरुवातीचा फार मोलाचा व मोक्याचा वेळ कोरापुटमध्ये वाया गेला. किरकोळ म्हणण्याचे कारण असे की, गेल्या काही महिन्यांत पूर्ण पलट खाऊन, सरकारशी सहकार्य व सरकारी नियमान्वये कारभार करावयाचा, एवढेच नाही तर पुढील बहुतेक सर्व कारभार सरकारी यंत्रणेवरच सोपवावा, असा निर्णय घेण्यात आला आहे. एका दृष्टीने या निर्णयामुळे भावी क्रांतीच्या दृष्टीने ग्रामदानाचा विचारच करण्याचे कारण उरत नाही. ग्रामदानात प्रथम वाटपापासून सुरुवात करून हळूहळू पूर्णपणे समताशील व प्रगत समाज निर्माण करणे, सतत विधायक प्रयत्न या दिशेने होत राहिले तर संभाव्य आहे, असे माझे मत आहे. परंतु ग्रामदान कार्यकर्त्यांनी फक्त प्रचार करावयाचा, काही थोड्या केंद्रांत सहकारी संस्था उभारावयाच्या, इतरत्र सर्व सरकारी यंत्रणेवर–त्यातल्यात्यात दिल्लीहून चालविल्या जाणाऱ्या यंत्रणेवर–सोपवावयाचे तर, इतर विकास योजनांच्या पद्धतीने व साधारणपणे त्यांच्याच वेगाने ग्रामदान खेड्यांतील भावी प्रगती होणार, त्यात क्रांतिकारक व अभिनवही काही राहणार नाही, हे उघड आहे. तंत्रमुक्तीवर भर देऊन सहकारी संस्था प्रचलित कायद्यानुसार उभारणे व नोंदणे यांसही हरकत घेता घेता सरकारी यंत्रणेत सर्व महत्त्वाचे कार्य विलीन करण्याचा निर्णय ग्रामदान-कार्यकर्त्यांनीही घ्यावा, ही गोष्ट खेदाची व देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने निराशा, निदान निरुत्साहजनक मानली पाहिजे यात शंका नाही. तार्किक अव्यवहार्य सिद्धान्त प्रत्यक्ष व्यावहारिक प्रगतीस कसे मारक ठरतात याचे हे उत्कृष्ट उदाहरण समजावयास हरकत नाही.

## चिकित्सक विचार आवश्यक

विनोबांच्या पदयात्रेच्या कालात महाराष्ट्रास अश्रद्धावान ठरवून चिकित्सक विचार अवहेलण्याच्या अविवेकी विचाराने पुन्हा डोके वर काढलेले दिसते. खरी गोष्ट अशी आहे की, सद्बुद्धीने चिकित्सा करणे, प्रश्न विचारणे हे आस्तिक्यबुद्धीचे लक्षण आहे, नास्तिक्यबुद्धीचे नाही. अंती, सुसंगत विचार व अनुरूप आचार या कसोट्या संतानाही जश लावते. आधी केले मग सांगितले, हे नसले तरी निदान सांगितल्यावर करून दाखवायचा प्रयत्न करणे आवश्यक आहे, ही गोष्ट व्यक्ती व समाजपरिवर्तनाबद्दल बोलणाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. सर्वोदयवाद्यांच्या मानव व मानवसमाजाबद्दलच्या अपेक्षा फार मोठ्या; परंतु त्यांच्यातले जे अनेक प्रत्यक्ष राजकारणात व व्यवहारात उतरले, त्यांतील जवळजवळ सगळ्यांचे वर्तन अगदी प्राकृतजनांसारखे दिसून आले. विनोबांची गोष्ट निराळी, म्हणून संत विनोबांना सर्वत्र मान आहे. पण जेव्हा ते पुढे जाऊन क्रांतीबद्दल बोलतात, स्वतःला क्रांतिकारक म्हणवितात तेव्हा या क्रांतीचे उद्दिष्ट, तिचे मार्ग व त्यांची व्यवहार्यता यांचा चिकित्सक दृष्टीने विचार करणे प्राप्त होते, कर्तव्य ठरते. क्रांतिकारी विनोबांना प्रश्न विचारले म्हणून संत विनोबांचे अवमूल्यन केले असे कोणीच मानण्याचे कारण नाही. यात फक्त शुद्ध विचार करणे व डोळसपणे वर्तणे याची परंपरागत जबाबदारी आम्ही पार पाडीत आहोत एवढेच समजावयाचे.

मालगावकर, श्री. ग, *ग्रामदानाची प्रयोगभूमी,* (पुणे : राजहंस प्रकाशन, १९५८) पृ० १–८.

☆

# ११ . . आयात-निर्यात धोरणात निश्चिततेची आवश्यकता

१ ऑक्टोबर १९६० ते ३१ मार्च १९६१ पर्यंतचे भारत सरकारचे आयातविषयक धोरण नुकतेच जाहीर झाले आहे. या सहा महिन्यांत, सेवनीय पण अनावश्यक वस्तू आणि ज्यांचे येथील उत्पादन वाढले आहे अशा वस्तूंच्याच आयातीत कपात होणार आहे. कापड, मद्य, स्पिरिट, कांच, टाईमपिसेस, कच्ची फिल्म आणि मोटारीचे सुटे भाग या त्या विशेष वस्तू होत. अशा तऱ्हेची कपात करताना येथील औद्योगिक उत्पादनाचा वेग कायम राहील आणि राष्ट्राच्या सुप्त शक्ती औद्योगीकरणासाठी उपयोगात येतील अशासाठी सरकार प्रयत्नशील आहे असा निर्वाळाही देण्यात आला आहे. प्रत्यक्ष जे वस्तूंचा वापर करतात अशांची कक्षा वाढविणे आणि सुप्रतिष्ठित अशा आयातदारांचे क्षेत्र कमी करणे अशाच धोरणाने सरकार पावले टाकीत आहे असे या सर्व धोरणाचे समर्थन करताना एका सरकारी प्रवक्त्याने सांगितले. अशा रीतीने या कालखंडात आयात-कपातीने सुमारे तीन कोटींची बचत होईल असा अंदाज आहे.

अर्थमंत्री श्री देसाई हे राष्ट्रकुलातील अर्थमंत्र्यांच्या परिषदेहून आले. आता आणखी २० वस्तूं-बाबतचे धोरण जाहीर होईल. या वस्तूंचा उत्पादनाशी प्रत्यक्षतः असा संबंध पोचत नाही. तसेच त्याबाबत एड-टू-इंडिया क्लबशी होणारी बोलणीही विचारात घेतली जातील.

खालील वस्तूंबाबत धोरण लवकरच जाहीर होणार आहे : खजूर, सुपारी, मसाले, सूत, कागद, फोटोग्राफीचे सामान, घड्याळे, टायर, ट्रॅक्टर्स, मशीन टूल्स, ऑपरेशनची हत्यारे, हिरे इत्यादी.

परदेशी चलनाची चणचण असली तरी साखर-कारखान्यांची यंत्रसामग्री आणि माती हलविण्याच्या यंत्रसामग्रीचे सुटे भाग यांच्या आयातीत थोडी वाढच करण्यात आली आहे.

चालू वर्षातील पहिले ७ महिने जरी घेतले तरी त्यांत रु. ६१३ कोटींची आयात आणि रु. ४०८ कोटींची निर्यात झालेली दिसेल. म्हणजे २०५ कोटी रुपये घटच आपण सोशीत आहोत असा त्याचा अर्थ आहे. या दृष्टीने सर्व वर्षाचा (१९६०) अंदाज केला तर सुमारे रु. २६४ कोटींच्या घरात ही रकम जाईल व आयात-निर्यातीचा समतोल बिघडलेला दिसेल. १९५९ चा विचार केला तर हा अंदाज अधिक आहे असे म्हणता येणार नाही. ऑगस्टपासून पुढील ५ महिन्यांत आशादायक परिस्थिती दिसते, कारण 'सिझनल' अशा काही बाबींची निर्यात होईल असा अंदाज आहे.

फिल्मच्या आयातीत कपात केल्याने त्या धंद्यावर विपरीत परिणाम होण्याचा संभव नाही, कारण सिनेमाच्या फिल्मची लांबी कमी करण्याचे ठरविले आहे. बंगाली फिल्म ११,००० फूट, हिंदी १३,००० आणि तामीळ १५,००० फूट अशी लांबी मान्यच करण्यात आली आहे. अन्य कोणतीही फिल्म १२,००० फुटांपेक्षा कमीच असेल.

पोलादाच्या आयातीचा विचार केला तर त्यात या दोन वर्षांत घटच झालेली दिसून येईल. १९५८ साली रु. ९८ कोटींची, तर १९५९ साली ८४ कोटींची आयात झाली. १९६०-६१ सालात यापेक्षाही कमी आयात करावी लागेल. न्यूजप्रिंटचा विचार केला तर एकूण पुरवठ्यात कपात केली जाणार नाही, पण 'नेपा' कागदाचे प्रमाण पूर्वी ५ टक्के होते ते आता १० टक्के करण्यात येणार आहे. नेपा कागदाचे उत्पादनही आता वाढत्या प्रमाणावर आहे. काही वस्तूंच्या आयातीबाबत मूलभूत असा कालखंड म्हणजे १९५७-५८ व १९५८-५९ हा धरण्यात आला आहे. पाऱ्याची आयात ही किमतीची जी सट्टेबाजी केली जाते त्यासाठी वापरण्यात येईल. किमती फार चढू नयेत म्हणून ती आयात उपयोगी पडेल.

सरकारने याबाबत काढलेल्या पत्रकात आयातीत अधिकाधिक काटकसर करण्याच्या धोरणाचा पुनरुच्चार करण्यात येऊन उद्योगपती आणि सुप्रतिष्ठित असे आयात-परवानेदार यांच्यावरच सर्व मिस्त आहे, असे त्यात म्हटले आहे. आयातदारांना दिलेले परवाने आणि ठरवून दिलेले भाग (Quota) यांचा ते शहाणपणाने उपयोग करून आयात जिनसांचे योग्य वाटप उत्पादनात वाढ करण्यासाठी मदत करून जिनसांच्या भावांतील पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतील अशी आशा त्यात व्यक्त करण्यात आली आहे.

आपली पौंडी गंगाजळी ही झपाट्याने कमी होऊ लागली आहे. जानेवारी १९६० मध्ये ती रु. २०७.८१ कोटी रुपये होती, ती जुलैत रु. १५३.२३ कोटी रुपये झाली, आणि सप्टेंबर १६ तारखेला तर ती रु. १४६.५ कोटी रुपये झाली. सप्टेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात ती आणखी रु. ३ कोटींनी खाली गेलेली आहे!

## निर्यात व्यापारात घट

देशाचा निर्यात व्यापार अधिकाधिक वाढत जाण्याऐवजी आयातीच्या मानाने तो एकसारखा घटतच आहे आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या काही वर्षांतच त्याबाबत कसा पेचप्रसंग निर्माण झाला हे खालील आकड्यांवरून कळून येईल :-

| सन | आयात (कोटी रुपये) | निर्यात (कोटी रुपये) |
|---|---|---|
| १९५५ | ६७३ | ६०८ |
| १९५६ | ८१५ | ६१४ |
| १९५७ | १०२६ | ६३८ |

१९५८ चे आंकडे घेतले तर ३१६ कोटी रुपयांची अधिक आयात करण्यात आली आहे असे दिसेल. याचा अर्थ असा की, गेली काही वर्षे आपल्या परदेशी व्यापारातील समतोल ढळला आहे आणि देशाची त्या प्रमाणात पिछेहाटच झाली आहे. स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशन ज्या देशांशी रुपयांच्या चलनात व्यापार करते त्यांचा १९५९ साली ६० कोटींचा व्यवहार होता; पण या वर्षी तो रु. ८० कोटीपर्यन्त जाईल असा भरंवसा वाटतो. भारत-पाकिस्तान व्यापार १९५९ साली रु. १२ कोटींचा होता, तो या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत जेमतेम १२.३४ कोटीपर्यन्त गेला असून त्यात वाढ

होण्याची शक्यता आहे, पण १० वर्षांपूर्वीच्या या व्यापार-व्यवहारात जमीन-अस्मानाचा फरक पडला आहे; मग त्याची कारणे काहीही असोत.

अशा रीतीने निर्यात व्यापारात घट होत असल्याने हा पेचप्रसंग उत्पन्न होत आहे. त्यासाठीच आयातीत घट करावी या उद्देशाने सरकारने हे पाऊल टाकले आहे. पण त्याची थोडी तपासणी करणे जरूर आहे.

व्यापारासाठी परदेशी हुंडणावळ आवश्यक असते; आणि ती निर्यात व्यापारातून प्राप्त होत असते. निर्यात व्यापार जर घटला तर त्या मानाने परदेशी हुंडणावळ कमी मिळते आणि आपल्या गरजेच्या वस्तू आपणांस आयात करता येत नाहीत. भारतासारख्या अविकसित अर्थव्यवस्था असलेल्या देशाला लोकांच्या सेवनीय वस्तू आयात कराव्या लागतात; शिवाय उत्पादनाचा वेगही कायम ठेवावा लागतो. त्यासाठी मशिनरी आणि कित्येक आवश्यक जिनसा आयात कराव्याच लागतात. पौंडी चलन असलेल्या देशांशी त्या त्या चलनात व्यवहार करावा लागतो आणि ते देश औद्योगिक दृष्टीने पुढारलेले असल्याने आपणांजवळ जर त्यांचे चलन नसेल तर अर्थातच आपणांस आपले औद्योगीकरण किंवा अशाच उत्पादनवाढीसाठी आवश्यक असा लागणारा माल मिळणार नाही आणि आपल्या विकासक्षम अशा अर्थव्यवस्थेला धक्का बसेल. यासाठी व्यापाराची आखणी वरील गोष्टी ध्यानात घेऊनच करावी लागते.

अन्नधान्याची आयात हा आपल्या अर्थव्यवस्थेवर मोठाच ताण आहे. १९५१ ते १९५९ या काळात सुमारे १०७५ कोटी रुपयांचे चलन केवळ अन्नधान्यासाठी खर्ची पडले आहे. याचाही विचार चलनातील चणचण होत असताना होणे क्रमप्राप्त आहे. पण भारत सरकारचे अन्नखाते 'स्टेट ट्रेडिंग'ला डावलून धान्य आयात करून देशातील धान्याच्या भावाची पातळी स्थिर राखण्याचा निष्फळ प्रयत्न करीत आहे. त्याला कोण काय करणार!

## निर्यात-संवर्धक मंडळे

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत निर्यात-संवर्धक मंडळे स्थापून निर्यातीत वाढ करण्याचा प्रयत्न झाला. २५ देशांशी व्यापाराचे करार झाले. दुसऱ्या योजनेच्या कालखंडात सरासरीने निर्यात व्यापार रु. ५८८ कोटींचा अपेक्षित होता, तो रु. ६१० कोटींपर्यंत गेला; पण १९५७-५८ मध्ये युरोप व अमेरिका यांमध्ये मंदीचा प्रभाव पडल्याने निर्यात व्यापारात अधिक प्रगती करता आली नाही असे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात म्हटले आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत वार्षिक रु. ६९० कोटी इतका निर्यात व्यापार वाढेल अशी अपेक्षा करण्यात आली आहे. उत्पादन वाढले पाहिजे आणि निर्यातक्षम अशा वस्तूंची निर्मितीही वाढली पाहिजे. तसेच, व्यापारी पिके वाढली पाहिजेत, शिवाय अन्नधान्यांचे उत्पादनही वाढले पाहिजे आणि या सर्वांचा समतोल साधला गेला तरच योग्य दिशेने प्रगती होईल. आता या दिशेने प्रगती साधावयाची म्हणजे व्यापारी धोरण ठरवून भागत नाही. त्याचा संबंध भांडवल उभारणे व भांडवल गुंतवणूक या प्रक्रियेशी येतो आणि भावांची पातळी स्थिर ठेवणे ही गोष्ट तर सर्वांच्या मुळाशी आहे. चलनवाढ केल्यावाचून अविकसित देशांत औद्योगीकरण होऊ शकत नाही, ती अपरिहार्य असते अशा सिद्धांतामुळे देशात चलनवाढ चालूच आहे. पण त्यामुळे चलनवाढ व भाववाढ यांचा पाठशिवणीचा खेळ चालू असतो. आत्यंतिक चलनवाढीमुळेही हुंडणावळीच्या क्षेत्रात अरिष्ट निर्माण होते हे आता मान्य होऊ लागले आहे. दुसऱ्या योजनेत सुमारे १२०० कोटींची चलनवाढ झालीच. तिसऱ्या योजनेत ती ५५० कोटींची अपेक्षिण्यात आली आहे. पण ती प्रत्यक्षात कोठवर जाईल याचा नियम नाही. अशा रीतीने निर्यात व्यापार व हुंडणावळ यांचा संबंध सर्व आर्थिक प्रक्रियेशी निगडित असा आहे.

दीर्घ मुदतीचे आयात-निर्यात धोरण असणे ही प्राथमिक गरज आहे. आपल्याकडे विशिष्ट परिस्थितीनुसार धोरणात फरक केला जातो. निर्यातीचा भाग बहुधा देशातील किमतीनुसार ठरविला जातो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात आपल्या उत्पादनाची किंमत जेव्हा घसरलेली असते, तेव्हा आपला माल निर्यात केला जातो. त्याचा परिणाम असा होतो की, बाजारातील किमतीवरही त्याचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? संबंधित व्यापाऱ्यांच्या सल्ल्याने सरकारचे आयात धोरण ठरत असते. समाजवादी समाजरचनेची वाटचाल करणारे ह्याचे समर्थन कसे करणार ?

*केसरी*, १४-१०-१९६०.

☆

# १२ . . भाववाढ व नियोजन

देशाचा नियोजित आर्थिक विकास घडवून आणावयाचा याचा अर्थ असा की, आपोआप स्वाभाविकपणे हा होत नाही म्हणून समाजाने, सरकारने दूरवर विचार करून दीर्घकालीन सर्वांगीण योजना आखून, अर्थव्यवहाराचे नियमन करणे आणि त्यास गतिमान करणे. पूर्वापार चालत आलेल्या अर्थव्यवहाराच्या घडणीत विकास व इष्ट प्रगती सहज योग्य दिशेने होत असती तर मुद्दाम खटाटोप करण्याचे कारण नव्हते. अनिर्बन्ध व्यवहारात हे साधत नाही, उलट अनेक वेळा पुच्छप्रगती होते, हा आपल्या देशातील एक शतकाहून अधिक काळाचा प्रत्यक्ष अनुभव. या करिता स्वातंत्र्योत्तर, आपण नियोजनाच्या कल्पनेचा स्वीकार केला व ती अमलात आणण्याचा गेली दहा वर्षे प्रयत्न करीत आहो. पण नियोजित विकासात काय अभिप्रेत आहे, कोणती धोरणे अवलंबिणे आवश्यक आहे, हे अजून मध्यवर्ती मंत्रीमंडळास नीटसे कळले अगर पटले नाही. ही गोष्ट अलीकडील भाववाढीवरील लोकसभेमधील चर्चा व वक्तव्ये यावरून पुन्हा स्पष्ट झाली आहे. अनिर्बन्ध व्यवहारांत सर्व थरावरच्या व सर्व प्रकारच्या अर्थव्यवहाराची दिशा व गतीही बाजारभावांत घडून येणाऱ्या दैनंदिन व दीर्घकालीन फरकांमुळे ठरली जातात असा सर्वमान्य सिद्धांत आहे; याच्या उलट नियोजित अर्थव्यवहारांत अर्थव्यवहाराचे स्वरूप व परिणाम एक तर प्रत्यक्ष ठरविले जातात अगर किमतीचे अनेकविध नियंत्रण करून त्याचे नियमन करण्यात येते. तेव्हा भाववाढ या विषयाशी सर्वच नियोजन-नियमांचे प्रश्न निगडित आहेत हे उघड आहे. प्रस्तुत प्रसंगी अलीकडील वादात उपस्थित झालेल्या केवळ एक-दोन प्रमुख मुद्द्यांचे थोडे विवेचन करणार आहे.

## भाववाढीविरुद्ध उपाययोजनेची निकड

ज्या देशांत विकास योजना मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आल्या आहेत तेथे भाववाढ होणे अटळ आहे; इतकेच नव्हे, तर भारतात झालेली गेल्या दशकातील भाववाढ इतर देशांच्या मानाने कमीच आहे, असा एक मुद्दा सरकारतर्फे मांडण्यात आला आहे. आर्थिक प्रगती झपाट्याने घडवून आणावयाची तर सर्वत्र भांडवलाची गुंतवणूक व रोजगारीत वाढ मोठ्या प्रमाणात झाली पाहिजे; यामुळे सर्व बाजारात तेजीचे वातावरण निर्माण होऊन भाववाढीची प्रवृत्ती दिसून यावी हेही स्वाभाविक आहे; परंतु जेथे नियोजन खऱ्या अर्थाने आहे तेथे ही प्रवृत्ती सहज आहे म्हणून तिला मोकळा वाव दिला असे होत नाही. किंबहुना अर्थव्यवहारास गतिमान करण्याचा प्रयत्न केला म्हणजे भाववाढ होऊ शकेल हे आधीच लक्षात आणून त्याविरुद्ध उपाय योजून ठेवले जातात, आणि कोणत्या दिशेने भाववाढ पूर्ण रोखावयाची व कोणत्या दिशेने कोणत्या प्रमाणात ती होऊ द्यावयाची हे ठरवून त्यानुसार नियमन केले जाते. महायुद्धकाळी सर्व युद्धमान राष्ट्रात हे फार तपशीलवार करण्यात

आले. प्राप्त परिस्थितीत किती तपशीलात, कोणत्या प्रकारे नियमन करावयाचे याचा विचार निरनिराळ्या प्रकारे होऊ शकतो. परंतु, भाववाढ विकास-योजनेमुळे अटळ आहे असे म्हणणे म्हणजे आमची अर्थव्यवस्था नियोजितच नाही असे सांगण्यासारखे आहे.

## तर्कदुष्ट युक्तिवाद

इतर देशांतील भाववाढीशी तुलना करून भारतात ज्याअर्थी जास्त वाढ झाली नाही त्याअर्थी आमचे काही चुकत नाही हा युक्तिवाद पूर्णपणे तर्कदुष्ट आहे. इतर, विशेषतः पुढारलेल्या उद्योगप्रधान देशांतील अलीकडील आर्थिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट बेकारी टाळणे हे असते. त्यामुळे अर्थव्यवहाराचा कोणत्याही रीतीने संकोच होणार नाही यावर भर दिला जातो आणि चलनवृद्धी व भाववाढ यांचा सतत धोका पत्करावा लागतो. परंतु याच धोरणाचा दुसरा परिणाम असा होतो की, अर्थोत्पादन सारखे वाढत राहते व दर डोई उत्पन्न व मजूरवर्गाचे जीवनमान हे प्रतिवर्षी सुधारत असतात. जीवनमान सतत वाढविण्याकरिता मजुरीचे दर चढतीचे ठेवणे हे इतके सर्व-सामान्य झाले आहे की, अनेकांस गेल्या दशकातील भाववाढीचे हेच प्रमुख कारण आहे असे वाटते. या इतर देशात भाववाढ झाली आहे हे खरे, पण ही भाववाढ ज्या धोरणामुळे घडून आली त्यामुळेच भाववाढीपेक्षाही फार मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय उत्पन्न व सामान्य जीवनमान यांत वास्तविक वाढ झाली. आपल्या देशाची परिस्थिती अशी नाही. दरडोई उत्पन्न विकास-योजनेमुळे अल्प प्रमाणात वाढले असेल, परंतु सामान्य जीवनमानावर याचा काय परिणाम झाला हे इतके विवाद्य आहे की, सरकारासच राष्ट्रीय उत्पन्नाच्या वितरण-संशोधनाकरिता एक उच्चपदस्थांची समिती नेमावी लागली. या समितीस दोन वर्षांहून अधिक काम करून अजून निश्चित अहवाल तयार करता आला नाही.

## बाजारभावांचे महत्त्व

सामान्य माणसाच्या दृष्टीने बाजारभाव दोन प्रकारे महत्त्वाचे ठरतात. एक तर ग्राहक म्हणून नित्याच्या उपभोगाच्या वस्तूंच्या गोष्टींचे भाव व दुसरे बहुसंख्य उत्पादक शेतकरी, म्हणून शेतमालाचे हंगामातील विक्रीचे बाजारभाव. भाववाढीस सुरुवात झाली तर उत्पन्न, निदान तितक्या प्रमाणात, बहुतेकांचे वाढत नाही. म्हणून सामान्य माणसाची मागणी व अपेक्षा अशी की, जीवनावश्यक पदार्थांच्या किमती स्थिर राहाव्या. राष्ट्रीय आर्थिक धोरणाचे हे प्रमुख उद्दिष्ट म्हणून सर्वत्र मानले जाते. आपल्या देशातील सर्वसामान्य जीवनमान इतके निकृष्ट आहे की, अन्न व वस्त्र आणि बहुतांशी अन्न यांवरच यातला मुख्य खर्च होतो. तसेच अन्न या सदराखाली तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, कडधान्ये, मीठ, मिरची, गूळ, तेल हीच महत्त्वाची आहेत. यामुळे जीवनावश्यक पदार्थांच्या किमती स्थिरावणे याचा शेतमालाच्या बाजारभावाच्या हालचालीशी अत्यंत निकट संबंध येतो. शेतमालाच्या किमतीविषयी, शेतकरी व सामान्य ग्राहक यांचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत अशी सर्व साधारण समजूत आढळून येते. शेतकऱ्यांच्या दृष्टीने भाव चढीचे असणे हितावह व ग्राहकांच्या दृष्टीने उतरलेले असणे चांगले अशा विचारावर ही समजूत आधारित आहे. दूरवर वास्तविक विचार केला तर प्रत्यक्षात असा विरोध नाही असे आढळते. शेतकऱ्याच्या दृष्टीने भाव किफायतशीर असल्यास ते सारखे वाढत राहणे हे खरोखर हितावह नाही. भाव स्थिरावण्यात ग्राहकांप्रमाणेच शेतकऱ्यांचेही हित आहे, हे दोन प्रकारे : भाववाढ सारखी होत असली म्हणजे शेतमालाच्या किमतीबरोबरच शेतकऱ्यास उत्पादनास व उपभोगास लागणाऱ्या पदार्थांच्या किमतीही वाढत राहतात. त्या बऱ्याच वेळा शेतमालाच्या किमतीपेक्षाही अधिक

प्रमाणात वाढतात आणि मग भाववाढीचा तादृश फायदा शेतकऱ्यांच्या पदरात पडत नाही. ज्या प्रमाणात शेतकरी छोटा, त्या प्रमाणात हे घडण्याचा संभव अधिक असतो.

## शेतमालाच्या विक्रीची पद्धत

याहून अधिक महत्त्वाचा विचार हल्लीच्या शेतमालाच्या विक्रीच्या पद्धतीतून उद्भवतो. भारतातील बहुसंख्य शेतकरी अजून सावकारी-व्यापारी पद्धतीच्या दडपणातून मुक्त झालेला नाही. सावकारी काही प्रमाणात कमी झालेली असली तरी शेतमालाची विक्री अजून पूर्णपणे व्यापारी वर्गाच्या हातात आहे. याचा परिणाम असा होतो की, उत्पादक शेतकरी आपल्या मालाची विक्री बहुतांशी हंगामात अल्पावधीत करून टाकतो, व तदनंतर मालाचा साठा वर्षातील बहुतेक महिने व्यापारी वर्गाच्या हातात राहतो. हंगामात शेतमालाचे भाव उतरणे व हंगामानंतर काही महिन्यांनी ते मोठ्या प्रमाणात वाढणे हे प्रतिवर्षी घडते व शेतमालाच्या किमतींची वाढ होत राहिली तरी तिचा फायदा फार मोठ्या प्रमाणात उत्पादकांस न मिळता व्यापारी वर्गास मिळतो. एवंच, शेतमालाच्या या किमती वाढत राहण्यापेक्षा त्या शेतकऱ्यांस परवडतील अशा पातळीवर स्थिरावणे व किमतीतील दलाली–अडतीचा भाग कमी होऊन योग्य हिस्सा उत्पादकांस मिळणे हे शेतकऱ्याच्या दृष्टीने इष्ट आहे; आणि येणेप्रमाणे किमती स्थिरावल्या म्हणजे निर्वाहखर्च सारखा वाढत न राहील हे साधणे सुकर होते. म्हणून सामान्य माणसाचे व शेतकऱ्यांचे अंतिम हित स्थिर भाव ज्यायोगे साधतील अशा धोरणात आहे. असे धोरण अंमलबजावणीत आणण्याचे दोन भाग पडतात. एक भाग शेतमाल किमान भावात सतत खरेदी करणारी एक सरकारी सहकारी यंत्रणा तयार करणे. दुसरा भाग जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिरावण्याकरिता त्यांच्या अधिकृत विक्रीची व्यवस्था, विशेषतः नागर विभागात, ठिकठिकाणी करणे.

## शेतमालाच्या किमती स्थिरावण्याची आवश्यकता

अंमलबजावणीच्या व्यवस्थेच्या तपशिलात शिरण्याचे हे स्थळ नव्हे; पण मूळ धोरणाबद्दल एक दोन गोष्टींकडे लक्ष वेधतो. शेतमालाच्या किमती स्थिरावण्याचे धोरण हे जगन्मान्य आहे. श्रीमंत–गरीब, उद्योगप्रधान–कृषिप्रधान अशा सर्व प्रकारच्या देशांत हे अवलंबिण्यात येते. विविध प्रकारच्या आर्थिक धोरणांत हे महत्त्वाचे समजले जाते. ब्रह्मदेश–सिलोन पासून जपान–अमेरिकेपर्यन्त शेतमालाच्या खरेदीची सरकार मान्य व्यवस्था आढळून येते. साम्यवादी राष्ट्रांत शेतमालाच्या किमती नियंत्रित आहेतच; परंतु पश्चिम युरोपीय राष्ट्रांतही त्यांचे मान राष्ट्रीय पातळीवर दरवर्षी ठरविण्याच्या अनेक विविध व्यवस्था आहेत. फोर्ड फाउंडेशनच्या अमेरिकन तज्ज्ञांनी तयार केलेल्या उत्पादनवाढीच्या सर्वांगीण योजनांच्या मसुद्यात शेतमालाच्या किमान किमतीची शेतकऱ्यांस हमी देणे ही बाब महत्त्वाची मानली होती. याचप्रमाणे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिरावण्याची काळजी प्रत्येक विकासक्षम राष्ट्राने घेतली पाहिजे, असे सर्व राष्ट्रीय संस्थांचे अहवाल व तज्ज्ञ अट्टाहासाने प्रतिपादतात. नाहून भाववाढ–मजुरी व वेतनवाढ असे दुष्ट चक्र निर्माण होऊन विकासाची प्रगती खुंटते. मौज अशी की, हे दोनअंगी धोरण व दुहेरी योजना यांचे निरूपण व पुरस्कार भारताचे नियोजनमंडळ आज अनेक वर्षे करीत आहे.

असे असता अर्थमंत्री भाववाढ अटळ आहे असे प्रतिपादतात व कृषिमंत्री भाववाढ झालीच नाही असे एकेवेळेस ठोकून देतात, तर दुसऱ्या वेळेस उत्पादनवाढीने हा प्रश्न सुटणार असा भविष्यावर हवाला देऊन मोकळे होतात. यांपैकी कोणीच पुढच्या–मागच्याचा साकल्याने विचार करीत नाही. शाश्वत दीर्घकालीन धोरण काय हवे, ते कसे अमलात आणावयाचे, याविषयी आपल्या अडीअडचणी

सांगून विवेचन करण्याऐवजी पावसाळ्यात वाढलेल्या किमती दिवाळीनंतर आपोआपच उतरतील एवढ्या अंदाजावर तात्पुरती उडवाउडवी करतात हे आज अनेक वर्षे चालले आहे. आणि यामुळे आपल्या नियोजित विकासाच्या प्रगतीत अडचणी उत्पन्न होत आहेत; प्रगती जी होत आहे ती एकांगी होते आणि तिचे फायदे सामान्यांस मिळत नाहीत असे घडत आहे.

हे न कळत होते असे म्हणणे कठीण आहे. मग सर्वसामान्य धोरण अवलंबिण्यात एवढी टाळाटाळ का व्हावी ? अंदाजच करावयाचा तर दोन मुख्य कारणे दिसतात. एक तर हे धोरण अमलात आणावयाचे म्हणजे कारभार कार्यक्षम हवा, व तो बारकाव्याने झाला पाहिजे. काही करू गेले तर ते नीट झाले नाही म्हणून लोकापवाद पत्करण्यापेक्षा केलेच नाही तर बरे असा विचार प्रभावी असावा. दुसरे असे की, या धोरणामुळे ग्रामीण जीवनावरील सावकारी–व्यापारी पकड मोठ्या प्रमाणात कमी होईल. हे शक्य तितक्या दूरवर ढकलणे ज्यांस इष्ट वाटते त्यांजकडून दिरंगाई होणे साहजिकच आहे. या दोन्हीबाबत केंद्रसरकार व राज्यसरकारे दोन्ही सारखी दोषी दिसतात. पण सरकार-पक्षाखेरीज इतरांवरही हल्लीच्या परिस्थितीबाबत मोठी जबाबदारी येऊन पडते. शेतमालाचा व्यापार समाज-नियंत्रणाखाली यावा या अशोक मेहतासमितीच्या मूलगामी शिफारशींचा कोणत्याच विरोधीपक्षाने आग्रहाने अगर सातत्याने पाठपुरावा केला नाही; आणि भाववाढविरोधी चळवळी पावसाळ्यातील छत्र्यांसारख्या बहुशः हंगामीच ठरतात. कदाचित बाजारभाव-नियंत्रण व नियोजन यांचा किती निकट संबंध आहे व या नियमनात सर्वांचेच सारखे हित कसे आहे याची कल्पना जितकी सार्वत्रिक व्हावयास हवी तितकी अजून झाली नसावी.

*केसरी*, ११–१०–१९६२.

☆

# १३ . . भारताचे युद्धकालीन आर्थिक धोरण

चिनी फौजांनी भारतीय सेनेवर हल्ला करून युद्ध सुरू केल्याला अनेक दिवस होऊन गेले आहेत. आणि युद्धाची परिस्थिती दीर्घकाल टिकून राहणार अशी स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. दीर्घकालीन लढाईत सेना व शस्त्रबलाइतकेच महत्त्व आर्थिक बळाचे आहे. तेव्हा आपल्या युद्धकालीन धोरणाचा सांगोपांग विचार करून अर्थव्यवहारास शक्य तितक्या लवकर योग्य वळण देणे आवश्यक ठरते.

## युद्धाचे सर्वस्पर्शी परिणाम

युद्धामुळे राष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीत अनेक बदल घडून येतात. सर्व आघाड्यांवर सैन्यबल, शस्त्रबल व आवश्यक साहित्य यांचा पुरवठा सतत टिकावा या उद्दिष्टांचा अर्थव्यवहाराच्या प्रत्येक अंगावर परिणाम होतो. शस्त्रास्त्राचे उत्पादन वाढवावयाचे झाल्यास अनेक प्रकारच्या चालू कारखान्यांच्या व उद्योगाच्या साह्याने ते करावे लागते. त्यामुळे त्यातील प्रचलित उत्पादनाचा संकोच होतो. सैन्यास व युद्धोपयोगी कार्यात गुंतलेल्या इतरांस योग्य पोषण व आरोग्य लाभावे याकरिता सर्व प्रकारच्या आवश्यक वस्तूंचा व सोयींचा पुरवठा करण्याकरिता राष्ट्रीय उत्पादनातील लहानमोठा वाटा मुद्दाम वेगळा काढावा लागतो. युद्धकार्याकरिता माणसे व माल यांची वाहतूक विशिष्ट दिशांनी करावी लागल्यामुळे वाहतुकीच्या उपलब्ध साधनांची मांडणी नवीन तऱ्हेने करावी लागते. युद्धाचे मान वाढून त्यासाठी अधिक माणसांची गरज भासू लागल्यास इतर व्यवसायांतून त्यांस नियोजनपूर्वक काढून त्या व्यवसायांची नवीन घडी बसवावी लागते. ज्या प्रमाणात युद्ध व्यापक व दीर्घकालीन असेल त्या प्रमाणात हे परिणाम मोठे व सर्वस्पर्शी असतात.

## चलनवृद्धी व भाववाढ

सरकारी खर्चाबाबत असाच फार मोठा परिणाम युद्धामुळे घडून येतो. युद्धकार्याकरिता आवश्यक खर्च जसा लागेल तसा करावा लागतो. सरकारी खजिन्यातील शिल्लक किंवा खर्चास मिळावयाची तांत्रिक संमती इत्यादि गोष्टींचे बंधन या कामी पाळता येत नाही. युद्धपूर्वकालीन अंदाजपत्रकात या वाढत्या खर्चाची तरतूद नसल्यामुळे सुरुवातीस तरी हा सर्व जादा खर्च असतो. यामुळे आयव्ययात मेळाची निश्चिती नसते; आणि तुटीचा अर्थव्यवहार करण्याखेरीज सरकारला गत्यंतर उरत नाही. तुटीचा अर्थव्यवहार म्हणजे सरकार तिजोरीत पैसा असो वा नसो, मालखरेदी किंवा इतर आवश्यक अर्थव्यवहार याकरिता लागणारा पैसा तात्बडतोबीने उभारून खर्च करणे. सरकारला किंवा त्यास अंकित असलेल्या मध्यवर्ती बँकेला पैसारूपाचे चलन हवे तेवढे वाढविण्याचा अधिकार असल्यामुळे नवीन नोटा

छापून किंवा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज काढून तुटीच्या अर्थव्यवहारातील पैशाची गरज भागविली जाते. तुटीचा अर्थव्यवहार म्हणजे चलनवृद्धी असे समीकरण याप्रकारे बसते. चलनवृद्धीचा परिणाम आर्थिक परिस्थितीवर थोड्या अधिक प्रमाणात लवकरच दिसून येणे अपरिहार्य असते. सरकारने वाढत्या चलनाच्या आधारे बाजारातील सर्व प्रकारच्या वस्तूंची खरेदी सुरू केली म्हणजे इतरांस उपयुक्त मालाचा पुरवठा कमी होतो. त्यांच्या हातांतील क्रयशक्ती ही मात्र पूर्ववतच राहते. यामुळे सरकारने इतर कोणतेही नियमनियंत्रण न केल्यास वस्तूंचे भाव वाढणे अटळ असते आणि अशी भाववाढीची क्रिया एकदा सुरू झाली म्हणजे तिची व्याप्ती व वेग एकसारखे वाढतच राहतात. भाव वाढले म्हणून सरकारी खर्चाचे मान वाढले, त्यामुळे चलनवृद्धीचे परिणाम वाढले आणि परिणामी भाव अधिकच वाढले असे दुष्ट चक्र सुरू होते.

## जीवनावश्यक वस्तूंच्या नियमित वाटपाची आवश्यकता

युद्धकालीन सरकारी आर्थिक गरजांचा वस्तुनिष्ठ विचार केला किंवा पैशाच्या दृष्टीने विचार केला तरी दोन्ही रीतीने निष्कर्ष एकच प्रकारचे निघतात. चलनवृद्धि अपरिहार्य असली तरी तिचे बाजार-भावावरील परिणाम शक्य तितके टाळणे वा सौम्य करणे हे अगत्याचे ठरते. तसेच, ज्या प्रकारच्या साधनांचा व वस्तूंचा पुरवठा युद्धकार्यास मोठ्या प्रमाणावर लागतो, ती नेहमीच्या पद्धतीनुसार बाजारात खरेदिणे हे युद्धकालात अनेक दृष्टींनी अशक्य व अनिष्ट असते. तेव्हा अनेक प्रकारचे उत्पादन ताब्यात घेऊन त्यास विशिष्ट वळण देणे, वाहतुकीची साधने व सर्वप्रकारच्या उत्पादनास आवश्यक असलेल्या काही महत्त्वाच्या वस्तूंचे अधिकृत वाटप करणे या गोष्टी युद्धकार्य आणि सामान्य व्यवहार विनायासे चालण्याच्या दृष्टीने आवश्यक असतात. वाहतूकव्यवस्थेवर ज्या प्रमाणात ताण पडतो, त्या मानाने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सार्वत्रिक, सारखा व सर्वकाळ होण्याबाबतची अनिश्चितता वाढते. आवश्यक वस्तूंचे विषम वाटप व त्यामुळे उत्पन्न झालेल्या स्थानिक तुटी यांचा परिणाम म्हणून अनेक महत्त्वाच्या वस्तूंचे भाव ठिकठिकाणी वाढीस लागून व्यवहारात अडचणी उत्पन्न होतात. चलनवाढीमुळे किंवा स्थानिक तुटीमुळे निर्माण झालेल्या भाववाढीच्या प्रवृत्तीस प्रत्यक्ष आळा घालणे हे कठीण असते. भाव-नियंत्रण सर्वंकष करणे अशक्यप्राय असते. तेव्हा सामान्य लोकांच्या जीवनावश्यक वस्तू व साधने यांचे नियमित वाटप हाती घेऊन तेवढ्यापुरते तरी शक्य तितके भाव ठरवून देणे हे सरकारी धोरणाचे सूत्र असावे लागते. याकरिता मोठी यंत्रणा उभारावी लागते व किमान पक्षी कार्यक्षम होईल असे पाहावे लागते. हे कार्य कठीण पण ते स्वीकारून पार पाडल्याखेरीज कोणत्याही युद्धमान आधुनिक राष्ट्रास तरणोपाय नसतो.

## विकास धोरणाशी साम्य

युद्धकालीन आर्थिक धोरण व विकास योजनेच्या काळात अनुरूप आर्थिक धोरण यांत बरेच साम्य आहे. उत्पादनास विशिष्ट वळण लावणे व उपभोगाचा संकोच करून बचत शक्यतोवर वाढविणे, उत्पादनास आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या वस्तू व वाहतूक वगैरे साधनांचे वाटप नियंत्रित करणे, जीवनावश्यक वस्तू सर्वत्र, समप्रमाणात, योग्य भावात सर्वांस उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणे, सरकारी कारभाराचा बोजा जनतेवर समप्रमाणात पडेल, त्यायोगे आर्थिक विषमता वाढणार नाही, अशी काळजी घेणे, या सर्व गोष्टी युद्धकाल किंवा विकासयोजनांचा काल या दोहोत सारख्याच आवश्यक असतात. गेल्या दहा वर्षांत वरीलप्रमाणे नियोजनास योग्य असे धोरण अवलंबिले गेले असते तर युद्धकालीन अर्थव्यवहारासाठी आवश्यक असलेले वळण लगेच देणे सोपे झाले असते.

त्यामुळे अर्थव्यवहार अधिक शिस्तबद्ध झाले असते. विषमता वाढू न दिल्यामुळे आणि भाववाढीस आळा घातल्यामुळे जनतेवरील बोजा सह्य झाला असता. युद्धकालात आवश्यक असलेल्या आर्थिक प्रयत्नांस अनुकूल पार्श्वभूमी उपलब्ध झाली असती.

दुर्दैवाने याकडे दुर्लक्ष केले गेले. म्हणून युद्धकालीन धोरणाच्या दृष्टीने आता प्राथमिक अवस्थेपासून सुरुवात करावी लागेल. ही सुरुवात युद्धकाळी कोणते आर्थिक धोरण इष्ट व आवश्यक आहे हे नीट कळून घेण्यापासून करावी लागेल असे दिसते. गेल्या पंधरवड्यात पुढाऱ्यांनी ज्या घोषणा व जी वक्तव्ये केली त्यांवरून युद्धकालीन आर्थिक गरजांची कल्पना स्पष्ट होत नाही. उदाहरणार्थ, युद्धकार्यात फंड उभारण्यास फार गौण स्थान द्यावयास हवे. युद्धाकरिता लागणारा खर्च राष्ट्रीय उत्पादनाचे मानाने एवढा मोठा असतो की, सर्वांवर सक्तीने बोजा टाकून तो भागवावा लागतो. राष्ट्रकार्यात सर्वांनी सहभागी व्हावे, युद्धप्रयत्नात उत्साहाने भाग घ्यावा, याकरिता भावनात्मक आवाहने उपयुक्त ठरतील; पण नेहमीचा व्यवहार चालवावयाचा तर या पलीकडे जाऊन सर्वांनीच सुसूत्र आणि कडक धोरण अवलंबिण्याखेरीज गत्यंतर नाही. युद्धकालात हाच मोठा धोका की कडक धोरण अवलंबिण्यास सरकार तयार होत नाही. राष्ट्राचे संपत्तिवान सत्तारूढ व बलशाली वर्गास हाताशी धरून त्यांच्याच कलाने कारभार चालविण्याची प्रवृत्ती बळावते. नियोजनास योग्य असे धोरण आजवर अवलंबिले गेले नाही यातही कोणत्याही कडक, विशेषतः संपत्तीवानांस अप्रिय अशा उपाययोजना हाती न घेणे ही प्रवृत्ती प्रामुख्याने होती.

## ब्रिटनचे उदाहरण

उत्पादन व्यवस्थेतील मर्मस्थाने आणि मोठी संपत्ती ज्यांच्याजवळ आहे त्यांची शक्ती चलनवृद्धी व चढता बाजार यामुळे अतोनात वाढते. त्यातच सरकार त्यांच्या कलाने कारभार करण्यास प्रवृत्त झाले तर ते शिरजोर बनतात. याच्या उलट लहान व्यवसाय व सामान्य माणसे यांच्यावरील सर्व प्रकारचा बोजा अतोनात वाढतो. एवंच, नफेबाजांचे फावते व समाजातील विषमता वाढते. युद्धकाल आहे म्हणून सरकारच्या धोरणाविरुद्ध काही न बोलणे, कोणतीही ओरड न करणे हे आवश्यक आहे, या सबबीखाली वाढता अन्याय पचतो. असे घडणे आज भारतासारख्याच्या परिस्थितीत जरी स्वाभाविक असले तरी ते अटळ नाही. युद्धकालात याच्या उलट घडू शकते, हे गेल्या महायुद्धात ब्रिटनने दाखवून दिले आहे. तेथील सर्वपक्षीय मंत्रिमंडळाने पुरोगामी, सुसूत्र व कडक आर्थिक धोरण स्वीकारले. व्याजाचे दर वाढू दिले नाहीत, करांचा बोजा, विषमता न वाढविता मोठ्या प्रमाणात वाढविला, चलनवाढ झाली तरी भाववाढ बेतात ठेवली, जीवनावश्यक वस्तू व सोयी यांचे वाटप इतक्या समप्रमाणात केले की सर्वांत निकृष्ट अवस्थेतील वर्गाचे जीवनमान महायुद्धकाली खालावण्याऐवजी थोडे सुधारलेच! समता व समाजवाद यांच्या दृष्टीने क्रांतिकारक पावले इंग्लंडात प्रथम गेल्या महायुद्धकालातच पडली. आपल्याकडेही आता असेच व्हावे असे सर्वांस वाटावयास हवे. आज तरी तसे होईल, साहजिक होईल, अशी लक्षणे दिसत नाहीत.

## आर्थिक बळावर युद्धसामर्थ्य अवलंबून

भारताची आजची महत्त्वाची गरज म्हणजे लढाई व तीस लागणारे आर्थिक उत्पादन यामुळे नियोजित आर्थिक विकास कार्यात खंड अगर त्रुटी पडू नये ही होय. लढण्याचे सामर्थ्य अंतिम दृष्ट्या आर्थिक बळावर अवलंबून आहे. तेव्हा आर्थिक विकासाची प्रगती शक्यतोवर चालू ठेवणे हे युद्धकार्याच्याच दृष्टीने अत्यावश्यक आहे. पण हे केवळ बोलण्याने, घोषणा केल्याने आपोआप घडून येणार

नाही. सर्व अनावश्यक हालचाली व उपभोग यांस निष्ठुरपणे काट दिला, सामान्यांवर बोजा कमी पाडून युद्ध आणि विकासकार्यातील त्यांचा उत्साह टिकविला आणि युद्धकार्य व विकासयोजना ही दोन्ही उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून भांडवलाची गुंतवणूक व उत्पादनाचे कार्यक्रम ठरविले तरच युद्धकार्याच्या बरोबरीने आर्थिक विकासही होत राहील. असल्या कडक धोरणाच्या अभावी विकासकार्यास खीळ बसेल. एवढेच नव्हे, तर चलनवाढीच्या परिणामामुळे युद्धकार्यातही अडथळा उत्पन्न होईल.

गेल्या महायुद्धात जो सार्वत्रिक अनुभव आला व जे सर्वमान्य आडाखे बसले गेले त्यांस अनुसरूनच वरील विवेचन केले आहे. हे अगदी प्राथमिक समजले पाहिजे. दुर्दैवाने आपले सरकार आज इतक्या प्राथमिक गोष्टींचीही दखल घेताना दिसत नाही. म्हणून युद्धकालात पुढे कोणत्या आर्थिक घडामोडी संभाव्य आहेत, योग्य धोरण न स्वीकारल्यास काय अनर्थ होतील, हे सर्वांनी जाणून घेतले पाहिजे. लोकमत आतापासून जागे झाल्यास त्यांचे दडपण सरकारी धोरणावर योग्य वेळी पडेल आणि त्यास इष्ट वळण लागेल हाच प्रमुख भरवसा आजच्या परिस्थितीत बाळगावा लागत आहे.

*केसरी*, ९-११-१९६२.

☆

# १४ . . युद्धजन्य परिस्थितीत राज्यविकास-योजनांचे भवितव्य

काही दिवसांपूर्वी भरलेल्या राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीत राज्य-विकास-योजनांबद्दल विचार झाला. त्यावेळी राज्यविकास-योजनांस मिळणाऱ्या केंद्रीय मदतीत यंदा फारशी कपात होणार नाही असे सांगण्यात आले. परंतु हे आश्वासन मिळाल्यामुळे युद्धपरिस्थितीचा राज्यविकास-योजनांवर फारसा परिणाम होणार नाही, असे म्हणता येत नाही. युद्धाचे परिणाम या योजनांवर काय होतील हे अनेक दृष्टींनी पाहिले पाहिजे. योजनांस लागणाऱ्या पैशांच्या पुरवठ्याबरोबरच त्या पुऱ्या करण्यास आवश्यक असलेल्या साहित्याचा व साधनांचा विचार केला पाहिजे. किंबहुना युद्धकालीन अर्थशास्त्रात साहित्यसामग्रीचा पुरवठा नीट जुळविता आल्यास पैशाच्या पुरवठ्याचा प्रश्न गौण मानता येतो.

साहित्यसामग्रीच्या पुरवठ्याच्या दृष्टीने राज्यविकास-योजनांवर युद्धपरिस्थितीचा परिणाम मुख्यतः दोन प्रकारे घडू शकेल. विवक्षित प्रकारची अंतर्गत सामग्री युद्धकार्यात खर्ची पडल्यामुळे त्या साहित्य-सामग्रीचा तुटवडा भासण्याचा संभव आहे. तसेच जी सामग्री परदेशाहून आणावयाची तिच्या-बाबत परदेशी चलनाचा तुटवडा फार भासू लागल्यामुळे आयात करण्यात अडचण उत्पन्न होऊ शकेल. राज्यविकास-योजनांतील ज्या भागास किंवा प्रकल्पास यांपैकी कोणती अडचण भासणार नाही, त्यांवर युद्धपरिस्थितिजन्य प्रत्यक्ष परिणाम होण्याचे कारण दिसत नाही. राज्यविकास-योजनांतील निरनिराळ्या प्रकल्पांची या दृष्टीने छाननी करून त्याबाबत पुढील धोरण ताबडतोबीने आखावे लागेल.

युद्धपरिस्थितीमुळे साहित्याचा तुटवडा पडण्याचा संभव मुख्यतः ज्या प्रकल्पांत यांत्रिक किंवा इतर सामग्री परदेशाहून आणावयाची आहे किंवा ज्यांत अंतर्गत युद्धाकार्यास विशेष लागणाऱ्या सीमेंट वगैरे वस्तूंची विशेष जरूरी आहे त्यात भासेल. कोणत्याही दीर्घकालीन महायुद्धात युद्धकार्यास सर्वच प्रकारचे साहित्य लागते. तेव्हा साहित्य-सामग्रीचा तुटवडा एका अर्थाने सार्वत्रिक भासावा; परंतु विशिष्ट बाबी सोडल्यास मामुली काटकसर करून हा तुटवडा काबूत आणण्याइतकी हल्लीच्या युद्धात परिस्थिती राहील असे वाटते. म्हणून राज्यविकास-योजनांबाबत प्रथम करावयाची गोष्ट म्हणजे त्यांची छाननी व वर्गीकरण करून साहित्य पुरवठ्याच्या अडचणी कोणत्या प्रकल्पांत विशेषत्वे भासतील हे अजमावणे व त्या प्रकल्पांत अन्य तरतुदी करणे किंवा त्याबाबतचा कार्यक्रम बदलणे ही होय.

## केंद्रसरकारची अर्थव्यवहारामधील जबाबदारी

साहित्य-पुरवठ्यावर मुख्य भर देण्याचे कारण एवढेच की पैशाबाबतची अडचण युद्धकालात नेहमीच भासणार व ती निवारण्याचे विशिष्ट युद्धजन्य परिस्थितीत अनुरूप असे उपाय योजावे लागणार. या

विषयीच्या धोरणात विकास-योजनात काही फरक करून बदल होण्यासारखा नाही. सामान्य युद्धपरिस्थितीत तुटीच्या अर्थसंकल्पाची कास धरावी लागते व याचे दुष्परिणाम भासू नयेत म्हणून अर्थव्यवहाराचे सर्वंकष नियमन करावे लागते हे या विवेचनात गृहीत धरले आहे. तुटीचा अर्थसंकल्प मात्र प्रत्येक राज्यसरकारचा असू शकत नाही. नवीन चलननिर्मिती किंवा चलनवृद्धी या मार्गाचा अवलंब फक्त केंद्रसरकार करू शकते. या दृष्टीने युद्धकालात कर्ज उभारण्याचे कार्य फक्त केंद्रसरकार करील आणि राज्यसरकारे पूर्वीप्रमाणे स्वतःची निराळी कर्जे उभारणार नाहीत असे जे नवीन धोरण घोषित करण्यात आले आहे ते योग्य ठरते. युद्धकालात चलनवृद्धीचा मार्ग स्वीकारावा लागल्यामुळे राष्ट्रीय अर्थसंकल्पाचे व्यवहार काहीसे जास्त केंद्रित होणे अपरिहार्य होते; परंतु याचकरिता केंद्रसरकारने राज्यसरकारांच्या अर्थव्यवहाराच्या पैशाच्या बाजूची जबाबदारी स्वतःवर मोठ्या प्रमाणावर घेणे हेही आवश्यक ठरते. अर्थसंकल्पाची जबाबदारी अशा रीतीने मूलतः केंद्रित झाल्यावर पैशाचा पुरवठा राज्यसरकारास स्वतः किती उपलब्ध करून घेता येतो यापेक्षा निरनिराळ्या राज्यांचे कारभार व विकास-योजना कशा व कोणत्या प्रमाणात चालविणे शक्य व इष्ट आहे हे ठरविणे जास्त महत्त्वाचे ठरते.

## राज्यविकास-योजनांची स्थगिती अनिष्ट

राज्यविकास-योजनांची प्रगती थांबविणे हे अनेक दृष्टींनी अनिष्ट आहे. आर्थिक व्यवहारास गतिमान करणे व रोजगार वाढविणे हे राज्यविकास-योजनांचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. तेव्हा त्यांची प्रगती थंडावल्यास एकंदर मंदी येऊन बेकारी वाढण्याचा संभव आहे. राज्यविकास-योजनांचे दुसरे प्रमुख उद्दिष्ट सर्वप्रकारच्या सामाजिक व आर्थिक मूलभूत साधनांची तरतूद करून भावी विविध प्रकारच्या अर्थव्यवहाराच्या वाढीचा पाया तयार करणे हे होय. विकासकार्यात हे कार्य प्रथम हाती घेण्याचे असून ते अत्यंत महत्त्वाचे आहे. देशभर ठिकठिकाणच्या व हरप्रकारच्या साधनांच्या निर्मितीचे कार्य राज्यविकास-योजनात अंतर्भूत असते. यामुळे या योजनांची गती मंदावल्यास पुढील सर्वच कार्यक्रम लांबणीवर पडून उत्पादनाची व संपत्तीची वाढ खुंटते. याकरिता युद्धामुळे प्रत्यक्ष साहित्य व साधने यांचा तुटवडा पडल्यामुळे विकास योजनांस जी मुरड घालावी लागेल तेवढी घालून त्यांची प्रगती शक्य तेवढी अधिक चालू ठेवणे अतोनात अगत्याचे ठरते.

प्रस्तुत परिस्थितीत हे साधण्यास राज्यसरकारांस मुख्यतः दोन दिशांनी विशेष प्रयत्न करावे लागतील. या प्रयत्नांची पहिली दिशा म्हणजे तुटीच्या अर्थसंकल्पामुळे निर्माण होणारा भाववाढीचा धोका टाळून सामान्य अर्थव्यवहार सुरळीतपणे चालू राहतील अशी उपाययोजना करणे. याबाबतचे देशव्यापी धोरण केंद्रसरकारने ठरवावयाचे असते. परंतु त्याच्या तपशीलवार अंमलबजावणीची जबाबदारी मुख्यतः राज्यसरकारांवरच पडते. काही दिवसांपूर्वी श्री. नंदा यांनी केंद्रसरकारच्या याबाबतच्या धोरणाची प्राथमिक घोषणा लोकसभेत केली. ही घोषणा पूर्णपणे समाधानकारक नसली तरी त्यात निर्देशिलेला मार्ग तात्पुरता योग्य वाटतो. पण केवळ ढोबळ मार्गदर्शन करून आज भागण्यासारखे नाही. उदाहरणार्थ, अन्नधान्याचे भाव वाढू नयेत म्हणून राज्यसरकारने हंगामाच्या सुरुवातीपासूनच ठराविक भावांत धान्य खरेदी करण्याची तयारी करावी. भात सडण्याच्या गिरण्यांकडून ठराविक प्रमाणांत साठा ताब्यात घ्यावा. सर्व प्रमुख शहरांत मध्यवर्ती ग्राहक संघ स्थापून त्यांमार्फत अनेक दुकाने चालवावी, अशा धोरणाच्या मुख्य बाबी श्री. नंदा यांनी निर्देशिल्या आहेत. परंतु महाराष्ट्र राज्यात तरी सरकार या बाबत काही करू लागल्याचे अजून कळत नाही.

## खरेदी-विक्री व वाटप यांची योजना

भाववाढ रोखण्याच्या कामात घाऊक व किरकोळ व्यापारी यांचे जेवढे सहकार्य मिळेल तेवढे चांगले; परंतु केवळ एवढ्याने भागेल असे समजून सरकारने स्वस्थ बसता कामा नये. स्थानिक पुरवठयाच्या चढउतारामुळे परिस्थिती व्यापाऱ्यांच्याही काबूत राहणार नाही. तेव्हा खरेदीविक्री व वाटप याची सूत्रबद्ध योजना सरकारने उभारून तिची तपशीलवार माहिती जनतेस ताबडतोब दिली पाहिजे. यामुळे जनतेत विश्वास निर्माण होईल व व्यापाऱ्यांचेही सहकार्य सुकर होईल. अन्नधान्य-वाटपाचा प्रश्न विशेष महत्त्वाचा आहे. परंतु तत्सम अनेक इतर प्रश्न संभाव्य तुटवडा व भाववाढ यांबद्दल निर्माण होतील. या सगळ्यांबाबत राज्यसरकारने धोरण आतापासून आखावयास हवे. हीच गोष्ट बचत योजनांची. स्वयंस्फूर्तपणे संरक्षणनिधीस मदत मिळणे हे दीर्घकालपर्यंत असेच टिकून राहणार नाही. तेव्हा ज्यांना शक्य असेल त्यांनी सर्व प्रकारच्या उपभोग्य वस्तूंच्या खरेदीस आळा घालून उर्वरित पैसा कर्जरोखे अगर संरक्षण-निधीत गुंतवावा यास सरकारने योजनापूर्वक उत्तेजन दिले पाहिजे.

## विकास-योजनांची फेरमांडणी आवश्यक

राज्यसरकारने विकास-योजनांची फेरमांडणी ताबडतोब हाती घेणे हेही आज फार महत्त्वाचे आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत अंतर्भूत झालेली राज्यविकास-योजना ही विशिष्ट प्रकारे बनविली गेली होती. नियोजनमंडळाच्या ठराविक साच्यात बसतील असे मुख्यतः सरकारी अधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे खातेवार बनविलेले प्रकल्प, अशा प्रकारचे या योजनेचे स्वरूप होते. युद्धपरिस्थितीमुळे राज्यविकास योजनांची फेरमांडणी करणे प्राप्त झाले आहे. ही फेरमांडणी जुन्या प्रकल्पात केवळ काही काटछाट करून होण्यासारखी नाही. याकरिता विकास-योजनांच्या दीर्घकालीन उद्दिष्टांवर दृष्टी ठेवून व युद्धकालीन साहित्य-पुरवठा जमेस धरून मूलतःच फेरविचार केला पाहिजे. अर्थव्यवहाराची गतिमानता व पुढील विकासाकरिता आवश्यक प्राथमिक सार्वत्रिक साहित्याची सिद्धता या दोन्ही गोष्टी आपणास प्रमुखत्वे साधावयाच्या आहेत हेही फेरमांडणी करताना लक्षात ठेवले पाहिजे. याबरोबरच नवीन निर्माण केलेल्या जिल्हा-परिषदांच्या यंत्रणेचे सहाय्य घेणेही जरूरीचे आहे. लढाई सुरू झाली नसती तरी अल्पकालातच जिल्हा-परिषदांना आपापल्यापुरत्या राज्यविकास-योजनांच्या काही भागांची पुनर्रचना करावी लागली असती. प्राप्त परिस्थितीमुळे त्यांना हे कार्य अधिक त्वरेने व अगत्याने करावे लागेल. परंतु हे सर्वस्वी जिल्हापरिषदांवर सोपवून चालावयाचे नाही. एकतर राज्यविकास-योजनांतील बराच भाग जिल्हा परिषदांच्या कार्यक्षेत्राबाहेरचा आहे. दुसरे असे की, जिल्हापरिषदांस योजना तयार करणे किंवा त्यांची पुनर्रचना करणे या कार्यांचे ज्ञान अगर अनुभव आज पुरेसा नाही. याकरिता राज्यविकास-योजनांच्या फेरविचाराचे काम राज्य-सरकारनेच हाती घेतले पाहिजे.

## योजना सल्लागार मंडळांचे महत्त्व

हे काम करताना राज्यसरकाराने याबाबतची आजवरची दृष्टी व कार्यपद्धती ही बदलणे आवश्यक आहे. आजपर्यंत झालेल्या योजना या बहुतांशी खात्यांनी व अधिकाऱ्यांनी नियोजन मंडळाचा कल लक्षात घेऊन तयार केल्या. त्या करताना राज्यविकास-योजनांची उद्दिष्टे, विविध कार्यांचा क्रम, दीर्घकालीन व्यूह यांची तात्त्विक, सार्वजनिक चर्चा कधीच झाली नाही. तपशीलातही लोकांस समजावणे, माहिती देणे, त्यांचा सल्ला घेणे यांतले काही घडले नाही. लोकशाही विकेंद्रीकरण प्रत्यक्षात सिद्ध होण्याकरिता योजना बनविणे व अमलात आणणे याबाबत सर्व लोकांस विश्वासात घेणे अत्यंत जरुरीचे आहे. जिल्हा

परिषदांच्या निर्मितीमुळे एक जिल्हानिहाय यंत्रणा आता उभी झाली आहे. परंतु राज्यविकास-योजना किंवा विभागीय विकासयोजना यांचा व्यापक विचार होण्याच्या दृष्टीने अधिक काही पावले पुढे पडली नाहीत. विकास-योजनांचा व्यापक विचार करण्याकरिता सबंध राज्य व त्यातील मोठे विभाग या पातळीवर योजना सल्लागारमंडळासारखी काही यंत्रणा निर्माण केल्याखेरीज जिल्हा परिषदासही व्यापक दृष्टीने मार्गदर्शन होणार नाही.

नियोजन मंडळाने राज्यनिहाय राज्ययोजनामंडळे व विभागीय योजना मंडळे स्थापावी अशी अलीकडे शिफारस केल्याचे कळते. राज्यसरकारास ही शिफारस कदाचित चटकन पटणार नाही. अशी मंडळे निर्माण करणे विशेषतः त्यात बाहेरचे सल्लागार घेणे हे कोणत्याही सरकारास विशेषतः सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांस अडचणीचे वाटणे साहजिक आहे. आज तरी अखिल भारतीय नियोजन मंडळ हेच सर्व राज्यांतील तज्ज्ञांचा सल्ला त्या त्या राज्यातील सरकारपेक्षा अधिक घेते अशी परिस्थिती आहे. दूरवर विचार करता, केवळ मंत्रिमंडळ व वरिष्ठ अधिकारी यांनीच राज्यविकास योजना तयार करणे, त्यांच्या घडणीत इतरांना सहभागी न करणे हे इष्ट नाही, हे सर्वमान्य होईल. पण याबाबत प्रत्यक्ष कोठेच काही घडत नाही. सुमारे अडीच वर्षांपूर्वी महाराष्ट्र सरकारने एक बहुरूपी नियोजन–सल्लागार–समिती नेमली. या समितीच्या उपसमित्यांनी दोन विशिष्ट प्रश्नांबाबत उपयुक्त अहवालही तयार केले. परंतु दोनच सभा होऊन या सल्लागार समितीचे कार्य स्थगित झाले. जिल्हा परिषदांच्या स्थापनेच्या विचारापूर्वी ही समिती बनविली गेली होती. बदललेल्या परिस्थितीत सल्लागार समितीच्या रचनेत बराच बदल करावा लागेल. हे कार्य ताबडतोबीने करून या सल्लागार समितीचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. राज्य-सल्लागार समिती व तिच्या बरोबरीने राज्य–योजनांचा विचार करणारे स्वतंत्र खाते निर्माण केले पाहिजे, व त्यांच्या कार्याचा जिल्हापरिषदांशी दुवा जोडून राज्यविकास-योजनांचा फेरविचार व फेरमांडणी ही घडवून आणली पाहिजे. असे झाले तरच राज्यांतील विकासकार्य पाया-शुद्ध राखून विकास-योजनांची आवश्यक प्रगती चालू ठेवणे शक्य होईल.

*केसरी*, २७–११–१९६२.

☆

# १५ . . संरक्षणनिधी व राष्ट्रीय बचत योजना

चीनने हिंदुस्थानावर आक्रमण केल्याला जवळजवळ चार महिने होत आले. पहिला महिना प्रत्यक्ष युद्धाचा होता. तदनंतर युद्धतहकुबी, वाटाघाटी यांचे पर्व सुरू झाले. पुन्हा युद्धाला तोंड इतक्यात लागेल असे दिसत नाही. परंतु काही झाले तरी आपणांस स्वसंरक्षणाची तयारी पूर्वीपेक्षा फार मोठ्या प्रमाणावर व जास्त व्यवस्थित करावी लागणार हे उघड आहे. याकरिता प्रतिवर्षी किती खर्च करावा लागेल याचा निश्चित अंदाज अजून बांधला गेला नाही. परंतु याचे प्रमाण मोठे राहील. दरवर्षी तीनशे ते पाचशे कोटी रुपयांपेक्षा तो कमी असणार नाही, एवढे स्पष्ट दिसू लागले आहे. तसेच आपण खऱ्या अर्थी स्वसंरक्षणक्षम होण्यास अनेक वर्षे प्रयत्न करावा लागेल हेही सर्वांस कळून चुकले आहे.

चिनी आक्रमण अनपेक्षित होते. त्यामुळे हिंदी जनतेस फार मोठा धक्का बसला आणि ताबडतोबीची प्रतिक्रिया म्हणून सर्व देशभर जो तो आपापल्या परीने देशाच्या संरक्षणार्थ मदत करण्याचा प्रयत्न करू लागला. भावनेच्या आवेशात अनेकांनी त्यागाच्या तयारीची परिसीमा गाठली. देशव्यापी तात्कालिक प्रतिक्रिया अशा रीतीने प्रभावी दिसून आली आणि एक मोठे कार्य साधले. परंतु सहजस्फूर्त तात्कालिक प्रतिक्रियेचे स्वरूप भिन्न भिन्न प्रकारचे असते. तिची व्याप्ती व खोली सर्वत्र सारखी नसते. आणि तिच्या प्रत्येक स्वरूपाचा सारखाच उपयोग होत नाही. याकरिता, प्रसंगोपात्त उचंबळलेल्या भावनांस योग्य वळण लावून राष्ट्रकार्यास इष्टप्रकारे त्यांचा उपयोग करून घ्यावा हे समाजनेत्यांचे कर्तव्य ठरते.

युद्धाच्या सुरुवातीच्या काळात सैन्यभरती, रक्तदान, सर्व प्रकारचे साहित्य व पैसा यांची मदत या सगळ्याच गोष्टींचा तात्कालिक उपयोग होण्यासारखा होता आणि या सर्व प्रकारांस उत्तेजन देणे इष्टच होते. प्रत्यक्ष युद्ध थांबून आता बरेच दिवस झाले आहेत आणि आपल्या पुढील भविष्यातील कार्य हे अगदी वेगळ्या प्रकारचे आहे. त्याकरिता देशातील सर्व लोकांस फार मोठ्या प्रमाणावर अधिक कसून श्रम करणे व विशिष्ट प्रकारे त्याग करण्यास तयार होणे हे करावे लागणार आहे. या कार्याचे स्वरूप अंती सरकारच ठरविणार, तेव्हा याबाबतच्या तपशीलवार सरकारी योजना लवकरच प्रकट होतील अशी आशा आहे.

### राष्ट्रीय संरक्षणनिधी

दरम्यान प्रथमपासून सुरू झालेल्या काही दिशांनी प्रयत्न अजून चालूच आहेत. यांतील प्रमुख म्हणजे राष्ट्रीय संरक्षणनिधीकरिता पैसा जमविणे हा होय. वर दर्शविल्याप्रमाणे राष्ट्रीय संरक्षणनिधीचे तात्कालिक महत्त्व बरेच होते.

सर्व ठिकाणच्या, सर्व थरांतील लोकांस स्वरक्षणाबद्दल किती कळकळ वाटते याची निधीतील

स्वयंस्फूर्त जमा ही द्योतक होती. आज निधीचे कार्य उरलेले नाही. आम जनतेचा पाठिंबा राष्ट्रीय संरक्षणार्थ सरकार जे जे करील त्यास भरपूर आहे हे आता सुस्पष्ट झाले आहे. आणि यापुढील कार्यास जो पैसा लागणार आहे त्यातील अल्पांशही संरक्षणनिधीसारख्या प्रयत्नांनी उभारणे शक्य नाही. चालू संरक्षणनिधीची उपयुक्तता संपली असे मानण्यास हरकत नाही. एवढेच नव्हे तर अशा रीतीने निधी गोळा करणे यापुढे चालू ठेवल्यास गैरफायदेच वाढतील असा धोका वाटू लागला आहे. निधी गोळा करण्यासारखी कोणतीही मोहीम देशव्यापी व सर्वस्पर्शी झाली व ती सतत चालू ठेवावयाची म्हटली म्हणजे प्रथमतः तिचे स्वरूप कितीही सहजस्फूर्त असले तरी लवकरच तीत विशिष्ट प्रकारच्या तंत्राचा अवलंब अनिवार्यपणे होतो. आपल्या देशात बहुतेक सर्व कारभारात ब्रिटिश अमलातील परंपरा अजून चालू आहेत आणि लढाईसारख्या प्रसंगी जनतेकडून मदत गोळा करण्याचे जुन्या मुलकी वगैरे खात्यांनी आखलेल्या मार्गांनी अजूनही कारभार होत राहतो. यामुळे सुरुवातीस प्रत्येकाने आनंदाने दिलेली देणगी हे याचे स्वरूप जाऊन हळूहळू अनेकांस तो जुलुमाचा रामराम वाटू लागला असण्याचा संभव आहे.

## निधी-वसुलीची सक्ती

लोकसभेमध्ये एका सदस्याने मुलकी अधिकारी निधी-वसुलीबाबत सक्ती करतात अशी तक्रार केली असता ही गोष्ट प्रमाणसिद्ध करून दाखविल्यास त्याचा विचार करू असे मुरारजीभाईंनी उत्तर दिल्याचे समजते. मुरारजीभाईंसारख्या जुन्या मुलकी कारभाराचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या मंत्र्यास तरी अधिकाऱ्यांविरूद्ध कोणतीही गोष्ट शाबीत करणे किती दुरापास्त आहे हे माहीत असावयास पाहिजे. तेव्हा त्यांनी दिलेले उत्तर म्हणजे राजकीय प्रतिपक्षाचे तोंड बंद करण्याकरिता दिलेले प्रत्युतर एवढेच समजावयाचे. अनेक प्रकारच्या कचेऱ्या व संस्थांमधूनही निधीची कपात दर महिन्यास होत राहते याबद्दल कुरकुर ऐकू येऊ लागली आहे. एके काळी भावनेच्या भरात केलेल्या ठरावांची बदलत्या परिस्थितीत मासिक अंमलबजावणी झाल्याने अनेकांस जड वाटल्यास नवल नाही. शिवाय नेहमीचा अनुभव हा की, निधीसारख्या सकृद्दर्शनी ऐच्छिक बाबीत गरिबांवरच जास्त बोजा पडतो. १९४२ साली मुंबई इलाख्यात धान्यपरिस्थिती बिकट झाली तेव्हा सरकारने आपल्याजवळ धान्याचा काही साठा असावा म्हणून हंगामात धान्य ऐच्छिकरीत्या गोळा करावे असे मुलकी अधिकाऱ्यांस सांगितले. याची अंमलबजावणी विभ्रम रीतीने कशी होते हे प्रत्यक्ष पाहणी केली तेव्हा दृष्टोत्पत्तीस आले. म्हणून प्रस्तुत लेखकाने याबाबत तपशीलवार टिपणे लिहून ऐच्छिक पद्धतीच्या ऐवजी सक्तीची धान्यवसुली करणे न्याय्य व इष्ट आहे हे त्यावेळच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले. ते पटल्यामुळेच पुढे पद्धतीत फरक झाला. एवंच सर्व अनुभवांवरून सतत दीर्घकालीन प्रयत्नांच्या दृष्टीने निधी गोळा करण्याच्या पद्धतीचा उपयोग न होता तिजमुळे अन्याय घडणे व असमाधान उत्पन्न होणे हेच होण्याचा अधिक संभव आहे.

## देणगीऐवजी बचतीवर भर आवश्यक

याचा अर्थ असा नव्हे की, निधि जमविण्याकरिता सिद्ध केलेली यंत्रणा आणि तत्प्रीत्यर्थ अनेकांनी दाखविलेली तयारी यांचा काही उपयोग होऊ शकत नाही, अगर करू नये. संरक्षणार्थ लागणाऱ्या पैशापैकी मोठा भाग सरकार कर लादून वसूल करील, पण कर कितीही लादले तरी जनतेने स्वयंस्फूर्तीने बचत करून संरक्षण व विकासकार्यास लागणारी साधने उपलब्ध करून देणे हे अत्यावश्यक असते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत नवीन कराच्या उत्पन्नाइतकाच पैसा निरनिराळ्या प्रकारचे

कर्जरोखे व बचत–योजना यांपासून उपलब्ध होईल असा अंदाज केला होता. नवीन परिस्थितीमुळे कराव्या लागणाऱ्या जादा संरक्षण खर्चाची विभागणी ही अशीच काही अंशी वाढत्या बचत–योजना यांतून भागवावी लागेल. संरक्षणनिधीत जमा झालेली रक्कम देणगीवजा असते. दर महिन्यास अशी देणगी देणे फारच थोड्यांना परवडते. परंतु नवीन उद्‌भवलेल्या परिस्थितीत प्रत्येकाने दैनंदिन खर्चात शक्य तितकी काटकसर करून स्वतःच्या बचतीत वाढ करावी असे म्हटल्यास ते अनेकांना शक्य व्हावे. वाढत्या संरक्षणखर्चाच्या दृष्टीने देणगीऐवजी बचत केल्यानेही कार्यभाग होण्यासारखा आहे. सरकारी खर्च वाढला म्हणजे राष्ट्रीय उत्पादनातील खाजगी व्यक्तींच्या गरजा भागविण्यास उपलब्ध होणाऱ्या भागास आळा बसतो अगर बसवावा लागतो. याकरिता खाजगी व्यक्तींनी आपल्या नित्य खर्चात करावयाची काट त्यांनी देणगीरूपाने पैसा देऊन केली किंवा बचतरूपाने ठेवी ठेवून, कर्जरोखे वगैरे विकत घेऊन घडविली तरी त्याचा तात्कालिक परिणाम एकच होतो. सरकारास जादा पैसा मिळतो आणि खासगी खर्च कमी होतो.

## बचत–योजनेचे स्वरूप

सर्व दृष्टीने विचार करता सरकारने संरक्षणनिधी जादा (अपरिहार्यपणे अंशतः सक्तीने) गोळा करण्याच्या भरीस न पडता नवीन प्रकारच्या बचत–योजनांकडे लक्ष वळवावे. लोकांच्या टिकलेल्या उत्साहाचा फायदा घेऊन कायम पद्धतीच्या किंवा लांब मुदतीच्या बचतीचा संकल्प सोडण्यास त्यांस आता उद्युक्त करावे. अशा बचत–योजना यशस्वी व्हावयाच्या असल्यास त्यांचे स्वरूप विविध प्रकारचे हवे. परंतु या बचत–योजनांबाबत काही गोष्टी साधारणपणे सर्वत्र साधाव्या लागतील. ज्या ज्या प्रसंगी व्यक्तींच्या हाती पैसा उत्पन्नाच्या रूपाने येण्याचा संभव असेल त्यांस अनुसरूनच बचत–योजनेची घडण झाली पाहिजे. पगार अगर वेतन मिळणाऱ्यास पगार अगर वेतन मिळण्याच्या वेळेस बचतीचा हप्ता कापून घेता येईल अशी सोय व्हावयास हवी. जेथे प्रॉव्हिडंट फंडासारख्या योजना चालू असतील तेथे काही मर्यादेपावेतो फंडातील स्वतःचा हप्ता वाढविण्याची मुभा देऊन त्याबाबत योग्य त्या सवलती द्याव्या. शेतमालाची विक्री होऊन सहकारी खरेदी–विक्री मंडळाकडे या रकमा जमा होण्याच्या वेळेस काही भाग बचत होईल असे करावे. बोनस, कर्जरोख्यांवरील व्याज, सरकारला पुरविलेल्या मालाबद्दलचे देणे इत्यादी प्रसंगी अंशतः बचत होईल असे पहावे. तसेच सरकारी कर्जरोख्याच्या रूपानेच बचत झाली पाहिजे असे न म्हणता प्रॉव्हिडंट फंड, निरनिराळ्या सहकारी संस्थांत लांब मुदतीच्या ठेवी अशा प्रकारचे बचत-योजनांचे वैकल्पिक स्वरूप असावे. उदाहरणार्थ, मजूर व पगारदार यांच्या सहकारी संस्था, खरेदी-विक्री संघ, उत्पादक मंडळ्या किंवा ग्रामसेवा सहकारी मंडळ्या यांत ठराविक वेळेस ठराविक हप्त्याने वाढणाऱ्या लांब मुदतीच्या ठेवी, अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर बचत करणे सुकर व्हावे. या लांब मुदतीच्या ठेवी काही विशिष्ट कारणाकरिता प्रॉव्हिडंट फंडाप्रमाणे अल्प कालाकरिता अंशतः वापरता याव्या. लहान लहान उद्योगधंद्यात पुढील भांडवली खर्चाकरिता जादा नफ्यावरील जुन्या कराच्या प्रमाणे विशिष्ट रक्कम वेळोवेळी बचत म्हणून राखून ठेवण्यास उत्तेजन द्यावे.

## साचेबंद योजना नको

या सर्व योजनांत उत्पन्न किंवा पैसा हाती येईल त्या वेळेस ठराविक भाग आपोआप बचत केला जाईल, आणि बचतीची पद्धती आणि बचत केलेली रक्कम या बचत करणाऱ्या व्यक्तीच्या परिचित पद्धतीची व तिच्या माहितीच्या संस्थांत ठेवलेली असेल असे कटाक्षाने योजावे; आणि अशी-

अडचणीच्या वेळेस बचतीचा अंशतः उपयोग करता यावा. हर प्रकारच्या व्यवसायाकरिता निरनिराळ्या बचत-योजना बनवाव्या व त्यांस याबाबत दीर्घकालीन संकल्प सोडण्यास उद्युक्त करावे. पाच-दहा वर्षे मुदतीच्या छोट्या विशिष्ट प्रकारच्या विमा-योजनाही या कार्याकरिता बनविणे शक्य आहे. पण हे घडावयाचे तर सरकारने संरक्षणनिधीबाबत आग्रह सोडला पाहिजे. एवढेच नव्हे केवळ सरकारी कर्जरोखे, पोष्टखाते वगैरे ठराविक ठशांच्या योजनांवर हल्ली केंद्रित झालेले लक्ष काढले पाहिजे. अल्प-बचत योजना वगैरे प्रीत्यर्थ आजच्या सरकारी दडपणामुळे सहकारी संस्थांवर अनिष्ट परिणाम होतो. एवढेच नव्हे तर अनेकवेळा विशेषतः वर्षअखेर लोकांचा पैसा फुकट जातो व गैरसोय होते हा नित्याचा अनुभव आहे. दीर्घकालीन बचत केली, लोकांनी स्वतःवरील खर्च थांबविला म्हणजे खरोखर काम झाले; मग बचत कोणत्याही स्वरूपात असो-हा वास्तविक दृष्टिकोन सरकारने स्वीकारल्यास अनेक प्रकारच्या नियमबद्ध संस्थाधिष्ठित बचत-योजनांकडून काम फार मोठ्या प्रमाणावर सुलभतेने करून घेता येईल. असे झाल्यास आज होत असलेले संभाव्य अन्याय टळतील. अनेकांची कुरकुर थांबेल आणि स्वतःचे आणि राष्ट्राचे असे दुहेरी हित साधल्यामुळे लोकांच्या भावनांस नीट वाव मिळून त्यांस चिरकालीन समाधान लाभेल. या दृष्टीने सरकारने सद्यःस्थितीचा काळजीपूर्वक विचार करावा अशी आग्रहाची विनंती आहे.

*केसरी*, १५-२-१९६३.

☆

# १६ . . भावनियंत्रण आणि सरकारी उपाययोजना

नियोजन-मंडळाचे उपाध्यक्ष श्री गुलझारीलाल नंदा यांनी गेल्या महिन्यात दोन-तीन वेळा भावनियंत्रणाबाबत भाषणे केली; आणि भावी सरकारी धोरणाची अंधुक कल्पना दिली. याच अवधीत अन्नमंत्री श्री स. का. पाटील यांनी अन्नधान्याच्या किमती सरकार बांधून देत असल्याचे सांगितले आणि कापसाची योग्य प्रमाणात खरेदी करण्याबाबत गिरणीमालकांस सूचना दिली. युद्ध सुरू झाल्याबरोबर सर्व प्रकारच्या किमती झपाट्याने वाढतील अशी अनेकांची अपेक्ष होती. सरकारच्या धोरणात्मक घोषणातही ही अपेक्षा अभिप्रेत होती. प्रत्यक्षात गेल्या तीन-चार महिन्यांत बहुतेक किमती वाढल्या नाहीत. पण एवढ्याने हुरळून जाऊ नये असा योग्य इशारा श्री नंदा यांनी दिला.

किमती न वाढण्याची कारणे अनेक असू शकतात. प्रत्यक्ष लढाई फार थोडा काळ चालली आणि लढाईचा ताण आर्थिक व्यवस्थेवर पडू लागण्याच्या आधीच ती थांबली. पण लढाईमुळे निर्माण झालेले अनिश्चिततेचे वातावरण टिकून राहिले. युद्धजन्य परिस्थितीमुळे बहुसंख्य गिऱ्हाइकांनी आपला हात आखडता घेतला आणि ऐन दिवाळीच्या मोसमातही वस्तूंचा खप नेहमीपेक्षा कमी झाला. गिऱ्हाइकांच्या वृत्तीचा परिणाम व्यापाऱ्यांवर साहजिक झाला आणि त्यांचे खरेदीचे मान कमी झाले. लढाई संपते तोच नवीन शेतमालाची आवक होऊ लागली. शेतमालाचे भाव प्रतिवर्षी नोव्हेंबर ते एप्रिलमध्ये मंदीचे असतात; ते मेपुढे वाढू लागतात. नवीन मालाचा जोरदार उठाव न झाल्यामुळे हे भाव अपेक्षेपेक्षाही मंदीत राहिले. शेअर, सोने, चांदी वगैरे सर्व बाजारांत घबराट उडाल्यामुळे त्या पातळीवरील अर्थव्यवहार रोडावला आणि सरकारच्या नवीन करयोजना प्रसिद्ध होईपावेतो बाजारात स्थैर्य येणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. ढोबळमानाने अपेक्षेप्रमाणे किमती न वाढण्याची वरीलप्रमाणे मीमांसा करता येईल.

## सरकारी धोरणाचा विचार

भावनियंत्रणाच्या सरकारी धोरणाबाबत उत्पादक व सामान्य गिऱ्हाईक या दोहोंच्या दृष्टीने विचार करावयास हवा. प्रथम विचार शेतमालाच्या भावाबद्दल साहजिकच करावा लागतो. कारण गेल्या तीन-चार महिन्यांतील परिस्थितीचा परिणाम मुख्यतः शेतकऱ्यांवर झाला. त्यांना अपेक्षेपेक्षा शेतमालाच्या किमती कमी मिळाल्या. यापुढे सर्व किमती वाढल्यास त्यांचे दुहेरी नुकसान होणार आहे. शेतमालाच्या किमतीबाबत सरकारी धोरण संदिग्ध व अपुरे आहे, असे स्पष्ट म्हणावे लागते. अन्नमंत्र्यांनी तांदूळ आणि गहू यांचे भाव आम्ही आधीच बांधून दिले आहेत असे सांगितले. पण हंगामात तांदुळाची खरेदी करण्याबाबत राज्यसरकारास सूचना देत आहे अशी घोषणा श्री नंदा यांनी नोव्हेंबरमध्येच

केली होती. परंतु प्रत्यक्षात राज्यसरकारांनी विशिष्ट प्रमाणात खरेदी केल्याचे ऐकिवात नाही. महाराष्ट्रात तर महाराष्ट्र सरकारने खरेदी करून तांदळाचा साठा अल्प प्रमाणात सुद्धा करून ठेवल्याचे दिसत नाही. शेतमालाचे भाव बांधून देणे हे नुसत्या घोषणा केल्याने होत नाही. सरकारने हंगामात प्रत्यक्षात काही तरी खरेदी सतत करीत राहिल्याखेरीज भाव सर्वत्र टिकून राहत नाहीत. त्याचप्रमाणे हंगामात खरेदी करून योग्य साठवण केल्याखेरीज वर्षाच्या उत्तरार्धात किमती वाढू लागल्यास त्या रोखण्याचे सरकारजवळ साधन उरत नाही. तेव्हा किमान आणि कमाल दोन्ही बाजूनी किमतीचे नियंत्रण करावयाचे म्हणजे सरकारने प्रत्यक्ष व्यवहारात उतरून विशिष्ट प्रमाणात खरेदी व विक्री या दोन्ही कार्यांकरिता यंत्रणा उभारल्या पाहिजेत. भाव बांधून दिल्याची घोषणा केली आणि व्यापारी आणि गिरणीवाले यांजकडून सक्तीने खरेदी करण्याचे अधिकार घेतले, एवढ्याने नेहमीकरिता भागणार नाही. केवळ अधिकार असले म्हणजे हंगाम संपल्यावर धान्याचा साठा पुरेसा उपलब्ध करून घेणे हे नेहमीच साधते असे नाही.

## कापूस-बाजारातील अनुभव

शिवाय सरकारचे खरेदीविक्रीचे व्यवहार सतत चालू असल्याखेरीज किमतीत सार्वत्रिक स्थैर्य उत्पन्न होत नाही. यंदाच्या हंगामातील शेतकऱ्यांची मुख्य तक्रार हीच होती की, अनेक वेळा व्यापाऱ्यांनी खरेदी करणे बंद केले किंवा व्यवहार फार कमी केले आणि त्यामुळे किमतीत चढउतार फार मोठ्या प्रमणावर झाले. हे चढउतार वारंवार होऊ नयेत म्हणून शेतकऱ्यांनी सहकारी मंडळ्यांमार्फत विक्री करावी असे म्हणता येईल. परंतु सहकारी व्यवस्था सार्वत्रिक झालेली नाही, म्हणून सहकारी मंडळ्यासही शेवटी व्यापाऱ्यांवरच आज अवलंबून राहावे लागते. सरकारी खरेदीचे किमान प्रमाण आश्वासित असल्यास ह्या अडचणी दूर होऊ शकतात.

कापूस-बाजारातील यंदाचा अनुभव असाच उद्बोधक ठरतो. आज अनेक वर्षे कापसाचे कमाल व किमान भाव सरकारने बांधलेले आहेत. पण या बाबतीतही सरकार प्रत्यक्ष व्यवहार काही करत नसून कापूस वायदेबाजाराचे नियंत्रण व विशिष्ट प्रसंगी अमुक प्रकारचे व्यवहार करण्याची गिरण्यांस अनुज्ञा एवढ्यावरच धोरण टिकविले जाते. यंदा हंगामाच्या सुरुवातीस सरकारने कापसाच्या प्रतवारीची नवीन पद्धती योजिली, तिजमुळे बराच घोटाळा उत्पन्न झाला. व्यापारी शेवटी प्रत काय ठरेल याची अनिश्चितता आहे असे सांगून माल पडत्या भावात मागू लागले. या पद्धतीत काहीशी दुरुस्ती झाली तरी भावांतील हेलकावे व एकंदर मंदी टिकून राहिली. आता अन्नमंत्र्यांनी गिरणीमालकांस महिन्याच्या आत हिंदी कापसाची योग्य खरेदी करा नाही तर कडक धोरण स्वीकारावे लागेल अशी धमकी दिली. यामुळे कापसाच्या भावातील चालू मंदीचे कारण म्हणजे घेणाऱ्यांनी केलेला कट आहे, असे अन्नमंत्र्यांस कळू लागल्याचे दिसते.

गेली काही वर्षे विदर्भात शेतकऱ्यांनी अनेकांचा मिळून कापूस विकण्याचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेच्या मार्गातील मुख्य अडचण म्हणजे यातील एकवट विक्रीकरिताही शेवटी व्यापाऱ्यांवरच अवलंबून राहावे लागते. सर्व गिरणीमालक कापसाची प्रत्यक्ष खरेदी न करता आमच्या दलालांमार्फतच आले पाहिजे असा आग्रह धरतात. यामुळे शेतकऱ्यांनी स्वतःची कितीही संघटना केली तरी ती अगतिक ठरते. खुल्या व्यापाराचे तत्त्वज्ञान जेथे सर्वमान्य आहे तेथे कोणत्याही वर्गाने आपल्या कुवतीप्रमाणे दुसऱ्याची अडवणूक केली तर त्याबद्दल आक्षेप घेता येत नाही. पण जेथे सर्वांगीण विकासाचे नियोजन होत आहे तेथे असे प्रकार व्हावे हे अनुचित होय. ते होऊ द्यावे हे सरकारास भूषणावह नाही. जुन्या मिरासदाराप्रमाणे व्यापारी कारखानदारांनी अमुक एक टक्केवारी

आम्हांस मिळालीच पाहिजे असा आग्रह धरावा, हंगामात शेतकऱ्याचा माल सर्व एकदम बाजारात येतो याचा पुरेपूर फायदा घेत राहावा, हे नियोजित अर्थव्यवस्थेत चालू देता येत नाही, निदान येऊ नये.

## उसाचे भाव

कापसाच्या भावात आजवर कमाल व किमान किमतीत फार मोठी तफावत होती ती कमी करून किमान किमती वाढविण्यात येणार आहेत असे नुकतेच आश्वासन दिले आहे. हे आश्वासन आणि अन्नमंत्र्यांनी गिरणीमालकांस दिलेली धमकी यावरून सरकारी धोरण बदलण्याची शक्यता दिसू लागली आहे. किमती चढीच्या असण्यापेक्षा त्या स्थिर राहणे हे जास्त महत्त्वाचे कसे आहे हे कापूस, ऊस यांच्या उत्पादनाच्या विभिन्न अनुभवावरून दिसून येते. गेली पंधरा वर्षे साखरकारखान्यांना ऊसउत्पादकांस देण्याचे भाव सरकार बांधून देत असते. यामुळे विशेषतः उत्तर प्रदेश व बिहार राज्यांत बहुसंख्य ऊसउत्पादकांस उसाचा भाव हंगामापूर्वीच बांधून दिल्यासारखे झाले आहे. महाराष्ट्रात सहकारी साखरकारखान्यांच्या स्थापनेमुळे ऊस पैदास होणाऱ्या बहुतेक महत्त्वाच्या टापूत अशाच प्रकारे उसाच्या भावास स्थैर्य लाभले आहे. परिणामी उसाच्या लागवडीखालील क्षेत्र व उसाचे उत्पादन ही दोन्ही सारखी वाढत आहेत. तसेच गुळाचा भाव स्थिर नसल्यामुळे शक्य असेल तेथे उसाचे उत्पादक आपणांस साखरकारखान्याच्या स्थापनेमुळे उत्पन्न होणारे स्थैर्य लाभावे म्हणून हरतऱ्हेने प्रयत्न करतात. काही हंगामांत गुळाचे भाव साखरेपेक्षाही तेजीचे असले तरी त्यात वारंवार चढउतार होतात म्हणून उत्पादक गुळापेक्षा साखरेचा धंदा जास्त चाहतात. साखरेच्या मानाने कापसाचा बाजार गेल्या १०-१२ वर्षांत फार अस्थिर राहिला. लांब धाग्याच्या कापसाची पैदास हिंदुस्थानात होण्यास सरकारने उत्तेजन दिले व असा कापूस बागायती पीक म्हणून काढल्यास ते काही वर्षे फार किफायतशीर ठरले. प्रसंगी उसापेक्षाही जास्त मुनाफा मिळाला. परंतु कोणत्याही एका विशिष्ट पातळीवर कापसाचे भाव स्थिरावले नाहीत यामुळे कापसाच्या पैदाशीत उसाप्रमाणे प्रतिवर्षी निश्चित वाढ झाली नाही व झाली ती टिकली नाही.

## परिणामक धोरणाची गरज

सरकारी उत्तेजन किंवा घोषणा यांपेक्षा निश्चित बांधून दिलेले भाव हेच उत्पादनाच्या दृष्टीने परिणामकारक ठरतात, हे गेल्या १०-१५ वर्षांच्या अनुभवावरून समजते. तसेच भाव बांधून देणे हे सरकारने वटहुकूम काढल्याने केवळ होत नसून ठरलेल्या भावात प्रत्यक्ष सर्व खरेदी केली जाईल अशी तरतूद करावी लागते. हाच न्याय उलटपक्षी गिऱ्हाइकांस पडणाऱ्या किमतीस लागू पडतो. आज अनेक वर्षे सामान्य लोकांस नित्यावश्यक असणाऱ्या वस्तूंचे भाव मर्यादित ठेवावे असे सरकारचे धोरण असल्याचे सांगितले जाते. चीनशी लढाई सुरू झाल्यानंतर याबद्दल सरकारास विशेष काळजी पडली. आणि आता सर्व प्रकारच्या वस्तूंवरील करांचा बोजा मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे ही काळजी द्विगुणित झाली आहे. पण याही बाबतीत सरकारने आपण कडक उपाय योजू अशी धमकी दिल्याने किंवा अमुक किमतीत वस्तू विकल्या पाहिजेत असे जाहीर केल्याने कार्यभाग होण्यासारखा नाही. वर दर्शविल्याप्रमाणे गिऱ्हाइकी कमी व हंगामामुळे अगर इतर कारणांमुळे पुरवठा भरपूर, तोवर भाववाढ काबूत राहू शकेल. परंतु ही परिस्थिती दीर्घकाळ टिकण्यासारखी नाही. कालांतराने गिऱ्हाईकांची खरेदी पूर्वीप्रमाणे होऊ लागेल आणि हंगामाचे दिवस संपले म्हणजे माल फक्त व्यापाऱ्यांच्या ताब्यात राहील. यानंतर कराचा बोजा नवीन आल्यास त्यामानाने अगर त्याहूनही अधिक भाव व्यापारी वाढवणार नाहीत अशी

अपेक्षा करणे व्यर्थ आहे. संभाव्य भाववाढीस आळा घालण्याचा उपाय एकच. तो म्हणजे सार्वत्रिक-रीत्या अन्य तऱ्हेने विवक्षित मालाचा पुरवठा उपलब्ध करून देणे. पण असे करावयाचे तर देशव्यापी यंत्रणा हवी व या यंत्रणेस मालाचा पुरवठा झाला पाहिजे. यापैकी काहीच करावयाचे नाही, फक्त धोरणाच्या घोषणाच करावयाच्या, यावर निदान यापुढे भागणे शक्य नाही.

असा विचार करिता आतापर्यंतचे सरकारी धोरण अवास्तव व अपुरे ठरते. गेल्या हंगामात भाव मंदीचे असता सरकारने मोठ्या प्रमाणावर खरेदी केली असती तर शेतकऱ्यास योग्य भाव मिळवून देणे व हंगामानंतरच्या पुरवठ्याची तरतूद करणे हे दोन्ही साधले असते. परंतु असे न करता भाववाढ आपोआप रोखली गेली एवढ्यावरच समाधान मानून सरकार स्वस्थ बसले. आता विशेषतः नवीन करवाढीमुळे, सर्वत्र काळजीचे वातावरण निर्माण झाले आहे. परंतु अजूनही तातडतोबीने काही न करता सहकारी ग्राहक मंडळ्या काढणे अशा उपायांवरच जोर दिला जात आहे. सहकारी मंडळ्या वटकुहुमाने चटकन निघत नाहीत. तशा निघाल्या तर कार्यक्षम होत नाहीत. शिवाय, त्या जबाबदार व्यक्तींनी चालविल्या तरी मालपुरवठा योग्य प्रमाणात होऊ न शकल्यास त्या भाववाढ रोखू शकणार नाहीत. थोडक्यात, आजवर या प्रश्नाबाबत सरकारने अक्षम्य चालढकल केली आहे. काही बाबतींत दिरंगाईमुळे पुढील परिस्थिती सुधारणे कठीण झाले आहे. आता तरी मागील चुका लक्षात घेऊन नवीन व्यापक व परिणामकारक धोरण शक्य तेवढ्या मोठ्या प्रमाणात व शक्य तितक्या लवकर सरकार अमलात आणील अशी आशा करू या.

*केसरी*, ११-३-१९६३.

☆

# १७ . . केंद्रीय अर्थमंत्र्यांची नवी करवाढ योजना

भारताचे अर्थमंत्री श्री मोरारजीभाई देसाई यांनी काही दिवसांपूर्वी १९६३–६४ सालचे मध्यवर्ती सरकारचे अंदाजपत्रक लोकसभेत सादर केले. या अंदाजपत्रकाप्रमाणे पुढील वर्षात नवीन कर लादून किंवा जुन्या करांची व्याप्ती अथवा दर वाढवून २६६ कोटींचे जादा उत्पन्न होणार आहे. करवाढीचे हे प्रमाण अभूतपूर्व असे आहे. प्राप्त-परिस्थितीत ही करवाढ अटळ आहे आणि निदान एवढी न केल्यास संरक्षण व विकास-योजना, आर्थिक स्थैर्य राखून, साधता येणार नाही असे अर्थमंत्र्यांचे म्हणणे आहे. करवाढीच्या परिणामाविषयी बोलावयाचे तर अर्थमंत्र्यांचे हे समर्थन सयुक्तिक दिसते व अप्रियतेचा धोका पत्करूनही कराचा बोजा वाढविण्यात मुरारजीभाईंनी जे धैर्य दाखविले त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

एका दृष्टीने हे वाइटातून चांगले निघाले असेही म्हणता येईल. केवळ आर्थिक विकासाच्या दृष्टीनेही गेली काही वर्षे देशात होणारी बचत ही फार अपुरी भासू लागली होती व उत्पादन व उत्पन्न यांची वाढ मंदावल्याची चिन्हे दिसत होती. विकासाची गतिमानता वाढविण्याकरिता बचत अधिक करणे प्राप्त होते व हे करण्याचा प्रमुख उपाय म्हणजे करांचे उत्पन्न वाढवून सरकारी भांडवली खर्च विस्तारणे हाच, हेही उघड होते. परंतु अलीकडे सर्व अर्थमंत्रीच कराचा बोजा वाढविणे शक्य नाही असे म्हणू लागले आहेत. तेव्हा इष्ट व आवश्यक मार्ग कोणता हे स्पष्ट दिसत असूनही तो अवलंबणे अशक्यप्राय झाले होते. चिनी आक्रमणाने परिस्थिती बदलली. सर्व अंगांनी राष्ट्राने अधिक कार्यक्षम बनले पाहिजे, अधिक त्यागास तयार झाले पाहिजे, हे सर्वांस पटू लागले. याचा फायदा अर्थमंत्र्यांनी घेतला हे चांगले केले. आत्मोन्नतीकरिता करण्याच्या प्रयत्नात एक पुढचा टप्पा आपण कायमचा गाठला, अशा रीतीने या घटनेचा अर्थ लावला पाहिजे.

हा विचार केवळ करवाढ योजनेची एकंदर व्याप्ती व ठोक उत्पन्न यांविषयी झाला. तपशिलात विचार करू लागल्यास मोरारजीभाईंच्या योजनेत अनेक त्रुटी व दोषस्थळे सापडतात. चिनी आक्रमणाने परिस्थिती बदलल्यानंतर अर्थमंत्र्यांस आपले पूर्वीचे बेत बदलून काहीशा घाईनेच नवीन करवाढ योजना बनवावी लागली असणार. तेव्हा योजनेतील अनेक दोष विचार करण्यास पूर्ण अवसर न मिळाल्यामुळे उत्पन्न झाले असतील. असे असले तरी हे दोष कोणत्या प्रकारचे आहेत हे समजून घेणे अगत्याचे आहे.

फार मोठ्या प्रमाणावर करांचे उत्पन्न वाढवावयाचे असल्यास अनेक प्रकारे आमूलाग्र विचार करावा लागतो. विशिष्ट करांच्या उत्पन्नवाढीस मर्यादा असतात. पण केवळ उत्पादनात वाढ होऊ शकते म्हणून तो कर वाढविणे योग्य असेही म्हणता येत नाही. उत्पन्नाप्रमाणे करांचा बोजा व त्यांचा एकंदर आर्थिक व्यवहारावर परिणाम याकडेही लक्ष द्यावे लागते. हे प्रत्येक कराबाबत वेगळे पाहावे

लागते. तसेच समग्र करयोजनेबाबत साकल्याने पाहावे लागते. एकंदर करांचा बोजा हलका असताना त्याची विभागणी ज्या तऱ्हेने करता येते ती विभागणी बोजा मोठ्या प्रमाणात वाढल्यास घातुक ठरण्याचा संभव असतो. त्यामुळे निरनिराळ्या अवस्थेत करयोजना न्याय्य व समतोल राखण्याकरिता त्यांची व्याप्ती व स्वरूप बदलावे लागते.

## करभाराचे स्वरूप

करांच्या भारांचे मापन करण्याच्या दृष्टीने करयोजनेचे स्थूलतः दोन विभाग पाडले जातात. पहिला विभाग प्रत्यक्ष करांचा. जे कर व्यक्तींच्या अगर मंडळ्यांच्या ऐन उत्पन्नावर लादले जातात ते बहुशः त्या उत्पन्नातून दिले जातील. त्यांचा बोजा कर भरणाऱ्यांवरच पडेल, असे समजले जाते. म्हणून यांस प्रत्यक्ष कर असे संबोधले जाते. इतर सर्व प्रकारचे कर व्यापार, विशिष्ट व्यवहार, वस्तू, जिंदगी, इत्यादींवर आधारित असतात. त्यांचा बोजा कर भरणाऱ्यावर पडतो असे नाही. विक्रीकर, व्यापारी गिऱ्हाइकांपासून वसूल करतात. भाडे–नियंत्रण नसल्यास घरावरील करांमुळे भाड्यात वाढ होते. पेट्रोल इत्यादींवरील करांमुळे मालवाहतुकीचे दर वाढतात. अशा अनेक प्रकारे कर भरणारा आणि त्यांचा बोजा पेलणारा हे विभिन्न असतात. सर्वसाधारणपणे असे समजले जाते की, अप्रत्यक्ष करांचा बोजा त्यातल्या त्यात गरिबावर पडण्याचा संभव जास्त असतो. करांचे उत्पन्न मोठे हवे असल्यास सर्वसामान्य व्यवहार व सार्वत्रिक खपाच्या वस्तू अशांवरच, हे कर लादावे लागतात. तसेच गरीब, श्रीमंत असा भेद अप्रत्यक्ष करांच्या योजनेत सहसा करता येत नाही. प्रत्यक्ष कर ऐन उत्पन्न मापून त्यावर बसविले जातात. म्हणून वाढत्या उत्पन्नाच्या मानाने त्यांचे दरही सारखे वाढत ठेवणे साधू शकते. यामुळे प्रत्यक्ष करांचा बोजा श्रीमंतांवर विशेष वाढवून अप्रत्यक्ष करांचे अनिष्ट परिणाम काही अंशी निवारण्यात येतात.

## अशास्त्रीय करपद्धती

प्रत्यक्षाप्रत्यक्ष करांची ही भिन्न प्रवृत्ती लक्षात घेता करयोजनेत त्यांचे एकमेकांशी विशिष्ट प्रमाण राखावे लागते व करवाढ जसजशी जास्त होईल तसतसे प्रत्यक्ष कराचे उत्पन्न अधिक प्रमाणात वाढेल असे करणे युक्त ठरते. भारतातील गेल्या दशकात कर-पद्धतीतील एक मोठा दोष म्हणून हा सांगता येतो की, प्रत्यक्ष करांचे उत्पन्न येथे वाढले नाही. १९६२–६३ सालच्या उत्पन्नात अप्रत्यक्ष करांचे उत्पन्न प्रत्यक्ष करांच्या उत्पन्नापेक्षा जवळजवळ तिप्पट असेल असा अगदी अलीकडील अंदाज आहे. नवीन करवाढीत जवळजवळ हेच प्रमाण राखले आहे. म्हणजे करवाढीच्या वाढत्या बोजाच्या मानाने प्रत्यक्ष कराचा भार जसा वाढावयास हवा तसा तो वाढविलेला नाही.

विशिष्ट करांबाबत विचार केल्यास असे आढळते की, अप्रत्यक्ष करांचा योजनेच्या मांडणीत काहीही नव्याने केलेले नाही. जुन्या सर्व करांच्या दरांत कमीअधिक प्रमाणात वाढ केली एवढेच. सर्व आयात वस्तूंवरील करात काही प्रमाणात सर्वसामान्य वाढ केली व निवडक वस्तूंवर जादा वाढ केली. अंतर्गत जकातीचेही दर असेच जकातीचे ढोबळ वर्गीकरण करून सरसकट वाढविले. खरोखर, अप्रत्यक्ष करयोजनेत मूलभूत फेरबदल करावयास हवेत. गेल्या पाच–सात वर्षांत या करांची व्याप्ती व उत्पन्न फार वाढली आहेत. दर वर्षी काही नवीन वस्तूंवर कर लादून व काही जुने दर वाढवून वाढ केली गेली. केव्हाच समग्र विचार केला नाही. त्यामुळे ही सर्वच व्यवस्था अशास्त्रीय बनली आहे, व तीत अनेक दोष शिरले आहेत. उदाहरणार्थ, नवीन उत्पन्न मिळणे कसे सुकर एवढाच विचार दरवर्षी झाल्यामुळे ज्या वस्तूंवर कर लादणे मुळात अयुक्त त्यांवरही ते लादले गेले.

अप्रत्यक्ष करांचा विचार, किमतींवरील परिणामाच्या दृष्टीनेही करावा लागतो. प्रत्यक्ष उपभोगाच्या वस्तूंवरील करांमुळे त्यांच्या किमतीत कराच्या बोजाइतकीच साधारण वाढ होते. तसेच अशा विशिष्ट वस्तूंचे गिऱ्हाईक कोणते याचा विचार करून भोग्य वस्तूंवरील कराचे मान ठरविता येते. याच्या उलट प्राथमिक अथवा उत्पादन–सहाय्यक वस्तूंवरील करांचा परिणाम अनेक विविध प्रकारच्या किमतींवर होतो, व त्याचे मापन वा नियंत्रण कठीण ठरते. तेव्हा प्रत्यक्ष उपभोगाच्या वस्तूंवर अप्रत्यक्ष कर केंद्रित करून कच्चा माल व उत्पादनात आवश्यक असलेले वाहतूक आदी व्यवहार यांवर ते शक्यतोवर लादू नयेत हे इष्ट ठरते. उदाहरणार्थ, यंदाच्या रेल्वेच्या अंदाजपत्रकात मालाच्या वाहतुकीचे दर वाढविण्याच्या ऐवजी उतारूंच्या तिकिटांचे दर वाढविणे जास्त इष्ट ठरले असते.

श्री मोरारजीभाईंनी जुन्या योजनेत काही बदल न करता केवळ जादा आकार लादूनच यंदा भागविले. हे नेहमीकरिता टिकण्यासारखे नाही व लवकरच अप्रत्यक्ष करांच्या मांडणीचा फेरविचार करावा लागेल.

## भाववाढ–नियंत्रणाची आवश्यकता

अप्रत्यक्ष करांचा किमतींवरील परिणाम हा अन्य एका तऱ्हेने विचारात घ्यावा लागतो. कराचे मान फार वाढल्यास किमती इतक्या वाढतात की सामान्य गिऱ्हाइकास त्या परवडत नाहीत आणि त्या जीवनावश्यक वस्तूंच्या असल्यास करवाढीचा परिणाम फार जाचक होतो. यंदाच्या करयोजनेमुळे केरोसिनच्या किमतीने ही परिसीमा गाठल्यासारखी दिसते. अशा परिस्थितीत एक तर विशिष्ट मर्यादेपलीकडे करवाढ टाळली पाहिजे, किंवा भावनियंत्रण व विशिष्ट वस्तूंचे अधिकृत वाटप या गोष्टी यशस्वी रीतीने केल्या पाहिजेत. जसजसा करांचा बोजा वाढेल, तसतशी केरोसिनसारखी स्थिती अनेक जीवनावश्यक वस्तूंची होईल. तेव्हा याबाबतच्या करवाढयोजनेचा विचार करण्याच्या आधी भाववाढ–नियंत्रण व वस्तू–वाटप यांची व्यवस्था सरकारने हाती घेतली पाहिजे.

प्राप्तीवरील करात केलेली वाढ आवश्यक व समर्थनीय आहे. याबाबतच्या योजनेत दोन दोष स्पष्ट दिसतात. प्राप्तीवरील कराचे दर वाढविताना नवीन जादा कर एकंदर प्राप्तीवर न ठेवता प्राप्तीतून जुन्या दराने भरलेला कर वजा करून उरलेल्या रकमेवर ठेवले आहेत. हे का करण्यात आले याविषयी खुलासा करण्यात आला नाही. एकाच कराचा हिशोब करताना अशा दोन व्याख्या अयुक्त ठरतात. शिवाय यामुळे जास्त श्रीमंतावर जादा कर लादला तो मोठ्या दराने लादला असा आभास निर्माण होतो. तसेच प्राप्तीवरील कराच्या वाढीत कराऐवजी सक्तीची बचत करण्याची योजना हीही असमर्थनीय आहे.

## सक्तीची बचतयोजना

सक्तीच्या बचतयोजनेचे समर्थन एकाच प्रकारे करता येते. उत्पन्न विशिष्ट मर्यादेपावेतो असणाऱ्यास प्रत्यक्ष कर देण्याची खरी पात्रताच नसते. तेव्हा काही काळ तरी नित्याचा खर्च शक्य तितका कमी करून या वर्गातील मंडळींस पुढील आवश्यक खर्चाकरिता तरतूद करण्यास भाग पाडणे हा सक्तीच्या बचतीचा उद्देश असू शकतो. त्यामुळे सरकारची तात्पुरती गरज भागते व ज्यांवर सक्ती केली त्यांचे नुकसान न होता काही अंशी ह्या सक्तीने दीर्घकालीन हितच साधते. तेव्हा तत्त्वतः सक्तीची बचत या प्रकारे इष्ट मानता येते. व्यवहारतः या योजनेच्या अंमलबजावणीस लागणारा खर्च, त्यामुळे होणारा त्रास व त्यापासून होणारी आवक यांचा मेळ कसा बसेल हे आजच सांगणे कठीण आहे. शिवाय या योजनेमुळे ऐन नवीन बचत किती होईल हे सांगता येत नाही. सक्तीच्या बचतीचा

उपक्रम चालू ठेवावयाचा असल्यास योजनेचा फेरविचार करावा लागेल. तिचे स्वरूप एकांगी न ठेवता अनेक प्रकारच्या चालू बचत योजनांशी तिला संलग्न करावे लागेल. आणि सक्तीच्या बचतीचा उपयोग दीर्घकालीन उभयपक्षी फायदेशीर ठरतो हे पाहावे लागेल.

या योजनेच्या अनुषंगाने जमीन–महसुलाच्या एका विशेषाकडे लक्ष वेधतो. या महसुलाची पद्धती व त्याच्या बोजाचे प्रमाण ही राज्याराज्यांतून सारखी नाही. काही गुंठे जमीन धारण करण्यापासून तो मोठ्या जमीनदारापर्यंत हा कर सम प्रमाणात वसूल केला जातो आणि कोणत्याच प्रकारे कर देण्याच्या पात्रतेशी या महसुलाचा संबंध जोडता येत नाही. तेव्हा केवळ हा कर सार्वत्रिक आहे म्हणून करवाढी-करिता महसुलाचा पाया पत्करावयाचा ही आजची प्रवृत्ती अयोग्य आहे. शेतीव्यवसायावरील करयोजनेचा विचार तो कर प्राप्तीकराच्या चौकटीत बसविणे या एकाच प्रकारे करणे इष्ट आहे. हा मार्ग राज्य व केंद्रीय अर्थमंत्री जितक्या लवकर स्वीकारतील तेवढे चांगले.

## कंपन्यांवरील कर

मोरारजीभाईंच्या योजनेतील कंपन्या, व्यापारी वा औद्योगिक मंडळ्या यांवरील कर मांडणीमुळे बरीच खळबळ उडविली आहे. यांतील एका भागाचे विशेष स्वागत करावयास हवे. यापुढे कंपनीच्या खर्चापैकी कोणत्याही अधिकाऱ्यावर दरसाल साठ हजार रुपयांहून जो जादा खर्च होईल तो प्राप्तिकराच्या हिशेबाकरिता मान्य केला जाणार नाही. अमुक मर्यादेपलीकडचे वेतन आपल्या देशात सरकार तत्त्वतः स्वीकारीत नाही, हे याने सिद्ध केले व पुढील धोरणास हे पोषक ठरणार आहे. याबाबत कोठे उघड विशेष तक्रार झालेली नाही, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. तक्रार झाली आहे ती कंपन्यांवरील करांचे मापन करण्याची जी नवीन पद्धती योजिली आहे तिजबाबत. असे म्हणण्यात येते की, या नवीन पद्धतीमुळे कंपन्यांची उर्वरित शिल्लक फार कमी राहील. एवढेच नव्हे तर यापुढे भांडवलाची गुंतवण मोठ्या प्रमाणावर करण्यास पुंजीपती धजावणार नाहीत. गेल्या लढाईच्या वेळेस लादलेल्या जादा फायद्यावरील करापेक्षा (एक्सेस प्रॉफिट) नवीन बृहत्फायद्यावरील (सुपर प्रॉफिट) कराचे स्वरूप अगदी निराळे आहे. सरसकट गुंतवलेल्या भांडवलाच्या सहा टक्के मुनाफ्यापासून या करास सुरुवात होते. कर सुरू होण्याचा हा सहा टक्के किमान दर फार कमी मानण्यात येतो. तसेच नवीन किंवा जुना धंदा, धोक्याचे कमीअधिक प्रमाण यांचा काही विचार न करता सब घोडे बारा टक्के हा न्याय मोरारजीभाईंनी याबाबत लादला अशी टीका करण्यात येते. या प्रश्नांचा विचार येथे करीत नाही, पण यांतून उत्पन्न होणाऱ्या एका व्यापक समस्येकडे लक्ष वेधतो.

आधुनिक व्यापारी व औद्योगिक मंडळ्यांच्या फायद्याचा मोठा भाग कररूपाने घ्यावयाचा असे सरकाने ठरविले की त्याच्या वाढीस लागणारे भांडवल त्यांस यापुढे कसे मिळेल याचाही विचार करणे सरकारला प्राप्त आहे. हल्ली कंपन्यांची स्वतःची बचत व सरकारी निम-सरकारी संस्थांचे भांडवल यांच्याद्वाराच नवीन भांडवलाचा पुरवठा होतो. कंपनीच्या बचतीचा मोठा भाग कररूपाने घेतल्यास त्याची जागा सरकारी संस्थांस भरून काढावयास हवी. असे न केल्यास पुढील प्रगती थांबेल. करयोजना व भांडवलपुरवठा यांची प्रगती या दिशेने होणे अनिष्ट नाही असे आम्हांस वाटते. पण हा विचार कर-योजना बनवितानाच व्हावा. व्यवहारास खीळ पडल्यावर तो करावा लागला असे होऊ नये.

श्री मोरारजीभाईंनी मोठी सर्वांगीण करवाढ करून नवीन टप्पा गाठला आहे. नियोजित आर्थिक विकासाचा वेग आणि करांचा बोजा यांचे साहचर्य अपरिहार्य आहे. जसजसा करांचा बोजा वाढू लागतो तसे त्यांचे सर्व परिणाम तीव्रतर होतात व अर्थव्यवस्था व व्यवहार यांसही ते भासू लागतात.

याकरिता मोठ्या करवाढीची योजना काळजीपूर्वक, सुसूत्र व समतोल बनवावी लागते. मोरारजीभाईंस असे करण्यास पुरेसा वेळ नव्हता हे उघड आहे. तरी दीर्घकालीन योजनेच्या दृष्टीने त्यात फेरबदल करून पुढील वर्षी अशीच धडाडीची परंतु अधिक दोषरहित करयोजना ते सुचवतील अशी आशा आहे.

*केसरी*, २१-३-१९६३.

☆

# विभाग : ४

## अर्थव्यवहाराचे नियोजन

# १ . . आर्थिक व्यवहाराचे नियोजन

## १

मानवसमाजातील इतर सर्व व्यवहारांप्रमाणे आर्थिक व्यवहारही समाजरचनेनुसार नियंत्रित झालेला असतो. व्यवहारावरील समाजनियंत्रणांचे प्रमाण हे सर्व स्थळी व काळी सारखेच नसते. एखाद्या ऐतिहासिक कालात व्यवहारांवरील बंधने बरीच कडक असतात, तर अन्य वेळी व्यक्तिस्वातंत्र्याचे माहात्म्य विशेष मानिले जाते. ज्या समाजात केवळ अराजक नाही, त्यात व्यक्तिस्वातंत्र्य कितीही वाढले असले तरी समाजनियंत्रण हे थोड्याबहुत प्रमाणात कायमच असते. नियंत्रण वाढता वाढता त्याचे नियोजनात पर्यवसान होते. स्थूल मानाने असे म्हणता येईल की, जेथे आर्थिक व्यवहारावर केवळ निर्बंध घालण्याचे कार्य राजसत्ता करिते तेथे ते नियंत्रण झाले. परंतु आर्थिक व्यवहारांचा काही भाग प्रत्यक्ष आपणाकडे घेऊन एकंदर आर्थिक व्यवहारांचे किंवा त्यांतील प्रमुख अंगांचे स्वरूप व प्रमाण ठरविण्याचा प्रयत्न जेथे केला जातो, तेथे नियोजनास आरंभ होतो. ज्या राष्ट्रात समग्र आर्थिक व्यवहारपद्धती व निरनिराळ्या व्यवहारांचे परिणाम हे सर्वच राजसत्ता ठरविते, तेथील आर्थिक व्यवस्था पूर्णपणे नियुक्त असते.

जेथे केवळ नियंत्रण असते तेथे नियोजनाची कल्पनाच नसते असे मानण्याचे कारण नाही. अगदी अनिर्बंध आर्थिक व्यवहाराच्या बुडाशीही योजना आहे. येथे योजनाच अशी की नियंत्रण अत्यल्प असावे. राजसत्तेची आर्थिक व्यवहारांतील ढवळाढवळ शक्य तितकी कमी करणे व यासंबंधींचे व्यक्तिस्वातंत्र्याचे क्षेत्र शक्य तितके वाढविणे याचेच महत्त्व या योजनेखाली मानिले जाते. प्रत्येक व्यक्तीने आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला असता त्यापासून समाजाची हानी न होता हितच होते. समाजाने प्रत्येक व्यक्तीच्या सर्व व्यवहारांची दिशा निश्चित करणे हे वेडगळपणाचे व दुर्घट कार्य आहे. यापेक्षा योग्य समाजरचना घडवून प्रत्येक व्यक्तीस शक्य तितके स्वातंत्र्य मिळाल्यास त्यापासून समाजातील बहुसंख्य व्यक्तींचे हित साधले जाईल. केवळ आर्थिक व्यवहाराविषयी पाहिले तर व्यक्तिस्वातंत्र्यवादाची विचारसरणी काहीशी अशी मांडता येईल; आपली संपत्ती व आपले श्रम यांचा विनियोग कसा करावा आणि त्यांजपासून कोणत्या व्यवसायांत फलप्राप्ती सर्वांत जास्त होईल हे जितके प्रत्येक व्यक्तीस स्वतःपुरते कळते तितके दुसऱ्या कोणासही ठरवून सांगता येणार नाही, हा पहिला सिद्धांत. दुसरा सिद्धांत असा की, सर्व व्यवहार पूर्णपणे अनिर्बंध असला म्हणजे समाजातील उत्पादनसाधनांचा उपयोग सर्वोत्कृष्ट रीतीनेच केला जाईल. कारण, प्रत्येकजण ज्या दिशेने आपल्या साधनापासून फलप्राप्ती सर्वांत अधिक तिकडे ते गुंतविण्याचा यत्न करणार, व अशा रीतीने अनेक व्यक्तींचे सारखे प्रयत्न चालू असले म्हणजे, अनुभवजन्य ज्ञानानुरोधाने प्रत्येक साधनाचा त्यापासून सर्वांत फलप्राप्ती ज्यांत अधिक त्याच व्यवसायांत व व्यवहारांत उपयोग होणार. विवक्षित व्यवहारांतील किंवा उत्पादनांतील प्राप्ती साधारण सरासरीपेक्षा कमी किंवा अधिक झाल्यास त्या व्यवहारांतून काही

जणांनी आपले अंग काढून घेणे किंवा तिकडे नवीन उद्योगाचा ओढा लागणे हे सहजच होत राहणार. अशा रीतीने सर्व प्रकारचे उत्पादन आणि व्यवहार ही योग्य त्या प्रमाणात वाढत राहतील. बरे, व्यापार अनिर्बंध असल्यामुळे निरनिराळ्या पदार्थांच्या किमती या उत्पादनखर्च व मागणीची तीव्रता यांवरून केवळ ठरविल्या जातील. म्हणजे, अनिर्बंध व्यापार व अनिर्बंध उत्पादन असले म्हणजे वस्तूं-बद्दलची व्यक्तींची मागणी व समाजाची उत्पादनक्षमता यांचा अत्युत्तम मेळ बसून कोणत्याही परिस्थितीत सर्वांत अधिक आर्थिक हित साधले जाईल. ही विचारसरणी स्वीकारल्यास सामान्यपणे नियंत्रण व निर्बंध ही शक्य तितकी कमी घालणे शहाणपणाचे ठरते. वरील विचारांत अर्थात अनेक गोष्टी गृहीत धरल्या आहेत. अनिर्बंध व्यापार व बाजारभाव मागणी-पुरवठ्याच्या तंत्रानुसार ठरणे, हे केवळ एका बाजूस असंख्य उत्पादक एकमेकांशी चढाओढ करून विक्रीची खटपट करीत आहेत व दुसऱ्या बाजूस असंख्य ग्राहक स्वतंत्रपणे खरेदी करीत आहेत असे असेल तरच शक्य आहे. तसेच प्रत्येकास आपले श्रम व संपत्ती यांचा वाटेल तसा विनियोग करण्याची पूर्ण मुभा आहे एवढेच नव्हे, तर कोणत्याही एका व्यवहारातून काढून कोणत्याही दुसऱ्या व्यवहारात ती नेणे हे शक्य व सुलभ आहे असेही समजावे लागते.

नियोजनाचा पूर्ण अभाव असा कधीच नसतो. निरनिराळे कायदे व समाजव्यवस्थेची निरनिराळी अंगे आर्थिक व्यवहारास विवक्षित वळण देण्याचे कार्य सदैव करीतच असतात. मालमत्तेच्या खाजगी मालकीची व्यवस्था व ती वंशपरंपरा एका कुटुंबात राहण्याची वारसाहक्काची व्यवस्था, या गोष्टींमुळे आर्थिक व्यवहारास विशिष्ट प्रकारचे वळण लागते ही गोष्ट प्रसिद्ध आहे. परंतु आर्थिक उत्पादन व उत्पन्नाची विभागणी यांच्याविषयी तटस्थ वृत्ती स्वीकारून प्रचलित समाजव्यवस्थेच्या अनुरोधाने आर्थिक व्यवहारास जे वळण लागेल ते लागू देणे यात व उत्पादनव्ययाचा तपशील ध्यानात घेऊन आर्थिक व्यवहाराचे स्वरूप व परिमाण ही पूर्ण विचाराने ठरविणे यात फार फरक आहे. थोड्या अंशी का होईना, जेथे दुसऱ्या प्रकारचा विचार येतो तेथे नियोजनास प्रारंभ होतो. असल्या प्रकारच्या नियोजनाचाही पूर्ण अभाव जरी केव्हाच आढळत नाही, तरी १९ व्या शतकात-विशेषतः त्याच्या उत्तरार्धात-इंग्लंड-अमेरिकेत अनिर्बंध आर्थिक व्यवहाराची पराकाष्ठा झाली होती असे म्हणण्यास हरकत नाही. या देशांतील त्या काळातील परिस्थिती अनिर्बंध व्यवहाराला पुष्कळ अंशी अनुकूल होती. औद्योगिक क्रांतीत इंग्लंड प्रथमपासून आघाडीवर होते. १९ व्या शतकाच्या अगदी शेवटपर्यंत इंग्लंडचे श्रेष्ठत्व निर्विवाद होते. पृथ्वीवरील सर्व खंडांत पाश्चात्त्य व्यापाऱ्यांच्या नवीन नवीन आटोक्यात येणाऱ्या व झपाट्याने विस्तार पावणाऱ्या सर्व गिऱ्हाइकीत इंग्लंड अग्रभागी होते. तेव्हा हा सर्व व्यवहार निर्बंधरहित वाढत राहावा व आपणास सदैव खुला राहावा अशी त्या देशाची अपेक्षा व प्रयत्न. या अनिर्बंध म्हणून वाढत्या व्यवहारावर इंग्लंडच्या भरभराटीची मदार व याच्या जोरावर इंग्रजांची लोकसंख्या, श्रीमंती व राजसत्ता यांचा अलोट प्रसार तीन-चार पिढ्यांच्या अवधीत झाला. संयुक्त संस्थानांतील लोकांच्या दृष्टीने सार्वराष्ट्रीय व्यवहाराचे महत्त्व फारसे नव्हते. सार्वराष्ट्रीय व्यवहारात अनिर्बंध व्यापाराचे तत्त्व त्यांनी स्वतःच्या बाबतीत अमलातही आणिले नाही; परंतु त्यांच्या देशातील अंतर्गत व्यवहारात अनिर्बंधत्वाची भूमिका रुजणे व फोफावणे साहजिकच होते. सुपीक परंतु निर्जन असा अफाट देशविस्तार, निसर्गदत्त साधनांची विविधता व विपुलता, सुशिक्षित व धाडसी प्रजा अशा सर्व बाजूंनी तो देश समृद्ध होता. कोणाही माणसाच्या कर्तबगारीस तेथे भरपूर वाव होता. अशा रीतीने या दोन्ही देशात एकोणिसाव्या शतकात व्यवहाराच्या वाढीस मर्यादा नव्हती; व जोपावेतो व्यवहारात व्यक्तिगत प्रयत्नांचे महत्त्व कमी झाले नव्हते तोपर्यंत आर्थिक नियंत्रण, निर्बंध व नियोजन यांची जरूरी भासली नाही. इंग्लंड-अमेरिकेच्या

मानाने इतर देशांतील परिस्थिती अनिर्बंध व्यवहारास कमी अनुकूल होती व त्यामुळे या तत्त्वाचा प्रभाव इतर देशांत तितकासा दिसून आला नाही. महायुद्धपूर्व कालापावेतो सर्वत्र अनिर्बंध व्यापारी तत्त्वज्ञानाचा पगडा जरी बळकट होता, तरी इंग्लंड-अमेरिकेत ही परिस्थिती हळूहळू बदलून या तत्त्वज्ञानाच्या यथार्थतेबद्दल साशंक वृत्ती उत्पन्न होऊ लागली होती. एकतर जर्मनीसारख्या राष्ट्रांच्या प्रगतीमुळे इंग्लंडच्या गिऱ्हाइकीचा संकोच होऊ लागला व अमेरिकेत वाढत्या लोकसंख्येने बहुतेक सर्व देश व्यापून तेथेही आर्थिक व्यवहाराच्या वाढीस मर्यादा भासू लागली; आणि या दोन्ही देशांत एकंदर परिस्थिती अनिर्बंध व्यवहाराच्या पुरस्कर्त्यांस तितकीशी अनुकूल राहिली नाही. परंतु खरा महत्त्वाचा फरक झाला असा आर्थिक घटनेच्या मूळ स्वरूपातच. लहानलहान कारखानदार व व्यापारी हे पृथक्पणे व्यवहार करीत असता रचिलेले सिद्धांत त्यांची जागा मोठमोठे समूह व संघ यांनी घेतली असता टिकून कसे राहावे ? विसाव्या शतकाच्या प्रारंभी लोखंड-पोलाद, रॉकेल, कोळसा इत्यादी महत्त्वाच्या धंद्यात प्रचंड संघ निर्माण होऊन अगदी अल्प संघांच्या हातांत यासंबंधींचे बहुतेक उत्पादन-सामर्थ्य केंद्रीभूत झालेले होते. ही प्रवृत्ती कमी न होता दिवसेंदिवस तिची व्याप्ती आणि प्रमाण ही वाढूच लागली. संघशक्तीचा प्रभाव किरकोळ विक्रीतही दिसू लागला व विवक्षित धंद्यांतील कारखान-दारांचे एकीकरण जगव्यापी होऊ लागले. जुन्या काळी उत्पादनाची जबाबदारी व उत्पादनाचे सूत्रचालकत्व ही दोन्ही कारखानदाराच्या हातात असून ती सावकारांचे महत्त्व वाढून हळूहळू पेढी-वाल्यांच्या हातांत जाऊ लागली. समाईक भांडवली मंडळ्यांचा (Joint Stock Companies) अतोनात विस्तार झाला. याबरोबरच मजुरांचे संघ व या संघांचे बळ ही दोन्ही वाढवून मजुरीच्या दरांबद्दलही एकदेशीय करार होऊ लागले. सारांश, अनिर्बंध व्यापाराच्या तत्त्वास आवश्यक असलेली परिस्थिती नाहीशी झाली. बाजारभाव केवळ चढाओढीने ठरेनासे झाले. मागणी-पुरवठा बदलला असता योग्य त्या प्रमाणातच अथवा अल्पावधीत किमतीत फेरबदल होतील अशी खात्री उरली नाही. असे जरी झाले तरी आर्थिक व्यवस्थेत उत्पन्न झालेला हा ताठरपणा अनिष्ट, पण तो व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारसरणीस मूलतः बाध आणण्याइतका वाढलेला नाही, असे मानण्याची महायुद्धापूर्वीची प्रवृत्ती होती. काही जाणत्या लोकांच्या शंका जरी बळावल्या तरी १९१४ पावेतो सनातनी आर्थिक परंपरेस इंग्लंड-अमेरिकेत तरी विशेष जोराचा धक्का बसला नव्हता.

## महायुद्धकालीन नियोजन

आर्थिक नियोजनाचा आधुनिक युगाचा पहिला खरा अनुभव म्हणजे महायुद्धकाळातील होय. महायुद्ध सुरू होताच स्वतंत्र आर्थिक व्यवहारातील नियंत्रण व निर्बंध साहजिकच एकदम पुष्कळ वाढले; व जसजसे युद्ध अधिक निकराचे होऊ लागले तसतसे युद्धाकडे सर्व राष्ट्रीय शक्ती एकवटणे अधिकाअधिक अवश्य होऊ लागले. सैनिकांची हालचाल, युद्धसामग्रीचे उत्पादन आणि आघाडीवर रसदीचा योग्य पुरवठा या गोष्टी प्रमुख समजून सर्व राष्ट्रीय आर्थिक व्यवहाराचा रोख युद्धबल वाढ-विण्याकडे करावयाचा, असे धोरण प्रत्येक राष्ट्र स्वीकारू लागले. साहजिकच प्रमुख धंद्यांतील उत्पादन-साधने व सर्व वाहतुकीची साधने यांचे नियंत्रण अत्यावश्यक झाले. लवकरच साधे नियंत्रण अपुरे पडले. दारूगोळा तयार करण्याचे जे कारखाने युद्धपूर्वकाली अस्तित्वात होते त्यांची उत्पादनशक्ती आता फार संकुचित वाटू लागली. हिचा झपाट्याने विस्तार करण्यावर युद्धातील यशापयश अवलंबून होते. तेव्हा सरकारने स्वतः या प्रकारचे उत्पादन हाती घेणे व त्या करिता जे जे इतर तत्सदृश उत्पादनात गुंतलेले कारखाने तेही आपल्या ताब्यात घेऊन त्यांचा उपयोग युद्धसामग्रीच्या तयारीस करणे क्रमप्राप्तच होते. पुढे एकंदर उत्पादनसामग्री व वाहतुकीची साधने यांचा युद्धाच्या कामी उपयोग फार

होऊ लागल्यामुळे व परराष्ट्रीय व्यापारात निरनिराळ्या प्रकारचे अडथळे उत्पन्न झाल्यामुळे नित्याच्या व्यवहारात लागणाऱ्या खाद्यपेयादी वस्तूंचा पुरवठा हाही कमी होऊं लागला. अशा परिस्थितीत व्यापारावर काही निर्बंध न घालावे तर किमती बेसुमार वाढून गरिबांची उपासमार व बंडाळी होण्याचा संभव फार, म्हणून प्रथम किमतींवर सरकारी नियंत्रण घातले. परंतु एवढ्याने भागेना, तेव्हा पुरवठा व गिऱ्हाइकी किती, विक्री कशी आखली पाहिजे याचा पूर्व विचार करून व्यक्तीमागे दर कालखंडात प्रमुख वस्तूंचे मिळू शकणारे प्रमाण व ते मिळविण्याची व्यवस्था या सर्व गोष्टी नियोजित झाल्या. अशा तऱ्हेने क्रमाक्रमाने नियोजित व्यवहारांचे क्षेत्र वाढून जर्मनीसारख्या देशात तर महायुद्धाच्या शेवटी जवळजवळ सर्वत्रच आर्थिक व्यवहार पूर्णपणे नियुक्त झाला. महायुद्धकालातील आर्थिक नियोजन बरेचसे यशस्वी झाले असे म्हणण्यास हरकत नाही. जसजशा अडचणी उद्‌भवल्या तसतसे नियोजनाचे क्षेत्र वाढले व नियोजनाचा प्रकार जास्त गुंतागुंतीचा झाला. प्रथम चुका बऱ्याच घडल्या. श्रमाचा व सामग्रीचा अपव्यय झाला. परंतु या चुका चटकन सावरण्यात येऊन एकंदर नियोजनाला विवक्षित परिस्थितीत तरी बरेच व्यवस्थित स्वरूप येऊ शकते हे सिद्ध झाले. अर्थात एका दृष्टीने महायुद्धकाली नियोजन करणे फार सोपे होते. कारण, या वेळेस नियोजनाचे उद्दिष्ट अगदी सरळ व निश्चित होते. युद्धबळ वाढविणे येवढे एकच उद्दिष्ट डोळ्यांपुढे असल्यामुळे नियोजनाच्या निरनिराळ्या पायऱ्या आखताना त्या सर्वांचा या एकाच दृष्टीने विचार करावयाचा होता. शिवाय युद्ध चालू असता निरनिराळे त्रासदायक निर्बंध अथवा खाद्यपेयांची कमतरता या गोष्टी बहुजनसमाज विशेष कुरकुर न करता सोसण्यास तयार होता.

महायुद्धकालातील हा नियोजनाचा प्रयोग पुढे युद्ध लवकरच संपल्यामुळे फार दिवस चालू नव्हता, आणि केवळ विवक्षित अडचणीमुळे आर्थिक व्यवहारास ही नवी दिशा द्यावी लागली अशीच सर्व-साधारण समजूत होती. तेव्हा युद्धसमाप्तीनंतर शक्य तितक्या लवकर पूर्वीप्रमाणे अनिर्बंध व्यवहारास प्रारंभ व्हावा या दृष्टीने प्रयत्न होऊ लागले. परंतु अनेक स्थित्यंतरांमुळे व्यवहाराची ही घडी पूर्ववत बसविणे कठीण आहे असे लवकरच आढळून आले. महायुद्धामुळे जगाच्या आर्थिक व राजकीय परिस्थितीत अनेक महत्त्वाचे फरक घडून आले. निरनिराळ्या राजसत्तांखालील प्रदेशांची फेरविभागणी झाली; आणि आर्थिक गोष्टीतही वेगवेगळ्या प्रदेशांच्या व राजसत्तांच्या महत्त्वात फरक पडला. महायुद्ध-समाप्तीनंतर कित्येक वर्षे रशिया, जर्मनीसारख्या–महत्त्वाच्या देशांतील राजकीय परिस्थिती अतिशय अनिश्चित होती. या अनिश्चिततेतच काही राष्ट्रांत चलनविषयक अव्यवस्थेची भर पडली. यामुळे सर्व आर्थिक व्यवहाराचा संकोच झाला व कित्येक राष्ट्रांचे पुनरुज्जीवन राष्ट्रसंघ या संस्थेच्या साहाय्याने, सहकाराने आणि देखरेखीने करावे लागले. ही अनिश्चितता व अव्यवस्था एका दृष्टीने तात्कालिक होती असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु जित राष्ट्रांवर लादलेल्या खंडण्या व त्या देण्यात उत्पन्न झालेल्या अडचणी १९२९ सालापावेतो सार्वराष्ट्रीय व्यवहारात जाचक भासत होत्या. शिवाय राष्ट्राराष्ट्रांच्या राजकीय व आर्थिक संबंधाहून निराळ्या क्षेत्रातही महायुद्धकालात फार महत्त्वाचे फरक घडून आले होते. यांतील दोन अत्यंत महत्त्वाचे फरक म्हणजे काही राष्ट्रांत–विशेषतः कॅनडा, अर्जेंटाईन, ऑस्ट्रेलिया इत्यादिकांत यांत्रिक साहाय्याने शेतकी उत्पन्नास आरंभ आणि बऱ्याच पौरात्य राष्ट्रांतील उद्योगधंद्यांची वाढ हे होत. यांत्रिक शेतकी उत्पादनामुळे धान्य, विशेषतः गहू स्वस्त झाला, व युरोपीय शेतकऱ्यांस या स्वस्त धान्याची आयात भोवू लागली. तसेच नवीन राष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे जुन्या औद्योगिक राष्ट्रांतील कारखान्यांस धक्का बसला. तात्पर्य, उत्पादनव्यवस्थेत एवढ्या मोठ्या उलाढाली घडून येत होत्या की, आपोआप सुरळीत कारभार चालण्यासारखी परिस्थिती कोठेच जुळून आली नाही. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रात आपले शेतकरी व कारखानदार यांच्या हिताचे संरक्षण कसे करावे हा प्रश्न उद्‌भवू लागला व परराष्ट्रीय व्यापारावर निर्बंध घालण्याची प्रवृत्ती वाढू लागली. याप्रमाणे महायुद्धोत्तर दशकात

राजकीय अथवा आर्थिक परिस्थिती स्थिरावू शकली नाही. १९२४ ते १९२९ या वर्षांत काही अंशी आर्थिक व्यवस्थेस निश्चित वळण लागल्यासारखे वाटत होते. पण हा केवळ पोकळ देखावा होता, हे १९२९ च्या नंतर पूर्णपणे कळून आले. १९२९ नंतर परिस्थिती कशी झपाट्याने बदलत गेली हे सर्वश्रुत आहे. सार्वराष्ट्रीय व्यवहाराचा संकोच, हुंडणावळीच्या दरांची अनिश्चितता, पदार्थांच्या किमतींतील उतार, शेतकऱ्याची निकृष्ट स्थिती, सर्व व्यवसायांतील वाढती बेकारी यांचा अंमल सर्वत्र सारखाच सुरू झाला; आणि या मंदीच्या काळात प्रत्येक राष्ट्रीय सरकारास या सर्व आपत्तींस तोंड देण्याकरिता निश्चित धोरण आखणे प्राप्त झाले. नियोजनाचे आजचे स्वरूप व व्याप्ती ही दोन्ही बहुतांशी १९२९ सालानंतरची परिस्थिती व धोरण यांच्या अनुरोधाने ठरली गेली आहेत.

## नियोजनात एकसूत्रीपणाचा अभाव

नियोजनाचा हा पूर्वेतिहास लक्षात घेतला म्हणजे आजचे त्याचे स्वरूप आकळणे सोपे होईल. कारण, आजची कोणत्याच देशातील नियोजनपद्धती सुसंगत अथवा एकसूत्री नाही. शेतकी पैदाशीच्या विक्रीसंबंधीची मि. ईलियट यांची इंग्लंडमधील योजना वगळली तर इतर कोणत्याच योजना पूर्वी अभ्यासून किंवा अनुभवून अमलात आणिल्या गेल्या असे आढळणार नाही. आजचे नियोजनाचे क्षेत्र व स्वरूप या सहजगत्या घडून आलेल्या गोष्टी आहेत. मंदीची तीव्रता जसजशी निरनिराळ्या दिशेने भासू लागली तसतसे आर्थिक निर्बंध वाढले. केवळ निर्बंधांनी आर्थिक व्यवहारास इष्ट ते वळण इष्ट त्या प्रमाणात लागण्याचा संभव नाही असे आढळले, तेव्हा प्रत्यक्ष राजसत्तेने आपल्या हाती कारभार घेऊन विवक्षित दिशेने तो नियुक्त करण्यास आरंभ केला. हल्लीचे नियोजन बहुतांशी तात्कालिन उपाययोजनेच्या स्वरूपाचे असल्यामुळे त्यात विस्कळितपणा व विसंगती हे दोष प्रामुख्याने दिसून येतात. याचा अर्थ १९२९ सालापूर्वी यांपैकी कशाचाच अनुभव आला नव्हता अथवा तत्पूर्वीच्या एकंदर प्रवृत्तींहून निराळेच काहीतरी मंदीच्या दिवसांत घडून आले असा घ्यावयाचा नाही. नेहमीप्रमाणेच असे म्हणता येईल की, १९२९ सालापूर्वी अस्फुट असलेल्या प्रवृत्ती मंदीच्या दिवसांतील परिस्थितीच्या जोरामुळे विशेष ठळक रीतीने दिसू लागल्या व पूर्वी एखाद्याच क्षेत्रात प्रसृत असलेल्या कल्पना सगळीकडे फैलावल्यामुळे त्यांची पकड विशेष बसली.

## विविध देशांतील नियोजन

गेल्या सहासात वर्षांत निरनिराळ्या राष्ट्रात अमलात आणिलेल्या नियोजनाचे प्रकार अनेक आहेत. आणि आर्थिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्राचे जगातील कोणत्या ना कोणत्या तरी देशात नियोजन झाल्याचे आढळून येते. परराष्ट्रीय कर्जे देण्याच्या अडचणीपासूनच प्रत्येक देशात मंदीची झळ लागण्यास आरंभ झाल्यामुळे परकीय देणे व परराष्ट्रीय व्यापार यांजवरील निर्बंध वाढण्यास प्रथम आरंभ झाला, व या क्षेत्रातील व्यवहारावर सरकारी हुकमत आजपावेतो विशेष आहे. परराष्ट्रीय व्यापाराशी हुंडणावळीच्या दरांचा व चलनपद्धतीचा अत्यंत निकट संबंध. तेव्हा परराष्ट्रीय व्यापाराबद्दलच्या योजनेस साह्य करणे हे चलनविषयक धोरणाचे एक प्रमुख अंग झाले; आणि हुंडणावळीच्या दरांतील फरकामुळे परराष्ट्रीय व्यवहारावर परिणाम घडवून आणण्याचा व त्याबरोबर चलनव्यवस्थेने अंतर्गत व्यवहारांत पदार्थांच्या किमती वाढविण्याचा प्रयत्न होऊ लागला. ह्या उपाययोजनेचा परिणाम व्हावा तितका चटकन दिसून आला नाही तर प्रत्यक्ष कृषिविषयक व औद्योगिक उत्पादनाचे नियंत्रण हाती घेणे, पदार्थांच्या किमती तपशीलवार ठरवून ठेवणे, मजुरीच्या दरांत फरक करणे, बेकारी–निवारणार्थ सरकारी बांधकामास आरंभ करणे इत्यादी अनेक गोष्टी हातात घेण्यात आल्या. या सर्वांचा परस्परसंबंध

व नियोजनाचे खरे स्वरूप ही काही प्रमुख देशांतील नियोजनाचा तपशीलवार विचार केल्यास नीट विशद होतील. *

## २

आर्थिक नियोजनाचे सांप्रतचे स्वरूप तीन देशांतील सद्यःस्थितीच्या वर्णनावरून विशद करण्याचे आम्ही योजिले आहे. हे तीन देश म्हणजे जर्मनी, अमेरिका व इंग्लंड हे होत.

### जर्मनीमधील नियोजन

रशियातील संपूर्ण नियुक्त व्यवहार जर सोडून दिला तर ज्या देशात नियोजनाची परमावधी झाली आहे अशांपैकी जर्मनी हा एक आहे. इटली व जर्मनी या दोन्ही देशांतील सत्तारूढ पक्ष स्वतःस समाजवादी म्हणवितो, हे लक्षात ठेवले पाहिजे. मार्क्सपंथियांचा समाजवाद चुकीचा असला तरी निर्भेळ व्यक्तिस्वातंत्र्यवादही तितकाच चुकीचा आहे असे फासिस्ट व नाझी या दोन्ही पक्षांचे म्हणणे आहे. वर्गकलहाची कल्पना ही समाजाच्या दृष्टीने हानिकारक आहे, परंतु प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्रपणे वाटेल तसा व्यवहार करू देणे हेही बरोबर नाही. राष्ट्रहित हेच खरे व अंतिम उद्दिष्ट. ते साधण्याकरता व्यक्तीवर नियंत्रण घालणे आवश्यक आहे. सर्व वर्ग व व्यवसाय यांचे योग्य पोषण करणे व त्यांना अवश्य ती दिशा लावणे हे प्रत्येक राष्ट्रीय सरकाराचे कर्तव्य आहे, अशी यांची विचारसरणी आहे. तेव्हा आर्थिक व्यवहारात नाझी सरकारने विशेष ढवळाढवळ केली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. शिवाय महायुद्धोत्तर जर्मनीतील आर्थिक व्यवहाराचा इतिहासच असा आहे की, त्यात ढवळाढवळ करणे कोणत्याही सरकारास भाग पडावे. १९२४ सालापर्यंतची चलनविषयक अव्यवस्था व अनिश्चितता संपल्यावर चार-पाच वर्षे परकीय भांडवलाच्या साहाय्याने जर्मनीत बरी गेली; पण या अवधीतही भांडवल मिळवून देणे व उद्योगधंद्यांची सुव्यवस्था लावणे यात सरकारचा हात होताच. सकृद्दर्शनी १९२४ ते १९२९ सालांत सुबत्ता होती. खरे पाहिले तर खंडणीचा बोजा जर्मन राष्ट्रास असह्य होता, व परकी कर्जामुळे तात्पुरती अडचण भागली तरी अंती त्यामुळे परकीय देण्याचा बोजा आणखी जबर वाढला. मंदी सुरू झाल्याबरोबर ही परिस्थिती उघडी पडली. एकीकडे जर्मन मालाचा परदेशांतील खप कमी झाला, तर दुसरीकडे कर्जदार आपल्या देण्याबद्दल तगादे करू लागले. तेव्हा धनकोकडून मुदत मागून घेऊन तोंडमिळवणी करण्याचा आटोकाट प्रयत्न करणे आवश्यक झाले. अशा परिस्थितीत सरकारी नियंत्रण-नियोजनाचे क्षेत्र सारखे वाढले व एकंदर निकृष्टावस्थेमुळे नाझी पक्षाचे घोडे पुढे सरकले. नाझी पक्षाने राजसत्ता बळकावल्यावर आर्थिक व्यवहारावरील सरकारी हुकमत झपाट्याने वाढली, हे सांगावयास नको.

### विभागीय संस्थानांची स्थापना

आर्थिक स्वावलंबन हे नाझीपक्षाचे ध्येय. ध्येयाची साधने हरएक प्रकारचे नियंत्रण व नियोजन. आजची पद्धती पूर्वविचाराने बनलेली नसून हळूहळू परिस्थितीप्रमाणे बनलेली आहे. नियंत्रण व नियोजन यांची परंपरा एकामागून एक साहजिकच कशी लागत येते हे येथे अभ्यासण्याजोगे आहे. परंतु नियो-

* *लोकशिक्षण* ७ : ९ मार्च १९३७ पृ० ७२४–७३०.

जनाचे ऐतिहासिक स्वरूप अभ्यासणे हा आपला मुख्य उद्देश नसल्यामुळे साधारणपणे आजची परिस्थिती काय आहे इकडेच लक्ष वळवू. नाझी-सरकारने आर्थिक व्यवहाराच्या एकंदर क्षेत्राचे पाच विभाग पाडले असून प्रत्येक विभागाचे निराळे संस्थानच (Estate) निर्माण केले आहे. हे विभाग म्हणजे (१) शेतकी, (२) कारखाने व व्यापार, (३) कारागिरी, (४) वाहतूक व (५) मजूरवर्ग. सर्व अंगांचे नियोजन आज सारख्याच प्रमाणात झालेले नाही.

## शेतकी संस्थाने

नियोजनाचे प्रमाण सर्वांत अधिक शेतकीमध्ये आढळून येते. कच्च्या मालाच्या बाबतीत जर्मनी बऱ्याच अंशी परावलंबी आहे. तेव्हा हे परावलंबित्व कमी करण्यास शेतकी पैदास वाढविण्याची व ती योग्य दिशेस लावण्याची तजवीज केली पाहिजे. याकरिता शेतकीत केवळ नियंत्रणावर भागत नाही. शेतकी अंग किंवा शेतकी संस्थान व इतर संस्थाने यांची घटना साधारणपणे एकसारखीच आहे. शेतकी संस्थानात राष्ट्रातील एकूणएक शेतकरी व शेतकी मालाचे व्यापारी यांचा समावेश होतो. या संस्थानाची घटना सकृद्दर्शनी स्वतंत्र बिनसरकारी आहे. म्हणजे, सर्व शेतकऱ्यांचे प्रांत आणि जिल्हानिहाय गट असून या सर्वांचे मिळून राष्ट्रीय शेतकी संस्थान बनते. पण या संस्थेचे सभासदत्व हे वैकल्पिक नाही. प्रत्येकाने सक्तीने सभासद झालेच पाहिजे व एकंदर संस्थानाची सत्ता ही सरकारी सत्तेच्या पाठबळावरच चालते हे उघड आहे. येथे दुसरेही लक्षात ठेवण्यासारखे आहे ते असे की, नाझी जर्मनीत सर्व संस्था किंवा सरकारी खाती यांच्या घटनांच्या बुडाशी एक प्रमुख तत्त्व अथवा पद्धत आहे. या पद्धतीस 'नेता' पद्धती म्हणता येईल. नाझी पक्षाच्या म्हणण्याप्रमाणे प्रातिनिधिक सत्ता ही नेहमी दुबळी व कर्तव्यशून्य असते व असणार. प्रातिनिधिक लोकशाही हे एक थोतांड आहे. प्रत्येक संस्था, सभा किंवा खाते यावर एक 'नेता' पाहिजे आणि त्याच्या हुकमतीने व त्याच्या जबाबदारीवर सर्व गोष्टी व्हावयाच्या. हेर हिटलर हा राष्ट्रनेता, इतर दुय्यम नेते त्याने नेमिलेले, व त्यांच्या सर्व सत्तेचा उगम याजपासून. या तत्त्वाचा विचार आपणांस प्रस्तुत करणे नाही. येथे एवढेच लक्षात ठेवावयाचे की, ही निरनिराळी आर्थिक संस्थाने जरी बिनसरकारी उत्पादकांचे संघ म्हणून समजली गेली, तरी प्रत्येक संस्थानाचा 'नेता' त्या त्या सरकारी खात्याचा मंत्री हाच असतो. म्हणजे या संस्थानांचे सर्व धोरण सरकारी धोरणाप्रमाणेच पूर्णपणे ठरविले जाते.

प्रत्येक शेतकरी हा शेतकी संस्थानाचा एक घटक असतो व प्रत्येक शेतकऱ्याच्या हरएक व्यवहाराचे नियंत्रण करण्याची सत्ता शेतकी संस्थानास पूर्णपणे आहे. कित्येक गोष्टीत हे नियंत्रण फार तपशीलवार केले जाते. धान्यपुरवठा ही कोणत्याही राष्ट्रात सर्वांत महत्त्वाची गोष्ट. जर्मनी धान्याच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी व्हावयास पाहिजे म्हणून धान्याची पैदास वाढविणे अत्यावश्यक. धान्याची किमान पैदास कोणत्याही वर्षी किती झाली पाहिजे हे ठरवून प्रत्येक शेतकऱ्याने किती गहू व इतर धान्य विक्रीस आणिले पाहिजे हे ठरविले जाते. गहू, राय इत्यादी प्रमुख धान्यांचा पुरवठा पहिल्या प्रतीच्या महत्त्वाचा म्हणून त्यांच्या पैदाशीचा नक्की आकडा आगाऊ ठरविला जातो, आणि याचा आपल्या वाटणीस आलेला भाग प्रत्येक शेतकऱ्यास उचलावा लागतो. इतर पैदाशीच्या बाबतीत विक्रीस आणण्याचे परिमाण आगाऊ ठरविलेले नसते. येथे पैदाशीस वळण लावणे हे जरा निराळ्या प्रकाराने होते. सर्व शेतकी पैदाशीची विक्री ही शेतकी संस्थानाद्वारेच होते. याकरिता संस्थानाने निरनिराळी विक्री-मंडळे स्थापिली आहेत. प्रत्येक मध्यवर्ती मंडळाकडे एकेक पैदाशीचा प्रकार सोपविला आहे. उदाहरणार्थ (१) धान्य, (२) गुरे व मांस, (३) दूध, व (४) बटाटे वगैरे. किमती विभागवार ठरविल्या जातात, आणि सर्व विक्री मंडळाकडून व ठराविक किमतीप्रमाणेच झाली पाहिजे. येथेही

धान्याच्या बाबतीत जितकी तपशीलवार व कडक योजना आहे तितकी इतरत्र नाही. शेतकऱ्यांवरील गहू व राय यांच्या ठराविक (quota) आकड्याप्रमाणे पिठाच्या गिरण्या व पावाच्या भट्ट्या यांच्या किंमती व पुरवठा यांबद्दल नियंत्रण आहे. धान्यापासून पावाच्या किंमती पायरीपायरीने ठरविलेल्या आहेत. पावांचे निरनिराळे प्रकार, त्यांची प्रत, पुरवठा व किंमत या सर्व गोष्टी धान्यविक्रीमंडळ व सरकारीखाते यांच्या नियंत्रणाखाली आहेत. इतकी तपशीलवार नसली तरी अशा धर्तीची योजना इतर पैदाशीतही आढळून येते. जेथे नवीन वळण लावण्याची अथवा पुरवठा वाढविण्याची आवश्यकता विशेष नाही, तेथे विक्रीमंडळामार्फत विक्री केल्याने पैदाशीचे परिमाण व प्रत यांवर जेवढी देखरेख होते तेवढी पुरेशी मानली जाते. जेथे पैदास वाढविणे जरूर असेल तेथे किंमती वाढविणे हा पैदाशीस उत्तेजन देण्याचा एक मार्ग झाला. पण मालाचा उठाव करणे हे तितकेच आवश्यक आहे. तेव्हा निरनिराळ्या धंद्यांत स्वदेशी माल वापरण्याचा आकडा (quota) ठरविला जातो. उदाहरणार्थ, चॉकोलेट तयार करताना स्वदेशी (जर्मन) साखर व दूध ही वापरण्याचे ठराविक किमान प्रमाण निश्चित केलेले आहे. जर्मनीत लोकर फार कमी उत्पन्न होते. तिचे उत्पादन वाढावे म्हणून खटपट चालू आहे आणि जर्मन लोकरीची किंमत परदेशाहून आयात केलेल्या लोकरीच्या जवळ जवळ चौपट ठरविलेली आहे. याबरोबरच सरकारी खात्यांस लोकरीचा माल पुरविणाऱ्या कारखानदारांनी आपल्या कारखान्यांत काही विवक्षित प्रमाणात जर्मन लोकर वापरली पाहिजे, असाही निर्बंध आहे. या सर्व प्रकारच्या निर्बंधांप्रमाणेच शेतीसुधारणा, पैदास वाढविणे व पैदाशीची प्रत सुधारणे यांकडेही शेतकी संस्थान लक्ष देत असते. या नियोजनाचे जास्त तपशीलवार वर्णन करणे येथे शक्य नाही. लक्षात ठेवण्याचा मुद्दा एवढाच की, ठराविक किंमती, पैदाशीचा ठोक ठराविक आकडा, विक्रीमंडळाची सत्ता अशा अनेक प्रकारांनी जर्मन शेतकीव्यवसाय आज पूर्णपणे बांधला गेला आहे. काय व किती पेरावे, कोठे व कसे विकावे, या सर्व बाबतींत शेतकऱ्यास बहुतांशी पूर्वनिश्चित योजनेनुसार चालावे लागते.

## इतर संस्थाने

इतर संस्थानांतील योजना इतकी तपशीलवार नाही. परंतु यांतीलही काही गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. नाझी समाजवाद खाजगी मालमत्तेच्या विरुद्ध नाही, किंबहुना खाजगी उद्योगास उत्तेजन द्यावे असे त्याचे मत आहे. तथापि याबरोबरच सरकारी ढवळाढवळींसही काही मर्यादा नसावी. कारण की, जेथे राष्ट्रहित व व्यक्तिहित यांत फरक पडतो तेथे राष्ट्रहिताप्रमाणे गोष्टी घडवून आणणे सरकारचे कर्तव्य आहे. शेतीप्रमाणेच उद्योगधंद्यांच्या संस्थानाचीही घटना आहे. परंतु अजूनपावेतो ही सुव्यवस्थित झालेली दिसत नाही. यात प्रत्येक मालक व कारखानदार हाच घटक. मजुरांस येथे काही स्थान नाही. कारण, कल्पना अशी की, प्रत्येक कारखाना हा जरी घटक असला, तरी कारखानदार अथवा मालक हाच कारखान्याचा 'नेता'. तेव्हा अनुयायांस निराळे स्थान मिळण्याचे काही कारण नाही. कारखानदारांचे धंदानिहाय संघ निघणे हे जर्मनीत पूर्वीपासूनच आहे. बहुतेक प्रमुख धंद्यांत विक्रीसंघ (cartels) हे जुने आहेत, व यांस सरकारी मान्यता मिळून त्यांचे नियंत्रण करणे हेही आधीच झालेले आहे. यांचे प्रमाण व क्षेत्र ही थोडी अलीकडे वाढली असे म्हणता येईल. अलीकडे नियंत्रण नवीन सुरू झाले असे कोठे असेल तर कच्च्या मालाचा वापर, कारखाने सुरू करणे, बंद करणे अथवा वाढविणे या बाबतीत. काही धंद्यांत नवीन कारखाने काढणे अथवा चालू कारखान्यांची उत्पादनसामग्री वाढविणे यांवर निर्बंध आहे. जेथे नवीन उद्योगधंदे वाढविण्याची परवानगी आहे, तेथेही कारखाने कोठे काढावे हे सरकारी योजनेनुसार व्हावे लागते. जर्मनीत लोखंड भरपूर असले तरी तांबे, शिसे, जस्त, अल्यूमिनियम इत्यादी धातूंचे उत्पादन फार कमी आहे. तेव्हा या धातूंचा उपयोग

निरनिराळ्या उद्योगांत कमी व्हावा म्हणून त्यांचा पुरवठा व विक्री नियमित प्रमाणात एका स्वतंत्र खात्यामार्फत केली जातात. तसेच स्वावलंबनाच्या दृष्टीने सर्व प्रकारच्या कापडाच्या बाबतीत जर्मनी फार मागासलेला आहे. कापूस, ताग, पाट, रेशीम, रबर इत्यादी तंतुद्रव्यांचा देशी पुरवठा जर्मनीत जवळजवळ मुळीच नाही. लोकरीची पैदास ही एकंदर खपाच्या एकदशांशाहून कमी आहे. तेव्हा सर्व प्रकारच्या कापडाच्या अथवा कातड्याच्या उपयोगात शक्य तितकी काटकसर करणे आणि शास्त्रीय शोध लावून कृत्रिम तंतुद्रव्यांचा पुरवठा वाढविणे या दोन्ही दिशांनी प्रयत्न चालू झाले आहेत. आयात कराव्या लागणाऱ्या सर्व तंतुद्रव्यांचा पुरवठा सरकारी खात्यामार्फत नियमित केला जातो. सार्वजनिक व सरकारी खात्यांस लागणाऱ्या कापड–कातड्यांच्या वस्तूंच्या खरेदीस सरकारी परवानगी लागते. किमती अर्थात सगळ्या नियंत्रितच आहेत. नवीन कारखाने घालता येत नाहीत व जुन्यांनी आठवड्यात किती तास काम करावयाचे हे वेळोवेळी ठरविले जाते. उद्देश हा की, शक्य तितक्या थोडक्या कच्च्या मालावर भागवावे, व हा सर्व कच्चा माल सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व कारखान्यांत असा वाटावा की कोठेही बेकारी वाढू नये. परिस्थितीमुळे कृत्रिम रेशमाच्या पैदाशीस अर्थात अत्यंत उत्तेजन मिळाले आहे, आणि कापसाच्या ऐवजी एक प्रकारच्या नवीन कृत्रिम तंतूचाही उपयोग देशात शक्य तितका वाढविण्यात येत आहे.

कृषि–उद्यमांप्रमाणे इतर सर्व अंगांचे नियमन सरकार आज असेच करीत आहे. राहिलेल्यांपैकी फक्त मजुरांच्या नियंत्रणाकडे थोडे लक्ष पुरवू. नियोजन करावयाचे असले म्हणजे नियोजनाचे उद्दिष्ट प्रथम निश्चित करणे अवश्य असते. जे आपोआप घडून येईल ते चांगले असे स्वातंत्र्यवादास म्हणता येते तसे नियोजनवादाचे नाही. वर्गकलहाची कल्पना चुकीची व अनिष्ट असे प्रतिपादल्यानंतर मजूर वर्गाच्या हितांचे संरक्षण कसे करावयाचे हा मुद्दा नाझी सरकारापुढे प्रामुख्याने उपस्थित झाला. कलह अनिष्ट, त्या अर्थी कारखानदार–संघ व मजूर–संघ असे परस्परविरोधी गट निर्माण होऊ देणे योग्य नाही, हे ओघानेच आले. खाजगी उत्पादन चालू ठेवावयाचे म्हणून क्रय-विक्रय–उत्पादनव्यवस्था या सर्व गोष्टींत मजुरांचा काही संबंध नाही. या बाबतींत कारखानदार हाच कारखान्याचा 'नेता' असे ठरले. परंतु मजुरीचे दर, कामाचा नियमितपणा व त्याची निश्चितता, कारखान्यांतील परिस्थिती, या गोष्टींत मजूरवर्गाचे हितसंरक्षण करणे हे कार्य कसे व्हावयाचे? नाझी पक्षाच्या विजयानंतर लगेच सर्व जुने मजूरसंघ रद्द करण्यात आले. त्याबद्दल नाझी–पक्षाने मजूरपंथ अथवा मजूर–फळी निर्माण केली. प्रथमतः यात फक्त मजूरवर्गाचाच समावेश करण्यात आला होता. पण पुढे त्यात मालक, कारकून इत्यादी सर्वांनाच घेण्यात आले. सभासदत्व वैकल्पिक असले तरी सभासदांना देण्यात आलेले फायदे इतके आहेत की, जवळजवळ सर्वच लोक सभासद होतात. जुन्या मजूरसंघाचा सर्व पैसा या नवीन संस्थेस मिळाला आहे, आणि मजूरसंघांचे विमे, बेकारवेतन वगैरे सर्व कार्य या नवीन संस्थेनेच आपणाकडे घेतले आहे. नाझी पक्षाशी या मजूरसंस्थेचा निकट संबंध असून मजुरांचे राजकारण-विषयक शिक्षणही या संस्थेकडूनच केले जाते. अशा रीतीने मजुरांच्या सामाजिक संघटनेची सोय झाली, परंतु मालकांशी वाटाघाटी करणे अथवा भांडणे हे काम काही नवीन मजूरफळी करू शकत नाही. याकरिता स्वतंत्र कायदेशीरयोजना झालेली आहे. १९३४ च्या कायद्याप्रमाणे यासंबंधी दोन निरनिराळ्या योजना करण्यात आल्या आहेत. सर्व मोठ्या कारखान्यांतून मजूर-मालकांची जोडमंडळे निर्माण करण्यात आली असून त्यांजकडे मजूरवर्गाची गाऱ्हाणी ऐकणे व रजा, दंड इत्यादिविषयक नियम बनविणे हे काम दिलेले आहे. परंतु मजूरसंघाचे मुख्य काम मालकाशी मजुरीचे दर वगैरेविषयी वाटाघाट करणे, हे अर्थात जोडमंडळावर सोपविलेले नाही. याकरिता मजूर-विश्वस्त म्हणून अगदी निराळेच अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. वरील जोडमंडळाच्या कामावर हे

मजूर-विश्वस्त देखरेख करितात. परंतु यांची खरी महत्त्वाची कामे म्हणजे आपापल्या टापूत एकंदर कार्यपद्धती व कामकऱ्यांसंबंधी नियम ही साधारण मानाने ठरविणे, प्रसंग पडल्यास मजुरीच्या दरांचे नियमन करणे व कोणाही कारखानदारास कामावरून बरेचसे मजूर एकदम कमी करणे असल्यास त्याविषयी त्यास परवानगी देणे वा न देणे ही होत. जर्मनीचे एकंदर १४ औद्योगिक विभाग पाडण्यात आले असून त्या प्रत्येकावर एक मजूर-विश्वस्त नेमिलेला आहे. मजूरवर्गावर याहून मोठे नियंत्रण म्हणजे अलीकडे प्रत्येक कामकऱ्यास एक नोकरी पुस्तक बाळगावे लागते. या पुस्तकात त्याच्या आजतागायत नोकरीचा आणि कामाचा तपशील नमूद केलेला असतो. ज्याचे पुस्तक आजतागायत व्यवस्थित भरलेले नाही अशा कोणासही कारकुनी, मजुरी अशा कोणत्याही कामावर कोणीही लावू नये, असा गतवर्षापासून कायदा झाला आहे. वरील विवेचनात जर्मनीतील आजच्या परिस्थितीचे तपशीलवार वर्णन करणे हा हेतू नसून केवळ नियोजन-नियंत्रण किती निरनिराळ्या मार्गांनी होते हे दिग्दर्शित करणे एवढाच आहे.

## अमेरिकेतील नियोजन

संयुक्त संस्थानांतील नियोजनाचा इतिहास व स्वरूप ही जर्मनीतील नियोजनाहून अगदी भिन्न अशी आहेत. दोहींच्या पूर्वेतिहासात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. जर्मनीत सरकारी हुकुमतीचा प्रथमपासून प्रभाव फार, तर अमेरिका व्यक्तिस्वातंत्र्यवादाचे माहेरघर. सरकारने विमावगैरेसंबंधी सामाजिक जबाबदाऱ्या उचलण्यात जर्मनीने पुढाकार घेतलेला, तर अमेरिकेत कोणत्याही प्रकारची सरकारी मदत अथवा ढवळाढवळ या विरुद्ध फार कटाक्ष. महायुद्धोत्तर परिस्थिती ही जर्मनीत फार अनिश्चिततेची, निष्कृष्टावस्थेची, तर अमेरिकेत १९१९ ते १९२९ ही वर्षे कमालीची भरभराटीची गेली. इतकी की, अमेरिकेने आपल्यापुरते तरी आर्थिक प्रश्न पूर्णपणे सोडविले असे तेथील काही अतिआशावादी लोक म्हणू लागले होते. परंतु जितके वर चढावे तितका अधःपातही अधिक होतो, या न्यायाने १९२९ नंतर मंदीचे परिणाम अमेरिकेत अतोनात भासले. बेकारी अकल्पित प्रमाणात वाढली, शेतकरी ठार बुडाले, बँकांवर दिवाळखोरीची पाळी आली. तात्पर्य, १९२९ नंतर अमेरिका भरभराटीच्या अत्युच्च शिखरापासून मंदीच्या खोल दरीत एकदम घसरली. प्रे० हूवर यांच्या कारकिर्दीची शेवटची वर्षे ही या मंदीची वर्षे होत. प्रे० हूवर व्यक्तिस्वातंत्र्यवादाचे खरेखुरे प्रतिनिधी व सरकारी ढवळाढवळीच्या विरोधकांचे कट्टे पुरस्कर्ते. यांच्या अमदानीत व यांच्या धुरीणत्वाखाली परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली व काही केल्या मंदी कमी होण्याचा संभव दिसेना. या आपत्तीच्या खडतर अनुभवामुळे परंपरागत कल्पना व समजुती यांस भयंकर जोराचा धक्का बसला आणि स्वस्थ बसून, तटस्थ वृत्ती स्वीकारून संकटनिवारण होणे शक्य नाही, सरकारने सर्व बाजूंनी जोराची धडपड केली पाहिजे, ही प्रे० रूझवेल्ट यांची घोषणा जनतेस पटली. त्याच्या जोरावर प्रचंड बहुमताने प्रे० रूझवेल्ट १९३२ साली निवडून आले, आणि त्यांची कारकीर्द व तेजीची सुरुवात ही एकत्र आल्यामुळे फेरनिवडणुकीच्या वेळेसही अमेरिकी जनतेने रूझवेल्ट यांस पूर्वीपेक्षाही मोठ्या बहुमताने कौल दिला. अमेरिकी तेजीचे श्रेय रूझवेल्ट यांच्या धोरणास खरोखर आहे किंवा नाही असल्या प्रकारच्या प्रश्नांचा विचार आपणास प्रस्तुत कर्तव्य नाही. अमेरिकेसारख्या देशातही परिस्थितीमुळे सरकारास ढवळाढवळ किती करावी लागली व नियोजन कोणत्या थरास गेले हे थोडक्यात दर्शविणे आहे. इतर देशांत प्रसृत असलेल्या बऱ्याच गोष्टी संयुक्त संस्थानांच्या सरकाराने १९२९ सालापर्यंत केलेल्या नव्हत्या. यामुळे प्रे० रूझवेल्ट यांच्या 'नव्या डावातील' अनेक बाबी केवळ अमेरिकेपुरत्या नव्या मानता येतील. उदाहरणार्थ बेकारांस काही मदत करणे ही जबाबदारी बहुतेक युरोपीय राष्ट्रांनी आज बरीच वर्षे पत्करलेली आहे. परंतु

संयुक्त संस्थानांतील बहुतेक संस्थानांत याविषयी काहीएक तरतूद केलेली नव्हती. १९२९ सालानंतर बेकारी झपाट्याने वाढल्यावरही बेकार-मदतीचे कार्य खाजगी व्यक्ती व मंडळ्या यांच्या द्वारेच होत होते. प्रे० रूझवेल्ट यांच्या कारकीर्दीत हे सरकारामार्फत प्रत्यक्ष हाती घेण्याचे प्रथम ठरले. हीच गोष्ट नैसर्गिक संपत्तीसंरक्षणाची. लोकसंख्येच्या मानाने देशविस्तार एवढा मोठा व हरतऱ्हेची नैसर्गिक साधने येथे इतकी विपुल की, यांचा विनियोग कसाही केला तरी त्याबद्दल परवा बाळगण्याचे कारण कोणास वाटले नव्हते. परंतु ही बेपर्वाईची वृत्ती घातक आहे असे मत अलीकडे बनत चालले व प्रे० रूझवेल्ट यांनी निरनिराळ्या बाबतीत या संपत्तीचे संरक्षण करण्याचे योजिले. उदाहरणार्थ, जंगलांच्या उपयुक्ततेवर विशेष जोर देऊन जंगले राखावी व त्यांच्या वाढीचे व योग्य जोपासनेचे प्रयत्न करावे असे धोरण त्यांनी स्वीकारले; आणि हे काम प्रारंभी फार मोठ्या प्रमाणावर हाती घेऊन त्यात बेकारीनिवारणही थोडेसे साधून घ्यावे, असा कार्यक्रम आखण्यात आला. बेकारीनिवारणार्थ बेकारांस वेतन देण्याची जबाबदारी पत्करण्यापूर्वी त्यांना काम देणे हा जास्त श्रेयस्कर मार्ग, ही प्रे० रूझवेल्ट यांची समजूत, व म्हणून जंगल-खात्यातील विशेष कामांप्रमाणे इतर सरकारी बांधकामाची वगैरे कामे त्यांनी मोठ्या प्रमाणावर सुरू केली आणि त्याकरिता बरेचसे कर्ज काढण्याची परवानगीही कायदेमंडळाकडून मिळविली. मोठ्या प्रमाणावर सरकारी कामे हाती घेण्याचे हे धोरण केवळ अमेरिकीच आहे असे समजण्याचे कारण नाही. बहुतेक सर्व देशांत याचा स्वीकार करण्यात आला आहे, व अर्थशास्त्रज्ञही खाजगी अर्थव्यवहार मंदावला असता सार्वजनिक कामे हाती घेऊन सरकारने व्यवहाराचे क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न करणे या गोष्टीवर अलीकडे विशेष भर देत आहेत. इतर देशांपेक्षा असल्या सार्वजनिक कामांप्रीत्यर्थ अमेरिकेत पुष्कळच जास्त पैसा खर्च करण्यात आला म्हणून याचा उल्लेख केला आहे.

### प्रे० रूझवेल्ट यांच्या नियोजनव्यवस्थेतील नवीन उपक्रम

प्रे० रूझवेल्ट यांचे नियोजनव्यवस्थेतील दोन नवीन उपक्रम म्हणजे उद्योगधंदे व शेती यांच्या पुनर्घटनेसंबंधीचे. राष्ट्रीय उद्योग पुनरुज्जीवनाचा कायदा (N. I. R. A.) व शेतकी पुनर्घटनेचा कायदा (A. A. A.) यांविषयी येथे तपशीलवार लिहिण्याची आवश्यकता नाही. एकदोनच गोष्टी ठळकपणे निर्देशितो. प्रे० रूझवेल्ट यांच्या कार्यक्रमात काम वाढविणे, किमतींचे नियंत्रण करणे व मजुरांची स्थिती सुधारणे या गोष्टी प्रामुख्याने होत्या. जर्मनीसारखा सर्व पदार्थांच्या किमतींचे प्रत्यक्ष नियंत्रण करण्याचा प्रयत्न रूझवेल्ट यांनी कधीच केला नाही. उद्योगधंद्यातील चढाओढीच्या अनिष्ट प्रकारास आळा घालणे हा किमती स्थिरावण्याबद्दलचा त्यांचा मुख्य उपाय, व हे करावयाचा त्यांचा मार्ग म्हणजे प्रत्येक उद्योगधंद्याने आपणापुरते योग्य ते नियम करून ते सर्वांकडून पाळले जातील हे पाहणे. प्रत्येक धंद्यात त्या त्या धंद्यापुरती नियंत्रणसंस्था निर्माण करावी व या संस्थेकडे नियामनाचे कार्य द्यावे असे ओघाने ठरले; आणि रा. उ. पु. कायद्याच्या अंमलबजावणीकरिता दोन वर्षांच्या आत लहानमोठ्या ५४६ नियंत्रक संस्था अस्तित्वात आल्या. या नियंत्रक संस्थांचे कार्यक्षेत्र व घटना ही सगळीकडे सारखीच नव्हती. ठराविक साच्यात सुसंगत घटना होण्यास खरोखर फारसा अवधीच मिळाला नाही. परंतु मजुरांच्या कामांचे तास, त्यांचे वेतन व इतर परिस्थिती, उत्पादनाची प्रत, विक्रीची पद्धती, मालाच्या किमती ठरविण्यासंबंधीचे धोरण इत्यादी अनेक बाबींत या औद्योगिक नियंत्रकसंस्थांस महत्त्वाचे अधिकार देण्यात आले होते.

औद्योगिक पुनरुज्जीवनाच्या बाबतीत अनेक गोष्टी साधावयाच्या होत्या; म्हणून उपाययोजना विविध व गुंतागुंतीची झाली. शेतकीसंबंधी जवळजवळ एकच उद्दिष्ट प्रे० रूझवेल्ट यांनी आपणापुढे

ठेविले होते, ते म्हणजे शेतीमालाच्या किमती शेतकऱ्यास किफायतशीर होतील इतक्या वाढविणे. या किमती वाढविण्याचा उपाय शेतीच्या मालाची पैदास कमी करणे हा त्यांनी योजिला. शेतकऱ्यांस जवळजवळ सक्तीने शेतकी पैदास–विशेषतः कापूस, तंबाखू असल्या पिकांची–कमी करण्यास लाविली आणि यामुळे त्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यास पडीत टाकलेल्या एकरामागे काही मदत दिली. आणि याकरिता लागणारा पैसा शेतकी मालाच्या बनावटीवर (म्हणजे कांडणे, दाबणे इत्यादी क्रिया करणाऱ्या कारखान्यांवर) कर लादून उभारला. किमती अमुक एका प्रमाणात वाढविल्या असता शेती किफायतशीर होईल, अमुक एका प्रमाणात पैदास कमी केली असता किमती हव्या तितक्या वाढतील, इतकी पैदास कमी करण्याकरिता नुकसानभरपाईसाठी शेतकरीवर्गास अमुक खंडणी दिली पाहिजे व ही खंडणी अमुक कर लादला असता जमा होईल, असे हिशेब करून प्रस्तुत संपूर्ण योजना आखली गेली. हे नियोजन जरी तात्पुरते होते तरी त्याने सबंध राष्ट्र व्यापिले होते व त्यामुळे अगदी नवीन तऱ्हेचे आर्थिक धोरण अमलात आणिले गेले.

औद्योगिक व शेतकी पुनरुज्जीवन या जरी दोन प्रमुख गोष्टी तरी प्रे० रूझवेल्ट यांच्या धोरणास इतरही बरीच अंगे होती. उदाहरणार्थ, कर्जबाजारी शेतकरी व सर्व देशभर कर्ज काढून घरे बांधलेले लहान लहान घरमालक यांची मंदीमुळे फारच त्रेधा उडाली. तेव्हा त्यांस सरकारी कर्जाची मदत देऊन ऋणमुक्त करण्याकडे रूझवेल्ट यांनी विशेष लक्ष पुरविले. पण याहूनही विशेष उल्लेखण्यासारखी योजना म्हणजे सरकारी वीजपुरवठ्याची. प्रे० रूझवेल्ट यांच्या कारकीर्दीत टेनेसी नदीवर मोठमोठी धरणे बांधून वीज उत्पन्न करण्याची एक प्रचंड योजना हाती घेण्यात आली आहे. आजपावेतो अमेरिकेला सरकारने प्रत्यक्ष उत्पादकाचे कार्य हाती घेण्याचे वावडे होते. सर्व व्यवहार खाजगी व्यक्ती आणि मंडळ्या यांच्या हातातच असावयाचा, फार झाले तर काही प्रमुख सार्वजनिक उपयुक्ततेच्या व्यवहारात उदा० आगगाड्या, वीज, पाणीपुरवठा इत्यादीत सरकारी नियंत्रण असावे एवढे तत्त्व मान्य झाले होते. प्रत्यक्ष सरकारी मालकी व व्यवस्था ही गोष्ट आजपावेती माहीत नव्हती. टेनेसी खोऱ्यातील वीजयोजना ही एकंदर उत्पादनाच्या राष्ट्रीभवनाची पहिली पायरी असे समजण्याचे कारण नाही. योजनेचे पुरस्कर्तेही खाजगी वीजवाल्यांच्या कार्यपद्धतीचा व हिशेबाचा पडताळा पाहणे व त्यांवर काही नियंत्रण ठेवणे एवढाच टेनेसी योजनेचा मुख्य उद्देश समजतात. परंतु ही योजना एकदा सरकारने हाती घेतल्यावर तिच्या अनुरोधाने टेनेसी खोऱ्याच्या आर्थिक व्यवहाराच्या नियोजनाच्या निरनिराळ्या प्रांतांत सरकारला सहजच लक्ष घालावे लागेल, असे आताच दिसू लागले आहे; व एका प्रदेशात सरकारी योजना यशस्वी झाल्यास दुसरीकडेही तिचा फैलाव व्हावा हे ओघानेच येणार. या दृष्टीने प्रे० रूझवेल्ट यांच्या इतर सर्व उपक्रमांहूनही टेनेसी खोऱ्याच्या योजनेचे महत्त्व काहीजण जास्त का मानतात हे कळून येईल.

## इंग्लंडमधील नियोजन

अमेरिकेत व्यक्तिस्वातंत्र्याचे बंड फार, तर इंग्लंडांत खुल्या व्यापाराचे. आणि ज्याप्रमाणे रूझवेल्ट यांच्या नव्या डावाने अर्थव्यवहारातील निर्भेळ व्यक्तिस्वातंत्र्यवादास मूठमाती मिळाली, त्याप्रमाणे इंग्लंडने संरक्षक जकाती लादल्यामुळे निर्भेळ खुला व्यापार हा सुद्धा नामशेष झाला असे म्हणण्यास हरकत नाही. इंग्रजांच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणातील ही क्रांती १९३१ साली घडून आली. पण यापूर्वीच नियोजित आर्थिक व्यवहाराच्या दिशेने इतर क्षेत्रात इंग्लंडने प्रवेश केला होता. महायुद्धातील कटू अनुभवाने काही औद्योगिक मर्मस्थानांचे (Key industries) संरक्षण करण्याचे महत्त्व इंग्लंडला पटले होते. यांत रासायनिक धंद्यासारखे प्रत्यक्ष युद्धोपयोगी धंदे होते, एवढेच

नव्हे, तर बीट साखरेसारख्या इतरही धंद्यांचा समावेश झाला होता. पण युद्धाचा विचार मनात न बाळगताही नियोजनाची आवश्यकता काही क्षेत्रांत भासू लागली होती. यांपैकी सर्वांत महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे शेतकी पैदाशीच्या विक्रीचे. महायुद्धोत्तर काल हा स्थूल मानाने इंग्रज शेतकऱ्यांस एकसारखा हलाखीचाच गेला. १९ व्या शतकात जेव्हा असाच हलाखीचा काल येत असे, तेव्हा श्रमविभागाच्या तत्त्वानुसार परिस्थितीत फेरबदल होत असता असे व्हायचेच असे समजण्याची लोकांची व सरकारची प्रवृत्ती होती.

## कृषिक्षेत्रातील नियोजन

महायुद्धानंतर शेतकी व्यवसायाचे महत्व पटले व प्रचलित विचारसरणी बदलली. या दोन्ही कारणामुळे सरकारी मदत शेतकऱ्यास कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात झाली पाहिजे असे मत बळावले. या मतपरिवर्तनाचा व शेतकीखात्याच्या एकंदर हळूहळू बनत चाललेल्या धोरणाचा दृश्य परिणाम गेल्या पाचसहा वर्षांत निर्माण झालेली विक्रीमंडळे हा होय. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावयाची तर उत्पादकांचे संघटन केले पाहिजे व हे संघटन विशेषतः मालविक्रीविषयी होणे अवश्य आहे, असा सिद्धांत शेतकीखात्याने बनविला. इंग्लंडमधील विक्रीमंडळे म्हणजे उत्पादकांचे संघ होत. एखादे विक्रीमंडळ स्थापण्याच्या पूर्वी एकंदर उत्पादकांपैकी तीनचतुर्थांशांची तरी अनुकूलता लागते. एवढ्यांची अनुकूलता मिळाली म्हणजे इतरांवर विक्रीमंडळात समाविष्ट होण्यास कायद्याने सक्ती करता येते. विक्रीमंडळ स्थापन झाले म्हणजे देशातील कोणत्याही लहानमोठ्या शेतकऱ्यास या मंडळाच्या देखरेखीखालीच आपल्या मालाची विक्री करावी लागते. विक्रीमंडळाचे अधिकार व कार्यपद्धती ही सर्वत्र सारखीच नाहीत. विशिष्ट परिस्थितीप्रमाणे त्यांत फेरबदल होत असतो व अजूनही या योजना प्रयोगावस्थेतच आहेत असे म्हणण्यास काही हरकत नाही. परंतु आजच विक्रीमंडळाचा व्याप फार मोठा आहे. आणि बाजारांतील चढाओढ व पदार्थांच्या किमती यांचे त्यांनी केलेले नियंत्रण सगळीकडे दिसून येते. उदाहरणार्थ, दूध-विक्रीची गोष्ट घ्या. सबंध ग्रेट ब्रिटनचे मिळून एक दूधविक्रीमंडळ स्थापण्यात आले आहे. दुधाची पैदास करणारे सर्व देशभरचे लोक या मंडळाचे घटक आहेत. प्रादेशिक संघटना व निवडणुकी होऊन विक्रीमंडळाचे अधिकारीमंडळ बनते. शेतकीखात्यातर्फेही काही प्रतिनिधी या मंडळाच्या वरिष्ठ अधिकारीमंडळावर नेमले जातात. सर्व देशभरच्या सर्व प्रकारच्या दुधाच्या किमती विक्रीमंडळ ठरविते. दरवर्षी हे उत्पादकांचे विक्रीमंडळ दूध–विक्रेत्यांच्या संघांशी करारमदार करून दुधाच्या किमतीचे तपशीलवार नियोजन करते. निरनिराळ्या प्रादेशिक विभागांत, तसेच निरनिराळ्या हंगामांत, मागणीपुरवठ्याच्या फरकाप्रमाणे किमतीत कसे फेरबदल करावयाचे हे आगाऊ ठरवितात. पिण्याकरिता विकाऊ दूध व चीज वगैरे करण्याकरिता कारखानदारांस विकण्याचे दूध यांच्या किमतीत किती व कसा फरक ठेवायचा हेही निश्चित केले जाते. कोणाही उत्पादकास विक्रीमंडळाच्या बाहेर किंवा मंडळाने ठरविलेल्या किमती सोडून विक्री करता येत नाही. निरनिराळ्या प्रादेशिक विभागांत व निरनिराळ्या उपयोगांत आणिलेल्या दुधाच्या किमतीत जरी फरक असला, तरी विक्रीपासून होणारा फायदा एकत्रित केला जाऊन तो काही ठराविक प्रमाणात निरनिराळ्या प्रदेशांतील उत्पादकांत वाटतात. अशा रीतीने सर्व देशभरच्या उत्पादकांची दृढ संघटना होऊन किमतींचे नियोजन महिनेच्या महिने आधी केले जाते. शेतकी व्यवहारांस सरकारी मदत विक्रीमंडळ स्थापनेनेच केवळ होते असे नाही, तर काही शेतकी पैदाशीच्या आयातींचे परिमाण ठरविणे आणि देशी पैदास मालबनावटीत वापरण्याबद्दल सक्ती करणे (उदा० पिठाच्या गिरण्यांवर) अशा प्रकारचे निर्बंधही इंग्लंडमध्ये अमलात आलेले आहेत.

## इतर क्षेत्रांतील नियोजन

नियोजन शेतीसंबंधी विशेष दिसून आले तरी इतर क्षेत्रांतही थोड्याबहुत प्रमाणात ते आढळते. कापसाच्या गिरण्या व कोळसा या धंद्यांतील अंतर्व्यवस्थेत सरकारने ढवळाढवळ केली असून त्यांच्या पुनर्घटनेच्या दिशेचे स्थूल स्वरूप कायद्याने नियोजित करण्यात आले आहे. लोखंड–पोलादांच्या कारखान्यांना संरक्षक जकाती म्हणून मदत करतेवेळीच धंद्यांत पुनर्घटना करणे आणि सुव्यवस्था लावणे यासंबंधी कारखानदारांकडून सरकारने आश्वासन घेतले व याविषयी दिरंगाई दिसता जकाती काढून घेण्याची धमकी देऊन घाई करण्याचा लकडा लाविला. दुसरीकडे १९३१ सालानंतर परदेशांत कर्ज देण्याची अथवा भांडवल गुंतविण्याची मनाई केली. इतकेच नव्हे, तर स्वदेशी कंपन्यांसही भांडवल अथवा कर्ज उभारणे ते फक्त बँक ऑफ इंग्लंडच्या देखरेखीखालीच करता येऊ लागले. इंग्लंडमधील विजेचे सर्व उत्पादन आज कित्येक वर्षे एका सरकारी मंडळीकडूनच होत असते. अशा नाना तऱ्हांनी व विविध बाजूंनी सरकारी ढवळाढवळ व तपशीलवार नियोजन यांचा प्रसार झालेला दिसून येतो. आणि आज तर विशेष अवनत प्रदेशांत सरकारने याहूनही चढाईचे धोरण स्वीकारावे याविषयी सर्व पक्षोपक्षांचे एकमत आहे. नवीन कारखाने येथेच काढावयास लावावे, येथील उद्योगधंद्यांस विशेष आश्रय द्यावा, या प्रदेशांत सर्व प्रकारच्या व्यवहारविस्तारास विशेष सवलती द्याव्या, यांची स्थिती सुधारेल अशा प्रकारे कारखान्यांच्या व व्यापाराच्या वाढीस वळण द्यावे आणि हे होण्याकरिता तपशीलवार योजना तयार करण्यास पैसा खर्च करावा अशी मागणी चोहीकडून होत आहे. सारांश, पूर्वेतिहास काहीही असला व आजही काही अर्थशास्त्रज्ञांची साशंक वृत्ती कायम असली, तरी नियोजनास तत्त्वतः विरोध इंग्लंडमध्ये उरला नाही. एवढेच नव्हे, तर नियोजनाचे प्रत्यक्ष पाऊल काही क्षेत्रांत तरी या देशात बरेच पुढे पडले आहे यात शंका नाही.*

## ३

आर्थिक नियोजनाचे सांप्रतचे स्वरूप व क्षेत्र ही किती विविध आहेत हे मागील वर्णनावरून कळून येईल. जसजशी परिस्थिती बदलली व उपाययोजना सुचली, तसतसा नियोजनाच्या अनेक प्रकारांचा निरनिराळ्या राष्ट्रांनी अवलंब केला. पूर्वविचाराने संगतवार योजना अशी कोठेच झाली नाही, आणि आजचे नियोजन हे बहुतांशी विवक्षित क्षेत्रे व व्यवहार यांपुरतेच मर्यादित आहे.

## मंदीचा नियोजनावरील परिणाम

पूर्वी दर्शविल्याप्रमाणे नियोजनाचा उगम महायुद्धोत्तर आर्थिक व राजकीय परिस्थितीतच आहे. महायुद्धोत्तर आर्थिक परिस्थिती विशेष अनिश्चित व अस्थिर होती. हळूहळू घडून येणारे फेरबदल अनिर्बंध व्यवहाराच्या काळात फारसे त्रासदायक भासत नाहीत; आणि आर्थिक जीवन व व्यवहार-पद्धती ही लवचिक असली म्हणजे मोठमोठे फेरबदल क्रमाक्रमाने व सावकाशपणे घडून आल्यास क्रांती घडून आल्याशिवाय समाज त्यांस पचवू शकतो. महायुद्धोत्तर काळात घडलेले फरक हे फार झपाट्याने घडून आले. अनिर्बंध व्यवहाराखाली दर बदलास युक्त असेल त्याप्रमाणे परिस्थितीची

* *लोकशिक्षण* ७ : १० एप्रिल १९३७ पृ० ८०२–८१३.

घडी बसत जाते हे जरी खरे असले तरी याला नेहमी कालावधी लागतो, आणि ज्या मानाने बदल मोठा त्या मानाने हा कालावधी अधिक असतो. व्यवहाराची घडी विस्कटल्यानंतर ती पुनः बसेपावेतो समाजातील काही काही व्यक्तींस व समूहांस आपत्तीत दिवस काढावे लागतात. फरक फार मोठे झाले म्हणजे या आपत्तींचे क्षेत्र फार मोठे होते; आणि त्यातून लवकर मार्ग दिसेनासा झाला म्हणजे सरकाराने काही तरी करावे अशी निकडीची मागणी चोहीकडून होऊ लागते; आणि सरकारासही या मागणीस नकार देणे जड जाते. तेजीमंदीच्या चक्राचे हेलकावे शक्य तितके कमी करण्याबद्दल प्रयत्न करणे हे एक सरकारचे कर्तव्य होय, हे मत अलीकडील काळातच दृढ झाले आहे. आर्थिक व्यवहाराचे नियोजन १९२९ पावेतो फार अल्पच होते आणि नंतरच्या प्रचंड मंदीच्या काळातच ते वाढले, हे वर विस्ताराने दाखविलेच आहे.

## राजकीय परिस्थितीचे महत्त्व

आर्थिक फेरबदलाबरोबर राजकीय परिस्थितीचे महत्त्वही आकळणे अवश्य आहे. आजच्या एकंदर सार्वराष्ट्रीय व्यवहारांत निरनिराळ्या लहानमोठया सार्वभौम राष्ट्रांची एकमेकांविषयीची साशंक वृत्ती आणि स्पर्धा ठळकपणे दिसून येत आहेत. आज आर्थिक अथवा राजकीय धोरणाचे महत्त्व जगाच्या दृष्टीने कोणीही मानीत नसून त्यात केवळ एकांगी राष्ट्रीय दृष्टी तेवढी असते. १९ व्या शतकातील परिस्थिती काहीशी निराळी होती. याचा अर्थ त्या वेळची प्रबल राष्ट्रे स्वार्थाकडे दुर्लक्ष करून जगाचे हित साधण्याकरिता झटत होती असा नव्हे. एवढेच की, बलवान राष्ट्रेच फार थोडी होती आणि तीही सर्व युरोप व अमेरिका या दोन खंडांतच. थोड्या बलाढ्य साम्राज्यांची जगभर हुकमत चालत होती. या साम्राज्यांचा विस्तार होण्यास वाव बराच असल्यामुळे एकमेकांच्या व्यवहारांत अडथळे उत्पन्न करण्याची त्यांस विशेष आवश्यकता भासत नव्हती. यामुळे एका दृष्टीने—म्हणजे या साम्राज्यांच्या विस्ताराच्या दृष्टीने—जगाचा व्यवहार बहुतांशी अनिर्बंध होता. महायुद्धानंतर राष्ट्रांची संख्या वाढली; इतकेच नव्हे तर, दोनचार प्रमुख राष्ट्रांची पकड पूर्वीइतकी टिकली नाही; यामुळे राष्ट्रीय वृत्ती बळावून तिचे जगाच्या व्यवहारावर स्पष्ट परिणाम दिसू लागले. म्हणजे राष्ट्रीय भावना अलीकडे बळावल्या असा अभिप्राय नव्हे. कोणत्याही राष्ट्राने जगभर साम्राज्य पसरविणे हे आत्यंतिक स्वराष्ट्रीय महत्त्वाकांक्षेचेच द्योतक होय. आजच्या व पूर्वीच्या परिस्थितीत फरक एवढाच की, ज्या आकांक्षा तृप्त करण्याचा प्रयत्न करणे पूर्वी फार थोड्यांस साधत होते ते आज अल्पांशाने तरी अनेकांस शक्य झाले आहे. राष्ट्राराष्ट्रांतील बलाबलाचा काहीसा स्थिरावलेला काटा महायुद्धानंतर हेलकावे खाऊ लागला व तो अद्याप समतोल स्थितीप्रत पावलेला नाही. तो अद्यापि हेलकावत असून राजकीय परिस्थिती अत्यंत नाजूक बनलेली आहे. असे असल्यामुळे पूर्वीपेक्षाही आपापल्या राष्ट्राचे केवळ लढाऊ सामर्थ्य वाढविण्याकरिता प्रत्येक राष्ट्राचे प्रयत्न चालू आहेत. महायुद्धातील अनुभवावरून परराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून राहणे फार धोक्याचे आहे हे सर्व देशांस कळून चुकले. आणि राष्ट्रीय स्वावलंबनाचे आर्थिक धोरण जिकडेतिकडे स्वीकारण्यात आले. अर्थात राष्ट्राला स्वावलंबी बनवावयाचे असल्यास त्याला सरकारी नियोजनाशिवाय गत्यंतर नाही. याप्रमाणे आर्थिक व्यवहारांच्या नियोजनाच्या मुळाशी राजकीय व आर्थिक परिस्थिती आहे हे कळून येईल. त्यातल्यात्यात राजकीय परिस्थितीचा व नियोजनाचा अतिशय निकट संबंध आहे. जगात जोपावेतो अशांततेचे वातावरण प्रसृत आहे तोपावेतो खुला व्यापार व अनिर्बंध व्यवहार यांची कास धरणे राष्ट्रीय सरकारांस शक्य नाही. प्रत्येक राष्ट्र आपल्यापुरते पाहणार आणि सार्वराष्ट्रीय श्रमविभागाकडे दुर्लक्ष करून आपल्यापुरते आर्थिक व्यवहारांचे नियोजन करणार.

## नियोजनाचा विस्तार क्रमप्राप्त

आर्थिक तेजीमंदीच्या चक्राचे निवारण, बेकारीस मदत इत्यादी गोष्टी जोपावेतो सरकारांचे आवश्यक कर्तव्य मानिल्या जातात आणि जोपावेतो राष्ट्रीय स्वावलंबन हे बहुतांशी प्रत्येक राष्ट्राचे ध्येय बनून राहिले आहे, तोपावेतो आर्थिक नियोजनाचा भावी काळात संकोच न होता विस्तारच होत जाणार हे अगदी उघड आहे. नियोजनाच्या क्षेत्राचा विस्तारच होत जाणार असे मानण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, एका क्षेत्रात नियोजनास आरंभ केला असता त्याचे उद्दिष्ट पुरे पाडण्याकरिता आजू-बाजूच्या क्षेत्रांतही नियोजन अवलंबावे लागते असा अनुभव आहे हे होय. या प्रवृत्तीची काही मोठी गमतीदार उदाहरणे देण्यासारखी आहेत. उदाहरणार्थ, जर्मनीत दूध व तज्जन्य पदार्थांच्या पुरवठ्यावर कडक नियंत्रण घालणे भाग आहे. कारण, विशेषतः लोण्याचा तुटवडा त्या देशात फार भासतो. प्रथम दूध, लोणी इत्यादींचा पुरवठा-मागणी पाहून त्यांच्या उत्पादनाचे व किमतींचे नियोजन–नियंत्रण करण्यात आले. लोण्याची किंमत फार जबर ठेवावी लागली, यामुळे लोण्याचा खप मर्यादित झाला. परंतु इतर बाबतींत फार अनपेक्षित प्रकार घडून आला. तो असा की, अंड्यांची मागणी अतिशय वाढली व नियोजित किमतीस अंडी मिळेनाशी होऊन त्यांच्या पुरवठ्यावर फार ताण पडला. कारण, लोणी खाण्यास न मिळाल्यामुळे त्याच्याऐवजी काहीतरी हवे म्हणून त्या मानाने स्वस्त मिळणारी अंडी लोक बऱ्याच अधिक प्रमाणात विकत घेऊ लागले. म्हणून पुढील वर्षी लोण्याच्या किमतीच्या कडक नियंत्रणाबरोबर अंड्यांच्या किमतींचे नियंत्रणही विशेष प्रमाणात करणे सरकारास भाग पडले. प्रे० रूझवेल्ट यांच्या प्रयत्नात अशाच रीतीने पूर्वापेक्षेच्या पलीकडे नियोजनाचे क्षेत्र—विशेषतः उद्योग-धंद्यांच्या बाबतीत—वाढत गेले, असा अनुभव आहे.

## नियोजन हे एक साधन

नियोजन हे एक केवळ साधन आहे. याचा सर्वच राष्ट्रे आपापल्या तऱ्हेने आपापली उद्दिष्टे साधण्याकरिता उपयोग करीत असतात. साम्यवादी, समाजवादी, राष्ट्रवादी असे अनेक निरनिराळे मतानुयायी नियोजनाची कास धरितात. समाजाची घटना बदलावयाची असली, एखादे मोठे सामाजिक किंवा आर्थिक स्थित्यंतर बरेच घडवून आणावयाचे असले, म्हणजे आर्थिक व्यवहाराच्या नियोजनाची आवश्यकता भासते. परराष्ट्रांशी खुले दळणवळण असले म्हणजे आर्थिक परिस्थितीवर होणारे या दळणवळणाचे परिणाम टाळता येत नाहीत, आणि हे परिणाम अमुक एका प्रकारचेच होतील अथवा असतील याबद्दल खात्री सांगता येत नाही. राष्ट्रीय उन्नतीकरिता अमुक एका प्रकारची परिस्थिती उत्पन्न होणे आवश्यक आहे असे वाटणाऱ्या सर्व कामगारांस परराष्ट्रांशी असलेला संबंध शक्य तितका कमी करण्याचे धोरण स्वीकारावे लागते. बोल्शेव्हिकांचे धोरण निदान प्रथमारंभी तरी जगद्व्यापी होते. तथापि रशियापुरती सामाजिक व आर्थिक क्रांती घडवून आणण्याकरिता त्यांस जगाशी आपला संबंध बहुतांशी तोडावा लागला. जर्मनी-इटालींना स्वावलंबी व्हावयाचे म्हणून आर्थिक नियोजनाच्या एकामागून एक अनेक पायऱ्या चढाव्या लागल्या. इतकेच काय पण श्री. केन्ससारख्या अर्थशास्त्रज्ञासही व्याजाच्या कमी दराचे महत्त्व इंग्लंडापुरते फार वाटू लागल्यामुळे, राष्ट्रीय स्वयंपूर्णतेचे समर्थन करून नवीन भांडवल गुंतविण्यावर नियंत्रणे घालून ते नियोजित करावे, असा आग्रहाचा सल्ला देणे योग्य वाटले. सारांश, ज्याला ज्याला आर्थिक व्यवहारास प्रचलित प्रवृत्तीहून भिन्न असे विशेष वळण लावणे हिताचे वाटते त्याला त्याला नियोजनाचा मार्ग पसंत पडतो.

तसेच राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहाराचा संकोच कोणत्या ना कोणत्या कारणाने होऊ लागला म्हणजे

स्वावलंबनाचा मार्ग सर्वच राष्ट्रांस स्वीकारावा लागतो. परराष्ट्रीय व्यवहाराच्या मार्गात एकदा अडथळे उत्पन्न होऊ लागले, म्हणजे त्यांचा परिणाम सगळीकडे कसा दिसू लागतो व त्यांचे स्वरूप क्रमशः अधिकाधिक विविध व व्यापक कसे होत जाते याचा ऊहापोह मागे एका लेखात आम्ही केलाच आहे. या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी गोष्ट एवढीच की, अनिर्बंध व्यवहाराचा अंमल चालू राहण्यास बहुतांशी सर्व प्रमुख राष्ट्रांचे सहकार्य लागते. हे सहकार्य मिळत नसल्यास इतर राष्ट्रांचा प्रतिकार करण्याच्या बुद्धीने तरी प्रत्येकासच निर्बंध घालण्याचा मार्ग स्वीकारावा लागतो; आणि निर्बंध बरेच झाले म्हणजे पुढची पायरी म्हणून नियोजन ओघानेच येते.

या अनेक गोष्टींचा विचार केला म्हणजे सर्व आर्थिक व्यवहार पुनः अनिर्बंध होणे निदान इतक्यात तरी संभवनीय वाटत नाही. अनिर्बंध व्यवहाराचे तत्त्वज्ञान रुजण्यास योग्य भूमिका—परिस्थितीची अथवा विचाराची—आज उरलेली नाही. या तत्त्वज्ञानाचा निर्भेळ पुरस्कार करणारा प्रो. रॉबिन्ससारखा एखादाच आग्रही अर्थशास्त्रज्ञ आज आढळतो. इतर सर्वांनी या भूमिकेचा त्याग करून निर्बंध, नियंत्रण व नियोजन यांची कमीअधिक प्रमाणात आवश्यकता प्रतिपादिली आहे.

## नियोजनाच्या मार्गातील प्रमुख अडचणी

आता नियोजनाच्या मार्गातील प्रमुख अडचणींचा विचार करून ही लेखमाला संपवितो. सकृद्दर्शनी एकदा नियोजनाचा स्वीकार केला म्हणजे हळूहळू त्याचे क्षेत्र वाढून लवकरच पूर्ण नियुक्त व्यवहारापर्यंत पाळी येण्यास काहीच हरकत नसावी असे वाटते. खुला व्यवहार म्हणजे अनिर्बंध, अनियोजित, यदृच्छेने घडून येणारा व त्याअर्थी अव्यवस्थित; उलट, नियोजित व्यवहार हा पूर्ण पूर्वविचारांती ठरविला गेला असल्यामुळे व्यवस्थित व इष्ट, असा युक्तिवाद बऱ्याच वेळा करण्यात येतो. परंतु हा प्रश्न इतका सरळ नाही. अनिर्बंध व्यवहारही काही मर्यादित कक्षेत व ठराविक साच्यात चालतो. आणि त्यात बाजारभावाच्या मुख्य सूत्रामुळे व्यवहारास एक प्रकारचे वळण सारखे लागत असते. उलट, नियोजन करणे फार गुंतागुंतीचे व भानगडीचे असते. तेव्हा नियोजनाचे श्रेष्ठत्व वाटते तितक्या चटकन प्रस्थापित करणे शक्य नाही. अनिर्बंध व्यवहाराच्या गुणदोषांचा विचार येथे करावयाचा नसून केवळ नियोजनाच्या मार्गातील अडचणी पाहावयाच्या आहेत. या अडचणी अनेक प्रकारच्या आहेत. नियोजन करावयाचे म्हणजे नियोजनाचे उद्दिष्ट ठरविणे व ते ज्या मार्गांनी साध्य होईल ते मार्ग निश्चित करणे होय. मागे सांगितल्याप्रमाणे महायुद्धासारख्या काळात उद्दिष्ट ठरविणे सोपे असते. युद्ध जिंकण्याचा प्रयत्न करणे ही एकच गोष्ट त्या वेळेस डोळ्यांपुढे असते. इतर काळात नियोजनाचे उद्दिष्ट इतक्या सोप्या रीतीने मांडता येत नाही. राष्ट्रीय स्वावलंबन, राष्ट्रीय संपत्ती वाढविणे, भांडवलवाल्यांचे वर्चस्व कमी करून आर्थिक विषमता कमी करणे, असली अनेक उद्दिष्टे नियोजन अवलंबिणाऱ्या सरकारापुढे असतात. पण उद्दिष्ट साधताना कोणत्या साधनांची निवड करावी आणि उद्दिष्टे व साधने भिन्न असता त्यांचा एकमेकांशी मेळ कसा बसवावा, हे प्रश्न सोडविणे फार बिकट आहे.

आर्थिक व्यवहारांचे परस्पर संबंध फार गुंतागुंतीचे असल्यामुळे कोणत्याही नियोजनाचा परिणाम सर्व बाजूंनी काय होईल हे ठरविणे फार कठीण असते. कारण, अनेक गोष्टींचा पूर्वानुभव काही नसल्यामुळे बऱ्याच कालांतराने अमुक केले असता काय होईल याचे अनुमान करता येते. विस्तार भयास्तव या मुद्द्याचा उदाहरणे देऊन विचार करता येत नाही. परंतु शेतकऱ्यास कर्जमुक्त कसे करावे यासंबंधी हिंदुस्थानात निरनिराळ्या कल्पनांनी करण्यात आलेले कायदे व त्यांचे प्रत्यक्ष व्यवहारात झालेले परिणाम अशा एखाद्याच अनुभवाचा जरी विचार केला, तरी या मुद्द्याचे महत्त्व लक्षात येईल.

ऋणविषयक कायद्यापेक्षाही नियोजनाचा व्याप व बारकावा अधिक आणि त्याने साधावयाच्या गोष्टीही अनेक, तेव्हा नियोजनाच्या अनेकविध प्रकारांचा परिणाम परस्परविरोधी होणार नाही अथवा साध्य तेवढेच ते साधतील याची खात्री बाळगणे नेहमीच कठीण असणार.

## नियोजनासाठी आवश्यक व्यवस्थेचा प्रश्न

नियोजनाविषयी लक्षात घेण्याचा दुसरा मुद्दा म्हणजे, ते घडविण्याकरिता लागणाऱ्या व्यवस्थेसंबंधीचा होय. नियोजन करावयाचे म्हटले म्हणजे सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांविषयी इत्थंभूत माहिती अगदी बारकाव्याने गोळा करणे कसे आवश्यक आहे हे वर दर्शविलेच आहे. ही माहिती सतत गोळा करून तिचे क्रमाक्रमाने संकलन करावयाचे व मागील प्रत्यक्ष संकलित अनुभव व पुढील अनुमान यांचा विचार करून नियोजनाचा आराखडा तयार करावयाचा. हा आराखडा तयार झाल्यावर त्यास तपशीलवार स्वरूप देऊन त्याची गटवार विभागणी करून देणे हे दुसरे काम होते. या पद्धतीने कोणतीही राष्ट्रीय योजना सिद्ध झाल्यावरही तिची अंमलबजावणी करण्याचे काम उरतेच. या कामाकरिता स्वतंत्र सरकारी खाती निर्माण करून सरकारी अंमलदार व तपासनीस नेमणे आवश्यक होते. म्हणजे योजना तयार करणे व ती अमलात आणणे या दोनही कार्यांकरिता एक मोठी नोकरशाही निर्माण करणे आवश्यक असते. नियोजन हे अर्थात खर्चाचे होते. अनिर्बंध व्यवहारांत प्रत्येकाने आपापल्या करिता विचार व योजना केल्याने या कार्याचा निराळा असा खर्च पडत नाही. नियोजन केले असता हा खर्च फार भारी येतो. प्रे० रूझवेल्ट यांच्या उद्योगधंद्यांचे नियंत्रण करणाऱ्या संस्था (Code Authorities) अथवा जर्मनीतील निरनिराळ्या आर्थिक संस्थानांच्या व्यवस्था पाहिल्या म्हणजे नियोजनाकरिता निर्माण करावी लागणारी खाती किती मोठी व किती विविध असावी लागतात हे स्पष्ट कळून येईल. नियोजनाची यशस्विता या नोकरशाहीच्या सचोटीवर व कार्यक्षमतेवर अवलंबून राहाणार हे उघड आहे. म्हणजे, जरी नियोजन तत्त्वतः श्रेयस्कर वाटले तरी प्रत्यक्ष व्यवहारात ते कितपत व कोठे आणावयाचे याचा विचार करताना सरकारी नोकरवर्ग—कनिष्ठ व वरिष्ठ—यांजकडून कोणत्या प्रकारच्या कामाची अपेक्षा करणे शक्य आहे याचा विचार काळजीपूर्वक झाला पाहिजे. जितके अधिक तपशीलवार नियोजन होईल, तितका हा प्रश्न अधिक महत्त्व पावेल. रशियातील योजना अनेक बाजूंनी नीट पार न पडण्याचे एक कारण तेथील ते काम नोकरशाहीच्या काहीसे आवाक्याबाहेरचे झाले हेही असू शकेल. तसेच ही निरनिराळी खाती निर्माण करून त्यांजकडून व्यवस्थितपणे काम करून घेणे आणि सर्व बाजूंनी योग्य अंमलबजावणी व तपासणी होण्याची योजना करणे हेही काम सोपे नाही. प्रे० रूझवेल्ट यांनी काही कामापुरते संघटित नियम करण्याचे व वेळेस किमतीही ठरविण्याचे अधिकार कारखानदारांस दिले आणि मजुरांच्या परिस्थितीसंबंधी ते काही बंधने स्वतःवर घालून घेतील अशी त्यांनी आशा धरली. परंतु प्रत्यक्ष आचरणात कारखानदारांनी सवलतींचा फायदा घेतला, पण मजुरांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले. या प्रकरणी कारखानदारांच्या स्वराज्य संस्थात मजुरांच्या प्रतिनिधींचा समावेश कसा केला जावा आणि वैयक्तिक कारखानदारांवर सर्व नियम पाळण्याची सक्ती कशी करावी यासंबंधी अनेक अडचणी उपस्थित झाल्या त्यांचे निराकरण नीटसे करता आले नाही. इंग्लंडमधील विक्री-मंडळांच्या व्यवस्थेविषयी असलाच एक कूट प्रश्न आहे. ही विक्रीमंडळे म्हणजे उत्पादक-संघच होत. यांना आपल्या मालाच्या किमती निश्चित करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या किमती ठरविताना गिऱ्हाईक लुबाडले न जाईल अशी व्यवस्था कशी करावी हा तो प्रश्न होय. उत्पादकांचे संघटन होते तसे गिऱ्हाइकांचे होऊ शकत नाही, आणि नफ्यातोट्यासंबंधी उत्पादक जसा आकडेशीर विचार करू शकतो तसा गिऱ्हाइकांस करता येत नाही.

## नियोजनासंबंधीच्या आक्षेपांचा परामर्ष

नियोजनाविरुद्ध अर्थशास्त्रज्ञांचा सर्वांत मोठा आक्षेप म्हणजे नियुक्त अवस्थेत अर्थव्यवहारातील किमतीचे सुकाण नाहीसे होते हा होय. खुल्या बाजारात अनिर्बंध व्यवहार चालू असला म्हणजे मागणी व पुरवठा यांतील फेरबदलांप्रमाणे किमतींत चढउतार होत असतो. या चढउतारावरून गिऱ्हाइकांस खरेदी व उत्पादकांस उत्पादन यांचे नियंत्रण करता येते. सर्व प्रकारच्या किमती या आर्थिक परिस्थितीमधील फेरबदलाच्या सूचक होत व त्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे व्यवहाराचे क्षेत्र बदलत राहिले म्हणजे आर्थिक व्यवहार हा सुसंबद्ध राहतो व सर्व साधनांचा विनियोग योग्य प्रमाणात होतो. यासंबंधी काहीसे विस्तृत विवेचन पहिल्या लेखांकात केलेलेच आहे. नियोजनाचे आक्षेपक असे म्हणतात की, जेथे उत्पादनाचे व किमतींचे नियोजन होते, तेथे किमतींचे वरील अर्थाचे सूचकत्व नष्ट होते. नियुक्त किंमत ही काही खुल्या बाजारात निरनिराळ्या उत्पादकांच्या स्पर्धेमुळे व व्यापारी–गिऱ्हाईक यांमधील घासाघिशीने ठरलेली किंमत नव्हे. नियोजित किमती या सत्ताधिकाऱ्यांनी ठरविलेल्या किमती. अधिकाऱ्यांची माहिती व अधिकाऱ्यांच्या कल्पना या त्या किमतीत प्रतिबिंबित झालेल्या असतात. परंतु प्रत्यक्ष परिस्थितीचे गमक असे त्यांस मानता येत नाही. पुढील वर्षी दुधाची अथवा बटाट्यांची किंमत काय असावी हे ठरविताना विक्रीमंडळाने जरी आगाऊ काही आकडेमोड केलेली असली, तरी या किमती एकदा ठरल्या की निश्चित झाल्या असे असल्याने खुल्या बाजारांतील किमतींच्या हेलकाव्यावरून जसे बदलत्या परिस्थितीचे अनुमान काढता येते, तसे नियोजित किमतीं-वरून काढता येणे मुळीच शक्य नाही. नियोजित किमती व प्रत्यक्ष परिस्थिती यांचा मेळ न बसला तर पुरवठा अगदी अपुरा पडणे अथवा मालाचा अगदीच उठाव न होणे येथपर्यंत मजल गेल्याशिवाय हा गैरमेळ लक्षातही येऊ शकत नाही. बरे, असे लक्षात येणे हे सुद्धा नियोजनाचे क्षेत्र फार आकुंचित असले तरच होऊ शकते. म्हणजे, एखादाच व्यवहार नियोजित आहे व त्या व्यवहाराशी निकट संबंध असलेले इतर व्यवहार नियोजित नाहीत असे असले, म्हणजे नियुक्त किंमतही परिस्थितीस फारशी सोडून अशी ठरविता येत नाही. अशातही उत्पादक–संघास गिऱ्हा-इकांच्या एखाद्या वर्गावर बराच अन्याय करता येतो. उदाहरणार्थ, इंग्लंडमधील दूध–विक्री–मंडळाचे धोरण या अर्थी बरेच टीकार्ह आहे असे मत अलीकडील एका समितीने नमूद केले आहे. पण जसजसे नियोजनाचे क्षेत्र वाढते, तसतशी नियोजित किमतींचे फेरबदल वाटेल तसे करता येण्याची शक्यता वाढते, आणि किमतींच्या नियोजनाबरोबर खरेदी–विक्रीचे नियोजनही आले म्हणजे आर्थिक व्यवहारातील सूत्रबद्धता अगदीच नाहीशी होते; अथवा किमतीची सूत्रबद्धता नाहीशी होऊन सूत्रबद्धता आणणे हे केवळ नियोजक–मंडळावर अवलंबून राहते. हा प्रश्न केवळ नियोजक–मंडळास उपलब्ध असलेल्या माहितीच्या अपुरेपणासंबंधीच नाही. ही माहिती आज कमी असल्यास ती पुढे–मागे भरून काढणे शक्य आहे. अर्थात काही विवक्षित प्रकारची माहिती (उदाहरणार्थ, किमतींच्या लहान लहान फरकांमुळे गिऱ्हाइकांच्या खरेदीत होत असलेले फरक) जमविणेही दुरापास्त आहे. परंतु मुख्य मुद्दा हा की, नियोजक-मंडळाने जरी सर्व माहिती जमविली, तरी बाजारभावाचा मानदंड नाहीसा झाल्यावर पद्धतशीर निर्णय करणे हेच कठीण होते. उदाहरणार्थ, उत्पादन वाढवावयाचे ते कापडाचे, लोखंडाचे की फळांचे, अशा प्रकारच्या प्रश्नांचा विचार करावयाचा असल्यास पुरवठा वाढविणे कितपत कठीण किंवा सोपे आणि जास्त गिऱ्हाइकी किती, हे ठरविणे अवश्य आहे. पण हे ठरवावयाचे तर इमारती, यंत्रे, कच्चा माल, वाहतूक इत्यादी सर्व गोष्टीत तपशीलवार किमतींची माहिती एका बाजूस व दुसऱ्या बाजूस निरनिराळ्या दर्जाच्या पदार्थांची निरनिराळ्या किमतींस हुकमी मागणी याविषयीची माहिती

समग्र प्रथम उपलब्ध पाहिजे. पण जेथे सर्व किमतीच नियोजक-मंडळाने नियोजिलेल्या, तेथे त्यांचा स्वतंत्र अनुमाने काढण्यास उपयोग कसा होणार?

वरील युक्तिवादास अद्यापि नीटसे उत्तर मिळालेले नाही. परंतु सर्वच प्रकारच्या नियोजनास याची वाटते तितकी अडवणूक होऊ शकत नाही. एक तर जेथे सर्व आर्थिक व्यवस्था पूर्णपणे नियुक्त आहे, तेथेच वर दर्शविलेली अडचण विशेष भासते. काही विवक्षित क्षेत्रापुरत्या होणाऱ्या नियोजनाविरुद्ध हा आक्षेप जोराने घेता येत नाही. आणि दुसरे म्हणजे, नियोजनाच्या अभावीही किमती या नेहमीच खऱ्या मागणीचे अथवा पुरवठ्याचे गमक असतात असे मुळीच नाही. समाजात श्रीमंत व गरीब वर्गात जोपावेतो संपत्तीची अत्यंत विषम विभागणी झाली आहे, तोपावेतो गरिबांच्या अतृप्त मागणीचा बाजारभावांवर काही परिणाम होत नाही, तर श्रीमंतांच्या व चैनीच्या जिनसांच्या उत्पादनास उत्तेजन मिळते. तसेच मागे दर्शविल्याप्रमाणे अलीकडे उत्पादनाच्या अनेक क्षेत्रांत उत्पादकांची संख्या फार मर्यादित झाली आहे व या मूठभर उत्पादकांच्या संगनमताने अनेक महत्त्वाच्या पदार्थांच्या किमती ठरविल्या जातात. असे झाले म्हणजे, या उत्पादकांनी ठरविलेल्या किमती व एखाद्या विक्री-मंडळाने किंवा नियोजकमंडळाने ठरविलेल्या किमती यांच्या सूचकत्वात तत्त्वतः काहीच फरक उरत नाही. सारांश, एकंदर राष्ट्रहित व समाजहित साधले जात असता खुल्या व्यवहाराचे क्षेत्र शक्य तितके मोठे असणे हे जरी इष्ट वाटले, तरी आर्थिक व्यवहारास अथवा व्यवस्थेस अनिष्ट वळण लागले असता किंवा त्यास काही विवक्षित मर्यादा घालणे इतर दृष्टीने आवश्यक झाल्यास नियोजनाचा अवलंब करणे गैर ठरत नाही. या नियोजनाच्या मर्यादा काय असाव्या ही प्रत्येक देशाच्या परिस्थित्यनुरूप अनुभवान्ती ठरणारी गोष्ट आहे. गेल्या पाचसहा वर्षांतील अनुभव हा त्या मानाने अत्यल्प व एकांगी आहे. निरनिराळ्या नियोजनकार्यक्रमात एकसूत्रता आणून ते कोठवर नेणे शक्य व अवश्य आहे, हे प्रत्येक देशात हळूहळू ठरवावे लागेल. पूर्ण अनिर्बंध व्यवहार पुनः चालू होणे जेवढे अशक्य तेवढेच या नियोजनातून पूर्ण नियुक्त व्यवहार निघणे असंभाव्य वाटते. पूर्ण नियुक्त व्यवहारांतही आज काही गोष्टींपुरता तरी बाजारभावाचा पडताळा पाहावा असा सूर वाहत आहे. तर प्रो. रॉबिन्ससारखे नियोजन-विरोधक प्रत्यक्ष सूचना करताना खाजगी मंडळीने (Company) आपल्या नफ्यापैकी किती नफा शिल्कीत टाकावा यावर सरकारी नियंत्रण असावे, येथपर्यंत ढवळाढवळ ग्राह्य समजतात. आर्थिक व्यवहारांतील सरकारी नियोजन ही घटना आता नित्याची झाली, असे समजण्यास चिंता नाही. काही महत्त्वाच्या क्षेत्रांत काही विवक्षित गोष्टींपुरते नियोजन—नियंत्रण व इतर खुला व्यवहार ही अवस्था जरी कोणत्याच तात्त्विक भूमिकेस जुळण्यासारखी नसली, तरी ती आता निदान काही काळ सार्वत्रिक फैलावणार असे वाटते; व नियोजन हे मूलतः इष्ट किंवा अनिष्ट असे काहीच नसून प्रत्येक विवक्षित नियोजनाची इष्टानिष्टता ही निरनिराळी अजमावली पाहिजे, एवढाच या लेखमालेचा निष्कर्ष सांगता येईल.

*लोकशिक्षण* ८ : ३ सप्टेंबर १९३७ पृ० १८१–१८९.

☆

# २ . . युद्धकालीन नियंत्रणे व युद्धोत्तर योजना

स्वतंत्र हिंदुस्थानात कोणते आर्थिक धोरण आखले जाणार हा प्रश्न आज प्रामुख्याने सर्वांपुढे उभा आहे. या प्रश्नाचे उत्तर अर्थात, राज्यकर्ते कोणत्या वर्गातील व कोणत्या योग्यतेचे आहेत, यावर अवलंबून राहणार. बहुतेक राजकीय पुढाऱ्यांनी आजवर केलेल्या निवेदनांत वेळोवेळी शेतकरी-कामगारांचे राहणीचे मान वाढविणे हा सरकारी धोरणाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या गेल्या वर्षातील कारभारामुळेच या दिशेने फारशी प्रगती झाली नसली तरी सामान्य जनतेच्या राहणीचे मान वाढविण्यास आर्थिक नियोजन आवश्यक आहे, हे निर्विवाद आहे. नियोजनासाठी नियंत्रणाचा उपयोग केला पाहिजे. म्हणून युद्धकालीन नियंत्रणाचा या कामी कितपत व कसा उपयोग करता येईल, हा विचार आज महत्वाचा ठरतो.

## नियंत्रणामध्ये पूर्वतयारीचा अभाव

युद्धकालीन नियंत्रणाचा सुरुवातीचा इतिहास बहुतेकांच्या स्मरणात असेलच. हिंदुस्थानातील युद्धकालीन नियंत्रणाचे मुख्य वैशिष्ट्य हेच की, त्याची निर्मिती व प्रगतीही इतर देशांच्या मानाने फारच कमी विचारपूर्वक झाली. या देशात युद्धकाली लोकशाही सरकार नव्हते; आणि तत्कालीन हिंदी सरकारास काही वर्षे एका प्रमुख पक्षाचा विरोध सहन करून राज्यकारभार चालवावा लागला. तसेच युद्धाची पहिली काही वर्षे हिंदुस्थान प्रत्यक्ष समरांगणापासून बरेच दूर राहणार अशी सरकारची कल्पना होती. युरोपीय व इतर पुढारलेल्या देशांत युद्धकालीन नियंत्रणांची घडण पहिल्या महायुद्धातील अनुभव पूर्णपणे जमेस धरून करण्यात आली व या नियंत्रणांची तयारी युद्धाच्या पूर्वकालात किंबहुना युद्धाच्या पूर्वीच केली गेली. हिंदुस्थानात यांपैकी काहीच घडले नाही. पहिल्या महायुद्धात इतर देशांनी जो जो मार्ग स्वीकारला, त्याच मार्गाने हिंदुस्थान याही काली गेले. म्हणजे केवळ प्रसंगोपात्त तातडीची गरज भागविण्याकरिता नियंत्रणे बसविली व नवीन अडचणींमुळे ती वाढविली. निरनिराळ्या नियंत्रणांत एकसूत्रीपणा आणण्याचा प्रयत्न कधीच केला गेला नाही. हा अनुभव सर्वच नियंत्रणांच्या बाबतीत आला. उदाहरणार्थ, अन्नाची प्रत्यक्ष टंचाई हिंदुस्थानात कधीच भासणार नाही, असा समज युद्धाच्या पूर्वकाली सरकारचा होता. ब्रह्मदेशातून तांदुळाची आयात थांबणार अशी चिन्हे दिसू लागल्यावरच या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले. अन्नप्रश्नाकडे झालेले दुर्लक्ष हे धान्याचे सुरुवातीचे भावनियंत्रण व गव्हाचे वाटप या बाबतच्या ढिलाईच्या धोरणावरून स्पष्ट होते; आणि देशाची धान्यपुरवठ्याबाबतची दुःस्थिती सरकारच्या लक्षात येण्याच्या आधीच बंगालच्या दुष्काळाची भीषण आपत्ती आपणावर कोसळली. युद्धकार्याप्रीत्यर्थ लागणाऱ्या पैशाच्या व इतर वस्तूंच्या पुरवठ्याबाबत अशीच अनास्था दिसून येते.

१९४२ पर्यंत युद्धासाठी लागणारा खर्च फारसा वाढला नव्हता. आणि एकंदर किमतीचे मानही माफक राहिले होते. परंतु जेव्हा १९४२ नंतर जपानी युद्धाकरिता माल पुरविणे व हिंदुस्थान आणि इतर देशांचा युद्धाच्या वाढत्या खर्चाचा बोजा उचलणे आवश्यक झाले तेव्हा ही जबाबदारी नीटपणे पार पाडण्यास सरकार असमर्थ ठरले. इतर देशांप्रमाणे मूलगामी योजना अमलात आणण्यात हिंदुस्थानात काही विशेष अडचणी होत्या. असे असले तरी आपल्या युद्धकालीन राज्यकर्त्यांस परिस्थितीच्या बिकटपणाची यथार्थ जाणीव अगर इतरत्र सदृश परिस्थितीत योजलेल्या उपायांचे पुरेसे ज्ञान नव्हते, हेही निर्विवाद आहे. किंबहुना १९४२–४३ पावेतो हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशात तपशीलवार नियंत्रणे अमलात आणणे बहुतेक वरिष्ठ अधिकाऱ्यांस अशक्यप्रायच वाटत होते.

## युद्धकालीन भावनियंत्रण

नियंत्रणांच्या पूर्वतयारीचा अभाव व त्यांची योजना घाईने करण्याची आवश्यकता यांचे जोडीस आणखी एका गोष्टीची भर पडली. विशिष्ट महत्त्वाच्या वर्गास दुखविण्याचे सामर्थ्य सरकारात नव्हते. या गोष्टीचा एकंदर किमतीच्या मानावर फार परिणाम झाला. अन्नधान्याचे भाव ठरविताना मध्यवर्ती सरकारला प्रांतिक सरकारांस तोंड द्यावे लागले. राजकीय कारणांसाठी पंजाबसारख्या जादा धान्योत्पादन करणाऱ्या प्रांतातील जमीनदारांच्या अवास्तव मागण्यांना आळा घालता आला नाही. यामुळे धान्याचे भावनियंत्रण व धान्यवसुली या बाबी बहुतेक प्रांतांत कधीच समाधानकारक होऊ शकल्या नाहीत. कारखानदार व खाणीवाले यांच्या मागण्याही त्यांच्या मालांच्या किमतीबाबत मान्य कराव्या लागल्या. १९४२ साली व नंतरही बहुतेक महत्त्वाच्या पदार्थांचे भाव सरकारने स्वतःच्या खरेदीपुरतेच नियंत्रित केले. उदाहरणार्थ, कापड, कोळसा, इत्यादी अति महत्त्वाच्या किमती सरकारने आपल्यापुरत्या जरी काही प्रमाणात नियंत्रित केल्या तरी बिनसरकारी व्यवहारांत त्या १९४२–४३ पावेतो पूर्णपणे अनियंत्रित ठेवल्या. पुढे चलनवृद्धी व तज्जन्य किमतींची वाढ यामुळे युद्धप्रयत्नास धोका पोचण्याची जेव्हा वेळ आली तेव्हाच भावनियंत्रण सरकारने हाती घेतले. युद्धपूर्वकालीन किमतींच्या पाचपटीने कापडाच्या किमती वाढल्यावरच त्या किमती नियंत्रित करण्याचे सरकारास सुचले. आणि नियंत्रण योजिले तेही कारखानदारांना पटेल व मानवेल असेच. कापडाच्या किमतीचे नियंत्रण कापड नियंत्रणमंडळांच्या एका उपसमितीवर सोपविले, आणि या उपसमितीत गिरणीमालक बहुसंख्येने असावेत, अशी योजना केली. कोळशाच्या नियंत्रित किमतीही खाणीमालक बहुसंख्य असलेल्या सल्लागार मंडळाच्या विचाराने ठरविल्या. कोणत्याही किमती ठरविताना उत्पादनखर्च, नफ्याचे प्रमाण इत्यादी मापनांचा उपयोग केला नाही. या किमती कारखानदारांनी वाटाघाटी करून ठरविलेल्या म्हणजे त्यांना अमान्य नसलेल्या अशाच होत्या. म्हणजे हिंदुस्थानातील भावनियंत्रणाबाबतचे धोरण कॅनडा, इंग्लंड व अमेरिका या देशांतील धोरणांहून अगदी भिन्न होते.

युद्धाच्या शेवटी आपल्या देशातील नियंत्रणे जवळजवळ इतर देशांइतकी बहुविध होती. शिधा-वाटपांच्या योजनेचा अंमल विस्तृत क्षेत्रात चालू होता आणि धान्यवसुलीच्या मोहिमेकडे बहुतेक इतर देशांपेक्षाही जास्त लक्ष पुरवावे लागत होते. भांडवल उभारणे, आयात-निर्यात व्यवहार, मुख्य मुख्य शेतकी व औद्योगिक उत्पादनाच्या किमती या सर्व नियंत्रित होत्या. तरीही हिंदुस्थानातील किमतीचे मान तत्सम नियंत्रणे असलेल्या इतर देशांपेक्षा पुष्कळच अधिक होते. सामान्य जनतेचे राहणीचे मान बरेच जास्त खालावले. नफेबाजी इतर कोठेही होती त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक झाली आणि एकंदर नियंत्रणपद्धतीतील विस्कळितपणा हा विशेष उत्कटत्वाने दिसून येत होता. या सर्वांचे कारण म्हणजे आपल्या युद्धकालीन नियंत्रणाच्या उगमाचा व विकासाचा उपरिनिर्दिष्ट इतिहास. आपली

नियंत्रणपद्धती बाह्यात्कारी इतर देशांसारखीच असली तरी तिची अंमलबजावणी निराळ्या तऱ्हेने झाल्यामुळे इतरत्र आढळून न येणारी निष्पत्ती तिच्यामधून झाली.

या देशातील जनतेचा नियंत्रणाकडे पाहण्याचा दृष्टिकोण समजण्यासाठी वरील विवेचन विस्तृतपणे केले आहे. अजूनही बहुसंख्य जनतेची अशी समजूत आहे की, नियंत्रणे उठविल्याने सध्यांची हलाखी दूर होईल. सामान्य लोकच नव्हे तर उच्चपदाधिष्ठित लोकनेत्यांचाही असाच समज असल्याचे आढळून येते. आपल्या देशात असा सार्वत्रिक समज असणे एक प्रकारे फार आश्चर्यकारक आहे. कारण या देशात सर्वच आर्थिक नियोजनाची आवश्यकता जोराने प्रतिपादितात. आर्थिक व्यवहार पूर्णपणे खुले असावे असे कोणाचेच—व्यापारी व कारखानदार यांचेही—मत नाही. नियंत्रणपद्धती व आर्थिक नियोजन यांतील निकट संबंध मात्र कोणाच्या लक्षात येत नाही.

## सर्वव्यापी नियंत्रणाची आवश्यकता

नियोजित आर्थिक प्रगती सर्वव्यापी नियंत्रणाशिवाय शक्य नाही, हा अर्थशास्त्राचा एक प्राथमिक सिद्धांत आहे. उदाहरणार्थ, 'मुंबई योजना' अमलात आणण्याचे मनात आणल्यास काय काय करावे लागेल हे पाहू. ही योजना उदाहरणादाखल घेण्याचे कारण या योजनेच्या उत्पादकांवर समाजसत्ता वादाचा किंवा सरकारी नियंत्रणाच्या पुरस्काराचा आरोप कोणी करणार नाही. राष्ट्रीय उत्पादन व सार्वजनिक रहाणीच्या मानाची वाढ ही 'मुंबई योजने'ची उद्दिष्टे आहेत. ही योजना अमलात आणावयाची असेल तर प्रथमतः आर्थिक उत्पादनाच्या वाढीकरता वार्षिक उत्पादनापैकी किती बचत करावयाची हे निश्चित ठरवावे लागेल. नंतर निरनिराळ्या प्रकारच्या मालांच्या उत्पादनाच्या मर्यादा ठरवाव्या लागतील आणि या मालांच्या वाटपाची योजनाही निश्चित करावी लागेल. 'मुंबई योजने' प्रमाणे ठरविलेल्या उत्पादनाच्या मर्यादा पाळणे व मालाचे योग्य वाटप करणे हे सर्वव्यापी नियंत्रणाखेरीज शक्य होणार नाही. उत्पादनाची वाढ नियोजित रीतीने व्हावयाची तर भांडवल उभारणे व गुंतविणे या गोष्टींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तसेच नवीन कारखान्याची स्थापना, जुन्याची वाढ व त्यांची योग्य स्थळी उभारणी यांचेही नियंत्रण करावे लागेल. औद्योगिक वाढीच्या साधनांसाठी आपण बहुतांशी परदेशांवर अवलंबून आहोत. म्हणून आर्थिक नियोजन करण्याकरिता आयात व्यापाराचे कडक नियंत्रण करणेही आवश्यक आहे. इंग्लंडवर ओढवलेल्या अलीकडील अरिष्टावरून परकी देशांत उपलब्ध असलेल्या पैशाचा विनियोग श्रीमंत देशांसही किती काळजीपूर्वक करावा लागतो, हे दिसून येईल. हिंदुस्थानसारख्या गरीब देशाला तर दीर्घकालीन योजना पूर्ण करण्याकरिता परदेशांतील आपले साठलेले भांडवल आणि परराष्ट्रीय व्यवहारांतील प्रतिवार्षिक बचत यांचा काटेकोरपणे उपयोग करणे विशेषच आवश्यक आहे. परदेशांतून यंत्रसामग्री व पक्का माल यांची कोणत्या प्रमाणात आयात करावयाची एवढेच ठरवून भागणार नाही, तर विशिष्ट उद्योगधंद्यांच्या सर्वांगीण वाढीसाठी यांत्रिक व इतर साधनांच्या तपशीलवार याद्या कराव्या लागतील. प्रत्यक्ष उत्पादनावर यंत्रसामग्री वाढल्यावरही देखरेख ठेवावी लागेल. मोटारीचे कारखाने स्थापन करण्याबाबतच नव्हे तर त्यांतून उत्पादन कोणत्या प्रकारचे करावयाचे याबद्दलही योजना व नियंत्रण करावे लागेल.

आर्थिक योजना म्हणजे केवळ उत्पादन-योजना नव्हे. उत्पादनाचे नियोजित वाटप हे गरीब देशांत उत्पादनापेक्षाही महत्त्वाचे आहे. दर माणशी कापडाचे सालीना उत्पादन पंधरापासून अठरापर्यंत वाढवावयाचे असल्यास वाढत्या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री उपलब्ध-आहे एवढेच पाहून भागावयाचे नाही. केवळ यंत्रसामुग्री वाढवून रहाणीचे मान वाढावयाचे नाही. सामान्य जनतेस हव्या असलेल्या कापडात वाढ झाली आहे व ते त्यांस परवडणाऱ्या किमतीस मिळत आहे हे पाहणे तितकेच जरूरीचे आहे.

## युद्धोत्तर आर्थिक नियोजन

युद्धोत्तर आर्थिक नियोजन हे युद्धकालीन आर्थिक नियंत्रणापेक्षा जास्त गुंतागुंतीचे आहे. युद्धकालीन आर्थिक धोरणाचे एकमेव उद्दिष्ट म्हणजे युद्ध जिंकणे. युद्धकालात कोणत्या पद्धतीने नियंत्रण करावयाचे व कशास प्रधान्य द्यावयाचे हे ठरविणे फारसे कठीण नसते. युद्धोत्तर कालातील गोष्ट अशी नाही. कोणती उद्दिष्टे आधी साधावयाची व कोणत्या उद्दिष्टांस जास्त महत्त्व द्यावयाचे, हे प्रश्न युद्धोत्तर कालात जास्त गुंतागुंतीचे होतात. तात्त्विक दृष्ट्या राष्ट्रीय संपत्तीची वाढ व जनतेच्या राहणीच्या मानातील वाढ यांत परस्परविरोध नाही. परंतु त्यांपैकी एकावरच विशेष भर दिल्यास तात्कालिक परिणामांत फार फरक दिसून येतो. राष्ट्रीय उत्पादन त्वरेने वाढवावयाचे की जनतेच्या राहणीच्या मानात वाढ करण्याकडे प्रथम लक्ष द्यावयाचे, हा प्रश्न क्रांतीनंतर रशियन राज्यकर्त्यांपुढे प्रामुख्याने उभा होता. रशियातील जनतेच्या राहणीचे मान क्रांतीनंतर बरीच वर्षे १९१४ सालापेक्षाही कमी होते असे म्हणतात. याचे मुख्य कारण रशियातील आर्थिक नियोजनात उत्पादनवाढीस दिलेले प्राधान्य. यांत्रिक उत्पादनास आधारभूत असलेल्या प्रमुख उद्योधंद्यांची संस्थापना व वाढ हेच नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट मानल्यामुळे रशियन जनतेस राहणीचे निकृष्ट मान पत्करावे लागले. हिंदी नियोजकांसही याच प्रश्नाचा विचार करावा लागेल. मात्र तो रशियापेक्षा जास्त कठीण भासेल. उद्योगधंद्यास लागणारी नैसर्गिक साधनसंपत्ती व लागवडीस न आणलेले फार मोठे क्षेत्र ही रशियात उपलब्ध होती. या सर्व नैसर्गिक संपत्तीचा योग्य उपयोग करून घेण्यास भांडवलाचीच काय ती वाण होती. याकरिता पोटास चिमटा घेऊन रशियन लोकानी आवश्यक भांडवल त्वरेने उभारण्याचे योजिले. हिंदुस्थानातील नैसर्गिक संपत्तिसाधने रशियापेक्षा कमी विपुल, आणि बचत करण्यास वाव जवळ जवळ नाहीच. येथील बहुसंख्य जनतेचे राहणीचे मान किती निकृष्ट आहे, हे बंगालच्या दुष्काळातील मृत्युसंख्येवरून स्पष्ट दिसून आले आहे

अमेरिकेसारख्या अत्यंत संपन्न देशांतच खुल्या व्यवहाराचे धोरण स्वीकारूनही विशेष आर्थिक हानी होत नाही. इतर कमी संपन्न देशांत सुव्यवस्थित नियंत्रणपद्धतीखेरीज शांततामय मार्गाने प्रगती होणे अशक्य आहे. स्वतंत्र हिंदुस्थानच्या आर्थिक योजनेचा विचार करताना तो पार पाडण्यासाठी आपणांस युद्धकालीन नियंत्रणे कायम ठेवावी लागतील, एवढेच नव्हे तर वाढवावीही लागतील हे लक्षात ठेविले पाहिजे. नियंत्रणपद्धतीत लादली जाणारी बंधने बहुतेकांस जाचक वाटतात. परंतु हल्लीच्या काळात शांतता व सुरक्षितता प्रस्थापिणे एवढेच शासनसंस्थेचे कर्तव्य नसून सामाजिक व आर्थिक उन्नतीचीही तिजवर जबाबदारी आहे, असे मानल्यास सामान्य जनतेच्या राहणीच्या मानात अल्पही वाढ होण्यासाठी बंधने पत्करली पाहिजेत.

## मध्यमवर्गाची जबाबदारी

हिंदुस्थानातील पांढरपेशा वर्गावर या बाबतीत फार मोठी जबाबदारी आहे. आपल्या देशाची प्रगती शांततामय मार्गाने व्हावयाची की वर्गकलह अधिक तीव्र होऊन रक्तपात व्हावयाचा, हे या वर्गाच्या त्यागाच्या तयारीवर व समजूतदारपणावर अवलंबून आहे. आर्थिक योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी बहुतांशी या वर्गातील व्यक्तींवरच पडणार. सध्या सर्वसामान्य सरकारी नोकरवर्ग कार्यक्षमही नाही व प्रामाणिकही नाही असे सर्वजण म्हणतात. त्याबरोबरच आपल्या व्यापारीवर्गास नीतिमत्तेची चाड नाही आणि जनतेस जबाबदारीची जाणीव नाही याबद्दलही दुमत नाही. सरकारी नोकर व व्यापारी लबाड आणि जनता दुबळी, हे मान्य केल्यास आपणास आशेस जागा उरणार नाही. आजची

परिस्थिती जरी अशी दिसली तरी तिचा संबंध आपल्या मूळ स्वभावाशी नाही. पुढारी आणि बुद्धिमान वर्गाच्या विचारातील गोंधळ व त्यामुळे जनतेची झालेली दिशाभूल यांचा हा परिपाक आहे. म्हणून आपणांपुढील आर्थिक प्रश्नांचे स्वरूप व ते सोडविण्याचे मार्ग यांचे यथार्थ ज्ञान मध्यमवर्गाने करून घेतले पाहिजे व त्याचा जनतेत प्रसार केला पाहिजे.

आज आपण बहुतेक स्वतःस समाजवादी व समतावादी म्हणवितो. पूर्ण समाजवाद अमलात आणणे तर राहोच, परंतु आत्यंतिक विषमता किंचित कमी करण्याकरिता केलेल्या प्रयत्नांचा प्रत्यक्ष परिणाम काय होईल याचा कितीजण विचार करतात? आर्थिक विषमता कमी करण्याच्या प्रयत्नाचे परिणाम युद्धकालीन नियंत्रणांच्या अनुभवावरून स्पष्ट झालेले आहेत. जीवनावश्यक वस्तूंचे वाटप युद्धकालात इंग्लंड व अमेरिकेत सामान्यतः सुलभपणे होऊ शकले याचे कारण त्या देशांत युद्धपूर्वकालातही मूलभूत जीवनावश्यक गोष्टींचा खप सर्व वर्गांत सामान्यतः सम प्रमाणात होता. उलट हिंदुस्थानातील परिस्थिती अगदी भिन्न असल्यामुळे वाटप-पद्धती बसविणे व चालविणे अवघड झाले. उदाहरणार्थ, साखर-वाटपाचा प्रश्न घ्या. निरनिराळ्या प्रांतांत हा प्रश्न वेगवेगळ्या रीतीने हाताळला आहे. मध्यप्रांतात साखरेच्या वाटपाचे प्रमाण उत्पन्नावर अवलंबून असते. ही पद्धत समतेच्या तत्त्वांशी विसंगत आहे. मुंबई प्रांतात साखरेचे वाटप उत्पन्नावर अवलंबून नाही, तर निवासस्थलावर म्हणजे लहान अगर मोठ्या शहरांत किंवा खेड्यांत राहण्यावर. ही पद्धत तितकी उघड उघड अन्यायाची नाही. परंतु ती पूर्णपणे तर्कशुद्धही नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, आपल्याकडील दर माणशी साखरेच्या खपाचे प्रमाण अत्यल्प असून बहुसंख्य गरीब वर्गात तिचा उपयोग युद्धपूर्वकाली जवळजवळ नव्हताच. अशा परिस्थितीत साखर वाटपाची कोणतीही पद्धत अन्याय्य तरी ठरणार किंवा अव्यवहार्य तरी होणार. कापडवाटपाची हीच तऱ्हा. माणशी सहा महिन्यांस मिळणारे दहा वार कापडही मध्यम-वर्गीय कुटुंबास अत्यंत अपुरे वाटते. परंतु युद्धापूर्वी एकंदर हिंदुस्थानात दरमाणशी कापडाचा वार्षिक खप १६ वारच होता. याचे कारण असे की, आपल्या देशातील कितीतरी माणसांस वर्षास एक वारही कोरे कापड विकत घेणे शक्य नव्हते. एवंच, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप समाधानकारक होण्यापूर्वी उत्पन्नाच्या विभागणीतील आत्यंतिक विषमता नाहीशी होणे जरूर आहे. मध्यमवर्गीयांनी आपल्या गरजा पुष्कळ कमी केल्या तरच गरीब वर्गाच्या राहणीत थोडी तरी सुधारणा होऊ शकेल.

मध्यम वर्गावरील आजची जबाबदारी दोन प्रकारची आहे. या देशातील आर्थिक विषमता युद्धपूर्व इंग्लंडात होती तितकी तरी कमी झाली पाहिजे, याकरिता मध्यमवर्गाने आपल्या मागण्या व आकांक्षा यास पायबंद घातला पाहिजे. मध्यवर्ती पे-कमिशनपुढे पगाराबाबतच्या ज्या मागण्या केल्या गेल्या व ज्या त्या कमिशनने बहुतांशी स्वीकारल्या, तितके पगाराचे मान आपल्या देशास झेपणे शक्य नाही. शिवाय नियंत्रण-नियोजनास लागणारा सुबुद्ध व प्रामाणिक नोकरवर्ग पुरविणे आणि सरकारी योजनांशी मनापासून सहकार्य करणे हेही मध्यमवर्गीयांचे कर्तव्य ठरते. या जबाबदाऱ्यांची योग्य जाणीव हिंदी मध्यमवर्गाने दाखविली नाही तर तो सध्या संपत्ती व सत्तेच्या शिखरावर असलेल्या प्रतिगामी भांडवलदारांचा हस्तक ठरेल.

*नवभारत* १ : १ ऑक्टोबर १९४७ पृ० ५७–६१.

☆

# ३ . . आपले आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य

आज जगात दोन तट पडले आहेत. एक पश्चिम यूरोपीय व अमेरिकी राष्ट्रांचा व दुसरा रशिया, बाल्कन राष्ट्रे व कम्युनिस्ट चीन यांचा. या दोन तटांतील एकेकाळचे स्नेहसंबंध पूर्णपणे दुरावले आहेत. मतभेद सारखे वाढत आहेत व दोघांसही एका जगात मित्रत्वाने अगर एकोप्याने नव्हे तर निदान, प्रत्यक्ष भांडणाशिवाय नांदता येईल किंवा नाही, याबद्दल दिवसेंदिवस जास्त शंका वाटू लागली आहे. समाजवादी वा साम्यवादी राष्ट्रे व व्यक्तिवादी भांडवलशाही राष्ट्रे यांचा केव्हाना केव्हा तरी जागतिक वर्चस्वासाठी झगडा होणारच हा मार्क्स-लेनिन-स्टालिन वादी रुसी तत्त्वज्ञांचा ठाम सिद्धांत आहे. इंग्रज-अमेरिकी राष्ट्रांतूनही याच सिद्धांताचा उलट्या बाजूने पुरस्कार अलिकडे केला जाताना आढळतो. हा झगडा विश्वव्यापी आहे, त्यातून कोणताही देश अगर समाज वगळला जाणार नाही. तसेच जो तात्त्विक वाद या झगड्याच्या मुळाशी आहे, त्याचा समाजजीवनाच्या प्रत्येक अंगाशी निकट संबंध आहे. त्याअर्थी आज जगातील कोणत्याही समाजाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक जीवनाचा विचार करू म्हटले तर या मूलभूत वादास धरूनच तो विचार करावा लागतो. हिंदुस्थानातील राजकीय पुढाऱ्यांस एके काळीं आपण या कलहात न पडता तटस्थतेने वागू असे वाटत होते. पण या भ्रमाचा निरास लवकरच झाला. आज हिंदुस्थानातील सत्तारूढ पक्षाने इंग्रजाशी आपल्या देशाचे संबंध दृढतर केले असून, अमेरिकेशी आर्थिक संबंध उत्तरोत्तर वाढविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. तेव्हा आज तरी आपला देश यूरोपीय–अमेरिकी गटाचा सदस्य बनला आहे याबाबत शंका येण्याचे कारण नाही. हिंदुस्थान सरकारचे आर्थिक व राजकीय धोरणही अमेरिकी गटाच्या सभासदत्वास अनुरूप असेच गेल्या दोन वर्षांत बनत गेले आहे. या धोरणाचा विकास कसा होत गेला व त्याचा परिणाम काय होण्याचा संभव आहे याविषयी काही विचार आपणापुढे मांडण्याचे मी आज योजिले आहे.

## युद्धकालीन परिस्थिती

प्रचलित जागतिक वाद मूलतः अर्थव्यवस्थेबाबतचा आहे. एका पक्षाचे म्हणणे असे की व्यक्ति-साहसास पूर्ण वाव देऊन, शासनसंस्थेचे नियंत्रण अत्यल्प राखणे ही सर्वोत्कृष्ट योजना; तर दुसऱ्या पक्षाच्या मते पूर्णपणे नियोजित अर्थव्यवहार समाजहिताच्या दृष्टीने चालविणे हाच एक इष्ट मार्ग. यास जोडूनच एक राजकीय वाद आहे. पहिल्या पक्षाचे धुरीण आपणास व्यक्तीस्वातंत्र्याचे व लोकशाहीचे पुरस्कर्ते म्हणवितात, तर दुसऱ्या पक्षाच्या मते व्यक्तिस्वातंत्र्याचे फाजील स्तोम खऱ्या लोकशाहीच्या प्रगतीस मारक व निर्नियोजित अर्थव्यवस्थेतील लोकशाही बेगडी आहे. तात्त्विक वादात शिरण्याचे हे स्थल नव्हे. परंतु काही सूचक घटना व गोष्टी यांकडे लक्ष दिल्यास वादाचे खरे स्वरूप लक्षात येऊ

लागेल. नियोजित अर्थव्यवस्थेच्या आग्रहाच्या बुडाशी व्यक्तिगत आर्थिक विषमता शक्य तो कमी करण्याचा आग्रह आहे. आर्थिक विषमता अनिष्ट आहे, प्रत्येक व्यक्तीच्या राहणीचे मान विवक्षित किमान मर्यादेहून कमी असू नये, धनसंचय थोड्या हाती झाला म्हणजे आर्थिक सत्ता अल्पसंख्यांकांच्या हाती जाऊन ते आपल्या हिताच्या दृष्टीने अर्थव्यवस्था राबवितात, इत्यादी अनेक सिद्धांतावर हा आग्रह आधारलेला आहे. उलट पक्षाची मूळ भूमिका अर्थविचारात समाजविचार अप्रस्तुत आहे, असे मानण्याची होती. व्यक्तिसाहसाचे जोरावर समाजाची साहजिक प्रगती होते व व्यक्तीव्यक्तीचे स्पर्धेत प्रत्येकास योग्य ते अर्थव्यवस्थेत स्थान प्राप्त होते, असा या पक्षाचा विश्वास होता. हा विश्वास गेल्या पंधरावीस वर्षांत ढासळलेला दिसतो. आपोआप सर्व गोष्टी इष्टच घडून येतात ही श्रद्धा परिस्थितीने पाश्चात्य देशातही भोळी ठरविली आहे. हिचा प्रकट उच्चार आज सहसा कोणी करताना आढळत नाही. बहुजनसमाजाचे राहणीचे किमान मान गाठविणे व राखणे, हे शासनसंस्थेच्या आद्य कर्तव्यांपैकी आता समजले गेले असून, अटलांटिक सनदेच्या चतुःसूत्रीत दारिद्र्यापासून सर्वांस मुक्त करणे या उद्दिष्टाचा समावेश करण्यात आला आहे. म्हणून आज निर्भेळ व्यक्तिसाहसावरील जोर कमी झाला आहे. १९२९ सालानंतर जागतिक मंदी व १९३९ नंतर युद्धकालीन परिस्थिती यामुळे सरकारचे आर्थिक कर्तव्य व व्यवहार यांची सीमा प्रत्येक देशातच फार वाढली व ती युद्धोत्तर काळात अजून तरी फारशी कमी होऊ शकली नाही. सरकारी आर्थिक व्यवहारक्षेत्र वाढविण्यास मुख्यतः दोन कारणे झाली. मंदीच्या व युद्धाच्या काळात सरकारला काही गोष्टी त्वरेने घडवून आणण्यास आर्थिक व्यवहारात ढवळाढवळ करणे, त्याचे मोठ्या प्रमाणावर नियंत्रण करणे, यांशिवाय गत्यंतर नव्हते. युद्ध संपल्यावरही तेजीमंदीच्या चक्राची गती पुन्हा कशी व केव्हा सुरू होईल याची भीती व युद्धकालीन परिस्थितीचे, विशेषतः सार्वराष्ट्रीय व्यापारावर झालेले शेष परिणाम यांचे निराकरण करणे किंवा त्यांस निदान आटोक्यात ठेवणे याची आवश्यकता, यामुळे युद्ध काळात सुरू केलेला उपक्रम व लादलेली नियंत्रणे यात अद्याप फारसा फरक होऊ शकला नाही.

याहूनही महत्त्वाचा फरक म्हणजे रुसी राज्यक्रांतीनंतर घडून आलेले मतपरिवर्तन अगर मूल्यपरिवर्तन. आर्थिक विषमतेचे निर्मूलन करणे हे सरकारचे आद्यकर्तव्य व फाजिल धनसंचय ही अनिष्ट गोष्ट मानू लागण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस बळावत आहे. श्रीमंत गरिबांचा, कारखानदार मजुरांचा उपकर्ता ही भाषा हास्यास्पद वाटू लागली व श्रीमंतीचे प्रदर्शन, आर्थिक विषमतेचे प्रदर्शन, समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने अहितावह ठरू लागले. ज्या देशात दारिद्र्य अधिक त्या देशात या प्रवृत्तींनी सरकारी धोरण किंवा समाजमन यांत जास्त उत्कट फरक घडवून आणला. परिणामी, व्यक्तिसाहसावर भर देणाऱ्या गटातील अनेक देशांत सरकारी धोरणावर आज समाजवाद अगर साम्यवाद यांचा पगडा कमी-अधिक प्रमाणात बसलेला प्रत्यक्ष आढळून येतो. इंग्लंडसारख्या देशात खाजगी आर्थिक व्यवहाराचा संकोच मोठ्या प्रमाणावर झाला असून, खाजगी व्यवहारावर अनेक प्रकारची बंधने घातली आहेत. शिवाय समाजवादाचे पाऊल या देशातून आजच्या पेक्षाही पुढे पडण्याची शक्यता आहे.

## यूरोप-अमेरिकी गटातील देशांची परिस्थिती

स्थूल मानाने यूरोपियन-अमेरिकी गटात श्रीमंतीच्या प्रमाणात, परिस्थितीत खालील फरक आढळून येतात. बहुजनसमाजाचे राहणीचे किमान मान राखणे हे सरकारी आद्य कर्तव्य मानून आजार, बेकारी, वृद्धापकाल या अवस्थेत मदत म्हणून सार्वजनिक खर्चाने तरतूद करण्याच्या योजना सर्वांसच मान्य आहेत. तसेच मंदीच्या काळात विशिष्ट वर्गाचे ऐन उत्पन्न खालावू नये याकरिता शेती मालाच्या पैदाशीच्या किमती सावरण्याची व्यवस्था करणे इ. धोरणे अमेरिकी सरकारासही मान्य आहेत.

अमेरिकेबाहेर अनेक देशांत यापुढे जाऊन प्रमुख आर्थिक व्यवसाय सरकारच्या मालकीचे करणे वा ताब्यात घेणे व काही बाबीत प्रत्यक्ष आर्थिक नियोजन अमलात आणणे हेही घडले आहे. स्कँडिनेव्ही देश व इंग्लंड यांसारख्या यूरोपातील श्रीमंत देशांत समाजवादाचा अंमल मोठ्या प्रमाणावर होऊन व्यक्तिगत राहणीच्या मानातील प्रत्यक्ष विषमता फार कमी झाली आहे. अखिल देशाचे असे उत्पादन, उपभोग, क्रय-विक्रय, आयात-निर्यात इत्यादींचे ताळेबंद आगाऊ करून पूर्वयोजनेनुसार नियंत्रणाच्या साहाय्याने ते प्रत्यक्षात उतरविणे येथपर्यंत सरकारी व्यवहाराचे क्षेत्र या देशात पोहोचले आहे. आणि यामुळे या देशातील लोकशाही राज्याचे बूड इतर कोणत्याही देशांपेक्षा जास्त स्थिर दिसते. प्रमुख धंद्यांचे राष्ट्रीयीकरण, खाजगी व्यवहारांचे कडक नियंत्रण, खाजगी उत्पन्नावर भारी कर व मजूर, शेतकरी इत्यादिकांच्या उत्पन्नात प्रत्यक्षाप्रत्यक्ष भर टाकण्याच्या निरनिराळ्या योजना या सर्व धोरणांचा इष्ट परिणाम या देशात साकल्याने घडून आलेला दिसतो. परंतु हे धोरण यशस्वी होण्यास काही किमान श्रीमंती व समाजस्वास्थ्य लागतात. ही तितक्या प्रमाणात फ्रान्स, इटलीसारख्या देशांत आज उपलब्ध नाहीत. म्हणून सारखवट आर्थिक धोरण असताही तितकी तुष्टी अगर शांती हे देश अनुभवीत नाहीत.

पाश्चिमात्य देशांतील समाजस्वास्थ्याचा प्रमुख मानदंड कम्युनिस्ट पक्षाचे प्राबल्य मानल्यास गरिबीच्या मानाने या देशांची उतरण लागेल असे वाटते. अगदी गरीब देशात इंग्रज समाजवाद कितपत फलदायी होईल याबाबतचा प्रत्यक्ष प्रयोग अजून कोठे घडून आलेला नाही. खुद्द इंग्लंडमधील आर्थिक धोरणाच्या यशस्वितेचे श्रेय बऱ्याच अंशी अमेरिकी मदतीस दिले पाहिजे. फ्रान्स, इटली या देशांतील कम्युनिस्ट पक्षाची अलीकडील पीछेहाट हीही मार्शल योजनेचे फळ मानिले पाहिजे. याचे तात्पर्यही हेच की, परकीय मदत अगर स्वतःची योजना या कशाच्याहीमुळे आर्थिक विकास झपाट्याने होऊन गरिबांची आर्थिक स्थिती उत्कटपणे सुधारू लागल्यास आर्थिक असंतोष व कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार ही कमी अधिक प्रमाणात काबूत ठेवता येतात.

## मार्शल योजनेतील विरोधाभास

या विचाराचा विस्तार करण्यापूर्वी मार्शल योजनेच्या अंमलबजावणीच्या पोटी जो एक विरोधाभास निर्माण झाला आहे त्याकडे लक्ष वेधले पाहिजे. मार्शल योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे युद्धोत्तर संक्रमणावस्था सुकरतेने पार पाडण्यास यूरोपीय राष्ट्रांस मदत करून त्यांचे कम्युनिस्ट धोक्यापासून रक्षण करणे. कम्युनिस्टांपासून बचाव करणे, याचा अर्थ म्हणजे व्यक्तिसाहसावर आधारलेल्या अर्थव्यवहारास विरोधी असलेल्या तत्त्वज्ञानाचा या देशात बीमोड करणे. हे करण्याचा मार्ग म्हणजे असंतुष्ट दरिद्र्यांचे पूर्वेकडे लागलेले डोळे, पश्चिमेकडून मोठ्या प्रमाणावर रसद पोहोचवून तिकडे वळविणे हाच होता. पण यूरोपीय संकटात, यूरोपास अमेरिकेने देऊ केलेल्या मदतीचा पूर्ण उपयोग अल्पावधीत करून घ्यावयाचा तर याबाबत निश्चित पूर्वयोजना तयार केली पाहिजे व तिची तपशीलवार अंमलबजावणी प्रत्यही झाली पाहिजे, याकरिता आर्थिक व्यवहाराच्या प्रत्येक अंगाचे मापन, त्याच्या संकोचविकासाच्या परिमाणाची निश्चिती व प्रत्येक अंगातील योजना पार पाडण्याकरिता त्या त्या अंगाचे भागशः नियंत्रण ही क्रमानुसार आली. सर्व घटनांचा परिपाक व सर्व योजनांचा हिशेब, यांचा अंदाज पूर्णपणे आधी बांधता येईलच असे नाही व सर्व योजना शंभर टक्के सर्वांकडून पार पडतील असेही नाही. याकरिता सर्व सहकारी राष्ट्रांच्या विचारविनिमयाने त्यांत वारंवार फेरबदल करण्याची तरतूद करणेही आवश्यक होते. अशा रीतीने मार्शल योजनेमुळे आज पश्चिम यूरोपीय अर्थव्यवस्थेचे नियोजन-नियंत्रण हे पूर्वी केव्हापेक्षाही अधिक तपशीलवार, सर्वांगीण व बहुराष्ट्रीय होऊन बसले आहे. मार्शलयोजना यशस्वी होऊन यूरोपची आर्थिक घडी लौकर स्थिरावल्यास कोणत्या पक्षास बळकटी येईल?

अर्थव्यवहाराचा पाया अनियंत्रित व्यक्तिसाहसावर असावा या पक्षाच्या पुरस्कर्त्यास, की पूर्वयोजनेनुसार आर्थिक प्रगती समाजहिताच्या दृष्टीने शासन संस्थेस घडवून आणता येते व या उद्दिष्टाने नियंत्रण-नियोजन आवश्यक आहे असे म्हणणाऱ्यांस ?

वरील त्रोटक विवेचनावरून असे दिसून येईल की, अर्थव्यवहाराबाबतच्या वादात यूरोपीय-अमेरिकी गटात पूर्ण मतैक्य वा एकरूपता नाही. अमेरिकेतील प्रभावी मत अजून बहुतांशी व्यक्तिसाहस-व्यवस्थेचा पुरस्कार करणारे आहे. तर बहुतेक यूरोपीय राष्ट्रांत कडक नियंत्रणे जारी असून स्वतःस समाजवादी म्हणविणारे पक्ष देशांदेशात सत्तारूढ आहेत. निर्भेळ अमेरिकी व्यवस्थेचे पुरस्कर्ते आज पश्चिम यूरोपात प्रतिगामी गणले जातात. या देशांतील लोकशाह्यांपुढील मुख्य पेच म्हणजे जुन्या अर्थव्यवस्थेचे पाठिराखी प्रतिगामी पक्ष व दुसऱ्या टोकाचे कम्युनिट यांच्या दरम्यान समाजवादी सरकारचे तारू कसे हाकारावे हा आहे. मधला मार्ग यशस्वी होण्याची शक्यता बऱ्याच अंशी देशाच्या श्रीमंती-गरिबीवर अवलंबून असते. इंग्लंड व स्कँडिनेवी देश आज बरेच सुस्थितीत आहेत; फ्रान्स, इटली सुधारण्याच्या मार्गावर आहेत अशी आशा तरी धरिता येते; पण ग्रीसमध्ये कोट्यवधी रुपयांची मदत अमेरिकेने देऊनही परिस्थिती सावरण्याची चिन्हे निश्चित नाहीत.

## नवीन सरकारच्या तीन घोषणा

जगातील या घडामोडी लक्षात धरून स्वदेशातील परिस्थितीचा काहीसा तपशीलवार विचार आता करू. आपणास स्वराज्य प्राप्त होऊन जवळ जवळ दोन वर्षे झाली. एवढ्या अवधीत आपला आर्थिक कारभार आपणच पूर्णपणे चालविला आहे. व हळूहळू हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणाचे स्वरूपही सुस्पष्ट झाले आहे. सुरवातीचे काही महिने संक्रमणावस्थेचे समजावयाचे. राज्ययंत्र हाती घेणाऱ्या पुढाऱ्यांनी गेली अनेक वर्षे वेळीअवेळी अनेक घोषणा केलेल्या होत्या. व त्यापैकी बऱ्याच जणांस सत्तारूढ झाल्यावर घोषित केल्यांपैकी बऱ्याच गोष्टी, आपण घडवून आणू असे वाटत असावे. काही घोषणा राज्यकारभार हाती आल्यावरही होत राहिल्या. उदाहरणार्थ सर्व प्रमुख धंदे सरकारी मालकीचे अल्पावधीत करावे अशी शिफारस करणारा एक काँग्रेस समितीचा अहवाल मुख्यप्रधानांचे सहीसकट १९४८ च्या सुरुवातीस बाहेर पडला. जुन्या घोषणांप्रमाणेच दुसरा वारसा, लियाकतअल्लीखानांच्या अंदाजपत्रकाचा, नूतन सरकारास पत्करावा लागला. यातही नवीन सरकारातील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा काही भाग होताच; म्हणून त्यातील अभिप्रेत धोरण चालू राहील अशी सार्वजनिक अपेक्षा उत्पन्न झाली होती. असे असूनही नवीन सरकारचे बदललेले आर्थिक धोरण लवकरच प्रकट होऊ लागले. हे नवीन धोरण तीन प्रकारे प्रकट झाले. पहिली पायरी विनियंत्रणाची, दुसरी राष्ट्रीयीकरण दहा वर्षांने पुढे ढकललेल्या घोषणेची व तिसरी प्रत्यक्ष उत्पन्नावरील करांचा बोजा कमी करून अप्रत्यक्ष करांची सार्वजनिक वाढ करण्याच्या धोरणाची.

## विनियंत्रणाचे धोरण

तसे पाहिले तर विनियंत्रणाच्या धोरणात इतर सर्वच गोष्टी आल्या. नियोजित अर्थव्यवस्थेचा, नियंत्रण हा आत्मा समजला पाहिजे. योजना कागदावर कितीही मांडल्या तरी प्रत्यक्षात उतरविण्यास सरकारी मालकी, सरकारी ताबा अथवा किमान पक्षी खाजगी व्यवहारावर सर्वांगीण सरकारी नियंत्रण हवे. ज्या सरकारला खाजगी अर्थव्यवहाराचे नियंत्रण करावयाचे नाही किंवा करिता येत नाही त्याच्या नियोजनाच्या वल्गना पोकळ ठरणारच. तेव्हा हिंदुस्थानचा पुढील आर्थिक विकास सरकारी योजनेनुसार होणार की तो व्यक्तिसाहसावर आधारलेला असणार याचे उत्तर नूतन सरकारने विनियंत्रणाचे

धोरण जाहीर करून एकाअर्थी ताबडतोब दिले. विनियंत्रणाचा हा निर्णय अजाणता किंवा घाईने दिला गेलेला नव्हता. याची नांदी श्री. राजगोपालाचार्य यांनी १९४६ च्या ऑक्टोबरमधे गळित धान्यनियंत्रण परिषदेत केली होती. तेथपासून सतत सव्वा वर्ष याबद्दल वाद सुरू होता. परंतु एका अर्थी सुरवातीपासूनच ही गोष्ट वादातीत होती असेही म्हणता येईल. नियंत्रणाच्या बाजूचे सर्व दुर्बल होते. काही अर्थशास्त्रज्ञ व सरकारी अधिकारी यांचा मुख्यत्वेकरून विनियंत्रणास विरोध होता. तसेच महाराष्ट्रासारख्या काही गैर महत्त्वाच्या भागांतील जनमतही बरेचसे नियंत्रणास अनुकूल होते. कारखानदारांपैकी काही विशेष दूरदर्शी व जुन्या वळणाचे, विनियंत्रणाचे परिणाम फारसे बरे होणार नाहीत, असे सौम्यपणे सुचवीत होते. उलटपक्षी बहुतेक सर्व कारखानदार व व्यापारी वर्ग विनियंत्रणाच्या मोहिमेच्या आघाडीवर होता व आजच्या सत्तारूढ पक्षातील प्रमुख पुढारी जनतेने विनियंत्रणाच्या बाजूने कौल द्यावा असा उघड प्रचार करीत होते. विनियंत्रण झाले त्याहून लवकर ते घडून न येण्याचे कारण एकच; ते म्हणजे १९४७ पावेतो मंत्रिमंडळात असलेले मुस्लिमलीग सदस्य. यांची अडचण दूर झाल्याबरोबर विनियंत्रण लवकरच होणार हे भविष्य करण्यास ज्योतिषाची आवश्यकता नव्हती. विनियंत्रण झाले ते घाईने किंवा भिडेने झाले हे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. ते बुद्धिपुरःसर करण्यात आले व एका विशिष्ट कारखानदार-व्यापारी गटाचा प्रभाव राजकारणावर पडल्यामुळे ते घडून आले.

विनियंत्रण ही प्रचलित हिंदी आर्थिक धोरणाची प्रकृती समजली पाहिजे. नियंत्रण ही विकृती. ही गोष्ट गेले साली पुनर्नियंत्रणाचा स्वीकार ज्या प्रकारे झाला त्यावरून स्पष्ट होते. पुनर्नियंत्रण स्वीकारले ते आपद्धर्म म्हणून. तात्कालिक परिस्थिती विकोपास गेली म्हणून काही नियंत्रणे युद्धकालातल्याप्रमाणे पुन्हा लादली. पण त्या वेळेस ही शक्य तेवढ्या लवकर काढण्यात येतील अशाही घोषणा करण्यात आल्या.

## राष्ट्रीयीकरणाची पिछेहाट

राष्ट्रीयीकरणाची पिछेहाट नियंत्रणाच्या मागोमाग ओघानेच आली. ज्या सरकारला अर्थव्यवहार नियंत्रित करणे अशक्य वा अनिष्ट वाटते, ते सरकार प्रमुख धंदे आपल्या ताब्यात घेऊन चालविणार कसे ! राष्ट्रीयीकरण करावयाचे नाही याचा अर्थ उद्योगधंद्यांची सर्व वाढ खाजगी व्यक्ती व मंडळ्या यास करू द्यावयाची अगर त्यांच्या द्वारे करवावयाची; व या मूळ कल्पनेस अनुरूप असे सर्व आर्थिक धोरण आखावयाचे. देशाची आर्थिक प्रगती घडवून आणण्याकरिता व्यक्तिसाहसास व खाजगी व्यवहारास संपूर्ण वाव देणे हा नवीन धोरणाचा विशेष समजला पाहिजे. हिंदुस्थान सरकारास देशाची आर्थिक प्रगती थोड्या काळात पुष्कळ घडवून आणावयाची आहे व याकरिता सरकारच्या योजनाही अनेक आहेत. सरकारचे हे उद्दिष्ट, व या योजना व नवीन आर्थिक धोरण यांचा मेळ कितपत घालता येईल ! प्रत्यक्ष सरकारी हुकमतीखाली किंवा नियंत्रणाखाली नसली तरी खाजगी भांडवलदारांच्या करवी एखादी सरकारी योजना पार पाडणे अशक्य नाही. किंबहुना असे करण्याचाच सरकारचा मानस असवा. तेव्हा सरकारी योजना व खाजगी व्यवहार यांची सांगड घालणे कसे व कितपत शक्य आहे याकडे आता लक्ष देऊ.

## नाझी राजवटीतील अनुभव

सरकारी सर्वांगीण नियंत्रण कडक ठेवल्यास कोणतीही सरकारी योजना खाजगी कारखानदार व व्यापारी यांमार्फत पार पाडता येते असा नाझी जर्मनीतील अनुभव आहे. नाझी राजवटीत उद्योग अगर व्यापार सरकारी मालकीचे केल्याशिवाय मोठमोठ्या योजना केवळ सरकारी नियंत्रणानुसार घडवून

आणल्या. पण हे नियंत्रण फार सूक्ष्म योजनापूर्वक केलेले होते आणि त्याची अंमलबजावणी फार कसोशीने व करडेपणाने होत होती. नाझी राजवटीचे आर्थिक धोरण हिंदुस्थानात अमलात आणणे तत्वतः अशक्य नाही. पण त्यास लागणारा विचार किंवा निश्चय ही आपल्या सरकारजवळ नाहीत, हे विनियंत्रणाचे वेळेस उघड झाले. औद्योगिक विकासाच्या योजना मांडताना राष्ट्रीय उत्पन्नाचा हिशेब काळजीपूर्वक काढावा लागतो. प्रत्येक व्यवसायातील उत्पादनाचे व वट उत्पन्नाचे इष्टांक ठरवून त्यांची विभागणी सर्व दृष्टीने विचार करून करावी लागते. प्राथमिक विभागणी, चालू उपभोग्य वस्तूंचे उत्पादन किती करावयाचे व भांडवली उत्पादक वस्तूंचे उत्पादन किती करावयाचे या बाबतची असते. तपशीलवार महत्त्वाची विभागणी म्हणजे चालू उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाचा कोणता वाटा समाजातील निरनिराळ्या वर्गास प्राप्त करून द्यावयाचा या बाबतची. हे सर्व इष्टांक स्थूलमानाने गोळाबेरजेवरून ठरवावयाचे नसून प्रत्येक महत्त्वाच्या वस्तूची किंमत व हरतऱ्हेचे व्याज, भाडे, मजुरी इत्यादिकांचे दर यांचा हिशेब जमेस धरून काढावयाचे असतात. असे केले असता कोणत्याही योजनेच्या पोटी सर्व महत्त्वाच्या किमतींची व दरांची निश्चिती साहजिकच येते. नाझी राजवटीतील नियोजन-नियंत्रण या स्वरूपाचे होते. मजुरीचे किमान व कमाल दर या राजवटीने ठरविले तर त्याबरोबरच मजुराच्या राहणीच्या मानाने सूचकांक यत्किंचितही न वाढतील याची खबरदारी घेतली. फार मोठ्या प्रमाणावर युद्धाची तयारी व काही वर्षे प्रत्यक्ष युद्ध करूनही आवश्यक उपभोग्य वस्तूंच्या किमती नाझींनी फार कौशल्याने स्थिरावल्या. असे करताना कारखानदारांच्या फायद्याला अनेकदा कात्री बसली, त्यांना आपली उत्पादनक्षमता सारखी वाढवावी लागली. ही वाढवूनही वेळेस तोटे आले; पण योजनेच्या यशस्वितेकडे पाहून त्यांच्या ओरडीकडे नाझी राजवटीने कधी लक्ष दिले नाही. युद्धकाळातील इंग्लंड, अमेरिका, कॅनडा वगैरे देशांतील अनुभवही हाच होता. सरकारी योजनेनुसार उत्पादनाची वाढ करावयाची तर मजुरीचे दर, राहणीचे मान व निरनिराळ्या अवस्थेतील वस्तूंच्या किमती यांचे अन्योन्य संबंध निश्चित करून ते हरतऱ्हेने कायम राखणे अत्यावश्यक असते. मजूरवर्ग आणि कारखानदार व व्यापारी या दोन्ही पक्षांच्या मागण्या काबूत ठेवता न आल्या तर हे नियंत्रण अशक्य होते.

## नियंत्रणपद्धतीचा बोजवारा

हिंदुस्थानातील युद्धकालीन सरकारास कारखानदार-व्यापाऱ्यांना दुखविणे शक्य नव्हते. यामुळे युद्धकाळी ठरलेल्या अनेक प्रकारच्या मालांच्या किमतीत भांडवली नफ्याची कूस सुरुवातीसच बेसुमार ठेवली गेली. सुरुवातीच्या बऱ्याच किमती १९४३–४४ सालात ठरल्या गेल्या. १९४६ साल पावेतो मजुरीचे दर व इतर किमती चढल्यामुळे अनेक धंद्यांत फायदा थोडाबहुत घटला. आणि या सुमारास किमती वाढवून मिळण्याची मागणी होऊ लागली. आर्थिक नियंत्रणात किमती ठरविणे ही बाब फार महत्त्वाची तशीच ती गुंतागुंतीची व निर्भीडपणे करावी लागण्याची. याकरिता निराळे भाव-नियंत्रण मंडळ नेमून ती करून घेण्याचा १९४७ चे सुरुवातीस प्रयत्न करण्यात आला. मुख्यतः काँग्रेसपक्षाच्या धुरीणांच्या आर्थिक धोरणामुळे तो अयशस्वी झाला; आणि हिंदुस्थान सरकारला कारखानदार-व्यापारी यांच्या किफायतीवर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे हे निर्विवाद ठरले. कोळसा, लोखंड-पोलाद, सीमेंट इत्यादी मूलभूत उत्पादन-सहाय्यक वस्तूंच्या किमती नियंत्रित असूनही फाजील वाढविल्या. कापडाच्या किंमतीवरील नियंत्रणही असेच ढिले ठेवले. मजुरी, कारखानदारांचा नफा व पदार्थांच्या किमती यांचे समप्रमाण टिकले नाही व नियंत्रण पद्धतीचा बोजवारा व दुर्लौकिक झाला.

किमतीत वाढावा करण्याच्या उत्पादकांच्या नित्य मागणीस नकार देण्याचे मनोधैर्य सरकारात नसले म्हणजे किमतींची उतरंड ढासळून अर्थव्यवहारात घोटाळे माजण्यास वेळ लागत नाही, हा

हिंदुस्थानातील ताजा अनुभव आहे. केवळ किमतीचे नियंत्रण करूनही आर्थिक योजना यशस्वी होतात असे नाही. अनेक प्रसंगी कोणत्या किमतींस वस्तू विकावयाच्या अगर मजुरीचे कोणते दर असावयाचे, या बरोबर कोणत्या तऱ्हेच्या वस्तूंचे उत्पादन कोणी करावयाचे, कोणत्या कसबाचे किती कामकरी कोणत्या व्यवसायात जावयाचे याही गोष्टी तपशीलात ठरवाव्या लागतात. इतर देशाच्या युद्धकालीन नियोजन-नियंत्रणात हे नित्य परिचयाचे झाले होते. आपल्या देशातील या बाबतचा अलीकडील अनुभवही अनेक दृष्टींनी उद्बोधक आहे. सार्वजनिक जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा कमी पडू लागला व त्यांचे उत्पादन तावडतोबीने वाढविणे शक्य नसले म्हणजे त्यांच्या किमतीचे व वाटपाचे नियंत्रण करावे लागते. वस्तू विशेष महत्त्वाची अगर तुटवडा फार असल्यास त्या वस्तूच्या उत्पादनाचेही नियंत्रण करण्याची पाळी येते. कापडाबाबत अशी पाळी १९४२ सालच्या पुढे सारखी आलेली होती, ही गोष्ट हिंदुस्थान सरकारने वेळोवेळी मान्य केलेली आहे. सर्व कापड सरकारने नियंत्रित किमतीस विकत घ्यावयाचे ठरविल्यानंतर कोणत्या प्रकारचे, कोणत्या दर्जाचे व किती कापड गिरण्यांनी काढावे हे ठरविणे क्रमप्राप्त होते. किंबहुना असे केल्याखेरीज उत्पादन, अनावश्यक कापडाचे आणि शिवाय फाजील खर्चाचे होते ही गोष्ट पदोपदी भासत होती. उत्पादित कापडांच्या तऱ्हांची संख्या मर्यादित करून, प्रत्येक गिरणीस विशिष्ट तऱ्हांचे उत्पादन करावयास भाग पाडून प्रत्येकाच्या कार्यक्षमतेचा उच्चांक गाठण्याचा प्रयत्न करावा याला कारखानदार प्रतिनिधीही तत्त्वतः संमती देत होते. पण प्रत्यक्षात या दिशेने एक पाऊलही आजवर पुढे पडू शकले नाही. समित्या व योजना अनेक झाल्या पण त्या सगळ्या वांझोट्या. कापडाच्या उत्पादनात जितका गैरशिस्तपणा व अप्रामाणिकपणा आज चालू आहे तितका इतरत्र क्वचितच सापडेल. याचे कारण नियंत्रणभाव ठरविणे वगैरे सर्व बाबींची दोंडी खुद्द उत्पादकांचे हातीच ठेवण्यात आली. कारखानदारांच्या इच्छेविरुद्ध वागण्याची सरकारची छाती नाही; वेळेस तसे करण्याचा आव आणल्यास कारखानदार दोन पोकळ धमक्या देऊन तो तावडतोब उतरवितात. या इतिहासाचा परिपाक आज असा झाला की उत्पादनक्षमता वाढविण्यास ज्यांनी मोठा नफा मिळत असता काही प्रयत्न केला नाही अशा गिरण्या आज 'आम्ही तोट्यात आहो' म्हणून ओरड करून उत्पादन थांबविण्याच्या धमक्या देत आहेत. अशा धमक्या दिल्या म्हणजे सरकार आपणास तूट भरून देण्याचे आश्वासन देईल अशी त्यांची अपेक्षा असावी व ती खरी ठरल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

वरील विवेचनाचा सारांश असा : आर्थिक विकासाची कोणतीही योजना अनेकांगी असते व तिच्या निरनिराळ्या अंगांचा परस्परांशी निकट व प्रमाणबद्ध संबंध असतो. आर्थिक प्रगतीची मोहीम यशस्वी व्हावयाची तर तिची चाल ठराविक दिशांनी, ठराविक मजलांनी, ठराविक वेळात झाली पाहिजे. सरकारनियंत्रित आर्थिक योजनांतही सर्व दिशांनी अपेक्षित प्रगती होतेच असे नाही. पण तेथे बदललेल्या परिस्थितीत मोहिमेच्या योजनेत इष्टावश्यक बदल करण्यास कोणीतरी जबाबदार सरसेनानी असतो. खाजगी व्यवहाराचे असे नाही. त्यास शिस्तवार फौजेपेक्षा अनेक एकांडे शिलेदार व काही स्वतंत्र पथके अशांच्या संमिश्र जमावाची उपमा अधिक शोभेल. वारा कसाही सुटला व लाटा कशाही आल्या तरी एका निश्चित स्थलाप्रत जाऊ पाहाणाऱ्या नौकेसारखी नियंत्रित नियोजन-व्यवस्था मानली तर फायद्याच्या विलोभनाच्या दरेक झुळकीबरोबर निरनिराळ्या दिशेने वळण घेणाऱ्या तारवासारखी व्यक्तिसाहसावर आधारलेली अर्थव्यवस्था असते. तात्कालिक फायद्याच्या जेवढ्या गोष्टी सरकारी योजनेत बसत असतील तेवढ्याच खाजगी व्यक्ती घडवून आणतील; इतरांची उपेक्षा करतील. इतकेच नव्हे तर सरकारी योजनाबाह्य किंवा विरोधी घटना किफायतशीर असल्यास त्याही घडून येणे हे खाजगी

अर्थव्यवस्थेच्या प्रवृत्तीस धरून होईल. मच्छरदाणीच्या कापडात एखाद्या पैचा अधिक मुनाफा मिळत असल्यास, लोकांना धोतरांची वाण कितीही भासत असली तरी, धोतरे काढण्याकडे कोणा व्यवहाऱ्याचे लक्ष जाईल अगर जावे? अधिकतम नफा मिळविणे हा ज्या अर्थव्यवस्थेचा धर्म तेथे त्याविरुद्ध आचरण अपेक्षणे योग्य नव्हे. खाजगी व्यापारी अगर कारखानदार यांना शिव्याशाप देण्यात अर्थ नाही; त्यांचा धर्म माहीत असूनही ते निराळे वर्तन करतील या अपेक्षेवर सरकारी आर्थिक धोरण बांधू पाहाणारे मात्र भोळे किंवा त्यापलीकडचे समजले पाहिजेत.

यावर काहीजण असे म्हणतील की हा विचार तात्त्विक दृष्ट्या योग्य असला तरी व्यवहारात मधला मार्ग काढता येणे अशक्य नाही. आर्थिक नियंत्रण नाझी राजवटीसारखे किंवा पश्चिम युरोपातील युद्धकालीन नियंत्रणांसारखे कडक नसले तरी चालण्यासारखे आहे. काही अप्रत्यक्ष नियंत्रणे व काही प्रत्यक्ष विलोभने वापरून सरकारी योजना शंभर टक्के नाही तरी बहुतांशी अमलात आणता याव्या. असा काहीसा प्रयत्न हिंदुस्थान सरकार आजही करीत आहे; पण तो यशस्वी ठरेल असे वाटत नाही. परदेशाहून विशिष्ट प्रकारची यांत्रिक सामग्री आणण्यास पैसा व परवानगी देणे व इतरास नाही म्हणणे हे सरकार आज करीत आहे. तसेच काही प्रकारचे उत्पादन उच्च श्रेणीचे समजून त्यास लागणारा माल व वाहतूक यांचा पुरवठा सरकार करते. पण यांत्रिक सामग्री आणण्यास परवानगी अगर हुंडणावळ दिली तरी ती सर्व योग्य रीतीने वापरून हवी ती सामग्री येईल असेच नाही; व ती आल्यावरही तिचा उपयोग सरकारला हवा त्या दिशेने व हवा त्या पद्धतीने होईल असेही नाही. तसेच सरकारी प्रत्यक्ष मदत देऊ केली तरी त्यामुळे विशिष्ट व्यवहारांचा विकास किंवा संकोच ठराविक प्रमाणात, निश्चित वेळात होईल याचीही खात्री नाही. तात्कालिक फायद्यांवर हेलकावणाऱ्या व्यवहारांस कोणत्याच प्रकारचा नियम लावता येत नाही. जलद वाहतुकीकरिता उपलब्ध करून दिलेले मालाचे डबे, किंमतीच्या वाढीची अपेक्षा असल्यास, व्यापारी कोठारासारखे वापरून वाहतुकीत घोटाळे उत्पन्न करतात, अशी तक्रार वाहतूक मंत्र्यांनी एका परिषदेत केलेली मी ऐकली आहे. कोळसा, पोलाद, सीमेंट यांचे वाटप सरकारने विशिष्ट कार्याकरिता म्हणून केले तरी त्यांचा उपयोग कशाकरिता होईल हे तात्कालिक परिस्थितीवर अवलंबून राहणार. आणि सरकारने प्रत्यक्ष विलोभने दाखविली तरी त्यांचा उपयोगही एकंदर बाजारभावावर अवलंबून. कोणत्याही विलोभनाचे सामर्थ्य तौलनिक दृष्ट्या मापावे लागते. सरकारला इष्ट वाटत असलेल्या उत्पादन अगर इतर व्यवहारापेक्षा दुसरा व्यवहार बाजारभावांनी जास्त किफायतशीर ठरविला तर ही परिस्थिती कायम राहीपावेतो सरकारने देऊ केलेली मदत फोल ठरेल.

आपल्या देशातील अलीकडील परिस्थिती अपवादात्मक मानली, तरी अप्रत्यक्ष नियंत्रण व अल्प मदत यांचे आधारावर सरकारी योजना कितपत यशस्वी होऊ शकते याचा इतर देशांतील अनुभव ग्राह्य मानला पाहिजे. १९३० सालानंतरच्या मंदीच्या दिवसांत इंग्लंड व स्कॉटलंडमधील काही उद्योग-धंद्यांस विशेष हलाखीचे दिवस आले व हे धंदे जेथे केंद्रित होते त्या भागांतील एकंदर आर्थिक स्थिती फार खालावली. अशा निकृष्ट भागांस ऊर्जितावस्थेस आणण्याकरिता सरकारने काही योजना आखल्या व त्या अमलात आणल्या जाव्या म्हणून काही अप्रत्यक्ष नियंत्रणे व अल्पशी प्रत्यक्ष मदत यांचा अवलंब केला. त्या वेळचे ब्रिटिश सरकार हुजूरपक्षीय असल्यामुळे याहून प्रभावी आर्थिक धोरणाचे त्यास वावडे होते. एकदोन ठिकाणी या योजना अंशतः यशस्वी झाल्या; पण इतरत्र त्यांचा उपयोग झाला नाही. योजनाप्रसिद्धीनंतरच्या काळात जेवढ्या बाबी खाजगी व्यक्ती अगर मंडळ्या यांस किफायतशीर वाटल्या तेवढ्या घडून आल्या; इतर तशाच राहिल्या.

## आर्थिक विकास कसा घडून येईल ?

एवंच, सरकारी योजनेनुसार आर्थिक विकास घडवून आणावयाचा तर फार मोठे आर्थिक क्षेत्र सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यातले तरी हवे किंवा सरकारच्या कडक नियंत्रणाखालील हवे. प्रमुख उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे करावयाचे नाहीत अशी घोषणा झाल्यामुळे हिंदुस्थान सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यात मोठे आर्थिक क्षेत्र येण्याचा संभव दुरावला आहे. आपले कोणतेही धोरण नियंत्रणाच्या साहाय्याने खाजगी व्यक्तीकडून घडवून आणण्याची इच्छा अगर शक्ती आजच्या हिंदुस्थान सरकारास नाही हेही उघड आहे. विनियंत्रणाचे एकंदर धोरण स्वीकारले असल्यामुळे भोग्य वस्तूंचे उत्पादन, वाटप व किमती यांचे नियंत्रणही सरकार करणार नाही. याचा अर्थ मुख्यतः काही कारखानदार व व्यापारी यांच्या उत्पादनावर व किफायतीवर प्रत्यक्ष नियंत्रण सरकार ठेवणार नाही. इतर नियंत्रणाच्या बाबत हिंदी धनिकांचा पक्ष अतिरेकी नाही. आपण उत्पादन करीत असलेल्या वस्तूंच्या किंमतीवर अगर वाटपावर सरकारने नियंत्रण ठेवू नये असा त्यांचा आग्रह आहे; परंतु उत्पादनास लागणाऱ्या यंत्रसाहित्यापासून सर्व गोष्टी मिळवून देणे, मालाची वाहतूक सुकर व स्वस्त करणे आणि स्वदेशीची बाजारपेठ, आवश्यक तर गिऱ्हाइकावर जादा बोजे लादूनही, आपणांकरिता सुरक्षित ठेवणे ही सर्व सरकारी विहित कर्तव्ये ते समजतात. म्हणून आर्थिक विकासाच्या योजना सरकारने काही आखल्या तर सरकारी मदतीने व स्वतःच्या मालकी हक्काने त्या पार पाडण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे. आजही सर्व भोग्य, विशेषतः जीवनावश्यक, वस्तूंखेरीज इतर भाव व वाटप यांचे नियंत्रण त्यास हवे आहे. मध्यंतरी खुले आयात परवाने सरकारने दिल्यामुळे बाजारात किती गडबड उडाली व सरकारवर अनेक व्यापारी कसे रुष्ट झाले हे सर्वांच्या स्मरणात असेलच.

यावर असे म्हणता येईल की व्यक्तिसाहसावर आर्थिक प्रगती सोपविल्यावर ती सरकारी योजने-प्रमाणेच घडून न आली तर काय बिघडले ? एकंदर राष्ट्राची संपत्ती व उत्पादन वाढू लागले म्हणजे आर्थिक प्रगती विशिष्ट दिशेने विशिष्ट प्रमाणात झाली अगर न झाली तर विषाद मानण्याचे कारण नाही. ज्ञानी माणसासही भविष्याचा अचूक अंदाज करिता येत नाही म्हणून योजनेविना यदृच्छया घडून आलेली प्रगतीच खरी हितावह व शाश्वत ठरते. हा पक्ष नवीन नाही; युरोपीय अर्थशास्त्रज्ञांचा हा सनातन वाद आहे व व्यक्तिसाहसवाद्यांस तो अर्थातच पूर्णपणे मान्य नाही. हिंदी भांडवलवाले, फक्त परराष्ट्रीय स्पर्धा खुली ठेवू नये एवढी मुरड घालून, याच मताचा पुरस्कार करीत असत. हिंदी राजकीय पुढाऱ्यांच्या आजवरच्या घोषणा भिन्न धोरणाच्या होत्या; पण राज्ययंत्राची जबाबदारी अंगावर पडल्यावर त्यांस आपली मते बदलावी लागली असावी.

प्रत्यक्ष या वादाबद्दल असे मला काहीच म्हणावयाचे नाही. पण व्यक्तिसाहसावर अर्थिक प्रगतीची मदार ठेवली तर त्याच्या पाठोपाठ इतर कोणत्या गोष्टी येतात या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही. या प्रश्नाचे उत्तर देण्यास मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या करयोजनेतील नवीन उपक्रमांनी सूचक सुरुवात केली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. आर्थिक विकासाचा आरंभ भांडवल गुंतविण्यापासून होतो. व्यक्तिसाहसाने आर्थिक प्रगती घडून येण्यास साहसी व्यक्तींस शिल्की भांडवल व ते किफाय-तशीर रीतीने गुंतविण्याचे मार्ग ही दोन्ही उपलब्ध हवीत. त्यांचे अभावी सर्व प्रगती खचित खुंटणार. सरकारी करांच्या बोजाखाली आमचा धनिकवर्ग इतका दडपला गेला आहे की अलीकडे त्याजजवळ गुंतवावयास उर्वरित पैसा नाही; व सरकारी नियंत्रणे आणि घोषणा, निर्बंध व कर यांचेमुळे उद्योगधंदे इतके खालावले व खचले आहेत की असलेला थोडाबहुत पैसा कोणत्याही दीर्घकालीन योजनांत घालण्यास त्यांजला उत्साह उरलेला नाही. अशी बिकट परिस्थिती असल्याचे करुण निवेदन सर्व उद्योगपती

आज दीड–दोन वर्षे वेळी अवेळी करीत आहेत. राजकारणपटूंस यात तथ्यांश आहे असे पटले असावे म्हणून ते, आम्ही तुमच्या भांडवलास निदान दहा वर्षे तरी हात लावणार नाही असे सारखे कळकळीचे आश्वासन देत असतात. पण केवळ आश्वासनांनी भांडवलवाल्यांचे समाधान होईना. तेव्हा आता भांडवलवाल्यांस पटण्यासारखी काही प्रत्यक्ष कृती करण्यास ते उद्युक्त झाले असावे. ही कृती म्हणजे श्रीमंतांवरील व उद्योगमंडळ्यांवरील प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करणे व नवीन उद्योगधंदे काढण्यास व चालविण्यास खास सवलती देणे.

व्यक्तिगत व उद्योगमंडळे यांवरील करांचा प्रश्न विशेष बिकट होण्यास लियाकत अलीखानांचे अंदाजपत्रक कारणीभूत झाले; व आजच्या बऱ्याचशा घोटाळ्यांच्या बुडाशी हेच अंदाजपत्रक आहे. हिंदी धनिकवर्ग मूठभर लोकांचा आहे, त्याचे हाती अवास्तव पैसा व अधिकार साचला आहे, असे सांगून या वर्गाची आर्थिक सत्ता कमी करण्याच्या स्पष्ट व उघड इराद्यानुसार या अंदाजपत्रकाची रचना झाली. या अंदाजपत्रकास इतर कोणीही विरोध केला असला तरी आजचे हिंदुस्थानचे मुख्य प्रधान व अर्थमंत्री या दोहोंचाही त्यास पाठिंबा होता अशी दिल्लीस त्या वेळेस वदंता होती. या अंदाजपत्रकाचे दूरगामी परिणाम होणार हे त्या वेळेसही कळण्यासारखे होते. धनिकांवर व मोठ्या धंद्यांवर अधिकाधिक कर लादले म्हणजे आजचे धंदे हळूहळू सरकारी मालकीचे करणे व आर्थिक विकासाच्या नवीन योजना बहुतांशी सरकारमार्फत करणे हे ओघाने घडणारच. मार्च १९४७ मध्ये कॉंग्रेसपक्षाच्या कार्यक्रमांत उद्योगधंद्यांच्या सत्वर राष्ट्रीयीकरणाचा समावेश असल्याने लियाकतअलींचे अंदाजपत्रक व कॉंग्रेसपक्षाचा आर्थिक कार्यक्रम यांचा तत्त्वतः विरोध आहे असे मानण्याचे कारण नव्हते. पण आता कार्यक्रम बदलल्यामुळे त्या अंदाजपत्रकानुसार केल्या गेलेल्या गोष्टींची अडचण भासू लागली आहे. खासगी व्यक्तींकरवी उद्योगधंदे वाढीस लावावयाचे तर त्यांस तसे करण्यास काही वाव व विलोभन दिले पाहिजे. हल्लीच्या करपद्धतीमुळे तसा वाव कर चुकविल्याखेरीज मिळत नाही आणि कर चुकवूनही साचलेला पैसा उघडपणे उद्योगधंद्यात गुंतविण्यास तांत्रिक अडचणी येतात. ही कोंडी फोडण्याचा एक उपाय म्हणजे धनिकांवर व मोठ्या धंद्यांवर असलेला प्रत्यक्ष कराचा बोजा कमी करणे. करयोजनेतील नवीन दृष्टी ही एकंदर नवीन धोरणातत्त्व कशी अंगभूत आहे हे आता कळून येईल.

विनियंत्रण, राष्ट्रीयीकरण न करण्याची घोषणा व धनिकांवरील कर कमी करणे या सर्व गोष्टी एका सूत्रात गोवलेल्या आहेत. हे सूत्र म्हणजे हेतूपूर्वक आर्थिक नियोजन करण्याकरिता अर्थव्यवहाराचे मोठे क्षेत्र सरकारी मालकी अगर नियंत्रण या खाली न आणता, भविष्यातील भिस्त बहुतांशी खाजगी व्यवहारावर टाकावयाची. हे सूत्र व त्याचे पुढील धागेदोरे यांची आज सर्वांस नीटशी कल्पना आहे असे म्हणवत नाही. परंतु हे नवीन धोरण फारसे लोकप्रिय दिसत नाही; त्यातल्या त्यात करपद्धतीवरील त्याचे परिणाम हे अनिष्ट आहेत अशी सुप्त भावना जिकडे तिकडे दिसते. विनियंत्रणास सर्व थरांतील व्यक्तींचा पाठिंबा मिळू शकतो, व धंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले पाहिजे या मताचा आपल्या देशात फारसा प्रचार झालेला नाही. पण सरकारी आर्थिक धोरणाचा परिणाम श्रीमंतांवरील प्रत्यक्ष कर कमी करून गरिबांच्यावर पडणाऱ्या अप्रत्यक्ष करांच्या वाढीत झाला म्हणजे मात्र काहीतरी खचित चुकते असे बहुजनांस वाटू लागते. असो! आपणास विचार करावयाचा तो तात्कालिक लोकमताचा नव्हे, तर शाश्वत राष्ट्रहिताचा. याकरिता हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणाचा एका निराळ्या भूमिकेवरून विचार केला पाहिजे. ही भूमिका म्हणजे गरीब राष्ट्रास अनुरूप असणाऱ्या आर्थिक धोरणाची.

## आर्थिक विकासयोजनेच्या मार्गातील अडचणी

जसे व्यक्तीस तसे राष्ट्रासही दारिद्र्य पदोपदी नाडते. गरिबी जितकी अधिक, तितक्या अतृप्त

आकांक्षा अधिक; पण त्या पुऱ्या करण्याचे सामर्थ्य व्यस्त प्रमाणात. गरीब देशाच्या आर्थिक विकास योजनेच्या मार्गातील मुख्य अडचणी खालीलप्रमाणे आहेत. देश गरीब याचा अर्थ लोकसंख्येच्या मानाने वार्षिक उत्पादन कमी, आणि सार्वजनिक राहणीचे मान निकृष्ट; त्यातल्या त्यात मजूर, शेतकरी इत्यादी वर्गांची राहणी फार हलाखीची. असे असल्यामुळे राहणीचे मान वाढविणे हे आर्थिक योजनेचे एक प्रमुख उद्दिष्ट साहजिकच ठरते. गरिबांच्या राहणीचे मान दोन प्रकारे वाढविता येते. एक राष्ट्रीय उत्पादन वाढवून व दुसरे सार्वदेशीय उत्पन्नाची वर्गावर्गांतील वाटणी जास्त सम करून. पहिला मार्ग शाश्वत व दूरदृष्टया खरा महत्त्वाचा. परंतु त्याचे परिणाम दिसू लागण्यास बराच कालावधी लागण्याचा संभव असतो. याकरिता दुसऱ्या मार्गाचा अवलंब करणे आवश्यक असते. हा मार्ग अवलंबण्याचे दोन मुख्य प्रकार : एक किमतीचे योग्य नियंत्रण करून शेतकरी व मजूर यांस राष्ट्रीय उत्पन्नाचा भाग पूर्वीपेक्षा अधिक मिळवून देण्याचा प्रयत्न करणे व दुसरा गरिबांच्या आर्थिक अडचणी अंशतः भागविण्याकरिता, आजार, बेकारी, वृद्धावस्था इत्यादी प्रसंगी सरकारी खर्चाने सार्वजनिक मदतीची तरतूद करणे.

आर्थिक विकासयोजनेचे अंतिम उद्दिष्ट देश संपन्न व बलवान करणे हे असल्यामुळे, त्यात राष्ट्रीय उत्पादन वाढविणे व गरिबांच्या राहणीचे मान वाढविणे यांचा सारखाच समावेश होतो. पण ही गोष्ट अंतिम ध्येयाची झाली. आर्थिक विकासयोजनेच्या सुरुवातीपासूनच गरिबांच्या राहणीचे मान वाढते अगर वाढू शकते असे नाही. किंबहुना एका अर्थी आर्थिक विकासयोजनेची शीघ्र प्रगती व गरिबांच्या राहणीचे मान तातडतोब वाढविणे या गोष्टी गरीब देशांत परस्परविरोधी भासतात. देश गरीब असण्याची कारणे सगळीकडे सारखीच नसतात. निसर्गसंपत्ती थोडी, लोकसंख्या फार, भांडवली साधने कमी, आधुनिक तज्ज्ञ कामगारांचा अभाव यांपैकी एक किंवा अनेक कारणांमुळे देश गरीब असतात वा राहतात. पण बहुतेक सर्व गरीब देशांत भांडवली साधने व तज्ज्ञपणा यांचा अभाव विशेष भासतो. अलीकडील शास्त्रीय प्रगतीमुळे जवळजवळ सर्वत्र भांडवल गुंतविण्यामुळे, म्हणजे मुख्यत्वेकरून आधुनिक यांत्रिक साधने उपयोगात आणू लागल्याने, उत्पादन झपाट्याने वाढू शकते.

पण भांडवल गुंतविण्याकरिता ते उपलब्ध झाले पाहिजे. नवीन भांडवल तीन मार्गांनी उपलब्ध होऊ शकते. लूट, कर्ज व बचत. पहिला मार्ग संमत मानला तरी दुबळ्या देशांचे दृष्टीने व्यवहार्य नाही. तेव्हा आर्थिक विकासयोजनेचा पाया कर्जाऊ भांडवल मिळवून किंवा राष्ट्रातील बचत वाढवून उभारावा लागतो. अलीकडील कोणत्याच योजनेत यांपैकी केवळ एकाच मार्गाचा अवलंब केलेला आढळत नाही. प्रगती लवकर घडविण्याकरिता सर्वच देश कर्जाऊ भांडवल मिळविण्याचा प्रयत्न करतात. पण आज जगात धनको अत्यल्प व ऋणको बहुसंख्य असल्यामुळे भांडवल परदेशांतून सहज किंवा पुष्कळ मिळण्याचा संभव कमी. तेव्हा आर्थिक विकासयोजनेकरिता स्वदेशीही भांडवल बरेच उभारावे लागते. राष्ट्रीय बचत करणे किंवा भांडवल उभारणे याचा खरा अर्थ बऱ्याच जणांस माहीत नसतो. आर्थिक प्रगतीसाठी भांडवली खर्च करणे म्हणजे चालू उत्पादनापैकी बराच भाग भोग्य वस्तूंचे ऐवजी उत्पादक भांडवली वस्तूंच्या निर्मितीसाठी योजणे हा आहे. गरिबी नडते ती मुख्यत्वे येथे. बहुजनसमाजास आवश्यक अशा अन्नवस्त्रादी वस्तूंचा किमान पुरवठा असल्याशिवाय जनतेच्या राहणीचे मान किमान दर्जाचे ठेवता येत नाही. परंतु गरीब देशाने मोठ्या प्रमाणावर बचत करावयाची तर एवढा किमान पुरवठाही करणे दुरापस्त होते. अमेरिकेसारख्या संपन्न देशांत मोठ्या युद्धाचा खर्च चालविला तरी थोड्या गैरसोयी व काही चैनींचा त्याग, ह्याहून अधिक परिणाम एकंदर जनतेवर झाला नाही. इंग्लंडमध्ये युद्धकाली व युद्धोत्तरकाली श्रीमंत व मध्यमवर्गास आपल्या राहणीच्या दृष्टीने फार मोठा त्याग करावा लागला; पण बहुजनसमाजाची राहणी युद्धकाळांतही फारशी खालावली नाही.

आपल्याकडे श्रीमंत व मध्यम वर्गाची राहाणी उतरवूनही भागेलच असे नाही. आपणांवर गरीब वर्ग धरून सर्वांचे पोट बांधण्याची पाळी आहे. पण ज्याचे पोट आधीच खपाटीस गेलेले त्याचे आणखी पोट बांधणार तरी किती? राहणीचे मान वाढविणे व भांडवली बचत करणे यांमधील सुरुवातीचा विरोध हा असा बिकट आहे.

गरीब देशांच्या आर्थिक विकास योजनेतील दुसरी अडचण योजना कोणातर्फे व कशी घडवून आणावयाची याबाबतची आहे. यांतील पर्याय स्थूलमानाने दोनच. विकासयोजना सरकारी मानणे किंवा ती खाजगी व्यक्ती व मंडळ्यांवर सोपविणे. योजना सरकारमार्फत घडवून आणण्याचे फायदे उघड आहेत. योजनेतील सर्व परस्परावलंबी अंगे यामुळे नियंत्रित व प्रमाणबद्ध राहू शकतात. विशेषतः राष्ट्रास पोट बांधण्याचा प्रसंग आला तर त्याचे परिणाम विशिष्ट वर्गावरच घडून न येता सर्वांस सारखे भासतील व असंतोष आणि वैषम्याची भावना न वाढेल अशी सरकारास खबरदारी घेता येते व घ्यावी लागते. आर्थिक विकास इष्ट दिशेने होईल व भोग्य वस्तू आणि उत्पादक वस्तू यांच्या उत्पादनात नियोजित प्रमाणात वाढ होईल अशी सरकारला काळजी घेता येते व इतकेच नव्हे, तर भोग्य वस्तूंचे उत्पादन वाढवायचे ते चैनीच्या वस्तूंचे न वाढविता प्राथमिक गरजा भागवितील अशांचे वाढवावे, व तसे वाढवल्यावर त्यांचे वाटप सार्वजनिक व्हावे अशीही योजना करिता येते. शेवटी सरकारमार्फत आर्थिक विकासयोजना घडवून आणण्याचा सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे आर्थिक प्रगतीमुळे वाढणारे राष्ट्रीय उत्पन्न हे मुख्यतः सरकारच्या हातात राहून या वाढत्या श्रीमंतीचा, बचतीच्या वाढत्या कुसीचा फायदा सरकारलाच म्हणजे पर्यायाने सर्व जनतेसच मिळतो. याचे उलट आर्थिक विकासयोजना सरकारमार्फत घडवून आणण्याइतके सरकार कार्यक्षम नाही, सरकारी सेवक सचोटीचे नाहीत व जनता सहकारी नाही, म्हणून ती सरकारने हाती घेणे धोक्याचे आहे असे सांगण्यात येते.

व्यक्तिसाहसावरील अवलंबित आर्थिक विकासाचा मार्ग अगदी भिन्न दिशेने जातो. सरकारच्या हाती सर्व कारभार असला म्हणजे भांडवली बचत करणे व आवश्यक वस्तूंचे उत्पादन व वाटप ही एकाच योजनेची दोन अंगे असतात. खाजगी व्यवहारात तसे नसते. व्यक्तिसाहसाने प्रगती घडवून आणण्याकरिता साहसी व्यक्तींच्या हातांत धनसंचय झाला पाहिजे, किंवा धनिकांनी तो त्यांचे हाती दिला पाहिजे. जितका हा धनसंचय अधिक तितके भांडवल गुंतवले जाण्याचा संभव जास्त; व जितका साहसी व्यक्तींचा नफा अधिक तितकी संचय वाढण्याची व त्याअर्थी उद्योग धडाडीने करण्याची शक्यता जास्त. खाजगी व्यक्ती अगर मंडळ्या यांचे मार्फत उद्योगधंद्यांची वाढ, त्याचे हातात भांडवल बरेच साठले व त्यांस बरीच किफायत झाली म्हणजेच होणार. श्रीमंत देशांत वार्षिक ऐन बचत करण्याची ऐपत बहुसंख्य वर्गाची असू शकते आणि उद्योगधंद्यांचे वाढीस लागणारा भांडवलाचा पुरवठा खाजगी व्यक्तीमार्फत होण्यास संपत्तीची फार विषम वाटणी असावीच लागते असे नाही. गरीब देशांत बहुसंख्य भिकार व मूठभर लोक फार मातबर असल्याखेरीज व्यक्तिसाहसावर आधार-लेली अर्थव्यवस्था चालणे शक्य नाही. संपत्तीच्या पुरवठ्याबाबत नव्हे तर धान्य पुरवठ्याबाबतही हाच नियम लागू पडतो. पिढ्यान्‌पिढ्या निकृष्टावस्थेत असलेल्या शेतकऱ्याने थोडे डोके वर काढल्या-बरोबर निर्यातीस पूर्वी उपलब्ध असलेले धान्य खावटीत जिरते असा अनेक देशांचा अनुभव आहे.

गरीब देशात भांडवल साठविण्याचे दोनच मार्ग. सर्वांस जवळजवळ सारख्या राहणीच्या मानावर आणून सक्तीने सार्वदेशीय बचत करणे व दुसरा बहुजनसमाजास विशेष निकृष्टावस्थेत ठेवून मूठभर लोकांच्या हातातील धनसंचय व सत्ता सारखी वाढतील अशी तरतूद करणे. पहिला मार्ग रशियाने चोखाळला आहे; दुसरा हिंदुस्थान चोखाळू पाहात आहे. दुसऱ्या मार्गात संपत्तीची व उत्पन्नाची

विषम वाटणी सुरुवातीस असावी लागतेच; एवढेच नव्हे तर ही विषमता सारखी वाढत जाणे या विशिष्ट परिस्थितीत अपरिहार्य आहे. ज्यांच्या हाती मुख्य उद्योग-व्यापार त्यांच्याचकडे उत्पन्नाचा मोठा ओघ सारखा वाहणार; शिवाय बचत करण्याची खरी कुवत या मूठभर लोकांच्या हातीच असणार. गरीब व मागासलेल्या देशांत सावकारी, व्यापार व कारखानदारी यांपासून मिळणारी आवकही तौलनिक दृष्ट्या मोठी असते. तेव्हा मूळचा संचय मोठा व उत्पन्न मोठे आणि बचत करण्याची ऐपत व विशेष किफायतीची बहुतेक साधने ही दोन्ही याच लहान वर्गाच्या हाती केंद्रित; एवढे सगळे झाल्यावर आर्थिक विषमता सारखी वाढणे अपरिहार्य आहे. हिंदुस्थानात, विशेषतः गेल्या २५–३० वर्षांत ही गोष्ट प्रत्यक्ष घडून आली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

## वाढत्या आर्थिक विषमतेला आळा कसा घालता येईल ?

या वाढत्या आर्थिक विषमतेला आळा दोन प्रकारे घालता येईल. एक तर औद्योगिक मालाच्या किंमतींचे कडक नियंत्रण करून त्यात अल्प फायदा राहील अशी मुळातच व्यवस्था करणे किंवा धनिक लोकांच्या अवास्तव उत्पन्नावर जबर कर लादून समाजस्वास्थ्य वाढविण्याच्या योजनांकडे कराचे उत्पन्न वापरणे. यांतील एकही धोरण हिंदुस्थान सरकार स्वीकारण्यास तयार नाही हे आपण पाहिलेच आहे. आणि आर्थिक विकासाच्या योजना या व्यक्तिसाहसाधिष्ठित ठेवावयाच्या म्हटल्यास हिंदुस्थान सरकारचे अलीकडील धोरण चुकले नाही असेच कबूल करावे लागेल. औद्योगिक मालाच्या किंमतीचे कडक-नियंत्रण केल्यास नवीन उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्यास व जुने उत्पादन वाढविण्यास उत्तेजक परिस्थिती उरत नाही; व जबर करांनी श्रीमंतांजवळचे द्रव्य शोषण केल्यास खाजगी धंदे चालविणाऱ्यां-जवळ नवीन भांडवल पुरेसे साचू शकत नाही. श्रीमंतावरील प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करण्याच्या नवीन प्रवृत्तीचा उगमही सरकारच्या मूळ आर्थिक धोरणापासून झाला आहे. जबर कर लादला असता वा फायद्यांचे कडक नियंत्रण केले असता भांडवलवाले नवीन धंदे काढण्यास कचरले तर त्यांना दोष देण्यात अर्थ नाही. अनियंत्रित खाजगी व्यवहार हा असाच चालावयाचा. "संप" करणारे भांडवलवाले स्वधर्माने चालत आहेत; मात्र खाजगी व्यवहाराधिष्ठित अर्थव्यवस्था व आर्थिक समता यांची सांगड घालू पाहाणारे किंवा घालतो म्हणणारे स्वतःची व जनतेची फसवणूक करीत आहेत.

मूठभर लोकांच्या हातांत धनसंचय फाजील होईल अशी व्यवस्था करणे ही खाजगी व्यक्ती व मंडळ्यामार्फत आर्थिक प्रगती घडवून आणावयाच्या धोरणाची एक बाजू झाली. याचीच दुसरी बाजू म्हणजे समाजातील इतर वर्गांचे उत्पन्न अगर त्यांची क्रयशक्ती फाजिल न वाढेल याची काळजी घेणे. ज्या वर्गाकरवी उद्योगधंद्यांची वाढ घडवावयाची त्यांच्या उत्पन्नावर (व पर्यायाने राहणीवर) नियंत्रण घालणे हे सयुक्तिक नाही. याच्या उलट या वर्गाच्या हाती धनसंचय होण्याकरिता इतरांचे उत्पन्न मर्यादित करणे हेच आवश्यक; कारण एकंदर राष्ट्रीय उत्पन्न मर्यादित व तोकडे असल्याने एकाचा संचय, दुसरीकडे तोकडेपणा आला तरच वाढू शकतो. प्रत्यक्ष करांचा बोजा उतरवू पाहत असता अप्रत्यक्ष करांचा बोजा सारखा वाढत आहे याचे मर्म वरील आवश्यकतेत आहे; व जीवनावश्यक वस्तूंच्या वाटपाचे विनियंत्रण करणे याकरिताच श्रेयस्कर ठरते. सर्वसाधारणपणे जीवनावश्यक वस्तू नियंत्रित दरांत वाटप केल्यास गरिबांच्या राहणीचे मान स्थिरावते असा अनुभव आहे. पण असे केल्याने राष्ट्रीय उत्पादनाचा बराच भाग गरिबांस लागणाऱ्या भोग्य वस्तूंत जातो. विनियंत्रण केले म्हणजे वाटपाची सरकारी जबाबदारी टाळता येते आणि मग गरिबांच्या राहणीचे मान खालावले किंवा नाही याकडे लक्ष देण्याचे कारण उरत नाही; किंबहुना खरे बोलायचे म्हणजे गरिबांच्या राहणीचे फाजील वाढलेले मान उतरविण्याकरिता विनियंत्रण करावयाचे असते. खाजगी व्यवहाराखाली सर्व वस्तूंचे वाटप

व्यक्तींच्या व वर्गांच्या ऐपतीप्रमाणे होते. ज्याला जे परवडत नाही ते त्याला मिळत नाही. नियंत्रित वाटपातही वस्तूंच्या किमती अवास्तव झाल्या तर हल्ली कापड-नियंत्रणाची झाली तशी अवस्था होऊ शकते. पण अशा परिस्थितीत किमती अवास्तव ठेवल्याबद्दल सरकार दोषी ठरण्याचा संभव असतो. विनियंत्रण केले असता कोणतीच अडचण भासत नाही. विनियंत्रण करून किमती वाढू दिल्या की बहुजनांच्या राहणीचे मान साहजिकच उतरते व बहुजनांची पैशाची आवक वाढली असल्यास अप्रत्यक्ष करांमार्फत तिचे शोषण होते. यातील काही अप्रत्यक्ष कर व्यापारी–कारखानदार यांच्या हितार्थ लादले असल्यास तिकडूनही आवश्यक आर्थिक विषमता निर्माण करण्यास मदत होते.

## मजूरवर्ग–विषयक सरकारी धोरणाचे विशेष

अप्रत्यक्ष करांची वाढ हा इतर वर्गाचे उत्पन्न कमी राखण्याचा एक मार्ग आहे. इतर दृष्टीनेही सरकारी आर्थिक धोरण या परिस्थितीत कसे असावे लागते हे पाहिले पाहिजे. आज सकृद्दर्शनी तरी औद्योगिक मजूरवर्गाचे उत्पन्न व सुखसोई वाढविण्याचा विशेष प्रयत्न सरकार करीत आहे असे वाटते. मजूरवर्गाबाबत हिंदुस्थानात सरकारने स्वीकारलेल्या धोरणाचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील:—संप टाळून मजुरीचे दर व इतर विवाद्य प्रश्न लवादामार्फत मिटविणे व मजुरांकरिता राहण्याच्या व इतर सोयींकरता पैसा खर्च करणे. मजुरीचे दर योग्य वा चढीचे असतील किंवा नाही हे लवाद-निवाडे कोणत्या दृष्टीने दिले जातात यावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांतील तेजीच्या काळात लवाद-निवाडे बरेच मजुरांच्या बाजूचे असे वाटले; किंवा ते असे होते अशी तक्रार कारखानदार करीत आले. परंतु मंदीची झळ भासू लागल्यावर लवादपद्धतीचा उपयोग मजुरीचे दर टिकविण्यास कितपत होईल हे सांगणे कठीण आहे. खाजगी व्यवहारांत तोटा येऊ लागला म्हणून कारखाना बंद करण्याची धमकी देणे हे शेवटचे अस्त्र मालकांच्या हाती असते. तेव्हा तोटा भरून देण्याची अगर कारखाना स्वतःच्या हाती घेण्याची सरकारची तयारी असल्याखेरीज मजुरीचे दर टिकविण्याकरिता सरकारला काही करता येत नाही.

लवादामार्फत मजुरीचे दर ठरविण्याऐवजी मजुरीच्या योग्य दरांची कायमची शास्त्रीय बांधणी करणे व कारखानदारांच्या किफायतीत मजुरांस ठराविक प्रमाणात भागी देणे याही मजूरवर्गास संतुष्ट ठेवण्याच्या उपायांचा बराच ऊहापोह अलीकडे होत असतो. मजुरीच्या दरांच्या शास्त्रीय बांधणीची कल्पना मुळातच अशास्त्रीय आहे. आणि कारखानदारांच्या फायद्यातील पाती दिल्याने मजुरांचा संतोष वाढतो असाही आजवरचा अनुभव नाही. परंतु या दोन्ही उपायांबाबतची खरी अडचण निराळीच आहे. शास्त्रीय म्हणून मजुरीचे दर ठरविण्याची विवक्षित पद्धती ठरविली तरी तिची अंमलबजावणी करण्यात अनेक अडथळे येतात; या सर्वांतून मार्ग काढावयाचा तर सरकारला प्रत्येक धंद्याचे आणि प्रत्येक कारखान्याचे सर्व व्यवहार व हिशेब अत्यंत बारकाईने तपासावे लागतील. परंतु हे करावयास सरकार असमर्थ आहे. उत्पादनाच्या किमती ठरवितानासुद्धा कारखानदारांकडून पुरेशी तपशीलवार माहिती ज्या सरकारला उपलब्ध होऊ शकत नाही ते सरकार मजुरीच्या बांधीव दरांची अगर फायद्यांच्या वाटणीची योजना कसोशीने अमलात आणू शकेल हे संभवत नाही. त्या गोष्टी साधण्याची शक्ती ज्या सरकारला असेल ते राष्ट्रीयकरणास भ्यावयाचे नाही.

औद्योगिक मजूरवर्गास संतुष्ट राखण्याचा हर प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे; व तेजीचे दिवस आहेत तोवर त्यांत यश मिळण्यासही हरकत नाही. मजूरविषयक धोरणाची खरी परीक्षा मंदीच्या काळात होत असते. मंदीच्या काळात खऱ्या आवश्यक असलेल्या बेकारी, आजार व वृद्धावस्था वेतनाच्या कोणत्याच योजना सरकारने अजून हाती घेतलेल्या नाहीत. मजुरीचे दर आज

वाढलेले दिसले तरी विनियंत्रणाच्या धोरणामुळे राहणीचे मानही बेसुमार वाढले आहे व सरासरीने, आजच्या राहाणीच्या मानातील वाढ मजुरीच्या दरांपेक्षा अधिक आहे. काम सर्वांस भरपूर आहे तोपावतो राहणीच्या मानातील वाढ तितकी जाचक नसते. परंतु एकदा मंदी आली की, सर्व परिस्थिती बदलेल. मजुरीच्या दरांची घसरगुंडी व बेकारीची वाढ यांस आळा घालण्यास सरकारजवळ कोणतेच साधन उपलब्ध नाही; आणि मंदी आली की घरे आणि मजुरांच्या इतर सुखसोयींकरिता जो पैसा सरकार आज खर्च करीत आहे तोही पुरविता येणार नाही. अर्थात, एकंदर औद्योगिक मजूरवर्गाची संख्या हिंदुस्थानात कमी आहे, व सरकारने मनात आणलेच तर विशेष पैसा खर्च करून त्याची अल्प सोय मंदीतही करता येईल. पण याचा अर्थ एवढाच होईल की कारखानदार, सरकार व औद्योगिक मजूर यांच्या संगनमताने इतर वर्गांवर फार मोठा बोजा पडेल. ही केवळ कल्पना नाही. टाटा कंपनीने दोन वर्षांपूर्वी पोलादाचे भाव वाढवून मिळण्याकरिता सरकारकडे अर्ज केला. अर्ज करताना प्रचलित भावांमुळे तोटा सोसावा लागत आहे असे प्रत्यक्ष कंपनीसही म्हणता येत नव्हते. परंतु आपणांस दरवर्षी तीन महिन्यांच्या वेतनाइतका फायद्यातील भाग म्हणून बोनस मिळेल अशी टाटा कामगारांची अपेक्षा पक्की बांधली गेली आहे; याबाबत त्यांची निराशा झाल्यास कारखाना बंदही पडेल; त्याअर्थी ज्यायोगे कामगारांस तीन महिने वेतनाइतका भाग म्हणून वाटता येईल एवढे फायद्याचे प्रमाण कंपनीस पडलेच पाहिजे व ते पडेल असे भाव सरकारने बांधून दिले पाहिजेत असा युक्तिवाद करण्यात आला; आणि भावनियंत्रण मंडळाने या युक्तिवादास विरोधी असा स्पष्ट अभिप्राय नमूद केला असताही त्या मंडळाच्या विसर्जनानंतर कंपनीने किमतीत मागितली होती त्याहूनही अधिक वाढ सरकारने मान्य केली !

## शेतीविषयक धोरण

औद्योगिक मजुरांच्या संख्येपेक्षा कितीतरी पटीने मोठी संख्या शेतकरी वर्गाची आहे. या वर्गाचे उत्पन्न शेती मालाच्या किमतींच्या प्रमाणावर अवलंबून असते. कृषिउत्पादन व यंत्रोत्पादन यांच्या किमतींचे परस्परप्रमाण हे शेती उत्पन्नाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे समजले पाहिजे. यांत्रिक युगाच्या सुरुवातीपासूनचा सर्वसाधारण अनुभव असा की कच्चा माल व पक्का माल यांच्या देवघेवीत पक्क्या मालाच्या उत्पादकाची किफायत बहुशः जास्त राहते. कच्च्या मालाचे उत्पादक गरीब, बहुसंख्य, असंघटित असतात. त्यांना बाजारभावाची अटकळ कमी, ओढून धरण्याची कुवत अल्प व आपल्या उत्पादनयोजनेत फेरबदल करून उत्पादन लवकर वाढविणे अगर घटविणे दुरापास्त असते. यामुळे तेजीच्या काही वर्षांत त्यांची जरी तात्कालिक भरभराट झाली तरी ती शाश्वत नसते. अनियंत्रित व्यवहारात पुढेमागे केव्हातरी शेतीमालाचे भाव बुडीचे ठरावे व शेतकऱ्यांची गतकाळातील कमाई इतर वर्गांच्या हाती जावी, हा नियम अबाधित राहिलेला आहे. गेल्या तीसचाळीस वर्षांतील जगभरचा अनुभव असा असल्यामुळे प्रत्येक देशात पुढील मंदीच्या संभाव्य काळात शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे टिकवावे याचा विचार चालू आहे. आणि इतर व्यवहार अनियंत्रित असावे असा आग्रह धरणाऱ्या अमेरिकन सरकारासही शेतीमालाच्या भावाबाबत उपाययोजना करणे इष्ट वाटत आहे. हिंदुस्थानात अलीकडील काही वर्षे एकंदर शेतकरी वर्गास बरी गेली; काही भागांतील शेतकऱ्यांस ती विशेष भरभराटीची गेली. आपल्या नागर धनिकवर्गाने तर आता पैसा देशात कुठे असेल तर शेतकऱ्याच्या हातीच राहिला आहे असा नवीन शोध लावला आहे. पण दूरवरचा विचार करिता आजवर झालेल्या प्रमाणे ही सुस्थितीही क्षणभंगुरच ठरणार. कारण शेती-मालाच्या पैदाशीच्या किमती स्थिरावण्याचा सरकारचा विचार दिसत नाही. गेल्या दोन वर्षांत

किमतींच्या नियंत्रणाबाबत जो अविचार सरकारने दाखविला त्यामुळे शेतीमालाच्या किमतीचे भवितव्य विशेषच कठीण होऊन बसले आहे. शेतीमालाच्या किमती येत्या वर्षात चट साऱ्या उतरल्याखेरीज आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही, असे अनेक उद्योगपती बोलू लागले आहेत. शेतीमालाच्या किमती व मजुरीचे दर उतरले म्हणजे आपणांस सार्वराष्ट्रीय स्पर्धेत टिकाव धरता येईल अशीही भाषा ऐकू येऊ लागली आहे. पण शेतीमालाच्या किमती एकदा घसरू लागल्या म्हणजे त्यांना कोठेतरी निश्चित सावरण्याची योजना मात्र कोणी विचारात घेऊ इच्छित नाही. अर्थात शेतीमालाच्या किमती स्थिरावणे हे सोपे नाही. याकरिता योजना दीर्घ विचाराने बसविली पाहिजे; व ती पार पाडण्यास बराच पैसा व बरेच व्यवहार नियंत्रित करण्याची तयारी हवी. हा विचार, हा पैसा व ही तयारी सरकारची नसल्यामुळे मंदीच्या काळात शेतकरी अनियंत्रित खाजगी व्यवहाराच्या वावटळीत पुन्हा सापडणार हे खचित. हे सर्व खाजगी व्यक्तिद्वारा आर्थिक प्रगती घडवून आणण्याच्या निर्णयात अभिप्रेत आहे, व त्यात अटळ आहे हे लक्षात आणले पाहिजे.

हिंदुस्थान सरकारच्या गेल्या दोन वर्षातील आर्थिक धोरणाच्या काही विशेषांचा हा आढावा झाला. यावरून सुरुवातीस निर्देशिलेल्या जागतिक परिस्थितीत हिंदुस्थानचे स्थान कोणते हे कळण्यास मदत होईल. रशियाचा साम्यवाद हिंदुस्थान सरकारला मान्य नाही, हे उघड आहे. इतकेच नव्हे तर पश्चिम यूरोपीय राष्ट्रांनी स्वीकारिलेला समाजवादही हिंदुस्थानात अमलात येण्याचा काही संभव नाही. शेतीमालाच्या किमती वगैरे बाबतीत हिंदुस्थान सरकारचे धोरण अमेरिकेपेक्षाही निष्क्रिय आहे. म्हणजे कितीही कायदे केले व केवढ्याही घोषणा केल्या, तरी आर्थिक प्रगती खाजगी साहसी व्यक्तींमार्फत घडवून आणण्याचा निर्णय घेतल्यामुळे आधीच धनिक असलेल्यांचा धनसंचय वाढू देणे, प्रत्यक्ष कराचा बोजा कमी करणे व इतर वर्गास तौलनिक दृष्ट्या डोके वर काढू देण्यास वाव न देणे या सर्व गोष्टी अपरिहार्य झाल्या आहेत. इतर सर्व बाबींप्रमाणे आर्थिक व्यवहारांत स्वराज्यप्राप्तीने काही फरक झाल्यासारखा दिसत नाही. १९२० सालापासून आपल्या देशातील व्यापारी-कारखानदार वर्गाच्या हातांतील आर्थिक बळ व राजकीय सामर्थ्य ही सारखी वाढत आहेत. ही अशीच पुढे वाढत राहणार; निदान ती अशीच पुढे वाढत राहावी असे धोरण सरकार स्वीकारणार.

## आर्थिक धोरण आणि राजकीय भवितव्य

सरकारचे आर्थिक धोरण कितपत यशस्वी व लोकमान्य होते यावर आपले राजकीय भवितव्य बव्हंशी अवलंबून आहे. प्रचलित अर्थव्यवहारही काही काल धड चालू राहतात किंवा नाही या प्रश्नाचा प्रस्तुत निबंधात विचार केलेला नाही. युद्धाच्या शेवटी आर्थिक परिस्थिती साधारण बरी असताही हल्लीच्या सरकारने ती स्वतःच्या हाताने इतकी बिघडविली आहे की, लवकरच एखादे अरिष्ट येण्याची भीती अनेकांस आज वाटत आहे. मोठा आघात होऊन अर्थव्यवहाराचा गाडा लवकर मोडून पडेल, हे मला संभाव्य वाटत नाही; आर्थिक दुःस्थिती सारखी चिघळत राहून जास्त जास्त बिघडेल याची मात्र शक्यता फार आहे. असे झाले असता हल्लीच्या सरकारला आपला दशवार्षिक कार्यक्रम पार पाडता येईल काय व न आल्यास आर्थिक धोरण व राजकीय हवामान कोणत्या दिशेने पालटण्याचा संभव आहे, हे प्रश्न खऱ्या महत्त्वाचे आहेत.

सरकारी धोरण टिकणे हे, हल्लीच्या दिवसांत, एकपक्षी सरकारी सामर्थ्य व दुसऱ्या पक्षी जनतेचे सहकार्य किंवा निदान संमती यांवर अवलंबून असते. आजच्या आर्थिक धोरणास जनतेची संमती मिळेल काय? कुळकायद्यांनी काही शेतकऱ्यांचे तात्पुरते समाधान झालेसे दिसेल. पण खरी परीक्षा मंदीच्या वेळी त्याला आर्थिक स्वास्थ्य लाभते किंवा नाही यावरच अवलंबून राहील. मजुराला तात्पुरती

महागाई किंवा जादा वेतन कितीही मिळाली तरी त्याचा खरा अभिप्राय धनिकांच्या वाढत्या चलतीस किती आळा बसतो असे त्यास वाटते यावर अवलंबून राहील. एकंदर जगातील अलीकडील इतिहास पाहिला तर राजकारण स्थिरावण्यास आर्थिक धोरण दोन प्रकारे यशस्वी व्हावे लागते. एक तर सर्व वर्गास किमान स्वास्थ्य लाभण्याच्या योजना सरकार अमलात आणीत आहे असे कळावे लागते; व दुसरे म्हणजे, बहुजन हालअपेष्टेत असता धनिकवर्गाच्या चैनीलाही काही आळा बसला आहे असे दिसावे लागते. पहिले स्वास्थ्य प्रत्यक्ष शारीरिक, दुसरे तितकेच महत्त्वाचे मानसिक. इंग्लंड व स्कँडेनेवी देशांत या दिशांनी जास्तीत जास्त यशस्विता सरकारी धोरणास लाभली आहे. आपल्याकडे यांतील कोणत्याच दृष्टीने आर्थिक धोरणाची आखणी होण्याचा संभव नाही. समाजस्वास्थ्याच्या योजना खर्चिक व मागासलेल्या देशात अवघड म्हणून सरकार हाती घेऊ शकत नाही; उलटपक्षी धनिकांवर आर्थिक धोरणाची सर्व मदार असल्यामुळे त्यांवर हुकमत चालविण्यापेक्षा त्यांची मनधरणी करणेच सरकारला आवश्यक भासत आहे. तेव्हा बहुजनसमाज सरकारच्या आर्थिक धोरणाचा विचार करताना 'कस्यार्थे' हा प्रश्न विचारणार व त्याचे, केवळ धनिकांच्या, एवढेच उत्तर विचारांती मिळणार हे स्पष्ट आहे.

## व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व

आर्थिक वादास जोडून एक राजकीय वाद, व्यक्तिस्वातंत्र्याबाबतचा, सुरुवातीस निर्देशिला; परंतु त्याचे आपल्या देशात खरोखर फारसे महत्त्व नाही. राज्यघटना मूलतः बदलल्याशिवाय समाजव्यवस्था अगर अर्थव्यवस्था यांत क्रांतिकारक फरक घडवून आणता येतात असा अनुभव इंग्लंड देशाचा आहे; आणि म्हणून तेथे व्यक्तिस्वातंत्र्याची पायमल्ली करून, रक्तपात घडवून, तावडतोब क्रांती करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा, सदनशीर मार्गाने दडपण आणून इष्ट ते बदल घडवावे याकडे बहुजनांचा कल असणे स्वाभाविक आहे. पण इंग्लंडची परिस्थिती अपवादात्मक मानिली पाहिजे. सत्ताधाऱ्यांत समजूतदारपणा व बहुजनांत संयम, या दोन्ही गोष्टी अनुकूल असल्याखेरीज इतिहासाचा ओघ असा वळत नाही. इंग्लंडमध्ये आज अमेरिकेपेक्षाही जास्त खरे व्यक्तिस्वातंत्र्य पाहावयास मिळते अशी ग्वाही सर्व देतात. इंग्लंडच्या जोडीस फक्त स्कँडेनेवी देशांस बसविता येते. इतरत्र उदारमतवादी लोकशाही म्हणविणाऱ्या सरकारांची वागणूक फारशी स्पृहणीय नाही. यातही क्रम गरिबीप्रमाणे लावता येतो. अमेरिकी गटाच्या यूरोपीय राष्ट्रांत हा क्रम फ्रान्स, इटली, ग्रीस असा लावता येईल. इटली, ग्रीसमधील राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याची परिस्थिती पाहता स्वतःस उदारमतवादी म्हणविणाऱ्या अनेक अमेरिकन मुत्सद्द्यांस मोठा पेच पडला आहे. कम्युनिस्ट गटात ही राष्ट्रे जाऊ नयेत म्हणून त्यांस आर्थिक मदत करणे श्रेयस्कर हे खरे, पण ही आर्थिक मदत परिणामी कर्मठ सनातनी, मोठ्या भांडवलवाल्यांचे गट व राजकीय हुकुमशाहीचे पुरस्कर्ते व चालक यांसच बलवान बनविते; व असे झाले म्हणजे अमेरिकी भांडवलशाही साम्राज्यवादी आहे या कम्युनिस्ट प्रचारास साहजिकच बळकटी येते. आपल्या देशातील सरकारने गेल्या दोन वर्षांत जे अधिकार स्वतःस प्राप्त करून घेतले व जे व्यक्तिस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य याबद्दल धोरण ठेवले त्यावरून त्यासही उदारमतवादी म्हणता येत नाही. आपणांस तत्त्वतः करडा विरोध होऊ लागला म्हणजे सर्व राज्यकर्ते व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काच्या मर्यादा उल्लंघितात; जो आपणास योग्य वाटतो त्या पक्षाचे अस्तित्वच धोक्यात आल्यास ते टिकविण्याकरिता सगळेच आपणांस उपलब्ध असलेली सर्व अस्त्रे योजतात. यांत साधू व असाधू निवडणे हे उडदामाजी काळेगोरे निवडण्याचा प्रयत्न करण्यासारखेच ठरते. व्यक्तिस्वातंत्र्यास अमुक जास्त महत्त्व देतात, अमुक जास्त सहिष्णू अगर अहिंसात्मक आहेत, या दाव्यांकडे लक्ष न देता, इष्ट फरक शांततामय

मार्गाने घडवून आणण्याच्या प्रत्यक्ष संभाव्यतेचाच विचार करू.

## आर्थिक विसंगती

निर्विकार मनाने पाहिले असता सर्वच बाबतीत आपल्या देशाची परिस्थिती ग्रीस, स्पेन व चीन अशा देशांशीच विशेष तुलनीय ठरते. या सर्व देशांत गेल्या वीस-पंचवीस वर्षांतील आर्थिक इतिहासात एक चमत्कारिक विसंगती प्रत्ययास येत आहे. समाजवाद व साम्यवादाचा अंमल शांततेने घडवून येण्यास परिस्थिती जेथे अनुकूल तेथे त्याची आवश्यकता कमी तीव्र व जेथे आवश्यकता विशेष तेथे बंडाळी शिवाय अर्थव्यवस्था बदलणे कमी संभाव्य, अशी ही विसंगती आहे. अत्यंत अल्पसंख्यांकाचे हाती राष्ट्रीय संपत्तीचा मोठा भाग केंद्रित होणे, थोड्या धनिकांचे हाती सर्व अर्थव्यवस्थेची किल्ली असणे, भीषण गरीबी व बेसुमार श्रीमंतीचे साहचर्य राहणे, या गोष्टींच्या निराकरणाकरिता सर्व प्रमुख अर्थव्यवहार सरकारी करणे आवश्यक मानण्यात येते. परंतु जेथे खरोखर अशी परिस्थिती असते तेथे समाजवाद चटकन अमलात आणणे फार कठीण असते. याचे उलट जेथे सार्वजनिक राहणीचे मान बरे, आर्थिक विषमता कमी, भांडवलवाल्यांत कार्यक्षम उत्पादनाची व सचोटीची परंपरा अधिक तेथे समाजवादाच्या दिशेने प्रगतीही अधिक लवकर होते.

आज इंग्लंडमधील राष्ट्रीयीकरणाच्या विरोधी अनेक लेखक इंग्लंडमध्ये राष्ट्रीयीकरण अनावश्यक आहे असे मुख्यतः प्रतिपादतात. त्यांचे मते आज इंग्लंडमधील सर्व मोठे उद्योगधंदे कोणा व्यक्तींच्या ताब्यात राहिले नसून मोठ्या सार्वजनिक मंडळ्यांच्या मालकीचे आहेत. या मंडळ्यांतील भागीदार बहुसंख्य व देशभर पसरलेले आहेत, व यांचा कारभार कोणाही एका व्यक्तीच्या अगर गटाच्या हुकमतीखाली अगर हिताकरिता चालत नाही. मंडळीने उत्पादन किफायतशीर व्हावे याकडे जरी लक्ष ठेवले तरी मजुरांचे समाधान, राष्ट्रीय संपत्तीचा योग्य विनियोग व सुरक्षितता, उत्पादनाचा उच्च दर्जा, शास्त्रीय संशोधनाची प्रगती इत्यादी अनेक बाबी या मोठ्या मंडळ्या तितक्याच कसोशीने सांभाळतात. तसेच मंडळ्यांच्या भागावर वाटण्यात येत असलेला नफा इतका अल्प व एकंदर करपद्धतीमुळे व जीवनावश्यक वस्तूंच्या वाटपाच्या नियंत्रणामुळे प्रत्यक्ष आर्थिक विषमता इतकी कमी की, राष्ट्रीयीकरणामुळे कोणत्याच दृष्टीने इष्ट फरक घडून येण्याची शक्यता उरलेली नाही. इंग्लंडात राष्ट्रीयीकरण इष्ट आहे किंवा नाही याचा आपणास विचार करावयाचा नाही. परंतु, तेथील विरोधकांच्या विधानांत काही अंशी तथ्य आहे, इतकेच नव्हे तर विरोधकांची भूमिकाही खाजगी व्यक्तीचे हातांत मोठा धनसंचय असणे, मूठभर साहसी व्यक्तींची हुकमत अर्थव्यवहारावर चालणे किंवा राहणीच्या मानांत मोठी विषमता असणे या गोष्टी समर्थनीय आहेत अशी नाही. त्यांचे मते या दृष्टीने आधीच इतकी प्रगती झाली आहे की जास्त घडवून आणण्यास राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता नाही.

## आपल्या आर्थिक सत्तेचे सूत्रधार

याच्या उलट हिंदुस्थानातील परिस्थिती आहे. येथे उद्योगधंदे फार थोड्यांच्या हाती व हे सर्व काही विशिष्ट गटांतले. "हरिजन" मध्ये काही महिन्यांपूर्वी एका उद्योगपतीचे पत्र प्रसिद्ध करण्यात आले. त्यात खाजगी भांडवलवाले प्रांतीयतेच्या विरुद्ध आहेत असे म्हटले. एका दृष्टीने हे खरेही आहे. कारण त्यांतील कोणाचीच दृष्टी आपले कुटुंब, सगेवाले अगर भागीदार यांच्या पलीकडे जाऊ शकत नाही. निरनिराळ्या प्रकारे सार्वजनिक मदतीने वाढलेल्या अगर चाललेल्या सर्व हिंदी उद्योगधंद्यांतील मुख्य फायदा, त्यांच्या व्यवहाराची सर्व मलई, किती थोड्या व्यक्तींना मिळते व ती सर्व विशिष्ट गटांत राखण्याची साधने काय याबद्दल चौकशी करणे राष्ट्रीय धोरणाच्या दृष्टीने आज खरोखर

फार महत्त्वाचे आहे. अमेरिकेत अशी चौकशी फार तपशीलवारपणे लढाईपूर्वीच करण्यात आली. इंग्लंडात एकाच धंद्यात–वर्तमानपत्राच्या–थोड्या व्यक्तींच्या हाती हुकमत असल्याचे आढळते. तेथेही या धंद्याबाबत नुकतीच चौकशी झाली. हिंदुस्थानात असल्यापैकी कोणतीच चौकशी होऊ घातल्याचे ऐकिवात नाही. आर्थिक सत्ता फार थोड्यांचे हाती आहे एवढेच नव्हे, तर तिचा उपयोगही केवळ व्यक्ति-फायद्यावर व गटाच्या सामर्थ्याचे वाढीवर लक्ष ठेवूनच केला जातो. अर्थव्यवस्थेस किफायत व्यवस्था काही अर्थशास्त्रज्ञ क्वचित म्हणतात. हिंदुस्थानात हे अक्षरशः खरे आहे. आपली व्यवस्था खरी उत्पादनव्यवस्था नाही. जास्तीत जास्त उत्पादन, चांगले उत्पादन, कमी खर्चाचे उत्पादन, राष्ट्रीय संपत्तीच्या दृष्टीने युक्त उत्पादनपद्धती ही दृष्टी आपणाकडे अभावाने दिसेल. उत्कृष्ट व प्रामाणिक कारखानदार म्हणून हिंदुस्थानात कीर्ती मिळविणारे, बहुतेक उद्योगधंद्यांत, अजूनही परकीयच आहेत. बाजार तेजीचा असला म्हणजे वाईट माल गिऱ्हाइकाचे माथी मारून स्वतःच्या देशातच नव्हे तर परदेशातही अनेकवार हिंदी कारखानदार व व्यापाऱ्यांनी अप्रतिष्ठा मिळविलेली आहे. कर चुकविणे, सरकारी नियंत्रणे पद्धतशीर रीतीने मोडणे, वजनामापांत, किमतींत गिऱ्हाईकास फसविणे, साठेबाजी-सट्टेबाजी करणे, एवंच सर्व तऱ्हेच्या लबाड्या करणारे प्रत्येक देशात आढळतात. देशादेशांतील मुख्य फरक म्हणजे ते केवढ्या प्रमाणांत व कोणत्या थरांत आढळतात याबद्दलचा. खऱ्या पुढारलेल्या देशांत हे अल्प असतात इतकेच नव्हे धुरीण समजल्या जाणाऱ्यांच्यात असे सहसा सापडत नाही. चीन–हिंदुस्थानसारख्या देशांत लहान-मोठे सगळेच एका माळेचे मणी, किंबहुना जेवढा मोठा धनिक तेवढा त्याचा दुर्लौकिकही मोठा अशी बऱ्याच वेळेस परिस्थिती असते. आणि चीन–हिंदुस्थानमधील आर्थिक धोरणाचे खरे सूत्रधार हेच. ज्यांना समाज कंटक म्हणून साक्षेपाने वगळावे ते आमच्या राजधानीत मोठे मानाचे सल्लागार म्हणून मिरवितात!

असे असता शांततेने बदल कसे घडून यावे? आजचे सर्वच राजकीय-आर्थिक धोरण विशिष्ट वर्गाच्या हितांकरिता कसे आखले जात आहे याचा अनुभव मुंबईकडे दृष्टी फेकली असताही सहज येतो. खडक-वासले, वीर सारखी धरणे उंच करण्यास पैसा नाही पण मुंबईत दूधवाडी व निर्वासितांची घरे याकरिता कोट्यावधी रुपये ओतले जातात. प्राथमिक उत्पादन व प्राथमिक उत्पादक यांचे महत्त्व सरकारच्या लक्षात येण्याचे कारण नाही; निदान त्यांची खरी भरभराट हा आर्थिक धोरणाचा खरा उद्देश नाही. मुंबईची वाढ भरमसाट होऊ द्यावयाची, मग त्याचे अनिष्ट परिणाम सावरण्याकरिता कोटींनी खर्च करू पहावयाचे. पण सार्वत्रिक प्राथमिक उत्पादन वाढेल व केंद्रांत फाजील साचलेला उद्योग व पैसा देशभर काही प्रमाणांत फैलावेल याचा विचार करावयाचा नाही. याचे कारण याबद्दल खरी कळकळच नाही. विकेंद्रीकरण खरे झाले तर दोनचार शहरांतल्या मूठभर लोकांची हुकमत कशी टिकेल?

## राजकीय संक्रमण शांततेने होणे दुरापास्त

राजकीय मतौघ असाच वहात आहे. स्थानिक स्वराज्य संस्था नव्हे तर प्रांतिक सरकारेही दुर्बल करावी, मध्यवर्ती सरकारची सत्ता हरतऱ्हेने वाढवावी, लढाईची रूपके वापरून अंधश्रद्धा व अंधानुयायित्व यांवर भर द्यावा हेच प्रकार सर्वत्र दिसतात. भांडवलवाल्यांची आर्थिक सत्ता व राजकीय हुकूमशाही यांचे साहचर्य सर्वत्रच असते. त्यांत आता या रूसी-अमेरिकी लढ्याने आयतेच फावले आहे. आदिवासी असंतुष्ट झाले, लहान बागाइतदार चिडले, किंवा निर्वासित बिथरले तर सर्व कम्युनिस्टांमुळे. सरकारवर जबाबदारी काहीच नाही. यापुढे हळूहळू सरकारचा प्रत्येक उघड अगर प्रच्छन्न टीकाकार कम्युनिस्टजमा आहे असे सरकारचे पोलिस समजू लागणार हे उघड आहे. या परिस्थितीबाबत आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. इतर सर्व तुल्य देशांत ती अशीच आहे. आणि आता अमेरिकी

मदत जास्त येऊ लागली म्हणजे ती एका दृष्टीने आणखीच बिघडेल; कारण सत्ताधारी आज आहेत त्यापेक्षाही कमी लोकाभिमुख होतील. मोठ्या राष्ट्रांच्या पाठबळाने सार्वराष्ट्रीय कम्युनिस्ट आघाडीच्या निमित्ताने त्यांचे लष्करी सामर्थ्य वाढेल व आसनही पुष्कळ वर्षे स्थिरावू शकेल.

कोणता पक्ष किती वर्षे आसनस्थ राहील हा विषय नाही! त्याबद्दल बोलण्याचा माझा अधिकारही नाही. गेल्या दोन वर्षांतील आर्थिक धोरणाच्या इतिहासावरून मला एवढेच वाटते की, या देशात संक्रमण शांततेने होण्याची चिन्हे दुरावू लागली आहेत, किंबहुना दुरावलीच आहेत. दोन वर्षांपूर्वी मी याबाबत आशावादी होतो. व्यापारी–कारखानदार वर्गाकडून काही समजूतदारपणा दाखविला जाईल असे मला वाटले नव्हते; परंतु राजकीय पुढारी, मोठे सरकारी अधिकारी व एकंदर शिक्षित पांढरपेशा-पैकी महत्त्वाच्या व्यक्ती यांना परिस्थितीचे यथार्थ आकलन होऊ शकेल असे वाटत होते. त्यातल्यात्यात युद्धकालीन नियंत्रणाचा गाडा मागील सरकारने आयताचा चालू करून दिलेला असल्यामुळे विनायासे बऱ्याच गोष्टी करता येण्यासारख्या होत्या. पण माझा आशावाद फाजील ठरला. कम्युनिस्ट म्हणतील की तो फाजील नव्हे तर केवळ स्ववर्गवृथाभिमानद्योतक होता. ते काही असो. राजकारणावर निवडणुकींच्या आधी पडलेला पैशाचा प्रभाव फार टिकाऊ ठरला; अर्थात परिस्थिती इतकी विषम व बिकट असता केवळ काही राजकीय पुढाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या जोरावर तीत मूलभूत फरक घडून येऊ शकतील ही अशा फोल ठरली. दिवसेंदिवस ही परिस्थिती सुधारणे कठीण होऊ लागले आहे. यापुढे सत्ताधिकाऱ्यांचा व धनिकांचा उन्माद कमी होण्याची चिन्हे नाहीत, तो बळावणार. सत्ता टिकविण्या-करिता, असंतोषाची चिन्हे दडपून टाकण्याकरिता हरतऱ्हेचे प्रयत्न होणार. या सर्व लढ्यात कोणास काहीही यश तात्कालिक येवो अगर न येवो, एकंदर मनातल्या आढ्या व असंतोष, वर्गावर्गातील, ज्ञातीज्ञातील अप्रीती व कलह वाढणार व आधीच कारभारात आलेल्या ढिलाईचे पर्यवसान वाढत्या अराजकात होणार असा धोका आज उघड दिसत आहे. परिणामी या मंथनातून हालाहल निघो वा अमृत निघो मध्यंतरीचा काळ-कठीण जाणार हे खचित.

मुंबई मराठी साहित्यसंघ, मुंबई, संघदिन भाषण, २३–७–१९४९ (मुंबई, १९४९)

☆

# ४ . . गरीब व अप्रगत देशांचा आर्थिक विकास

जगातील एकंदर गरीब व अप्रगत देशाच्या आर्थिक विकासाचा विचार करू लागल्यास, जगात गरीब व अप्रगत देशांचीच संख्या अधिक आहे असे दिसून येईल. त्यांच्या आर्थिक संबंधीच्या सर्वसाधारण विचाराबाबत तशांत फारसे मतभेद होतील असे वाटत नाही. गरीब व अप्रगत आणि संपन्न व प्रगत या व्याख्या तुलनात्मक दृष्टीनेच केव्हाही होऊ शकतील आणि ही तुलनात्मक गमके व क्रम हीही बदलत असतात. प्रत्येक देशाची तुलनात्मक परिस्थिती नेहमी तीच एकसारखी राहते असे नाही. आपण भारतीय दोनशे वर्षांपूर्वी आर्थिक दृष्ट्या इतरांच्या मानाने इतके मागासलेले नव्हतो आणि आज आपण तुलनेने जितके गरीब आहोत इतके ५०–६० वर्षांपूर्वी नव्हतो. अमेरिकेचे आजचे दरडोई वार्षिक उत्पन्न ८००० रुपये आहे तर भारतामध्ये हे प्रमाण अवघे २५० रुपये आहे. म्हणजे आज आपल्यापेक्षा अमेरिकेचे उत्पन्न तीस-बत्तीस पटींनी अधिक आहे. ५०–६० वर्षांपूर्वी आपण आणि अमेरिका यांच्यामध्ये हे अंतर इतके नव्हते. हा इतका फरक आज का पडतो याचा विचार झाला पाहिजे.

## आर्थिक विकासाचा अर्थ

आर्थिक प्रगती व विकास म्हणजे तरी काय? हे अगदी प्रारंभापासून पाहू गेल्यास असे दिसेल की अगदी प्राथमिक अवस्थेत मानव व इतर प्राणी यांचे जीवन एकाच प्रकारचे होते. इतर प्राण्यांसारखाच मानवाचा जीवनक्रम नैसर्गिक परिस्थितीने पूर्णपणे मर्यादित होता. पुढे माणसे आपला जीवनक्रम सुकर करण्यासाठी काही बाह्य साधने वापरू लागली. अवजारे व हत्यारे यांचा वापर सुरू होताच मानव आणि इतर प्राणी यांच्या जीवनक्रमात फरक पडू लागला असे दिसून येते. अवजारे व हत्यारे यांच्या उपयोगामुळे मानवाची उत्पादनशक्ती वाढली व त्याच्या उत्पादनात विविधता येऊ लागली; आणि उपभोग्य वस्तूंच्या वाढत्या निर्मितीबरोबर मनुष्यसमाजाचा आर्थिक विकास होऊ लागला.

तरीपण गेल्या दोनशे वर्षांपूर्वीपर्यंतच्या काळात या उत्पादन–साधनांच्या विकासाची गती बरीच मंद होती. फार प्राचीनकाळी सुधारलेल्या अशा इजिप्त देशात ज्या प्रकारची साधनसामग्री मानवांनी तयार केली होती त्यामध्ये आणि इसवी सन सतराव्या किंवा अठराव्या शतकातील बहुतेक देशात साधन-सामग्रीमध्ये फारसे अंतर नव्हते. त्या एका प्रदीर्घ कालखंडाच्या मानाने गेल्या दोन अडीच शतकांत झालेली साधनसामग्रीची वाढ फारच झपाट्याने व विविधप्रकारे झालेली आहे असे दिसून येते. ही उत्पादन–साधनांची प्रगती व आर्थिक विकास यांचा फार निकट संबंध आहे.

माणूस पूर्वी फक्त स्वतःची व इतर प्राण्यांचीच शक्ती उत्पादनकार्यासाठी वापरीत असे. परंतु गेल्या दोन शतकांत वाफ, वीज, खनिज तेल इत्यादींच्या उपयोगामुळे ही शक्ती अनेक पटीने वाढली आहे.

तसेच केवळ अवजारे अथवा हत्यारे यांऐवजी उत्पादनात यंत्रांचा उपयोग करण्याचे ज्ञान होऊन यंत्रशास्त्र झपाट्याने वाढले. या सर्वांमुळे विशेषतः औद्योगिक विकास झाला, आणि मानवाची एकंदर उत्पादनशक्तीच वाढली. परंतु जगातील प्रत्येक देशात हा विकास सारखा झालेला नसल्यामुळे जेथे तो जास्त प्रमाणात झाला ते देश संपन्न व प्रगत झाले आणि जेथे तो अल्प प्रमणात झाला किंवा झालाच नाही ते गरीब व अप्रगत राहिले. संपन्न व प्रगत आणि गरीब व अप्रगत हा फरक मुख्यत्वे या यांत्रिक युगामुळे झाला. देशादेशांतील हा फरक कमी करून इतर संपन्न व प्रगत देशांच्याबरोबर आपणांस जाणे असल्यास नवविज्ञानाच्या व यंत्राच्या सहाय्याने आपणास आपले उत्पादन-सामर्थ्य वाढविले पाहिजे हे उघड आहे. परंतु यांत्रिक साधने फार अवजड, बहुविध व क्लिष्ट स्वरूपाची आहेत; व त्यांचा वापर व नवविज्ञानाचा प्रसार याकरिता अनुरूप अशी समाजरचना, अर्थव्यवस्था व शासनसंस्था बनवावी लागतील. थोडक्यात, आपली आर्थिक व सामाजिक घडीच नव्याने बसवावी लागेल.

साधनांची प्रगती म्हणजे काय हे पाहू गेल्यास उत्पादनसाधनांच्या वाढीच्या क्रियेचे स्वरूप अगदी साध्या उदाहरणानेही स्पष्ट होण्यासारखे आहे. प्राथमिक अवस्थेत मनुष्य आपले भक्ष्य केवळ आपल्या अवयवांचाच उपयोग करून मिळवीत असे. पुढे त्याने धनुष्य-बाण अगर जाळे वापरावयास सुरुवात केली तेव्हा त्यास या साधनांच्या उपयोगांचा शोध व ज्ञान होणे याबरोबरच ही साधने निर्माण करण्याकरिता वेळ व शक्ती खर्च करणे हेही आले. प्रत्यक्ष भक्ष्य मिळविण्यात सर्व वेळ व शक्ती न घालविता त्यातील काही साधनांच्या उत्पादनात घालविणे शक्य असल्यास ते फायदेशीर ठरू लागले. तेव्हा उत्पादन-साधनांच्या वाढीस त्यांच्या ज्ञानाप्रमाणेच त्यांच्या निर्मितीकरिता मोकळा वेळ व शक्ती असणे आवश्यक असते.

गरीब व अप्रगत देशांना नवीन साधनांची निर्मिती करण्यात अनेक अडचणी येतात. मुख्य अडचण म्हणजे गरीबीचीच. समाजाच्या नित्याच्या गरजा भागवून वेळ उरला तरच साधनांची निर्मिती होणार व ही निर्मिती ज्या प्रमाणात वाढणार त्या प्रमाणातच नवीन साधनांचा संचय होणार. तसेच साधनांच्या निर्मितीकरिता लागणाऱ्या कष्टांच्या मानाने साधनांची उत्पादन-क्षमता जेवढी अधिक असेल तेवढी त्यांची निर्मिती जास्त फायदेशीर ठरावयाची. साधन-उत्पादनाकरिता वेळ व शक्ती खर्च करण्याची जितकी शक्यता अधिक तितकी समाजाची साधनसंपत्तीची वाढ अधिक होण्याचा संभव जास्त व जेवढ्या प्रमाणात साधने उत्पादनक्षम तेवढ्या प्रमाणात उत्पादनाची वाढ झपाट्याने होत जाणार! यांत्रिक युगाने मुख्य फरक साधनांच्या उत्पादन-क्षमतेत घडवून आणला आहे. नुसते उत्पादनाचे केंद्रीकरण करून अगर प्रमाण वाढवून हा फरक घडून आलेला नाही. हातमाग कारखाने एकत्र करण्यात विशेष मुद्दा नाही. यांत्रिक भागांच्या तेवढ्याच संख्येमुळे उत्पादन कितीतरी जास्त पटीने वाढते.

यंत्रामुळे नवयुग आले. या नव्या युगात साधनसंपत्तीचे महत्त्व वाढले व त्याबरोबर एकंदर उत्पादन अनेकशः वाढले व मोठ्या प्रमाणावर संचयही होऊ लागला. जुन्या काळात संपत्तीचा संचय मर्यादित असे, याचे कारण उत्पादन मर्यादित, एवढेच नव्हे तर संचय झाल्यास नव साधनांची कार्यक्षमताही मर्यादित, म्हणून जुन्या श्रीमंतीची कल्पना म्हणजे दासदासी व कलाकुसरीच्या वस्तूंचा संचय अशा प्रकारच्या होत्या. आता उपभोग्य वस्तू पुष्कळ व त्यांचे उत्पादनही पुष्कळ व हे सर्व विविध साधन-साहित्यामुळे शक्य. त्यामुळे या यंत्रयुगाबरोबरच साधनसंचयाचे म्हणजे भांडवलशाहीचे युग आले.

## साधनसंचयाचे महत्त्व

उत्पादनक्षम साधनांचा संचय करून एकंदर समाजाची साधनसंपत्ती वाढविणे हा तो समाज अथवा तो देश संपन्न करण्याचा एकच मार्ग आहे. गरीब राष्ट्रांचा साधनसंचय कमी. श्रीमंत राष्ट्रांचा हा

साधनसंचय मोठा म्हणून तेथील प्रत्येक माणसाची उत्पादनक्षमताही गरीब देशातील माणसापेक्षा अधिक असते. याचा अर्थ सधन देशातील मनुष्य गरीब देशातील माणसापेक्षा अधिक कसबी, अधिक वाकबगार असतो असे नाही. त्याच्या सहाय्यास अधिक साधनसामग्री म्हणून तो अधिक उत्पादनक्षम वाटतो एवढेच. आपणांस हे सर्व साध्य करून घ्यावयाचे असल्यास ही साधनसामग्री व ती वापरण्याचे ज्ञान ही उपलब्ध करून घेतली पाहिजेत.

अर्थात यंत्रे उपलब्ध झाल्याने हे सर्व साध्य होईल असे नव्हे. याबरोबरच इतर नवे मार्गही चोखाळावे लागतात. म्हणजे नवीन पद्धतीच्या अर्थसंस्था, पेढ्या, वाहतूक व क्रय-विक्रयव्यवस्था इत्यादी यंत्रयुगाच्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व नव्या गोष्टी साध्य करून घ्याव्या लागतील. हे सर्व जेव्हा आपणांस उपलब्ध होईल तेव्हा आपण संपन्न व प्रगत होऊ.

आपली साधनसंपत्ती वाढविण्याचे दोन मार्ग आहेत : ती विकत आणणे किंवा स्वदेशी तयार करणे. विकत आणावयाची तर त्यास पैसा हवा व हा पैसा हाती येणे दोन प्रकारे संभवते. एक म्हणजे धनसंचय करणे व दुसरा संपन्न देशांकडून कर्ज घेणे. यांपैकी कोणती तरी एक गोष्ट मान्य झाल्याविना आपणांस इष्ट दिशेने पाऊल टाकता येणार नाही.

धनसंचय होण्यास आजच्या राष्ट्रीय प्राप्तीत वाढ झाली पाहिजे. तसेच उपभोग्य वस्तूंचा वापर कमी करून एकंदर प्राप्तीतील तात्कालिक गरजांकरिता व्यय कमी झाला पाहिजे. देशात साधनसामग्री करण्या-करिताही हेच साधावे लागेल. कारण येथे साधनसामग्री तयार करावयाची तर नवीन उद्योगधंदे काढावे लागतील व त्याकरिता भांडवली विनियोग व मनुष्यबळ योजावे लागेल. हेही तात्कालिक व्यय कमी करून एकंदर बचत करूनच होऊ शकेल.

बचत केली पाहिजे हे म्हणणे ठीक आहे. परंतु आपल्या या गरीब देशात बचत करा सांगणे हेही कठीण आणि प्रत्यक्षात आणणे त्याहून कठीण आहे. राष्ट्रीय बचत करणे म्हणजे अन्न व वस्त्र इत्यादीं-करिता जो काही व्यय होतो, त्यात कमी करण्याखेरीज गत्यंतर नाही. परंतु आधीच येथील खाली गेलेले राहणीचे मान लक्षात घेता बचत करा हे सांगणे सोपे नाही असे दिसून येईल. भारतासारख्या कृषिप्रधान देशाची दुसरी एक अडचण म्हणजे येथील कृषियोग्य एकूण एक भूमी पूर्ण व्याप्त आहे. भारताच्या शेतीबाबत जुन्या ज्ञानाच्या आधारे होणे शक्य होते ते बहुतेक मानवी प्रयत्न झालेले आहेत. गेल्या शेदीडशे वर्षांतील शास्त्रीय प्रगतीचा एकांगी परिणामच भारतात दिसून येऊ शकला किंवा दिसला आणि यामुळे निर्माण झालेल्या अडचणी भारतीयांना भोगाव्या लागत आहेत. औषधी साधने व आरोग्याचे नियम यांमुळे लोकसंख्येची वाढ पूर्वीपेक्षा अधिक झपाट्याने होत गेली. पाश्चात्य देशात लोकसंख्येच्या वाढीबरोबरच विज्ञानामुळे उपलब्ध झालेल्या उत्पादन-साधनांमुळे तेथील दरडोई उत्पन्नही वाढत गेले. परंतु भारतासारख्या देशात आंग्ल साम्राज्यशाहीच्या आर्थिक दडपणामुळे दरडोई उत्पन्नात वाढ बिलकुल झाली नाही.

आपल्या राष्ट्रात नवीन विज्ञान व नवे उद्योग न आल्याकारणाने एकाच शेतीच्या व्यवसायावर भर दिला गेला. देशांतील बहुसंख्य लोक कृषीसारख्या प्राथमिक उत्पादनात गुंतून राहिले व इतर व्यवसायांचे अभावी लोकसंख्येच्या वाढीबरोबर शेतीतच काम करणारांची अधिकाधिक गर्दी वाढली आणि दर कामकऱ्यामागे शेतजमिनीचे प्रमाण कमी पडू लागले. शेतकऱ्यास उत्पादनासाठी जमीनच कमी असल्यामुळे तो कार्यक्षम असूनही उत्पादनवाढ थोडेबहुत नवीन ज्ञान वापरूनही फारशी होऊ शकली नाही.

गरीब लोकांच्या गरिबीमुळे एकंदर धनसंचयाला वाव कमी; त्यातल्या त्यात जेथे भूक्षेत्र मर्यादित व कृषि-उत्पादनात गर्दी जास्त तेथे कृषिक उत्पादनक्षमता कमी व तीव्रतेने वाढविणेही कठीण. या सर्व

अडचणी लक्षात घेऊन विकास करणे किती अवघड आहे हे पाहूनच आपण कार्याला आरंभ केला पाहिजे.

एकेकाळी या भारतभूमीत सोन्याचा धूर निघत होता असे सांगण्यात येते. पूर्वी आपण संपन्न व प्रगत असू पण त्या ऐतिहासिक स्मृतीचा आज काही एक उपयोग नाही.

आजच्या यंत्रयुगात आपण व प्रगत देश यांमध्ये पडलेले अंतर भरून काढण्यास व पुढेही आपली संपन्नस्थिती टिकविण्यास आपल्या प्राप्त परिस्थितीतील नवी साधने वापरून मार्ग काढला पाहिजे. त्यासाठी आपणास कष्ट, त्याग व शिस्तीचे वर्तन पत्करून परिस्थितीशी झगडा द्यावा लागेल; आपल्या संकल्पित विकासाच्या मार्गाची ही पहिली पायरी आहे असे मला वाटते. याबाबत कोणाचा मतभेद होईल असे वाटत नाही. हे एकदा लक्षात आल्यावर आता त्या दृष्टीने कशी हालचाल करावयाची हे पाहिले पाहिजे. नवी कला, नवे व्यावसायिक विज्ञान शिकले पाहिजे. ते सोपे नाही हे खरे तरी पण ते कष्टसाध्य आहे व प्रयत्नपूर्वक ते साध्य करून घेतले पाहिजे. कलाकुसर किंवा विज्ञान यांत प्रगती करण्यात भारतीय मागे नाहीत.

उत्पादनक्षमता वाढविण्यास आरोग्य-संरक्षणाचीही अत्यंत जरुरी असते. धडधाकट माणसेच खूप कष्ट करून देशाच्या आर्थिक उत्पादनात परिणामकारक भर घालू शकतात. त्यासाठी बहुसंख्यांकांचे राहणीचे किमान मान सुधारले पाहिजे. पण विज्ञान किंवा आरोग्य यांच्या प्रचारासाठीही खर्च केला पाहिजे, त्याकरिता पैसा हवा. यासाठी धनसंचय हा केंद्रीय विचार ठरतो. हा धनसंचय करण्याकरिता बहुसंख्य लोकांच्या राहणीचे मान कमी करणे कठीण आहे. याबाबत थोडी कूस प्राप्तीची आज विषम वाटणी कमी करून काढता येण्यासारखी आहे. काही थोडे समाज किंवा व्यक्ती इतरांच्या मानाने बरेच श्रीमंत आहेत. त्यांच्या राहणीचे मान थोडे कमी करून बचत करणे शक्य आहे.

## संपन्न देशांतील आर्थिक प्रगती

गेल्या महायुद्धाच्या काळात इंग्लंडने याच मार्गाने बचत करून युद्धसामग्रीसाठी पैसा उभा केला होता आणि आजही काही अंशी इंग्लंडने हा उपाय चालू ठेवला आहे. श्रीमंतांच्या राहणीचे मान कमी करण्याचे दोन मार्ग आहेत :–(१) त्यांच्यावर बरेच कर लादणे व (२) त्यांना उपलब्ध असणाऱ्या उपभोग्य वस्तू कमी अगर मर्यादित प्रमाणात उपलब्ध होऊ देणे. इंग्लंडमध्ये प्रतिवर्षी अनेक नव्या मोटारी तयार होतात. परंतु देशाचे आर्थिक उत्पादन वाढावे म्हणून त्या सर्व परदेशी निर्यात होतात व तेथील श्रीमंत लोकांनाही नवीन मोटारगाडी मिळणे आज कठीण झाले आहे. राष्ट्रीय बचतीचा हा एक परिणामकारक उपाय आज इंग्लंडमध्ये अंमलात आणला जात आहे.

उपभोग्य वस्तूंचे नियंत्रित वाटप करून धनसंचय वाढविता येतो व अशा प्रकारे वाचविलेल्या संपत्तीचा योग्य विनियोग करून एकंदर राष्ट्रीय उत्पादनामध्ये भर घालता येते. हा विचार या एकंदर प्रश्नाचा गाभा आहे व या मार्गाच्या शक्याशक्यतेवरच देशाचे आर्थिक विकसन अवलंबून आहे.

देशाच्या एकंदर आर्थिक प्रगतीकडे सर्वांगीण दृष्टीने पाहिले पाहिजे. प्रत्येक बाबतीत उत्पादन कसे वाढेल याचा विचार झाला पाहिजे. कृषि-उत्पादन वाढण्यासाठी सुधारलेले बी-बियाणे, खते, कालव्यांचे पाणी, सुधारलेल्या अवजारांचा वापर वगैरे गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे उद्योग, वाहतूक, व्यापार याचेही विकास-योजनेत फार मोठे स्थान आहे. औद्योगिक विकासाशिवाय तर भारतासारख्या कृषिप्रधान देशाची धडगत नाही हे स्पष्ट आहे.

देशाचा कृषिव्यवसाय सुधारण्यासाठी व तो अधिक संपन्न करण्यासाठी शेतकऱ्यांची म्हणजे कृषिव्यवसायात राबणाऱ्यांची संख्या कमी केली पाहिजे. प्रत्येक कृषिकाला पुरेसा वाव मिळण्यासाठी

त्यास जास्त जमीन उपलब्ध करून दिली पाहिजे व त्याकरिता प्रथम कृषीतील काही लोकांना नागर-व्यवसायांत गुंतविले पाहिजे. त्यासाठी कारखाने काढले पाहिजेत. निरनिराळ्या उद्योगधंद्यांचा विस्तार झाला पाहिजे. देशाच्या आर्थिक वाढीत नागर व्यवसायांच्या वृद्धीला असे फार महत्त्वाचे स्थान आहे.

साम्यवादी मतप्रणालीचे काही देश सोडले तर बहुतेक देशांत झालेला आजवरचा आर्थिक विकास योजनाबद्ध पद्धतीने झालेला नाही. इंग्लंड-अमेरिकेत बहुतेक विकास अर्थव्यवहार अनिर्बंध असता व सरकारी विशेष संचालन नसता घडून आला. जर्मनी-जपानात नियंत्रण व संचालन जास्त होते. या देशांत शेती-सुधारणा, नागरी उद्योगधंद्यांची वाढ, कृषीतील कामकरी कमी करून ते नागरी उद्योगधंद्यांत गुंतविणे, उत्पादक साधनसंपत्तीची वाढ, हे सर्व क्रमाक्रमाने झाले. परंतु येथेही सर्वांगीण पूर्व योजना नव्हती. तेथील भांडवलवाल्यांनी सरकारी छत्राखाली आपले सामर्थ्य व धंदे वाढविले. त्याचा परिणाम मात्र त्या देशांचे एकंदर उत्पादन व साधनसंपत्ती वाढण्यात झाला.

आताच उल्लेखिलेली ही बहुतेक राष्ट्रे मूलतःच आपल्या राष्ट्रापेक्षा संपन्न होती आणि ज्या काळात त्यांचा आर्थिक विकास झाला त्या कालातील एकंदर जागतिक परिस्थितीही त्यांना अनुकूल अशीच होती. आजच्यापेक्षा त्या वेळेस एकंदर विकासाला अधिक वाव होता. आपण आर्थिक दृष्ट्या गरीब आहोत. शिवाय एकंदर जागतिक परिस्थितीमुळे आज सहज विकासाला थोडा वाव राहिला आहे आणि आजची समाजव्यवस्थाही निराळी आहे. आजच्या परिस्थितीत तशाप्रकारे भांडवलवाल्यांच्या-मार्फत आर्थिक विकास घडवून आणणे इष्ट नाही. कारण असे झाल्यास आजच्यापेक्षाही पैसेवाल्यांची समाजावर हुकमत चालेल. त्यांच्यावर हे काम सोपविणे झाल्यास त्यांचे व्यवहार अनिर्बंध ठेवावे लागतील. धनपतीस अधिक श्रीमंत होण्यास वाव द्यावा लागेल. यामुळे सध्या समाजात असलेली विषमता अधिक वाढेल. एकंदर समाजस्वास्थ्यास व शांततेस बाध येण्याचा संभव अधिक निर्माण होईल. आज एकंदर विश्वसमाजाच्या मनोभूमिकेतच फरक पडला आहे. तेव्हा या परिस्थितीत जपान-जर्मनीच्या औद्योगिक विकासाचा मार्ग आपल्याला चोखाळता येणार नाही.

## गरीब देशातील विकासाचा प्रश्न

गरीब अशा या जुन्या देशाचा विकास आर्थिक समता सांभाळून कसा काय करावयाचा हे एक मोठे कोडे आहे. हे कोडे इष्टपद्धतीने सोडविण्यासाठी आपणांस काय केले पाहिजे हे पाहू गेल्यास सर्वसामान्य शिक्षणप्रसार, यांत्रिक कसब जाणणारे तज्ज्ञ तयार करणे, उद्योगधंद्यांची वाढ, शेतीची सुधारणा, कामगारवर्ग धडधाकट राहील अशी व्यवस्था करणे या सर्व गोष्टी कराव्या लागतील. यासाठी लागणारा पैसा (१) श्रीमंतांवर कर बसवून गोळा करावा लागेल. व (२) उपभोग्य वस्तूंचा वापर कमी करून बचतीचे प्रमाण वाढवावे लागेल. यामुळे होणाऱ्या धनसंचयाचा विनियोग योजनापूर्वक आर्थिक विकासाच्या दृष्टीने नवउत्पादन व उत्पादनवाढ यांकरिता योग्य झाला पाहिजे.

केवळ भांडवलवाल्यांवर उद्योगधंद्यांची वाढ सोपवून भागणार नाही. कारण पैसेवाल्यांची दृष्टी त्यांच्या जवळचा पैसा अधिक वाढविण्याकडे असते. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने त्यांचे सर्वच व्यवहार होतील असे नाही आणि म्हणून कोणता माल निर्माण करावयाचा, कोणता निर्यात करावयाचा, कोणता आयात करावयाचा, हे सर्व राष्ट्रहिताच्या दृष्टीने ठरवून द्यावे लागेल. विचारपूर्वक योजना ठरवून त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली तरच आर्थिक नियोजन सफल होते आणि हे व्हावयाचे तर केंद्रीय संचालन व सार्वत्रिक नियमन ही अत्यावश्यक आहेत.

आपला देश मूलतःच गरीब असल्यामुळे इतकी सर्व पथ्ये पाळूनही धनसंचय एकदम फार मोठा होईल अगर उत्पादनशक्ती त्वरेने वाढेल असे नाही. गरीब व अप्रगत राष्ट्रांच्या विकासाचा विचार

करण्याकरिता राष्ट्रसंघाने नेमलेल्या समितीच्या अहवालातील आकडेमोड यासंबंधी बोधप्रद ठरेल. या अहवालात जगातील सर्व गरीब व अप्रगत राष्ट्रांतील लोकसंख्या सुमारे १५० कोट दाखविली आहे. या सर्व देशांत आपणास हवा असलेला विकास घडवून आणण्यास वार्षिक ९ ते १० हजार कोटींचे भांडवल खर्चावे लागेल असे दाखविले आहे. या देशांतील यापुढे वाढणारी लोकसंख्या कृषि-व्यवसायात न जाता नागर व्यवसायांत गुंतली जाईल व कृषिउत्पादन जास्त वाढेल एवढ्याकरिता ही रक्कम लागणार आहे. या देशांतील सर्व हातांनी व सर्व बाजूंनी होणारी आजची बचत एकत्र केली तर ती अडीच हजार कोटीपेक्षा अधिक होणार नाही असाही समितीने अंदाज केला आहे. गरीब व अप्रगत देशांचा नियोजित विकास साधण्यास सुमारे सात हजार कोटींची तूट पडणार आहे. हे मोठे थोरले खिंडार कसे भरून निघणार ? संपन्न राष्ट्रांकडून मदत घेतल्यास ही तूट सहज भरून येण्यासारखी आहे. अमेरिकेकडून हा पैसा मिळणे शक्य आहे. परंतु असा पैसा अमेरिका किंवा इतर संपन्न राष्ट्रांकडून मिळणे अगर घेणे कितपत व्यवहार्य आहे हे तज्ञांना सांगता येणार नाही असे समितीने म्हटले आहे.

गरीब राष्ट्राचा एकंदर विकास घडवून आणण्यासाठी त्यास स्वतःच्या कष्टावरच अखेरीस भर द्यावा लागेल असे मला वाटते. आर्थिक विकासासाठी कोणत्या पद्धतीने किती श्रम करावे लागतील, त्याकरिता कोणकोणत्या योजना कराव्या लागतील याचा विचार करावयाचा असतो. हा विचार करून त्याकरिता अनुकूल परिस्थिती निर्माण करावी लागते. हे कार्य राष्ट्रांकडील मदतीवर विसंबल्यास फारसे शक्य नसते. कारण दुसऱ्याच्या मदतीने आपणास हवा असलेला विकास हवा त्या पद्धतीनुसार करता येईल असे नाही. गेल्या शंभरदीडशे वर्षांत ब्रिटिशांच्या अंमलाखाली झालेला या देशाचा विकास फार एकांगी झाला हे उघड आहे. अमेरिका आज आपणास सहाय्य करण्यास तयार असली तर ते कोणत्या आर्थिक धोरणानुसार व हे धोरण आपणास कितपत परवडण्यासारखे आहे याचा विचार झाला पाहिजे.

परकीय राष्ट्रांच्या मदतीने आर्थिक विकास घडवून आणणे हा राजकीय दृष्ट्या गौण मार्ग ठरतो. तेव्हा तो पत्करला नाही तर शेवटी आपल्या विकासासाठी आपणांस स्वावलंबनाखेरीज अन्य मार्ग नाही, हीच खूणगाठ मनाशी धरली पाहिजे.

डेकन अॅग्रिकल्चरल असोसिएशन, प्रकाशन, ५ (पुणे, १९५१); १२ सप्टेंबर १९५१ रोजी पुणे येथे दिलेले व्याख्यान.

☆

# ५ . . पंचवार्षिक योजनेचे समीक्षण

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्याविषयीचे विचार या लेखात संक्षेपाने मांडले आहेत. या आराखड्यातील ठळक उणीवा आणि टीका-स्थळे नजरेस आणणे हा प्रस्तुत लेख लिहिण्यातील मुख्य उद्देश आहे. प्रत्येक मुद्द्याचे सविस्तर विवरण करण्याचा प्रयत्न या लेखात केलेला नाही.

पंचवार्षिक योजनेचे समीक्षण करताना, या लेखात मुख्यतः तीन दृष्टिकोनांतून विचार केला आहे. पहिला विचार योजनेतील भांडवली विनियोगाच्या कार्यक्रमाचा व तो कार्यक्रम ठरविण्याच्या पद्धतीचा आहे. नियोजित उत्पादनाची उद्दिष्टे, कार्यक्रम व इष्टांक हे कसे ठरविले आहेत, ते साधण्यासाठी काय उपाययोजना केली आहे व ही उपाययोजना सफळ होण्याचा कितपत संभव आहे, हा दुसरा दृष्टिकोन. तिसरी दृष्टी भारतीय राज्यघटनेतील सामाजिक उद्दिष्टे आणि या आराखड्याचे संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणाम यांविषयीची आहे.

## पाणीपुरवठा योजनांची निवड सदोष

प्रस्तुतच्या आराखड्यातील भांडवली विनियोगाच्या कार्यक्रमात प्रमुख स्थान शेतकीच्या उत्पादनास दिलेले आहे व त्यातही पाणी व वीजपुरवठ्याच्या योजना मुख्य आहेत. आराखड्यातील कालव्यांची व वीजपुरवठ्याच्या योजनांची यादी कशी तयार झाली असावी हे एक गूढ आहे. पाणीपुरवठा सुधारण्यासाठी कोठे खर्च करावा याविषयी दोन सर्वमान्य कसोट्या सहज वापरता आल्या असत्या. पहिली कसोटी अशी की, ज्या प्रदेशांत कमी किंवा अनिश्चित पावसामुळे पिकाची अशाश्वती अधिक तेथे कालव्यांवरील खर्च केंद्रित करावा. दुसरी कसोटी अशी की, पाणीपुरवठ्यात गुंतविलेल्या भांडवला-मुळे ज्या प्रदेशांत उत्पन्नाचा वाढावा जास्त होण्याचा संभव तेथे खर्च केंद्रित करावा. प्रत्यक्ष यादी करताना या दोनही निकषांकडे बघावे लागते.

परंतु या दोनही निकषांकडे पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात दुर्लक्ष झाल्यासारखे वाटते; कारण अखेर त्यात समाविष्ट झालेल्या मुंबई राज्यातील कामांची यादी उदाहरणादाखल तपासली तर शेवटचा निर्णय कोणती कसोटी लावून केला असावा हे सांगणे कठीण जाते. ही गोष्ट खालील कोष्टकावरून कळून येईल –

(१) मुंबई प्रांतातील मध्य-विभागातल्या पाणीपुरवठ्याच्या पुढील सहा योजना युद्धोत्तर पुनर्घटनेच्या १९४४ च्या आराखड्यात त्या वेळच्या ९३ कलमी सरकारने घातलेल्या आढळतात :—

| योजनेचे नाव | भिजणारे क्षेत्र |
|---|---|
| (१) वीर धरण | ३४००० एकर |
| (२) खडकवासला | ४२००० एकर |
| (३) गंगापूर धरण | २५००० एकर |
| (४) गिरणा | ११०००० एकर |
| (५) मुठा | ७६००० एकर |
| (६) तिसंगी तलाव | ७२०० एकर |

इतर सहा लहान तलावांचाही उल्लेख आहे.

(२) १९४७ सालच्या आराखड्यात त्यावेळच्या मुंबई सरकारच्या पंचवार्षिक युद्धोत्तर पुनर्घटनेच्या सुधारलेल्या योजनेत पुढील कार्यक्रम आढळतो :—

| योजनेचे नाव | भिजणारे क्षेत्र |
|---|---|
| (१) वीर धरण | ९०००० एकर |
| (२) खडकवासला | ४२१०० एकर |
| (३) गंगापूर धरण | ६१००० एकर |
| (४) गिरणा | ११०००० एकर |
| (५) मुठा | ११६००० एकर |
| (६) तिसंगी तलाव | ७२०० एकर |

याशिवाय १० लहान योजनांचा व ४ मोठ्या कामांचा उल्लेख असून त्यांची चौकशी पुरी व्हावयाची होती.

(३) नियोजन-मंडळाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत मात्र मुंबई प्रांतातील मध्यविभागात फक्त गंगापूरसाठ्याची योजना (पूर्ण झाल्यानंतर ३८००० एकर अधिक क्षेत्र) तेवढी आढळते !

हिंदुस्थानच्या दक्षिण द्वीपकल्पातील एक विस्तृत दुष्काळी भाग या मध्यविभागात मोडतो हे लक्षात ठेवले पाहिजे. सध्या पाण्याच्या अभावी जमिनीचा पुरेसा उपयोग येथे होत नसल्याने, या प्रदेशात पाणीपुरवठ्यावर खर्च केला तर दुष्काळ-निवारणाबरोबरच दरएकरी उत्पादनाचा वाढावा विशेष नजरेत भरण्याजोगा होईल. हा खास दुहेरी फायदा १९०२ सालच्या इरिगेशन कमिशनपासून सरकारने ओळखलेला असून या विभागातील अनेक योजनांची पुष्कळ पूर्वतयारी बराच काळ होत आहे. १९४४ पासून या प्रदेशातील पाणीपुरवठ्याच्या योजना गळता गळता आता एकच शिल्लक राहावी आणि ती जिच्यावर यापूर्वीच एकतृतीयांश खर्च झालेला आहे अशी–याची कारणे सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे खासच नाहीत !

आराखड्यात प्रत्येक योजनेने किती एकरांना पाणी मिळेल याचे आकडे आहेत व त्यावरूनच कामाची श्रेणी खर्चाचा अंदाज घेऊन ठरली असावी अशी कल्पना होण्याचा संभव आहे; परंतु ती निराधार आहे ! आराखड्यात सापडणाऱ्या अनेक योजनांची तांत्रिक व स्थापत्यदृष्ट्या तपशीलवार तयारीही अद्यापि झालेली नाही हे सर्वश्रुत आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर त्याखालील जमिनीचा कसा उपयोग होईल याविषयी पूर्वकालीही काहीच अंदाज तयार होत नसत; त्यावेळी तर इंजिनियरांचे नकाशे

सावकाश व साक्षेपाने तयार होत असत. तेव्हा जेथे स्थापत्यदृष्ट्याही विचार पूर्ण झाला नाही तेथे एकाही योजनेच्या आर्थिक फायद्यांचा अंदाज केलेला नसावा असे म्हणण्यास हरकत नाही. सारांश, अहवालातील एकरांच्या आकड्यास आर्थिक किंवा शेतीविषयक असा काहीच अर्थ नाही.

प्रादेशिक विकासातली विषमता ही सुद्धा भांडवली विनियोग कोठे करावा यासंबंधी आणखी एक कसोटी मानता येईल. फायदेशीर रीत्या भांडवल गुंतविता येत असेल तर गरीब प्रदेशांना भांडवली खर्चाबाबत अग्रहक्क देणे न्यायाचे ठरेल. या दृष्टीनेही मुंबई राज्यातील भांडवली विनियोगाची वाटणी समर्थनीय ठरत नाही.

शिवाय पाणीपुरवठ्याच्या योजनांसाठी स्थानिक भांडवल उभारण्याचा नवीन बूट निघाला आहे; त्यामुळेही आधीच श्रीमंत किंवा प्रगत असलेल्या प्रदेशांत ही कामे केंद्रित होतील.

मुंबई राज्यातील खर्चाबाबत मुद्दाम लिहिण्याचे कारण असे की, येथील प्रादेशिक परिस्थितीची मला चांगली माहिती आहे. इतर राज्यांतील पाणीपुरवठ्यासाठी भांडवली विनियोगाचा कार्यक्रम आखतानाही कोणत्या निकषांचा विचार केला याचा उल्लेख नसल्यामुळे तेथील योजनांच्या योग्यायोग्यतेबद्दल काही लिहिता येत नाही.

## केवळ वीजनिर्मितीची योजना निरर्थक

कालव्यांविषयी केलेली टीका वीजनिर्मितीवरील खर्चालाही सारखीच लागू पडते. एकवेळ असे म्हणता येईल की, भरपूर व खात्रीलायक पाणीपुरवठ्याने कोणत्याही भागाचा फायदाच होईल. हे विधानसुद्धा त्रिकालाबाधित सत्य नव्हे; परंतु त्यावर विसंबून पाणीपुरवठ्याच्या आर्थिक परिणामांचा तपशीलवार हिशेब दरवेळेस आवश्यक नाही असे म्हणता येईलही! परंतु वीजपुरवठ्याबाबत मात्र खर्चाच्या मानाने त्याच्या योग्य उपयोगाचा संभव किती हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. कोठेही निर्मिलेल्या विद्युच्छक्तीतील बहुतांश वीज आसपासच्या प्रदेशात शेतीच्या किंवा उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी किफायतशीररीत्या वापरली जाणार असेल तरच त्या निर्मितीसाठी केलेला भांडवली खर्च समर्थनीय ठरतो. तसा तिचा वापर झाला नाही तर भांडवलाचा अपव्यय होईल किंवा जवळच्या मागणीच्या अभावी वीज कोठे तरी दूर न्यावी लागल्याने नुकसान होईल.

उद्योगधंद्यांच्या वाढीची योजना, व त्यांची प्रादेशिक व स्थानिक वाटणी ही न आखताच नुसती असंबद्ध वीजनिर्मितीची योजना करणे पूर्णपणे निरर्थक होय. सध्या काही ठिकाणी वीजनिर्मितीचा इंजिनियरांना संभव वाटतो, एवढ्याखातर वीजनिर्मितीच्या योजनांवर खर्च करण्याचे ठरविले एवढाच याचा अर्थ होतो. पाणीपुरवठ्याप्रमाणेच वीजपुरवठ्याबाबतही भांडवली विनियोगाची श्रेणी लावण्याचे निकष निश्चित ठरविले पाहिजेत हे उघड आहे.

ज्या भागांत विजेला मागणी नाही किंवा तिच्या उपयोगाने उद्योगधंदे वाढविण्याची योजना नाही तेथे वीजनिर्मिती केल्यास आधीच ज्या दूरच्या केंद्रांत उद्योगधंदे एकत्र आले आहेत तिकडे वीज द्यावी लागेल. त्यामुळे प्रादेशिक विषमता अधिकच तीव्र होईल; कारण मागासलेल्या भागांची साधनसंपत्ती आधीच पुढारलेल्यांच्या पथ्यावर पडेल. कोयना धरणाच्या योजनेबाबत येथे धोक्याचा इशारा देणे आवश्यक वाटते. कोयना धरणाची योजना मुख्यतः वीजनिर्मितीची आहे. व या विजेचा वापर बहुतांशी आधीच प्रमाणाबाहेर वाढलेल्या मुंबई विभागात करावयाची योजना आहे. या योजनेमुळे महाराष्ट्राचा कोणताही भाग भिजणार नाही; विजेचा उपयोग एकदा मुंबईस होऊ लागला म्हणजे दक्षिण महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाकरिता भविष्यातही वीजपुरवठा मिळविणे दुरापास्त होईल. योजनेवरील सर्व खर्च मात्र महाराष्ट्राकरिता केला असा बहाणा केला जाईल. एवंच महाराष्ट्रास

दुष्काळी ठेवून मराठी मजूर मुंबईस पुरविण्याची हमी ठेवण्याचे आजपर्यंतचे धोरणच यानेही पुढे चालू राहील. तेव्हा कोयना योजनेच्या मृगजळाच्या मागे न लागता १९४४ व १९४७ च्या योजनांतील पाटबंधाऱ्यांची सतत मागणी महाराष्ट्राने करीत राहिले पाहिजे. प्रस्तुत आराखड्यात, इतरत्र आढळते त्याप्रमाणेच विजेबाबतही ज्यांच्याजवळ भरपूर साठा आहे त्यांनाच जास्त देण्याची व्यवस्था दिसते! पाणीपुरवठ्याच्या आणि वीजनिर्मितीच्या योजनांतील आणखी एक आवश्यक भाग म्हणजे दुय्यम पूरक कामे योजनापूर्वक हाती घेऊन पाणी व वीज यांचा योग्य व त्वरित उपयोग केला जाईल अशी योजना करणे. अमेरिकेत व भारतातही असा अनुभव आला आहे की, अशा स्वरूपाची व्यवस्था आगाऊच केली नाही तर वीज व पाणी पुरविल्यानंतर त्यांचा भरपूर उपयोग होऊ लागेपर्यंत व्यर्थ फार काळ जातो. शिवाय उपयोग होऊ लागला तरी तो यदृच्छयाच होत असल्याने इष्ट दिशेनेच होईल असे नसते. पंचवार्षिक आराखड्यात समाविष्ट झालेल्या योजना पाहता या प्रश्नाकडे अजिबात लक्ष दिलेले दिसत नाही!

## औद्योगिक विकासाच्या पायाभरणीकडे दुर्लक्ष

भांडवली विनियोगाचे दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे औद्योगिक होय. औद्योगिक विकासाची योजना अनेक कसोट्या लावून निश्चित करता येते. औद्योगिक विकासाची प्रक्रिया दूरगामी असल्याने पहिल्या पंचवार्षिक योजनेत या निकषांचा स्पष्ट निर्देश व उहापोह असणे योग्य होय. या आराखड्यात मुख्यतः अल्पकालीन दृष्टीने औद्योगिक क्षेत्रातील विकासश्रेणीचा थोडा विचार केलेला आढळतो. या चर्चेवरून असे दिसते की, उत्पादक सामग्रीचा विकास प्रामुख्याने शेती, पाणीपुरवठा व वीज यांच्या योजनेशीच संबद्ध आहे. औद्योगिक विकासाच्या पायाभरणीच्या दृष्टीने वीजनिर्मितीच्या स्थानांचा व वापराचा कोठेही विचार केलेला नाही हे आश्चर्य होय. पोलाद, सिमेंट व खते यांचे धंदे वाढण्यास परिस्थिती अनुकूल आहे हे नियोजकांना मान्य आहे, तरीही या धंद्यांत भांडवल गुंतविण्याची भरघोस तरतूद आराखड्यात आढळत नाही! तसेच उत्पादक सामग्री निर्मिणाऱ्या इतर धंद्यांचा विकास होणे अर्थव्यवस्था समतोल करण्याच्या दृष्टीने जरूर आहे हे सुद्धा नियोजकांना कबूल आहे; परंतु त्यांच्या वाढीची कोणतीच खास व्यवस्था केलेली दिसत नाही. अहवालात लोखंडाचा खास उल्लेख आहे, पण त्याबाबतही अशीच उणीव आढळते. खरी गोष्ट अशी आहे की, प्रस्तुत आराखड्यात केलेली उद्योगधंद्यांत अधिक भांडवल गुंतविण्याची तरतूद अत्यंत मर्यादित असून उपभोग्य वस्तू निर्मिणाऱ्या महत्त्वाच्या धंद्यांतील उत्पादनवाढसुद्धा पुष्कळशी आहे त्या साधनांचा जास्त उपयोग करूनच व्हावयाची आहे.

मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांच्या विस्तृत क्षेत्रात एकूण सुमारे १२५ कोटी रुपये भांडवल गुंतावयाचे आहे. यातच जीर्णोद्धार, नवकार व दुरुस्ती यांबाबत युद्धकाळात तुंबून राहिलेली गरज जमेस धरली तर एकूण भांडवल सुमारे २५० कोटी रुपये लागते. याशिवाय खुद्द सरकारकडून काही सरकारी धंद्यात व काही खाजगी उद्योगात असे ८० कोटी रुपये भांडवल गुंतविण्याची योजना आहे. एकंदर सर्व प्रकारच्या गरजांकरिता मोठ्या उद्योधंद्यात पाच वर्षांत ३००–३५० कोटी रुपयांचा विनियोग व्हावयाचा आहे. या आकड्यांवरून पहिल्या पंचवार्षिक योजनेतील औद्योगिक सामग्री किंवा औद्योगिक वृत्ती यांच्या विकासाचे स्वरूप अत्यंत मर्यादित आहे हे स्पष्ट होते. त्यापुढील काळात औद्योगिक वृत्तीची उत्तरोत्तर वाढच होत जावी व औद्योगिक विकास बहुविध स्वरूपाचा व्हावा अशा दृष्टीने हा विकासक्रम आखलेला नाही हे सुद्धा उघड दिसते.

भारतासारख्या मागासलेल्या देशात तर अर्थव्यवस्था अधिकाधिक बहुविध बनवून शेतीत राबणारी

लोकसंख्या कमी करणे, निदान वाढू न देणे याचे महत्त्व फार आहे. ते ध्यानी घेऊन औद्योगिक विकासाची योजना आखणे जरूर होते; परंतु तशी ती आखलेली नसल्यामुळे तिचा योग्य परामर्श घेणे अवघड आहे. विकासाच्या प्राथमिक अवस्थेत सर्व राष्ट्रे पायाभूत उद्योगांच्या त्वरित उभारणीकडे विशेष लक्ष देतात, कारण त्यांजवरच औद्योगिक विकासाची भावी इमारत उभी राहणार; शिवाय संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या उद्योगधंद्यांमुळे तर पायाभूत उद्योगांचे महत्त्व विशेष ठरते. ज्या देशांत पायाभूत उत्पादक उद्योगांना अनुकूल परिस्थिती नसते तेथे मुद्दाम प्रयत्नपूर्वक त्यांची वाढ करण्यात येते. भारतात तर लोखंड, पोलाद, रसायने यांसारख्या मूलभूत पदार्थांच्या उत्पादनास अनुकूल परिस्थिती आहे. असे असून त्याबाबत कोणतीही मोठी व्यवस्था योजनापूर्वक केलेली नाही याचा विस्मय वाटतो! यामुळे औद्योगिक विकासयोजनेचा तपशील बाजूस ठेविला तरी, शेतीतील आणि उद्योगधंद्यांतील भांडवली विनियोगास दिलेले प्रमाण योग्य मानता येत नाही.

## लघु व घरगुती धंद्यांची समस्या

लहान घरगुती धंद्यांबाबतची व्यवस्था पाहिली म्हणजे तर औद्योगिक वृत्तिविकासाचा आराखडा अत्यंत दुर्बोध आणि गोंधळाचा दिसतो. एकूण पाच वर्षांत या धंद्यांवर सरकार १६ कोटींपेक्षाही कमी खर्च करणार आहे; आणि तेवढ्यानेच यापुढे या धंद्यांत वाढत्या लोकसंख्येस काम मिळेल असा नियोजकांस भरंवसा वाटत आहे! लहान व घरगुती धंद्यांच्या विकासामुळे बरीच वाढती रोजगारी तर मिळणारच आहे पण शिवाय स्थानिक धंदे वाढून घरगुती बाजारपेठही सुधारणार आहे असे आराखड्यात मानलेले आढळते. एवढी मदार ज्या विभागावर ठेवली त्याबद्दलचा विचार व विवेचन मात्र अत्यंत असमाधानकारक केलेले असावे हे दुर्दैव होय. लहान धंद्यांची परिस्थिती व गरजा अजून पूर्णपणे कळून यावयाच्या आहेत असे आराखड्यातील एका शिफारशीवरून वाटते. परदेशी तज्ज्ञांच्या साहाय्याने या धंद्यांची तपशीलवार तपासणी अद्यापि हाती घ्यावी अशी एक सूचना आहे. अशा तपासणीत काहीही नवीन निघो, निदान आजच उघड असलेल्या बाबींकडे योजनेत लक्ष द्यावयास हवे. भारतासारख्या अप्रगत देशातील मूलभूत आर्थिक समस्या अल्पोद्योग व वृत्तिहीनता ही आहे असे म्हटले जाते व शेतीत सतत रोजगार नसतो आणि साधनसामग्री अपुरी असते व यामुळे उत्पादन कमी पडते हे सर्वसामान्य आहे. परंतु लहान व घरगुती धंद्यांचे उत्पादनही तितकेच अपुरे आहे हे विसरता कामा नये. सर्व घरगुती व बहुतेक लहान धंद्यांतील दर कामगारागणिक उत्पादन कमी पडते तेही मुख्यतः अपुऱ्या सामग्रीमुळे व सतत उद्योग नसल्यामुळेच!

यामुळे शेतीप्रमाणेच लहान व घरगुती धंद्यांचा प्रश्नही अल्पोद्योगांचा मानला पाहिजे. एवढेच नव्हे तर काही दृष्ट्या लहान घरगुती धंद्यांच्या विकासाचे कार्य शेतीसुधारणेपेक्षाही अधिक अवघड होऊन बसले आहे; कारण वाढता व निश्चित पाणीपुरवठा झाल्यास उपलब्ध सामग्रीचा अधिक उपयोग करण्याची शक्यता शेतात सहज आहे तशी कोणत्याही प्रकारे लहान धंद्यांत नाही; शिवाय मोठ्या धंद्याच्या चढाओढीमुळे लहान धंद्यांच्या पैदाशीच्या मागणीचे क्षेत्र सारखे खालावत चालले आहे. लहान उद्योधंद्याच्या विकासाचा अवघड प्रश्न सोडविताना निदान खालील तीन महत्त्वाच्या गोष्टी कराव्या लागणार—(१) या धंद्यांची सामाजिक घडी न मोडता त्यांची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी आर्थिक व तांत्रिक पुनर्रचनेचे मार्ग शोधणे, (२) या पुनर्घटनेसाठी तांत्रिक शिक्षण व भांडवली खर्च यांची तरतूद करणे व (३) काही किमान काळपर्यंत ही पुनर्घटना शक्य व स्थिर व्हावी म्हणून त्यांच्या उत्पादनास संरक्षित बाजारपेठ मिळवून देणे. या तीन गोष्टी न करता लहान घरगुती धंद्याचे योग्य पुनःसंघटन करणे अशक्य आहे. एवढे करूनही या धंद्यांतील कामकरी वाढण्याचा संभव

कमी. योग्य उपाययोजना केल्यास या धंद्यांतील कार्यक्षमता व प्राप्ती वाढवून पायरीपायरीने कमी होणाऱ्या कामकऱ्यांच्या संख्येस पूर्णोद्योगाची शाश्वती ठराविक कालापर्यंत देता येईल, एवढेच. नवीन मोठ्या धंद्यांना पूरक अशा दुय्यम लहान धंद्यांच्या उभारणीचा प्रश्न अगदी वेगळा आहे. मोठ्या धंद्यांचा योजनाबद्ध विकास बराच झाल्याखेरीज त्यांची निर्मिती करणे कठीण आहे.

लहान धंद्यांची उत्पादनक्षमता वाढली तरी त्यांतील कामकरी-संख्या वाढण्याचा संभव कमी दिसतोच, पण वर निर्देशिलेल्या तीन दिशांनी उत्पादनक्षमता किंवा प्राप्ती वाढविण्याकरिता काही केले पाहिजे याचीही जाणीव आराखड्यात कोठे आढळून येत नाही. आराखड्यातील उपाय व खर्च पाहिल्यास लहान व घरगुती धंद्यांचे कोणत्याच दृष्टीने विशेष पुढे पाऊल पडण्याचा संभव दिसत नाही.

## बिगरशेतकी व्यवसाय वाढविण्याची निकड

आर्थिक विकासासाठी भांडवली विनियोग किती व कसा केला पाहिजे याबद्दल तात्त्विक अगर आकडेसिद्ध विवेचन पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात कोठेच सापडत नाही. परंतु हा विचार कोणत्याही योजनेत मूलभूत समजला पाहिजे; कारण त्याशिवाय आर्थिक विकासाच्या योजनेची बैठकच बसू शकत नाही. योजनेतील इष्टांक निर्देशिताना एकाच ठिकाणी थोडासा आकडेसिद्ध विचार मांडलेला दिसतो; हा धान्योत्पादनाबद्दल. सुदैवाने अन्न-स्वयंपूर्णता तावडतोब साध्य करण्याचे धोरण या आराखड्यात ग्राह्य धरले नाही. तरी एकंदर या स्वयंपूर्णतेच्या उद्दिष्टाची विशेष पकड अजूनही योजनेवर बरीच आढळून येते व तिजमुळेच कृषिउत्पादनावर विशेष जोर देऊन औद्योगिक वाढीकडे दुर्लक्ष झाले असावे. आर्थिक विकास-योजनेचा पाया याहून जास्त मूलगामी बाबींचा विचार करून रचला पाहिजे. वर दर्शविल्याप्रमाणे आपल्या दारिद्र्याचे मूळ कारण कृषी व ग्रामोद्योगांत आपली बहुसंख्य प्रजा गुंतली असून नैसर्गिक संपत्ती व भांडवली साधने ही दोन्ही या वृत्तीत–व्यवसायांत–कामकरी संख्येच्या मानाने फार अपुरी पडतात हे होय. आपली गरीबी दूर करणे–म्हणजे संपत्ती वाढविणे–असल्यास दर माणशी पडणारे आजचे उत्पादनाचे प्रमाण वाढविले पाहिजे. मोठ्या प्रमाणावरील औद्योगिक अगर यांत्रिक उत्पादन आणि इतर नागर व्यवसायांतील दरडोई उत्पन्न आपल्या देशातही कृषी व ग्रामोद्योग यांपेक्षा पुष्कळ जास्त आहे. गरीबीनिवारणाचा एक उपाय म्हणजे या नागर व्यवसायांतील कामकरी संख्या वाढविणे व दुसरा म्हणजे कृषी व ग्रामोद्योगांतील दरडोई उत्पादन वाढविणे. ग्रामोद्योगविकासाच्या अडचणी वर थोडक्यात दाखविल्या आहेतच. खरा महत्त्वाचा विचार शेती-उत्पादनाचा. यातील दरडोई उत्पादन वाढवावयाचे तर नुसता जादा भांडवलाचा विनियोग करून भागणार नाही; कारण आजची मुख्य अडचण अल्पोद्योगी अवस्था व हिचे निराकरण दर कामकऱ्याच्या वाटणीस येणारे जमिनीचे क्षेत्रफळ वाढविल्याखेरीज होणार नाही. जमिनीचे क्षेत्रफळ एकंदरीने वाढविता येत नाही. पाटबंधाऱ्यांमुळे लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्रांत किंवा जमिनीच्या उत्पादक गुणात फरक झाला तरी तो मर्यादित असतो. उलटपक्षी लोकसंख्येची सारखी वाढ होत असल्यामुळे कृषिवृत्तीय कामकरी-संख्या प्रतिवर्षी वाढत असते आणि परिणामी दर कामकऱ्यागणिक जमिनीचे क्षेत्रफळ कमी होऊन उत्पन्न घटणे व अल्पोद्योग वाढणे हे घडत असते. याकरिता भारतासारख्या गरीब व बहुप्रज देशातील आर्थिक विकासाचे धोरण बिगर-शेतकरी व्यवसाय वाढविण्यावर भर देणारे हवे.

## नियोजनात दीर्घकालीन विचाराचा अभाव

आपला आर्थिक विकासाचा प्रश्न किती बिकट आहे हे थोडीशी आकडेमोड केली असता सहज कळण्यासारखे आहे. भारताची आजची लोकसंख्या ३५ कोटी आहे. यात मागील अनुभवावरून

निदान २० कोटींची वाढ पाच वर्षांत होईल असे मानण्यास हरकत नाही. सरासरीने एकंदर लोकसंख्येपैकी कामकऱ्यांची संख्या ३५ टक्के हे प्रमाण मानल्यास पुढील पाच वर्षांत कामकऱ्यांच्या संख्येत सात कोटींनी वाढ होण्याचा संभव आहे. आजचे शेतीतील दर कामकऱ्यामागील जमिनीचे क्षेत्रफळ निदान तितकेच ठेवावयाचे तर या वाढलेल्या ७ कोटी कामकऱ्यांस बिगरशेतकी व्यवसाय लावले पाहिजेत. बिगरशेतकी व्यवसायात दर उत्पादक कामगारामागे कमीत कमी रु. २००० भांडवल लागते असे म्हटल्यास हे करण्यास १४०० कोटी रुपये लागतील. ही तरतूद पहिल्याच पंचवार्षिक योजनेत करणे अगर एकदम एवढी कामकरी संख्या गुंतविणारे नागर बिगरशेतकी व्यवसाय वाढणे हे अशक्य आहे. पण क्रमाक्रमाने हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न झाल्याशिवाय आर्थिक विकास व्हावयाचा नाही. प्रथम वाढत्या लोकसंख्येतील वाढते प्रमाण, नंतर सर्वत्र वाढती कामकरी-संख्या, बिगरशेतकी व्यवसायांत गुंतेल अशी कार्यक्रमाची मांडणी हवी. या दृष्टीने औद्योगिक वाढ पुढे कशी होणार, तिच्याकरिता पहिल्या अवस्थेत तयारी काय हवी याचा विचार करून शक्य तितका भांडवली विनियोग या दिशेने होणे आवश्यक आहे. हा विचार आराखड्यात दिसत नाही आणि त्यातील एकंदर औद्योगिक विकासाकरिता निर्देशिलेली भांडवली रक्कम व त्याचा क्रम यावरून या योजनेत पुढील आर्थिक विकासाची बीजे रोवण्याची खबरदारीही घेतली नाही असे म्हणावे लागते.

उत्पादनांचे जे इष्टांक गाठण्याचा योजनेत संकल्प आहे ते कोणत्या मार्गाने गाठावयाचे योजनेत ठरविले आहे ते आता पाहू. उत्पादनाच्या इष्टांकासंबंधी बांधलेले अंदाज भांडवली खर्चाचा कार्यक्रम पाहता वस्तुस्थितीस कितपत धरून आहेत याबद्दल येथे चर्चा करण्याचा उद्देश नाही. ते तसे आहेत असे मानून, ज्या मार्गांनी ते गाठता येतील अशी योजनाकारांची अपेक्षा आहे त्यांचाच फक्त येथे विचार करीत आहो.

योजनेत निर्देशिलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी साधनसंपत्तीची योग्य वाटणी होईल अशा रीतीने किमतीबाबतचे धोरण आखणे जरूर आहे व वस्तूंचे भावनियंत्रण हे योजनेचे एक महत्त्वाचे उपांग आहे असे योजनेत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. आजपर्यंतचे सरकारी धोरण पाहता, योजनेच्या आराखड्यातील हे धोरण निश्चितपणे पुढचे पाऊल आहे. परंतु निव्वळ किमतीबाबतच्या धोरणावर अवलंबून कार्यभाग होणार नाही. केवळ भावनियंत्रणावर आधारलेल्या धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना अनेक अडचणी येण्याचा संभव आहे. योजनेत या अडचणींचा पुरेसा विचार केलेला दिसत नाही. काही सार्वत्रिक उद्दिष्टे परिपूर्ण करण्याच्या दृष्टीने आखलेले किमतीबाबतचे धोरण योजनेतील अनेक विशिष्ट उद्दिष्टांची परिपूर्ती करण्यास पुरे पडणार नाही. उदाहरणार्थ, अन्नधान्ये व इतर कच्चा माल यांच्या किंमतीचे विशिष्ट परस्पर-प्रमाण कायम राखून त्याबरोबरच आजच्या एकंदर किमती वाढू न देता त्या हळूहळू उतरविणे या दोन्ही गोष्टी पुष्कळ वेळा परस्परविरोधी ठरण्याचा संभव आहे. अशा परिस्थितीत एकंदर किमतीचे धोरण ठरवून निरनिराळ्या वस्तूंच्या किमतींचा परस्परसंबंध देशातील सर्वसाधारण परिस्थित्यनुरूप निश्चित करणे जरूर असते. परंतु असे केल्यामुळे निरनिराळ्या पिकांच्या किमतींचे परस्परसंबंध प्रत्येक प्रदेशात वाजवी ठरतीलच असे नाही. अन्नधान्याची लागवड वाढून गळिताची कमी होणे अगर गळिताची लागवड वाढून अन्नधान्याची कमी होणे अशासारखे बदल होण्यास आवश्यक असणारे त्या त्या पिकांच्या किमतीतील फरकाचे प्रमाण सर्व प्रदेशांत सारखेच असते असे नाही. जोंधळा, भुईमूग व कापूस यांच्या किमतींचा परस्परसंबंध निकट आहे. हिंदुस्थानच्या अनेक भागांत या किमतींच्या परस्परमानाने लागवडीत चढउतार होत असतो; पण प्रत्येक भागात चढउतार होण्यास लागणारे प्रमाण हे सारखेच नसते. असे असले तरी अखिल हिंदुस्थानच्या दृष्टीने काही सरासरी काढून अगर अंदाज बांधून

या किमतींचे सर्वसामान्य परस्परसंबंध निश्चित करावेच लागतात. म्हणून योजनेत ठरविलेल्या विशिष्ट पिकांच्या उत्पादनाचे इष्टांक गाठावयाचे असल्यास भावनियंत्रण करून शिवाय त्या त्या पिकांच्या उत्पादनाचे प्रादेशिक लागवडीच्या प्रमाणांचे काही नियमन केले तरच ते गाठता येतील आणि यासाठी आणखी काही पूरक अधिकारही सरकारास घ्यावे लागतील.

## ग्राम-उत्पादन-मंडळांना अधिकार कोणते ?

शेती-उत्पादन वाढविण्यासाठी योजनेत ग्राम-उत्पादन-मंडळांची (व्हिलेज प्रॉडक्शन कौन्सिल) व्यवस्था सुचविण्यात आली आहे. परंतु ग्राम-उत्पादन-मंडळ ही संस्था कोणते पीक कोणत्या भागात किती प्रमाणात काढावे यासारखे महत्त्वाचे निर्णय घेण्यास योग्य व समर्थ ठरेल असे वाटत नाही. यासाठी मोठ्या एकजिनसी क्षेत्रावर पिकांच्या योजना आखून त्यांचे प्रमाण निर्देशिणे अवश्य आहे. तसेच शेतीचे मार्गदर्शन करण्यासाठी व विशिष्ट पिकांचे ठरवून दिलेले कमाल व किमान उत्पादन करवून घेण्यासाठी या ग्राम-उत्पादन-मंडळांना कायद्याने काही अधिकार अगर नियंत्रणाची सत्ता मिळणे जरूर आहे. पीक योजनेची तरतूद केली नाही तर योजनेत ठरविलेले उत्पादनाचे इष्टांक गाठण्याची काहीच खात्री नाही. क्षेत्रवार पिकांची प्रादेशिक योजना व तिची अंमलबजावणी करण्यास आवश्यक ते नियंत्रणाचे अधिकार प्रादेशिक व ग्राम-उत्पादन-मंडळे यांस देणे अत्यावश्यक आहे. अशी काही तरतूद न केल्यास ग्राम-उत्पादन-मंडळांचे श्रम विशेष कारणी लागणार नाहीत. तसेच ग्राम-उत्पादन-मंडळांच्या कार्यातही एकसूत्रता राहणार नाही व प्रत्येकाचे कार्य स्थानिक परिस्थितीच्या दडपणाने वेगवेगळ्या प्रकारे चालू राहील.

पिकांच्या उत्पादनाचे इष्टांक गाठण्याचा प्रश्न थोडा बाजूस ठेवून शेतीव्यवसायाची पुनर्घटना करण्याबाबत नियोजन-मंडळाने जे उपाय सुचविले आहेत त्याचा थोडा विचार करू. जमीनदारीचे उच्चाटन व कुळांचे संरक्षण यांसारख्या सुधारणांचा नियोजन-मंडळाने उल्लेख केला आहे; परंतु अनेक वर्षांचे हे जुनेच प्रश्न असून त्याबाबत पूर्वीपेक्षा काही विशेष नवीन सुचविले आहे असे बिलकुल नाही. शेती-उत्पादनाची पुनर्घटना व शेतीउत्पादनाचे घटक-क्षेत्र याबाबत नियोजन-मंडळाने जे विवेचन केले आहे तोच खरा महत्त्वाचा भाग आहे. याबाबत नियोजन-मंडळाने पुढील तीन प्रमुख उपाय सुचविले आहेतः—

(१) ग्राम-उत्पादन-मंडळांची स्थापना.
(२) मोठ्या प्रमाणावरील नोंदलेली शेती (रजिस्टर्ड फार्म्स).
(३) सहकारी शेतीची वाढ.

ग्राम-उत्पादन-मंडळ ही प्रामुख्याने सल्ला देणारी संस्था असून तिच्यावर प्रत्यक्ष उत्पादनाचे काम सोपविलेले नाही. विशिष्ट प्रमाणापेक्षा अधिक जमीन धारण करण्यास प्रतिबंध असू नये अशी जी नियोजकांची विचारसरणी आहे त्यातूनच रजिस्टर्ड फार्म्सची–मोठी नोंदलेली शेती–कल्पना निघालेली आहे. आज अस्तित्वात असलेल्या मोठ्या जमीन-मालकांच्या शेतीची विभागणी करू नये एवढेच नव्हे तर त्यांच्या मालकीचे क्षेत्र आणखी वाढविण्यास त्यांस प्रतिबंध असू नये असे नियोजकांचे म्हणणे दिसते. शेतीतील वाढती भांडवलदारी हळूहळू कमी करण्याऐवजी नियोजन-मंडळाने मोठ्या विस्ताराच्या शेतीचा एक नवा वर्ग निर्माण करून त्यांना विशेष सवलती देण्याचे धोरण आखले आहे. उत्पादन-वाढीच्या दृष्टीने विचार करता या उपक्रमाची गुणवत्ता या नोंदलेल्या शेतीच्या प्रत्यक्ष चालणाऱ्या कामावर व त्यांच्या उत्पादन-योजनांवर सरकारचा ताबा कितपत राहील आणि तो राहिला तरी हे नियंत्रणाचे व संचालकत्वाचे काम सरकारकडून किती कार्यक्षमतेने पार पाडले जाईल, यावर अवलंबून आहे.

## मालविक्री व संस्करण यांजकडे दुर्लक्ष

परंतु अजून काही वर्षे तरी अशा मोठ्या प्रमाणावरील शेतांची (रजिस्टर्ड फार्म्स) संख्या व त्यांच्या ताब्यातील एकंदर शेतजमिनीचे क्षेत्र यांची विशेष वाढ होण्याचे लक्षण दिसत नाही. म्हणून सहकारी शेतीमंडळ्यांची वाढ करणे हाच एक शेतीउत्पादनाची पुनर्घटना करण्याचा प्रमुख उपाय उरतो. आज हिंदुस्थानामध्ये बहुतेक राज्यांतून आढळून येणाऱ्या सहकारी शेतीमंडळ्या केवळ नावाच्याच असून खऱ्या अर्थाने सहकारी शेती करणाऱ्या मंडळ्या जवळजवळ अस्तित्वात नाहीत असे म्हटल्यास बिलकुल अतिशयोक्ती होणार नाही. एवढेच नव्हे तर सहकारी संघटनेच्या कार्यक्षेत्रात सहकारी शेती-मंडळ्या निर्माण करणे हे मोठे अवघड आहे असा अनुभव सर्वत्र आढळून येईल. जमिनीचे लहान लहान तुकडे एकत्र आणून त्यांतून एक सामुदायिक व सहकारी उत्पादन-संघटना निर्माण करणे हे अतिबिकट कार्य असून शेतीव्यवसायाच्या पुनर्घटनेचे अनेक प्राथमिक उपाय योजल्यानंतर शेवटी करावयाचा हा उपक्रम आहे. शेतीउत्पादनाची संपूर्ण सहकारी संघटना निर्माण करण्याच्या आधी शेतकऱ्याचे उत्पन्न वाढेल, त्याची उत्पादनपद्धती सुधारून कार्यक्षमता वाढेल याबाबत अनेक प्राथमिक उपाय योजता येण्यासारखे आहेत. शेतीमालाची विक्री व शेतीउत्पादनाचे संस्करण करून त्याचा तयार माल करण्याच्या (उदा. भात सडणे, हळद चोळणे, सरकी काढणे इत्यादी.) बाबतीत शेतकरी नेहमी दुसऱ्यावर अवलंबून असतो. हे दोन्ही व्यवहार त्याच्या हातात नसल्याने त्याचे नुकसान होऊन त्याच्या उत्पन्नात घट होते. आपल्या कष्टाचे योग्य फल मिळण्यास शेतकऱ्यास ही मोठी अडचण आहे. त्यामुळे शेतीमालास चांगले भाव येऊन बरकतीचा काळ आला तरी त्याचा फायदा शेतकऱ्यास फारसा मिळत नाही. शेतीमालाची विक्री व उत्पादनाचा तयार माल करण्याचे हे मध्यस्थांचे धंदे करणारे व्यापारीच भाववाढीच्या परिस्थितीचा बराचसा फायदा उपटतात. गेल्या दहा वर्षांत असले मध्यस्थाचे धंदे करणाऱ्या लोकांची संपत्ती केवढ्या झपाट्याने वाढली यावरून याची सत्यता अनुभवास येईल. याच मध्यस्थ वर्गाच्या बहुविध हालचाली, ग्रामीण जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सरकारी नियंत्रण व संचलन कठीण करून सोडतात व त्यामुळे सहकारी पद्धतीचीही तेथे वाढ होऊ शकत नाही. म्हणून या योजनेत योजनाकारांनी शेतीव्यवसायात अत्यंत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या शेतीमालविक्री व शेतीउत्पादनाचा तयार माल करण्याच्या धंद्यांबाबत काहीच उल्लेख करू नये हे आश्चर्य आहे. सहकारी पद्धतीने हे धंदे करून अगर त्यांचे राष्ट्रीयीकरण करून या धंद्यांची पुनर्रचना करणे आवश्यक आहे याची जाणीव योजनाकारांस नसावी ही खेदाची गोष्ट आहे.

शेतीमालाची विक्री व शेतीउत्पादनाचा तयार माल करण्याच्या व्यवसायांची पुनर्रचना करण्यावर प्रथम भर देऊन मग शेती-पुनर्घटनेच्या कार्यक्रमास सुरुवात करणे योग्य ठरेल. काही ठराविक मुदतीत शेतीमालाची सर्व विक्री सहकारी संस्थांच्या हातात येणे हे शेती-विकासाचे एक गमक म्हणता येईल. तसेच शेतीउत्पादनाचा तयार माल करण्याच्या धंद्याचेही राष्ट्रीयीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. पुष्कळ ठिकाणी या धंद्यांतून गरजेपेक्षा जास्त भांडवल गुंतविल्याचे दिसून येते. तसेच हा धंदा करणारे कारखानदार पुष्कळ वेळा माल तयार करण्याच्या खर्चाची आकारणी वगैरेबाबत सहविचाराने व एकजुटीने वागत असतात. यामुळे त्यांचे राष्ट्रीयीकरण करणे आवश्यक आहे व सुलभ आहे असे आढळून येईल. तसेच शेतीउत्पादनाच्या विक्रीच्या बाजारपेठांजवळ शेतीउत्पादनावर संस्करण करणाऱ्या धंद्यांची उभारणी होणे अवश्य आहे. शेती-पुनर्रचनेत ही बाब महत्त्वाची आहे. शेतीमालाची संपादणी करून त्याच्या किमती वाढू न देण्याच्या प्रश्नाशीही या धंद्यांचा फार निकटचा संबंध असतो. योजनापूर्वक शेतीचा विकास साधावयाचा असल्यास या धंद्यांचे शक्य तितक्या लवकर राष्ट्रीयीकरण करणे

अवश्य आहे. मोटार-वाहतुकीच्या धंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्यास जी कारणे होती त्यापेक्षा कितीतरी सबळ कारणे या धंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यास आहेत. शेतीउत्पादनाचा तयार माल करण्याच्या धंद्यांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर व शेतीमालविक्रीचा धंदा सहकारी संस्थांच्या हाती आल्यानंतर शेतकऱ्याची वैयक्तिक उत्पादनशक्ती वाढविणे सोपे जाईल व पुढे हळूहळू सहकारी शेतीच्या दिशेने एकेक पाऊल टाकण्यासारखी परिस्थिती निर्माण करता येईल. म्हणून या मध्यंतरीच्या पायऱ्या ओलांडून एकदम सहकारी शेतीची भाषा बोलणे वस्तुस्थितीस धरून आहे असे वाटत नाही.

किफायतशीर शेतीचे किमान क्षेत्र ठरवून व त्याप्रमाणे शेतीचे उत्पादक घटक सुधारून शेती-व्यवसायाची पुनर्रचना करण्याच्या कार्यक्रमास हात घालावयाचा म्हणजे शेतकऱ्यांच्या बेकारीचा प्रश्न लगेच निर्माण होतो. परंतु तो कसा सोडवावयाचा याचा नियोजन-मंडळाने काहीच विचार केलेला नाही. शेतीउत्पादनाचे नवीन सुधारलेले घटक बनविताना शेतीचे असंख्य लहान लहान घटक एकत्र आणावे लागतील. त्यामुळे पूर्वीच्या वैयक्तिक मालकीच्या शेतीवर राबणाऱ्या लोकांपैकी बरेच लोक बेकार होणार ही गोष्ट निश्चित आहे. आज शेतीव्यवसायात गुंतलेल्या या फाजील लोकसंख्येचा प्रश्न हिंदुस्थानच्या कोणत्याही विशिष्ट भागापुरता नसून तो सार्वत्रिक आहे. म्हणून शेतीची पुनर्घटना करताना निर्माण होणाऱ्या या महत्त्वाच्या प्रश्नाचा नियोजन-मंडळाने उल्लेखही करू नये ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय?

## नियोजनाचा अजब नमुना

औद्योगिक अगर यांत्रिक उत्पादनाबाबत नियोजन-मंडळाच्या ज्या योजना आहेत त्या आता पाहू. बहुतेक सर्व मोठे यंत्रोद्योग खाजगी मालकीच्या कक्षेत राहावयाचे आहेत. त्यांच्या विकासाचा जो कार्यक्रम सुचविण्यात आला आहे तो उद्योगपतींशी आधी विचारविनिमय करून ठरविण्यात आला आहे. अर्थात त्यात उद्योगपतींच्या विचारांचे व अपेक्षांचेच प्रतिबिंब उमटलेले आहे. नियोजन-मंडळा-पुढील महत्त्वाच्या उद्दिष्टांच्या अगर विचारसरणीच्या अनुरोधाने काही हा कार्यक्रम ठरविण्यात आला नाही हे स्पष्ट आहे. तेव्हा हा कार्यक्रम म्हणजे मुख्यतः येत्या पाच वर्षांत आपल्या मालकीच्या उद्योगांचे काय व्हावे, त्यांस कोणती स्थिती प्राप्त व्हावी, त्यांची वाढ कशी होऊ शकेल, याबद्दल मालकांनी बांधलेले अंदाज अगर त्यांच्या कल्पना, याचा सारांश होय असे दिसते. असले हे विचित्र नियोजन म्हणजे मिश्र अर्थव्यवस्थेचा एकमेव हिंदी नमुना असेच मानावे लागेल! नियोजनाची ही पद्धती मान्य केली तरी या यंत्रोद्योगांच्या विकासाचा जो कार्यक्रम मांडण्यात आला आहे तो कसा पुरा करावयाचा हा महत्त्वाचा प्रश्न राहतोच.

## महत्त्वाचे अधिकार सरकाराकडे नाहीत

नियोजन-मंडळाच्या औद्योगिक विकास-कार्यक्रमाच्या दोन प्रमुख बाजू आहेत. प्रथम विद्यमान यंत्रोद्योगांच्या शक्तीचा पुरेपूर वापर करून उत्पादनवाढ करावयाची आहे. आजच्या बहुतेक यंत्रोद्योगातील विद्यमान यंत्रसामग्रीचा पुरेपूर वापर करून जेवढी उत्पादनवाढ योजिली आहे तेवढी त्या यंत्रोद्योगात आणखी नव्या यंत्रसामग्रीची नियोजित भर घालून होणार नाही. पण हे प्रत्यक्ष घडून यावयाचे असेल तर सरकारजवळ या यंत्रोद्योगांवर काही नियमनाचे अधिकार हवेत. उत्पादनाचे प्रकार निश्चित करणे व प्रत्येक कारखान्यात ठराविक प्रकारांचेच उत्पादन करणे अशा पद्धतीच्या काही योजना हव्या. परंतु नियोजन-मंडळाने खाजगी यंत्रोद्योगांतील यंत्रशक्तीचा पुरेपूर वापर होण्यासाठी प्रत्यक्ष कोणते उपाय योजणे जरूर आहे याची आपल्या अहवालात विशेष चर्चा केलेली नाही. सरकारला यासंबंधी कोणते

अधिकार राहतील याबाबत फक्त औद्योगिक विकास व नियंत्रण कायद्याचा (इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट व कंट्रोल बिल) उल्लेख केला आहे. संसदेत मंजूर होऊन बाहेर पडलेले या बिलाचे स्वरूप पाहता एखाद्या उत्पादन-योजनेची सक्तीने अंमलबजावणी करण्यास पुरे पडतील एवढे अधिकार त्यात दिलेले नाहीत असे आढळून येईल. नियोजन-मंडळाच्या अहवालात योजनेच्या उद्दिष्टांबाबत पुढील मजकूर आहे : "आज खाजगी उद्योगांची जी रचना आहे त्यापेक्षा अगदी भिन्न अशी त्यांची नवी रचना करावी लागेल. आर्थिक व सामाजिक धोरणांतील उद्दिष्टे त्यांना मान्य करावयास लागतील, एवढेच नव्हे, तर आपले कामगार, उत्पादनाचा उपभोग घेणारी जनता व त्यात भांडवल गुंतविणारे लोक या प्रत्येकाबाबत आपले काही कर्तव्य आहे याची जाणीव त्यांस बाळगावी लागेल. राष्ट्रीय अर्थरचनेच्या इतर अंगांबरोबरच खाजगी उद्योगांचेही धोरण नियोजन—कार्यक्रमात बसेल असेच असले पाहिजे. सामाजिक गरजा पुऱ्या होऊन सर्वसामान्य जनतेचे समाधान होईल व राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय होणार नाही, तसेच कोणाचीही लुबाडणूक होणार नाही व लाचलुचपतीलाही थारा मिळणार नाही अशा रीतीनेच उद्योगपतींनी आपले उद्योग चालविले पाहिजेत." परंतु योजनाकारांचे हे उद्दिष्ट सफल करण्यास खाजगी उद्योगांचे नियंत्रण व मार्गदर्शन करण्याचे महत्त्वाचे अधिकार कोणत्याच कायद्यान्वये सरकारकडे सुपूर्त केलेले दिसत नाहीत. औद्योगिक विकास व नियंत्रण बिलातील सिलेक्ट कमिटीच्या दुरुस्तीप्रमाणे काही विशिष्ट धंद्यातील उत्पादनात घट आल्यास अगर त्याची प्रत बिघडल्यास सरकारला त्याची फक्त चौकशी करता येईल. ही चौकशी एका मध्यवर्ती औद्योगिक मंडळाने (सेंट्रल इंडस्ट्रियल बोर्ड) करावयाची असून त्या मंडळाच्या अहवालानंतर सरकारने त्याबाबत प्रत्यक्ष कोणते उपाय योजावयाचे ते त्या मंडळाच्या शिफारशीनुसार ठरावयाचे आहे. धंद्यात उघड उघड अपप्रकार चालले असतील अगर धंद्याच्या व्यवस्थेत फार गोंधळ माजला असेल अशाच काही प्रसंगी या दीर्घसूत्री उपायांचा उपयोग होणार आहे. एखाद्या सबंध औद्योगिक व्यवसायाची पुनर्रचना करावयाची असल्यास किंवा त्यास जास्त कार्यक्षम करण्यास हे उपाय कुचकामी आहेत. योजनापूर्वक उत्पादन करण्याचा प्रयत्न करण्याचा कापडाच्या धंद्याबाबत युद्धकालीन व युद्धोत्तर भरपूर अनुभव आहे. उत्पादनाचे नियंत्रण तत्त्वतः मान्य करून ते प्रत्यक्षात कापड-कारखानदारांनी पूर्णपणे डावलले. साखरेबाबत साखर-कारखानदारांच्या सहकार्याचा आलेला अनुभव अनेक सरकारी अहवालांत तपशीलवार नमूद आहे. मागे काहीही झाले असले तरी उद्योगपती यापुढे पूर्वीपेक्षा वेगळ्या रीतीने वागून सरकारशी सहकार्य करतील व याकरिता जरूर ती सत्ता अगर अधिकार सरकारला हाती घेण्याची गरज भासणार नाही, असे ज्या नियोजकांस वाटते त्यांना स्वतःच्या योजनांची फारशी कळकळ आहे असे म्हणता येत नाही.

उत्पादन-सामर्थ्याची पूर्ण वाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या महत्त्वाच्या उपायांची उणीव ज्या अहवालात दिसून येत आहे, तेथे इतर बाबींचा विचार करता योजनेची परिपूर्ती होईल अशी खात्री देणे अधिकच कठीण आहे. औद्योगिक विकास व नियंत्रण बिल मंजूर झाले तरीही त्याअन्वये सरकारला मिळणारे अधिकार प्रभावी ठरणार नाहीत. साधन-संपत्तीचा होणारा थोडासा अपव्यय थांबविता येईल अगर अत्यंत गैरव्यवस्था आढळल्यास त्यावर काही उपाय योजिता येतील. परंतु उद्योगधंद्यांची कार्यक्षमता वाढून त्यांतून अधिक उत्पादन होईल अशी कोणतीही तरतूद त्यामध्ये नाही. तसेच उद्योगधंद्यांवरील खाजगी भांडवली खर्चाचा जो तपशीलवार कार्यक्रम योजिला आहे त्याची अंमलबजावणी उद्योगपतींकडून सक्तीने करून घेता येईल अशी कोणतीही तरतूद त्यात नाही. यावरून योजनेतील औद्योगिक विकासाचा कार्यक्रम हा कोणत्याही भरीव पायावर आधारलेला दिसत नाही. उद्योगपतींचा फायदा होण्यासारखी परिस्थिती असेल तेव्हा ही आशा सफळ होण्याचा संभव आणि तशी परिस्थिती नसल्यास ही सर्व योजनाच बारगळण्याचा दाट संभव आहे.

एकंदर उत्पादन–योजनाच वस्तुस्थितीस कशी सोडून आहे हे विशेषतः लहान व घरगुती धंद्यांबाब-तच्या उत्पादन-योजना पाहता स्पष्टपणे नजरेस येण्यासारखे आहे. वर दर्शविल्याप्रमाणे लहान व घरगुती उद्योगांतील उत्पादन-व्यवस्थेचे संचालकत्व व मार्गदर्शन कार्यक्षमतेने करू शकणे एवढ्यावरच या उद्योगांचा विकास अवलंबून नाही, तर त्यासाठी मोठ्या उद्योगधंद्यांचे उत्पादन व लहान आणि घरगुती उद्योगांचे उत्पादन यांच्या स्वतंत्र बाजारपेठा ठरवून देणे अत्यंत जरूरीचे आहे. अशा रीतीने परस्परांच्या स्वतंत्र बाजारपेठा ठरवून द्यावयाच्या म्हणजे लहान व घरगुती धंद्यांतून आणि मोठ्या यंत्रोद्योगांतून कोणत्या जातीचा माल किती प्रमाणात काढावयाचा हेही ठरवून द्यावे लागेल. तसेच परदेशांहूनही कोणत्या मालाची किती आयात करावयाची हेही ठरवून द्यावे लागेल. परंतु हे सर्व करण्यासाठी लागणारे अधिकार केंद्र सरकारला अगर राज्य सरकारांना देण्याबाबत नियोजन–मंडळाच्या अहवालात कसलाही उल्लेख नाही. एवढेच नव्हे तर आपला योजना-कार्यक्रम पार पाडण्यासाठी अशा काही अधिकारांची अगर सत्तेची आवश्यकता आहे याची जाणीवही नियोजन–मंडळास असल्याचे दिसत नाही. इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट व कंट्रोल बिलावरील सिलेक्ट कमिटीच्या अहवालास श्री. विश्वनाथ दास यांनी जी भिन्न मतपत्रिका सादर केली आहे त्यात त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की या बिलाचे सिलेक्ट कमिटीच्या दुरुस्तीनंतरचे स्वरूप पाहता राज्य सरकारांच्या उद्योगधंद्यांबाबत असलेल्या अधिकारांची वाढ करण्याऐवजी त्यांचा संकोचच करण्यात आला आहे.

### किंमतविषयक धोरणाचा प्रश्न

औद्योगिक मालाच्या किमतीबाबत कोणते धोरण राहील याचा विशेष विचार नियोजन-मंडळाने आपल्या अहवालात केलेला नाही. शेती व औद्योगिक उत्पादनाचे परिणामकारक मार्गदर्शन करण्याचे प्रमुख साधन म्हणजे परस्परसंबद्ध असे किमतीचे धोरण होय ही गोष्ट नियोजन–मंडळास मान्य आहे. परंतु औद्योगिक विकासास उपयुक्त असे किमतीचे धोरण ठरविताना निर्माण होणाऱ्या महत्त्वाच्या अडचणींचा समितीने विचार करणे जरूर होते. प्रमुख शेतीमालाच्या किमतींचा परस्परसंबंध निश्चित करताना येणाऱ्या अडचणींचा वर उल्लेख केलाच आहे. औद्योगिक मालाच्या किमतींच्या परस्परसंबंधाचा प्रश्न तर त्याहूनही बिकट आहे. औद्योगिक मालाच्या किमती ठरविण्याच्या प्रश्नाच्या दोन महत्त्वाच्या बाजू आहेत. निरनिराळ्या औद्योगिक मालाच्या किमतींची पातळी काय असावी हे प्रथम ठरविणे जरूर आहे. चलनवाढीस आळा घालावयाचा तर औद्योगिक मालाच्या किमतींची पातळी जेवढी खाली आणता येईल तेवढी आणणे जरूर असते. ती वाढविणे अत्यंत विशेष जरूरीचे ठरल्याखेरीज अन्य ठिकाणी ती कधीही वाढविली जाऊ नये. उत्पादनखर्च वाढला असला तरी शक्य तेवढा तो आजच्या वर्तांळ्यात अगर मुनाफ्यात जिरवून टाकला पाहिजे.

आपले आर्थिक धोरण व्यवस्थित राखणाऱ्या बऱ्याच राष्ट्रांनी युद्धकालात असल्या धोरणाचा अवलंब केला होता आणि आज शस्त्रवाढीच्या कार्यक्रमामुळे निर्माण होणारे चलनवाढीचे संकट टाळण्यासाठीही पुनः याच धोरणाची बहुतेक सर्व राष्ट्रांतून सक्तीने अंमलबजावणी केली जात असल्याचे दिसून येत आहे. परंतु हिंदुस्थान सरकारने मात्र १९४७ सालापासून याच्या अगदी विरुद्ध धोरण जाणूनबुजून स्वीकारले आहे. किमती वाढविण्याची यशस्वी तरफदारी ज्या मालाच्याबाबत केली गेली त्यांच्या किमती वाढवून देण्यात आल्या आहेत. ज्या औद्योगिक मालाच्या किमती नियंत्रित केल्या होत्या त्या उद्योगधंद्यांच्या भागांचे वाढलेले भाव व त्या धंद्यांनी मिळविलेल्या नफ्यांचे प्रमाण लक्षात आणले म्हणजे या विधानाची सत्यता पटेल. औद्योगिक वाढ करण्यास उद्योगपतींना स्फुरण चढावे यासाठी हे धोरण स्वीकारले असे कदाचित सांगण्यात येईल. असे असेल तर सरकारी धोरण परस्परविरोधी नव्हे काय! एकीकडे

उद्योगपतींना उत्तेजन देण्यासाठी किंमतवाढ करावयाची व त्याबरोबरच चलनवाढीस आळा घालण्याचीही भाषा बोलावयाची या गोष्टी विसंगत नव्हेत काय ?

औद्योगिक मालाच्या किमतीचे नियंत्रण करण्याच्या प्रश्नाची दुसरी महत्त्वाची बाजू किंमत-नियंत्रणाशी संबद्ध असे मालाचे ठराविक उत्पादन घडवून आणणे. ज्या वेळी एका विशिष्ट प्रकारच्या उपभोग वस्तूंचे उत्पादन वाढावे अशी नियोजन-मंडळाची अपेक्षा असते त्या वेळी त्या वस्तूंचा अगर मालाचा समाजातील विशिष्ट वर्गामध्ये होणारा खप वाढेल व विशिष्ट वस्तू विशिष्ट किमतीस त्यांना मिळू शकेल असे धरून ते आपली योजना आखते असे मानणे जरूर आहे; परंतु कापडाच्या किंमत-नियंत्रणाचा युद्धकाली आलेला अनुभव लक्षात घेता अशी काही योजना कार्यक्षम व यशस्वी होऊ शकेल असे दिसत नाही. कापडाच्या उत्पादनाचे प्रकार शेकड्यांनी आहेत; या सर्वांच्या उत्पादनाचे प्रमाण केवळ भाव-नियंत्रणाने साधणे दुरापास्त आहे. कापसाच्या भावाची चढउतार, निरनिराळ्या उत्पादकांची निरनिराळ्या प्रकारातील कार्यक्षमता अशा अनेक गोष्टींवर निरनिराळ्या प्रकारांच्या उत्पादनात सारखे फरक पडणार. केवळ किमतींच्या फरकावर विसंबले असता ज्यास गिऱ्हाइकी नाही अशा मालाचे उत्पादन कसे फाजिल वाढू शकते याबाबत कापडबाजारातील अनुभव सर्वांच्याच पाहण्यातले आहेत. एवंच निव्वळ किमतींचे नियंत्रण करून उत्पादनाचा इष्टांक गाठण्याची खात्री शेतीउत्पादनाच्या बाबतीतही फारच थोडी आहे. पण तेवढीही खात्री औद्योगिक उत्पादनाचे इष्टांक गाठण्याच्या बाबतीत नाही !

## नियोजनाचे सामाजिक परिणाम

योजनेचे समीक्षण करण्याचा तिसरा महत्त्वाचा दृष्टिकोन म्हणजे या योजनेमुळे घडून येणाऱ्या सामाजिक परिणामांचा विचार करणे. प्रजासत्ताक भारताच्या राज्यघटनेत दिलेले आदेश परिपूर्ण करावेत, या हेतूने हा योजनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे असा नियोजन-मंडळाचा दावा आहे. हे त्यांचे म्हणणे कितपत यथार्थ आहे ते आपण पाहू. नियोजकांकडून याबाबत एक बचावाचा मुद्दा पुढे आणला जाण्याचा संभव आहे. तो असा की, ही पहिली पंचवार्षिक योजना प्रामुख्याने उत्पादन-योजना असून या योजनेप्रमाणे उत्पादनाची बरीचशी वाढ झाल्यानंतरच मग विशिष्ट सामाजिक उद्दिष्टांची कशी परिपूर्ती करावयाची याची आखणी पुढच्या योजनेत करता येईल. परंतु उत्पादन-योजना व विभाजन-योजना यांत असा भेदाभेद मुळात करताच येत नाही. कोणतीही उत्पादन-विकास-योजना समाजाच्या विशिष्ट उत्पादक-रचनेवर आधारलेली असते. विकास-योजनेप्रमाणे जसजशी उत्पादनाची व उत्पादन-शक्तीची वाढ होत जाते तसतसे विद्यमान रचनेतील महत्त्वाच्या आर्थिक व सामाजिक घटकांचे सामर्थ्यही वाढत असते. ज्या उत्पादन-व्यवस्थेत विशिष्ट हितसंबंधी अगर सत्ताधारी गटांचे प्राबल्य आहे तेथे उत्पन्नाच्या वाटणीचा अगर सामाजिक परिमाणांचा विचार न करता उत्पादन-योजना आखली गेल्यास विद्यमान सत्ताधाऱ्यांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय सामर्थ्य वाढत जाऊन वाढत्या उत्पादनाचा वाढता वाटा त्यांजकडे जातो ही गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे. म्हणून विभाजन-व्यवस्थेचा योग्य विचार न करणारी उत्पादन-योजना अमलात आल्यास कालांतराने सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी दुसऱ्या योजनेची आखणी करणे व तिची अंमलबजावणी करणे हे सोपे न होता उलट अधिकाधिक बिकटच होणार आहे. याकरिता त्या उत्पादन-योजनेच्या कालमर्यादेतच घटनेतील सामाजिक उद्दिष्टांची परिपूर्ती कशी होईल इकडे लक्ष देणे अवश्य आहे. शिवाय योजनाकारांच्या आशा–अपेक्षेप्रमाणे बहुसंख्य जनतेचा योजनेविषयी उत्साह वाढून ती यशस्वी करण्यास तिचे सहकार्य मिळवावयाचे असल्यास योजनेमुळे समाजातील आर्थिक विषमता कमी होऊन अधिक न्याय्य व समान अशी समाजरचना निर्माण होईल याची खात्री तिला पटणे जरूर आहे.

विकास-योजनेमुळे वाढणाऱ्या संपत्तीची व उत्पन्नाची वाटणी समाजाच्या निरनिराळ्या वर्गांत कशी होण्याचा संभव आहे याचा विचार केल्यास सामाजिक परिणाम काय होतात हे कळण्यासारखे आहे. शेतीमालाच्या अलीकडे वाढलेल्या किमतींमुळे समाजाच्या विस्तृत क्षेत्रात संपत्ती विखुरली असे विधान नियोजन-मंडळाने आपल्या अहवालात अनेक ठिकाणी केले आहे. त्यांचे हे विधान प्रत्यक्ष कोणत्या माहितीवर आधारले आहे अगर या त्यांच्या म्हणण्याचा नक्की अर्थ काय हे कळण्यास साधन नाही. शेतीमालाच्या किमती व औद्योगिक मालाच्या किमती यांचा गेल्या दहा वर्षांतील परस्परसंबंध १९३० सालानंतरच्या जागतिक मंदीच्या काळात आढळून येणाऱ्या त्यांच्या परस्परसंबंधापेक्षा निराळा आहे एवढाच ह्या विधानाचा आशय असेल तर काही हरकत नाही. पण दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळात समाजामध्ये उत्पन्नाची वाटणी होत होती त्यापेक्षा अधिक समानतेच्या दिशेने ती आता होत आहे असा जर त्याचा अर्थ असेल तर मात्र हे विधान संदिग्ध आहे. उपलब्ध असलेल्या माहिती-वरून अशा अर्थाचे विधान करण्यास कोणताच आधार असल्याचे दिसून येत नाही. तसेच समाजाच्या विस्तृत क्षेत्रात उत्पन्न अगर संपत्ती विखुरली गेली या परिभाषेमुळे काही गैरसमज अगर दिशाभूल होण्याचाही संभव आहे. मंदीच्या काळात शेतकरीवर्गाची जी अत्यंत हलाखीची परिस्थिती झाली होती ती थोडी आता सुधारली आहे हे खरे. परंतु समाजाच्या दोन अंगांपैकी अगर विभागांपैकी (शेती विभाग व औद्योगिक विभाग अगर नागर व ग्रामीण विभाग) एका विभागाची परिस्थिती थोडी सुधारली तरी त्यामुळे एकंदर समाजाच्या विस्तृत क्षेत्रात उत्पन्नाची अगर संपत्तीची पसरण झाली असे म्हणता येत नाही. तसेच मंदीच्या काळापेक्षा शेतकरीवर्गाची परिस्थिती सुधारली याचा अर्थ या सुधारणेचे परिणाम सर्व प्रदेशांतील शेतीवर सारखे विखुरले अगर दर प्रदेशातील शेतकरी-वर्गाच्या सर्व थरांत ते सारखे दिसून आले असा करता येत नाही. समाजाच्या औद्योगिक अगर नागर विभागातील संपत्तीच्या वाटणीची विद्यमान धाटणी कशी आहे याबद्दल नियोजन-मंडळाने काहीच विवेचन केले नाही आणि शेती अगर ग्रामीण विभागातील संपत्तीच्या वाटणीबाबत जी चर्चा केली, ती वरील प्रकारची आहे!

## लहान प्रमाणावरील शेतीचे प्रश्न

शेतीमालाच्या किमती वाढल्याने शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणावर काय परिणाम घडून आला याबद्दल अलीकडे काही विभागांची चौकशी करण्यात आली आहे. त्यावरून सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, ज्या शेतकऱ्याजवळ स्वतःची गरज भागवून विकण्यास बराच माल उरत असे व जो महत्त्वाची व्यापारी पिके काढीत असे त्यालाच या भाववाढीचा विशेष फायदा झाला आहे. यामुळे विशिष्ट प्रदेशांतील शेतकऱ्यांचेच उत्पन्न बरेच वाढल्याचे दिसून येते; आणि ज्या प्रदेशांत ते वाढले तेथेही मोठ्या शेतकऱ्यांचेच वाढले असून बहुसंख्य शेतकऱ्यांचा विशेष फायदा झाला असे आढळून येत नाही. वाढलेल्या किमतींचा अगर किमतींच्या परस्परसंबंधांतील बदलाचा फायदा घ्यावयाचा झाल्यास शेतीउत्पादन विशिष्ट प्रकारचे व कार्यक्षेत्र मोठे असावे लागते. शिवाय किंमत-वाढीमुळे मिळालेल्या संधीचा फायदा घेण्यास शेतकऱ्यास खेळत्या भांडवलाचा भरपूर पुरवठा उपलब्ध व्हावा लागतो.

बिनकिफायतीची लहान प्रमाणावरील बहुसंख्यांची शेती हा आजच्या भारतीय आर्थिक जीवनाचा गाभा आहे. बाहेरून काही मदत झाल्याखेरीज किंमतवाढीसारख्या घटनांचाही हे बहुसंख्य सहसा फायदा घेऊ शकत नाहीत. तेव्हा ज्यायोगे त्यांच्यापर्यंत परिणाम निश्चित पोचतील असे विशेष प्रयत्न केल्याखेरीज कोणत्याही भांडवली खर्चाच्या कार्यक्रमाचा अगर विकास-योजनेचा असंख्य गरीब शेत-कऱ्यांना काहीच उपयोग होणार नाही.

बिनकिफायतीच्या लहान प्रमाणातील शेतीच्या मुलभूत प्रश्नाकडे नियोजन-मंडळाने दुर्लक्ष केले आहे याचा उल्लेख वर केलाच आहे. शेतीस भांडवलाचा पुरवठा करण्याचा प्रश्नही उत्पादनश्रेणीसारखा महत्त्वाचा आहे. नियोजन-मंडळाने या प्रश्नाची चर्चा केली आहे, परंतु त्याबाबतच्या त्यांच्या शिफारशी अत्यंत अस्पष्ट व ढोबळ आहेत. मागासलेल्या शेतीच्या प्रदेशांना व दरिद्री शेतकरीवर्गाला भांडवलाचा पुरवठा करून त्यांची स्थिती सुधारण्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलेले आहे; एवढेच नव्हे तर जो थोडा पतदार शेतकरीवर्ग त्यालाही भांडवलाचा पुरवठा निश्चित होऊ शकेल अशी कोणतीही स्पष्ट योजना सुचविलेली नाही. ग्रामीण भागात भांडवलाचा पुरवठा करण्यास उपयुक्त अशी संघटना अगर व्यवस्था कशी निर्माण करता येईल एवढीच या प्रश्नाची व्याप्ती नाही. काही राज्यातून अशी संघटना निर्माण करण्याचे प्रयत्न चालूच आहेत, परंतु ते यशस्वी झाल्यास हलक्या व्याजाच्या दराने भरपूर पैशाचा पुरवठा सर्व शेतकऱ्यांस कसा करावयाचा हा प्रश्न लगेच उभा राहणार आहे. सहकारी बँकांना एवढ्या मोठ्या भांडवलाचा पुरवठा तात्बडतोब करणे शक्य नाही आणि रिझर्व्ह बँकेकडून जी मदत होणार ती फक्त पीक-कर्जापुरतीच आहे. म्हणून भांडवलाचा साठा करणाऱ्या देशातील इतर संस्थांच्या व व्यक्तींच्या हातांतील पैशाचा उपयोग करून शेतकऱ्यास सहकारी संस्थांमार्फत भांडवल पुरविण्याची योजना आखली पाहिजे. याच्या उलट खाजगी व्यापारी बँकांना व इंपीरियल बँकेला त्यांचे ग्रामीण भागातील व्यवहार वाढविण्याकरिता सरकार आज पैशाची मदत देण्याचा विचार करीत आहे. यावरून सरकारच्या आर्थिक धोरणाचा कल कळून येत आहे. इंपिरियल बँकेचा व्यवहार वाढविण्यास सरकार अनेक वर्षे मदत करीत आले आहे. आजही त्या बँकेत सरकारची बरीच शिल्लक ठेवली जाते. या सर्वांचा फायदा त्या बँकेच्या खाजगी भागीदारांसच झाला व होत राहणार.

या बँकेचे राष्ट्रीयीकरण करून शेतीउत्पादनास व शेतीमालाच्या व्यापारास आवश्यक ते भांडवल पुरविण्याची रिझर्व्ह बँक व इंपीरियल बँक यांची एक सार्वदेशिक जोड योजना आखणे जरूर आहे.

## ग्रामीण विभागातील केंद्रीकरणाची अपप्रवृत्ती

पाटबंधाऱ्यांच्या प्रमुख योजनांचा ज्या प्रदेशांना फायदा मिळणार आहे तेथील अर्थव्यवस्था अगर समाजरचना पुढे कशी होईल, याबाबत नियोजन-मंडळाने विशेष विचार केलेला दिसत नाही. वर केलेल्या विवेचनावरून कालव्यांचा फायदा साहजिकपणे प्रथम तरी थोडे मोठे शेतकरीच घेतील हे उघड आहे. पुढे ही एकंदर प्रवृत्ती केंद्रीकरणाची राहणार व तीस प्रतिबंध करण्याचे विशेष प्रयत्न केले नाहीत तर तीस आळा बसण्याचाही संभव नाही. यासंबंधात योजनेमध्ये मुंबई राज्यातील पाणी पट्टीचा (इरिगेशन सेस) उल्लेख करण्यात आला आहे. मुंबई राज्यातील या पट्टीचे स्वरूप केवळ एक जादा कर एवढेच आहे. पाणीपुरवठ्यामुळे होणाऱ्या विशिष्ट घटनांचा विचार करून पट्टीची योजना झालेली नाही. शहरविकास योजनेपोटी जशी सुधारणा-पट्टी आकारली जाते तसेच या कराचे स्वरूप आहे. पाटबंधाऱ्यांचा कोणत्याही नव्या योजनेमुळे निर्माण होणारा पहिला प्रश्न म्हणजे कालव्याखाली भिजणाऱ्या जमिनींची स्थानिक श्रीमंत शेतकऱ्याकडून अगर परस्थ भांडवलदारांकडून भरमसाठ किंमतीस मागणी व त्यामुळे एकंदर जमिनींची किंमतवाढ. असल्या व्यवहारांचा परिणाम बहुतेक अखेरीस जमिनीच्या केंद्रीकरणात होतो. या प्रवृत्तीवर पाणीपट्टी आकारण्याचा काहीच परिणाम होऊ शकत नाही. उलट या कराच्या बोजामुळे जमिनीस चांगली मागणी आल्यास लहान जमीनमालक ती विकण्यासच प्रवृत्त होण्याचा संभव असतो. पाटबंधाऱ्यांच्या मुख्य योजनेबरोबरच त्यास पूरक अशा दुसऱ्या योजना हाती घेतलेल्या नसल्यामुळे दुसरा प्रश्न निर्माण होतो तो गरीब व अननुभवी शेतकऱ्यांच्या नवीन पाण्याचा उपयोग करण्याच्या असमर्थतेचा. सध्याच्या लहान शेतकऱ्यांना बागायती शेतीचे शिक्षण देणे व त्याबरोबरच या शेतीच्या

वाढत्या खर्चास भांडवलाचा पुरवठा करणे अशा स्वरूपाच्या पूरक योजनांची मुख्य योजनेबरोबर आखणी होणे जरूर आहे. ही व्यवस्था न झाल्यास मोठया शेतकऱ्याचे अगर बाहेरच्या भांडवलदारांचे आक्रमण होऊन लहान शेतकरी आपल्या शेतीवरून काढले जाण्याचा दाट संभव आहे. याने संपत्तीचे केंद्रीकरण होते व कालव्याच्या प्रदेशात विशिष्ट तऱ्हेचे सामाजिक झगडे सुरू होतात. सामाजिक व अर्थव्यवस्थेवरील परिणामांचा विचार न करता आर्थिक विकासाची योजना आखल्यास संपत्तीचे केंद्रीकरण होऊन सामाजिक झगडे कसे निर्माण होतात याची कल्पना महाराष्ट्रातील प्रमुख पाटबंधाऱ्या-खालच्या प्रदेशांतील अनुभवावरून येण्यासारखी आहे.

ब्रिटिश राज्यकर्त्यांनाही या प्रवृत्तीची अंधुक कल्पना होती. म्हणून त्यांनी कालव्यांच्या प्रदेशांत पाणीवाटप करण्याच्या पद्धतीत पाणी मिळण्याच्या हक्काची ठराविक काळाने फेरतपासणी करण्याची व्यवस्था केली होती. पाणी मिळण्याच्या हक्काचे फाजील केंद्रीकरण होऊ नये असा यात उद्देश होता. अज्ञानामुळे अगर भांडवली खर्चाचे सामर्थ्य नसल्यामुळे कालव्यांच्या सुरुवातीच्या काळात ज्या लहान शेतकऱ्यांना पाण्याचा फायदा घेता आला नाही किंवा पुढे मंदीमुळे ज्यांना पाणी सोडावे लागले त्यांना स्थिती सुधारल्यास थोडे पाणी पुन्हा घेता यावे या उद्देशाने ही तरतूद केली होती. परंतु प्रस्तुतच्या मुंबई सरकारच्या पाटबंधाराखात्याचे अलीकडील धोरण ब्रिटिश सरकारपेक्षाही प्रतिगामी बनल्याचे दिसून येत आहे! १९५२ साली पूर्वी ठरल्याप्रमाणे महाराष्ट्रातील काही प्रमुख कालव्यांचे पाणी मिळण्याच्या हक्काबाबत फेरवाटणी व्हावयाची आहे. पण हे फेरवाटप करताना सध्याच्या सरकारने असे धोरण जाहीर केले आहे की गेल्या सहा वर्षांत ज्यांना पाणी मिळत होते तेवढ्यातच पाणी पुन्हा वाटले जाणार. ज्यांना पाणी मिळण्याचे हक्क आज नाहीत म्हणजे ज्यांनी पाणी गेल्या सहा वर्षांत घेतले नाही अशा लहान शेतकऱ्यांनी पाणी मिळण्यासाठी केलेले अर्ज या धोरणानुसार स्वीकारण्यातच आले नाहीत! मोठ्या शेतकऱ्यांचे उत्पादन जास्त होते म्हणून त्यांनाच पाणी देणे जरूर आहे असे या धोरणाचे कदाचित समर्थन केले जाईल. अर्थात असे समर्थन करण्यास सबळ असा प्रत्यक्ष कोणताच पुरावा नाही; कारण दोन एकरांच्या क्षेत्रात उसाचे जे दर एकरी सरासरी उत्पादन होते त्यापेक्षा चाळीस एकरांतील उत्पादन नेहमीच जास्त असते असे दिसून येत नाही. परंतु ते जास्त असते असे एक वेळ जरी मानले तरी या धोरणाचा खरा अर्थ लहान शेतकऱ्यांचे उच्चाटन करून फक्त मोठ्या शेतकऱ्यांना जगू द्यावयाचे असा स्पष्ट होतो हे लक्षात घेतले पाहिजे. मग ज्याअर्थी मोठ्या शेतकऱ्यांकडूनच अधिक उत्पादन होणार त्याअर्थी विकास-योजनेवरील सर्व खर्च मोठ्या शेतकऱ्यांचीच संपत्ती, सामर्थ्य व कार्यक्षेत्र वाढविण्यास कारणीभूत होणार हे उघड झाले.

मुंबई सरकारच्या पाटबंधारा मंत्र्यांनी उघड दर्शविण्याइतका श्रीमंतांचा पक्षपात जरी सर्व सरकारी धोरणात झाला नाही तरीही जेथे बहुसंख्य शेतकरीवर्गात दारिद्र्य व अज्ञान सर्वत्र पसरले आहे अशा हिंदुस्थानसारख्या आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशात कोणत्याही विकास-योजनेची स्वाभाविक परिणती समाजातील संपत्तीची व प्राप्तीची विषमता वाढविण्यात होणार हे गृहीत धरून चालले पाहिजे. ब्रिटिश राजवटीतील अनिर्बंध अर्थव्यवहाराच्या अनुभवावरून हे अनुमान स्पष्ट निघते. या जोरदार स्वाभाविक प्रवृत्तीचा प्रतिरोध करण्याचा कोणताही उपाय नियोजन-मंडळाने आपल्या शेतीविषयक नियोजनात सुचविलेला नाही; किंबहुना ही प्रवृत्ती नित्य आहे हे नियोजन-मंडळाच्या लक्षातच आलेले दिसत नाही. नियोजन-मंडळाच्या रजिस्टर्ड फार्म्स (नोंदलेल्या शेती)च्या योजनेत मोठे भांडवलदार शेतकरीच समाविष्ट होणार ही गोष्ट उघड आहे. सरकारकडून सर्व तांत्रिक मदतीचा व साधनांचा पुरवठा त्यांना होणार. या सरकारी धोरणामुळे व सरकारी पैशाच्या व्ययामुळे त्यांचे उत्पादनसामर्थ्यही वाढणार, पण या वाढलेल्या उत्पादनसामर्थ्यामुळे त्यांची जी प्राप्ती वाढणार तिची वाटणी कशी होणार याचा

विशेष खुलासा योजनेत आढळत नाही. आपल्या शेतीउत्पादनाचा बराच भाग त्यांना सरकारला योग्य किंमतीस विकावा लागेल एवढाच उल्लेख योजनेत आढळतो. पंचवार्षिक योजनेतील बराचसा सरकारी खर्च पाटबंधाऱ्यांवर होणार असून या खर्चाचे फायदे साहजिकच काही थोड्या प्रदेशांस मिळणार आहेत आणि त्या प्रदेशांतील या योजनांचा विशेष फायदाही काही थोडे संपन्न लोकच घेऊ शकणार. वर सांगितलेच आहे की, शेतीमालाची विक्री व शेतीउत्पादनाच्या मालाचे रूपांतर करण्याच्या धंद्यांविषयी नियोजन-मंडळाने विचार केलेला नाही. ग्रामीण विभागांत हे धंदे करणारे लोक शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करीत असतात; यामुळे त्यांचे नियमन करणे हा कृषिविकास-योजनेचा महत्त्वाचा भाग समजला पाहिजे. एवंच समाजाच्या कृषिविषयक अंगाच्या बाबतीत घटनेत उद्घोषिलेल्या सामाजिक उद्दिष्टांचा प्रश्न नियोजकांनी पूर्णपणे उपेक्षिला आहे.

## वीज-वापराच्या योजनेचा अभाव

बहुतेक पाटबंधाऱ्यांच्या योजनांत विद्युच्छक्ती निर्माण करण्याची तरतूद आहे. या व अन्य प्रकारे निर्माण होणाऱ्या विद्युच्छक्तीचा वापर कोठे व कसा करावयाचा याची आखणी योजनेत केलेली नाही हे मागे सांगितलेच आहे. पाणीपुरवठ्याच्या व इतर शेतीच्या कामासाठी फक्त मोठे शेतकरीच विजेचा खाजगी वापर करू शकतील. वीज विकत घेण्याइतके ज्यांचे आर्थिक सामर्थ्य असेल त्या शेतकऱ्यांमध्येच विजेचा खाजगी खप होणार. विजेच्या उत्पादनामुळे औद्योगिक क्षेत्रात केंद्रीकरण होण्याचा संभव कसा आहे हे मागे निवेदिले आहे. घटनेतील सामाजिक उद्दिष्टांची परिपूर्ती करावयाची असेल तर यंत्रोद्योगांचे केंद्रीकरण होऊ न देता मोठ्या क्षेत्रावर विजेच्या वापराची पसरण होईल अशा रीतीने हेतुपुरःसर पूर्वयोजना आखणे अवश्य आहे. याचा अर्थ लहान लहान उद्योगधंद्यांना उत्तेजन ज्यायोगे मिळेल असेच विजेच्या वापराबाबत धोरण ठरवावे लागेल. यासाठी वीजनिर्मितीच्या योजना व त्या अनुरोधाने उभारावयाचे यंत्रोद्योग, त्यांचे परिमाण, व त्यांची स्थाने यांची तपशीलवार आखणी आधी केली जाणे अवश्य आहे आणि हे करावयाचे तर मागे सांगितल्याप्रमाणे लहान यंत्रोद्योग व मोठे यंत्रोद्योग यांच्या क्षेत्रमर्यादाही आधी ठरविल्या पाहिजेत. अर्थात यांतील कशाचाच नियोजन-मंडळाने विचार केलेला नाही.

## उद्योगांचे व लोकवस्तीचे वाढते केंद्रीकरण

यंत्रोद्योगांच्या प्रदेश व स्थळ-विभागणीबाबत योजनेत कोठेही उल्लेख आढळत नाही. महायुद्धोत्तर नेमलेल्या विशिष्ट उद्योगमंडळांनी (इंडस्ट्रियल पॅनेल) ज्या योजना आखल्या आहेत त्या अनुरोधाने त्यांची उभारणी व्हावयाची असली तरी तेवढ्याने भागणार नाही; कारण या मंडळांनी केवळ एकेकट्या उद्योगाबाबत विचार केला होता. एकंदर व्यावसायिक लोकसंख्येच्या राष्ट्रीय वाटणीच्या दृष्टीने त्यांच्या शिफारशी झालेल्या नाहीत. मुंबई व कलकत्त्यासारख्या शहरांतून उद्योगधंद्यांचे फाजील केंद्रीकरण झाल्यामुळे जे गंभीर स्वरूपाचे सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांकडे तरी विशेषतः नियोजन-मंडळाने लक्ष पुरवावयास हवे होते. विशिष्ट राज्यसरकारांनीही या शहरांमध्ये होणारे उद्योगधंद्यांचे वाढते केंद्रीकरण थांबविण्यासाठी काही केले नाही. उलट मुंबई सरकारने मुंबई शहराच्या परिसरातच महायुद्धोत्तर आणखी यंत्रोद्योगांची वाढ होण्यास उत्तेजन दिले असून उल्हास खोऱ्यातील ज्या पाण्याचा उपयोग शहराभोवती अत्यावश्यक बागायती पिकांचा पट्टा निर्माण करण्याकडे करावयाचा ते कृत्रिम रेशमासारख्या कारखान्यांस वाटून सर्व दृष्टींनी आधीच बिकट झालेल्या परिस्थितीत अधिक भर घातली आहे. हे धोरण समाजदृष्ट्या किती महागाचे आहे याची कल्पना या

दाट वस्तीच्या शहरांतून राहत्या घरांच्या किंबहुना साध्या मनुष्यनिवाऱ्याच्या प्रश्नाचे सद्यःस्वरूप काय आहे यावरून येईल. विकास-योजनेतील सामाजिक क्षेत्रात होणारा सर्व मोठा खर्च या मोठ्या औद्योगिक शहरांतील घर-बांधणीवर होणार आहे! या शहरांतील कामगारवस्तीस घरे पुरविण्याचा प्रश्न एवढा अफाट आहे की, कितीही मोठ्या रकमा खर्च केल्या तरी तो सुटणे शक्य नाही. सद्यःस्थितीतून खरा, खात्रीचा व मूलगामी असा एकच उपाय आहे; तो म्हणजे या मोठ्या शहरांची आणखी वाढ तावडतोब थांबवून तेथे केंद्रित झालेल्या लोकवस्तीपैकी बराच भाग जेथे घरांचा पुरवठा थोडक्या खर्चात होऊ शकेल व जेथील राहणी अधिक आरोग्यकारक असेल अशा निरनिराळ्या ठिकाणी शक्य तितक्या लवकर हलविणे हा होय.

## मागासलेल्या भागांच्या विकासाचा प्रश्न

विद्युच्छक्तीच्या वापराच्या दृष्टीनेही औद्योगिक विकेंद्रीकरणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. उद्योगधंद्यांची ठिकठिकाणी विखरून उभारणी करण्याचे धोरण बुद्धिपुरःसर आखले नाही तर वाढणाऱ्या विजेचा उपयोग आजच्या औद्योगिक केंद्रांनाच होऊन उद्योगधंद्यांचे अधिक केंद्रीकरण होत जाईल. नवीन विद्युच्छक्तीचा उपयोग अन्य ठिकाणी न योजल्यास ती विद्यमान औद्योगिक केंद्राकडेच जाईल व त्या केंद्रामध्ये तिचा चटकन वापर होऊन ती नंतर इतरत्र अनुपलब्ध होईल. नवीन उद्योगांची कोठे उभारणी करावयाची याची तपशीलवार आखणी करून सरकारी नियमनाने त्याची अंमलबजावणी करण्याचे धोरण असले तरच नवीन विद्युच्छक्ती निर्माण करण्यात काही अर्थ आहे. अशी काही पूर्व योजना नसताना जी नवी विद्युच्छक्ती निर्माण होईल, ती उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण वाढविण्यासच कारणीभूत होईल. खाजगी उद्योगांवर कोणत्याही प्रकारचे बंधन अगर नियंत्रण नसल्यास मोठ्या शहरांतूनच त्यांची उभारणी होण्याकडे सहज प्रवृत्ती असते. उद्योगपतींचा वर्ग मागासलेल्या भागांचा विकास बुद्धिपुरस्सर करण्याची कामगिरी पत्करीत नाही; कारण अशा मागासलेल्या भागांत उद्योगांची उभारणी केल्यास विशेष फायदा मिळेल असे नसते. मागासलेल्या भागांचा विकास कसा साधावयाचा व उद्योगधंद्यांची उभारणी कोठे होऊ द्यावयाची याविषयीच्या योजनांचा अभाव ही या पंचवार्षिक योजनेत आढळून येणारी आणखी एक महत्त्वाची उणीव आहे.

## श्रीमंतांच्या श्रीमंतीत भर!

वरील महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यामुळे ही पंचवार्षिक योजना अर्थशक्तीचे केंद्रीकरण होण्याच्या विद्यमान प्रवृत्ती कायम राखून आधीच श्रीमंत असणाऱ्या वर्गांची व प्रदेशांची श्रीमंती आणखी वाढविण्यास कारणीभूत होईल. खाजगी उद्योगाबाबत जे सरकारी धोरण आहे त्यामुळे ह्या प्रवृत्तीस जोर चढत आहे. पंचवार्षिक योजनेत सर्व मोठे उद्योगधंदे खाजगी मालकीच्या कक्षेतच राहावयाचे आहेत; आणि त्याबरोबरच या उद्योगधंद्यांची वाढ व्हावी यासाठी संरक्षक जकातीचे धोरण व सरकारी मदतीच्या इतर सर्व योजना चालूच राहणार आहेत. याखेरीज स्वतः सरकार अगर इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनसारख्या निमसरकारी संस्था सर्वांत मोठ्या उद्योगांना, त्यांचे उत्पादन व उत्पादनक्षमता वाढावीत म्हणून, बऱ्याच मोठ्या भांडवलाचा पुरवठा करणार आहेत. उद्योगपतींनी बचत करावी व आपल्या उद्योगांची वाढ करण्यास त्यांच्या जवळ भांडवलाची कूस राहावी या उद्देशाने १९४७ सालापासून सरकारने इन्कमटॅक्स-सुपरटॅक्स मध्ये सूट देण्याचे व उद्योगधंद्यांना सतत सवलती देण्याचे धोरण स्वीकारले आहे. परंतु या उद्योगांच्या विकासाची कोणतीही मोठी योजना आखताना पुनः सरकारी भांडवलावरच विसंबून राहण्याची पाळी यावी हे चमत्कारिक आहे! १९४७ सालापासून उद्योगपतींना सतत सवलती

देण्याचे धोरण किती यशस्वी झाले हे यावरून कळून येण्यासारखे आहे. गेल्या काही वर्षांत सरकार-कडून उद्योगपतींना करांत एकंदर किती सूट मिळाली व त्या मानाने त्यांनी धंद्यांत किती जादा भांडवल गुंतविले याचा हिशेब करणे उद्बोधक होईल. हा हिशेब बराच गुंतागुंतीचा असतो व सरकारदसरी असणारी माहिती उपलब्ध झाल्याखेरीज तो करता येत नाही ही गोष्ट खरी. असे असले तरी १९४७ नंतरच्या प्रत्येक अर्थमंत्र्यांनी आपल्या अंदाजपत्रकावरील भाषणात करात सूट दिल्यामुळे सरकारचा किती तोटा झाला याचा जो अंदाज केला आहे तोच आधारभूत मानू. करात चालू वर्षी झालेला वाढावा जमेस धरून हिशेब केला असता दिसून येईल की, या करसुटीमुळे उद्योगपतींना किमान २० कोटी रुपये यंदा ऐन मिळाले असावे व गेल्या वर्षीचा हा आकडा ३० कोटी रुपयांच्या आसपास असावा. गेल्या काही वर्षांत उद्योगपतींनी प्रतिवर्षी १५ कोटी रुपयांप्रमाणे नवीन भांडवलाची उभारणी केली आहे, असे जे सांगितले जाते त्याच्याशी वरील हिशेब ताडून पाहावा; तसेच पंचवार्षिक योजनेत ५ वर्षांच्या कालावधीत भांडवलवाढीच्या कार्यक्रमासाठी जी १२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, तिच्याशी याची तुलना करावी.

या ढोबळ आकडेमोडीवरूनही असे दिसते की १९४७–४८च्या अंदाजपत्रकातील करआकारणीचे मान कायम ठेवले असते तर पंचवार्षिक योजनेत खाजगी उद्योगधंद्यांच्या विकासासाठी जेवढ्या भांडवली खर्चाची अपेक्षा आहे जवळजवळ तेवढीच रक्कम सरकार स्वतः या कार्याकरिता उभी करू शकले असते. आणि असे झाले असते तर भांडवली विनियोगाचा कार्यक्रम व उद्योगवाढीचे नियंत्रण सर्वस्वी सरकारच्या हातांत राहून सरकारी उत्पन्नातही वाढ झाली असती. मोठ्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठी खाजगी भांडवलाचा पुरवठा उद्योगपतींकडून कितपत होऊ शकतो यासंबंधीची हल्लीची परिस्थिती लक्षात घेतली असता मोठ्या प्रमाणावरील सर्व कारखानदारी खाजगी मालकीच्या कक्षेत ठेवण्याचा जो सरकारचा आग्रह आहे त्याचा अर्थ काहीच कळत नाही.

## जनतेचे दुहेरी नुकसान

इतर परिणामांच्या दृष्टीने विचार करताही या उद्योगधंद्यांची खाजगी मालकी चालू ठेवणे समर्थनीय ठरणार नाही. मोठ्या उद्योगांच्या खाजगी मालकीमुळे राष्ट्रीय प्राप्तीच्या वाटणीतील विषमता सारखी वाढतच जाते. हिंदुस्थानच्या गेल्या तीस वर्षांतील औद्योगिक विकासाकडे थोडी नजरफेक केली असता दिसून येते की, जवळजवळ प्रत्येक उद्योग, सरकारकडून मिळालेले प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साहाय्य व सर्वसामान्य गिऱ्हाईक जनतेने सोसलेली झीज, यांवर पोसला–वाढला आहे. सरकारी धोरण व जनतेचा त्याग यांमुळे प्रामुख्याने घडून आलेल्या औद्योगिक विकासाचा समाजातील संपत्तीच्या व उत्पन्नाच्या वाटणीच्या दृष्टीने विचार करता काही थोडे गट अगर थोड्या व्यक्ती यांच्याच हातात संपत्तीचे व प्राप्तीचे एकत्रीकरण होण्यात त्याची परिणती झाली असे दिसून येते. आणि हेच धोरण व याच प्रवृत्ती या पंचवार्षिक योजनेत चालू राहणार आहेत. ज्या वेळी सरकार उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी खाजगी उद्योगांना कर्ज देते अगर तंत्रविषयक विशेष साहाय्य करून त्यांची सुधारणा घडवून आणते अगर अन्य काही मदत करते त्या वेळी सरकारच्या वरील सर्व तऱ्हेच्या मदतीचा भार अखेर कर देणाऱ्या सामान्य जनतेसच सहन करावा लागतो. ह्या मदतीचा परिणाम मात्र सामान्य जनतेचे दारिद्र्य वाढण्यात व काही खाजगी व्यक्तींच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होण्यात होतो. म्हणून हा उपक्रम यापुढे चालू ठेवणे कोणत्याही दृष्टीने न्याय्य ठरत नाही. योजनेतील मोठ्या उद्योगांस मोठ्या प्रमाणावर भांडवलपुरवठा व इतर मदत करण्याचे धोरण हे दुहेरी दृष्ट्या अन्यायाचे आहे. सर्वसामान्य जनतेस झळ लागून समाजातील विशिष्ट वर्गांची व व्यक्तींची अर्थार्जनशक्ती कृत्रिमपणे ते आज वाढविते,

एवढेच नव्हे तर पुढे जेव्हा एखादा उद्योग सरकारी मालकीचा करण्याचा प्रश्न निर्माण होईल त्या वेळी द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कमही आजच्या सरकारी मदतीमुळे वाढवून ठेवली जात आहे. आणि ज्यांच्या मदतीने व त्यागाने हे उद्योग वाढले त्यांनाच पुनः ह्या वाढलेल्या नुकसानभरपाईचा बोजा सहन करावा लागणार आहे! ब्रिटिशांच्या राजवटीत संरक्षक जकाती वगैरे सारख्या धोरणांचा अचिकित्सक पाठपुरावा जरी समर्थनीय मानला तरी विद्यमान अगर भावी सार्वजनिक हिताची कसलीही दखलगिरी न घेता खाजगी धंद्यांस सरकारी मदत पुढे अशीच चालू ठेवणे केव्हाही समर्थनीय ठरणार नाही. पायरीपायरीने सर्व मोठ्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण क्रमप्राप्तच आहे. आज किमानपक्षी ज्या उद्योगधंद्यांना सरकार प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष मदत देते त्यांच्या विद्यमान उत्पन्नाबाबत व त्यांना मिळू शकणाऱ्या भावी नुकसानभरपाईबाबत योग्य त्या अटी घालूनच ती मदत आज दिली जाईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नसावी.

आजच्या हिंदी अर्थरचनेत जेथे प्राप्ती विशेष होऊ शकते व भांडवली संचयासही बराच अवसर मिळतो अशी फारच थोडी व्यवसायक्षेत्रे आहेत. ती मुख्यतः म्हणजे मोठे यंत्रोद्योग, बँका आणि परकी व्यापार ही होत. आणि नेमके हे व्यवसायच खाजगी मालकीचे राहणे जरूर आहे, अशी सरकारची भूमिका आहे. अशा परिस्थितीत योजनेत सामाजिक उद्दिष्टांची वाच्यता करणे व्यर्थ आहे.

काही क्षेत्रांत सरकारी व्यापाराची शक्यता असल्याबद्दलचा योजनेत ओझरता उल्लेख आहे. परंतु हा उल्लेख अस्पष्ट व ढोबळ आहे आणि या बाबतीत सरकारची प्रत्यक्ष कृती पाहता, विशेषतः पाट (Jute) व गळिताची धान्ये यांच्या व्यापाराबाबतचे प्रत्यक्ष धोरण पाहता विशेष काही घडेल अशी आशा नाही. वास्तविक काही महत्त्वाच्या निर्यात व्यापाराची संपूर्ण मक्तेदारीच सरकारकडे जाणे अवश्य आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या अनेक देशांचे व काही पुढारलेल्या देशांचे उदाहरण याबाबत आपणांस मार्गदर्शक ठरावे. सार्वराष्ट्रीय बाजारपेठेत ज्या वस्तूंच्या किमतीत खूप चढउतार होतात त्याची झळ देशांतर्गत त्या वस्तूंच्या किमतीस लागू नये व देशातील किमतीचे योग्य रीतीने नियमन करता यावे यासाठीही निर्यात व्यापार सरकारने आपल्या ताब्यात घेणे अवश्य आहे. परंतु १९४७ सालापासून अनेक कमिट्यांनी व बोर्डांनी पाट, गळिताची धान्ये इत्यादींबाबत हे धोरण स्वीकारण्याचा सरकारला आग्रह केला असला तरी सरकारने या शिफारशींची हेतुतः उपेक्षा केली आहे; आणि पंचवार्षिक योजनेत सरकारी व्यापाराच्या शक्यतेबद्दल मोघम उल्लेख असला तरी विशिष्ट व्यापार-क्षेत्रांबाबत कोणताच निश्चित कार्यक्रम सुचविलेला नाही.

## विषमतेची अपप्रवृत्ती रोखण्याचे उपाय

सध्याच्या आपल्या अर्थव्यवस्थेतील संपत्तीचे वाटप अत्यंत विषम असून बहुतेक क्षेत्रांतील काही थोडे लोक मोक्याच्या जागा धरून बसले आहेत. आर्थिक विकास होण्यासाठी करावयाच्या सर्व सरकारी खर्चाचा फायदा याच लोकांना होणार आहे. आपल्या देशाच्या सद्यःस्थितीत मोठ्या भांडवली विनियोगाच्या सरकारी योजनांची परिणती थोड्या लोकांच्या हाती अनेक प्रकारच्या अनार्जित प्राप्तीची वाढ करण्यात होणार आणि एकंदर राष्ट्रीय उत्पादनाची जी वाढ होईल तिची वाटणी पूर्वीपेक्षाही अन्याय्य पद्धतीने होणार. पंचवार्षिक योजनेतच ताबडतोब विशेष उपाय योजण्याची काळजी घेतली तरच या प्रवृत्तीचा प्रतिरोध करता येईल. हे उपाय पुढीलप्रमाणे:—

(१) विद्यमान खाजगी मालमत्तेचा वापर व तिच्यातून होणाऱ्या अनार्जित प्राप्तीवरील हक्क कायद्याने मर्यादित करणे. यासंबंधी एक लेख मी Indian Economic Journal, Jan. 1947 या अंकात लिहिला आहे. (२) भांडवली विनियोगाच्या योजनेतच त्या खर्चाची विस्तृत क्षेत्रावर

प्रसरण होईल व या खर्चाचे फायदे विस्तृत क्षेत्रावर उपलब्ध होतील अशी सरतूद करणे. (३) वाढलेल्या उत्पन्नाची पुनर्वाटणी होईल अशा रीतीने सरकारी आयव्यय आखणे.

त्यांपैकी पहिला उपाय मूलगामी असून विद्यमान सरकार त्या दिशेने विचार करील असे वाटत नाही. दुसऱ्या उपायाची योजनेत तरतूद नाही. सामाजिक उत्पन्नाची पुनर्वाटणी करण्यासाठी योजावयाच्या आयव्यय पद्धतीची दोन अंगे आहेत. (१) करआकारणी व (२) सरकारी खर्चाची विशिष्ट दिशा व प्रमाण. सध्या श्रीमंतांवर करांचा जो बोजा आहे त्यापेक्षा तो अधिक वाढणार नाही असे योजनेत स्पष्टपणे सांगितले आहे. उत्पन्नाची पुनर्वाटणी होण्याच्या दिशेने योजलेला व योजनेत खास समाविष्ट केलेला एकच उपाय म्हणजे वारसाकर बसविण्याची सूचना. वारसाकराचा विचार बराच जुना आहे. तो प्रत्यक्षात लागू केव्हा होईल हे सांगणे कठीण आहे. शिवाय हा कर नैमित्तिक असल्यामुळे त्याची अंमलबजावणी झाल्यास त्यायोगे उत्पन्नाची कितपत पुनर्वाटणी होते हे कळून येण्यास एकदोन दशके जावी लागतील. म्हणून करआकारणीच्या दृष्टीने विचार करता विषमतेच्या दिशेने प्रस्तुतची स्वाभाविक प्रवृत्ती थोपवून धरण्यास योजनेत काहीच साधन नाही.

दुसऱ्यापक्षी सरकारी नियंत्रणाने अगर सरकारी पैसा खर्च करून सामाजिक विषमतेस आळा बसेल अशी कोणतीही व्यवस्था योजनेतील त्या बाजूस दिसत नाही. ज्यांना लोककल्याणाची खाती म्हणता येईल अशांसाठी योजनेत खर्चाचा विभाग आहे. परंतु यावर होणारा सर्व खर्च म्हणजे केंद्र सरकार अगर राज्य सरकारे शिक्षण-आरोग्य यांसारख्या कार्यावर जो सध्या खर्च करत आहेत अगर त्यांनी करावयाचे योजले आहे त्यांचीच निव्वळ बेरीज आहे. हा खर्च योजतानाही काही नवीन धोरण अवलंबिले आहे अगर या खर्चाच्या परिणामाची विशिष्ट तऱ्हेने पुनर्वाटणी होत आहे असे मानण्यास जागा नाही. यापैकी कोणताच खर्च पर्यायाने गरिबांच्या उत्पन्नात भर पाडील अशा स्वरूपाचा नाही. समाजस्वास्थ्याचे उपाय योजण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या (आजार, बेकारी इत्यादी) अडचणीत मदत किंवा धान्य, कपडा यांच्या किमती कमी करण्यासाठी हा खर्च झाला तर अप्रत्यक्ष रीतीने गरिबांचे उत्पन्न वाढविण्यास तो कारणीभूत होत असतो; असे काही योजनेत नाही. याला एकच अपवाद म्हणजे कामगारांच्या घरबांधणीस होणाऱ्या खर्चाचा; पण मागे सांगितलेच आहे की, हा खर्च खात्रीने सामाजिक उपयुक्ततेचा ठरेलच असे नाही. वस्तुस्थिती पाहता असे म्हणता येईल की, मोठ्या शहरांतील कामगारांच्या घरबांधणीवर होणाऱ्या खर्चामुळे दाट वस्तीच्या शहरातून उद्योगधंद्यांचे उच्चाटन न होता तेथेच त्यांचे बूड स्थिर होईल आणि त्यामुळे त्या शहरांतील उद्योगपतींच्या मालकीच्या कारखान्यांचाच फायदा होईल.

## चलनवाढीचे भय

शिवाय योजनेत अनुस्यूत असलेल्या एकंदर करसंपादणीच्या धोरणामुळे चलनवाढ अधिक होण्याचेच भय आहे. या चलनवाढीस परिणामकारक रीतीने आळा बसू शकेल असे उत्पादन—व भावनियंत्रणाचे धोरण योजनेत नाही; व त्यासाठी सरकारला असलेले अधिकारही अपुरे असल्याचे दिसून येईल. त्यामुळे योजनेतील इतर प्रवृत्ती व त्याबरोबरच चलनवाढीच्या दिशेने होणारी योजनेची वाटचाल यांचा परिणाम अखेरीस उत्पन्नाच्या विभागणीतील विषमता आणखीच वाढविण्यात होईल. योजनेत परराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणाबाबत कोणताही उल्लेख नाही. परराष्ट्रीय व्यापाराची एखादी निश्चित योजना ठरविणे जरूर होते. पंचवार्षिक योजनेची सर्व आखणी पुरी झाली नसून अजून ती प्राथमिक अवस्थेत आहे असे याबाबत कदाचित सांगण्यात येईल. उत्पन्नाच्या वाटणीच्या दृष्टीने परराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणास किती महत्त्व आहे हे इंग्लंडच्या उदाहरणावरून कळून येते. इंग्लंडने आयात व निर्यात व्यापाराचे

नियंत्रण करून गरिबांच्या राहणीचे मान वाढविले व श्रीमंतांच्या राहणीचे मान उतरविले हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. पंचवार्षिक योजनेत अशा दृष्टीने परकी व्यापाराचा विचार केलेला नाही. याचा अर्थ इंग्लंडमध्ये श्रीमंतांच्या उपभोगसामर्थ्यास जी मर्यादा घालून दिली आहे तितपत मर्यादाही आमच्या येथील श्रीमंतांवर घालण्यात येणार नाही एवढाच करावयाचा.

## खऱ्या अर्थाने 'नियोजन'च नव्हे

या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यास खऱ्या अर्थाने "नियोजन" असे कितपत म्हणता येईल याबद्दल शंकाच आहे. मुख्यतः पाटबंधारे, रस्ते इत्यादीसारखी जी सार्वजनिक कामे केंद्र सरकार व राज्य सरकारे सध्या करीत आहेत अगर त्यांनी पुढे करण्याचे ठरविले आहे त्यांची ही एकत्र केलेली यादी आहे. यापेक्षा या योजनेत विशेष असे काही नाही आणि हे संकलनदेखील विशिष्ट तत्त्वानुसार अगर धोरणाने केलेले आहे असे नाही. औद्योगिक क्षेत्राबाबत बोलावयाचे तर ही योजना म्हणजे उद्योगपतींशी झालेल्या चर्चेचा आढावा आहे. इतर क्षेत्रांबाबतही केंद्र सरकार व राज्य सरकारे यांचा सध्या जो खर्च होत आहे, त्यांची उद्दिष्टे आहेत त्याचीच ही उजळणी आहे. उत्पादनाचे जे आकडे योजनेत दिले आहेत ते प्रदेशवार अगर विभागवार तपशिलाने हिशेब करून काढलेले नसून सुपरिचित असलेल्या 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेतील आकड्यांसारखे सरासरीचे अंदाजी हिशेब आहेत. योजनेत ठरविलेले शेतीउत्पादनाचे व मोठ्या उद्योगधंद्यांतील उत्पादनाचे इष्टांक निश्चितपणे गाठले जातील याची खात्री वाटण्यासारखे योजनेत काही नाही. व्यापार व लहान उद्योगांबाबत अस्पष्ट व ढोबळ असे सर्वसामान्य विवेचनच तीत आढळते. सामाजिक धोरणाबाबतच्या सर्व प्रश्नांची योजनेत संपूर्ण उपेक्षा केली असून योजना-कार्यक्रम यशस्वी करण्याचे महत्त्वाचे साधन गणल्या गेलेल्या किमतींच्या धोरणातील अडचणींचाही पुरेसा व खुलासेवार विचार केलेला नाही. एवंच कोणत्याही आर्थिक विकास-योजनेत अवश्येकरून अपेक्षिल्या जाणाऱ्या व्यापकता, निश्चितता आणि संबद्धता इत्यादी महत्त्वाच्या गुणांची उणीवच या पंचवार्षिक योजनेत आढळून येत आहे.

गोखले अर्थशास्त्र संस्था, मराठी प्रकाशन, ४ (पुणे, १९५१)

# ६ . . भारताचा आर्थिक विकास

१

युद्धोत्तर जगतात आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांच्या आर्थिक प्रगतीच्या प्रश्नाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. या गोष्टीचे बरेचसे श्रेय कम्युनिझमच्या वाढत्या प्रभावाला द्यावे लागेल. कम्युनिझमच्या वाढत्या प्रसाराला आळा घालण्यासाठी अंतर्गत आर्थिक परिस्थिती सुधारणे किती आवश्यक आहे हे मागासलेल्या देशांतील बिगर-कम्युनिस्ट सरकारांना आता कळू लागले आहे. आणि मागासलेल्या देशांतील जीवनमान त्वरेने वाढविणे हाच कम्युनिझमला आळा घालण्याचा दूरगामी उपाय आहे हा अमेरिकेच्या धोरणाचा एक सिद्धांत बनून गेला आहे.

### आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा अहवाल

आंतरराष्ट्रीय जगतात या प्रश्नाला दिले जात असलेले महत्त्व आंतरराष्ट्रीय परिषदांच्या कार्यक्रमपत्रिकेवर या विषयास जे कायम स्थान मिळत आहे त्यावरून सिद्ध होते. गतवर्षी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सरचिटणिसांनी या विषयावर अहवाल तयार करण्यासाठी काही तज्ज्ञांची नेमणूक केली होती. त्यांनी आपला अहवाल मे १९५१ मध्ये सादर केला. या अहवालाबद्दल वेगवेगळ्या देशांनी व्यक्त केलेली मते मोठी बोधप्रद आहेत. तज्ज्ञांनी आपल्या अहवालात अंतर्गत आणि बाहेरचे असे दोन तऱ्हेचे उपाय आर्थिक विकासासाठी सुचविले होते. त्यापैकी दुसऱ्या तऱ्हेच्या उपायांवरच बहुतेक सर्व चर्चा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये झाली. याला कारण एक तर अंतर्गत उपाययोजनेबाबत आंतरराष्ट्रीय मंडळांना काहीच करण्यासारखे नव्हते; आणि दुसरे म्हणजे जे उपाय सुचविले गेले होते त्यांचा पुरा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न झाला नाही. सोव्हिएट गटातील राष्ट्रांना तज्ज्ञांचा दृष्टिकोणच मान्य नव्हता, कारण त्यांच्या मूलभूत विचारसरणीच्या साच्यात तो बसत नव्हता. सोव्हिएट गटाबाहेर मात्र, दूरगामी सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाची, धन आणि सत्ता यांची वाटणी बदलण्याच्या दृष्टीने सामाजिक क्रांती घडवून आणण्याची आणि आर्थिक विकासासाठी सर्वंकष नियोजन करण्याची आवश्यकता असल्याबद्दलच्या ज्या कल्पना मांडल्या गेल्या होत्या त्यांस विशेष विरोध मुळीच दिसून आला नाही. अर्थात या कल्पना त्या देशांना सर्वस्वी मान्य होत्या असे मुळीच नाही. तपशीलवार चर्चेच्या वेळी हे स्पष्ट झाले.

### वासाहतिक देशांची भूमिका

अमेरिका आणि दुसरे पूर्वकालीन वासाहतिक देश यांचे म्हणणे असे होते की मागासलेल्या देशांचा आर्थिक विकास हा विकसित देशांच्या आर्थिक विकासाच्या पावलावर पाऊल टाकून होणे शक्य

आहे. प्रगत देशांचा आर्थिक विकास मुख्यतः खाजगी भांडवलवाल्यांच्या उद्यमामुळे झाला. अंतर्गत खाजगी भांडवलाला साहाय्य आणि उत्तेजन दिले आणि अर्थव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत जरूर ते स्थैर्य निर्माण करून आणि आश्वासने देऊन परकीय खाजगी भांडवल गुंतले जाण्यासही मदत केली म्हणजे मागासलेल्या देशांचा आर्थिक विकास नैसर्गिक आणि सहज असा होईल अशी त्यांची भूमिका होती. याचा स्पष्टच अर्थ होता की मध्यवर्ती नियंत्रणाखालील नियोजित आर्थिक विकासाची कल्पना त्या देशांना मान्य नव्हती. पण ऐतिहासिक दृष्ट्या पाहिले तर मागासलेल्या देशांची आजची आर्थिक स्थिती आणि अमेरिका, कॅनडा वगैरे देशांचा आर्थिक विकास घडून आला तेव्हाची त्यांची स्थिती यांत महदंतर दिसून येते. या देशांचा विकास अठराव्या शतकात सुरू झाला. त्यावेळी या देशांत लोकवस्ती अतिशय तुरळक होती आणि नैसर्गिक संपत्तीची आणि भूप्रदेशाची विपुलता होती; आणि अशा या प्रदेशात निष्णात, उत्साही आणि सशक्त अशा लोकांची हळूहळू भरती होत होती. या देशांमधील उत्पन्न वाढत होते आणि परकी भांडवलही सहज आकर्षिले जात होते. पश्चिम युरोप सोडून जगातील बाकीचे प्रदेश त्यावेळी मागासलेले होते आणि शेतकीप्रधान आणि उद्योगप्रधान देशांमधील व्यापारात उद्योगप्रधान देशांना फायदा होण्यासारखी परिस्थिती होती. त्या देशांमधील सामाजिक आणि आर्थिक घडण आणि तत्त्वज्ञान हेही, निदान सुरवातीच्या अवस्थांमध्ये तरी, समतेकडे झुकणारे होते. आशिया खंडातील देशांची आजची स्थिती याच्या अगदी उलट आहे. तेथील जमीन कित्येक शतके विहित होत आलेली आहे आणि शेतीतील उत्पादन घटक अतिशय लहान झाला आहे. शिवाय गेली शंभर किंवा जास्त वर्षे या देशांवर असे आर्थिक आघात झालेले आहेत की त्यांमुळे त्यांची आर्थिक घडण विसकटून गेलेली आहे. प्राचीन उद्योगधंदे मातीला मिळाले आहेत आणि लोकसंख्येतील जमिनीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. तेथील समाजरचनाही विस्कळित झालेली असून आर्थिक विषमता आणि सत्तेची मक्तेदारी निर्माण झालेली आहे. याशिवाय हेही लक्षात ठेवले पाहिजे की जुन्या पद्धतीच्या अर्थव्यवस्थेकडून औद्योगिक क्रांतीनंतरच्या अर्थव्यवस्थेकडे जावयाचे म्हणजे काही किंमत द्यावी लागते. पश्चिम युरोपातील देशांना याचा त्रास फारसा जाणवला नाही; कारण वसाहती आणि इतर अंकित देशांवर ही किंमत त्यांना लोटून देता आली. अमेरिका, कॅनडा अशा देशांमध्ये औद्योगिक क्रांतीपूर्वीची अर्थव्यवस्था अशी फारशी नव्हतीच. त्यामुळे त्यांना या परिवर्तनाचा फारसा त्रास झाला नाही. पण आजच्या मागासलेल्या प्रदेशांतील स्थिती अगदी वेगळी आहे. मोठी लोकसंख्या आणि जुन्या पद्धतीची अर्थव्यवस्था यांमुळे या देशांना औद्योगिक क्रांतीच्या परिवर्तनाची किंमत मोठी पडेल. औद्योगिक क्रांती आता १९ व्या शतकाप्रमाणे थोड्या देशांपुरती मर्यादित राहिलेली नसून जगाच्या जास्त जास्त भागावर पसरत असल्यामुळेही या देशांची औद्योगिक वाढ आता अधिक बिकट झाली आहे.

जुन्या वासाहतिक देशांनी आणि पश्चिम युरोपातील देशांनी मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासाबद्दल सुचविलेल्या कार्यक्रमांमध्ये उत्पादनतंत्र सुधारून या देशांनी विशेषतः शेती आणि जुने उद्योगधंदे यांतील–उत्पादनक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करावा; जमीनदारी पद्धत नष्ट करून शेती ही कसणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे ताब्यात द्यावी असे म्हटले आहे. (सामूहिक शेतीच्या किंवा त्या तऱ्हेच्या कोणत्याही बदलाला अमेरिकेचा स्पष्ट विरोध होता.) औद्योगीकरणावर या देशांचा विशेष भर नव्हता. आणि जो होता तो भोग्य वस्तू निर्माण करणारे उद्योगधंदे वाढविण्याची आवश्यकता आणि शक्यता यांवर होता. हे उद्योगधंदे वाढविण्यासाठी खाजगी–अंतर्गत आणि परकी–भांडवलावर अवलंबून राहण्यास काही हरकत नाही आणि असा कार्यक्रमच शक्यतेच्या कोटीतील आहे असे या देशांचे म्हणणे होते.

२

## भारताची पंचवार्षिक योजना

भारताच्या पंचवार्षिक योजनेतील प्रमुख वैशिष्ट्ये पुढील आहेत : ही योजना म्हणजे मुख्यतः सरकारी खर्चाची योजना असून पाटबंधारे आणि विद्युत् उत्पादनाच्या योजनांवर आणि सुधारलेल्या तंत्रांचा उपयोग करून शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यावर या योजनेचा भर आहे. दळणवळणाची साधने वाढविण्यासाठी खर्चाचा मोठा भाग वापरला जाणार असून उद्योगधंद्यांच्या विकासासाठी थोडीशीच तरतूद करण्यात आली आहे. शेतीतील उत्पादनव्यवस्था अगर शेतीशी संलग्न असणारे इतर उद्योग यांच्या पुनर्रचनेसंबंधी काही निश्चित योजना त्यात नाही. मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे, पेढ्या आणि व्यापार पूर्वीप्रमाणेच खाजगी मालकीखाली राहणार आहेत. योजनेत निर्देश केलेले या क्षेत्रांतील भांडवल आणि उत्पादनाचे आकडे हे योग्य परिस्थिती असेल तर खाजगी मालकीखाली या क्षेत्रांत काय घडून येण्याची अपेक्षा आहे ते दर्शविणारे आहेत. देशातील अन्नोत्पादन वाढविणे हा योजनेचा एक महत्त्वाचा हेतू असून भोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी आवश्यक असे जे उद्योगधंदे भारतात आज अस्तित्वात आहेत त्यांचे उत्पादन वाढविण्याकडेही योजनेत विशेष लक्ष पुरविण्यात आलेले आहे. भारताच्या पंचवार्षिक योजनेत विकासाच्या लांबवरच्या योजनेची कोणतीही कल्पना नसून पाच वर्षांनंतरच्या परिस्थितीबाबत त्यात काहीही उल्लेख नाही. तेव्हा साधारणतः भारताची पंचवार्षिक योजना ही अमेरिकेच्या या बाबतीतल्या मतांशी जुळती आहे असे दिसते.

अर्थात याचा अर्थ असा नव्हे की, भारताच्या नियोजन मंडळाने मुद्दामच उद्योगधंद्यांत पुढारलेल्या देशांची विचारसरणी अनुसरली. एका विशिष्ट दृष्टिकोणाचा हा तर्कशुद्ध परिणाम आहे. आधुनिक उद्योगधंदे आणि व्यापार यांचे क्षेत्र खाजगी उद्योगधंद्यांसाठी राखून ठेवावयाचे असे एकदा ठरविले म्हणजे नियोजनाची व्याप्ती आपोआपच कमी होते. ज्या उद्योगधंद्यांत खाजगी उद्योगपती फारसे लक्ष घालणार नाहीत–मग ते त्या उद्योगासाठी लागणाऱ्या मोठया भांडवलामुळे असो की त्यात नुकसान येण्याचा संभव जास्त असल्यामुळे असो—त्या उद्योगांत प्रत्यक्ष शिरकाव करण्याचा अधिकार आपल्याकडे राखून ठेवण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. बाकीचे क्षेत्र खाजगी उद्योगधंद्यांना मोकळे ठेवण्यात आलेले आहे. याचा अर्थ असा होतो की सरकारी उद्योग हा केवळ खाजगी उद्योगास पोषक असा समजला गेला असून खाजगी उद्योगांतून होणाऱ्या विकासाची दिशा बदलणे अगर वेग वाढविणे त्या बाबत सरकारला फारसे काही करणे शक्य होणार नाही. धरणे-पाटबंधारे बांधणे, वीज-उत्पादन करणे अगर आधुनिक वाहतुकीची तरतूद करणे या कामांना मोठे भांडवल लागते; त्यामुळे अशा तऱ्हेच्या नियोजनात त्यांची जबाबदारी सरकारवर पडते. शेतीच्या क्षेत्रात जमीनदारी नष्ट करण्याची आवश्यकता मान्य केली गेली आहे, पण छोटया शेतकऱ्यांच्या शेतीव्यवसायाची पुनर्रचना करण्यासाठी काहीही महत्त्वाचे उपाय सुचविलेले नाहीत. औद्योगिक क्षेत्रात खाजगी मालकीचे तत्त्व एकदा पक्के मान्य केल्यावर शेतीमधील उत्पादनव्यवस्थेत कोणताही मूलभूत बदल घडवून आणणे अशक्य बनते. शिवाय खाजगी व्यापारी आणि कारखानदार यांचे स्थान अबाधित ठेवण्याचे ठरले म्हणजे शेतीच्या मालाचा व्यापार अगर त्याच्यावरील पुढील संस्कार हेही सहकारी संस्थांसाठी राखून ठेवणे शक्य होणार नाही. नवीन उत्पादनतंत्रांच्या प्रसाराखेरीज शेती-क्षेत्रात कोणताही मोठा बदल घडवून आणता येणार नाही. खाजगी मालकी आणि भांडवल यांवर अवलंबून राहण्याचे तत्त्व एकदा मान्य केले म्हणजे या सर्व गोष्टी ओघानेच येतात.

अशा तऱ्हेच्या कार्यक्रमाची दिशा आणि त्यामुळे घडून येणारा बदल योग्य आणि पुरेसा समजता येईल का? सर्वसाधारण राष्ट्रीय उद्दिष्टांवरून आर्थिक धोरणाचे हेतू ठरविता येतात. देशातील लोक सुखी होणे आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांत देशाचे महत्त्व वाढणे ही देशातील उत्पादन साधनांच्या विकासाची सर्वसाधारणपणे उद्दिष्टे मानता येतील. ती साध्य करण्यासाठी त्वरेने आर्थिक विकास करण्याची आवश्यकता आहे हे कोणी अमान्य करणार नाही. देशातील आजची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नाही. गेली दहा अगर जास्त वर्षे आपण कसेबसे तग धरून आहोत. जीवनमानात कोणतीही वाढ झालेली नाही. अन्नाची उपलब्धता तर पूर्वीपेक्षा खात्रीनेच वाढलेली नाही. ब्रिटनमधील डॉलरच्या प्रश्नासारखाच आपला अन्नप्रश्न हा जवळजवळ कायमचाच येथे तळ देऊन बसला आहे. कापडाच्या दरडोई उपलब्धतेमध्ये काही सुधारणा झालेली दिसत नाही. घरांच्या बाबतीत तर मोठ्या आणि मध्यम शहरांमधील स्थिती १९४० च्या मानाने निश्चितपणे खालावलीच आहे. १९३० ते ४० या काळाच्या मानाने काही शेतकऱ्यांची परिस्थिती आता बरी आहे. पण सर्वसाधारणतः परिस्थिती आशादायक नाही आणि युद्धोत्तरकाळांत कोणत्याही एका दिशेने प्रगती निश्चित होत चालली आहे असे म्हणण्यासारखे काहीही घडलेले नाही. जमिनीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचा भार वाढतो आहे. शेतातील अर्ध-बेकारीचे प्रमाण वाढत आहे. बहुतेक राज्यांतील शेतीतील उत्पादन घटक इतका लहान आहे की तो वाढविल्यावाचून उत्पादनक्षमता वाढणे आणि अर्थव्यवस्था सुधारणे अशक्य आहे.

## सर्वंकष विकास-योजनेची निकड

जास्त उत्पादनाची आपणास आवश्यकता आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. पण जास्त उत्पादनाच्या नुसत्या घोषणांचा काही उपयोग होणार नाही. आज उत्पादनात वाढ घडवून आणता येईल अशा सर्वंकष विकास-योजनेची निकड आहे. हा प्रश्न सोडवण्याचा सहज सुचणारा मार्ग म्हणजे कामगारांना जास्त काम करण्यास आवाहन करावयाचे आणि उत्पादनतंत्र सुधारण्याचा प्रयत्न करावयाचा; पण मूलभूत समाजव्यवस्थेस मात्र धक्का लावावयाचा नाही. भारतीय पंचवार्षिक योजनेमागील वृत्ती हीच आहे. परिस्थितीतील अडथळे मूलभूत व खोलवर रुजलेले नसते तर ही वृत्ती चालू शकली असती. पण आपल्या आर्थिक मागासलेपणाची अगर दारिद्र्याची कारणे केवळ मागासलेले तंत्र अगर मानवी प्रयत्नांचा अपुरेपणा ही नाहीत. नैसर्गिक संपत्तीच्या प्रत्यक्ष उपयोगावर अर्थव्यवस्थेमध्ये जो भर असतो तो बदलून औद्योगिक उत्पादनाला महत्त्वाचे स्थान मिळणे म्हणजे आर्थिक विकास हे औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांच्या गेल्या दोन शतकांच्या इतिहासावरून स्पष्ट होते. आधुनिक काळात सर्व देशांमध्ये औद्योगिक क्षेत्रातील उत्पादकतेची पातळी शेतीच्या क्षेत्रापेक्षा जास्त असल्याचे दिसते; आणि शेतीची पुनर्रचना अगर विकास घडून येण्यासाठी मनुष्यबळ शेतीकडून काढून औद्योगिक क्षेत्राकडे वळवावे लागले आहे. शेतीसारख्या उत्पादनाच्या प्राथमिक क्षेत्रातील तंत्र सुधारण्यावर केवळ भर देऊन भागत नाही आणि अशा उपायाने आर्थिक विकासाचा मुळचा प्रश्न सुटत नाही हे आता सिद्ध झालेले आहे.

या संबंधात हल्लीच्या लोकसंख्यावाढीची काही वैशिष्ट्ये ध्यानात ठेवली पाहिजेत. औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात लोकसंख्येच्या वाढीबाबत दोन वेगळ्या प्रवृत्ती दिसून येतात. एक अशी की सार्वजनिक आरोग्यरक्षण सुधारले आणि विशेषतः जे साथीचे रोग पूर्वी हाहाःकार उडवून देत त्यांना आळा घातला गेला की मृत्युसंख्या हळूहळू घटू लागते. या उलट औद्योगीकरण झाले आणि शहरी लोकसंख्येची वाढ होऊ लागली की जननसंख्याही कमी होऊ लागल्याचे आढळून येते. मृत्युसंख्या कमी

होण्याची प्रवृत्ती जगात आता सर्वत्र आढळून येते. काही किमान कार्यक्षमता असलेले सरकार राज्यावर असले म्हणजे ही प्रवृत्ती दिसू लागते. त्यासाठी आर्थिक समृद्धीची वरची पातळी गाठण्याची अगर आर्थिक रचना काही विशिष्ट तऱ्हेची असण्याची गरज दिसत नाही. आशिया खंडातील देशांच्या लोकसंख्येच्या प्रश्नाचे वैशिष्ट्य असे आहे की ही पहिली प्रवृत्ती या देशांमध्ये अनेक वर्षे दिसत आहे; पण वसाहतीच्या स्वरूपाची अर्थव्यवस्था येथे असल्यामुळे दुसरी जननसंख्या कमी होण्याची प्रवृत्ती मात्र येथे आढळत नाही. औद्योगीकरण होऊन शहरी लोकसंख्येत वाढ होत नाही तोवर या देशांची लोकसंख्या अशीच वाढत राहणार. शेतीच्या विकासावर भर देण्याने लोकसंख्या आणि नैसर्गिक संपत्ती यांच्या व्यस्त प्रमाणाचा प्रश्न काही काळ तहकूब मात्र होईल – सुटणार नाही. इजिप्तसारख्या देशांच्या गेल्या काही दशकांच्या इतिहासावरून हाच बोध होतो.

त्याचप्रमाणे हेही लक्षात घेतले पाहिजे की भोग्य वस्तूंचा पुरवठा ताबडतोबीने वाढविण्याचा कार्यक्रम हा फार अल्प काळ यशस्वी होऊ शकेल. भोग्य वस्तूंना ताबडतोबीची मागणी आहे किंवा त्यांचे उत्पादन वाढवणे सहज शक्य आहे म्हणून त्या उद्दिष्टावर भर देणे हा काही दूरगामी विचार नव्हे. सर्व क्षेत्रांमध्ये समतोल विकास होणे यालाच आर्थिक विकास म्हणता येईल. जगातील सगळीकडचा अनुभव हेच दर्शवितो की दीर्घकालीन आर्थिक सुधारणा अगर विकास घडवून आणावयाचा असेल तर प्रथमदर्शनी दूरच्या वाटणाऱ्या अशा पायाभूत उद्योगधंद्यांपासून सुरवात केली पाहिजे.

## बहुसंख्यांकांच्या हिताकडे दुर्लक्ष

समाजकल्याणाच्या अगर जनसाहाय्याच्या योजना आज भारतात जवळजवळ नाहीतच. औद्योगिक कामगारांसाठी काही तरतुदी करण्यास सुरवात झाली आहे. पण एकूण लोकसंख्येचा फारच थोडा भाग त्यात समाविष्ट होतो. बहुसंख्य लोकांच्या अगदी प्राथमिक स्वरूपाच्या सामाजिक गरजासुद्धा भागविण्याची आज व्यवस्था नाही. सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण दहा वर्षांत अमलात आणण्याबाबतची एक तरतूद भारतीय गणराज्याच्या घटनेत धोरणविषयक मूलभूत तत्त्वांमध्ये ग्रथित करण्यात आलेली आहे. पण मुंबईखेरीज इतर कोणत्याही राज्यामध्ये हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने निश्चित कार्यक्रम आखण्यात आलेला नाही; आणि मुंबईतसुद्धा पैशाच्या अभावी हा कार्यक्रम पुढे नेणे अशक्य होऊ लागलेले आहे. सरकारमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुखसोयी वाढविण्याची कोणतीही तरतूद पंचवार्षिक योजनेत नाही.

संपत्तीची अगर उत्पन्नाची वाटणी समान करण्याचीही योजनेत काही तरतूद नाही. भारताचे अर्थमंत्री गेली काही वर्षे प्रत्यक्ष करांचे प्रमाण कमी करीत आहेत. प्रत्यक्ष करांचे प्रमाण जास्त वाढवणे शक्य नाही असे सरकारला जोपर्यंत वाटत राहील तोवर वाढता सरकारी खर्च भागविण्यासाठी अप्रत्यक्ष करांचा अगर चलनवाढीचाच उपयोग करावा लागेल. या दोहोंचाही परिणाम उत्पन्नांची वाटणी जास्त विषम होण्यात होतो. खाजगी उद्योगपतींना ते क्षेत्र मोकळे ठेवून औद्योगिक वाढ होण्याची अपेक्षा केली म्हणजे औद्योगिक विकासातून जे जादा उत्पन्न येईल ते त्याच वर्गाला मिळेल, समाजाच्या इतर थरांना मिळणार नाही, हेही उघड आहे. पंचवार्षिक योजनेत दर्शविण्यात आलेला एकूण कार्यक्रमच इतका मर्यादित आहे की योजनेअखेर दरडोई उत्पन्नात काही म्हणण्यासारखी वाढ होईल अशी नियोजन मंडळाचीही अपेक्षा दिसत नाही; आणि योजनेच्या पुरस्कर्त्यांनी काहीही सांगितले तरी योजना अमलात येण्याने उत्पन्नांची वाटणी जास्त सम होण्याची काहीही शक्यता नाही.

योजनेतील अपुरा कार्यक्रम आणि फळाची अनिश्चितता याची कारणे शोधणे अवघड नाही. भारताची पंचवार्षिक योजना ही दोन डगरींमध्ये पडली आहे. खाजगी मालकीच्या पद्धतीतून त्वरेने

आर्थिक विकास साधण्यासाठी जी योग्य परिस्थिती निर्माण करावी लागते ती निर्माण करण्यासाठी जरूर ते बदल घडवून आणण्याची नियोजकांची तयारी नाही. हे करावयाचे म्हणजे प्रत्यक्ष करांचा बोजा आणखी उतरवावा लागेल, मजूरविषयक कायदे काढून टाकावे लागतील आणि सामाजिक उद्दिष्टांचा त्याग करावा लागेल. हे केले तरच लोकांवर जरूर तेवढा बोजा लादता येईल. याचे उलट, राष्ट्रीय शिल्कीचा मध्यवर्ती साठा, भांडवल गुंतवण्याबाबत मध्यवर्ती दिग्दर्शन, आणि प्रत्यक्ष नियंत्रणे आणि करयोजना यांचा उपयोग करून साधेपणाची-काटकसरीची राहणी समाजात बाणविणे या कल्पनांचेही खाजगी मालकीच्या कल्पनेवरील निष्ठेमुळे त्यांना वावडे आहे. यांतला कोणतातरी एक मार्ग निश्चितपणे न स्वीकारल्याचा साहजिक परिणाम ही योजना जवळजवळ निष्फळ ठरण्यात होणार आहे.

## ३

### मागासलेल्या देशातील प्रश्न

आज आर्थिक दृष्ट्या मागासलेले जे देश आहेत त्यांतील बहुतेक सर्व देश अगदी अलिकडच्या काळापर्यंत पुढारलेल्या भांडवलशाही देशांच्या प्रभावाखाली होते. वेगाने आर्थिक विकास झाल्याचे उदाहरण त्या गटात सापडत नाही. खरे म्हणजे कम्युनिस्ट गटाबाहेर असे कोणतेच उदाहरण गेल्या तीस वर्षांत सांपडत नाही. पण जपानमध्ये या शतकाच्या सुरवातीच्या दशकात आर्थिक विकास झाला, तेथील अनुभव आणि औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांचा पूर्वीचा अनुभव यांवरूनही आर्थिक विकासास कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याचा विचार करता येईल. आर्थिक विकास होण्यासाठी मोठा प्रयत्न करावा लागतो असे त्या अनुभवावरून लक्षात येते. मुख्य म्हणजे चालू काळात त्याग करण्याची तयारी ठेवावी लागते, उपलब्ध भांडवलसंचयाचे मध्यवर्ती नियंत्रण मान्य करावे लागते आणि चालू काळातील जीवनमान आणि भविष्य काळासाठी गुंतवले जाणारे भांडवल या दोहोंच्याही बाबतीत काटकसरीची दृष्टी ठेवावी लागते.

मागासलेल्या देशातील प्रश्नांची व्यापकता अगर ते सोडविण्यास जरूर असलेला प्रयत्न यांचे मोजमाप फक्त काही बाबतींतच करता येईल. त्यासाठी जे अंतर्गत, राजकीय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणावे लागेल त्याचे मोजमाप करणे शक्य नाही. तंत्रविशारदांचा पुरवठा यासारख्या बाबतीत काही मोजमाप शक्य आहे. पण खरे म्हणजे आवश्यक ते सामाजिक अगर राजकीय बदल सोडल्यास आर्थिक विकासाच्या प्रश्नाचा गाभा जर कोठे असेल तर तो आर्थिक विकासासाठी किती साधनसामग्री उपलब्ध आहे यांत आहे.

### राष्ट्रसंघ-तज्ज्ञांचे अंदाज

संयुक्त राष्ट्रसंघ-तज्ज्ञांनी या बाबतीत काही ढोबळ अंदाज बांधण्याचा यत्न केला. मागासलेल्या देशातील मोठ्या प्रमाणावर असलेली अर्धबेकारी नष्ट करणे आणि सरासरी उत्पन्न वाढविणे ही उद्दिष्टे समोर ठेवून त्यांनी आपला अंदाज बसवला. हा अंदाज करताना आर्थिक विकासाचा एक भाग म्हणजे लोकसंख्येचे वाढते प्रमाण बिगर-शेतधंद्यांत गुंतले पाहिजे; त्यासाठी लोकसंख्येच्या वाढीमुळे काम करणाऱ्या एकूण लोकसंख्येत जितकी वाढ होईल ती सर्व बिगर-शेती धंद्यांत गुंतविली गेली पाहिजे

आणि शेतीधंद्यांवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या निदान वाढू देता कामा नये असे किमान उद्दिष्ट मानण्यात आले. बिगर-शेतीधंद्यांत एका माणसाला गुंतविण्यास सरासरी किती भांडवल लागते त्याचा अंदाज करून त्याला कामकरी लोकसंख्येतील अपेक्षित वाढीच्या संख्येने गुणले म्हणजे आवश्यक भांडवलाचा एक भाग ठरविता येईल. शेतीधंद्यांतील उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी लागणारे भांडवल हा त्याचा दुसरा भाग. तज्ज्ञांच्या अंदाजाइतके भांडवल गुंतवले गेल्यास मागासलेल्या देशांतील सरासरी उत्पन्न दरवर्षी दोन टक्के वाढेल अशी त्यांची अपेक्षा होती. भांडवल गुंतवण्याबाबतच्या त्यांच्या कल्पना अशक्य कोटीतल्या होत्या असे म्हणण्याचे काही कारण नाही. कोलंबियासाठी आंतरराष्ट्रीय बँकेने तयार केलेल्या योजनेतील आवश्यक भांडवलाचा अंदाज आणि तज्ज्ञांनी केलेला सर्वसाधारण अंदाज यांत खूपसा सारखेपणा दिसून येतो, त्यावरूनही हे सिद्ध होते. राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांच्या अंदाजा-प्रमाणे बिगर-शेतीधंद्यांत काम मिळवून देण्यासाठी कामगारामागे २५०० डॉलर इतके भांडवल गुंतवावे लागेल. पुढील पाच वर्षांत भारतातील कामकरी लोकसंख्येत सत्तर लाखांची वाढ होईल असे गृहीत धरले तर या सर्वांना बिगर-शेतीधंद्यांत काम देण्यासाठी ८,७५० कोटी रुपये भांडवलाची गरज भासेल आणि शेतीधंद्यांतील उत्पादनक्षमता वाढण्यासाठी साधारणतः राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४ टक्के इतके भांडवल गुंतवावे लागेल. या तज्ज्ञांच्या हिशेबाप्रमाणे ९,००० कोटी रुपये वार्षिक राष्ट्रीय उत्पन्नापैकी ३६० कोटी प्रतिवर्षी शेतीच्या क्षेत्रात भांडवल म्हणून घालावे लागतील. म्हणजे पाच वर्षांत एकूण १०,५५० कोटी किंवा दरवर्षी सरासरी २,११० कोटी रुपये भांडवल लागेल. दुसऱ्या शब्दांत ९,००० कोटी रुपये राष्ट्रीय वार्षिक उत्पन्नाशी तुलना करता त्याच्या २३·३ टक्के इतके भांडवल प्रतिवर्षी लागेल. भारताच्या पंचवार्षिक योजनेत पाच वर्षांत मिळून अर्थव्यवस्थेत एकूण किती भांडवल गुंतवले जाईल त्याचा अंदाज केलेला नाही. पण राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांच्या अंदाजाच्या मानाने त्या योजनेतील गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलाचा अंदाज फारच कमी आहे. सरकारी अमलाखालील सर्व क्षेत्रांत मिळून गुंतविण्याच्या भांडवलाबाबतचा पाच वर्षांचा एकूण अंदाज १,५०० कोटी रुपयांचा आहे. मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांत खाजगी उद्योगपतींकडून पाच वर्षांत २५० ते ३०० कोटी भांडवल गुंतवले जाईल अशी त्यातील अपेक्षा आहे. बाहेरील देशांकडून मदत मिळाल्यास यात ३०० ते ५०० कोटींची वाढ होईल. कोलंबिया योजना ही आंतरराष्ट्रीय बँकेच्या तज्ज्ञांनी तयार केली असल्याने ती तरी सत्य-स्थितीला धरून आहे असे मानण्यास हरकत नाही. त्यातील आवश्यक भांडवलाच्या अंदाजाच्या मानाने सुद्धा भारतीय योजनेतील भांडवलाचा अंदाज फारच कमी आहे. जपानच्या युद्धोत्तर आर्थिक योजनेत १९४९ ते १९५३ या काळात प्रतिवर्षी २३·१ ते २३·५ टक्के इतका वार्षिक राष्ट्रीय उत्पन्नाचा भाग भांडवलासाठी वापरण्याची तरतूद केली होती हे लक्षात घेतल्यास तज्ज्ञांच्या अंदाजाप्रमाणे भारताने उत्पन्नाच्या २३ टक्के भांडवल गुंतवण्याची अपेक्षा करणेही अवास्तव वाटण्याचे कारण नाही.

## प्रयत्नपूर्वक बचतीची आवश्यकता

आर्थिक विकासासाठी साधनसामुग्री फार मोठी लागणार असल्यामुळे सरकार आणि समाज यांनी जितकी शक्य असेल तितकी मेहनत या कामी घेतली गेली पाहिजे हे उघड आहे. सर्व समाजाने या कामी झटून प्रयत्न करावयाचे तर सर्व वर्गांवर काटकसरीची आणि साधेपणाची राहणी स्वीकारण्याची सक्ती करणे आणि ज्या ज्या ठिकाणी बचत करणे शक्य आहे त्या त्या ठिकाणी ती करून उपलब्ध भांडवल पूर्वनियोजित पद्धतीने वापरणे आवश्यक आहे. भारतासारखी परिस्थिती असलेल्या देशांमध्ये बचतीची शक्यता एकूण कमीच असते आणि जी असते ती थोड्या जागी एकवटलेली असते.

कोलंबियाबाबत आंतरराष्ट्रीय बँकेने केलेल्या पाहणीतून हाच निष्कर्ष निघाला. वैयक्तिक बचत, आणि शेतीधंद्यांत होणारी बचत ही आपल्याकडे फार कमी असते. आधुनिक उद्योगधंदे, पेढ्या आणि विम कंपन्या, परदेशी व्यापार, अंतर्गत घाऊक व्यापार, आणि वेगवेगळ्या तऱ्हेची सट्टेबाजी ही थोडीशीच अशी क्षेत्रे आहेत की जेथे बचत शक्य असते आणि केली जाते. ही बचत काही थोडया माणसांच्या हातांत एकवटलेली असते आणि ती समाजोपयोगी कार्यासाठीच वापरली जाईल अशी मुळीच खात्री देता येत नाही. तेव्हा अशा परिस्थितीत या क्षेत्रांची मालकी सरकारने स्वतःकडे घेतल्यास बचतीचा प्रश्न मिटू शकेल. इतर अनेक दृष्टींनीही असे धोरण उपयोगी होईल.

आर्थिक विकासासाठी वर्तमान काळात त्याग करावयाचा तर तो सामाजिक न्यायावर आधारलेला पाहिजे. समाजात अस्तित्वात असलेली संपत्तीची विषमता खूपशी कमी करणे त्यासाठी प्रथम आवश्यक आहे. ज्या क्षेत्रांत संपत्ती अगर उत्पन्न फार एकवटलेले आहे अशी क्षेत्रे सरकारी मालकीची करणे त्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. भारतातील परिस्थिती पाहता भांडवलदार वर्गाची मुबत्ता कायम ठेवून बाकीच्या समाजावर साधी राहणी लादणे फार काळ सहन केले जाईल असे वाटत नाही.

विकास योजनेचे स्वरूप असे हवे की, त्यात औद्योगीकरणाला जास्तीत जास्त महत्त्व दिले गेले पाहिजे. शेतीतील कायमच्या अर्धबेकारीच्या प्रश्नावर औद्योगीकरण हा एकच तोडगा आहे. बाल्कन देशांतील युद्धोत्तर विकासावरून हे स्पष्ट होते की, औद्योगीकरणाच्या दिशेने नियोजित प्रयत्न झाले नसते तर तेथे आज जी औद्योगिक प्रगती घडून आली ती कधीच घडून आली नसती.

भारतासारख्या देशाच्या विकास-योजनांतील आणखी एक त्रासदायक प्रश्न म्हणजे शेतीकामांतील उत्पादन आणि फायदा यांचा. तो सोडविण्यासाठी शेतीतील कामाचा घटक मोठा करणे हाच मूलभूत उपाय होय. यासाठी एक तर शेतीधंद्यांतील लोकसंख्या बिगर-शेतीधंद्यांत गुंतविण्याची काही व्यवस्था करावी लागेल; आणि दुसरे म्हणजे शेतीशी संलग्न असे कर्जव्यवहार, खरेदी-विक्री आणि शेतीमाला-वरील पुढील संस्कार हे सर्व सहकारी मंडळ्यांच्या अगर सरकारच्या हुकमतीखाली आणावे लागतील. एवढे केल्यावर मगच सहकारी शेती मोठया प्रमाणावर पुरस्कारण्याचा प्रश्न हाती घेता येईल. यासाठी योजनापूर्वक प्रयत्न करावयाचे म्हणजे सरकारला याबाबत मार्गदर्शन करावे लागेल, काही व्यवहारांची क्षेत्रे सहकारी मंडळांसाठी राखून ठेवावी लागतील आणि कदाचित समाजाच्या सहकारी प्रयत्नांत सहभागी होण्याची सक्ती काही अल्पसंख्यांकांवर करावी लागेल.

अशा नियोजित विकासासाठी परदेशी व्यापाराचे कडक नियंत्रण करण्याचीही आवश्यकता भासेल. कारण एक तर जे काही परदेशी चलन उपलब्ध होईल त्याचा विकास-योजनेसाठी आवश्यक ती साधनसामग्री मिळवण्यासाठी योग्य उपयोग करण्याची खबरदारी घ्यावी लागेल; आणि दुसरे, बचत अधिक होण्यासाठी गैरमहत्त्वाच्या भोग्य वस्तू आयात होऊ द्यावयाच्या नाहीत याचीही काळजी घ्यावी लागेल.

अर्थव्यवस्था काहीशी स्वयंसिद्ध बनवणे हे योजनेच्या सुरुवातीच्या अवस्थेतील एक महत्त्वाचे उद्दिष्ट राहील. युद्धाची भीती आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील कायमची अस्थिर अशी परिस्थिती या दोन्ही गोष्टी लक्षात घेतल्या तर महत्त्वाच्या बाबतीत तरी स्वयंपूर्ण होण्याची मनीषा आपण बाळगली पाहिजे हे उघड होते. भारतात उपलब्ध असलेली साधनसामग्री पाहता हे अशक्य आहे असेही मानण्याचे काही कारण दिसत नाही.

## ४

### पुढारलेल्या देशांची वृत्ती

मागासलेल्या प्रदेशांच्या आर्थिक विकासासाठी बाहेरून मदत मिळण्याची कितपत शक्यता आहे याचा विचार करण्यापूर्वी अशा विकासाबाबत पुढारलेल्या देशांची काय वृत्ती आहे त्याचा थोडा विचार केला पाहिजे. मागासलेले प्रदेश हे राजकीय दृष्ट्या आता स्वतंत्र होत आहेत आणि साहजिकच आपल्या देशावर दुसऱ्या देशांची कोणत्याही तऱ्हेची ताबेदारी राहू नये यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत. गेली दोन शतके गोऱ्या वंशाच्या काही राष्ट्रांचा जगावर जितका वरचष्मा चालला तितका आता चालणार नाही हे उघड होत आहे. आशियातील राष्ट्रवादाची प्रगती म्हणजे गोऱ्या वंशाच्या सार्वभौमतेला आणि राजकीय व आर्थिक वर्चस्वाला आव्हान आहे. या प्रगतीचे आर्थिक परिणाम लक्षात ठेवणे आवश्यक आहे. जगातील सर्व भागांची प्रगती झाली म्हणजे सर्वांचेच भले होईल ही गोष्ट अंतिम दृष्ट्या खरी असली तरी नजीकच्या काळात साम्राज्य व वसाहती नष्ट झाल्यास त्याचा साम्राज्यशाही देशांतील जीवनमानावर निश्चितच उलटा परिणाम होणार आहे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. स्वतःजवळील नैसर्गिक संपत्तीचा स्वतःच्या उन्नतीसाठी उपयोग करण्याचा आणि औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांवर अवलंबून न राहण्याचा मागासलेल्या देशांचा प्रयत्न हा आज श्रीमंत असलेल्या देशांची उत्पन्ने आणि त्यांची आर्थिक सत्ता ही धोक्यात आणणारा आहे यात काहीच शंका नाही. मागासलेल्या देशांचा त्वरेने आर्थिक विकास झाला तर शेतीमाल आणि औद्योगिक माल यांच्या परस्पर किमतीही अशा तऱ्हेने बदलतील की ज्या अर्थव्यवस्था स्वस्त कच्चा माल मोठ्या प्रमाणावर आयात करण्याच्या पायावर उभारलेल्या आहेत त्यांना मोठाच त्रास होईल. या सर्व गोष्टींवरून असे दिसते की मागासलेल्या प्रदेशांचा त्वरेने आर्थिक विकास झाला तर ते निदान नजीकच्या काळात तरी आज उद्योगप्रधान असलेल्या देशांना फायद्याचे होणार नाही. तेव्हा या विकासासाठी उदार हस्ताने ते मदत करतील अशी आशा करणे फारसे योग्य होणार नाही.

आशियातील या मागासलेल्या देशांमध्ये दाट लोकवस्ती आहे. गेली दोनशे वर्षे युरोपियन लोकांना आपण जगाचे राजे आहो असे समजण्याची सवय लागलेली आहे. इतर वंशांची समताही त्यांनी मोठ्या कष्टाने आणि बराच विरोध केल्यानंतर अखेर तत्त्वतः मान्य केली आहे. पण अतिशय मोठ्या लोकसंख्येचे हे देश खरोखरच समपातळीवर येऊन बसण्याची शक्यता दिसली तर युरोपीय लोकांना मोठे अवघड काम होईल. गेल्या दोनशे वर्षांत गोऱ्या लोकांनी जगाचे मोठमोठे भाग व्यापून आपली संख्या बरीच वाढविली आहे. जगाच्या आर्थिक विकासाचा एकत्र विचार करावयाचा झाला तर ज्या देशांमध्ये माणसाची उत्पादनक्षमता कमी आहे त्या देशांकडून ज्या देशांत ती जास्त आहे त्या देशांकडे लोकसंख्येचा प्रवाह चालू राहणे ही सार्वत्रिक भरभराट होण्याची पहिली पायरी ठरेल. अशी उपाययोजना आज करता तर येत नाहीच, पण आंतरराष्ट्रीय चर्चांमध्ये अशा कल्पनांचा उल्लेख करणेही निष्फळ वाटते. जगातील राजकीय सत्तेची आजची वाटणी कशी आहे याची ही खूण आहे. ऑस्ट्रेलियासारख्या देशांना मागासलेल्या देशांचा आर्थिक विकास होऊन त्यांची सत्ता वाढली आणि तोपर्यंत स्वतःच्या देशातील मोठे भाग न वसविलेले राहिले तर काय होईल याची मोठी काळजी वाटते.

पश्चिम युरोपातील श्रीमंत आणि पुढारलेल्या देशांनी मागासलेल्या प्रदेशांच्या आर्थिक विकासामध्ये मोठे औत्सुक्य दाखवावे अशी परिस्थिती नाही हे वरील चर्चेवरून लक्षात येईल. १९४० पर्यंत या

श्रीमंत देशांपैकी कोणीही मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासाबाबत विशेष औत्सुक्य दाखवले नाही. मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासासाठी बाहेरून मदत मिळण्याची शक्यता युद्धोत्तर काळातच निर्माण झालेली आहे. कम्युनिझमचा प्रभाव कमी करण्याची युरोपीय देशांना आवश्यकता भासत आहे व त्यामुळेच काही बाबतीत नजीकच्या काळात तोटा होण्यासारखा असला तरी श्रीमंत देश हे मागासलेल्या देशांस मदत करण्यास सध्या तयार आहेत. ही मदत किती आणि कोणत्या प्रकारे दिली जाण्याचा संभव आहे या संबंधात राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांच्या अहवालांवर झालेल्या चर्चेतून आणि वर उल्लेख केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चांमधून चांगला प्रकाश पडतो. कोणत्याही समाजातील आर्थिक धोरणाबाबतच्या विचारांवर देशाचा तत्कालीन अनुभव आणि नजीकच्या काळातील आर्थिक क्षेत्रातली स्वहिताची दृष्टी यांचा फार मोठा पगडा असतो, हे त्या चर्चेवरून स्पष्ट होते. पुढारलेल्या आणि मागासलेल्या देशांमध्ये अनुभव आणि नजीकच्या काळातील हितसंबंध यांबाबत महदंतर असल्यामुळे आपल्या प्रश्नांवरील त्यांच्या विचारांना फार महत्त्व देण्याचे काही कारण नाही.

## विभिन्न आंतरराष्ट्रीय संस्थांची कार्यक्षेत्रे

मागासलेले देश आर्थिक विकासाचे कोणते धोरण स्वीकारतात यावर परकीय मदत मिळण्याची शक्याशक्यता कितपत अवलंबून आहे? राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांनी मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासाला मदत करण्यासाठी एक खास संस्था निर्माण करण्यात यावी आणि मागासलेल्या देशांना सर्वसामान्य विकास-योजनांसाठी त्या संस्थेमार्फत मदत देण्यात यावी असे सुचविले होते. पुढारलेल्या देशांचा या सूचनेस विरोध होता; आणि जरी मागासलेल्या प्रदेशांच्या नेटामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने या बाबतीत एक ठराव पास केला असला तरी प्रत्यक्षात त्यातून काही निष्पन्न होण्याचा संभव विशेषसा दिसत नाही. आज अस्तित्वात असलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांपैकी जागतिक आरोग्य संघटना, जागतिक अन्न संघटना वगैरे संस्था त्या त्या क्षेत्रांपुरत्या मर्यादित असून सर्वसामान्य आर्थिक विकासाचे कामात त्यांचा विशेष उपयोग होण्यासारखा नाही. आंतरराष्ट्रीय चलन मंडळ हे आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आणि चलनक्षेत्रातील अडचणींचा परिहार करण्यासाठी आहे. पुनर्रचना आणि विकास यांसाठी म्हणून काढलेली आंतरराष्ट्रीय बँक ह्या संस्थेचा विकासकार्यामध्ये जास्त उपयोग होऊ शकेल. राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांनी या संस्थेकडून विकासाच्या कार्यात महत्त्वाचा भाग घेतला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली होती. आंतरराष्ट्रीय बँकेचा कल खाजगी मालकीच्या आधाराने आर्थिक विकास होण्यावर आहे यात काही शंका नाही. पण इतर कारणांस्तव मदत देण्याची आवश्यकता पटली तर या कारणामुळे मदत नाकारली जाईलच असे नाही, असे बँकेतर्फे युगोस्लाव्हियासारख्या आर्थिक धोरणात कम्युनिस्ट तत्त्वप्रणाली मान्य करणाऱ्या देशाला विकासासाठी कर्ज देऊ करण्यात आले यावरून वाटते. पण आंतरराष्ट्रीय बँकेच्या या बाबीतल्या कामावर महत्त्वाच्या मर्यादा आहेत. मागासलेल्या देशाच्या आर्थिक विकासाच्या सर्वंकष योजना वगैरे तयार करण्यात मदत करणे बँकेला शक्य नाही. त्याचप्रमाणे सवलतीच्या दराने कर्ज देणे अगर मदत वाटणे या गोष्टी बँकेला करता येण्यासारख्या नाहीत.

## परकीय मदतीचे अन्य मार्ग

बाहेरून मदत मिळविण्याचे दुसरे मार्ग म्हणजे वेगवेगळ्या देशांच्या सरकारांकडून प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष मदत मिळविणे आणि परकी देशांतील खाजगी व्यक्तींकडून भांडवल मिळविणे हे आहेत. अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेने गेल्या काही वर्षांत अशी मदत देण्यात महत्त्वाची कामगिरी

वजावली आहे, पण एकूण या बँकेमार्फत मिळणाऱ्या मदतीवर फार अवलंबून राहाणे शक्य नाही; कारण ही बँक म्हणजे अमेरिकन सरकारने घालून दिलेले धोरण अमलात आणणारी संस्था आहे. परकीय सरकारांकडून प्रत्यक्ष मदत मिळविण्याची मार्शल योजनेसारखी एखादी योजना आशियातील देशांसाठी आज तरी अस्तित्वात नाही. भारतासारख्या देशांना अमेरिकेकडून अशी मदत देऊ केली जाईल अशी शक्यता आहे. पण ही मदत काही निश्चित उद्दिष्टांसाठी आणि कार्यक्रमांसाठी असण्याचा संभव जास्त आहे. अमेरिका अगर इतर परकीय देशांकडून येणारी आर्थिक मदत ही कोणत्याही देशाच्या अंतर्गत आर्थिक धोरणापेक्षा राजकीय आणि युद्धाशी संबंधित अशा घटनांवर अवलंबून राहील. ज्या देशांना अमेरिकन मदत मिळाली आहे त्यांचा अनुभव असे दर्शवतो की अशा मदतीमागे राजकीय हेतू असतो आणि एका सरकारने दुसऱ्या देशाच्या सरकारला मदत करण्यात असा काही हेतू असणारच. शिवाय अमेरिकेतील राजकीय यंत्रणा अशी आहे की एकदा मदतीचा काही कार्यक्रम सुरू झाला म्हणजे तो वर्षानुवर्षे ठरल्याप्रमाणे अखंड चालू राहील अशी मुळीच खात्री देता येत नाही. याशिवाय भारताची विशिष्ट परिस्थिती, तेथील परंपरा आणि इतिहास आणि त्याच्या परराष्ट्रीय धोरणाची गेल्या काही वर्षातील दिशा या गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे अमेरिका आणि भारत यांच्यांत मतभेदाचे मुद्दे निर्माण होत राहाणार असे दिसते. अशा परिस्थितीत अमेरिकेसारख्या देशाकडून मदत मिळण्यावर अवलंबून राहाणे चूक ठरेल. अर्थात जी मदत सहज मिळू शकत असेल ती नाकारण्याची काही गरज नाही.

सोव्हिएट गटातील देश जगातील गरीब देशांत मोडतात. त्यामुळे तेथे जी काय साधनसामग्री उपलब्ध असेल ती त्याच देशाच्या-विशेषतः चीनच्या-विकासास आवश्यक आहे. तेव्हा कम्युनिस्ट देशांच्या नियोजन आणि आर्थिक विकासाबाबतच्या कल्पनांचा जरी भारताने स्वीकार केला तरी त्या गटातील देशांकडून मोठीशी मदत मिळण्याची आशा करता येणार नाही. शिवाय या देशांकडून मदत घेण्याचा राजकीय परिणाम अमेरिकेकडून अशी मदत घेण्यापेक्षाही आपल्या प्राचीन परंपरेशी आणि सध्याच्या परिस्थितीशी विसंगत होईल.

खाजगी परकीय भांडवल आर्थिक विकासासाठी येऊ द्यावयाचे म्हणजे एक तर मोठी किंमत द्यावी लागेल. अशा भांडवलावर निदान १५ टक्के नफा मिळण्याची शक्यता असल्यासच असे भांडवल मिळू शकेल. परकीय खाजगी भांडवलाला आकृष्ट करण्यासाठी देशी खाजगी भांडवलाला सुद्धा आपोआप सवलती द्याव्या लागतील. अधिकृत पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे आणि कार्यक्रम यांच्याशी या धोरणाचा विरोध येणार नाही. पण जास्त जोराची आणि क्रांतिकारक उपाययोजना करावयाची तर त्यात हे बसू शकणार नाही आणि अशा योजनेसाठी परकी खाजगी भांडवलावर फारसे अवलंबून राहता येणार नाही.

एखाद्या देशाला बाहेरच्या देशांतून एकूण किती मदत मिळू शकेल याचा अंदाज करणे अवघड आहे. अनुकूल परिस्थिती असेल तर पुढील दहा वर्षांमध्ये भारताला १०० कोटींपासून २०० कोटींपर्यंत रक्कम मिळू शकेल असे म्हणावयास हरकत नाही. ज्या योजनेत सरकारी क्षेत्रातील वार्षिक प्रतिवर्षी खर्चाची व्याप्ती ३०० कोटी रुपये इतकीच आहे त्या योजनेमध्ये ही परकीय मदत अतिशय महत्त्वाची ठरेल. पण भारताच्या आर्थिक विकासासाठी जो उपाय वर सुचविला आहे त्यानुसार सरकारी खर्चाची व्याप्ती सुरवातीच्या वर्षात किमान १००० कोटी रुपये इतकी असावी लागेल. भारतासारख्या देशाला १०० कोटी रुपयांइतकी परकीय मदत कःपदार्थ मानता येणार नाही हे खरे; पण अंतर्गत प्रयत्न एवढा मोठा असल्यावर तुलनेने या परकीय मदतीला कमी महत्त्व राहील.

५

## भारत सरकारचा भ्रम

या लेखात जे विचार मांडले आहेत त्यांचे तात्पर्य आपणा भारतीयांपुरते तरी उघड आहे. आपल्या सरकारने खाजगी मालकीचे आजचे क्षेत्र अबाधित राखण्याची ग्वाही दिलेली आहे आणि अर्थमंत्र्यांनी प्रत्यक्ष कर जास्त वाढविणे अगर आयात कमी करणे अशक्य असल्याच्या घोषणा केल्या आहेत. तेव्हा भारतातील धनिकवर्गाचे सध्याचे जीवनमान टिकणार असून त्यांच्या हाती एकवटलेल्या आर्थिक सत्तेला अगर नफा मिळविण्यासाठी त्यांना खुल्या असणाऱ्या क्षेत्रांना कोणताही धक्का लागणार नाही. सरकारच्या प्रत्यक्ष अमलाखालील क्षेत्रांत आगगाड्या अगर कालवे यांवर ब्रिटिश सरकार जितपत खर्च करीत होते तितपतच खर्च करण्याची सरकारची मनीषा आहे. गरीब वर्गावरील बोजा विशेष वाढविणे अगर उत्साहाचे वातावरण निर्माण करणे हेही सरकारला साधणे शक्य होणार नाही. जर कोणती एक नवी सवलत उपलब्ध झाली असेल तर ती म्हणजे सोप्या तऱ्हेने मिळणारी काही परकीय सरकारची मदत. श्रीमंतवर्गाला विशेष काही त्याग करावयास न लागता आणि सरकारासही विशेष प्रयत्न करावयास न लागता भारताचा आर्थिक विकास होऊ शकेल अशी भारत सरकारची कल्पना झालेली दिसते. हा निव्वळ भ्रम आहे. भारत हा जगातील प्राचीनतम, मोठयात मोठ्या आणि गरिबात गरीब अशा देशांमध्ये जमा होतो. त्यापुढील प्रश्न अतिशय कठीण आहेत आणि साधनसामग्री फार थोडी आहे. अशा देशांमध्ये आर्थिक सत्ता आणि उत्पन्न यांची वाटणी पार बदलून टाकणारी सामाजिक क्रांती झाल्याशिवाय कोणताही विकास त्वरेने घडून येणार नाही. आणि विकास साधावयाचा तर देशातील सर्वांना चालू काळात मोठा त्याग करावा लागेल आणि विकासाची फळे उपलब्ध होईपर्यंत धीर धरावा लागेल. यासाठी सामाजिक एकता आणि सुसंवाद यांची गरज आहे. नियोजनात हुषारी, अंमलबजावणीत सचोटी आणि कर्तृत्व आणि समाजात शिस्त या गुणांची या घटकेला अतिशय आवश्यकता आहे. देशातील विचारी मंडळींनी जागे होऊन ही सर्व परिस्थिती नीट ध्यानात घेणे आवश्यक आहे.

*रचना* १ : २ नोव्हेंबर १९५२ पृ० ९५–१११ (*Indian Quarterly*, 1952, "Economic Development in India" या लेखाचा संक्षिप्त अनुवाद).

☆

# ७ . . योजना व तिची प्रगती

आमचे अर्थकारण आणि दुसरी पंचवार्षिक योजना ही सध्या मोठ्या अडचणीत सापडली आहेत यात शंका नाही. माझ्या दृष्टीने या परिस्थितीचे निदान स्पष्ट करणे योग्य होईल. या विषयावर ज्या पद्धतीने विचार करण्याची प्रथा आहे त्यापेक्षा माझी विचारसरणी पुष्कळशी भिन्न आहे. उदाहरणार्थ, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आकार फार मोठा आहे, अगर तिची मांडणी अयोग्य आहे असे माझे मत नाही. त्याचप्रमाणे भारताच्या अर्थमंत्र्यांनी जो नवा करभार लादला त्याचे प्रमाण मला एकंदरीत ठीक वाटते. परंतु आज जी आणीबाणीची परिस्थिती उत्पन्न झाली आहे ती माझ्या मते दूरदृष्टीचा विचार, संयोजित कृती व तीमधील एकसूत्रीपणा या योगाने टाळता आली असती. उदाहरणार्थ, आजच्या आर्थिक परिस्थितीत ज्या दोन बिकट समस्या देशापुढे तातडीने उभ्या आहेत त्यांचाच आता विचार करू या.

### परदेशी चलनाचा तुटवडा

परदेशी चलनाचा वाढता तुटवडा ही आज एक महत्त्वाची समस्या होय. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा व्याप अगर तिची मांडणी यांचा या तुटवड्याशी काही संबंध नाही. याबाबतीत गेल्या अठरा महिन्यांतील प्रसिद्ध झालेले आकडे स्पष्ट दर्शवितात की दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये आयातीची ज्या प्रमाणात तरतूद केली आहे, तिच्या सरासरीच्या सुमारे दुप्पटीने या काळात परदेशांतून त्या प्रकारचा माल आला. तसेच हे आकडे असेही दर्शवितात की परवानगी देण्यात आलेल्या काही मालाच्या आयातीची योजनेत तरतूदही नव्हती. साहजिकच योजनेमध्ये तरतूद केलेल्या आयातीच्या प्रमाणाबाहेर माल आणण्याचा प्रकार घडला नसता तर आमच्या परदेशी हुंडणावळीचा साठा इतक्या मोठ्या प्रमाणात व लवकर संपुष्टात येऊ लागला नसता. दीड वर्षात जी परिस्थिती सिद्ध म्हणून उभी राहिली आहे ती तशी न घडती तर चलनात होत असलेली घट वेळोवेळी तपासून परदेशांतून पतीवर माल मिळविण्याइतकी वा अन्य तऱ्हेने प्रयत्न करण्यापुरती आमची आर्थिक स्थिती बळकट राहिली असती. परदेशांतून आयात करण्याच्या योजनेतील मालासंबंधी योग्य अंदाजपत्रक केलेले दिसून येत नाही. विविध मालाच्या आयातीस परवानगी देण्याबाबत सूत्रबद्ध धोरणाचा अभाव आढळून येतो आणि परदेशी हुंडणावळीच्या गंगाजळीकडे नीटसे लक्ष दिलेले आढळून येत नाही. असे प्रकार घडून यावेत ही घटना उच्च स्थानांवरील राजकीय व शासनविषयक गंभीर परिस्थितीची द्योतक होय.

### खाजगी विभागात भांडवलाची जादा गुंतवणूक

गेल्या दोन वर्षांतील घडमोडी पाहिल्या तर एक गोष्ट सिद्ध होते, ती ही की दुसऱ्या पंचवार्षिक

योजनेच्या विस्ताराएवढी योजना अंगीकारण्याइतकी आमची आर्थिक बाजू बळकट होती. आयातीचे बाबतीत एकसूत्रीपणा व निरनिराळ्या खात्यांत सहकार्य न आढळ्याने गेल्या अठरा महिन्यांत उद्योगधंद्यांच्या मोठ्या खाजगी विभागात व्यापक प्रमाणात पैसे गुंतविले गेले; किंबहुना योजनेत सुचविल्यापेक्षा सुमारे दुप्पट भांडवली गुंतवणूक प्रस्तुत बाबतीत खाजगी उद्योगपतींनी केल्याचे आढळून येते. यामुळे परिणामतः खाजगी विभागाने बँकांच्या पतीवर मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्यांत पैशाची पेरणी केली. याचा परिणाम असा झाला की देशातील बँकांवर वाढता ताण पडला. हा ताण आणि खाजगी विभागात अती जलद रीत्या भांडवल गुंतल्यामुळे उत्पन्न झालेली चलनवाढ व वाढत्या किंमती इत्यादी प्रकार टाळण्यासारखे होते. या गोष्टी टाळल्या असल्या तर भारताची आजची आर्थिक परिस्थिती काळजी करण्यासारखी झाली नसती.

दुसरी महत्त्वाची समस्या अन्नधान्यासंबंधीची होय. गेल्या दहा वर्षात अन्नधान्याचा पुरवठा आणि त्यांच्या किंमती या संबंधात तीन वेळा आणीबाणीची परिस्थिती उत्पन्न झाल्याचे आपण पाहिले. १९४८ मध्ये घाईघाईत अन्नधान्यावरील नियंत्रण उठविले त्यावेळी पहिल्याप्रथम अशी आपत्ती ओढवली होती. पुन्हा अशाच घाईत धान्याची आयात पूर्ण बंद केली जाईल म्हणून घोषणा केल्यानंतर ओढवलेली आपत्तीची दुसरी वेळ. या प्रकारच्या धोरणाचा परिणाम असा झाला की १९५०–५१ मध्ये सर्व जगभर गव्हाकरिता भीक मागावयाची आमचेवर पाळी आली. सरकारने अशी समजूत करून घेतली की, दोनतीनदा लागोपाठ चांगले पीक आल्यामुळे परिस्थिती निवळली. शिवाय आंतरराष्ट्रीय धान्याच्या किंमतीतही घट झाल्याचे आढळले. त्यामुळे आपण देशाचा अन्नधान्याचा प्रश्न सोडविला असे जे सरकारने आत्मसंतुष्ट धोरण अंगीकारिले त्यामुळे आजची आणीबाणीची परिस्थिती ओढविली आहे. आजची देशातील अन्न परिस्थिती एक गोष्ट स्पष्ट करते की दूरदृष्टीने व दीर्घकाल विचारानेच दीर्घकालीन योजना यशस्वी करणे शक्य होईल; आणि त्याबाबत दीर्घकालीन धोरणांचा एकसूत्रीपणे पाठपुरावा करावा लागेल. भारतात शेतीचे उत्पन्न आणि अन्नधान्यादी पदार्थांच्या किंमती समतोल राहतील तर दीर्घकालीन नियोजन शक्य होईल. किंमतीमध्ये स्थिरता आणण्याचे धोरण सरकारने अंगीकारावयास हवे. अन्नधान्याचा मोठ्या प्रमाणावर साठा हाताशी असल्याखेरीज आणि देशभर ठिकठिकाणी अशा मालाची खरेदी, विक्री व साठवण करण्याची यंत्रणा सरकारने सिद्ध केल्याखेरीज या परिस्थितीतून तरणोपाय नाही. या साधनांनी अन्नधान्यासंबंधी नियंत्रण कितपत करणे आवश्यक होईल हे त्या त्या परिस्थितीवर अवलंबून राहील. परंतु युद्धकालातील विविध प्रकारांचे नियमन करणारी यंत्रणा हाताशी सज्ज ठेवणे दूरदर्शीपणाचे ठरेल. परिस्थिती विशेष गंभीर यामुळे वाटते की आजसुद्धा उच्च अधिकारी मंडळीत चालू आठवड्यांचे बाजारभाव किंवा आगामी पिकांचे अंदाज यांवरच धोरण ठरविण्याची प्रवृत्ती आढळून येते. सामान्य जनतेचा विचारही अधिक दूरदर्शी आढळून येत नाही.

## बेकारी बिकट होत जाणार

चालू परिस्थितीमुळे भावी कालातील प्रगतीची रचना प्रमाणबद्ध न राहण्याची आणखीही एक आपत्ती ओढवण्याचा संभव आहे. मोठा सार्वजनिक विभाग, त्याचप्रमाणे मोठ्या खाजगी उद्योगधंद्यांचा विभाग यांना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सिद्धीसाठी आवश्यक ती सामग्री व साधने बव्हंशी प्राप्त झालेली आहेत. या उलट राज्य सरकारे आणि खाजगी विभागातील विशेष महत्त्वाचा भाग म्हणजे शेती, लहान उद्योगधंदे इत्यादींस मात्र साधनसामग्री पुरेशी उपलब्ध झालेली नाही. या नवीन परिस्थितीने व त्यामुळे पडलेल्या ताणांनी या उपेक्षित विभागांच्या मागण्यात आणखी काटछाट केली

त्यांपैकी विशिष्ट भागावर कमीजास्त भर दिला जातो एवढ्यामुळे वरील विधानास बाध येत नाही.

पूर्वीच्या काळी अर्थशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उत्पादन-साधनांची वर्गवारी, भूमी, श्रम व भांडवल अशी त्रिविध करण्याची पद्धती होती. अलीकडे तीत संघटन-साहसाचा चवथे उत्पादनसाधन म्हणून समावेश करण्याचा प्रघात आहे. नियोजन म्हणजे आर्थिक विकास घडवून आणण्याकरिता राष्ट्रीय उत्पादन-शक्तीचे सरकारने अंगिकारलेले साहसी संघटन! सुरुवातीस उपलब्ध साधनसामग्रीला अधिक चांगल्या संघटनेची जोड देणे एवढेच नियोजकास करता येते. एकंदर फल अधिक मोठे व चांगले पदरात पडावे अशा हेतूने वैयक्तिक व सामुदायिक व्यवहाराचे नियंत्रण व मार्गदर्शन दूरदृष्टीने आणि समंजसपणे करणे म्हणजेच चांगल्या संघटनेची जोड देणे होय. अशी जोड सतत देता आली की तिच्यामुळे साधनसामग्रीची प्रत सुधारून तीत वाढही होते आणि पुढच्या अवस्थांत वरील वाढ परस्परपोषक होत गेल्याने संपत्ती व उत्पादन अधिकाधिक वाढत राहते. एवंच नियोजन म्हणजे अधिक चांगले, सुसंगत, दूरदर्शीपणाचे आणि व्यापक स्वरूपाचे संघटन. अशा संघटनासाठी जरूर ती राजकीय व शासकीय व्यवस्था करण्यामध्ये सार्वजनिक कार्यक्षेत्राचा विस्तार, खाजगी व्यवहारावर नियंत्रण आणि विविध कायदेकानू इत्यादी सर्वांचा समावेश होतो. वरील विवेचन अगदी प्राथमिक स्वरुपाचे वाटण्याचा संभव आहे. तथापि, नियोजनाचा पुरस्कार करणारी अत्युच्चपदस्थ मंडळी जेव्हा नियंत्रण या नुसत्या शब्दालाही बुजतात तेव्हा वरील प्राथमिक स्वरूपाचे मुद्देसुद्धा पुन्हा पुन्हा मांडणे आवश्यक ठरते.

भारतातील नियोजनाच्या प्रयत्नासाठी कोणती राजकीय आणि शासकीय व्यवस्था करावयास हवी याचा विचार करताना, प्रथम आपल्या प्रचलित राज्यव्यवस्थेचा परामर्श घेतला पाहिजे. सर्वसाधारणतः आपल्या राज्यव्यवस्थेचे वर्णन असे करता येईल की, ती लोकशाहीप्रधान संघ–राज्याच्या स्वरूपाची असून संसदीय पद्धतीचे प्रातिनिधिक सरकार आहे आणि अंमलबजावणीचे अधिकार केंद्रीय मंत्रिमंडळाकडे सोपविलेले आहेत. हे सर्वसाधारण चित्र नजरेसमोर ठेवूनच भारतातील नियोजनाच्या राजकीय गरजांचा विचार केला पाहिजे. या राज्यव्यवस्थेपैकी पुढील विशेष या संदर्भात विचारात घ्यावयास हवेत :

(१) केंद्रीय व प्रांतिक सरकारमधील कामाची वाटणी,
(२) सर्व धोरणे व कायदे यांना लोकनियुक्त प्रतिनिधी-सभांची मान्यता घेण्याची आवश्यकता,
(३) केंद्रीय व प्रांतिक मंत्रिमंडळाची सामुदायिक जबाबदारी आणि,
(४) मंत्रिमंडळाचे स्थैर्य बहुसंख्य लोकप्रतिनिधींच्या पाठिंब्यावर आधारित असणे.

आजच्या आपल्या राज्यव्यवस्थेमध्ये नियोजनाचा प्रयत्न करणे म्हणजे सरकार जो करील तोच. हा प्रयत्न जे धोरण केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळांनी मान्य केलेले अथवा त्यांना मान्य होण्यासारखे असून, ज्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी मंत्रिमंडळाकडे सोपविलेली आहे अशा कायदेविषयक व कारभार-विषयक धोरणांनुसार केला जाणार हेही उघड आहे.

नियोजनाच्या प्रयत्नाच्या स्वरूपाविषयी प्रारंभी वरील काही गोष्टी नमूद केल्यानंतर भारतातील सध्याच्या परिस्थितीकडे वळले पाहिजे. या प्रश्नाचा विचार भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आणि त्यांतही नियोजन-मंडळाची नेमणूक १९५० मध्ये झाल्यानंतरच्या कालावधीतील अनुभवाच्या आधारे मी करणार आहे.

## नियोजन-मंडळाची कामे

नियोजन-मंडळाच्या नेमणुकीच्या वेळी त्याजकडे सोपविलेली कामे खालीलप्रमाणे नमूद करण्यात आली होती :

(१) देशातील भौतिक व भांडवली साधनसंपत्तीचा आणि तंत्रविशारदांचा व अन्य मनुष्यबळाचा

अंदाज करणे आणि या साधनसंपत्तीपैकी जी राष्ट्राच्या गरजेच्या मानाने अपुरी असल्याचे आढळून येईल ती वाढविण्याचे मार्ग शोधणे.

(२) देशाच्या साधनसंपत्तीचा अत्यंत परिणामकारक आणि समतोल उपयोग करून घेण्याची योजना तयार करणे.

(३) योजनेची अंमलबजावणी कसकशी केली जावी यासंबंधी अवस्था ठरवून देणे व प्रत्येक अवस्था पूर्ण करण्यासाठी उद्दिष्टांतील अनुक्रम ठरवून त्याच्यानुसार साधनसंपत्तीचा निरनिराळ्या कामांसाठी कसा विनियोग करावा ते सुचविणे.

(४) आर्थिक विकासाला प्रतिरोध करणाऱ्या गोष्टी कोणत्या ते दर्शवून प्रचलित सामाजिक व आर्थिक परिस्थितीत योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कोणकोणत्या गोष्टी घडवून आणणे जरूर आहे ते ठरविणे.

(५) योजनेची अंमलबजावणी प्रत्येक अवस्थेत सर्वच बाबतीत यशस्वी करण्यासाठी आवश्यक असलेल्या यंत्रणेचे स्वरूप ठरविणे.

(६) योजनेच्या प्रत्येक अवस्थेमध्ये अंमलबजावणीच्या कामी किती प्रगती झाली याचा आढावा घेणे आणि त्यावरून धोरणात व कारभारात कोणत्या सुधारणा करणे आवश्यक असल्याचे आढळून आले त्याविषयी शिफारशी करणे.

(७) विकासाचा कार्यक्रम, चालू धोरणे व उपाययोजना आणि प्रचलित आर्थिक परिस्थिती यांचा विचार करता अथवा केंद्रीय वा प्रांतिक सरकारांकडून सल्ल्याखातर पाठविल्या गेलेल्या प्रश्नाची तपासणी करता, किंवा स्वतःकडे सोपविलेली कामे पार पाडणे सोयीचे व्हावे याकरिता, योग्य वाटतील त्या अंतरिम अथवा आनुषंगिक शिफारशी करणे.

## रचना व कामकाजाची पद्धत

नियोजन-मंडळाचे एक अधिकारी श्री पी. पी. आगरवाल यांनी 'इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह जर्नल' मध्ये नुकताच एक लेख नियोजन-मंडळाविषयी लिहिला असून त्या मंडळाची रचना व कामकाजाची पद्धत वर्णिलेली आहे. त्यांच्या लेखातून पुढील उतारा घेतला आहे :

"नियोजन-मंडळामध्ये सध्या आठ सभासद आहेत : पंतप्रधान (अध्यक्ष), उपाध्यक्षासह पूर्ण वेळ काम करणारे चार सभासद आणि केंद्र सरकारातील नियोजन, अर्थ आणि संरक्षण या तीन खात्यांचे मंत्री, नियोजनमंत्र्यांना साह्य करण्यासाठी एक उपमंत्री व पार्लमेंटरी सेक्रेटरी असतात. मंत्रिमंडळाचे सांख्यिकीय सल्लागार हे वस्तुतः कमिशनचे आणखी एक सभासद आहेत.

मंडळाचे सर्व सभासद सामुदायिकरीत्या कामकाज पाहतात; परंतु सोयीसाठी प्रत्येकाकडे एक-दोन विषय सोपविलेले असून त्या विषयातील प्रश्नांच्या अभ्यासाबाबत तो तो सभासद मार्गदर्शन करतो. उपाध्यक्षांकडे मुख्यतः सर्वसाधारण एकसूत्रीकरणाचे व कारभारविषयक कामकाज असते. नियोजन-मंत्र्यांकडे इतर सभासदांप्रमाणे काही विषय सोपविलेले असतात; परंतु मंत्रिमंडळाला व संसदेला एकूण नियोजन-मंडळाच्या कामकाजाबाबत ते जबाबदार असतात. अर्थमंत्र्याकडे नियोजन-मंडळाचे सभासद या नात्याने येणाऱ्या कामाशिवाय ज्या महत्त्वाच्या प्रकरणात खर्चाची बाब अंतर्भूत असते आणि ज्याचा आर्थिक धोरणावर परिणाम होण्यासारखा असतो ती प्रकरणेही सोपविलेली असतात.

धोरणविषयक सर्वगोष्टी नियोजन-मंडळाच्या सभेपुढे विचारार्थ मांडल्या जातात. सर्व सभासदांनी मिळून विचार करावयाच्या गोष्टींमध्ये पंचवार्षिक व प्रतिवार्षिक योजना बनविणे व त्यांची प्रगती याविषयीच्या शिफारशी, त्या योजनेमध्ये फेरफार करणे, योजनातील धोरणांमध्ये फरक घडवून

आणणाऱ्या गोष्टी, मंत्रिमंडळापुढे यावयाच्या प्रकरणाबाबत एखाद्या केंद्रीय खात्याला सल्ला देणे, केंद्रीय खात्याशी अगर प्रांतिक सरकाराशी ज्या गोष्टीत काही करारमदार करावयास हवेत अशा गोष्टी, मंडळाच्या सभासदांमधील मतभेदाचे मुद्दे, आणि नियोजन-मंडळाच्या अंतर्गत कार्यपद्धतीविषयी व संघटनेविषयी धोरण ठरविणे इत्यादींचा समावेश होतो."

## नियोजन यंत्रणेची वैशिष्ट्ये

भारतातील नियोजन यंत्रणेची कांही वैशिष्ट्ये श्री आगरवाल यांनी आपल्या लेखात पुढीलप्रमाणे विशद केली आहेत:—

"नियोजन-मंडळाची स्थापना अनेक मंत्रि-सभासदांची एक संघटना अशा स्वरूपात झालेली आहे. नेहमीप्रमाणे एकावयवी खात्यासारखी ती करण्यात आलेली नाही. अशा स्वरूपाच्या रचनेमुळे सरकारशी व्यवस्थित संबंध ठेविण्याचे काम नीट पार पडते. जरी नियोजन आणि विकास यांविषयी सरकारास सल्ला देणारी संघटना असे नियोजन-मंडळाचे स्वरूप आहे तरी त्यात सरकारच्या प्रतिनिधींचा समावेश केलेला आहेच. मंडळाचे अध्यक्ष महामंत्री हेच आहेत आणि नियोजनमंत्री, अर्थमंत्री व संरक्षणमंत्री असे केंद्रीय मंत्रिमंडळाचे तिघे सभासद मंडळामध्ये आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळाचे चिटणीस हे मंडळाचे चिटणीस म्हणून काम पाहातात. मंडळाचे उपाध्यक्ष आणि संबंधित सभासद जेव्हा आवश्यकता असेल तेव्हां कॅबिनेटच्या व त्यांच्या उपसमित्यांच्या बैठकींना निमंत्रणावरून उपस्थित राहतात. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निरनिराळ्या खात्यात उद्‌भवणाऱ्या महत्त्वाच्या आर्थिक समस्यांचा विचार होण्यापूर्वी प्रारंभी नियोजन-मंडळामध्ये त्यांचा विचार केला जातो. नियोजन-मंडळाच्या बैठकीमध्ये त्या त्या खात्यातून संबंधित अधिकारीसुद्धा उपस्थित असतात. अशा रीतीने विविध कल्पनांचा व सूचनांचा ओघ सतत मंडळाकडून सरकारकडे आणि उलट दिशेनेही वाहता राहातो. त्यामुळे मंडळाच्या शिफारशीमध्ये वास्तवता अधिक येते आणि सरकारी कारभारात नवीन जोम येतो.

केंद्रीय नियोजन-मंडळ ही काही बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण संघटना आहे. राज्यकारभार-शास्त्राच्या दृष्टीने सरकारी कार्यक्षेत्रामध्ये अलीकडील काळात नियोजन-मंडळाच्या वाढीइतकी सर्वसाधारण अगर व्यावहारिक दृष्ट्या महत्त्वाची दुसरी एखादी घटना घडलेली दाखविता येण्यासारखी नाही. नियोजन आणि विकास या विषयींचे राष्ट्रीय विचारकेंद्र असेच मंडळाच्या संघटनेचे स्वरूप आहे. या शिवाय वेळोवेळी नियोजन-मंडळाने राष्ट्रीय नियोजनामधून उद्‌भवणारी काही प्रत्यक्ष कामेही हाती घेतलेली आहेत. उदाहरणार्थ : समाज-विकास-प्रकल्पावर देखरेख ठेवणे आणि त्याबाबत सर्वसाधारण मार्गदर्शन करणे, पंचवार्षिक योजना पार पाडण्याच्या कामी जनतेचे सहकार्य संपादणे वगैरे. अर्थात समाज-विकास-प्रकल्पाचे खाते प्रथमपासूनच स्वतंत्र संघटनेसारखे विकसित होत गेले आणि आता ते निराळे झालेही आहे. नियोजन-मंडळ सरकारला आर्थिक विकासाबाबत सल्ला देण्यासाठी जरी निर्माण झाले असले तरी विकासाखेरीज इतर सार्वजनिक विषयातील धोरणाबाबतही त्याचा सल्ला प्रभावी ठरतो आणि एका अर्थी त्याच्या कार्यकक्षेमध्ये सर्व राज्यकारभाराचा समावेश होतो."

नियोजन-मंडळाकडे त्याच्या स्थापनेच्या वेळी सोपविलेली कामे आणि त्याची विशिष्ट रचना व कार्यपद्धती लक्षात घेऊन, या ठिकाणी नियोजन-मंडळ कितपत यशस्वी झाले आणि त्याच्या अपयशाची कारणे कोणती याचा विचार करावयाचा आहे.*

* *केसरी*, १०–८–१९५८ (अहमदाबाद येथील हॅरॉल्ड लास्की इंस्टिटयूट ऑफ पोलिटिकल सायन्स येथे २४ मार्च १९५८ रोजी दिलेल्या लास्की स्मारक व्याख्यानाचा अनुवाद)

## २

आर्थिक व्यवहाराचा, नियंत्रणाचा व मार्गदर्शनाचा व्यापक संघटनात्मक प्रयत्न असे नियोजनाचे वर्णन मी पहिल्या लेखात केले आहे. या सर्वव्यापी प्रयत्नामध्ये सरकारच्या बहुतेक सर्व यंत्रणेला, खाजगी व्यक्तींना व बिनसरकारी संघटनांना निरनिराळ्या पातळ्यांवर मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे लागते. या सर्व नियोजनविषयक प्रयत्नांच्या अग्रभागी नियोजन-मंडळ आहे असे मानले पाहिजे.

### दोन योजनांमधील भिन्नता

नियोजन-मंडळाच्या कार्याचे मूल्यमापन करताना पहिल्या पंचवार्षिक योजनेची पूर्वतयारी व अंमलबजावणी यांचा विचार दुसऱ्या योजनेहून वेगळा करणे योग्य होईल. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये ज्याला खरोखर नियोजनाचा प्रयत्न असे म्हणता येईल, तो विशेष प्रमाणात नव्हताच, असे माझे मत असल्याकारणाने वरीलप्रमाणे दोन योजनांचा निरनिराळा विचार करणे मला आवश्यक वाटते. दुसरी पंचवार्षिक योजना तयार करून तिच्या अंमलबजावणीस प्रारंभ करतानाच नियोजनाचा असा प्रश्न प्रथम हाताळला जाऊ लागला, म्हणून भारतीय नियोजन-मंडळाची कामगिरी व जुनी आणि भावी कार्यशक्ती यांच्या मूल्यमापनासाठी माझ्या मताने १९५५ पासूनचा अनुभव विशेष उपयुक्त ठरतो. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीविषयी येथे विस्ताराने लिहिण्याचा माझा उद्देश नाही. सर्वसाधारणपणे या कालावधीतील नियोजन विषयक अनुभव आणि नियोजन-मंडळाचे कार्य या बाबत सारांशाने पुढीलप्रमाणे मांडणी करता येईल. योजनेच्या पूर्वतयारीचेच दोन भाग कल्पिता येतात. पहिला, नियोजनाच्या प्रश्नाचे स्वरूप ठरविणे, भारतातील नियोजनविषयी योग्य दृष्टिकोन आखणे आणि योजनेचा आराखडा तयार करणे; दुसरा भाग कार्यक्रम, इष्टांक व खर्चाचे, त्याचप्रमाणे करवसुली, कर्जे, परकी मदत इत्यादींचे अंदाज तपशीलवार ठरविणे आणि एकूण प्रक्रियेमध्ये अंतर्भूत असलेले आर्थिक धोरणाविषयीचे निर्णय स्पष्टपणे निर्देशिणे.

### नियोजन-मंडळाने केलेले मुख्य कार्य

पहिल्या भागाच्या बाबतीत भारतीय नियोजन-मंडळाचे कार्य विशेष वरच्या दर्जाचे झाले हे सर्वानुमते मान्य करण्यात आलेले आहे. विशिष्ट कालावधीतील परिस्थितीचा विचार करून तात्काळ अंमलात आणण्याच्या धोरणाचा विचार करणारे लिखाण तो कालावधी संपल्यावर पडताळून पाहणे, ही त्या लिखाणाची खरी परीक्षा. असल्या परीक्षेवरून पहिल्या पंचवार्षिक योजनेचा अहवाल उत्कृष्ट ठरतो. १९५१ च्या रिपोर्टातील अन्नधान्यविषयक धोरणाचे प्रकरण मला पुनः लक्षपूर्वक नुकतेच वाचावे लागले. तेव्हा अन्नधान्यविषयक प्रश्नाचे विवेचन व त्याच्या सोडवणुकीचा योग्य दृष्टिकोन प्रस्तुत अहवालात अर्थपूर्ण पद्धतीने मांडलेला आढळला. त्यात १९५१ मधील परिस्थितीचे यथायोग्य विश्लेषण तर केलेले आहेच; पण भारतातील अन्नधान्यविषयक प्रश्नाच्या प्रमुख व कायमच्या समस्यांचा जसा विचार केलेला आहे त्यापेक्षा अधिक चांगला तर नंतर कोठे केलेला मला आढळला नाही.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभाच्या वेळी सविस्तर कार्यक्रम-इष्टांक वगैरे आखणे एका अर्थाने फार सोपे होते. केंद्रीय व प्रांतिक सरकारांनी आधीच अनेक कामे व योजना हाती घेतलेल्या होत्या. त्या सर्वांना व्यवस्थित व एकसूत्री स्वरूप देऊन, काही काटछाट करून, आणि अगदी क्वचितच थोडी भर घालून त्यांची एकत्र यादी करण्याचे काम नियोजन-मंडळास यावेळेस करावे लागले. निरनिराळ्या

प्रांतांनी व केंद्रीय खात्यांनी आधीच हाती घेतलेल्या कार्यक्रमाच्या व प्रकल्पाच्या गर्दीमध्ये काही शिस्त व प्रमाणबद्धता निर्माण करण्याचे ते काम होते असे म्हणता येईल. आधीच हाती घेतल्या गेलेल्या कामाच्या विविधतेमुळे त्यात फारशी सुसंगती लावता येण्यासारखी नव्हती. तथापि त्या दिशेने जेवढा प्रयत्न करता येईल तेवढा करणे उपयुक्त व आवश्यक होते. आणि त्याबाबतीत नियोजन-मंडळाने पुष्कळ यश संपादले यांत संशय नाही. या तात्कालिक अडचणींच्या वर्णनावरून दिसून येईल की, नियोजन-मंडळाला आपल्या अहवालात मांडलेल्या तात्त्विक दृष्टिकोनाचे व्यावहारिक स्वरूप अजमविण्याचा प्रसंग बहुतेक बाबतीत आला नाही. तेव्हा स्थापनेनंतरच्या दोन वर्षांत नियोजन-मंडळाने केलेले मुख्य कार्य म्हणजे नियोजनाविषयी भारताचा दृष्टिकोन ठरविणे आणि केंद्रीय खात्याच्या व प्रांतिक सरकारांच्या आधीच हाती घेतलेल्या बहुतेक सर्व कामांची पुष्कळशी शिस्तवार सुव्यवस्था लावणे व त्यांत क्वचितच काही नवी खर्चाची कामे घालून धोरणांचे व कार्यक्रमांचे एकसूत्रीकरण करणे हे होय. त्या वेळी नियोजन-मंडळाने प्रांतिक सरकारांना आपापल्या खर्चाच्या योजना सुधारण्याबाबत आणि केंद्राकडे सतत केल्या जाणाऱ्या मागण्या कमी करण्याबाबत योग्य सल्लामसलत देण्याचे बरेच उपयुक्त कार्य केले, असेही सिंहावलोकन करताना आढळून येते. काही राज्यांना स्वतःच जास्त उत्पन्न वाढविण्याची जबाबदारी घेण्याला प्रवृत्त करण्याबाबतही नियोजन-मंडळाच्या वजनाचा उपयोग झाला.

## ठळक उणिवा

जनमनात नियोजनाचे महत्त्व ठसविण्याचे कार्य नियोजन-मंडळाने पार पाडले असेही नेहमी सांगितले जाते. परंतु या विधानाचा अर्थ लावताना बराच सावधपणा बाळगला पाहिजे. कारण वर सांगितल्याप्रमाणे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये नियोजनविषयक विविध प्रश्न उपस्थित झाले ते फक्त तात्त्विक पातळीवर. एकतर योजनेचा आकारच नेमस्त होता, व एकंदर सार्वजनिक खर्च फारसा मोठा नव्हता. महायुद्धाच्या व युद्धोत्तरकालातील राष्ट्रीय बचत, करवसुली, सरकारी कर्जे, बाहेरून मिळालेली मदत, यांची तुलना केली असता पहिल्या पंचवार्षिक योजनेत ही विशेष मोठ्या प्रमाणात वाढविलेली दिसत नाही. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा प्रारंभकाल विशिष्ट पद्धतीच्या संक्रमणावस्थेचा होता. १९४४ पासूनच्या कालात हिंदुस्थानामध्ये निरनिराळ्या बाबतीत अर्थव्यवस्थेचे नियंत्रण व मार्गदर्शन सरकारने हाती घेतलेले होते. नियंत्रणाचा सार्वत्रिक अंमल सुरू होऊन एक यंत्रणा उभारली गेली होती; ती १९४८ मध्ये मोडण्याचा प्रयत्न करण्यात आला, पण तो यशस्वी होऊ शकला नाही. आर्थिक व्यवहाराचे नियंत्रण करण्यासाठी कायदेशीर व इतर अनेक प्रकारची उपाययोजना यामुळेच आधीच अस्तित्वात होती; परंतु युद्धकालीन अर्थव्यवस्थेत अनुभविलेल्या निरनिराळ्या अडचणींशी त्या उपाययोजनांचा संबंध पुढाऱ्यांच्या व लोकांच्या मनांत पक्का जडला गेला. त्यामुळे जरी नियोजन-मंडळाने विनियंत्रणाची मागणी मान्य केली नाही, किंबहुना नियंत्रणविषयक उपाययोजना चालू ठेवण्याचे तात्त्विक समर्थन उत्तम रीतीने केले तरी त्याचा प्रभाव राजकारणी व इतर पुढाऱ्यांवर फारसा पडू शकला नाही. शिवाय, यांतील सार्वजनिक कार्यक्षेत्राच्या विस्तारासारख्या महत्त्वाच्या भागांस पुष्कळशा खाजगी हितसंबंधियांचा उघड विरोध होता. अशा स्थितीत जनमनात नियोजनाचे महत्त्व ठासविण्याचे कार्य पार पडू शकले, ते मुख्यतः नवी परिभाषा रूढ करण्यापुरते व काही अपेक्षा वाढविण्यापुरते होय. नियोजनाच्या प्रयत्नाचा व्यापक व संपूर्ण अर्थ लोकांना अगर त्यांच्या पुढाऱ्यांना समजावून देण्याच्या दिशेने त्या कार्याची प्रगती होऊ शकली नाही.

पहिल्या पंचवार्षिक योजनेची आखणी करताना नियोजन-मंडळाने योजनेच्या अंमलबजावणीची यंत्रणा व पद्धती यांजकडे विशेष लक्ष दिले नाही. सार्वजनिक क्षेत्रामध्ये कोणतेही मोठे अगर क्रांतिकारक

स्वरूपाचे कार्य सुचविण्यात आले नाही. खाजगी क्षेत्रांमधील उद्दिष्टांक पूर्णपणे शिफारसवजा मानण्यात आले; ज्याखातर अंमलबजावणीचे विशेष अधिकार आवश्यक वाटावे, इतके मोठे कार्य कोणत्याही दिशेने योजिलेच नाही. त्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेचेही स्वरूप मुख्यतः सार्वजनिक खर्चाचा एक नेमस्त स्वरूपाचा कार्यक्रम असे बनले. खाजगी क्षेत्रासाठी केलेल्या योजनेतील शिफारशी बंधनकारक नव्हत्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील कार्यक्रमाशी त्यांचा अभेद्य किंवा निकटचा संबंधही नव्हता.

वरील अभिप्राय लहान उद्योगधंद्यांच्या क्षेत्रामधील परिस्थितीचे उदाहरण देऊन स्पष्ट करता येईल. या क्षेत्रामध्ये नियोजित विकासाविषयी अत्यंत अवघड असे प्रश्न उपस्थित होतात. सर्व आधुनिक व संघटित क्षेत्रांमधील मोठे खाजगी उद्योगधंदे स्वतःची काळजी पूर्णपणे घेऊ शकतात. परंतु सर्व प्रकारचे छोटे खाजगी उद्योगधंदे मात्र अनेकवेळा असहाय्य असलेले आढळतात. पहिल्या पंचवार्षिक योजने-मध्ये या परिस्थितीतून उद्भवणाऱ्या समस्येचे तात्त्विक स्वरूप व्यवस्थित मांडलेले आढळते आणि प्रत्येक उद्योगातील सर्व प्रकारच्या लहान-मोठ्या घटकांसाठी एक सर्व संग्राहक उत्पादनाचा कार्यक्रम ठरविला जावा असेही तीत सुचविण्यात आले. तथापि जे कार्यक्रम आधीच सुरू झालेले होते, त्यांना आशीर्वाद देण्यापलीकडे प्रत्यक्ष व्यवहारात नियोजन-मंडळाने स्वतः काही आखले अगर घडवून आणले नाही, असे म्हटले तरी चालेल.

## उपेक्षेची उदाहरणे

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अहवालात पुरस्कारलेली महत्त्वाची तत्त्वेही नियोजन-मंडळाने व्यवहारात कशी उपेक्षिली हे प्रत्यक्ष उदाहरणे देऊन दाखविता येईल. योजनेमध्ये भारतातील धान्यविषयक प्रश्नांचे विवेचन मूलग्राही पद्धतीने केले आहे असे मी वर सांगितलेच आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणी योग्य रीतीने मांडलेले धोरण पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी संपण्यापूर्वीच कोलमडले आणि त्याबाबतीत नियोजन-मंडळ पूर्णपणे अगतिक ठरले. योजनेच्या काळात या धोरणाची सालोसाल जी घसरगुंडी होत होती, ती नियोजन-मंडळाच्या ध्यानात तरी आली किंवा नाही कोण जाणे! योजनेमधील दुसऱ्या धोरणविषयक शिफारशीचे उदाहरणही असेच देता येते. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अहवालात आर्थिक व्यवहारावरील नियमनाचे मुख्य साधन म्हणून किमतीच्या नियंत्रणाचा निर्देश केलेला आहे. किमतीचे सर्वांगीण नियंत्रण किती आवश्यक आहे व हे केल्याने भांडवल व इतर साधने यांचा विनियोग योजनेतील उद्दिष्टानुसार कसा घडून येईल हे मंडळाच्या अहवालातील परिच्छेद ५३ ते ७३ यांत स्पष्ट दाखविले आहे. विशेषतः अन्नधान्याच्या किमतीवरील नियंत्रण ठेवण्या-बरोबर इतर ठिकाणच्या किमतीवरही त्यांच्या जोडीने नियंत्रण घालण्याचे महत्त्व अहवालात पूर्णपणे प्रतिपादिलेले होते. या सर्व बाबतीतील योजनेमधील विचारपूर्वक सूचना पाहता, प्रत्यक्ष परिस्थिती कसकशी पालटते ते नियोजन-मंडळ दक्षतापूर्वक पाहात राहील अशी अपेक्षा निर्माण झाली होती. योजना तयार झाली त्यावेळी भारतातील किमती चलनवृद्धीमुळे चढीच्याच होत्या. परंतु योजना प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षाच्या आत किमती खाली आल्या आणि योजनेचा कालावधी संपेपावेतो बहुतांशी चलनवृद्धीचा प्रभाव पुन्हा त्यावर पडला नाही. मात्र त्या स्थिरावल्या नाहीत. सालोसाल त्यांत वाढ आणि घट बऱ्याच प्रमाणात होत राहिली आणि योजनेचा कालावधी संपता संपता शेतमालाच्या किंमती बऱ्याच खालावल्या होत्या. या सर्व घडामोडी चालू असता किमती फार चढल्या तरच त्याबाबत काही करणे आवश्यक आहे, त्या घसरू लागल्यास त्यांजकडे लक्ष देण्याचे कारण नाही, अशा वृत्तीने भारत सरकार वागले. किमतीच्या हालचालीविषयी सरकारने विशिष्ट धोरण स्वीकारावे म्हणून नियोजन-मंडळानेही आग्रह धरलेला दिसला नाही. नियोजन मंडळाने साधनसंपत्तीचा योग्य विनियोग

घडवून आणण्यासाठी किंमतनियंत्रणाचे जे महत्त्व मानले होते त्याकडे पाहता शेतमालाच्या किंमतीतले हे मोठ्या प्रमाणावील चढउतार नियोजन-मंडळास अस्वस्थ करतील असे होते.

तसेच पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत इतर प्रश्नांसंबंधी जे नवीन विचार देशात स्पष्टपणे बनत होते त्याबाबत नियोजन-मंडळाने प्रत्यक्ष काही केले नाही. या प्रवृत्तीचे नेतृत्व तर केव्हाच केले नाही. जुन्या लहान प्रमाणातील घरगुती उद्योगधंद्यांना संरक्षण देणे अथवा त्यासाठी कार्यक्षेत्र राखून ठेवणे ही या कालातील एक महत्त्वाची समस्या होती. याबाबतीत सरकारने अचानक जे धोरण स्वीकारले ते प्रामुख्याने काही राज्यांमधील राजकीय पुढाऱ्यांच्या दडपणामुळेच. शेतकी कर्जाबाबतीतही रिझर्व्ह बँकेने प्रमुखत्वाने हालचाल केली. रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या ग्रामीण-कर्जपाहणीच्या मार्गदर्शन समितीच्या शिफारशीत समाविष्ट झालेल्या पुष्कळशा सूचनांचा उगम तत्पूर्वीच्या नियोजन-मंडळाच्या शेतकीविषयक उपसमित्यांमधील चर्चेत झाला होता असे आढळून येते. नियोजन-मंडळाच्या या उपसमित्यात प्रारंभी काही काळ बरीच उपयुक्त चर्चा झाली होती, परंतु पहिली योजना तयार झाल्यानंतर उपसमित्यांच्या बैठकी थांबल्या.

तेव्हा नियोजन-मंडळाचे विचारमंथनाचे व नियोजनविषयक संघटनात्मक जे कार्य झाले ते केवळ योजनेच्या आखणीपूर्वीच झाले हे उघड आहे. योजना तयार होऊन प्रसिद्ध झाल्यावर नियोजन-मंडळ सुप्तावस्थेत गेले आणि निरनिराळ्या केंद्रीय खात्यांच्या व राज्यांच्या संबंधांत सर्वसाधारण संगती साधणे व देखरेख ठेवणे एवढेच त्याचे कार्य उरलेले दिसले.*

## ३

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पूर्वतयारीचे काम नियोजन-मंडळाने व्यवस्थित केले. पण योजना प्रसिद्ध होताच जणू काही मंडळ निवृत्त झाले असे मी वर म्हटले आहे. हे वर्णन चुकीचे नाही असे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेबाबत काय घडले हे पाहाता दिसून येईल. नियोजन-मंडळ १९५४ च्या शेवटी पुन्हा कामाला लागले. दुसऱ्या योजनेची तयारी हा नियोजन-मंडळाच्या कामातला आणखी एक महत्वाचा टप्पा मानता येईल. निरनिराळ्या कमिट्या व पोटकमिट्या यांचे मार्फत ते काम नियोजन-मंडळाने निःसंशय चांगले केले. नियोजन-विषयक प्रश्नांबाबत नियोजन-मंडळाने जसा पहिल्या योजनेच्या काळी यथायोग्य दृष्टिकोन आखला होता, तसाच तो दुसऱ्या योजनेच्या वेळीही पुष्कळ अंशी आखला.

### नियोजनातील निर्णायक शक्ती

दुसरी पंचवार्षिक योजना तयार करण्याच्या कामी निरनिराळ्या व्यक्तींनी व संघटनांनी नेमका कोणता भाग उचलला होता हे माझ्यासारख्या बाहेरील व्यक्तीला निश्चित सांगणे कठीण आहे. परंतु त्यावेळी प्रा. महालनवीस हे नियोजन-मंडळाचे रीतसर अगर वास्तविक सभासदही नसताना त्यांनी सुरुवातीच्या घडामोडीत महत्त्वाचा भाग घेतलेला होता असे हाती आलेल्या एकूण माहितीवरून दिसून येते. योजना किती मोठी असावी व तिची बांधणी अथवा रचना कशी असावी याविषयी मूलभूत स्वरूपाचे निर्णय प्रारंभी घ्यावयाचे होते. दरसाल १ हजार कोटी रुपये खर्च होतील एवढी मोठी

* केसरी, १७–८–१९५८.

योजना असावी असे ठरविण्यात अनेक दूरगामी व मूलग्राही स्वरूपाचे निर्णय अभिप्रेत होते. योजनेच्या आकाराविषयी निर्णय कोणी, केव्हा व कोणाच्या सल्ल्याने अगर आग्रहाने केला हे माहीत नाही. हा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने केला की नियोजन-मंडळात त्याचा उगम झाला किंवा महामंत्री किंवा अर्थमंत्री अगर त्यांचे कुणी सल्लागार यांपैकी कोणी व्यक्तींनी तो खरोखर केला हे कळलेले नाही. योजनेच्या रचनेविषयी झालेल्या दुसऱ्या मूलभूत स्वरूपाच्या निर्णयामध्ये निरनिराळ्या कार्यक्षेत्रांचा वाटा व विशिष्ट कार्यांची महत्त्वश्रेणी यांचा समावेश अभिप्रेत होता. यावेळी काही भारी उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर वाढविण्यावर भर दिला गेला. त्यात अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन विकासाचा मार्ग कोणता असावा हे अभिप्रेत होते. योजनेतील निरनिराळ्या उद्दिष्टांची वस्तुनिष्ठ व संगतवार मांडणी करणे हाही एक महत्त्वाचा उपक्रम होता.

अशा वस्तुनिष्ठ पद्धतीने उद्दिष्टांकांची मांडणी करता येते हा काही नवा शोध म्हणता येत नाही. तशी मांडणी करण्याबाबत डॉ. के. एन. राज यांनी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी केलेली सूचना नियोजन-मंडळाच्या दफ्तरात नमूद आहे. वरील उपक्रमात नावीन्य होते. ते उपलब्ध माहिती वापरून, आकडे जरी ढोबळ असले तरी एकूण योजना वस्तुनिष्ठ स्वरूपात प्रत्यक्ष मांडण्यामध्ये होते. अशा मांडणीसाठी जरूर ती तांत्रिक तज्ज्ञता नियोजन-मंडळाच्या अधिकारीवर्गातच उपलब्ध होती हे उघड आहे. परंतु योजना किती मोठी असावी, तिची रचना कशी असावी, व ती कशी मांडून दाखवावी, हे सूत्रबद्ध पद्धतीने आपल्या आराखड्यात व्यक्त करण्याचे काम प्रा. महालनवीस यांनी त्यांच्या मोक्याच्या वैयक्तिक स्थानामुळे स्वतः पुढाकार घेऊन केले होते; त्यांचे हे काम मुख्यतः सूत्रीकरणाचेच. पुढील काळात जरी ते नियोजन-मंडळाचे वस्तुतः सभासदच गणले गेले तरी त्यांना विशेष असे काही करता आले नाही यावरून ही गोष्ट स्पष्ट होते.

## योजनेच्या आखणीतील उणीवा

खुद्द नियोजन-मंडळाने दुसरी योजना तयार करण्यास मंडळ या नात्याने प्रत्यक्ष कोणता भाग घेतला हे सांगणे कठीण आहे. तरी योजनेच्या तयारीचे मुख्य श्रेय नियोजन-मंडळालाच देणे उचित होईल. मात्र ते देताना मंडळाची ही कामगिरी कशी मर्यादित स्वरूपाची होती हेही लक्षात घेतले पाहिजे. पहिल्या योजनेप्रमाणे दुसरीतही आपल्या पुढील समस्यांचे यथार्थ दर्शन व त्या सोडविण्याबाबत योग्य मार्गदर्शन ही कामे उत्कृष्ट रीतीने करण्यात आली. या बाबतीतसुद्धा एक महत्त्वाचा फरक नमूद करावयास हवा. पहिल्या योजनेत तात्त्विक विवेचन करताना तपशीलाचा विचार मोठ्या प्रमाणात करण्याची आवश्यकता नव्हती. दुसऱ्या योजनेचा मात्र विस्तार मोठा व रचना हेतुतः निराळी केलेली, यामुळे तात्त्विक विवेचनाची सांगड तपशीलाशी घालण्याची जबाबदारी मंडळावर येऊन पडली. खरोखर या जबाबदारीमुळे योजनेची मांडणी अधिक स्पष्ट व अर्थपूर्ण व्हावयास हवी होती. पण तशी ती न होता उलट अस्पष्ट व अनिश्चित अशी झाली, ही गोष्ट कदाचित पुढे घडलेल्या घटनांचे पूर्वचिन्हच म्हणता येईल. अन्नधान्याचा प्रश्न, किमती, अथवा नियंत्रणे यांसारख्या कोणत्याही महत्त्वाच्या बाबतीतील धोरणाविषयीचे पहिल्या योजनेतील विवेचन दुसऱ्याशी ताडून पाहिले असता वरील विधानाची यथार्थता लक्षात येईल.

दुसरे असे की, उद्दिष्टांकांची व इतर आकड्यांची मांडणी दुसऱ्या योजनेमध्ये अधिक सुसंबद्ध केलेली होती. परंतु योजनेतील वस्तुनिष्ठ उद्दिष्टांक अथवा त्याचे पैशांतील हिशेब शास्त्रशुद्ध तपासणी करून अंदाजलेले नव्हते ही गोष्ट सुरुवातीला स्पष्ट झाली होती. त्यामुळे सर्वदेशीय ढोबळ अंदाजांचा तांत्रिक आराखडा एवढेच या नवीन मांडणीचे स्वरूप ठरले. जरी हे आकडे शास्त्रीय रीतीने निरनिराळ्या

स्तंभांत व चौकटीत मांडून दाखविले तरी ते योग्य तपासणी करवून पारखून घेतलेले नसल्यामुळे व्यावहारिक दृष्ट्या त्यांत कांही विशेष अर्थ नव्हता. अर्थात मोठमोठ्या धरणयोजनांसारख्या सरकारी कामाच्या खर्चाचे अंदाज हे इतर सर्वसाधारण सरकारी कामासाठी व्हावयाचा खर्च व खाजगी क्षेत्रांतील खर्च यांच्या अंदाजाहून निराळ्या प्रकाराचे होते. काही फार मोठ्या सरकारी योजनांच्या खर्चांची आखणी काळजीपूर्वक तपासणीनंतर केलेली दिसली. एखाद्या वेळेस या बाबतीतही हे घडले नसावे. उदाहरणार्थ, राज्यपुनर्रचनेमुळे जो एक नवा विभाग आपल्या राज्यात समाविष्ट झाला त्यातल्या एका मोठ्या धरणयोजनेला दुसऱ्या योजनेमध्ये मंजुरी मिळालेली असतानाही तिची जागासुद्धा ठरलेली नव्हती असे एका राज्याच्या चीफ इंजिनिअरने मला सांगितले. सर्वदेशीय ढोबळ अंदाज, काही अंशी सुरुवातीस तरी, काल्पनिकच असणार, हे एकंदर कामाचा व्याप व गुंतागुत पाहता अपरिहार्य असेल. तथापि योजनेचा आकार व रचना ठरल्यानंतर ताबडतोब वस्तुनिष्ठ उद्दिष्टांक व त्यांचे पैशांतील हिशेब मुळातून शास्त्रशुद्ध पद्धतीने तपासावयास हवे होते. ही महत्त्वाची तपासणी करणे नियोजन-मंडळाला जमले नाही. तेथूनच मंडळाच्या खऱ्या अपयशाला सुरुवात झाली.

## शास्त्रशुद्ध दृष्टीचा अभाव

पहिल्या योजनेतील सरकारी कार्यक्रमाचे स्वरूप नेमस्तच होते, त्याच्या अंमलबजावणीसाठी वस्तुनिष्ठ उद्दिष्टकांची तपशीलवार तपासणी करावी लागली नव्हती आणि त्यावेळी नियोजनाचे असे सविस्तर तंत्र बनविणे आवश्यक ठरले नव्हते. ही गोष्ट ध्यानात घेतली म्हणजे नियोजन-मंडळाच्या वर निर्देशिलेल्या अपयशाचे स्वरूप नक्की लक्षात येते. दुसरी योजना फार मोठी व तिची रचनाही निराळी व दूरगामी, यामुळे निर्माण झालेल्या नव्या गरजा नियोजन-मंडळ भागवू शकले नाही असा या अपयशाचा अर्थ होतो.

दुसऱ्या योजनेची व्याप्ती मोठी असल्याने तिच्यातील उद्दिष्टांक वस्तुनिष्ठ असणे आवश्यक होते. तसेच त्या उद्दिष्टकांचा पैशातील हिशेबही वास्तव असावयास हवा होता. त्या हिशोबाप्रमाणे खर्च भागविण्यासाठी रक्कम तर उभी करणे आवश्यक होते, परंतु जे उद्दिष्ट साधावयाचे ते व्यवहार्य आहे की नाही हेही वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहावयास हवे. त्यासाठी सर्व कार्यक्रमाची तपशीलवार व सर्वांगीण तपासणी करणे भाग होते. वस्तुनिष्ठ उद्दिष्टांक व त्यासाठी योजिलेल्या रकमा यांचे परस्परांशी नेमके समीकरण होते की नाही हे पाहणे आवश्यक होते. याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे सर्व प्रकारचे वस्तुनिष्ठ अंदाज एकमेकांशी सुसंगत आहेत की नाही हे पाहणे. उदाहरणार्थ, योजनेतील सर्व कार्यक्रमांसाठी एकंदर पोलाद व सीमेंट किती लागेल याचा अंदाज काळजीपूर्वक करावयास हवा होता. त्या अंदाजानुसार पोलादाचे व सीमेंटचे उत्पादन वाढवून आणि आयात करून पुरवठा पुरा पडेल की नाही याची तपासणी व्हावयास हवी होती. उद्दिष्टांकांची तपासणी करताना सरकारी व खाजगी क्षेत्रांमध्ये मेळ घालण्याच्या दृष्टीने काय करावे लागेल तेही पाहणे जरूर होते. उत्पादन, आयात, निर्यात इत्यादींचे जे वस्तुनिष्ठ उद्दिष्टांक ठरविले होते त्यासाठी वाहतुकीची व्यवस्था किती वाढवावी लागेल याचाही अंदाज नीट करावयास हवा होता. योजनेतील वाहतुकीवरचा खर्च पुरेसा आहे की नाही, याविषयी आरंभापासून वाद सुरू झाला होता.

योजनेतील महत्त्वाच्या क्षेत्रांतील वर्गवारी व त्यांतील परस्परसंबंधांचे स्वरूप हे दाखविणे एवढेच कार्य प्रा. महालनवीस यांच्या झटपट आराखड्याने केले. त्यांच्या आराखड्यापैकी कोणताही विशिष्ट उद्दिष्टांक खरोखरी योग्य आहे की नाही हे शास्त्रशुद्ध तपासणीनेच समजण्यासारखे होते. अशी तपासणी तो आराखडा बनविण्यापूर्वी फारच थोडी झाली अशी सर्वसामान्य समजूत आहे. १९५५ च्या एप्रिल-मध्ये नियोजन-मंडळाकडे अर्थशास्त्रज्ञांच्या पॅनेलने जे निवेदन दिले होते त्यातील पुढील उताऱ्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते :—

"अर्थात मांडवलगुंतवणुकीच्या प्रत्येक शीर्षकाखाली ज्या रकमा मांडल्या आहेत त्या तांत्रिक दृष्ट्या अचूक आहेत की नाहीत हे आम्ही सांगू शकत नाही. त्यांची युक्तायुक्तता तंत्रज्ञांकडून सविस्तर तपासणी झाल्याशिवाय ठरविणे शक्य नाही. अशी तपासणी नियोजन-मंडळ येत्या काही महिन्यांत करून घेईल असे आम्ही गृहीत धरतो."

वरील सूचनेप्रमाणे तंत्रज्ञांनी तपासणी केली असे मानण्यास काहीच पुरावा नाही. मूळच्या आराखड्यातील अंदाज व उद्दिष्टांक कितपत युक्तायुक्त होते कोण जाणे. पण त्यांची युक्तायुक्तता जेव्हा योजना अंतिम स्वरूपात प्रसिद्ध झाली तेव्हा वाढली असे काही दिसत नाही. खुद्द नियोजन-मंडळाने शेतकीविषयक अंदाज वरिष्ठांच्या टीकेमुळे अगदी शेवटी शेवटी मोठ्या प्रमाणात वाढविले यावरून उद्दिष्टांकांची वस्तुनिष्ठ मांडणी करताना स्वतःवर पडलेल्या जबाबदारीची जाणीव नियोजन-मंडळात नव्हती हे सिद्ध झाले.

## अपयशाचे मूळ अशास्त्रीय आखणीत

नियोजन-मंडळाच्या पुढील अपयशाची सुरुवात खरोखर येथेच झाली असे माझे मत मी वर सांगितलेच आहे. त्या अपयशाचे खरे कारणही याच ठिकाणी सांपडते. या अपयशाच्या बुडाशी तांत्रिक अकार्यक्षमता असल्याने ते राजकारणी व्यक्तींच्यामुळे ओढविले असे म्हणता येत नाही. या कार्यात निरनिराळ्या केंद्रीय खात्यांचा आणि राज्यांचा फारसा संबंध नव्हता. वेगवेगळ्या क्षेत्रांतील तज्ज्ञ एकत्र आणवून त्यांच्याकडून सर्वांगीण शास्त्रीय तपासणी करून घेऊन आकडे ठरवावयाचे होते. हे काम निःसंशय गुंतागुंतीचे होते आणि ते पूर्णपणे अचूक होणे कठीण होते; परंतु ते केले गेले नाही याबद्दल नियोजन-मंडळाबाहेरील कोणालाही जबाबदार धरता येत नाही. विशेषतः मूळ आराखडा मांडताना त्यातील उद्दिष्टांकांची वस्तुनिष्ठ मांडणी म्हणजे जणू काय नवा शोधच आहे असे भासावे इतकी तिची वाहवा केल्यावर तर वरील अपयशाचे अधिकच आश्चर्य वाटते. आरंभीच्या आराखड्यातील मांडणी नमुन्याखातर असल्याने ती काही अंशी काल्पनिक असली तरी विशेष बिघडले नव्हते. पण ती तशीच्या तशी योजनेच्या अंतिम स्वरूपात ठेवणे केव्हाही योग्य नव्हते; कारण तांत्रिक तपासणी झाल्याशिवाय सुसंगततेच्या अथवा व्यवहार्यतेच्या दृष्टीने या आकड्यांत फारसा अर्थ नव्हता. प्राथमिक आराखड्यात मांडलेल्या अंदाजामुळे ज्या अपेक्षा निर्माण झाल्या त्या नियोजन-मंडळाला, त्याच्या सल्लागारांना व तज्ज्ञांना पूर्ण करता आल्या नाहीत. यामुळे तो आराखडा निरुपयोगी ठरला. एवढेच नव्हे तर या घटनेमुळे, अहेतुतः का होईना, पण ज्या दृष्टिकोनाशिवाय व कार्यपद्धतीखेरीज कोणतेही व्यापक स्वरूपाचे नियोजन पूर्ण होऊ शकणार नाही, तो दृष्टिकोन व ती कार्यपद्धत निष्फळ आहे असा भास निर्माण झाला.

योजनेतील वेगवेगळ्या कार्यक्रमांची महत्त्वश्रेणी कशी ठरवावी याबाबत योग्य निकष निश्चित करण्याच्या कामी हे नियोजन-मंडळ अयशस्वी झाले. उदाहरणार्थ, पहिल्या योजनेमध्ये पाणीपुरवठ्याच्या विद्युतनिर्मितीच्या विविध योजना समाविष्ट करण्यासंबंधी नियोजन-मंडळाकडे निवेदने करण्यात आली होती. त्यावेळी नियोजन-मंडळाला आम्ही अगदी नव्याने सुरुवात करतो असे नाही, असे म्हणणे शक्य होते. पहिल्या योजनेत ज्या कामाचा समावेश झाला ती या ना त्या स्वरूपात आधीच हाती घेतलेली होती असे त्यावेळी सांगण्यात आले. दुसऱ्या योजनेच्या वेळी निरनिराळी कामे हाती घेण्याबाबत कोणकोणते शास्त्रीय निकष लावावे हे ठरविले जाईल, असेही त्यावेळी सांगितले होते. पण त्यावेळी ते घडले नाही. वेगवेगळ्या कामांसाठी कोणकोणते शास्त्रीय निकष असावेत ते नियोजन-मंडळाने एकतर ठरविले नाही, किंवा ठरविलेले असले तर त्यास प्रसिद्धी दिली नाही.

पंचवार्षिक योजनेमध्ये ज्यांचा समावेश होतो त्या सर्व योजना व प्रकल्प शास्त्रशुद्ध कसोट्यांस उतरलेले असतात असे नाही. तसेच तपासणीत योग्य ठरलेले सर्व प्रकल्प व योजना शेवटी मंजूर होतातच असेही नाही. दीर्घकालीन योजनेची आखणी हीच मुळात एक राजकीय प्रक्रिया आहे. कोणत्या तरी दडपणामुळे अगर तडजोड म्हणून योजनेचे स्वरूप व क्रम यांत अनियोजित फरक घडतात. नियोजनाच्या प्रक्रियेचा हा भाग ध्यानात घेतला म्हणजे नियोजन-मंडळाच्या कार्याबाबतची एक महत्त्वाची अडचण स्पष्ट होते. आपले काम शास्त्रीय व तांत्रिक सल्ला देण्याचे आहे असे नियोजन-मंडळाने मानले म्हणजे प्रत्येक कार्यक्रम व एकंदरीने सर्वच शिफारशी जास्तीत जास्त शास्त्रशुद्ध नि निरपेक्ष आणि निर्विकार दृष्टीने तपासून घेण्याचा मंडळाकडून प्रयत्न व्हावा. हे कार्य झाल्यानंतर राजकीय दृष्ट्या व्यवहार्यतेची कसोटी लावून प्रत्यक्ष राज्यकर्ते योग्य ते अंतिम निर्णय करतील. परंतु शास्त्रीय विचार व राजकीय व्यवहार यांची जर गल्लत झाली तर असल्या गुंतागुंतीमुळे दोहोंपैकी कोणता तरी भाग दुर्लक्षिला जाणारच आणि अर्थातच अशा परिस्थितीत शास्त्रीय विचाराकडे दुर्लक्ष व्हावे हे अपरिहार्य ठरणार.

नियोजन-मंडळाची रचना व कार्यपद्धती अशी दिसते की, त्यामुळे शास्त्रीय निरपेक्ष विचाराची उपेक्षा व्हावी. नियोजन-मंडळ व त्याच्या हाताखालील यंत्रणा वेगवेगळ्या प्रकल्पांची तपासणी करताना प्राधान्येकरून राजकीय व्यवहार्यता मनात बाळगताना दिसतात. हे अनिष्ट आहे. याचा असा अर्थ नव्हे की, राजकीय व्यवहार्यतेचा विचार डावलावा अगर डावलणे शक्य आहे. परंतु योग्य निकषानुसार कोणत्या योजना मंजूर व्हाव्या आणि राजकीय तडजोडीखातर अखेर काय घडते, या दोहोंमधील फरक (त्यास प्रसिद्धी न दिली तरी) स्पष्टपणे कळून येणे अत्यंत आवश्यक आहे. ते वरील गल्लतीमुळे अशक्य होऊन बसते.

योजनेतील वेगवेगळ्या कार्यक्रमांचे एकसूत्रीकरण करणे हे वर निर्देशिलेल्या सर्वांगीण शास्त्रीय तपासणीपेक्षाही जास्त सोपे व प्राथमिक स्वरूपाचे काम आहे. उदाहरणार्थ, शास्त्रविशारद अथवा तंत्रज्ञ पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत ही योजनाबद्ध विकासकार्यात उपस्थित होणारी अत्यंत महत्त्वाची नित्याची समस्या आहे. अशा प्रसंगी तंत्रज्ञ इत्यादींच्या वेतनश्रेणी ठरविण्याचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. तंत्रज्ञांचा मुळातच तुटवडा असला म्हणजे सरकारी व निम-सरकारी विविध संघटना व खाती यांच्याकडून आपणास पुरेसे तंत्रज्ञ मिळावे म्हणून हरतऱ्हेने खटपटी होतात. यास आळा घालून, प्रत्येकाची तंत्रज्ञाची मागणी किमान करावयास लावून तंत्रज्ञांच्या वेतन वगैरेच्या शर्ती सर्वत्र सारख्याच राहाव्या असा प्रयत्न होणे जरूर असते. असा प्रयत्न दक्षतापूर्वक केला नाही तर जास्ती पगारांचे अथवा सोयीसवलतींचे आमिष दाखवून निरनिराळ्या संघटना एकमेकांकडून तंत्रज्ञ काढून घेतात. ही बाब सकृद्दर्शनी किरकोळ वाटली तरी नियोजित विकासकार्य सुरळीत चालण्याच्या दृष्टीने तिला अत्यंत महत्त्व आहे. अशा प्राथमिक गोष्टीतही सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न नियोजन-मंडळाने कसोशीने केला नाही हे उघड आहे.*

## ४

### योजनेच्या अंमलबजावणीतील अपयश

नियोजन-मंडळाच्या कामकाजामध्ये दुसरी योजना तयार करण्याच्या वेळी कोणत्या महत्त्वाच्या उणिवा दिसून आल्या हे आतापावेतो पाहिले. योजनेच्या अंमलबजावणीला सुरुवात झाल्यानंतर

* *केसरी*, २४-८-१९५८.

नियोजन—मंडळाच्या अपयशाचे माप जास्तच भारी झाले. प्रथम सर्वदेशीय ढोबळ अंदाज अशा स्वरूपात योजनेची तयारी होते, तिचा विचार केला जातो व तिला मंजुरी मिळते. परंतु अंमलबजावणी करताना इतर कोणत्याही अर्थसंकल्पाप्रमाणे किंवा कार्यक्रमाप्रमाणे या योजनेचाही यथायोग्य तपशील नजरेसमोर आणला पाहिजे. उदाहरणार्थ, वेगवेगळ्या कालखंडांत व निरनिराळ्या प्रदेशांत कोणती कामे करावयाची हे स्पष्ट निर्देशिले पाहिजे. पंचवार्षिक योजनेची विभागणी वार्षिक योजनांमध्ये करावयास हवी आणि त्यांत या प्रतिवार्षिक योजनेत कोणत्या कामासाठी किती खर्च व्हावयाचा व ते काम कोणत्या प्रदेशात व्हावयाचे याची तपशीलवार फोड केलेली असली पाहिजे. वस्तुतः हा मुद्दा अगदी प्राथमिक स्वरूपाचा आहे. पंचवार्षिक योजनेची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी तिचे प्रतिवार्षिक विभाग पाडणे हे काम नियोजन-मंडळाचेच आहे, परंतु ते झाले नाही. याबाबतीत मला संपूर्ण माहिती नाही, पण पंचवार्षिक योजनेची प्रतिवार्षिक विभागणी पूर्णपणे केली नाही, असे उपलब्ध असलेल्या सर्व पुराव्यावरून दिसते.

## परदेशी हुंडणावळीतील दिवाळखोरी

१९५६व १९५७ सालांत परदेशी हुंडणावळीबाबत जे काय घडले, तो वरील पुराव्याचा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. मोठ्या भांडवली मूलभूत उद्योगधंद्यांवर योजनेत भर दिल्याने आयातीची गरज मोठ्या प्रमाणात वाढून परदेशी हुंडणावळीची तरतूद करणे कठीण होणार हे आरंभीच पूर्णपणे लक्षात आलेले होते. परदेशी हुंडणावळ आपणापाशी पुरेशा प्रमाणात टिकून राहावी म्हणून निर्यातीला उत्तेजन दिले पाहिजे व आयातीवर निर्बंध घातला पाहिजे किंवा शक्यतो आयात करणे टाळले पाहिजे, या गोष्टी पहिल्या योजनेच्या वेळीच तत्त्वतः मान्य करण्यात आल्या होत्या. पहिली योजना सावधगिरीने व रूढ चाकोरीतच अमलात आणल्यामुळे परदेशी हुंडणावळीच्या गंगाजळीतून मोठ्या प्रमाणात व्यय करावा लागला नाही. ही परिस्थिती टिकण्यासारखी नव्हती हे खरे असले तरी, या घटनेमुळे एक प्रकारची गैरसावधगिरी उत्पन्न झाली व पहिल्या योजनेच्या कालावधीतच परदेशी हुंडणावळीबाबत काटेकोर कारभार राहिला नसावा. ते काहीही असो, आयात-परवाने देण्याबाबतचे धोरण १९५५ पासून १९५७ च्या उत्तरार्धात आयातीवर बरेच निर्बंध घातले जाईपर्यंत अगदीं ढिलाईचे, अव्यस्थित व योजनेच्या योग्य अंमलबजावणीच्या दृष्टीने घातुक होते हे उघड आहे.

उद्योग-व्यापार खात्याने आयात-परवाने देताना काही विशिष्ट पद्धतीने किंवा विशेष निकषांनुसार कारभार चालविला असेल, परंतु या कारभाराचा नियोजनाशी संबंध नव्हता. आयात-परवाना देण्याबाबत अमुक निश्चित वार्षिक कार्यक्रम अमलात आणावयाचा याची कल्पना त्या खात्यास देण्यात आली होती असे दिसत नाही. एवढेच नव्हे तर परदेशी हुंडणावळीची गंगाजळी सारखी घटत जाऊ लागल्याने याबाबत नियोजन-मंडळाने, अर्थखात्याने अथवा रिझर्व्ह बँकेने काहीच प्रतिबंधक उपाय वेळी योजिले नाहीत. योग्य उपाययोजनेसाठी वेगवेगळ्या कालावधीतील आवश्यक ती आकडेवार माहिती गोळा होत राहण्याची व्यवस्थाही केलेली नव्हती किंवा उपलब्ध माहितीचे संकलन व तिच्यावरून या धोरणाबाबतचे निष्कर्ष कसे काढावे याविषयी काही पद्धती ठरलेली नव्हती. या उणीवेमुळे देशाचे फार मोठे नुकसान झाले व सध्याची बिकट आर्थिक परिस्थिति निर्माण झाली आहे. योजनेची प्रगती कशी होत आहे यावर देखरेख ठेवण्याची मुख्य जबाबदारी नियोजन-मंडळावर आहे, असे असूनही मंडळाने पंचवार्षिक योजनेची प्रतिवार्षिक योजनांमध्ये विभागणी करणे, योजनेमधील वार्षिक आवश्यक आयातीचा भाग कोणता हे अजमावून त्याविषयी निश्चित कार्यक्रम ठरविणे आणि वार्षिक कार्यक्रम, त्याबाबतची आयात वगैरे व्यवस्थित रीतीने पार पडत आहेत हे पाहण्याकरिता जरूर ती

माहिती मिळविण्याची व ती तपासण्याची पद्धती ठरवून देणे वगैरे सर्वसामान्य गोष्टीही केल्या नाहीत. यांपैकी काही करण्याचा प्रयत्न क्वचितच झालाही असेल. परंतु परदेशी हुंडाणावळीबाबत जे काय घडले त्यामुळे वरील प्राथमिक गोष्टी करण्याचा प्रयत्न झाला नसावा असे निश्चयाने वाटू लागते.

## धोरणनिश्चितीतील गोंधळ

ही झाली अंमलबजावणीची गोष्ट. मंडळाच्या धोरणविषयक कामकाजाविषयी लिहिताना प्रारंभीच एक अडचण उपस्थित होते. ती अशी की, पहिल्या व दुसऱ्या योजनेच्या अहवालामधील नियोजन-मंडळाच्या धोरणविषयक लिखाणाव्यतिरिक्त मंडळाने कोणत्याही बाबतीत सरकारास काय सल्ला दिला हे निर्देशिणे शक्य नाही. याचे अेक कारण म्हणजे नियोजन-मंडळाकडून अहवालानंतर सरकारकडे निवेदने गेली असल्यास ती प्रसिद्ध झाली नाहीत. शिवाय केंद्रीय मंत्रिमंडळापुढे येणाऱ्या कामकाजाबाबत वेगवेगळ्या सरकारी खात्यांना सल्ला देणे व महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांवरील अंतीम चर्चेत संयुक्त बैठकीच्या द्वारे केंद्रीय मंत्रिमंडळाबरोबर भाग घेणे या नियोजन-मंडळाच्या नित्याच्या कार्यपद्धतीतील बाबी आहेत असे, श्री आगरवाल यांच्या उपरिनिर्दिष्ट लेखावरून दिसून येते. हे लक्षात घेतले म्हणजे नियोजन-मंडळाने निरनिराळ्या प्रश्नांबाबत योजना यशस्वी करण्याच्या दृष्टीने सल्ला दिला किंवा नाही व दिला असल्यास काय सल्ला दिला याची वेगळी नोंद असणे संभवनीय वाटत नाही. याबाबतीत नियोजन-मंडळाचे कार्य व निरनिराळ्या सरकारी खात्यांचे आणि मंत्रिमंडळाचे कामकाज यांमध्ये कांही फरक आढळत नाही. त्यामुळे आर्थिक धोरणाबाबतच्या अपयशाची जबाबदारी सरकारइतकीच नियोजन-मंडळावरही टाकावी लागते.

## एकसूत्रीकरणाचा अभाव

एकंदर आर्थिक धोरणामध्ये विशेषत्वे निरनिराळ्या क्षेत्रांतील कारभारामध्ये एकसूत्रीकरण राखण्याची खास जबाबदारी नियोजन मंडळावर पडते. आर्थिक व्यवहाराचे सुसंगत नियमन करण्यास जरूर ते कायदेशीर अधिकार भारत सरकारच्या हाती आहेत ही गोष्ट सर्वमान्य आहे. खरी अडचण आहे ती अशी की त्या अधिकाराचा सूत्रबद्धपद्धतीने वापर योजनेच्या अंमलबजावणीच्या कामी झालेला नाही. या गोष्टीकडे अर्थशास्त्रज्ञांच्या समितीने आपल्या निवेदनात मुद्दाम लक्ष वेधले होते. असे झाले तरी उपाययोजनेतील एकसूत्रीकरणाबाबतची उणीव पहिल्या योजनेप्रमाणेच दुसऱ्या योजनेच्या बाबतीतही अजून तितकीच दिसून येत आहे.

परराष्ट्रीय व्यापाराच्या नियमनाचा पंचवार्षिक योजनेशी मेळ घालण्याकडे नियोजन-मंडळाने काहीच लक्ष दिले नाही ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. १९४७ पासून व विशेषतः नियोजनाला आरंभ झाल्यापासन आयात-निर्यातीचा दर तिमाहीचा वाटा कोणत्या पद्धतीने ठरविला जातो हे मला तरी एक कोडेच वाटत आले आहे. नियोजन-मंडळाने पहिल्या व दुसऱ्या दोनही योजनांच्या अहवालामध्ये आयात-निर्यातीवरील नियंत्रणाचा योजनेच्या आखणीच्या व अंमलबजावणीच्या दृष्टीने कसा काय वापर होतो अगर व्हावा याकडे मुळीच लक्ष दिले नाही.

आयात-निर्यातीच्या असल्या तिमाही विभागणीमध्ये व्यापाऱ्यांचा एक खास वर्ग निर्माण झाला. भरमसाट नफा मिळविण्याचे प्रभावी साधन उपलब्ध झाले व सरकारला खैरातीसाठी विशिष्ट क्षेत्र उत्पन्न झाले, ही गोष्ट परदेशी हुंडणावळीविषयीची सध्याची गंभीर समस्या निर्माण होण्यापूर्वी स्पष्टपणे दिसून आलेली होती. या कारभारामुळे अनेक उपभोग्य वस्तूंच्या किमती सारख्या हेलावत राहिल्या आणि पुष्कळशा उत्पादकांचा उत्पादन-खर्च निष्कारण मधेच वाढल्यामुळे उत्पादनावरही दुष्परिणाम झाले.

सरकारी धोरण बनविण्यात नियोजन-मंडळ व वेगवेगळी खाती आणि मंत्रिमंडळ यांचा निरनिराळा भाग काय आहे ते सांगणे कठीण आहे हे मी वर निर्देशिले आहे. नियोजन-मंडळाच्या कार्यपद्धतीवर अल्प प्रकाश अन्नधान्य चौकशी समितीने १९५५ साली झालेल्या अन्नधान्यविषयक धोरणाच्या घडामोडीबाबत केलेल्या विवेचनामुळे पडतो. त्या अहवालातील उतारे मुळातूनच सविस्तर येथे मी देत आहे. कारण या एका विवेचनामुळे उपलब्ध होणारी माहिती अत्यंत अर्थपूर्ण आहे. सदर समिती म्हणते.

"आमच्या धान्यावरील नियंत्रणे उठविण्याचा लोकांचा आग्रह व त्यास अनेक उच्चपदस्थ राजकारणी धुरीणांचा पाठिंबा हे सरकारी धोरणातील व अंमलबजावणीतील अनेक उणीवांच्या मुळाशी आहे. श्री. किदवई यांच्या या बाबतच्या धोरणाविषयी बराच गैरसमज झालेला दिसतो. त्यांच्याच कारकीर्दीत शेतकी-खात्याने 'फूडग्रेन्स (लायसेन्सिंग ॲन्ड प्रोक्युअरमेंट) ऑर्डर १९५४' काढली होती. यावरून किदवयींचा उद्देश संपूर्ण विनियंत्रण करावे असा नव्हता हे उघड दिसते. त्यांनी नियंत्रण वेगळ्या रीतीने करावे असे योजिले होते. यास 'रेग्युलेटेड डी-कंट्रोल' (नियमित विनियंत्रण) असे म्हणता येईल. किदवाईंची ही योजना त्यांच्या आधीचे अन्नमंत्री श्री के. एम. मुनशी यांनी निवृत्तीपूर्वी जे 'स्ट्रेटेजिक कंट्रोल' [कळसूत्रीनियमन] चे धोरण जाहीर केले होते, त्यातूनच पुढे आली होती आणि हेच धोरण पुढे चालविण्याचा प्रयत्न किदवाईंच्या नंतर आलेल्या अन्नमंत्र्यांनी केला (परिच्छेद ४-४२).

"विनियंत्रणाच्या योजनेपैकी महत्त्वाचा भाग म्हणून व्यापाऱ्यांना परवाने द्यावे, धान्याचे राखीव साठे करून ठेवावे वगैरे सावधगिरीच्या सूचना प्रसंगी संकटास तोंड देता यावे या दृष्टीने अन्नखात्याने १९५२ मध्ये धान्य-विनियंत्रण करावे असे सुचविताना केलेल्या होत्या. राखीव साठे करण्याची सूचना या वेळेस मंजूर झालेली नाही. पुनश्च १९५४ मध्ये केंद्र सरकारने किमान १५ लक्ष टनांचा राखीव धान्यसाठा करून ठेवावा आणि प्रत्येक राज्यात धान्यवाटपयंत्रणेचा गाभा ठेवावा, असे अन्न-खात्याने सुचविले. या सूचना मंजूर झाल्या. सरकारने राखीव साठे करण्यासाठी खुल्या बाजारात रास्त भावाने धान्य खरेदी करावे असेही अन्नखात्याने यावेळी सुचविले होते. ही सूचना मात्र मंजूर झाली नाही. (परिच्छेद ४–३६)

"अन्नखात्याच्या सूचना कोणत्या कारणाने मंजूर अगर नामंजूर झाल्या हे नियोजन-मंडळाकडून खुलासेवार समजून घेण्याच्या हेतूने मंडळाच्या उपाध्यक्षांना भेटण्याचा आम्ही बेत केला. परंतु त्यांनी असे सांगितले की, चौकशी-समित्यांपुढे साक्षीपुरावा देण्याची नियोजन-मंडळाची पद्धत नसल्यामुळे त्यांच्याशी होणाऱ्या अनौपचारिक चर्चेच्या आधारे काही लिहिता यावयाचे नाही, तेव्हा आम्ही त्यांच्याशी जास्त वाटाघाटी केल्या नाहीत. मात्र आम्ही अन्नमंत्र्यांना भेटलो व त्यांनी याबाबतच्या आपल्या धोरणाची आम्हास माहिती दिली (परिच्छेद ४–३८)"

वरील उताऱ्यावरून असे स्पष्टपणे दिसून येते की, १९५५ च्या उत्तरार्धात धान्यपरिस्थितीत जो बिघाड झाला तो सरकारने अन्नखात्याच्या सूचना स्वीकारल्या असत्या तर निदान काही प्रमाणात तरी निश्चितपणे टाळता आला असता. तसेच सरकारने अन्नखात्याच्या सर्व सूचना का स्वीकारल्या नाहीत यावर नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष काही प्रकाश टाकू शकतील असे चौकशीसमितीला वाटले. परंतु सरकारने एका महत्त्वाच्या प्रश्नाच्या विचाराकरिता नेमलेल्या समितीस नियोजन-मंडळाकडून अथवा त्याच्या उपाध्यक्षांकडून समाधानकारक माहिती मिळू शकली नाही. धोरणविषयक महत्त्वाच्या अंतिम निर्णयात नियोजन-मंडळाचा हात नसावा, असल्यास निष्कारण गोंधळ होतो व नंतर निर्णयाची जबाबदारी योग्य त्या खात्यावर अथवा मंत्रिमंडळावर टाकणे अशक्यप्राय होते असा निष्कर्ष वरील एकंदर प्रकरणावरून काढणे अपरिहार्य आहे.

नियोजन-मंडळाच्या अपयशाची आणखी उदाहरणे देत बसण्याचे कारण नाही. सध्या पंचवार्षिक योजनेचा 'कोअर' उर्फ गाभा म्हणजे नेमके काय हे ठरविण्यात जो गोंधळ माजला आहे त्याचा नियोजन-मंडळाच्या अकार्यक्षमतेचे व अपयशाचे ताजे उदाहरण म्हणून येथे निर्देश केला तरी पुरे.*

५

## नियोजन मंडळाचे अपयश

अद्यापि आपण नियोजित अर्थव्यवस्था निर्माण करू शकलो नाही हे आतापावेतो नियोजन-मंडळाच्या कामकाजाचे जे विवेचन केले त्यावरून स्पष्ट होते. योजनाबद्ध अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न पहिल्या पंचवार्षिक योजनेत केलेला नव्हता. त्या दिशेने पुष्कळ प्रगती करावी असे दुसऱ्या योजनेत अभिप्रेत होते. परंतु योजनेची अंमलबजावणी ठरल्याप्रमाणे झाली नाही. शेतमालाच्या किमती स्थिर ठेवणे, अन्नधान्याच्या पुरवठ्याची योग्य तरतूद करणे आणि परदेशी हुंडणावळीचा दक्षतापूर्वक व काटकसरीने वापर करणे अशा अगदी प्राथमिक स्वरूपाच्या गोष्टींबाबत यथायोग्य धोरण ठेवले गेले नाही. एवढेच नव्हे तर गेल्या दोन वर्षांतील अनुभवानंतर आवश्यक सुधारणा करण्याचा प्रयत्न किंवा त्या दिशेने निदान विचारही केला जात आहे असे दिसत नाही. तेव्हा जरी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये देशात अनेक महत्वाच्या गोष्टी साध्य झाल्या असल्या तरी अद्यापि आपल्या अर्थव्यवस्थेचा कारभार योजनाबद्ध रीतीने चालू लागलेला नाही असे म्हणावे लागते.

ही परिस्थिती शक्य तितक्या लवकर सुधारण्यावर देशाची भावी प्रगती मुख्यतः अवलंबून आहे असे मला वाटते. चालू व यापुढील विकास-योजना आखताना व त्याची अंमलबजावणी करताना विचारपूर्वक व संघटित प्रयत्न केला पाहिजे. प्राप्त परिस्थितीतून कसातरी धडपडत मार्ग काढण्याचा प्रकार आपणांस परवडण्यासारखा नाही आणि आपल्याच चुकांमुळे उद्भवणाऱ्या सर्व अडचणीतून शेवटी काही ना काही तरी मार्ग निघेलच अशा अपेक्षेने हातपाय जोडून स्वस्थ बसण्याची अकर्मण्यता अत्यंत घातक ठरेल. नियोजनाचा प्रयत्न मनःपूर्वक व कसोशीने केल्याखेरीज आपणांस गत्यंतरच नाही. या कार्यात शिरोभागी असणाऱ्या नियोजन-मंडळासारख्या संघटनेने तिच्याकडे स्थापनेच्या वेळी सोपविण्यात आलेली कामे योग्यरीतीने पार पाडल्याशिवाय या दिशेने काहीच प्रगती होणार नाही.

१९५० साली नियोजन-मंडळाच्या नेमणुकीच्या ठरावात त्याजकडे साधनसंपत्तीचा अंदाज घेणे, योजना तयार करणे, तिच्या निरनिराळ्या अवस्था ठरवून प्रगती कसकशी होत आहे याचा आढावा घेणे व धोरणाबाबत आणि कारभाराबाबत योग्य त्या शिफारशी करणे अशी कामे सोपविली होती. यांपैकी योजनेच्या तात्त्विक आखणीचे कार्य वगळता इतर प्रत्येक बाबतीत नियोजन-मंडळ अपयशी झाले असे १९५५ पासूनच्या घडामोडी पाहता दिसून येते. यथायोग्य तांत्रिक व अन्य तपासणी करून तपशीलवार व अर्थपूर्ण योजना बनविण्यात नियोजन-मंडळ अयशस्वी झाले; निरनिराळे कार्यक्रम व त्यासाठी खर्चांच्या रकमा ठरवून देण्याबाबत शास्त्रशुद्ध निकष त्यांनी ठरविले नाहीत; प्रतिवार्षिक योजना बनवून त्यातील सर्व तपशील नीट मांडण्याचे कार्य झाले नाही; योजनेच्या अत्यंत स्थूल क्षेत्रामध्येही कशी प्रगती होत आहे व होत आहे की नाही यावर देखरेख ठेवली गेली नाही; योग्य धोरणे अमलात

* *केसरी*, ३१–८–१९५८.

आणली जावी असा आग्रह सातत्याने नियोजनमंडळाने धरला नाही, एवढेच नव्हे तर चुकीच्या धोरणांचा स्वीकार करण्यात नियोजन-मंडळ सहभागी झाले.

नियोजन-मंडळाची ही अकार्यक्षमता आजही पूर्ववत दिसून येत आहे. अपयश खरोखरी नियोजन-मंडळाच्या तज्ज्ञ व अधिकारीवर्गाचे नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. अहवालातील तात्त्विक विवेचन लिहिणे किंवा विकास-विभागाच्या काही कार्यास व्यवस्थित वळण लावणे अशा प्रकारच्या दोन वेगवेगळ्या क्षेत्रांतही नियोजन-मंडळाच्या तज्ज्ञ व अधिकारीवर्गाची कार्यक्षमता चांगल्या प्रतीची आहे असे दिसून येते. प्रस्तुत लेखमालेच्या सुरुवातीसच श्री आगरवाल यांच्या लेखातील उताऱ्यामध्ये जी नियोजन-मंडळाच्या कामकाजाची काही वैशिष्ट्ये निर्देशिलेली आहेत, त्यांत नियोजन-मंडळाच्या या संपूर्ण अपयशाची खरी कारणे शोधावी लागतात. नियोजन-मंडळाचे स्वरूप वस्तुतः सल्लागारमंडळ असे असताना सरकारी धोरण बनविण्याच्या कामात ते मंडळ पडले हेच त्याच्या अपयशाचे मूळ होय.

## नियोजन-मंडळाची सदोष रचना

नियोजन-मंडळाचे सभासद ज्या तऱ्हेचे नेमले गेले त्यामुळे ही घटना अपरिहार्यही झाली असेल. नियोजन-मंडळात प्रथमपासूनच काही प्रमुख केंद्रीय मंत्र्यांचा समावेश करण्यात आला; इतर सभासदही सर्व मुरब्बी अधिकारी अगर ज्येष्ठ सार्वजनिक कार्यकर्ते होते. यांतील कोणाजवळ केंद्रीय राज्यकारभाराचे मंत्री किंवा ज्यावर मुख्यतः राज्यकारभार सुसूत्र चालविण्याची जबाबदारी होती, असे मोठ्या हुद्यावरील अधिकारी यांच्याहून निराळे अनुभव, ज्ञान किंवा तज्ज्ञपणा यांपैकी काहीही नव्हते. थोडक्यात, नियोजन मंडळाचे बहुतेक सभासद मंत्री अगर वरिष्ठ अधिकारी यांसारखेच काम केलेले व तसेच काम करण्याची पात्रता असलेले असे होते.

अशा परिस्थितीत मंडळातील मंत्र्यांव्यतिरिक्त इतर सभासदांनी आपल्या आवडीप्रमाणे व कुवती-नुसार कामे व कार्यक्षेत्रे आपणांसाठी निवडावीत हे स्वाभाविकपणे घडले. परिणामी नियोजन-मंडळाच्या योग्य कार्याऐवजी केंद्रीय खाती व प्रांतिक सरकारे यांच्याप्रमाणेच त्यांच्या सदृश कामे करण्याकडे नियोजन-मंडळाने लक्ष पुरविले. यामुळे मंडळाच्या तज्ज्ञ व अधिकारीवर्गाचे कामही वैशिष्ट्यपूर्ण मार्गाने होऊ शकले नाही. नियोजन-मंडळाकडे कामास असलेले तज्ज्ञ अधिकारी तेथे काही काळापुरतेच राहात. मंडळातून वेगवेगळ्या खात्यांमध्ये आणि खात्यांतून मंडळाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या, एवढेच नव्हे तर तज्ज्ञांच्याही सहज बदल्या होत असत. तसेच यांपैकी काहींकडे मंडळाची व खात्याची अशी दोनही प्रकारची कामे सोपविली जात. यावरून नियोजन-मंडळाच्या व खात्याच्या कामकाजांतील मूलभूत प्रकारांत फरक मानला जात नव्हता हे स्पष्ट होते.

नियोजन-मंडळाच्या या अनावश्यक, दुहेरी, दुबार कारभारामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींकडे, नुकतेच समाजविकास प्रकल्प व राष्ट्रीय विस्तारकार्य यांची तपासणी करण्यासाठी नेमलेल्या समितीने आपल्या अहवालात मुद्दाम लक्ष वेधले आहे. तसेच अन्न व शेतकी खात्याच्या कार्यक्षेत्रात नियोजन-मंडळाकडून ढवळाढवळ झाल्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील सहकारी चळवळीची प्रगती बराच काळ रोखली गेली आहे ही गोष्ट सर्वश्रुत आहे. नियोजन-मंडळाचे आपल्या मुख्य कार्याकडे असे दुर्लक्ष झाले आणि इतर अनेक भलत्या कामांत त्याने निष्कारण लक्ष घातले, याचे मुख्य कारण असे दिसते की, नियोजन-मंडळाला व त्याच्या सभासदांना अधिकाराची स्वाभाविक लालसा असल्यामुळे, मंत्र्यांप्रमाणे आपणांसही काही सत्ता असावी, काही उपकार-सामर्थ्य असावे असे त्यांस वाटते. महामंत्री व अर्थमंत्री हे नियोजन-मंडळाचे सभासद असल्यामुळे नियोजन-मंडळाला व त्याच्या निर्णयाला अस्वाभाविक महत्त्व व

प्रतिष्ठा प्राप्त झाली. यामुळेही नियोजन-मंडळाचे आपल्या कामाकडे दुर्लक्ष होऊन भलत्या कार्यक्षेत्रात त्याजकडून हस्तक्षेप व्हावा असे घडले असावे.

नियोजन-मंडळाकडे नेमणुकीच्या वेळी सोपविलेली कामे त्याजकडून नीट करवून घेणे हाच वरील परिस्थितीवर खरा तोडगा आहे. भारतीय नियोजन-मंडळाचे स्वरूप पूर्णपणे बदलून अर्थखात्यातील एखाद्या विभागाचे स्थान त्यास द्यावे असे सुचविण्याचा माझा हेतू नाही. कोणत्याही सरकारी खात्याच्या हाताखाली नियोजन-मंडळास ठेवण्याचे कारण नाही. सध्याप्रमाणेच स्वतंत्र संघटना म्हणून नियोजन-मंडळाने काम करावे आणि जरूर तेव्हा केंद्रीय खात्याशी आणि प्रांतिक सरकारशी प्रत्यक्ष वाटाघाटी व विचारविनिमय करण्याचा त्यास अधिकार असावा. परंतु नियोजन-मंडळाकडे कोणतेही अंमल-बजावणीचे काम नसावे आणि धोरणाबाबत अंतिम निर्णय करण्याच्या वस्तुतः राजकीय स्वरूपाच्या असलेल्या प्रक्रियेमध्ये मंडळाने केव्हाही सहभागी होऊ नये. आर्थिक धोरणाबाबत निर्णय घेण्याचे काम प्रथम संबंधित खात्याच्या चिटणिसांच्या समित्यांकडे आणि नंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या खास उपसमिती-कडेच पूर्णपणे राहावे आणि शेवटचा निर्णय खुद्द मंत्रिमंडळाने करावा. अशा समित्या–उपसमित्या आजही आहेत, परंतु त्या कार्यक्षम दिसत नाहीत. या क्षेत्रात नियोजन-मंडळाने पदक्षेप केल्यामुळे या बाबीची सरकारी कारभाराची कार्यक्षमताही कमी झाली असावी. नियोजन मंडळाने धोरण बनविण्यात भाग घेऊ नये असे ठरले तर त्याचे महत्त्व कमी होईल असे कोणाला वाटेल, परंतु यामुळे मंडळाची उपयुक्तता वाढून शेवटी प्रतिष्ठाही वाढल्याचे आढळून येईल. अंमलबजावणीचे काम काढून घेतल्यास नियोजन-मंडळाचा विस्तार–कार्यादिकांशी आणि प्रोग्रॅम इव्हॅल्युएशन ऑर्गनायझेशन या संघटनेशी असलेला संबंध तेवढा नष्ट होईल, इतकेच.

## कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल आवश्यक

केंद्रीय खात्यांनी व प्रांतिक सरकारांनी तयार केलेले कार्यक्रम व अंदाजपत्रके तपासण्याबाबतची नियोजन-मंडळाची सध्याची पद्धतही मूलतः बदलली पाहिजे. याबाबत योग्य कार्यपद्धती आखताना, प्रथम कोणत्याही कार्याची किंवा सूचनेची तांत्रिक तपासणी नीट केली पाहिजे हे ध्यानात ठेवावयास हवे. अशी तपासणी नियोजन-मंडळाने योग्य त्या तज्ज्ञांकडून करवून घेतली पाहिजे. नंतर एकंदर योजनेचा विस्तार व रचना लक्षात घेऊन सूचनेत अभिप्रेत असलेल्या कार्याचा संकोचविस्तार, त्याची कालक्रमानुसार विभागणी करणे वगैरे गोष्टी केल्या पाहिजेत. निरनिराळी केंद्रीय खाती किंवा प्रांतिक सरकारे यांच्या सर्व सूचनांबाबत घेतलेले निर्णय हे समग्र योजनेमध्ये समाविष्ट असलेले मूलभूत अधिकृत निर्णय समोर ठेवून त्या मूलभूत निर्णयांपासून तर्कशुध्द रीतीने निष्पन्न झालेले आहेत असे सर्वांस उघड दिसावयास हवे. पंचवार्षिक योजनेच्या कालात धोरणात काही बदल केला पाहिजे, असे परिस्थितीचा आढावा घेता नियोजन-मंडळाला आढळून आले तर सप्रमाण निवेदन तयार करून त्यास सरकारची रीतसर मान्यता मिळवून घ्यावे. नियोजन-मंडळाच्या प्रांताशी व केंद्रीय खात्यांशी असलेल्या संबंधांचे स्वरूप विशिष्ट खात्याच्या किंवा संघटनेच्या कार्यात व्यापक धोरणाच्या दृष्टीने तज्ज्ञ व तांत्रिक मार्गदर्शन करणारी संघटना असे रहावे. परस्परांत देवाणघेवाण चालावी, एकाने दुसऱ्यावर दपडण घालावे अशा खात्याखात्यांतील स्वरूपाचा व्यवहार नियोजन-मंडळाचा केंद्रीय खात्यांशी व राज्यांशी होऊ नये.

## तज्ज्ञांचे स्थान

नियोजन-मंडळाला सल्ला देणाऱ्या समित्या व अन्य सल्लागार संस्था यांच्या बाबतीतही काही सुधारणा होणे जरूर आहे. या समित्यांचा कसा उपयोग करून घ्यावयाचा याविषयी नियोजन-मंडळाचे

काही निश्चित धोरण असलेले दिसत नाही. नवीन योजना तयार करावयाच्यावेळी अशा समित्या नेमल्या जातात व त्यांच्याशी मुख्यतः तेव्हाच विचारविनिमय केला जातो. बिनसरकारी तज्ज्ञांना काय महत्त्वाचे वाटेल ते समजावून घेणे, विशिष्ट कार्यक्षेत्रांतील नियोजनविषयक प्रश्नाकडे त्या तज्ज्ञांचे लक्ष वेधणे आणि सर्वसाधारणपणे भावी योजनांबाबत व विशेषतः प्रचलित योजनेच्या पुढच्या अवस्थेविषयी परस्पर-विचारमंथनाला चालना देणे, या कार्यासाठी अशा सल्लागार समित्यांचा अधिक उपयोग करून घेतला पाहिजे. नियोजन-मंडळाच्या तज्ज्ञ व अधिकारी वर्गाच्या कार्याला कोणती दिशा लावायची हा प्रश्नही विचारात घ्यावयास हवा. नियोजन-मंडळाच्या हाताखाली प्रत्यक्ष कारभार-विभाग अगदी लहान, जरुरीपुरता ठेवण्याची दक्षता घ्यावयास पाहिजे. योजनेची प्रगती कसकशी होत आहे ते नीट अजमाविण्यासाठी आवश्यक तेवढी प्रचलित परिस्थितीची माहिती नियोजन-मंडळाला प्रत्यक्ष मिळवून देणे, हे त्या कारभार-विभागाचे मुख्य कार्य असावे. तज्ज्ञवर्ग मात्र विविध कार्याला उपयुक्त असा पाहिजे. अनेक वर्षे काम करून करून त्या तज्ज्ञवर्गास एक विशिष्ट दृष्टिकोन संपादता यावा. सरकारी खात्याकडे अथवा अन्य संघटनांकडे असलेल्या तज्ज्ञांवर न विसंबून राहता नियोजन-मंडळाजवळ स्वतःचा तज्ज्ञ नोकरवर्ग का असावा याची कारणे उघड आहेत. एकतर सामान्यतः खात्यांकडील वा अन्य तज्ज्ञांचा दृष्टिकोन संकुचित असणे अपरिहार्य ठरते. म्हणून सर्वदेशीय योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने कोणत्याही प्रश्नाचे स्वरूप व्यापक पार्श्वभूमीवरून कसे पारखावे ते पाहणारे आणि अभिनव कल्पनांचे मोकळेपणाने परीक्षण करणारे तज्ज्ञ नियोजन-मंडळापाशी असावेत. निरनिराळ्या खात्यांतील तज्ज्ञांवर त्यांच्या दैनंदिन नित्याच्या कामाचा मोठा बोजा असतो. जवळजवळ तितकाच तो नियोजन-मंडळाच्या तज्ज्ञ नोकरवर्गावरही हल्ली पडतो हे योग्य नव्हे. तज्ज्ञांस दूरदृष्टी हवी असेल तर पुढचा विचार करण्यासाठी त्यांना पुरेशी सवड दिली पाहिजे. नियोजन-मंडळाच्या अर्थशास्त्रज्ञांनी योग्य पद्धतीने कार्य केले तर अमेरिकेच्या अध्यक्षांचे आर्थिक-सल्लागार मंडळ ज्याप्रमाणे दर सहामाहीस अर्थव्यवहाराच्या सद्यःस्थितीचा व्यापक समालोचनात्मक अहवाल तयार करते, त्याप्रमाणे नियोजन-मंडळाचे अर्थशास्त्रज्ञ वेळोवेळी आढावा घेऊ शकतील. तसे काम त्यांच्याकडे सोपविले पाहिजे. संमिश्र अर्थव्यवस्थेच्या समस्या व तिच्या व्यवहारात समाजास पडणारी तोशीस अथवा नियोजनाच्या निरनिराळ्या तंत्रांची तौलनिक कार्यक्षमता, यांसारख्या अनेक प्रश्नांचा दीर्घकालीन अभ्यास योजनापूर्वक हाती घेणेही नियोजन-मंडळाच्या अर्थशास्त्रज्ञांकडे सोपवावयास हवे.

## सभासदत्वाबाबत नवा दृष्टिकोन आवश्यक

अशा रीतीने नवीन वळण लावण्यासाठी नियोजन-मंडळाच्या सभासदत्वाबाबतही नवा दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. महामंत्री व अर्थमंत्री यांनी नियोजन-मंडळाचे सभासद राहू नये हे उघड आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात नियोजनमंत्र्यांची म्हणून निराळी जागा राहणार असेल तर नियोजन-मंत्री नियोजन-मंडळाचे अध्यक्ष असावेत. त्यांच्या व्यतिरिक्त केंद्रीय मंत्रिमंडळातील अन्य कोणीही मंत्री नियोजन मंडळाचा सभासद नसावा. नियोजन-मंडळाच्या उपाध्यक्षपदी कारभाराचा व्यापक अनुभव असलेल्यांची नेमणूक करणे चांगले; कारण केंद्रीय खाती व राज्ये आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांच्याशी जोडलेल्या संबंधाद्वारा नियोजन-मंडळाचे कामकाज मुख्यतः चालते. तेव्हा त्यांच्या कार्य-पद्धतीची माहिती असणाराच नियोजन-मंडळाचा कारभार-प्रमुख असणे आवश्यक आहे. नियोजन-मंडळाचे इतर सभासद तज्ज्ञ असावेत पण व्यवहारिक प्रश्न हाताळण्याचा त्या सर्वांना काही अनुभव असावा. विविध भौतिक शास्त्रज्ञ, तंत्रविशारद, समाजशास्त्रज्ञ, संख्याशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ यांच्या

तज्ज्ञतेची मुख्यतः नियोजनास आवश्यकता आहे. अर्थात सभासदांची एकूण संख्या फार मोठी नसावी. तज्ज्ञतेची मुख्य गरज नियोजन-मंडळाचे प्रमुख तज्ज्ञ आणि सल्लागार-समित्या मिळून भागवू शकतील.

नियोजनमंडळाची पुनर्रचना करताना, त्यात अधिक तरूण रक्ताचा समावेश केला जावा अशी सूचना मला आग्रहपूर्वक करावीशी वाटते. ६५ वर्षे वयाहून अधिक अशा वृद्धांचा विचार करण्याऐवजी नियोजन-मंडळाचे बहुसंख्य सभासद ५५ हून कमी वयाचे असले तर जास्त कार्यक्षम ठरतील. नियोजन-मंडळाच्या कामकाजाचा ताण बराच असणार, शिवाय स्वतंत्र व नवीन विचार पचविण्याची मंडळाच्या सभासदात ताकद हवी.

नियोजन-मंडळाची रचना व कामकाज यांविषयी पूर्णपणे पुनर्विचार त्वरित करण्याची अत्यंत निकड आहे, असा निष्कर्ष एकंदर परिस्थितीच्या वरील विवेचनावरून काढावा लागतो. आपल्या नियोजनाच्या प्रयत्नामध्ये शिरोभागी असणारी ही संघटना पुन्हा नव्या जोमाने व योग्य दिशेने कार्यान्वित होणे सध्याच्या अत्यंत बिकट परिस्थितीत अत्यावश्यक ठरते. प्राप्त परिस्थितीमध्ये असा मूलगामी पुनर्विचार करणे इतर दृष्टींनी शक्य व्हावे.*

* *केसरी*, ७–९–१९५८.

☆

# ९ . . तिसरी पंचवार्षिक योजना : नियोजनाची उद्दिष्टे आणि व्यवहार

विशिष्ट मार्गांनी देशातील अर्थव्यवस्थेची गतिमानता वाढेल असा कार्यक्रम, आर्थिक प्रगतीसाठी करण्यात येणाऱ्या नियोजनात अभिप्रेत असतो. अशा प्रकारच्या नियोजित अर्थकारणात बचतीचे प्रमाण हेतुपुरःस्सर वाढविण्याची आणि गुंतवणुकीवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असते. मागासलेल्या देशांतील करवाढीच्या मर्यादा लक्षात घेता या देशांच्या नियोजित आर्थिक प्रगतीसाठी काही प्रमाणात तरी तुटीचे अर्थकारण अनिवार्य ठरते. अशा अर्थकारणातून निर्माण होणारी परिस्थिती आणि युद्धकालीन आर्थिक परिस्थिती या दोन्हीत बरेचसे साम्य असते. युद्धकालीन अर्थकारणात रोख चलनाचे चलनमूल्य कमी करणे, जनतेकडून काढलेली कर्जे, जादा छापलेल्या नोटा, चलनवाढनिर्मित भांडवल इत्यादी मार्गांचा वापर करावा लागतो. मागासलेल्या देशात विकास-नियोजनासाठी काही काळ तरी या सर्व मार्गांचा उपयोग करावा लागेल. परंतु अशा प्रकारच्या तुटीचे अर्थकारणाची काही पथ्ये आहेत. या पथ्यांच्या अभावी तुटीचे अर्थकारण अनर्थावह ठरण्याचाही धोका आहे.

## नियोजनाचा आढावा

हे सर्व विचारात घेता योजनेचे स्वरूप आणि व्याप्ती समाजाच्या करभार सहन करण्याच्या ताकदीवर आणि सरकारी यंत्रणेच्या नियमनक्षमतेवर अवलंबून आहे हे स्पष्ट होते. म्हणून योजनेसंबंधी विचार करताना राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याचा वेग काय असावा इत्यादी लक्ष्ये निश्चित करण्यापासून सुरुवात करणे अनुचित होईल. आपली उद्दिष्टे काय, त्यासाठी आपण काय करू शकतो व जनतेची संभाव्य प्रतिक्रिया काय होईल, या संबंधीचा विचार करून निश्चित स्वरूपाचे धोरण आखण्यापासून नियोजन-विचार सुरू करणे आवश्यक आहे. गेल्या दहा वर्षात असा विचार केल्याचे दिसत नाही. योजनेच्या आराखड्यातून तात्त्विक दृष्ट्या आखलेली धोरणे दिसतात, परंतु योजना एकसंध कार्यवाहीत आणता येण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सूत्रबद्धता या धोरणात दिसून येत नाही. असे का घडावे, याचा विचार करणे अपरिहार्य आहे. १९५१ सालापासूनच्या आर्थिक घडामोडींचा आढावा घेतला असता निरनिराळ्या आर्थिक सूचकांकातील विसंगती प्रकर्षाने लक्षात येते. १९५३ ते १९५८ या काळात अन्नपरिस्थितीत काहीही फरक झालेला नाही! रोजगाराबाबतची परिस्थिती तर निश्चित खालावली आहे. दरडोई कापडाचे प्रमाण सुरुवातीला वाढलेले दिसून येते, परंतु १९५५ पासून या क्षेत्रात दिसून येणारी वाढही खुंटलेली दिसते. एका बाजूला अशा प्रकारे राहणीचे मान आणि रोजगारीची खालावणारी परिस्थिती दिसते, तर दुसऱ्या बाजूला औद्योगिक उत्पादन, दरमाणशी उत्पन्न, पाटबंधारे, विजेचे उत्पादन इत्यादी क्षेत्रांतून वाढ झालेली दिसून येते! युद्धाच्या अखेरीस दिसून आलेली

अर्थव्यवस्थेची गतिमानता गेल्या दहा वर्षांत कधीही दिसून आली नाही. कोरियन युद्धाच्या वेळी, पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला (चांगल्या पीकपाण्यामुळे) किंवा १९५६–५७ साली (अनिर्बंध आयातीमुळे) काही प्रमाणात देशातील अर्थव्यवस्थेचा वेग वाढलेला दिसतो; परंतु हा वेग तात्कालिक स्वरूपाचा आणि परिस्थितिसापेक्ष होता. प्रत्येक वेळी विशिष्ट घटनांचा परिणाम संपताच हा वेग कमी झालेला, मूळ स्थितीला आलेला, दिसून येतो. अशा प्रकारे अर्थोद्योगाच्या वेगात दिसून येणारी असमानता ही या काळांतील दुसरी लक्ष वेधणारी घटना म्हणता येईल.

## विषमतेत वाढ

वर्गा–वर्गांच्या आर्थिक स्थितीतील वाढलेली विषमता आणि वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांचा झालेला असमान विकास ही या काळातील तिसरी महत्त्वाची घटना. शेतमजूर–चौकशी–समितीच्या अहवाला-नुसार १९५१ ते १९५६ या काळात शेतमजुरांच्या उत्पन्नात १० टक्क्यांनी तरी घट झाली असावी! १९५६ नंतर ही परिस्थिती सुधारली असे मानण्याचे काही कारण नाही. शेतमजूर हा आर्थिक दृष्ट्या सर्वांत मागासलेला वर्ग आहे असे मानायला काही हरकत नाही. मोठ्या धंद्यांतील मजुरांची स्थिती त्या मानाने बरी आहे असे समजले जाते. सरासरी उत्पन्न आणि किंमती यांच्या चढ उताराचा विचार करता १९५१–५५ या काळात गिरणी मजुरांची स्थिती थोडीफार सुधारली होती असे म्हणता येईल. १९५५–५७ या काळात भाववाढ, त्यांच्या पगारात झालेल्या वाढीपेक्षा, जास्त होती आणि ५७ नंतर तर परिस्थिती निश्चितपणे अधिकच खालावली आहे. आज गिरणीमजूर मूळच्या ५१ सालच्या परिस्थितीप्रत पोचला आहे, असे मानायला काहीच हरकत नाही. बाकीच्या मजूरवर्गाची स्थिती या दोहोंच्या मधली आहे. मंदीच्या काळात छोट्या उद्योगधंद्यांची आणि हंगामी मजुरांची परिस्थिती अधिक बिकट होते. मजूर-मजुरांतील आर्थिक तफावत वाढते. परंतु सामान्यपणे सर्व मजूर-वर्गाची स्थिती विशेषत: १९५७ नंतर खालावली आहे. नोकरीपेशाच्या वर्गाची स्थितीही अशीच आहे.

शेतकरी-व्यापारी आणि उद्योगपती हे बाकीचे वर्ग. या वर्गांतील वरच्या थरांतील लोकांची स्थिती सुधारलेली दिसून येते. ऊस, तंबाखू इत्यादी व्यापारी पिके काढणाऱ्या आणि ज्या भागांत सघन कसणूक अबाधितपणे केली जाते त्या भागांतील शेतकऱ्यांची स्थिती सुधारली आहे. परंतु ज्या भागांत अवर्ष-णाची सतत धास्ती असते, आणि जेथे केवळ जीवनोपयोगी धान्य पिकविले जाते, त्या भागांतील वरच्या थरांतील शेतकऱ्यासुद्धा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या १९५१ सालच्या स्थितीत काहीही सुधारणा झालेली दिसत नाही. कोरियन युद्धाच्या काळात आणि त्या आधीच्या दशकात शेतकरी वर्गाची स्थिती निश्चितपणे समाधानकारक होती. या काळात फार मोठ्या प्रमाणावर कर्जफेड झाली, हे लक्षात घेण्यासारखे आहे. ठोकव्यापार आणि 'प्रोसेसिंग' या दोन गोष्टींना शेतीउत्पादनाच्या संदर्भात अति-शय महत्त्व असते; कारण बऱ्याच प्रमाणावर शेतीउत्पादनाच्या व्यापारातील फायदा हा या प्रक्रियांतच होतो. या प्रक्रिया ज्यांच्या हाती असतील ते साठेबाजीचा मार्ग अवलंबून उत्पादनाच्या अनिश्चित परिस्थितीपासून फायदा उठवू शकतात; बाकीच्यांना मात्र अनिश्चित परिस्थितीची, कमी उत्पन्नाच्या स्वरूपात किंमत द्यावी लागते! एकंदरीत दलाल आणि मधल्या उत्पादकांची किंवा या प्रक्रियांवर नियंत्रण असलेल्या शेतकऱ्यांची स्थिती सुधारली. विकासयोजनांचा फायदा श्रीमंत शेतकरी आणि धनिक विभाग यांनाच अधिक झाला आहे. गरीब व श्रीमंत शेतकरी आणि श्रीमान व मागासलेले विभाग यांतील आर्थिक तफावत वाढली आहे.

शहरे आणि खेडी यांतील विषमता अधिक वाढली आहे. शहरातून असलेल्या संपत्तीचे केंद्रीकरण वाढले आहे. सरकारी क्षेत्रात इमारतीखातर केलेल्या खर्चाचे, भपक्याचे आणि केंद्रीयीकरणाचे प्रमाण

वाढले आहे. खेड्यातून मात्र सरकारी खर्चाचे सुपरिणाम फारसे कोठे दिसून येत नाहीत. या प्रकारची विषमता वेगवेगळ्या औद्योगिक क्षेत्रांतही दिसून येते. १९५० ते '५५ या काळातील मजुरीचे आकडे पाहिले असता जेथे मजुरी जास्त होती, तेथील मजुरीच्या दरातच जास्त मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली दिसते. यामुळे वेगवेगळ्या विभागातील मजुरातील विषमता वाढलेली आहे. दरडोई उत्पन्नाचे प्रमाण गेल्या दहा वर्षांत वाढले आहे. परंतु ही वाढ अतिशय असमानरीत्या झाली आहे हे स्पष्ट दिसते. परिणामी शहरे आणि खेडी, श्रीमंत आणि गरीब, श्रीमान विभाग आणि गरीब विभाग, मालक आणि मजूर यांच्यांतील आर्थिक विषमता पोसली गेली आहे. व्यापारी, उद्योगपती यांनी मात्र अखंडपणे फायदा उठविला आहे. त्यातही व्यापारी जितका अधिक श्रीमंत आणि अधिक मोठ्या शहरातील, तितका फायदा अधिक वाढलेला दिसतो.

## तुटीच्या अर्थकारणाचा परिणाम

तुटीच्या अर्थकारणाचा अर्थव्यवस्थेवर विशेष परिणाम झालेला नाही, ही लक्षात घेण्यासारखी घटना आहे. या बाबतीतील रिझर्व्ह बँकेचे धोरण बरेच सावधगिरीचे होते. गेल्या दहा वर्षांत फाजील भाववाढ होऊ नये, या दृष्टीने पत-चलन-निर्मिती आणि त्याचा वापर या दोहोंवरही तिने स्वतंत्रपणे नियंत्रण ठेवले होते. परंतु भाववाढ रोखण्यात या धोरणाचा कितपत भाग आहे याबद्दल शंका आहे. कारण विशिष्ट व्यापारक्षेत्रात पत-चलन वापरण्यावर बंधन घालण्याने सार्वत्रिक भाववाढीवर फारसा परिणाम होण्याचे कारण नाही. संबंधित वस्तू सोडून इतर वस्तू तारण म्हणून वापरून, पत-चलन मिळविणे आणि ते पाहिजे त्या क्षेत्रात वापरणे काही फारसे कठीण नाही. एकंदर पत-चलनांना विवक्षित मर्यादा घालून आणि धान्यव्यापारात अगर तत्सम क्षेत्रात पतचलन वापरले जाऊ नये, अगर विवक्षित क्षेत्रातच पत-चलन वापरले जावे, अशा प्रकारचे पत-चलनाच्या वापरासंबंधी काटेकोर नियम करून एक सुसूत्र असे धोरण आखले गेले, तर भाववाढ रोखण्याच्या दृष्टीने त्याचा काही प्रमाणावर उपयोग होणे शक्य आहे. परंतु असे धोरण अजून तरी आखलेले दिसत नाही.

सरकारी कर्जरोख्यात बँकांनी केलेल्या गुंतवणुकीमधील वाढही लक्षात घेण्यासारखी आहे. १९५३ ते ५६ या काळात सरकारी कर्जरोख्यात, बँकांनी केलेल्या गुंतवणुकीत सुमारे ६० कोटी रुपयांची निव्वळ वाढ दिसून येते. १९५६–५७ मध्ये मात्र कर्जरोख्यातील गुंतवणुकीत फार मोठ्या प्रमाणावर घट झालेली दिसते. १९५७–५८ पासून या गुंतवणुकीत परत वाढ झालेली दिसते. अमेरिकेच्या 'पब्लिक लॉ'च्या ४८० व्या कलमानुसार आपण जे धान्य अमेरिकेकडून आयात करू, त्याची किंमत रुपयाच्या स्वरूपात द्यावयाची असून ही रक्कम स्टेट बँकेत अमेरिकन सरकारच्या नावाने एक नवे खाते उघडून त्या खात्यावर जमा करावयाची आहे. १९५७–५८ मधील कर्जरोख्यांतील गुंतवणुकीतील वाढ ही या 'पब्लिक लॉ' ४८० चा परिणाम आहे हे उघड आहे! परिणामी १९५६–५७ मध्ये परदेशी हुंडणावळीत निर्माण झालेल्या तुटीमुळे आणि इतर वर्षांत कर्जरोख्यातील वाढत्या गुंतवणुकीमुळे तुटीच्या अर्थभरण्याचे देशातील अर्थव्यवस्थेवर विशेष परिणाम झाल्याचे दिसून येत नाही.

या काळात तुलनात्मकदृष्ट्या दिसून आलेले कापडाचे स्थिर भाव आणि कापडाची खुंटलेली मागणी यांचाही विचार अनुषंगाने करणे योग्य ठरेल. कापडाची खुंटलेली मागणी व त्याचे स्थिर भाव हे धान्याच्या वाढत्या भावाचे परिणाम असावेत असे सुचविले गेले आहे. परंतु हा खुलासा तितका समाधानकारक वाटत नाही. फाजील भाववाढीची परिस्थिती असताना धान्याच्या वाढलेल्या भावामुळे ज्यांच्या हातात पैसा येईल त्यांच्या वाढत्या मागणीमुळे कापडाच्या भावात आणि मागणीत वाढ दिसायला हवी होती. विशेषतः जर सामान्य शेतकरी भाववाढीचा फायदा उठवत असता तर हे परिणाम जरूर दिसून यायला

हवेत. कारण त्यांची कापडाची मागणी निश्चितपणेच स्थिर स्वरूपाची नाही. या सर्व घटनांवरून हे स्पष्ट होते की, उत्पादनात आणि दरडोई सरासरी उत्पन्नात जरी वाढ झाली असली तरी सामान्य माणसाच्या उत्पन्नाची पातळी वाढलेली नाही. हे सर्व वाढलेले उत्पन्न व्यापारी, उद्योगपती इत्यादी लोकांच्या खिशांतच गेले आहे! हा वर्ग या उत्पन्नाचा विनियोग पैशाचा संचय करण्याकडे करीत आहे आणि जर हा पैसा खर्च केलाच तर तो अशा वस्तूंच्या खरेदीवर केला जातो की, ज्या वस्तूंची मागणी वाढल्यामुळे आपल्याकडील सामान्य मजुराच्या उत्पन्नात काहीही फरक पडणार नाही.

या सर्व घडामोडींचा अन्वयार्थ हा की, आपली अर्थव्यवस्था विस्कळित स्वरूपाची असल्यामुळे एका क्षेत्रात होणाऱ्या विकासखर्चाचा इतर क्षेत्रांतून सुपरिणाम झालेला दिसेलच असे नाही. परिणामी काही क्षेत्रांतच प्रगती झालेली दिसून येते. आणि सर्वसामान्यपणे आपली आर्थिक स्थिती कमीअधिक प्रमाणात मूळ पदावरच असलेली दिसून येते. काही कारखान्यांच्यामुळे विशिष्ट शहरांना फायदा झालेला दिसतो. तसेच काही धरण-योजनांमुळे जवळपासच्या खेड्यांना फायदा झालेला दिसतो. परंतु एकंदर लोकसंख्येच्या मानाने अशा प्रकारचा फायदा झालेले मूठभर लोकच निघतील. आपल्याकडे योजनां-बाबत कितीही डांगोरा पिटला जात असला तरी खऱ्या अर्थाने नियोजन आपल्याकडे होत नाही. सध्याचे तथाकथित नियोजन म्हणजे केवळ सरकारी खर्चाने, मदतीने अगर सहकार्याने करावयाच्या काही व्यवहारांचे संकल्प आहेत! निर्दिष्ट मार्गाने विकास घडवून आणण्याचा बुद्धिपुरःसर व सुसूत्र प्रयत्न कोठेही दिसून येत नाही.

## सरकारची दुर्बलता

मिश्र अर्थव्यवस्थेत नियोजित आर्थिक प्रगती घडवून आणताना खाजगी धंद्यातील अनिश्चिततेचा भाग कमी करणे हे फार महत्त्वाचे सूत्र ठरते. यासाठी भाववाढ स्थिर राहील व मागणी वाढती राहील अशी परिस्थिती निर्माण करणे व विशिष्ट दिशेने सरकारी मदत आणि संरक्षण देणे जरूर असते. त्याचबरोबर खाजगी उद्योगधंद्याचे क्षेत्र ठरवून देणे आणि त्यांच्यावर योग्य ते नियंत्रण ठेवणेही आवश्यक असते. हिंदुस्थानात एका बाजूला अतिनियंत्रणाबाबत तक्रारी ऐकू येतात तर दुसऱ्या बाजूला खाजगी उद्योगपती विकासकार्याचा बेसुमार फायदा उठवीत असल्याचे व त्यावर बंधन घालण्यास सरकार असमर्थ असल्याचे दिसून येते. यावरून आमच्या मिश्र अर्थव्यवस्थेचे महत्त्व स्पष्ट होते.

हिंदुस्थानात महत्त्वाच्या धंद्यांतील उत्पादनाच्या किमती ठरून गेल्यासारख्या असतात. त्यांवर सरकार काही नियंत्रण घालू शकत नाही. त्यांची मक्तेदारी अबाधित असते, हे साखरेच्या बाबतीत दिसून आले आहे. शिवाय, सरकारी मदत आणि सवलती यांतून खाजगी मालमत्ताच वाढते. या मालमत्तेवर समाजाचा काहीही अधिकार राहत नाही. त्यामुळे सध्याच्या मदतीतून सामाजिक किंवा सरकारी हस्तक्षेपाची शक्यता कमी आहे. किंबहुना खाजगी मालमत्ता वाढून सरकारी हस्तक्षेप अशक्य होण्याचा संभव आहे. यातून वैयक्तिक आर्थिक सत्ता जास्त होते. हे राष्ट्रहिताला मारक आहे. एका बाजूला याप्रमाणे सरकार खाजगी उद्योगपतींच्या कारवायांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ आहे तर दुसऱ्या बाजूला सद्यःपरिस्थितीत यंत्रांचा आणि अवजारांचा पूर्णपणे उपयोग व्हावा म्हणून आणि बेकारी वाढू नये म्हणून डबघाईला आलेल्या कारखानदारांना देखील—ही परिस्थिती व्यवस्थापनातील चुकांमुळे प्राप्त झाली असली तरीही—सरकारला साह्य करावे लागते!

याप्रमाणे आपल्याकडील मिश्र अर्थव्यवस्था ही एकतर्फी चालू आहे. ही स्थिती जर बदलावयाला हवी असेल, तर सरकारी धोरणात महत्त्वाचे बदल होणे आवश्यक आहे. एकतर महत्त्वाच्या वस्तूंच्या पुरवठ्याबाबत आणि भावमानाबाबत नियंत्रणाचे धोरण मान्य केले पाहिजे. दुसरे म्हणजे ज्या

कारखान्यांना सरकारी साह्य करायचे त्या कारखान्यांवर काही प्रमाणावर तरी सामाजिक हक्क निर्माण होईल याची खबरदारी घेतली पाहिजे. आणि तिसरे म्हणजे उत्पादन आणि रोजगार यांत घट होऊ नये म्हणून कोणत्याही क्षेत्रातील कारखाना सरकारला जरूर तर ताब्यात घेता येईल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे.

## परदेशी हुंडणावळीचा प्रश्न

आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या बहुसंख्य मागासलेल्या राष्ट्रांना परदेशी हुंडणावळीच्या समस्येला तोंड द्यावे लागणारच. कारण विकासकार्यासाठी नेहमीपेक्षा जास्त आयात तर करावीच लागते; परंतु विकासकार्याच्या वाढत्या मागणीमुळे सध्या निर्यात करीत असलेल्या मालापैकी बराचसा माल देशातच वापरला जाण्याची शक्यताही वाढते. यासाठी काळजीपूर्वक आखलेले दीर्घमुदतीचे आयात-निर्यातीचे धोरण असणे आवश्यक आहे. आपल्याकडे असे धोरण असल्याचे दिसून येत नाही. विशिष्ट परिस्थित्यनुसार धोरणात वारंवार बदल केला जातो. निर्यातीचा 'कोटा' बहुधा देशातील किमतीनुसार ठरविला जातो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात आपल्या उत्पादनाची किंमत जेव्हा घसरलेली असते तेव्हा आपला माल निर्यात केला जातो! परिणामी परदेशी व्यापारापासून मिळावा तितका फायदा आपण मिळवू शकत नाही. आयातीचा 'कोटा' अनिश्चित असल्यामुळे उत्पादकाचे संकल्पही निश्चित स्वरूपाचे होऊ शकत नाहीत. याचा परिणाम बाजारातील किमतीवर झाल्याशिवाय राहात नाही. संबंधित व्यापाऱ्यांच्या सल्ल्याने सरकारचे आयात निर्यात धोरण ठरत असल्यामुळे कित्येक वेळा भुईमुगाच्या पेंडीसारखी शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली जिन्नस निर्यात केली जाते! सुसूत्र, दीर्घमुदतीच्या, विचारपूर्ण धोरणाचा अभाव या सर्व अनिश्चिततेच्या मुळाशी आहे.

## भाव व वाटप यांचे नियंत्रण आवश्यक

आयात–निर्यातीवर नियंत्रण असल्यामुळे विविध वस्तूंचा पुरवठा अपुरा पडतो. या परिस्थितीचा समाज–शत्रूंनी फायदा उठवू नये असे वाटत असेल, तर विविध क्षेत्रात सरकारी नियंत्रण आवश्यक आहे हे मान्य करायला हवे. मागणी आणि पुरवठा यांच्यातील संतुलन जेव्हा स्वाभाविकरीत्या कठीण असते, तेव्हा भावमान आणि वाटप यावर योग्य ते नियंत्रण ठेऊन आयात-निर्यात-नियंत्रणाचे किमान दुष्परिणाम होतील अशी खबरदारी सरकारने घ्यावयास पाहिजे. नाहीपेक्षा दलाल आणि मधले व्यापारी परिस्थितीचा बेसुमार फायदा उठवतील आणि परिणामी आयात-निर्यात-नियंत्रण निरर्थक ठरेल. हेच सूत्र सर्व क्षेत्रात लागू आहे. बचत वाढवावयाची असेल तर खर्चावर नियंत्रण ठेवले पाहिजे. विशिष्ट क्षेत्रातील गुंतवणूक वाढावयाची असेल तर इतर क्षेत्रातील गुंतवणुकीवर नियंत्रण ठेवले पाहिजे. याप्रमाणे नियंत्रणे जर निर्माण केली नाही तर योजना पुरी करणे कठीण आहे. हिंदुस्थान सरकारचे अन्नधोरण हे या धरसोडवृत्तीचे एक नमुनेदार उदाहरण आहे.

१९५८–५९ साली प्रसिद्ध झालेल्या 'एकॉनॉमिक सर्व्हे' प्रमाणे १९५३ ते ५५ या काळात दरडोई उपलब्ध धान्याचे प्रमाण १२·८ औंस होते; तर १९५६ ते ५८ या काळात तेच प्रमाण १२·७ औंस होते. आणि ५६ ते ५८ या काळात ५३ ते ५५ या काळापेक्षा सरासरी १५·५ लक्ष टन अन्न जास्त आयात केले जात असूनही ही तूट दिसून येते! या आयातीमुळे आपल्या परदेशी हुंडणावळीवरचा ताण वाढला हे स्पष्टच आहे. इतके असूनही सरकारने अन्नपरिस्थिती सुधारण्यासाठी काहीही केले नाही. युद्धकाळात अमलात आणलेले कडक धोरण तर लांबच राहिले, परंतु 'अशोक मेहता समिती'ने केलेल्या सौम्य स्वरूपाच्या सूचनाही कार्यवाहीत आणल्या नाहीत.

सरकारने शेती-उत्पादनाचे भाव स्थिर करण्याची आवश्यकता कागदोपत्री मान्य केल्याला एक दशक होऊन गेले. हे भाव स्थिर करण्याची आवश्यकता 'एकाफे' आणि 'एफएओ' यांसारख्या आंतर-राष्ट्रीय संस्थांनी वारंवार प्रतिपादिली आहे. परंतु भारत सरकारने मात्र याबाबतीत काहीही करण्याचे टाळले आहे. मोसमापूर्वी शेतकऱ्याला किमान भाव ठरवून देणे किंवा भावमानाची कमाल मर्यादा ठरविणे हे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असूनही सरकारने यापैकी काहीही केले नाही.

## शेतकीखात्याची अनाकलनीय तऱ्हा

शेतकीखात्याच्या धोरणाचा तर अन्वयार्थ लावणे कठीण आहे. १९५५ साली अन्नधान्यावरील नियंत्रणे उठविण्यात आली. नियंत्रणे उठविण्याचे धोरण काही शेतकीखात्याला पसंत नव्हते असे 'अशोक मेहता समिती'ला भासविण्याचा प्रयत्न झाला. नियोजन-मंडळ या निर्णयाला जबाबदार होते असा याचा अर्थ होतो. उलट, नियोजन-मंडळाने हे खरे नसल्याचे सिद्ध करण्याचा अनधिकृतरीत्या का होईना प्रयत्न केला! एवढे असूनही अन्नविषयक दीर्घ मुदतीचे धोरण आखण्यास शेतकीखाते किंवा नियोजन-मंडळ कुणीच तयार दिसत नाही. वेळोवेळी धान्य परिस्थिती आणि भावमान यांविषयी अधिकृतरीत्या विधाने केली जातात. ही सर्व विधाने तात्कालिक परिस्थितीवर आधारलेली असतात. दीर्घ मुदतीचे सुसूत्र धोरण या विधानांतून कधीच दृष्टोत्पत्तीस येत नाही.

धान्याचे भाव स्थिर करण्याचे मार्ग दोन :– (१) सरकारने अन्नधान्य-व्यापार ताब्यात घेणे किंवा (२) या क्षेत्रात सहकारी सोसायट्या वाढविणे आणि त्यांना जरूर ते साह्य देणे. यांतील कोणत्याही उपायाने सावकार-व्यापारी वर्गाच्या सर्वंकष सत्तेला धक्का पोचेल. सावकार-व्यापारी वर्गातून आजचा भांडवलदार निर्माण झाला आहे. साहजिकच या वर्गाच्या सत्तेला धक्का हा भांडवलदार वर्गाला धक्का आहे. अशा प्रकारच्या योजनेला आजच्या सरकारकडून मान्यता मिळणे कठीण आहे.

भाव-नियंत्रण करणे आणि सरकारने व्यापारात पदार्पण करणे यास योजनेसाठी पैसा उभा करण्याच्या दृष्टीनेही महत्त्व आहे. योजनेच्या सुरुवातीच्या काळात तरी अप्रत्यक्ष करांना विशेष स्थान असते. परंतु विविध क्षेत्रांत 'कोटा' पद्धतीमुळे निर्माण होणाऱ्या अपुऱ्या पुरवठ्याच्या परिस्थितीमुळे वस्तूंचे भाव बेसुमार वाढतात आणि यामुळे व्यापारी जो जादा फायदा मिळवितात तो कररूपात वसूल करणे शक्य नसते. जर सरकारही व्यापारात शिरले तर सामान्य माणसावर जादा भाववाढीमुळे निर्माण झालेला भार काही प्रमाणात कमी करता येईल आणि योजनेसाठी त्यात जास्त पैसे मिळण्याची शक्यता वाढेल. याप्रमाणे अप्रत्यक्ष करांतून जास्त पैसा मिळविण्याचा, व्यापार हातात घेणे हा सर्वात अधिक कार्यक्षम मार्ग आहे. यामुळे भाव नियंत्रण तर अधिक चांगल्या प्रकारे करता येईलच, परंतु योजनेसाठी व्यापारातील फायदाही वापरता येईल.

## औद्योगीकरणाचे स्वरूप

कोणत्याही देशात ज्या लोकांच्या हातात खऱ्या अर्थाने अर्थसत्ता असते त्यांना किफायतशीर असे धोरणच राजसत्ता स्वीकारते. हिंदुस्थानात आज खरी अर्थसत्ता उद्योगपती आणि बडे व्यापारी यांच्या हातात आहे. दिवसानुदिवस ही सत्ता कमी कमी लोकांच्या हातात केंद्रित होत आहे. धार्मिक आणि तांत्रिक मक्तेदारी बरीचशी नष्ट झाली आहे, परंतु आर्थिक सत्ता मात्र पूर्णपणे अबाधित आहे. साहजिकपणे सर्व धोरण त्यांना अनुकूल असे आखले जाते किंवा त्या दृष्टीने ते अमलात आणले जाते.

दुसऱ्या योजनेच्या मसुद्यात आपल्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप काय असावे, म्हणजे कोणत्या प्रकारच्या उद्योगधंद्यांना अर्थव्यवस्थेत कोणते स्थान असावे यासंबंधी ढोबळ धोरण दिले आहे. या धोरणानुसार

आपल्याकडील परंपरागत व रूढ उद्योगधंद्यांत अधिक रोजगार वाढावयाचा नाही, या क्षेत्रामध्ये नवे कारखाने निघणार नाहीत, अशी खबरदारी घ्यावयाची आणि या क्षेत्रातील उत्पादन नव्या, सुधारलेल्या यंत्रांचा वापर करून व उपलब्ध साधने आणि श्रमशक्ती यांचा पुरेपूर वापर करून वाढवावयाचे, इतकेच नव्हे तर हळू हळू जसजसा आर्थिक विकास होत जाईल आणि लोकांना पर्यायी रोजगार मिळण्याची शक्यता वाढेल तसतशी रूढ धंद्यांतील रोजगारात घट व्हावी याबरोबरच औद्योगीकरणाच्या दृष्टीने मूलभूत असलेल्या पोलाद वगैरे मालाच्या उत्पादनावर विशेष भर द्यावयाचा असे एकंदर धोरण आहे. या धोरणात बदल करण्याचे काही कारण नाही. परंतु जुने रूढ उद्योगधंदे कोणते, त्यांचे महत्त्व कोणत्या प्रकारे आणि केव्हा कमी करायचे हे निश्चितपणे ठरविण्याची वेळ आता आलेली आहे. त्याचप्रमाणे एकदा पुरेसा भांडवली माल निर्माण करण्याची ताकद आपल्यात आली की, कोणत्या प्रकारचा भांडवली माल आणि त्या अनुषंगाने कोणत्या प्रकारच्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करावयाचे हे निश्चित करावयास हवे.

नियोजनाच्या सुरुवातीला तरी उपभोग्य वस्तूंवरील खर्चाला मर्यादा घालणे आवश्यक ठरते. बचत वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे जरूर असते. या प्रयत्नामुळे ज्या प्रमाणात राष्ट्रीय उत्पन्न वाढते त्या प्रमाणात उपभोग्य वस्तूंवरील खर्च वाढत नाही. कालांतराने राष्ट्रीय उत्पन्नांत पुरेशी वाढ होईल व त्यामुळे उपभोग्य वस्तूंवरही खर्च वाढलेला दिसेल. या दृष्टीने कोणकोणत्या उपभोग्य वस्तूंचे किती उत्पादन करावयाचे आणि या उद्योगधंद्यांची केंद्रे कोणती, कोठे ठेवायची यासंबंधीचा निर्णय मूलभूत महत्त्वाचा आहे. याबाबतीत निश्चित स्वरूपाचे निर्णय केल्यावाचून भावी औद्योगीकरणाची दिशा ठरविणे कठीण आहे.

उद्योगधंद्यांच्या या क्षेत्रात विकेंद्रीकरण कितपत शक्य आहे याचा विचार करणे आणि त्या दृष्टीने प्रयोग व संशोधन करणे जरूर आहे. आधुनिक तंत्रावर आधारलेल्या यंत्रोद्योगासारख्या क्षेत्रातही विकेंद्रीकरण शक्य आहे का, याचा विचार झाला पाहिजे. छोट्या छोट्या 'वर्कशॉप्स' मधून यंत्रोत्पादन करून गरज भागू शकेल काय, यासंबंधी विचार करून विविध औद्योगिक क्षेत्रांचे अंतिम स्वरूप केंद्रित अगर विकेंद्रित कसे असावे या बाबतीत निर्णय करणे आवश्यक आहे.

## मजूर-प्रधान तंत्र स्वीकारणे इष्ट

हिंदुस्थानात औद्योगीकरणाचे स्वरूप काय आहे याचा येथे विचार करणे योग्य ठरेल. आपल्याकडे एका बाजूला वाढती लोकसंख्या आणि दुसऱ्या बाजूला तुलनात्मकदृष्ट्या कमी पडणारी नैसर्गिक आणि भांडवली संपत्ती अशी स्थिती आहे. या परिस्थितीचा दुहेरी विचार करणे आवश्यक आहे. प्रथमतः आपल्याकडे बेकारी आणि अर्ध-बेकारीच्या समस्येचा विचार केला पाहिजे. रोजगाराची परिस्थिती दिवसानुदिवस जास्तच खालावत आहे. पुरेसा रोजगार पुरविण्याच्या दृष्टीने पुढील योजनेचा विचार झाला पाहिजे. आपल्याकडील भांडवलाची कमतरता लक्षात घेता जादा रोजगार पुरविण्यासाठी दरडोई कमीत कमी भांडवल लागेल अशा तंत्रांचाच अवलंब केला पाहिजे. आपल्याकडील भांडवलाची कमतरता ही केवळ तात्पुरत्या स्वरूपाची नाही. तसे असते तर एका बाजूला बदलत्या स्वरूपाच्या मजूर-प्रधान तंत्राचा वापर आणि दुसऱ्या बाजूला प्रगत तंत्रावर आधारलेले औद्योगीकरण अशा धोरणांचा विचार करावयासही हरकत नव्हती. परंतु प्राप्त परिस्थितीत दीर्घकालपर्यंत कमीत कमी भांडवलाचा उपयोग करावा लागेल अशा तंत्राला प्राधान्य देणे भाग आहे. भांडवलाची कमतरता असताना काही क्षेत्रांत भांडवल-प्रधान तंत्राचा वापर करणे म्हणजे इतर क्षेत्रांतील भांडवल दुर्मिळ करणे हे होय. असे करणे समाजविरोधी आणि आर्थिक दृष्ट्या तोट्याचे आहे, हा या समस्येचा दुसरा पैलू आहे.

थोडक्यात सांगावयाचे तर आपला औद्योगिक विकास छोट्या कारखान्यांच्या स्वरूपातच करण्याचे योजिले पाहिजे. आधुनिक उत्पादन-तंत्राच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरेल तेथेच फक्त बड्या कारखान्यांना आणि भांडवलाच्या केंद्रीयीकरणाला वाव दिला पाहिजे. या कारखान्यांवर शक्यतो समाजाचे नियंत्रण राहील, किंबहुना हे कारखाने सरकारी क्षेत्रातच असतील याविषयी खबरदारी घेतली पाहिजे. आपला औद्योगिक विकास छोट्या कारखान्यांच्या स्वरूपात केला पाहिजे हे अमान्य करणे म्हणजे बेकारीतून उद्भवणारे सामाजिक आणि आर्थिक तोटे महत्त्वाचे नाहीत आणि बेकारी-निवारण जरूरीचे नाही असे म्हणणे होय.

## विकेंद्रीकरणाची निकड

रोजगाराबाबतची परिस्थिती दिवसेंदिवस खालावत आहे. ज्या प्रमाणात बेकारी वाढत आहे त्या प्रमाणात जादा रोजगार पुरविण्यास आपले उद्योगधंदे समर्थ नाहीत. जास्त जास्त लोकांना शेतीकडे वळू देऊन भूमीवरचा भार वाढविणे म्हणजे प्रगतीचा मार्ग अधिकाधिक कठीण करणे होय. आपल्या सध्याच्या परिस्थितीत दळणवळण, वाहतूक इत्यादी क्षेत्रांत जादा रोजगार पुरविता येणे कठीण आहे. कारण उद्योगधंद्यांची बहुविध वाढ झाल्यावाचून दळणवळण, वाहतूक वगैरे क्षेत्रांची वाढ होणे असंभवनीय आहे. या सर्व मुद्द्यांचा विचार करता विकेंद्रित स्वरूपात औद्योगिक वाढ करणे आवश्यक ठरते.

या अर्थाच्या घोषणा राजकीय स्वार्थासाठी गेली दहा वर्षे केल्या जात आहेत. प्रत्यक्षात मात्र मोठ्या शहरांतून मोठे उद्योगधंदे पुरविण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. औद्योगिक क्षेत्राचे विकेंद्रीकरण काही तातडतोब होऊ शकणार नाही. परंतु औद्योगिक विकासाच्या दृष्टीने योग्य अशी छोटी शहरे आणि गावे निवडून तेथे जर औद्योगीकरणाच्या दृष्टीने उपयुक्त असे सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रम हाती घेतले तर विकेंद्रीकरणाच्या दिशेने ते एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. त्याचबरोबर आज अनेक वर्षे लोकांना काम पुरविणारे कारखाने बंद पाडून बेकारी वाढणार नाही यासाठी योग्य ती खबरदारी घेतली पाहिजे.

या दृष्टीने आज दिल्लीतच केंद्रित असलेल्या नियोजनाचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. आपल्या सर्वच कार्यात केंद्रीकरणाची प्रवृत्ती आढळते. आपल्या घटनेनुसार आपण घटक-राज्यपद्धती स्वीकारली असूनही प्रत्यक्षात मात्र बव्हंश राजकीय सत्ता मध्यवर्ती सरकारच्या हाती केंद्रित झाली असल्याचे दिसून येते! समूह-विकास-योजनेसारखे कार्यही एका मध्यवर्ती मंत्र्याकडे दिलेले दिसते. आजच्या परिस्थितीत उद्वेगकारक घटना ही की, जे धोरण स्वीकारले जाते ते चर्चात्मक मार्गाने नाही तर काही सत्ताधिष्ठित विशिष्ट व्यक्तींच्या लहरीनुसार! खालपासून तयार होणाऱ्या योजनांबाबत बरेच बोलले जात असले तरी अजूनही आजच्या योजना खऱ्या अर्थाने तशा नाहीत. केंद्राने खालच्या लोकांना कार्यप्रवण केले पाहिजे. जेव्हा केंद्राकडून विशिष्ट योजनाच खालच्या लोकांच्या हातात दिल्या जातात, तेव्हा विकेंद्रित नियोजन कसे होणार? सध्याच्या रचनेत बाह्यात्कारी कोणताही बदल न करता, केवळ सत्तेचे संतुलन बदलल्याने योजनेच्या धोरणात बदल घडून येऊ शकतो. जोपर्यंत दिल्लीला काही व्यक्तींच्या हातांत सत्ता केंद्रित झालेली आहे, तोपर्यंत मोठ्या शहरांतील, मोठ्या धंद्यांतील, मोठ्या योजनेशिवाय इतर कोणताही कार्यक्रम हाती घेतला जाईल हे शक्य दिसत नाही.

घोषणा अर्थपूर्ण करण्याची वेळ आता आलेली आहे. वेगवेगळ्या परिस्थितीत निरनिराळे प्रयोग केल्यानेच हे शक्य होईल. परिस्थितीचा अभ्यास केल्याशिवाय परिस्थितिसापेक्ष प्रयोग हाती घेणे शक्य नाही. असे केले तर खऱ्या अर्थाने विकासकार्य (विकासकार्याचे अनुकरण नव्हे) सुरू करता येणे शक्य आहे. परंतु यासाठी प्रांतनिहाय योजना-अधिकारी नेमणे आणि त्यांना आवश्यक तेवढे

अधिकार देणे आवश्यक आहे. गावोगावी विचारपूर्ण योजना तयार केल्याशिवाय खऱ्या अर्थाने त्या त्या भागासाठी विकासयोजना तयार होऊ शकणार नाहीत. यासाठी यंत्रणा आणि कार्यकर्ते निर्माण करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या विभाग-योजनामुळेच त्या त्या भागांतील साधने आणि माणसे उपलब्ध होणे शक्य आहे.

कदाचित हे सर्व तत्त्वतः मान्य होईलही. परंतु विचारांत क्रांती घडून आल्यावाचून व्यवहारात तसे दृश्य दिसणार नाही. बोलायचे ग्रामराज्याबाबत आणि प्रत्यक्षात राज्य सकारांनाही पुरेशी स्वायत्तता द्यावयाची नाही, अशी सध्याची कार्यपद्धती दिसते. सध्याच्या राज्य सरकारच्या योजना म्हणजे केंद्रमान्य होतील अशा काही संकल्पांची बांधलेली मोट इतकाच त्यांना अर्थ आहे.

*साधना* १३ : १–२ १५ ऑगस्ट १९६० पृ० ७–१२.

☆

# १० . . आर्थिक विकासाच्या योजना आणि राष्ट्रीय एकात्मता

नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर आणि त्यातून मिळणाऱ्या महसुलाचे वाटप हा संघराज्याच्या सुरळीत कारभाराच्या मार्गातला एक कसोटीचा प्रश्न असतो. संघराज्य, मग ते कोणत्याही प्रकारचे असो, त्याला ह्या प्रश्नांना तोंड द्यावेच लागते. परंतु त्यातही जी संघराज्ये आर्थिक दृष्ट्या मागासलेली असतात आणि आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे नियोजन करू मागतात त्यांच्या बाबतीत हे प्रश्न विशेष अवघड होऊन बसण्याची अधिक शक्यता असते. राज्य सरकार आणि संघसरकारे यांच्यात किंवा वेगवेगळ्या सहकारी राज्यांत या दृष्टीने मतभेद निर्माण होऊ शकतात. जेथे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापराबाबत घटनेने स्पष्ट अशी आखणी केलेली असेल तेथे साधनसंपत्तीचे क्षेत्र कोणत्या राज्याच्या कक्षेत आहे आणि त्याचा विनियोग कोण करतो, याबाबत विशेष मतभेद निर्माण होत नाहीत.

## नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनियोग

ज्या राज्यांच्या भूप्रदेशात ही नैसर्गिक साधनसंपत्ती गवसते त्या राज्यांना स्वाभाविकपणेच असे वाटते की, तिचा उपयोग आपल्या राज्यातील आम जनतेच्या भल्यासाठी जास्तीत जास्त झाला पाहिजे. राज्यातील साधनसंपत्तीच्या विनियोगाचे फायदे जेवढ्या प्रमाणात राज्याच्या भूप्रदेशाबाहेर जातात तेवढ्या प्रमाणात आपल्यावर अन्याय झाल्यासारखे त्या राज्यांना वाटते. राज्यातील भूगर्भसंपत्ती व जलसंपत्ती यांच्या विनियोगाच्या योजनांबरोबर आनुषंगिक अशा दुय्यम उद्योगांची मालिका निर्माण होते. किंवा त्याच क्षेत्राच्या भोवती इतरही धंदे उभे राहत असतात. औद्योगिक क्षेत्राची वाढ एखाद्याच केंद्राभोवती केवळ न होता ती राज्यात जास्तीत जास्त विखुरली जावी असे सर्वच राज्यांना वाटत असते. आणि त्या उलट घडण्याचा संभव दिसताच एक प्रकारची अन्यायाची बोचणी त्यांना वाटू लागते. आसामातील खनिज तेलांच्या शुद्धीकरणाबाबतचे भांडण हे या सदरात मोडते.

राज्याच्या प्रदेशात सापडणारी नैसर्गिक साधनसंपत्ती दुर्मिळ आणि किमती असते तेव्हा त्यात अप्रत्यक्ष वाटा मिळण्याऐवजी प्रत्यक्षच वाटा मिळावा, अशी स्वाभाविकच त्या त्या राज्यांच्या सरकारांची अपेक्षा असते. केंद्र सरकार त्या साधनांचा कोणत्या प्रकारे व कोणत्या गतीने उपयोग करू चाहते, त्याबाबतही राज्य सरकारांना लक्ष घालावे लागते. राज्यांना या साधनांचा पूर्ण आणि त्वरित उपयोग होण्याची पुष्कळ वेळा घाई असते. उलट राष्ट्रीय गरजांचा विचार करून आणि काही निश्चित व्यापक सिद्धान्त ठरवून केंद्र सरकारला योजनांची क्रमवारी ठरवावी लागते. राज्यांना स्वतःच्या त्वरित विकासाची असलेली तळमळ आणि केंद्र सरकारला व्यापक धोरणाने ठरवावी लागणारी क्रमवारी यामुळे मतभेदाचे प्रसंग उद्‌भवतात. अशा मतभेदांच्या प्रसंगी मार्ग काढताना त्या त्या प्रश्नांचा सामग्र्याने विचार केला जाणे

आवश्यक असते. काही सार्वकालिक असे वस्तुनिष्ठ सिद्धान्त ठरवून अशा प्रकरणांची योग्य उत्तरे हमखास मिळतातच असे सांगणेही अवघड आहे. परंतु जेव्हा जेव्हा असे प्रसंग उद्‌भवतील तेव्हा तेव्हा सर्वसामान्य सिद्धांत ठरवण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे. आणि त्यांच्या प्रकाशात, अभिनिवेशांना बळी न पडता प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. या पद्धतीने काही संकेत निर्माण होऊ शकतील.

## आंतरराज्यीय वादस्थळे

एका राज्यातील साधनसामग्रीचा विनियोग करण्याचा प्रश्न त्या मानाने थोडा सोपाही म्हणता येईल. परंतु नद्यांच्या पाण्याच्या वापराचेच उदाहरण घेतले, तर अनेक राज्यांच्या विकासाचा तेथे संबंध येतो. पंधरा वर्षांपूर्वी पाणीवाटपाच्या प्रश्नावरून देशात कोठल्याही प्रकारचे मतभेद आढळत नव्हते. त्या काळात नियोजित आर्थिक विकासाचा विचारच आपण करीत नव्हतो. ती ती योजना आर्थिक दृष्ट्या परवडणारी आहे किंवा कसे एवढाच विचार केला जात असे. आणि त्यामुळे बोटावर मोजण्याइतक्याच योजनांचा तेव्हा विचार केला जात होता. परंतु आज परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. आज शेतीला पाणीपुरवठा आणि जलविद्युतनिर्मिती हे विकास योजनांच्या आखणीतील एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. आपल्या देशातील उत्पादनाचे शेती हेच आज सर्वात मोठे साधन असल्याने पाणीपुरवठ्याच्या साधनांचा कमाल उपयोग करून घेतल्याशिवाय हिंदुस्थानातील प्रायः कोणत्याच भागाच्या विकासाची वाटचाल सुरूच होऊ शकत नाही. कारण शेतीच्या विकासाशिवाय धंद्यांच्या वाढीचा पायाच तयार होऊ शकत नाही. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या परवडण्याची एकच एक कसोटी लावून जलशक्तीच्या वापराची व्यवहार्यता ठरवली जात नाही. मालाच्या वाढत्या किमती आणि वाढती मागणी यामुळे सघन शेतीव्यवसाय हा दिवसेंदिवस अधिक किफायतशीर ठरू लागला आहे, असे गेल्या दहा वर्षांचा आढावा घेतला तर आढळून येते. आता असे वाटू लागले आहे की काही दिवसानी सरकारचा, पाणीपुरवठा योजनांत गुंतणारा आवर्तक व अनावर्तक असा सर्व खर्च त्यांच्या व्यवस्थापनातून जवळपास सर्व योजनांत भरून निघू शकेल. जे प्रकल्प विद्युत्‌निर्मितीचे आहेत त्यांच्याबाबत तर ही गोष्ट अधिकच खरी आहे. ज्या राज्यांत शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने जलसंपत्तीची चणचण आहे, त्या त्या ठिकाणी अनेक राज्यांची मिळून जी नद्यांसारखी सामाईक पाणीपुरवठा साधने आहेत त्यांच्या पाण्याच्या वाटपाबाबत प्रश्न निर्माण होणे अटळ आहे. अशा प्रकारचे प्रश्न पुढे निर्माण होण्याची शक्यता आहे, ही गोष्ट घटनाकारांच्या ध्यानात आली होती. आणि असे प्रश्न सोडवण्याबाबत त्यांनी काही निश्चित घटनात्मक तरतुदीही करून ठेवल्या आहेत. योग्य पाहणी व चौकशी, परस्पर विचार-विनिमय आणि करारमदार आणि ते जमले नाहीतर लवाद पद्धतीचा अवलंब, हा मार्ग पाणीवापराच्या योजनांची आखणी करताना दुर्दैवाने यापूर्वी वापरला गेला नाही. त्यामुळे निष्कारणच प्रश्नांतील गुंतागुंती वाढल्या. कृष्णा-गोदावरी या नद्यांच्या पाणीवापराचा प्रश्न हे त्याचे एक उदाहरण म्हणून दाखवता येईल.

## घाटाघाटीतील विपरीती

राज्याराज्यातील आणि इतरही वादग्रस्त प्रश्नांबाबत केंद्र सरकारातील जबाबदार मंडळींनी जी चमत्कारिक भूमिका वेळोवेळी घेतली तिची थोडीफार छाननी करणे या संदर्भात आवश्यक आहे. ह्या मंडळींचा ह्या बाबतचा खाक्या अजब आहे! अशा प्रकारे काही मतभेद आहे ही गोष्टच मुळात नाकारायची, हे त्यांचे पहिले पाऊल! त्यातूनही या मतभेदांनी उग्र स्वरूप धारण केलेच, तर ते अगदी किरकोळ मतभेद आहेत असे मानणे, हे प्रश्न सोडवण्याबाबतचे त्यांचे दुसरे पाऊल! त्यांतूनही मतभेद

विकोपाला गेले तर मग पडद्याआड वाटाघाटी करून त्यांची तड लावण्याचा प्रयत्न करणे हे तिसरे पाऊल ! यावेळी संबंधितांनी आपसांत वाटाघाटी करून मतभेद मिटवण्याचा प्रयत्न कसोशीने करावा, असाच वरचेवर सल्ला देणे...ही प्रश्न सोडवण्याची जबाबदार मंडळीची तऱ्हा. यामुळे होते असे की, वर्षानुवर्षे प्रश्न लोंबकळत राहातो. एवढेच नव्हे, तर आता झालेला निर्णय हा अखेरचा, असा विश्वासच वाटत नाही. कुठलीही निश्चित तत्त्वे ठरवून त्यानुसार हे निर्णय घेण्यात आले असे दिसत नाही; तसे आहे असे पटवून देण्याचाही कुठला प्रयत्न होत नाही. त्यामुळे प्रश्नाची तड कधी लागतच नाही. दुखणे चरत राहते. आपसांत विचारविनिमय करून राज्यांनी आपले मतभेद मिटवून भांडणे टाळावी, ही गोष्ट काही वावगी नाही. परंतु ह्या मार्गाच्याही काही मर्यादा आहेत, हे वास्तव सत्य ध्यानात घेण्याची आवश्यकता आहे. वाटाघाटींच्या मार्गांनी आपण आपसातले मतभेद मिटवले नाहीत तर लवादाचा किंवा अन्य मार्ग चोखळण्यात येईल, याची निश्चित जाणीव दिली गेली तर वाटाघाटीचा नुसताच घोळ घालीत न बसता संबंधित लोक मतभेद मिटविण्याचा कसोशीचा प्रयत्न करण्याला प्रवृत्त होतील. परंतु आपसांतील वाटाघाटी आणि समझौता हाच प्रश्न सोडवण्याचा एकमेव मार्ग आहे, असे सांगितले जाते तेव्हा ह्या मार्गाने प्रश्न कधीही न सुटण्याचीच खात्री बाळगावी ! कारण प्राप्त परिस्थितीचा फायदा ज्या पक्षाला मिळत असतो त्याला वाटाघाटी कधी निर्णयात्मक अवस्थेला पोचू न देणे स्वाभाविकतःच हितावह वाटते. आणि ते त्यांना सहज साधतेही. अशा प्रश्नांच्या सोडवणुकीबाबतचे निश्चित सुयोग्य सिद्धान्त आणि निकष ठरवण्याची अनिच्छा हेही प्रश्न निर्माण होण्याचे आणि चिघळत राहण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. गेली दहा वर्षे राष्ट्रीय नियोजनाच्या कालखंडात आपण जगत आहोत, असे आपण मानावे अशी अपेक्षा आहे. उद्दिष्टांची रेखीव आखणी, उपलब्ध साधनसामग्रीशी त्यांचा घातलेला विवेकपूर्ण मेळ आणि विविध प्रकल्पांची अर्थपूर्ण क्रमवारी या तीन राष्ट्रीय विकास योजनेच्या मूलभूत शर्ती आहेत. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर, प्रकल्पांची आखणी आणि वेळापत्रक याबाबत मतभेद निर्माण होतील तेव्हा राष्ट्रीय विकास योजनेच्या खड्यांला धरून त्यांची सोडवणूक करणे हे सोपे असते. परंतु उद्दिष्टांची आणि धोरणाची रेखीव मांडणी करून त्या अनुषंगाने कार्यक्रम आखून योजना बनवण्याचे काम दुर्दैवाने आपल्या देशात कधीच झाले नाही. योजनेच्या सुरुवातीला काही ठोकताळ्यांचा आधार घेतला जावा हे समजण्यासारखे आहे. योजनेची मांडणी आणि कार्यक्रमाची आखणी करताना तत्कालीन परिस्थितीची ऐतिहासिक कारणपरंपरा ध्यानात घेऊन त्या चौकटीत योजनेचा तपशील नीट बसेल हे पाहणे त्या वेळी अटळ होते. परंतु कालान्तराने जुनी आश्वासने पूर्ण झाल्यानंतर अर्थातच एक तर्कशुद्ध चौकट तयार होऊन तिच्यात सर्व भावी कार्यक्रम नेटके बसवले जाणे शक्य होते. अशा प्रकारची तर्कशुद्ध चौकट तयार करण्याच्या दृष्टीने पावले टाकण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक व्हायला पाहिजे होता. परंतु ह्या गोष्टीकडे जावे तसे पुरेसे लक्ष दुर्दैवाने गेले नाही; आणि नियोजन-मंडळ किंवा केंद्र सरकार यांना तसे करणे भाग पडावे अशीही स्थिती नाही.

मोठ्या धरणांची पूर्वीच हाती घेतलेली कामे अर्धवट सोडता आली नाहीत, हे म्हणणे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालापुरते रास्त म्हणता येईल. परंतु त्यानंतरच्या काळात तरी या बाबतीत काही निश्चित तत्त्वे ठरवणे व त्या अनुषंगाने योजनेतील कार्यक्रमांची क्रमवारी ठरवून घेणे आवश्यक होते. परंतु हे कधीच घडले नाही. लागेबांधे आणि दबाव आणण्याची शक्ती यांचा प्रभाव योजना-आयोगावर पडल्याचे ह्या क्षेत्रातील व इतरही क्षेत्रातील घटनांवरून स्पष्ट दिसते. वैयक्तिक पूर्वग्रह आणि राजकीय हेतू यांचा प्रभाव पडण्याला पूर्ण मुभा, शक्य तेथे विरोधी मतांची मुस्कटदाबी करण्याला वाव, योग्य पुरावे आणि आकडेवारी यांचा आग्रह धरून त्यांच्या आधारे कार्यक्रम आखण्याऐवजी ठोकताळ्यांवर विसंबून त्यांची आखणी करण्याची प्रथा यांनी आपले नियोजन वारंवार डागाळलेले

दिसते, असे म्हणण्याची दुर्दैवाने पाळी येते. कृष्णा-गोदावरीच्या पाण्याचा किंवा इतर तत्सम वादांचे मूळ या प्रवृत्तीत आणि अशा कृतीत आहे.

## प्रकट चर्चेची आवश्यकता

ज्या योजनेची आंखणी केंद्रानुवर्ती पद्धतीने केली जाते आणि केंद्राची उद्दिष्टे आणि कसोट्याच जेथे प्रभावी ठरतात तेथे योग्य अशा स्थानिक व प्रादेशिक आकांक्षांची उपेक्षा होऊन अन्याय होण्याचा संभव असतो ही गोष्ट खरी आहे. असा अन्याय होऊ नये या दृष्टीने परस्पर विचार-विनिमय करण्याला व दोहोत मेळ घालण्याला सदैव वाव असला पाहिजे, ही गोष्टही खरी. परंतु हे घडून यावयाचे असेल तर या प्रश्नाकडे पाहण्याची आजची रूढ पद्धती मुळातूनच बदलली पाहिजे. यासाठी विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध करून घेणे, उद्दिष्टे आणि तत्त्वे निश्चित करणे, प्रकल्पांची तपशीलवार आणि स्पष्ट मांडणी करणे आणि लोकांना याबद्दल चर्चा व विचारविनिमय करण्याला भरपूर वाव देणे, अशी भूमिका घेतली तर ते योग्य होईल. या दिशेने टाकलेले एक योग्य पाऊल म्हणून गुल्हाटी कमिशनच्या नेमणुकीचा निर्देश करता येईल. परंतु गुल्हाटी कमिशनच्या प्रतिवृत्ताची उपेक्षा होता कामा नये. त्याबाबत जी कारवाई केली जाईल तीही उघड आणि तत्त्वनिष्ठ असली पाहिजे. पडद्याआडच्या वाटाघाटी आणि राजकीय दबाव या गोष्टी होता कामा नयेत.

भारतासारख्या खंडप्राय देशातील लोकशाही संघराज्यात मतभेद असणे, हितभिन्नता वाटणे आणि क्वचित कुरबुरी चालणे या गोष्टी अपेक्षितच आहेत. मतभेद दडपून टाकणे किंवा एखाद्या समाजाला आपल्या हिताच्या वाटणाऱ्या गोष्टीचा आग्रह धरण्याला वा त्या दृष्टीने न्याय्य कृती करण्याला प्रतिबंध करणे हे अंतिम दृष्ट्या घातक ठरेल. अशा प्रकरणांचे वाईट परिणाम टाळावयाचे तर लोकमत सुबुद्ध करणे आणि उदार वागणूक ठेवणे एवढाच मार्ग आहे. सुबुद्ध लोकमत तयार करावयाचे तर मतभेदाच्या प्रश्नाबाबतची सर्व वस्तुस्थिती लोकांपुढे उघडपणे तपशीलवार मांडली पाहिजे. त्याबाबत लोकांनी सर्वांगीण अभ्यास व चर्चा करावी, या गोष्टीला सक्रिय प्रोत्साहन दिले पाहिजे. तशा वेगवेगळ्या संध्या उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. या बाबतचे निर्णय तत्त्वनिष्ठेने, निर्भयपणे आणि पक्षपातरहित बुद्धीने केले जातात, असे लोकांना जाणवले पाहिजे. लोकशाही संघराज्यात राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हायची व टिकून राहायची तर वेगवेगळ्या राज्यांतील व लोकसमूहांतील संबंधाबाबत न्याय्य तत्त्वांचा सहर्निश व सार्वत्रिक सक्रिय अवलंब केला जातो असा प्रत्यय लोकांना आला पाहिजे. दहशतीने किंवा बळाने न्यायतत्त्वांपासून सरकार कदापि विचलीत होत नाही, ही गोष्ट ज्या प्रमाणात लोकांच्या प्रत्ययास येईल त्या प्रमाणात मतभेदांची तीव्रता आणि प्रक्षोभ कमी होऊन एकात्मता साध्य होईल.

*साधना* १५ : ८ २९ सप्टेंबर १९६२ पृ० ३,१०.

☆

# ११ . . जिल्हा विकास योजना :
# तत्त्वे, पद्धती व अंमलबजावणी व्यवस्था

जिल्हा विकास योजना ही राष्ट्राच्या समग्र विकास योजनेचा एक भाग आहे. नियोजन पूर्णपणे केंद्रित असल्यास सर्व प्रदेशातील सर्व स्तरांवरील व सर्व प्रकारच्या कार्यक्रमांचा विचार एकत्रित केला जातो आणि राष्ट्रीय योजनेत जे ठरले त्याची अंमलबजावणी करावयाची एवढेच कार्य स्थानिक शासनाधिकाऱ्यांकडे येते. परंतु जेथे राज्यघटना संघात्मक असते व जेथे विकेंद्रीकरणास महत्त्व दिले जाते तेथे योजना बनविणे व राबविणे या दोन्ही क्रिया राज्यकारभाराच्या निरनिराळ्या स्तरावर काही अंशी स्वतंत्रपणे होऊ शकतात. काही अंशी म्हणण्याचे कारण हे की सर्वांगीण राष्ट्रीय विकास योजनेची उद्दिष्टे व मार्ग मूलतः ठरल्यावर राष्ट्रातील भागाभागाच्या अंतर्गत योजना या राष्ट्रयोजनेशी व एकमेकांशी सुसंगत असाव्या लागतात. या दृष्टीने राज्य व जिल्हा नियोजनाचे क्षेत्र व स्वायत्तता मर्यादित होतात.

## नियोजनातील केंद्रीकरण

केवळ घटनात्मक दृष्टीने पाहता निरनिराळ्या स्तरांवरील राज्यसंस्थांचे कार्यक्षेत्र कायद्याने त्यांस नेमून दिले असते, तेवढ्यापुरत्या त्या स्वायत्त मानता येतात. व्यवहारतः–विशेषतः नियोजनाच्या बाबतीत–प्रत्यक्ष कारभारास वेगळे वळण लागू शकते. हिंदुस्थानाची राज्यघटना संघात्मक असली आणि आज आपल्या देशात विकेंद्रीकरणाबाबत विशेष बोलले जात असले तरी आपले नियोजन बहुतांशी केंद्रितच आहे. याची मुख्यतः दोन कारणे आहेत. एकतर योजना राबवण्यास लागणारा जादा पैसा मुख्यतः हिंदुस्थान सरकारकडून सर्वत्र यावा लागतो. यामुळे या पैशाच्या वापराबाबत अटी घालणे हे हिंदुस्थान सरकार साहजिकच करू इच्छिते व हे करावयाचे म्हणजे पैसा कोणत्या कामी खर्च होतो याचा तपशील पाहणे म्हणजे पर्यायाने राज्य योजनांचा बराचसा तपशील ठरविणे असे होते. भारतीय नियोजन मोठ्या अंशी केंद्रित असण्याचे दुसरे कारण म्हणजे नियोजन करणाऱ्या स्वतंत्र यंत्रणा भारत सरकार खेरीज इतर कोणत्याच स्तरांवर निर्माण करण्यात आल्या नाहीत हे होय. नियोजनाची उद्दिष्टे व मार्ग यांचा आपल्या प्रदेशापुरता व कार्यक्षेत्रापुरता स्वतंत्र विचार करून काही वैशिष्ट्यपूर्ण योजना आखणे हे कोणत्याच राज्यात आजवर यामुळे होऊ शकले नाही. मुख्यतः सचिवालयातील अधिकाऱ्यांनी खातेप्रमुखांच्या सहाय्याने तयार केलेली खातेवार मागणी अगर मांडणी हेच आजच्या राज्य योजनांचे स्वरूप आहे. परिणामी जो नियोजनशास्त्राचा अगर व्यवहाराचा विचार दिल्लीत झाला, व जे खातेवार प्रकल्पाचे स्वरूप व साचे तेथे बनले त्यांच्याच सहाय्याने आपल्या योजना बनवाव्या, याहून निराळे कोणत्याच राज्यात घडू शकत नाही. जिल्हा परिषदा स्थापन करिताना त्यांना विकास योजनात्मक काही विशिष्ट अधिकार देण्यात आले होते. परंतु चतुर्थ

पंचवार्षिक योजना बनविताना त्यांना आपल्या जिल्हा योजनेच्या निश्चित मर्यादा व चौकट दर्शवून स्वायत्त क्षेत्र कोणते हे सांगण्यात आले नाही. एवढेच नव्हे तर, जिल्हा परिषदांस अवास्तव योजना तयार करण्यास उत्तेजन देऊन त्यांच्या नियोजनात्मक अधिकारांचा बोजवारा उडविला गेला. आता चतुर्थ योजनाही—सर्व जिल्ह्यांची व राज्यांची—खऱ्या अर्थी सचिवालयातच बनणार हे उघड आहे.

सद्य:स्थिती अशी असली तरी हीच कायम टिकणार आहे असे मानण्याचे कारण नाही. तेव्हा जिल्हा योजनांचे खरे स्वरूप व कार्य कोणते, त्या कशा बनवाव्या व अमलात आणाव्या याचा विचार येथे करणे अयुक्त ठरणार नाही. या विवेचनाच्या सहाय्यानेच क्रमाक्रमाने सद्य:स्थिती कशी पालटावी व पालटता येईल हे कळू शकेल.

## जिल्हा योजनेचे मर्यादित क्षेत्र

वर सांगितले की जिल्हा योजना ही राष्ट्र योजनेचा एक भाग आहे. जिल्हा योजनेची उद्दिष्टे साहजिकच राष्ट्रीय योजनेतील उद्दिष्टे हीच असतात. आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टांचे वर्णन सुबत्ता व स्वास्थ्य सार्वत्रिक साधणे असे थोडक्यात करता येईल. जास्त फोड करून सांगावयाचे तर ही सुबत्ता, सर्व उत्पादनसाधनांची सुरक्षा व सतत वाढ आणि उत्पादनाचे सुधारते तंत्र व वाढती कार्यक्षमता यांवर अवलंबून असते. स्वास्थ्य हे उत्पादन-वाढीचे व तंत्र सुधारण्याचे युक्त मार्ग स्वीकारण्याने व वाढत्या उत्पादनाचे वाटप समानता साधण्याकरता करण्याने साधता येते. आणि या क्रिया सार्वत्रिक घडवावयाच्या तर दोन्ही बाबतीत सर्व प्रदेश व समाजातील सर्व स्तर यांकडे लक्ष द्यावे लागते.

राष्ट्रीय पातळीवर ही उद्दिष्टे व मार्ग व्यापक शब्दांत मांडली तरी चालतात. जिल्हा योजनांचा विचार करताना त्यांचा अर्थ जास्त विशिष्ट व वस्तुनिष्ठ शब्दांत व्यक्त करावा लागतो. असे करताना जिल्हा योजनेचे क्षेत्र मर्यादित आहे हे लक्षात घ्यावे लागते. आयात-निर्यात व्यापार किंवा चलनविषयक धोरण अगर राष्ट्रीय सरकारने ठरवावयाच्या गोष्टी या क्षेत्राबाहेरच्या आहेत. तसेच सबंध राज्याकरिता ज्यांचे नियोजन होते त्याही बाबी जिल्हा पातळीवर हाताळता येत नाहीत. उदाहरणार्थ, जमीन-धारकांचे मालकी हक्क अगर कूळ म्हणून सुरक्षितता या गोष्टींचा शेती-उत्पादनवाढीशी खचित संबंध आहे. पण या विषयांचे नियमन व कायदे राज्य सरकारच्या कक्षेतील आहेत. या कायद्याची चौकट गृहीत धरूनच जिल्हा परिषदेला आपली योजना आखावयाची असते. तसेच आगगाड्या, राज्यकक्षेतील दळणवळणाचे रस्ते, पाटबंधाऱ्याच्या मोठ्या योजना किंवा मोठी कारखानदारी हाही विषय भारत सरकार अगर राज्य सरकारे यांच्या कक्षेत पडतात. यावरून हे स्पष्ट होते की ज्या बाबतीत स्थानिक परिस्थिती व बदल यांचे महत्त्व अधिक व ज्या विषयांत तपशील व बारकावा पाहून जागोजागी अनुरूप योजना आखाव्या लागतात त्या गोष्टीच मुख्यत: स्थानिक-जिल्हा योजनेत समाविष्ट होतात—कराव्या लागतात. तेव्हा राष्ट्रीय योजनेच्या उद्दिष्टांचे स्थानिक स्वरूप प्रगट करावयासाठी प्रथम स्थानिक परिस्थिती व स्थानिक समस्या यांची यथार्थ माहिती करून घेतली पाहिजे.

## जिल्हा योजनेची पूर्वतयारी

आज अशी आवश्यक माहिती कोणत्याच महत्त्वाच्या बाबतीत उपलब्ध नाही. ही माहिती मुख्यत: दोन प्रकारची असावी लागते; एक आर्थिक व दुसरी तांत्रिक. जिल्हा योजना बनविण्यास सुरुवात करण्याआधी निदान स्थूल मानाने तरी माहिती मिळविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. प्राथमिक स्थूल माहितीवरच सुरुवातीचा सांगाडा उभारावा लागेल. परंतु नियोजन दीर्घकालीन करावयाचे तर क्रमाक्रमाने माहिती जास्त तपशीलवार व बिनचूक गोळा करण्याची व्यवस्था झाली पाहिजे. व बदलती

परिस्थिती व नियोजन-कार्यक्रमांचे परिमाण हे नियोजकांस अजमाविता आले पाहिजे. या बरोबर विशिष्ट स्थानिक समस्यांबाबत प्रयोग व संशोधन यांची तरतूदही स्थानिक योजनेत करावी लागेल. एवंच, नियोजन जाणतेपणाने व शास्त्रशुद्ध करावयाचे तर सुरुवातीस किमान माहिती गोळा केली पाहिजे आणि पुढे सतत सूक्ष्मतर अवलोकन व संशोधन करण्याची योजना आखली पाहिजे.

जिल्हा योजना तयार करावयाची ती संपूर्ण तपशीलवार माहितीवर आधारलेली हवी हे उघड आहे. तसेच तिच्यातील समग्र कार्यक्रम विकास योजनांच्या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने आखला पाहिजे. म्हणजे कोणती उद्दिष्टे कार्यक्रमातील निरनिराळ्या भागांनी कशी साध्य होतात हे योजना करताना स्पष्ट झाले पाहिजे. निरनिराळे प्रकल्प व कार्यक्रम हे कशाकरिता पार पाडावयाचे, त्यांची यशस्विता कशाने, कोणत्या प्रकारे योजावयाची हे या कार्यक्रमांचा मेळ, विशिष्ट उद्दिष्टांची परिपूर्ती करण्याशी घालूनच ठरविता येते. तसेच योजनेच्या निरनिराळ्या भागांचा एकत्र विचार, नियोजनाच्या मूळ हेतूंचे पोषण त्या सर्वांनी मिळून कसे होते या दृष्टीने झाला पाहिजे. हे साधावयाचे असल्यास या विचाराच्या अनुषंगानेच योजना तयार केली पाहिजे. मूळ उद्दिष्टांपासून सुरुवात करून कोणत्या मार्गांनी कोणत्या साधनांच्या सहाय्याने उद्दिष्टे साधता येतील हे ठरविले पाहिजे. नंतर क्रमाने साधने, गरजा व कुवत ही नीट अजमावून कार्यक्रमांच्या ढोबळ रूपरेषेची मांडणी झाली पाहिजे. ही ढोबळ प्राथमिक मांडणी केल्यानंतर तिची जुळणी उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने कशी होऊ शकते याचा पडताळा घेतला पाहिजे, आणि तदनंतरच ढोबळ रूपरेषा जास्त तपशिलात विस्तारून स्थलकालसापेक्ष कार्यक्रम भरले पाहिजेत.

## जिल्हा योजनेची आखणी

काही तपशील देऊन वरील कल्पना विस्तारणे आवश्यक आहे. कोणतीही प्रादेशिक-जिल्हा-योजनेसारखी योजना तयार करावयाची असल्यास तिची मांडणी व जुळणी करण्याच्या दृष्टीने प्रथम विषयांचे वर्गीकरण झाले पाहिजे, विभाग कल्पिले पाहिजेत. योजनेची मांडणी करण्याच्या दृष्टीने किमान तीन विभाग सांगता येतात. अर्थोत्पादन सर्वत्र वाढले पाहिजे, विकास सर्व भागांचा, सर्व स्तरांचा, शक्य तितका सारख्या वेगाने झाला पाहिजे हे योजनांचे एक प्रमुख उद्दिष्ट. काही अर्थव्यवहारास व समाजजीवनास आवश्यक अशा तरतुदी व सोयी सार्वत्रिक असल्याखेरीज या उद्दिष्टाच्या दिशेने प्रगती करता येत नाही; तेव्हा या तरतुदी व सोयी सर्वत्र करणे हा विकास योजनेचा पहिला विभाग मानता येईल. सर्वत्र याचा अर्थ जेथे जेथे वस्ती आहे व जेथे जेथे उत्पादनक्षम निसर्ग-संपत्ती आहे तेथे. एका दृष्टीने जिल्हा योजनेचा हा प्रादेशिक सांगाडा आहे असे म्हणता येईल. आर्थिक व्यवहार-वाढीचा व विविधतेचा सर्वांस फायदा मिळावयाचा तर सर्वांस अर्थव्यवहाराच्या मुख्य प्रवाहात सामील होता आले पाहिजे आणि सर्व वस्त्यांस जोडणारे लहानमोठे मार्ग असल्याशिवाय हे अशक्य आहे. वाहतुकीच्या साधनांचा—मुख्यतः रस्त्यांच्या वाढीचा व दुरुस्तीचा—कार्यक्रम हा या भौगोलिक सांगाड्याचा महत्त्वाचा भाग. इतर सोयी सार्वत्रिक करणे इतके सोपे व इतके प्रथमावश्यक नाही. तेव्हा रस्ते सार्वत्रिक झाल्यास इतर सोयींचे कमीअधिक प्रमाणात केंद्रीकरण करून चालेल. पण मग साधनांची व सोयींची श्रेणी बनवून त्यांचा विस्तार किती करता येईल हे अजमावून प्रत्येक सोयीबाबत केंद्रे व केंद्र क्षेत्रे यांची निश्चिती करणे हा योजनेचा महत्त्वाचा भाग ठरतो. खरेदी-विक्री व्यवस्था, बँकव्यवस्था, औद्योगिक उत्पादन-साधने, शिक्षण, आरोग्य इत्यादी प्रत्येक बाबीत सोयी-तरतुदींची श्रेणी व श्रेणीवार केंद्रे यांची निश्चिती करणे व प्रत्येक केंद्रात योग्य तऱ्हेची व प्रमाणाची व्यवस्था करणे हे यात येते. या बहुतेक सोयी एकमेकांस पूरक आहेत. अनेक दृष्टींनी केंद्राची निवड निरनिराळी, खातेवार न करता सर्व सोयी एकत्रित योजनेचा भाग समजून निर्णय घेणे हे खर्चाच्या व कार्यक्षमतेच्या दृष्टीने

फायदेशीर ठरते. या सर्व विचाराचा रस्ते-वाहतूक-विचाराशी निकट संबंध आहे. म्हणून वाहतूक साधने व व प्राथमिक सोयींचा पद्धतशीर प्रसार हा एक योजनेचा स्वतंत्र विभाग म्हणून त्याची रचना करता येते. आणि अशी रचना झाल्याने प्रत्येक खात्याच्या सोयींच्या योजनेत सुसंगती राहून मूळ उद्दिष्ट—अर्थोत्पादन व समाजस्वास्थ्य सार्वत्रिक वाढविणे—किती साधते हे अजमावता येते.

## जिल्हा योजनेचे वैशिष्ट्य

जिल्हा योजनेचा एक विशेष या विवेचनात लक्षात घेणे जरूर आहे. केंद्र व राज्य सरकारांच्या मानाने, जिल्हा स्तरावर प्रत्यक्ष उत्पादनक्रियेत अगर इतर अर्थव्यवहारांत कमी भाग घेतला जातो, घेता येतो. याचे कारण मुख्यतः हे की शेती, छोटे उद्योगधंदे इत्यादी उत्पादन-व्यवसायच जिल्हा योजनेच्या अधिकारात येतात. हे मूलतः अनेक, सर्वत्र विखुरलेल्या लहानलहान उत्पादकांच्या हाती असतात. म्हणून उत्पादन-कार्यात इतरांस मदत करणे आणि हे वाढीस लागेल या दृष्टीने सर्व आवश्यक व्यवस्था करणे याच गोष्टी मुख्यतः जिल्हा योजनेत कराव्या लागतात. या दृष्टीने वरील योजनेचा पहिला विभाग म्हटला म्हणजे सर्वच प्रकारचा अर्थव्यवहार वाढणे व तो विविधांगी होणे याकरिता शासनाने, समाजाने करावयाच्या ज्या तरतुदी त्या उपलब्ध करणे हा आहे.

जिल्हा योजनेत समावेश झालेल्या व्यवसायात प्राथमिक उत्पादकांचाच भरणा फार आणि यांच्या उत्पादनाची भिस्त मुख्यत्वे निसर्ग-संपत्तीवर असते. तेव्हा उत्पादनवाढीच्या उद्दिष्टांसाठी निसर्ग-संपत्तीचे सार्वत्रिक संरक्षण व संवर्धन हे फार महत्त्वाचे ठरते व हा जिल्हा योजनेचा दुसरा विभाग कल्पिता येतो. जमिनीची धूप थांबविणे, जंगल, चराऊ-राने इत्यादींची शास्त्रीय पद्धतीने निगा राखणे व उत्पादनक्षमता वाढविणे, शेतीस पाणीपुरवठा हरतऱ्हेने वाढता उपलब्ध करणे या सर्व गोष्टी या विभागात येतात. या निसर्ग-संपत्ति-संवर्धनावरच पुढील विविधांगी आर्थिक विकासाची मदार राहते. या दोन्ही विभागांतील कार्यक्रम मुख्यतः शासनानेच हाती घ्यावयाचा असतो. जिल्हा योजनेच्या कक्षेखालील उत्पादक सर्वच छोटे; तेव्हा निसर्ग-संपत्ती संरक्षण व संवर्धन याचा सर्व बोजा ग्रामीण भागात सरकारलाच पत्करावा लागतो. जुने खोत-मालगुजार होते; त्यांच्या ताब्यात असलेली जंगले व तलाव हीही आता सार्वजनिक मालकीची झाली आहेत.

योजनेचा तिसरा भाग निरनिराळ्या प्रकारच्या उत्पादकांस त्यांच्या उत्पादन-कार्यात सहाय्य करण्याचा असा मानता येईल. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांस बी अगर खते यांचा पुरवठा करणे, शास्त्रीय सल्ला देणे, सहकारी संस्थांमार्फत पीक-कर्जाची किंवा खरेदी-विक्रीची सोय करणे या सर्व क्रिया उत्पादकास सहाय्य देणे यात मोडतात. अशाच प्रकारे प्रत्येक व्यवसायाकरिता सहाय्यक कार्यक्रम योजता येतात. याहून अधिक तपशिलात शिरण्याचे कारण नाही. मुख्य मुद्दा हा की, मूळ उद्दिष्टांस धरून योजनेचे ढोबळ विभाग, म्हणजे आवश्यक सार्वजनिक सोयींची संपूर्ण जिल्ह्याची चौकट बनविणे, साधन-संपत्तीचे संरक्षण व संवर्धन करणे व व्यक्तिशः उत्पादकांस योग्य सहाय्य देणे असे कल्पिल्यास प्रत्येक कार्याची किंवा प्रकल्पाची उपयुक्तता, आवश्यकता, प्रयोजन व स्थान यांचा या विभागांतर्गत विचार करणे सोपे होते.

## जिल्हा योजनेची जुळणी

योजनेची याप्रकारे विभागवार मांडणी ही पहिली अवस्था झाली. यापुढील क्रिया म्हणजे योजनेची जुळणी करणे. योजनेची जुळणी यात मी खालील गोष्टींचा समावेश होतो असे समजतो. विभागात समाविष्ट असलेल्या निरनिराळ्या कार्यक्रमांचा आकार, परिमाण ठरविणे, त्यांत अग्रक्रम देणे व त्या सर्वांचे परस्पर संबंध निश्चित करणे : अशा प्रकारे जुळणी करताना अनेक गोष्टी लक्षात घ्याव्या

लागतील, अनेक गमके वापरावी लागतील. सर्व कार्यक्रम वस्तुनिष्ठ आहेत, म्हणजे प्रत्यक्ष स्थानिक साधने, गरजा व समस्या यांचा विचार करून ठरले आहेत असे मानले तरी सर्वच इष्ट कार्ये एकदम हाती घेता येत नाहीत. तेव्हा जुळणी करताना प्रथम ही गमके लक्षात घेऊन जे मापन करावयाचे त्याचा संबंध, शक्यता व युक्तता यांशी असतो. शक्यता निदान दोन प्रकारे पहावयाची. पहिली पैशाची मर्यादा. ही म्हणजे एकंदर योजनेकरिता कोणत्याही कालखंडात बाहेरून व आतून सर्वप्रकारच्या उपलब्ध पैशाची परिसीमा. हे माप लावताना दोन्ही प्रकारांनी विचार करावा लागतो. एक विचार कार्यक्रमांच्या विभागाबाबत, विषयांबाबत अगर खात्यांबाबत. दुसरा तितकाच महत्त्वाचा विचार प्रादेशिक विभागाबाबत. थोडक्यात, कोणत्या भागात कोणत्या कार्यावर खर्च करण्यास किती पैसा उपलब्ध आहे या निर्णयाप्रत क्रमाने यावयाचे आहे. हा विचार करताना विकास योजनेचे दीर्घकालीन स्वरूप, तिची उत्क्रांती व परिणती यांकडे लक्ष द्यावे लागते. पुढील पाच वर्षांत निरनिराळ्या विभागात पैसा कसा वाटावयाचा हे काही ठोक प्रमाण अगर हिस्सेरशी मानून होण्यासारखे नाही. आर्थिक विकास कोणत्या क्रमाने होणार आहे, यात कोणत्या गोष्टी प्रथम केल्या पाहिजेत की ज्यावर पुढील घटना अवलंबून आहेत, त्या किती प्रमाणात होणे आवश्यक आहे अशा प्रकारचे प्रश्न प्रथम उपस्थित करून त्यांची उत्तरे शोधली पाहिजेत. ज्या मागासलेल्या भागांत दळणवळणाची साधने पुरी नसल्यामुळे विशिष्ट किफायतशीर पिके किंवा दुग्धव्यवसाय वाढू शकत नाहीत तेथे शेती-शिक्षण अगर वळू योजनांपेक्षा रस्ते करण्यास सर्वाधिक अग्रक्रम दिला पाहिजे हे उघड आहे. इतपत विचारही नेहमी होतो असे नाही. खरोखर याहून बारकावा बराच पहावयास हवा. विकास योजना तयार करणे याचा अर्थ आपण काही विशिष्ट सूचक गोष्टी प्रथम केल्या तर क्रमाक्रमाने पुढे स्वाभाविकपणे अधिक घडामोडी होतील अशा प्रकारची कल्पना बांधणे आहे. हे व्यूह मांडण्यासारखे आहे. यांत क्रिया-प्रक्रियांची सांखळी कल्पिली असून घडामोडींचे एक मध्यवर्ती सूत्र आहे अशी अटकळ असते. उदाहरणार्थ ग्रामीण औद्योगीकरणाची सुरुवात प्रक्रियाव्यवसायांपासून करावी असे म्हणण्यामध्ये, अशा प्रकारे सुरुवात करण्यात सुकरता आहे व प्रक्रियाउद्योग स्थापन झाल्यास त्यामुळे इतरांस स्वाभाविक उत्तेजन मिळेल अशा प्रकारचे कांही अनुभव, काही तर्क यांवर अधिष्ठित असे हे विचार असतात. तेव्हा पैसा मर्यादित आहे म्हणून कार्यक्रमांची काही मर्यादेत जुळणी करण्याची पाळी आली म्हणजे मूळव्यूह, त्यातील मध्यवर्ती कल्पना व कल्पित कालक्रम या सर्वांच्या अनुरोधानेच हे करावे लागते. असे केल्यासच नियोजन करतो, योजना बनवितो असे होईल. एरवी नाही.

जुळणी करण्याचे दुसरे गमक म्हणजे मनुष्यबळ व इतर वास्तविक साधनांच्या मर्यादा सांभाळणे हे आहे. योजनेच्या सुरुवातीच्या काळात तरी या मर्यादा फार भासतात व अनुल्लंघनीय असतात. तंत्रज्ञ मिळत नाहीत, सिमेंटचा पुरवठा नाही, अमुक गोष्टींची आयात करता येत नाही अशा अनेक मर्यादा सांभाळणे अवश्य असते. आणि योजना करणाऱ्यानेच त्या मुळात सांभाळल्या म्हणजे योजनेचे स्वरूप वेळेवर पुढे सारखे बदलावे लागणे, हे होत नाही.

वरील दोन्ही गमकांत शक्यतेचा विचार झाला. युक्ततेच्या दृष्टीने जुळणी करण्याचे तिसरे गमक निर्देशनास येते. हे योजनेचा भाग एक असेही समजता येईल. योजनेचे म्हणून जे मूळ तीन भाग कल्पितो त्या सर्वांचा प्रत्यक्ष फायदा ज्याचा ज्याचा लहानमोठा कोणताही धंदा, व्यवसाय असेल त्यास मिळावा असे होते. पण ज्यांना काही व्यवसाय-स्वतःचा, स्वतंत्र नाही आणि जे केवळ मोलमजुरी करून पोट भरतात त्यांची योजनेत सोय कोठे उघडपणे दिसत नाही. भारतीय विकास योजनेतील कल्पना अशी की, सार्वजनिक सोयी सार्वत्रिक वाढविणे आणि निसर्ग संपत्तीचे संरक्षण-संवर्धन या विभागात ज्या मोठ्या वाढत्या योजना समाविष्ट होतील त्यांमुळे रोजगार वाढेल व साहजिकच केवळ

मजुरीवर पोट भरण्याचीही सोय होईल ही कल्पना असावी असे मी केवळ तर्काने म्हणतो. याबाबत कोठे विशेष खुलासा नाही. किंबहुना तिसऱ्या योजनेत ग्रामीण श्रमिकांकरिता म्हणून पुस्तीवजा योजना आयत्यावेळी जोडल्या गेल्या त्यावरून या विषयीचा विचार सुस्पष्ट झालेला दिसत नाही. असो! माझे म्हणणे स्पष्ट असे की, वाढत्या रोजगाराची सोय विकास योजनांतर्गत तरतूद करूनच केली पाहिजे. दुष्काळासारखी विशेष आपत्ती आली म्हणजे कोणत्याही मार्गाने दुष्काळग्रस्तांची कामाची व पोटाची व्यवस्था करावयाची तशापैकी हा प्रकार नाही. किंवा विशिष्ट जुन्या धंद्यात चढाओढीमुळे रोजगार कमी झाला म्हणून त्यास तात्पुरते संरक्षण द्यावयाचे अशासारखेही कार्यक्रम या परिस्थितीत अप्रस्तुत ठरतात. छोटे शेतकरी व विशेषतः शेतमजूर यांच्या अल्पोद्योगाची समस्या ही कायमची, हल्लीच्या आर्थिक व्यवस्थेत मूलभूत अशी आहे. आर्थिक विकासाच्या दीर्घकालीन कार्यक्रमाचे एक उद्दिष्ट ही समस्या सोडविणे हे आहे. तेव्हा कोणतेही जुजबी पुस्तीवजा कार्यक्रम हाती घेऊन ही खऱ्या अर्थाने सोडविता येणार नाही. विकास कार्याच्या योजनेतच ज्या मानाने वाढता रोजगार समाविष्ट होईल त्यामानाने हा प्रश्न तात्कालिक सुटेल, एवढेच नव्हे, तर कायमचा सुटण्याच्या मार्गाला लागेल. कोणचे तरी काम मदतीखातर द्यावयाचे असे नाही तर ज्यामुळे दीर्घकालीन विकासाचा पाया दृढ होईल अशा कामाच्या योजना निवडून ज्या भागात व ज्यावेळी रोजगाराची विशेष जरुरी भासते तेथे त्यावेळी या योजनांमुळे वाढते काम उपलब्ध होईल अशा प्रकारे कार्यक्रमांची मांडणी करावयाची आहे. ही गोष्ट योग्य रीतीने प्रादेशिक विभागवार करणे विशेष जरुरीचे असल्यामुळे जिल्हा योजनेच्या जुळणीत एक गमक म्हणून हिचा उपयोग होईल असे वर म्हटले आहे. म्हणजे जिल्ह्याच्या निरनिराळ्या विभागात रोजगारीच्या वाढीची जरुरी किती आहे हे पाहून त्या त्या विभागातील एकंदर कार्यक्रम ठरविण्याचा प्रयत्न करावा. रस्ते व इतर सार्वजनिक तरतुदी व जंगले, पाणीपुरवठा इत्यादी विषयांचे संरक्षण-संवर्धनाचे कार्यक्रम यांतून मुख्यतः वाढती रोजगारी निर्माण होणार. तेव्हा या कार्यक्रमांचे कोणत्याही पंचवार्षिक योजनेतील परिणाम ठरवण्यासाठी विभागाची रोजगारीविषयीची गरज पाहिल्याने प्रकल्पांची क्रमवारी वगैरे लावण्यात मदत होईल. शिवाय यामुळे योजनेने सर्वांची अर्थोन्नती घडवून आणावयाची हेही उद्दिष्ट साध्य होईल. विकास योजना राबवीत असता अल्पोद्योगाची समस्या सोडविण्याचा याशिवाय दुसरा मार्ग नाही.

जुळणी करण्याच्या वेळेस आणखी एका महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देणे जरुरीचे आहे. ही बाब म्हणजे कार्यकारी व्यवस्था व संघटना. प्रत्येक कार्य अगर प्रकल्प अमलात आणण्याची जबाबदारी कोणाची, त्यात सहाय्य कोणाचे घ्यावयाचे आणि त्याकरिता काही विशिष्ट यंत्रणा अगर संघटना निर्माण करणे जरूर आहे काय या गोष्टींचा विचार महत्त्वाचा आहे. या कामी उपलब्ध असलेल्या व्यवस्था म्हणजे, सार्वजनिक कार्याकरिता, पंचायत राज्याच्या वेगवेगळ्या स्तरांवरील संस्था आणि आर्थिक व्यवहाराकरिता, विविध प्रकारच्या सहकारी संस्था. प्रत्येक कार्य यांपैकी कोणाच्या कक्षेत बसते हे योजनेत निर्देशावे लागेल. काही वेळा असे होईल की, विशिष्ट कार्यास अनुरूप अशी संस्था नसेल. मग योजनेत ही निर्माण करण्यापासून तरतूद करावी लागेल. नव्या प्रकारच्या सहकारी संस्था कोठे व कशा काढाव्या हा योजनेचा एक भाग राहील. काही वेळेस नवीन संयुक्त संस्था अगर समित्यांची आवश्यकता भासेल. या संयुक्त संस्था निराळ्या स्तरांवरील संस्थांच्या अगर वेगवेगळ्या प्रकारच्या संस्थांच्या असू शकतील. निसर्ग-संपत्तीच्या संवर्धन योजनेत असे प्रश्न उपस्थित होण्याचा विशेष संभव आहे. अशा संपत्तीचे संरक्षण व तिचा वाढता उपयोग ही सार्वजनिक संस्थांची जबाबदारी मानली जाते. पण बरेच वेळा त्याचा प्रत्यक्ष उपयोग काही मर्यादित गटांपुरताच होतो. अशा वेळी जबाबदारी व बोजा यांची योग्य वाटणी करून कार्यक्षम वापर व सार्वजनिक हित ही दोन्ही साधण्याकरिता विशिष्ट संघटनात्मक

२७

प्रयोग युक्त ठरतो. तसेच संपत्ती तत्त्वतः राज्याच्या मालकीची असली—उदाहरणार्थ, जंगले—तरी संरक्षणाचे खरे कार्य स्थानिक रहिवाश्यांच्या सहकार्यानेच होऊ शकते. अशा परिस्थितीत संरक्षण—संवर्धनात स्थानिक लोक लक्ष घालतील अशी तरतूद करावी लागते आणि त्यांस काही विलोभन दाखवून व विशिष्ट जबाबदारी त्यांजवर टाकून हे करावे लागते. विकास योजनेच्या प्राथमिक काळात असले प्रयोग विशेष महत्त्वाचे ठरतात. नवीन प्रकारच्या संस्था उभारणे, संघटनात्मक प्रयोग करणे हे योजनापूर्तीकरिता आवश्यक असते आणि योजनेची जुळणी करतानाच ती कार्यान्वित होण्याची संस्थात्मक व्यवस्था विचारपूर्वक निर्देशणे आवश्यक असते.

## जिल्हा योजनेतील कार्यक्रमाचे स्वरूप

जिल्हा विकास योजनेची मांडणी व जुळणी करण्यातील प्रमुख क्रिया थोडक्यात अशा आहेत. स्थानिक परिस्थिती, गरजा व समस्या यांचा अभ्यास करून कार्यक्रम, प्रकल्प इत्यादींच्या प्रमुख विभागवार याद्या करावयाच्या, पैशाची उपलब्धता, प्रत्यक्ष अंमलबजावणीची शक्यता, आणि वाढत्या रोजगाराची गरज यांकडे लक्ष देऊन विशिष्ट कालखंडातील गटवार, विभागवार व विषय आणि खातेवार कार्यक्रमाची निश्चिती करवयाची. हे करताना एकंदर नियोजनाचा व्यूह व प्रत्येक विभागातील कार्यांची मध्यवर्ती कल्पना अगर प्रमुख सूत्र या गोष्टी स्पष्टपणे निर्देशावयाच्या आणि व्यवस्था व संघटना यांचाही विचार लक्षात घ्यावयाचा. असे केले म्हणजे योजनेचा प्राथमिक आराखडा तयार होईल. या पुढील क्रिया स्थळ-काळ-क्रम यांच्यासहित तपशील भरण्याची. आजवरच्या अनुभवावरून या बाबतीत काही गोष्टींकडे लक्ष वेधणे जरुरीचे आहे. खातेवार तपशिलाची कार्य-योजना करीत असतासुद्धा मूळ उद्दिष्टपूर्तीकरता सर्व कार्यक्रम आहे या दृष्टीने प्रत्येक तपशील ठरविणे जरुरीचे आहे. उदाहरणार्थ, सहकारी खात्याच्या योजनेत १०० टक्के कुटुंबास सहकारी संस्थाचे सभासद करण्यावर भर दिला जातो. याने आपण काय साधतो? काही विशेष साधते का? याचा विचार झाल्यास हा भर कमी होण्याचा संभव आहे. आज महाराष्ट्रातील सेवा सहकारी सोसायट्यांपुढील मुख्य प्रश्न म्हणजे समाजातील दुबळ्या घटकांस सहाय्य सार्थपणे कसे करावयाचे हा आहे. हा प्रश्न सोडविल्याखेरीज १०० टक्के सभासदत्वाचे लक्ष्य गाठणे केवळ अनावश्यक नव्हे तर अयुक्त आहे. यापेक्षा प्रत्येक प्रकारच्या व्यवहारातील अपूर्ण कार्याची दखल घेऊन पुढील प्रगतीकरिता विशिष्ट प्रयोग आखणे हे महत्त्वाचे आहे. पण सांगण्यास सुबोध व करण्यास सुलभ असे हे लक्ष्य राहणार नाही. दुसरे उदाहरण म्हणून गुदामे बांधण्याचा कार्यक्रम परीक्षावा. हा निरनिराळ्या स्तरांवर—(केंद्र, राज्य, जिल्हा) चालू आहे. निरनिराळी खाती—कृषि, पुरवठा, सहकार—हा हाती घेत असतात. सगळयांची ठराविक साच्यानुसार वरून खाली बांधकाम चालू आहेत. पण अजून अमुक जिल्हातील सर्व गुदामे बांधून झाली तर त्यांचा उपयोग कोण, कसा केव्हा करणार आहे असा साकल्याने हेतूपूर्वक विचार कधीच झाला नाही, असे म्हणणे अतिशयोक्तिपूर्ण नाही.

प्रत्येक कार्याचा तपशील स्थानिक परिस्थितीशी जुळता आहे किंवा नाही हे पाहणे तितकेच महत्त्वाचे आहे. नवीन अवजारांची योजना असल्यास जमिनीची वर्गवारी, पिकाची पद्धत व बैलांची कार्यक्षमता यांशी ती ठिकठिकाणी जुळती आहे किंवा नाही हे पाहिले पाहिजे. आजच्या शेती-उत्पादनाच्या सर्वच योजना फार ठोकळेबाज वाटतात. "अधिक धान्य पिकवा" मोहिमेस २० वर्षे होऊन गेली तरी अजून जुन्या पद्धतीच्या खरीप, रबी मोहिमा चालू आहेत. साहजिकच त्यांचे यश तितपतच आहे. नवीन सघन म्हटल्या जाणाऱ्या योजना याच प्रकारच्या. खरे म्हटले तर आता हे कार्य प्रचार मोहिमांनी होण्यासारखे राहिलेले नाही. भौगोलिक परिस्थिती आणि उत्पादकांच्या भिन्नभिन्न वर्गांची आर्थिक व सामाजिक स्थिती यांचा खोलवर विचार करून उत्पादनवाढीचे तालुका-

निहाय तपशीलवार दीर्घकालीन कार्यक्रम आखल्याशिवाय विशेष प्रगती होऊ शकेल असे वाटत नाही. पण हे करावयाचे तर स्थानिक अधिकारी, स्थानिक शेतकरी आणि निरनिराळ्या प्रकारचे तज्ञ यांनी एकत्र मिळून कार्यक्रम घडविले पाहिजेत. अनेक ठिकाणी नवीन विहीर–कर्ज मोठ्या प्रमाणावर देणे चालू असते. त्यापैकी बऱ्याच भागांत जुन्या उपयोगात नसलेल्या अनेक विहिरी असतात. परंतु यांची पृथक् पृथक् पाहणी करून त्यावरून नवीन विहिरी खोदण्याबाबत सावधान राखणे हे केले जात नाही किंवा मोठे भांडवल गुंतवून खोदलेल्या जुन्या विहिरी उपयोगात आणण्याचा कार्यक्रम हाती घेणे हेही होत नाही.

जिल्हा योजनांतील फार मोठा भाग लहान उत्पादकांस मदत करून विशिष्ट दिशेने प्रगती करण्यास उत्तेजित करणे या संबंधीचा असतो. अशा योजनात निरनिराळ्या खात्यांनी विशिष्ट दिशांनी प्रयत्न केले म्हणजे सर्व मिळून काही परिणाम घडून येईल अशी कल्पना असते. पण मग हे एकमेकांस पूरक असलेले सर्व कार्यक्रम खरोखर प्रत्येक खात्यात हाती घेण्यात येत आहेत, त्यांची मांडणी व क्रम एकमेकांशी जुळते आहेत व एकमेकांची माहिती व सल्ला घेऊन हे पार पाडले जातील, एवढे सर्व योजनेत पहावयास हवे. असे घडतेच असे नाही. अनेक कारागिरी उद्योगांचे प्रशिक्षण देण्याच्या योजना अनेक वर्षे राबविल्या जात आहेत. पण असे शिक्षण घेतलेले त्या धंद्यांत पुष्कळसे शिरत नाहीत हा अनुभव आहे. त्या धंद्यात भावी उत्कर्षास वाव आहे अशी परिस्थिती उत्पन्न झाल्याशिवाय नवीन होतकरू त्यात शिरणार नाहीत, अनेक कारणांमुळे तात्पुरता शिष्यवृत्तीचा फायदा तेवढा घेतील. धंद्याच्या आर्थिक पुनर्व्यवस्थेची योजना हाती घेऊन यशस्वी झाल्यासच शिक्षण योजनेचा उपयोग आहे. एरवी नाही हे उघड आहे.

## प्रचलित जिल्हा योजना केवळ बांधकामाच्या याद्या

वरील विवेचनावरून साहजिकच असा प्रश्न उपस्थित होतो की आजच्या नियोजनात सुसूत्रपणा व सुसंगती नसल्यास त्याचे कारण काय? याचे कारण हे की, आजची जिल्हा योजना समग्र, एकत्रित परस्पर–संबद्ध अशी योजना म्हणून बनविलीच जात नाही. जिल्हा योजनेतच हे होत नाही, तर राज्य व देशपातळीवरही हेच घडते. आजच्या योजना खातेवार बनतात. प्रत्येक खात्याचे प्रकल्पांचे, कार्यक्रमांचे ठराविक साचे असतात. असे जुने, नवे साचे मिळून खातेवार योजना तयार होते व अनेक खात्यांची योजना मिळून राज्याची अगर जिल्ह्याची बनते. प्रत्येक खाते आपली योजना शक्य तितकी मोठी असावी म्हणून प्रयत्न करते. तेव्हा शेवटी प्रत्येकाच्या योजनेत छोटी मोठी काटछाट होते. असल्या काटछाटी बहुधा खातेच करते आणि प्रत्येक खात्याची योजना बहुतांशी स्वतंत्रपणे तयार होते. काही ढोबळ परस्पर-संबंधांची दखल घेतली गेली असली तरी योजना समग्र एकरूपी बनविणे हे केव्हाच केले जात नाही. एका दृष्टीने अशी योजना करणे फार सोपे आहे. कारण कामाच्या याद्या करताना विशिष्ट खाते अगर विभाग या पलीकडे विचार करावयाचा नसतो. तेव्हा खात्याचे धोरण व कार्यक्रम एवढेच पहावे लागतात. योजनेचा विस्तार किंवा संकोच हाही हुकुमी होऊ शकतो. पुष्कळ अंशी प्रकल्पाचा साचा किंवा विशिष्ट कार्यपद्धतीबाबत राज्यखात्यासही स्वतंत्र विचार करता येत नाही. महत्त्वाच्या केंद्रीय मदत मिळणाऱ्या कामांचे साचे दिल्लीसच बनविलेले असतात आणि त्यांत बदल करण्याचा कोणास अधिकार नसतो. अशा विशिष्ट कालस्थिति-निरपेक्ष प्रकल्पांच्या मदतीने योजना बनविणे सोपे होते हे जितके खरे, तितकेच ती कोणत्या विशिष्ट परिस्थितीस लागू पडणार नाही हेही खरे.

शिवाय असल्या बनावटीचे इतरही अनेक परिणाम होतात. योजनांच्या मूळ उद्दिष्टांशी एकेका कार्यक्रमाचा संबंध काय हे कळून येत नाही. तसेच निरनिराळ्या कार्यांचा एकमेकांशी संबंध स्पष्ट होत

नाही. प्रत्येक खाते, इतकेच नव्हे, तर प्रत्येक खातेविभाग स्वतंत्रपणे कारभार हाकते आणि कोणत्याही योजनेची यशस्विता खर्च किती केला यावरून ठरते. यामुळे ज्याने खर्च चटकन केलेला दिसतो असली कामे–बांधकाम व इमारती–यांवर सर्वत्र भर दिला जातो.

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांनी बनविलेल्या चतुर्थ पंचवार्षिक योजना सर्व वरील पद्धतीनेच बनल्या आहेत. खऱ्या अर्थी या योजना नव्हेत, कामांच्या याद्या आहेत. याही इतक्या फुगवून अवास्तव केल्या आहेत की, शेवटी काय शिल्लक राहणार हे कोणासच माहीत नाही. अखेरचे निर्णय अर्थात राज्याच्या योजनेचा आवाका निश्चित झाल्यावर सचिवालयात घेतले जाणार. तेव्हा खालून योजना तयार करण्याच्या घोषणा व जिल्हा परिषदांचे कायद्यातले अधिकार हे सर्व निरुपयोगी ठरून या योजनांत विशिष्ट स्थानिक परिस्थितिनुरूप अगर स्थानिक निर्णयानुसार काही उरणार नाही हे भाकित करण्यास ज्योतिषी नको.

## जिल्हा योजनेची अंमलबजावणी

योजना तयार करण्यापुरताच येथवर विचार झाला. अंमलबजावणीचे काम तितकेच महत्त्वाचे आहे. पण याविषयी विवेचन थोडक्यात करता येईल. कारण योजना तयार करीत असताना जो निराळा दृष्टिकोन व बदललेली कार्यपद्धती वर निर्देशिली त्यांचाच अवलंब अंमलबजावणीच्या बाबतीतही करावा एवढेच सांगावयाचे आहे. प्रत्येक प्रकल्पाची किंवा कार्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी त्याची तपशील-वार फोड झाली पाहिजे. कोणताही कार्यक्रम संपूर्णपणे स्थल, काल व क्रम या दृष्टीने विभागून निश्चित झाला पाहिजे. प्रत्येक विभागाची प्राथमिक जबाबदारी कोणा अधिकाऱ्याची, संघटनेची अगर संस्थेची हे निर्देशिले पाहिजे. तसेच प्रत्येक कार्यक्रमाशी संलग्न कार्यक्रम (ज्यावर त्याची पूर्तता अवलंबून आहे अगर यावर ज्यांची पूर्तता अवलंबून आहे अगर कोणत्याही संयुक्त कार्यात जे सहभागी आहेत) असे सर्व ओळखून त्यांची एकत्र सूची झाली पाहिजे. हे कार्य सकृत्दर्शनी किचकट वाटले तरी यथार्थ अंमलबजावणीच्या दृष्टीने ते फार महत्त्वाचे आहे. असे केल्यासच एकंदर कार्यक्रमामुळे मूळ उद्दि-ष्टांच्या दिशेने मजल मारली जात आहे किंवा नाही असे ठरविता येईल आणि असे केल्यामुळे कार्याचे मापन करणेही सुकर होईल. कार्यसिद्धी केवळ खर्चाचे दृष्टीने किंवा खात्याच्या दृष्टीने मापणे हे अनुपयुक्त आहे. परस्पर संबंधित सर्व कार्य वेळेवर इष्ट क्रमाने होऊन समग्र योजनेची वाटचाल काय होते हे खरे पहावयाचे. आणि हे वर सांगितल्याप्रमाणे कार्यक्रम विभागाचा तपशील ठरवीत असता-नाच विश्लेषण आणि संयोगीकरण दोन्ही योग्य रीतीने झाल्याशिवाय करिता येणार नाही. शिवाय सर्व योजनेची मांडणीच मुळात अशा पद्धतीने झाल्यास वरिष्ठास दैनंदिन देखरेख करणे सोपे पडेल आणि कोणत्या दोषामुळे, काय मागे राहिल्यामुळे कार्यहानी होत आहे हे वेळीच लक्षात येऊ शकेल. शिवाय अशाने मूळचे काही आडाखे, काही अंदाज, काही कल्पना चुकल्या असल्यास ते कोणते व कोठे चुकले हेही निश्चितपणे समजू शकेल.

हा शेवटचा विचार हल्लीच्या आपल्या देशातील नियोजनाच्या प्राथमिक अवस्थेत विशेष महत्त्वाचा मानला पाहिजे. नियोजनाकरिता लागणाऱ्या माहितीपैकी फार थोडी आज उपलब्ध आहे; स्थानिक परिस्थितीचे व समस्यांचे स्वरूप नीटसे कळलेले नाही व विविध क्षेत्रांत आवश्यक संशोधन झाले नाही, होण्याची अजून सोयही नाही. अशा वेळी कोणतीही योजना बरीच अनमान धपक्याने बनवावी लागते; बरेच कार्यक्रम प्रायोगिक म्हणून योजावे लागतात. प्राथमिक संकलन व संशोधन येथून सुरुवात करावी लागते. जसजसा अनुभव मिळेल, ज्ञान वाढेल तसतसा बदल करून सुधारणा करता येईल या भरंवशावर पुढे जावे लागते. हल्लीच्या नियोजनात या क्रियेला बिलकुल अवसर नाही. अनुभवावरून

शिकणे म्हणजे जुने काही चुकले असे कबूल करणे; प्रकल्पांचे ठोक साचे मोडण्याची अगर मूळ दिशाच बदलण्याची तयारी राखावी लागते. आज एकदा सुरू झालेला कार्यक्रम प्रत्येक पाच वर्षांनी काही पटीने वाढवावयाचा याहून निराळा विचार रूढ नाही. एकदा केंद्राची संमती अमुक तपशीलास मिळाली की तो बदलण्याचा कोणाला अधिकार नाही व लक्ष्य पुरे करण्याच्या चढाओढीपलीकडे स्थानिक अधिकाऱ्याने काही विचक्षणपणे म्हणावे अगर करावे अशी अपेक्षा नाही. ही परिस्थिती आमूलाग्र बदलल्याशिवाय प्रादेशिक योजना कधीही यशस्वी होऊ शकणार नाहीत.

नियोजनात योग्य प्रकारे परिवर्तनक्षमता हवी. प्रत्येक जिल्हा परिषदेस चतुर्थ योजना बनविण्याचे आधी आर्थिक पाहणी करावी असा आदेश महाराष्ट्र सरकारने दिला होता. अशी पाहणी कोणत्याच परिषदेने केल्याचे ऐकिवात नाही. हल्लीच्या पद्धतीप्रमाणे योजना बनविताना पाहणीचा विशेष उपयोग झाला असता असेही नाही. पण असे समजा की एखाद्या परिषदेने पुढील एकदोन वर्षांत पुष्कळ माहिती मिळविली, काही संशोधन करविले, विशिष्ट समस्यांचे स्वरूप समजावून घेतले तर त्याचा आजच्या परिस्थितीत काही उपयोग होऊ शकेल काय! पंचवार्षिक आराखडा बनला म्हणजे नवीन कार्यक्रम हाती घेणे राहोच, पण ठरलेल्यात काही महत्त्वाचा, तपशीलाचा, स्थूल कामाचा फरक करणे हेही प्रस्तुत व्यवस्थेत कितपत शक्य आहे ! खातेप्रमुख, सचिवालय, नियोजन-मंडळ इत्यादी अनेक अडसर दूर करणे कोणास साधेल ?

## वर्धा जिल्हा योजनेचा अनुभव

वरील विवेचनाचा अर्थ शास्त्रशुद्ध पद्धतीने नियोजन होऊ शकणारच नाही असा नाही. वर्धा जिल्ह्यात याविषयी काही अनुभव घेतला, तो उद्बोधक व मार्गदर्शक ठरावा. योजना तयार करण्या-पूर्वी माहिती मिळविणे, पाहणी करणे हे वर्ध्यास झाले व अशा माहितीचा योजना बनविण्यात उपयोग होतो हेही प्रत्ययास आले. योजनेची मांडणी विभागवार वर्धा-योजनेत केली गेली. एवढेच की, दोन वर्षांपुरती पुस्तीवजा योजना बनविणे हाती घेतल्यामुळे या योजनेत मुख्यतः पूरक बाबींकडे लक्ष देण्यात आले. गोखले अर्थशास्त्र संस्थेने बनविलेल्या पहिल्या योजनेत पैशाची विशिष्ट मर्यादा ध्यानात धरली होती. परंतु जिल्हा परिषदेने केलेल्या नंतरच्या योजनेत या विचारास महत्त्व नव्हते. संघटनेचा विचार अनेक बाबतीत प्राथमिकरीत्या तरी केला होता. परंतु वास्तविक रीतीने किती काम पार पाडता येईल किंवा रोजगारीच्या दृष्टीने प्रकल्पांची प्रादेशिक विभागणी कशी करावी हे ठरविण्यापर्यंत मजल पोचली नाही. प्रत्येक प्रकल्पाची फोड करून स्थल-काल-क्रम यांचा तपशील ठरविणे, परस्पर-संबद्ध कार्यक्रमांची सूची करणे इत्यादी कामांस सुरुवात झाली, पण त्यांत फारशी प्रगती होऊ शकली नाही. तसेच या ज्या उणीवा प्रथम राहिल्या त्या चौथी योजना बनवितेवेळी भरून निघतील अशी अटकळ प्रथम होती ती अयुक्त ठरली.

थोडक्यात, जिल्हा योजना कशी बनवावी व अंमलात आणावी या विषयीचे मांडलेले विचार अनुपयुक्त व अव्यवहार्य नाहीत एवढे सिद्ध करण्यापुरता अनुभव वर्धा-योजनेत आला. त्याचबरोबर हल्लीच्या कार्यपद्धतीत अनेक सुधारणा केल्याखेरीज या विचारांस मूर्त स्वरूप देता येणार नाही हेही कळून आले. वरील विवेचनात माहिती गोळा करणे, संशोधन करणे, व अनुभवास धरून योजनेत व प्रकल्पांत बदल करणे यावर भर दिला आहे, यांतील काही गोष्टी जिल्हा परिषदांस कराव्या लागतील. पण बऱ्याच अंशी जिल्ह्यातील इतर संस्थांच्या साहाय्याने त्या करून घेता येतील. प्रत्येक जिल्ह्यात आता उच्चशिक्षण संस्था स्थापन झाल्या आहेत. नियोजन कार्याच्या दृष्टीने त्यांचा उपयोग व्हावा म्हणून विशिष्ट सामग्री पुरविणे व अध्यापकांना प्रशिक्षण देणे हे फारसे कठीण नाही. तसेच जिल्हा

परिषदांनी जिल्ह्यातील अनुभवी व तज्ज्ञ मंडळींचा शक्य तितका उपयोग करून घेण्याचे ठरविले तर नियोजन पुष्कळ सुकर होईल. जिल्हा परिषदेच्या सेवकांत सर्वच विषयांत पुरेसे तज्ज्ञ नसतील. परंतु जिल्हा परिषद सेवकांचा स्थानिक अनुभव, माहिती व राज्यपातळीवरील तज्ज्ञांचे ज्ञान यांची योग्य सांगड घालता आली तर स्थानिक नियोजन शास्त्रशुद्ध होऊ शकेल. आज हे करण्याऐवजी या दोन स्तरांत दुरावा दिसून येतो हे मात्र खरे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, असे काहीतरी मूलभूत केले पाहिजे हे सर्वांस पटले पाहिजे. नियोजन-मंडळ, राज्य मंत्रिमंडळ व सचिवालय यांना हा विचार रुचल्या-पचल्याखेरीज प्रगती होणे अशक्य आहे. स्थानिक नियोजनाबाबतचे ठराविक सांचे, संकेत व नियम यांत बदल करण्याची तयारी असली तरच स्थानिक नियोजन परिस्थितीस अनुरूप व परिवर्तनशील होऊ शकेल. तसेच जिल्हा परिषदेच्या सेवक-वर्गास कार्यपद्धतीत बदल करावा लागेल, आणि जिल्हा परिषद सभासदांस आपल्या मर्जीनुसार नव्हे तर ठराविक उद्दिष्टांस व प्रत्यक्ष प्रमाणास अनुसरूनच कारभार हाकणे इष्ट व युक्त हे पटवून घ्यावे लागेल. या सर्व गोष्टी अशक्य आहेत असे मी मानीत नाही. किंबहुना सहकारी क्षेत्रात जे परिवर्तन महाराष्ट्रात झाले व जे नवीन विचार व कार्यपद्धती रूढ होऊ शकली त्यावरून जिल्हा परिषदांसही नवीन जबाबदाऱ्या पटल्या तर त्या पेलण्यास त्या समर्थ ठरतील असा माझा विश्वास आहे.

पुणे, गोखले अर्थशास्त्र संस्था, १९६६ (चक्रमुद्रित).

☆

# १२ • • ग्रामीण औद्योगीकरण

ग्रामीण औद्योगीकरणाचा प्रश्न अगदी नव्या दृष्टिकोनातून हाताळला पाहिजे, हे या टिपणाचे मुख्य प्रतिपादन आहे. सध्याचा दृष्टिकोन ऐतिहासिक घडामोडींचा परिपाक आहे. गेली काही वर्षे खादी ग्रामोद्योग कमिशन, हॅंडिक्राफ्ट्स बोर्ड, हॅंडलूम बोर्ड अशांसारख्या अनेकविध यंत्रणा या क्षेत्रात काम करीत आहेत. या यंत्रणा व संघटनांच्या कामाचे संयोजन व एकसूत्रीकरण करण्यासाठी मुख्यतः रूरल इंडस्ट्रीज प्लॅनिंग कमिटीची स्थापना करण्यात आली. परिणामतः त्या यंत्रणांशी समदर्शी व समांतर असे काम या कमिटीला करायचे आहे असे मानले गेले. कमिटीचा दृष्टिकोन व कामाची पद्धत त्यानुसार ठरली गेली. मला हे असमाधानकारक वाटते.

### ग्रामीण औद्योगीकरणाचे स्थान

आर्थिक विकासाच्या नियोजनाचे ग्रामीण औद्योगीकरण हे प्रमुख आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट असले पाहिजे, अशी माझी धारणा आहे. एकंदर आर्थिक विकासाची व विशेषतः औद्योगीकरणाची योजना ते उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने आखली गेली पाहिजे. ग्रामीण औद्योगीकरणाबाबतचा आजचा दृष्टिकोन कायम ठेवून सध्याच्या मर्यादित क्षेत्रापुरते काम करीत राहिले तर अल्पकालात काहीही विशेष साध्य होणार नाही. आणि मोठ्या उद्योगधंद्यांविषयीच्या सध्याच्या धोरणातील प्रवाहांमुळे दीर्घकालात भांडवलसघन व शहरी उद्योगधंद्यांचे प्रभावशाली क्षेत्र निर्माण होईल व ग्रामीण भाग उद्योगरहित, दरिद्री राहील. विखुरलेल्या व छोट्या उद्योगधंद्यांच्या सहाय्याने, भरपूर रोजगार उपलब्ध करून देणारे, कार्यक्षम उत्पादनतंत्राशी व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेशी सुसंवादी असे सबंध देशाचे औद्योगीकरण करणे हा मी ग्रामीण औद्योगीकरणाचा उद्देश मानतो. नियोजनतंत्राचे जे ज्ञान सध्या उपलब्ध आहे त्यातून या प्रश्नावरील निकडीच्या उपाययोजनेविषयी मार्गदर्शन मिळू शकत नाही. म्हणून त्याचा विचार कामचलाऊ स्वरूपात व टप्प्याटप्प्याने केला पाहिजे.

मोठ्या उद्योगाच्या स्थापनेसाठी परवाना देण्याच्या व त्याला साधनसामग्रीचे वाटप देण्याच्या प्रत्येक निर्णयामुळे देशाच्या औद्योगीकरणाचा भावी आकृतिबंध ठरत असतो. योजना आयोगाच्या विकास कक्षाचे (डेव्हलपमेंट विंग) काम भावी व्यवस्था ठरविण्यात महत्त्वपूर्ण आहे, आणि अलीकडे परदेशीयांबरोबरील भागीदारी व निर्यात व्यापारास उत्तेजन देण्याचे धोरण यांचाही प्रभाव या संदर्भात वाढतो आहे. सध्या तरी यांपैकी कुठल्याच यंत्रणेला वा कार्यक्रमाला ग्रामीण औद्योगीकरणाच्या व्यापक सर्वगामी उद्दिष्टाचे भान आहे असे दिसत नाही. त्यामुळे आकारमान व भांडवलसघनता याबाबत औद्योगिकदृष्ट्या अतिशय प्रगत असलेल्या देशांतील उद्योगधंद्यांची बरोबरी करू शकतील असे

उद्योगधंदे आपल्या देशात स्थापन होण्यातच या सर्वांच्या कामाचा परिणाम होतो आहे. आयत्या आनुषंगिक सोयींच्या उपलब्धतेमुळे उद्योगधंदे मोठ्या शहरांवर केंद्रित होत आहेत व अशा रीतीने या उद्योगांच्या वसनाचे शहरकेंद्री आकृतिबंध वा चित्र तयार होत आहे. असले उद्योग व त्यांना दुय्यम किंवा पूरक असणारे उद्योग यांचे तंत्र, प्रमाण व वसन यांचा आकृतिबंध याच दिशेने ठरत जाणे अपरिहार्य होय.

सध्याच्या यंत्रणा, व्यवस्था व त्यांचा व्यवहार यांच्या दूरगामी परिणामांबरोबरच अल्पकालीन परिणामही महत्त्वाचे आहेत. त्यांतील मुख्य परिणामांचा संबंध कच्च्या मालाच्या उपलब्धतेशी आहे. ग्रामीण औद्योगीकरणासाठी आज ताबडतोबीत उपलब्ध असलेला आधार ग्रामीण भागातील कच्चा माल हा होय. तो जर शहरी भागातील मोठ्या उद्योगधंद्यांत मोठ्या प्रमाणावर वापरला जाऊ लागला तर भावी काळात ग्रामीण औद्योगीकरण अशक्य होऊन बसेल. सध्या हे होत आहे. आणि टाकल्या जाणाऱ्या पावलांचा अंतिम परिणाम काय होईल याकडे माझ्या माहितीनुसार तरी आज काहीही लक्ष दिले जात नाही. उदाहरणार्थ, साखर कारखान्यांतील चोयट्या व साय यांचा उपयोग आधुनिक, मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांत करून घ्यायचा विचार चालू आहे. परकीय भांडवलाच्या साहाय्याने कांद्याचे निर्जलीकरण करण्यासाठी एक मोठा कारखाना उभारण्याचा विचार चालू असल्या-चेही माझ्या ऐकिवात आहे. सुस्पष्ट रीतीने आखलेल्या सर्वगामी धोरणाच्या अभावी असे होण्यात काही आश्चर्यही नाही. अतिशय सुधारलेल्या उत्पादनतंत्राचा अवलंब करून शक्य तितका मोठा कारखाना उभारावा अशी तंत्रज्ञांची दृष्टी असणारच. धोरणाविषयक काही आदेश मिळाले तरच ते अन्य पर्यायांचा विचार करतील.

माझ्या माहितीनुसार व्यापक धोरणविषयक निर्णयामार्फत औद्योगिक विकासावर इच्छित परिणाम घडवून आणल्याचे एकच उदाहरण आहे. ते म्हणजे कापडगिरण्यांचे. त्यातही निर्यात-प्रोत्साहनाच्या नावाखाली काही पळवाटा ठेवण्यात आल्या आहेत. कापडउद्योगात नकारात्मक कृती करण्यात आली आहे. याचे कारण पहिल्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आलेल्या समाईक उत्पादन कार्यक्रमाचा गांभीर्याने कधीच पाठपुरावा करण्यात आला नाही. अर्थात समाईक उत्पादन-कार्यक्रमाच्याही मर्यादा आहेत. एकाच उद्योगात परंपरागत व आधुनिक अशा दोन्ही तंत्रांनुसार उत्पादन चालू असले तरच तो कार्यक्रम होऊ शकतो. भविष्याकडे नजर टाकता असे दिसते की परंपरागत तयार होत नसलेल्या नव्या वस्तूंच्या उत्पादनाचे क्षेत्र बरेच व्यापक असेल. म्हणून उत्पादनाच्या नव्या क्षेत्रात उत्पादन-तंत्राच्या समुचित पातळीवर व प्रमाणावर व उद्योगधंदे बसविण्याविषयीच्या धोरणाबाबत योग्य ती खबरदारी घेऊन आधुनिक उद्योगधंदे स्थापन होऊ शकतील या दृष्टीने आवश्यक ती व्यवस्था करायला पाहिजे. औद्योगीकरणाच्या सर्वगामी योजनेची आखणी करताना त्यातच या व्यवस्थांचा अंतर्भाव केला पाहिजे.

## ग्रामीण औद्योगीकरणाच्या गरजा

'ग्रामीण औद्योगीकरणा'च्या इतर गरजाही ध्यानात घेतल्या पाहिजेत. आवश्यक त्या सोयींचा विस्तार करण्याची योजना ही त्यातली सर्वांत महत्त्वाची होय. मोठ्या शहरांचे आकर्षण ही सर्वत्र आढळून येणारी प्रवृत्ती आहे. विखुरलेले औद्योगिक प्रदेश विकसित करण्याच्या योजनेत याची नोंद घेऊन वाहतूक, पाणी, वीज इत्यादी सोयींचा विस्तार शक्य तितक्या व्यापक प्रमाणावर व उदार दृष्टीने करण्याची गरज आहे. मोठ्या रस्त्यांवर व प्रमुख केंद्रांवर लक्ष व खर्च केंद्रित करण्याची जुनी प्रवृत्ती भारतात अद्यापही चालू आहे. या बाबतच्या योजनांची फेरआखणी केली पाहिजे. असे

करण्यात एक गुंतागुंतीचा प्रश्न उपस्थित होतो. आपली साधनसामग्री मर्यादित असल्याने या सोयींचा विस्तार वाढविणे प्रमाणातच शक्य होईल. म्हणून या संदर्भात ग्रामीण औद्योगीकरणाची व्याख्या किंवा त्याचा अन्वयार्थ स्पष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामीण औद्योगीकरणाची योजना ग्रामीण भागातील वेचक 'केंद्रां'च्या भोवती आखली पाहिजे. ही केंद्रे किती लहान वा मोठी असावीत, ती किती प्रमाणात विखुरलेली असावीत याचे निर्णय अंतिम उद्दिष्ट व निकटच्या शक्यता लक्षात ठेवून घेतले पाहिजेत. त्यासाठी टप्प्याटप्प्याच्या कार्यक्रमाची गरज आहे. सुरुवात निवडक थोड्या मोठ्या केंद्रांपासून करावी व पुढे यथावकाश पसरण्याला वाव असावा.

ग्रामीण औद्योगीकरणाच्या योजनेची आणखी एक गरज म्हणजे या प्रक्रियेला साह्य होईल अशा पद्धतीने संशोधनकार्याची, विशेषतः तांत्रिक संशोधनाची, आखणी करणे. औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशांतील संशोधनाचे वळण तेथील भांडवल व मनुष्यबळ यांच्या तौलनिक उपलब्धतेनुसार ठरले गेले. तरीदेखील तशा काही देशांत स्वयंचलनामुळे संक्रमणकालीन बेकारीचे गंभीर प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. त्यांची उत्पादनतंत्रे सारासारविवेक न करता किंवा आवश्यक ते फेरफार न करता जशीच्या तशी स्वीकारल्यास आपल्याकडे फारच बिकट प्रश्न निर्माण होतील. कुठल्या एका उद्योगापुरते किंवा तंत्र-प्रकारापुरते हे मर्यादित नाही. सर्वांच्याच बाबतीत ते लागू पडेल. संशोधनकार्याला व औद्योगीकरणाविषयीच्या विकास धोरणाला व कार्यक्रमाला नवे वळण देण्यानेच आपली गरज भागू शकेल.

ग्रामीण औद्योगीकरणाच्या संदर्भात संशोधन कार्याच्या एका पैलूकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. डोंगराळ, पडित व जंगलव्याप्त जमिनीवर ग्रामीण भागातील उद्योगांना आधारभूत होतील अशा तऱ्हेचा माल तयार करणे हा तो पैलू होय. ग्रामीण औद्योगीकरण हे बऱ्याच अंशी स्थानिक पातळीवर उपलब्ध होऊ शकणाऱ्या कच्च्या मालावर आधारावे लागेल व त्या दृष्टीने लागवडीखाली नसलेल्या आणि वाढत्या गतीने बेकाम होत जाणाऱ्या जमिनींचा अशा प्रकारच्या मालाचा पुरवठा करण्यासाठी भरपूर उपयोग होऊ शकेल.

भारताच्या एकंदर परिस्थितीचा विचार करता विखुरलेल्या स्वरूपातील, छोट्या प्रमाणावरील पण कार्यक्षम उद्योगधंद्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी कसून प्रयत्न करणे इष्टच नव्हे, तर अत्यंत आवश्यक होय. हे उद्दिष्ट—यालाच मी ग्रामीण औद्योगीकरण म्हणतो—साध्य करणे सुलभ नाही. सध्या भारतात अवलंबिले जाणारे, अतिशय लोकप्रिय असलेले, गोष्टी घडतील तशा घडू देण्याचे धोरण टाकून देऊन औद्योगिक व आर्थिक विकासाला योग्य ती दिशा देण्यासाठी भगीरथ प्रयत्न करण्याची गरज आहे. आपल्याला या प्रयत्नात अनेक बाबतीत इतर ठिकाणांहून फारच थोडे मार्गदर्शन होऊ शकेल. सतत प्रयोग करायला व तात्पुरते पवित्रे घेऊन प्रयत्न करायला आपण शिकले पाहिजे. हा प्रयत्न मनापासून व सर्वगामी स्वरूपात केला तरच यश मिळण्याची आशा आहे. ग्रामीण औद्योगीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीच्या अभिप्रेत गरजा लक्षात घेऊन औद्योगीकरण, परकीय सहभाग, वाहतूक व इतर आर्थिक सोयी, विकास, संशोधनाचे काम इत्यादींबाबतचे सध्याचे चिंतन व धोरण मूलगामी स्वरूपात बदलण्याची निकडीची गरज आहे.

## ग्रामीण औद्योगीकरणाची काही क्षेत्रे

ग्रामीण औद्योगीकरणाच्या व्याख्येचा समुचितपणे विस्तार केला पाहिजे व सध्याच्या चालू कामाबरोबर आणखी बऱ्याच गोष्टींचा अंतर्भाव रूरल इंडस्ट्रीज प्लॅनिंग कमिटीने आपल्या कार्यक्रमात केला पाहिजे. क्षेत्रविस्ताराची काहीशी कल्पना देण्याच्या दृष्टीने कामांची आखणी ताबडतोब कोणत्या दिशांनी करावी याची यादी पुढीलप्रमाणे करता येईल.

(१) ग्रामीण व शहरी कारागिरीचे व हस्तव्यवसायाचे परंपरागत उद्योग. त्यांचे पुनर्वसन करण्याचे, त्यांना संरक्षण देण्याचे काम तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या मजबूत पायावर करावे लागेल व भविष्यात आर्थिक आणि तांत्रिक प्रगती होत राहील अशीही खबरदारी घ्यावी लागेल.

(२) शेतमाल व खराब, डोंगराळ, पडित आणि जंगली जमिनीत पैदा होणारा माल आणि अन्य प्राथमिक उत्पादने यांच्यावर प्रक्रिया करणे व रूपांतर करणे या क्षेत्रात सध्या चालू असलेल्या प्रयत्नांचे कार्यक्षम सहकारी चळवळीच्या स्वरूपात एकत्रीकरण करणे, त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, उत्पादनतंत्र व बाजारपेठ यांचे संशोधन चालू ठेवून उद्योगांचा पसारा व उत्पादित वस्तूंचे प्रकार वाढविण्याकडे विशेष लक्ष दिले जाणे.

(३) ग्रामीण भागातील इमारती व बांधकामाचे क्षेत्र. ग्रामीण औद्योगीकरणाला हे एक महत्त्वपूर्ण क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल. व्यापक प्रमाणावर रोजगार देण्यासाठी ज्या कार्यक्रमांच्या आखणीचा विचार केला जातो त्यांमुळे अवजारे, साधने व अन्य मध्यम वस्तूंसाठी बरीच मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. छोट्या प्रमाणावरील विखुरलेल्या ग्रामीण उद्योगांनी या बाजारपेठेला माल पुरविण्यावर भर द्यावा. या संदर्भात खेड्यांचे सुधारलेले आराखडे व नवी घरे यांकडेही लक्ष दिले जावे. त्यामुळे देखील स्थानिक स्वरूपात महत्त्वपूर्ण व आवश्यक अशी बाजारपेठ उपलब्ध होईल.

(४) ग्रामीण भागात बऱ्याच नवीन उपभोग्य वस्तूंचा प्रवेश होतो आहे. काही, विशेषतः खाद्य वस्तूंच्या बाबतीत, उत्पादन एका समान दर्जाचे होईल या दृष्टीने प्रयत्न करणे शक्य आहे. हे ग्रामीण औद्योगीकरणासाठी विशेष उपयुक्त ठरू शकेल.

(५) मोठे उद्योग आपल्या सरहद्दीत वसविले जावेत यावरून सध्या राज्याराज्यांत व एकाच राज्यातील विविध जिल्ह्यांत बरीच चढाओढ चालू आहे. एखाद्या ठिकाणी मोठा कारखाना निघाल्याने आजूबाजूच्या प्रदेशाला फायदा होतो हे खरे, पण काही विशिष्ट उपाययोजना केली तरच. सुटे भाग तयार करणारे छोटे उद्योग स्थापन करणे व मोठ्या उद्योगाच्या आनुषंगिक आणि पोट (अॅसिलरी अॅड सब्सिडिअरी) गरजा भागविण्याचा प्रयत्न करणे हे त्यांपैकी काही उपाय होत. मोठ्या उद्योगांना परवाने देताना व त्यांच्या भावी कार्यवाहीची आखणी करताना ग्रामीण औद्योगीकरणाच्या उद्दिष्टांकडे पुरेसे लक्ष पुरविले गेले तरच वरीलसारखे उपाय योजणे शक्य होईल.

सुराणा, पन्नालाल, संपादक, *ग्रामीण औद्योगीकरण* (पुणे : समाज प्रबोधन संस्था, १९६७) पृ० २९-३४ (योजना आयोगास १९६२ मध्ये सादर केलेल्या टिपणाचे भाषांतर)

☆

# विभाग : ५

## भारताच्या
## राजकीय समस्या

# १ . . हिंदी संघराज्याचे घटक-प्रांत

हिंदी संघराज्यात विशिष्ट प्रदेशांच्या गरजा व देशी संस्थानांचा राजकीय दर्जा या दोन गोष्टींसाठी निरनिराळ्या प्रमाणात सत्तेचे विकेंद्रीकरण करावे लागेल व प्रादेशिक स्वायत्ततेच्या विशिष्ट योजना स्वीकाराव्या लागतील. घटक-प्रांत हा हिंदी संघराज्याचा खरा मूळ पाया आहे. तो कदाचित केवळ आजच्या ब्रिटिश प्रांतांतील प्रदेशाचा किंवा केवळ संस्थानी प्रदेशाचा किंवा काही भाग आजच्या ब्रिटिश प्रांतांतील व काही भाग देशी संस्थानांतील अशा संमिश्र प्रदेशाचा बनविण्यात येईल. नव्या योजिलेल्या घटनेप्रमाणे काही विशिष्ट विषयांच्या पुरतीच सत्ता मध्यवर्ती संघराज्याच्या सरकारला देऊन उरलेली सर्व सत्ता घटक-प्रांतांना मिळावयाची आहे. याशिवाय ब्रिटिश शिष्टमंडळाच्या योजनेप्रमाणे हिंदी संघराज्याच्या अंतर्गत तीन समूहराज्ये करण्यात आली, तर त्या त्या गटांतील घटकांना आपापल्या सत्तेपैकी काही सत्ता या समूहराज्यांच्या सरकारांकडे द्यावी लागेल. मात्र मूळ सत्ता ही घटक-प्रांतांचीच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. कित्येक घटक-प्रांतांमध्ये आर्थिक अगर भौगोलिक परिस्थिती भिन्न असणाऱ्या निरनिराळ्या प्रदेशांचा समावेश होणे शक्य आहे. यासाठी त्या त्या घटक-प्रांतांतील मोठमोठ्या शहरांच्या काही विशिष्ट गरजा असल्यास त्या भागविण्यासाठी प्रांतांच्या घटनेत काहीतरी तरतूद करणे आवश्यक होईल.

## उपप्रांतांच्या स्वायत्ततेचा प्रश्न

स्वायत्ततेच्या बाबतीत रशियामध्ये राजकीय घटकांची श्रेणी करण्यात आली आहे. यू. एस. एस. आर. हे मुख्यतः स्वायत्त लोकशाही घटकांचे बनलेले एक संघराज्य आहे. परंतु त्यांतील प्रत्येक स्वायत्त घटकामध्येही स्वायत्त प्रदेश अगर स्वायत्त जिल्हे यांचा अंतर्भाव केलेला आहे. जर्मनीमध्ये प्रत्येक लेंडरमध्ये म्हणजे घटक-राज्यामध्ये मोठमोठया ग्रामीण प्रदेशांसाठी व मोठमोठया शहरांसाठी घटनेनुसार स्वायत्ततेची सोय करून ठेवण्यात आली आहे. युद्धापूर्वी फ्रान्समध्ये निरनिराळे विभाग आपापल्या प्रादेशिक विभिन्नतेवर जोर देऊन स्वायत्ततेची सारखी मागणी करीत होते. आणि ब्रिटनमध्ये स्कॉटलंड व वेल्सकडूनही स्वराज्याची मागणी करण्यात येत होती. हिंदुस्थानच्या अवाढव्य विस्तारामुळे हिंदुस्थानातही असे प्रश्न उत्पन्न होतील ही कल्पना मॉंटफर्ड-सुधारणांचा मसुदा तयार करणाऱ्यांना आली होती. आणि त्यासाठी एखाद्या प्रांतामध्ये उपप्रांत निर्माण करून त्यांना बरीच स्वायत्तता द्यावी लागेल हे जाणून तशा तऱ्हेची योजना करण्याचे त्यांच्या मनांत घोळत होते असे दिसते.

हिंदी संघराज्याच्या घटकांतील उपप्रांतांना कशी व कोणत्या प्रमाणात स्वायत्तता द्यावी याचा विचार करण्यापूर्वी संघराज्यातील या मुख्य घटकांची सत्ता अबाधित राखण्यासाठी त्यांची घटनात्मक मांडणी

व त्यांना द्यावयाचे किमान अधिकार यांचे विवेचन प्रथम करणे जरूर आहे. संघराज्याचा घटक असणाऱ्या प्रांताचे घटनेतील स्थान व त्या प्रांताचा एक स्वायत्त विभाग असणाऱ्या उपप्रांताचे स्थान यांमध्ये मोठा महत्त्वाचा घटनात्मक फरक आहे. संघराज्याच्या घटक-प्रांताला जी सत्ता प्राप्त होते ती कोणत्याही वरिष्ठ सत्तेकडून होत नाही. ही सत्ता किंवा अधिकार स्वयंसिद्ध असून संघराज्याच्या स्थापनेपासूनच मूळ घटनेत त्याची नोंद झालेली असते. परंतु प्रांतातील उपघटकांना मिळणारे स्वायत्ततेचे अधिकार हे घटक-प्रांताचे कायदेमंडळ स्वतः केलेल्या कायद्यान्वये उपप्रांताला देते. यासाठी स्वायत्त उपप्रांत निर्माण करून त्यांना जरूर तेवढे अधिकार देणारे व इतर मूळ अधिकार स्वतः उपभोगणारे असे घटकांचे एकच सार्वभौम कायदेमंडळ असावयास पाहिजे. घटक-प्रांताच्या कायदेमंडळाबरोबर प्रांतिक कार्यकारी मंडळ अगर मंत्रिमंडळ हेही आलेच. प्रांतामधील सर्वोच्च दर्जाच्या नोकरवर्गाच्या नेमणुकाही आजच्या अखिल भारतीय नोकरश्रेणीप्रमाणे सर्व प्रांतांसाठीच कराव्या लागतील. प्रांताचे एकच वरिष्ठ हायकोर्ट असणे आवश्यक आहे. आणि तज्ज्ञ नोकरवर्ग, उच्च संशोधन-खाती, प्रयोगसंस्था व शिक्षणसंस्था यांचे स्वरूपही प्रांतिक असणे इष्ट होईल. कायदे करण्याच्या क्षेत्रातसुद्धा आर्थिक अगर सामाजिक विषयांच्या सर्वसाधारण नियंत्रण-नियोजनाच्या बाबतीत प्रांतिक कायदेमंडळाचे कायदे हे अधिक व्यापक व म्हणूनच निर्णायक मानले गेले पाहिजेत. दिवाणी व फौजदारी कायदा सर्व प्रांतांसाठी सारखाच असला पाहिजे हे सांगावयास नकोच. आर्थिक नियोजन यशस्वी रीतीने करण्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सत्ता प्रांतिक सरकाराकडे ठेवावी लागेल. सामाजिक सुधारणांसाठी कायदे करण्यासंबंधीचे स्थूल धोरणही प्रांतिक सरकारलाच ठरवून द्यावे लागेल. त्याचप्रमाणे समाजातील असहाय वर्गांचे संरक्षण करण्याचीही जबाबदारी प्रांतिक सरकारलाच उचलावी लागेल. इतके सर्व अधिकार प्रांतिक कायदेमंडळाकडे राखून ठेवल्यानंतर उपप्रांताला द्यावयाचे स्वायत्ततेचे अधिकार त्या त्या विभागाच्या परिस्थितीप्रमाणे कमीअधिक होऊ शकतील. स्थूल मानाने १९१९ च्या हिंदुस्थान सरकारच्या कायद्यात हिंदी प्रांतांना दिलेल्या अधिकाराइतके अधिकार नवीन घटनेप्रमाणे अस्तित्वात येणाऱ्या प्रांतिक घटकांतील उपप्रांतांना देणे शक्य होईल. घटक-प्रांतांतील स्वायत्तता उपभोगणाऱ्या या उपप्रांतांना आपापल्या क्षेत्रांतील जमीनमहसुलाची व्यवस्था करण्याचा व वरिष्ठ कोर्टाच्या कार्यकक्षेत न मोडणाऱ्या न्यायालयांची व्यवस्था करण्याचा अधिकार द्यावयास हरकत नसावी. उपप्रांतांना शेतकी, जंगल, मच्छीमारी, लहान आणि मोठे उद्योगधंदे इत्यादी विषयांच्या बाबतीत १९१९ च्या घटनेतील प्रांतासारखे अधिकार देता येतील. मात्र सर्व प्रमुख बाबतीत प्रांतिक सरकारांना देखरेख ठेवण्याचे, दिग्दर्शन करण्याचे व निरनिराळ्या उपप्रांतांतील कायद्यांमधील विरोध अगर विसंगती दूर करण्याचे अंतिम व निर्णायक अधिकार असावे लागतील हे उघड आहे. ज्या घटकांतील निरनिराळे भाग आर्थिक अगर इतर परिस्थितीमुळे फार भिन्न आणि शिवाय सारख्याच तोलाचे असतील तेथे पूर्ण स्वायत्त उपप्रांतांची अशा प्रकारची राज्यघटना सोयीची होईल.

परंतु बहुतेक प्रांतांमध्ये इतके अधिकार असलेला उपप्रांत निर्माण करण्याचा प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव नाही. हिंदी संघराज्याच्या बहुतेक प्रांतांतील प्रादेशिक विभागास दक्षिण आफ्रिकेतील घटना-कायद्यान्वये तेथील प्रांतिक कौन्सिलांना जितके अधिकार देण्यात आले आहेत, तितके दिले असता त्या त्या विभागातील स्वायत्ततेची मागणी किंवा इच्छा पुरी होण्यासारखी आहे. दक्षिण आफ्रिकेतील प्रांतिक कौन्सिलांकडे पुढील अधिकार व खाती दिलेली आहेत :—(१) विशिष्ट कर लादणे, (२) वरिष्ठ सरकारच्या संमतीने कर्ज काढणे, (३) स्थानिक स्वराज्यसंस्था, (४) स्थानिक महत्त्वाचे रस्ते, इमारती व इतर बांधकाम, (५) शेतकी, जंगल व मच्छीमारी, (६) सार्वजनिक आरोग्य, दवाखाने, धर्मादाय

संस्था वगैरेंची देखरेख आणि (७) उच्च शिक्षणाशिवाय बाकी सर्व तऱ्हेचे शिक्षण. या बाबींबरोबरच अधिकारीवर्गाची नेमणूक, त्यांचे पगार, त्यांच्या नोकरीच्या बाबतीत निरनिराळ्या गोष्टी ठरविणे यासंबंधीचे व या सर्व कामांसाठी सार्वजनिक मालमत्तेची मालकी मिळविणे व राखणे इत्यादी अधिकारही उपप्रांतिक विभागांना देण्यास हरकत नाही.

स्कॉटलंडने स्वयत्ततेची मागणी केली असताना जी चर्चा झाली तीही या बाबतीत लक्षात घेण्या-सारखी आहे. प्रो. रॅम्से म्यूर यांनी स्कॉटलंड व ब्रिटिश बेटांतील इतर प्रदेशांसाठी सुचविलेल्या सत्तावितरणाच्या योजनेत पोलिस व तुरुंग, शेतकी व मच्छीमारी, सार्वजनिक आरोग्य व शिक्षण, दारिद्र्यनिवारण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची देखरेख व संघटना इतक्या बाबी उपप्रांतीय सत्तेकडे सोपविण्यात याव्या असे म्हटले आहे. दक्षिण आफ्रिकेमध्ये प्रांतिक कौन्सिलांना देण्यात आलेल्या अधिकारांच्या धर्तीनुसार सुचविलेल्या विषयांच्या यादीहून प्रो. म्यूर यांची यादी विशेष निराळी नाही हे वाचकांच्या लक्षात येईलच. फक्त त्यांच्या यादीत पोलिस व तुरुंग यांचाही समावेश आहे. इतकेच नव्हे, तर उच्च शिक्षणाचाही शिक्षणविषयक अधिकारांमध्ये अंतर्भाव केला आहे. मात्र इतके अधिकार उपप्रांतांना दिल्यावरसुद्धा वरिष्ठ कायदेमंडळाने त्या सर्वांच्या वरचा अंतिम अगर निर्णायक कायदे करण्याचा आपला अधिकार सोडता कामा नये असे प्रो. म्यूर यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. ज्या ज्या घटक-प्रांतांत मुख्य प्रांतातील आर्थिक परिस्थितीपेक्षा अगदी भिन्न अशी आर्थिक स्थिती असलेला असा एक मोठा प्रादेशिक विभाग असेल, तेथे अशा प्रकारचा उपप्रांत निर्माण करून त्याला वर सांगितलेले अधिकार दिल्याने बहुधा कार्यभाग होण्यासारखा आहे.

परंतु आर्थिक परिस्थितीच्या विषमतेमुळे किंवा भिन्न हितसंबंधामुळे नव्हे, तर प्रांतातील राजकीय सत्ता ज्या मध्यवर्ती ठिकाणी केंद्रित होणार त्या केंद्रापासून एखादा विशिष्ट भाग हा फार दूर असल्या-मुळे त्याच्या उन्नतीकडे दुर्लक्ष होईल अशा भीतीमुळेही पुष्कळ वेळा वेगळा उपप्रांत मागितला जाण्याचा संभव आहे. परंतु या परिस्थितीत उपप्रांत निर्माण करण्याचा उपाय हा रास्त ठरणार नाही. तर स्कॉटलंडसाठी जी योजना हल्ली जारी आहे तिला अनुसरून दूर असलेल्या प्रदेशासाठी प्रांताच्या मंत्रिमंडळात खास मंत्री नेमून तद्वारा प्रादेशिक गरजा भागविणे अधिक सोयीचे होईल. ब्रिटिश राज्ययंत्रात स्कॉटलंडसाठी पुढीलप्रमाणे व्यवस्था झालेली आहे. स्कॉटलंडसाठी स्कॉटिश ऑफिस नावाचे एक वेगळेच खाते उघडण्यात आले असून त्याच्या मुख्याधिकाऱ्याला 'सेक्रेटरी फॉर स्कॉटलंड' हे नांव आहे. हा सेक्रेटरी ब्रिटिश कॅबिनेटचा सभासद असतो. त्याचप्रमाणे स्कॉटलंडसाठी लॉर्ड ॲडव्होकेट सॉलिसिटर जनरल हे निराळे असून ते जरी ब्रिटिश कॅबिनेटमध्ये नसले तरी ते ब्रिटिश सरकारमध्ये मंत्रिमंडळाचे सभासद असतात. स्कॉटलंडमध्ये पूर्वीपासून चालत आलेले अनेक विशिष्ट कायदेकानू असून त्या देशाची कोर्टे व त्यांची कार्यपद्धती याही वेगळ्या आहेत. पुष्कळ विषयांच्या बाबतीत स्कॉटलंडसाठी वेगळे कायदे करावे लागतात. हे सर्व कायदे पूर्वापार चालत आलेल्या रूढीप्रमाणे पार्लमेंटच्या सर्व स्कॉटिश सभासदांच्या मिळून बनलेल्या 'सिलेक्ट कमिटी'कडे अगोदर विचारासाठी पाठविले जातात. स्कॉटलंडसाठी नेमलेल्या मंत्र्याकडे स्कॉटिश प्रश्नाबाबतची खाती असतात. या खात्यांवर कायमचे सेक्रेटरी नेमलेले असून त्यांच्या कचेऱ्या एडिंबर्ग येथे आहेत. उदाहरणार्थ, स्कॉटलंडसाठी स्कॉटिश बोर्ड ऑफ हेल्थ, स्कॉटिश शिक्षणखाते, स्कॉटिश मच्छीमारी खाते वगैरे खाती एडिंबर्ग येथे ठेवण्यात आली आहेत. गेली वीस वर्षे स्कॉटलंडला प्रभावी मंत्री मिळाल्यामुळे व स्वायत्ततेच्या चळवळीच्या जोरामुळेही आजपर्यंत ह्या व्यवस्थेपासून स्कॉटलंडचा पुष्कळच फायदा झाला आहे. मंत्रिमंडळातील एका प्रमुख मंत्र्यावर स्कॉटलंडच्या बाबतीतली सर्व जबाबदारी टाकलेली असते व या जागेसाठी साहजिकच स्कॉचमनचीच निवड होते. यामुळे

स्कॉटलंडमधील प्रश्नांकडे ब्रिटिश सरकारचे कधी दुर्लक्ष झाले नाही. सामाजिक व आर्थिक व्यवस्थेच्या बाबतीत दोन प्रदेशांत पुष्कळ साम्य असले, तरी ते जेथे एकमेकांपासून फार दूर असतात व प्रांतीय सरकारचे अधिकार केंद्र दूर राहिल्यामुळे त्यांपैकी एखाद्या प्रदेशाच्या उन्नतीकडे प्रांतीय सरकारचे दुर्लक्ष होण्याचा संभव असतो, तेथे स्कॉटलंडसारखी व्यवस्था अमलात आणल्याने सर्व प्रकारच्या तक्रारी दूर होण्याचा संभव आहे.

## शहरांचे स्वतंत्र घटक बनविणे हानिकारक

घटक-प्रांतांतील मोठमोठ्या शहरांचा प्रश्न हा एक आणखी वेगळाच प्रश्न आहे. काही जणांची अशी सूचना आहे की ह्या मोठ्या शहरांना त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशापासून वेगळे करण्यात येऊन त्यांना हिंदी संघराज्याचे स्वतंत्र घटक बनवावे. संघराज्याचे घटक कसे असावेत या बाबतीत पूर्णपणे अज्ञान असणाऱ्यांच्या तोंडूनच अशी सूचना ऐकावयास मिळेल. आधुनिक नागर-जीवन हे अतिशय एकांगी असले आणि शहरांमध्ये व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशांमध्ये जर कोणत्याही प्रकारचे दळण-वळण अगर राजकीय व सामाजिक संबंध नसतील, तर त्यामुळे त्या ग्रामीण जनतेचे जे नुकसान होईल त्यापेक्षाही शहरांचेच नुकसान अधिक होण्याचा संभव आहे. शहरातील राजकीय व आर्थिक जीवन हे इतके वैशिष्ट्यपूर्ण असते की हिंदी संघराज्यातील इतर घटकांच्या बरोबरीने कोणतेही मोठे शहर हे स्वावलंबी व जवळजवळ सार्वभौम असा घटक बनूच शकत नाही. शिवाय शहर व त्याच्या भोवतालचा प्रदेश यांच्या फारकतीमुळे आजूबाजूच्या प्रदेशास शहरातील केंद्रित संपत्तीचा व साधनांचा फायदा मिळेनासा झाल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होईल तो वेगळाच. प्रांतातील मुख्य शहराला प्रांतापासून वेगळे केल्याने प्रांतातील बौद्धिक व सामाजिक जीवनाचे मुळावरच घाव बसतो. प्रांताच्या अंतर्गत कारभारात त्यामुळे अनेक अडचणी व घोटाळे निर्माण होतील. त्याचे दुष्परिणाम प्रांतास भोगावे लागतील. त्यामुळे प्रांताची आर्थिक स्थितीही हलाखीची होईल. शिवाय एक केंद्र अशा रीतीने गमावल्यास साहजिकच त्या शहराशी स्पर्धा करणारे असे शहर आपल्या प्रदेशात निर्माण करण्याची भोवतालच्या प्रांतांना बुद्धी होईल. अशा रीतीने प्रांतातील शहरांना त्यातून वेगळे काढण्याने एकंदरीत बरीच अनवस्था माजेल. पूर्ण फारकत नाही तरी अशा मोठ्या मिश्र वस्तीच्या शहरांच्या बाबतीत काहीतरी विशेष व्यवस्था दर प्रांतात करणे अवश्य आहे हे तितकेच खरे आहे. या शहरांना इतर देशांतील कॉर्पोरेशनच्या धर्तीवर जास्तीत जास्त स्वायत्तता दिल्याने हा प्रश्न सुटण्यासारखा आहे. या नागर शासनसंस्थांच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारून त्यांना सार्वजनिक आरोग्य, रस्ते, पूल आणि सार्वजनिक हिताची इतर बांधकामे, धंदेशिक्षण धरून सर्व प्राथमिक व दुय्यम शाळांतील शिक्षण, घरबांधणी व शहरांची मांडणी, वाढ व सुधारणा यांबाबत सर्व योजना, व्यापारी वाहतुकी अगर वाहतुकी कारभार करण्यास मुभा व या सर्व बाबतीत योजनाबद्ध आखणी करण्याचे अधिकार व सर्व प्रकारचे समाजहित व सांस्कृतिक संवर्धन या बाबतीत नवीन योजना व उपक्रम करण्याची सत्ता वगैरे अधिकार दिले जावेत. इतके अधिकार हाती मिळाल्यावर या मोठ्या शहरातील जीवनाचे निरनिराळे प्रश्न सोडविण्याचे काम शहरांतील नगरपालिका सहज व सुलभ रीतीने करू शकेल.

*संयुक्त महाराष्ट्र परिषद*, प्रकाशन, २ (पुणे, १९४६).

☆

# २ .. नवीन प्रांतरचना व उपप्रांताचे सत्ताधिकार

## १

नवीन प्रांतरचना करण्याचा मुख्य उद्देश, सध्या अस्तित्वात असलेल्या प्रांतांपेक्षा राजकीय दृष्ट्या अधिक एकजिनसी घटक निर्माण करणे हा आहे, ही गोष्ट या विषयाच्या प्रारंभीच गृहीत धरणे सोयीचे होईल. अर्थात प्रांतांच्या पुनर्रचनेचा विचार करण्यापूर्वी 'राजकीय एकात्मते'चे निकष–लक्षणे–निश्चित करणे आवश्यक आहे. याचाच अर्थ असा की, एखाद्या भागातील लोकवस्ती, तिच्या शेजाऱ्यापासून पृथक अशी स्वतंत्र 'राजकीय जमात' म्हणून कोणत्या विशेष लक्षणामुळे ओळखली जाईल हे घटना समितीला प्रथम दिग्दर्शित करावे लागेल. या बाबतीत सर्वसाधारणतः आजपर्यंत एकभाषित्व हीच अशा वैशिष्ट्याची कसोटी सर्वमान्य झाली आहे. काही विशिष्ट परिस्थितीत भाषेप्रमाणेच त्या त्या जनसमूहाची विशिष्ट धार्मिक किंवा वांशिक रचना असे निकषही संमत करावे लागतील. मुसलमान बहुसंख्यांकांचा प्रदेश विभक्त केल्यानंतरसुद्धा पंजाबात, जेथे शीखांची दाट वस्ती आहे असा एक राजकीय घटक निर्माण करणे कदाचित आवश्यक ठरेल. त्याचप्रमाणे मध्य व पूर्व हिंदुस्थानात वन्य जातींची ज्या ठिकाणी अतिशय दाट वस्ती आहे, तेथेही असाच एक स्वतंत्र राजकीय विभाग अगर उपप्रांत निर्माण करणे इष्ट वाटेल.

### गौणभाषीय विभागांचा प्रश्न

राजकीय एकात्मतेचे भाषा हेच जर मुख्य लक्षण मानले तर नव्या राजकीय घटकांच्या सीमा, पृथक् भाषावार गटांच्या प्रदेशांच्या सीमांशी एकरूप व्हायला हव्यात. तथापि, हे सर्वांसच ठाऊक आहे की, हिंदुस्थानात बोलल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या भाषांची संख्या खूपच मोठी आहे. अर्थात नवीन प्रांतरचनेच्या मार्गातील पहिले पाऊल म्हणजे, कोणत्या प्रमुख भाषांना राजकीय विभागांच्या निर्णयासाठी आधारभूत मानावयाचे, हे ठरविणे. हे ठरविताना, विशिष्ट भाषा बोलणारांची लोकसंख्या केवढी आहे, त्या प्रांतात ती एकवटलेली आहे की विरळ पसरलेली आहे, आणि त्या प्रांतात ती विशिष्ट भाषा किती परिणतावस्थेला पोचलेली आहे, या सर्व गोष्टी आपणांस लक्षात घ्याव्या लागतील. कारण आपल्या देशात अशा काही भाषा आहेत की तौलनिक दृष्ट्या त्या बऱ्याच मोठ्या लोकसंख्येकडून बोलल्या जातात, परंतु त्यांचा फारसा कधी लेखनात उपयोग केला जात नाही, किंवा त्यांत विपुल ग्रंथसंपत्ती अगर भरदार साहित्यपरंपरा आढळत नाही. अशा भाषांचे कितपत संगोपन व संवर्धन करावयाचे, की त्यांना तसेच नामशेष होऊ द्यावयाचे, याचाही निर्णय आपणास यासंबंधीचे आपले धोरण ठरविताना घ्यावा लागेल. राजकीय घटक बनविताना किंवा वन्य जमातीची दाट वस्ती असलेल्या भागांचा राज्यकारभार हाकताना हा प्रश्न प्रामुख्याने पुढे येईल. हा वन्य जातींचा भाग सोडून दिला तरी, जेथे एखाद्या छोट्या पण दाट लोकवस्तीच्या गटाकडून नजीकच्या एखाद्या प्रमुख भाषेशी

संबद्ध अशी, पण त्या भाषेइतकी संपन्न वा प्रगत नसलेली भाषा बोलली जाते, उदाहरणार्थ, कच्छी, कोंकणी, किंवा तुळु, तेथेही या प्रश्नास तोंड द्यावे लागेल. विशिष्ट भाषेमुळे अगर अन्य तऱ्हेने एकजिनसी असलेल्या कोणत्याही गटाला स्वतंत्र राजकीय घटकाचा दर्जा प्राप्त होण्यास किमान उत्पन्नाची अट जर आवश्यक मानण्यात आली तर, तुलनेने लहान असे जे गौण भाषीय विभाग असतील त्यांना, त्यांच्या भाषेशी संबद्ध असणाऱ्या प्रमुख भाषेच्या मोठ्या प्रांतामध्ये स्वायत्ततेचा दर्जा वा विशेष सवलतीचे हक्क देणे जरूर आहे. असे करताना वेल्समध्ये वेल्श भाषेच्या उपयोगाची आणि शिक्षणाची व्यवस्था ज्या पद्धतीने करण्यात आली आहे तशाच पद्धतीचा अवलंब आपणांसही अशा लहान स्थानिक बोलींच्या बाबतीत करावा लागेल.

## हिंदी संघराज्याचे घटक

'राजकीय एकात्मते' चे प्रमुख निकष कोणते हे प्रथम घटना-समितीने निश्चित केले पाहिजे. ते केल्यानंतर या निकषांच्या आधारावर हिंदी संघराज्यात एकंदर किती 'राजकीय घटक' संभवतात त्यांची संख्याही कळेल. असे एकजिनसी राजकीय घटक निश्चित करणे ही नवीन प्रांतरचनेच्या कामातील पहिली पायरी आहे. या राजकीय एकात्मतेच्या निकषानुसार शेजारच्या लोकसमूहाच्या सापेक्षतेने स्वतःचे राजकीय वा सांस्कृतिक पृथकत्व सिद्ध करणारे असे लोकवस्तीचे एकंदर किती व कोणते प्रदेश होतात, हे ठरविता येईल. हे राजकीय विभाग ठरविण्यापूर्वी आणि त्यांचा दर्जा निश्चित करण्यापूर्वी घटना-समितीला आणखी दुसऱ्या बाबतीतही निर्णय घ्यावे लागतील. राजकीय दृष्ट्या एकजीवी असलेला प्रत्येक घटक, संपूर्ण, स्वतंत्र प्रांत म्हणून ओळखला जाण्यास त्यातील लोकसंख्या, उत्पन्न इत्यादींची किमान मर्यादा काय असली पाहिजे, हेहि घटना-समितीला नक्की करावे लागेल. त्याप्रमाणे, राजकीय वा सांस्कृतिक दृष्ट्या सर्वस्वी विभिन्न असलेले, परंतु लोकसंख्येच्या व उत्पन्नाच्या किमान आवश्यक मर्यादेलाही अपुरे पडणारे घटक, लगतच्या मोठ्या घटकामध्ये कोणत्या पद्धतीनुसार समाविष्ट वा संलग्न केले जाणार, व तसा त्यांचा समावेश झाल्यानंतर त्यांना कोणता राजकीय दर्जा मिळेल व कितपत स्वायत्तता उपभोगता येईल, या गोष्टीही घटना-समितीने स्पष्ट केल्या पाहिजेत. ही दुसरी अवस्था पुरी झाली की दोन गोष्टींचा निकाल लागेल. (१) संपूर्ण प्रांताच्या दर्जाला लायक अशा राजकीय एकात्म घटकांची संख्या (२) व ज्यांना हा दर्जा मिळणार नाही अशा घटकांची संख्या. त्याचप्रमाणे कोणत्या मोठ्या घटकात कोणते लहान घटक समाविष्ट वा संलग्न करावयाचे व संलग्न केल्यानंतर या छोट्या घटकांचा राजकीय दर्जा कोणता राहावयाचा हेही दर्शविले जाईल.

## स्वतंत्र प्रांत-स्थापनेचे निकष

यानंतर स्वतंत्र प्रांताचा दर्जा लाभण्यासाठी लोकसंख्या, उत्पन्न, क्षेत्रफळ इत्यादी बाबतीत ज्या किमान शर्ती आपण ठरवू त्यापेक्षा जे प्रांत खूपच अवाढव्य परंतु राजकीय दृष्ट्या मात्र एकात्म स्वरूपाचे आहेत, त्यांचा प्रश्न येतो. अशा वेळी एखादा प्रांत काही विशिष्ट कमाल मर्यादेपेक्षा (लोकसंख्या, क्षेत्रफळ, उत्पन्न इ.) अधिक मोठा असू नये असा नियम करणे इष्ट होईल. केवळ राजकीय एकात्मतेच्या निकषानुसार बनविलेले काही प्रांत प्रचंड आकाराचे होण्याचा संभव आहे. तेव्हा अशा विभागांची एकापेक्षा अधिक स्वतंत्र प्रांतात वाटणी करावी की काय, याचा विचार करणे प्राप्त आहे. प्रादेशिक एकता व लोकसंख्येचा एकजिनसीपणा असलेल्या विभागाचे दोन अगर अधिक प्रांत बनविताना आपणास राजकीय एकात्मतेखेरीज अन्य मुद्द्यांच्या विचारास प्राधान्य द्यावे लागेल. असे करताना त्या भागाची ऐतिहासिक परंपरा, भौगोलिक रचना आणि आर्थिक परिस्थिती या बाबींचा

विचार महत्त्वाचा ठरेल आणि यांपैकी कोणत्या विशिष्ट बाबीवर कमी जास्त भर द्यावयाचा, हे त्या त्या विशिष्ट प्रश्नावर अवलंबून राहील.

## स्वयंनिर्णयाचा हक्क

एकात्म घटकात अंतर्भूत होणारा प्रदेश अथवा लोकसंख्या फार मोठी (कमाल मर्यादेपेक्षा) नसली तरीही राजकीय दृष्ट्या एकजिनसी असलेल्या घटकातून एकाहून अधिक घटक निर्माण करण्याचा हा प्रश्न सोडवावा लागेल. अशा एकात्म राजकीय घटकाच्या एखाद्या भागाची ऐतिहासिक किंवा इतर कारणांमुळे स्वतंत्र प्रांत होण्याची आकांक्षा असणे संभवनीय आहे. प्रांतांच्या नवीन रचनेबाबत घटना-समितीने घालून दिलेल्या सर्वसाधारण तत्त्वांच्या अनुरोधानेच आपणांस राजकीय एकता असलेल्या विभागांतील अशा विभक्तीकरणाचा आग्रह धरणाऱ्या गटांच्या मागणीचा विचार करावा लागेल. समजा, सामान्यतः प्रांत हे विस्ताराने मोठे असावेत आणि शक्यात शक्य कमाल लोकसंख्या व क्षेत्रफळ त्यांच्या वाट्यास यावे असा जर घटना-समितीचा हेतू असेल तर राजकीय एकता असलेल्या विभागांचे एकापेक्षा अधिक प्रांत बनविण्याच्या प्रवृत्तीस उत्तेजन देता कामा नये. उलटपक्षी, प्रांतांची संख्या शक्यतो जास्त असावी—फक्त एका विशिष्ट किमान आकारापेक्षा हे प्रांत मोठे असले म्हणजे झाले—असा दृष्टिकोन जर स्वीकारण्यात आला तर मग सापेक्षतेने लहान अशा एखाद्या एकजीवी राजकीय घटकातूनही एकाहून अधिक प्रांत बनविण्यास उत्तेजन देण्यास हरकत नसावी. तथापि, घटना-समिती या दोहोंपैकी कोणत्याही पर्यायाचा, ते एक सर्वसाधारण धोरण म्हणून अवलंब न करता, प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्र व्यक्तिगत विचार करण्याचे ठरवील. अशा प्रसंगी घटना-समिती स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा अवलंब करून त्या आधारानेच या प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घेईल. अर्थात ही गोष्ट स्पष्टच आहे की, या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा अंमलही काही ठराविक मर्यादेपर्यंतच करू दिला जाईल. उदाहरणार्थ, जे विभाग पूर्ण प्रांताच्या आवश्यक शर्तींच्या किमान मर्यादेपर्यंतही पोहोचू शकत नाहीत, त्यांना केवळ स्वयंनिर्णयाच्या अधिकारावर स्वतंत्र प्रांताची मागणी करता येणार नाही. शिवाय, हा स्वयंनिर्णयाचा हक्कही ठराविक मर्यादेत आणि विवक्षित, स्पष्टपणे निर्दिष्ट केलेल्या प्रदेशांनाच फक्त वापरता येईल.

## प्रांतनिर्मितीतील कामाचा क्रम

अशा तऱ्हेने नवीन राजकीय प्रांतनिर्मितीचे काम पुढीलप्रमाणे सुरू होईल (१) ठरविलेल्या निकषानुसार राजकीय एकजिनसी घटक निश्चित करणे. (२) एखाद्या विभागाला संपूर्ण प्रांताचा दर्जा लाभण्यासाठी आवश्यक असणाऱ्या किमान बाबींची व्याख्या करणे. (३) जे विभाग या किमान मर्यादाही गाठू शकत नाहीत त्यांना कोणत्या मोठ्या राजकीय घटकाशी संलग्न करावयाचे ते ठरविणे, व अशा प्रकारे जोडलेल्या लहान विभागांचा त्यानंतरच राजकीय दर्जा ठरविणे, (४) विशिष्ट मर्यादेपेक्षा (लोकसंख्या, क्षेत्रफळ उत्पन्न या दृष्टीने) जे विभाग मोठे आहेत त्यांचे एकापेक्षा अधिक प्रांत बनविणे. (५) एखाद्या राजकीय एकात्म घटकाच्या अंगभूत विशिष्ट प्रदेशातील लोकांनी केलेल्या स्वतंत्र प्रांताच्या मागणीसंबंधी, राजकीय धोरणाप्रमाणे अगर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसारे, निर्णय देणे.

संघराज्यातील राजकीय घटक म्हणून अस्तित्वात येणारे मुख्य प्रदेश ठरविल्यानंतर पुढची पायरी म्हणजे या घटकांच्या निश्चित सरहद्दी ठरविण्याकरिता काही तत्त्वे व कार्यपद्धती आखणे. या बाबतीत काही थोड्या मूलभूत गोष्टींकडे प्रथम लक्ष देणे जरूर आहे. ज्या क्षेत्रविस्ताराची पुनर्विभागणी होणार तो सर्वच्या सर्व प्रदेश या नवीन घटकांत संपूर्णपणे विभागला गेला पाहिजे हे अगदी उघडच आहे.

त्यासाठी, प्रदेश-वाटणीची तत्त्वे व पद्धती अशी आखली पाहिजेत की, कुठलाही प्रदेश अथवा लोकवस्ती एकाच वेळी एकाहून अधिक घटकांत समाविष्ट केली जाणार नाही किंवा कुठल्याच घटकात समाविष्ट न होता ती तशीच अधांतरी राहणार नाही. शिवाय आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नवीन बनलेल्या प्रत्येक घटकाचे क्षेत्र हे एकत्र व एकाच सलग भूप्रदेशाचे झाले असले पाहिजे व त्याची सरहद्दही सलग व अखंडित असली पाहिजे. याचाच अर्थ असा की एखाद्या घटकाच्या सरहद्दींनी वेढलेला प्रदेश हा सर्व त्या घटकाच्याच मालकीचा असला पाहिजे; त्यात इतर घटकांच्या मालकीची बेटे किंवा कप्पे तरंगता कामा नये. आणखी हीही गोष्ट स्पष्ट आहे की, राजकीय एकजिनसीपणाची कोणतीही कसोटी लावली तरीदेखील अखेर सर्व नव्या घटकांच्या परिसरांत संमिश्र लोकवस्तीचे असे काही प्रदेश उरतीलच. हे लोकवस्तीचे भाग त्या त्या राजकीय घटकांतील अल्पसंख्यांकांच्या लोकवस्तीचे भाग म्हणून मानले गेले पाहिजेत. त्यांतील लोकवस्ती परकीय आहे व त्या कारणाने ज्या घटकाच्या चतुःसीमेत ती वसली आहे त्या घटकाच्या राजकीय अधिपत्याखाली ती येत नाही, असे मुळीच समजले जाणार नाही.

## सार्वमत व त्याचे स्वरूप

एखादा स्वतंत्र प्रांत बनविताना अगर एखादा लहान विभाग निकटवर्ती कोणत्या मोठ्या प्रांताशी जोडावयाचा हे ठरविताना त्या प्रदेशातील लोकांची इच्छा अजमावण्यासाठी 'सार्वमताच्या साधनाने जनमताचा कौल घ्यावा लागेल. तसेच एखादा लहान विभाग जोडण्याचे बाबतीत परस्परविरोधी मागण्या उद्भवल्यास तेथेही 'सार्वमत' उपयोजावे लागेल. राजकीय दृष्ट्या एकजिनसी असूनही जर एखादा विभाग वेगळा स्वतंत्र प्रांत होण्यास असमर्थ असेल तर तो लगतच्या मोठ्या प्रांताशी जोडावा लागेल. अशा वेळी हा विशिष्ट लहान विभाग शेजारच्या मोठ्या प्रांतापैकी कोणाशी जोडावा याबाबतीत खुद्द त्या भागातील रहिवाशांचेच एकमत नसेल तर या प्रश्नाचा निकाल त्या विशिष्ट विभागातील जनतेचे सार्वमत घेऊनच द्यावा लागेल. त्याचप्रमाणे ज्या भागांची आपला वेगळा स्वतंत्र प्रांत बनविला जावा अशी मागणी आहे, परंतु त्या बाबतीत त्या भागांतील लोकांमध्ये सर्वसाधारण स्पष्ट एकवाक्यता दिसून येत नसेल तर तेथेही अशाच रीतीने त्या भागांतील लोकांचे या प्रश्नावर सार्वमत घ्यावे लागेल.

नवीन भाषावार प्रांतांच्या निश्चित सरहद्दी ठरवितानाही सार्वमत घ्यावे लागेल. यापेक्षा दुसरी कोणतीही पद्धत प्रस्तुत बाबतीत अधिक योग्य व सोईस्कर असल्याचे आढळणे संभवनीय नाही. परस्परविरोधी पक्षांकडून आपल्या मागण्यांच्या निर्णयासाठी १९४१ सालच्या शिरगणतीसारखे पूर्वीच्या मोजदादीचे आधार—पुरावे—मान्य केले जाण्याचा संभव फारच थोडा आहे. दुसरे असे की, सरहद्दीवरील प्रदेशाच्या लोकसंख्येची विभागणी, तेथे प्रत्यक्ष राहणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणेच उत्तम होऊ शकते. अशा प्रकारे सार्वमत घेताना, ज्या पद्धतीने गेल्या काही दशकांत युरोप व इतर पाश्चात्य देशामध्ये सार्वमत घेतले गेले, तीच पद्धत आपण अनुसरावी हे चांगले. प्रथम दोन्ही विरोधी पक्षांना त्यांच्या त्यांच्या मतांप्रमाणे त्यांच्या त्यांच्या प्रदेशाच्या सीमा आखण्यास पाचारावे. नंतर एकापेक्षा अधिक प्रांतांच्या चतुःसीमेत सामील करून घ्यावा, अशा ज्या प्रदेशाबद्दल मागण्या होतील तो 'विवाद्य' अगर 'वादातील प्रदेश' म्हणून समजला जाईल. अर्थात हा प्रदेश सार्वमताने जी नक्की सीमा ठरविली जाईल त्या सीमेच्या दोन्ही बाजूंना असणार. याच सरहद्दीवरील पट्ट्यांत सार्वमत घेतले जाईल. जमीन महसुलाचा गाव म्हणजे मुख्य गाव व त्याखाली काही वाड्या असल्यास तोही सर्व प्रदेश, हे, सार्वमताचा निर्णय ग्रथित करताना व सीमारेषा ओढताना प्रारंभिक

अविभाज्य प्रमाण (बेसिक युनिट) धरले जाईल. सार्वमतानंतर, प्रत्येक घटक प्रांताची सरहद्द सलग व अखंडित असली पाहिजे या तत्त्वास धरून आणि लोकमतास शक्य तितके अनुसरून सीमारेषा ओढल्या जातील. म्हणजेच सीमारेषा आखताना जास्तीत जास्त मतदारांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल. यावेळी हे गृहीत धरले आहे की संघराज्याच्या घटनेमध्ये, पुढील अनुभवाच्या अनुषंगाने, प्रांतांच्या सरहद्दीमध्ये वा दर्जामध्ये काही फेरबदल आवश्यक वाटल्यास तो करण्याची सवलत ठेवली जाईल.

जमीन महसुलाचा गाव हे प्रारंभिक अविभाज्य प्रमाण मानून सार्वमत घेण्याची पद्धत ज्या ठिकाणी सरहद्द अरण्य, ओसाड वाळवंट अशाप्रकारच्या निर्मनुष्य भूभागांतून जात असेल त्या ठिकाणी निरुपयोगी ठरेल. अशा प्रसंगी नद्यांचे प्रवाह, जलसंचय इ. भौगोलिक रचना लक्षात घेऊन सीमारेषा ठरविल्या जातील. जर अशा निर्जन पट्टयांत बहुमोल खनिज व उद्भिज्ज संपत्ती प्राप्त वा सुप्त असेल तर मात्र सीमानिर्णयाचा प्रश्न फार बिकट होईल. अशा वेळी त्या प्रदेशाच्या भौगोलिक, समाजशास्त्रीय अशा विविध अंगोपांगांची सूक्ष्मपणे सविस्तर चिकित्सा करूनच सीमांची आखणी पार पाडावी लागेल. तुर्कस्तान आणि इराण यांच्या दरम्यान मोसल प्रांताची वाटणी करताना असा प्रसंग आला होता. ते उदाहरण अशा वेळी उद्बोधक ठरेल.

सार्वमत घेताना, मताधिकारी लोक कोण याचा निर्णय करताना काही प्रश्न उपस्थित होतील. सरहद्दीवरील सार्वमतात येथील वास्तव्याबाबतची मतदाराची लायकी ठरविताना काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. राजकीय एकात्मतेच्या निकषाप्रमाणे एकादा विभाग अगर लोकवस्ती एका विशिष्ट राजकीय घटकात स्पष्टपणे मोडत असताना, ज्यावेळी त्या घटकापासून फुटून निघण्याचा तो विभाग आग्रह धरीत असेल त्यावेळी 'रहिवाशी' शब्दाची व्याख्या फारच दक्षतेने केली पाहिजे. अशा वेळी या एकजिनसी राजकीय घटकाचे जे खरेखुरे रहिवाशी असतील व तसे निष्ठापूर्वक मानत असतील त्यांनाच केवळ हा मतदानाचा हक्क आहे असे गृहीत धरले पाहिजे. जे त्या विभागाचे रहिवाशी नाहीत अगर जे तसे समजत नाहीत त्यांना तो हक्क असता कामा नये. जी लोकसंख्या तेथे स्थायिक नसून उपरी आहे तिला एकात्म असलेला प्रदेश दोन घटकांत विभागावा किंवा काय हे ठरविण्याचा बिलकूल अधिकार नाही.

## सारांश

(१) विद्यमान प्रांतापेक्षा राजकीय दृष्ट्या अधिक एकजिनसी असे नवे प्रांत निर्माण करताना 'राजकीय एकात्म'तेचे निकष ठरविणे ही पहिली पायरी होय.

(२) स्पष्ट राजकीय एकात्मता असलेल्या घटकांचा एक स्वतंत्र प्रांत होण्यासाठी लोकसंख्या व उत्पन्न यांची आवश्यक किमान मर्यादा निश्चित करणे, ही दुसरी पायरी होय.

(३) ज्या घटकांकडून ही किमान मर्यादेची अट पुरी होत नाही त्यांना शेजारच्या विवक्षित घटकांशी संलग्न करणे, आणि त्यानंतरचा त्यांचा दर्जा स्पष्ट करणे, ही तिसरी पायरी.

(४) राजकीय एकात्मता असलेले काही घटक, त्यांचा एकच प्रांत करण्याच्या दृष्टीने जर फार मोठे होत आहेत असे वाटले तर राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठी त्यांना एकाहून अधिक प्रांतात विभागावे.

(५) एकात्म राजकीय घटकांतून फुटून विभक्त निघावयाच्या मागणीसंबंधीचा निर्णय, प्रांतिक घटकाचा बरोबर आकार केवढा असावा ह्यासंबंधी जे धोरण ठरेल त्यावर अवलंबून राहील. काही आर्थिक व राजकीय कसोटी ठरवून त्या अनुरोधानेच अशा प्रत्येक मागणीचा स्वतंत्र विचार करून निर्णय घ्यावा लागेल.

(६) सरहद्दीची निश्चिती व राजकीय एकात्म घटकातून फुटून वेगळे होण्याचा हक्क पोचतो की नाही, या गोष्टी 'सार्वमत' घेऊनच ठरविल्या जातील.

(७) नवीन होणाऱ्या प्रांताच्या क्षेत्रविस्तारातील सर्व प्रदेश सलग व एकत्र असला पाहिजे व त्याची सरहद्द अभंग व अखंडित असली पाहिजे.

(८) घटकामध्ये प्रदेश विभागण्यासाठी अशी तत्त्वपद्धती शोधून काढली पाहिजे की, कोणत्याही एका प्रदेशाची अगर लोकवस्तीची एकापेक्षा अधिक घटकांमध्ये वाटणी होता कामा नये अथवा कोणत्याच घटकांमध्ये वाटला गेला नाही असा प्रदेश उरता कामा नये.

(९) एका प्रांताच्या चतुःसीमेत सामावलेला सर्वच्या सर्व प्रदेश त्या प्रांताचाच असला पाहिजे.

(१०) सरहद्द निश्चित करताना, तात्पुरत्या काल्पनिक सरहद्दीच्या उभय बाजूंचे विवाद्य असे भूप्रदेशाचे पट्टे कोणते ते प्रथम ठरवून नंतर त्या विवाद्य भूप्रदेशांत 'सार्वमत' घेऊन सीमारेषा नक्की केली पाहिजे.

(११) जमीन महसुलाचा गाव हा एक अविभाज्य गट समजून सार्वमताचा निकाल ग्रथित केला जाईल व जास्तीत जास्त मतदारांच्या इच्छा परिपूर्ण होतील अशा रीतीनेच सीमारेषा काढली जाईल.

## २

### उपप्रांताचे सत्ताधिकार

संघराज्यामधील प्रांताचा दर्जा व प्रांतातील उपप्रांताचा अगर एखाद्या स्थानिक सत्तेचा दर्जा यांमध्ये महत्त्वाचा घटनात्मक फरक आहे. प्रांताचे सत्ताधिकार कोणत्याही वरिष्ठ घटनात्मक सत्तेपासून निर्माण होत नसून ते स्वयंसिद्ध असतात; संघराज्याची लिखित घटना हेच त्यांचे प्रत्यक्ष उगम स्थान. उलटपक्षी उपप्रांतास वा अन्य स्थानिक विभागास प्राप्त होणारे सत्ताधिकार हे प्रांतिक विधिमंडळाने आपल्या कायद्याने त्यांना बहाल केलेले असतात. अर्थात संघराज्याच्या प्रत्येक घटक प्रांताचे सर्व प्रांतासाठी म्हणून विवक्षित हक्क व सत्ता असणारे असे एकच कायदेमंडळ असले पाहिजे. त्याबरोबरच आपल्या प्रांतामध्ये स्वायत्त घटक निर्माण करून त्यांच्याकडे काही सत्ताधिकार सोपविण्याचा हक्कही त्यांस असला पाहिजे. सर्व प्रांताचे कायदेमंडळ असले म्हणजे त्याबरोबर सर्व प्रांतासाठी कार्यकारी मंडळही ओघानेच आले. तसेच वरिष्ठ सरकारी नोकरीतील भरती, सध्याच्या 'अखिल भारतीय नोकरी' (ऑल इंडिया सर्व्हिसेस) प्रमाणे, सर्व प्रांतासाठी म्हणून केली जाणे अवश्य आहे. त्याचप्रमाणे सर्व प्रांताकरिता म्हणून एकच वरिष्ठ न्यायालय असले पाहिजे. तज्ज्ञ नोकरवर्ग, संशोधन संस्थांसारख्या विशेष संस्था प्रांतिक सरकारच्या अधिकारकक्षेतीलच असल्या पाहिजेत. सर्व प्रांताचा गव्हर्नर हा एकच सत्ताप्रमुख असला पाहिजे. प्रत्येक उपप्रांतासाठी एक डेप्युटी गव्हर्नर नेमणे हे योग्य वाटेल व तो गव्हर्नरच्या त्या विशिष्ट उपप्रांतातील अनुपस्थितीत त्याचे काम करील. कायदे करण्याच्या क्षेत्रात सर्व प्रांताच्या कायदेमंडळाला आर्थिक, सामाजिक इत्यादी सर्व बाबतींत व्यापक व सर्वश्रेष्ठ स्वरूपाचे अधिकार असले पाहिजेत हे स्पष्टच आहे. सर्व प्रांतांसाठी म्हणून दिवाणी व फौजदारी कायदे एकच राहतील. तसेच औद्योगिक व व्यापारी क्षेत्रातील कायदेकानूनही एकच राहतील. आर्थिक नियोजनास आवश्यक असे सर्व अधिकारही प्रांताकडेच राहातील. तसेच शेती व पिके यांच्या नियोजनाचे अधिकारही प्रांताकडेच राहतील. प्रमुख सामाजिक संस्थांचे संचलन व नियमन प्रांताकडेच राहील व सामाजिक कायद्यांच्या स्थूल रूपरेषांची आखणीही प्रांतच करील.

उपप्रांतांना कोणते अधिकार सुपूर्त करता येतील ह्याचा तपशीलवार विचार करण्यापूर्वी संघराज्य सरकार व त्याचे घटक प्रांत सरकार यांमध्ये कशी सत्ताविभागणी झाली आहे, हे पाहणे जरूर आहे.

नव्या हिंदी संघराज्य घटनेतील या सत्ताविभागणीची निश्चित माहिती आज नसल्याने सध्या आपणांस १९३५ च्या हिंदुस्थान सरकारच्या घटना कायद्याच्या सातव्या कोष्टकात कायदे करण्याचे अधिकाराबाबत ज्या याद्या दिल्या आहेत त्यांचा उपयोग करावा लागेल. या कोष्टकांतील पहिली यादी, म्हणजे संघराज्य सरकारच्या कक्षेतील जे कायद्याचे विषय प्रांतिक सरकारकडे देता येतील त्यांची यादी, तीमधील सर्व अधिकार प्रांतिक सरकारकडेच असावेत. तसेच संघराज्य सरकार व प्रांतिक सरकार या उभयतांच्याही कक्षेत येणारे असे याच कोष्टकातील तिसऱ्या यादीतील सर्व अधिकार, हेही प्रांतिक सरकारकडेच असावेत. प्रांताच्या कक्षेतील कायद्यांच्या यादीतील म्हणजे याच कोष्टकातील दुसऱ्या यादीतील बरेच विषय उपप्रांत सरकारकडे देता येतील. जे प्रमुख अधिकार उपप्रांताकडे सोपविणे शक्य आहे त्या विषयांची यादी पुढीलप्रमाणे होईल.

(१) सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था.
(२) प्रांतिक वरिष्ठ न्यायालयाखेरीज इतर सर्व न्यायालयांवरील देखरेख व सत्ता.
(३) पोलिस.
(४) तुरुंग व अल्पवयी गुन्हेगारांच्या सुधारणा-शाळा.
(५) स्थानिक कामे.
(६) स्थानिक स्वराज्यसंस्था.
(७) सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता.
(८) प्राथमिक व दुय्यम शिक्षण. तसेच या इयत्तेपर्यंत दिले जाणारे औद्योगिक व धंदेशिक्षण.
(९) उपप्रांतांची म्हणून ठरविलेली वाहतूक व दळणवळणाची साधने.
(१०) लहान पाटबंधारे.
(११) शेती-संशोधन व पिकांचे नियोजन या व्यतिरिक्त शेतीविषयक कामे.
(१२) जमीन व खंडपद्धती.
(१३) स्थानिक बाजार व जत्रा.
(१४) धर्मादाय व धर्मादाय संस्था.
(१५) नाटयगृहे व नाट्यप्रयोग.
(१६) उपप्रांतांची वाचनालये व पदार्थसंग्रहालये.

१९३५ च्या घटना-कायद्यातील प्रांतांच्या कक्षेतील कायद्यांच्या यादीपैकी जे प्रमुख विषय प्रांताकडेच असणे जरूर आहे ते पुढीलप्रमाणेः—

(१) मोठी धरणे व पाटबंधारे.
(२) शेतीसंशोधन व पिकांचे नियोजन.
(३) खाणी व खनिज संपत्ती.
(४) गॅस, वीज इत्यादी शक्तींची निर्मिती व वाटणी.
(५) उद्योगधंदे व व्यापार, सावकारी व सावकारी करणारे (संस्था व व्यक्ति).
(६) कारखाने व त्यांची वाढ.
(७) वजने–मापे.
(८) बेकारी, अनाथांना मदत व सामाजिक सुरक्षा.
(९) औद्योगिक व व्यापारी संघ आणि मंडळ्या (कंपनी)
(१०) चित्रपट व्यवसाय
(११) विद्यापीठ व त्या दर्जाचे उच्च शिक्षण.

यावरून हे दिसून येईल की दैनंदिन राज्यकारभाराचे बहुतेक सारे काम या वाटणीमुळे उपप्रांताकडे जात आहे व प्रामुख्याने लहान प्रदेशाशी संबद्ध असलेले सर्व विषयही त्याचेकडे जात आहेत. पद्धतशीर कामाच्या व काटकसरीच्या दृष्टीने शक्य तितक्या मोठ्या क्षेत्रावर जे विषय हाताळणे जरूर आहे व ज्यांचे परिणाम दूरगामी व व्यापक संभवतात तेवढेच विषय प्रांतिक सरकारकडे ठेवले आहेत. तथापि प्रांताच्या कक्षेतील पुष्कळशा विषयांचा प्रत्यक्ष कारभार स्वतंत्र प्रांतिक नोकरवर्गाकडून न करता उपप्रांत सरकारच्या मध्यस्थीने करता येण्यासारखा आहे.

राज्यकारभाराच्या सर्व शाखांतील वरिष्ठ प्रतीच्या नोकरवर्गाची भरती 'प्रांतिक सरकारचा नोकरवर्ग' म्हणून केली जाणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्याने एकापेक्षा अधिक उपप्रांतांत नोकरी केली पाहिजे. त्यामुळे उपप्रांताच्या अधिकारकक्षेतील विषयाची यादी मोठी असली तरी देखील, उपप्रांतांमध्ये राज्यकारभारविषयक कल्पनांची परस्परांत देवघेव होऊन राज्यकारभाराच्या पद्धतीत बरीचशी समानता येईल.

कायदेविषयक व राज्यकारभारविषयक बाबींच्या विभागणीपेक्षा उत्पन्नविषयक बाबींची विभागणी करताना अनेक अडचणी निर्माण होतील. जमीन-महसूल, शेती-उत्पन्नावरील प्रत्यक्ष कर, दिवाणी स्टँपांचे उत्पन्न आणि कदाचित करमणुकीवरील कर, यांचे उत्पन्न उपप्रांतांना देणे शक्य आहे. इतर बहुतेक करांच्या बाबतीत ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे की, बऱ्याच मोठ्या प्रदेशांत करांची समानता असली पाहिजे आणि कोणत्याही दोन उपप्रांतांत करांच्या आकारणीत व अंमलबजावणीत तफावत पडू न देण्याची दक्षता घेतली पाहिजे. अबकारी कर, शेती उत्पन्नाखेरीज अन्य उत्पन्नावरील प्रत्यक्ष कर, औद्योगिक संघ (कार्पोरेशन) व मंडळ्या (कंपन्या) यांवरील कर, वारसाकर, खाणी व खोदण्याच्या हक्कावरील कर आणि विक्रीकर, हे सर्व कर असे आहेत की, त्यांच्या दरांमध्ये, आकारणीच्या पद्धतीमध्ये व अंमलबजावणीमध्ये दोन उपप्रांतांत फरक असू नये. उपप्रांतांना दिलेली उत्पन्नाची साधने त्यांच्या गरजा भागविण्यास अपुरी आहेत असे आढळून आल्यास प्रांतिक स्वरूपाच्या करांतील काही करांचा हिस्सा या उपप्रांतांना देण्यात येईल.

प्रांताची एकात्मता अबाधित राखून उपप्रांताचे अधिकारक्षेत्र वरीलप्रमाणे जास्तीत जास्त विस्तारता येईल. परंतु, प्रांतामध्ये जेवढे म्हणून राज्यकारभारविषयक उपविभाग केले असतील त्या प्रत्येकाला हे सर्व अधिकार देणे जरूर आहे असे मुळीच नाही. सध्या भावी महाराष्ट्राचे—संयुक्त महाराष्ट्राचे—पुढीलप्रमाणे उपप्रांत होऊ शकतील असे दिसते. (१) पूर्व महाराष्ट्र (२) पश्चिम महाराष्ट्र (३) बृहन् मुंबई (४) कोल्हापूर. कोल्हापूर विभागात लगतच्या संस्थानी प्रदेशाचाही समावेश होऊ शकेल. इतस्ततः विखुरलेल्या लहान लहान संस्थानांचा कार्यक्षम असा एक संघ करणे शक्य होणार नाही म्हणून अशा लहान लहान संस्थानांना ज्या मोठ्या प्रांतात ती आहेत त्यातच मिळून जावे लागेल. भावी महाराष्ट्रात जर बस्तर संस्थान समाविष्ट झाले तर कोल्हापूरप्रमाणे त्याचाही एक स्वतंत्र उपप्रांत होऊ शकेल. आणि जर गोमंतक महाराष्ट्रात आले तर गोमन्तक, व त्या उपप्रांतात सामील होण्याची ज्यांची इच्छा आहे असा त्यालगतचा कोकणी भाषिकांचा भाग यांचाही एक लहान उपप्रांत बनविता येईल. वर वर्णन केलेले उपप्रांताचे संपूर्ण सत्ताधिकार फक्त पूर्व व पश्चिम महाराष्ट्र या दोन मोठ्या घटकांनाच द्यावेत. उत्पन्नाच्या व लोकसंख्येच्या दृष्टीने लहान असलेल्या इतर उपप्रांतांनी, वर उपप्रांताच्या अधिकारक्षेत्रातील विषयांची जी यादी दिली आहे त्यांपैकी बरेच विषय प्रांतिक सरकारच्या सत्तेकडेच सोपविणे सोईस्कर होईल.

*संयुक्त महाराष्ट्र परिषद*, प्रकाशन, ५ (पुणे, १९४६).

☆

# ३ . . भारतीय राज्यघटना संघराज्यघटना आहे काय ?

हिंदी राज्यघटनेच्या यथार्थ स्वरूपाचे समारोपादाखल वर्णन करीत असता डॉ. आंबेडकर यांनी 'आपली नवीन घटना संघराज्याच्या-(फेडरल) पेक्षा एकमुखी (युनिटरी) अधिक आहे' या आक्षेपास उत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मुख्यतः दोन मुद्दे मांडले. संघराज्य घटनेचे वैशिष्ट्य असे असते की, संघराज्य सरकार व घटकराज्य सरकारे यांच्या दरम्यान कायदेविषयक अंमलबजावणीविषयक आणि आर्थिक क्षेत्रांत विभागणी मूळ घटनेतच केलेली असते. आणि ती एकतर्फी बदलता येत नाही. डॉ. आंबेडकर यांच्या मते हिंदी राज्यघटनेत अशा प्रकारची विभागणी केलेली असून प्रांतिक अर्थात घटकराज्य सरकारचे क्षेत्र पूर्णपणे संरक्षित आहे. निरनिराळ्या क्षेत्रांची विभागणी विशिष्ट प्रमाणात केली आहे, म्हणजे संघराज्य व प्रांत यांस विशिष्ट बाबतीत कमी अगर अधिक अधिकार दिलेले आहेत, यावरून घटना संघराज्याची आहे, किंवा एकमुखी आहे हे ठरत नाही. जोपावेतो अधिकारक्षेत्र-विभागणी घटना कायद्यातच निश्चित आहे, तोपावेतो प्रांतिक सरकारचे अधिकार अल्प वाटले तरी घटनेस एकमुखी म्हणता येणार नाही, हा डॉ. आंबेडकर यांचा मुद्दा ग्राह्य समजला पाहिजे.

## राज्यपालाच्या नेमणूकीचा प्रश्न

परंतु डॉक्टरसाहेबांनी हिंदी राज्यघटनेतील काही टीकास्पद विशिष्ट कलमांचे जे समर्थन करण्याचा प्रयत्न केला ते समर्थन विचारी माणसास पटण्यासारखे नाही. हिंदी राज्यघटनेच्या टीकाकारांनी ही घटना फेडरल नाही असे म्हणताना दोन-तीन विशिष्ट मुद्द्यांचा उल्लेख केलेला आहे. हिंदी राज्य-घटनेत प्रांतांचा प्रमुख राजपाल हा संघ-राज्याचा प्रमुख जो राष्ट्रपती त्याने नियुक्त करावयाचा आहे. अशा तऱ्हेची योजना कोणत्याही लोकसत्ताक संघराज्य घटनेत आढळून येत नाही. कॅनडामध्ये या सारखी योजना आढळते; परंतु कॅनडाच्या गव्हर्नर जनरलचे गव्हर्नर नेमण्याचे अधिकार हे त्याच्याकडे ब्रिटिश राज्याचा प्रतिनिधी म्हणून आलेले आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे. कॅनडा व ऑस्ट्रेलिया यांच्या संघराज्य घटना या एका राजसत्ताक साम्राज्यात अंतर्भूत असलेल्या राज्यांच्या घटना होत. यांतील सर्व राज्याधिकार तत्त्वतः राजाच्या हाती केंद्रित आहेत. असे असले तरी ऑस्ट्रेलियातील गव्हर्नर नेमणे हे राजा प्रांतामधील मुख्य प्रधानाच्या सल्ल्यानुसारच करतो. हिंदी राज्यघटनेत राष्ट्रपतीचे स्थान अगर अधिकार हे ब्रिटिश साम्राज्यातील राजाचे स्थान अगर अधिकार यांच्या बरोबरीने मानता येत नाहीत. तेव्हा गव्हर्नर नेमण्याचा प्रेसिडेंटला दिलेला अधिकार हा १९३५ च्या कायद्याच्या अंधानुकरणाचा परिणाम आहे असे जरी मानले नाही, तरी फेडरल घटनेच्या मूल तत्त्वास तो अंशतः तरी बाध आणतो असे कबूल करणे प्राप्त आहे.

## सार्वराष्ट्रीय करार, तह व धोरणे

अशाच प्रकारचा दुसरा तपशिलाचा मुद्दा म्हटला म्हणजे सार्वराष्ट्रीय तह, करार, धोरणे इत्यादींच्या अंमलबजावणीबाबत संघराज्य सरकारास दिलेल्या अधिकाराचा होय. एकदा कायदेकानू करण्याबाबत किंवा अंमलबजावणीबाबत क्षेत्रविभागणी निश्चित झाली म्हणजे कोणत्याही सबबीदाखल त्यात फेरबदल होता कामा नये. या मूल सिद्धांताचे उल्लंघन या विशिष्ट कलमाने केलेले आहे. परराष्ट्राशी केलेले तह किंवा करार अगर सार्वराष्ट्रीय परिषदात झालेले ठराव यांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार संघराज्य सरकारकडे असावे असे म्हणणे साहजिक व साधे वाटते. परंतु हे तह अगर करार आणि सार्वराष्ट्रीय परिषदात चर्चिले जाणारे विषय यांचा विचार केला म्हणजे संघराज्य घटनेत निर्माण होणाऱ्या अडचणींचे स्वरूप लक्षात येईल. घटनेतील क्षेत्रविभागणी-याद्यांच्या अन्वये शिक्षण, व्यापार, शेती यांसारख्या सर्वसाधारणपणे प्रांतिक सरकारच्या अधिकारात पडणाऱ्या बाबींबाबतही सार्वराष्ट्रीय परिषदात अनेक ठराव वारंवार होत असतात. या ठरावांची भाषा पुष्कळ वेळा मोघम स्वरूपाची असून त्यांचे क्षेत्रही फार व्यापक असते. यामुळे सार्वराष्ट्रीय परिषदेत केलेल्या ठरावांच्या अंमलबजावणीकरिता म्हणून कोणत्याही विवक्षित क्षेत्रात आपले मत प्रांतिक सरकारवर लादण्याचा अधिकार संघराज्य सरकारास प्राप्त होण्याचा या कलमामुळे संभव उत्पन्न झाला आहे. संघराज्य सरकार व प्रांतिक सरकार यांतील निश्चित व एकतर्फी न बदलू शकणारी अधिकार-क्षेत्रविभागणी हा संघराज्यघटनेचा आत्मा मानला पाहिजे, हे मत डॉ. आंबेडकर यांसही मान्य असावेसे दिसते. परराष्ट्रीय तह व सार्वराष्ट्रीय ठराव यांच्या अंमलबजावणीच्या मिषाने राज्यघटनेत नमूद केलेल्या अधिकारक्षेत्राचे अतिक्रमण करण्याचे सर्वसाधारण अधिकार संघराज्य सरकारला हिंदी राज्यघटनेत दिलेले आहेत. हे अधिकार संघराज्यघटनाशास्त्रात बसू शकत नाहीत, असे टीकाकारांचे म्हणणे आहे. त्यास डॉ. आंबेडकर यांनी अगर इतर कोणीही नीटसे उत्तर दिलेले नाही.

## आकस्मिक संकटकालातील अधिकार

हिंदी राज्यघटना संघराज्याची आहे किंवा नाही, ही शंका उपस्थित करणाऱ्यांच्या डोळ्यांपुढे मुख्यतः घटनेतील आकस्मिक संकटकालाबाबतची (इमर्जन्सी) कलमे असतात. यांतील सर्व अधिकार संघराज्याचा राष्ट्रपती आणि संघराज्याचे कायदेमंडळ यांस दिलेले आहेत. आकस्मिक संकटकाल जाहीर करणे अगर न करणे हे केवळ राष्ट्रपतीवर अवलंबून असून आकस्मिक संकटकालाबाबतची व्यवस्था चालू ठेवण्याबाबतचे पूर्ण अधिकार संघराज्याच्या कायदेमंडळाला दिलेले आहेत. आकस्मिक संकटकाल जाहीर झाला म्हणजे राज्यघटनेचा सर्व प्रांतिक भाग रद्द करण्याचे अधिकार राष्ट्रपती व संघराज्य कायदेमंडळ यांस प्राप्त होतात. प्रांतिक सरकारच्या कायदेकानूविषयक क्षेत्रांत शिरून कोणतेही कायदे करणे, प्रांतिक सरकारला कोणतेही कृत्य करण्यास भाग पाडणे व आपल्या क्षेत्रात पूर्वी नसलेले कोणतेही कर वगैरे लादणे, हे सर्व आकस्मिक संकटकालात संघराज्य सरकारला करता येते. अशा प्रकारची कोणत्याही प्रकारची योजना आज अस्तित्वात असलेल्या एकाही संघराज्य घटनेत नाही. या मूलग्रामी, विस्तृत व एकांगी सत्तेचे डॉ. आंबेडकर यांनी केलेले समर्थन फारच लंगडे आहे. कोणत्याही घटनेकडे, अगर घटनाशास्त्राच्या तत्त्वाकडे बोट दाखवता न आल्यामुळे डॉ. आंबेडकर यांनी 'राउंडटेबल' मधील एका लेखाच्या उताऱ्याचा आधार घेतलेला आहे. या उताऱ्यातही अस्तिपक्षी विधान काहीच केलेले नसून आणीबाणीच्या प्रसंगी अंतिम निष्ठेचे स्थान निश्चित करणे आवश्यक होते व क्वचित प्रसंगी संघराज्य व त्याची घटकराज्ये यांच्या दरम्यान परस्पर

निष्ठा विरोधी दिसण्याचा संभव असतो, एवढेच त्यात निदर्शित केले आहे. उताऱ्यातील हा मुद्दा नवीन नाही.

## संघराज्य कल्पनेवर घाला

निरनिराळ्या संघराज्यांच्या इतिहासांत असे प्रसंग अनेक वेळा उद्भवले आहेत. अमेरिकन यादवीचा उगम असल्या प्रकारच्या विरोधाभासातच होता. असा विरोध कधी काळी येऊ शकतो ही गोष्ट जरी सर्वमान्य असली तरी याकरता फेडरल घटनाच मूलतः रद्द करण्याचे अधिकार फेडरल सरकारास असावे असा दावा आजवर कोणी केल्याचे आमच्या ऐकिवात नाही. 'राउंड टेबल' मधील लेखकाचा असा दावा नव्हता. प्रत्येक राज्यघटनेत काही अडचणी घटनेच्या मूळ स्वरूपातच अभिप्रेत मानल्या पाहिजेत. एकजिनसी, एकमुखी नसलेल्या समाजास किंवा निरनिराळ्या प्रादेशिक समूहांस एका राज्यघटनेत स्वेच्छेने किंवा किमान स्वायत्तता राखून एकत्र आणणे, हाच संघराज्य घटनेचा विशेष होय. निष्ठा-विरोध होण्याचा संभव म्हणूनच राज्यघटनेचे स्वरूप एकमुखीच्या ऐवजी संघराज्याचे करावे लागते. तेव्हा विरोधाचा संभव आहे म्हणून राज्यघटनेचे संघराज्य स्वरूप बदलण्याचा अधिकार केंद्रीय सरकारला द्यावा असे म्हणणे म्हणजे फेडरल राज्य-घटनेचा मूल स्वभाव न जाणण्यासारखे आहे. डॉ. आंबेडकर यांनी स्वतःच आपल्या समर्थनाच्या पहिल्या भागात संघराज्य व प्रांत यांमधील अधिकार-विभागणी एकतर्फी बदलता न येणे हे संघराज्य घटनेचे वैशिष्ट्य आहे, असे कबूल केले आहे. आकस्मिक संकटकालीन अधिकाराच्या दुसऱ्या भागात समर्थन करताना त्यांस या मध्यवर्ती मुद्द्याकडे पूर्ण दुर्लक्ष करावे लागले आहे. यावरूनच भारताच्या राज्यघटनेतील आकस्मिक संकटकालातील खास अधिकारांच्या या अभूतपूर्व अशा योजनेमुळे मूळ संघराज्यकल्पनेवरच हिंदी राज्यघटनाकारांनी घाला घातला असे म्हणणाऱ्यांस राज्यघटनेच्या प्रमुख निर्मात्याजवळही समर्पक उत्तर नाही, हे उघड दिसत आहे.

*केसरी*, २७–१–१९५०.

☆

# ४ . . लोकमान्य टिळकांची चतुःसूत्री

"स्वराज्य आम्हांस साध्य आहे व स्वदेशी चळवळ, बहिष्कार-योग आणि राष्ट्रीय शिक्षण ही स्वावलंबनाची सदर हेतु सिद्धीस नेण्यास तीन मोठी साधने आहेत." कलकत्ता येथे दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रीय सभेत लोकमान्यांनी ही चतुःसूत्री मांडली. राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व बहिष्कार ह्याचा पुरस्कार १९०५ सालापासून ते करीत होते. १९०८ साली तुरुंगात जाईपावेतो त्यांच्या सर्व चळवळींचा व लिखणाचा भर या चतुःसूत्रीवरच होता. या चतुःसूत्रीतील साधनत्रयीचे व साध्याचे स्वरूप काय होते हे प्रथम टिळकांच्या शब्दांतच पाहू. पं. मदन मोहन मालवीय यांनी पुरस्कारिलेल्या राष्ट्रीय युनिव्हर्सिटीच्या कल्पनेस अनुलक्षून टिळक लिहितात :—

"सरकारने आमच्या देशात शांतता राखली आहे खरी, पण उद्योगधंद्याच्या किंवा इतर बाबतींत आमच्या देशाचे हित होईल, अशा प्रकारच्या शिक्षणापासून त्यांनी आम्हांस जाणूनबुजून बहिष्कृत केलें आहे. सरकारी शाळातून जें शिक्षण मिळतें तें हुषार पण नेभळे नोकर तयार करण्याकरिता आहे. राष्टीय शील, उमेद किंवा उद्योग वाढविण्याकरिता नाहीं हें आम्ही अनेक प्रसंगी सांगितले आहे. वास्तविक म्हटले म्हणजे हे काम खाजगी शाळांनी करावयास पाहिजे. पण त्याही शाळा सरकारनें आपल्या कह्यांत घेतल्या आहेत. तेव्हां आतां अगदी स्वतंत्र व सरकारच्या कधीही कह्यांत न जाणारी युनिव्हर्सिटी काढल्याखेरीज गत्यंतरच नाहीं असें झालें आहे."

## स्वदेशीचा पुरस्कार

स्वदेशीचा, विशेषतः स्वदेशी कापडाच्या वापराचा जोरदार पुरस्कार टिळकांनी प्रथमपासूनच केला होता. हिंदी गिरण्यांच्या पैदाशीवर लादलेल्या जकातीस अनुलक्षून 'यापेक्षा जास्त अन्याय तो कोणता' या लेखात टिळक लिहितात. "हिंदुस्थानचें राज्य हिंदुस्थानच्या कल्याणाकरिता चालवावयाचें आहे, मँचेस्टरचे कल्याणाकरितां नाहीं. ही गोष्ट प्रत्येकाच्या अंतःकरणांत बिंबून त्याप्रमाणें त्यानें आचरण करावयास पाहिजे. सरकारनें जरी अन्याय केला तरी त्याचा प्रतिकार करणें कांहीं अंशीं तरी तुमच्या स्वाधीन आहे. तो प्रतिकार कोणता म्हणाल तर सर्वांनीं देशी कपडा वापरावयास लागावें हा होय." स्वदेशी मालाचे उत्पादन पुरेसे नाही, तो महाग पडतो, इत्यादी स्वदेशावरील आरोप टिळकांनी मुद्देसूदपणे यावेळेस आणि पुढे खोडून काढले. पण स्वदेशी चळवळीस खरा जोर तिला बहिष्काराची जोड मिळाली तेव्हाच चढला. बहिष्काराचा उगम वंगभंगाविरुद्ध बंगाल्यात सुरू झालेल्या चळवळीत झाला, आणि लोकमान्यांच्या विचाराची दिशा प्रथमपासून असल्या प्रतिकारात्मक स्वावलंबी मार्गास अनुकूल असल्यामुळे त्यांनी बहिष्कारास तावडतोब जोराचा पाठिंबा दिला. १९०५

ऑगस्टमधील 'राष्ट्रीय बहिष्कार' या लेखात टिळक लिहितात :—

"प्रजा कितीहि दुर्बळ असली तरी धैर्यानें, जुटीनें आणि निश्चयानें अरेरावी राज्यकर्त्यांस शस्त्राविणही ती भारी होते ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. राज्यकर्त्याविरुद्ध बंड करणें गैरकायदा आहे किंबहुना गुन्हा आहे, पण बहिष्काराचा तसा प्रकार नाहीं. राज्यकर्त्यांपुढें आपली गाऱ्हाणीं सयुक्तिक रीतीनें मांडण्याचें सोडून द्या असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु नुसत्या विनवणीनें कार्यसिद्धि होत नाहीं, असा अनुभव आहे. सदर विनवणीस बहिष्काराची पुरवणी देऊन या जोडगोळीच्या बंदुकीनें आम्ही आपले इष्ट हेतु साध्य करून घेतले पाहिजेत. बंगाली लोकांच्या लक्षांत ही गोष्ट आतां पूर्णपणें येऊन चुकली आहे. व त्याप्रमाणेंच ते आज प्रयत्न करीत आहेत."

"विशेषतः करून महाराष्ट्रीयांनीं तर या प्रसंगीं बंगाली लोकांस अवश्य मदत केली पाहिजे. विलायती कापड न वापरतां देशी कपडा वापरावा, त्यांतच राष्ट्राचें हित आहे ही कल्पना प्रथमतः महाराष्ट्रांत निघाली, व पुण्यांत अद्याप असे पुष्कळ लोक आहेत कीं, ज्यांनीं सार्वजनिक काकांचें कंदी पागोटें आणि खादीचा अंगरखा पाहिलेला आहे. अर्थात पुणेकरांस किंवा महाराष्ट्रांतील लोकांस ही कल्पना नवी नाहीं. बंगाली लोकांनीं याच कल्पनेचा कांहीं निराळ्या तऱ्हेनें उपयोग करून घेण्याचें योजिलें आहे हें खरें आहे. पण विलायती मालास बहिष्कार घालण्याची युक्ति स्वरूपतः एकच असल्यामुळें बंगाली लोकांचें त्यांच्या निश्चयाबद्दल अभिनंदन करण्याकरितां आम्ही ठिकठिकाणीं सभा भरवून आपलें मत त्यांस कळवून धीर दिला पाहिजे."

## स्वराज्य आणि सुराज्य

ही तीन साधने झाली. या सर्व स्वावलंबी मार्गाने साधावयाचे, स्वराज्य. 'स्वराज्य' या विशिष्ट राजकीय ध्येयाची घोषणा प्रथम दादाभाई नौरोजी यांनी आपल्या १९०६ डिसेंबरच्या अध्यक्षीय भाषणात केली. कॉंग्रेसच्या ठरावात या शब्दाचा वापर तेव्हा केला गेला नाही. परंतु दादाभाईंनी अध्यक्षीय भाषणात शब्द वापरला एवढे टिळकांस पुरे होते. यापुढे सर्रास 'स्वराज्य' याच शब्दाने आपल्या राजकीय ध्येयाचा ते सारखा उल्लेख करू लागले. तत्कालीन परिस्थितीत त्यांना हवा असाच हा शब्द होता. याची व्याप्ती सांगण्यात, याची व्याख्या करण्यात त्यांनी पुष्कळ लिहिले. 'स्वराज्य आणि सुराज्य' या सुप्रसिद्ध लेखात दुसरा बाजीराव, हिंदी संस्थाने, तत्कालीन रशिया, जर्मनी व हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्य या सर्वांचे गुणदोष विवेचन करून खालील शब्दांत आपला निर्णय व्यक्त केला. "राज्यपद्धत नुसती शिस्तवार असल्याने कोणतेंही राज्य लोकांस सुखकर होत नाहीं. लोकांच्या तंत्रानें व त्यांच्या हिताकरितां तें राज्य चाललें पाहिजे, किंबहुना लोकांच्या तंत्रानें चाललें म्हणजे तें त्यांच्या हिताकरितां असतेंच असें म्हटलें असतां चालेल."

"खऱ्या स्वराज्याची म्हणजे ज्यांतील राज्यसत्ता प्रजेच्या हातांत आहे अशाची वाण केवळ व्यवस्थित राज्यानें अगर स्वदेशी राजा असल्यानेंही भरून येत नाहीं, आणि अशा प्रकारचें खरें स्वराज्य जर नाहीं तर व्यवस्थित सुराज्य किंवा स्वदेशी राज्य यांपैकीं कशानेंही लोकांस सुख होणार नाहीं. सर्वत्र जी चळवळ चालू आहे ती प्रजेचा पगडा राज्यकारभारावर असावा एवढ्याकरितांच होय. आम्हांसही तीच गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची आहे व स्वराज्यप्राप्तीकरितां झटा, म्हणून जेव्हां आम्ही लोकांस सांगतों तेव्हां याच अर्थानें 'स्वराज्य' शब्दाचा उपयोग करतों."

येणेप्रमाणे स्वराज्याची व्यापक व मार्मिक व्याख्या केली. पण एवढ्यावर टिळक थांबले असे नाही. पुढे स्वातंत्र्यवाद निघाला तेव्हा १९०८ सालीच त्यांनी स्वातंत्र्य हेच प्रत्येक राष्ट्राचे अंतिम ध्येय व स्वराज्य ही स्वातंत्र्याची पायरी असे निर्भयपणे प्रतिपादले. परंतु याजबरोबर आज स्वराज्य व स्वातंत्र्य

ही दोन्ही इतकी दूर आहेत की, त्याविषयी वाद वाढविणे शहाणपणाचे नाही, तुमच्यांतील भेद हेच सरकारचे कवच, तुमची दुर्बलता हेच त्यांचे बळ, तुमचे स्वतःबद्दलचे अज्ञान हेच त्यांचे सामर्थ्य. तुम्ही ओळखाल तर सर्व तुमचेच आहे—असा कळकळीचा उपदेश केला.

एवंच, अंतिम ध्येयास कोणतीच मर्यादा अगर इयत्ता मानण्यास टिळक तयार नव्हते. पण कार्यक्रमाचे, साधनांचे बाबतीत स्थिति-काल मर्यादा ते पूर्णपणे ओळखून होते. स्वत्व व स्वाभिमान रक्षण आणि स्वावलंबन यांचे धडे देत देत प्राप्त परिस्थितीत प्रयत्नांची जेवढी पराकाष्ठा शक्य दिसली तेवढी करविण्याचा त्यांचा सतत उद्योग होता.

## चतुःसूत्रीचे महत्त्व

चतुःसूत्रीचा कार्यक्रम आज फार नेमस्त वाटेल. चतुःसूत्रीचे महत्त्व समजण्यास त्या काळची परिस्थिती ध्यानात घेतली पाहिजे. टिळकांनी चतुःसूत्री बनविली व तिचा हिरीरीने प्रचार केला त्यावेळेस 'स्वराज्य' व 'बहिष्कार' हे शब्द उच्चारणे राजद्रोहाचे समजले जात असे; आणि हिंदी राजकीय पुढाऱ्यांपैकी बहुतेक मोठ्या वजनदार पुढाऱ्यांना या शब्दाचा वापर अनिष्ट व चतुःसूत्रीचा कार्यक्रम अव्यहार्य वाटत होता. एवढेच नव्हे तर स्वदेशी मालाचा वापर थोडी झीज सोसूनही करावा हे राष्ट्रीय सभेच्या ठरावात नमूद करण्यास दादाभाई अध्यक्ष असूनही प्रयास पडले. टिळकांचा त्यावेळचा मार्ग, चतुःसूत्री पुरस्काराचा मार्ग, धडाडीचा व धोक्याचा होता; त्यांनी किती मोठा धोका पत्करला होता हे पुढे लवकरच प्रत्ययासही आले. पण टिळकांचा मोठेपणा ते एक धाडसी पुढारी, यात नव्हता. आपले ध्येय बनविण्यात त्यांनी जे मूलगामी निदान केले व साधनांच्या योजनेत जो मुत्सद्दीपणा दाखविला, त्यांची चारित्र्यास व धैर्यास जोड मिळाल्यामुळे त्यांनी अलौकिक यश संपादिले.

परकी सत्ता हे आपल्या दुःखाचे मूळ व सर्वप्रकारचे स्वावलंबी मार्ग दृढनिश्चयाने चोखाळणे, त्याच्या निराकरणाचा एकमेव मार्ग या पायावर टिळकांच्या जीवितकार्याची उभारणी झाली. कालमानाप्रमाणे ध्येय व साधने यांच्या विवेचनात, फरक पडत गेला; सुरुवातीस ब्रिटिश राजनीतीत अजून थोडा विश्वास होता. परिस्थिती प्रतिकूल व लोकजागृती बिलकूल झालेली नाही म्हणून शब्दयोजना फार बेताने केली, पण विचाराचा गाभा प्रथमपासून एकच होता. १८९६ साली टिळकांनी ब्राम्हण व त्यांची विद्या या परीक्षण लेखमालेत हिंदी परिस्थितीचे निदान व त्यावरील उपाययोजना याबद्दल मूलभूत व साद्यंत विवेचन केले आहे. या लेखमालेचे सूत्र खालील वाक्यात आहे. "हिंदुस्थानातील सर्व" प्रांतांतील व सर्व जातींतील लोकांस सारखीच निकृष्टावस्था प्राप्त झालेली आहे; व त्याचे प्रधान कारण म्हणजे परराज्य होय, हे निदान झाल्यावर पुढे त्यांनी स्पष्ट सांगितले की, "परिस्थिती पालटण्याकरिता जें काही करावयाचें तें सर्व जातींकरिता व सर्व प्रांतांतील लोकांकरितां, त्यास बरोबर घेऊन त्यांच्या सहाय्यानेंच केलें पाहिजे." नंतर मूळ निदानाच्या अनुरोधाने उपाययोजना. "उत्साह, शौर्य किंवा कर्तबगारी दाखविण्याची हल्लीच्या राज्यांत सवड न राहिल्यामुळे जर आम्ही निःसत्त्व झालों असतों तर तशी सवड जेणेंकरून मिळेल असलेच उपाय आपणास योजले पाहिजेत." पण ही उपाययोजना तडीस जाण्यास मुख्य उणीव माणसांची, म्हणून सर्व तरुण मंडळींना टिळकांनी विनंती केली की त्यांनी "आपला देह देशाच्या कामीं खर्च करण्याचा संकल्प करून आपल्या जन्मांत कांहींतरी करून दाखवूं अशी बुद्धि मनांत बाळगून त्याप्रमाणें उद्योगास प्रवृत्त व्हावें." पण त्याचबरोबर हाही स्पष्ट इषारा दिला की, "या कामात यश येण्यापूर्वी आमचीं बरींच माणसें खर्ची पडतील हें आम्ही जाणून आहों; पण येथें राहून तीस कोटी प्रजेंत आणखी भर पाडण्यापेक्षां अशा रीतीनें देह ठेवण्याची वेळ आली तरीहि त्यांत यत्किंचितही वाईट वाटण्याचें

कारण नाहीं." ही १८९६ तील वृत्ती व विचार पुढे वाढले व दृढ झाले. १९०५ ते १९०८ ची चतुःसूत्री या विचाराचेच परिणत स्वरूप व त्यांतील अभिप्रेत व्यवहार्य कार्यक्रम.

## टिळकांचे माहात्म्य

पण टिळकांचा खरा मोठेपणा याहीपलिकडे त्यांनी ज्या वृत्तीने सर्व आयुष्यातील कार्य केले त्यात होता. अनेक दृष्टींनी निराशा झाल्यामुळे त्यांना दिवसेदिवस जास्त कडक शब्दयोजना व निकराचे उपाय यांचा अवलंब करावा लागला; पण काही झाले तरी त्यांचे नैतिक अधिष्ठान व कर्मयोग्याची बैठक ही कायम टिकली. आणि म्हणून त्यांचा आयुःक्रम व त्यांचे लिखाण ही समाजाला तात्कालिक उपायकारक झाली. एवढेच नव्हे, तर पुढील पिढ्यांसही शाश्वत मार्गदर्शक होत आहे. या विधानाच्या पुष्ट्यर्थ दोन उतारे देऊन हे विवेचन संपवितो. पहिला उतारा 'सदनशीर की कायदेशीर' या लेखातील आहे.

"न्याय, नीति आणि ऐतिहासिक परंपरा किंवा प्रगति यांचा आधार आपणांस आहे कीं नाहीं, एवढेंच आम्ही पाहिलें पाहिजे. आणि यांचा आम्हांस पाठिंबा असला म्हणजे मग आमचे प्रयत्न कायद्याचे मर्यादेत येतात कीं बाहेर पडतात, याची आम्ही पर्वा करून उपयोगी नाहीं; कारण कायदा परक्यांचे हातांत आहे. आतां एवढें खरें कीं, कायदा मोडला गेला तर शिक्षा होणार; परंतु, कायदा जर जुल्मी असेल तर ही शिक्षा सोसूनच त्याचा प्रतिकार केला पाहिजे; एरव्ही इलाज नाहीं. नीति आणि कायदा यांची जेव्हां फारकत होते तेव्हां असेच प्रकार घडून यावयाचे."

दुसरा उतारा 'विश्ववृत्तांतील' एका लेखामधील आहे.

"ज्या आशेनें पंचवीस तीसवर्षांपूर्वी नवीन सुशिक्षित लोकांनीं राजकीय उन्नतीच्या कामीं पुढाकार घेऊन उद्योग करण्यास सुरवात केली ती आशा आतां राहिलेली नाहीं.

आतां आम्हांस जो उद्योग करावयाचा, तो अमक्यावर भिस्त ठेवून अगर अमका तमका गृहस्थ आपणांस सहाय्य करील अशा आशेनें करून उपयोगी नाहीं. आशेचेही दोन प्रकार आहेत. एक लोभमूलक परावलंबी; आणि एक निराशेच्या पोटीं उत्पन्न झालेली स्वावलंबी. या दुसऱ्या आशेसच निर्वाणीचें धैर्य असें म्हणतात; राजनीति किंवा एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याची पद्धत ही कांहीं औदार्याच्या किंवा परमार्थाच्या पायावर रचलेली नसते. हा एक स्वार्थाचा धंदा आहे."

"ज्याच्या हातीं ससा तो पारधी या न्यायानें अधिकारारूढ मंडळी इतरांस आपल्या अधिकार-मदानें तुच्छ मानीत आहेत व मानतील. त्यांच्या औदार्यास, परोपकारबुद्धीस किंवा न्यायदृष्टीस शरण गेल्यानें आपलें काम व्हावयाचें नाहीं, ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झालेली आहे. अशा वेळीं कार्यसिद्धीसाठीं आम्हांस एकच उपाय राहिला आहे आणि तो निराशेची आशा हा होय. ह्या आशेच्या जोरावर भवाब्धी पार पाडून अनेक लोकांनीं जर ईश्वरपदाची प्राप्ती करून घेतली आहे, तर आपल्यावर आलेल्या संकटांचा सागर तरून जाण्याची शक्ति आपल्या अंगीं उत्पन्न करण्यास हें साधन आहे याबद्दल शंका घ्यावयास नको. मात्र हें साधन किंवा हा गुण आपल्या अंगीं पूर्ण बिंबला पाहिजे; आणि तो तसा बिंबून त्याप्रमाणें आपल्या हातून जर उद्योग झाला तर 'नैराश्यं परमं सुखं' ह्या व्यासोक्तीचें बीज आम्हांस सांपडलेसे होऊन आम्ही लवकरच हल्लीच्या परिस्थितींतून पार पडूं."

हे तेज, हा कणखरपणा ही स्थिर बुद्धी ज्याच्या ठायी होती त्या पुरुषांचे पुण्यस्मरण कोणत्याही काळी विशेषतः आपत्काळी फलप्रद ठरलेच पाहिजे.

आकाशवाणी, पुणे, भाषण, २९-७-१९५६.

# ५ . . समाजसत्तेचे विकेंद्रीकरण

नव्या कायद्यानुसार करण्यात येत असणारा लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग फार महत्त्वाचा आहे. याच्या अनुषंगाने कायद्याच्या चर्चेपेक्षा जास्त व्यापक विषयाचे, म्हणजे-विकेंद्रीकरण म्हणजे काय ? सत्तेचे विकेंद्रीकरण करावयाचे म्हणजे काय करावयाचे ? या मागची तात्त्विक भूमिका कोणती ? याबद्दलची चर्चा मी करण्याचे योजिले आहे.

या विषयाची त्रिविध विभागणी करता येईल. पहिला टप्पा म्हणजे समाजसत्ता व राजसत्ता यांबद्दलच्या ब्रिटिशपूर्व कालातील व्यवस्था व विचार; दुसरा म्हणजे या व्यवस्थांचे व कल्पनांचे ब्रिटिश अमदानीत झालेले रूपांतर आणि शेवटचा टप्पा म्हणजे याविषयीची आजची परिस्थिती.

## सत्तेची संकल्पना

सत्ता म्हणजे काय या कल्पनेपासून मी विवेचनाला आरंभ करतो. आपल्याकडे पूर्वापार जिथे जिथे नीतिविवेचन झाले तेथे तेथे दंडाच्या आवश्यकतेचे प्रतिपादन केलेले आढळते. अशा वेळी अराजक झाल्यास काय दुष्परिणाम होतील, समाजात कोणत्याही प्रकारची सत्ता नसली, नियम नसले म्हणजे काय होते याचे वर्णन करून मग दंडाची उत्पत्ती, दंडाची आवश्यकता, असा विचार सांगितला जातो. समाजाचे अनेक स्तर व क्षेत्रे असतात. या सर्व क्षेत्रांत व थरांवर समाजाचे नियमन व्हावे लागते. या निरनिराळ्या थरांत व क्षेत्रांत अनेक संकेत, रूढी, परस्परसंबंधांबद्दलच्या अपेक्षित क्रिया-प्रतिक्रिया असतात आणि या सर्वांबाबत काही पथ्य पाळणे युक्त समजले जाते. याशिवाय समाज चालावयाचा नाही. यांतल्या बहुतेक गोष्टी स्वाभाविकपणे अहेतुक परंपरागत संस्कारांमुळे होतात. तथापि हे सर्व नेहमीच सहज होईल असा भरंवसा ठेवून चालत नाही. शेवटी काही तरी नियमन आवश्यक असते. प्रत्येक क्षेत्रात कोणीतरी असा अधिकारी लागतो की जो त्या क्षेत्रात नियमन करू शकेल व आवश्यकता पडल्यास दंडाचा वापरही करू शकेल.

## शासनमुक्तीची कल्पना

दंडाशिवाय समाज चालणे ही समाजाची सर्वोच्च अवस्था असे सर्व तत्त्ववेत्त्यांना वाटते. आपल्याकडील सत्ययुगाची किंवा रामराज्याची कल्पना, अथवा विनोबांची शासनमुक्तीची कल्पना ह्यांत हेच अभिप्रेत आहे. एका अर्थाने शासनमुक्ती हे मार्क्सच्या withering of the State चे भाषांतर मानता येईल. कोणतेही शासन नसणे ही सत्ययुगाची कल्पना. तेथे स्वनियमन असते, प्रत्येकजण स्वयंशासित असतो. संस्था चालवण्यास आपल्याला संकेत लागतात, नियम लागतात, तेही सत्ययुगीन अवस्थेत लागणार नाहीत. प्रत्येकाला आपल्या बुद्धीने स्वतःचे नियमन करून समाजात

दंडाशिवाय चालता येईल. पण निदान आजपावेतो तरी या सर्व कल्पनाच राहिल्या आहेत हे स्पष्ट आहे. क्वचित काही ठिकाणी ज्यांना एकोणिसाव्या शतकात "युटोपियन सोशॅलिस्ट" म्हणतात–त्यांच्यापैकी काहींनी असे दंडरहित सहकारी समाज स्थापन करण्याचे प्रयत्न केले. पण असले प्रयत्न अमेरिकेत दूरवर जाऊन व जगाशी संबंध नसलेले आपले अलग समाज निर्माण करून, सुरक्षित व संपन्न अशा अवस्थेतही टिकू शकले नाहीत, असा आजवरचा इतिहास आहे. याचा अर्थ पुढे काही प्रयत्न सफल होणार नाहीत असा जरी नसला तरी आपल्याला वर्तमानकाळात विचार करावयाचा असल्यास दंड आवश्यक मानून चालणे भाग आहे.

समाजाची सत्ता विविध क्षेत्रांत चालावी लागते. एखादी संस्था, शाळा, क्रीडामंडळ, काहीही घेतले तरी नियमनासाठी शेवटी दंड–मग त्याची पातळी काही असो–आवश्यक भासतो.

## भारतातील प्राचीन राजसत्तेचे स्वरूप

जुन्या काळापासून संकेत असा आहे की समाजसत्तेच्या सर्व क्षेत्रात अंतिम हुकमत ही राजाची राजसत्ता व ती सर्व प्रकारच्या सत्तांवर एक मोठी चौकट म्हणून बसलेली असते. पण राजाचा अधिकार सर्वत्र चालू असला तरी तो केव्हाही अबाधित, अनिर्बंध, मानला जात नसे. निरनिराळ्या देशांत विविध प्रकारांनी राजाच्या सत्तेवर बंधने असू शकत. तात्त्विकदृष्ट्या आपल्याकडचा विचार हा की राजा हा धर्मपालनाकरता आहे, तेव्हा राजावर जरी इतर काही मांडलिकांचे, सामंतांचे, लोकांचे बंधन नसले तरी शेवटी धर्माचे तत्त्वतः तरी बंधन होते. प्रत्यक्षात काय परिस्थिती होती याचा जर आपण विचार केला, तर असे आढळून येईल की, राजाची सत्ता जरी कितीही अबाधित आणि अनिर्बंध मानली तरी प्रत्यक्षतः ही सत्ता गाजवण्यात अनेक अडचणी होत्या. भौगोलिकदृष्ट्या विचार केला तरी असे दिसून येईल की एका केंद्राचे ठिकाणापासून फार मोठ्या प्रदेशावर हुकमत चालवणे कठीण होते. तेव्हा सर्व जुन्या साम्राज्यांत साम्राज्याचा विस्तार फार झाला तर त्याचे विभाग पडणे, त्यांतील मोठ्या सामंतानी स्वतः सार्वभौम बनण्याचा प्रयत्न करणे हे नेहमी चालत असे. कुठल्याही एका अधिकारी गटास सर्वत्र सर्व क्षेत्रांत सत्ता चालविणे कठीण पडे. यामुळे समाजाची रचनाच अशी बनली होती की बहुतांशी समाज हा लहान लहान गटांत स्वायत्त असे आणि राजसत्तेचा त्याच्याशी काही निवडक बाबींपुरताच संबंध येत असे. शांतता राखणे, बंडाळी न होऊ देणे, कारभार वसूल करणे अशा मुख्य गोष्टी तेवढ्या राजसत्ता करत असे.

एल्फिन्स्टनने महाराष्ट्रातील जुन्या ग्रामव्यवस्थेविषयी प्रत्येक ग्राम हे एकेक लोकराज्य होते, असा शब्दप्रयोग केला आहे. याचा अर्थ एवढाच की प्रत्येक ग्राम बहुतांशी स्वायत्त होते. महसूल हा सर्व ग्रामाकडून एकवट वसूल दिला जात असे. त्याची वसुली, वाटणी कूळवार जी करावयची ती ग्रामाधिकारी परंपरानुसार करीत असत. ग्रामाचा कारभार ग्रामाधिकारी रूढीप्रमाणे चालवत असे. ग्रामाने कर न दिल्यास, काही मोठी उलाढाल, रूढीभंग झाल्यास तेवढे प्रकरण राजसत्तेकडे जात असे. ग्रामाची जी परंपरागत घडी बसलेली असेल, तेवढी राखावी, एवढीच राजसत्तेकडून अपेक्षा असे. राजसत्तेने यात काही नवीन करावे, काही परिवर्तन करावे अशी अपेक्षा नसे. आपला किंवा कोणताही समाज स्वतःला परिवर्तनशील समजत नसे. या समाजांची प्रवृत्ती परंपरेला मानून राहावे अशीच होती. तेव्हा सर्वत्रच प्रत्येक क्षेत्रातील अधिकाऱ्यांवर या प्रकारचे दडपण असे.

## विकेंद्रीकरणाची परंपरा

मला येथे मुख्य मुद्दा सांगावयाचा असा आहे की, या सर्व जुन्या व्यवस्थेत दोन प्रकारे विकेंद्रीकरण सहज चालले होते. आपल्याकडील देशमुख, देशपांड्यांसारखे काही मोठे देशाधिकारी असत.

२९

पण त्यांचेही हक्क मर्यादित असत. त्यांचा अधिकार देशाची भरभराट व्हावी यासाठी ज्या काही सार्वत्रिक गोष्टी करायच्या तेवढ्यापुरता मर्यादित असे. दुष्काळ पडला, दंगेधोपे झाले, काही कारणांनी गावे ओसाड पडली, वहित कमी झाले तर त्या दृष्टीने उपाययोजना करणे हे काम देशमुख, देशपांडे मंडळींकडे होते. पण प्रत्यक्ष स्थानिक कारभार हा पाटील, कुलकर्णी, विशेषतः गावपाटील यांजकडे असे. पण हीही व्यवस्था पाटील परंपरेप्रमाणेच चालवी. यापलीकडे त्याला स्वतःचे अधिकार नसत.

याप्रमाणे राजसत्तेत प्रादेशिक व ग्रामवार विकेंद्रीकरण होते. तसेच सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत, समाजातील प्रत्येक जाती-जमातीत सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले दिसून येते. आपला समाज हा जवळ-जवळ स्वायत्त असलेल्या अनेक जाती-जमातींत विभागलेला असे. येथेही राजाचा अधिकार, जर कोणी रूढीपरंपरेविरुद्ध जाऊ लागला, तर त्याला शासन करणे एवढाच मुख्यतः होता. जर या जाती-जमातींतील चौधरी, पंच, मेहत्रे असे कोणी जे मुख्य असतील, ते रूढीविरुद्ध गेले तरच राजसत्ता त्यात ढवळाढवळ करत असे, एरवी नाही. अर्थव्यवस्थेचेही असेच होते. महाराष्ट्रात गावगाड्याबाहेर विशेष संघटित अर्थव्यवस्था नव्हती. पण गुजराथेसारख्या ज्या प्रदेशांत विशेष संपन्न, वैविध्यपूर्ण, नागर अर्थव्यवस्था होती तेथे आपणांला अर्थव्यवस्थेतील विकेंद्रीकरणाची उदाहरणे सापडतील. गुजराथेत निरनिराळ्या प्रकारचे महाजन होते. महाजन ही संस्था प्रत्येक प्रकारच्या व्यावसायिक कारागिरांची असे. महाजन मंडळींकडे कारागिरांचे सातत्य राखणे आणि कारागिरीतील जे अनेक संकेत असतात, उदाहरणार्थ, कोणत्या प्रकारची घडण करायची, मालाची प्रत कशी ठरवायची, मजुरीचे दर ठरवायचे, वाटप नियंत्रण करायचे व याबाबतच्या नियमांचे पालन नीट होत आहे ना हे पाहावयाचे अधिकार असत. सबंध नगराकरता जर काही करावयाचे असेल तर त्याबाबत नगर-महाजनाकडे स्वायत्त असा अधिकार होता. आपल्याकडील प्रसिद्ध झालेल्या दोनचार पत्रांवरून हे सांगता येते. पुण्याचा दुल्लभशेट म्हणून नगरशेठ होता. त्याने नाना फडणविसाला पाठवलेले एक पत्र छापलेले आहे. यातील निवेदनाचा सारांश की, "मी पुण्याचा नगरशेठ म्हणून लाहोरपासून रामेश्वरपर्यंत समजला जातो. तेव्हा मजकडे अनेक मंडळी येतात. त्यांची सरबराई करणे आणि पुण्याचा आब राखणे हे माझे काम आहे; आणि ही नगरशेठ म्हणून माझ्यावर जी जबाबदारी आहे ती पार पाडण्याबद्दल आपण मजकडे टांकसाळीचे काम तोडून दिले आहे." सांगायचा मुद्दा असा की सर्व क्षेत्रांतील मुख्य कामे व अधिकार, परंपरा पाळून व रूढी राखून त्या त्या क्षेत्रातील अधिकाऱ्याकडे सर्वस्वी ठेवावी अशा प्रकारची सर्वत्र व्यवस्था होती.

राजसत्तेचे काम म्हणजे परंपरागत रूढीनुसार क्षेत्राक्षेत्रांतील कारभार नीट चालला आहे–धर्मपालन होत आहे–हे पाहणे. त्या वेळी त्या काळाला व कल्पनांना अनुसरून स्वायत्त, स्वयंशासित व्यवस्था होती. याला लोकशाही म्हणावे की नाही हा भाग वेगळा; पण सर्व सत्ता विकेंद्रित होती हे निश्चित.

## ब्रिटिश अमदानीतील स्थित्यंतर

ब्रिटिश जेव्हा या देशात आले, तेव्हा साहजिकपणे पण हळूहळू हे निश्चित बदलले. हळूहळू मुद्दाम म्हणतो, कारण ब्रिटिशांनी निदान पश्चिम हिंदुस्थानात प्रथम आक्रमण केले तेव्हा एखादी पिढी जाईपर्यंत काही एक बदलायचे नाही असे धोरण त्यांनी कटाक्षाने ठेवले. एल्फिन्स्टनच्या व त्याच्या समकालीनांच्या कारकीर्दीत शक्य तोवर सद्यःस्थितीत बदल करावयाचा नाही अशा धोरणावर भर होता. पण हा भर सुरुवातीला असला तरी तो शांतता प्रस्थापित होऊन ब्रिटिश राज्य लोकांच्या अंगवळणी पडेपर्यंतच होता. त्यानंतर मुद्दाम केला नाही, तरी बदल होणे अपरिहार्यच होते.

ब्रिटिश साम्राज्य आणि कोणत्याही जुन्या प्रकारच्या शाह्या ह्यांत मुख्य फरक हा की ब्रिटिश येथे

स्थायिक झाले नाहीत. इतर, अगदी शक–हूणांपासून जे आक्रमक भारतात आले त्यांतील बहुतेक सर्व या देशात स्थायिक झाले. आपणाकडे नेहमी असे सांगितले जाते की, पुढे पुढे मुसलमानांविरुद्ध दक्षिणेत बंडाळ्या झाल्या त्यांचे कारण मुसलमान स्वतः परकी, गैरमुलकी आहोत असे समजून वागायला लागले हे होय. ब्रिटिश मात्र येथले म्हणून कधीही स्थायिक झाले नाहीत आणि त्यांनी अगदी नवीन पद्धतीने राज्य सुरू केले. शिवाय ब्रिटिश अमदानी येणे आणि यांत्रिक युग सुरू होणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडल्या. यांत्रिक युग सुरू झाल्यावर ज्या जुन्या भौगोलिक अडचणी एकाधिकार सर्वत्र चालण्याच्या आड येत, त्या हळूहळू नाहीशा व्हावयास लागल्या. ब्रिटिशांची येथील सत्ता दृढ झाल्यावर त्यांनी नवीन पद्धतीने कारभार चालू केला. ब्रिटिशांचा कारभार येथे कधीच स्थायिक न झालेल्या, आपल्या देशातून पाठविलेल्या मूठभर अधिकाऱ्यांमार्फत चालवण्यात यावयाचा होता. ह्या परिस्थितीमुळे तत्पूर्वीच्या व्यवस्था-संकेतांतील बदलाची आवश्यकता भासू लागली. काही थोड्या अधिकाऱ्यांमार्फत कारभार चालवायचा यामुळे दोनशे-तीनशे जिल्ह्यांना प्रत्येकी दोन-तीनच ब्रिटिश अधिकारी वाट्याला आले असे झाले. अशा परिस्थितीत या दोन-तीन अधिकाऱ्यांच्या हातांत सत्ता केंद्रित होण्याखेरीज गत्यंतर नव्हते. अशा रीतीने एखादा मुलकी अधिकारी, वेळेस स्वतंत्र न्यायाधिकारी आणि एखादा त्या जिल्ह्यात जर काही महत्त्वाचे एखादे क्षेत्र असेल, उदाहरणार्थ जंगल, तर त्यावरचा अधिकारी, यांच्या हातात सर्व सत्ता दिली गेली. आणि शेवटी तिथला जो जिल्हाधिकारी तो प्रमुख मानून त्याच्या हातांत सर्व सत्ता केंद्रित झाली. ब्रिटिशांच्या राजवटीत जिल्हाधिकाऱ्याने काहीही केले तरी त्याला वरून पूर्ण पाठिंबा मिळत असे. ह्याच्या खालच्या अधिकाऱ्यांच्या थरापर्यंत मात्र हा पाठिंबा पोचत नसे. कारण जिल्हाधिकारी हा ब्रिटिश राज्याचा जिल्ह्यातील प्रतिनिधी होता. त्याची हुकमत, त्याचा आब विशेष आणि तो राखणे महत्त्वाचे होते, पण याच्या खालच्या थरांवर बहुतेक हिंदी अधिकारी होते. आणि हे सर्व अधिकारी पूर्णपणे सांगकामे असत; त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा विवेकविचार करण्याची जबाबदारी नव्हती, अशी परिरिरिथती होती.

## स्वायत्तता व स्वयंशासन यांचा ऱ्हास

ब्रिटिशांना त्यांच्या मर्जीनुसार कारभार चालवायचा तर हे अपरिहार्य होते. पण याचा परिणाम असा झाला की कोणत्याही खालच्या थरावर पूर्वीप्रमाणे स्वायत्त कारभार होणे बंद झाले. या आमूलाग्र बदलाचे एक चांगले उदाहरण द्यावयाचे झाल्यास पाटलाचे देता येईल. जो गावपाटील ग्रामाधिकारी होता, स्वायत्त ग्रामाचा प्रमुख होता, त्याचा मुलकी व पोलिस पाटील झाला. हे परिवर्तन खरे महत्त्वाचे होय. तो जिल्हाधिकाऱ्याचा सांगकाम्या बनला व अशाच पद्धतीने इतर बदल होत गेले; अर्थात ही गोष्ट एकदम झाली नाही, ती काही पिढ्यांत झाली. पूर्वीचे काही वळण, काही संकेत होते, काही कल्पना होत्या त्या स्थानिक शिल्लक राहिल्या. पण प्रत्यक्षात हा पोलिस पाटील, मुलकी पाटील खरोखर सरकारी अधिकारी बनला. स्वायत्तता, स्वयंशासन, स्वतःच्या गावाचा दावा करण्याची शक्यता, हे सर्व नाहीसे झाले. साहेबाची बडदास्त राखणे, त्याच्यामार्फत काम करवून घेणे या पलीकडे राजसत्तेच्या खालच्या थरावर स्वयंशासनाला अर्थच उरला नाही.

नंतर रिपन साहेबाच्या वेळेपासून जेथे विशेष स्वायत्तता नव्हती, त्या शहरांतून काही नवीन प्रयोग सुरू केले ही गोष्ट निराळी. पण मूळचे जे कनिष्ठ थरावरील सर्व स्वायत्त असे अधिकारी होते ते गेले. इतरही अनेक गोष्टी गेल्या. सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्वायत्तताही क्रमाक्रमाने गेली. काही बाबतीत ढवळाढवळ न करण्याचे पथ्य ब्रिटिशांनी पाळले, तरी एकंदर बदलती परिस्थिती जुनी व्यवस्था टिकण्यास प्रतिकूल होती. साधे न्यायपद्धतीचे उदाहरण घेतले तर असे दिसते की ब्रिटिशांची

न्यायपद्धती व न्यायविषयक कल्पना यांमुळे अनेक दूरगामी बदल घडून आले. १८७६ मधील इंदापूरच्या दंग्यानंतरच्या चौकशी समितीच्या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की दक्षिणेत सावकारांविरुद्ध बंडे होण्याचे प्रमुख कारण, म्हणजे कर्जफेडीकरता जमीन विकण्याची ब्रिटिश न्यायपद्धतीतील तरतूद. पूर्वी कर्जापोटी जमीन जप्त केली जात नसे, पण ब्रिटिश न्यायपद्धतीप्रमाणे कर्जापोटी सबंध जिंदगी विकणे हे आले. तसेच सामाजिक बाबतीतही हळूहळू जातजमातीच्या अधिकारांबाबत अनेक तंटे कोर्टात जाऊ लागले. परिणामी ही व्यवस्था शिथिल झाली. अशा रीतीने समाजाची जुनी घडी बिघडली—समाजरचना विस्कळित झाली. काही बाबतीत, उदाहरणार्थ, आर्थिक बाबतीत ही फार बिघडली. जुने नगरशेठ-महाजन यांचे व्यवसाय बसले, त्यांचे नियंत्रणाचे अधिकार गेले.

अशा रीतीने आपल्या समाजात स्वायत्तता व स्वयंशासन यांचे संपूर्णपणे निर्मूलन झाले. असा अव्यवस्थित समाज एकत्रित न राहणे हे अगदी साहजिकच होते. हे घडण्याचे कारण ब्रिटिशांच्या राजवटीचे पूर्वीच्या राजवटींपेक्षा वेगळेपण आणि त्यातच ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांच्या अमदानीत झालेली औद्योगिक क्रांती. आपल्या देशातल्या परिस्थितीत आणि इतर अनेक आशियाई देशांतल्या परिस्थितीत एक मोठा फरक आहे तो हा की, ब्रिटिश अंमल दीर्घकाल राहिल्यामुळे आपल्याकडील जुन्या संस्था, जुन्या कल्पना, जुने संकेत बहुतांशी नष्ट झाले. यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची सुरुवात करण्यास पूर्वीच्या स्वतंत्र-स्वायत्त युगातील काही स्मृति–अवशेष शिल्लक उरले नाहीत.

## निवडणूक म्हणजे लोकशाही असे मानणे धोक्याचे

आपल्याला आता अगदी नवीन सुरुवात करावयाची आहे व ही करीत असताना आपण जुन्या कल्पना विसरलो आहोत, हे लक्षात ठेवले पाहिजे. आज आपण नेहमी म्हणत असतो की, नियोजित अर्थव्यवस्था हवी आणि याला केंद्रशासनाची प्रभावी शक्ती पाहिजे. असे म्हणताना आपण केंद्रसत्ता म्हणजे काय? लोकशाही म्हणजे काय? याचा खोलवर विचार करीत नाही. लोकशाही म्हणजे स्वयंशासन; समाज स्वतंत्र, स्वनियमित व स्वयंशासित असणे असे म्हणतात. पण स्वयंशासन म्हणजे काय? प्रत्येक जण काही प्रत्येकावर हुकमत चालवत नाही. तसे झाले तर अराजक माजावयाचे आणि मग सत्तेचे केंद्रीकरण झाल्यावर हुकूमशाही कशावरून येणार नाही? यावर आजची तोड म्हणजे आपण आपला प्रतिनिधी निवडून देणे ही आहे. आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधीने कारभार चालवला म्हणजे तो आपणच चालवला आहे असे मानायचे, जुन्या काळी कोणत्याही तत्त्ववेत्त्याने ही कल्पना मान्य केलेली नाही. रूसोने तर याचा उपहास केला आहे. रुसो स्वतः स्वित्झर्लंडमधला. तेथे त्याने प्रत्यक्ष लोकशाही, म्हणजे लहान लहान नगरांत सर्व नागरिकांनी एकत्र येऊन प्रत्यक्ष चालवलेली राज्ये पाहिलेली होती. तो इंग्लंडबद्दल नेहमी म्हणत असे की, इंग्रज ५ वर्षांतून एकदा स्वतंत्र असतात. एकदा प्रतिनिधीकरता मत दिले की त्यांच्या सत्तेचा लोप होतो. ते मग स्वयंशासित राहात नाहीत. तेव्हा प्रतिनिधी निवडणे ह्या योजनेचा उपयोग फार मर्यादित आहे असे आपल्या लक्षात येईल. खरे स्वयंशासन कधीही प्रतिनिधीमार्फत होणार नाही. आपल्याला या कल्पनांचा कसा पूर्ण विसर पडला आहे, त्याबद्दल एक उदाहरण देतो. जेव्हा भाषिक राज्यांचा वाद चालला होता, तेव्हा विचारवंत म्हणवल्या जाणाऱ्या भारतातील अनेक लोकांनी यावर अशी उपाययोजना सुचवली की, सर्व कारभार दिल्लीहून चालवावा. तेथील लोकसभेतील प्रतिनिधींनी संपूर्ण कारभार चालवला की तो लोकशाहीचा होईल असे मानणारी विचारवंत मंडळी भारतात होती व आहेत, ही कल्पना माझ्या मते अतिशय भयावह आहे. कोणालाही निवडून दिल्यावर त्यांनी कारभार चालविला म्हणजे तो आपणच चालवत आहोत असे समजणे, यासारखी भयावह कल्पना दुसरी नाही. केव्हाही

शासनावर नियंत्रण हवे, तरच ते लोकांच्या कलाने, काही तरी धर्माने चालत राहील असा राज्यशास्त्रातला सर्वसामान्य सिद्धांत ॲक्टनने पुढीलप्रमाणे मांडला आहे : ज्या ठिकाणी सत्ता आहे, त्या ठिकाणी भ्रष्टाचार हा आलाच, आणि सत्ता ज्या मानाने जास्त अनियंत्रित, त्या मानाने भ्रष्टाचार हा जास्त. नवीन शब्दांत सांगावयाचे झाल्यास सत्तेवर ज्या मानाने लोकांच्या बहुविध नियंत्रणाची मर्यादा असेल, त्या मानाने ती निकोप राहून, तीत लोकमत जास्त प्रतिबिंबित होऊ शकेल.

## सत्तेच्या विकेंद्रीकरणाची आवश्यकता

विकेंद्रीकरणाच्या विचाराची सुरुवात या सिद्धांतापासून करावी लागेल. लोकशाहीत अथवा कोणत्याही इतर शासनात-अनियंत्रित सत्ता ही वाईट, दुष्परिणामकारक होत असते. कारण मनुष्य कितीही चांगला असला तरी त्याच्याबाबत दोन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. एक तर त्याला सर्वज्ञता यावयाची नाही. सर्वांचे कल्याण कशात आहे किंवा सर्वांची पीडा काय आहे हे कोणालाही समग्र कळणे शक्य नाही. यामुळे काही थोड्यांच्या हाती सत्ता गेल्यास असा विचार संकोच होणार हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरे असे की ज्यांच्या ज्यांच्या हाती सत्ता असेल ते त्या सत्तेचा वापर आपले हितसंबंधी, स्वसमाजातील जे आहेत त्यांच्यासाठी करतील, त्यांना हा मोह अनावर होणे साहजिक आहे. म्हणूनच जे शासक आहेत, जे सत्ताधारी आहेत, त्यांनी सर्वांचे हितसंबंध-सर्वांचे दुःख लक्षात घ्यावे. त्यांनी संकुचित दृष्ट्या स्वहित-सत्ताधाऱ्यांचे व त्यांच्या संबंधीयांचे हित पाहू नये. हे साधावयाचे असेल तर या सत्तेवर मर्यादा घातल्याच पाहिजेत. आणि याच्या पुढचा सिद्धांत म्हणजे सत्तेचे विभाजन करून हे झाले पाहिजे-ही सत्ता केंद्रित राहून चालावयाचे नाही.

वर दर्शविल्याप्रमाणे सत्तेच्या विभाजनाचा विचार दोन प्रकारे म्हणजे निरनिराळ्या थरांवर, भौगोलिक परिस्थितीनुसार करता येईल. तसेच निरनिराळ्या क्षेत्रांबद्दल करता येईल. शेवटी राजसत्ता, अंतिम सत्ता चालवणारी कोणती तरी एक सत्ता, पाहिजे. निरनिराळ्या क्षेत्रांत चालणारा कारभार कोठेतरी जुळणी करून संगतवार बनवला गेला पाहिजे. एरवी सर्व समाज एका दिशेने सामोपचाराने जावयाचा नाही हे येथे मान्य केले, पण त्याबरोबरच या राजसत्तेवर मर्यादा असावी हाही विचार मान्य केला. तेव्हा राजसत्तेने विविध क्षेत्रांत स्वायत्तता राखून स्वमर्यादा पाळावी असे ओघाने येते. हा विचार आपल्या पूर्वापार परंपरेला बिलकूल सोडून नाही. ज्याप्रमाणे जुन्या महाजनांनी, ग्रामांनी, जातपंचायतींनी आपला कारभार नीट चालवला असता राजसत्तेने त्यात ढवळाढवळ करण्याचे कारण नव्हते, त्याप्रमाणे आज विद्यापीठांनी, सहकारी संस्थांनी, मजूर चळवळीतल्या पुढाऱ्यांनी आपला कारभार आपल्या धर्मानुसार नीट चालवला असता, त्यात राजसत्तेने ढवळाढवळ करणे हे सर्वप्रकारे अनिष्ट ठरेल. समाजसत्तेच्या विकेंद्रीकरणांत हा क्षेत्रविचार फार महत्त्वाचा आहे. सर्व क्षेत्रांवर सर्वसाधारण शासन ठेवणे, कायदे करणे, यापुरती राजसत्तेची जरुरी असली तरी त्या त्या क्षेत्रांतील अधिकार स्वायत्त संस्थांकडे देणे अत्यावश्यक आहे. अशी स्वायत्तता असल्याखेरीज लोकशाहीला अर्थच उरत नाही. कारण आपण जे लोकप्रतिनिधी निवडतो, त्यांच्या अंगी, प्रतिनिधी झाल्यामुळे, नसणारे गुण चिकटत नाहीत. ज्या विवक्षित कारभाराकरता आपण त्याला नेमतो, त्याचे अधिकार तेवढ्यापुरते मर्यादित राखणे हा लोकशाहीची बूज राखण्याचा एकमेव मार्ग आहे.

हा विचार आपल्या राजसत्तेच्या आधुनिक अवतारात विशेष महत्वाचा आहे. आज राजसत्ता ज्याच्या हातात असते त्याच्या हातात मोठी प्रभावी यंत्रणा येते. जुन्या काळी एकतर्फी हुकमत चटकन चालवता येत नसे, बंडाळी करणे अगदी सोपे होते. आज तसे नाही. मोठमोठ्या देशांतून काही मूठभर लोकसुद्धा लष्करी सत्ता हाती असल्यास अनिर्बंध हुकुमत चालवू शकतात. हा

आजच्या यंत्रयुगाचा परिणाम होय. तेव्हा अशी हुकुमशाही येऊ द्यावयाची नसेल तर, आपल्या राज्यव्यवस्थेची घडणच अशी पाहिजे की तिच्यात सत्तेचे विकेंद्रीकरण होईल.

## ब्रिटिश राज्याचा शाप

मला याबरोबरच आपल्याला हेही स्पष्ट सांगावयाचे आहे की कोणत्याही व्यवस्थेत रचनात्मक कार्य केवळ घटनात्मक कायदा पास केल्याने होईल असे नाही. आपण म्हटले की विद्यापीठाच्या कारभारात सरकारने ढवळाढवळ करू नये. सहकारी संस्थांवर दडपड आणू नये. हे सगळे कायद्यांत असले तरी ते खऱ्या अर्थी होईल केव्हा तर दोन्ही पक्षी संकेत पाळले जातील तेव्हा. एक पक्षी राज्यकर्त्यांनी जो स्वायत्त आहे त्याला स्वायत्तता भोगू दिली पाहिजे आणि दुसऱ्या पक्षी ज्याला स्वायत्तता टिकवायची त्याला तेवढा धीर पाहिजे. त्याच्या अंगात जर बळ नसले, तो स्वतःच्या पायावर उभा राहण्यास, प्रसंगी झीज सोसण्यास, कठीण प्रसंगास तोंड देण्यास तयार नसला तर ही स्वायत्तता टिकणार नाही, आणि टिकली तरी तिला काही अर्थ नाही. तेव्हा मुख्य मुद्दा असा की स्वायत्तता मानण्याकरता, आणि लोकशाही रूढ होण्याकरता समाजात काही बळ पाहिजे. आणि खरोखर ब्रिटिश राज्याबद्दल घृणा वाटण्याजोगे काही असेल, तर ते हे की त्यायोगे आपला समाज दुर्बल, विघटित झाला. स्वतःच्या पायावर उभी राहण्याची आमची शक्ती, एवढेच काय त्या शक्तीची आठवण सुद्धा नाहीशी झाली. आपली ही मोठीच हानी झाली आहे हे खरे आणि आता आपल्याला हे सगळे पुन्हा उभे करावयाचे आहे.

## लोकशाही विकेंद्रीकरणातील अडचणी

लोकशाही विकेंद्रीकरण सोपे नाही हे मला सांगावयाचे आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाचे कायदे आपण करू, पण विकेंद्रीकरण प्रत्यक्षात उतरविणे फार कठीण आहे. उदाहरणार्थ, सहकारी व्यवस्थेत अशा प्रकारचा संपूर्णपणे विकेंद्रित लोकशाहीचा सांगाडा तयार केलेला आहे. सर्वत्र खालच्या थरावर प्राथमिक मंडळ्या आहेत. खरेदी-विक्री, उत्पादन-व्यवहार, पैशाचा विविध व्यवहार या सर्व बाबतींत सहकारी व्यवस्था प्राथमिक मंडळीपासून सुरू होते आणि थराथराने त्याची संघात्मक रचना होते. आजची महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घेतल्यास तिचे संचालक मुख्यतः सर्व जिल्हा बँकांचे अध्यक्ष आहेत. म्हणजेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही जिल्हा बँकांची संघात्मक रचना होऊन बनली आहे. याप्रमाणेच जिल्हा बँकेची रचना संघात्मक असते. ही सहकारी व्यवस्था विविध क्षेत्रांतही विभागली गेली आहे. सावकारी व्यवहार करणारी एक, खरेदी-विक्री करणारी एक, मोठ्या मुदतीची कर्जे देणारी एक–अशी स्वायत्त क्षेत्रे असून त्यांत प्रत्येक थराथरावर विकेन्द्रीकरण आहे. पण ही व्यवस्था अशी आपोआप चालत नाही. आज भारतातील निरनिराळ्या राज्यांतून सहकारी कायदे जवळजवळ एकसारखेच आहेत. पण काही राज्यांत बँकेचा अध्यक्ष जिल्हाधिकारीच आहे आणि जिल्हाधिकारी असल्याशिवाय सहकारी संस्था चालावयाचीच नाही असे तेथे मानले जाते. असे जोपर्यंत आहे, तोवर या संस्था सहकारी म्हणून चालणार नाहीत. किंबहुना या परि-स्थितीत सहकारी संस्थांची खऱ्या अर्थी निर्मितीच होणे शक्य नाही.

आपण जेव्हा सत्तेचे विकेंद्रीकरण अथवा विभाजन करावयाचे म्हणतो, तेव्हा त्यामागचा उद्देश हा केवळ विभाजनाकरिता विभाजन नसून त्यायोगे समाजाचा सर्व व्यवहार अधिक चांगल्या रीतीने व्हावा, अधिक कार्यक्षमतेने चालावा, अधिक लोकमतानुवर्ती असावा म्हणून विभाजन करावयाचे हा असतो. विविध क्षेत्रांतील लोकांनी प्रत्येकी आपापला व्यवहार आपापल्या बुद्धीने, चांगल्या रीतीने चालवायला शिकावे आणि तो चांगला चालवावा. सहकारी संस्था चालवावी. शाळाचालकांनी

शाळा चालवाव्या. राजसत्तेने केवळ सर्वसाधारण देखरेख ठेवावी. हे राजसत्तेचे विभाजन कारभार कार्यक्षम होण्याकरता आणि इतकेच नाहीतर सर्वांना शासनात-स्वयंशासनात वाव मिळावा म्हणून झाले पाहिजे. सर्व प्रकारच्या स्थानिक संस्था जितक्या प्रभावी व जितक्या स्वायत्त तितक्या प्रमाणात आपण सगळे शासनात सहभागी होऊ.

आज पाश्चात्य देशांत समाजशास्त्रज्ञांना जर काही विशेष चिंता वाटत असेल तर ती ही की नवीन यांत्रिक युगात जे मोठमोठे नागर-समाज निर्माण झाले आहेत, हे सर्व एक प्रकारे कशातही प्रत्यक्ष सहभागी नसलेल्या केवळ बघ्यांचे, प्रेक्षकांचे आहेत. आणि अशी जर प्रेक्षकाची तटस्थ वृत्ती समाजात सर्व थरांत पसरली तर, समाजाचा कारभार हा माझा नाही, ती माझी जबाबदारी नाही, कोणी तरी चालवतो आहे, मी नुसता पाहाणारा अशी वृत्ती बळावेल की काय अशी भीती पाश्चात्य समाज-शास्त्रज्ञांना वाटते. अर्थात ही यांत्रिक युगामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे. आपल्याकडे इतकी औद्योगिक प्रगती झाली नसली तरी हीच भीती ब्रिटिश काळात निर्माण झालेल्या वृत्तीमुळे आज आहे असे मला वाटते.

## नोकरशाहीच्या पगड्याची भीती

ब्रिटिश काळात आपल्या समाजावर जो नोकरशाहीचा पगडा बसला त्यामुळे उत्पन्न झालेल्या व अजून टिकून असलेल्या वृत्तीची मला भीती वाटते. ब्रिटिशांनी आपले राज्य चालविण्याकरिता नोकर-शाहीतील सर्वोच्च जे ब्रिटिश अधिकारी ते एका अर्थी नोकर नसून हिंदुस्थानातील राजप्रतिनिधी होते. हे अल्पसंख्य असल्यामुळे त्यांच्या हाताखाली राज्ययंत्र चालविण्यास स्थानिक नोकरशाही निर्माण करण्यात आली. हे स्थानिक नोकर उपरे होते. परंपरागत लोकपुढाऱ्यांस अधिकार देणे किंवा स्थानिक लोकसंस्था टिकविणे हे ब्रिटिशांस शक्य नव्हते. त्यात धोका होता. म्हणून त्यांस डावलून आपणांवर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या नोकरांतर्फे ब्रिटिशांनी कारभार चालविला. या व्यवस्थेत जुन्या अगर नव्या लोकपुढाऱ्यांचा भाग उरला नाही; व सत्ता पूर्णपणे सरकारी नोकरांत केंद्रित झाली. हे नोकर सर्वाधिकारी असून त्यांवर लोकमताचा दाब नाही हे जनतेस अनुभवाने कळून आले. सरकारी नोकरांची इतरांबरोबर वागण्याची वृत्ती अरेरावीची व बेपर्वाईची बनली व सरकारी नोकरांपुढे नमून वागण्याची सवय आपणांस पडली. परकी राजसत्तेचा नोकर हाच अधिकारी बनल्यामुळे त्याचा स्वसमाजातील दर्जा फार उंचावला व सरकारी नोकरीत शिरकाव करून घेणे हेच प्रतिष्ठा मिळण्याचे साधन बनले.

याचा परिणाम असाही झाला की राज्यकारभार चालविणारे सर्वस्वी सरकारी अधिकारी आणि आपण प्रजाजन, तटस्थ पाहणारे, सोसणारे अशी भूमिका सार्वत्रिक झाली. ब्रिटिश अमदानीचे हे परिणाम अजून टिकून आहेत. मते मिळाली तरी नित्याच्या कारभाराशी आपला संबंध आहे असे लोकांस वाटत नाही, असे वाटावे असे काही केले जात नाही. सरकारी नोकरांची-विशेषतः मुलकी व पोलीस खात्यांतील-कार्यपद्धती बदलत नाही. अधिकाऱ्यास भिऊन वागण्याची सवय जात नाही. केवळ सरकारी अधिकाऱ्याचे स्थान आहे म्हणून त्याचा बडेजाव करणे अजून सुटत नाही.

जुने लोकशाही संकेत, स्वायत्त समाजाचे संकेत नष्ट झाले आहेत. समाजात पुढारी कोण असावा, धुरीण कोण असावा, त्याने कसे वागावे हे ज्याला कळेल, तो समाज तेवढा बलवान राहील. आज समाजास स्वयंशासन राहिले नसल्यामुळे समाज कोणावर दडपण आणू शकेल, समाजातील कोणी व्यक्ती अरेरावी झाली, शिरजोर झाली तर त्यांच्याविरुद्ध ठाकून उभा राहील आणि जाब विचारील अशी स्थिती नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

समाजसत्तेच्या विकेंद्रीकरणाचा हा मूलभूत विचार माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. महत्त्वाचा या व्यापक अर्थाने की आपला भविष्यातील समाज दुर्बल राहाणार की तो सबळ होणार, तो स्वायत्त,

स्वयंशासित खऱ्या अर्थाने बनणार की नाही, हे यावर अवलंबून आहे. शेवटी ते कोणत्याही रीतीने कायद्यावर अवलंबून नाही. कायदे वाईट असले, तरी फारसे वाईट होणार नाही. चांगले असले तरी आपोआप काही चांगले घडून येणार नाही. आपण किती स्वयंशासित आहोत, आपण सत्ता-व्यवहारात किती सहभागी होतो, आपापल्या ठिकाणी आपले बळ किती प्रस्थापित करू शकतो, राजसत्तेवर किती प्रभाव टाकू शकतो आणि सत्ताधाऱ्यांना त्यांचे कार्य, त्यांचे स्थान दाखवू शकतो, नोकरांनाही त्यांचे स्थान दाखवू शकतो, आपण प्रत्येक समाजातीलच आहोत, आपलेही काही विशिष्ट स्थान त्यात आहे, असे समजून जबाबदारीने वागू शकतो–यावर समाजाची स्वायत्तता व स्वातंत्र्य अवलंबून आहे. हे जेव्हा आपल्याला सर्वांना कळू लागेल, ब्रिटिश अमदानीतील परंपरा विसरून जाऊन आपण जुने संकेत, नव्या अर्थाने मनात बाळगू शकू तेव्हाच खऱ्या अर्थाने सत्तेचे – समाजसत्तेचे विकेंद्रीकरण होईल व स्वयंशासित – स्वावलंबी, म्हणून समर्थ, असा समाज आपल्या दृष्टीस पडेल.

## खऱ्या लोकशाहीचे गमक समाजसत्तेचे विकेंद्रीकरण

समाजसत्तेच्या विकेंद्रीकरणाची इष्टता व आवश्यकता अनेक दृष्टीने सांगता येते. सत्ता केंद्रित होणे अनिष्ट म्हणून खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित करावयाची तर जितक्या अधिक अंशाने अधिक लोकांस समाजकारभारात प्रत्यक्ष भाग घेता येईल तितका इष्ट. म्हणून सर्व कारभार जितका निकट संबंधित लोक हाताळतील तितका तो लोकहितकारी व लोकमतानुवर्ती पद्धतीने चालविला जाईल. म्हणून समाजसत्ता खऱ्या अर्थाने फार व्यापक आहे. सर्वच समाजाचे विविध व्यवहार व त्यांचे नियमन यांचा त्यात समावेश होतो. आपल्याकडे ब्रिटिशपूर्व कालात समाजसत्तेचे विकेंद्रीकरण बऱ्याच प्रमाणात झालेले होते. राज्यव्यवहार भौगोलिक आदी कारणांमुळे फार केंद्रित नसत. प्रादेशिक, विशेषतः ग्रामसमाज याबाबत मोठ्या अंशी स्वायत्त होते. तसेच आर्थिक, धार्मिक, सामाजिक इत्यादी अलग क्षेत्रांतील व्यवहाराचे नियमन त्या त्या क्षेत्रांतील संस्था व अधिकारी यांवरच बहुतांशी सोपविलेले होते. ब्रिटिश अमदानीत हे सगळे बदलले. स्थानिक ग्रामस्वायत्तता नष्ट झाली. इतर क्षेत्रांत स्वायत्तता राखून सुसूत्रता आणणे हे कार्य राजसत्ता करीनाशी झाली व नोकरशाहीखेरीज इतरांचे अधिकार व प्रतिष्ठा नाहीसे झाले. यामुळे समाज अनेकशः विभागला गेला. त्याची स्वयंशासन करण्याची संवय मोडली, त्यातील पुढारीपण नाहीसे झाले. आज या हीन स्थितीपासून वर येण्यास सुरुवात करावयाची आहे; म्हणून काय करावयाचे आहे, त्याचे स्वरूप ओळखून घेणे फार महत्त्वाचे आहे. आज चर्चा राजसत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या कायद्याबाबतच मुख्यतः होते. समाजसत्तेचे क्षेत्रवार विकेंद्रीकरण हे त्याहूनही महत्त्वाचे आहे. हे कायद्यापेक्षा राजसत्ताधारी व प्रत्येक क्षेत्रातील कार्यकर्ते यांची वृत्ती व त्यांच्या दरम्यानचे संकेत यांवर अवलंबून आहे. तसेच विकेंद्रीकरण राजसत्तेचे झाले तरी प्रत्यक्ष लोक व लोकनेते किती व कसा प्रत्यक्ष कारभार करतात, जबाबदारी उचलतात यावर खरे फलित अवलंबून आहे. राजसत्ता व तिचे नोकर यांचीच प्रतिष्ठा राखणे, त्यांवर भिस्त व भार टाकणे याऐवजी प्रत्येकाने आपापल्या ठिकाणी निग्रहाने व निर्भीडपणे काम करणे, जबाबदारी पेलणे व अति-क्रमणाचा धीराने प्रतिकार करणे याची संवय समाजास लागली तरच खऱ्या अर्थी समाजसत्तेचे विकेंद्रीकरण होऊ शकेल व तो सुफलदायी ठरेल.

*लोकशाही विकेंद्रीकरण आणि स्थानिक नेतृत्व* (पुणे : गोखले अर्थशास्त्र संस्था, १९६२) पृ० १–१२ (पुणे येथे लोकशाही विकेंद्रीकरण आणि स्थानिक नेतृत्व' या विषयावर १७–१८ मार्च १९६२ रोजी झालेल्या परिसंवादातील भाषण)

# ६ . . राजसत्तेचे विकेंद्रीकरण व सहकारी अर्थव्यवस्था

राजसत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या योजनांचा आजकाल फार उत्साहाने पुरस्कार केला जात आहे. या योजनांचे स्वरूप सर्वत्र सारखे नसले तरी तद्भूत अनेक प्रश्न सगळीकडे महत्त्वाचे समजले जातात. यांपैकी एक प्रश्न म्हणजे राजसत्तेच्या विकेंद्रित घटकांचा-ग्रामपंचायती, जिल्हाबोर्ड इत्यादिकांचा-निरनिराळ्या प्रकारच्या व निरनिराळ्या स्तरावरच्या सहकारी संस्थांशी किती व कोणत्या प्रकारचा संबंध असावा हा आहे. विकेंद्रित राजसत्ताघटक हे स्थानिक सार्वजनिक कारभारातील मुख्य कार्यवाह व सहकारी संस्था या स्थानिक अर्थव्यवहार चालविणाऱ्यांत प्रमुख असे मानल्यास या दोहोंचे संबंध निकट व सहकार्य संपूर्ण हवे हे उघड आहे. नियोजित अर्थव्यवस्थेत असे असणे विशेषच महत्त्वाचे आहे हे सर्वमान्य झाले तरी हे संबंध कशा प्रकारचे असावे याबाबत आज मतभेद दिसून येतात. या विषयीच्या विवाद्य प्रश्नांचा तपशिलात उहापोह करण्याचा येथे विचार नाही. परंतु कोणत्या तात्त्विक बैठकीवरून त्या सर्वांचा विचार झाला पाहिजे हे थोडक्यात येथे निर्देशावयाचे आहे.

## सहकार व सरकार यांचे परस्पर संबंध

सहकारी चळवळीच्या पुरस्कर्त्यांचे एक पुरातन तत्त्व या चळवळीस राजसत्तेपासून अलिप्त राखणे असे होते व काही देशांत हा विचार अढळ सिद्धांतरूप होऊन बसला होता. इतर ठिकाणी सरकारी मदत थोडीबहुत स्वीकारली तरी सहकारी संस्थांवर सरकारी नियंत्रण नसावे याविषयी आग्रह होता. या देशातील तत्कालीन राज्यसरकार भांडवलशाहीचा पुरस्कार करणारे व मजूर-शेतकरी इत्यादींच्या सहकारी हालचालीस विरोधक अगर त्याविषयी उदासीन असे असल्यामुळे हा विचार व आग्रह दृढ झाला होता. परंतु ज्या नवोदित समाजात सहकारी चळवळ बाह्य पुरस्कारा-शिवाय व सरकारी पाठपुराव्याखेरीज मूळ धरू शकत नव्हती तेथे हा जुना विचार बदलणे प्राप्त ठरले व सरकारी मदत व मार्गदर्शन या दोहोंचा स्वीकार करावा लागला. विशेषतः नियोजित आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत सहकारी संस्थांस मध्यवर्ती स्थान देऊन सार्वत्रिक सहकारी अर्थव्यवस्था निर्मिण्याचा विचार जेथे मान्य झाला तेथे या संबंधीचा दृष्टिकोन पुरा बदलणे आवश्यक आहे.

असे असले तरी सहकारी अर्थसंस्था व सरकार यांचे बदललेल्या परिस्थितीत संबंध काय असावे हे ठरविताना सहकारी संस्थांचे मूळ सहकारी स्वरूप कायमचे बदलणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. सहकारी अर्थव्यवस्थेचे दोन मुख्य विशेष म्हणजे स्वावलंबनाकरिता सहकारी व्यवहार व त्याचे स्वनियंत्रण हे होत. सरकारी मदत घेतली असता स्वावलंबनास बाध येतो व प्राथमिक अवस्थेत न घेतली तर प्रगती होऊ शकत नाही हा अवघड पेच गरीब अविकसित देशांत

निर्माण होतो. यातून सर्वमान्य मार्ग म्हणजे प्राथमिक अवस्थेत आवश्यक तेवढी मदत जरूर घ्यावी पण ती घेताना व पुढील प्रगती आखताना बाह्य मदतीवर नेहमी अवलंबून राहावे लागणार नाही व पूर्ण स्वावलंबनाची अवस्था शक्य तितक्या लवकर गाठता येईल असे धोरण ठेवावे हा आहे.

तसेच नियोजित अर्थव्यवस्थेत सहकारी संस्था पूर्णपणे स्वनियंत्रित असणे शक्य नाही. नियोजनाच्या आराखड्याप्रमाणे त्यांनी ज्या प्रकारचे कार्य करावयाचे आहे व जी मजल गाठायची आहे ती स्पष्ट दिशेने गाठली जात आहे हे पाहणे, त्याबाबत नियमन करणे हे केव्हाही शासनसंस्थेने केले पाहिजे. पण या बाह्य मर्यादा संभाळल्यास इतर बाबतींत स्वनियंत्रणाचा आग्रह धरला पाहिजे, नाहीतर संस्थेचे सहकारी स्वरूप नष्ट होईल.

## स्वावलंबन व स्वनियंत्रण

स्वावलंबन व स्वनियंत्रण केवळ सहकारी संस्थांनीच इष्ट मानले आहे असे नाही. प्रत्येकाने शक्यतो स्वतःच्या पायावर उभे राहावे, इतरांवर, समाजावर आपला भार पाडू नये हे सर्व अवस्थेतील समाजात सर्वमान्य तत्त्व आहे. स्वावलंबनाचा अर्थ समाजाची, विशेषतः अर्थव्यवहाराची बैठक ज्याप्रमाणे बदलेल त्याप्रमाणे बदलतो. सर्व अर्थव्यवहार व्यक्तिनिष्ठ असावे व सामाजिक, सामूहिक अर्थव्यापारांचे क्षेत्र अगदी संकुचित असावे ही विचारसरणी मान्य असली म्हणजे व्यक्तिव्यवहार अनिर्बंध चालू देणे असा स्वावलंबनाचा अर्थ ठरतो. समाजवाद मान्य करणाऱ्या राज्यांत स्वावलंबनाचा अर्थ अगदी निराळा होतो. समाजाने नियुक्ती केल्याप्रमाणे झटून उद्योग करणे यातच स्वहित व स्वावलंबन आहे असे येथे समजले जाते.

स्वावलंबनाची इष्टता तत्त्वतः सर्व समाज मान्य करतात; स्वनियमनाचे तसे नाही. लोकशाही, गणराज्य, अशा प्रकारची राज्यव्यवहाराची घडी जेथे आहे तेथेच फक्त समाजव्यवहारांत व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वनियमनाची इष्टता किंवा शक्यता मानली जाते; पण हीही सर्व क्षेत्रांत किंवा सर्व थरांवर नेहमीच मानली जाते असे नाही. याकरिता ज्या प्रमाणात सर्व बाबतींत अगदी लहान–लहान गटांना सुद्धा इष्ट रीतीने स्वयंशासित राहता येते त्या प्रमाणात लोकशाही प्रत्यक्षात उतरली आहे असा सिद्धांत बरेचजण मांडतात. विकेंद्रीकरणास मिळत असलेला प्रचलित पाठिंबा या सिद्धांतावरच मुख्यतः आधारित आहे.

परंतु कोणत्याही समूहाने किंवा सबंध समाजाने स्वनियमन करणे याचा अर्थ काय, याचा व्यावहारिक मार्ग कोणता हे समजावणे किंवा व्यवहारांत उतरविणे यांत अनेक अडचणी उत्पन्न होतात. सगळेच नियंते कसे होऊ शकतील ? पण एकाने दुसऱ्याचे, काहींनी इतरांचे नियमन केले, त्यावर हुकमत चालविली, म्हणजे हे स्वनियमन कसे मानावयाचे ? असल्या प्रश्नास तात्त्विक उत्तर देणे कठीण आहे. खऱ्या अर्थी, स्थूल मानाने सुद्धा सर्वांचे स्वतःवरचे नियमन व्यवहारात होईल, सत्ता थोड्यांच्या हातात जाणार नाही, हे प्रत्यक्षात साधणे तितकेच कठीण आहे. याबाबत अनेक कल्पना पुढे मांडल्या जातात, अनेक क्लृप्त्या सुचविल्या जातात. यामध्ये सत्तेचे शक्य तेवढे विभाजन करावे, निरनिराळ्या प्रसंगाने निरनिराळ्या कारभारांतील सत्ता-वापरात अनेकांस जितके सहभागी करिता येईल तितके करावे ही सर्वमान्य विचार-व्यवहारांची दिशा आहे.

## सत्ता-विभाजनाचे महत्त्व

समाजाचे सामूहिक व्यवहार अनेक प्रकारचे असतात. कौटुंबिक, व्यावहारिक, धार्मिक असे अनेक भेद त्यांत असतात. शिवाय सर्व प्रकारच्या सामूहिक कारभाराच्या विस्ताराचे क्षेत्रही विशिष्ट कार्य-

परत्वे स्थल, विभाग, अखिल समूह असे विभिन्न असते. सर्व समाजसत्तेचे विभाजन या दोन्ही प्रकारे होऊ शकते. सामाजिक व्यवहार अनेक प्रकारचे असले तरी या सर्व व्यवहारांचे सुसूत्र सार्वत्रिक नियमन व्हावे याकरिता सर्वांचा समावेश करणारी एक चौकट आवश्यक आहे. पूर्वकालापासून दंडधारी राजसत्ता ही सार्वत्रिक नियमन करीत आली आहे. पण याचा अर्थ राजसत्तेचा अबाधित अधिकार सर्व क्षेत्रांत चालतो अगर चालावा असे नाही. एका क्षेत्राने दुसऱ्यावर अतिक्रमण करू नये, एकमेकांच्या कारभारांत फार विसंगती उत्पन्न होऊ नये, इतपत सामान्य सर्वव्यापी नियमन सर्व क्षेत्राचे राजसत्तेने करणे हे उचित असले तरी मूलतः सर्व निरनिराळे समाजव्यवहार स्वायत्त समजले जावे. विभाजनाबाबत हा विचार फार महत्त्वाचा आहे. धर्मकारण, राजकारण, अर्थकारण यांची बव्हंशी फारकत असावी व प्रतिष्ठा, राजसत्ता व पैसा ही एकाच वर्गाच्या हाती केंद्रित नसावी हे तत्त्व आपल्याकडेही पूर्वापार मान्यता पावले आहे. राज्यकारभाराच्या हुकूमशाहीच्या आधुनिक अनुभवांवरूनही हा सिद्धांत आज तत्त्वतः सर्व स्वीकारतात.

अर्थव्यवहारापुरता विचार करताना स्वायत्ततेचा अर्थ कसा लावयाचा ते आता पाहिले पाहिजे. अनिर्बंध व्यक्तिव्यवहार जेथे प्रचलित आहे तेथे स्वायत्तता व पूर्वी वर्णिलेले स्वावलंबन यांत फारसा फरक नाही; कारण येथे राजसत्तेने लादलेल्या व्यापक चौकटीत सर्व व्यक्तिव्यवहार अनियंत्रित असून अमुक थरावर अमुक प्रकारच्या समूहाचे म्हणून ते व्यवहार एकत्रित होतील असे निश्चित सांगता येत नाही. ते असे होणे न होणे केवळ व्यक्तिमतांवर व निर्णयांवर अवलंबून. तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्य व स्वावलंबन यांहून निराळा अर्थ स्वायत्ततेला या समाजात उरत नाही. उलट जेथे अर्थव्यवहारात सामूहिक व्यवस्थेचे किंवा कारभाराचे महत्त्व विशेष तेथे स्वावलंबनाचा विचार सामाजिक किंवा सामूहिक दृष्टीतून करावा लागतो व स्वायत्ततेला निराळे महत्त्व प्राप्त होते. सहकारी कार्यकर्त्यांचा दावा असा की, सहकारी व्यवस्थेस संपूर्ण स्वावलंबी, स्वयंशासित व्यवस्थेचे स्वरूप देता येईल; किंबहुना तिचे खरे स्वरूप असेच आहे.

## लोकशाही व विकेंद्रीकरण

लोकशाही व विकेंद्रीकरण या दोन्ही कल्पना सहकारी व्यवस्थेत मूलतःच समाविष्ट आहेत. स्थानिक प्राथमिक संस्था या समग्र सहकारी व्यवस्थेस पायाभूत आहेत. व्यक्तिसभासद मुख्यतः प्राथमिक संस्थांचेच असतात. यांचा कारभार स्वायत्त असला म्हणजे अर्थव्यवहाराचे शक्य तेवढे विकेंद्रीकरण झाले असे म्हणता येते. अनेक प्राथमिक संस्था विशिष्ट कार्यांकरिता एकत्र येऊन इतर सहकारी संस्था काढू शकतात. तसेच निरनिराळ्या प्रकारच्या सर्व प्राथमिक संस्थांची स्तरास्तराने संघात्मक व्यवस्था बनते. याप्रमाणे विविधांगी, विकेंद्रित परंतु व्यापक, सुसूत्र व एकात्म अशी सहकारी व्यवस्था बनविता येते. अशा व्यवस्थेने जेवढे क्षेत्र व्यापले तेवढ्यापुरते लोकशाही व विकेंद्रीकरण यांबाबतचे प्रश्न उरण्याचे कारण नाही.

अशा सहकारी व्यवस्थेबरोबर विकेंद्रित राज्यसंस्थांचे संबंध कसे असावे हा या लेखाचा मुख्य विषय आहे. निरनिराळ्या स्तरांवरील सहकारी संस्थांचे त्या त्या स्तरांवरील शासनसंस्थांबरोबर निकट संबंध असावे याबद्दल वाद नाही. अनेक गोष्टी या दोहांच्या विचारविनिमयाने व सहकार्याने कराव्या लागणार हेही सर्वमान्य आहे. प्रश्न येतो तो या दोहोंत मतभेद झाल्यास काय करावयाचे, सर्वव्यापी नियमन करण्याचा राजसत्तेचा अंतिम राखीव हक्क कोणी बजवावयाचा या विषयीचा. राज्यकारभाराचे विकेंद्रीकरण झाले म्हणजे प्रत्येक थरावरच्या शासनसंस्थेने त्या थरावरच्या सहकारी संस्थांवर हुकमत चालवावयाची असा अर्थ अनेक जण करतात व तो सर्वमान्य होऊ पहात आहे. सहकारी कार्यकर्त्यांच्या

व तज्ज्ञांच्या मते हे पूर्णपणे चूक आहे. सहकारी व्यवस्था ही एकजिनसी स्वयंशासित मानली तर तिचे व्यापकदृष्ट्या मार्गदर्शन करणे व तिच्या कार्यांच्या अंतिम मर्यादा ठरविणे हे कार्य सर्वश्रेष्ठ राजसत्तेनेच केले पाहिजे; आणि ठरविलेल्या मर्यादेत व आखलेल्या पद्धतीत सर्व तपशीलवार कारभार व त्याची विभागणी या गोष्टी सहकारी व्यवस्थेवर सोपविल्या पाहिजेत. नट्टून प्रत्येक स्तरावर व प्रत्येक संस्थेचे वेगवेगळे नियम होऊ लागल्यास सहकारी व्यवस्थेच्या स्वायत्ततेस काही अर्थ उरणार नाही. संलग्न कारभार व सहकार्य हे स्तरास्तरावर अवश्य घडेल. परंतु नियमन करावयाचे ते फक्त समग्र सहकारी व्यवस्थेचे, राज्ययंत्रणेने ठरलेल्या मार्गांत व ठरलेल्या अर्थाने. विशिष्ट सहकारी संस्था किंवा कोणत्याही स्तरावरील संस्थांचा गट यांचे नियमन राजसत्तेने करावयाचे नसून ते सहकारी व्यवस्थेनेच स्वतः करावयाचे आहे. नियोजित पद्धतीने नियोजित दिशेने सर्वांचा कारभार चालतो हे तपशिलात पाहण्याची जबाबदारी सहकारी व्यवस्थेची, हाच खरा स्वायत्ततेचा अर्थ; आणि वर सांगितल्याप्रमाणे सत्तेचे फाजील केंद्रीकरण शासनसंस्थेत होऊ नये याकरिता क्षेत्रशः सत्तेचे विकेंद्रीकरण म्हणजे क्षेत्राक्षेत्रांची स्वायत्तता रक्षिणे हेच होय....

सकृद्दर्शनी साध्या वाटणाऱ्या वादाची तात्त्विक भूमिका ही अशी आहे. दूरवर विचार करिता ही घट्ट टिकविणे महत्त्वाचे आहे. म्हणून सर्व सहकारी कार्यकर्त्यांनी व राजकारणातील पुढाऱ्यांनी ती नीटपणे समजावून घेतली पाहिजे. हे सुकर करणे एवढाच या त्रोटक लेखाचा हेतू.

शेंदुर्णीकर, ग. स., संपादक, *महाराष्ट्र राज्य सहकारी बँक–सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ*, (मुंबई, १९६२) पृ० ११–१४.

☆

# ७ . . राष्ट्रपतींची निवडणूक

राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीबाबत गेल्या तीन-चार महिन्यांत जी चर्चा व ज्या घडामोडी झाल्या त्यांमुळे राष्ट्रपतिपदाचे आपल्याकडील अवास्तव महत्त्व निश्चितपणे बरेच कमी झाले आहे. राष्ट्रपतिपदाची व्यवस्था भारतीय घटनेने केली ती विधिमंडळात सत्ताकेंद्रित असलेल्या इतर लोकशाही घटनांच्या अनुरोधाने केली. विधिमंडळात सत्ता केंद्रित केल्यामुळे सरकारी कारभार विधिमंडळास जबाबदार असलेल्या व त्यातील बहुमतानुसार बदलत असलेल्या मंत्रिमंडळाच्या स्वाधीन ठेवला जातो; परंतु कोणत्याही मंत्रिमंडळाचे स्थान शाश्वत नसल्यामुळे नित्याचा कारभार सुरळीत चालवायचा तर तो कोणातरी अन्य स्थिर पदाधिकाऱ्यांच्या नावाने चालविणे इष्ट व आवश्यक ठरते. याबाबतची व्यवस्था सर्व विधिमंडळ-सत्ताकेंद्रित लोकशाही घटनांत, ब्रिटिश राजा व पार्लमेंट यांच्याबाबत आधुनिक काळात निर्माण झालेल्या संकेतानुसार करण्यात आलेली आढळते. राजासारखे एक उच्चतम मानाचे पद निर्माण करून त्या पदाधिकाऱ्याची नियुक्ती विशिष्ट कालापुरती करावयाची व तिचा मूलतः अस्थिर असलेल्या मंत्रिमंडळाशी काही संबंध ठेवावयाचा नाही हे या व्यवस्थेचे स्वरूप आहे. लोकशाहीत वंशपरंपरा गादीवर येऊन आयुष्यभर काम करणारा राजा उपलब्ध नसल्यामुळे कोणत्यातरी लोकशाही पद्धतीने मर्यादित कालापुरती या उच्चतम पदाधिकाऱ्याची निवड करावी लागते. परंतु तो विधिमंडळ सदस्यांनी अथवा घटनेनुसार इतर कोणत्याही पद्धतीने निवडला तरी त्यास त्यामुळे विधिमंडळ अगर मंत्रिमंडळ यांच्यासारखे कोणतेही सत्ताधिकार मिळत नाहीत. तो केवळ नामधारी अधिकारी असतो; आणि त्याने आपले सर्व कार्य मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार करावयाचे असते.

## संकेतांचा फेरविचार

ज्या कोणास स्वतंत्रपणे काम करावयाचे उरलेले नाही अगर ज्यास प्रचलित कारभाराबाबत काही आग्रहाने उत्कटपणे सांगावयाचे नाही अशा मान्यवर सेवानिवृत्त व्यक्तीने भूषवावे असे हे राष्ट्रपतिपद आहे. राज्यपाल मालिकेतील ते उच्चतम पद आहे. घटनांतर्गत काही मोठे कार्य राष्ट्रपतीने करावयाचे आहे हा प्रचलित समज चुकीचा वाटतो. मुख्यमंत्री म्हणून कोणास पाचारण करावे ही बाब निश्चितपणे राष्ट्रपतीने ठरवावयाची हे खरे; पण याबाबत अनिश्चितता फार थोड्या प्रसंगी असणार आणि काही झाले तरी मंत्रिमंडळाचे अस्तित्व विधिमंडळ बहुमतावर अवलंबून असल्यामुळे राष्ट्रपतीच्या निवडीचे महत्त्व निर्णायक मानण्याचे कारण नाही आणीबाणीची परिस्थिती घोषित करून राजसत्ता हाती घेण्याचे अधिकार राष्ट्रपतीस केवळ राज्यसरकाराबाबत आहेत. केंद्रीय सरकाराबाबत त्यांस असे काही करता येत नाही; आणि राज्यसरकार हाती घेण्याचे

अधिकार खरोखर राष्ट्रपतीचे नसून केंद्रीय सरकारचे आहेत, हा आजवरचा अनुभव आहे. शिवाय काँग्रेस सरकारच्या अनियंत्रित हुकमतीच्या काळात या सत्तेचा ज्या तऱ्हेने वापर झाला तसा तो पुढे होऊ शकेल असेही वाटत नाही. श्री नंबुद्रीपाद यांचे पहिले सरकार बरखास्त करण्याबाबत जी कारवाई झाली, ती अनेक घटनातज्ज्ञांचे मते युक्त नव्हती. राजस्थानमधील अलीकडील घडामोडींमुळे राज्यपालाची नियुक्ती व राज्यपाल-राष्ट्रपतिसंबंध याविषयी अनेक संकेतांचा फेरविचार करणे प्राप्त आहे असे दिसून आले आहे. अलीकडील घडामोडींचा रोख राष्ट्रपति-राज्यपालपदाचे महत्त्व वाढविण्याकडे नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. कोणत्याच राजकीय पक्षास राष्ट्रपति-राज्यपाल यांचे एक निराळे सत्ताकेंद्र निर्माण व्हावे हे रुचणार नाही. राष्ट्रपतीची स्वतःची अशी खास कोणतीही कारभारयंत्रणा नाही व मंत्रिमंडळाच्या विरोधात सामान्य सरकारी यंत्रणेकडून होणार नाही असे त्यास काही करणे शक्य दिसत नाही.

कोणत्याच मंत्रिमंडळाचा कारभार स्थिर चालू शकला नाही किंवा लष्करी अधिकाऱ्यांनी राजसत्तेवर आक्रमण करण्याचे ठरविले तर काय, असे सर्व विचार घटना अपुरी पडते तेव्हाच्या परिस्थितीबाबतचे आहेत. अशा प्रसंगी राष्ट्रपती कोण अगर त्यांचे घटनांतर्गत अधिकार यांचे महत्त्व उरत नाही. प्राप्त परिस्थितीत जी व्यक्ती अगर शक्ती प्रभावी ठरेल ती प्रत्यक्ष सत्ता धारण करते. हे करताना परिवर्तनास शक्य तितके कायदेशीर स्वरूप दिले जाते व लोकांच्या संमतीने, लोकांच्या हिताकरिता, हे आहे असे म्हटले जाते, पण अशा देखाव्याने कोणी फसत नाही.

## राष्ट्रपतीचे कार्य

भारतीय राष्ट्रपतीस स्वतः कोणताही राज्यकारभार करावयाचा नसतो. राज्यपाल नेमणे अगर विशिष्ट राज्यात आणीबाणीची परिस्थिती घोषित करणे हे त्यास पूर्वसंकेतानुसार कोणाच्या तरी सल्ल्याने करावयाचे असते. प्रसंगी एखाद्या विधेयकास संमती न देता काही मुद्द्यांचा फेरविचार करण्याकरिता ते परत पाठविणे एवढ्या एकाच अधिकाराचा अंमल त्याच्या स्वतःच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. पण हाही त्यास वारंवार करता येण्याजोगा नाही. तज्ज्ञ कायदेपंडित तो असण्याची काही आवश्यकता नाही. घटनेत त्याने वरिष्ठ न्यायालयाचा सल्ला वाटेल तेव्हा घ्यावा अशी स्पष्ट तरतूद केली आहे. तेव्हा वरिष्ठ न्यायालयाहून वेगळा असा घटनेच्या कलमांचा अर्थ लावणारा राष्ट्रपती निघाल्यास अनावस्था प्रसंग निर्माण होईल. मुख्य म्हणजे स्वदेशात व परदेशी वकील व इतर मानकरी त्यांच्या बरोबरच्या संबंधात राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणे हेच राष्ट्रपतीचे काम. स्वदेशातील राजकीय अंतःप्रवाहांची माहिती असली, राजकारणी व सार्वजनिक जीवनातील इतर पुढारी यांची थोडीबहुत प्रत्यक्ष ओळख असली, व परराष्ट्रातही बोलबाला असला तर हे काम सुकर होईल. म्हणून अशाची निवड करावी हे उचित. शिवाय ही जागा बहुमानाची, योग्य सेवानिवृत्त पाहून त्यास द्यावयाची असे म्हटल्यास त्याची सेवा प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रात झालेली हवी. सेवानिवृत्त सरकारी अधिकारी अगर न्यायाधीश यांना राष्ट्रपती करू नये असा संकेत सर्व पक्षांनी मान्य केला, अशी मध्यंतरी बातमी आली होती. याच्या पाठीमागील विचार हाच असावा की, ज्याने नोकरी किंवा इतर स्वतःचा व्यवसाय एवढे जन्मभर केले तो या बहुमानास पात्र नाही. शिवाय ज्याने एखाद्या तरी सार्वजनिक क्षेत्रात अनेक वर्षे काम केले नाही, त्याला राष्ट्रपतीपद योग्य रीतीने सांभाळण्यास लागणारा अनुभव व ज्ञान हीही नसणार.

## डॉ. झाकीर हुसेन यांची उमेदवारी

डॉ. झाकीर हुसेन यांच्या उमेदवारीविषयी एक दोन-गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. ते या

क्षेत्रात नव्याने शिरत नाहीत. उपराष्ट्रपती म्हणून त्यांची निवड झाली तेव्हाच ते राष्ट्रपती होण्याचा संभव निर्माण झाला. मध्यंतरी पाकिस्तानबरोबर झालेल्या वेबनावामुळे लोकमतात काही फरक पडला असे मानले तर निराळे. पण असे झाले तरी त्यांचे नाव पुढे येईल व त्यास बराच पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा गेल्या निवडणुकीत काँग्रेसपक्षाची मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष पीछेहाट होईपोवेतो सार्वत्रिक होती. या पीछेहाटीमुळे अनेक घडामोडी झाल्या. काँग्रेस प्रमुखांपैकी काहीस नवे सुचू लागले. असे झाले तरी डॉ. झाकीर हुसेन यांची उमेदवारी यथाक्रम आहे असेच मानले पाहिजे. अलीकडील वादंग निर्माण झाल्यावर त्यांच्याबद्दल आक्षेप घेण्यात आले. काहींनी ते विकलांग आहेत असे म्हटले अगर उपराष्ट्रपती म्हणून आणखी पाच वर्षे राहण्यास नकार दिला म्हणून त्यांजवर ठपका ठेवला. राज्यसभेत त्यांचे दैनंदिन काम पाहून ते विकलांग नाहीत असे मी खात्रीने सांगू शकतो; तसेच राज्यसभेतील अध्यक्षांचे काम इतके जिकीरीचे, कटकटीचे, बरेचसे निरर्थक वाटावे असे आहे की, कोणीही सुज्ञ माणसाने आणखी पाच वर्षे नको म्हटल्यास मी त्यास बिलकुल दोष देणार नाही. त्यांच्याविरुद्ध दोन प्रमुख आक्षेप म्हणजे ते काँग्रेसपक्षाचे उमेदवार आहेत व ते धर्मनिष्ठ मुसलमान आहेत हेच होत. तेव्हा काँग्रेस विरोधकांनी किंवा ज्यांना राष्ट्रपती मुसलमान असणे अनिष्ट वाटते त्यांनी त्यांना मते न दिली तर आश्चर्य नाही.

या निवडणुकीत निधर्मीपणाचा गैरलागू मुद्दा उपस्थित करण्याबाबत केवळ काँग्रेसला दोष देता येणार नाही. विरोधीपक्षांनीही दोन उमेदवारांपैकी एक मुसलमान हवा अशी भूमिका आग्रहाने घेतली. नबाब अलीयावर जंग यांनी नकार दिल्यावरही दुसरा मुसलमानच शोधून काढला. तेव्हा डॉ. झाकीर हुसेन यांची उमेदवारी यथाक्रम मानल्यास मुसलमानांबाबतचा आग्रह विरोधकांचाच अधिक उत्कट वाटतो.

श्री सुब्बाराव यांची निवड विरोधकांनी एकमुखाने केली. श्री सुब्बाराव यांनी कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रात आजवर विशेष काम केलेले नाही. न्यायालयाबाहेर कोणत्याही सार्वजनिक प्रश्नावर स्पष्ट अगर उत्कट मतप्रदर्शन केले नाही म्हणूनच अशी निवड होऊ शकली, हे उघड आहे. निर्गुणत्व असले म्हणजे गुणावगुणाबाबत वाद निर्माण होत नाहीत. श्री सुब्बाराव हे उघड एका फळीचे उमेदवार आहेत. डॉ. झाकीर हुसेन हेही प्रसंगवशात पक्षीय उमेदवार बनले आहेत. तेव्हा जरी, माझ्यामते डॉ. झाकीर हुसेन यांनी शिक्षण आणि इतर क्षेत्रांतील आपल्या दीर्घकालीन कामगिरीमुळे आपली लायकी बऱ्याच अंशी सिद्ध केली असली, तरी त्यांची आता निवड होणार ती पक्षीय उमेदवार म्हणूनच हे खरे. यामुळे या पदाचे महत्त्व पूर्वीपेक्षा काही झाले तरी पुष्कळच कमी होणार हे उघड आहे.

## समाजधुरीणांची जबाबदारी

या सर्व प्रकारात अनेकांना जी खंत वाटते ती उमेदवाराच्या निवडीबाबत नसून या घडामोडीत जे राजकीय जीवनाचे दर्शन घडले त्याबाबत. पण येथेही हा विचार केला पाहिजे की, आता जे बोचते ते काही नवीन नाही; आपली चिकित्सक दृष्टी ही नवीन आहे. कोणत्याही समाजजीवनात दूरगामी धोरण, निकोप प्रवृत्ती, इष्ट संकेत यांचे महत्त्व फार असते. या गोष्टी कल्पिणे, रुजविणे, पोसणे, हे समाजधुरीणांचे खरे कार्य. स्थिरधुरीणत्व, अनुकूल परिस्थिती व पुरेसा कालावधी हे सर्व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात १५ वर्षे तरी होते. पण एवढ्यात याबाबत योग्य दिशांनी कार्य होऊ शकले नाही ही खेदाची गोष्ट आहे. पं. नेहरूंच्या नेतृत्वाच्या काळातच केरळमधील घटनात्मक दृष्ट्या विवाद्य व उघड स्वपक्षपाती उलाढाल झाली. पट्टम थाणु पिल्ले, छगला, अशोक मेहता इत्यादिकांस

याच वेळेस उच्चपदाचे विलोभन दाखविले गेले. कृष्ण मेनन संरक्षणमंत्री व स. का. पाटील अन्नमंत्री याच काळात नेमले गेले. बक्षी, कैरो, पटनाईक यांस आसरा एव्हाच मिळाला. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे तर भाटघर आचारसंहितेची घडण व दुर्दशा दोन्ही याच काळात झाल्या. काँग्रेसपक्षाविरुद्ध जर काही मोठा आक्षेप घेण्यासारखा असला तर तो हाच की, अबाधित सत्ता असताही दीर्घकालीन हितकर धोरण बांधणे, निकोप वृत्ती जोपासणे, इष्ट संकेत स्वीकारून स्थिरावणे यांपैकी त्यांनी काही साधले नाही, साधू पाहिले नाही. बहुतांशी पक्षनिविष्ट स्वार्थी भूमिकेवरूनच कार्य केले. आता तर सर्वच पक्ष दुर्बळ, पेचात सापडलेले आहेत. तेव्हा संकेत व मर्यादापालन यांचा विशेष विचार न करता तात्कालिक फायद्याच्या दृष्टीने सतत सर्वच वर्तन राहिले तर आश्चर्य नाही. सद्यःस्थिती-बाबतची जबाबदारी केवळ राजकीय पुढाऱ्यांची आहे असे मी मानत नाही. इतर क्षेत्रांतील कार्यकर्ते हे आजवर राज्यकर्त्यांवर फाजील विसंबून राहिले आणि त्यामुळे स्वतंत्र प्रभाव सार्वजनिक जीवनावर पडू शकला नाही. याबद्दल तेही दोषास पात्र आहेत. या इतर क्षेत्रांतील चढाओढ राजकारणाइतकी तीव्र नसते, व त्यात तात्कालिक विचारास इतके महत्त्व न दिले तरी चालते हे ओळखून आजवर जे घडले नाही ते घडवून आणण्याचा स्वतः प्रयत्न करणे व त्या दिशेने राजकारण करण्यास प्रवृत्त करणे हे प्रत्यक्ष राजकारणाबाहेर जे आहेत त्यांचे आज मोठे निकडीचे कर्तव्य आहे असे मी समजतो.

केसरी, ५-५-१९६७.

☆

# ८ . . लोकमान्यांचे राष्ट्रीय एकात्मतेविषयीचे विचार

कोणताही राष्ट्रीय नेता तत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगानेच आपल्या सामाजिक आणि राजकीय धोरणांची सूत्रे निश्चित करीत असतो. आपला दृष्टिकोन लोकांना मान्य होऊन आपल्या धोरणास पाठिंबा मिळावा याच हेतूने तो परिस्थितीचे आणि धोरणाचे विश्लेषण करीत असतो. हे विश्लेषण थोड्याफार फरकाने नंतरच्या बदललेल्या काळास आणि परिस्थितीस लागू पडते किंवा नाही यावर त्यांच्या विचारांची खोली आणि सूक्ष्मता अजमावली जाते.

## राष्ट्रीय एकात्मकता

राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात लोकमान्य टिळकांना असलेल्या अडचणी आणि आज आपल्यापुढे असलेल्या अडचणी यांत बरीच तफावत आहे. लोकमान्यांचे आयुष्य राष्ट्राला जागे करून, संघटित करून स्वराज्याचा आवाज उठविण्यात गेले. गेली वीस वर्षे आपण स्वातंत्र्य अनुभवीत आहोत. आजच्या परिस्थितीत लोकमान्यांचे राजकीय आणि राष्ट्रीय एकात्मतेबद्दल विश्लेषण महत्त्वाचे ठरले आहे. या विषयावर लोकमान्यांचे विचार त्यांनी १८९६ साली 'केसरी'त लिहिलेल्या एका लेखमालेत प्रकर्षाने व्यक्त झाले आहेत. या लेखमालेत एकूण सात लेख आहेत. ब्राह्मणांच्या शिक्षणासंबंधीच्या एका पुस्तकावर टीका करण्याच्या उद्देशाने त्यांनी हे लेख लिहिले. त्या काळातील शिक्षणातील पद्धतीमुळे ब्राह्मणांच्या शारीरिक क्षमतेचा आणि बुद्धिमत्तेचा ऱ्हास होत गेला असा दावा या पुस्तकात लेखकाने केला होता. लोकमान्यांनी त्याचे खंडन केले. प्रथम त्यांनी असे गृहीत धरले की, परिस्थिती आणि सामाजिक नेतृत्व, कर्तृत्व यांचा निकटचा संबंध आहे. सर्वस्वी अनुकूल परिस्थितीमुळे अठराव्या शतकात महाराष्ट्रातील सर्व जाती-जमातींतून कर्तृत्ववान माणसे उदयास आली हे त्यांनी दाखवून दिले. शंभर वर्षानंतर शारीरिक आणि बौद्धिक क्षमता तेवढीच असूनही बदललेल्या परिस्थितीमुळे मराठ्यांना आपल्या वाडवडिलांप्रमाणे कर्तृत्व गाजविता आले नाही. या काळात शिवाजी जन्माला आला असता तर तो फार तर सुभेदार-मेजरच्या हुद्द्यापर्यंत पोचला असता. परकीयांच्या वर्चस्वामुळे येथील बुद्धिजीवी, शिपाई, व्यापारी वगैरे सर्वच वर्गाची स्वतःची उन्नती करून घेण्याची शक्ती मर्यादित झाली होती. या सर्व विश्लेषणातून साहजिकच परकीयांच्या दास्यातून मुक्तता करून घेण्याचा उपाय पुढे आला. त्यासाठी जे प्रयत्न करावयाचे त्यांच्या संदर्भातच लोकमान्यांनी सामाजिक आणि राष्ट्रीय ऐक्याची जरुरी प्रतिपादिली.

अनेक जाती-जमाती, भाषिक गट यामुळे विभागल्या गेलेल्या भारतीय समाजास संघटित करण्याच्या दृष्टीने लोकमान्यांनी दोन मुद्द्यांवर भर दिला. पहिला म्हणजे केवळ राजकीय आणि सामाजिक नव्हे, तर सर्व आघाड्यांवर प्रगती करणे. सर्व वर्गांच्या परिस्थितीत सुधारणा होईल असे प्रयत्न करणे आणि

दुसरा म्हणजे शिक्षित वर्गावर येणारी जबाबदारी. इतरांना मागे टाकून आपण पुढे जाण्यापेक्षा सर्वांनी मिळून पुढे जाणे याला महत्त्व होते. त्यासंबंधी लोकमान्यांनी लिहिले होते :

"जें कांहीं आपल्याला करावयाचें आहे, तें सर्व जमातींच्या व सर्व प्रांतांच्या लोकांसाठीं केलें पाहिजे. तसें करतांना त्यांना आपल्याबरोबर घेऊन त्यांच्या मदतीनेंच करणें शक्य आहे."

लोकमान्यांच्या या सूत्राची 'एकात्मता म्हणजे काय' यापेक्षा अधिक फोड करण्याची गरज नाही.

इंग्रजी शिक्षणामुळे निर्माण झालेला अहंकार आणि उद्धटपणा सुशिक्षितांनी सोडून दिला पाहिजे, असे लोकमान्यांनी परखडपणे बजावले. सर्व थरांतील लोकांशी मिसळून वागणे, त्यांच्यातच राहाणे, इतकेच नव्हे तर त्यांच्या मागे राहाणे आवश्यक असून तसे केले तरच त्यांची परिस्थिती समजेल आणि त्यांच्या सुधारणेची दिशा कळून येईल. पारतंत्र्याच्या काळात वैयक्तिक किंवा एखाद्या गटाच्या प्रगतीला वाव नाही. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांनीच परकी सत्ता उलथली जाऊ शकते. सर्वांची सारखी प्रगती झाल्यानेच हे ऐक्य निर्माण होऊ शकते असे बजावून लोकमान्यांनी त्याची जबाबदारी सुशिक्षित वर्गावर टाकली. सर्वांच्या विषयी सहानुभूती आणि स्वार्थत्याग यांचे दर्शन, नेतृत्व समाजास देण्याची जबाबदारी या वर्गाची आहे, असा लोकमान्यांचा दावा होता.

१८९६ नंतरच्या काळातील लोकमान्यांच्या लिखाणावर याच विचारांचा पगडा आहे. इंडियन नॅशनल कॉंग्रेस जनताभिमुख करण्याचे त्यांचे प्रयत्न, बंगालच्या फाळणीविरुद्ध चाललेल्या चळवळीस त्यांनी दिलेला पाठिंबा, त्यांचा स्वदेशीचा आणि राष्ट्रीय शिक्षणाचा प्रचार, स्वराज्य हेच ध्येय ठेवण्यावरचा त्यांचा आग्रह आणि निरनिराळे राजकीय आणि धार्मिक गट कॉंग्रेसमध्ये समाविष्ट करण्याचे त्यांचे प्रयत्न त्यांच्या मूलभूत सूत्राशी सुसंगत असेच होते. घटनात्मक पुनर्रचनेसंबंधी त्यांनी केलेल्या सूचनांतही त्यांचे हे विचार उतरले होते. १९०८ साली विकेंद्रीकरणावरील रॉयल कमिशनला सादर केलेल्या निवेदनात त्यांनी भाषा आणि मानववंशशास्त्र यांचा विचार करूनच प्रांतांची पुनर्रचना करणे आवश्यक आहे, असे ठामपणे म्हटले होते. १९१६ साली लखनौ कॉंग्रेसमध्ये स्वातंत्र्याच्या ठरावावर बोलताना त्यांनी सांगितले, 'जेव्हां तिसऱ्या पक्षाबरोबर लढायचें असतें तेव्हा राजकीय मतभेद किंवा अन्य बाबींचा विचार न करतां एकाच व्यासपीठावरून सुसंघटितपणें आवाज उठविला पाहिजे.' हिंदुमुस्लिम कराराचा उल्लेख करून ते म्हणाले, आपण मुस्लिमांच्या ज्या मागण्या मान्य केल्या आहेत त्या वाजवीपेक्षा जास्त आहेत असे म्हणता येणार नाही.

देशातील समाजाच्या कोणत्याही भागास हे हक्क मिळाले तरी चालतील; कारण तो भाग आणि उर्वरित भाग यांच्यांत संघर्ष निर्माण होईल, आजच्यासारखा 'तिरंगी' संघर्ष त्यावेळी असणार नाही.

लोकमान्यांची राष्ट्रीय ऐक्याची कल्पना अशा रीतीने वास्तव परिस्थितीवर आधारलेली होती. बहुविधता त्यांना अपेक्षित आणि मान्य होती. सर्वांच्या भावना समजावून घेणे, त्यांची अधिकाधिक पूर्ति करणे हा एकता निर्माण करण्याचा मार्ग आहे अशी त्यांची धारणा होती. ज्यांना नेतृत्व करावयाचे आहे त्यांनी समाजातील सर्व थरांशी, बहुजनसमाजाशी समरस आणि एकरूप झाले पाहिजे. लोकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या दूर करण्यासाठी शक्य तेवढे प्रयत्न केले पाहिजेत. तसे करू अशी त्यांची खात्री पटविली पाहिजे. लोकमान्यांचा हा दृष्टिकोन मला योग्यच वाटतो आणि त्यामुळेच बहुविधता मान्य करण्याचा स्थानिक जनतेचा न्याय्य हक्क मान्य करण्याचा आणि शक्य तेवढ्या त्वरेने प्रादेशिक व वर्गीय विषमता नष्ट करण्याचा श्रीनगर येथील राष्ट्रीय एकात्मता परिषदेचा निर्णय मला स्वागतार्ह वाटतो.

*केसरी*, २३–८–१९६८.

☆

# सूची


अंदाजपत्रक : १८२, २०७, २२४–२६, २८४, ३६०, ३७६, ३९६
ॲक्टन : ४५३
ॲग्रिकल्चरल ॲडजस्टमेंट ॲक्ट : ५५, ३०१
अटलांटिक सनद : ३१७
ॲडम स्मिथ : १५९, १६१, १६४
अनिर्बंध व्यवहार : १६७–७०, २६४, २९३, २९४, ३०४–०५, ३०७–१०
अर्थकारण–तुटीचे : ३९९, ४०१
अर्थव्यवस्था : २८७, ३१७, ३२३, ३२८, ३३२–३४, ३३७, ३४५, ३५६–५७, ३६५, ३६८, ३७१–७२, ३८७, ३९४, ३९७, ४०१–०२, ४०४, ४५०, ४५८
अर्थव्यवहार : २६५, २६८, २७०, २७३, २७४, २८०, २८७, २९१, २९३, २९६, ३०५, ३०९, ३१९, ३२१, ३२५, ३३१, ३३३, ३४०, ४१४–१५, ४५९
अनिर्बंध १३६, ३५७
तुटीचा २६९
अर्थशास्त्र–हिंदी (भारतीय) : १४३–४४, १४९–५२, १५४, १५७–५९, १६२–६३, १६५, १७०–७१
अर्थसंकल्प–तुटीचा : २७३
अर्थसत्ता : ४०४
अर्विन : १९९, २०३
अलुते–बलुते : ८०, ९३, १००, १४९
अल्पबचत योजना : २७९
अल्पोद्योग : ३४६–४७, ४१७
अशोक मेहता समिती : २६७, ४०३, ४०४
अहमदाबाद गिरणी मालक संघ : २२९

आंतरराष्ट्रीय चलनमंडळ : ३७३
आंतरराष्ट्रीय बँक : ३७०–७१, ३७३
आंतरराष्ट्रीय बाजार : ४०३
आंतरराष्ट्रीय व्यापार : ३७१, ३७३
आंतरराष्ट्रीय : पाहा, 'सार्वराष्ट्रीय'
आंबेडकर, डॉ. : ४४१–४३
आकस्मिक संकटकाल : ४४२
आगरवाल, पी. पी. : ३८१–८२, ३९२, ३९५
आपटे, दत्तोपंत : १८०, १८५
आर्थिक नियंत्रण : ३१४, ३२१
आर्थिक विकास : ३२४–२७, ३३६, ३४१, ३४७–४८, ३६१, ३६४–६५, ३६७–७०, ३७२–७५, ३७९–८१, ४०३, ४०५, ४१६–१७, ४२३, ४२५, ४५७
आर्थिक विषमता : ३१५, ३१७, ३२८–२९, ३३३, ३५४, ३६५, ४००–०१

इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट व कंट्रोल बिल : ३५२–५३
इंडस्ट्रिअल पॅनेल : ३५८
इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन : ३५९
इंदापूरचा दंगा : ४५२
इंपीरियल प्रेफरन्स : १५२, १५५
इंपीरियल बँक : १३२, २१२, ३५६
इतिहास संग्रह : ८१, ८८, १९२

इरविन, लॉर्ड : २०७
इरिगेशन कमिशन : ३४३
इरिगेशन सेस : ३५६

ईस्ट इंडिया कंपनी : ८४, ११९, १२८

उदीमसंघ : ९०
उत्पादक संघ : २९७, ३०३, ३०८–०९
उत्पादकांची सहकारी संस्था : २४९
उत्पादन : ३६३, ३८०, ३८८, ४०२–०३, ४०५, ४०९
अनिर्बंध २९२
तंत्र ३६६-६७, ४२६
पद्धती ३३४
योजना ३३०, ३४९, ३५४
वाढ ३१४, ३३८, ३४०, ३४५, ३५१, ४१२, ४१८
विकास-योजना ३५४
व्यवस्था ३३४, ३५४, ३६६
शक्ती ३३६–३७, ३५४, ३८०
साधन २९१, ३३६–३७, ३६७, ३८०, ४१३
सामर्थ्य ३३७, ३५२, ३५७
क्षमता ३२१–२२, ३३७–३९, ३४६–४७, ३६५–६७, ३७०, ३७२, ४१५
उत्पादनाचे नियंत्रण : ३५२
उद्योगधंदे : छोटे ३८५, ४१५ ४२३
मोठे ३५३, ४२३, ४२६
लहान व घरगुती ३४६, ३५३, ३८६
उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण : ३५९
उद्योगवाढीचे नियंत्रण : ३६०
उपप्रांत : ४२९–३०, ४३३, ४३८–४०

एक्सचेंज बँका : १३१–३२, १३६
एक्सपोर्ट-इंपोर्ट बँक : ३७३
एल्फिन्स्टन : ४४९–५०
ऐतिहासिक टिपणे : १९२

ओटावा करार : २१५, २२९

औद्योगिक उत्क्रांती : ५, ६
औद्योगिक उत्पादन : २९५, ३४७, ३५४, ३९९
औद्योगिक कमिशन : १३७, १५४
औद्योगिक क्रांती : ८०, ८४, १३४, १३८, २९२, ३६५, ३६७
औद्योगिक माल : ३५३, ३५५, ३७२
औद्योगिक व व्यापारी क्रांती : १३९
औद्योगिक वाढ : ३४७–४८, ३५३, ३६५
औद्योगिक विकास : ७०, ३२१, ३३७, ३४४–४६, ३५१–५३, ३६०, ३६८, ४०४, ४०६, ४२४
औद्योगिक विकास व नियंत्रण कायदा : ३५२
औद्योगीकरण : १४७, २६०, २६२, ३६५, ३६७–६८, ३७१, ४०४–०५, ४२३–२५
ग्रामीण ४१६, ४२३–२६

कंपनी कायदा : २३८, २४०
कंपनी सरकार : ८५, ८६, १०५
कॅनन, डॉ. : १६७
कम्युनिस्ट : ३१९, ३३२, ३३४, ३३९, ३७३–७४
कर : २८५–८६, ३१९, ३२५, ३२९
अप्रत्यक्ष ४०४
आकारणी ३६०, ३६८
कंपन्यांवरील २८६
पद्धती १५२, १६१, ३३३
प्रत्यक्ष २८५, ३२८, ३६८–६९, ३७५, ४४०
प्राप्तीवरील ११, २०५–०६ २८६–८७, ३५९
फायद्यावरील २८७
भार २८५, ३७६
महाकर २०५, ३५९
योजना २८०, २८७–८८, ३२४–२५, ३६९
वाढ २८४–८८, ३९९
वारसा ३६२, ४४०

विक्री २८५, ४४०
करचौकशी कमिटी : १६१
कर्वे, प्रो. : १५७–५८, १६२, १८८
कारटेल्स : २९८
काँग्रेस : ७, १०, ३१९, ३२१, ३२५, ४४५, ४६२–६४, ४६६
कॉम्युनिस्ट पक्ष : ७३, ७४, ३१८
कायमधारा : १०१
कायमधारा पद्धती : १७५
कावसजी, जहांगिर : १०, १४
काळे, प्रो. वा. गो. : १५७–५८, १६२, १८०, २२२
किंमत : नियंत्रण ३५४, ३८६
वाढ ६६, ३५४–५६
किदवई, श्री. : ३९३
कूळकायदा : १७३, १७६, २४३, २४५, २४८–५०, २५२, ३३१
कूळ वहिवाट : २४९–५१,
कूळ हक्क : २४८, २५०, २५२
कृषिउत्पादन : ३३०, ३३९, ३४१
कृष्णा–गोदावरी : ४०९, ४११
केंद्रीकरण : ३३७, ३५६–५८, ४००, ४५२, ४६०
केतकर, डॉ. श्री. व्यं. : १४३–५०, १५४, १६८, १७०–७१, १८०, १८६, १९४
केन्स, प्रो. : १९, १५०, १६९, १७१, ३०६
कोड ऑथॉरिटीज : ३०८
कोयना धरण : ३४४
योजना ३४५

खादी : २०९–१०
खुला व्यापार : १६७, २८१, ३०२, ३०५

गंगाजळी : १३, २६१, ३९१
गॅझेटियर ऑफ दि बॉंबे प्रेसिडेंसी : १८३, १८७, १९०, १९२
गांधी, महात्मा : ७, १९९, २०७
गावगाडा : ८०, ४५०
गुल्हाटी कमिशन : ४११
गोलमेज परिषद : ७–९, १२, १३, १५
ग्राम : उत्पादन मंडळ : ३४९
दान २४१, २४४–४८ २५१–५९
पंचायती ४५७
राज्य ४०७
विकास २५८
व्यवस्था २५७, ४४९
व्यवस्था मंडळ २४६
संकल्प २५२, २५७
संस्था ८०, ८२, ८३, ९३, १००, १३६, १७७, १८५, २०७, २४७–४९
सभा २४७
समाज २४४–४५, २४८–४९, ४५६
सुधारणा २०४
ग्रामदानी गाव : २४५, २५३
ग्रामाधिकारी : ८२, १८२, ४४९, ४५१
ग्रामीण कर्जपाहाणी : १७७, ३८६
ग्रामोद्योग : २५१, ३४७

घटक प्रांत : ४२९, ४३०, ४३२
घटक राज्ये : ४४१–४२
घटना कायदा : ४३९
घटना समिती : ४३३–३५
घरबांधणी ६१–६३, ३५९

चतुःसूत्री : ४४४, ४४६–४७
चलन : १८७, २६८
कागदी २६, २७, २९, ३०, ३५, ३८, ३९, ४५, १३१, २१८
निर्मिती २७३
पद्धती ८, ११–१३, १५–१७, २१, २३–२५, २७, २९–३१, ३३–३८, ४०, ४४, ४६, ४८, ५०, ५१, १२८–३२, १५२, १५३, १५५, १६१, २१६–१८, २९५
मूल्य ३९९
वाढ २६२, २७०, २७१, ३५३–५४, ३६२, ३६८, ३७७, ३९९

वृद्धी ६६, २६५, २६८–७०, २७३, ३१२, ३८५
व्यवस्था २१४, २९५
चलनविषयक धोरण : ४१३
चलनी नाणी : १०३, १२८–३०
चलनी नोटा : ११, ३२
चांदी परिषद : ४८–५०
चाफेकर, ना. गो. : १८०, १८८
चालक-मंडळ : २३१–३३, २३५, २३७, २४०
चिनी क्रांती : ७४
चौथाई–सरदेशमुखी : १९४

जकात : ५८, १८२, १८९, २१०, २२८, २२९
अंतर्गत २२६
आयातीवरील २२५–२६, २२९
निर्बंधक ६०
निर्यातीवरील २२६
संरक्षक ५९, ११५, १२०, १२३, १३६, १३७, २१२, २२१–२३, २२९–३०, ३०२, ३०४, ३५९, ३६१
जकात कमिशन : १३७, १६१, २२१–२३
जकात मंडळ : ११५, ११८–२३, २२८, २२९
जठार व बेरी : १५१–५६
जमिनीचे पुनर्धारण व पुनर्वितरण : २४७, २५१
जमिनीचे फेरवाटप : २४७
जमिनीचे संकलन : २४६–४७
जमीनदारी : ८३, १०१–०२, २४३, ३४९, ३६५
जमीन महसूल : ८३, १०१–०४, ११०, १४९, २५२, २८७, ४०८, ४३०, ४३६, ४३७, ४४०, ४४९
जमीनसारा : १५५
जमीन सुधारणाविषयक कायदे : २४२, २४९, २५२

जलविद्युत् निर्मिती : ४०९
जलसंपत्ती : ४०८, ४०९
जॉईंट स्टॉक कंपनीज : २९३
जिना, बॅ. : ८, १०, १२, १४
जिल्हाधिकारी : ४५१, ४५४
जिल्हा परिषद : २७४–७५, ४१२–१३, ४२०–२२
जिल्हा बँक : ४५४
जिल्हा लोकल बोर्ड : २०२–०३, ४५७
जीवनमान : पाहा, 'राहणीचे मान'

टॅरिफ बोर्ड : २१२
टिळक, लोकमान्य : १७२, १७४–७७ ४४४–४७, ४६५–६६

डॉज योजना १७, १८, ३५
डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलीफ ॲक्ट : १११

तंत्रमुक्ती : २५९
ताता, जमशेटजी : ११९, २१२
तेजी : ३४–३७, ४२, ५८, ६५, ११८, २१४, २१७, २६४, ३२९, ३३०, ३३४
तेजी–मंदी : ३४, ९७, १३०, २१६, ३०५–०६, ३१७

दत्त, श्री : १०३, १७३, १७५
दरडोई उत्पन्न : २६५, ३३८, ३९९, ४०१, ४०२
दळणवळण : ३६६, ४०६, ४१३, ४३९
दुल्लभशेठ, गोविंदजी : १८८, १९२, १९३, ४५०
दुष्काळ : ८९, १०२–०५, ११३, १२९, १३३–३५, ३११, ३१४, ४१७, ४५०
कमिशन १०४–०५
दुर्गादेवीचा ८८
निवारण १०५–०६, ३४३
देसाई, मुरारजीभाई : २६०, २७७, २८४, २८६–८८

धरणयोजना : ३८८

धान्यवसुली : ३१२

नगरशेठ : ९०,१९१–९३, ४५०, ४५२
नॅशनल रिकव्हरी ॲक्ट : ५२–५५, ३०१
नागरसंस्था : १८५
नाझी : २९६–९९, ३१२, ३२०–२३
नियंत्रणे : २९१–९२, २९६–९९, ३०६, ३११–१५, ३१८, ३२०–२५, ३२८, ३३३–३५, ३४९, ३५२, ३५९, ३६३, ३६९, ३७७–८०, ३८३–८५, ३९९, ४०२–०३, ४३०, ४५०
नियमन : २९९, ३००–०१, ३४०, ३४९, ३५१, ३६१, ३७८, ३९२
नियमित विनियंत्रण : ३९३
नियोजन : ७१, २६४, २६७, २७०, २८१, २९१–९६, २९८, ३०२–११, ३१४, ३२५, ३४७, ३५१, ३६३–६४, ३६६, ३७४–७५, ३७७–८४, ३८८, ३९०, ३९९, ४०२, ४०५–०६, ३०८, ४१०, ४१२–१४, ४१६, ४१९–२३, ४३०, ४३८
अमेरिका ३००–३०२
इंग्लंड ३०२–३०४
जर्मनी २९६–३००
नियंत्रण ३००, ३१५, ३१९, ३२१–२२
नियोजन मंडळ : २६६, २७४–७५, २८०, ३४३, ३४९, ३५१–५६, ३५८, ३६६, ३६८, ३७९–९८, ४०४, ४१०, ४२१, ४२२, ४२६
नियोजनाचा व्यूह : ४१८
नियोजित अर्थव्यवस्था : २८२, ३१७, ३१९, ३९९, ४५२, ४५७–५८
नियोजित आर्थिक विकास : ३६५, ४०९
निर्यात संवर्धक मंडळे : २६२
निसर्गसंपत्ती : ४१५–१७
नेहरू रिपोर्ट : ८, ९, १३–१५
नैसर्गिक साधनसंपत्ती : ३४७, ३६५, ४०५, ४०८, ४१०
नोकरशाही : ४५५
नौरोजी, दादाभाई : १७३, १८९, ४४४–४६

पंचायत राज्य : ४१७
पंडित, नलिनीबाई : १७३
पतपेढ्या : १२८, १५२–५३, १६५
पब्लिक लॉ ४८० : ४०१
परकीय भांडवल : २९६, ३६५, ३७४, ४२४
परदेशी भांडवल कमिटी : १४, १५
परकीय मदत : ३७४–७५, ३८३, ४२५
परदेशी चलन : २६०, ३७६
परदेशी हुंडणावळ : ३७६, ३९१–९२, ३९४, ४०१, ४०३
परराष्ट्रीय व्यापार : ८४, २२६, २९४–९५, ३०५, ३६१–६३, ३९२
पाटबंधारा कमिशन : १०६
पाटबंधारे : ३४५, ३४७, ३५६–५८, ३६३, ३६६, ३९९, ४१३, ४३९
पाटील, रा. कृ. : ७१, ७२, ७५
प्राथमिक मंडळ्या : ४५४
पाणीपुरवठा : ३४२–४६, ३५६, ३५८, ३८९, ४०९, ४१५, ४१७
पाणीवाटप : ३५७, ४०९
पेढी : १९३, ३३८, ३७१
पेशवे दप्तर : १७९, १८१, १८४, १८७, १८९
प्रांतांची पुनर्रचना : ४३३, ४६६
प्रांतिक सरकार : ३१२, ३२४, ३३४, ३९४, ४३९, ४४१–४२
प्रादेशिक विकास : ३४४
प्रेसिडेन्सी बँका : १३१–३२

फिस्कल कमिशन : १४, १५, १२०
फेडरल कमिटी : १०, १२
फेडरल रिझर्व्ह बोर्ड : ४०, ४२

बँक ऑफ इंग्लंड : ४५, ३०४
बँक ऑफ फ्रान्स : ४०, ४४

बचत : २८४, २८७, ३१३-१४, ३४१, ३७०-७१, ३९९, ४०३, ४०५
योजना २७८-७९
सक्तीची २८६-८७
राष्ट्रीय २७६, ३२६, ३३८
बहिष्कार : ४४५-४६
चळवळ ११६
योग ४४४
बाल कॉन्फरन्स : ४२
बेकारी : ४२, ५३, ५४, ६९, १२७, १५३, १६८, २१८, २५७, २६५, २७३, २९५, २९९, ३००-०१, ३२६, ३२९-३०, ३५१, ३६२, ३७७-७८, ४०२, ४०५, ४०६, ४२५, ४३९
अर्ध ३६७, ३६९, ३७१, ४०५
बेकार-वेतन : ५५
बोहरी : १८७, २३४
ब्रेन, एफ. एल. : १९९-२०४

भांडवल : ३२६, ३७०, ३८०, ३८५
खेळते २३४-३५
पुरवठा २८७, ३२७, ३५६-५७ ३५९-६०
भांडवलदार : ३१५, ३२४-२५, ३३३, ३४०, ३५६, ३७१, ४०४
भांडवलशाही : ३१६, ३३२, ३३७, ३६९, ४५७
भांडवलाचे केंद्रीकरण : ४०६
भांडवलाची गुंतवणूक : २७१, २८७, ३७७, ३८९, ३९९, ४०१, ४०३
भांडवलवाल्यांचा संघ : २०९
भांडवली खर्च : ३२६, ३४८, ३५५
भांडवली नफा : ३२१
भांडवली बचत : ३२७
भांडवली विनियोग : ३३८, ३४२, ३४४-४७, ३६०-६१
भांडवली संचय : ३५६, ३६१, ३६९
भांडवली साधने : ३२६, ३४७
भागदार : २३१-३३, २३८-४०
भूमिहीन : २४६, २४८, २५४
भावनियंत्रण : २८०, २८६, ३११-१२, ३४८-४९, ३५४, ३६२, ४०४
भावमान : ४०३-०४
भाववाढ : २६२, २६४-६८, २७०, २७४, २८३, ३५०, ३५५, ४००-०२, ४०४
नियंत्रण २८६, ३२१, ३३०
भूदान : २४१, २४४, २४६-४७, २५४-५५

मंदी : ३४, ३६, ३८, ४०-४३, ४७, ५१, ५४, ५७-५९, ६१, ६२, ६४, ६५, ११५-१७, ११९, १२७, १४१, २१३-२१८, २३५, २६२, २७३, २८०-८१, २८३, २९५-९६, ३००, ३०२, ३०४, ३१७, ३२३, ३२९-३१, ३५५, ३५७, ४००
मॅकमिलन कमिटी : ४३
मक्तेदारी : ३६१, ३६५, ४०२
मजूर : कमिशन १२३, १२५-२६, १२८, २११
कायदे १७५
चळवळ १२७
विश्वस्त २९९, ३००
संघ ५, ३८, ५४, १२७, २९३, २९९
मध्यवर्ती औद्योगिक मंडळ ३५२
मध्यवर्ती कायदेमंडळ : १२, २२४, २२९
मध्यवर्ती पेढ्या : ११
मध्यवर्ती सरकार : ३१२, ३२४, ३३४
मध्यवर्ती बँक ऑफ जपान : ६७
महाजन : ९०, ४५२, ४५३
संस्था : १९०-९२
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक : ४५४
महाराष्ट्र स्वदेशी संघ : २१३
महाराष्ट्रीय ज्ञानकोश : १४३, १८०, १८६
महालनवीस, प्रा. : २८६-८८
मॉटफर्ड सुधारणा : ४२९
मॉटेग्यू सुधारणा : २०५
माजगावकर, श्री. ग. : २५५, २५७-५९

मार्क्सवाद : १६७–६८, १७६, १७९
मार्शल योजना : ३१८, ३७४
मालगुजारी : ८३
मिठाचा कर : ११, २०६
मिल्ल : १६४, १६७
मुंबई गिरणीमालक संघ : २२८–२९
मुंबई चेंबर ऑफ कॉमर्स : २३९
मुंबई भागदार मंडळ : २३७–३८
मुंबई योजना : ३१३
मुकर्जी, डॉ. : १४४, १५४, १५८
मे कमिटी : ४३–४५
मेनन, कृष्ण : ४६४
मेस्टन निवाडा : २०५

यंग-कमिटी : १७
यंग-योजना : १८, १९, २१
यंत्रोद्योग : ३५१, ३५८, ३६१
यहुदी राष्ट्रकेंद्र : ६४
युरोपियन अॅसोसिएशन : १३, १४
युरोपियन सोशलिस्ट : ४४९
योजना : ३१३, ३२०, ३२२–२३, ३२५–२८, ३५२, ३५४, ३६९, ३८१, ३८६–८८, ३९०, ३९६, ३९९, ४०२–४०४, ४०७, ४०९, ४१५–१८, ४२०–२१, ४२४
पंचवार्षिक ६६, २१९, ३४२, ३५८–६३, ३६६–६८, ३७०, ३७४, ३८१–८२, ३९०–९१, ३९४;
पहिली पंचवार्षिक ३४५, ३४८, ३५४, ३८३–८९, ३९१–९२, ३९४, ४००, ४१०, ४२४
दुसरी पंचवार्षिक २६२, ३७६, ३८३, ३८६–८९, ३९२
तिसरी पंचवार्षिक २६२, ३९९, ४१७
चतुर्थ पंचवार्षिक ४१३, ४२०–२१
प्रतिवार्षिक ३९१, ३९४
विकास ६८, २६५, २६९, २७३, २७५, २८४, ३२७, ३५५, ३५९, ३६३, ३६७ ३७१, ३९४, ४००, ४०९, ४१४, ४१६–१७
जिल्हा ४१२–१५, ४१७–२१
राज्यविकास २७२–७५
राष्ट्रीय विकास ३०८, ४१०, ४१२
सल्लागार मंडळ २३२, २७४–७५
योजनेचा आराखडा : ३४५, ३४७, ३६३, ४२१

रजिस्टर्ड फार्म्स : ३४९–५०, ३५७
रयतवारी : ८३, १०१–०२
रॅशनलायझेशन : ३५, ३६
राउंडटेबल : ४४२–४३
राजकीय हुकूमशाही : ३३२, ३३४
राजवाडे, वि. का. : १७८–८०, १८५, १८७, १९४
राज्यक्रांती : १८५, १८७
राज्यघटना : ९, २०६, ३३२, ३४२, ३५४, ३५८, ३६८, ४१२, ४३०, ४४१, ४४३
रानडे, न्या. : १००, १५१–५२, १५८, १६३–७३, १७६, १७८–८०
रॉबिन्स, प्रो. : १६७, ३०७, ३१०
रॉयल कमिशन : ४६६
राष्ट्रपती : ४४१–४२, ४६१–६३
राष्ट्रसंघ : २०, २१, ५६, ५९, २९४, ३४१, ३७०, ३७३
राष्ट्रीय उत्पन्न : २६५, ३२६–२७, ३३८, ३६०, ३७०, ३९९, ४०५
राष्ट्रीय उत्पादन : २७०, २७८, ३१३–१४, ३२६
राष्ट्रीय एकात्मता : ४११, ४६५–६६
राष्ट्रीय कर्ज : ९, १०, २०६
राष्ट्रीय विकास मंडळ : २७२
राष्ट्रीय शिक्षण : ४४४, ४६६
राष्ट्रीय संपत्ती १६१, ३१४, ३३३, ३५२
राष्ट्रीय सभा : ४४४, ४४६
राष्ट्रीयीकरण : ३१८, ३२०, ३२५, ३२९, ३३३, ३५०–५१, ३५६, ३६१
राहणीचे मान : १६१, ३१२, ३१४, ३१७,

३२१, ३२६–२७, ३२९–३०, ३३३, ३३८–३९, ३६७, ३७२, ३७५, ३९९
रिकार्डो १५९, १६७
रिझर्व्ह बँक : ११, १२, १५, १७७, ३५६, ३८६, ३९१, ४०१
रूझवेल्ट, प्रे. : ४८–५४, २१६–१८, ३००, ३०२, ३०६, ३०८
रूरल इंडस्ट्रीज प्लॅनिंग कमिटी : ४२३, ४२५
रेडिंग, लॉर्ड : ७, १०–१२, १४
रोजगार : ३९९, ४०३, ४०५–०६, ४१६–४१८, ४२१, ४२३, ४२६
रौप्यमान पद्धती : २७, ४६–४८, ५०, ५१, १२८–२९, २१७
रौप्यसंचय : ४७, ५७

लियाकत अली खान : ३१९, ३२५
लिस्ट : १४३, १५९, १६४
ली कमिशन : ९
लीज–मोदी करार : २२८–२९
लोकनाथन, श्री. : २३२, २३५
लोकशाही : ७३, ७५, २९७, ३३२, ४५०, ४५२–५३, ४५५–५६, ४५९, ४६१
लोकशाही विकेंद्रीकरण : २७४, ४४८, ४५४, ४५६
लोकशिक्षण : १५, २२, ३३, ४५, ५२, ५५, ६०, ६३, ६५, १५६, १९९, २०४, २०७, २२०, २२३, २२७, २३०, २३६, २४०, २९६, ३०४, ३१०
लोकसभा : २६४, २८४

वंगभंग : ४४४
वर्गकलह : ३१४
वर्गसमन्वय : १७३
वाड, रा. ब. गणेश चिमणाजी : १८०, १८८, १८९
वाणीसमाज : गुजराती १९०–९३
मारवाडी १८७
वाहतूक : ३३८, ३६६, ४०६, ४१४–१५, ४२४–२५, ४३९
विकास प्रकल्प यंत्रणा : २४४
विकेंद्रीकरण : ४०५, ४१२, ४४९–५०, ४५३–५९, ४६६
विक्रीमंडळे : २९७, ३०३, ३०८–१०
विजयनगर : १८५, १८६
विदेशी बँक : २१२
विदेशी विमा कंपन्या : २१२
विधिमंडळ : ४६१
विनियंत्रण : ३१९–२०, ३२४–२५, ३२८–३०, ३८४, ३९३
विनोबाजी : २५४–५५, २५७, २५९, ४४८
वीजनिर्मिती : ३४४–४५, ३५८, ३८९
व्यक्तिस्वातंत्र्य : १६७, १७३, ४५९
व्यवस्थापक-मंडळ पद्धती : २३१, २३३–३८

शिरगणती : १८३, ४३६
शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा : ३५५
शेतकऱ्यांचा दंगा : १०२
शेतकऱ्यांच्या परस्पर साह्यकारी पेढ्या : १७७
शेतकी कमिशन : १०६, १११–१२, १३७, १६०, १९९, २०३, २२०
शेतमजूर-चौकशी समिती : ४००
शेतसारा : १०१
शेती उत्पादन : २४१, २४३, ३४७, ३४९, ३५०, ३५५, ३५८, ३६३, ४००, ४१३
शेतीची पुनर्घटना : ३४९–५१
शेतीमाल : २८०, ३३१, ३७२, ३८५, ४२६
शेतीमालाची विक्री : ३५०, ३५८
शेतीमालाची संपादणी : ३५०
शेतीमालाच्या किंमती : ३५३, ३५५, ३८६
शेती विकास : ३५०
शेतीसुधारणाविषयक कार्यक्रम : २४३

संततिनियमन : १३५–३६, १६०
संघराज्य : ४०८, ४३८–३९, ४४३
संघराज्य सरकार : ४३९, ४४१–४२

संपत्तीची व प्राप्तीची विषमता : ३५७
संपत्तीचे केंद्रीकरण : ३६०, ४००
संयुक्त महाराष्ट्र परिषद : ४३२, ४४०
संयुक्त राष्ट्रसंघ : ३६९, ३७३
संरक्षण-निधी : २७४, २७६–७९
सट्टेबाजी : ३९, ४०, ९४, ९८, ९९, १३१, २३४–३५, २३८, ३३४, ३७१
सत्ता-विभाजन : ४५८
सत्तेचे विकेंद्रीकरण : ४२९
सनदी नोकर : ८–१०, १५
सप्रू, सर तेजबहादूर : १२, १३
समाजवाद : ३१३, ३१५, ३१८, ३३१, ३३३, ४५८
समाजवादी : २९६, ३०६, ३१५–१६, ३१९
समाज-विकास-प्रकल्प : ३८२, ३९५
कारभार यंत्रणा २४३
समाजसत्ता : ४४८
समाजसत्तेचे विभाजन : ४५९
समायिक उत्पादन : २४७
समूह-विकासयोजना : ४०६
सहकारी अर्थव्यवस्था : ४५७
सहकारी खरेदीविक्री मंडळ : २७८
सहकारी खाते : ४१८
सहकारी ग्राहक मंडळ्या : २८३
सहकारी चळवळ : १११–१२, १६१, १७७, २०३, ३९५, ४२६, ४५७
सहकारी जिल्हा बँक : ६७
सहकारी पतपेढ्या : १११, १३२, २०३, ३५६
सहकारी भांडवल व भागीदारी : १७७
सहकारी मंडळ्या : १११–१२, २८१
सहकारी व्यवस्था : ४५९–६०
सहकारी शेती : ७१–७४, २४७, ३४९–५०, ३७१
सहकारी संघ : ६६, ७०
सहकारी संघटना : २५१, ३५०
सहकारी संस्था : २४२–४३, २५९, २७८, २७९, ३५१, ४१५, ४१७–१८, ४५३, ४५४, ४५७–५९;
प्राथमिक २४२
सहकारी सोसायटी : ६७, ४७४
साखर कारखाना : २८२, ४२४
साठेबाजी : ३३४, ४००
सामाजिक क्रांती : ८३, ३७५
सामुदायिक व सहकारी उत्पादन-संघटना ३५०
साम्यवाद : ३३१, ३३३
साम्यवादी : ३०६, ३१६, ३४०
साम्राज्यशाही : ३७१
सायमन कमिशन : २०५
सार्वजनिक कंपनी : ३३१–३६, ३३३
सार्वमत : ४३६–३८
सार्वराष्ट्रीय कर्ज : २०, २२
सार्वराष्ट्रीय खंडणी : २०, २२
सार्वराष्ट्रीय परिषद : १२६, ४४२
सार्वराष्ट्रीय पेढी : १८, १९, २१, ३०
सार्वराष्ट्रीय पैसा : ४४
सार्वराष्ट्रीय बाजारपेठ : ३६१
सार्वराष्ट्रीय व्यवहार : २९२, २९४–९५, ३०५
सार्वराष्ट्रीय व्यापार : ६०, २१६, २१८, २२९, ३१७
सार्वराष्ट्रीय श्रमविभाग : ३०५
सार्वराष्ट्रीय स्पर्धा : ३३१
सार्वराष्ट्रीय : पाहा, 'आंतरराष्ट्रीय'
सिलेक्ट कमिटी : २३९, ३५२–५३
सुधारणापट्टी : ३५६
सुवर्ण : निधी ३०, ३१, ३३, ३९
संग्रह २७–२९
संचय ३१, ३२, ३९, ४०, ५७
सुवर्णमानपद्धती : २३, २५–२९, ३१–३५, ३८–४०, ४२, ४३, ४५, ४६, ५६–५८, ६०, १२९–३०, १५५–५६, १६१, २१६–१८
सेरांग : ३, ५
सेठना, सर फिरोझ : ११, १२, १४

स्थानिक संस्था : २०७, ४५९
स्वदेशी : १३१, १७२, २०८–१०, ४४४, ४४६, ४६६
स्वनियंत्रण : ४५८
स्वयंनिर्णयाचे तत्त्व : ४३५
स्वयंशासन : ४५१–५२
स्वराज्य : ७–११, १३, १५, १९४, २०५, २०६, ३०८, ३१९, ३३१, ४२९, ४४४–४४६, ४५६, ४६६
स्थानिक स्वराज्य संस्था : ८२, ३३४, ४३०, ४३१, ४३९
स्वायत्तता : ४३४, ४५१, ४५३–५४, ४५६, ४५९–६०;
प्रांतिक ८, ४२९
स्वायत्त समाज : ४५५
स्वावलंबन : ४५८–५९
हिंदीकरण : १०
हिंदी कायदेमंडळ : ९
हिंदी खलाशी : ३, ४, ५
हिंदी दप्तरे : १८१
हिंदी नौकानयन कमिटी : १४
हिंदी मंत्रिमंडळ : १०
हिंदू–मुस्लिम करार : ४६६
हिल्टन यंग कमिशन : १३०
हुंडणावळ ८, ११, १२, १६–१८, २८, ३०, ३२, ३८, ३९, ४५, ५६, ५९, ९६, १२९–३२, १५३ १५६, १६१, २६२, २९५, ३२३
हुंड्या : ३१, ४३
हुकूमशाही : ७३, ७५, ४५२, ४५४, ४५९
हूवर, प्रेसिडेंट : १६, २१, ४२, ३००